**जाहिरातींचे दर.**

खालील पत्त्यावर चौकशी करावी.

व्यवस्थापक, अर्थ, 'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

**वर्गणीचे दर.**

वार्षिक वर्गणी रु. ४

(टपाल हंशील माफ)

किरकोळ अंकास एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ८ — पुणें, बुधवार, तारीख ७ जानेवारी, १९४२ — अंक १

## 'आम्हांला कल्पना नव्हती!!!'

कारखान्याचा व्याप इतक्या मोठ्या प्रमाणावर वाढला असेल, नवी इमारत इतकी भव्य व सोइस्कर असेल, औषधनिर्मिती इतकी शास्त्रशुद्ध व आधुनिक पद्धतीची असेल, जुन्यानव्याची सांगड इतकी उत्कृष्ट घालून औषधांच्या स्टँडर्डायझेशनकरितां इतके कसोशीनें प्रयत्न केले असतील अशी आम्हांस कल्पना नव्हती

**असे उद्गार**

महाराष्ट्र कर्नाटक मेडिकल कॉन्फरन्सकरितां जमलेल्या तीनशें डॉक्टर्सनीं

**आयुर्वेद रसशाळा पुणें लिमिटेड**

ह्या प्रमुख देशी औषधी कारखान्यास भेट दिली त्यावेळीं काढले.

**कारखान्याला हें यश**

आयुर्वेद महाविद्यालयांतील तज्ज्ञांच्या देखरेखीखालीं तयार झालेल्या व शेठ ताराचंद रामनाथ धर्मार्थ आयुर्वेदीय हॉस्पिटलमध्यें पारखून गुणकारी ठरलेल्या

**रक्तवर्धक, कॅल्सीप्राल, बालजीवन, उपनाह, वगैरे पेटंट व लोकप्रिय औषधांमुळेंच मिळालें.**

दरसाल बिनचूक नफा वाटणाऱ्या ह्या कारखान्याचे शेअर्स व औषधें

## आयुर्वेद रसशाळा पुणें लिमिटेड, पु[illegible]

...र्थिक उन्नतीच्या दृष्टीनें
अनेक उदाहरणें
...णाऱ्या ... चळवळी-
... हें कार्य अपरि-

SERVANTS OF INDIA SOCIETY'S LIBRARY POONA 4

Withdrawn From The S.I.S. Library

# विविध माहिती

### कामगारांच्या रहाणीच्या खर्चाचें मान

१५ डिसेंबर १९४१ अखेर संपलेल्या महिन्यांत मुंबई शहरांतील कामगारांच्या रहाणीच्या खर्चाचें मान जून १९३४ मधील खर्चाचे मानापेक्षा २९% अधिक होतें. नोव्हेंबरमध्यें तें २६% अधिक होतें.

### रबराची निर्गत

ब्रिटिश हिंदुस्थानांतून १९४२ च्या पहिल्या तिमाहींत ५,३२५ टन रबराची निर्गत होण्यास परवानगी आहे.

### त्रावणकोर बँक

त्रावणकोर नॅशनल अँड क्विलॉन बँकेच्या त्रावणकोर बाहेरील सर्व घेणेकऱ्यांस रुपयांत आठ आणे डिव्हिडंड मिळणार आहे. त्रावणकोरमधील घेणेदारांस हें डिव्हिडंड अगोदरच मिळालेलें आहे.

### सिमला येथें घरांची अडचण

ज्यांचे पति परदेशीं गेलेले आहेत, अशा स्त्रियांस सिमला येथें राहण्यासाठी घरें मिळणार नाहींत. तेथील अधिकारीवर्ग व नोकरवर्ग ह्यांसच पुरेशी रहाण्याची जागा मिळणें अवघड झालें आहे.

### जमीन महसुलाची वसुली

मुंबई प्रांतांत १९४०–४१ मध्यें एकूण ३,९२,६५,००० जमीन महसूल वसूल झाला. म्हणजे, येण्यापैकी ९९.६% येणें वसूल झालें. एकूण ५९ लक्ष रुपयांची तहकुबी व १६३/४ लक्ष रुपयांची माफी देण्यांत आली.

### आंब्यांस मोहोर छान लागला

कोकणांत आंब्यांस मोहोर चांगला येऊं लागला आहे, परंतु तयार आंबे बाहेर पाठविण्यास अडचण येणार असल्याकारणानें आंब्यांस चांगला भाव येणार नाहीं, अशी अपेक्षा आहे.

### हिंदी सरकारी रेल्वेजचें उत्पन्न

हिंदी सरकारी रेल्वेजना १ एप्रिल, १९४१ ते २० डिसेंबर, १९४१ अखेर ८८ कोटि, ८५ लक्ष रुपये उत्पन्न झालें. १९३९-४० च्या व १९४०-४१ च्या तत्सम मुदतींतील उत्पन्नापेक्षा हा आकडा अनुक्रमें २१ कोटि व १२३/४ कोटि रुपयांनीं जास्त आहे.

### रशियाच्या कणखरपणाचें रहस्य

रशियानें जर्मन–हल्ल्यांचा एवढ्या यशस्वी रीतीनें प्रतिकार केला, त्याचें मर्म रशियाची शास्त्रीय प्रगति हें आहे, असें सर सी. व्ही. रामन ह्यांनीं नुकतेंच एका भाषणांत सांगितलें. शास्त्रीय प्रगतीचें व संशोधनाचें महत्त्व रशिया जाणतो, असें ते म्हणाले.

### युद्ध–खर्च

जुलैपासून प्रारंभ होणाऱ्या येत्या वर्षांत अमेरिकन सरकारचा जेवढा एकूण खर्च चालू वर्षीं, त्याची निम्मी रकम युद्धकार्यी खर्च पडणार आहे. ... च्या युद्धखर्च एकूण खर्चाच्या २७% आहे.

### ...गाड्यांशीची वहातूक

... अभावीं सुमारें एक लक्ष गासड्या ... स्टेशनांत पडून आहे.

### पेट्रोलच्या वापरावर नियंत्रण

हिंदुस्थानांत दरमहा सरासरीनें एक कोटि गॅलन पेट्रोल खपतें, त्यांपैकीं बहुतेक ब्रह्मदेशांतून येतें. ऑगस्ट, १९४१ मध्यें पेट्रोल रेशनिंगची योजना अमलांत आली, तिनें पेट्रोलचा खप २०% कमी केला. जानेवारी, १९४२ पासून तो ४०% कमी करण्यांत आला आहे.

### म्हैसूर पेपर मिल्स लि.

वरील कंपनीस ३० सप्टेंबर, १९४१ अखेर संपलेल्या वर्षी ६ लक्ष रुपये नफा झाला, त्यांतून शिलकी तोटा ( १ लक्ष, १५ हजार रुपये ) भरून काढला, ६५ हजार रुपये व्याजाचे दिले, २ लक्ष ३० हजार रुपये रिपोर्टाच्या वर्षाबद्दल घसारा काढला व ३४ हजार रुपयांचा विनियोग पूर्वी घसारा काढावयाचा राहिला होता, त्याकडे करण्यांत आला.

### चुंगकिंग–कलकत्ता वैमानिक दळणवळण

चुंगकिंग ( चीन ) व कलकत्ता ह्यांचेमध्यें वैमानिक दळणवळणास प्रारंभ झाला आहे. ह्या दोन शहरांमधील प्रवासास ८१/२ तास लागतात.

### क्वेटा येथें धरणीकंप

ता. २९ डिसेंबर रोजीं क्वेटा येथें दोनदा धरणीकंप झाला, त्यामुळें घरें जोरानें हादरलीं. परंतु नुकसान कांहीं झालें नाहीं.

### आयर्लंडमध्यें चहावर नियंत्रण

हिंदुस्थानांत विकत घेतलेला चहा आयर्लंडला पोचविणें अवघड होत असल्याकारणानें जानेवारी १९४२ मध्यें दर आठवड्यास दर माणशीं फक्त अर्धा औंस चहाच मिळेल. ह्यापूर्वी एक औंस चहा वाटण्यास येत असे.

### हिन्दी युद्ध–कर्जे

हिन्दी युद्ध–कर्जे २० डिसेंबर, १९४१ अखेर १ अब्ज, ८१/२ कोटि रुपयांचीं खपलीं आहेत.

### सिंधू नदीवर आणखी एक धरण

सिंधू नदीवर, खालच्या भागांत, आणखी एक धरण बांधण्याचा सरकारचा विचार असल्याचें त्या प्रांताच्या गव्हर्नरांनीं बोलून दाखविलें. सक्करच्या धरणामुळें त्याचे पाण्याखालील जमिनी धारण करणारांची सुबत्ता झाली आहे, तेव्हां दुसरें एक धरण आणखी खालीं बांधणें उपयुक्त ठरेल, असें ते म्हणाले.

### डच सैनिकांसाठी चहा

डच ईस्ट इंडीजमधील चहाच्या मळेवाल्यांनीं ब्रिटिश फौजेंत लढत असलेल्या डच सैनिकांसाठी ३० हजार पौंड चहा ग्रेट ब्रिटनकडे पाठविला आहे. वाहतुकीचा व इतर सर्व खर्च मळेवाल्यांनींच केला आहे.

### बाजारभाव नियंत्रण परिषद

वरील परिषदेचें अधिवेशन दिल्ली येथें ता. ५ व ६ फेब्रुवारी रोजीं भरणार आहे. जीवनास आवश्यक असलेल्या जिनसांचा पुरवठा अखंड राखण्याच्या प्रश्नाचाहि विचार परिषदेंत होईल.

### हिंदी कपास कापडाच्या गिरण्या

३१ ऑगस्ट, १९४१ अखेर संपलेल्या वर्षी हिंदुस्थानांत एकूण ३९० गिरण्या चालू होत्या व त्यांचें वसूल भांडवल ४४ कोटि, ४७ लक्ष रुपये होतें. सर्व गिरण्यांत मिळून २१ लक्ष, २५ हजार खंडी कपास खपली. त्यांतील कामगारांची संख्या ४ लक्ष, ९० हजार भरली.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | २ |
| २ अर्थशास्त्र परिषद ... | ३ |
| ३ हिंदी सहकारी पतपेढ्यांची सद्यःस्थिति ... | ४ |
| ४ स्फुट विचार ... | ५ |
| युद्ध आणि नूतन वर्ष—अँग्लो-अमेरिकन युद्ध-सहकार्य—अर्थशास्त्र परिषदेंतील चर्चा—बॉंबे को. कार्टेली—सह्याद्रि रानडे विशेषांक—चित्रमयजगत् खास महायुद्ध अंक | |
| ५ महाराष्ट्र औद्योगिक परिषद व प्रदर्शन ... | ८ |
| ६ भिक्षा मागण्याच्या धंद्याची इतिश्री ... | ९ |
| ७ निवडक बाजारभाव ... | ९ |



# अर्थ

बुधवार, ता. ७, जानेवारी १९४२


## अर्थशास्त्र परिषद

अखिल भारतीय अर्थशास्त्र परिषद यंदा मुंबई येथें प्रांतिक विश्वविद्यालयाच्या विद्यमानें नाताळांत भरली होती. राजकारण-शास्त्र व अर्थशास्त्र ह्यांचा परस्पर संबंध अत्यंत निकट असल्यानें त्यांच्या परिषदा एकाच वेळीं व एकाच ठिकाणीं भरवण्याचा उपक्रम गेल्या वर्षी म्हैसूर येथें करण्यांत आला आणि त्याच धोरणानें मुंबईस दोन्हीं परिषदांचीं अधिवेशनें एकत्र झालीं. अर्थ-शास्त्र परिषदेच्या अधिवेशनाचे दोन विशेष येथें नमूद केले पाहि-जेत. तिच्या यंदाच्या अधिवेशनांत परिषदेचा रौप्य महोत्सव साजरा करण्यांत आला आणि भारतीय अर्थशास्त्राचे आद्य प्रणेते, न्यायमूर्ति रानडे, ह्यांच्या जन्माचा शतसांवत्सरिक उत्सवहि उरकण्यांत आला. भारतीय अर्थशास्त्रीय परिषदेच्या स्थापनेस पंचवीस वर्षें होऊन तिचें कार्य जोमानें चाललें आहे ही अत्यंत समाधानकारक आणि अभिनंदनीय गोष्ट होय. हिंदुस्थानची विशिष्ट परिस्थिति लक्ष्यांत घेतली जाऊन तिला अनुरूप अशा पद्धतीनें अर्थशास्त्राचा अभ्यास व सिद्धांत ह्यांची जुळणी कर-ण्याची परंपरा न्यायमूर्ति रानडे ह्यांनीं चालू केली आणि तिचा अंगिकार आतां सार्वत्रिक झालेला पाहून विचारवंतांस आनंद वाटणें स्वाभाविक आहे. परवाची अर्थशास्त्र परिषद ही मुंबईस भरलेली चौथी परिषद होय आणि ह्या प्रांताचें हिंदुस्थानच्या आर्थिक प्रगतीच्या प्रयत्नांतलें अग्रेसरत्व लक्षांत घेतां यंदाचें परिषदेचें अधिवेशन मुंबईस होण्याचें औचित्य सहज लक्षांत येण्यासारखें आहे. परिषदेच्या अधिवेशनाचें उद्घाटन सर पुरुषोत्तमदास ठाकुरदास ह्यांच्यासारख्या व्यापार व उद्योगधंदे ह्यांमध्यें अग्रणी असलेल्या पुढाऱ्याच्या हस्तें झालें हेंहि अन्वर्थकच होय. एकंदरीनें अर्थशास्त्र परिषदेच्या मुंबईच्या यंदाच्या अधिवेशनाचा योग असामान्य होता असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं.

सर पुरुषोत्तमदास ह्यांचें भाषण त्यांच्या औद्योगिक पुढारी-पणास आणि व्यवहारचातुर्यास साजेल असेंच झालें. मुंबईच्या व्यावहारिक अग्रेसरत्वाचें वर्णन करून त्यांनीं आर्थिक उन्नति व अर्थशास्त्रीय संशोधन ह्यांचा किती निकट संबंध आहे ह्याचें दिग्दर्शन केलें. युद्धजन्य परिस्थितीच्या हिंदी उद्योगधंदे व व्यापार ह्यांच्यावर होणाऱ्या परिणामांचें विवेचन त्यांच्या भाषणांत येणें यथोचित होतें. युद्धोत्तर काळांत जगाची आर्थिक घडी कशी बसवली जावी याविषयीं चोहोकडे चर्चा चालली आहे, तथापि ह्या पुनर्घटनेंत हिंदुस्थानास राष्ट्रीय स्वातंत्र्याचें स्थान प्राप्त झाल्यावांचून ह्या देशाच्या आर्थिक उन्नतीचें भवितव्य आशा-जनक होण्याचा संभव नाहीं असें त्यांनीं स्पष्टपणानें बोलून दाखवलें. युद्धसामुग्रीचें उत्पादन ह्या देशांत वाढलें आहे खरें, परंतु गेल्या महायुद्धाच्या अनुभवानें शहाणपणा शिकून सरकारनें ह्या पूर्वींच स्वदेशी उद्योगधंद्यांस कां सहाय दिलें नाहीं असा खोचदार प्रश्न सर पुरुषोत्तमदास ह्यांनीं केला. हिंदी तरुण विला-यतेस यांत्रिक शिक्षण घेण्यासाठी पाठवण्यांत येत आहेत, पण ह्या पूर्वींच अशी व्यवस्था हिंदी जनतेची सारखी टोचणी अस-तांहि करण्यांत आली नाहीं. सरकारच्या रेलवेज वगैरेसाठी ब्रिटिश कारखानदारांकडून मोठ्या प्रमाणावर माल खरेदी करण्यांत येत असतो, त्यांनीं हिंदी तरुणांस आपल्या धंद्यांचें शिक्षण देण्याची व्यवस्था केली पाहिजे अशी अट घातली जाण्याची सूचना अनेकवार करण्यांत आली असतां तिच्याकडे दुर्लक्षच झालेलें आहे ह्या गोष्टीचाहि सर पुरुषोत्तमदास यांनीं उल्लेख केला. हिंदी शेतकऱ्यांच्या प्राप्तींत भर पडण्याचें आणि त्यासाठी खास प्रयत्न होण्याचें महत्वहि त्यांनीं विस्तारानें प्रतिपादलें.

अर्थशास्त्रज्ञ आणि आर्थिक व्यवहारज्ञ ह्यांचा निकट संबंध येऊन त्यांचे प्रयत्न परस्पर-पोषक कसे होतील ह्या प्रश्नाची बोध-प्रद चर्चा सर पुरुषोत्तमदास ह्यांनी केली. हिंदी अर्थशास्त्रज्ञांची कामगिरी अत्यंत उपयुक्त होत असल्याविषयीं त्यांनीं समाधान व्यक्त केलें आणि हिंदुस्थान सरकारनेंहि त्यांच्या सल्ल्याचा उपयोग करून घेण्याचें धोरण अंगिकारलें आहे त्याचा अभिनंदनपर निर्देश केला. हिंदुस्थानच्या भावी घटनेसंबंधानें सूचना करण्या-साठी योग्य ती चर्चा राजकारणशास्त्र परिषदेंत व्हावी आणि राजसत्तेची आर्थिक व्यवहाराविषयीं कशा प्रकारची भूमिका असावी ह्या प्रश्नाचा विचार दोन परिषदांनीं संयुक्त रीतीनें करावा असें ते म्हणाले.

अर्थशास्त्र परिषदेचे अध्यक्ष, डॉ. नियोगी, ह्यांनीं आपल्या भाषणांत अर्थशास्त्राच्या अभ्यासाची व्यवस्था हिंदी विश्व-विद्यालयांत पद्धतशीर व कार्यक्षम होण्याच्या आवश्यकतेवर विशेष जोर दिला. ह्या देशाचे अनेक बिकट आर्थिक प्रश्न सोड-वण्याची जबाबदारी हिंदी अर्थशास्त्रज्ञांवर येऊन पडली असल्या-कारणानें ह्या विषयास खास महत्व प्राप्त झालें आहे असें सांगून विश्वविद्यालयीन आर्थिक अभ्यासक्रमाची त्यांनीं छाननी केली. माहिती डोक्यांत सांठवण्यापेक्षा तिचा शास्त्रीय रीतीनें उपयोग करण्याची प्रवृत्ति विद्यार्थ्यांमध्यें वाढावणें आवश्यक असून अभ्यासक्रमास त्या दिशेनें वळण लावण्याची आवश्यकता डॉ. नियोगी ह्यांनीं प्रतिपादिली.

अर्थशास्त्रीय सिद्धांतासंबंधानें नवीन विचार व नवीन तर्क-पद्धति ह्यांचा अंगिकार पाश्चात्य देशांत करण्यांत येत आहे त्याचें परिशीलन व उपयोग हिंदुस्थानच्या आर्थिक उन्नतीच्या दृष्टीनें आवश्यक आहे, हें डॉ. नियोगी ह्यांनीं अनेक उदाहरणें देऊन सिद्ध केलें. प्रत्यक्ष उद्योगधंद्यांत वावरणाऱ्या ... चळवळी-अशी असते कीं त्यांच्या व्यवहारांत उद्भ... हें कार्य अपरि-

प्रश्न ह्यांच्या दृष्टीनें अर्थशास्त्रज्ञांच्या तार्किक वादांपासून कांहींच फलनिष्पत्ती होत नाहीं; अर्थशास्त्र-पंडीत व धंदेवाले लोक ह्यांचा विचारविनिमय होण्याची व्यवस्था झाली आणि अर्थशास्त्रज्ञहि व्यावहारिक प्रश्नांचा परामर्श घेऊं लागले तर ह्या तक्रारीस जागा रहाणार नाहीं ही तोड डॉ. नियोगी ह्यांनीं येथें सुचवली आहे. कारखानदार व घाउशी धंदेवाले आणि अर्थशास्त्रज्ञ ह्यांचें सहकार्य होण्याची आवश्यकता मुंबईसारख्या उद्योगधंद्याच्या माहेरघरांत प्रतिपादण्यांत त्यांनीं औचित्य प्रकट केलें आहे ह्यांत शंका नाहीं. आपल्या विचारसरणींत व्यावहारिक दृष्टि ठेवणें हें अर्थशास्त्रज्ञांस जसें आवश्यक आहे तसें अर्थशास्त्रीय संशोधनास सहाय देऊन त्याचा औद्योगिक प्रगतीस उपयोग करून घेण्याची जबाबदारी धंदेवाल्या लोकांवर येऊन पडते ही गोष्ट त्यांनीं मार्मिक रीतीनें पुढें मांडली. युद्ध परिस्थितींत व युद्धोत्तर काळांत मोठे विकट प्रश्न उपस्थित होत आहेत आणि होणार आहेत, ते सोडवण्याची कार्यक्षम तरतूद व्हावी ह्या उद्देशानें आर्थिक संशोधनासंबंधानें त्यांनीं केलेल्या सूचनांस मूर्त स्वरूप देण्याचें अगत्य सर्वांस पटण्यासारखें आहे.

## हिंदुस्थानांतील सहकारी पतपेढ्यांची सद्यःस्थिति

### रिझर्व्ह बँकेच्या ॲ. क्रे. खात्याचा आढावा

हिंदुस्थानांतील सहकारी पतपेढ्यांची संख्या, पतपेढ्यांचे सभासद व पतपेढ्यांचें खेळतें भांडवल, ह्यांचे तुलनात्मक आकडे खाली दिले आहेत, त्यावरून १९१० पासून आतांपर्यंत पतपेढ्यांची झालेली प्रगति लक्षांत येईल. गेल्या महायुद्धानंतरच्या काळांत पतपेढ्यांचे वाढीस चालना मिळाली, परंतु मंदीचा काळ आल्यानंतर ती प्रगति टिकलेली आढळत नाहीं.

| पांच वर्षांची सरासरी | सोसा.सं. (हजार) | सभासद (लक्ष) | खेळतें भांडवल (कोटि रु.) |
|---|---|---|---|
| १९१०-११ ते १९१४-१५ | १२ | ५·५ | ५·४८ |
| १९१५-१६ ते १९१९-२० | २८ | ११·३ | १५·१८ |
| १९२०-२१ ते १९२४-२५ | ५८ | २१·५ | ३६·३६ |
| १९२५-२६ ते १९२९-३० | ९४ | ३६·९ | ७४·८९ |
| १९३०-३१ ते १९३४-३५ | १०६ | ४३·२ | ९४·६१ |
| १९३७-३८ | १११ | ४८·५ | १०३·०२ |
| १९३८-३९ | १२२ | ५३·७ | १०६·५६ |
| १९३९-४० | १३७ | ६०·८ | १०७·१० |

१९३९–४० अखेर हिंदुस्थानांत एकूण १,१८,५४४ शेतकी सोसायट्या होत्या, त्यांपैकी १,०१,४०१ म्हणजे ८५% क्रेडिट सोसायट्या होत्या. सर्व शेतकी सोसायट्यांचे मिळून ४१ लक्ष सभासद होते व त्यांचें खेळतें भांडवल ३०½ कोटि रुपये होतें. त्यांपैकी शेअर भांडवल ४ कोटि, ८ लक्ष रुपये व रिझर्व्ह व इतर फंड ८ कोटि, २७ लक्ष रुपये होते. सभासदांच्या व बिगर सभासदांच्या ठेवींचा आकडा अनुक्रमें १ कोटि, २४ लक्ष व १ कोटि, १९ लक्ष रुपये भरला. प्रांतिक व मध्यवर्ती सहकारी बँकांचीं सोसायट्यांकडील येणें कर्जें १५ कोटि ५५ लाखांचीं [illegible]ण खेळत्या भांडवलाशीं सोसायट्यांच्या स्वतःच्या [illegible]४०% पडलें. (भाग भांडवल १३ % व [illegible] फंड २७%) सभासदांच्या ठेवींचें एकूण खेळत्या भांडवलाशीं प्रमाण ४% होतें. सोसायट्यांच्या एकूण खेळत्या भांडवलापैकी ५१% भांडवल म्हणजे बँकांचीं कर्जें होतीं. कित्येक सोसायट्यांच्या रिझर्व्ह फंडाचा आकडा केवळ दर्शनीच असण्याचा संभव आहे, कारण नफ्यांतून बुडीत कर्जाची तरतूद करण्याचे अगोदरच रकम फंडांत टाकली जाणें शक्य आहे व रिझर्व्ह फंड बहुंशीं सोसायटीचे व्यवहारांतच गुंतविलेला असावयाचा. सहकारी चळवळीच्या मुळाशीं बचतीची कल्पना आहे ती येथें आढळून येत नाहीं व सोसायट्यांचें बाहेरील भांडवलावरील अवलंबन वाजवीपेक्षा अधिक आहे. शहरांतील सुखवस्तु लोकांचे पैसे प्रांतिक व मध्यवर्ती बँकांचे मार्फत सोसायट्यांचे द्वारा त्यांच्या सभासदांस कर्ज म्हणून देऊन गुंतविण्याचा सहकारी चळवळ हा एक राजमार्गच होऊन बसला आहे!

१९३९-४० अखेर सोसायट्यांकडे एकूण २३ कोटि १४ लक्ष रुपयांचीं कर्जें येणें होतीं, त्यांपैकी १० कोटि, ७१ लक्ष रुपयांचीं कर्जें थकलेलीं होतीं. थकबाकीची रकम ठरविण्याची कित्येक प्रांतांतील असमाधानकारक व वेगवेगळी पद्धति आणि तहकुबी देण्याची प्रथा ही लक्षांत घेतां वरील आकडे दर्शवितात त्यापेक्षा सोसायट्यांची परिस्थिति वाईट असली पाहिजे असें अनुमान निघतें. कर्जें थकल्यामुळें सोसायट्यांच्या व्यवहारांवर अनिष्ट परिणाम झाला, आणि मध्यप्रांत व वऱ्हाड, बिहार, ओरिसा, बंगाल, ह्या प्रांतांत सहकारी संस्थांचे व्यवहार बंद पडण्याची पाळी आली. १९३९-४० सालीं सबंद हिंदुस्थानांत मिळून सोसायट्यांनीं ७ कोटि, ४४ लक्ष रुपयांचीं नवीं कर्जें दिलीं व त्यांची ७ कोटि, ९६ लक्ष रुपयांची वसुली झाली. नवीन कर्जांत कांहीं जुन्या कर्जांचीच मुदत वाढविली असलेल्या रकमांचा समावेश झालेला आहे. १९२८-२९ सालीं १२ कोटि, ५५ लक्ष रुपयांचीं नवीं कर्जें दिलीं गेलीं होतीं. म्हणजे, १९३९-४० मधील तत्सम आकडा १९२८-२९ चे मानानें सुमारें निम्म्याइतकाच आहे. अर्थात् ह्या मुदतींत बाजारभाव उतरले असल्या कारणानें, त्या प्रमाणांत चलनाची किंमत वाढली, ही गोष्ट लक्षांत घेऊनच वरील आकड्यांकडे पाहिलें पाहिजे.

सोसायट्यांच्या वर्गीकरणाची पद्धत वेगवेगळ्या प्रांतांत भिन्न असली, तरी ड आणि ई शेरा मिळालेल्याच सोसायट्यांची संख्या फार मोठी आहे व अ आणि ब वर्गांत फार थोड्या सोसायट्या आहेत, हें खालील तक्ता दर्शवितोः—

### शेतकी सोसायट्यांचें वर्गीकरण

प्रत्येक शंभरांतील वर्गवारी

| प्रांत | अ | ब | क | ड | ई | इतर |
|---|---|---|---|---|---|---|
| मुंबई | ५·५ | २६·२ | २५·८ | ४२·१ | ... | १·४ |
| मद्रास | ३·९ | १५·४ | ६९·५ | ११·२ | ... | ... |
| पंजाब | २·२ | १४·२ | ६१·८ | १८·६ | | ३·२ |
| बंगाल | ·१ | १·३ | ४६·८ | १२·९ | १२·५ | २६·४ |
| सं. प्रांत | ·१ | १·५ | ४५·१ | ३७·१ | १५·९ | |
| मध्यप्रांत | | | | | | |
| वऱ्हाड | ·३ | ५·२ | ७०·७ | १८·२ | ५·६ | ... |
| बिहार | ·९ | ६·४ | ६६·४ | २१·४ | ४·९ | ... |
| ओरिसा | ·४ | २·८ | ५१·९ | ३०·६ | १२·८ | १·५ |
| आसाम | ·६ | ५·७ | ५२·१ | ४१·५ | ·१ | |
| सिंध | १·७ | २८·८ | २९·३ | १०·७ | ... | २९·५ |
| सरहद्दप्रांत | १·६ | ८·१ | ६९·९ | ५·८ | ... | १४·६ |
| दिल्ली | ... | १९·२ | ४७·४ | २७·७ | ... | ५·७ |
| अजमीर मारवाड | २·१ | २५·९ | ४५·३ | १८·५ | | ८·२ |
| कूर्ग | १५·७ | ४३·६ | ३०·७ | ८·९ | ११ | |

## स्फुट-विचार

### युद्ध आणि नूतन वर्ष

युद्ध चालू झाल्यास आतां अडीच वर्षे झालीं आहेत आणि नाताळानंतर नूतन वर्षारंभाचे प्रसंगीं मागील चढामोडींचा आढावा काढून पुढील कार्यक्रमाची आखणी करणें आवश्यक आहे. मि. चर्चिल व हिंदुस्थानचे सर सेनापति ह्यांनीं आतांपर्यंतची कामगिरी व चालू वर्षांत करावें लागणारें कार्य ह्यांची कल्पना दिली आहे. रशिया, लिबिया व अटलांटिक महासागर येथील युद्धक्षेत्रांत शत्रूचे प्रयत्न निष्फळ ठरून त्याची पीछेहाट होत आहे. पॅसिफिक महासागरांत फिलिपाइन्स व मलाया ह्यांचे मध्यें सध्या घुमश्चक्री चालली आहे. जपाननें अकस्मात हल्ले करून अमेरिका व इंग्लंड ह्यांची कांहीं ठाणीं घेतलीं आहेत व त्याची प्रगति कित्येक क्षेत्रांत हळुहळू होत आहे. परंतु वॉशिंग्टनमध्यें प्रेसिडेंट रूझवेल्ट व मि. चर्चिल ह्यांनीं चर्चा करून एकसूत्री युद्धाचा कार्यक्रम आखला आहे तो अमलांत येऊं लागतांच जपानच्या प्रगतीस आळा बसेल. चालू वर्षांत जपान व जर्मनी ह्यांच्या हालचालींचें नियंत्रण होऊन पुढील सालीं त्यांचा पाडाव होईल अशा दूरदर्शी बेतानें इंग्लंड व अमेरिका ह्यांनीं तयारी केली आहे. ह्या कारणानें जपानचें पाऊल आज पुढें पडत असलेलें दिसलें तरी सरह्याची धाव कुंपणापलीकडे जाऊं शकणार नाहीं हें लक्षांत ठेवलें पाहिजे. नाताळाच्या निमित्तानें हिटलरनें केलेल्या भाषणांत इंग्लंड, अमेरिका व रशिया ह्यांच्या विषयींच्या द्वेषाशिवाय दुसरें कांहींच नव्हतें. युद्धाचें चालकत्व स्वतःच्या हातीं घेतल्याचें त्यानें समर्थन केलें आणि जर्मन जनतेनें युद्धापासून उत्पन्न होणारीं दुःखें मुकाट्यानें सहन करावीं असा त्यांस उपदेश केला. जर्मन राष्ट्रानें सबंध युरोपियन खंडाचें व जगाचेंहि रक्षण करण्यासाठीं युद्ध चालू ठेवलें पाहिजे आणि यशस्वी केलें पाहिजे हें हिटलरनें स्वतःच्या लोकांस दिलेल्या संदेशाचें सार होतें. रशिया व लिबिया ह्या देशांत जर्मन सैन्यास अपयश आलें आहे, त्यामुळें जर्मन जनतेंत असमाधान व निराशा ह्यांचा प्रसार झाला आहे. त्यावर उपाय म्हणून हिटलरला तिचें समाधान कसेंबसें करणें प्राप्त होतें. ह्यावरून जर्मनीची युद्धशक्ति क्षीण होऊन गेली आहे असें न समजतां इंग्लंडनें युद्ध जोरानें चालू ठेवणें अगत्याचें असल्याविषयीं मि. चर्चिल ह्यांनीं सूचना दिली आहे ती लक्षांत घेणें आवश्यक आहे.

### अँग्लो-अमेरिकन युद्ध-सहकार्य

हिटलरशाहीविरुद्ध झगडणाऱ्या इंग्लंड, चीन व रशिया ह्यांच्यासारख्या राष्ट्रांस युद्धसामुग्री पुरवण्याचें कार्य अमेरिकेस करावयाचें होतें, तेव्हां अमेरिकन आरमार, व्यापारी जहाजें व विमानदल ह्यांची वाटणी अटलांटिक व पॅसिफिक महासागरांत विशिष्ट योजनात्मक पद्धतीनें करण्यांत आली होती. पॅसिफिक महासागरांत अमेरिकेचे फिलिपाइन्स सारखे प्रदेश पसरले आहेत, त्यांचें संरक्षण करण्याच्या महत्त्वाची जाणीव अमेरिकन मुत्सद्यांस नव्हती असें नाहीं. परंतु युद्धाचा मारा आरंभींच्या वर्षा-दोन वर्षांत इंग्लंड व रशिया ह्यांचेवर चालून अॅटलँटिक महासागराच्या बाजूनें लोकशाही राष्ट्रांच्या स्वातंत्र्यास धोका उत्पन्न झाल्यामुळें त्या बाजूसच अमेरिकेस आपलें लढाऊ सहाय एकवटणें प्राप्त होतें. पॅसिफिक महासागरांतील स्वतःच्या हितसंबंधांकडे अमेरिकन मुत्सद्यांनीं दुर्लक्ष करून युद्धसामुग्री दुसऱ्या दिशांकडे वळवण्यांत अदूरदृष्टित्व दाखवलें असें कोणास वाटण्याचा संभव असून जपानच्या फिलिपाइन्समध्यें झालेल्या प्रगतीस अनुलक्षून त्यांस दोष लावला जाण्याचा संभव आहे. परंतु जपान युद्धांत पडण्यापूर्वी हिटलरशाहीच्या पाडावासाठीं अमेरिकेनें अॅटलँटिक महासागरांत, आफ्रिकेंत व पश्चिम रशियांत जें बहुमोल सहाय दिलें तें त्यावेळच्या युद्धपरिस्थितींत आवश्यक व योग्य होतें ह्याविषयीं सूक्ष्म विचार करणारांस शंका वाटणार नाहीं. जपाननें आकस्मिक रीतीनें चालू केलेल्या आक्रमणानंतर इंग्लंड व अमेरिका ह्या राष्ट्रांच्या मुत्सद्यांनीं रशिया, चीन, ऑस्ट्रेलिया इत्यादि राष्ट्रांच्या सहविचारानें पश्चिम व पूर्व ह्या दोन्ही बाजूंच्या रणांगणांतील परिस्थितीचा आढावा घेऊन आपल्या आर्थिक व लढाऊ शक्तीचा कमाल उपयोग कसा करावा हें तात्काळ निश्चित केलें. एवढ्यावरच ते थांबलेले नाहींत. पूर्व एशियांत इंग्लंड, अमेरिका व चीन ह्या राष्ट्रांच्या लढाऊ हालचालींत सहकार्य व एकसूत्रीपणा येणें अगत्याचें झालें असल्यानें त्याहि बाबतींत त्यांनीं विधायक योजना अंमलांत आणली आहे. जनरल वेव्हेल, हिंदुस्थानचे सर सेनापति, ह्यांस पॅसिफिकच्या दक्षिण व पश्चिम भागांत प्रमुख सेनापति नेमण्यांत आलें आहे आणि तिकडच्या लढायांचीं सूत्रें अमेरिकेच्या अनुमतीनें त्यांच्या हातीं देण्यांत आलीं आहेत ही गोष्ट अर्थपूर्ण आहे. चिनी समुद्रांत चिनी सेनापतींस असेच अधिकार देण्यांत आले आहेत आणि अमेरिकन लष्करी अधिकाऱ्यांची ह्याच प्रकारची योजना झाली आहे. आपणांवर मोठी जबाबदारी टाकण्यांत आली आहे, ती आपण कार्यक्षम रीतीनें व निश्चयानें पार पाडूं असा आत्मविश्वास सर आर्चिबाल्ड वेव्हल ह्यांनीं प्रकट केला आहे. त्यांच्या नेमणुकीबाबत अमेरिका व इंग्लंड ह्या देशांत पूर्ण समाधान व्यक्त करण्यांत आलें आहे. मित्र राष्ट्रांच्या सहकार्याचा पूर्ण एकजीव झाला असल्याचें हें स्पष्ट चिन्ह आहे आणि तें उत्तेजनकारक आहे.

### अर्थशास्त्र परिषदेंतील चर्चा

मुंबईस नाताळांत भरलेल्या अर्थशास्त्र परिषदेंत कित्येक महत्त्वाच्या प्रश्नांची चर्चा झाली. हिंदुस्थानांत अर्थशास्त्रीय विचारांची प्रगति ह्या विषयावर न्यायमूर्ति रानडे ह्यांच्या शताब्दि उत्सवाच्या निमित्तानें अनेक निबंध परिषदेस सादर करण्यांत आले होते. ह्या संबंधांत न्यायमूर्तींनीं केलेल्या बहुमोल कामगिरीचा गौरवपूर्वक उल्लेख सर्व वक्त्यांनीं केला. हिंदी अर्थशास्त्रज्ञांनीं स्वतंत्र सिद्धांतनिर्मिति केली नाहीं ह्या आरोपाचें निरसन समर्पक रीतीनें करण्यांत आलें. माहिती गोळा करून ती छापण्यांत शास्त्रीय पद्धतीचा अवलंब करावाच लागतो आणि शिवाय, विशिष्ट हेतु डोक्यांत ठेवून सार्वत्रिक व सनातन स्वरूपाचे सिद्धांत स्थापण्याची कल्पना मुळांतच हिंदी पंडितांस मान्य नसल्यानें त्यांच्या वरील आरोपांत कांहींच स्वारस्य नाहीं ही गोष्ट पुढें मांडण्यांत आली. खेडेगांवांतील सहकारी संस्था हिंदुस्थानांत अयशस्वी ठरल्या असल्यावरून त्यांची संघटना कुचकामाची समजली पाहिजे असा आत्यंतिक स्वरूपाचा अभिप्राय कांहीं निबंधलेखकांनीं व्यक्त केला होता. ह्या प्रश्नाची दुसरी बाजू ह्या टीकाकारांस उत्तर देणाऱ्या सभासदांनीं पुढें मांडली. सहकारी चळवळींतले दोष दूर करून ती इष्ट पायावर उभी करणें हें कार्य अपरि-

हार्य आहे, कारण शेतकरीवर्गाचा तरणोपाय दुसऱ्या कोणत्याहि आर्थिक पद्धतींत नाहीं ही विचारसरणी अंगिकारून त्यांनीं विधायक सूचना केल्या. तिसरा विषय, स्थानिकस्वराज्य संस्थांच्या सांपत्तिक स्थितीबाबतचा होता. ह्या स्थितीच्या असमाधानकारकपणाचीं कारणें दर्शवून तीं दूर होण्याचे उपाय सभासदांनीं दर्शवले. विशेषतः लोकलबोर्डांचीं उत्पन्नें वाढण्याचे मार्ग आणि त्यांस सरकारच्या ग्रँट्स अधिक उदारपणानें दिल्या जाण्याची आवश्यकता ह्या मुद्यांचा प्रामुख्यानें उल्लेख करण्यांत आला. युद्धोत्तर काळांतील आर्थिक पुनर्घटना ह्या विषयावर परिषदेंत महत्त्वाचीं भाषणें झालीं. ह्या काळांत भयंकर मंदी माजेल आणि तिच्याशीं राष्ट्रांस परस्पर सहाय्यानें झगडावें लागेल आणि आपला व्यापार व धंदे ह्यांची घडी त्यांस नीट बसवावी लागेल ह्या सिद्धांताच्या पुष्ट्यर्थ वक्त्यांनीं तात्त्विक व व्यावहारिक विचार पुढें मांडले. निवडक हिंदी अर्थशास्त्रज्ञांस युद्धोत्तर पुनर्घटनेच्या संबंधांत हिंदुस्थान सरकारनें सल्लागार नेमलें आहे. ह्या संधीचा त्यांनीं भावी पुनर्घटना व्यवस्थित पद्धतीनें होण्याच्या कामीं योग्य उपयोग करून घ्यावा अशी सूचना त्यांस करण्यांत आली. सल्लागार मंडळाचे सभासद परिषदेंत उपस्थित होते. त्यांनीं सर्वांच्या वतीनें ह्या सूचनेच्या संबंधांत जरूर तें धोरण अंगिकारण्यांत येत आहे असें आश्वासन दिलें.

---

### बॉंबे को. क्वार्टर्ली

बॉंबे को. क्वार्टर्लीचा डिसेंबर १९४२ चा अंक प्रसिद्ध झाला आहे. त्यांतील प्रो. वा. गो. काळे ह्यांचा "शेतीस सहकारी पद्धतीनें भांडवल-पुरवठा" हा लेख सध्याच्या परिस्थितींत अत्यंत उपयुक्त व मार्गदर्शक वाटेल. ॲग्रिकल्चरिस्ट डेटर्स रिलीफ ॲक्टाचा सहकारी चळवळीवर काय परिणाम होईल, ह्याची चर्चा त्या लेखांत केलेली आहे. मुंबई शहरांत सहकारी संस्थांच्या कार्यास किती वाव आहे, ह्याचें दिग्दर्शन रिझर्व्ह बँकेचे माजी डेप्युटी गव्हर्नर, सर मणिलाल नानावटी ह्यांनीं आपल्या लेखांत केलें आहे. अर्बन बँकांच्या वाढीचें विवेचन श्री. जी. एम. जोशी ह्यांचे लेखांत आलें आहे. पुस्तक परीक्षण, ताज्या सहकारी पुस्तकांची यादी, संपादकीय स्फुटें, सहकाराची प्रगति, रजिस्ट्रारचीं सक्युर्लरें, सहकारी बँकांची आर्थिक परिस्थिति दर्शविणारे आकडे, इत्यादि नेहमीचीं सदरें अंकांत आहेतच. मुंबई प्रांतांतील प्रमुख ठिकाणच्या सहकारी दिनाच्या समारंभाची माहितीहि अंकांत छापलेली आहे.

---

### सह्याद्रि—रानडे विशेषांक

रानडे शतसांवत्सरिक उत्सवाचे निमित्तानें "सह्याद्रि" मासिकानें आपला जानेवारी, १९४२ चा अंक रानडे–विशेषांक म्हणून प्रसिद्ध केला आहे. त्यामध्यें रानड्यांच्या राजकीय, ऐतिहासिक, आर्थिक, सामाजिक, धार्मिक, वाङ्मयीन इत्यादि कामगिरीवर श्री. न. चिं. केळकर, श्री. द. वि. आपटे, प्रा. वा. गो. काळे, प्रि. ध. रा. गाडगीळ, डॉ. द. ल. सहस्रबुद्धे, प्रि. वि. के. जोग, श्री. भास्करराव जाधव, प्रा. द. गो. कर्वे, प्रा. रा. श्री. जोग, इत्यादींचे वाचनीय लेख प्रसिद्ध झाले आहेत. वामनराव रानड्यांची रोजनिशी, अफझलखान वधाबद्दलचा पत्रव्यवहार आणि रानड्यांचीं दोन छायाचित्रें प्रस्तुत अंकांत प्रथमच प्रसिद्ध होत आहेत. रानड्यांनीं केलेल्या राष्ट्रोद्धारक योजनांच्या बीजारोपणाची माहिती सह्याद्रीच्या प्रस्तुत अंकांत चांगली मिळते.

---

### चित्रमयजगत्–खास महायुद्ध अंक

चित्रमयजगत् मासिकाचा ३३ व्या वर्षाचा १ ला म्हणजे जानेवारी, १९४२ चा अंक खास महायुद्ध अंक म्हणून प्रसिद्ध करण्यांत आला आहे. अंकामध्यें प्रारंभीं सध्याच्या युद्धक्षेत्राची योग्य कल्पना देणारा पॅसिफिक व अटलांटिक महासागर दाखविणारा जगाचा मोठा रंगित नकाशा दिला आहे. हिटलरचे फसलेले चार प्रयत्न ( त्र्यं. र. देवगिरीकर ), पॅसिफिक रणक्षेत्राचा परिचय ( रा. प्र. कानिटकर ), ॲंग्लो–जर्मन जलयुद्ध ( श्री. रा. पोतनीस ), जपानची साम्राज्यविषयक महत्त्वाकांक्षा (महाराष्ट्रीय), रूसो–जर्मन युद्ध ( द. श्री. मराठे ), इत्यादि माहितीपूर्ण लेख ह्या अंकांत प्रसिद्ध झाले असून इंग्लंडमधील युद्धकाळांतील कथानकावर लिहिलेल्या एका लोकप्रिय कादंबरीचा श्री. त्र्यं. र. देवगिरीकरकृत अनुवादहि अंकांत दिलेला आहे. युद्धविषयक चित्रेंहि अंकांत बरींच आहेत. चित्रमयजगत्मध्यें युद्धासंबंधीं उपयुक्त माहिती नेहमीच येते व प्रस्तुत अंक तर खास महायुद्ध अंक आहे.

---


## SPOTLIGHTS ON INDIAN LIFE INSURANCE

**BY B. N. SAHASRABUDDHE**

Foreword By Dr. B. R. AMBEDKAR.

Contains extremely useful information and a mass of facts, figures and charts. Equally useful to Policy-holders, Agents and Life Offices alike.

Highly spoken of by Messrs G. S. Marathey and C. Venkatasubbiah (Actuaries), An Insurance Manager, N. C. Kelkar, and Prin. D. R. Gadgil, M. A., M. Litt.

Price Rs. 3-0-0 ( Post free in India against payment in advance. )

Book-Sellers will be given reasonable terms.

*Copies can be had of:—*

| B. N. Sahasrabuddhe, | P. D. Joshi, | The Insurance World Office, |
|---|---|---|
| D. G. Colony, | P. B. No. 202, | 15 Chittaranjan Avenue, |
| POONA, 4. | MADRAS. | CALCUTTA. |

# पैसे कोठें गुंतवावेत
# ही चिंता कशाला ?

सांप्रतच्या जागतिक युद्धाच्या परिस्थितींत वेस्टर्न इंडियाच्या विमा पॉलिसींत पैसे गुंतविणें हा सर्वांत अधिक सुरक्षित आणि सर्वांत अधिक हितप्रद मार्ग आहे.

★

इतरत्र सामान्यतः ठेवल्या जाणाऱ्या ठेवींवर बाजारी चढउताराचा परिणाम होतो; पण विमा पॉलिसीची किंमत दर वर्षींच्या नफ्याबरोबर वाढणारी आणि भरण्यापेक्षां नेहमींच अधिक असते.

★

## जास्तींत जास्त त्रैवार्षिक बोनस

प्रतिसहस्र

| हयातीनंतरचें | हयातींतील |
|---|---|
| रु. ६७-८ | रु. ५४ |

अधिक माहितीसाठीं लिहा.

# वेस्टर्न इंडिया

## लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि. सातारा

पुणें शाखा—१७९ बुधवार, लक्ष्मीरोड, पुणें

## महाराष्ट्र औद्योगिक परिषद् व प्रदर्शन

न्या. रानडे शतसांवत्सरिक जन्मदिनोत्सवाचा एक कार्यक्रम म्हणून भरणाऱ्या महाराष्ट्र औद्योगिक, व्यापारी व आर्थिक परिषद्–प्रदर्शनांचें उद्घाटन करण्याचें सुप्रसिद्ध, प्रथितयश व अनुभवी कारखानदार व ओगले ग्लास वर्क्स लि. चे मॅनेजिंग एजंट श्री. श्रीपाद प्रभाकर ओगले यांनीं कबूल केलें असून परिषदेचें अध्यक्षस्थान मुंबईच्या हॅटरसी मिल्स लि. चे व्यवस्थापक श्री. केशव बाळकृष्ण वैद्य, बी. कॉम्., यांनीं स्वीकारण्याचें मान्य केलें आहे. परिषदेला व प्रदर्शनास शनिवार ता. १० रोजीं सकाळीं ८॥ वाजतां प्रारंभ होईल.

महाराष्ट्र औद्योगिक प्रदर्शनांत स्वतःच्या नांवें दुकानें घेणारांना मालविक्री करतां येईल. घरगुती व लहान धंद्यांचा माल प्रदर्शनांतील एका स्वतंत्र विभागांत ठेवण्याची सोय करण्यांत आली आहे.तरी लहान कारखानदारांनीं या सोयीचा फायदा जरूर घ्यावा. ज्या कारखानदारांना स्वतंत्र दुकान घेणें शक्य नसेल, त्यांना आपला माल प्रदर्शन-समितीच्या विभागांत ठेवतां येईल.

स्वतंत्र दुकानाचें भाडें तीस रुपये असून, प्रदर्शन-समितीच्या विभागांत जो माल ठेवला जाईल त्याकरितां प्रत्येक वस्तुला अगर एक चौरस फूट जागेला तीन रुपये भाडें पडेल.

या परिषद्-प्रदर्शनाचा एक प्रधान हेतु महाराष्ट्राचें द्रुततर औद्योगिकरण घडवून आणणें हा असल्यानें महाराष्ट्रीय व्यापारी, कारखानदार आणि औद्योगिक व व्यापारी प्रगतिबद्दल आस्था बाळगणारी जनता यांनीं तें यशस्वी करण्याच्या कामीं शक्य तें सहकार्य करावें अशी आग्रहपूर्वक विनंति आहे.

| | |
|---|---|
| लॉर्ड रे इंडस्ट्रिअल म्युझिअम, शुक्रवार पेठ पुणें २. | द. वा. फाटक<br>अध्यक्ष, प्रदर्शनसमिति.<br>आ. रा. भट<br>अध्यक्ष, स्वागतसमिति |

### सहकारी सोसायट्यांची वर्गवारी कशी करतात ?

१९२९ सालीं भरलेल्या प्रांतिक रजिस्ट्रार्सच्या परिषदेनें ठरवून दिलेल्या नियमांस अनुसरूनच साधारणतः सहकारी सोसायट्यांचें वर्गीकरण केलें जातें, परंतु कांहीं प्रांतांनीं, आलेल्या अनुभवाप्रमाणें वर्गीकरणाच्या पद्धतींत थोडा बदल केला आहे. अ वर्गांतील सोसायटी सहकारी तत्त्वाप्रमाणें चालते, आर्थिक दृष्टीनें ती व्यवस्थित आहे, तिला बाहेरून सहाय फारसें लागत नाहीं व ती आदर्श समजण्यास प्रत्यवाय नाहीं. ब वर्गांतील सोसायटी चांगली चालत असली तरी तींत कांहीं गैर–वक्तशीर कर्जदार असतील व सहकारी तत्त्वाचे आचरणांत ती थोडी कमी पडत असेल असें समजावें. ड वर्गांतील सोसायटी वाईट परिस्थितींत असून ती दोन वर्षांत न सुधारल्यास रद्द होईल व ती बँकेकडून कर्ज मिळण्यास अपात्र आहे, असा अर्थ होतो. बाकीच्या उरलेल्या सोसायट्यांस क वर्ग मिळतो. त्यांचे खालीं ड व ई.हे वर्ग येतात.

### २६ राष्ट्रांचा करार

जर्मनीविरुद्ध विजय मिळेपर्यंत लढण्याचा व त्या देशाशीं स्वतंत्र तह न करण्याचा निश्चय जाहीर करणाऱ्या पत्रकावर २६ राष्ट्रांनीं सही केली आहे. त्यांत हिंदुस्थानाचाहि समावेश आहे.

### चेक्सची देवघेव

२३ डिसेंबर अखेर संपलेल्या आठवड्यांत मुंबई बँन्कर्स क्लिअरिंग हाऊसमध्यें १३ कोटि, २१½ लक्ष रुपये किंमतीच्या ७८,३६४ चेक्सची देवघेव झाली.


'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

न्यायमूर्ति रानड्यांचे
तीन अप्रसिद्ध लेख प्रसिद्ध झाले

PLEA FOR PROTECTIONIST POLICY
INDIAN SUGAR INDUSTRY

न्यायमूर्ति रानडे यांनीं १८९९ सालीं 'टाइम्स ऑफ इंडियांत' स्वदेशी साखरेच्या धंद्यासंबंधीं लिहिलेले महत्त्वाचे तीन लेख, प्रो. वा. गो. काळे ह्यांच्या प्रस्तावनेसह प्रसिद्ध करण्यांत आले आहेत.

व्यवस्थापक, 'अर्थ', पुणें ४

ह्या पत्त्यावर आठ आण्यांची तिकिटें पाठवून लेखांची प्रत मागवावी.

"जीवन हा एक संगम आहे"
खांडेकरांच्या वरील म्हणण्याची सत्यता
नवयुग चित्र
संगम
मध्यें पहा!
९ वा आठवडा
मराठी : रोज ४, ७ व १० शनि–रवि १, ७ व १०
हिंदी : फक्त शनि–रवि ४ वा.
न्यू वेस्ट एण्ड–मुंबई
मिनर्व्हा–पुणें
३ रा जोरदार आठवडा

## हैद्राबाद संस्थानांत भिक्षा मागण्याच्या धंद्याची इतिश्री

"हैद्राबाद भिक्षावृत्ति विलास" आतां कायद्याचें स्वरूप प्राप्त झाल्यामुळें त्या संस्थानांतून भिक्षावृत्तीचें उच्चाटन करण्याकरितां संघटित प्रयत्न करण्याची वेळ आतां आली आहे. अलीकडे हा धंदा बऱ्याच प्रमाणांत वाढला होता. न्याय व धर्म खात्याचे मंत्री मि. सय्यद अब्दुल अजीज यांच्या उपक्रमानें व प्रयत्नामुळें हें बिल अस्तित्वांत येऊन तें कायदेमंडळांत पास झालें. या कायद्यांत समाविष्ट झालेली योजना उत्कृष्ट रीतीनें प्रत्यक्ष अमलांत कशी आणतां येईल यासंबंधीं कांहीं अधिकारी व वेगवेगळ्या मतांचे लोक यांच्याशीं विचारविनिमय करण्याच्या कामांत सध्या हे मंत्री गुंतले आहेत. एक प्रातिनिधिक समिति या सहकारासाठी व्यवस्था करीत आहे. शेवटीं ज्या स्वरूपांत हा कायदा पास झाला आहे त्याप्रमाणें आपापल्या विभागांत सदरील प्रश्न योग्य रीतीनें सुटण्याकरितां कोणतें व्यवहार्य धोरण योजावें हें ठरविणाऱ्या प्रादेशिक समित्या स्थापून त्यांचें जाळें संस्थानभर पसरावयाचें आहे. प्रत्येक नगरपालिका व जिल्हा बोर्डाच्या क्षेत्रांत अशा तऱ्हेची एक समिति स्थापली जाईल, व जशी परिस्थिति असेल त्याप्रमाणें ही समिति नगरपालिका अथवा जिल्हा बोर्डाच्या हाताखालीं काम करील. ज्या लोकांना भिक्षा मागण्यापासून परावृत्त करण्यांत येईल त्यांना त्यांच्यासाठी संस्था स्थापून त्या चालविण्याचें कार्य या समित्यांना करावें लागेल. असें सुचविण्यांत आलें आहे कीं, या संस्थांतून पूर्वी भीक मागत असलेल्या लोकांना सर्वसाधारण शिक्षण देण्यांत यावें, व या शिक्षणक्रमांत कलाकौशल्य, शेतकी, कोंबडी-बदकें संगोपन आणि थोडें भांडवल लागणारे इतर धंदे यांचा समावेश व्हावयाचा आहे. कायद्यांत सुचविलेलीं भिक्षेकऱ्यांचें पोषण करणारीं गृहें चालविण्याकरितां जो खर्च लागेल तो या समित्यांना भागवावा लागेल. या कार्याकरितां सार्वजनिक वर्गणी गोळा करण्याचा अधिकार सदरील समित्यांना देण्यांत आला आहे. शिवाय नगरपालिका व जिल्हा बोर्डें आपापल्या अंदाजपत्रकांत यासाठी खास रकमा राखून ठेवतील. तथापि, एकदम मोठ्या प्रमाणांत सदरील कार्य सुरू करावें असा विचार नाहीं. हैद्राबाद शहरांत या कामाचा प्रारंभ करून नंतर त्याचें क्षेत्र जिल्ह्यापर्यंत वाढवावें असें सुचविण्यांत आलें आहे. नवाब सालार जंगबहादुर यांच्या अध्यक्षतेखालीं दिनांक १२ डिसेंबर १९४१ रोजीं जमरूद महल थिएटरांत भरलेली सार्वजनिक सभा ही प्रस्तुत मोठ्या सामाजिक दुर्गुणाचें निर्मूलन करण्याकरितां सरकारनें योजिलेल्या उपाययोजनेस जनतेचा चांगला पाठिंबा असल्याचें प्रत्यंतर आहे.

### असोसिएटेड सिमेंट कं. लि.

वरील कंपनीस ३१ जुलै, १९४१ अखेर संपलेल्या वर्षी ४५ लक्ष, ५४ हजार रुपये नफा झाला. भागीदारांस कर माफ ६% डिव्हिडंड मिळेल. शेठ डालमियांच्या सिमेंट कारखान्यांची स्पर्धा, आतां सिमेंटच्या विक्रीची संयुक्त योजना अमलांत आल्यामुळें, बंद झाली आहे. त्या कारणानें, कंपनीचा नफा पुढें वाढेल, अशी अपेक्षा आहे. अहवालाचे वर्षी डायरेक्टरांनीं कंपनीच्या पैशापैकी ५ लक्ष रुपये बिनव्याजी सरकारी रोख्यांत गुंतविले.

## निवडक बाजारभाव

बँक रेट (२८ नोव्हेंबर, १९३५ पासून) ३%

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन (१९४५–५५) ... ... | १०९–४ |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०३–० |
| ३½% बिनमुदत ... ... ... ... | ९४–१२ |
| ३½% १९४७–५० ... ... ... | १०१–१२ |
| ३% (१९६३–६५) ... ... ... | ९३–८ |
| २¾% १९४८–५२ ... ... ... | ९७–४ |
| ४% पोर्ट ट्रस्ट (लांब मुदत) ... | १०८–८ |
| ४% मुंबई म्युनिसिपल (लांब मुदत) ... ... | १०८–८ |
| ४% म्हैसूर कर्ज (१९५३–६३) ... ... | ११५–० |
| ५% म्हैसूर कर्ज (१९५५) ... ... | १२५–० |

### मंडळ्यांचे भाग

(कंसातील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया (१००–५०) ११% ... ... | १०४–८ |
| बँक ऑफ बरोडा (१००–५०) १०% ... ... | ११०–० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया (५०–२५) ९% ... | ४६–८ |
| इंपीरिअल बँक (५००) १२% ... ... | १६००–० |
| बॉंबे प्रॉ. को. बँक (५०) १½ रु. ... ... | ५३–८ |
| रिझर्व्ह बँक (१००) ३½% ... ... | १०३–० |

#### वीज

| | |
|---|---|
| बॉंबे ट्रॅम्वे ऑर्डि. (५०) १२% ... ... | १३६–८ |
| कराची (१००) ९% ... ... ... | २१७–८ |
| पुणें इलेक्ट्रिक (१००) ९% ... ... | २२०–० |
| टाटा पॉवर ऑर्डि. (१०००) ५½% ... ... | १५८०–० |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. (१०००) ७½% ... ... | १६५५–० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती (१००) ४½% ... ... | १०४–८ |
| पाचोरा–जामनेर (१००) ३½% ... ... | ९३–० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) ११½% ... | ८७७–८ |
| तापी व्हॅली (५००) ६% ... ... ... | ६३३–४ |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर (५०) १० रु. ... ... ... | २३६–० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट (१००–५०) २ रु. ... ... | ४९–८ |
| सिंधिया स्टीम (१५) १ रु. ... ... ... | २०–४ |
| न्यू इंडिया विमा (७५–१५) १ रु. ८ आ. ... | ५१–८ |
| ओरिएंटल विमा (२००) १२५ रु. ... | ४७१०–० |
| टाटा आयर्न प. प्रे. (१५०) ६% ... ... | २११–० |
| टाटा आयर्न दु. प्रे. (१००) ७½% रु. ... ... | १३६–० |
| टाटा आयर्न ऑर्डि. (७५) १५ रु. ... ... | ३[illegible]–० |
| टाटा आयर्न डिफर्ड (३०) १७२ रु. १० आ. ० पै. ... | १६६०–० |
| असोसिएटेड सिमेंट (१००) ५ रु. ... | १५९–० |

#### सोनें–चांदी

| | |
|---|---|
| सोनें (मिंट) प्रत्येक तोळ्यास ... ... | [illegible] |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यास ... ... | ६९–१० |

राहाणेची व भोजनाची उत्तम सोय




फोन नं. ७७९ गणपति चौक, व्यवस्थापक.

वक्तशीर आणि मनपसंत काम
करून देणारे
**मोहन वॉच कंपनी**
रेग्युलेशन मोफत
कॉमनवेल्थ बिल्डिंगसमोर लक्ष्मी रोड, पुणें २.

पावसाळ्यांतील उपयुक्त औषधें
**संग्रह करा**
कॉलरा गोळी, संजीवनी गुटी, कुटजारिष्ट,
पाचकवटी, पंचकोलासव
तसेंच
पंडुरोगावरील अप्रतिम गुणकारी
**—: रक्तवर्धक :—**
सुवर्णकल्प, बालजीवन, अस्थिपोषक,
रक्तशोधक, कफनाशक हीं पेटंट
औषधें मागवा

मुख्य दुकान—गणपति चौक, लक्ष्मीरोड, पुणें
**आयुर्वेद रसशाळा पुणें, लि.**

सर्व तऱ्हेची कापड छपाई व रंगाई (Calico Printing and Dyeing) करणारा कारखाना.
**'पायोनियर डाइंग हाऊस'**
कोचाचें कापड (Casement cloth), दाराचे पडदे, टेबल कव्हर इ. टिकाऊ रंगाचे, स्वदेशी तयार मिळतात. कारखानाः—
भिकारदास मारुती रोड, दातेवाडी, पुणें.




**मधुमेहावरील औषध**
तीन आठवड्यांचे
औषधास फक्त रु. ७
— मागविण्याचा पत्ता —
मॅनेजिंग डायरेक्टर, रूरल प्रॉडक्ट्स
कंपनी लिमिटेड.
९२३ ए, सदाशिव, पुणें २.

महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चात काटकसर करा. एक वेळ येऊन
स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर
**महिंद्रकर ब्रदर्स**
तयार कपड्याचे व्यापारी
बुधवार चौक, पुणें

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व
रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

जाहिरातींचे दर
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
एक आणा

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ८ पुणें, बुधवार, तारीख १४ जानेवारी, १९४२ अंक २

## * विमाक्षेत्रांतील 'कॉमनवेल्थ'चें अढळ स्थान *

### १९४०चें पूर्ण केलेलें काम........४५ लक्षांहून अधिक

**★ बोलका—ढलपा ★**

| | |
|---|---|
| कंपनीची मालमत्ता | २७,८३,००० |
| सरकारी कर्जरोखे, गॅरंटीड शेअर्स यांत गुंतविलेली रक्कम | ८,९४,००० |
| रोकड व बँकेंतील ठेवी ... ... | ३,०९,००० |
| कंपनीच्या मुख्य कचेरीची इमारत, हौसिंग कॉलनी व जमीन | ४,३८,००० |
| लाईफ फंड | २०,६३,००० |
| कंपनीचें चालू काम | १,८७,१२,१८१ |
| १९४० मध्यें दिलेले क्लेम्स | ८४,८५१ |

★ सर्वत्र उत्साही व विश्वासू एजंटस् पाहिजेत ★

चेअरमन
खा. ब. एम्. एन्. मेथा,
C. I. E., M. B. E.

**• कॉमनवेल्थचीं वैशिष्ट्यें •**

(१) विमेदारांच्या हक्कांविषयीं जागरूकता
(२) भरभक्कम पायावरील आर्थिक सुस्थिति
(३) काळजीपूर्वक काटकसरीची व्यवस्था
(४) जनतेच्या विश्वासास पात्र झालेलें डायरेक्टर बोर्ड
(५) विम्याचे पैसे त्वरित देण्याबद्दलची दक्षता

## कॉमनवेल्थ

### ॲशुअरन्स कंपनी लि., पुणें २.

—शाखा—
मुंबई—मद्रास—कलकत्ता—नाशिक—
कराची—अहमदाबाद

एस्. एन्. भागवत, बी. ए.
ॲक्टिंग ऑफिस सुपरिंटेंडेंट.

## The Co-operators' Book Depot.

9, Bakehouse Lane,
FORT, BOMBAY.

**The Only Book Depot of its Kind in India.**

*Specialising in*

Books on Economics, Co-operation, Banking and Finance, Accountancy and Auditing, Commerce, Business Organisation, Rural Reconstruction and allied Subjects.

Books on all Subjects and of all Publishers in India, England and America are readily supplied at the published Prices.

## DECCAN BOOK STALL

**Booksellers, Publishers & Subscription Agents**
**Fergusson College Road, Poona No. 4**

(1) We stock and supply Educational books, General books & Library books.
(2) We supply Government of Bombay and Government of India publications.
(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.
(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.

# विविध माहिती

### ट्रेझरी बिलांवर १ रु. व्याजाचा दर

रिझर्व्ह बँकेनें गेल्या आठवड्यांत हिंदुस्थान सरकारचीं एक कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा दर सरासरी द. सा. द. शे. १ रुपया पडला.

### सर अकबर हैदरी

हिंदुस्थान सरकारच्या नव्या एक्झिक्युटिव्ह कौन्सिलचे एक सभासद सर अकबर हैदरी, हे दिल्ली येथें ता. ८ रोजीं निवर्तले.

### मुंबई कॉर्पोरेशनचें अंदाजपत्रक

मुंबई कॉर्पोरेशनला १९४२–४३ मध्यें ३ कोटि, ७४½ लक्ष रुपये उत्पन्न होऊन ३ कोटि, ७४ लक्ष रुपये खर्च होतील, असा अंदाज आहे.

### जुन्या मोटारगाड्यांत मागणी

पेट्रोल रेशनिंगमुळें जुन्या मोटारगाड्यांसहि मागणी उत्पन्न झाली आहे. पेट्रोल मिळविण्यासाठी पंधरा वर्षांपूर्वींच्या गाड्याहि रजिस्टर केल्या जात आहेत. एकापेक्षा अधिक गाड्या ठेवून पेट्रोल ज्यास्त मिळविण्याची ही खटपट आहे.

### " मार्कोनी "

ॲटलँटिक महासागरांत अमेरिकन नाविक दलानें मार्कोनी नांवाची आगबोट ती इ[illegible]च्या मालकीची आहे असें समजून पकडली, परंतु ती प[illegible] देशाच्या मालकीची असल्याचें सिद्ध झाल्यावरून तिला स[illegible] देण्यांत आलें आहे.

### ९० लक्ष सैनिक

फेब्रुवारीच्या १६ तारखेस अमेरिकेंतील २० ते ४५ वर्षें वयाच्या सुमारें ९० लक्ष पुरुषांची नोंद केली जाईल. ह्यांतून सैनिकांची निवड करण्यांत येईल.

### सर्कसमधील वाघ-सिंहास ठार मारणार

सिडने येथें, पेट्रोलवरील नियंत्रणामुळें, एक सर्कस अडकून पडली आहे. तिचेमधील सिंह व वाघ ह्यांस ए. आर. पी. चे नियमांस अनुसरून, गोळी घालून ठार करण्यांत येणार आहे. वैमानिक हल्ल्यांत चुकून हीं जनावरें मोकळीं सुटलीं, तर नागरिकांवर कठीण प्रसंग ओढवेल तो टाळण्याकरितां जनावरांचा अगोदरच नाश करण्यांत यावयाचा आहे.

### अमेरिकेंत शेतीखाली अधिक जमीन येणार

आपल्यास केवळ ग्रेट ब्रिटनकडेच अन्नसामुग्री पाठवावी लागेल अशी अमेरिकन सरकारची कल्पना होती, परंतु आतां रशिया व चीन ह्या देशांसहि तिचा पुरवठा करावा लागणार आहे. ह्या दृष्टीनें, अमेरिकेंत धान्य व कपास ह्यांची लागवड वाढविण्यांत येत आहे.

### जर्मन सैनिकांचा पोषाक एवढा दरिद्री का !

ब्रिटिश मिनिस्टर ऑफ एकनॉमिक वॉरफेअर, डॉ. ह्यू डाल्टन, ह्यांनीं आपल्या एका ताज्या भाषणांत जर्मन सैनिकांच्या भिकार पोषाकाची कारणमीमांसा केली. "ब्रिटिशांनीं जर्मनीची पूर्ण नाकेबंदी केली तशी केली नसती, तर रशियांतील हिवाळा शत्रूस इतका मुळींच जाणवला नसता. जर्मनींत तयार होणारें कृत्रिम धाग्यांचें कापड कुचकामी ठरत आहे. जर्मन साबणांत ७५ टक्के तर केवळ सद्दूची पूड आहे" असें ते म्हणाले.

### खासगी मोटारगाड्यांचें उत्पादन बंद

कॅनडांत खासगी वापराच्या मोटार गाड्यांचें उत्पादन अजीबात बंद करण्यांत आलें आहे.

### मोटारींचे सुटे भाग जोडणारा कारखाना

रशियामध्यें मोटार गाड्यांचा पुरवठा करण्याकरितां अमेरिका सिंधमध्यें एक कारखाना उभारणार आहे, त्यामध्यें अमेरिकेंतून येणारे सुटे भाग जोडून गाड्या तयार करण्यांत येतील व तेथून त्या रशियाकडे पाठविण्यांत येतील. युद्धसमाप्तीनंतर हा कारखाना अमेरिकेकडे परत नेण्यांत येईल.

### पंजाब नॅशनल बँक लि.

वरील बँकेस डिसेंबर १९४१ अखेर संपलेल्या वर्षी ६,१७,८९० रुपये निवळ नफा झाला.

### लष्करी बुटांचें उत्पादन

हिंदुस्थानांत युद्धकार्यासाठी दरसाल दुसरें ३० लक्ष बुटांच्या जोड्या बनविण्यांत येत आहेत. रबरी तळाचे कॅनव्हसचे बूटहि बनविले जात आहेत.

### हिंदुस्थान सरकारचा उत्पन्न–खर्च

१९४१-४२ च्या पहिल्या आठ महिन्यांत हिंदुस्थान सरकारचा खर्च उत्पन्नापेक्षा ३६½ कोटि रुपयांनीं अधिक झाला, गेल्या वर्षींचा तत्सम आकडा ३१ कोटि रुपये होता. चालू वर्षी उत्पन्न १६½ कोटींनीं ज्यास्त असलें तरी युद्धखर्च २१½ कोटींनीं वाढला आहे.

### हिंदी टपाल

समुद्रमार्गानें हिंदुस्थानांतून २८ सप्टेंबर ते ४ ऑक्टोबर, १९४१ च्या दरम्यान निघालेलें टपाल ग्रेट ब्रिटनमध्यें वाटण्यांत आलें आहे.

### इंडियन बँक लि., मद्रास

वरील बँकेस ३१ डिसेंबर, १९४१ अखेर ६,८९,७६७ रुपये नफा झाला.

### घड्याळें एक तास पुढें

अमेरिकेंतील घड्याळें एक तास पुढें लावण्यांत यावयाचीं आहेत.

### रशिदअली

इराकी बंडखोर पुढारी, रशिदअली, ह्यास बगदाद येथील लष्करी कोर्टानें फाशीची शिक्षा फर्माविली आहे. रशिदअली हा सध्या जर्मनींत आहे, असें समजतें.

### टोलपट्टी

मुंबईच्या मोटार व्हेइकल्स ॲक्टानें मुंबई सरकारला तो कायदा झाल्यानंतर (१९३५) बांधण्यांत येणाऱ्या पुलावरील वहातुकीकडून टोलपट्टी वसूल करण्याचा अधिकार दिला आहे. जुना पूल दुरुस्त करून नव्यासारखा केला, तरी त्या पुलावर टोल बसविण्यास सरकारी अधिकार देणारी कायद्यांत दुरुस्ती सुचविण्यांत आली आहे. नर्मदा पुलामुळें हा प्रश्न प्रामुख्यानें उपस्थित झाला.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | १२ | युद्धाच्या हालचाली-मुंबईचा नाणें बाजार—रानडे शत-सांवत्सरिक जन्मदिनोत्सवास आरंभ—औद्योगिक परिषदेंतील भाषणें—अध्यक्षांची विधायक सूचना व परिषदेंतील ठराव | |
| २ युद्ध परिस्थिति, युद्धोत्तर काळ आणि ग्रामसुधारणा | १३ | ७ बँक ऑफ इंडिया लि. | १६ |
| ३ कंपनीच्या भागावरील कॉलची रकम ... | १४ | ८ निवडक बाजारभाव ... | १७ |
| ४ नंबरी बटाटे ... | १४ | | |
| ५ डिफर्ड शेअर्सचें रूपांतर | १४ | | |
| ६ स्फुट विचार ... | १५ | | |


# अर्थ

बुधवार, ता. १४, जानेवारी १९४२

## युद्धपरिस्थिति, युद्धोत्तर काळ आणि ग्रामसुधारणा

ग्रामसुधारणेचें कार्य पद्धतशीरपणानें व्हावें. ह्या हेतूनें मुंबई सरकारनें एक योजना तयार केली आणि तिला अनुसरून प्रत्येक जिल्ह्यांत एक व सबंध प्रांताकरितां एक अशीं प्रातिनिधिक मंडळें स्थापन केलीं आणि त्यांच्या खर्चाची तरतूद केली. अलीकडे ह्या मंडळांची पुनर्घटना प्रांतिक सरकारनें केली आहे आणि ह्या रीतीनें बनलेल्या प्रांतिक ग्रामसुधारणा मंडळाची पहिली सभा त्यांनीं गेल्या आठवड्यांत सल्लागार–मंत्री, मि. नाइट, ह्यांच्या अध्यक्षतेखाली भरवली. सभेचें उद्घाटन गव्हर्नर ह्यांनीं केलें आणि तिच्या पुढें येणाऱ्या प्रश्नांचें दिग्दर्शन आपल्या भाषणांत केलें. सध्याच्या गडबडीच्या युद्धकाळांत खेडेगाव ही प्राचीन संस्था परिस्थितीस इतर संस्थांपेक्षा अधिक कार्यक्षमतेनें तोंड देऊं शकेल, तथापि, त्याच्या संबंधांत आज काय करतां येणें शक्य आहे, ह्याचा विचार होऊन माहिती दिली जाणें अगत्याचें आहे असें त्यांनीं सांगितलें. खेडेगावांच्या सुधारणेबाबत आजपर्यंत अनेक चौकशा व प्रयत्न झाले आहेत आणि त्यासंबंधांत आस्था असणाऱ्या बिनसरकारी लोकांचें सहकार्य सरकारी अधिकाऱ्यांशीं होणें आवश्यक असून सरकारच्या ग्रामसुधारणेविषयींच्या योजना प्रांतिक ग्रामसुधारणा मंडळापुढें मांडण्यांत येतील त्यांवर सभासदांनीं सल्ला द्यावा अशी गव्हर्नरसाहेबांनीं सूचना केली. शेतकरी वर्गाची परिस्थिति नेहमींच अडचणीची असते, आणि युद्धामुळें ती अधिक कठिण होऊन गेली आहे. उदाहरणार्थ, युद्धसामुग्रीची वहातुक तातडीची असल्यानें शेतमालाचा उठाव होण्यास रेल्वे–वाघिणींचा तुटवडा पडला आहे. पेट्रोलचा पुरवठा मर्यादित झाल्याकारणानें मोटारींचा उपयोग ह्या कामीं होणें अशक्य झालें असून गूळ व कपास ह्यांचेसारखा माल खेडेगावांमधून हालण्याची पंचाइत झाली आहे. ह्या स्थितींत सुधारणा लवकर होण्याचीहि अपेक्षा नाहीं. युद्धाच्या गरजांस कांहीं झालें तरी प्राधान्य द्यावें लागत असल्यानें प्रांतिक सरकारास वहातुकीच्या साधनांचा पुरवठा वाढवण्याचे बाबतींत विधायक असें कांहींच करतां येत नाहीं ही वस्तुस्थिति गव्हर्नरसाहेबांनीं प्रांजलपणानें निवेदिली. ह्या स्थितींतहि प्रांतिक सरकार स्वतःस जें जें करतां येणें शक्य आहे तें तें करीत आहे व करील असें त्यांनीं सभेस आश्वासन दिलें.

सध्याची युद्धपरिस्थिति व युद्धोत्तर काळांतील घडामोडी ह्यांच्या दुहेरी दृष्टीनें सरकारनें ग्रामसुधारणेचा कार्यक्रम कसा आखावा ह्याची चर्चा मुंबईच्या सभेंत विस्तृत रीतीनें झाली. जपानला होणारी मालाची निर्गत थांबली असल्यानें आखुड धाग्याच्या कापसास मागणी फार थोडी राहिली आहे, ह्यासाठी त्याची पैदास थांबवून त्याच्याऐवजी धान्यांचीं वगैरे पिकें करण्याचा सल्ला शेतकऱ्यांस द्यावा, अशा आशयाची सूचना सर पुरुषोत्तमदास ठाकुरदास ह्यांनीं केली होती. आखुड धाग्याच्या कपाशीची लागवड थांबवण्याची सक्ती करणें अनिष्ट आहे, त्या पिकाचे जागीं दुसरीं कोणतीं पिकें निरनिराळ्या क्षेत्रांत करतां येतील ह्याचा विचार करून शेतकी खात्यानें योग्य तो सल्ला शेतकऱ्यांस द्यावा असें सर्वसाधारण मत सभेंत मान्य झालें. शेतकऱ्यांची प्राप्ति वाढून युद्धोत्तर परिस्थितीस तोंड देण्याचें सामर्थ्य त्यांचेमध्यें उत्पन्न व्हावें ह्याकरितां अनेक सूचना सरकारनें पुढें मांडल्या होत्या त्यांची दीर्घ चर्चा सभेनें केली. लहान प्रमाणावरील पाणी पुरवठ्याचीं कामें, पावसानें शेतीच्या उपयोगाची जमीन वहात जाते, तिचें बंधाऱ्यांचे सहायानें रक्षण करणें, नवीन झाडें लावणें, जंगलांची वाढ करणें, मोठ्या प्रमाणावर संयुक्त शेतीची व्यवस्था करणें, वहातुकीच्या सोयीसाठी रस्ते तयार करणें इत्यादि सुधारणांच्या योजना तयार ठेवाव्या आणि त्यांस लागणाऱ्या भांडवली खर्चाची तरतूद आखावी आणि योग्य वेळीं हीं कामें योग्य स्थळीं तात्काळ हातीं घेतलीं जावीं असा सल्ला सभेनें सरकारास दिला. शेतकरी कर्जनिवारणाचा कायदा कांहीं तालुक्यांत प्रयोगादाखल अंमलांत आणला जात आहे, त्याच्या अंमलबजावणीचा प्रत्यक्ष अनुभव येईल, त्याच्या अनुरोधानें त्या प्रश्नासंबंधांतलें धोरण आखण्यांत यावें असा अभिप्राय सभेस संमत झाला. हातमागांच्या धंद्याचे मार्गांत सुताच्या तुटवड्याची विलक्षण अडचण येत आहे आणि त्या योगानें युद्धोपयोगी कापड तयार करण्याच्या विणकरांच्या उद्योगांत व्यत्यय येत आहे. गिरण्यांनीं सुताचा पुरवठा बेताच्या किंमतीनें विणकरांस करावा आणि सरकारनें ह्या प्रकरणीं तातडीनें लक्ष घालावें अशी आग्रहाची सूचना सभेंत करण्यांत आली. शेतीचें उत्पन्न वाढण्यास जमिनीची सुधारणा होणें अगत्याचें आहे. तथापि, जमिनीचे तुकडे एकत्र आणणें, बांध घालणें, ह्यासारखीं कामें होण्यास शेतकरी लोकांचें त्यांस अनुकूल मत हवें आणि बहुमताची मान्यता असल्यास अल्पमतावर कायद्यानें सक्ती होणें आवश्यक असतें. हें सक्तीचें तत्त्व कांहीं प्रांतिक कायद्यांत समाविष्ट झालें आहे; त्याचा अंतर्भाव जमीन सुधारणेच्या कार्यक्रमाविषयींच्या नियोजित कायद्यांत व्हावा ह्या मतास सभेनें पुष्टी दिली. निरनिराळ्या प्रकारांचें शुद्ध बीं शेतकऱ्यांस पुरवण्याची व्यवस्था आज अमलांत आहे ती अधिक विस्तृत व कार्यक्षम व्हावी, शहरांबाहेरच्या प्रदेशांत एकत्र काम करणाऱ्या मजुरांच्या राहण्याची सोइस्कर व आरोग्यकारक तजवीज आज नाहीं ती केली जावी, पेट्रोलची टंचाई झाल्यामुळें प्रेरकशक्तीचा अल्कोहाल व गॅस बनवण्याच्या बाबतींत योजना हातीं घेण्यांत याव्या, इत्यादि प्रश्नांची चर्चा सभेंत झाली आणि त्यांचे विषयीं कित्येक विधायक सूचना करण्यांत आल्या. सभेंतील चर्चेच्या योगानें कित्येक अवघड प्रश्नांवर उपयुक्त प्रकाश पडला असून तिचें सहाय सरकारास होईल असें अध्यक्ष, मि. नाइट म्हणाले.

## कंपनीच्या भागावरील कॉलची रकम

### भागीदाराची जबाबदारी

तरुण इन्शुअरन्स कंपनी लि. चे श्री.नरोत्तम पी. भंडारी हे एक भागीदार होते. त्यांनीं आपल्या भागांवरील कॉलचे पैसे व त्यांवरील व्याज ह्यांचा भरणा कंपनीकडे केला नाहीं, म्हणून कंपनीनें मुंबईच्या स्मॉल कॉज कोर्टांत श्री. भंडारी ह्यांचेवर दावा दाखल केला. दाव्याची हकीकत खालीलप्रमाणें आहे : कंपनीच्या डायरेक्टर बोर्डानें ठराव केल्याप्रमाणें कंपनीनें भागीदारांकडे शेअरवरील पहिल्या कॉलची मागणी केली, व ठराविक मुदतींत कॉलची रकम न भरल्यास द. सा. द. शे. ९% दरानें त्यावर व्याज आकारलें जाईल, असें त्यांस कळविलें. नंतर कांहीं काळानें भागीदारांस असें कळविण्यांत आलें कीं व्याजासुद्धां कॉलची रकम ठराविक काळांत त्यांनीं भरली नाहीं तर भाग रद्द करण्यांत येतील. प्रतिवादी मि. भंडारी ह्यांनीं मागणीप्रमाणें रकम भरली नाहीं, तेव्हां त्यांचे भाग रद्द करण्यांत आले व त्या भागांचे पोटीं जेवढी रकम जमा झालेली होती, तेवढ्याच किंमतीस ते दुसऱ्यास विकण्यांत आले. अशा तऱ्हेनें, ते भाग दुसऱ्यास दिल्यानंतर कंपनीनें प्रतिवादीकडे पहिला कॉल व त्यावरील व्याज ह्यांची पुनः मागणी केली, परंतु प्रतिवादीनें रकम न भरल्या कारणानें वादीनें प्रस्तुत दावा आणला. शेअरच्या वसूल रकमेइतक्या किंमतीस ते भाग पुनः विकले असल्याकारणानें, आपण कॉलची रकम व व्याज भरण्यास जबाबदार नाहीं आणि व्याज देण्याची जबाबदारी आपणांवर कांहीं झालें तरी पडत नाहीं, असें प्रतिवादीचें म्हणणें होतें. कंपनीच्या आर्टिकल्स ऑफ असोसिएशनप्रमाणें भागीदार कॉलची रकम व व्याज देण्यास बांधलेला आहे व कंपनी कायद्याप्रमाणें, भागीदाराचा कंपनीबरोबर सभासदत्वाचा करार होतो त्यांत ही बंधनकारक अट समाविष्टच असते, असें जज्जांनीं सांगितलें. कंपनीनें शेअर रद्द करून ते दुसऱ्यास विकण्यांत कंपनीचें नुकसान झालेलें नाहीं, कारण विक्रीच्या तारखेपर्यंत शेअरवरील मागणी केलेल्या सबंद रकमेइतकी रकम कंपनीस मिळालेली आहे. तेव्हां, दुसऱ्याकडून कंपनीस जी रकम मिळाली आहे, तीच कॉलची रकम वादीकडून पुनः वसूल करण्याचा अधिकार कंपनीस नाहीं, असें स्मॉल कॉज जज्जांचें मत पडलें. वरिष्ठ कोर्टानेंहि तो निवाडा उचलून धरला व कंपनीचा दावा खर्चासुद्धा काढून टाकला.

### नंबरी बटाटे

गेल्या लागवडीचे मोसमांत सिमल्याचे आसपासचे डोंगरांतून ४०० टन नंबरी बटाटे लागवडीसाठी मुंबई प्रांतांत आले. पूर्वी इटली ह्या बेण्यांचा पुरवठा करीत असे, तो युद्धामुळें आतां बंद पडला आहे. पुणें जिल्ह्यांतच ह्या बटाट्यांची लागवड होते, त्यासाठी ६७,१३५ रुपयांचीं तकावी कर्जें सरकारनें शेतकऱ्यांस हे बटाटे घेण्याकरितां दिलीं. ह्या बेण्यांचा प्रसार करण्याकरितां खेड, चाकण, मंचर, पावळ, सासवड व दौंड येथें विक्रीचीं केंद्रें उघडण्यांत आलीं होती. मागविण्यांत आलेले ४६८ टन बटाटे मिळूं शकले नाहींत, व आलेले ४५८ टन बटाटेहि सर्व खपले नाहींत. ह्याचें कारण अपुऱ्या पावसामुळें पाण्याची अनपेक्षित टंचाई हें होय. शिलकी राहिलेले बटाटे अहमदनगर व पुणें जिल्ह्यांतील कालव्याखालील जमिनींत लागवडीसाठी देण्यांत आले.

## टाटा डिफर्ड शेअर्सचें ऑर्डिनरी शेअर्समध्यें रूपांतर

टाटा आयर्न अँड स्टील कंपनीच्या डिफर्ड भागांचें ऑर्डिनरी भागांत रूपांतर करण्याची योजना कंपनीच्या डायरेक्टर बोर्डानें आखली आहे, तिचे अन्वयें प्रत्येक डिफर्ड भागाचे बदली साडेपाच ऑर्डिनरी भाग देण्यांत यावयाचे आहेत. ह्या योजनेस भागीदारांची मंजुरी मिळविण्याकरितां फेब्रुवारीमध्यें खास सभा बोलावण्यांत येणार आहे. कंपनीच्या डिफर्ड भागाची दर्शनी किंमत ३० रुपये असून अशा भागांची संख्या ४८,७५० आहे म्हणजे, डिफर्ड भाग भांडवल १४ लक्ष, ६२½ हजार रुपये आहे. कंपनीच्या ऑर्डिनरी भागाची दर्शनी किंमत ७५ रुपये असून अशा ३½ लक्ष भागांचें भांडवल २ कोटि, ६२½ लक्ष रुपये भरतें. १४ लक्ष, ६२½ हजारांचें डिफर्ड भांडवल रद्द करून व रिझर्व्ह फंडांतील २,०१,०९,३७५ रुपयांचें भांडवलाचे रूपांतर करून त्याचे २,६८,१२५ नवे ऑर्डिनरी भाग निर्माण करावयाचे व ते डिफर्ड भागांचे बदली १:५½ ह्या प्रमाणांत द्यावयाचे, अशी ही योजना आहे. कंपनीच्या भाग भांडवलांत आज ६% क्यु. प्रेफरन्स, ७½% क्यु. प्रेफरन्स ऑर्डिनरी व डिफर्ड अशा प्रकारचे भाग आहेत व एकूण भांडवलापैकी ७५% भांडवल प्रेफरन्स भागांचें आहे. नवीन योजनेमुळें भागांच्या प्रकारांपैकी एक प्रकार कमी होईल व ऑर्डिनरी भाग भांडवलाचें एकूण भांडवलांतील प्रमाण वाढेल. डिफर्ड भागाची किंमत नेहमी हेलकावे खात असे व त्यामुळें कंपनीच्या सर्वच भागांची किंमत निष्कारण अस्थिर होई. आतां भाग—भांडवलाची रचना सोइस्कर करण्यांत येत आहे. तिचेमुळें मंदीचे दिवसांतहि कंपनीच्या भागांस सट्ट्याचे व्यवहाराची झळ कमी प्रमाणांत लागून कंपनीच्या स्थिर प्रगतीस सहाय होईल, अशी अपेक्षा आहे.

कंपनीच्या डिव्हिडंड वाटणीची सध्याची व्यवस्था खालीलप्रमाणें आहे. कंपनीच्या प्रेफरन्स भागांस डिव्हिडंड दिल्यानंतर उरलेल्या नफ्यापैकी प्रथम ऑर्डिनरी भागांस ८% डिव्हिडंड मिळतें. डिफर्ड भागांस २५% डिव्हिडंड मिळाल्यावर बाकी नफा ऑर्डिनरी व डिफर्ड भागांस निम्मा-निम्मा वाटला जातो. म्हणजे, २ कोटि, ६२½ लक्ष रुपयांच्या ३½ लक्ष ऑर्डिनरी भागांस मिळून जेवढा नफा मिळतो, तितकाच नफा १४ लक्ष, ६२½ हजारांच्या ४८,७५० डिफर्ड भागांचे वाट्यास येतो. अशा रीतीनें, डिफर्ड भागांस, चलतीचे काळांत, कमाल नफा मिळतो. सट्टेबाजीचें हें मूळ नव्या योजनेमुळें नाहींसें होणार आहे.

**N. V. WADNERKAR**

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver,
Electro-plater & Manufacturer of Sporting
Trophies, Medals, Cups etc.

- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -
POONA CITY.

# स्फुट-विचार

## युद्धाच्या हालचाली

आतां युद्ध हिंदुस्थानच्या सीमेस येऊन भिडलें आहे आणि मलाया व फिलीपाइन्स ह्या प्रदेशांवर केलेल्या अचानकपणाच्या स्वतःच्या हल्ल्यांचा जपान पूर्ण फायदा घेत आहे. ह्याचें प्रायश्चित्त त्यास योग्य वेळीं मिळेलच. तथापि, पूर्व एशियांतील सध्या चालू असलेल्या हालचालींच्या प्रसारापासून ह्या देशाचें संरक्षण करण्यासाठीं ज्या योजना अमलांत आणल्या जात आहेत आणि रणक्षेत्रांतील घडामोडींविषयीं ज्या ज्या बातम्या प्रसिद्ध होत आहेत, त्यांच्यावरून उठणाऱ्या गप्पांच्या योगानें जनतेनें आपला गैरसमज करून घेऊं नये आणि घाबरटपणाचें कोणतेंहि कृत्य करूं नये अशा सूचना देण्यांत येत आहेत, तिकडे सर्वांचें लक्ष जाणें अगत्याचें आहे. कोणत्याहि भावी परिस्थितींत गडबडून न जातां स्वतःच्या व इतरांच्या रक्षणासाठीं केलेल्या तजवीजींत सर्वांनीं सहभागी झालें पाहिजे. अमेरिका, इंग्लंड व चीन ह्यांच्या सहकार्याची योजना अंमलांत येत आहे, आणि ह्या सर्व राष्ट्रांचें बळ एकत्रित करण्यांत आलें असून त्याचा उपयोग अधिकांत अधिक कार्यक्षम रीतीनें केला जात आहे. अमेरिकेनें लढाऊ सामुग्रीचें उत्पादन शक्य तितक्या प्रचंड प्रमाणावर वाढवण्याचें ठरवलें आहे. त्याकरितां लागणाऱ्या भांडवलाची तजवीज करण्यांत आली आहे आणि अमेरिकन जनतेनें युद्धसामुग्रीच्या उत्पादनाकरितां जरूर असलेला सर्व स्वार्थत्याग करण्याचा निश्चय केला आहे. मोटारींचें उत्पादन व उपयोग अमेरिकेंत जेवढ्या प्रमाणावर होतो तेवढा तो दुसऱ्या कोणत्याहि देशांत होत नाहीं. त्या देशांत प्रत्येक पांच माणसांत एक माणूस मोटारगाडी वापरतो आणि मजूर लोक आपल्या कामावर मोटारींत बसून जातात. मोटारींचे कारखाने व रबर ह्यांचा उपयोग आतां युद्धसामुग्रीच्या उत्पादनाकडे मुख्यत्वेंकरून व्हावयाचा असल्यानें अमेरिकन जनतेस आपली मोटारींची सवय टाकून द्यावी लागणार आहे. युद्ध, शक्तिसर्वस्व खर्चून नेटानें चालवण्याचें धोरण अमेरिकेंत आतां सर्वमान्य झालें आहे आणि त्यास अनुसरून तयारी व लढाऊ हालचाली चालल्या आहेत ही गोष्ट उत्तेजनकारक आहे. रशिया व लिबिया ह्यांतील रणक्षेत्रांत जर्मनीस सारखी माघार घ्यावी लागत आहे तिचा अत्यंत अनुकूल असा परिणाम एकंदर युद्धपरिस्थितीवर होत आहे.

## मुंबईचा चांदी बाजार

युद्धाच्या बातम्यांचा परिणाम जनतेचें आर्थिक जीवन अस्वस्थ होण्यांत कमी कमी होत चालला आहे ही लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे. शत्रूचा प्रतिकार व देशाचें संरक्षण करण्याच्या सर्व योजना अंमलांत आणल्या जात आहेत आणि त्यांत जनतेनें पूर्ण सहकार्य करणें आवश्यक आहे ह्या विषयींच्या जाणिवेनें ही प्रवृत्ति दृढ होत आहे. ह्या प्रवृत्तीचें उत्कृष्ट गमक मुंबईच्या चांदी बाजाराच्या परिस्थितींत सापडण्याजोगें आहे. नाताळानंतरच्या आठवड्यांत सरकारी कर्जरोख्यांचे भाव चांगले स्थिर राहिले, आणि त्यांस मागणीहि बरी होती. कॉलमनीवरच्या व्याजाचा दर अर्धा टका, तीन महिने मुदतीच्या कर्जांचा सव्वा टका व सहामाहीचा कर्जाच्या दीड टका ह्याप्रमाणें पैशाचा पुरवठा पुरेसा होता. एकूण चलनी नोटांच्या पुरवठ्यांत सुमारें साडेनऊ कोटि रुपयांची वाढ झाली आणि त्यापैकी साडे सहा कोटींच्या नोटा व्यवहारांत खेळत होत्या. रिझर्व्ह बँकेच्या नोटांच्या हिशेबांत जिंदगीच्या बाजूस स्टर्लिंग रोख्यांत दहा कोटि रुपयांची वाढ झालेली दिसते. सोनें व स्टर्लिंग रोखे ह्यांचें बँकेस असलेल्या देण्याशीं प्रमाण वाढलें आहे आणि तें सुमारें ऐंशी टक्क्यांपर्यंत वर गेलें आहे. इंपीरिअल बँकेंतील ठेवी नाताळ अखेर साडेचार कोटींनीं वाढल्या आणि तिनें दिलेल्या कर्जांत पांच कोटींची वाढ झाली. पूर्वींच्या कित्येक आठवड्यांचे मानानें सोन्याची किंमत स्थिर राहिली. दर तोळ्यास साडे सत्तेचाळीस रुपयांच्या आसपासच्या दरास ती धरून होती. सॉव्हरिनची किंमत सुमारें सव्वाबत्तीस रुपये होती. चांदीच्या भावांतहि बरीच स्थिरता दृष्टोत्पत्तीस आली आणि शंभर तोळ्यांस सुमारें साडेसत्तर रुपये ही किंमत बाजारांत बरीच टिकली. कंपन्यांच्या भागांच्या बाबतींत बाजारांत विशेष गडबड होईल अशी भीति वाटत होती, पण ती निराधार ठरली आहे. स्टॉक एक्सचेंजचें बोर्ड ऑफ डायरेक्टर्स व प्रांतिक सरकार ह्यांच्यामध्यें चर्चा होऊन सव्द्यांच्या पटावटीबाबत योजना ठरली. तिचे योगानें ह्या बाबतींत अनुकूल वातावरण निर्माण झालें असें म्हणावयास हरकत नाहीं.

## रानडे शतसांवत्सरिक जन्मदिनोत्सवास प्रारंभ

न्यायमूर्ति रानडे ह्यांचा शतसांवत्सरिक जन्मदिवस साजरा करण्याकरितां एक प्रातिनिधिक समितीची स्थापना झालेली आहे व तिनें न्यायमूर्तींच्या देशोद्धारक विविध कार्यास अनुसरून, वेगवेगळे कार्यक्रम आखले आहेत. ह्या कार्यक्रमाचा एक महत्त्वाचा भाग म्हणजे महाराष्ट्र औद्योगिक, व्यापारी व आर्थिक परिषद ह्या आहे. ही परिषद ता. १० जानेवारी रोजीं, अ. भा. कारखानदार संघाच्या महाराष्ट्र प्रादेशिक समितीचे विद्यमानें भरविण्यांत आली व तिला जोडून महाराष्ट्र औद्योगिक प्रदर्शनहि मांडण्यांत आलें. परिषद व प्रदर्शन ह्यांचें उद्घाटन ओगले ग्लास वर्क्स लि. चे मॅनेजिंग एजंट श्री. श्रीपादराव ओगले ह्यांनीं केलें व परिषदेचें अध्यक्षस्थान अमृतलाल ओझा अँड सन्स लि. चे व्यवस्थापक श्री. के. बा. वैद्य, बी. कॉम, ह्यांनीं मंडित केलें. ता. १० रोजीं सकाळीं स्वागताध्यक्ष श्री. आ. रा. भट, प्रदर्शन समितीचे अध्यक्ष श्री. द. बा. फाटक, परिषद व प्रदर्शन ह्यांचें उद्घाटक श्री. श्रीपादराव ओगले व अध्यक्ष श्री. के. बा. वैद्य ह्यांचीं भाषणें झालीं. त्यानंतर, न्या. रानडे ह्यांनीं हिंदी अर्थशास्त्राचा पाया घालून हिंदुस्थानाला औद्योगिक प्रगतीचा व व्यापारवृद्धीचा जो शास्त्रशुद्ध मार्ग दाखविला त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणारा ठराव परिषदेनें मंजूर केला. ह्या ठरावावर श्री. न. चिं. केळकर व प्रो. वा. गो. काळे ह्यांचीं भाषणें झालीं. परिषदेंत दुपारीं वेगवेगळ्या ठरावांची चर्चा झाली. महाराष्ट्र औद्योगिक प्रदर्शन १८ जानेवारीअखेर चालू रहाणार आहे.

## औद्योगिक परिषदेंतील भाषणें

स्वागताध्यक्षांनीं आपल्या भाषणांत महाराष्ट्रांतील औद्योगिक व आर्थिक प्रगतीचा थोडक्यांत आढावा घेतला व महाराष्ट्र संपत्तिमान होण्यास त्यांतील रहिवाश्यांनीं व्यापार-उदिम आपल्या हातीं घेणें हाच मार्ग आहे, असें सांगितलें. सरकारच्या औद्योगिक धोरणावर टीका करून, त्यासंबंधांत त्यांनीं कांहीं

विधायक सूचनाहि केल्या. कारखानदारांकडील ठेवी व भागभांडवल ह्यांच्या परस्पर प्रमाणासंबंधीं त्यांनीं विवेचन केलें व कारखान्यांनीं शक्यतोंवर कारखान्याच्या कोणत्याहि मालमत्तेच्या तारणावर कर्ज काढूं नये असें सांगितलें. प्रदर्शन-समितीचे अध्यक्षांनीं प्रदर्शनांचा इतिहास कथन करून उघडण्यांत यावयाच्या प्रदर्शनासंबंधीं थोडक्यांत माहिती सांगितल्यानंतर श्री. ओमले ह्यांनीं भाषण केलें व त्यांत त्यांनीं महाराष्ट्रहि वैश्य वृत्तींत इतर प्रांतांना मार्गदर्शक होईल असा विश्वास प्रकट केला. लिमिटेड कंपन्यांच्या व्यवहारासंबंधीं त्यांनीं केलेल्या कांहीं सूचना अत्यंत उपयुक्त अशा होत्या. "पब्लिक लिमिटेड" या शब्दाची व्याप्ती तींतील भाग घेणारांपुरतीच आहे, रस्त्यांतील येणाराजाणारांना हा अधिकार पोचत नाहीं, हे त्यांचे उद्‌गार लक्षांत ठेवण्याजोगे आहेत. सरकारच्या औद्योगिक संरक्षणविषयक धोरणावर त्यांनीं कडक टीका केली, ती त्यांस आलेल्या अनुभवावरच आधारलेली होती.

---

### अध्यक्षांची विधायक सूचना व परिषदेंतील ठराव

परिषदेच्या अध्यक्षांनीं सामान्यतः स्वागताध्यक्षांचे भाषणांतील प्रमुख मुद्यांवर मुख्यतः भर दिला व नवीन उद्योगधंदे सुरू करण्याकरितां पायलट प्लँट्स उभारावे व महाराष्ट्रीय कारखानदारांच्या मालविक्रीकरितां एक विक्रय संस्था अस्तित्वांत आणावी अशी सूचना केली. हीच सूचना त्यांनीं परिषदेपुढें एका ठरावाचे रूपानें मांडली. महाराष्ट्राच्या द्रुत प्रगतीचे दृष्टीनें त्याच्या नैसर्गिक स्वरूपाची शास्त्रीय पहाणी करण्याकरितां एक समिति नेमावी व तिनें पैसे जमा करून एक विश्वस्तनिधि उभारावा आणि तिच्या विश्वस्तांचे सल्ल्यानें पायलट प्लँटसचा प्रयोग आरंभावा, असा ह्या ठरावाचा आशय होता. परिषदेनें इतरहि ठराव केले, त्यांत सरकारचें औद्योगिक संरक्षणाचें धोरण, प्रांतिक सरकारचें औद्योगिक धोरण, स्थानिक स्वराज्य संस्थांनीं उद्योगधंद्यांस उत्तेजन देणारें धोरण आखण्याची आवश्यकता, बँकांच्या वाढीची दिशा, विमा कायद्याची कडक अंमलबजावणी, इत्यादि संबंधीचे ठराव महत्त्वाचे होते व त्यांवर भाषणेंहि माहितीपूर्ण आणि कळकळीचीं झालीं.

---

### बँक ऑफ इंडिया, लि.

३१ डिसेंबर, १९४१ अखेर संपलेल्या वर्षी बँक ऑफ इंडियास, मागील वर्षांतील ओढलेले ८,९८,७८४ रुपये धरून एकूण झालेला नफाः— २३,११,६५५ रुपये

चालू वर्षाचा प्राप्तीवरील कर व सुपरटॅक्स देण्यास तरतूद ... ... ४,००,००० रुपये

३० जून, १९४१ रोजीं पहिल्या सहामाहीचें ११% दरानें डिव्हिडंड जाहीर केलें, त्याबद्दल दिलेली रक्कम ... ... ५,५०,००० रुपये

नफा वाटणीकरितां आतां

२३,६१,६५५ रुपये

रहातात. ३१ डिसेंबर, १९४१ अखेरच्या वर्षाचे ११% कर माफ डिव्हिडंड कायम करण्याचें डायरेक्टर बोर्डानें ठरविलें आहे. ... ५,५०,००० रुपये

बँकेच्या मालमत्तेखातीं वर्ग ५,००,००० रुपये

बँकेच्या रिझर्व्ह फंडाकडे वर्ग २,५०,००० रुपये

पुढील वर्षांत ओढण्याकरितां १०,६१,६५५ रुपये

'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

न्यायमूर्ति रानड्यांचे
तीन अप्रसिद्ध लेख प्रसिद्ध झाले
PLEA FOR PROTECTIONIST POLICY
INDIAN SUGAR INDUSTRY
न्यायमूर्ति रानडे यांनीं १८९९ सालीं 'टाइम्स ऑफ इंडियांत' स्वदेशी साखरेच्या धंद्यासंबंधीं लिहिलेले महत्त्वाचे तीन लेख, प्रो. वा. गो. काळे ह्यांच्या प्रस्तावनेसह प्रसिद्ध करण्यांत आले आहेत.
व्यवस्थापक, 'अर्थ', पुणें ४
ह्या पत्त्यावर आठ आण्यांची तिकिटें पाठवून लेखांची प्रत मागवावी.

४ था 'डिप्लोमसी'च्या
आठवडा जोरावर पुंडोपंतानें
काय केलें
ते
नवयुग चित्र
नवयुगचित्र
संगम
मध्यें पहात असतां तुमची
हंसून हंसून मुरकुंडी वळेल!
१० उत्कृष्ट कलावंत — १२ मधुर गाणीं
मिनर्व्हा—पुणें
रोज ६। व १० शनि. रवि. सोम.
जादा खेळ ३। वा.

## निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) | ३% |

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) ... ... | १०९–४ |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०३–० |
| ३½% बिनमुदत ... ... ... ... | ९४–१२ |
| ३½% १९४७–५० ... ... ... | १०१–१२ |
| ३% ( १९६३–६५ ) ... ... ... | ९३–८ |
| २½% १९४८–५२ ... ... ... | ९७–४ |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( लांब मुदत ) ... | १०८–८ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... ... | १०८–८ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३ ) — ... | ११५–० |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) ... — | १२५–० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो. )

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( १००–५० ) ११% ... ... | १०४–८ |
| बँक ऑफ बरोडा ( १००—५० ) १०% ... ... | ११०–० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ९% ... | ४६–८ |
| इंपीरिअल बँक ( ५०० ) १२% ... ... | १६००–० |
| बाँबे प्रॉ. को. बँक ( ५० ) १½ रु. ... ... | ५३–८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% ... ... | १०३–० |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) १२% ... ... | १३६— |
| कराची ( १०० ) ९% ... ... ... | २१७–८ |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% ... ... | २२०–० |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% ... ... | १५८०–० |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% ... ... | १६५५–० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० ) ४½% ... ... | १०४–८ |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) १½% ... ... | ९३–० |
| अहमदाबाद प्रांतज ( ५०० ) ११½% ... | ८७७–८ |
| तापी व्हॅली ( ५०० ) ८% ... ... ... | ६३३–४ |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) १० रु. ... ... ... | २३६–० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु. ... ... | ४९–८ |
| सिंधिया स्टीम ( १५ ) १ रु. ... ... ... | २०–४ |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु. ८ आ. ... | ५१–८ |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. ... | ४७१०–० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% ... ... | २११–० |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( १०० ) ७½% रु. ... ... | १३६–० |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १५ रु. ... ... | ३१७–० |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) १७२ रु. १० आ. ० पै ... | १६६०–० |
| असोसिएटेड सिमेंट ( १०० ) ५ रु. ... | १५९–० |

#### सोनें–चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास ... ... | ४८–७ |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यास ... ... | ६९–१० |


मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् को-ऑपरेटिव् बँक, लिमिटेड.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी–सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंग

९, बेक हाउस लेन, कोट मुंबई.

शाखा

| | |
|---|---|
| १ बारामती ( जि. पुणें ) | १८ अकलूज ( जि. सोलापूर ) |
| २ सातारा ( „ सातारा ) | १९ विरमगांव ( „ अहमदाबाद ) |
| ३ इस्लामपूर ( „ „ ) | २० धुळें ( „ प. खानदेश ) |
| ४ कऱ्हाड ( „ „ ) | २१ दोंडाईचें ( „ „ ) |
| ५ तासगांव ( „ „ ) | २२ शिरपूर ( „ „ ) |
| ६ किर्लोस्करवाडी ( „ „ ) | २३ शहादें ( „ „ ) |
| ७ शिराळें ( „ „ ) | २४ नंदुरबार ( „ „ ) |
| ८ कोरेगांव ( „ „ ) | २५ साक्री ( „ „ ) |
| ९ वाई ( „ „ ) | २६ शिंदखेडें ( „ „ ) |
| १० अहमदनगर ( „ अहमदनगर ) | २७ तळोदें ( „ „ ) |
| ११ शेवगांव ( „ „ ) | २८ मालेगांव ( „ नाशिक ) |
| १२ कोपरगांव ( „ „ ) | २९ सटाणा ( „ „ ) |
| १३ बेलापूर ( „ „ ) | ३० कळवण ( „ „ ) |
| १४ राहुरी ( „ „ ) | ३१ लासलगांव ( „ „ ) |
| १५ भिवंडी ( „ ठाणें ) | ३२ नांदगांव ( „ „ ) |
| १६ पालघर ( „ „ ) | ३३ दोहद ( „ पंचमहाल ) |
| १७ कल्याण ( „ „ ) | ३४ कालोल ( „ „ ) |

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेडऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.

राहाणेची व भोजनाची उत्तम सोय





फोन नं. ७७९ गणपति चौक, व्यवस्थापक.

वक्तशीर आणि मनपसंत काम
करून देणारे
**मोहन वॉच कंपनी**
रेग्युलेशन मोफत
कॉमनवेल्थ बिल्डिंगसमोर लक्ष्मी रोड, पुणें २.

पावसाळ्यांतील उपयुक्त औषधें
**संग्रह करा**
कॉलरा गोळी, संजीवनी गुटी, कुटजारिष्ट,
पाचकवटी, पंचकोलासव
तसेंच
पंडुरोगावरील अप्रतिम गुणकारी
**—: रक्तवर्धक :—**
सुवर्णकल्प, बालजीवन, अस्थिपोषक,
रक्तशोधक, कफनाशक हीं पेटंट
औषधें मागवा

मुख्य दुकान—गणपति चौक, लक्ष्मीरोड, पुणें
**आयुर्वेद रसशाळा पुणें, लि.**

सर्व तऱ्हेची कापड छपाई व रंगाई (Calico Printing and Dyeing) करणारा कारखाना.
**' पायोनियर डाइंग हाऊस '**
कोचाचें कापड (Casement cloth), दाराचे पडदे, टेबल कव्हर इ. टिकाऊ रंगाचे, स्वदेशी तयार मिळतात. कारखानाः—
भिकारदास मारुती रोड, दातेवाडी, पुणें.




**मधुमेहावरील औषध**
तीन आठवड्यांचे
औषधास फक्त रु. ७
— मागविण्याचा पत्ता —
मॅनेजिंग डायरेक्टर, रूरल प्रॉडक्ट्स
कंपनी लिमिटेड.
१२३ ए, सदाशिव, पुणें २.

महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन
स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर

**महिंद्रकर ब्रदर्स**
तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व
रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं ' दुर्गाधिवास, ' भांबुर्डा, घ. नं. ९२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

**जाहिरातींचे दर.**
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

**वर्गणीचे दर.**
वार्षिक वर्गणी
रु. ४
(टपाल हंशील माफ)
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ८ | पुणें, बुधवार, तारीख २१ जानेवारी, १९४२ | अंक ३

**कॉमनवेल्थचा वैभवशाली विस्तार**

★ २७ हजारांचेवर पॉलिसी–होल्डर्स
★ एकूण चालू विमे २ कोटीचेवर
★ दोन हजारांहून अधिक कार्यकर्ते निरनिराळ्या प्रांतांत कॉमनवेल्थसाठीं उत्साहानें काम करीत आहेत.


हेड ऑफिस बिल्डिंग

**कॉमनवेल्थ**
**अॅशुअरन्स कंपनी लि.**

चेअरमन
* खा. ब. एम्. एन्. मेथा,
C. I. E., M. B. E.

अॅक्टिंग ऑफिस सुपरिन्टेंडेंट * एम्. एन्. भागवत, B. A.

'कॉमनवेल्थ' ची पॉलिसी घेऊन जीवन निश्चिंत व सुखी करा.

**The Co-operators' Book Depot.**
9, BAKEHOUSE LANE,
FORT, BOMBAY.
**The Only Book Depot of its Kind in India.**
*Specialising in*
Books on Economics, Co-operation, Banking and Finance, Accountancy and Auditing, Commerce, Business Organisation, Rural Reconstruction and allied Subjects.
Books on all Subjects and of all Publishers in India, England and America are readily supplied at the published Prices.

**DECCAN BOOK STALL**
**Booksellers, Publishers & Subscription Agents**
**Fergusson College Road, Poona No. 4**

(1) We stock and supply Educational books, General books & Library books.
(2) We supply Government of Bombay and Government of India publications.
(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.
(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.

# विविध माहिती

**हिंदी अंड्यांची निर्गत**

हिंदुस्थानांतील कोंबड्यांची अंडीं ब्रिटिश गिऱ्हाइकांस कितपत पसंत पडतात व तीं पाठवावयाचीं म्हटल्यास त्याची व्यवस्था कशी करावयाची, ह्याचा विचार सरकार करीत आहे. प्रयोगादाखल सहा हजार अंडीं पाठविण्यांत आलीं आहेत. ह्या अंड्यांच्या परीक्षणाचा रिपोर्ट मिळाल्यावर, आणखी अंडीं धाडण्याचा कार्यक्रम ठरवितां येईल.

**लष्करांत अधिकाऱ्यांची भरती**

हिंदी लष्करांत आणखी अधिकारी हवे असल्याकारणानें ज्या उमेदवारांस पूर्वी निवडले नव्हते, अशांची पुनः चाचणी घेण्याचें ठरविण्यांत आलें आहे. युद्धास प्रारंभ होतांच, अनेक उमेदवार पुढें आले व स्पर्धेतील कांहीं विशेष लायक उमेदवारांसच निवडण्यांत आलें. बाकीच्यांस आतां पुनः संधि मिळत आहे.

**१ कोटि, ४० लक्ष कामगार**

अमेरिकेंतील कारखान्यांत सध्यां ५० लक्ष कामगार काम करीत आहेत. त्यांची संख्या १९४२ अखेर १ कोटि, ४० लक्ष करण्याची अमेरिकन सरकारची योजना आहे. पुरुषांस लष्करांत जातां यावें, ह्याकरितां त्यांची जागा शक्य तेथें स्त्री-कामगार घेतील. ५० लक्ष लोकांचें लष्कर तयार करण्यापेक्षा त्याच्या तिपटीइतक्या कामगार-दलाची योजना करणें अधिक अवघड आहे, असे उद्गार एका अमेरिकन अधिकाऱ्यानें काढले.

**ऑस्ट्रेलियाचें युद्धक्षेत्रांतील महत्त्व**

ऑस्ट्रेलिया, आतांपर्यंतच्या रूढीस सोडून, अमेरिकेबरोबर स्वतंत्रपणें वाटाघाटी करूं लागला आहे. वसाहतींनीं ग्रेट-ब्रिटनमार्फतच परराष्ट्रांबरोबर बोलणीं करण्याचा आजपर्यंतचा प्रघात आहे. युद्धविषयक धोरण आखणाऱ्या ब्रिटिश युद्धमंत्रिमंडळांत ऑस्ट्रेलियाचा एक प्रतिनिधि मंत्रि पाहिजे, अशी मि. स्पेंडर ह्यांची मागणी आहे. इतर वसाहतींचा प्रतिनिधि तेथें नसला, तरी ऑस्ट्रेलियाचा प्रश्न स्वतंत्र आहे, असें ते म्हणाले.

**जपानी नाविक हानि**

पॅसिफिक महासागरांत जपानच्या १ लक्ष, २८ हजार टनांच्या आगबोटी आतांपर्यंत बुडविण्यांत आल्या आहेत.

**हाँगकाँग अँड् शांघाई बँकिंग कॉर्पोरेशन**

वरील कंपनीची मुख्य कचेरी आतां लंडनमध्यें नेण्यांत आली आहे.

**कपाशीचें काय करणार ?**

वऱ्हाडांत गेल्या वर्षी २,८८,३६६ गाड्या कपास विक्रीसाठी आली होती; यंदा ४,३९,२९७ गाड्या आली आहे. त्यामुळें व वहातुकीच्या अडचणीमुळें, वऱ्हाडांतील शेतकऱ्यांची कुचंबणा झाली आहे. प्रांतिक सरकारनें सर्व कपास विकत घ्यावी असें सुचविण्यांत येत आहे. कपाशीची लागवडहि, जरूर तर कायद्यानें नियंत्रित करण्याची पाळी येईल.

**हिंदी गिरण्यांत हिंदी कपाशीचा उठाव**

| सप्टेंबर ते नोव्हेंबर | गाठी |
|---|---|
| १९४० | ८,४२,१९५ |
| १९४१ | ९,८७,२०५ |

**संशोधन चालू असतांना मृत्यु**

श्री. दीनबंधु भट्टाचार्य हा कलकत्ता विश्वविद्यालयांतील संशोधन कार्य करीत असलेला एक विद्यार्थी स्ट्रिकनाइन हैड्रोक्लोर हें एक विषारी रसायन एका नळींतून दुसऱ्या नळींत घालीत होता त्यावेळीं त्याच्या श्वासाबरोबर रसायनाचा कांहीं वायू आंत गेल्यामुळें तो बेशुद्ध पडून मरण पावला.

**बॉम्बे टेलिफोन कं. लि.**

गव्हर्नमेंट टेलिफोन बोर्ड लि. नें वरील कंपनीचे भाग ८९ रु. १५ आ. स सक्तीनें घेण्याचें ठरविलें, त्यास बॉंबे टेलिफोनच्या कांहीं भागिदारांनीं विरोध केला. भागाची ही किंमत रास्त नाहीं, ती १३४ रुपये असावयास पाहिजे, असें त्यांचें म्हणणें आहे. मुंबई हायकोर्टानें, ह्यासंबंधांत सरकारी तज्ज्ञानें कोणत्या आधारावर भागाची किंमत ठरविली तें दाखविणारे कागद दाखविण्यास टेलिफोन बोर्डाला हुकूम दिला आहे.

**युद्ध-कामगिरी करणारांस प्राधान्य**

मुंबई प्रांतांतील न्याय खात्यामधील वरिष्ठ जागा (डिस्ट्रिक्ट जज्ज, प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेटस, स्मॉल कॉज कोर्ट जज्जेस, हायकोर्टांतील वरिष्ठ जागा इ.) भरतांना युद्धविषयक भरीव कामगिरी करणारांस प्राधान्य दिलें जाणार आहे. उमेदवारांच्या वयाची अट जरा ढिली केली जाईल, परंतु इतर लायकी मात्र नियमाप्रमाणें असली पाहिजे. खालच्या दर्जाच्या नोकरीचे बाबतहि युद्धकार्य केलें असणारांस प्राधान्य मिळेल.

**पगाराचे पैसे बाहेर पाठविण्यास परवानगी**

हिंदुस्थानांतून परदेशीं पैसे पाठविण्यास रिझर्व्ह बँकेची परवानगी लागते. एखाद्या फर्मला विदेशी नोकर ठेवावयाचा असल्यास तिनें त्या नोकरास आपल्या पगाराचा कांहीं भाग त्याचे देशाकडे पाठविण्यास परवानगी मिळेल किंवा नाहीं ह्याची अगोदर चौकशी करावी. हिंदुस्थानांत येण्यास पासपोर्ट मिळाला म्हणजे स्वदेशी पैसे पाठविण्यास परवानगी मिळाली असें समजूं नये.

**आणखी आगगाड्या रद्द होणार**

जी. आय. पी. रेल्वे आपल्या उतारूंच्या आणखी कांहीं गाड्या बंद ठेवणार आहे. रद्द केलेल्या गाड्या लवकरच जाहीर केल्या जातील. युद्धविषयक वहातुकीस व अन्नसामुग्री आणि शेतीचा माल ह्यांचे वहातुकीस प्राधान्य देण्यासाठी ही व्यवस्था आहे.

**सुताचा पुरवठा**

कोष्टी लोकांस पुरेशा सुताचा पुरवठा योग्य किंमतींत करण्याच्या योजनेचा विचार हिंदुस्थान सरकार करीत आहे.

**विणकरांची उपासमार**

बंगलोर शहरांत सुमारें ४० हजार विणकरी आहेत. १० हजार हातमाग तेथें चालू असत, त्यांतील निम्मे आतां बंद पडले आहेत. रेशमाच्या धाग्याच्या किंमतीमधील बेसुमार वाढीचा हा परिणाम आहे. विणकऱ्यांवर उपासमारीची वेळ आली आहे. शहरांतील व्यापारी विणकर कुटुंबांना अन्नदान करीत आहेत.

**ओखा येथें मोटार कारखाना**

बिर्ला ब्रदर्सनीं ओखा (बडोदें संस्थान) येथें मोटारींचा कारखाना काढण्याची योजना केली आहे. तूर्त, ट्रक तयार करण्याचें काम तेथें होईल. एका अमेरिकन फर्मनें त्यास सहाय दिलें आहे. कंपनीचें अधिकृत भांडवल १० कोटि रुपये आहे.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | २० | विमा व्यवसायावरील नवें पुस्तक | |
| २ न्यायमूर्ति रानडे ह्यांच्या जीवनाचें रहस्य ... | २१ | ५ प्रदर्शनाची पूर्वपीठिका | २४ |
| ३ १९४१ सालांतील शेअर्समधील चढउतार | ३२ | ६ रिझर्व्ह बँकेच्या कार्याचा आढावा ... | २४ |
| ४ स्फुट विचार ... | २३ | ७ हिंदी तांदुळाचें पीक ... | २४ |
| पुणें येथील रानडे सप्ताह—पुण्याच्या सभेंतील भाषणें— | | ८ निवडक बाजारभाव ... | २५ |



# अर्थ

बुधवार, ता. २१ जानेवारी, १९४२


## न्यायमूर्ति रानडे ह्यांच्या जीवनाचें रहस्य

कोणत्याहि पुरुषाच्या मृत्यूची किंवा जन्माची तिथी साजरी करण्याची प्रथा सार्वत्रिक रीतीनें रूढ झाली आहे तिच्या मुळाशी दोन हेतु असतात. त्या पुरुषानें स्वतःच्या आयुष्यांत केलेल्या लोकसेवेसंबंधानें कृतज्ञता व्यक्त करणें हा एक हेतु आणि त्याच्या पुण्य स्मरणानें आपणांस सत्कार्यप्रवण करण्यासाठी स्फूर्ति प्राप्त करून घेणें हा दुसरा हेतु. न्यायमूर्ति माधवराव रानडे ह्यांनीं हिन्दी राष्ट्राच्या हितसंवर्धनार्थ एवढें महत्त्वाचें व प्रचंड कार्य केलें आहे कीं त्यांच्या मृत्यूनंतर एकेचाळीस वर्षांनीं त्यांची जन्मतिथी शंभर वर्षांची होत असल्यानें तो प्रसंग मोठ्या प्रमाणावर आणि आभारपूर्वक साजरा करण्यांत लोकांनीं स्वतःचें केवळ कर्तव्यच बजावलें आहे ह्यांत संशय नाहीं. न्यायमूर्तींच्या जन्माच्या शतसांवत्सरिक उत्सवांत सर्व धर्मांचे, पक्षांचे, विचारांचे व प्रांतांचे पुढारी भाग घेत आहेत, ह्यावरून त्या पुरुषाच्या कार्याची विशालता, विविधता व राष्ट्रीय उपयुक्तता याची कल्पना येते. हिन्दुस्थानास आपलें पूर्ववैभव पुन्हां प्राप्त होऊन जगांतील प्रमुख राष्ट्रांत मानाचें स्थान मिळवावयाचें असेल तर त्या उद्दिष्टाच्या सिद्धीसाठीं भगीरथ प्रयत्न निरनिराळ्या क्षेत्रांत झाले पाहिजेत असें त्यांचें मत असल्यानें न्यायमूर्तींनीं अनेक राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक व वाङ्मयविषयक चळवळी चालू केल्या. त्यांच्या कार्याच्या विविधतेंत सूत्रबद्धता होती ती लक्षांत येण्यास त्यांच्या ध्येयाचें मर्म समजणें आवश्यक आहे. फर्ग्युसन कॉलेजांतील अर्थशास्त्र आणि राजकारणशास्त्र यांचे प्राध्यापक प्रो. कर्वे, यांनीं न्यायमूर्ति रानडे यांच्या चरित्रावर मार्मिक ग्रंथ लिहून नुकताच प्रसिद्ध केला आहे त्याची ह्या कामीं उत्कृष्ट मदत होण्यासारखी आहे.

प्राध्यापक कर्वे ह्यांच्या पुस्तकांत (Ranade–the Prophet of Liberated India) न्यायमूर्तींच्या भिन्नभिन्न क्षेत्रांतील कामगिरीचा स्वतंत्र रीतीनें व सलोख्यानें विचार करण्यांत आला असल्यानें त्यांतलें विवेचन मूलग्राही व उद्बोधक झालें आहे. ग्रंथकर्त्यानें प्रथम न्यायमूर्तींचें चरित्र वर्णिलें आहे. आणि त्यांत घडलेल्या गोष्टींचें नुसतें तिथिवार टाचण दिलेलें नसून कार्याची उद्देश व परिणाम ह्यांच्या दृष्टीनें उत्कृष्ट संगति लावलेली आहे. ह्या प्रकरणांतील माहिती व विवेचन ह्यांचे योगानें युगप्रवर्तक ह्या नात्यानें न्यायमूर्ति रानडे ह्यांस हिंदुस्थानच्या प्रगतीच्या इतिहासांतील एका महत्त्वाच्या युगाचे प्रवर्तक ह्या नात्यानें कोणतें स्थान आहे ह्याची नीटशी कल्पना येण्यास सहाय होतें. चरित्रनायकाचें उच्च ध्येय आणि तें गाठण्यास हिंदी लोकांनीं करावयाच्या कार्याच्या दिशा ह्यांचें विवेचन ग्रंथाच्या पुढील दोन प्रकरणांत आलें आहे. ह्या रीतीनें विस्तरशः चर्चावयाच्या विषयाची पार्श्वभूमि तयार करून ग्रंथकर्त्यानें न्यायमूर्तींनीं हातीं घेतलेल्या विविध कार्यांचें विवेचन निरनिराळ्या प्रकरणांत केलें आहे. पन्नास वर्षांमागें सामाजिक सुधारणेच्या संबंधांत देशांत व विशेषतः महाराष्ट्रांत विलक्षण मतभेद उत्पन्न होऊन रणें माजलीं होतीं. त्यावेळीं सुधारणेचें तारूं ह्या दंगलीच्या वादळांतन सुरक्षित रीतीनें हाकण्यांत न्यायमूर्तींनीं कौशल्य दाखवलें त्याचें वर्णन ग्रंथकर्त्यानें बोधप्रद आणि तत्त्ववेधक पद्धतीनें केलें आहे.

भारतीय अर्थशास्त्राची स्थापना आणि स्वदेशी उद्योगधंद्यांची जोपासना ह्यासंबंधांतलें न्यायमूर्तींचें कार्य आद्यप्रवर्तकाचें व युगकर्त्याचें आहे. इंग्लिश अर्थशास्त्रज्ञांचे सिद्धांत हिन्दी राष्ट्राची परिस्थिति व गरजा ह्यांस लागू करण्यांत राज्यकर्त्यांची भयंकर चूक होत असल्याचें त्यांनीं बिनतोडपणानें सिद्ध केलें. हिंदुस्थानचें दारिद्र्य व तें दूर करण्याचे उपाय हा गेल्या शतकांत सध्याप्रमाणें जिव्हाळ्याचा विषय होऊन बसला होता. त्याचें तात्त्विक व व्यावहारिक आकलन करण्याची शक्ति त्याकाळीं लोकांमध्यें क्वचितच आढळण्यासारखी होती. इंग्रजी शिक्षणाबरोबर इंग्रजी विचार ह्या देशांत पसरले होते आणि इंग्लिश अर्थशास्त्र राज्यकर्त्यांचें अर्थशास्त्र असल्यानें त्याच्या विरुद्ध बंडाचें निशाण उभारणें जवळजवळ अशक्य होतें. तथापि, न्यायमूर्ति रानड्यांची जाडी विद्वत्ता, तत्त्वान्वेषक बुद्धि, जाज्वल्य देशाभिमान व स्वतःचीं मतें स्पष्टपणें पुढें मांडण्याची निर्भयता ह्यांच्या अपूर्व साहचर्यामुळें त्यांस हिंदुस्थानच्या विशिष्ट परिस्थितीस सुसंगत अशी अर्थशास्त्राची मांडणी यशस्वी रीतीनें करतां आली. भारतीय अर्थशास्त्र व स्वदेशी उद्योगधंद्यांचा परिपोष ह्यांचे संबंधांत अलीकडे प्रगति झाली आहे तिचें श्रेय न्यायमूर्तींच्या बहुमोल कार्यास दिलें पाहिजे. आर्थिक प्रगतीच्या संबंधांत राज्यकर्त्यांची भूमिका तटस्थपणाची असून चालत नाहीं हा सिद्धांत आतां सर्वमान्य झाला आहे. ह्या सर्वच विषयाचें विवेचन प्रा. कर्वे ह्यांनीं आपल्या ग्रंथांत मुद्देसूद व सुबोध पद्धतीनें केलें आहे. राज्यकारभारव्यवस्था, शिक्षण, राजकारण इत्यादि बाबतींत न्यायमूर्तींचे विचार काय होते आणि त्यांचे संबंधांत त्यांनीं कोणती कामगिरी बजावली ह्याचें रहस्य पुस्तकाच्या शेवटच्या प्रकरणांत आलें आहे. न्यायमूर्तींच्या चरित्राचें मूलग्राही आणि संगतवार वर्णन व विवेचन जिज्ञासू जनतेच्या दृष्टीनें आवश्यक होतें आणि ती उणीव प्रा. कर्वे ह्यांनीं उद्बोधक रीतीनें भरून काढली आहे असें म्हणण्यांत आम्हांस आनंद वाटतो.

## १९४१ सालांतील शेअर्समधील चढउतार

### आर. आर. नावर आणि कंपनीचा आढावा

मुंबई येथील आर. आर. नावर आणि कंपनी (श्री. व्ही. पी. बर्वे), शेअर, स्टॉक व फिनॅन्स ब्रोकर, ह्यांनीं प्रतिवर्षीप्रमाणें १९४१ चा आढावा व १९४२ विषयीं अदांज प्रसिद्ध केला आहे. त्यांत त्यांनीं गेल्या वर्षांतील युद्धविषयक व राजकीय परिस्थिति, हिंदुस्थानांतील व्यापारविषयक परिस्थिति, जिनसांचे बाजारभाव, व्याजाचे दर, सरकारी रोखे, पौंडांतील रोख्यांचें रुपयांतील रोख्यांत स्थित्यंतर, हुंडणावळ, हिंदी आयात-निर्गत व्यापार, लष्करी खर्चाचा सरकारी बजेटावर परिणाम, औद्योगिक परिस्थिति, इत्यादि गोष्टींचें सिंहावलोकन करून कपास-कापड, ताग, लोखंड व पोलाद, इंजिनिअरिंग, खाणी, कोळसा, हड्रो-इलेक्ट्रिक, आगबोट, केमिकल, चहा, साखर, कागद, सिमेंट, इत्यादि धंद्यांतील घडामोडींचा आढावा घेतला आहे. स्टॉक एक्सचेंजवरील घडामोडींचीहि थोडक्यांत माहिती दिलेली आहे. त्याचप्रमाणें, १९४२ सालांतील अपेक्षित घडामोडी सांगणें कठीण असलें तरी त्यासंबंधांतील अंदाजहि देण्यांत आला आहे.

१९४१ च्या प्रारंभापेक्षा त्याचा शेवट स्टॉक एक्सचेंजला चांगला गेला. लोकांना शिलकी पैसे गुंतविण्याची पंचाईत पडूं लागल्यामुळें भागांच्या किंमतीस बळकटी येऊं लागली. बाल्कन्समध्यें जर्मनीची चढाई झाल्यानंतर ५ मे रोजीं भाव एकदम खाली गेले, ते लवकरच पुनः वर आले आणि जपान युद्धांत पडेपर्यंत ते चढीचे राहिले. गेल्या वर्षी बँका, विमा कंपन्या व रेल्वेज ह्यांचे भाग व ठराविक व्याज देणारे रोखे ह्यांस विशेष मागणी होती, व त्या विभागांतील जवळ जवळ प्रत्येक भागाची किंमत अगदी वर गेली. वर्ष अखेरची भागांची किंमत साधारणपणें दोन वर्षांपूर्वीच्या मानानें २०% अधिक आहे. युद्ध परिस्थितींतहि बँकांची प्रगति अखंड चालू राहिली, व त्यामुळें त्यांचे भागांचे किंमतींत १०% वाढ झाली. सेंट्रल बँकेच्या भागाची किंमत ५८ रुपयांपर्यंत वर गेली. आयुर्विमा कंपन्यांस गेलें वर्ष विशेष चांगलें गेलें नाहीं, तरी इतर विम्याच्या कंपन्यांनीं जादा दरानें हप्ते घेतले व त्या प्रमाणांत त्यांस क्लेम्स द्यावे न लागल्यामुळें, त्या कंपन्यांचे भागास मागणी वाढली. न्यू इंडियाचे भागानें तर विक्रमच केला. सर्व साधारणपणें, विमा कंपन्यांचे भाग १२% नें वर सरकले. मुंबईच्या कपास कापडाच्या गिरण्यांच्या भागांची किंमतहि वाढत गेली, ती डिसेंबरच्या मध्यापर्यंत. असोसिएटेड सिमेंटचें काम नीट चालल्यामुळें त्याच्या भागांची किंमत १३८ रु. ८ आ. ची १८१ रु. ४ आ. मध्यंतरीं झाली. बाँबे स्टीमच्या भागांस गेल्या वर्षी जेवढी मागणी होती तेवढी गेल्या दहा वर्षांत कधींच आली नव्हती. इलेक्ट्रिक कंपन्यांचे भागहि कमालीच्या तेजींत राहिले. बर्मा शेअरमध्यें जपानकडील बातमीप्रमाणें चढउतार होत राहिला, व डिसेंबरमध्यें ते शेअर एकदम गडगडले. गेल्या कित्येक वर्षांत त्या भागांची किंमत इतकी खाली गेली नव्हती. डिसेंबरमध्यें जपानला पॅसिफिक महासागरांत जे भराभर विजय मिळत गेले, त्यामुळें भाव आणखी वाढतील ह्या अपेक्षेनें जे व्यवहार करीत होते, त्यांस चांगलाच धक्का बसला. कित्येक अजीबात बुडाले. खालील तक्त्यांत कांहीं प्रातिनिधिक कंपन्यांच्या भागांचे तुलनात्मक भाव दिले आहेत, त्यांवरून वरील अहवालाचें स्पष्टीकरण होईल. शेअर्सच्या भावांतील चढउताराचे मानानें सरकारी रोख्यांच्या भावांत चढउतार अल्प प्रमाणांत झालेला आढळून येतो. नोव्हेंबर-अखेरपर्यंत, सरकारी रोख्यांचे भाव नियंत्रणांत राहूं शकले व त्यांत चढउतार झालाच नाहीं असें म्हणतां येईल. विमा व तत्सम संस्था व वॉर रिस्क इन्शुअरन्स फंडासारखे पैसे गुंतवूं इच्छिणारें सरकार ह्यांचेकडून सरकारी रोख्यांस चांगली मागणी होती. तथापि जपानच्या आक्रमणानें सरकारी रोख्यांसहि थोडा धक्का दिला. युद्धविषयक इतर कोठल्याहि बातमीचा ह्या रोख्यांवर परिणाम न होतां त्याची किंमत ९६ पर्यंत वर गेली होती. परंतु जपाननें युद्ध पुकारतांच ती ९२ रुपयांवर आली. वर्षअखेर ती ९२ रु. १२ आणे झाली.

| | १९४० २०-१२-४० | १९४१ सर्वांत ज्यास्त. | १९४१ सर्वांत कमी. | १९४१ २२-१२-४१ | वर्षांतील वाढ अगर घट. |
|---|---|---|---|---|---|
| **शेअर्स.** | | | | | |
| बाँबे डाइंग ... ... ... | १०४८ १२ | १५१०—० | ९७२—० | १२४५—० | + १९६—४ |
| सेंचरी ... ... ... | ३६७—८ | ५८२—० | ३४८—० | ४२२—० | + ५४—८ |
| सिंप्लेक्स ... ... ... | १०१—० | २८०—० | ९०—० | २२९—८ | + १२८—८ |
| आंध्र व्हॅली ... ... ... | १६३५—० | १८८५—० | १६०७—८ | १६५५—० | + २०—० |
| टाटा हिफ्र्ड ... ... ... | १८९०—० | २,३५५—० | १६२०—० | १७१०—० | − १८०—० |
| बेलापूर ... ... ... | २१८—० | ३४५—० | १९७—० | २८४—० | + ६६—० |
| बाँबे बर्मा ओल्ड ... ... | ५५८—१२ | ६१७—८ | २९५—० | ३७०—० | − १८८—१२ |
| असोसिएटेड सिमेंट ... ... | १४०—० | १८१—० | १३०—१२ | १६३—० | + २३—० |
| रिझर्व्ह बँक ... ... ... | १०५—४ | ११४—१२ | १०२—० | १०५—० | − ०—४ |
| सेंट्रल ... ... ... | ४०—६ | ५५—० | ३९—१० | ४७—१२ | + ७—६ |
| न्यू इंडिया ... ... ... | ४०—० | ६१—० | ३९—१४ | ५१—० | + ११—० |
| **सरकारी रोखे.** | | | | | |
| $3\frac{1}{2}$% ... | ९४—० | ९६—२ | ९२—० | ९२—१० | − १—६ |
| ५% १९४५-५५ ... ... | ११२—६ | ११२—८ | १०८—८ | १०८—१० | − ३—१२ |
| ४% १९६०-९० ... ... | १०७—८ | १११—२ | १०७—८ | १०८—० | + ०—८ |

# स्फुट-विचार

## पुणें येथील रानडे सप्ताह

न्यायमूर्ति रानडयांची शतसांवत्सरिक जन्मतिथि साजरी करण्याचा कार्यक्रम अनेक ठिकाणीं उत्साहपूर्वक पार पाडण्यांत आला आहे आणि येत आहे. कित्येक शहरांतून त्यासंबंधांत सप्ताह साजरा करण्यांत आला आहे. पुणें येथें न्यायमूर्तींच्या विविध प्रकारच्या कामगिरीस अनुलक्षून आर्थिक व व्यापारी परिषद, साहित्तिकांची व इतिहासतज्ञांची सभा, स्त्रियांचें संमेलन, धार्मिक विषयावर भाषणें, विद्यार्थ्यांच्या संभाषणांची चढाओढ, इत्यादि कार्यक्रम झाला आणि मुख्य दिवशीं म्हणजे गेल्या १८ तारखेस हिराबागेच्या आवारांत प्रकट सभा डॅ. बाबासाहेब जयकर यांच्या अध्यक्षतेखाली भरून तींत श्री. तात्यासाहेब केळकर, पार्शी समाजाचे धर्मगुरु, श्री. जेधे, सर रफिउद्दिन अहमद व प्रो. काळे ह्या वक्त्यांचीं भाषणें झालीं. हिराबाग आणि तिच्यामधील इमारत हीं सार्वजनिक मालकीची असून त्यांची व्यवस्था टाऊन हॉल कमिटी ह्या नांवाच्या विश्वस्तांच्या हातांत आहे. सार्वजनिक उपयोगासाठीं ह्या मालमत्तेचा उपयोग व्हावा ह्या हेतूनें ती खरेदी करण्यांत न्यायमूर्ती रानडे ह्यांनीं पुढाकार घेतला होता आणि तिच्या पटांगणांत व इमारतींत सभा, संमेलनें व प्रदर्शनें भरलीं असल्यानें तिच्यामधील मुख्य दिवाणखान्यास रानडयांचें नांव द्यावें असें शतसांवत्सरिक प्रसंगाच्या निमित्तानें ठरलें आणि ही गोष्ट परवांच्या सभेचे अध्यक्ष श्री. जयकर ह्यांनीं औपचारिक रितीनें जाहीर केलें. हें न्यायमूर्तींचें स्मारक करण्यांत औचित्य दाखवण्यांत आलें असल्यानें त्याबद्दल टाऊन हॉल कमिटीचें व पुणेंकरांचें अभिनंदन करणें आवश्यक आहे.

---

## पुण्याच्या सभेंतील भाषणें

न्यायमूर्ति रानडयांचें सार्वजनिक कार्य देशांतील सर्व धर्मांच्या व वर्गांच्या हितासाठी होतें ह्याची जाणीव पुण्यांतील १८ तारखेच्या सभेंतील भाषणांवरून स्पष्ट होण्याजोगी आहे. पार्शी समाजाच्या वतीनें त्यांच्या धर्मगुरूंनीं हिंदी राष्ट्राचे पुढारी ह्या नात्यानें न्यायमूर्तींची योग्यता किती उच्च दर्जाची होती ह्याचें दिग्दर्शन केलें. सर रफिउद्दीन अहमद ह्यांनीं मुसलमान समाजाच्या वतीनें ह्याच गोष्टीवर जोर दिला. आपल्या देशाच्या उन्नतीसाठीं लोकांनीं आपली सर्वांगीण प्रगति केली पाहिजे आणि राजकीय, सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक क्षेत्रांत त्यांचें पाऊल सारखें पुढें पडत गेलें पाहिजे ह्या न्यायमूर्तींच्या भूमिकेचें रहस्य प्रो. काळे ह्यांनीं आपल्या भाषणांत समजावून सांगितलें. जगांतील सर्व घडामोडी ईश्वरी संकेताप्रमाणें चालत असतात आणि हिंदुस्थानांत ब्रिटिश राज्य प्रस्थापित झालें ह्याचा ईश्वरी हेतू ह्या देशाची उन्नति ह्याच मार्गानें व्हावी अशी असल्याविषयीं न्यायमूर्तींची दृढ श्रद्धा होती. तथापि ते दैववादी नसून प्रयत्नवादी असल्यानें हिंदी लोकांनीं परिस्थितीचा पूर्ण फायदा करून घेतला पाहिजे अशी त्यांची शिकवण होती आणि तीस अनुसरून त्यांनीं अनेक प्रकारांच्या चळवळी हातीं घेतल्या. हिंदी अर्थशास्त्रानें ब्रिटिश अर्थशास्त्राची जागा कां घेतली पाहिजे ह्याचें विवेचन त्यांनीं धैर्यानें व समर्पक रीतीनें केलें आणि स्वदेशी धंद्यांच्या उत्कर्षाचें कार्य चालू केलें. श्री. जेधे ह्यांनीं सत्यशोधक समाजाचे प्रतिनिधि ह्या नात्यानें भाषण करून महात्मा फुले आणि न्यायमूर्ति रानडे ह्यांनीं जनतेस धार्मिक स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठीं कसें सहकार्य केलें ह्याचें वर्णन केलें. सभेचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब जयकर, ह्यांनीं आपल्या भाषणांत न्यायमूर्तींच्या सार्वजनिक चरित्राचें रहस्य मोठ्या मार्मिक रीतीनें व विस्तारानें उकलून दाखवलें. न्यायमूर्तींचे लेख व भाषणें ह्यांचा भरपूर आधार घेऊन त्यांचें धार्मिक, सामाजिक व आर्थिक सुधारणेच्या संबंधांतील विचार साध्या व स्पष्ट शब्दांत त्यांनीं पुढें मांडले. मराठ्यांच्या इतिहासाचें रहस्य न्यायमूर्तींनीं किती भेदक बुद्धीनें ओळखून उघडें केलें आणि आपलें सामाजिक सुधारणेचें तडजोडीचें धोरण किती कौशल्यानें जनतेच्या गळीं उतरवलें त्याचें विवेचन डॉ. बाबासाहेबांनीं रसाळवाणीनें व परिणामकारक रीतीनें केलें. न्यायमूर्तींच्या कार्याची थोरवी सामान्य बुद्धीच्या माणसाच्या मनावर ठसावी आणि त्यांच्या पुण्य स्मरणानें जनतेस सर्वांगीण प्रगतीच्या बाबतींत स्फूर्ति प्राप्त व्हावी ह्या प्रकारचें त्यांचें सबंध भाषण होतें.

---

## हिंदी आयुर्विमा व्यवसायावरील नवें उत्कृष्ट पुस्तक

हिंदी आयुर्विमा कंपन्यांच्या व्यवहाराविषयीं सुपरिन्टेंडेंट ऑफ इन्शुअरन्सनें १९४० च्या ताज्या इअर बुकांत सुचविलेल्या सुधारणा व त्यानें दिलेला इषारा ह्यामुळें विमाक्षेत्रांत थोडी चलबिचल झाली. १९३८ च्या विमा कायद्याचा जाचकपणा नवीन अथवा मजबूत पाया नसलेल्या कंपन्यांस जाणवूं लागला. सुपरिंटेंडेंट ऑफ इन्शुअरन्सचें धोरण विमा कायद्याची कडक अंमलबजावणी करण्याचें दिसून येत आहे. विमा कायद्याचे मूळ हेतुबद्दल कोणाची तक्रार नाहीं. परंतु दीर्घ काळ लाडावलेल्या मुलास एकदम शिस्त लावतां येत नाहीं, तसाच कांहींसा प्रकार विमा कंपन्यांच्या बाबतींत झालेला आहे. कायद्याची अंमलबजावणी जरा सहानुभूतिपूर्वक करण्यांत यावी व कंपन्यांना आपला व्यवहार सुधारण्यास थोडी सवड देण्यांत यावी असें विमा कंपन्यांचें म्हणणें आहे. नव्या कंपन्यांनीं वेळ न गमावतां आपल्या विमेदारांच्या हिताचे दृष्टीनें, इतर कंपन्यांशीं एकीकरण करावें, काटकसरीनें कारभार चालवावा, नाहींतर त्यांची बिकट परिस्थिति होईल, असा सुपरिंटेंडेंट ह्यांचा अभिप्राय आहे. गेलीं कांहीं वर्षें इअर बुकांतून नव्या कंपन्यांच्या स्थापनेस प्रतिकूल असा इषारा देण्यांत येत असे व १९३८ चा विमा कायदा अंमलांत आल्यानंतर अशा इशाऱ्याची आवश्यकता उरली नाहीं. हिंदी विमा व्यवसायाची प्रगति कोणत्या दिशेनें होत आहे व त्यांत खरें संकट कोठें आहे, ह्याची छाननी १९४० चे इअर बुक प्रसिद्ध होण्यापूर्वींच श्री. बी. एन. सहस्रबुद्धे ह्यांनीं आपल्या "स्पॉटलाइट्स ऑफ इंडिअन लाइफ इन्शुअरन्स" ह्या अत्यंत उपयुक्त इंग्रजी पुस्तकांत केली व ह्या दृष्टीनें श्री. सहस्रबुद्धे हे अभिनंदनास पात्र आहेत. श्री. सहस्रबुद्धे ह्यांस धंद्याचा दीर्घ अनुभव असून विमाक्षेत्रांत त्यांनीं प्रत्यक्ष दहा वर्षें काम केलेलें आहे व त्यांनीं हिंदी विमाव्यवसायाचा उत्कृष्ट अभ्यास करून, कोणत्याहि प्रकारचा पूर्वग्रह करून न घेतां, प्रस्तुत पुस्तकांत आपले विचार निर्भीडपणें मांडले आहेत. विमा उतरण्याचे वेळीं कोणत्या कंपनीची निवड करावी, हें ठरविण्यास मार्गदर्शन करण्याचा पुस्तकाचा प्रमुख हेतु आहे. आपण करीत असलेल्या व्यवसायाचें सूक्ष्म परीक्षण स्वतःच करण्यास सवड नसलेल्या नव्या कंपन्यांचे चालकांस हें पुस्तक फारच मार्गदर्शक वाटेल. पुस्तकाचें तपशीलवार परीक्षण येथें करतां येण्याजोगें नाहीं; तें स्वतंत्रपणेंच केलें पाहिजे.

"Spotlights of Indian Life Insurance" ले:—बी. एन. सहस्रबुद्धे. किं. रु. ३, आगाऊ पाठविणारास टपालखर्च माफ.

## पुण्यांतील प्रदर्शनांची पूर्वपीठिका

"पुण्यांतील पहिलें मोठें व सुप्रसिद्ध प्रदर्शन १८८८ सालीं न्या. रानडे यांच्या प्रोत्साहनानें व कै. माधवराव नामजोशी यांच्या खटपटीनें हिराबागेंतील टाऊन हॉलमध्यें भरलें होतें. त्याच प्रदर्शनांतून प्रदर्शन समितीचे चिटणीस श्री. घारपुरे यांच्या अविश्रांत श्रमानें अखिल हिंदुस्थानांत नांवारूपास आलेल्या लॉर्ड रे इंडस्ट्रिअल म्युझियम या नमुनेदार संग्रहालयाचा जन्म झाला. पहिलें प्रदर्शन पाहिलेले श्री. तात्यासाहेब केळकर नि बॅ. गाडगीळ यांच्याकडून त्या वेळच्या आठवणी ऐकावयास मिळतात. १८९० सालीं संग्रहालयाच्या इमारतीची योजना कायम होऊन तोफखान्याच्या आवारांत त्याचा पाया घालण्याचा समारंभ झाला. त्यावेळीं प्रो. वा. गो. काळे हे उपस्थित होते. परंतु पुढें इमारतीची योजना मागें पडली. श्री. नामजोशी हे अकालीं मृत्यु पावले व संग्रहालयसंवर्धनाचें काम थंडावलें. अखेरीला कार्यकर्त्यांच्या अभावीं इंडस्ट्रिअल असोसिएशन ऑफ वेस्टर्न इंडिया या संस्थेनें संग्रहालय व रु. १४००० चा निधि पुणें म्युनिसिपालिटीच्या हवालीं केला. न्या. रानडे हेच या भागांतील औद्योगिक प्रदर्शनाच्या चळवळीचे जनक असल्यानें त्यांच्या जन्मदिनोत्सवानिमित्त भरणाऱ्या औद्योगिक परिषदेबरोबर आम्हीं हें प्रदर्शन भरवीत आहों.":—पुणें येथील प्रदर्शन समितीचे अध्यक्ष, श्री. द. ब. फाटक ह्यांचें भाषण.

### रिझर्व्ह बँकेच्या कार्याचा आढावा

"रिझर्व्ह बँकेकडे विचारासाठीं आलेला पहिला महत्त्वाचा प्रश्न म्हणजे दक्षिण हिंदुस्थानांतील बँकिंगचे क्षेत्रांत उडालेला गोंधळ हा होय. नंतर युद्धास प्रारंभ झाला व बँक रेटसंबंधीं तर्कवितर्क चालू झाले. त्यानंतर हुंडणावळीच्या नियंत्रणाचा महत्त्वाचा प्रश्न उपस्थित झाला व ब्रिटिश कर्जाची हिंदुस्थानानें केलेली फेड ही अगदी ताजी बाब आहे. ह्या सर्व बाबतींत रिझर्व्ह बँकेनें अगदी तपशीलवार इतकी उत्कृष्ट कामगिरी बजावलेली आहे की, हिंदी लोकांना जबाबदारीच्या जागांवर राहून मोठे प्रश्न सोडवितां येत म्हणणारांस रिझर्व्ह बँकेनें चूप बसविलें आहे. रिझर्व्ह बँकेचें बँकिंग, चलन, हुंडणावळ, सहकारी चळवळ इत्यादि बाबतींतील कार्य तिच्या टीकाकारांसहि समाधानकारक वाटेल इतकें चांगलें झालें आहे, परंतु सावकारांना ती अद्याप आपल्या कक्षेंत आणूं शकलेली नाहीं. त्रावणकोर बँकेच्या प्रकरणानंतर रिझर्व्ह बँकेनें बिगर शेड्यूल्ड बँकांसहि आपल्या जाळ्यांत घेतलें आहे. सावकारांवर रिझर्व्ह बँकेचे निर्बंध लादण्यास मुंबईचें श्रॉफ अनुकूल आहेत, चेट्टींना ते नको आहेत व मारवाड्यांचें त्याकडे लक्षहि नाहीं.":—रिझर्व्ह बँकेचे माजी डे. गव्हर्नर सर मणिलाल नानावटी ह्यांचे उद्गार.

### श्रीगणेश मोफत वाचनालय व ग्रंथालय, पुणें

या संस्थेचा २२ वा वार्षिक समारंभ श्री. सरदार आबासाहेब मुजुमदार यांचे अध्यक्षतेखालीं साजरा झाला. यावेळीं संस्थेच्या ग्रंथालयशाखेस श्री. शं. ह. मुळे यांनीं ५१ रु. ची पुस्तकें देणगी दाखल दिलीं व श्री. बी. एम्. जिंतीकर यांनीं आपलेकडील १०० पुस्तकें कांहीं अटींवर संस्थेच्या उपयोगासाठी दिलीं आहेत, याबद्दल संस्था त्यांची आभारी आहे असें चिटणीस कळवितात.

### हिंदी तांदळाचें पीक

आंतरराष्ट्रीय हिंदी व्यापारांतील खाद्य धान्यांचे आयात-निर्गतीमध्यें तांदळाचा अनुक्रम तिसरा लागतो. हिंदुस्थान व चीन ह्या दोन देशांत मिळून तांदळाच्या एकूण जागतिक उत्पादनापैकी दोन तृतीयांश उत्पादन होतें तरी त्या देशांना तांदळाची आयात करावी लागते. गेल्या दहा वर्षांत हिंदुस्थाननें दरसाल १५ ते २५ लक्ष टन तांदळाची आयात केलेली आहे.

तांदूळ निर्गत करणाऱ्या देशांत ब्रह्मदेश, सयाम व इंडोचायना हे प्रमुख आहेत. एकट्या ब्रह्मदेशांतून जागतिक निर्गतीच्या ३०% म्हणजे ३० लक्ष टन तांदळाची निर्गत होते व त्यांतील बराच मोठा भाग हिंदुस्थानांत येतो. तांदळाचे लागवडीवर व व्यापारावर बहुसंख्य ब्रह्मी लोकांची उपजीविका अवलंबून आहे.

हिंदुस्थानांत एकूण लागवडीखालील जमिनीपैकीं १८% व खाद्य धान्यांचे लागवडीखालील जमिनीपैकीं ३६% जमिनींत तांदूळ लावण्यांत येतो. ह्यावरून तांदळाच्या पिकाचें महत्त्व लक्षांत येईल. दरसाल सुमारें ७,६२,६०,००० एकर जमिनींत तांदूळ लावला जातो. एकट्या बंगालमध्येंच २,१०,००,००० एकरांत भात पेरला जातो. तांदळाचें हिंदी वार्षिक उत्पादन साधारणपणें २ कोटि, ९० लक्ष टन इतकें आहे, व त्याची किंमत सुमारें, २ अब्ज, ७६ कोटि रुपये भरते. एकूण उत्पादनापैकीं ८८% उत्पादन ब्रिटिश हिंदुस्थानांत व १२% उत्पादन संस्थानी हद्दींत होतें. हिंदुस्थानांत होणाऱ्या तांदळाच्या वार्षिक आयातीची किंमत १३½ कोटि रुपये भरते. हिंदुस्थानांत तांदुळाचा दरमाणशीं सरासरी वार्षिक उठाव ९०½ शेर आहे. बंगालमध्यें तें प्रमाण १७२ शेर पडतें. ब्रह्मदेशांत तें ११५½ शेर आहे.


धरित्रीमातेच्या सेवेसाठीं—

आपलें जीवन वाहणाऱ्या तरुण-तरुणीची कथा

संगम

नवयुग चित्र




यशस्वी ५ वा आठवडा

मिनर्व्हा—पुणें

रोज दोन खेळ ६। व १० शनि. रवि. सोम.

जादा खेळ ३। वा.

### कॅलेंडर-प्रदर्शन, पुणें, १९४२.

चालू सालचें कॅलेंडरप्रदर्शन फेब्रुवारीचे दुसरे आठवड्यांत भरविण्यांत येणार आहे.

व्यापारी मंडळींनीं प्रदर्शन यशस्वी करणेसाठीं आपले १९४२ चे कॅलेंडरची एक प्रत कमिटीकडे पाठवून आपली सहानुभूति व्यक्त करावी.

चिटणीस, प्रदर्शन-कमिटी, १४०८ कसबा. नव्यापुलाजवळ, पुणें.

### हितचिंतक–ग्रामपंचायत विशेषांक

लिंब येथील 'हितचिंतक' नें ग्रामपंचायत विशेषांक म्हणून आपला २४ व्या वर्षाचा पहिला अंक ग्रामपंचायतींना उपयुक्त व मार्गदर्शक व्हावा ह्या दृष्टीनें प्रसिद्ध केलेला आहे. अंकांत ग्रामोन्नतीविषयीं बरेच लेख आलेले आहेत. ह्या पुढें 'हितचिंतक' प्रत्येक अंकांत पंचायतीसाठीं एक पृष्ठ नियमित देणार आहे.

## निवडक बाजारभाव

बँक रेट (२८ नोव्हेंबर, १९३५ पासून) 3%

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन (१९४५–५५) | १०८–४ |
| ४% १९४३ | १०३–० |
| ३½% बिनमुदत | ९५–१ |
| ३½% १९४७–५० | १०१–८ |
| ३% (१९६३–६५) | ९४–४ |
| २¾% १९४८–५२ | ९७–४ |

### मंडळ्यांचे भाग

(कंसातील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया (१००–५०) ११% | १४५–० |
| बँक ऑफ बरोडा (१००–५०) १०% | १११–८ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया (५०–२५) ९% | ४७–८ |
| इंपीरिअल बँक (५००) १२% | १५७०–० |
| रिझर्व्ह बँक (१००) ३½% | १०५–० |
| बॉंबे ट्रॅम्वे ऑर्डि. (५०) १२% | १३८–० |
| टाटा पॉवर ऑर्डि. (१०००) ५½% | १५८१–४ |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. (१०००) ७½% | १६५५–० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) ११½% | ८५५–० |
| तापी व्हॅली (५००) ८% | ६४१–४ |
| बेलापूर शुगर (५०) १० रु. | २१८–० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट (१००–५०) २ रु. | ४९–० |
| शिंदा स्टीम (१५) १ रु. | २०–३ |
| न्यू इंडिया विमा (७५–१५) १ रु. ८ आ. | ५२–१२ |
| ओरिएंटल विमा (२००) १२५ रु. | ४२६०–० |
| टाटा आयर्न ऑर्डि. (७५) १५ रु. | ३०३–८ |
| टाटा आयर्न डिफर्ड (३०.) १७२ रु.१० आ.० पै | १६००–० |
| असोसिएटेड सिमेंट (१००) ५ रु. | १५६–० |

### सोनें–चांदी

| | |
|---|---|
| सोनें (मिंट) प्रत्येक तोळ्यास | ४६–६–६ |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यांस | ७०–१२ |


## दि बँक ऑफ इंडिया लि.

[स्थापना : १९०६]

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | रु. १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड | रु. १,१५,५०,००० |

**मुख्य कचेरी :** ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

**मुंबईमधील शाखा :** बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

**इतर शाखा :** अहमदाबाद (भद्र, मुख्य ऑफिस), अहमदाबाद (एलिस ब्रिज शाखा), अहमदाबाद (स्टेशन शाखा), अंधेरी (मुंबई शेजारीं), बांद्रे (मुंबई शेजारीं), कलकत्ता (क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर, कराची, नागपूर (किंग्जवे), नागपूर (इतवारी बझार), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत.

**लंडन एजन्ट्स :** वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

**डायरेक्टर्स :** सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई, सर जोसेफ के. नाईट, मि. ए. गेडिस, सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई., मि. दिनशा के. दाजी, श्री. रामनिवास रामनारायण.

**करंट डिपॉझिट अकाउंट्स :**

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षा कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमीचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

एजंट—टी. आर. लालवाणी.

## दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

**हेड ऑफिस : पुणें शहर.**

**स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.**

**मुंबई शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.**

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १०,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ४,१४,०५० |
| वसूल झालेलें भांडवल | रु. २,०६,९७५ |
| एकूण खेळतें भांडवल | रु. ३३,००,००० |

### डायरेक्टर्स

प्रो. वा. गो. काळे, अध्यक्ष

| | |
|---|---|
| श्री. धों. कृ. साठे | श्री. मा. रा. जोशी |
| श्री. न. ग. पवार | श्री. श्री. गो. मराठे |
| श्री. त्र्यं. वि. रानडे | श्री. र. चिं. सोहोनी |
| श्री. वा. पु. वर्दे | मि. फ. दो. पदमजी |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदीविक्री कसोशीनें करून दिली जाते.

बँकेच्या शेअरवर १९४० अखेर पुऱ्या होणाऱ्या वर्षी द. सा. द. शेंकडा ४ टक्के करमाफ डिव्हिडंड दिलें गेलें. बँकेची शेअरविक्री चालू आहे.

म. वि. गोखले
मॅनेजर.

राहाणेची व भोजनाची उत्तम सोय




फोन नं. ७७९ गणपति चौक, व्यवस्थापक.

वक्तशीर आणि मनपसंत काम
करून देणारे
**मोहन वॉच कंपनी**
रेग्युलेशन मोफत
कॉमनवेल्थ बिल्डिंगसमोर लक्ष्मी रोड, पुणें २.

पावसाळ्यांतील उपयुक्त औषधें
**संग्रह करा**
कॉलरा गोळी, संजीवनी गुटी, कुटजारिष्ट,
पाचकवटी, पंचकोलासव
तसेंच
पंडुरोगावरील अप्रतिम गुणकारी
**—: रक्तवर्धक :—**
सुवर्णकल्प, बालजीवन, अस्थिपोषक,
रक्तशोधक, कफनाशक हीं पेटंट
औषधें मागवा

मुख्य दुकान—गणपति चौक, लक्ष्मीरोड, पुणें
**आयुर्वेद रसशाळा पुणें, लि.**

सर्व तऱ्हेची कापड छपाई व रंगाई (Calico Printing and Dyeing) करणारा कारखाना.
**'पायोनियर डाइंग हाऊस'**
कोचाचें कापड (Casement cloth), दाराचे पडदे, टेबल कव्हर इ. टिकाऊ रंगाचे, स्वदेशी तयार मिळतात. कारखानाः—
भिकारदास मारुती रोड, दातेवाडी, पुणें.




**मधुमेहावरील औषध**
तीन आठवड्यांचे
औषधास फक्त रु. ७
— मागविण्याचा पत्ता —
मॅनेजिंग डायरेक्टर, रूरल प्रॉडक्ट्स
कंपनी लिमिटेड.
९२३ ए, सदाशिव, पुणें २.

महायुद्धाची जाणीव! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन
स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर
**महिंद्रकर ब्रदर्स**
तयार कपड्याचे व्यापारी
बुधवार चौक, पुणें

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व
रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनी 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

**जाहिरातींचे दर.**

खालील पत्त्यावर चौकशी करावी.

व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

**वर्गणीचे दर.**

वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ८ | पुणें, बुधवार, तारीख २८ जानेवारी, १९४२ | अंक ४

## कॉमनवेल्थचा वैभवशाली विस्तार

★ २७ हजारांचेवर पॉलिसी–होल्डर्स
★ एकूण चालू विमे २ कोटीचेवर
★ दोन हजारांहून अधिक र्यकर्ते निरनिराळ्या प्रांतांत कॉमनवेल्थस उत्साहानें काम करीत आहेत.



हेड ऑफिस बिल्डिंग

# कॉमनवेल्थ

अॅशुअरन्स कंपनी लि.

चेअरमन
* खा. ब. एम्. एन्. मेथा,
C. I. E., M. B. E.

अॅक्टिंग ऑफिस सुपरिन्टेंडेंट * एम्. एन्. भागवत, B. A.

' कॉमनवेल्थ ' ची पॉलिसी घेऊन जीवन निश्चिंत व सुखी करा.

राहाणेची व भोजनाची उत्तम सोय




फोन नं. ७७९ गणपति चौक, व्यवस्थापक.

**वक्तशीर आणि मनपसंत काम करून देणारे**

## मोहन वॉच कंपनी

रेग्युलेशन मोफत

कॉमनवेल्थ बिल्डिंगसमोर लक्ष्मी रोड, पुणें २.

# विविध माहिती

### इंडिया पेपर पल्प कं. लि. कलकत्ता

वरील कंपनीस ३० सप्टेंबर १९४१ अखेर संपलेल्या वर्षी ७ लक्ष, २९ हजार रुपये निव्वळ नफा झाला. कंपनीची विक्री २४ लक्ष रुपयांची झाली.

### बडोदें संस्थान

ताज्या शिरगणतीच्या अहवालाप्रमाणें, बडोदें संस्थानाचें क्षेत्रफळ ८,१७६ चौरस मैल असून त्याची लोकसंख्या २८ लक्ष, ५५ हजार आहे. संस्थानांत एकूण ६४ गांवें व २,८९६ खेडीं आहेत. खेड्यांतील लोकांची शहराकडे धाव असल्याचें दिसून येतें.

### हिंदी रेल्वेजचें उत्पन्न

| १ एप्रिल ते ३१ डिसेंबर | रुपये |
|---|---|
| १९४० | ८०,३०,००,००० |
| १९४१ | ९२,७२,००,००० |

### कपास पेरण्यास बंदी

इजिप्तच्या सरकारनें त्या देशांतील बऱ्याच मोठ्या भागांत कपास पेरण्यास बंदी केली आहे. ज्या ठिकाणीं कपास नाहीं, तेथें धान्य पेरण्याची सक्ती करण्यांत आली आहे.

### २½ हजार रुग्णांची सोय

मुंबईवर वैमानिक हल्ला झालाच, तर तरतूद असावी ह्या दृष्टीनें मुंबई सरकार १½ लक्ष रुपये खर्चून तेथील इस्पितळांत आणखी २½ हजार रुग्णांची सोय करणार आहे.

### चेक्सची [illegible]

मुंबई बँकर्स क्लिअरिंग हाउसमध्ये १९४० व १९४१ सालीं झालेल्या चेक्सच्या देवघेवींचे तुलनात्मक आंकडे खालीं दिले आहेत:—

| वर्ष | चेक्सची संख्या | चेक्सची रकम (रु.) | प्रत्येक चेकची सरासरी रकम रु. |
|---|---|---|---|
| १९४० | ५५,७९,६०१ | ८ अब्ज, २८½ कोटि | १,४८५ |
| १९४१ | ६२,८७,०८२ | ९ अब्ज, ७८½ कोटि | १,५५७ |

### औद्योगिक वांधे

१९४१ च्या पहिल्या तिमाहींत ब्रिटिश हिंदुस्थानामध्यें ७१ औद्योगिक वांधे झाले व त्यांत २५,९४५ कामगारांचे कामाचे १,८५,५०६ तास बुडाले.

### कॅनडा आपलें येणें कर्ज रद्द करणार

युद्धसाहित्य, अन्नसामुग्री, कच्चा माल, इत्यादींसाठीं ग्रेटब्रिटनला कॅनडाचें १½ अब्ज डॉलर्सचें देणें झालें आहे, तें कॅनडा रद्द करणार आहे.

### बर्मुडा येथील बँकेपुढील प्रश्न

बर्मुडा येथें कांहीं काळापुरत्या येऊन राहिलेल्या रहिवाश्यांनीं आपले पैसे तेथील बटरफील्ड ॲन्ड सन ह्या खासगी बँकिंग फर्म-कडे ठेव म्हणून ठेवले आहेत. त्यामुळें बँकेकडील ठेवींत गेल्या वर्षी ५०% वाढ झाली. हे पैसे केव्हां परत मागितले जातील त्याचा नेम नसल्याकारणानें, ते बऱ्हंशीं रोख शिल्लक ठेवणें बँकेस प्राप्त झालें आहे. ३० जून, १९४१ रोजीं बँकेच्या एकूण जिंद-गीपैकीं (१७ लक्ष, १३ हजार पौंड) १० लक्ष, २५ हजार पौंड एवढी रकम तिनें रोख अगर इतर बँकांत ठेवली. बँकेस ह्या ठेवीपासून फायदा होत नसल्याकारणानें, ठेव ठेवणारांकडून ती व्यवस्थेचा खर्च वसूल करूं लागली आहे.

### चॅनेल आयलंड्स

चॅनेल आयलंड्सचा ताबा ग्रेट ब्रिटननें सोडण्यापूर्वी ज्या व्यापाऱ्यांनीं त्या बेटांकडे माल निर्गत केला होता. त्यांस त्यांचें तेथील येणें बुडीत म्हणून लिहून टाकणें प्राप्त झालें आहे. सर-कारनें व्यापाऱ्यांची नुकसानभरपाई—करावी, अशी व्यापारी संस्थांनीं केलेली खटपट व्यर्थ गेली.

### ब्रह्मी नोटांची मोड मिळण्याची सोय

"सध्याची विशिष्ट परिस्थिति लक्षांत घेतां, रिझर्व्ह बँक आपल्या शाखांमार्फत ब्रह्मदेशांतच केवळ चालणाऱ्या चलनी नोटा ½% डिस्कौंटनें स्वीकारून त्यांची मोड देईल" असें जाहीर कर-ण्यांत आलें आहे. किमान आठ आणे तरी चार्ज घेण्यांत येईल.

### इराणचे माजी शहा

सध्याच्या युद्धपरिस्थितींत इराणच्या माजी शहांनीं मॉरिशस-मध्यें वास्तव्य करावें, असें ठरविण्यांत आलें आहे. ब्रिटिश सर-कारच्या इच्छेनुरूप त्यांची तेथें उत्कृष्ट व्यवस्था ठेवण्यांत येत आहे.

### प्रमुख बँकांस गेल्या वर्षी झालेला नफा

| बँक | नफा ( रुपये ) |
|---|---|
| इंपीरिअल | ८०,१६,९०० |
| बँक ऑफ इंडिया | ३३,११,६५५ |
| पंजाब नॅशनल | ६,१७,८९० |
| इंडियन बँक | ६,८९,७६७ |
| बँक ऑफ़ बरोडा | ९,८२,१४४ |

### इंजनांचा तुटवडा

"सबंद हिंदुस्थानांत, ब्रॉड-गेजवर चालणाऱ्या इंजनांच्या संख्येंत १९२९-३० चे मानानें १९३९-४० सालीं ६३३ इंज-नांची घट पडलेली आहे. प्रत्येक इंजनाची माल ओढण्याची शक्ति वाढलेली असली तरी मागणी पुरी पडण्याइतकीं इंजनें अस्तित्त्वांत नाहींत, असें दिसतें. ज्यास्त वॅगन्स मिळाल्या तरी त्या ओढण्याला इंज़नें मिळतील का?" बेंगाल कोल कं. लि. चे अध्यक्ष, मि. मीलिंग, ह्यांचें कंपनीच्या वार्षिक सभेंत भाषण.

### हिंदुस्थानचे नवे कमांडर–इन–चीफ

हिंदुस्थानचे कमांडर–इन–चीफ़ जनरल सर आर्किबाल्ड वेव्हेल ह्यांचे जागीं ज़नरल सर ॲलन फ्लेमिंग हार्टले ह्यांची नेमणूक बादशहांनीं केली आहे. कमांडर–इन–चीफ हे गव्हर्नर जनरलच्या एक्झिक्यूटिव्ह कौन्सिलचे सभासद असतातच.

### बॉंबे स्वदेशी को. स्टोअर्स कं. लि.

वरील स्टोअर्स कंपनीनें प्रत्येक भागास २ रुपये अथवा भागाचे दर्शनी भागास २०% असें गेल्या वर्षीच्या व्यवहारांतील नफ्यांतून डिव्हिडंड जाहीर केलें आहे.

### लंडन स्टॉक एक्सचेंज

युद्धास प्रारंभ झाल्यापासून, लंडन स्टॉक एक्सचेंजवर काम करण्यास परवानगी असणाऱ्या सभासदांची व नोकरांची संख्या १४½ हजारांची ६ हजारांवर आली आहे. त्यापैकीं ३½ हजार ४५ वर्षांवरील आहेत. नोकरांनीं फौजेंत दाखल होण्यामुळें ही घट पडली आहे. पुरुष कारकुनांचे जागीं स्त्रियांची नेमणूक होऊं लागली आहे. परंतु आतांपर्यंत दोनच स्त्रिया नेमण्यांत आल्या आहेत.

अनुक्रमणिका

| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | २८ |
| २ चलन, बचत व गुंतवण | २९ |
| ३ हवाई-हल्ल्यापासून बचाव | २९ |
| ४ स्फुट विचार ... | ३१ |
| रणांगणांतील हालचाली—श्री. वैकुंठराय मेहता ह्यांचें भाषण—बेलापूर येथील सहकारी परिषद्—कै. भालचंद्रपंत सामंत. | |
| ५ कागदाची काटकसर करणेचे कांहीं प्रकार... | ३२ |
| ६ भाडगुळावर मोहीम ... | ३३ |
| ७ चित्रपटाचे धंद्यावर कराचा बोजा ... | ३३ |
| ८ ग्रेटब्रिटनचें परराष्ट्रांतील भांडवल ... | ३३ |
| ९ निवडक बाजारभाव ... | ३३ |

# अर्थ

बुधवार, ता. २८ जानेवारी, १९४२

## चलन, बचत व गुंतवण

आवश्यक असलेली सर्व लढाऊ सामुग्री भरपूर पुरवणें आणि त्यासाठी लागणाऱ्या खर्चाची तजवीज करणें हें युद्ध-काळांत सरकारचें पहिलें कर्तव्य असतें. रणांगणावरील हालचाली लष्करी तज्ञांच्या सल्ल्याप्रमाणें निश्चित करून युद्धासंबंधांतलें धोरण यशस्वी होण्याकरितां ज्या योजना अमलांत आणाव्या लागतात, त्यांस पैसा लागतो आणि तो पुरवण्याचें काम सरकारच्या फडनवीशी खात्यास कौशल्यानें करावें लागतें. जनतेचे प्रतिनिधी ह्या नात्यानें राज्यकर्ते कारभार हाकीत असतात आणि त्यांस युद्ध-खर्चाची भरपाई लोकांकडून मिळणाऱ्या पैशांतूनच करावयाची असते. हा पैसा सरकारास मिळण्याचे दोन मार्ग असतात आणि ते कर व कर्ज हे होत. रोजच्या रहाणीस अत्यावश्यक असलेल्या आपल्या प्राप्तींतला अंश स्वतः खर्चून बाकीची मिळकत लोकांनीं कर व कर्ज ह्यांचे स्वरूपांत सरकारच्या स्वाधीन करावी अशी अपेक्षा असते. युद्ध-खर्च, जनतेची प्राप्ती, कर व कर्ज ह्यांचा मेळ घालणें हें मोठ्या कौशल्याचें काम असतें. राष्ट्राचा खर्च युद्ध-परिस्थितींत विलक्षण रीतीनें वाढत असतो आणि तो चलनाच्या सहायानें व्हावयाचा असल्यानें पैशाचा पुरवठा मागणीस अनुसरून योग्य मर्यादेंत राखणें हें कामहि अवघड असतें. सरकारचा खर्च अवाढव्य रीतीनें वाढणें म्हणजे देशांतील व्यवहारांत मोठ्या प्रमाणांत चलन खेळणें होय. युद्ध-परिस्थितीमुळें एका बाजूनें अनेक जिनसांचा पुरवठा मर्यादित होतो आणि हा माल विकत घेण्याचें जनतेचें सामर्थ्य चलनाच्या विस्ताराच्या योगानें मात्र वाढलेलें असतें. ह्या बाबतींत मागणी-पुरवठ्याचा मेळ न बसल्यास बाजारभाव चढतात आणि कामकरी व मध्यम वर्गांतले लोक ह्यांस प्राप्ति वाढण्याची आवश्यकता भासूं लागते. चढते बाजारभाव आणि विस्तार पावणारें चलन ह्यांची योग्य सांगड घालण्यासाठी सरकारला खास योजना अंमलांत आणाव्या लागतात, त्या दुहेरी असतात. लोकांनीं विकत घ्यावयाच्या जिनसांच्या पुरवठ्याचें नियंत्रण करणें आणि त्यांस आपल्या खर्चांत बचत करावयास लावून ती कर्जाच्या मार्गानें आकर्षून घेणें ह्या त्या योजना होत.

खाद्य पदार्थ व कपडे ह्यांच्या खरेदीवर इंग्लंडमध्यें सरकारनें नियंत्रण घातलें आहे आणि ठराविक किंमतीचीं तिकिटें देऊनच लोकांनीं हे जिन्नस विकत घेतले पाहिजेत असा तेथें निर्बंध आहे. त्याचप्रमाणें लोकांनीं खर्चांत बचत करून शिलकी पैसा सरकारी रोखे खरेदी करून त्यांत गुंतवावा ह्यासाठी जोराचा प्रचार त्या देशांत चाललेला आहे. हिंदुस्थानांत मालाच्या खरेदीवर सरकारी नियंत्रण नाहीं. युद्धपरिस्थितीमुळें मालाची वहातूक अडचणीची होऊन स्वाभाविक रीतीनें जिनसांच्या पुरवठ्यास मर्यादा बसेल तेवढेंच ह्या देशांत नियंत्रण आहे असें म्हणतां येईल. तथापि, प्रमाणाबाहेर चलनाचा प्रसार होऊन बाजारभाव चढण्यांत त्याचा परिणाम होऊं नये म्हणून लोकांची बचत सरकारी रोख्यांत आकर्षली जावी असा प्रयत्न चालू आहे. वाढत्या युद्धखर्चाबरोबर व्यवहारांत अधिक चलन खेळणें अपरिहार्य आहे आणि तें सरकारकडे परत जावें ह्या हेतूनें देशांत ठिकठिकाणीं मंडळें स्थापण्यांत आलीं आहेत आणि तीं ह्या प्रकारची बचत व सरकारी रोख्यांत गुंतवणें ह्यांचे बाबतींत प्रचार करीत आहेत. प्रस्तुत प्रकरणीं चर्चा करून धोरण ठरवण्यासाठी हिंदुस्थान सरकारचे फडनवीस सर जेरेमी रेस्मन ह्यांनीं दिल्ली येथें नुकतीच एक परिषद बोलावली होती. लोकांची बचत सरकारकडे आकर्षण्याचे व त्या संबंधांतल्या प्रचाराचे नवीन व अधिक कार्यक्षम मार्ग शोधून काढणें हें त्या परिषदेचें मुख्य कार्य होतें. सामान्य जनतेमध्यें वैयक्तिक प्रचार होणें आणि स्थानिक मंडळींनीं लोकांचीं मनें बचतीकडे वळविणें हाच इष्ट व कार्यक्षम मार्ग आहे हा दिल्लीच्या परिषदेंत झालेल्या चर्चेचा निष्कर्ष होता असें प्रसिद्ध झालें आहे.

चलन व्यवहारांत अधिक खेळणें हें युद्धासारख्या परिस्थितींत अपरिहार्य आहे. चलनाचा व मालाच्या पुरवठ्याचा मेळ बसणें ही महत्त्वाची गोष्ट आहे आणि तो बसण्यास चलनाचा कांहीं भाग व्यवहारामधून काढून घेतला जाणें आवश्यक होतें. इंग्लंड, अमेरिका, कानडा इत्यादि सर्वच देशांत चलनाचा झपाट्यानें विस्तार होत आला आहे, परंतु तेथें जनतेची बचत आणि तिची सरकारी कर्जांत गुंतवण त्यांचीहि प्रगति होत आहे. हिंदुस्थानांत चलन कसें वाढलें आहे हें रिझर्व्ह बँकेच्या व्यवहाराचे प्रस्तुत संबंधांतले तुलनात्मक आकडे खालीं दिले आहेत त्यांवरून दिसून येईल:—

हिंदी चलनाची वाढ

| | प्रचलित नोटा (कोटि रुपये) |
|---|---|
| ऑगस्ट १९३९ पूर्वीचे १९ महिने (सरासरी) | १८४ |
| मार्च १९४१ नंतरचे १९ महिने (सरासरी) | २३६ |
| १६ जानेवारी १९४२ रोजी | ३५२ |

## हवाई-हल्ल्यापासून बचाव

आपला बिल्डिंग व स्ट्रीट वॉर्डन कोण आहे, तें प्रथम समजून घ्या, कारण ते तुम्हांस आतां व पुढें अधिक जरूरीचे वेळीं सहाय करणार आहेत.

### हल्ल्यापूर्वी

घरगुती व्यवहार व उद्योगधंदा पूर्ववत् चालू ठेवा. काम थांबवूं नका. गप्पा ऐकूं नका अथवा गर्दी वाढवूं नका. अन्नसामुग्रीवर

अच्छादन ठेवा. डब्यांत ती भरून वर झांकण घालणें फार उत्तम. झांकण उडून जाऊं नये ह्यासाठी त्यावर वजनें ठेवा, कारण कांचेचे तुकडे त्यांत उडाले तर अन्न खाणें धोक्याचें आहे व तें कदापि खाऊं नये. पिण्याचें पाणी हाताशीं पण सुरक्षित ठेवा. पाणी जेवढें भरून ठेवतां येईल तेवढें ठेवा, म्हणजे लागलेली आग तात्काळ विझवितां येईल.

### हल्ल्याचे वेळीं

इषारा ऐकला कीं, घरांत बसा. बाहेर जाणें धोक्याचें असून जाण्यास मनाई आहे. घराबाहेर असल्यास, जवळच्या घरांत शिरा व तेथेंच थांबा. घराबाहेर रहाण्यास मनाई आहे. वॉर्डनचा सल्ला घ्या. घरांतील तळमजल्यावरील आंतली खोली सर्वांत सुरक्षित. रस्त्यावर खिडक्या नसलेली खोली श्रेयस्कर. खुर्ची, गादी, इत्यादींवर बसा अगर निजा. भिंतीस टेकूं नका. खिडक्यांपासून दूर रहा; उडत्या कांचा मृत्यूस कारण होऊं शकतात. खिडक्या उघड्या ठेवा. हॅंडरॅटलनें गॅस हल्ल्याचा इशारा दिला, कीं खिडक्या दारें उघडून टाका. भेगा वगैरे कागदाच्या बोळ्यांनीं अथवा चिंध्यांनीं भरून टाका. ह्या कामीं ब्लॅंकिटें उत्तम. गॅस मीटर बंद करा. शेगड्या, समया, चुली इत्यादि विझवा. धार्मिक कामासाठींहि वात लावूं नका. पेटलेल्या आगी प्रबळ होण्यापूर्वीं तात्काळ विझवा; त्यासाठी पाण्याची तरतूद हवीच. हानी अथवा नुकसान झाल्यास तात्काळ बिल्डिंग वॉर्डन, स्ट्रीट वॉर्डन, पोलिस अथवा सिव्हिक गार्ड ह्यांस कळवा.

### हल्ल्यानंतर

"ऑल क्लिअर"चा इषारा मिळाला, कीं नेहमीच्या कार्यक्रमास प्रारंभ करा. गर्दी वाढवूं नका. नुकसानी बघण्यास जाऊं नका; इतरांवरील आपत्ती तुमचा तमाशा नव्हे. तुमच्यावर पाळी आल्यास तुम्हांकडे लोकांनीं निरखून पाहिलेलें तुम्हांला आवडणार नाहीं.

### गॅस

गॅस वापरला जाण्याचा संभव नाहीं, परंतु तो वापरण्यांत आलाच, तर खालील गोष्टी लक्षांत ठेवा. हॅंडरॅटलचा आवाज करून वॉर्डन व पोलीस गॅसचा इशारा देतील. तो ऐकूं येतांच, सर्व दारें व खिडक्या लावून घ्या, कागदांनीं अथवा कापडाच्या चिंध्यांनीं भेगा बुजवा व ब्लॅंकेटांचा उपयोग करा. शांत रहा; व "ऑल क्लिअरचा" इशारा मिळेपर्यंत, तुम्हीं करीत असलेलें काम चालू ठेवा. गॅसचा धोका संपल्याचें कळविण्याकरितां पोलीस व वॉर्डन हातानें छोट्या घंटा वाजवतील. त्या ऐकल्यावर दारें व खिडक्या उघडण्यास हरकत नाहीं. गॅसचा उपयोग केला जात नसेल, अशा सर्व वेळीं दारें-खिडक्या उघड्या ठेवा म्हणजे कांचा उडून जातील, त्या तुम्हांस अपाय करणार नाहींत.

नेहमीं शांत व धीरोदात्त रहा म्हणजे तुमचें अनुकरण करून इतरहि तसेंच करतील.

शत्रूला तुम्हांस गोंधळून टाकावयाचें आहे, तेव्हां त्याचेकडे दुर्लक्ष करून त्याचा पराभव करा.

### इशारे

दोन मिनिटें वाजणारा, आवाजांत चढ-उतार करणारा भोंगा म्हणजे हवाई हल्ल्याचा इशारा होय. भराभर कर्कश आवाज देणारी शिटी इन्सेंडिअरी बॉंबचा वर्षाव दर्शविते. हॅंडरॅटल म्हणजे विषारी वायु, हातानें वाजविण्याची घंटा म्हणजे विषारी वायूचा हल्ला बंद व दोन मिनिटें एकाच आवाजांत वाजणारी शिटी म्हणजे सब ठीकचा इशारा होय.

६ वा यशस्वी आठवडा
दोन विरुद्ध दिशेनें वहाणारे प्रवाह!
ते एकत्र झाले तर किती प्रभावी
कार्य करूं शकतात त्याचें चित्र
संगम
नवयुग चित्र
: निर्माते :
विनायक
मिनर्व्हा—पुणें
रोज दोन खेळ ६॥ व १० शनि. रवि. सोम.
जादा खेळ ३ वा.

महायुद्ध दाराशीं आलें
परदेशी औषधें
दुर्मिळ व महाग झालीं
पण
भिण्याचें कारण नाहीं !!!
— कारण —
आयुर्वेद रसशाळा पुणें लि०
या देशी औषधाच्या प्रसिद्ध कारखान्यानें
तयार केलेलीं
• रक्तवर्धक, • उपनाह,
• बालजीवन, • कॅल्सीप्राल
इत्यादि पेटंट, स्टँडर्ड व लोकप्रिय औषधें खात्री पटल्यामुळें
★ डॉक्टर्सहि वापरूं लागले आहेत. ★
दरसाल बिनचूक नफा वाटणाऱ्या ह्या कंपनीचे
शेअर्स व औषधें मागवा.
आयुर्वेद रसशाळा पुणें लि०
मुख्य दुकान गणपति चौक, लक्ष्मीरोड, पुणें २.

# स्फुट-विचार

## रणांगणांतील हालचाली

मलायामध्यें जपानी सैन्य हळुहळु सिंगापूरच्या रोखानें पुढें येत आहे आणि ब्रह्मदेशांतहि त्याची गडबड चालली आहे. विशेषतः रंगूनवर जपानी विमानांचे हल्ले वाढत्या प्रमाणांत होत आहेत. पॅसिफिक महासागराच्या ह्या विभागांत ह्या रीतीनें जपानची प्रगति होत आहे हें पाहून इंग्लंडमधील लोकमत त्याबद्दल आपल्या सरकारास जाब विचारीत असून त्यानें पूर्व एशियांत लढाऊ तयारी ठेवावयास पाहिजे होती तशी ती ठेवली नाहीं अशी त्याचेवर टीका केली जात आहे. मलायामध्यें जपाननें विमानगृहें व महत्वाचीं बंदरें झडप घालून ताब्यांत घेतलीं आणि किनाऱ्यावर आपलें सैनिक उतरून ब्रिटिश फौजांस दक्षिणेकडे माघार घेणें आवश्यक केलें, त्याचें कारण बचाव करणाऱ्या ब्रिटिश सैन्यास लढाऊ विमानांचा जरूर तो पुरवठा होऊं शकला नाहीं ही गोष्ट इंग्लंडमध्यें अधिकाऱ्यांनीं व मंत्र्यांनीं कबूल केली आहे.त्यांचें म्हणणें असें आहे कीं, युद्धाच्या हालचालींकडे व्यापक व अंतिम परिणामांच्या दृष्टीनें पाहिलें असतां सिंगापूरच्या बाजूस जपानच्या अनपेक्षित हल्ल्यांचा तात्काळ प्रतिकार करण्यास समर्थ अशी लढाऊ तयारी जागेवर नसणें अपरिहार्य होतें. एकाच वेळीं अनेक रणांगणांवर युद्धसामुग्री भरपूर पाठवणें शक्य नव्हतें. रशियास सामान पुरविणें अत्यावश्यक होतें आणि लिबियांतून जर्मनी व इटली ह्यांच्या सैन्याची हकालपट्टी करणें हीहि तातडीची गरज होती. युरोपांत जर्मनीचें बळ खच्ची करणें ही जिव्हाळ्याची गोष्ट आजहि आहे आणि रशियानें हिटलरवर अलीकडे जे दणदणित विजय मिळवले आहेत ते शक्य होण्यास इंग्लंड व अमेरिका ह्यांस त्या रणांगणावर लढाऊ सामान पाठवणें अगत्याचें होतें. त्यांनीं असें केलें नसतें तर कॉकेशस व सुएझ कालवा ह्यांचेकडची बाजू उघडी पडली असती आणि हिटलरच्या पश्चिम एशिया व इजिप्त ह्यांमधील स्वाऱ्यांच्या योजनांस अनुकूल परिस्थिति निर्माण झाली असती. ह्या विचारसरणींत पुष्कळ तथ्य आहे, हें सामान्यतः मान्य करावें लागेल. इंग्लंड, अमेरिका, चीन, व ईस्ट इंडीज ह्यांच्या संपूर्ण सहकाराच्या योजना आतां हळुहळु फलद्रूप होत आहेत, तसतशा जपानी सैन्यांच्या हालचालींस अधिकाधिक पायबंद बसत आहे. अमेरिकेचा प्रतिकारहि कार्यक्षम होत असून चिनी फौजांस शत्रूच्या विरुद्ध यश येत आहे. पॅसिफिक महासागरांतील युद्धाच्या हालचाली प्रारंभीं असमाधानकारक झाल्या असल्या तरी त्या परिस्थितींत अनुकूल बदल होण्याचीं लक्षणें स्पष्ट दिसत आहेत. विशेषतः अमेरिकेंत लढाऊ सामुग्रीच्या उत्पादनाच्या प्रचंड योजना हातीं घेतल्या जात आहेत आणि ब्रिटिशांचें वैमानिक सामर्थ्य वाढत आहे. ह्या गोष्टी आशाजनक आहेत. जय्यत तयारी होईपर्यंत शत्रूची पुढें होणारी चाल मर्यादित करून आपली लढाऊ शक्ति अबाधित ठेवणें हेंच धोरण ब्रिटिश सेनानींस शक्य व इष्ट आहे हें सूक्ष्म विचाराअंतीं लक्षांत घेण्यासारखें आहे.

## श्री. वैकुंठराय ह्यांचें भाषण

के. वा. रावबहादुर काळे ह्यांच्या उदार देणगीनें स्थापन झालेल्या गोखले स्कूल ऑफ पॉलिटिक्स अँड एकॉनॉमिक्स ह्या संस्थेचा वार्षिक दिन गेल्या रविवारीं साजरा करण्यांत आला. त्या प्रसंगीं मुंबई प्रांतिक सहकारी बँकेचे मॅनेजिंग डायरेक्टर, श्री. वैकुंठराय मेथा ह्यांचें मुख्य भाषण झालें. सहकारी चळवळीबाबत दीर्घकालीन अनुभव असलेला, पूर्ण माहितगार व श्रद्धावान कार्यकर्ता त्यांच्यासारखा विरळा असल्यानें त्यांचें भाषण अत्यंत बोधप्रद व विचारप्रवर्तक झालें हें सांगावयास नको. सहकारी संस्थांच्या संघटनाच्या मुळाशीं असलेलीं तत्त्वें आणि त्यांच्या कार्यपद्धतीचीं वैशिष्ट्यें ह्यांचे संबंधांत अज्ञान पसरल्यामुळें लोकांमध्यें सामान्यतः अनेक गैरसमज फैलावले आहेत. त्यांचें दिग्दर्शन करून, हिंदी सहकारी चळवळीची सुधारणा सहेतुक पद्धतीनें कशी केली पाहिजे ह्या विषयाचें मार्मिक विवेचन श्री. वैकुंठराय ह्यांनीं केलें. प्राथमिक शेतकी पतपेढ्यांच्या कारभारची छाननी करून कर्ज देणें व वसूल करणें, देखरेख इत्यादि बाबींविषयींच्या कार्यपद्धतीच्या गुणदोषांचें त्यांनीं परीक्षण केलें.प्रांतिक सरकारचें व सहकारी खात्याचें सहकारी संघटनाशीं संबंध आणि ग्रामोद्धाराचे कामीं सहकारी संस्थांचा उपयोग करून घेण्याचें महत्व ह्यांचें विवेचन करून ह्या बाबतींत योजनात्मक धोरण आखलें जाण्याची आवश्यकता त्यांनीं प्रतिपादली.

---

## बेलापूर येथील सहकारी परिषद

अहमदनगर जिल्हा व बारामती येथील कॅनॉलखालील सहकारी सोसायट्यांच्या प्रतिनिधींची एक सभा बेलापूर येथें गेल्या शनिवारीं प्रा. काळे ह्यांच्या अध्यक्षतेखालीं भरली होती. सोसायट्यांच्या अडचणींवर उपाय शोधून काढून त्यांचें काम अधिक उत्साहानें व कार्यक्षम रीतीनें चालावें ह्यासाठी योजना आखणें हा सभेचा मुख्य उद्देश होता. सहकारी व इरिगेशन खात्यांचे स्थानिक अधिकारी, कर्जेंत्रसुलच्या, शेतीसुधारणेच्या व शेती मालाच्या विक्रीच्या व्यवस्थेसंबंधाचे अधिकारी उपस्थित असून प्रांतिक बँकेचे मॅनेजिंग डायरेक्टर, मॅनेजर व सीनिअर सुपरव्हायझर ह्यांनीं सभेंतील कार्यास सहाय दिलें. चर्चा व्यावहारिक स्वरूपाची होऊन तीमध्यें सभासदांनीं उत्साहानें भाग घेतला. कालव्याचें पाणी शेतीस समाधानकारक रीतीनें मिळावें ह्यासाठी इरिगेशन खात्यास सूचना, वाईट स्थितींतल्या सोसायट्यांची पुनर्घटना, शेतमालाच्या विक्रीची सहकारी घटना व शेतमालाच्या वहातुकीस रेल्वेच्या सवलती मिळण्याची आवश्यकता, ह्या विषयांची चर्चा सभेंत होऊन कित्येक ठराव मान्य करण्यांत आले. उपस्थित असलेल्या अधिकाऱ्यांनीं आपापल्या कक्षेंत येणाऱ्या विषयांसंबंधानें माहिती दिली आणि मार्गदर्शन केलें. बेलापूर येथें भरलेल्या सहकारी परिषदेचा परिणाम तिच्या कार्यांत भाग घेणाऱ्या सोसायट्यांच्या परिस्थितींत सुधारणा होण्यांत आणि त्यांच्या कार्यकर्त्यांत अधिक उत्साह व अधिक विस्तृत संघटना निर्माण होण्यांत होईल अशी अपेक्षा करण्यास हरकत नाहीं.

### कै. वा. भालचंद्रपंत सामंत

मुंबई येथील बी. पी. सामंत आणि कंपनी ह्या सुप्रसिद्ध जाहिरात कंपनीचे चालक श्री. बी. पी. सामंत ह्यांस कांहीं दिवसांपूर्वी देवाज्ञा झाली हें नमूद करण्यास दुःख वाटतें. श्री. सामंत ह्यांनीं छापखान्यांतील टाइमकीपरच्या नोकरीपासून आपल्या व्यवसायी आयुष्यक्रमास प्रारंभ केला आणि अल्पावधींत ते स्वतंत्र जाहिरात एजंट म्हणून सुप्रसिद्ध झाले. आपल्या धंद्यांत त्यांनीं कमालीचें यश मिळविलें व पुढें त्यांनीं पिअरलेस पिक्चर्स ह्या नांवानें चित्रपट प्रकाशनाचें कामहि हातीं घेतलें. त्यांच्या सहकार्याची मदत कांहीं महाराष्ट्रीय कंपन्यांस बहुमोल झालेली आहे. त्यांच्या कर्तबगारीस आणखी कितीतरी यश आलें असतें, परंतु त्यापूर्वींच अकाली त्यांचेवर मृत्यु ओढवला. श्री. सामंत ह्यांची सचोटी व कर्तबगारी आणि त्यांनीं मिळविलेलें सुयश व त्यांचें त्यांतील उच्च स्थान ह्यासंबंधीं वेगवेगळया वृत्तपत्रांनीं अत्यंत गौरवपर उद्गार काढलेले आहेत.

---


## दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

हेड ऑफिस : पुणें शहर.

स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.

मुंबअी शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबअी.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | : रु. | १०,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | : रु. | ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | : रु. | ४,१४,०५० |
| वसूल झालेलें भांडवल | : रु. | २,०६,९७५ |
| एकूण खेळतें भांडवल | : रु. | ३३,००,००० |

**डायरेक्टर्स**

प्रो. वा. गो. काळे, अध्यक्ष

| | |
|---|---|
| श्री. धों. कृ. साठे | श्री. मा. रा. जोशी |
| श्री. म. ग. पवार | श्री. श्री. गो. मराठे |
| श्री. त्र्यं. वि. रानडे | श्री. र. चिं. सोहोनी |
| श्री. वा. पु. वर्दे | मि. फ. दो. पदमजी |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदीविक्री कसोशीनें करून दिली जाते.

बँकेच्या शेअरवर १९४० अखेर पुऱ्या होणाऱ्या वर्षी द. सा. द. शेंकडा ४ टके करमाफ डिव्हिडंड दिलें गेलें. बँकेची शेअरविक्री चालू आहे.

म. वि. गोखले
मॅनेजर.


---


## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार


## कागदाची काटकसर करणेचे कांहीं प्रकार

( लेखकः—श्री. श्री. ज. भानू, राजगुरु प्रेस, पुणें )

युद्धामुळें कागद फार दुर्मिळ होत चालला आहे; तेव्हां कागद शक्य तेवढ्या काटकसरीनें उपयोगांत आणावा आणि त्याची कशा तऱ्हेनें काटकसर करतां येईल हें पुढें निदर्शनास आणलें आहे.

( १ ) प्रत्येक कामाचे वेळीं शक्य तेवढा लहानांत लहान आकाराचा कागद वापरणेचें ठरवा.

( २ ) टाइप करणें अगर हातानें लिहिणें कागदाचे दोन्ही बाजूनें लिहा.

( ३ ) जरूर नसेल अशा वेळीं ऑफिस कॉपी ठेऊं नका.

( ४ ) जास्त प्रती लिहितांना अगर टाइप करतांना तेवढ्या सर्व प्रतींची जरूरी आहे अगर कसें तें अगोदर नीट पाहून मगच त्याचेकरतां कागद खर्च करा.

( ५ ) टाइप करणें तें सिंगल स्पेसनें टाइप करा.

( ६ ) छपाई अगर हातानें लिहिणेचे सर्व कामांत मार्जिनचें ( समास ) प्रमाण शक्य तों कमी करा.

( ७ ) छपाई कामास शक्य तेवढा लहान टाइप वापरून जागेची बचत करा.

( ८ ) एकेरी जिन्नस पॅक न करतां १०–५ अशा जिनसा एके ठिकाणीं गुंडाळून पहा.

( ९ ) पॅकिंगमध्यें अगदी आवश्यक तेवढ्याच आकाराचा कागद वापरा; त्यापेक्षां मोठा वापरूं नका.

( १० ) तयार मालावरील लेबलांचा साइज कमी करतां येईल तेवढा करा.

( ११ ) तुम्हास आलेले पत्राचे मागेच त्याचे उत्तराची ऑफिस कॉपी लिहा व अशा तऱ्हेनें तो कागद वांचवा.

( १२ ) विशेष बाईट न दिसेल अशा वेळीं वेष्टणाशिवाय माल न्या.

( १३ ) मासिकें, साप्ताहिकें, दैनिकांचे अंक वगैरे विक्री होईल ती होईल, बाकीच्या प्रती परत, या पद्धतीवर व्यवहार करूं नका.

( १४ ) भिंतीवर वगैरे लावले जाणारे एकाच जाहिरातीचे २ बोर्डांतील अंतर २०० फुटांपेक्षां कमी ठेवूं नका.

( १५ ) चालू परिस्थितींत शक्य तों मोफत वांटणेकरतां कॅलेंडर्स काढूं नका; त्यांतूनहि काढलींच तर तीं फारच अल्प प्रमाणावर काढा.

( १६ ) शाळाखात्याचे शिक्षणक्रमांत ज्यामुळें आज नवीन पुस्तकें छापणें जरूरीचें होईल असा कोणत्याहि प्रकारचा फरक चालू युद्धजन्य परिस्थितींत केला जाऊं नये अशी दक्षता घ्या.

( १७ ) छापखान्यांतून प्रुफाकरतां वापरला जाणारा कागद पूर्वीप्रमाणें एक बाजूचे ऐवजीं दोन बाजूनें उपयोगांत आणा व त्या कागदाची लांबी रुंदी ही अगदीं जरूर तेवढीच ठेवा.

( १८ ) सर्व ऑफिसेसमधून सरकारी अगर खासगी लहान मोठीं पाकिटें पुन्हां पुन्हां वर कोरा कागद लावून उपयोगांत आणलीं जावींत. —"मुद्रणप्रकाश"वरून

---

### म्हैसूर पेपर मिल्स लि. बंगलोर

वरील कंपनीस ३० सप्टेंबर, १९४१ अखेर संपलेल्या वर्षी १ लक्ष, २५ हजार रुपये निव्वळ नफा झाला.

### बांडगुळावर मोहीम

पुणें येथील डेक्कन ॲग्रिकल्चरल असोसिएशननें खेड-शिवापूर खोऱ्यांत, आंब्यांवरील बांडगुळांचा नाश करण्यासाठी गेल्या महिन्यांत जी मोहीम काढली होती, तिला लोकांकडून चांगला पाठिंबा मिळून त्या खोऱ्यांतील १० गांवांत १,१०७ झाडांवरील बांडगुळें काढण्यांत आलीं व त्यांची संख्या १५,६५१ इतकी भरली. बांडगुळाचें सर्पण चांगलें होतें. तोडलेल्या बांडगुळापासून ५३८ गाड्या सर्पण झालें. बांडगुळें तोडण्याचें काम बहुतेक झाडांच्या मालकांनीं स्वतःच केलें.

निरनिराळ्या गांवांत किती काम झालें तें खालील तक्त्यावरून दिसेल.

| गांवाचें नांव | झाडें संख्या | बांडगुळें नग | मालगाड्या |
|---|---|---|---|
| कामुर्डी | १५३ | २०७० | ८२ |
| खेड | ४२ | ५९५ | ३० |
| शिवापूर | २० | ७५ | ४ |
| गाउडदरे | ७६ | ८८० | २५ |
| खोपी | २५ | ५०० | २० |
| आर्वी | ७६ | १,५२० | ५० |
| रांझे | २५५ | ४,२३० | ११८ |
| कुसगांव | २९६ | ४,५०० | १५० |
| शिंदेवाडी | ३५ | २५० | १० |
| रहाटवडे | १२९ | १,०३१ | ३९ |
| | १,१०७ | १५,६५१ | ५३८ |

## चित्रपटाचे धंद्यावरील कराचा बोजा

चित्रपटाचे धंद्यावरील कराचा बोजा किती भारी आहे, हें जर्नल ऑफ दि फिल्म इंडस्ट्रीच्या नोव्हेंबर १९४१ च्या अंकांत सुबोध रीतीनें दाखविण्यांत आलें आहे. त्यांतील माहिती खाली दिली आहे:—

| | वार्षिक कर ( रुपये ) |
|---|---|
| ( १ ) (अ) कच्चा फिल्मवर व (ब) सिनेमाचे यंत्रसामुग्रीवर आयात जकात | ( अ ) १९३८-३९ सालीं ४½ लक्ष रुपये जकात वसूल झाली. (ब) हें उत्पन्न १½ लक्ष भरेल. |
| ( २ ) प्राप्तीवरील कर | सुमारें १८ लक्ष, १२ ह. |
| ( ३ ) जादा नफ्यावरील कर | माहिती उपलब्ध नाहीं |
| ( ४ ) तयार फिल्मवरील आयात जकात | सुमारें ८ लक्ष, ८५ हजार. |
| ( ५ ) करमणुकीवरील कर | सुमारें ४५ लक्ष, ३६ ह. |
| ( ६ ) वीज कर | किमान ८ लक्ष |
| ( ७ ) मालमत्तेवरील सरकारी कर | ५ लक्ष |
| ( ८ ) प्रॉपर्टी टॅक्स ( सिनेमागृहांवरील ) | ३७½ लक्ष |
| ( ९ ) जाहिरातीवरील कर | २ लक्ष |
| ( १० ) थिएटरवरील कर | १ ते २ लक्ष |
| ( ११ ) फिल्मवरील ऑक्ट्रॉय ड्यूटी | १½ लक्ष |

म्हणजे, एकूण वार्षिक कराची रकम १ कोटि, ३४ ½ लक्ष रुपये, म्हणजे चित्रपट धंद्याच्या उत्पन्नाचे ३८% भरते!

### ग्रेट ब्रिटनचें परराष्ट्रांतील भांडवल

ग्रेट ब्रिटनमध्यें होणाऱ्या आयातीची किंमत देण्यास ग्रेट-ब्रिटनमधून पुरेशी निर्गत होणें सध्यां शक्य नसल्या कारणानें, तें राष्ट्र इतर देशांत गुंतविलेलें भांडवल त्या कामीं उपयोगांत आणीत आहे. ह्या भांडवलाच्या उत्पन्नामुळें ग्रेट ब्रिटननें निर्गत करावयाच्या मालाचे पेक्षां कितीतरी पट अधिक माल त्या देशास आजवर उपलब्ध होऊं शकत असे. अमेरिकेंतील ब्रिटिश-कंपन्यांचे भाग आतां तेथें विकण्यांत अगर गहाण टाकण्यांत आले आहेत व कॅनडा, हिंदुस्थान आणि दक्षिण आफ्रिका ह्या देशांनीं आपलीं ग्रेट ब्रिटनमधील कर्जें विकत घेऊन टाकलीं आहेत. दक्षिण अमेरिकेंतील देशहि हाच मार्ग आक्रमीत आहेत. चालू युद्धामुळें ग्रेट ब्रिटनला आपल्या परदेशांत गुंतविलेल्या भांडवलापैकी सुमारें एक तृतीयांश भांडवलास मुकावें लागेल असा मँचेस्टर गार्डियन साप्ताहिकाचा अंदाज आहे.

## निवडक बाजारभाव

बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) ३%

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) ... ... | १०८-४ |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०३-० |
| ३½% विनमुदत ... ... ... ... | ९५—६ |
| ३½% १९४७-५० ... ... ... | १०१—८ |
| ३% ( १९६३-६५ ) ... ... ... | ९४—६ |
| २½% १९४८-५२ ... ... ... | ९७—० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसातील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( १००-५० ) ११% ... ... | १४२ - ८ |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% ... ... | १११-८ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ९% ... | ४७-८ |
| इंपीरिअल बँक ( ५०० ) १२% ... ... | १५५२—८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% ... ... | १०५—० |
| बॉंबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) १२% ... ... | १३६—४ |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% ... ... | १५८०—० |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% ... ... | १६४०—० |
| अहमदाबाद मीलज (५००) ११½% ... ... | ८५१-१२ |
| तापी व्हॅली ( ५०० ) ८% ... ... ... | ६३५—० |
| बेलापूर शुगर ( ५० ) १० रु. ... ... ... | २१८—० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००-५० ) २ रु. ... ... | ४९—८ |
| शिंदिया स्टीम ( १५ ) १ रु. ... ... ... | २०—४ |
| न्यू इंडिया विमा ( ७५-१५ ) १ रु. ८ आ. ... | ५०—८ |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. ... ... | ४२६०—० |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १५ रु. ... ... | ३०२—० |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) १७२ रु.१० आ.० पै ... | १६२५—० |
| असोसिएटेड सिमेंट ( १०० ) ५ रु. ... | १५९—८ |

### सोनें-चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास ... ... | ४६-१४-० |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यास ... ... | ७०-१० |

सर्व तऱ्हेची कापड छपाई व रंगाई (Calico Printing and Dyeing) करणारा कारखाना.

**'पायोनियर डाइंग हाऊस'**

कोचाचें कापड (Casement cloth), दाराचे पडदे, टेबल कव्हर इ. टिकाऊ रंगाचे, स्वदेशी तयार मिळतात. कारखानाः—
भिकारदास मारुती रोड, दातेवाडी, पुणें.

**N. V. WADNERKAR**

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver,
Electro-plater & Manufacturer of Sporting
Trophies, Medals, Cups etc.
- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -
POONA CITY.



**बायो टोनो.**

शरीर व त्यांतील रक्त-पेशींची वाढ करणारें
**उत्कृष्ट टॉनिक**

नैसर्गिक रीतीनें हाडांची वाढ होण्यास आणि शरीर सदृढ करण्यास याची मदत होते. हें मधुर व रुचकर असून मुलें आवडीनें घेतात.

किं. रु. १-८-० ट. ख. नि.

रॉय आणि कंपनी, १७६ प्रिन्सेस स्ट्रीट, मुंबई २

**न्यायमूर्ति रानड्यांचे**

**तीन अप्रसिद्ध लेख प्रसिद्ध झाले**

**PLEA FOR PROTECTIONIST POLICY**

**INDIAN SUGAR INDUSTRY**

न्यायमूर्ति रानडे यांनीं १८९९ सालीं 'टाइम्स ऑफ इंडियांत' स्वदेशी साखरेच्या धंद्यासंबंधीं लिहिलेले महत्त्वाचे तीन लेख, प्रो. वा. गो. काळे ह्यांच्या प्रस्तावनेसह प्रसिद्ध करण्यांत आले आहेत.

व्यवस्थापक, 'अर्थ', पुणें ४

ह्या पत्त्यावर आठ आण्यांची तिकिटें पाठवून लेखांची प्रत मागवावी.

महाराष्ट्रांत लेखी गॅरंटीसह टिकाऊ व मनपसंत

**साईन-बोर्डस्, रबरी शिक्के,**

आकर्षक

**सिनेमा स्लाइडस् व पिक्चर पेंटिंग**

सतत २० वर्षे विश्वसनीय व वेळेवर मिळण्याचें
एकच ठिकाण

**पेन्टर ए. जी. वेडेकर**

(मराठी वळणाचे स्पेशॅलिस्ट)

**बुधवार चौक, पुणें २ (सिटी)**

बाहेरगांवचीं कामें व्यवस्थित व वेळेवर पाठवूं.

**महायुद्धाची जाणीव! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.**

बंबाचे माडीवर

**महिंद्रकर ब्रदर्स**

**तयार कपड्याचे व्यापारी**

बुधवार चौक, पुणें

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद् वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ८ | पुणें, बुधवार, तारीख ४ फेब्रुवारी, १९४२ | अंक ५

७ वा आठवडा ★

'डिप्लोमसी' आणि 'ट्रेडसिकेट'
यांनीं उडविलेला गोंधळ

नवयुग चित्र

संगम

मध्यें पहा
भूमिकाः—मीनाक्षी, वत्सला कुमठेकर, साळवी, दामुअण्णा मालवणकर, विनायक.

मिनर्व्हा—पुणें

रोज दोन खेळ ६॥ व १० शनि. रवि. सोम.
जादा खेळ ३ वा.

ठेवी घेणें आहेत

- फक्त रु. वीस हजारापर्यंतच ठेवी घेणें आहेत.
- ठेवी घेण्याची मुदत फक्त १ मार्च १९४२ पर्यंतच आहे.
- कारखाना रात्रंदिवस चालू आहे.
- ठेवीची रक्कम खेळत्या भांडवलासाठी वापरली जाईल.

— जास्त खुलाशाकरितां समक्ष भेटा अगर लिहा —

दि विजय टेक्स्टाइल्स लि.
कर्वे युनिव्हर्सिटीसमोर, एरंडवणें, पुणें ४.

वक्तशीर आणि मनपसंत काम करून देणारे

मोहन वॉच कंपनी

रेग्युलेशन मोफत
कॉमनवेल्थ बिल्डिंगसमोर लक्ष्मी रोड, पुणें २.

महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर

महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

# विविध माहिती

### पर्ल बंदरावरील अचानक हल्ला

जपान पर्ल बंदरावर ७ डिसेम्बर, १९४१ रोजीं अचानकपणें हल्ला कसा करूं शकला, ह्याची चौकशी करण्याकरितां सुप्रीम कोर्टाच्या न्यायाधिशाचे अध्यक्षतेखाली प्रेसिडेंट रुझव्हेल्ट ह्यांनीं एक कमिशन नेमलें होतें. "हल्ल्याचे दिवसापूर्वी दहा दिवस फिलिफाईन्समध्यें जपान्यांचा धोका असल्याचें अमेरिकन सरकारनें हवाईमधील नाविक अधिकाऱ्यांस कळविलें होतें, परंतु त्या अधिकाऱ्यांस वैमानिक हल्ल्याचा समीपपणा लक्षांत आला नाहीं. वैमानिक हल्ल्याची बिलकुल शक्यता नाहीं असें त्यांस वाटून ते गप्प बसले." ॲडमिरल किमेल व लेफ्टनंट जनरल वॉल्टर शॉर्ट, ह्यांचेवर कमिशननें दुर्लक्षपणाचा दोष ठेवला आहे. कमिशनच्या रिपोर्टाचा अमेरिकन सरकार पूर्ण विचार करून योग्य तो हुकूम सोडील.

### सहा लक्ष लोक ई. इं. रेल्वेनें बाहेर गेले

१३ ते २० डिसेंबर, १९४१ ह्या मुदतींत ईस्ट इंडिया रेल्वेनें ५,९२,५७२ लोक कलकत्ता सोडून गेले. साधारणपणें २½ लक्ष लोक एवढ्या मुदतींत एरव्ही बाहेर जातात.

### माळवा शुगर मिल्स, लि.

वरील नांवाची एक कंपनी किशनगड (देवास, धाकटी पाती) येथें नोंदण्यांत आली आहे. मुंबई-आग्रा रस्त्यावर गोपाळपूर येथें संस्थानचे हद्दींतच ४०० ते ५०० टनांचा साखर कारखाना उभारण्याचा कंपनीचा विचार आहे. देवास सरकारनें कंपनीच्या ५ लक्ष रुपयांच्या भागांची हमी घेतली आहे.

### ब्रह्मी विधिमंडळाची बैठक

अंदाजपत्रकाचा विचार करण्याकरितां ब्रह्मी विधिमंडळाची बैठक रंगून येथें नेहमीप्रमाणें भरविणें शक्य नसल्याकारणानें ती बैठक एकादे जिल्ह्याचे गांवीं भरविण्यांत येईल व तिचें काम थोडक्यांत आवरण्यांत येईल.

### चरखा संघास देणगी

तिरुपुर येथें एक. खादी केंद्र स्थापन करण्याकरितां मद्रास सरकारनें अ. भा. चरखा संघास १९,८२० रुपयांची देणगी दिली आहे.

### देवकरण नानजी बँकिंग कं. लि.

वरील बँकेची स्थापना १९३८ मे मध्यें झाली. १९४१ अखेर तिचेकडे ३,८१७ खातीं होतीं व ठेवींची रकम ४५¾ लक्ष रुपये भरली. एकूण खेळतें भांडवल ६७¾ लक्ष रुपये होतें. तिनें १९४१ सालीं क्लिअरिंग हाउसमार्फत १,१६,९६९ चेक्सची वसुली केली, त्यांत तीन उप-सभासद बँकांचे ११,३५७ चेक होते. बँकेस नफा ३२,२२ रुपये झाला, त्यापैकी २० हजार रुपये रिझर्व्ह फंडांत टाकण्यांत आले.

### साखरेची सरकारी खरेदी

सध्याच्या युद्धपरिस्थितीमुळें, निर्गत करण्याकरितां हिंदुस्थान सरकारास बरीच साखर पाहिजे व सरकार ती हिंदी कारखान्यांकडून विकत घेणार आहे.

### युद्धपुकार

थायलंडनें ग्रेट ब्रिटन व अमेरिका ह्यांचेविरुद्ध युद्ध पुकारलें आहे.

### जनरल ऑबर्स्ट रोमेल

बेंगाझी पुनः सर करणाऱ्या जनरल रोमेल ह्या जर्मन सेनानीस हेर हिटलरनें जनरल ऑबर्स्टचा (दुसऱ्या दर्जाचा फील्ड मार्शल) दर्जा देऊन त्याची बढती केली आहे. रोमेलचा व हेर हिटलरचा निकटचा स्नेह असून रोमेल हा चालू युद्धापूर्वी हिटलरच्या बॉडीगार्डमध्यें वरिष्ठ जागेवर होता. पोलंडमध्येंहि त्यानें मर्दुमकी केली व फ्रेंच सेनेचा पराभव होण्यास कारणीभूत होणारा मॉबेगचा हल्ला त्यानेंच योजिला. लिबिया त्यानें जिंकला, त्यावेळीं चढाई करण्याची त्याची तयारी होती, ह्याची ब्रिटिशांना कल्पनाच नव्हती. आपल्या सैनिकांस ताजे राखण्याची त्याची योजना व रणांगणावरच दुरुस्ती करण्याचीं त्याचीं वर्कशॉप्स, हीं अत्यंत कार्यक्षम असतात.

### चेक्सची देवघेव

मुंबई बँकर्स क्लिअरिंग हाउसमध्यें २३ जानेवारी अखेर संपलेल्या आठवड्यांत २२ कोटि, ६३ लक्ष रुपये किंमतीच्या १,३८,०२१ चेक्सची देवघेव झाली.

### ॲंग्लो-सोव्हिएट-इराण करार

ग्रेटब्रिटन, रशिया व इराण ह्यांचेमधील करारावर सह्या झाल्या आहेत.

### विम्याच्या हप्त्यांत वाढ

हिंदुस्थानांतील कित्येक आयुर्विमा कंपन्या आपले हप्त्यांचे दर वाढविण्याच्या विचारांत आहेत. व्याजाच्या अल्प दरामुळें असें करणें आवश्यक झालें आहे. अर्थात्, नव्या विमेदारांसच नवे दर लागू होतील.

### हिंदी लष्कर

हिंदी लष्करांत दरमहा ५० हजारांची भर पडत आहे व १० लक्ष सैनिक आज सुसज्ज आहेत, असें दि. ब. रंगनादन हे लंडनमधील एका भाषणांत नुकतेच म्हणाले.

### स्टँडर्ड टाइम

बिहार, ओरिसा, बंगाल आणि आसाम ह्या प्रांतांतील स्टँडर्ड टाइम एक तास पुढें करण्यांत आली आहे. ह्या प्रांतांतील पोस्ट व तार ऑफिसें नव्या वेळेप्रमाणें काम करतील, परंतु रेल्वे मेल सर्व्हिसचें काम सध्याच्या स्टँडर्ड टाइमप्रमाणेंच चालेल.

### जपाननें व्यापलेल्या प्रदेशांतील बँका

जपाननें पादाक्रांत केलेल्या प्रदेशांतील विदेशी भांडवलाच्या सर्व विदेशी बँका जपानी सरकारनें बंद पाडल्या आहेत. जपानी धोरणास अनुसरून चालण्यास तयार असणाऱ्या बँकांस सवलती मिळतील.

### लष्करी अधिकाऱ्यांच्या पगारांत वाढ

इमर्जन्सी इंडियन कमिशन मिळालेल्या हिंदी लष्करी अधिकाऱ्यांचे पगारांत वाढ करण्यांत आली असून ती १ जानेवारीपासून अंमलांत आली. विशेषतः विवाहित अधिकाऱ्यांस ह्यापुढें ज्यास्त पगार मिळणार आहे. पूर्वीच्या व नवीन मासिक पगारांची तुलना खाली केली आहे.

| दर्जा | पूर्वीचा पगार | नवा पगार |
|---|---|---|
| | रु. | रु. |
| सेकंड लेफ्टनंट | ४०५ | ४५० |
| लेफ्टनंट | ४३० | ४९० |
| कॅप्टन | ५०० | ५६० |
| १४ वर्षांच्या नोकरीनंतर | ६०० | ६५० |
| मेजर | ८०० | ८५० |

अनुक्रमणिका

| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | ३६ |
| २ आखूड धाग्याचा कापूस | ३७ |
| ३ कर्जरोख्यांची किंमत... | ३७ |
| ४ गवयाच्या बाद्यांची विक्री | ३८ |
| ५ कोल्हापूर अर्बन को. बँक | ३८ |
| ६ हिंदी चित्रपटांची लाथी | ३८ |
| ७ स्फुट विचार ... | ३९ |
| मि. चर्चिल ह्यांचा दणदणीत विजय—साखरेच्या धंद्याचें मध्यवर्ती मंडळ—साखर मंडळाच्या इतर सूचना—कापसाच्या आयातीवर जादा जकात—ए. आर. पी. च्या खर्चाची वाटणी—आंतरराष्ट्रीय चलनव्यवस्था—फ्रेंच उद्योगधंद्यांवर जर्मनीचें वर्चस्व. | |
| ८ डिसेंबर महिन्यांतील आर्थिक घडामोडी ... | ४१ |
| ९ निवडक बाजारभाव ... | ४१ |

अर्थ

बुधवार, ता. ४ फेब्रुवारी, १९४२

## आखूड धाग्याचा कापूस

हिंदुस्थानचा जपानशीं होणारा व्यापार बंद पडल्यामुळें आखूड धाग्याच्या हिंदी कपाशीचें मोठें गिऱ्हाइक तुटून ह्या शेतीच्या मालाची स्थिति कठिण झाली आहे. ह्या जातीच्या कपाशीचें मामुली उत्पादन आणि त्यास असलेली हिंदुस्थानांतली मागणी ह्यांचा मेळ बसणें अशक्य आहे. आखुड जातीच्या कपाशीच्या उठावासाठीं हिंदुस्थानास चालू युद्धापूर्वी बाहेरील देशांवर अवलंबून रहावें लागत असे; आतां युद्ध—परिस्थितींत ह्या परकी गिऱ्हाइकांची जागा स्वदेशी गिरण्यांस अत्यंत अल्प प्रमाणांतच घेतां येणें शक्य आहे. कपास तर हिंदी शेतकऱ्यांस रोकड उत्पन्न देणारें पीक आहे, आणि तिचें उत्पादन पूर्वीप्रमाणें चालू राहिल्यास हा माल कवडीमोल होऊन जाईल इतकेंच नव्हे तर त्याचा उठावच होणार नाहीं. ह्या कठिण प्रसंगांतून मार्ग कसा काढावा हा सरकारच्या व लोकांच्या पुढें अवघड प्रश्न उपस्थित झाला आहे. इंडियन सेंट्रल कॉटन कमिटीची सभा मुंबई येथें नुकतीच भरली होती, तेव्हां त्या प्रश्नाचा विचार होऊन आखूड धाग्याच्या कपाशीचें क्षेत्र पन्नास टक्के कमी करण्यांत यावें आणि लांब धाग्याच्या कपाशीची लागवड करण्यास किंवा कपाशीच्या जागीं धान्याचीं पिकें काढण्यास शेतकऱ्यांस सरकारनें उत्तेजन व सहाय द्यावें अशा अर्थाचा ठराव मान्य करण्यांत आला. कॉटन कमिटीच्या शिष्टमंडळानें व्हाइसरॉयांची भेट घेऊन त्यांच्या पुढें आपलें म्हणणें मांडावें असेंहि सभेंत ठरलें.

कमिटीच्या ठरावाचा आशय वरील विवेचनावरून ध्यानांत येईल. आखूड धाग्याच्या कपाशीचें मोठें गिऱ्हाइक तुटल्यामुळें आणि प्रस्तुत युद्ध किती काळपर्यंत चालेल ह्याचा अंदाज करणें अशक्य असल्याकारणानें जेथें हें पीक मुख्यत्वेंकरून होतें, त्या प्रांतांच्या व संस्थानांच्या सरकारांनीं आपल्या हद्दींतील ह्या जातीच्या कपाशीचें क्षेत्र निम्म्यानें कमी होईल अशी व्यवस्था करावी असें कमिटीनें म्हटलें आहे. स्थानिक परिस्थितीस अनुसरून धान्याचीं वगैरे पिकें कपाशीच्या ऐवजीं काढण्यांत यावीं आणि अशा पिकांच्या भरपूर पुरवठ्याचें विशेष महत्त्व आहे असें तिनें सुचवलें आहे, पिकांमध्यें असा बदल करणें शेतकऱ्यांस सोयीचें व्हावें ह्याकरितां प्रांतांच्या व संस्थानांच्या सरकारांनीं त्यांस जरूर दिसणारें सहाय द्यावें अशी कमिटीची शिफारस आहे. ह्या कामीं शेतकऱ्यांस तज्ज्ञांचा सल्ला लागेल, बीबियाणें लागेल किंवा पाणी पुरवठ्यासाठीं भांडवल लागेल त्याची तरतूद करण्यांत यावी आणि सरकारांनीं आपल्या योजनांची माहिती शक्य तितक्या लवकर शेतकऱ्यांस द्यावी असेंहि कमिटीच्या ठरावांत म्हटलें आहे. येता शेतीचा हंगाम चालू होण्यापूर्वी म्हणजे मार्चच्या सुमारास ही माहिती पुरवली जाणें अगत्याचें आहे हें उघड आहे.

आखूड धाग्याच्या कपाशीच्या पिकाचें क्षेत्र सध्या एक कोटि एकर आहे. तें निम्मे म्हणजे पन्नास लक्ष एकर वर नमूद केलेल्या सूचनेप्रमाणें झालें असतां ह्या कपाशीचें उत्पादन पुढील हंगामांत पंधरा लक्ष गाठी होईल असा अंदाज करण्यांत आला आहे. ह्यांपैकी बारा लक्ष गाठी स्वदेशी गिरण्यांमध्यें आणि सुमारें चार लाख गाठी इतरत्र खपतील अशी कल्पना आहे. युद्धपुरवठा खात्यास कापसाचें कापड लागतें, त्याच्या बनावटींत कांहीं भागापुरता आखूड धाग्याचा कापूस उपयोगांत आणतां येईल अशी सोय करण्यांत आल्यानें हिंदी गिरण्यांत तो माल घेतला जाण्याची शक्यता उत्पन्न झाली आहे, ती वरील अंदाजांत हिशेबांत घेण्यांत आली आहे. आखुड धाग्याच्या कापसाचा उठाव कसा व्हावा, गिरण्यांनीं कापूस खरेदी करून त्याचा साठा करून ठेवणें किती शक्य आहे आणि ह्या कामीं पैसा लागेल तो कसा उभारावा इत्यादि प्रश्नांचा विचार हिंदुस्थान सरकार करीत असून त्या बाबतींत निश्चित योजना तयार व्हावयाची आहे. सेंट्रल कॉटन कमिटीचें शिष्टमंडळ व्हाइसरॉयांची भेट घेईल त्या वेळीं सरकारला आपली योजलेली व्यवस्था थोडीशी स्पष्ट रीतीनें व तपशीलवारपणानें जाहीर करण्याची संधि मिळणार आहे, तिचा फायदा घेतला जाईल अशी अपेक्षा करण्यास हरकत नाहीं. प्रस्तुत प्रश्न तातडीचा व महत्त्वाचा आहे ह्याची जाणीव सर्वांस आहे. त्याचप्रमाणें, तागाच्या पिकाचे बाबतींत सरकारास अनुभव आला आहे, त्याचाहि उपयोग कपाशीच्या पिकाचे बाबतींत करतां येण्यासारखा आहे. सेंट्रल कॉटन कमिटीनें प्रस्तुत प्रश्न हातीं घेऊन त्याचा पाठपुरावा करण्याचा प्रयत्न चालवला आहे त्याबद्दल तिचें अभिनंदन केलें पाहिजे. प्रांतिक ग्रामसुधारणा मंडळाची सभा मुंबई येथें गेल्या महिन्यांत भरली होती तींत आखूड धाग्याच्या कपाशीची लागवड मर्यादित केली जाऊन तिच्या ऐवजीं धान्याचीं पिकें शेतकऱ्यांनीं काढण्यास प्रोत्साहन देण्याच्या प्रश्नास चालना देण्यांत आली होती ह्याची आठवण येथें वाचकांस होईलच.

३% १९४९–५२ च्या कर्जरोख्यांची किंमत

| फेब्रुवारी | किंमत रु. |
|---|---|
| २ ते ७ | १०० |
| ९ ते १४ | १००-०-९ |
| १६ ते २१ | १००-१-६ |
| २३ ते २८ | १००-२-३ |

पुढें प्रत्येक आठवड्यास दरशेकडा ९ पै ह्याप्रमाणें कर्जरोख्यांची किंमत वाढत जाईल.

## गवयाचीं वाद्यें डिक्रीचे अंमलबजावणींत जप्त करतां येतात काय ?

### मद्रास हायकोर्टाचा निवाडा

सीमाकुर्थी—अर्जदार ( डि. हो. ) वि. जोन्नाविथुला—गैर अर्जदार ( जजमेंट–डेटर )

अर्जदार ( सीमाकुर्थी, डिक्रीहोल्डर ) ह्यानें गैर–अर्जदारावर जोन्नाविथुला, जजमेंट–डेटर ) स्मॉल कॉज कोर्टांतून डिक्री मिळविली. गैर–अर्जदार संगीत शिकवून व कपडे शिवून देऊन आपला उदरनिर्वाह करीत असे. अर्जदारानें आपल्या डिक्रीचे अंमलबजावणींत गैर–अर्जदाराचे घरून कांहीं माल जप्त करून नेला. यांत शिवण्याचें यंत्र ( मशीन ), बाजाची पेटी, फिडल व वीणा इतक्या वस्तु होत्या. गैर-अर्जदारानें सि. प्रो. कोडच्या क. ६० (१)(ब) प्रमाणें जप्तीस हरकत आणली. ती हरकत अशी होती कीं, गैर-अर्जदार कपडे शिवण्याचा व गाणें शिकविण्याचा धंदा करीत असल्यामुळें त्या दोन्ही धंद्यास लागणारीं अवजारें ( हत्यारें ) हीं कारागिराचीं अवजारें असतात म्हणून तीं जप्त करतां येत नाहींत. खालच्या कोर्टानें गैर-अर्जदाराची हरकत मान्य करून जप्त झालेला सर्व माल कपडे शिवण्याचें मशीन, बाजाची पेटी, फिडल व वीणा जप्तींतून सोडून दिला, म्हणून अर्जदारानें हें रिव्हिजन केलें होतें.

"अर्जदारानें जप्त केलेल्या वस्तूंना कारागिराचीं अवजारें म्हणतां येतें किंवा काय हें आपल्याला पहावयाचें आहे. कपडे शिवण्याचें यंत्र कारागिराचें अवजार असतें, म्हणून तें जप्तीस पात्र नसतें, ह्याबद्दल आम्हाला मुळींच शंका नाहीं. आतां प्रश्न उरला बाजाची पेटी वगैरे वस्तूंचा. सिव्हिल प्रोसीजर कोडच्या क. ६० मध्यें ज्या अर्थानें 'कारागीर' (आर्टिस्ट) हा शब्द वापरला आहे त्या अर्थानें गवई 'कारागीर' असतो किंवा काय हें आपल्याला पाहिलें पाहिजे. आमचें मत असें आहे कीं, 'औद्योगिक कले'वर उपजीविका करणारी व्यक्ति 'कारागीर' असते. गवयाचा औद्योगिक कलेशीं कांहींच संबंध येत नसल्यामुळें तो कारागीर नसतो, म्हणून त्याच्या जवळचीं वाद्यें 'कारागिराचीं अवजारें' नसतात. सबब तीं अवजारें जप्तीस पात्र असतात. वरील कारणास्तव हें रिव्हिजन मंजूर करून खालच्या कोर्टाचा निकाल रद्द करतों."

कारागिराचीं अवजारें जप्तीस पात्र नसतात. औद्योगिक कलेवर उपजीविका करणारास 'कारागिर' म्हणतात. औद्योगिक कलेशीं गवयाचा संबंध येत नाहीं म्हणून तो 'कारागिर' नसतो, सबब त्याचीं अवजारें (वाद्यें) जप्तीस पात्र असतात. —'न्यायबोध'

---

### उत्तर आयर्लंडमध्यें अमेरिकन सैनिक

उत्तर आयर्लंडमध्यें अमेरिकन सैनिक उतरले, त्यासंबंधांत आयराच्या सरकारशीं ब्रिटिश अथवा अमेरिकन सरकारचें कांहीं बोलणें झालेलें नव्हतें. मि. डी व्हॅलेरा ह्यांनीं त्याबद्दल आपली नाराजी व्यक्त केली आहे. "अमेरिकेशीं आपलें वाकडें नाहीं व त्याचे बरोबर भांडण होऊं नये अशीच आमची इच्छा आहे, असें ते म्हणाले.

### बॉम्बहल्ल्यांचा अनुभव

बॉम्बहल्ल्यांचा प्रत्यक्ष अनुभव मिळविण्याकरितां, संयुक्त प्रांताचें सरकार एक पोलिस दल ब्रह्मदेशाकडे पाठविणार आहे.

### दि कोल्हापूर अर्बन को. बँक लि. कोल्हापूर

वरील बँकेच्या, ३० जून, १९४१ अखेरच्या २८ व्या वार्षिक अहवालावरून व ताळेबंदावरून तिच्या प्रगतीची कल्पना येते. बँकेच्या संकल्पित २५ हजारांच्या भांडवलापैकी, २४,९९५ रुपये रोख वसूल आहेत. रिझर्व्ह फंड ५७½ हजारांचा असून इतर फंडांत सुमारें ६१ हजार रुपये आहेत. बँकेकडील ठेवींची रकम १ लक्ष, ८७ हजार, रुपये भरते. स्थानिक इतर बँकांच्या ठेवीवरील व्याजाचे दरापेक्षा कोल्हापूर अर्बनचे दर कमी असतांहि ठेवींत वाढ झालेली आहे, हें नमूद केलें पाहिजे. बँकेचे ४९ हजार रुपये रोख हातांत व इतर बँकांत खात्यांवर असून तिनें ६०½ हजार रुपये सरकारी रोख्यांत व पोस्टल कॅश सर्टिफिकेटांत गुंतविलेले आहेत. बँकेचे सभासदांकडून १ लक्ष, ३३ हजार रुपये कर्ज, सोसायट्यांकडून ७८½ हजार रुपये कर्ज व सभासदांकडून १०½ हजार रुपये कॅश क्रेडिट येणें आहे. इमारत व आड मिळून १६½ हजारांची जिंदगी आहे. बँकेची एकूण थकबाकी १ लक्ष, ५ हजार रुपये आहे. म्हणजे मागील सालाचे मानानें ती २५ हजारांनीं कमी आहे. बँकेच्या एकूण खेळत्या भांडवलापैकी ( ३ लक्ष, ६८ हजार रुपये ) सुमारें ४२% भांडवल ( १ लक्ष, ५१½ हजार रुपये ) बँकेचें स्वतःचेंच आहे, व बँकेनें आपल्या जिंदगीपैकी सुमारें १ लक्ष १० हजार रुपये रोख अगर सरकारी रोख्यांत ठेवले आहेत, ही गोष्ट समाधानकारक आहे, व ती बँकेची मजबुती दर्शविते. थकबाकीचा आकडा कमी करण्याची आवश्यकता बोर्डास पटलेली असून त्याबाबत कसून प्रयत्न चालू आहेत. बँकेचे ८०½ हजारांचे हुकूमनामे वसुलीसाठी तयार आहेत. सहकारी खात्यानें बँकेस शेतकी सोसायट्यांना कर्जें देण्यास परवानगी दिली असल्यामुळें ही बँक सेंट्रल बँकेचेंहि काम करीत आहे. ह्या आघ संस्थेचें रूपांतर मध्यवर्ती फायनान्सिंग एजन्सीमध्यें होणें आवश्यक आहे ह्या दृष्टीनें प्रयत्नहि सुरू झाले आहेत. वर्षअखेर बँकेस ४,६०८ रुपये निव्वळ नफा झाला, त्यांतून भागीदारांस ७½% डिव्हिडंड वाटण्याचें ठरलें. डिव्हिडंड देऊन उरणारी रकम इन्व्हेस्टमेंट फ्ल. फंडाकडे वर्ग करण्यांत आली. श्री. गणपतराव नारायणराव भोसले हे बँकेचे अध्यक्ष होते. त्यांचे व श्री. श्री. ह्यं. गुणे, बी. कॉम, मॅनेजर ह्यांचे बँकेच्या गेल्या वर्षांतील प्रगतीबद्दल अभिनंदन केलें पाहिजे.

---

### हिंदी चित्रपटांची लांबी

हिंदी चित्रपटांची लांबी विदेशी फिल्म्सच्या लांबीपेक्षा फार मोठी असते व ती कमी केल्यानें हिंदी फिल्म्स अधिक करमणूक करूं शकतील, असें मत बंगाल बोर्ड ऑफ फिल्म सेन्सॉर्सच्या अध्यक्षांनीं नुकतेंच व्यक्त केलें. हिंदी फिल्म्सच्या प्रदीर्घतेविषयींची ही तक्रार नवी नाहीं व तीमध्यें तथ्यहि आहे. विशेषतः दक्षिण हिंदुस्थानांत तयार होणाऱ्या चित्रपटांची लांबी फारच जास्त, कधी कधी १५½ हजार फुटांपेक्षाहि अधिक असते. तथापि, १९४१ मध्यें दाखविण्यांत आलेल्या ४८ हिंदी चित्रपटांच्या लांबीची सरासरी ११,५९९ फूट पडलेली आहे. सध्याच्या युद्धपरिस्थितींत कच्च्या फिल्म्सची काटकसर करणें आवश्यक झालेलें असल्याकारणानें हिंदी चित्रपटांची लांबी कमी करण्यास प्रस्तुत वेळ सोईची आहे. ब्रिटिश सरकारनें तेथील फिल्म कंपन्यांना कच्ची फिल्म कमी वापरण्याविषयीं विनंति केलेली आहे. हिंदुस्थानांत कच्ची फिल्म तयार होत नसल्याकारणानें व आयात दिवसेंदिवस अवघड होत असल्याकारणानें हिंदी कंपन्यांनीं फिल्म्सची काटकसर करणें अधिकच इष्ट झालें आहे.

# स्फुट-विचार

### मि. चर्चिल ह्यांचा वणवणीत विजय

मलाया आणि ब्रह्मदेश ह्यांचे बाजूस जपानच्या चढाईनें त्वरित प्रगति केल्यामुळें आणि तिकडे ब्रिटिशांचें संरक्षक बळ शत्रूचा प्रतिकार तात्काळ करण्यास असमर्थ ठरल्याकारणानें इंग्लंडमध्यें मि. चर्चिल ह्यांच्या प्रधान मंडळाच्या कार्यक्षमतेविषयीं शंका उत्पन्न होऊन त्यावर प्रतिकूल टिकाहि प्रकटपणानें होऊं लागली. युद्धाच्या बिकट परिस्थितींत आणि शत्रूस दूरदूरच्या अनेक रणांगणांत एकाच वेळीं तोंड द्यावें लागत असतां आपण शक्य तों युद्ध प्रयत्न करीत असल्यामुळें ब्रिटिश मुख्य प्रधान, मि. चर्चिल, ह्यांस आपल्या मंत्रिमंडळावर होणाऱ्या टीकेचा निर्णायक समाचार घेणें अगत्याचें वाटलें. आजपर्यंत स्वतःच्या धोरणाचें स्पष्टीकरण व समर्थन त्यांनीं कॉमन्स सभेंत अनेकवार केलें आहे. तथापि, टीकाकारांस स्वतःचे विचार निर्भीडपणानें पुढें मांडण्याची संधि देऊन जरूर वाटल्यास मुख्य प्रधान व मंत्रिमंडळ बदलण्याचा मार्ग कॉमन्स सभेस मोकळा करून ठेवण्याचें त्यांनीं ठरवलें. लोकशाही राज्यव्यवस्थेच्या तत्वास व पद्धतीस अनुसरून ही योजना त्यांनीं निश्चित केली. युद्धाची परिस्थिति कसकशी बदलत गेली, रशियास लढाऊ सामुग्री पुरवण्याचें व लिबियांत युद्ध चालू ठेवण्याचें महत्व काय होतें आणि मलायांत बाजू लंगडी पडणें कसें अपरिहार्य होतें ह्या सर्व गोष्टींचा तपशीलवार खुलासा मि. चर्चिल ह्यांनीं आपल्या भाषणांत केला. त्यावर तीन दिवस खुल्या दिलानें चर्चा होऊन त्यांच्या मंत्रिमंडळावरचा आपला पूर्ण विश्वास व्यक्त करणारा ठराव कॉमन्स सभेनें एक विरुद्ध चारशेचौसष्ट मतांनीं मान्य केला. युद्धाच्या बाबतींत ब्रिटिश जनतेनें आपल्या सरकारास असा जोराचा पाठिंबा दिल्यानें त्याचें कार्य अधिक उत्साहानें चालण्यास सहाय होईल ह्यांत शंका नाहीं.

---

### साखरेच्या धंद्याचें मध्यवर्ती मंडळ

हिन्दी साखरेच्या धंद्याचे संबंधांत उद्भवणाऱ्या प्रश्नांचा विचार करून त्यांचे बाबतींतल्या धोरणाविषयीं सल्ला देण्यासाठीं हिंदुस्थान सरकारनें एक मध्यवर्ती मंडळ नेमलें आहे ह्याची माहिती आमच्या वाचकांस आहेच. ह्या मंडळाची सभा दिल्ली येथें नुकतीच भरली होती. तीमध्यें भाषण करतांना सरकारच्या व्यापार मंत्र्यांनीं स्वदेशी साखरेचे नवीन कारखाने देशाच्या निरनिराळ्या भागांत स्थापन होत असून मालास असलेल्या मागणीच्या मानानें उत्पादन व पुरवठा वाढत चालला आहे. त्याच्या किंमती व खप ह्यांची समाधानकारक व्यवस्था कशी लावावी ह्या प्रश्नाकडे प्रामुख्यानें लक्ष वेधून त्या बाबतींत मंडळाचा अभिप्राय विचारला. कारखान्यांची स्थापना व त्यांतील उत्पादन ह्यांवर कायद्यानें नियंत्रण न घालतां मागणी व पुरवठा ह्यांचा मेळ बसवून साखरेच्या योग्य किंमती व धंद्याचा फायदेशीरपणा ह्यांची व्यवस्था कशी लावावी हा प्रश्न सध्या अवघड होऊं पहात आहे. ऊस पिकविणारे व गुळाचा धंदा करणारे शेतकरी आणि व्यापारी ह्यांच्या हितसंबंधाचीहि गुंतागुंत साखर कारखान्यांच्या उद्योगाशीं झालेली आहे. साखरेचे नवीन कारखाने निघण्यापूर्वी प्रांतिक व संस्थानी सरकारांनीं त्यांच्या भवितव्याविषयीं चौकशी करून त्यांस परवाने द्यावे अशी एक सूचना मंडळाच्या सभेनें मान्य केली असल्याचें प्रसिद्ध झालें आहे. कारखान्यांची परस्पर स्पर्धा होऊन साखरेचा खप होण्यास व तिला योग्य किंमती येण्यास अडचण उद्भवूं लागली आहे. तिचें निराकरण वेळींच न झाल्यास कांहीं कारखान्यांस पुढें पश्चात्तापाचा प्रसंग येईल ह्याविषयीं भयचिन्ह अगाऊ डोळ्यांपुढें मांडणें हा वरील सूचनेचा हेतु आहे आणि तो कारखानदारांनीं वेळींच लक्षांत घेणें अगत्याचें आहे.

---

### साखर मंडळाच्या इतर सूचना

व्यापार-मंत्रि व मध्यवर्ती साखर सल्लागार मंडळ ह्यांनीं वरील महत्वाची भयसूचना दिली, तिच्या शिवाय दिल्ली येथील सभेंत इतर बाबींसंबंधानें अभिप्राय व्यक्त केला गेला. कारखान्यांची साखर बाजारांत वेळोवेळ कोणत्या प्रमाणांत पाठवावी ह्या विषयींचे निर्बंध मालाच्या किंमती पडूं नयेत ह्या हेतूनें घालण्यांत आले आहेत, त्यांची आतां चांगल्या भावांच्या परिस्थितींत आवश्यकता नाहीं; चालू हंगामांत उसास द्यावयाच्या किंमती किमान दरानें निश्चित व्हाव्या आणि हंगामाचे अखेरीस साखरेचे सरासरीचे भाव चांगले राहिले असल्यास विशिष्ट प्रमाणांत शेतकऱ्यांस जादा किंमती मिळण्याची तरतूद व्हावी; साखरेच्या बाजारभावांची कमाल मर्यादा ठरवली जाऊन व्यापारी अयोग्य रीतीनें मालाच्या किंमती वाढवीत आहेत असें दिसल्यास त्यांच्यावर सरकारनें नियंत्रण घालावें इत्यादि प्रश्नांसंबंधानेंहि मंडळानें शिफारसी केल्या. ब्रिटिश सरकार हिंदी साखर विकत घेण्यास तयार आहे असें समजतें आणि ही खरेदी झाल्यास मालाचा उठाव होण्यास मदत मिळेल. परंतु साखरेची किंमत येताची असली तरच तें सरकार ती विकत घेईल असें समजतें. हिंदी कारखानदारांस व व्यापाऱ्यांस त्यानें देऊं केलेली किंमत परवडेल किंवा कसें हा येथें अवघड प्रश्न आहे. रेल्वे वहातुकीच्या अडचणी वाढत असल्यानें कारखानदारांनीं माल साठवणींत न ठेवतां शक्य तितक्या त्वरेनें त्याची उठावणी करावी असें त्यांस सुचवण्यांत येणार आहे असें कळतें. साखर मंडळाच्या सभा वर्षांतून दोनदां भरावयाच्या असून त्याची पुढली बैठक येत्या मे महिन्यांत व्हावयाची आहे.

---

### कापसाच्या आयातीवर जादा जकात

आखुड धाग्याच्या कपाशीचे भाव उतरल्यामुळें उत्पन्न झालेल्या परिस्थितीस कसें तोंड द्यावें ह्याविषयीं आवश्यक असलेल्या व्यवस्थेचें विवेचन आजच्या अंमलेसांत करण्यांत आलें आहे. शेतकऱ्यांनीं ह्या जातीच्या कपाशीचे ऐवजी धान्याचीं वगैरे पिकें काढावीं आणि ह्या व असल्या इतर योजना अमलांत आणण्यास पैसा लागेल त्याच्या पुरवठ्याची तरतूद व्हावी अशा सूचना करण्यांत आल्या आहेत. ह्या कामासाठीं फंड लागेल तो उभारण्याचा मार्ग म्हणून हिंदुस्थान सरकारनें एक वटहुकूम काढून कपाशीच्या आयातीवर दर पौंडास एक आणा ह्याप्रमाणें जादा जकात घेण्यांत येईल असें प्रसिद्ध केलें आहे. ह्या जकातीचें उत्पन्न येईल त्याचा स्वतंत्र फंड बाजूस काढून ठेवण्यांत येईल आणि त्याचा विनियोग सरकारास योग्य दिसेल त्या रितीनें शेतकरी वर्गास सहाय देण्याकडे केला जाणार आहे. ही योजना अर्थातच तात्पुरत्या स्वरूपाची असून पुरेसा फंड जमा झाला आहे असें दिसल्यास जादा जकात काढून घेण्यांत येईल.

फंडाच्या विनियोगाची तपशीलवार योजना प्रांतिक व संस्थानी सरकारें आणि गिरणीवाले व व्यापारी मंडळें ह्यांच्याशीं विचार-विनिमय होऊन निश्चित करण्यांत येईल. आखूड धाग्याच्या कापसाची किंमत चालू भावाच्याहि खालीं जाऊं लागल्यास त्यापैकी कांहीं माल सरकार खरेदी करून तात्पुरता साठवील किंवा गिरणीवाल्यांस व व्यापाऱ्यांस त्याची खरेदी करण्यास सहाय देईल. बाजारभाव स्थिर करण्याची ही तात्पुरती योजना झाली. पण हलक्या जातीच्या कपाशीचें क्षेत्र कमी करण्यासाठीं शेतकऱ्यांस निरनिराळ्या मार्गांनीं द्रव्यसहाय द्यावें लागेल त्याचीहि तजवीज करणें आवश्यक आहे. ह्या सर्व गोष्टींस लागणारा पैसा उभारण्याचें काम महत्त्वाचें असल्यानें त्या बाबतींतला उपक्रम हिंदुस्थान सरकारनें तातडीनें केला आहे, ही गोष्ट स्तुत्य आहे. फंड किती जमा होईल, जादा जकातींचे परिणाम कापडाच्या किंमती व गिरण्या ह्यांचेवर काय होतील हे प्रश्न अर्थातच येथें उद्भवतात आणि त्यांचाहि विचार सरकारास करावा लागेल. तो करतांना जरूर असलेला फंड उभारण्याचे दुसरे मार्ग उपलब्ध आहेत किंवा नाहींत आणि ते अधिक युक्त होतील किंवा कसें ह्याची चर्चा काळजीपूर्वक व्हावी लागेल. सुताच्या व कापडाच्या किंमती अगोदरच चढल्या आहेत आणि जादा आयात जकातीमुळें त्या आणखी वर जातील किंवा कसें ह्या महत्वाच्या बाबी हिशेबांत घेतल्या जाणें आवश्यक आहे. आर्थिक प्रश्न कसे गुंतागुंतीचे असतात आणि त्यांचे एकमेकांवर दूरगामी परिणाम कसे होतात ह्याचें स्मरण येथें ठेवलें जाणें अगत्याचें आहे.

---

### ए. आर. पी. च्या खर्चाची वाटणी

हवाई हल्ल्यापासून बचाव करण्याकरितां केलेल्या खर्चाची वाटणी मध्यवर्ती सरकार व प्रांतिक सरकार ह्यांचेमध्यें कशी करावी ह्याचा विचार करण्याकरितां हिंदुस्थान सरकारच्या फडनवीसांनीं दिल्ली येथें प्रांतिक सरकारांच्या प्रतिनिधींची एक परिषद बोलाविली होती. ए. आर. पी. साठीं होण्याऱ्या एकूण खर्चापैकी एक कोटि रुपयांच्या खर्चाची वाटणी मध्यवर्ती व प्रांतिक सरकारांत समसमान करावी आणि त्यापेक्षा जो ज्यास्त खर्च होईल त्यापैकी ७५% मध्यवर्ती सरकारनें व २५% प्रांतिक सरकारांनीं सोसावा, असें परिषदेंत ठरलें. खर्चाच्या सर्व योजना प्रांतिक सरकारांनीं हातीं घेण्यापूर्वी त्यांस मध्यवर्ती सरकारची मंजुरी मिळविण्यास फार वेळ लागतो. ह्याकरितां प्रांतांच्या आपल्या एकूण उत्पन्नाच्या ४% रकमेइतका खर्च त्यांनीं करून टाकावा असेंहि ठरविण्यांत आलें. खर्चाचे पुढील टप्पेहि निश्चित करून दुसऱ्या टप्प्यांतील खर्चाची मध्यवर्ती व प्रांतिक सरकारांत वाटणी ५०:५० व तिसऱ्या टप्प्यांतील खर्चाची वाटणी ७५:२५ ह्या प्रमाणांत व्हावी आणि त्यापेक्षा कितीहि ज्यास्त खर्च झाला, तरी मध्यवर्ती सरकारनें त्याचा ८७½% भाग उचलावा व १२½% खर्चाची जबाबदारी प्रांतिक सरकारांनीं घ्यावी, असेंहि परिषदेंत ठरलें. प्रांतिक सरकारांनीं बचावाच्या योजना हातीं घेण्यापूर्वी त्या मध्यवर्ती सरकारकडे पाठविण्याचें आतां प्रयोजन नाहीं; तथापि खर्चाच्या योजनांतील कांहीं बाबी मध्यवर्ती सरकारास मान्य झाल्या नाहींत, तर त्यास मागाहून तकार करतां येईल.

---

### आंतरराष्ट्रीय चलनव्यवस्था

हिटलरशाही आणि जपानी चढाई ह्यांचे विरुद्ध झगडणाऱ्या इंग्लंड व अमेरिका ह्यांसारख्या राष्ट्रांस युद्धसामुग्रीच्या पुरवठ्याचे बाबतींत जवळजवळ बिनशर्त परस्पर सहाय करावें लागत आहे. शांततेच्या काळीं मामुली देवघेवीचे आंतरराष्ट्रीय व्यवहार चालतात, तेव्हां व्यापाराच्या ओघांत होणाऱ्या देण्याघेण्याची व्यवस्था विशिष्ट चलन-हुंडणावळीच्या पद्धतीनें होत असते. युद्धपरिस्थितींत व्यापारी देण्याघेण्याच्या मामुली पद्धतीची घडी विस्कटून जाते आणि आंतरराष्ट्रीय हुंडणावळीचे दर व अंतर्गत चलन ह्यांची खास व्यवस्था करावी लागते. प्रस्तुत युद्धांत सहकारी राष्ट्रांस अमेरिका लढाऊ सामुग्रीचा पुरवठा मोठ्या प्रमाणावर करीत असून अमेरिकन खंडांतील राष्ट्रांमध्यें परस्पर सहायाची योजना नुकतीच निश्चित झाली असल्यानें त्यांच्यामधील देण्याघेण्याची समाधानकारक योजना अमलांत आणणें आवश्यक झालें आहे. अमेरिकन खंडांतील देशांच्या परस्पर व्यापारामध्यें सर्वमान्य होईल असें किंमतींचें मान निश्चित करण्याच्या कल्पनेचा विचार चालू असल्याचें अमेरिकेच्या तिजोरीचे चिटणवीस मि. मॉर्गेन्थॉ ह्यांनीं बोलून दाखवलें आहे. पौंड व डॉलर ह्यांच्या विनिमयाचा दर आज स्थिर व निश्चित केला गेला आहे, त्याप्रमाणेंच अमेरिकन खंडांतील देशांच्या चलनाच्या परस्परांच्या देवघेवीच्या किंमती विशिष्ट रीतीनें ठरवून टाकण्याची ही योजना आहे. ती अमेरिकेंत सर्वमान्य झाल्यास तिची अंमलबजावणी त्या खंडाच्या बाहेरहि केली जाणार आहे. अशा प्रकारची व्यवस्था युद्धपरिस्थितींत अत्यंत आवश्यक आहे ह्यांत संशय नाहीं.

---

### फ्रेंच उद्योगधंद्यांवर जर्मनीचें वर्चस्व

जर्मनी फ्रान्सकडून कच्चा माल विकत घेत नाहीं. कापड, विजेचें साहित्य, कांच सामान, कागद, इत्यादि जिनसांची खरेदी जर्मनी फ्रान्समध्यें करतो, त्यामुळें फ्रेंच कारखानदारांस आपण जर्मनीस युद्धसहाय करीत आहों, अशी टोचणी लागत नाहीं व युद्धसमाप्तीनंतर फ्रेंच कारखान्यांत फेरफार करावा लागण्याची आवश्यकता भासणार नाहीं. तथापि ह्या पद्धतीमुळें जर्मनीला आपली सर्व शक्ति युद्धोपयोगी मालाचे उत्पादनाकडे लावतां येते. जर्मनी फ्रान्सला कच्चा माल पुरवितो. फ्रान्समधील लहान व मध्यम आकाराच्या कारखान्यांस आतां आपला माल निर्गत करतां येऊं लागला आहे. हळुहळु फ्रेंच कारखानदार युद्धोपयोगी मालहि काढूं लागले आहेत व जेथें विरोध आढळतो तेथील कारखान्यांच्या भाग भांडवलांत आपलें बहुसंख्यत्व करवून घेण्याचा जर्मनीचा प्रयत्न असतो. अशा रीतीनें फ्रेंच कारखाने जर्मन पंखाखालीं येत आहेत. लंडन टाइम्स पत्राच्या बातमीदारानें ही हकीकत प्रसिद्ध केली आहे.

---

### ब्रह्मदेशांतून परतलेले लोक

रंगूनवरील पहिल्या बॉम्बहल्ल्यानंतर ब्रह्मदेश सोडून निघालेले १०½ हजार लोक आतांपर्यंत चितगांव बंदरांत येऊन उतरले व तेथून ते आपआपल्या गांवीं हळुहळु गेले.

### बंगाल प्रांताचें बजेट

बंगाल प्रांताच्या येत्या वर्षाच्या अंदाजपत्रकांत दोन कोटि रुपयांची तूट अपेक्षित आहे.

## डिसेंबर महिन्यांतील आर्थिक उलाढाली

( प्रो. काळे ह्यांचें मुंबई रेडिओवरील भाषण, रेडिओ अधिकाऱ्यांचें कृपेनें उद्धृत करण्यांत येत आहे )

बाजारभावांत युद्धपरिस्थितीमुळें चढउतार होतो त्याचा आणि विशेषतः धान्य, कापड, कोळसा असल्या जीवनास अत्यावश्यक असलेल्या जिनसांच्या किंमती बेसुमार चढतात, त्यांचा सर्व बाजूंनीं विचार करून महागाईवर उपाययोजना करण्याच्या हेतूनें फेब्रुवारीचे प्रारंभीं दिल्ली येथें प्रांतिक सरकारांच्या प्रतिनिधींची परिषद भरणार असल्याचें प्रसिद्ध झालें आहे. अशा परिषदा मागें भरल्या आहेत आणि पुढेंहि मधून मधून भरणें आवश्यक आहे. युद्धक्षेत्रांत नवीन नवीन घडामोडी होतात आणि धान्यधुन्याच्या पुरवठ्यावर नैसर्गिक व इतर कारणें ह्यांचा परिणाम होऊन परिस्थिति बदलते, तिचा विचार केवळ स्थानिक किंवा प्रांतिक दृष्टीनें करून चालत नाहीं. ह्या प्रश्नाची चर्चा आणि त्यासंबंधांतले निर्णय अखिल भारतीय व युद्धविषयक भूमिकेवर व्हावे लागतात. नित्याच्या जीवनास लागणाऱ्या जिनसांच्या पुरवठ्याचे बाबतींत कोणताहि प्रांत किंवा जिल्हा सर्वस्वी स्वावलंबी होऊं शकत नाहीं. ह्या पदार्थांची देवघेव जिल्ह्याजिल्ह्यांत व प्रांताप्रांतांत चालत असते आणि एका ठिकाणचा तुटवडा दुसऱ्या ठिकाणांतील शिल्लकी किंवा फाजील पुरवठ्यांतून भरून काढावा लागतो. तसें करतांना वहातुकीच्या साधनांची पुरेशी व्यवस्था आहे किंवा नाहीं, कोणी व्यापारी आपला माल आणखी अधिक महाग व फायदेशीर रीतीनें विकतां यावा म्हणून त्याचा पुरवठा अडकवून ठेवीत आहेत काय आणि दुकानदार परिस्थितीचा अवास्तव फायदा घेऊन जिनसांच्या किंमती भरमसाटपणानें चढवीत आहेत कीं काय ह्या गोष्टींकडे अधिकाऱ्यांनीं लक्ष पुरवणें अगत्याचें असतें. युद्धासारख्या गडबडीच्या काळांत थोडीफार महागाई होणें अपरिहार्य असतें, हें खरें. तथापि, सामान्य जनतेस जाचक होणार नाहींत अशा बेतानें जिनसांच्या किंमती नियंत्रित करणें सरकारचें कर्तव्य ठरतें. शक्य तेथें पुरवठा निरनिराळ्या मार्गांनीं वाढवून, वाहतुकीच्या सवलती व सोयी उपलब्ध करून व व्यापाऱ्यांच्या नफेबाजीस आळा घालून मागणी व पुरवठा यांचा मेळ त्यास घालावा लागतो. फेब्रुवारीच्या आरंभीं दिल्ली येथें भरणाऱ्या परिषदेच्या त्रोटक रीतीनें प्रसिद्ध झालेल्या कार्यक्रमासंबंधानें असें म्हटलें आहे कीं बाजारभावांच्या सरकारी नियंत्रणाच्या अलीकडील परिस्थितीचा विचार करणें, जरूरीच्या जिनसांच्या पुरवठ्याची पहाणी करणें आणि हे जिन्नस बेताच्या किंमतीनें सर्वत्र सारखे उपलब्ध होण्याची व्यवस्था करण्याच्या उपायांची चर्चा करणें हे प्रश्न मुख्यत्वेंकरून चर्चिले जातील. परिषदेच्या ह्या उद्देशांचें अधिक स्पष्टीकरण करण्याची आवश्यकता नाहीं.

कच्चा व पक्का माल, देशांत उत्पन्न होणारे व बाहेरून येणारे जिन्नस ह्या सर्वांच्या बाजारभावांचें नियंत्रण करण्याचा प्रश्न येथें नाहीं, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. कपास, गळिताचीं धान्यें वगैरे शेतीच्या मालास असलेलें परराष्ट्रीय गिऱ्हाईक मर्यादित झाल्यामुळें त्याच्या किंमती चढल्या नाहींत हें युद्धपरिस्थितींत स्वाभाविकच आहे. तथापि, गहूं, तांदूळ, बाजरी, इत्यादि शेतीचाच माल विलक्षण महागला आहे. हे जिन्नस आणि कोळसा, लाकूडफाटा, राकेल इत्यादि आवश्यक पदार्थ ह्यांची महागाई होणें एकंदर जनतेच्या दृष्टीनें अनिष्ट असल्यानें ह्या मालाच्या संबंधांत उत्पादक, उपभोक्ते व व्यापारी ह्या वर्गांच्या हितसंबंधांचा योग्य मेळ घालावा लागतो हेंच धोरण प्रांतिक सरकारांनीं अंगिकारलें आहे. पंजाबमध्यें तेथील सरकारानें गव्हाच्या किंमती ठरवून टाकल्या आहेत, एवढेंच नव्हे तर कांहीं महत्त्वाच्या बाजारांतील गहूं आपल्या स्वतःच्या हुकमतींत आणला असून त्याची विक्री नियंत्रित केली आहे. कांहीं जातींच्या मालाचा पुरवठा तोकडा होणार असें दिसतांच मुंबईमधील व्यापाऱ्यांनीं त्याच्या किंमती एकदम चढवल्या आणि त्याकारणानें सामान्य लोकांस नित्याच्या उपयोगाच्या जिनसांचा पुरवठा होणें कठीण झालें. कोळसा, गहूं, तांदूळ आणि ज्वारी ह्यांच्या किंमती ह्या रीतीनें कडकल्याकारणानें मुंबई सरकारनें बी. बी. अँड सी. आय. आणि जी. आय. पी. ह्या रेल्वेजच्या अधिकाऱ्यांशीं बोलणें करून ह्या जिनसांच्या वहातुकीसाठी वॅगन्सचा पुरवठा होण्याची व्यवस्था तातडीनें केली. अल्प प्राप्तीचीं व हातावरचें पोट असणारीं हजारों मध्यम व कनिष्ठ आर्थिक स्थितींतलीं कुटुंबें मुंबई शहरांत आहेत. त्यांच्या सुरळीतपणाच्या चरितार्थाचे आड व्यापाऱ्यांचें स्वार्थी धोरण येऊं लागल्यास त्यांचा समाचार सरकार घेतल्यावांचून रहाणार नाहीं, असें त्यांस बजावण्यांत आलें आहे तें युक्तच आहे. युद्धधोरण यशस्वी होण्यासाठी लढाऊ सामुग्री तातडीनें रेल्वेमार्गानें पाठवावी लागते आणि त्या कामीं रेल्वेच्या वाघिणी कांहीं काळपर्यंत गुंततात व बिनलढाऊ वहातुकीच्या उपयोगास येऊं शकत नाहींत. ह्या तात्पुरत्या गरजेच्या वेळीं व्यापाऱ्यांनीं पुरवठ्याचा तुटवडा आहे ह्या सबबीवर मालाच्या किंमती वाढवणें किंवा चढीच्या भावानें मुदतीचे खरेदीचे वायदे करणें अयोग्य आहे, ह्यासंबंधांत प्रांतिक सरकारानें व्यापाऱ्यांस योग्य वेळीं व स्पष्ट इशारत दिली आहे, तिचा आवश्यक तो इष्ट परिणाम होईल अशी अपेक्षा आहे. तसा तो न झाल्यास किंमतीचें नियंत्रण करण्याचा सरकारास अधिकार आहे त्याची अंमलबजावणी करण्यास तें मागेंपुढें पाहणार नाहीं. ( अपूर्ण )

### निवडक बाजारभाव

बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) ... ३%

सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) | १०८–१ |
| ४% १९४३ | १०३–० |
| ३½% बिनमुदत | ९५–० |
| ३½% १९४७–५० | १०१–६ |
| ३% ( १९६३–६५ ) | ९४–४ |
| २¾% १९४८–५२ | ९७–० |

सोनें–चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास | ४७–८–० |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यांस | ७०–०–० |


## न्यायमूर्ति रानड्यांचे
## तीन अप्रसिद्ध लेख प्रसिद्ध झाले

**PLEA FOR PROTECTIONIST POLICY**

**INDIAN SUGAR INDUSTRY**

न्यायमूर्ति रानडे यांनीं १८९९ सालीं ' टाइम्स ऑफ इंडियांत ' स्वदेशी साखरेच्या धंद्यासंबंधीं लिहिलेले महत्त्वाचे तीन लेख, प्रो. वा. गो. काळे ह्यांच्या प्रस्तावनेसह प्रसिद्ध करण्यांत आले आहेत.

व्यवस्थापक, ' अर्थ ', पुणें ४

ह्या पत्त्यावर आठ आण्यांची तिकिटें पाठवून लेखांची प्रत मागवावी.

**महायुद्ध दाराशीं आलें**
**परदेशी औषधें**
**दुर्मिळ व महाग झालीं**
पण
**भिण्याचें कारण नाहीं !!!**
**— कारण —**
**आयुर्वेद रसशाळा पुणें लि०**
या देशी औषधाच्या प्रसिद्ध कारखान्यानें तयार केलेलीं
● रक्तवर्धक, ● उपनाह,
● बालजीवन, ● कॅल्सीप्राल
इत्यादि पेटंट, स्टँडर्ड व लोकप्रिय औषधें खात्री पटल्यामुळें
★ डॉक्टर्सहि वापरूं लागले आहेत. ★
दरसाल बिनचूक नफा वाटणाऱ्या ह्या कंपनीचे शेअर्स व औषधें मागवा.
**आयुर्वेद रसशाळा पुणें लि०**
मुख्य दुकान गणपति चौक, लक्ष्मीरोड, पुणें २.

सर्व तऱ्हेची कापड छपाई व रंगाई (Calico Printing and Dyeing) करणारा कारखाना.
**‘ पायोनियर डाइंग हाऊस ’**
कोचाचें कापड (Casement cloth), दाराचे पडदे, टेबल कव्हर इ. टिकाऊ रंगाचे, स्वदेशी तयार मिळतात. कारखानाः—
भिकारदास मारुती रोड, हातेवाडी, पुणें.

महाराष्ट्रांत लेखी गॅरंटीसह टिकाऊ व मनपसंत
**साईन-बोर्डस्, रबरी शिक्के,**
आकर्षक
**सिनेमा स्लाइडस् व पिक्चर पेंटिंग**
सतत १० वर्षे विश्वसनीय व वेळेवर मिळण्याचें
एकच ठिकाण
**पेन्टर ए. जी. वेडेकर**
( मराठी वळणाचे स्पेशॅलिस्ट )
**बुधवार चौक, पुणें २ ( सिटी )**
बाहेरगांवचीं कामें व्यवस्थित व वेळेवर पाठवूं.

**कॉमनवेल्थचा वैभवशाली विस्तार**

★ २७ हजारांचेवर पॉलिसी–होल्डर्स
★ एकूण चालू विमे २ कोटीचेवर
★ दोन हजारांहून अधिक कार्यकर्ते निरनिराळ्या प्रांतांत कॉमनवेल्थसाठी उत्साहानें काम करीत आहेत.


हेड ऑफिस बिल्डिंग

**कॉमनवेल्थ**
**ॲशुअरन्स कंपनी लि.**

चेअरमन
★ रा. ब. एम्. एन्. मेथा, C. I. E., M. B. E.

ॲक्टिंग ऑफिस सुपरिन्टेंडेंट ★ एम्. एन्. भागवत, B. A.

‘ कॉमनवेल्थ ’ ची पॉलिसी घेऊन जीवन निश्चिंत व सुखी करा.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं ‘ दुर्गाधिवास, ’ भांबुर्डा, घ. नं. १२४।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ८ पुणें, बुधवार, तारीख ११ फेब्रुवारी, १९४२ अंक ६

न्यायमूर्ति रानड्यांचे
तीन अप्रसिद्ध लेख प्रसिद्ध झाले

PLEA FOR PROTECTIONIST POLICY
INDIAN SUGAR INDUSTRY

न्यायमूर्ति रानडे यांनीं १८९९ सालीं ' टाइम्स ऑफ इंडियांत ' स्वदेशी साखरेच्या धंद्यासंबंधीं लिहिलेले महत्त्वाचे तीन लेख, प्रो. वा. गो. काळे ह्यांच्या प्रस्तावनेसह प्रसिद्ध करण्यांत आले आहेत.

व्यवस्थापक, ' अर्थ ', पुणें ४

ह्या पत्त्यावर आठ आण्यांचीं तिकिटें पाठवून लेखांची प्रत मागवावी.

ठेवी घेणें आहेत

- फक्त रु. वीस हजारापर्यंतच ठेवी घेणें आहेत.
- ठेवी घेण्याची मुदत फक्त १ मार्च १९४२ पर्यंतच आहे.
- कारखाना रात्रंदिवस चालूं आहे.
- ठेवीची रक्कम खेळत्या भांडवलासाठी वापरली जाईल.

— जास्त खुलाशाकरितां समक्ष भेटा अगर लिहा —

दि विजय टेक्स्टाइल्स लि.
कर्वे युनिव्हर्सिटीसमोर, एरंडवणें, पुणें ४.

'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

वक्तशीर आणि मनपसंत काम करून देणारे
मोहन वॉच कंपनी
रेग्युलेशन मोफत
कॉमनवेल्थ बिल्डिंगसमोर लक्ष्मी रोड, पुणें २.

महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर
महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी
बुधवार चौक, पुणें

**श्रीराम सिल्क मिल्स लि., बंगलोर**
[ कंपनीनें १९४० अखेर ६ टक्के डिव्हिडंड वांटला आहे. ]
युद्धसाहित्यपुरवठा–खात्याची पॅरेशूटकरितां लागणाऱ्या
रेशमी कापडाची ऑर्डर पुरी करण्यासाठी लागणाऱ्या भांडवलाकरितां तूर्त एकूण रु. १ लक्षाच्या रकमेपर्यंत
**ठेवी घेणें आहेत**
व्याजाचा दर ४॥ ते ६ टक्के. ठेव किमान रु. ५०० ची असावी. ठेवीवरील व्याज दर सहा महिन्यांनीं दिलें जातें.
श्रीराम सिल्क मिल्स लि., श्रीरामबाग, बसवनगुडी, बंगलोर. | नारायण गोविंद नाईक, ( माजी अध्यक्ष, म्हैसूर चेंबर ऑफ कॉमर्स ) मॅनेजिंग डायरेक्टर
आमच्या कारखान्यांतील माल मुंबईस बॉम्बे स्वदेशी को-ऑपरेटिव्ह स्टोअर्समध्यें व पुण्यास लक्ष्मी रोडवरील रे म्यूझिअमच्या व्यापार-संवर्धन-गृहांत पहा.

# विविध माहिती

### कॉलिफ्लॉवरची भाजी

कॉलिफ्लॉवरची भाजी मूळ भूमध्यसमुद्राचें किनाऱ्यावरची, सायप्रसमधून ती इंग्लंडकडे १६ व्या शतकांत गेली व तेथून ती हिंदुस्थानांत आली.

### खास लष्करी गाड्या

गेल्या नऊ महिन्यांत, लष्कराच्या वहातुकीसाठीं सबंध हिंदुस्थानांत एकूण १,९७४ खास आगगाड्या सोडण्यांत आल्या, म्हणजे, मासिक सरासरी २२० आगगाड्यांची पडली.

### ट्रेझरी बिलांवर १५ आ. ११ पै व्याजाचा दर

रिझर्व्ह बँकेनें गेल्या आठवड्यांत हिंदुस्थान सरकारची एक कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. १५ आ. ११ पै इतका पडला.

### कृत्रिम रबर

पेट्रोलियमपासून निघणाऱ्या एका पदार्थाचें कृत्रिम रबर तयार करण्याची सिद्धता अमेरिकेनें केली आहे. स्वाभाविक रबराचा पुरवठा अजिबात बंद झाला, तरी युद्धप्रयत्नांस अडचण पडणार नाहीं, असा विश्वास तेथें व्यक्त करण्यांत आला आहे.

### बँकांस सुट्टी

शुक्रवार, ता. १३ फेब्रुवारी रोजीं महाशिवरात्रीनिमित्त बँका बंद राहतील.

### रेल्वेजच्या वाढाव्याचा विनियोग

हिंदी रेल्वे बजेट असेंब्लीस १८ फेब्रुवारी रोजीं सादर करण्यांत येणार आहे. रेल्वेजच्या कारभारांतील वाढाव्याचा उपयोग युद्धविषयक खर्च भागविण्याकडे करण्यांत यावा, असें सरकारतर्फे सुचविण्यांत येईल अशी बातमी आहे.

### डॉ. शिरनामे

मुंबई प्रांताचे मुख्य मार्केटिंग अधिकारी, डॉ. शिरनामे, ह्यांची कंट्रोलर ऑफ प्राइसेसचे जागीं नेमणूक झाली आहे. खानबहादुर दलाल हे त्या जागीं पूर्वी काम करीत होते.

### फिल्मी टपाल

हिंदुस्थान ते ग्रेट ब्रिटन फिल्मी टपालाची वहातुक सुरू झाली आहे. ह्या योजनेमुळें, नेहमीच्या ३,००० पत्रांचा मजकूर १४ औंस फिल्मवर मावूं शकतो व पत्रें दोन ते तीन आठवडे आधीं पोंचूं शकतात.

### रक्तांतरासाठी गव्हर्नर आपलें रक्त देणार

इंडियन रेड क्रॉस सोसायटीच्या ब्लड बँक कमिटीस आपलें रक्त देण्याची तयारी बंगालच्या गव्हर्नरांनीं दर्शविली आहे. युद्ध हिंदुस्थानाचे समीप येत चाललें असल्याकारणानें, रक्तांतरासाठी रक्ताचा साठा करून ठेवण्याची आवश्यकता उत्पन्न झाली आहे.

### रेडिओवरील हिंदी व इंग्रजी बातम्या

हिंदी रेडिओवर सकाळीं सांगण्यांत येणाऱ्या हिंदुस्थानी व इंग्रजी बातम्यांचे वेळांत फेब्रुवारीपासून बदल करण्यांत येणार आहे. सध्याच्या त्यांचे वेळापेक्षा अगोदर पंधरा मिनिटें बातम्या सांगितल्या जातील.

### चीनकडे हिंदी कापड

चीनकडे हिंदी कापड पाठविण्यासंबंधीं वाटाघाटी चालू आहेत.

### ग्रेटब्रिटन व एथिओपिया ह्यांचेमध्यें करार

ग्रेटब्रिटन व एथिओपिया ( अॅबिसिनिया ) ह्यांचेमध्यें करार झाला आहे. पहिल्या वर्षी १५ लक्ष व दुसऱ्या वर्षी १० लक्ष पौंड एवढी रकम ग्रेटब्रिटन एथिओपियाला देणार आहे एथिओपियाच्या बादशहानें ग्रेटब्रिटनची आर्थिक व लष्करी बाबतींत मदत मागितली आहे.

### हैद्राबाद संस्थान बँक

या बँकेचें अधिकृत भांडवल १,५०,००,००० रुपयांचें असून तें १,५०,००० भागांत विभागण्यांत आलें आहे. प्रत्येक भाग १०० रुपयांचा आहे. यांपैकीं ३८,२५,००० रुपये किंमतीचे ३८,२५० भाग निजाम सरकारकरितां राखून ठेवण्यांत आले आहेत. बाकीचे ३६,७५,००० रुपये किंमतीचे ३६,७५० भाग जनतेसाठीं ठेवण्यांत आले आहेत. अर्जासोबत प्रत्येक भागास २५ रुपये व अर्ज मंजूर झाल्यावर ७५ रुपये वर्गणीदारांनीं द्यावे लागतील. बँकेच्या सर्व भागांवर शेकडा ३ टक्केप्रमाणें कायम स्वरूपाचा किमान फायदा देण्याची सरकारनें हमी दिली आहे. १ खुर्दाद १३५१ फसली ( ५ एप्रिल इ. स. १९४२ ) पासून भागांवर फायदा देण्यांत येईल. भागांची रक्कम संस्थानच्या नाण्यांत घेण्यांत येईल.

### म्हैसूर सरकारी रेल्वेज

म्हैसूर संस्थानाच्या सरकारी रेल्वेजला १९४०-४१ मध्यें ९२ लक्ष ४१ हजार रुपये उत्पन्न झालें. निव्वळ उत्पन्न २६ लक्ष, ५२ हजार रुपये झालें.

### म्हैसोर किर्लोस्कर लि.

किर्लोस्कर बंधूंनीं हरिहर ( म्हैसूर संस्थान ) येथें काढलेल्या मशिन टूलसच्या कारखान्याचा उद्घाटन समारंभ सोमवार, ता. ९ रोजीं म्हैसूरच्या दिवाणांचे हस्तें मोठ्या थाटानें पार पडला.

### साबणाची काटकसर

ग्रेट ब्रिटनमध्यें साबणाचा खप ८०% कमी करण्याची रेशनिंगची योजना ९ तारखेपासून अंमलांत आली.

### वाघांची खानेसुमारी

हिंदुस्थानांतील वाघांची खानेसुमारी करण्याचें काम हातीं घेण्यांत आलें आहे.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | ४४ |
| २ शेतकऱ्यांच्या कर्जफेडीचा कायदा ... | ४५ |
| ३ हिंदी कपाशीचें पीक... | ४६ |
| ४ हिंदी संस्थानांतील जॉइंट स्टॉक बँका ... | ४७ |
| ५ स्फुट विचार ... | ४७ |
| कृत्रिम रबर—ऊंस आणि साखर—साखरेच्या कारखानदारांच्या तक्रारी—सिंगापूर | |
| ६ डिसेंबर महिन्यांतील आर्थिक घडामोडी ... | ४८ |
| ७ शेतकी प्रदर्शन ... | ४९ |
| ८ निवडक बाजारभाव ... | ४९ |



# अर्थ

बुधवार, ता. ११ फेब्रुवारी, १९४२


## शेतकऱ्यांच्या कर्जफेडीचा कायदा

(रा. ब. दिवाणजी ह्यांचें नवें पुस्तक* )

मुंबई प्रांताचा, शेतकऱ्यांच्या कर्जफेडीचा कायदा ( बॉंबे ॲग्रिकल्चरल डेटर्स रिलीफ ॲक्ट, १९३९ ) मुंबई प्रांतांतील कांहीं तालुक्यांस लागू करण्यांत आला आहे. हा कायदा दीर्घपरिणामी असून, त्याच्या अंमलबजावणीचा प्रयोग शेतकऱ्यांच्या हिताचे दृष्टीनें अत्यंत महत्त्वाचा आहे. शेतकऱ्यांची आर्थिक स्थिति सुधारण्याचे प्रयत्न हिंदुस्थानांतील सर्व प्रांतांत चालू आहेत आणि हिंदुस्थान सरकारहि ग्रामसुधारणेच्या कामीं लक्ष घालीत आहे. जुन्या कर्जाचा बोजा कमी करणें, नवें कर्ज होऊं न देणें, शेतीचें उत्पन्न वाढविणें, शेतीच्या मालाची संघटित विक्री करणें, खेडेगांवी उद्योगधंद्यांचें पुनरुज्जीवन करणें, भांडवल पुरवठ्याची व्यवस्था करणें, इत्यादि मार्गांनीं शेतकऱ्यांच्या आर्थिक दुःस्थितीचें निवारण करण्याचा प्रयत्न चालू आहे. शेतकऱ्यांच्या आर्थिक दुःस्थितीचा प्रश्न फार जुना आहे, परंतु तो सोडविण्याचा पद्धतशीर प्रयत्न आजवर इतक्या उत्साहानें करण्यांत आला नव्हता. गेल्या शतकाचे उत्तरार्धांत, शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणाचा परिणाम मोठ्या प्रमाणावर तंटेबखेडे व दंगे होण्यांत झाला होता. त्यांची चौकशी करण्याकारितां नेमलेल्या कमिशननें केलेल्या सूचनांचें अनुरोधानें डेक्कन ॲग्रिकल्चरिस्टस् रिलीफ ॲक्ट १८७९ सालीं करण्यांत आला, परंतु तो विशेष उपयुक्त ठरला नाहीं. त्यानंतर कांहीं किरकोळ प्रयत्न झाले, तथापि त्यांत व्यापकपणा, एकसूत्रीपणा व पद्धतशीरपणा नव्हता. १९३० सालानंतर आलेल्या मंदीमुळें शेतीच्या मालाचे बाजारभाव एकदम उतरले, त्याकारणानें शेतकऱ्यांचें उत्पन्न कमी होऊन त्यांची परतफेडीची पात्रता नाहींशी झाली. कित्येकांच्या जमिनी लिलावास निघाल्या. त्यांस उदरनिर्वाहाचें साधन न उरल्यामुळें सार्वजनिक शांततेस धोका उत्पन्न होण्याजोगी परिस्थिति निर्माण झाली आणि प्रांतिक सरकारांस हा प्रश्न तातडीनें हातीं घेणें अत्यावश्यक झालें. प्रांतांच्या लोकमतानुवर्ती प्रधानमंडळांस सहाजिकच हा प्रश्न जिव्हाळ्याचा वाटला व त्यांनीं तात्कालिक कर्जफेडीच्या तहकुबीबरोबर कर्जबाजारीपणाच्या व्यापक प्रश्नाकडेहि लक्ष्य पुरवलें, त्याचा परिणाम आज स्पष्ट दिसतच आहे. मुंबई प्रांतिक सरकारच्या ह्या संबंधांतील कार्यक्रमापैकीच शेतकऱ्यांच्या कर्जफेडीचा कायदा, ही एक महत्त्वाची बाब आहे. हा कायदा विधिमंडळांत मंजूर करून घेण्यांत काँग्रेस मंत्रिमंडळानें निष्कारण घाई केली, असें म्हटलेलें कित्येक ठिकाणीं ऐकूं येतें. "गव्हर्नर जनरलनीं ह्या कायद्यास संमति द्यावी, अशी शिफारस मुंबईच्या गव्हर्नरनीं केली व काँग्रेस मंत्रिमंडळानें त्यावेळीं अधिकारत्याग केला होता, तरी गव्हर्नर जनरलनीं त्या कायद्यास मंजुरी दिली, ह्याचा अर्थ प्रांतिक विधिमंडळास ह्या कायद्याचा विचार पूर्णपणें करण्यास सवड मिळालेली होती, असाच होतो" असें रा. ब. दिवाणजी ह्यांचें म्हणणें आहे. मुंबई सरकारनें कर्जफेडीच्या कायद्याचे अंमलबजावणीचे कामीं नंतरहि निष्कारण दिरंगाई केलेली नाहीं, ह्यावरूनहि त्या कायद्याचे इष्टतेबद्दल अनुकूल असाच त्याचा अभिप्राय व्यक्त होतो.

शेतकऱ्यांचें कर्जनिवारण केल्यानंतर पुनः कर्जांत ते पडूं नयेत, ह्याची तरतूद प्रस्तुत कायद्यानें केलेली नाहीं. आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक सुधारणांचे द्वारांच तो प्रश्न सुटण्यासारखा आहे; एकाद दुसऱ्या कायद्याचे सहायानें कर्जाची आपत्ती नाहींशी करतां येणें शक्य नाहीं. अशा व्यापक सुधारणांचे प्रयत्न शक्य त्या प्रमाणांत चालू झाले आहेत, त्यांस जोराची चालना मिळणें आवश्यक आहे. तथापि, तूर्त शेतकऱ्यांच्या कर्जफेडीचा कायदा अमलांत येत आहे, त्याचें विस्तृत विवरण करणारें पुस्तक अजून तयार झालें नव्हतें. रा. ब. दिवाणजी, सेवानिवृत्त स्मॉलकॉज कोर्ट जज्ज, ह्यांचें, कर्जफेडीच्या कायद्याची कलमवार चर्चा करणारें पुस्तक नुकतेंच प्रसिद्ध झालें आहे, तें अत्यंत उपयुक्त आहे. लेखकानें कायद्याच्या कलमांचा अर्थ लावतांना अर्थातच, कायद्याची पार्श्वभूमि, कायद्याच्या मसुद्यावरील चर्चा इत्यादि लक्षांत घेतलेली आहेत. तथापि, कलमांच्या अर्थाविषयीं कांहीं मतभेद होणें स्वाभाविक आहे. लेखकानें आपल्या मताचें शक्य तेवढें समर्थन केलें आहे. ग्रंथकर्त्यानें पुस्तकास ६३ पृष्ठांची प्रस्तावना जोडली आहे, त्यांत कायद्याचा हेतु, कायद्याची प्रमुख कलमें, इतर प्रांतांतील तत्सम कायदे, इत्यादींची उद्बोधक चर्चा केली आहे. कायदेपंडित व जुन्या कायद्याची प्रत्यक्ष अमलबजावणी केलेला जज्ज, ह्या दुहेरी नात्याचा अनुभव असलेल्या लेखकानें प्रस्तुत पुस्तक लिहिलेलें आहे, हें त्याचें वैशिष्ट्य आहे. अशाच प्रकारचें एक पुस्तक मराठी भाषेंत श्री. वि. ग. तिले ह्यांनीं लिहिलेलें आहे. त्याचा उल्लेख श्री. दिवाणजी ह्यांनीं आपल्या प्रस्तावनेंत केला आहे.

*"The Bombay Agricultural Debtors' Relief Act, 1939" लेखक:—रावबहादुर प्रल्हाद सी. दिवाणजी, एम. ए., एलएल. एम्, पृ. सं. ४२२. किं. ७ रु.

### हिंदी तांदळाचें पीक

१९४१–४२ च्या सरकारी अंदाजाप्रमाणें हिंदुस्थानांतील तांदळाची लागवड ६ कोटि, ९९ लक्ष, ८२ हजार एकर जमिनींत आहे. एकूण लागवडीपैकीं, २९% बंगालमध्यें, १३·१% मद्रासमध्यें, १२·८% बिहारमध्यें, १०·३% मध्यप्रांत—वऱ्हाडांत व ९·७% संयुक्त प्रांतांत आहे. हिंदी लागवडीपैकीं ३·२% लागवड मुंबई प्रांतांतील आहे.

## हिंदी कपाशीचें पीक

(१९४१-४२ चा सरकारी अंदाज)

हिंदुस्थानांत कपाशीखाली २,२२,६९,००० एकर जमीन आहे. गेल्या वर्षी २,१९,८२,००० एकरांत कपाशीची लागवड करण्यांत आलेली होती. चालू वर्षीचें अपेक्षित उत्पादन ५४,९०,००० गाठी आहे, म्हणजे गेल्या वर्षीच्या मानानें तें ४% ज्यास्त आहे.

### प्रांतवार लागवड व उत्पादन

| प्रांत अथवा संस्थान | क्षेत्रफळ हजार एकर | उत्पादन गाठी | दर एकरी उत्पादन (पौंड) |
|---|---|---|---|
| मुंबई | ५,५९८ | १,०७४ | ७७ |
| मध्यप्रांत व वऱ्हाड | ३,६१० | ७६६ | ८५ |
| पंजाब | ३,५१२ | १,५७३ | १७९ |
| मद्रास | २,०३६ | ४४१ | ८७ |
| सिंध | १,००३ | ३७० | १४८ |
| सं. प्रांत | ४३४ | १०६ | ९८ |
| बंगाल | १०७ | ३० | ११२ |
| आसाम | ३८ | १३ | १३७ |
| बिहार | ४१ | ८ | ७८ |
| अजमीर मारवाड | २८ | १० | १४३ |
| सरहद्द प्रांत | १५ | ३ | ८० |
| ओरिसा | ८ | १ | ५० |
| दिल्ली | १ | | ५४ |
| हैद्राबाद | २,११२ | ५०९ | ७० |
| मध्यहिंदुस्थान | १,०९० | २०१ | ७४ |
| बडोदें | ८०४ | १६२ | ८१ |
| ग्वाल्हेर | ५३० | १०७ | ८१ |
| रजपुताना | ४२१ | १०१ | ९६ |
| म्हैसूर | ८१ | १५ | ७४ |
| एकूण (१९४१-४२) | २२,२६९ | ५,४९० | ९९ |
| एकूण (१९४०-४१) | २१,९८२ | ५,२६५ | ९६ |
| एकूण (१९३९-४०) | २०,४७३ | ४,३७८ | ८६ |

### हिंदी गिरण्यांतील उठाव (गाठी)

| प्रांत अथवा संस्थान | १९४१-४२ | १९४०-४१ | १९३९-४० |
|---|---|---|---|
| मुंबई | २९५,५८२ | २२९,७७२ | २०५,८८८ |
| मद्रास | ९२,४१८ | ८८,९०३ | ८०,९६३ |
| सं. प्रांत | ६७,६४४ | ६१,९२० | ४९,०१२ |
| मध्यप्रांत | ३०,२८६ | २२,७१४ | २६,९५० |
| बंगाल | १९,६५३ | १८,१६८ | १४,६०७ |
| पंजाब व दिल्ली | २७,२७५ | २९,११३ | २४,२४५ |
| इतर ब्रि. हिंदुस्थान | ७,४६४ | ७,८०४ | ७,९६३ |
| हैद्राबाद | १२,४१२ | ११,०६३ | १२,२७७ |
| म्हैसूर | ११,६५५ | ११,६९५ | १०,०४२ |
| बडोदें | १४,८५६ | १२,५११ | १३,७५६ |
| ग्वाल्हेर | १६,२४८ | १४,५४९ | १५,३५९ |
| इंदूर | २६,८५९ | २१,९४२ | १९,६४६ |
| इतर देशी संस्थानें | २८,७२८ | २१,४७४ | २२,६१६ |
| एकूण | ६५१,०३६ | ५५०,९१४ | ५०३,३२४ |

### हिंदी कपाशीची निर्गत

| १ सप्टेंबर ते ३१ ऑगस्ट | हजार गाठी (प्रत्येकी ४०० पौंड) |
|---|---|
| १९३६-३७ | ४,२१५ |
| १९३७-३८ | २,०५३ |
| १९३८-३९ | ३,२७४ |
| १९३९-४० | २,३४० |
| १९४०-४१ | २,०१३ |

### हिंदी संस्थानांतील जॉइंट स्टॉक बँका

हिंदुस्थानांत एकूण २१५ संस्थानें व ३२७ जहागिरी आहेत व त्यांनीं हिंदुस्थानाचा एक तृतीयांश भाग व्यापला आहे. ह्या संस्थानांपैकी कांहीं अगदींच लहान, तर कांहीं थोडी इटली अथवा ग्रेटब्रिटनएवढीं मोठीं आहेत. सर्व संस्थानांत मिळून ८०० गांवें व १,८७,००० खेडीं आहेत. त्यांपैकी फक्त १२८ गांवांत बँका आहेत व त्यांची संख्या २४१ आहे. म्हणजे, प्रत्येक ३,३७,००० लोकसंख्येस एक बँक असें प्रमाण पडतें. ब्रिटिश हिंदुस्थानांत तें १,४८,००० लोकवस्तीस एक बँक, असें आहे. हैद्राबाद, म्हैसूर, त्रावणकोर, कोचीन व बडोदें ह्या प्रगतिपर संस्थानांत मिळून १९५ बँका आहेत. म्हणजे बाकीच्या सर्व संस्थानांत मिळून फक्त ४६ बँका आहेत. त्रावणकोरमध्यें सर्वांत ज्यास्त बँका आहेत, त्याचे खालोखाल कोचीन व म्हैसूर हीं येतात. कोचीनमध्यें प्रत्येक २४,००० लोकसंख्येस एक बँक, असें प्रमाण पडतें. बडोद्यांत एकच बँक आहे, मात्र तिच्या शाखांचें जाळें त्या संस्थानाच्या १७ प्रमुख ठिकाणीं पसरलेलें आहे.

#### बँकांची संख्या

| संस्थान | बँका | संस्थान | बँका |
|---|---|---|---|
| त्रावणकोर | ६४ | पदुकोटा | ४ |
| कोचीन | ५० | ग्वाल्हेर | ३ |
| म्हैसूर | ४५ | राजकोट | ३ |
| बडोदें | १८ | पतियाळा | २ |
| हैद्राबाद | १८ | जयपूर | २ |
| काश्मीर | ८ | सांगली | २ |
| इंदूर | ४ | मिरज | २ |
| | | इतर | १२ |
| भोपाळ | ४ | एकूण | २४१ |

भावनगर, नवानगर, पोरबंदर, अलवार, मलेरकोटा, औंध, मणिपूर, जोधपूर, कपूरथळा, मयूरभंज, नाभा व प्रतापगड ह्या संस्थानांत प्रत्येकी एक बँक आहे. एकूण २४१ बँकांपैकीं १२२ शेड्यूल्ड बँकांच्या शाखा आहेत. एकट्या इंपीरिअल बँकेच्या, संस्थानी हद्दींत ३३ शाखा आहेत. एक्सचेंज बँकांपैकी लॉइड्स बँकेच्या गुलमार्ग व श्रीनगर येथें शाखा आहेत. काश्मीरला येणाऱ्या युरोपियन प्रवाशांची सोय मुख्यतः त्या पहातात. सेंट्रल बँकेच्या १६ शाखा संस्थानांत आहे, त्यांपैकी ११ शाखा हैद्राबाद संस्थानांत आहेत. त्रावणकोर, कोचीन व म्हैसूर येथें बिगर-शेड्यूल्ड बँकांची गर्दी विशेष आढळते. हिंदी संस्थानांत काम करणाऱ्या ११९ बिगर-शेड्यूल्ड बँकांपैकी १०३ बँका ह्या तीन संस्थानांत आहेत.

## स्फुट-विचार

### कृत्रिम रबर

मलायासारख्या देशांतून झाडांच्या चिकापासून उत्पन्न होणाऱ्या रबराच्या पुरवठ्याचा तुटवडा पडल्यास कृत्रिम रीतीनें तो पदार्थ तयार करण्याची व्यवस्था अमेरिकेंत मोठ्या प्रमाणांत झाली आहे. युद्धामध्यें अनेक कामांसाठी, विशेषतः मोटारींच्या चाकांकरितां रबर अत्यावश्यक आहे आणि इतर लढाऊ सामानांप्रमाणें त्याचा भरपूर पुरवठा होणें अगत्याचें आहे. नैसर्गिक रीतीनें झाडांच्या चिकापासून मिळणारें कच्चें रबर हवें तितकें उपलब्ध न झाल्यास आधुनिक शास्त्रांच्या सहाय्यानें तें कारखान्यांत बनवण्याची तयारी झाली आहे. हल्लीं कोळशापासून तेल तयार करण्याची युक्ती ज्याप्रमाणें निघाली आहे त्याचप्रमाणें तेलापासून रबर करण्याची योजना यशस्वी झाली आहे. ह्या कृत्रिम रबरांत नैसर्गिक रबराचे सर्व गुणधर्म आहेत; आणि त्याचा उपयोग झाडापासून निघणाऱ्या रबराप्रमाणें सर्व बाबतींत होतो असें आढळून आलें आहे. युद्धसामुग्रीप्रीत्यर्थ जेवढें लागेल तेवढें रबर कृत्रिम रीतीनें बनवण्याचें सामर्थ्य असलेले कारखाने अमेरिकेंत चालू झाले आहेत. रबराच्या पुरवठ्याची इंग्लंडमध्यें सरकारनें केलेल्या व्यवस्थेची हाउस ऑफ कॉमन्समध्यें नुकतीच चर्चा झाली. रॉकेल तेलापासून कृत्रिम रबर बनवलें जात असल्यानें तेलाच्या पुरवठ्याशेजारीच ह्या रबराचे कारखाने असणें युक्त आहे; म्हणून ब्रिटिश सरकारानें अमेरिकेशीं ह्या बाबतींत व्यवस्था करून इंग्लंडमध्यें निराळे कारखाने काढलेले नाहींत असें टीकाकारांस सांगण्यांत आलें. जुन्या रबरी सामानाचा उपयोग नवीन रबराचीं चाकें वगैरे बनवण्याकडे सरकारनें करावा अशी सूचना त्यांनीं केली होती. परंतु नवें कच्चें रबर मिश्रित करूनच हा धंदा चालवतां येत असल्यानें इंग्लंडमध्यें तो मर्यादित प्रमाणांतच होणें शक्य आहे असाहि खुलासा करण्यांत आला. रद्दी झालेला रबराचा माल अमेरिकेस पाठवून तिकडून कच्चें रबर आणणें आणि त्याचाच ब्रिटिश कारखान्यांत उपयोग करणें श्रेयस्कर आहे असें सरकारच्या वतीनें मि. हॅरोल्ड मॅकमिलन ह्यांनीं कॉमन्स सभेंत सांगितलें आणि रबर कंपन्यांच्या स्वार्थाचा ह्या व्यवस्थेशीं संबंध नाहीं अशी टीकाकारांची खातरजमा केली.

---

### ऊस आणि साखर

संयुक्त प्रांत व बिहार येथील साखरेच्या कारखानदारांस लागणारा ऊस शेतकऱ्यांकडून विकत घ्यावा लागत असल्याकारणानें उसाच्या किंमती ठरवण्यांत नेहमीं बांधा उपस्थित होतो. शेतकऱ्यांस आपल्या मालाची योग्य किंमत मिळावी आणि ती कारखानदारांस तोट्याची होऊं नये ह्या बेतानें उसाचे भाव सरकारकडून ठरवले जातात. पण त्या किंमतीचा हिशेब कसा व्हावा ह्याविषयीं मतभेद उत्पन्न होतात आणि कारखानदार व शेतकरी ह्यांच्या मागण्यांचा मेळ घालणें अवघड होतें. संयुक्त प्रांतांत उसाची किंमत दर मणी पांच आणे ठेवण्यांत आली आहे; आणि साखरेची किंमत दर मणी नऊ रुपये बारा आणे धरून तिच्या प्रमाणांत तो दर सरकारनें निश्चित केला आहे. साखरेचे भाव हंगामांत चढतील तर त्या मानानें जादा किंमत शेतकऱ्यांस शेवटीं मिळावी अशी योजना आखण्यांत आली आहे. दर मणी नऊ रुपये बारा आणे ही साखरेची हिशेबासाठीं धरलेली किंमत फार कमी आहे आणि साखरेचे भाव बारा रुपये मणाच्या वरहि जातील असें ऊस पिकविणाऱ्या शेतकऱ्यांचें म्हणणें आहे. साखरेची किमान किंमत दरमणी सव्वा अकरा रुपये धरण्यांत यावी आणि तिच्या मानानें उसाची किंमत दरमणी सहा आणे नऊ पै ह्या भावानें देण्यांत यावी अशी त्यांची मागणी आहे. हिशेबासाठीं धरलेली आणि हंगामांत प्रत्यक्ष व्यवहारांत येणारी सरासरीची साखरेची किंमत ह्या दोहोंतील फरक एक रुपयापेक्षा अधिक असूं नये; असें झाल्यानें हंगामाचे अखेर मिळणाऱ्या जादा रकमेचा मोठा भाग शेतकऱ्यांच्या पदरांत उसाच्या विक्रीच्या वेळीं पडून त्यांस त्यासाठीं निष्कारण वाट पहावी लागणार नाहीं असा त्यांचा मुद्दा आहे. शेतकऱ्यांच्या म्हणण्यांत पुष्कळ सयुक्तिकपणा आहे आणि साखरेच्या किंमती त्यांच्या अंदाजाप्रमाणें रहाण्याचा संभव असल्यास सरकारनें त्यांच्या बाजूचा सहानुभूतिपूर्वक विचार करणें आवश्यक आहे. साखरेच्या किंमतीवर उसास द्यावयाच्या किंमती अवलंबून ठेवण्याचें तत्त्व योग्य असून तें एकदा मान्य झाल्यावर कारखानदारांसहि शेतकऱ्यांच्या मागणीचा अव्हेर करतां यावयाचा नाहीं. कारखानदारांस योग्य नफा आणि शेतकऱ्यांस उसाची योग्य किंमत ह्यांचा मेळ घालणें अवघड असलें तरी तो शक्य तितक्या कसोशीनें घातला जाऊन प्रस्तुत बांधा मिटवणें हेंच सर्वांस श्रेयस्कर आहे.

---

### साखरेच्या कारखानदारांच्या तक्रारी

संयुक्तप्रांत व बिहार ह्या प्रांतांतील ऊस पिकवणाऱ्या शेतकऱ्यांचीं गाऱ्हाणीं व सूचना ह्यांची माहिती वर दिली आहे. ह्या प्रांतांतील सरकारांच्या धोरणासंबंधानें साखर-कारखानदारांच्याहि तक्रारी आहेत. त्यांचें म्हणणें असें आहे कीं १९४०-४१ च्या हंगामांत उसाचें चांगलें पीक आलें होतें त्यावेळीं सरकारांनीं कारखान्यांस भरपूर ऊस गाळूं दिला नाहीं. साखरेचें उत्पादन प्रमाणाबाहेर जाऊन तिचे बाजारभाव पडूं नयेत ह्या उद्देशानें त्यांनीं हें केलें असेल. तथापि, जादा माल तयार होईल तो मागुली मालाचा उठाव होईपर्यंत आपण विक्रीकरितां बाहेर काढणार नाहीं असें सरकारांस कारखानदारांनीं आश्वासन दिलें होतें असें ते म्हणतात. ह्या धोरणामुळें बराचसा ऊस गाळला गेला नाहीं आणि त्याचा नाश झाला. यंदाच्या हंगामांत मागील अनुभवामुळें शेतकऱ्यांनीं कमी ऊस केला आणि पाऊसहि वेळेस पडला नाहीं ह्यामुळें पिकाखालील क्षेत्र घटलें आहे. असें असूनहि सरकारांनीं कारखाने लवकर चालू होऊं दिले नाहींत आणि साखरेच्या उत्पादनास मर्यादा घातली. ह्याचा परिणाम असा झाला आहे कीं उसाचा तुटवडा चोहोंकडे भासत आहे आणि सरकारांनीं ठरवून दिलेलें मर्यादित उत्पादन साखर-कारखान्यांत होईल कीं नाहीं ह्याची शंका उत्पन्न झाली आहे. गेल्या वर्षीं शिलकी साखर पडून होती तेव्हां तिची निर्गत हलक्या किंमतीनेंहि होऊं शकली नाहीं. चालू वर्षीं उत्पादनाचा खर्च व योग्य नफा ह्यांवर आधारलेल्या किंमतीनें निर्गतीसाठीं साखर घेण्याचा सरकारचा विचार आहे असें समजतें. पण यंदा साखरेचें उत्पादन कमी होणार असल्यानें ह्या निर्गतीचा विशेष उपयोग कारखानदारांस होण्यासारखा आहे असें दिसत नाहीं. तेव्हां हिंदी साखरेचें उत्पा-

वन किती होईल आणि तिच्या किंमती काय रहातील ह्याचा हिशेब झाला पाहिजे. पुरवठा बेताचा असून मालाची निर्गत होईल तर साखरेच्या किंमती चढतील आणि जनतेस महागाईचा बोजा सहन करावा लागेल. युद्धपारीस्थितींत बाहेरची साखर हिंदुस्थानांत तर येणार नाहींच, पण हिंदी साखरेस बाहेरची मागणी येऊन तिची निर्गत व्हावी लागेल. ह्या दृष्टीनें देशी साखरेचा पुरवठा व त्याच्या किंमती ह्यांच्या विषयींच्या प्रश्नाचा विचार होणें इष्ट आहे. स्वदेशी साखरेपैकीं दोनतृतीयांशाइतका माल संयुक्तप्रांत व बिहार ह्यांमध्यें तयार होतो आणि तेथील उसाच्या व साखरेच्या धंद्यांची घटना विशिष्ट प्रकारची आहे. ह्या कारणांनीं त्या प्रांतांतील सरकारांस ह्या धंद्याचें नियमन करावें लागत आहे. तथापि, इतर प्रांत व संस्थानें ह्यांमध्यें साखरेचा धंदा स्थापन झाला आहे आणि त्याचा विस्तार होत आहे ही गोष्टहि हिशेबांत घेतली जाणें आवश्यक आहे.

---

## सिंगापूर

पश्चिम आणि दक्षिण पॅसिफिक महासागराच्या नकाशाकडे नजर फेकली असतां मोक्याचें ठिकाण ह्या नात्यानें सिंगापूर बेटाचें महत्त्व काय आहे ह्याची तात्काळ कल्पना येईल. बंगालचा उपसागर, हिंदुस्थानचा पूर्वकिनारा व ब्रह्मदेश ह्यांच्याशीं समुद्रानें वळणवळण होण्याच्या मार्गावर अत्यंत नाजूक ठिकाणीं सिंगापूर वसलेलें आहे. त्याचें हें महत्व ओळखून ब्रिटिशांनीं आपल्या पूर्वेकडील आरमाराचें सिंगापूर हें मुख्य केंद्र केलें आणि त्याची तटबंदी भरभक्कम होईल अशी व्यवस्था केली. सिंगापूरचें लष्करी महत्व काय आहे ह्याची पूर्ण जाणीव जपानला अर्थातच होती आणि आहे. युद्धांत जपाननें उडी टाकली तेव्हां सिंगापूरच्या रक्षणाकडे ब्रिटिशांनीं विशेष लक्ष दिलें. परंतु जपाननें एकाच वेळीं चोहोंबाजूंनीं अमेरिकेचे, ब्रिटिशांचे व डच ईस्ट इंडीजमधले प्रदेश ह्यांचेवर हल्ले चढवण्याचा क्रम चालू केला आणि मलाया हळुहळु व्यापून रंगूनच्या दिशेनें आपला मोर्चा वळवला, तेव्हां सिंगापूरच्या रक्षणाचा प्रश्न बिकट झाला. त्या बेटाच्या भोंवतालचा समुद्र आणि विमानगृहें जपाननें आपल्या वर्चस्वाखालीं आणलीं आणि त्यास घेरण्याचा घाट घातला. सिंगापूरला चोहोंबाजूंनीं वेढा घालून त्याची उपासमार करणें किंवा त्याच्यावर सरळ हल्ले चढवून तें बेट काबीज करण्याचा प्रयत्न करणें हे दोन मार्ग जपानी सेनानींच्या पुढें आहेत. त्यांपैकीं कोणता स्वीकारला जातो हें समजणें कठीण असल्यामुळें सिंगापूरच्या संरक्षकांनीं त्या दोहोंसहि तोंड देण्याची तयारी ठेवली आहे. सिंगापूरच्या लष्करी व बिनलष्करी लोकांचा करारीपणा कौतुकास्पद आहे. त्यांस लढाऊ मदत पाठवण्याची शिकस्त केली जात आहे आणि त्यांस उत्तेजनपर संदेश पाठवण्यांत येत आहेत. विमानी दलाची कुमक सिंगापूरला जसजशी अधिकाधिक जाऊन पोहोंचेल तसतसें त्या बेटाच्या संरक्षकांचें बळ वाढत जाईल हें उघड आहे. कांहीं झालें तरी सिंगापूर सोडावयाचें नाहीं हा ब्रिटिश सेनानींचा निश्चय प्रसिद्ध झाला असून त्यांत यश येण्यासाठी शक्य त्या सर्व उपायांची योजना केली जात आहे.

---


८ वा आठवडा

संगम

दोन प्रणयी जीव—
गैरसमजुतीमुळें दूर झाले तरी पुन्हां एकत्र कसे आले त्याची नाविन्यपूर्ण कथा

: निर्माते :
विनायक

उत्कृष्ट भूमिका : गोड संगीत

नवयुगचें प्रभावी चित्र

मिनर्व्हा-पुणें

नवयुग चित्र

रोज : ६॥ व १०
शनि. रवि. सोम. जादा खेळ ३। वा.


## नोटीस

### दि बँक ऑफ महाराष्ट्र, लिमिटेड

नोटीस देण्यांत येते कीं, बँकेच्या भागीदारांची सातवी साधारण सभा रविवार ता. २२ फेब्रुवारी १९४२ रोजीं सायंकाळीं ४ वाजतां ( स्टँ. टा. ) बँकेचे रजिस्टर्ड ऑफिस, काकाकुवा मॅन्शन, लक्ष्मी रोड, पुणें शहर, या ठिकाणीं खालील कामासाठीं भरेल.

( १ ) बँकेचा ता. ३१ डिसेंबर १९४१ अखेरचा ताळेबंद, नफातोटापत्रक, आणि डायरेक्टर बोर्डाचा व ऑडिटर्सचा रिपोर्ट यांचा विचार करणें.
( २ ) * डिव्हिडंड मंजूर करणें.
( ३ ) निवृत्त होणाऱ्या ( फेरनिवडणुकीस पात्र असलेल्या ) तीन डायरेक्टरांचे जागीं डायरेक्टरांची निवडणूक करणें.
( ४ ) ऑडिटर्स नेमणें व त्यांचा मुशाहिरा ठरविणें.
( ५ ) अध्यक्षांचे परवानगीनें पुढें येणारीं इतर कामें.

बोर्डाच्या हुकुमावरून
पुणें शहर | एम्. व्ही. गोखले,
ता. २८-१-१९४२ | मॅनेजर.

---

वि. सू.—बँकेची शेअर-ट्रॅन्स्फर बुकें ता. २०-२-४२ ते २७-२-४२ ( दोन्ही दिवस धरून ) बंद राहतील.

* डिव्हिडंड मंजूर झाल्यानंतर तें शुक्रवार ता. १३ मार्च १९४२ पासून दिलें जाईल. डिव्हिडंड वॉरंट्स भागीदारांच्या नोंदलेल्या पत्त्यावर टपालानें पाठविलीं जातील. पत्ता बदलला असल्यास बँकेकडे सत्वर कळवावें.

## डिसेंबर महिन्यांतील आर्थिक उलाढाली

(१)

जिनसांचा साठा कमी झाला असतां नवीन पुरवठा न होतां मागणी मात्र कायम रहाणें व तातडीची होणें ह्या प्रकारच्या अडचणी व्यापाऱ्यांसहि भासतात, त्या बाजारभावांचें नियंत्रण करणाऱ्या अधिकाऱ्यांनीं हिशेबांत घेतल्या पाहिजेत. निरनिराळ्या जिनसांच्या खरेदीविक्रीचा धंदा करणारांचीं व्यापारी मंडळें आहेत, त्यांनीं व इतर व्यापाऱ्यांनीं आपल्या व्यवहारांतल्या अडचणी अधिकाऱ्यांपुढें मांडल्या असतां त्यांचें निराकरण होण्याचा प्रयत्न अवश्य केला जाईल असें आश्वासन त्यांस सरकारच्या वतीनें देण्यांत आलें आहे. रेल्वेजच्या वाघिणींवर सध्यां वहातुकीचा विलक्षण ताण पडत आहे आणि त्यांमधून मुंबईसारख्या शहरांत दुरून माल येण्याची व्यवस्था झाल्यावांचून महागाईचा प्रश्न सुटावयाचा नाहीं. वास्तव रेल्वेज, बाजारभावांचें नियंत्रण करणारे अधिकारी व मालाची घाऊक व किरकोळ खरेदी-विक्री करणारे व्यापारी आणि दुकानदार ह्यांचें पूर्ण सहकार्य होणें अगत्याचें आहे. ह्या तीन पक्षांनीं बाजारभाव शक्य तितके स्थिर व बेताचे ठेवण्याचें महत्त्व ध्यानांत वागवल्यास ह्या प्रकारचें सहकार्य होण्यास अडचण पडूं नये. ब्रह्मदेशांतला तांदूळ इकडील बाजारांत विशिष्ट प्रमाणांत येऊन विकल्यावांचून त्याच्या किंमतींत समतोलपणा उत्पन्न व्हावयाचा नाहीं हें लक्षांत घेऊन रंगूनच्या तांदुळाचा पुरवठा वाढवण्याची तजवीज केली जात आहे. ब्रह्मदेशचा हिंदुस्थानाशीं तांदुळाचा व्यापार चालतो. त्याच्या व्यवस्थेबाबत ब्रह्मी सरकारनें एक नवीन योजना अमलांत आणण्याचें ठरवलें होतें. ती व्यवस्था आपणांस जाचक होणार असल्याविषयीं हिंदी व्यापाऱ्यांनीं तक्रार केली होती. हिंदुस्थान सरकारनें तो प्रश्न हातीं घेऊन त्यासंबंधांत ब्रह्मदेशाच्या सरकाराशीं बोलणीं चालवलीं होती. त्यांचा परिणाम ब्रह्मी तांदुळाच्या व्यापार-व्यवस्थेंत इष्ट सुधारणा घडून येण्यांत झाला असल्याची बातमी नुकतीच प्रसिद्ध झाली, ती अत्यंत समाधानकारक आहे.

चालू युद्धानें सबंध जगास आतां व्यापून टाकलें आहे आणि पूर्व एशिया खंड त्यापासून अलिप्त होतें तेहि आतां विस्तृत रणक्षेत्र बनलें आहे. लढाऊ सामुग्रीची बनावट व पुरवठा, हीं मामुली वहातुक व विनिमय ह्यांस जरूरीप्रमाणें मुरड घालूनच निश्चित केलीं जाऊन बदलत्या युद्ध-धोरणाप्रमाणें उद्योगधंदे व व्यापार ह्यांची घडी प्राप्त परिस्थितींत सरकारास बसवावी लागते. युद्ध काळांत जनतेच्या रोजच्या जीवनास आवश्यक असलेल्या जिन-सांस असलेली मागणी व त्यांचा पुरवठा ह्यांचा मेळ घातला जाऊन त्यांच्या किंमती अमर्यादपणानें चढणार नाहींत ह्याविषयीं खबरदारी घ्यावी लागते. ती न घेतली गेल्यास बाजारभावाच्या वाढीस अंत न राहून समाजांत आर्थिक गोंधळ माजण्याची भीति असते. पदार्थांचे भाव चढले म्हणजे लोकांची रहाणी महा-गाईची होते आणि रहाणी महागली म्हणजे मजुरीचे दर व प्राप्ति ह्यांत वाढ व्हावी अशी सार्वत्रिक मागणी उत्पन्न होते. ही मागणी पुरी व्हावयाची म्हणजे उत्पादनाचा खर्च वाढणें अपरिहार्य आहे आणि उत्पादनाच्या खर्चांत वाढ झाली असतां पदार्थांच्या किंमती चढणें क्रमप्राप्तच होतें. महागाई आणि मजुरींत व प्राप्तींत वाढ ह्यांचा याप्रमाणें शिवाशिवीचा खेळ चालतो, तो आर्थिक व्यवहाराच्या व जीवनाच्या चालू घडीस विघातक होतो. विशिष्ट पदार्थांच्या किंमती, त्यांच्या विषयींच्या मागणी-पुरवठ्याचा मेळ घालून कांहीं मर्यादेंत निश्चित करतां येतात. पण चलनाच्या म्हणजे पदार्थ विकत घेण्याच्या जनतेच्या शक्तीचा विस्तार युद्ध-परिस्थितींत होतो तेव्हां मालाच्या मर्यादित पुरवठ्यामुळें किंमती एकंदरीनें चढण्याची प्रवृत्ती निर्माण होते. जिनसांचा पुरवठा मर्यादित पण चलन म्हणजे क्रयशक्ति वाढलेली, अशा स्थितींत बाजारभाव चढणीस लागणें सहाजिक आहे. एवढ्यासाठी व्हाइसरॉय साहेबांनीं कलकत्ता येथें असोसिएटेड चेंबर्स ऑफ कॉमर्सच्या वार्षिक सभेंत केलेल्या आपल्या भाषणांत भयसूचना दिली तिच्याकडे लक्ष देणें आवश्यक आहे. हातांत येणाऱ्या सबंध क्रयशक्तीचा उपयोग करून मालाच्या मर्यादित पुरवठ्यावर ताण पाडूं नये आणि त्या शक्तीपैकीं कांहीं राखून ठेवून लोकांनीं ती सरकारी रोख्यांत किंवा पोस्ट ऑफिसमधील ठेवींत गुंतवावी अशी लॉर्ड लिनलिथ्गो त्यांनीं सूचना केली. तिच्याप्रमाणें वागून बाजारभावांतील वाढ थांबवण्यास मदत करणें सर्वांच्याच हिताचें आहे. स्वतःचा चालू खर्च मर्यादित करण्याची ज्यांस सवड आहे, त्यांनीं काटकसर केल्यास महागाईचें एक प्रमुख कारण मुळांतच नाहींसें करण्याचें श्रेय त्यांस मिळणार आहे.

---

### श्रीखंडोबाचे यात्रेनिमित्त शेतकी प्रदर्शन

चंदनपुरी ( ता. मालेगांव, जि. नाशिक ) येथें २-१-४२ ते ५-१-४२ अखेर शेतकी प्रदर्शन भरविण्यांत आलें होतें, त्यांत मालेगांव ता. को. सु. यूनियन लि. मार्फत एक सहकारी विभाग ठेवण्यांत आला होता.

प्रदर्शनामध्यें निरनिराळ्या खात्यांमार्फत विभाग मांडण्यांत आले होते. सहकारी विभागामध्यें शेतकऱ्यांची कर्जबाजारी-पणाचीं कारणें दाखवून त्यांना सहकारी सोसायट्यांमार्फत कर्ज-मुक्त कसें होतां येईल आणि त्यांच्या निरनिराळ्या गरजा भागून ते कसे सुखी होतील हें सचित्र तक्ते, नकाशे, इत्यादिकांचे द्वारें शेतकऱ्यांना सहज समजेल अशा सोप्या भाषेमध्यें त्याची रचना करण्यांत आली होती. त्याचप्रमाणें नवीनच स्थापन झालेल्या मुंबई मार्केटिंग को-ऑपरेटिव्ह सोसायटीच्या माहितीचा सचित्र तक्ता, तिचे उद्देश व त्यापासून शेतकऱ्यांचे होणारे फायदे दाखविण्यांत येऊन त्या सोसायटीबाबत प्रचार करण्यांत आला. औद्योगिक सहकारी मंडळ येवला व मालेगांव यांनीं हातमागा-वरील निवडक व उत्तम उत्तम नमुने प्रदर्शनांत मांडून सहकारी विभागास अधिक शोभा आणली होती.

सहकारी विभागांत औद्योगिक सहकारी मंडळ येवला व माले-गांव यांना असि. कलेक्टर, मालेगांव भाग यांनीं चांदीचीं पदकें व सहकारी विभागांत भाग घेतलेल्या इतर निरनिराळ्या लोकांना सर्टिफिकिटें दिलीं. हीं मिळालेली सर्टिफिकिटें डेप्युटी रजिस्ट्रार को-ऑपरेटिव्ह सोसायटीज पुणें यांचे हस्तें वाटण्यांत आलीं.

---

### प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांचें टपाल

प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांस दररोज ३॥ ते ४ हजार पत्रें येतात.

### उत्तर ध्रुवावरील 'दिवस'

उत्तर ध्रुवावर आपण राहिलों, तर २१ मार्चला सूर्य उगवेल तो २३ सप्टेंबर रोजीं मावळलेला दिसेल.

महायुद्ध दाराशीं आलें
परदेशी औषधें
दुर्मिळ व महाग झालीं

पण

भिण्याचें कारण नाहीं !!!

— कारण —

आयुर्वेद रसशाळा पुणें लि०
या देशी औषधाच्या मसिद्ध कारखान्यानें तयार केलेलीं

● रक्तवर्धक, ● उपनाह,
● बालजविन, ● कॅल्सीप्राल

इत्यादि पेटंट, स्टँडर्ड व लोकप्रिय औषधें खात्री पटल्यामुळें

★ डॉक्टर्सहि वापरूं लागले आहेत. ★

दरसाल विनचूक नफा वाटणाऱ्या ह्या कंपनीचे शेअर्स व औषधें मागवा.

आयुर्वेद रसशाळा पुणें लि०
मुख्य दुकान गणपति चौक, लक्ष्मीरोड, पुणें २.



सर्व तऱ्हेची कापड छपाई व रंगाई (Calico Printing and Dyeing) करणारा कारखाना.

'पायोनियर डाइंग हाऊस'

कोचाचें कापड (Casement cloth), दाराचे पडदे, टेबल कव्हर इ. टिकाऊ रंगाचे, स्वदेशी तयार मिळतात. कारखाना:—
भिकारदास मारुती रोड, दातेवाडी, पुणें.



महाराष्ट्रांत लेखी गॅरंटीसह टिकाऊ व मनपसंत
साईन-बोर्डस्, रबरी शिक्के,
आकर्षक
सिनेमा स्लाइडस् व पिक्चर पेंटिंग
सतत २० वर्षे विश्वसनीय व वेळेवर मिळण्याचें
एकच ठिकाण

पेन्टर ए. जी. वेडेकर
(मराठी वळणाचे स्पेशॅलिस्ट)
बुधवार चौक, पुणें २ (सिटी)
बाहेरगांवचीं कामें व्यवस्थित व वेळेवर पाठवूं.



कॉमनवेल्थचा वैभवशाली विस्तार

★ २७ हजारांवर पॉलिसी–होल्डर्स
★ एकूण चालू विमे २ कोटीचेवर
★ दोन हजारांहून अधिक कार्यकर्ते निरनिराळ्या प्रांतांत कॉमनवेल्थसाठी उत्साहानें काम करीत आहेत.



हेड ऑफिस बिल्डिंग

कॉमनवेल्थ
ॲशुअरन्स कंपनी लि.

चेअरमन
● रा. ब. एम्. एन्. मेथा, C. I. E., M. B. E.

ॲक्टिंग ऑफिस सुपरिन्टेंडेंट ● एम्. एन्. भागवत, B. A.

'कॉमनवेल्थ' ची पॉलिसी घेऊन जीवन निश्चिंत व सुखी करा.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद् वामन् काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. १२७।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
(टपाल हंशील माफ)
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ८ पुणें, बुधवार, तारीख १८ फेब्रुवारी, १९४२ अंक ७

## न्यायमूर्ति रानड्यांचे
## तीन अप्रसिद्ध लेख प्रसिद्ध झाले

**PLEA FOR PROTECTIONIST POLICY**

**INDIAN SUGAR INDUSTRY**

न्यायमूर्ति रानडे यांनीं १८९९ सालीं 'टाइम्स ऑफ इंडियांत' स्वदेशी साखरेच्या धंद्यासंबंधीं लिहिलेले महत्त्वाचे तीन लेख, प्रो. वा. गो. काळे यांच्या प्रस्तावनेसह प्रसिद्ध करण्यांत आले आहेत.

व्यवस्थापक, 'अर्थ', पुणें ४

ह्या पत्त्यावर आठ आण्यांचीं तिकिटें पाठवून लेखांची प्रत मागवावी.

## श्रीराम सिल्क मिल्स लि., बंगलोर

[कंपनीनें १९४० अखेर ६ टक्के डिव्हिडंड वांटला आहे.]

युद्धसाहित्यपुरवठा–खात्याची पॅरेशूटकरितां लागणाऱ्या रेशमी कापडाची ऑर्डर पुरी करण्यासाठी लागणाऱ्या भांडवलाकरितां तूर्त एकूण रु. १ लक्षाच्या रकमेपर्यंत

## ठेवी घेणें आहेत

व्याजाचा दर ४॥ तें ६ टक्के. ठेव किमान रु. ५०० ची असावी. ठेवीवरील व्याज दर सहा महिन्यांनीं दिलें जातें.

श्रीराम सिल्क मिल्स लि.,
श्रीरामबाग,
बसवनगुडी, बंगलोर.

नारायण गोविंद नाईक,
(माजी अध्यक्ष, म्हैसूर चेंबर ऑफ कॉमर्स) मॅनेजिंग डायरेक्टर

आमच्या कारखान्यांतील माल मुंबईस बॉम्बे स्वदेशी को–ऑपरेटिव्ह स्टोअर्समध्यें व पुण्यास लक्ष्मी रोडवरील रे म्यूझिअमच्या व्यापार–संवर्धन–गृहांत पहा.

## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

## वक्तशीर आणि मनपसंत काम करून देणारे
## मोहन वॉच कंपनी

रेग्युलेशन मोफत

कॉमनवेल्थ बिल्डिंगसमोर लक्ष्मी रोड, पुणें २.

**महायुद्धाची जाणीव!** कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर

# महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

## विविध माहिती

### पॅसिफिकमधील १,४०० बेटें

महायुद्धांतील पराभूत राष्ट्रांकडून काबीज केलेल्या देशांची व्यवस्था राष्ट्रसंघानें आपल्या २२ व्या कलमानुसार केली. पॅसिफिक महासागरांतील विषुववृत्ताच्या उत्तरेकडील १४०० जर्मन बेटें त्या व्यवस्थेप्रमाणें जपानचे देखरेखीखाली आलीं. ह्या बेटांची लोकसंख्या अर्धालाख व क्षेत्रफळ ८५६ चौ. मैल भरतें. जपाननें राष्ट्रसंघाचें सभासदत्व सोडलें तरी त्या बेटांवरील आपली सत्ता सोडली नाहीं. जिंकित मुलुखांतील लोकांच्या झालेल्या कमीजास्त सुधारणानुसार त्यांचे प्रतवार तीन गट करण्यांत आले. क (कनिष्ठ) वर्गांतील प्रदेशांची व्यवस्था प्रत्यक्ष व्यवहारांत काबीज केलेल्या देशांप्रमाणेंच करण्यांत येत असते. पॅसिफिकमधील जर्मन बेटें क वर्गांतच आहेत.

### पेपर अँड पल्प कन्व्हर्शन्स लि.

वरील नांवाची १ लक्ष रुपये भांडवलाची खासगी लिमिटेड कंपनी पुणें येथें नोंदण्यांत आली आहे. कागद, कागदाचा रांधा इत्यादींपासूनच्या जिनसांचें उत्पादन व विक्री करण्याचा तिचा उद्देश आहे. पारसे आणि कंपनी तिचे मॅनेजिंग एजंट्स आहेत.

### दातांचें आरोग्य

मुंबई शहरांतील सुमारें ५ हजार विद्यार्थ्यांच्या दातांची वैद्यकीय तपासणी बॉंबे प्रेसिडेन्सी डेंटल असोसिएशननें नुकतीच केली, तींत असें आढळून आलें कीं शेकडा ५०% विद्यार्थ्यांचे दांत किडलेले आहेत. शेंकडा १० सुद्धां विद्यार्थी आपले दात दररोज स्वच्छ करीत नाहींत व शेकडा ६० विद्यार्थी आपले दात कधीच घुवत नाहींत.

### सिंध युनिव्हर्सिटी

सिंधकरितां स्वतंत्र विश्वविद्यालय काढावें, अशी शिफारस त्या संबंधांत चौकशी करण्याकरितां तेथील सरकारनें नेमलेल्या कमिटीनें केली आहे. विद्यार्थी शारीरिक परीक्षेंत पास झाल्याविना त्यांस विश्वविद्यालयाची परीक्षा देतां येऊं नये, अशीहि कमिटीची शिफारस आहे.

### चिनी रिझर्व्ह बँक

सेंट्रल बँक ऑफ चायना, बँक ऑफ चायना, बँक ऑफ कम्युनिकेशन्स व फार्मर्स बँक ऑफ चायना ह्या चार चिनी सरकारी बँकांचें एका रिझर्व्ह बँकेंत रूपांतर करावें, असें मत चिनी प्रमुख आर्थिक पत्रकारांनीं व्यक्त केलें आहे.

### 'क्ष' किरण फोटो

एक्स रे फोटो अधिक चांगले घेण्याची युक्ती कोलंबो येथील रेडिऑलजी खात्याच्या एका अधिकाऱ्यानें शोधून काढली आहे, तिचेमुळें 'क्ष' किरण फोटो अगदीं अचुक मिळूं शकतील, असें प्रसिद्ध झालें आहे.

### रिझर्व्ह बँक कायद्यांत दुरुस्ती

हिंदुस्थान व ब्रम्हदेश ह्यांचेमध्यें तारांची ये-जा वक्तशीर होत नसल्याकारणानें, ब्रम्हदेशांत ज्यांच्या शाखा आहेत, अशा हिंदी बँकांना रिझर्व्ह बँकेकडील जापल्या ठेवींत जरूर तो बदल करणें कठीण पडत आहे व कायद्याप्रमाणें पाठवावयाची माहितीहि धाडणें कठीण जात आहे. ह्यासंबंधांतील कायद्याची अंमलबजावणी सध्याच्या परिस्थितींत स्थगित करण्याची सवड देणारी रिझर्व्ह बँक कायद्यांत दुरुस्ती एका ऑर्डिनन्सद्वारा करण्यांत आली आहे.

### कराची शहराची पाणीपुरवठ्याची योजना

कराची शहरास सिंधू नदीच्या पाण्याचा पुरवठा करणारी १ कोटि ७० लक्ष रुपयांची योजना कराची कॉर्पोरेशनपुढें आहे. कॉर्पोरेशननें सरकारास त्या योजनेचा कांहीं खर्च सोसण्याची विनंति केली आहे व कर्ज उभारावें लागेल, त्याच्या परतफेडीची मुदत ८० वर्षें निदान ६० वर्षे, तरी ठेवण्यास तिनें सरकारची परवानगी मागितली आहे.

### मलायांतील मलेरिया

"एप्रिलपर्यंत मलायांतील एक तृतीयांश तरी जपानी सैनिकांना तेथील मलेरिया ग्रासून टाकील. सिंगापूर जर दोन ते तीन महिने टिकाव धरूं शकलें, तर मलेरियाची मदत आपणांस मिळूं शकेल."—रॉस इन्स्टिट्यूट ऑफ ट्रॉपिकल हायजीनचे डायरेक्टर, सर माल्कम वाटसन, ह्यांचा ताजा अभिप्राय.

### चेक्सची देवघेव

मुंबई बँकर्स क्लिअरिंग हौसमध्यें ६ फेब्रुवारी अखेर संपलेल्या आठवड्यांत २४ कोटि, १२½ लक्ष रुपये किंमतीच्या १,३०,८५० चेक्सची देवघेव झाली.

### म्यूर मिल्स कं. लि.

कानपूर येथील ह्या सुप्रसिद्ध कंपनीला ३१ डिसेंबर, १९४१ अखेर संपलेल्या वर्षी ५ लक्ष, १७½ हजार रुपये नफा झाला. कामगारांस बोनसची, अपेक्षित कराची (२५½ लक्ष रु.), घसाऱ्याची (४½ लक्ष रु.) इत्यादि तरतूद करून हा नफा उरलेला आहे. कंपनीनें गेल्या वर्षी १ कोटि, १७ लक्ष रुपयांचा माल विकला. भागीदारांस २०% डिव्हिडंड व ५% बोनस मिळणार आहे.

### शास्त्रीय विषयांवरील लेख

जगांतल्या वेगवेगळ्या भाषांतील ३३ हजार मासिकांत शास्त्रीय विषयावरील सुमारें ५ लक्ष लेख दरसाल प्रसिद्ध होतात.

### इंपीरिअल बँक ऑफ इंडिया

वरील बँकेचें वसूल भांडवल ५ कोटि, ६२½ लक्ष रुपये आहे व तिचा रिझर्व्ह फंडहि तितकाच आहे. तिचेकडे १०९ कोटि रुपयांच्या ठेवी आहेत. १९४१ च्या दुसऱ्या सहामाहींत तिनें नोकरवर्गास ५३ लक्ष २० हजार रुपये पगार दिला. डायरेक्टर व लोकल बोर्डांचे सभासद ह्यांच्या फीस ६२ हजार रुपये लागले. पोस्टेज व तारांसाठी ३ लक्ष, २७ हजार रुपये व स्टेशनरीकरितां २ लक्ष, ७१ हजार रुपये खर्च आला. भागीदारांस करमाफ १२% डिव्हिडंड मिळालें.

### रक्ताचें दान

एकाद्याचे शरीरांतील रक्ताचा पुरवठा कमी झाला असला, तर दुसऱ्याचें रक्त त्याच्या अंगांत घालतां येतें. मनुष्याच्या रक्ताचे चार प्रकार संभवतात व तें देणारांचें व घेणारांचें रक्त एकाच प्रकारचें असावें लागतें. ह्या संबंधांतील पहिला प्रयोग फ्लॉरेन्स (इटली) येथें १६५४ साली करण्यांत आला, परंतु रक्तांतर ही नित्याची गोष्ट होण्यास विसावें शतक उजाडावें लागलें. आपलें रक्त स्वयंस्फूर्तीनें देणारांची, सुमारें २½ लक्ष लोकांची एक संस्था लंडनमध्यें आहे, तिचे सभासद जाण्यायेण्याच्या खर्चाखेरीज एक पैहि न घेतां, बोलावणें येतांच रक्त देण्यास तयार असतात. जखमी सैनिकांस मोठ्या प्रमाणावर अशा रक्तदानाची आवश्यकता असते व त्याकरितां स्वखुषीनें रक्त देणारांची जरूरी आहे. बंगालच्या गव्हर्नरांनीं आपलें स्वतःचें रक्त देऊं करून ह्या बाबतींत पुढाकार घेतला आहे.

अनुक्रमणिका

| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | ५२ | चलन आणि महागाई— स्वदेशी साखरेच्या कारखान्यातील साखरेचा उतारा— मि. चार्चिल ह्यांचें भाषण— स्वाध्याय मंडळ, औंध— स्व. बा. दि. व. मळजी. | |
| २ बाजारभावांचें नियमन | ५३ | ६ मि. कार्डेल हल ... | ५७ |
| ३ बंगाल प्रांतांतील बिगर-शेड्यूल्ड बँका ... | ५४ | ७ जर्मन इंजिनिअर, डॉ. टॉड | ५७ |
| ४ जपानचें पॅसिफिकमधील आक्रमण ... | ५४ | | |
| ५ स्फुट विचार ... | ५५ | | |

# अर्थ

बुधवार, ता. १८ फेब्रुवारी, १९४२

## बाजारभावांचें नियमन

जनतेस रोजच्या गरजा भागवण्यास लागणाऱ्या जिनसांची महागाई होत आहे, तिला आळा घालण्याची आवश्यकता सर्वांस पटली आहे. व्यापाऱ्यांनीं भरमसाटपणानें किंमती चढवूं नयेत ह्यासाठी बाजारभाव सरकारी अधिकारी ठरवून टाकीत आहेत. मुंबईसारख्या शहरांत निश्चित भावानें जिन्नस विकणारीं दुकानेंहि चालवण्यांत येत आहेत. पण जरूरीच्या जिनसांच्या कमाल किंमती अधिकारी रीतीनें ठरण्यानें हा वाढत्या महागाईचा प्रश्न सुटत नाहीं. निरनिराळ्या बाजारांत माल जाण्याचीं वहातुकीचीं साधनें पुरेशीं नसल्यास नुसत्या किंमती निश्चित झाल्यानें कार्यभाग कसा होणार? ह्या महत्त्वाच्या बाबीकडे हिंदुस्थान सरकारचें लक्ष गेलें आहे ही समाधानाची गोष्ट आहे. बाजारभावांच्या नियमनाचे संबंधांत चर्चा करून कांहीं विधायक योजना आखण्याच्या हेतूनें मध्यवर्ती सरकारच्या विद्यमानें दिल्ली येथें प्रांतिक व संस्थानी सरकारांच्या प्रतिनिधींची परिषद नुकतीच भरली होती, तीमध्यें भाषण करतांना हिंदुस्थान सरकारचे व्यापार मंत्री सर ए. रामस्वामी मुदलियार म्हणाले कीं वहातुकीचीं साधनें अपुरीं राहिलीं आणि त्यामुळें देशाच्या निरनिराळ्या भागांत आवश्यक जिनसांचा पुरवठा व्हावा तसा झाला नाहीं तर बाजारभावांचें नियंत्रण निष्फळ ठरेल आणि म्हणून वहातुकीचीं साधनें व मालाची वाटणी ह्यांकडे सरकारास प्रथम लक्ष पुरवावें लागेल. दिल्ली येथील परिषदेनें अशी सूचना केली आहे कीं जिनसांची वहातुक, पुरवठा व बाजारभाव ह्यां संबंधांतली व्यवस्था लावण्यासाठीं देशाचे निरनिराळे गट करण्यांत यावे आणि त्यांतली सर्व योजना स्थानिक समित्यांवर सोपवली जावी. कोणताहि प्रांत किंवा कोणतेंहि संस्थान जिनसांच्या पुरवठ्याचे बाबतींत स्वयंपूर्ण असूं शकत नाहीं; प्रत्येक क्षेत्रांत कांहीं मालाचा तुटवडा होईल तर इतर जिनसांचा उठाव होणें अवघड पडेल. विशिष्ट जिनसांचे बाबतींत मागणी-पुरवठ्याचा योग्य मेळ घालतां येईल ह्या बेतानें नियोजित समित्यांचीं कार्यक्षेत्रें बनवलीं पाहिजेत आणि त्यांमध्यें जिनसांचे भाव योग्य रीतीनें निश्चित केले गेले पाहिजेत.

निरनिराळ्या क्षेत्रांच्या सीमांवर किंमती काय असाव्या आणि त्यांच्या आंत काय असाव्या हें ठरवावें लागेल आणि सर्व देशभर ज्यांस मागणी आहे अशा जिनसांचे भाव मध्यवर्ती सरकारानें निश्चित करावे लागतील. किंमतींच्या नियंत्रणाबाबतच्या प्रश्नांची चर्चा करण्यासाठी मोठ्या प्रमाणावरील परिषदा वारंवार भरूं शकत नाहींत, परंतु स्थानिक समित्यांची स्थापना झाली म्हणजे त्यांच्या प्रतिनिधींची सभा दर महिन्यास होऊं शकेल असा अभिप्राय व्यापारमंत्र्यांनीं व्यक्त केला. निरनिराळ्या प्रांतांनीं व संस्थानांनीं कांहीं माल साठवून ठेवणें आणि त्याच्या निर्गतीस आपल्या हद्दीच्या बाहेर प्रतिबंध करणें अयोग्य आहे असें परिषदेचें मत पडलें. तथापि, माल ह्याप्रमाणें ठिकठिकाणीं अडकून न रहातां त्याची हालचाल चोहोंकडे होणें अगत्याचें आहे म्हणूनच वहातुकीचीं साधनें पुरवण्याची जबाबदारी मध्यवर्ती सरकारावर येऊन पडते हें उघड असून परिषदेनें ही गोष्ट प्रामुख्यानें पुढें मांडली. मालाची योग्य वांटणी देशाच्या सर्व भागांत प्रमाणशीर व्हावी ह्या तत्त्वावर तिनें विशेष जोर दिला. अपवादात्मक परिस्थितींत विशिष्ट मालाची साठवण कांहीं विशिष्ट ठिकाणीं करणें उचित ठरेल ह्या बाबीकडे तिनें दुर्लक्ष केलें नाहीं. तांदूळ, गहू, दगडी कोळसा, साखर, सूत व कापड ह्या जिनसांच्या किंमती निश्चित व्हाव्या लागतील ह्या सूचनेसंबंधानें सर ए. रामस्वामींनी म्हणाले कीं प्रांतिक सरकारांच्या सल्ल्यानें हें किंमतीचें नियंत्रण करावें लागेल. दगडी कोळशाचा पुरवठा निरनिराळ्या औद्योगिक क्षेत्रांत विषम तऱ्हेनें होत असल्यानें कित्येक ठिकाणच्या कारखान्यांच्या मार्गांत अडचणी उपस्थित झाल्या आहेत त्या मध्यवर्ती सरकारनें वहातुकीच्या साधनांच्या योग्य पुरवठ्यानें दूर करणें आवश्यक आहे असें परिषदेनें मत व्यक्त केलें.

सुताच्या पुरवठ्याचा प्रश्न अत्यंत अवघड होऊन गेला आहे. त्याबाबत व्यवस्था करण्यासाठी मध्यवर्ती सरकारनें एका कमिशनराची नेमणूक केली आहे. प्रांतिक सरकारांनीं अशीच व्यवस्था अंमलांत आणावी आणि मध्यवर्ती व प्रांतिक व्यवस्थेचा मेळ घातला जावा असें परिषदेनें सुचवलें. सामान्य जनतेच्या उपयोगासाठी मामुली तऱ्हेचें कापड पुरवण्याची योजना आखण्यांत आली आहे आणि तिला मध्यवर्ती सरकारानें योग्य वेळीं व योग्य रीतीनें मूर्त स्वरूप यावें असें ठरलें. हलक्या दर्जाच्या कपाशीच्या लागवडीचा व पुरवठा-विक्रीचा प्रश्न परिषदेपुढें आला. त्या विषयींच्या योजनेची माहिती प्रसिद्ध झालीच आहे आणि तिच्या संबंधांतहि कित्येक सूचना परिषदेनें केल्या. आखूड धाग्याच्या कपाशीची लागवड मर्यादित होण्याची खटपट प्रांतिक सरकारांनीं चालवली असून ती यशस्वी होणार ह्याविषयीं आश्वासनें देण्यांत आलीं आहेत. प्रत्येक प्रांतानें व संस्थानानें बाजारभावांच्या नियंत्रणाची व्यवस्था करण्यासाठी खास अधिकारी नेमण्याचें महत्व व्यापारमंत्र्यांनीं प्रतिपादलें. निरनिराळ्या जातींच्या जिनसांचें उत्पादन व पुरवठा ह्यांचे विषयींची अधिकारयुक्त माहिती मध्यवर्ती सरकारास वेळोवेळ मिळणें अगत्याचें आहे असें त्यांनीं सांगितलें. किंमतीच्या नियंत्रणाचा सर्व बाजूंनीं दिल्लीच्या परिषदेनें विचार केला असून विधायक योजना सरकारपुढें मांडल्या आहेत. ह्या सूचना तातडीनें अंमलांत आणल्या जाव्या अशी जनतेची अपेक्षा आहे.

## बंगाल प्रांतांतील बिगर-शेड्यूल्ड बँका व लोन कंपन्या

बंगाल प्रांतांत काम करणाऱ्या बँकांचें वर्गीकरण (१) शेड्यूल्ड बँका, (२) बिगर शेड्यूल्ड बँका व (३) लोन कंपन्या असें करतां येईल. लोन कंपन्या ह्या बँकिंग कंपन्याच असल्या तरी त्या कंपनी ॲक्टांतील बँकिंग कंपनीच्या व्याख्येंत येत नाहींत व त्या कंपन्यांच्या रजिस्ट्रारकडे शिलकी रोख रकमेचे तक्ते पाठवीत नाहींत. बंगालमध्यें स्थापन झालेल्या व काम करीत असलेल्या ८६३ बँकिंग व लोन कंपन्यांपैकीं २१६ कंपन्याच फक्त वर सांगितल्याप्रमाणें कॅश रिझर्व्हचे तक्ते पाठवितात. ह्याच खऱ्या बँका समजल्या पाहिजेत. हिंदुस्थान सरकारनें कंपनी कायद्याच्या २७७ एफ कलमांत दुरुस्ती सुचविली आहे, तिचें कायद्यांत रूपांतर झालें, म्हणजे पुष्कळशा लोन कंपन्यांना बँकांच्या यादींत येणें भाग पडेल.

बाकी शेड्यूल्ड बँका व उरलेल्या २१६ बँका २७७ (एफ) ह्या कलमाखालीं येतात. त्यांपैकीं १९८ बँकांचे ताळेबंद उपलब्ध आहेत; त्यांवरून खालील निष्कर्ष निघतो:—

### वसूल भांडवल

फक्त १४ बँकांचें वसूल भांडवल प्रत्येकी १ लक्ष रुपयांवर आहे. १८ बँकांचें वसूल भांडवल ½ ते १ लक्ष रुपये आहे. उरलेल्या १७५ बँकांचें वसूल भांडवल ५० हजार रुपयांपेक्षा कमी आहे. त्यांपैकी १४४ बँकांचें वसूल भांडवल २० हजार रुपयेहि नाहीं. ५० बँकांचें वसूल भांडवल प्रत्येकीं ५ हजार रुपयेहि नाहीं. कांहीं बँकांचें भांडवल शेकड्यांनींच मोजतां येण्याजोगें आहे.

### रिझर्व्ह फंड

१९८ बँकांचे रिझर्व्ह फंडांत एकुण ३१ लक्ष, ३२ हजार रुपये रकम आहे. म्हणजे रिझर्व्हजचा आकडा वसूल भांडवलाच्या सुमारें ५०% आहे.

### ठेवी

एकूण ठेवींची रकम ४ कोटि, ५३ लक्ष रुपये आहे. म्हणजे प्रत्येक बँकेंतील ठेवींची सरासरी २ लक्ष २९ हजार रुपयांची आहे.

### गुंतविलेल्या रकमा

बँकांजवळील रोख रकमा योग्य प्रमाणांत असल्या, तरी ८४ बँकांनीं सरकारी रोख्यांत एक पैहि ठेवलेली नाहीं व उरलेल्या ११४ बँकांनीं सरकारी रोखे, कंपन्यांचे भाग, इतर बँकांत मुदतबंद ठेवी, इत्यादींमध्यें फक्त ७२ लक्ष रुपये म्हणजे आपल्या ठेवींच्या १५-९७% रकम ठेवलेली आहे. शेड्यूल्ड बँकांचे बाबतींत तें प्रमाण ४५% पडतें. ठेवींपैकी ७७-२% रकम बँकांनीं कर्जाऊ दिलेली आहे, ती मुख्यतः जमिनींचे तारणावरच आहे. १९८ बँकांपैकीं फक्त २५ बँकांनीं हुंड्या डिस्कौंट केलेल्या आढळतात. बुडीत, संशयित व थकलेलें कर्ज पुष्कळ आहे. बहुतेक बँका तोट्यांत चालल्या आहेत. १९८ बँकांपैकीं, ११९ बँका तोटा दाखवीत आहेत व २६ बँकांचा तोटा त्यांचें वसूल भांडवल व रिझर्व्ह ह्यांपेक्षा अधिक आहे. कांहीं बँकांनीं ठेवी आकर्षण्यासाठीं कित्येक शाखा काढल्या आहेत. ५० हजार रुपये भांडवलाच्या परंतु १२ शाखा असणाऱ्या (त्यांपैकी कांहीं प्रांताबाहेरहि असणाऱ्या) बँकांची उदाहरणें आढळतात.

### लोन कंपन्या

६४७ लोन कंपन्यांपैकीं, फक्त २७ कंपन्यांचें भरणा झालेलें भांडवल ५० हजार रुपयांपेक्षा अधिक आहे. ४७० कंपन्यांचें वसूल भांडवल प्रत्येकी ५ हजारांपेक्षांहि कमी आहे. वसूल भांडवलाची सरासरी १०,९०० रुपये पडते.

लोन कंपन्यांकडे २ कोटि, ६७ लक्ष रुपयांच्या ठेवी आहेत, म्हणजे प्रत्येकींत सरासरीनें ४६,५०० रुपये आहेत. त्यांची रोकड बाळगलेल्या रकमेची सरासरी ३,६०० रुपये पडते. ५२७ कंपन्यांचे ताळेबंद नुकसान दर्शवितात. २२७ कंपन्यांचा तोटा त्यांचें वसूल भांडवल व रिझर्व्ह ह्यांपेक्षां अधिक आहे. बंगालमधील कित्येक बँका व लोन कंपन्या वकील लोकांचे व्यवस्थेखाली आहेत, त्यांना बँकिंग विषयक अथवा व्यावसायिक अनुभव क्वचितच असतो.

## जपानचें पॅसिफिकमधील आक्रमण

गेल्या महायुद्धाची प्रत्यक्ष झळ पूर्व आशियास लागली नव्हती. चीनमधील जर्मन ठाणें जपाननें अल्पशा आयासानें घेतलें त्याव्यतिरिक्त पूर्व आशियाचा युद्धाशीं संबंध आला नाहीं. १९३१ सालीं जपाननें मंच्यूरियावर स्वारी केली, त्यावेळेपासून पूर्व आशियाचें युद्धक्षेत्र बनलें. जपाननें आक्रमण केलेल्या देशांपैकीं नेदरलंडस इंडीज, फ्रेंच इंडोचायना, थायलँड (सयाम) व मलाया आणि स्टेट्स सेटलमेंटस ह्यांची लोकसंख्या, व्यापार, इत्यादींची माहिती खाली दिली आहे:—

**नेदरलँडस इंडीज**—७,३०,००० चौ. मैल. १६०२–१८०० मध्यें घेतलेली. लोकसंख्या ७ कोटि. (२½ लक्ष युरोपियन व १५ लक्ष चिनी). रबर, तंबाखू, साखर, तेल, चहा, खोबरें, इत्यादींचा निर्गत व्यापार. राजधानी—बटेव्हिया. लोकसंख्या ५½ लक्ष.

**फ्रेंच इंडो चायना**—२,८५,००० चौ. मैल. १८५८–८४ मध्यें घेतलेला. लोकसंख्या २ कोटि, ४० लक्ष. (५० हजार युरोपियन, १ कोटि ८ लक्ष ॲनमाइटस्). तांदूळ, रबर, कोळसा, इत्यादींचा निर्गत व्यापार. राजधानी हॅनॉई. लोकसंख्या १½ लक्ष. प्रमुख शहर सायगांव. लोकसंख्या १ लक्ष, ६० हजार.

**थायलंड (सयाम)**—२,००,००० चौ. मैल. १३५० मध्यें एकत्र झालेलें. लोकसंख्या १½ कोटि (१० लक्ष चिनी, ४ लक्ष हिंदी व मलायी) तांदूळ, टीक लाकूड, टिन इत्यादींचा निर्गत व्यापार. राजधानी—बँगकॉग. लो. संख्या १० लक्ष.

**मलाया आणि स्ट्रेटस सेटलमेंटस**—५३ हजार चौ. मैल. (१८१९–१९०९ मध्यें घेतलेली). लोकसंख्या ३८,५०,००० (६ लक्ष चिनी व २ लक्ष हिंदी). रबर, टिन, खोबरें, तांदूळ, मासे इत्यादींचा निर्गत व्यापार (स्ट्रेटस सेटलमेंटसमध्यें सिंगापूर, पेनांग, मलाका, कोकोस व ख्रिसमस आयलंडस ह्यांचाहि समावेश होतो.) राजधानी सिंगापूर. लो. संख्या ४ लक्ष.

## स्फुट-विचार

### चलन आणि महागाई

दिल्ली येथें भरलेल्या परिषदेंत बाजारभावांच्या नियंत्रणाविषयीं उद्भवणाऱ्या अनेक प्रश्नांचा विचार झाला त्याचें विवेचन आजच्या अग्रलेखांत आम्हीं केलेंच आहे. महागाईच्या एका प्रमुख कारणाचा उल्लेख तेथें आलेला नाहीं आणि तें कारण म्हणजे राष्ट्रीय चलनाची परिस्थिति हें होय. चलनाचा बाजारभावांशीं संबंध कसा येतो आणि युद्धकाळांत चलनाचा खेळ शक्य तितका मर्यादित करणें कां आवश्यक असतें ह्या प्रश्नाचें विवेचन आम्हीं विस्तरशः अनेक वेळां केलें आहे. दिल्लीच्या परिषदेंत, सर जरेमी रेस्मन, हिंदुस्थान सरकारचे अर्थमंत्री, ह्यांच्या कार्यक्षेत्रांत हा विषय येत असल्यानें, त्यांनीं आपलें त्याबाबतचें म्हणणें पुढें मांडलें. अडचणीच्या प्रसंगीं कागदी चलन काढून आपली पैशाची गरज अनायासें भागवण्याची प्रवृत्ति युद्धपरिस्थितींत कित्येक राज्यकर्त्यांत दिसून येते. ह्या प्रकारचें बिनबुडाचें योग्य प्रमाणाबाहेर काढलेलें कागदी चलन महागाईस कारण होतें आणि तें समाजांत गोंधळ माजवतें. हिंदुस्थानांत चलनी नोटांचा प्रसार युद्धखर्चामुळें वाढवावा लागला आहे खरा. तथापि, तो सर्वस्वी प्रमाणबद्ध आहे, म्हणजे त्यास पूर्ण तारण आहे आणि सरकारी खर्च भागवण्याची सोपी युक्ति म्हणून त्याचा अवलंब करण्यांत आलेला नाहीं. हिंदुस्थान सरकारचा वाढता खर्च जादा कर आणि कर्जें ह्यांच्या साधनानें भागवला जात आहे आणि त्या कामीं बिनतारणाच्या कागदी चलनाचा उपयोग करण्यांत येत नाहीं ही गोष्ट सर जरेमी ह्यांनीं स्पष्ट केली. कागदी चलनास शंभर टक्के तारण असलें तरी व्यवहारांत खेळणाऱ्या चलनाच्या मानानें विकत घ्यावयाच्या पदार्थांच्या पुरवठा मर्यादित असल्यास बाजारभाव चढल्यावांचून रहात नाहींत ह्या अर्थशास्त्रीय तत्त्वाची फोड करून त्यांनीं जनतेनें आपल्या खर्चांत बचत करण्याचें महत्व प्रतिपादलें. कागदी चलनाचा सुळसुळाट होऊन त्याचें मोल म्हणजे पदार्थ विकत घेण्याचें सामर्थ्य कमी होण्याची, अर्थात् त्या योगानें बाजारभाव चढण्याची भीति हिंदुस्थानांत नाहीं. पण आपल्या सर्व प्राप्तीचा उपयोग जिन्नस खरेदी करण्याकडे जनतेनें केल्यास व्यवहारांत फाजील चलन खेळून महागाई होणें अपरिहार्य होईल, असें सर जरेमी ह्यांनीं परिषदेस बजावलें. ह्यावरून लोकांनीं खर्चांत बचत करून बाजारभाव चढण्याच्या प्रवृत्तीस आळा घालण्यास मदत देण्याचें महत्त्व सिद्ध होतें आणि त्याकडे फडनविसांनीं लक्ष वेधलें. खर्चांत काटकसर करणें हें अखेरीस लोकांच्याच हिताचें कसें आहे हें विशद करून सांगणें हा त्यांच्या भाषणाचा मुख्य हेतु होता.

---

### स्वदेशी कारखान्यांतील साखरेचा उतारा

स्वदेशी साखरेच्या धंद्याची प्रगति मुख्यत्वेंकरून उसाचा सकसपणा व त्यांतील साखरेच्या पडणाऱ्या उताऱ्याचें प्रमाण ह्यांवर मुख्यत्वें करून अवलंबून आहे हें ध्यानांत बाळगणें आवश्यक आहे. हिंदी उसाच्या नवीन व सुधारलेल्या जाती शास्त्रीय प्रयोगांच्या सहायानें तयार करण्यांत येत असून त्यांचें बियाणें विस्तृत प्रमाणांत उपयोगांत आणलें जात आहे ह्यांत शंका नाहीं. उसाचें दर एकरी उत्पादन वाढलें आहे आणि वाढत आहे आणि त्याबरोबरच निघणाऱ्या साखरेचा उताराहि सुधारत आहे. तथापि हिंदुस्थानांतील उसाचा व साखरेचा धंदा जाव्हाच्या कितीतरी मागें आहे हें विसरतां कामा नये. साखरेच्या उताऱ्याचें सरासरीचें प्रमाण संयुक्त प्रांत, बिहार व इतर क्षेत्रें ह्यांमध्यें गेल्या नऊ वर्षांत कसें पडलें आहे हे दर्शविणारे तुलनात्मक आकडे खालीं दिले आहेत ते बोधप्रद झाल्यावांचून रहाणार नाहींत:—

साखरेचा उतारा

( ऊस व साखर ह्यांचें शेकडा प्रमाण )

| वर्षें | संयुक्तप्रांत | बिहार | इतर | हिंदुस्थान | जाव्हा |
|---|---|---|---|---|---|
| १९३२-३३ | ८·५ | ८·६ | ८·९ | ८·६ | |
| १९३३-३४ | ९·० | ८·३ | ८·७ | ८·८ | |
| १९३४-३५ | ८·५ | ८·७ | ८·७ | ८·६ | |
| १९३५-३६ | ९·६ | ८·९ | ९·० | ९·२ | |
| १९३६-३७ | ९·६ | ९·२ | ९·६ | ९·५ | १३·२ |
| १९३७-३८ | ९·१ | ९·५ | ९·७ | ९·३ | |
| १९३८-३९ | ९·१ | ९·० | ९·९ | ९·२ | |
| १९३९-४० | ९·३ | ९·२ | ९·८ | ९·४ | |
| १९४०-४१ | ९·८ | ९·८ | ९·३ | ९·७ | |

कांहीं महिन्यांत व क्षेत्रांत उतारा अधिक पडतो आणि पाऊसपाण्याच्या परिस्थितीप्रमाणें तो कमी-जास्ती होतो. तथापि, सबंद देशाची साखरेच्या उताऱ्याची सरासरी काय आहे हेंच पहाणें महत्त्वाचें आहे. ह्या दृष्टीनें विचार करतां हिंदी साखरेच्या प्रगतीस अजून किती वाव आहे हें वर दिलेल्या आकड्यांवरून लक्षांत येईल. ह्या देशांतील सरासरीचा उतारा दहा टक्क्यांपर्यंत आला आहे, पण तो तेरा-चवदा टक्क्यांवर जाण्यासारखा आहे. म्हणजे देशी साखरेचें उत्पादन-प्रमाण वाढून तिच्या खपाचा विस्तार होण्यास पुष्कळ जागा आहे. ही वाढ होत जाईल तिच्या मानानें साखरेची किंमत कमी करतां येऊन तिचा खप वाढण्यास सहाय मिळण्यासारखें आहे हें उघड आहे.

---

### मि. चर्चिल ह्यांचा आढावा

सिंगापूर बेटावर जपाननें केलेल्या निकराच्या हल्ल्यांचा प्रतिकार एक आठवडाभर चिकाटीनें व धैर्यानें चालवून अखेर तेथील ब्रिटिश सेनाधिकाऱ्यांस हें महत्त्वाचें ठाणें शत्रूच्या स्वाधीन करावें लागलें आहे. पॅसिफिक महासागरांतलें सिंगापूर हें मान्याचें ठिकाण ब्रिटिशांस सोडून द्यावें लागलें आहे हा प्रस्तुत युद्धांतला एक आणीबाणीचा प्रसंग आहे ही गोष्ट इंग्लंडमध्यें सर्वांनीं प्रांजलपणानें कबूल केली आहे. सिंगापूर हातीं आल्यानें जपानचें लढाऊ बळ वाढलें आहे ह्यांत कोणासहि शंका नाहीं. तथापि, युद्धांतल्या प्रगतीचा व पीछेहाटीचा शांतपणानें आढावा घेतल्यास आणि सिंगापूरचा पराभव नुकसानीच्या सदरांत टाकल्यास निष्कर्ष काय निघतो हें पहाणें आवश्यक आहे. असा आढावा इंग्लंडचे मुख्य प्रधान, मि. चर्चिल, ह्यांच्यासारख्या मुत्सद्यानें अधिकारीपणानें सिंगापूरच्या प्रसंगाच्या पाठोपाठ घेतला हें उत्तेजनकारक आहे. रणांगणावर दोन हात करण्यास सरसावलेल्या सैन्यांस मार खावा-द्यावा लागतो आणि एखाद्-दुसऱ्या अपयशानें निराश न होतां ध्येयाकडे दृष्टी ठेवून निश्चयानें व शिस्तीनें अंतिम विजय मिळेपर्यंत लढत रहावें लागतें. हा सामान्य सिद्धांत

झाला. परंतु मि. चर्चिल ह्यांनीं आपल्या आढाव्यांत इंग्लंड, अमेरिका व चीन ह्या राष्ट्रांचें संयुक्त बळ किती मोठें आहे आणि त्याचा पूर्ण उपयोग होऊं लागतांच विजय कसा जवळ जवळ येऊं लागेल ह्याचें प्रांजलपणानें व मार्मिक रीतीनें विवेचन केलें. इंग्लंडच्या सहायास रशिया आणि अमेरिका हीं बलाढ्य राष्ट्रें आतां आहेत; रशियानें हिटलरचे हल्ले उलटवून त्याच्या फौजांस मागें रेटीत नेलें आहे. जपानची लढाऊ तयारी मोठी आहे तरी चिनी राष्ट्राचें सहकार्य पूर्व एशियांत इंग्लंड व अमेरिका ह्यांस होत आहे; ह्यापुढें होणाऱ्या लढायांत कधीं विजय तर कधीं अपयश पदरीं येण्याचा संभव असला तरी शेवटीं जर्मनी व जपान ह्या दुसऱ्यांच्या प्रदेशावर अन्यायाचें आक्रमण व त्यांच्या स्वातंत्र्यावर आघात करणाऱ्या रानटी देशांचा पूर्ण पराभव करण्याइतकें सामर्थ्य इंग्लंड, अमेरिका व चीन ह्यांचेमध्यें असल्याचा आपला दृढ विश्वास मि. चर्चिल ह्यांनीं आपल्या भाषणांत व्यक्त केला. इतर सर्व गोष्टी आपणांस अनुकूल आहेत पण त्यांचा पूर्ण व कार्यक्षम उपयोग होण्यास इंग्लंडमध्यें लोकांत जूट, शिस्त, निर्धार व स्वार्थत्यागाची तयारी हे गुण प्रभावी होत राहिले पाहिजेत असा अखेरचा संदेश त्यांनीं दिला. इंग्लंडमध्यें मंत्रिमंडळाच्या कारभारावर अलीकडच्या घडामोडीमुळें टीका होत असली तरी मि. चर्चिल ह्यांचेवरचा जनतेचा विश्वास अढळ आहे आणि ह्या विश्वासास ते सर्वस्वी पात्र आहेत हें त्यांच्या आढाव्यानें पुनः एकवार सिद्ध केलें आहे. त्यांच्या आढाव्याचा परिणाम इंग्लंड, अमेरिका, हिंदुस्थान व ब्रिटिश वसाहती ह्यांचेवर स्फूर्तिदायक झाल्यावांचून रहावयाचा नाहीं.

### स्वाध्याय मंडळ, औंध

पुरुषार्थाच्या फेब्रुवारी १९४२ च्या अंकांत वरील संस्थेसंबंधीं सर्व प्रकारची माहिती दिलेली आहे. वेदांचा अभ्यास नीटपणानें होऊन त्यांतील धर्माचा प्रसार व्हावा ह्या हेतूनें पं. सातवळेकर ह्यांनीं स्वाध्याय मंडळाची स्थापना १९१८ सालीं केली व मंडळानें आपल्या ध्येयास अनुसरून भरीव कामगिरी केली. मंडळाला स्थिर स्वरूप देण्याकरितां तें आतां रजिस्टर करण्यांत आलेलें आहे. पुरुषार्थाचे ताज्या अंकांत मंडळाच्या आजवरच्या कामगिरीचें सविस्तर वर्णन दिलेलें असून पुढें करावयाच्या कार्याचें दिग्दर्शनहि केलेलें आहे. स्वाध्याय मंडळाची घटना, त्याचे नियम व पोटनियम हेहि त्यांत दिलेले आहेत मंडळाच्या कार्याचें स्वरूप जनतेस नीटपणें कळून येण्यास प्रस्तुत अंक उपयोगी पडेल. ह्या ध्येयनिष्ठ संस्थेचें आजवरचें हिंदी आणि मराठी प्रकाशन व त्यास मिळालेल्या देणग्या, ह्यांवरून संस्थेस ह्यापुढें अधिक मोठ्या प्रमाणावर कार्य करतां येण्याजोगी परिस्थिति निर्माण होईल, असा भरंवसा वाटतो.

### स्वर्गवासी दि. ब. मळजी

भडोचचे जुने वकील, दिवाण-बहादुर मळजी, हे एक निष्ठावंत, उत्साही व उद्योगी असे सहकारी चळवळीचे नेते होते आणि त्यांच्या नुकत्याच झालेल्या खेदकारक निधनानें ह्या प्रांतांतील सहकारी संघटनेची मोठी हानि झाली आहे. प्रांतिक सहकारी चळवळीच्या आद्यप्रवर्तकांपैकीं ते एक होते. भडोच येथील जिल्हा सहकारी बँक त्यांनीं १९०७ सालीं स्थापिली आणि गेलीं चोवीस वर्षें ते गुजराथेचे उत्तर भागांतील ऑनररी ऑर्गनायझर होते. मुंबईच्या प्रांतिक सहकारी इंस्टिट्यूटच्या उत्तर भागाच्या शाखेचे ते तिच्या स्थापनेपासून अध्यक्ष होते. प्रांतिक सहकारी बँकेचे डायरेक्टर म्हणून त्यांनीं अनेक वर्षें काम केलें आणि रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या मुंबई-शाखेचे ते अलीकडे डायरेक्टर होते. ऑनररी ऑर्गनायझरचें काम ते अत्यंत उत्साहानें व निरलसपणानें करीत आणि गुजराथेंतील सहकारी चळवळीचे ते केवळ आधारस्तंभ होते. प्रांतिक इन्स्टिट्यूटनें चालवलेल्या त्रैमासिकांत त्यांचे लेख नेहमी येत असत आणि सहकारी घटनेच्या कायद्याच्या व कारभाराच्या संबंधांतील लहान-मोठ्या प्रश्नांची ते मार्मिकपणानें चर्चा करीत. दिवाणबहादुर मळजी ह्यांची रहाणी अत्यंत साधी पण टापटिपीची होती आणि सहकारी संघटनेच्या आर्थिक व नैतिक उपयुक्ततेवर त्यांचा दृढ विश्वास होता. त्यांच्या जीवनाचा व कार्याचा कित्ता इतरांनीं गिरवण्यासारखा आहे.

### "नॉर्मंडी"

नॉर्मंडी ह्या सुप्रसिद्ध फ्रेंच आगबोटीस ता. ९ रोजीं न्यूयॉर्क बंदरांत आग लागून ती समुद्रतळास गेली. ही उतारूंची आगबोट ८३,४२३ टनांची होती, म्हणजे जगांतील ती दुसऱ्या नंबरची आगबोट होती. १९३५ सालीं ती बांधण्यांत आली. तिचेवर २,०३३ उतारूंची सोय होती. तिची लांबी १,१२९ फूट होती. ३ सप्टेंबर १९३९ पासून ती न्यूयॉर्क बंदरांतच पडून होती.

### सेंट्रल कन्स्ट्रक्शन कं. लि.

वरील नांवाची १ लक्ष रुपये भांडवलाची कंपनी मुंबई येथें श्री. एन. जी. रानडे ह्यांनीं रजिस्टर केली आहे.


आजच्या तरुण—तरुणींची
मनःस्थिति हुबेहुब चित्रीत करणारी
नवयुगची कलाकृति

संगम

९ वा आठवडा

निर्माते:—विनायक. दिग्दर्शक:—जुन्नरकर
लेखक:—खांडेकर
सुमधुर संगीत ! उत्कृष्ट अभिनय ! !
मिनर्व्हा—पुणें
रोज :—६॥ व १० वा.
शनि. रवि. सोम. जादा खेळ ३॥ वा.

## मि. कॉर्डेल हल

अमेरिकेचे अध्यक्ष, मि. रूझवेल्ट, ह्यांनीं आपल्या पहिल्या कारकीर्दीचे आरंभीं मि. कॉर्डेल हल ह्यांची सेक्रेटरी ऑफ स्टेटचे जागीं नेमणूक केली, तेव्हांपासून ते त्याच जागेवर आहेत. आज त्यांचें वय ७० वर्षांचें असलें, तरं एकाद्या तरुणाप्रमाणें ते काम करतात. प्रत्येक गोष्टीचा सर्व बाजूंनीं विचार केल्याखेरीज ते आपलें मत देत नाहींत, ह्यामुळेंच त्यांनीं आपली जबाबदारी एकहि चूक न करतां गेलीं नऊ वर्षें पार पाडली आहे. अब्राहम लिंकन हा सुप्रसिद्ध अमेरिकन मुत्सद्दी व अध्यक्ष ज्या प्रांतांतून आला, त्याच टेनेसी प्रांतांत मि. कॉर्डेल हल ह्यांचा जन्म झालेला आहे. त्यांच्या वयाचीं पहिलीं पंधरा वर्षें शेतीचे कामांतच गेलीं. १७ व्या वर्षीं त्यांनीं आगगाडी प्रथमें पाहिली; तथापि, अशा मागसलेल्या प्रांतांत व ठिकाणींहि त्यांनीं हातीं येतील तीं पुस्तकें वाचून काढलीं. नंतर त्यांनीं वकिलीची परीक्षा देण्याचें ठरविलें. स्पॅनिश–अमेरिकन युद्धास प्रारंभ होतांच, त्यांनीं एक पलटण उभारून ते आघाडीवर लढाईस गेले. परत आल्यावर चार वर्षें त्यांनीं जज्जाचें काम केलें. १९०७ सालीं त्यांचा अमेरिकन कॉंग्रेसमध्यें प्रवेश झाला. १९३० सालीं त्यांची सेनेटवर निवडणूक झाली. अत्यंत कमी बोलणारा परंतु कुशल मुत्सद्दी म्हणून मि. कॉर्डेल हल ह्यांचा लौकिक आहे.

---

### जर्मन इंजिनिअर, डॉ. टॉड

जर्मनींतील वहातुकीच्या प्रचंड रस्त्यांचा व सीफ्रिज लाइनचा योजक, डॉ. टॉड, विमानाचे अपघातांत सापडून नुकताच मरण पावला, त्यावेळीं त्याचें वय ५० वर्षांचें होतें. १९३३ सालीं डॉ. टॉड ह्याची रस्त्यांच्या इन्स्पेक्टर जनरलचे जागीं नेमणूक झाली. ८ डिसेंबर, १९३७ चे "अर्था" चे अंकांत "जर्मनीमधील मोटारींचे नवीन रस्ते" ह्या शीर्षकाखालीं प्रसिद्ध झालेला मजकूर येथें उद्धृत करीत आहों, तो उद्‌बोधक वाटेल:—

"जर्मनीमधील बेकारी निवारणाचा एक उपाय म्हणून मोठे हमरस्ते तयार करण्याचें काम तेथील सरकारनें १९३३ सालीं सुरू केलें. शक्य तितकें काम यंत्रांचे सहायावांचून करावयाचें असें सरकारचें धोरण होतें. १९३४ सालीं ८४ हजार लोक ह्या कामावर होते; १९३५ सालीं त्यांची संख्या १ लक्ष १५ हजारांवर गेली. सप्टेंबर १९३७ अखेर एकूण ८ कोटि, २० लक्ष तासांत काम पुरें करण्यांत आलें आहे. केवळ मोटारींच्या वहातुकीसाठीच ह्या रस्त्यांची योजना असल्यानें आडवे रस्ते टाळण्याकरितां प्रत्येक ठिकाणीं पूल बांधण्यांत आले आहेत. वळणें शक्य तितकीं कमी घेऊन चढ-उतारहि कमींत कमी येण्याचा प्रयत्न करण्यांत आला आहे. रस्त्यांचे बांधणींत मुख्यतः सिमेंटचा (३० लक्ष टन) उपयोग करण्यांत आला आहे. रस्त्यांचे योजनेस लागणारी भांडवली स्वरूपाची रकम कर्जाचे द्वारा उभारलेली आहे."

ह्या रस्त्यांचें अर्थशास्त्र असें आहे, कीं चांगल्या रस्त्यांवरून मोटारी वेगानें जाऊं शकतात, ह्या कारणानें मोटारवाल्यांच्या वेळांत व वहानांस लागणाऱ्या जळणांत व यंत्रांच्या झिजेमध्यें बचत होते व रस्त्यांप्रीत्यर्थ केलेला खर्च अशा अप्रत्यक्ष मार्गानें भरून येतो.

---

### निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| ३½% बिनमुदत ... | १२—०—० |
| सोनें प्रत्येक तोळयास | ५०—?—० |
| चांदी प्रत्येक १०० तोळयांस | ७२-५-० |


## दि बँक ऑफ इंडिया लि.

[स्थापना : १९०६]

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल ... ... ... | रु. २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... ... ... | रु. १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड ... ... ... | रु. १,१५,५०,००० |

मुख्य कचेरी : ओरिएन्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

मुंबईमधील शाखा : बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

इतर शाखा : अहमदाबाद (भद्र, मुख्य ऑफिस), अहमदाबाद (एलिस ब्रिज शाखा), अहमदाबाद (स्टेशन शाखा), अंधेरी (मुंबई शेजारीं), बांद्रे (मुंबई शेजारीं), कलकत्ता (क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर, कराची, नागपूर (किंग्जवे), नागपूर (इतवारी बझार), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत.

लंडन एजन्ट्स : वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

डायरेक्टर्स : सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई, सर जोसेफ के. नाइट, मि. ए. गेडिस, सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई., मि. दिनशा के. दाजी, श्री. रामनिवास रामनारायण.

करंट डिपॉझिट अकाउंट्स :

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षा कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमीचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

एजंट—टी. आर. लालवाणी.

## दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

हेड ऑफिस : पुणें शहर.

स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.

मुंबई शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १०,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ४,२५,८५० |
| वसूल झालेलें भांडवल | रु. २,१२,८४५ |
| एकूण खेळतें भांडवल | रु. २३,००,००० |

**डायरेक्टर्स**

प्रो. धा. गो. काळे, अध्यक्ष

| | |
|---|---|
| श्री. धों. कृ. साठे | श्री. मा. रा. जोशी |
| श्री. न. म. पवार | श्री. श्री. बो. मराठे |
| श्री. त्र्यं. वि. रानडे | श्री. र. चिं. सोहोनी |
| श्री. वा. पु. वर्दे | मि. फ. बो. पदमजी |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदीविक्री कसोशीनें करून दिली जाते.

बँकेच्या शेअरवर १९४० अखेर पुऱ्या होणाऱ्या वर्षी द. सा. द. शेंकडा ४ टक्के करमाफ डिव्हिडंड दिलें गेलें. बँकेची शेअरविक्री चालू आहे.

म. वि. गोखले
मॅनेजर.

महायुद्ध दाराशीं आलें
परदेशी औषधें
दुर्मिळ व महाग झालीं
पण
भिण्याचें कारण नाहीं !!!
— कारण —
आयुर्वेद रसशाळा पुणें लि०
या देशी औषधाच्या प्रसिद्ध कारखान्यानें तयार केलेलीं
● रक्तवर्धक, ● उपनाह,
● बालजीवन, ● कॅल्सीप्राल
इत्यादि पेटंट, स्टँडर्ड व लोकप्रिय औषधें खात्री पटल्यामुळें
★ डॉक्टर्सहि वापरूं लागले आहेत. ★
दरसाल बिनचूक नफा वाटणाऱ्या ह्या कंपनीचे शेअर्स व औषधें मागवा.
आयुर्वेद रसशाळा पुणें लि०
मुख्य दुकान गणपति चौक, लक्ष्मीरोड, पुणें २.

सर्व तऱ्हेची कापड छपाई व रंगाई (Calico Printing and Dyeing) करणारा कारखाना.
' पायोनियर डाइंग हाऊस '
कोचाचें कापड (Casement cloth), दाराचे पडदे, टेबल कव्हर इ. टिकाऊ रंगाचे, स्वदेशी तयार मिळतात. कारखानाः—
भिकारदास मारुती रोड, दालेवाडी, पुणें.

महाराष्ट्रांत लेखी गॅरंटीसह टिकाऊ व मनपसंत
साईन-बोर्डस्, रबरी शिक्के,
आकर्षक
सिनेमा स्लाइडस् व पिक्चर पेंटिंग
सतत २० वर्षे विश्वसनीय व वेळेवर मिळण्याचें
एकच ठिकाण
पेन्टर ए. जी. बेडेकर
( मराठी वळणाचे स्पेशॅलिस्ट )
बुधवार चौक, पुणें २ ( सिटी )
बाहेरगांवचीं कामें व्यवस्थित व वेळेवर पाठवूं.

कॉमनवेल्थचा वैभवशाली विस्तार
★ २७ हजारांचेवर पॉलिसी-होल्डर्स
★ एकूण चालू विमे २ कोटीचेवर
★ दोन हजारांहून अधिक कार्यकर्ते निरनिराळ्या प्रांतांत कॉमनवेल्थसाठी उत्साहानें काम करीत आहेत.



हेड ऑफिस बिल्डिंग

कॉमनवेल्थ
ॲशुअरन्स कंपनी लि.
चेअरमन
★ खा. ब. एम्. एन्. मेथा, C. I. E., M. B. E.
ॲक्टिंग ऑफिस सुपरिन्टेंडेंट ★ एम्. एन्. भागवत, B. A.
' कॉमनवेल्थ ' ची पॉलिसी घेऊन जीवन निश्चिंत व सुखी करा.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५/१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं ' दुर्गाविलास, ' भांबुर्डा, घ. नं. ९२७/११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ, 'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ८ पुणें, बुधवार, तारीख २५ फेब्रुवारी, १९४२ अंक ८

## न्यायमूर्ति रानड्यांचे
## तीन अप्रसिद्ध लेख प्रसिद्ध झाले

**PLEA FOR PROTECTIONIST POLICY**

**INDIAN SUGAR INDUSTRY**

न्यायमूर्ति रानडे यांनीं १८९९ सालीं ' टाइम्स ऑफ इंडियांत ' स्वदेशी साखरेच्या धंद्यासंबंधीं लिहिलेले महत्त्वाचे तीन लेख, प्रो. वा. गो. काळे ह्यांच्या प्रस्तावनेसह प्रसिद्ध करण्यांत आले आहेत.

व्यवस्थापक, ' अर्थ ', पुणें ४.

ह्या पत्त्यावर आठ आण्यांचीं तिकिटें पाठवून लेखांची प्रत मागवावी.

## श्रीराम सिल्क मिल्स लि., बंगलोर

[ कंपनीनें १९४० अखेर ६ टक्के डिव्हिडंड वांटला आहे. ]

युद्धसाहित्यपुरवठा-खात्याची पॅरेशूटकरितां लागणाऱ्या रेशमी कापडाची ऑर्डर पुरी करण्यासाठी लागणाऱ्या भांडवलाकरितां तूर्त एकूण रु. १ लक्षाच्या रकमेपर्यंत

## ठेवी घेणें आहेत

व्याजाचा दर ४॥ ते ६ टक्के. ठेव किमान रु. ५०० ची असावी. ठेवीवरील व्याज दर सहा महिन्यांनीं दिलें जातें.

श्रीराम सिल्क मिल्स लि., श्रीरामबाग, बसवनगुडी, बंगलोर. } नारायण गोविंद नाईक, ( माजी अध्यक्ष, म्हैसूर चेंबर ऑफ कॉमर्स ) मॅनेजिंग डायरेक्टर

आमच्या कारखान्यांतील माल मुंबईस बॉम्बे स्वदेशी को-ऑपरेटिव्ह स्टोअर्समध्यें व पुण्यास लक्ष्मी रोडवरील रे म्यूझिअमच्या व्यापार-संवर्धन-गृहांत पहा.

## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

## वक्तशीर आणि मनपसंत काम करून देणारे
## मोहन वॉच कंपनी

रेग्युलेशन मोफत

कॉमनवेल्थ बिल्डिंगसमोर लक्ष्मी रोड, पुणें २.

महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर

## महिंद्रकर ब्रदर्स
### तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

# विविध माहिती

### डाकार

डाकार बंदराचें नांव आतां सर्वतोमुखीं झालें आहे. हें बंदर आफ्रिकेच्या पश्चिम किनाऱ्यावर आहे, व दक्षिण अमेरिकेपासून त्याचें अंतर १,५०० मैल आहे. आतां त्या बंदराचें महत्त्व अतिशय वाढलें आहे. चाळीस वर्षांपूर्वी तें अप्रसिद्ध होतें. सेनेगॉल ह्या फ्रेंच वसाहतीमध्यें तें आहे.

### मध्यवर्ती सरकारचा उत्पन्न-खर्च

डिसेंबर, १९४१ मध्यें हिंदी मध्यवर्ती सरकारचा खर्च त्याच्या उत्पन्नापेक्षा ४ ½ कोटि रुपयांनीं अधिक झाला. १९४१-४२ च्या पहिल्या नऊ महिन्यांतील उत्पन्नापेक्षा जास्त झालेल्या खर्चांचा आकडा ४१ कोटि रुपये भरला. गेल्या वर्षीच्या तत्सम मुदतींत तो ३५ कोटि रुपये होता. चालू वर्षीं उत्पन्नांत २०½ कोटींची भर पडली असली तरी खर्च २५½ कोटींनीं वाढलेला आहे. हिंदुस्थान सरकारच्या कर्जाचा आकडा वरील मुदतींत ७५ लक्ष रुपयांनीं कमी झालेला आहे.

### मुंबई प्रांतांतील सहकारी बँका

मुंबई प्रांतांतील सहकारी बँकांची यादी त्यांच्या असोसिएशननें नुकतीच प्रसिद्ध केली आहे. अशा प्रकारची यादी प्रथम १९३७ सालीं प्रसिद्ध करण्यांत आली होती. यादीची किंमत ४ आणे आहे.

### ५५ हजार शिंपी

प्रत्यक्ष युद्धसाहित्य तयार करण्यांत ५५ हजार शिंपी गुंतले आहेत. वेगवेगळ्या तऱ्हेचे ६५ कपडे करण्याचा मक्ता मिळालेल्या ८० कंत्राटदारांचे हाताखालीं हे शिंपी काम करीत आहेत.

### गाईंच्या निर्गतीची आवश्यकता नाहीं

गेल्या महायुद्धाचे वेळीं मेसापोटेमियांतील सैनिकांस दूध पुरविण्याकरितां हिंदुस्थानांतून गाई पाठविण्यांत आल्या होत्या. चालू युद्धांत दुधाची पूड, लोणी, वगैरे पाठविण्यांत येतात.

### मुंबई प्रांतांतील स्थानिक स्वराज्य संस्था

लोकल ऑडिट डिपार्टमेंटचा १९४०–४१ चा अहवाल प्रसिद्ध झाला आहे, त्यावरून असें दिसतें कीं, मुंबई प्रांतांतील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कारभारांतील गैरशिस्तपणा पूर्ववत चालूच आहे. विशेषतः लहान म्युनिसिपालिट्यांची आर्थिक परिस्थिति फारच असमाधानकारक आहे. ऑडिटरच्या सूचनांकडे दुर्लक्ष करण्याची प्रवृत्ति सर्वत्र आढळते. नोकरांच्या नवीन जागा मंजुरी नसतांना निर्माण करणें, पगारवाढ नियमाविरुद्ध करणें, कारणें नमूद न करतां पगारवाढ थांबविणें इत्यादि प्रकार चालू आहेत. ठाणें, भुसावळ, मालेगांव, नाशिक, पंढरपूर ह्या म्युनिसिपालिट्यांची बाकी वसूल ४०% पेक्षां अधिक आहे. भिवंडी, बारामती, इंदापूर, जेजुरी इत्यादि ठिकाणीं बाकीचें एकूण येण्याशीं प्रमाण ५०% पडतें. सुरत, अंमळनेर, धारवाड व हुबळी येथें हें प्रमाण १०% पेक्षां कमी आहे. बाकीदार सभासदांची संख्या व त्यांच्या बाकीचा आकडा ह्यांत वाढ होत आहे.

### ट्रेझरी बिलांवर १ रु. व्याज

रिझर्व्ह बँकेनें गेल्या आठवड्यांत हिंदुस्थान सरकारचीं २ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा दर द. सा. द. शे. १ रुपया पडला.

### सिव्हिक गाड्या

मुंबई प्रांतांतील सिव्हिक गाड्यांची संख्या ५,०१९ आहे.

### ॲबिसिनियाचे पंतप्रधान

ॲबिसिनियाचे ग्रेट ब्रिटनमधील माजी वकील, डॉ. मार्टिन ह्यांची ॲबिसिनियाच्या बादशहांनीं मुख्य प्रधानाचे जागीं नेमणूक केली आहे. ॲबिसिनिया इटलीचे ताब्यांत गेल्यानंतर ते डेहराडून येथें येऊन राहिले होते. आतां ते ॲबिसिनियाकडे रवाना झाले आहेत.

### ब्रह्मी विधिमंडळाची बैठक

ब्रह्मदेशाच्या विधिमंडळाची बैठक नुकतीच भरली होती, तिची जागा जाहीर करण्यांत आलेली नाहीं. ह्या बैठकींत बजेटावर चर्चा झाली. येत्या वर्षीं ८२ लक्ष रुपयांची तूट अपेक्षित आहे. विशिष्ट युद्धपरिस्थितीमुळें नवीन करांचा विचार करण्यांत आला नाहीं.

### मादागास्कर

मादागास्कर बेटावर जपानचा डोळा असण्याचा संभव आहे असें मत अमेरिकन वृत्तपत्रें व्यक्त करीत आहेत. सिंगापूरपासून मादागास्कर ३,००० मैल दूर आहे व तेथून डरबान १,५०० मैलांवर आहे. मादागास्कर बेट हिंदी महासागरांत असून तें १८८९ सालीं फ्रेंचांच्या ताब्यांत गेलें. त्याचें क्षेत्रफळ २ लक्ष, ४१ हजार चौ. मैल व त्याची लोकसंख्या ३७ लक्ष आहे.

### २ कोटि भांडवलाची बँक

हिंदी संस्थानांत औद्योगिक प्रगति घडवून आणण्याचे हेतूनें २ कोटि रुपये भांडवलाची एक बँक मुंबई येथें रजिस्टर करण्यांत आली आहे.

### सार्वजनिक सुट्ट्या

मुंबई प्रांतिक सरकारी कचेऱ्यांस वर्षांतून २८ सुट्ट्या मिळतात, त्यांची संख्या चालू वर्षीं १९ करण्यांत आली आहे. युद्धसाहित्याच्या निर्मितीचा सुट्ट्यांमुळें वेग मंदावतो म्हणून ही योजना करण्यांत आली आहे.

### कामाची सक्ती

आफ्रिकेंतील स्थानिक लोकांवर युद्धकार्यासाठी नोकरीची सक्ती करण्यांत येणार आहे, असें समजतें. २२,००० आफ्रिकन मजुरांची आवश्यकता आहे, ती भागविण्याकरितां १६ ते ४५ ह्या वर्षांच्या मधील सर्व आफ्रिकनांस काम करावें लागेल. काम सहन न होणारांस अपील करतां येईल. काम करावयास सांगण्यापूर्वी त्यांची वैद्यकीय तपासणी केली जाईल.

### एम. डी. व एम. एस.

आंध्र विश्वविद्यालयाच्या एम्. डी. व एम्. एस्. पदव्यांस हिंदुस्थान सरकारनें मान्यता दिली आहे.

### सातारा मोटार ट्रॅन्स्पोर्ट लि.

वरील नांवाची कंपनी श्री. वराडकर ह्यांनीं सातारा येथें राजिस्टर केली आहे. कंपनी खासगी लिमिटेड असून तिचें भांडवल एक लक्ष रुपये आहे.

### सर जेम्स टेलर

रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर, सर जेम्स टेलर, ह्यांची त्याच जागीं फेर-नेमणूक झाली आहे. नेमणुकीची मुदत पांच वर्षांची आहे.

### सहा लाखांची मालमत्ता

के. जमनालाल बजाज ह्यांची ६ लक्ष रुपयांची मालमत्ता राष्ट्रकार्यासाठी उपयोगांत येणार आहे.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती | ... ६० |
| २ रेल्वे बजेट | ... ६१ |
| ३ बँक ऑफ महाराष्ट्र | ... ६२ |
| ४ हिंदी रेल्वेजचें अंदाजपत्रक | ... ६२ |
| ५ महाराष्ट्र बँकेची सहा वर्षांतील प्रगति | ... ६२ |
| ६ स्फुट विचार | ... ६३ |
| सिंगापूरचा प्रसंग आणि पुढील कार्याची दिशा—मालविरील कराविषयींचा ठराव अमान्य—कर्ज-निवारण कायदा. | |
| ७ महाराष्ट्र बँकेची वार्षिक सभा | ... ६५ |
| ८ प्रदेश | |
| ९ निवडक बाजारभाव | ... ६५ |



# अर्थ

बुधवार, ता. २५ फेब्रुवारी, १९४२


## रेलवे बजेट

सध्या वहातुकीच्या प्रमुख साधनांवर युद्ध परिस्थितीचा विशेष ताण पडत आहे ही गोष्ट सुप्रसिद्ध आहे. युद्धसामुग्रीच्या वहातुकीची मागणी तातडीची असल्यानें हिंदी रेलवेजना इतर बाबी दुय्यम महत्वाच्या समजून ती पुरवणें प्राप्त आहे. हिंदी रेलवेजचें सहाय युद्ध व्यवस्थेच्या संबंधांत किती विस्तृत प्रमाणावर होत आहे ह्याची कल्पना मध्यवर्ती असेंब्लींत वहातुक मंत्री सर अँड्र्यू क्लो ह्यांनीं आपलें पुढील वर्षाचें अंदाजपत्रक सादर करतांना सभासदांस दिली. लढाऊ सामानाची नेआण रेलवेजना करावी लागत आहे, पण पेट्रोलचा पुरवठा मर्यादित झाला असल्याकारणानें त्यांचा उपयोग करण्याची प्रवृत्ति व्यापारी व बिनव्यापारी लोकांत वाढणें स्वाभाविक आहे. देशाबाहेरील रणांगणांवर उपयोगासाठी तातडीनें लागणारे रूळ स्वतःच्या साठ्यामधून आणि कांहीं दुय्यम प्रतीचे लोहमार्ग बंद करून त्यांनीं पुरवले आहेत. चालू सालीं पाचशे मैल लांबीचे रूळ ह्या प्रमाणें काढून टाकून पुरवण्यांत येतील. इंजनें, वाघिणी वगैरे प्रकारचें नवें सामान विकत घेणें दूरच राहून स्वतःच्या जवळची ह्या प्रकारची सामुग्री रेलवेजना युद्धाच्या कामाकरितां द्यावी लागली आहे. त्याचप्रमाणें हुशार व कुशल असे नोकरहि त्याच रीतीनें लढाईच्या कामगिरीवर पाठवावे लागले आहेत. युद्धाबाबतची आपली जबाबदारी रेलवेज ह्याप्रमाणें पार पाडीत असतां त्यांची उत्पन्नखर्चाची परिस्थिति समाधानकारक राहिली आहे हें कर देणाऱ्या जनतेच्या दृष्टीनें भाग्यच समजलें पाहिजे.

युद्धामुळें वहातुकीविषयींच्या गैरसोयी लोकांस सोसाव्या लागणें अपरिहार्य आहे. त्याचप्रमाणें वहातुकीचे दर वाढले आहेत त्यांसहि त्यांनीं तोंड दिलें पाहिजे. तथापि त्याच बरोबर रेल्वेजच्या उत्पन्नांत वाढावा झाला नसता तर वाढत्या युद्ध खर्चाची तरतूद करण्यासाठीं रेल्वेजची प्राप्ती सरकारास मिळाली नसती आणि त्या प्रमाणांत ज्यादा कर लोकांवर बसवावे लागले असते. परंतु वस्तुस्थिती अशी आहे कीं रेल्वेजचें निवळ उत्पन्न चालू साला मूळ अंदाजापेक्षा पुष्कळ अधिक झालें असून येत्या सालच्या अंदाजपत्रकांतहि तितक्याच वाढाव्याचा समावेश करण्यांत आला आहे. हिंदुस्थान सरकारच्या तिजोरीस रेल्वेजच्या उत्पन्नामधून ठराविक प्रमाणांत दरवर्षी रकम दिली जावी अशी योजना अंमलांत आहे. मागें कांहीं वर्षें ही वार्षिक रकम प्रतिकूल सांपत्तिकस्थितीमुळें रेल्वेजकडून सरकारला मिळाली नाहीं. आतां रेल्वेजची निवळ प्राप्ती वाढली असल्यानें ही मागची राहिलेली बाकी तीमधून फेडली जात आहे. ह्या कारणानें सरकारी तिजोरीवरील खर्चाचा ताण हलका होण्यास सहाय होत आहे. म्हणजेच त्यां परत फेडीच्या मानानें नवीन कर व कर्ज ह्यांचें प्रमाण कमी होत आहे. चालू सालच्या म्हणजे १९४१–४२ च्या रेल्वेजच्या हिशेबांत २६ कोटि २० लक्ष रुपयांचा वाढावा निव्वळ आहे. मूळच्या अंदाजाच्या मानानें हा आकडा ११ कोटि, ८३ लक्ष रुपयांनीं अधिक आहे. १९४०-४१ मध्यें जो वाढावा राहिला होता त्यापेक्षां ७ कोटि ७४ लक्षांनीं चालू सालांतला वाढावा ज्यास्त होणार आहे. सरकारी मालकीच्या रेलवजचें वहातुकीचें उत्पन्न १२७ कोटि रुपये भरेल आणि मामुली घसाऱ्याचे सुमारें पावणे तेरा कोटि रुपये धरून खर्च ७३ कोटि रुपये होईल. त्याशिवाय भांडवलावरील व्याजाचें देणें आहे तें दिलें असतां निवळ वाढावा वर सांगितल्याप्रमाणें २६ कोटि रुपयांचा राहील. त्यांतून १९ कोटि रुपये सरकारच्या तिजोरींत त्याच्या देण्याच्या भरपाईसाठी जमा केले जातील आणि ७ कोटि रुपये घसाऱ्याच्या निधींतून मागें उचल केली आहे तिच्या फेडीसाठी देण्यांत येतील. येत्या वर्षाच्या अंदाजपत्रकांत उत्पन्न दीड कोटींनीं कमी धरण्यांत आलें आहे आणि त्याची रकम १२५½ कोटि होईल असा अजमास करण्यांत आला आहे. खर्चाचा अंदाज सुमारें ७० कोटि रुपयांचा आहे आणि अजमासें २८ कोटि रुपये निवळ शिल्लक राहील असा हिशेब करण्यांत आला आहे. ह्या वाढाव्यापैकी २० कोटि रुपये सरकारच्या तिजोरींत जमा होतील आणि बाकीची सुमारें ८ कोटींची रकम घसारा निधींतल्या उचलीची परतफेड करण्याकरितां वापरण्यांत येईल. ह्या रीतीची अंदाजपत्रकाची मांडणी सर अँड्र्यू क्लो ह्यांनीं केली आहे. कंपन्यांच्या मालकीच्या रेलवेज कराराप्रमाणें खरेदी करण्याचें धोरण सरकारनें चालू ठेवलें असून ह्यासाठी जरूर असलेला भांडवली खर्च तें करीत आहे. अलीकडच्या रेलवे खरेदीमुळें उत्तर हिंदुस्थानांतल्या बहुतेक सर्व रेलवेज आतां सरकारच्या मालकीच्या झाल्या आहेत. सरकारच्या ताब्यांतल्या रेलवेजची लांबी १७ हजार मैलांची २४ हजार मैल होईल आणि त्यांवरील सरकारी नोकरांची संख्या १ लक्ष ९० हजारांची पाच लाख होईल. रेलवे खरेदीसाठी २० कोटि आणि सुमारें १४ कोटि रस्त्यांची व रुळांची सुधारणा इत्यादि कामांसाठी ह्याप्रमाणें ३४ कोटि रुपयांच्या भांडवली खर्चाची तरतूद येत्या सालच्या बजेटांत करण्यांत आली आहे.

### डिफेन्स कर्ज

१ फेब्रुवारी, १९४१ रोजीं हिंदुस्थान सरकारनें ३% १९४९-५२ चें दुसरें डिफेन्स लोन काढलें, ते ठराविक किंमतीस केव्हांहि घेतां येत असे. ह्या कर्जाचे रूपानें सरकारास ६० कोटि रुपये मिळाले. सध्याच्या रोखे बाजाराच्या परिस्थितींत ह्या रोख्यांस मागणी नव्हती व सरकारी किंमतीपेक्षा दर शेकडा २ रुपयांनीं स्वस्त तें बाजारांत मिळूं लागलें होतें. परिस्थिति सुधारल्यानंतर सरकार नवें कर्ज जाहीर करील. दुसरें डिफेन्स कर्ज बंद करण्यांत आलें आहे.

## बँक ऑफ महाराष्ट्र

### प्रो. काळे ह्यांचें भाषण

"बँक ऑफ महाराष्ट्र"च्या वार्षिक सभेचे प्रसंगीं बँकेच्या बोर्डाचे अध्यक्ष, प्रो. काळे ह्यांनीं भाषण केलें, त्याचा गोषवारा खालीं दिला आहे:—

"सध्या आपणां सर्वांस अत्यंत जिव्हाळ्याचा प्रश्न म्हटला म्हणजे युद्ध आपल्या दाराशीं ठेपलें असून त्या परिस्थितीस व्यवस्थित रीतीनें तोंड देण्याची तयारी करण्याविषयींचा होय. माझ्या दृष्टीनें जपान आपल्या आजवर झालेल्या चढाईचा फायदा घेऊन कांहीं हिंदी बंदरें व शहरें ह्यांवर बॉंबफेक करील ही भीति आहे, तिच्यापेक्षांहि अधिक भीति लोकांचा घाबरटपणा आणि बेफिकीरपणा व अंतर्गत गडबड ह्यांची आहे. सर्व पक्षांचे पुढारी आणि सरकारी लष्करी व बिनलष्करी अधिकारी ह्या कारणानें लोकांनीं अफवा न पसरवतां व त्यांवर विश्वास न ठेवतां स्वरक्षणाची संघटित व शिस्तीची तजवीज करावी असा उपदेश करीत आहेत. संकट येणार असें समजून आपले नित्याचे व्यवहार जनतेनें शांत चित्तानें चालू ठेवावे आणि त्याच्या प्रतिकारासाठी शिस्तीनें व परस्पर सहायानें व्यवस्था करावी हें अगत्याचें आहे. घाबरटपणानें वागण्यानें आपण इतरांचें व स्वतःचेंहि नुकसान करूं हें सर्वांनीं लक्षांत ठेवून रक्षणाच्या योजनेंत सहकार्य केलें पाहिजे. इंग्लंडमध्यें शत्रूचे विमानहल्ले जोराचे होत असतांहि तेथील बँका व जनता ह्यांनीं आपले धंदे व नित्याचे व्यवहार धिमेपणानें चालू ठेवले आहेत, ह्यापासून हिंदुस्थानांत आपण बोध घेण्याजोगा आहे. गडबडीच्या काळांत पैशाच्या बाबतींत चांगल्या रीतीनें चाललेल्या बँका वास्तविक सुरक्षित आश्रयस्थानें आहेत असें समजलें पाहिजे. त्यांचें सावधगिरीचें धोरण व चोख व्यवहार आणि जनतेचा त्यांवरील विश्वास ह्यांची जोड जमल्यास बँकांची उपयुक्तता निश्चित सिद्ध होते.

"बँक ऑफ महाराष्ट्राच्या ताळेबंदाची छाननी केली असतां बँकांतल्या ठेवींच्या पैशाचा विनियोग कशा रीतीनें केला जावा ह्याविषयींचे ठोकताळे अनेक वर्षांच्या अनुभवानें सर्वमान्य झालेले आहेत त्यांस व रिझर्व्ह बँकेच्या सल्ल्यास सर्वस्वी अनुसरून तिची रोकड, रोख्यांत गुंतवण व कर्जें ह्यांचीं प्रमाणें आहेत असें दिसून येईल. ठेवींचा पैसा पूर्णप्रमाणांत तरता राहील अशी बँकेची भक्कम व्यवस्था आहे. गुंतवणें आणि कर्जें ह्यांची व्यवस्था कसोशीनें केलेली आहे. मुदतबंदी रोख्यांच्या किंमतींत येणाऱ्या तफावतींचा मेळ घालतां येईल ह्या रीतीचे रिझर्व्ह आहेत आणि नफ्यामधून रकमा काढून त्याविषयींची सर्व व्यवस्था केली जाण्यासारखी पूर्ण तयारी आहे. बँकेच्या चालू खर्चाचें एकूण खेळत्या भांडवलाशीं प्रमाण आहे तेंहि योग्य आहे. बँकेचें भांडवल, ठेवी व रिझर्व्ह ह्यांमध्यें आणि तिच्याकडे असलेल्या निरनिराळ्या खात्यांत अभिनंदनीय वाढ होत आहे. केवळ नफा मिळवणें हेंच बँकेचें ध्येय असतां कामा नये. ठेवीदार, भागीदार व पैशाची जरूर असलेली जनता ह्यांच्या गरजा व हितसंबंध ह्यांचा मेळ घालून सुरक्षित व मजबुतीचे व्यवहार चालवणें हें तिचें धोरण असलें पाहिजे. ह्या तत्त्वास अनुसरून व मान्यता पावलेल्या मोठ्या बँकांचा आदर्श पुढें ठेवून आपल्या बँकेचे डायरेक्टर वागत आहेत. जनतेचा विश्वास व सहकार्य आणि मॅनेजर व नोकरवर्ग ह्यांचें कष्टाळूपणाचें काम ह्यांचे योगानेंच महाराष्ट्र बँकेस गेल्या सहा वर्षांत एवढी प्रगति करतां आली आहे. बँक व जनता ह्यांचे संबंध असेच सहकार्याचे व परस्पर विश्वासाचे रहावे असें मी इच्छितों."

## हिंदी रेल्वेजचें अंदाजपत्रक

( लक्ष रुपये )

| | दुरुस्त अंदाज | अंदाज |
|---|---|---|
| वहातुकीचें उत्पन्न | १९४१-४२ | १९४२-४३ |
| ठोक उत्पन्न | १,२७,०० | १,२५,५० |
| व्यवस्थेचा खर्च (घसरा धरून) | ७३,१३ | ७०,७६ |
| ( अ ) निवळ उत्पन्न | ५३,८७ | ५४,७४ |
| इतर | | |
| उत्पन्न | २,५७ | २,९७ |
| खर्च | १,६३ | १,४१ |
| ( ब ) निवळ उत्पन्न | ९४ | १,५६ |
| एकूण निवळ उत्पन्न | ५४,८१ | ५६,३० |
| व्याज | २३,६१ | २८,३५ |
| वाढावा | २६,२१ | २७,९५ |

### महाराष्ट्र बँकेची सहा वर्षांतील प्रगति

| | १९३६ | १९३७ | १९३८ | १९३९ | १९४० | १९४१ |
|---|---|---|---|---|---|---|
| खेळतें भांडवल | ८,२६,४७८ | १३,३९,८७४ | १८,५५,६२७ | २३,१३,३१० | ३०,३९,७७० | ३७,३१,५९० |
| वसूल भांडवल | १,०४,४९५ | १,१२,४४० | १,२५,२८० | १,५१,७२५ | १,८१,२७५ | २,०९,२५० |
| चालू ठेवी | १,६४,५७५ | ३,२४,५२० | ५,५२,६८९ | ६,२७,०८९ | ७,१६,८०८ | १०,२३,६७३ |
| सेव्हिंग्ज ठेवी | ३,२२,४३३ | ५,७२,२५१ | ६,९५,१९१ | ९,४८,९८१ | १३,५६,५११ | १६,४६,४७५ |
| मुदतीच्या ठेवी | २,३३,९१५ | ३,१६,६१५ | ४,५७,५१५ | ५,०७,२७५ | ६,७९,०५५ | ६,९२,७५० |
| दिलेलीं कर्जें | १,९७,६५८ | १,९९,५५१ | ३,२९,८०७ | ३,७०,४८१ | ४,३५,२६५ | ३,०७,२४२ |
| कॅश क्रेडिट्स | ६३,५९९ | ३,००,५२९ | ३,५४,५८५ | ७,०५,६१३ | ८,२२,३६६ | ९,२३,८६८ |
| रोख्यांत गुंतविलेली रकम | ४,८०,४६२ | ६,९८,३६५ | ८,८९,३१६ | ८,८१,५०६ | ११,४६,७४० | १९,१६,५७० |
| निवळ नफा | ६३५ | १३,७५२ | १७,५१५ | १९,२०० | २०,३१२ | २०,४०७ |

## स्फुट-विचार

### सिंगापूरचा प्रसंग व पुढील कार्याची दिशा

मलाया देश जपान्यांनीं चोहोंकडून पद्धतशीर रीतीनें घेरल्याकारणानें सिंगापूरचें ठाणें ब्रिटिशांस शत्रूच्या स्वाधीन करणें कसें भाग पडलें ह्याचा वृत्तांत आतां प्रसिद्ध होत आहे आणि ह्या माहितीनें इंग्लंडमध्यें लोकमतांत खळबळ उडवून दिली आहे. प्रधान मंडळाचें एशियामधील धोरण चुकलें आहे आणि मि. चर्चिल ह्यांनीं आपल्या सहकार्यांच्या घटनेंत महत्वाचे बदल करून जपानचा या रणांगणांत समाचार घेण्याचें सामर्थ्य असलेल्या लढाऊ डावपेचांचा आश्रय तात्काळ करणें अगत्याचें आहे अशा सूचना ब्रिटिश वृत्तपत्रें करीत आहेत. जपानचे एशियांतील विजय आणि ब्रेस्ट बंदरामधून ब्रिटिश चॅनलच्या मार्गानें जर्मन लढाऊ जहाजांचें सुरक्षित पलायन ह्या अनपेक्षित घटनांनीं इंग्लंडमध्यें लोकमतास जोराचा धक्का दिला आहे आणि त्याचा मि. चर्चिल ह्यांचेवर पूर्ण विश्वास आहे तरी त्यांच्या मंत्रिमंडळाची पुनर्घटना व त्यांचें लढाईचें युद्धधोरण ह्यांबद्दलची त्याची तातडीची मागणी आहे. मि. चर्चिल ह्यांनीं सर स्टॅफर्ड क्रिप्स ह्यांस मंत्रिमंडळांत जागा देऊन लॉर्ड बीव्हरब्रुक ह्यांस मोकळें केलें आहे. ही योजना वरील लोकमतास मान दिला जात आहे ह्याचें निदर्शक आहे. सिंगापूरच्या प्रसंगानें व ब्रह्मदेशांत चाललेल्या लढायांमुळें युद्धाचा पल्ला हिंदुस्थानापर्यंत येऊन पोहोचला असल्याविषयीं आतां शंका उरलेली नाहीं. हिंदी महासागरांत गडबड उडवून जपान ह्या देशाविरुद्ध मोहीम चालू करण्यास आतां मागेंपुढें पहाणार नाहीं असें वाटण्यास कारण उत्पन्न झालें आहे. जपानचा रंगूनवर डोळा आहे आणि ब्रह्मदेशांतून चीनला लढाऊ सामुग्रीचा पुरवठा होत आहे तो त्यास बंद पाडावयाचा आहे. ह्या बाबतींत योग्य तजवीज होण्यासाठीं वाटाघाटी करून चिनी व हिंदी फौजा ह्यांचें कार्यक्षम सहकार्य घडवून आणावें ह्या उद्देशानें जनरॅलिसिमो चिआंग काय शेक ह्या देशांत आले होते. त्यांनीं हिंदुस्थानचें सरकार व हिंदी पुढारी ह्यांच्याशीं चर्चा केली आहे, तीवरून जपानची पश्चिमेकडील प्रगति थांबवण्याचे जोराचे प्रयत्न होतील यांत संशय राहिलेला नाहीं. चिनी फौज ब्रह्मदेशांत हिंदी सैनिकांच्या बरोबरीनें आज लढतच आहे. ऑस्ट्रेलियाच्या उत्तर किनाऱ्यावरील मुख्य बंदरावर जपानी विमानांनीं हल्ले केले आहेत, त्यांवरून नैऋत्य पॅसिफिक पूर्णपणानें स्वतःच्या वर्चस्वाखालीं आणण्याची शिकस्त शत्रू करीत आहे हें स्पष्ट दिसतें. ह्या बाजूच्या रणांगणांत चाललेल्या लढायांत विमानांचा तुटवडा ब्रिटिश सेनानींस भासत असून ही उणीव भरून काढण्याचा हरतऱ्हेचा प्रयत्न चालला असल्याचीं आश्वासनें देण्यांत येत आहेत. हिंदुस्थानांतील जनतेनें स्वसंरक्षणाची तयारी पद्धतशीर रीतीनें करण्याचें महत्व सर्वांस आतां पटणें अगत्याचें आहे. लोकांनीं घाबरून न जातां येईल त्या प्रसंगास तोंड देण्याची सिद्धता केली पाहिजे. ह्या संबंधांत संघटनात्मक प्रयत्नांची आवश्यकता असून सरकार व जनता ह्यांचें कार्यक्षम सहकार्य झालें पाहिजे. स्वतःवर प्रसंग येईल तेव्हां पाहूं असें म्हणून चालढकल करण्यासारखी परिस्थिति आतां राहिलेली नाहीं आणि या कामीं बेफिकीरपणा सर्वांसच घातक होईल हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

### प्राप्तीवरील कराविषयींचा ठराव अमान्य

मध्यवर्ती असेंब्लीमध्यें सर अबदुल हलीम गझनवी ह्यांनीं प्राप्तीवरील कराची व्यवस्था पहाणाऱ्या सरकारी खात्याच्या कारभाराविरुद्ध तक्रार करणारा आणि त्यांत महत्वाचे बदल सुचवणारा ठराव पुढें मांडला होता तो मोठ्या बहुमतानें अमान्य झाला. प्राप्तीवरील कर देणारांस योग्य न्याय मिळत नाहीं आणि हिंदी व युरोपिअन कर भरणारांमध्यें भेदाभेद केला जात असल्यानें खात्याच्या निकालाविरुद्ध अपील स्वतंत्र न्यायमंडळाकडे करतां येईल अशी योजना केली जावी हा त्या ठरावाचा आशय होता. सर अबदुल हलीम ह्यांच्या भाषणास उत्तर देतांना सरकारी फडनवीस, सर जेरेमी रेस्मन, ह्यांनीं प्राप्तीवरील कराचा कारभार पहाणाऱ्या खात्यावर करण्यांत आलेल्या अन्यायाबाबतच्या आरोपाचा जोरानें इन्कार केला. ह्या खात्याचें काम किती अवघड असतें आणि कर चुकवूं पहाणाऱ्या श्रीमान् लोकांच्या खटपटी अयशस्वी करणें किती जबाबदारीचें असतें ह्याची कल्पना देऊन आपण ह्या संबंधांतल्या चळवळींस भीक न घालतां कायद्याप्रमाणें आपला कारभार चालवूं असें त्यांनीं निक्षून सांगितलें. विशेषतः सध्यासारख्या युद्धाच्या कठीण परिस्थितींत प्राप्तीवरील कराच्या कारभारावर वजनदार लोकांनीं टीकेचें अस्त्र संघटित रीतीनें सोडावें ह्याविषयीं सर जेरेमी ह्यांनीं निषेध प्रदर्शित करून असेंब्लीनें आपल्या धोरणास पाठिंबा द्यावा अशी विनंति केली. त्यांनीं केलेली तरफदारी प्रभावी ठरून सर अबदुल हलीम ह्यांचा ठराव नामंजूर झाला.

### "कर्ज निवारण कायदा"*

मुंबई सरकारनें शेतकऱ्यांसाठीं केलेल्या १९३९ च्या कर्जफेडीच्या कायद्याचें विवरण करणारें एक पुस्तक रा. ब. दिवाणजी ह्यांनीं इंग्रजी भाषेंत प्रसिद्ध केलें आहे. कायद्याचें संक्षिप्त मराठी विवेचन व कलमवार टीपासह भाषांतर नागपूर येथील सेंट्रल लॉ हाउसनें नुकतेंच प्रसिद्ध केलें आहे. कायद्याच्या संक्षिप्त विवेचनांत शेतकरी ऋणको कोणास म्हणावयाचें, कोणत्या कर्जांस हा कायदा लागू नाहीं, कर्जनिवारण बोर्डाची घटना व अधिकार, अपिलाचा हक्क, अर्ज करण्याची पद्धत, तडजोड, कोर्टांकडील चालू दावे, कर्जांत कपात करण्याचा अनुक्रम, वार्षिक हप्ते, वकील केव्हां देतां येतो, नादारीपणा, इत्यादिविषयीं थोडक्यांत माहिती देण्यांत आली आहे. त्यानंतर कायद्याचा कलमें देऊन प्रत्येक कलमाखालीं टीपा दिलेल्या आहेत. पुस्तकाचे प्रारंभीं विस्तृत अनुक्रमणिका आहे, त्यामुळें पुस्तकाचा उपयोग करणारांची चांगली सोय झाली आहे. कर्जफेडीच्या कायद्याच्या अंमलबजावणीस आतां प्रारंभ होत असल्याकारणानें प्रस्तुत पुस्तकाच्या उपयुक्ततेविषयीं अधिक लिहिण्याची आवश्यकता नाहीं. खेडेगांवांतील अज्ञ लोकांसाठींच म्हणजे कायद्याचा ज्यास फायदा मिळावयाचा आहे, त्यांचेकरितांच हें पुस्तक योजिलेलें आहे.

* पृ. सं. १२२, किं. १ रु. ८ आ. भाषांतरकारः के. रा. प. चिंचळकर वकील, टीपा लेखकः श्री. क. म. देशपांडे वकील, सहायकः श्री. के. वा. गजेंद्रगडकर वकील.

# वेस्टर्न इंडिया

*विमा कंपनी लि. सातारा*

लढाईच्या वावटळींत सुद्धां

## यशाची चढती कमान

सन १९४० पेक्षां
सन १९४१ मध्यें
कामांत

## दोन लक्षांची वाढच !

जनतेच्या विश्वासाचा
प्रचंड पुरावा !

सन १९४१ मध्यें
पुरें झालेलें काम
रु. ६८,४६,१२९.

## महाराष्ट्र बँकेची वार्षिक सभा

वरील बँकेस ३१-१२-४१ अखेर संपलेल्या सहाव्या वर्षी मागील सालांतील शिल्लक नफा ६७४ रु. धरून, एकूण २१,०८२ रुपये नफा झाला. त्यांतून रिझर्व्ह फंडांत ५,१०० रुपये टाकावे, ४,००० रुपये कॉंटिन्जन्सी फंडांत टाकावे, १,००० रुपयांचा संशयित व बुडीत कर्जांकरितां रिझर्व्ह खातीं वर्ग करावे व ७,७५७ रुपयांचा विनियोग ४% करमाफ डिव्हिडंड देण्याकडे करावा अशी बोर्डानें शिफारस केली. चालू वर्षाच्या इनकम टॅक्स व सुपरटॅक्ससाठी २,००० रुपयांची व नोकर वर्गास बोनससाठी १,५०० रुपयांची तरतुद करण्यांत आली असून ७२५ रुपये पुढील हिशेबांत ओढण्यांत यावयाचे आहेत.

बँकेची वार्षिक सभा रविवार, ता. २२ रोजीं सायंकाळीं चार वाजतां बँकेच्या नोंदलेल्या कचेरींत भरली होती. सभेस सुमारें ५० भागीदार उपस्थित होते. बँकेचे मॅनेजर श्री. म. वि. गोखले ह्यांनीं सभेची नोटीस वाचून दाखविल्यानंतर, अध्यक्ष, प्रो. वा. गो. काळे ह्यांच्या सुचनेस अनुसरून ताळेबंद, नफा-तोटा पत्रक व रिपोर्ट हीं सभेंत वाचण्याचें कारण नाहीं असें तिनें ठरविलें. त्यानंतर प्रो. काळे ह्यांनीं बँकेच्या गेल्या वर्षातील प्रगतीचा आढावा घेतला आणि ताळेबंद, नफा तोटा पत्रक व रिपोर्ट ह्यांस सभेनें अनुमति द्यावी असें त्यांनीं सुचविलें त्यास श्री. धोंडूमामा साठे ह्यांनीं अनुमोदन दिलें. डायरेक्टर बोर्डानें सुचविलेलें ४% करमाफ डिव्हिडंड सभेनें मंजूर केलें व निवृत्त होणाऱ्या तिघाहि डायरेक्टरांची फेरनिवड केली. श्री. गो. द. आपटे व मेसर्स कुलकर्णी आणि खानोलकर ह्यांची ऑडिटर्सचे जागीं निवडणूक झाली.

### ब्रह्मदेश

ब्रह्मदेश पूर्वी स्वतंत्र होता, तो तीन ब्रह्मी युद्धानंतर ब्रिटिशांचे ताब्यांत आला. पहिलें युद्ध १८२४ ते १८२६ चाललें व त्यामुळें ब्रह्मदेशाचा थोडा भाग ब्रिटिशांस मिळाला. दुसरें युद्ध १८५२ सालीं झालें त्यामुळें दक्षिण ब्रह्मदेश ब्रिटिशांचे हातीं गेला. १८८५ च्या युद्धानंतर ब्रह्मदेश पूर्णपणें ब्रिटिशांच्या ताब्यांत गेला व तो हिंदुस्थानचा लेफ्टनंट गव्हर्नरचे हाताखालील एक प्रांत बनला. १९२८–३० च्या रॉयल कमिशननें, ब्रह्मी लोकांस विभक्तीकरण मान्य असल्यास ब्रह्मदेश विभक्त करावा, अशी सूचना केली व त्याप्रमाणें नव्या राज्यघटनेनें ब्रह्मदेश हिंदुस्थानापासून विभक्त केला. १९१९ च्या सुधारणाकायद्याच्या अंमलबजावणींतून ब्रम्हदेश मुद्दाम वगळण्यांत आला होता. परंतु मागाहून त्यास सुधारणा कायद्याचीं कलमें लावण्याचें ठरलें व गव्हर्नराच्या प्रांताचा दर्जा त्यास मिळाला. १९३७ सालीं ब्रह्मदेश विभक्त करण्यांत आला. ब्रह्मदेशांतील स्त्रियांचें विशिष्ट स्थान लक्षांत घेऊन त्यांस प्रथमपासून पुरुषांच्या बरोबरीनें मतदानाचा अधिकार देण्यांत आला होता.

ब्रह्मदेशाचें क्षेत्रफळ २,६१,००० चौ. मैल म्हणजे ग्रेट ब्रिटनच्या क्षेत्रफळाचे दुपटीपेक्षा ज्यास्त असून त्याची लोकसंख्या १½ कोटीचे वर आहे. ब्रह्मदेशांतील सर्वांत महत्त्वाची नदी इरावती ही होय. तिची लांबी ८५० मैल असून समुद्रापासून ७८० मैलांपर्यंत तिच्या पात्रांतून आगबोटी जाऊं शकतात. ब्रह्मदेशाची राजधानी, रंगून, हीं रंगून नदीवर समुद्रापासून २१ मैल आंत वसलेली आहे. ब्रह्मी लोक मुख्यतः इंडोचायनीज वंशाचे व बुद्धधर्मी आहेत.

### निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| ३½% बिनमुदत ... ... ... ... | ९०—८ |
| सोनें प्रत्येक तोळ्यास ... ... | ५०—१ |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यांस ... ... | ७७—११ |


## दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल ... ... ... | रु. | २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... ... ... | रु. | १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड ... ... ... | रु. | १,१५,५०,००० |

मुख्य कचेरी : ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

मुंबईमधील शाखा : बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

इतर शाखा : अहमदाबाद ( भद्र, मुख्य ऑफिस ), अहमदाबाद ( एलिस ब्रिज शाखा ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अंधेरी ( मुंबई शेजारीं ), बांद्रे ( मुंबई शेजारीं ), कलकत्ता ( [illegible] स्ट्रीट, मुख्य ऑफिस ), कलकत्ता ( बडा बझार ), कलकत्ता ( चौरंगी स्क्वेअर ), जमशेदपूर, कराची, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत.

लंडन एजन्ट्स : वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

डायरेक्टर्स : सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई, सर जोसेफ के. नाईट, मि. ए. गेडिस, सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई., मि. दिनशा के. दाजी, श्री. रामनिवास रामनारायण.

**करंट डिपॉझिट अकाउंट्स :**

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षा कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमीचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

एजंट:—टी. आर. लालवाणी.



## दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

हेड ऑफिस : पुणें शहर.

स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.

मुंबई शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | : रु. १०,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | : रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | : रु. ४,२५,८५० |
| वसूल झालेलें भांडवल | : रु. २,१२,८४५ |
| एकूण खेळतें भांडवल | : रु. ३३,००,००० |

**डायरेक्टर्स**

प्रो. वा. गो. काळे, अध्यक्ष

| | |
|---|---|
| श्री. धों. कृ. साठे | श्री. मा. रा. जोशी |
| श्री. न. ग. पवार | श्री. श्री. गो. मराठे |
| श्री. त्र्यं. वि. रानडे | श्री. ए. चिं. सोहोनी |
| श्री. वा. पु. वर्दे | मि. फ. वो. पदमजी |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदीविक्री कसोशीनें करून दिली जाते.

बँकेच्या शेअरवर १९४० अखेर पुऱ्या होणाऱ्या वर्षी द. सा. द. शेंकडा ४ टक्के करमाफ डिव्हिडंड दिलें गेलें. बँकेची शेअरविक्री चालू आहे.

म. वि. गोखले
मॅनेजर.

## महायुद्ध दाराशीं आलें
## परदेशी औषधें
## दुर्मिळ व महाग झालीं

पण

**भिण्याचें कारण नाहीं !!!**

— कारण —

## आयुर्वेद रसशाळा पुणें लि०

या देशी औषधांच्या प्रसिद्ध कारखान्यानें तयार केलेलीं

● रक्तवर्धक, ● उपनाह,
● बालजीवन, ● कॅल्सीप्राल

इत्यादि पेटंट, स्टँडर्ड व लोकप्रिय औषधें खात्री पटल्यामुळें

★ डॉक्टर्सहि वापरूं लागले आहेत. ★

दरसाल बिनचूक नफा वाटणाऱ्या ह्या कंपनीचे शेअर्स व औषधें मागवा.

**आयुर्वेद रसशाळा पुणें लि०**

मुख्य दुकान गणपति चौक, लक्ष्मीरोड, पुणें २.

सर्व तऱ्हेची कापड छपाई व रंगाई (Calico Printing and Dyeing) करणारा कारखाना.

## ' पायोनियर डाइंग हाऊस '

कोचाचें कापड (Casement cloth), दाराचे पडदे, टेबल कव्हर इ. टिकाऊ रंगाचे, स्वदेशी तयार मिळतात. कारखानाः—

भिकारदास मारुती रोड, दांतेवाडी, पुणें.

महाराष्ट्रांत लेखी गॅरंटीसह टिकाऊ व मनपसंत

## साईन-बोर्डस्, रबरी शिक्के,

आकर्षक

## सिनेमा स्लाइडस् व पिक्चर पेंटिंग

सतत २० वर्षे विश्वसनीय व वेळेवर मिळण्याचें एकच ठिकाण

## पेन्टर ए. जी. बेडेकर

( मराठी वळणाचे स्पेशॅलिस्ट )

**बुधवार चौक, पुणें २ ( सिटी )**

बाहेरगांवचीं कामें व्यवस्थित व वेळेवर पाठवूं.

# कॉमनवेल्थचा वैभवशाली विस्तार

★ २७ हजारांचेवर पॉलिसी-होल्डर्स
★ एकूण चालू विमे २ कोटीचेवर
★ दोन हजारांहून अधिक कार्यकर्ते निरनिराळ्या प्रांतांत कॉमनवेल्थसाठी उत्साहानें काम करीत आहेत.



हेड ऑफिस बिल्डिंग

# कॉमनवेल्थ

अॅशुअरन्स कंपनी लि.

चेअरमन
* खा. ब. एम्. एन्. मेथा, C. I. E., M. B. E.

अॅक्टिंग ऑफिस सुपरिन्टेंडेंट * एम्. एन्. भागवत, B. A.

' कॉमनवेल्थ ' ची पॉलिसी घेऊन जीवन निश्चिंत व सुखी करा.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीराम् वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ११४।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गानिवास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हशील माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ८ पुणें, बुधवार, तारीख ४ मार्च, १९४२ अंक ९

## न्यायमूर्ति रानड्यांचे
## तीन अप्रसिद्ध लेख प्रसिद्ध झाले

**PLEA FOR PROTECTIONIST POLICY**

**INDIAN SUGAR INDUSTRY**

न्यायमूर्ति रानडे यांनीं १८९९ सालीं 'टाइम्स ऑफ इंडियांत' स्वदेशी साखरेच्या धंद्यासंबंधीं लिहिलेले महत्त्वाचे तीन लेख, प्रो. वा. गो. काळे ह्यांच्या प्रस्तावनेसह प्रसिद्ध करण्यांत आले आहेत.

व्यवस्थापक, 'अर्थ', पुणें ४

ह्या पत्त्यावर आठ आण्यांचीं तिकिटें पाठवून लेखांची प्रत मागवावी.

## श्रीराम सिल्क मिल्स लि., बंगलोर

[ कंपनीनें १९४० अखेर ६ टक्के डिव्हिडंड वांटला आहे. ]

युद्धसाहित्यपुरवठा–खात्याची पॅरेशूटकरितां लागणाऱ्या रेशमी कापडाची ऑर्डर पुरी करण्यासाठी लागणाऱ्या मांडवलाकरितां तूर्त एकूण रु. १ लक्षाच्या रकमेपर्यंत

## ठेवी घेणें आहेत

व्याजाचा दर ४॥ ते ६ टक्के. ठेव किमान रु. ५०० ची असावी. ठेवीवरील व्याज दर सहा महिन्यांनीं दिलें जातें.

श्रीराम सिल्क मिल्स लि., श्रीरामबाग, बसवनगुडी, बंगलोर.

नारायण गोविंद नाईक, ( माजी अध्यक्ष, म्हैसूर चेंबर ऑफ कॉमर्स ) मॅनेजिंग डायरेक्टर

आमच्या कारखान्यांतील माल मुंबईस बॉम्बे स्वदेशी को–ऑपरेटिव्ह स्टोअर्समध्यें व पुण्यास लक्ष्मी रोडवरील रे म्यूझिअमच्या व्यापार–संवर्धन–गृहांत पहा.

## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

वक्तशीर आणि मनपसंत काम करून देणारे

## मोहन वॉच कंपनी

रेग्युलेशन मोफत

कॉमनवेल्थ बिल्डिंगसमोर लक्ष्मी रोड, पुणें २.

**महायुद्धाची जाणीव! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.**

बंबाचे माडीवर

## महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

# विविध माहिती

### सिलोनला अन्नपुरवठा पाहिजे

हिंदुस्थानाकडून कांहीं अन्नपुरवठा मिळविण्याकरितां सिलोन सरकारचे कृषिमंत्रि दिल्लीस आले आहेत.

### न्यूयॉर्क येथें ब्रिटिश सैन्य

कांहीं ब्रिटिश सैन्य न्यूयॉर्क येथें दाखल झालें आहे.

### सुताच्या पुरवठ्याची योजना

विणकऱ्यांना सध्या सुताच्या पुरवठ्याबाबत अतिशय अडचण भासत आहे. कित्येकांनीं सुताचा साठा करून ठेवला आहे, ते वास्तविक गिरणीवाले अथवा व्यापारीहि नाहींत. हिंदुस्थान सरकारनें विणकऱ्यांस सुताचा पुरवठा नीट व्हावा ह्या दृष्टीनें एक योजना केली आहे, तिचे अन्वयें ज्याचे जवळ सरकारी परवाना नाहीं अशा कोणासहि सुताची विक्री करतां येणार नाहीं.

### प्रिन्सिपॉल गाडगीळ ह्यांची नेमणूक

प्रिन्सिपॉल धनंजयराव गाडगीळ ह्यांची रिझर्व्ह बँकेच्या मुंबई विभागाच्या लोकल बोर्डावर नेमणूक झाली आहे. मुंबई, कलकत्ता, दिल्ली, मद्रास व रंगून ह्या पांच विभागाकरितां पांच बोर्डें आहेत. त्या बोर्डांवरील सभासदांपैकी, पांच सभासद तेथें नोंदलेल्या भागिदारांनीं निवडावयाचे असतात व ज्यास्तींत ज्यास्त तिघांची नेमणूक मध्यवर्ती बोर्डाकडून केली जाते. हे तिघेहि रिझर्व्ह बँकेच्या स्थानिक विभागांत नोंदलेले बँकेचे भागीदार असावे लागतात. शेती व सहकार ह्यांच्या हितसंबंधांच्या प्रतिनिधींचा सल्ला बँकेस मिळावा ह्या दृष्टीनें ह्या तिघांची निवड केली जाते. मध्यवर्ती मंडळ ज्या वेळीं व ज्यासंबंधी सल्ला विचारील तो देणें व मध्यवर्ती मंडळ जीं कामें सोपवील तीं करणें, हें लोकल बोर्डाचें कार्यक्षेत्र आहे.

### हवाई हल्ल्याबाबत चौकशी

ऑस्ट्रेलियाच्या डारविन बंदरावर जपाननें हवाई हल्ला केला, त्यासंबंधांत पूर्ण चौकशी करण्याकरितां ऑस्ट्रेलियन सरकारनें कांहीं वरिष्ठ अधिकारी नेमले आहेत.

### अमेरिका-ग्रेट ब्रिटन करार

उसन-उधार पद्धतीनें अमेरिका ग्रेट ब्रिटनला मालाचा पुरवठा करीत आहे. पर्ल बंदरावरील हल्ल्यापासून हा पुरवठा तिपटीनें वाढला आहे. जानेवारी, १९४१ मध्यें ह्या पद्धतीनें ग्रेट ब्रिटनला ४९ कोटि, २० लक्ष डॉलर्सची मदत मिळाली. आतांपर्यंत ग्रेट-ब्रिटनकडे लीज-लेंड पद्धतीनें २०० कोटि रुपयांचा माल आला आहे. ह्या पद्धतीच्या मूळ तत्त्वांस अनुसरून अमेरिका व ग्रेट ब्रिटन ह्यांचेमध्यें नुकताच एक करार झाला आहे.

### दि फेमस इं. कं. लि.

वरील नांवाची एक विमा कंपनी मुंबई येथें नोंदण्यांत आली आहे. कंपनीचें अधिकृत भांडवल २५ लक्ष रुपये असून विक्रीस काढलेलें भांडवल ६ लक्ष रुपये आहे. २½ लाखांचें भांडवल खपल्यावर कंपनी कामास प्रारंभ करील. त्यापैकी ८० हजारांचे भाग मेमोरँडम व आर्टिकल्सवर सही करणारांनीं घेतलेले आहेत. मॅनेजिंग डायरेक्टरास दरमहा १ हजार रुपये पगार ठरला आहे, त्यांत वार्षिक शंभर रुपयांची वाढ होऊन तो १½ हजारांपर्यंत जाईल. नवीन कामाच्या हप्त्यांवर ५% व चालू कामाच्या हप्त्यांवर १½% कमिशनहि त्यांस मिळावयाचें आहे.

### ओगले ग्लास वर्क्स लि.

वरील कंपनीला १९४१ सालअखेर एकूण ३ लक्ष, ३८ हजार रुपये उत्पन्न झालें. नेहेमींचे खर्च वजा टाकून, रौप्य ज्युबिलीचा सर्व खर्च, ३१,२०० रुपयांच्या जुन्या इमारती वगैरे, २५,००० रुपयांची गुडवुइल, २४ हजार रुपयांचा घसारा, इत्यादि लिहून टाकून निवळ नफा ९८,३५६ रुपये राहिला. त्यांतून १० हजार रुपये रिझर्व्ह फंडांत, १५ हजार रुपये डि. ई. फंडांत, २० हजार रुपये बोनससाठी, ३ हजार रुपये औंध संस्थानास रॉयल्टीकरितां, ह्याप्रमाणें तरतूद करून ८% दरानें भागीदारांस डिव्हिडंड देण्याकरितां ४८ हजारांचा विनियोग करण्यांत आला. आतां कंपनीनें विक्रीस काढलेलें ८ लाखांचें भांडवल खपून गेलें आहे.

### अहमदाबाद प्रांतज रेल्वे कं. लि.

वरील कंपनीनें ९% दराचें इंटेरिम डिव्हिडंड जाहीर केलें आहे. किलिक निक्सन आणि कंपनीकडे रेल्वे कंपनीची मॅनेजिंग एजन्सी आहे.

### चेक्सची देवघेव

मुंबई बँकर्स क्लिअरिंग हाउसमध्यें २० फेब्रुवारीअखेर संपलेल्या आठवड्यांत २५ कोटि, ४१ लक्ष रुपयांच्या १,४०,१९० चेक्सची देवघेव झाली.

### बँकांस सुट्टी

मंगळवार, ता. ३ मार्च रोजीं होळीनिमित्त बँकांस सुट्टी आहे.

### कलकत्ता शहरांतील खंदक

कलकत्ता शहरवासीयांचें हवाई हल्ल्यांपासून संरक्षण व्हावें, ह्याकरितां तेथें एकूण ७,६५,३१० फूट लांबीचे खंदक खणण्यांत आले आहेत.

### लोखंड-पोलादाचा तुटवडा

हिंदुस्थानांत लोखंड व पोलाद ह्यांचा फार तुटवडा पडत आहे, तेव्हां कारखान्यांनीं अतिशय काटकसरीनें तें वापरावें; शक्य तेथें त्याचे ऐवजी दुसऱ्या कशाचा तरी उपयोग करावा, असा सल्ला हिंदुस्थान सरकारनें बंगाल गिरणी मालक संघास दिला आहे.

### गिर्यारोहण बंद

हिंदुस्थान सरकारच्या कचेऱ्यांचें येत्या उन्हाळ्यांत सिमल्यास स्थलांतर होणार नाहीं. व्हाइसरॉय व कमांडर इन चीफ हे सुद्धां सिमल्यास जाणार नाहींत.

### ब्रह्मदेशाकडे जाणारें टपाल

रजिस्ट्रेशन, इन्शुरन्स, पार्सल पोस्ट व साध्या मनिऑर्डरी ह्यांबाबतच्या पोस्टाच्या सवलती ब्रह्मदेशाकडे जाणाऱ्या वस्तूंपुरत्या तात्पुरत्या बंद केल्या आहेत. रजिस्टर्ड अथवा इन्शुअर्ड जिन्नस, पार्सल अथवा मनिऑर्डर हीं ब्रह्मदेशाकडे पाठविण्याकरितां स्वीकारण्यांत येणार नाहींत. एअरमेल व टेलिग्राफिक मनिऑर्डरी स्वीकारल्या जातील.

### करवसुली स्थगित करा

ब्रह्मदेशांतील कित्येक लोक देश सोडून गेले आहेत. अशा अनिश्चित परिस्थितींत ब्रह्मी सरकारनें प्राप्तीवरील कर व जमिनीवरील कर वसूल करण्याचें कांहीं काळ स्थगित करावें, अशी विनंति इंडियन मर्चंट्स चेंबरनें ना. अणे यांस तार पाठवून केली आहे.

### निवडक बाजारभाव

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३½% विनमुदत ... | ... | ... | ... | ८६—१२ |
| सोनें प्रत्येक तोळ्यास | | ... | ... | ५१—४ |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यांस | | ... | ... | ८०—० |

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | ६८ | कारचें गियरोहण बंद—दोन मुत्सद्यांचे युद्धविषयक विचार—चीन-हिंदुस्थान सहकार्य—आकडे-शास्त्रविषयक षण्मासिक | |
| २ मध्यवर्ती सरकारचें अंदाजपत्रक ... ... | ६९ | ६ जी. आय. पी. रेल्वे | ७२ |
| ३ डिसेंबरमधील आर्थिक उलाढाली ... ... | ७० | ७ सरकारी प्रॉमिसरी नोटा व स्टॉक सर्टिफिकिटें ... | ७३ |
| ४ लॉर्ड डरहॅम ... ... | ७० | ८ रानडे शतसांवत्सरिक उत्सव | ७३ |
| ५ स्फुट विचार ... ... बाजारभावांच्या चढउतारांचा क्रम—हिंदुस्थान सर- | ७१ | | |


# अर्थ

बुधवार, ता. ४ मार्च, १९४२

## मध्यवर्ती सरकारचें अंदाजपत्रक

वाढत्या युद्धखर्चामुळें येणारी तूट अंशतः भरून काढण्यासाठी हिंदुस्थान सरकारच्या फडनवीसांस कांहींतरी करवाढ करावी लागणार हें सामान्यतः उघडच दिसत होतें. पुढील वर्षी चालू उत्पन्नाच्या बाबींपासून येणारी मिळकतीची रक्कम व्हावयाच्या खर्चापेक्षां ४७ कोटि रुपयांनीं कमी पडेल असा सर जरेमी रेस्मन ह्यांनीं अंदाज केला असून ही तूट भरून निघण्यास सहाय म्हणून कांहीं करांत वाढ सुचवली आहे. योजलेल्या जादा करांचें उत्पन्न १२ कोटि रुपये होईल आणि तुटींतले बाकीचे ३५ कोटि रुपयें सरकारास कर्जाच्या उपायानें उभे करावें लागतील. युद्ध ही बुडीत खर्चाची बाब पण आवश्यक असल्यानें त्याकरितां राष्ट्रीय कर्ज अपरिहार्यच असतें. तथापि, करांचें उत्पन्न होईल तितकें वाढवण्याचा प्रयत्न सरकार करतें, परंतु ह्या उत्पन्नाच्या वाढीस मर्यादा असल्यानें कर्जाचा मार्ग स्वीकारावाच लागतो. करांमध्यें जनतेचा स्वार्थत्याग येतो, आणि त्या विषयींची निरनिराळ्या वर्गांची क्षमता आणि पात्रता हीच करवाढीची मर्यादा होय. वाढवल्या जाणाऱ्या करांची युक्तायुक्तता ह्या प्रकारच्या मापानें मोजावी लागते. प्राप्तीवरील कर, आयात जकाती, पोस्टाचे दर व पेट्रोल किंमत हीं उत्पन्नाच्या वाढींचीं साधनें फडनवीसांनीं योजिलीं आहेत. वार्षिक एक हजार ते दोन हजार उत्पन्न असणाऱ्या लोकांस ७५० रुपयांपेक्षां तें उत्पन्न जेवढ्यानें अधिक असेल तेवढ्या रकमेवर दर रुपयास ६ पै ह्या दरानें प्राप्तीवरील कर द्यावा लागेल. ह्या बाबतींत एक सवलत ठेवण्यांत आली आहे, ती अशी कीं, ही कराची आकारणी होईल तिच्या सवापट रक्कम डिफेन्स सेव्हिंग्ज बँक खात्यांत ठेवली गेल्यास ती युद्ध-समाप्तीनंतर एक वर्षानें काढतां येऊन तिच्यावर अडीच टक्के व्याज मिळेल. प्राप्तीच्या करावर सध्या सरचार्ज आहे त्यांत हप्त्याहप्त्यानें वाढावा करण्यांत आला आहे. त्याचप्रमाणें कॉर्पोरेशन टॅक्स दीड आणा केला जावयाचा आहे. जादा नफ्यावरील कर ६६⅔ टक्के कायम राहील पण ह्या कराच्या रकमेच्या एक-दशांश, कर देणारा तिच्या एक-पंचमांश देईल तर सरकार भरील आणि हा एक-पंचमांश बाजूस काढून ठेवण्यांत येऊन युद्धानंतर परत देण्यांत येईल आणि त्यावर दोन टक्के व्याजहि त्यास मिळेल. अप्रत्यक्ष करांमधील मुख्य वाढ म्हटली म्हणजे आयात जकाती एकपंचमांशानें अधिक केल्या जातील ही होय. पेट्रोल, कपास व मीठ हे सदरहू वाढीस अपवाद आहेत. पोस्टांतून पाठवावयाच्या पत्राच्या तिकिटाचा दर पांच पैशांचा सहा पैसे होईल आणि तारेचा दर १० आण्यांचा १२ आणे होईल.

एक हजार ते दोन हजार रुपये वार्षिक उत्पन्नापैकीं ७५० रुपयांवरील रकमेवर ६ पै दरानें कर देण्याची योजना आहे तिच्या बाबतींत कराच्या सव्वापटीइतकी रकम अडीच टक्के व्याजानें ठेव म्हणून ठेवली जाण्याची सोय आहे ती, लोकांनीं खर्चात बचत करून आपला पैसा सरकारी कर्जात घालावा आणि चलन वाढल्यानें होणाऱ्या बाजारभावांच्या चढीस आळा घालण्यास सरकारास मदत करावी, ह्या हेतूनें देण्यांत आलेली सवलत आहे. उदाहरणार्थ, ज्याची १,२५० रुपये प्राप्ति आहे त्यास ५०० रुपयांवर ६ पै दरानें १५ रु. १० आणे कर द्यावा लागेल. पण त्यानें त्याच्या सवापट म्हणजे दर पंचवीस रुपयांस एक रुपया ह्या प्रमाणांत २० रुपयांची ठेव ठेवल्यास अडीच टक्के व्याज व रकम परत मिळेल, म्हणजे कर माफ होऊन बचत व्याजी राहील. जादा नफ्यावरील कराचे बाबतींत अशाच प्रकारची एक सवलत ठेवण्यांत आली आहे. मोठ्या धंद्यांत नफ्याची बचत होऊन निधि वाढण्यास आणि त्यांचा पुढें भांडवली उपयोग होण्यास सवड मिळावी म्हणून तेथेंहि बचतीची योजना सुचवण्यांत आली आहे. करवाढीच्या ह्या आणि इतर सूचना मध्यवर्ती असेंब्लीच्या लोकनियुक्त सभासदांस रुचल्या नसाव्या असें त्यांनीं काढलेल्या उद्गारांवरून दिसतें. युद्धपरिस्थितीचा आणीबाणीचा प्रसंग लक्षांत घेतां कांहीं करवाढीस मान्यता देणें अखेर त्यांस उचित वाटेल ह्यांत शंका नाहीं. तथापि ज्यापासून सरकारी उत्पन्न फारसें न वाढतां सामान्य जनतेची गैरसोय होते अशा पोस्टाच्या दरांतील वाढीवर असेंब्लींत प्रतिकूल टीका होईल आणि तिचें समाधान फडनवीसांस करावें लागेल. प्राप्तीवरील कराच्या दरांत व सरचार्जमध्यें होणाऱ्या वाढीवरहि अशाच तऱ्हेची टीका झाल्यास त्यांत आश्चर्य नाहीं. असल्या वाढीचा परिणाम धंदे व व्यापार ह्यांवर काय होईल ह्याकडे काळजीपूर्वक पहाणें अगत्याचें आहे.

चालू सालाच्या दुरुस्त अंदाजपत्रकाकडे पाहिलें असतां असें दिसून येतें कीं मूळ अजमासापेक्षा सुमारें १६½ कोटि रुपयांनीं उत्पन्न वाढलें आहे, पण त्या बरोबरच खर्च २० कोटींनीं अधिक झाला आहे. ह्यामुळें वर्षअखेरची तूट १४ कोटींची १७ कोटि रुपये होईल असा रंग आहे. येत्या सालची परिस्थिति खालीं दिलेले आंकडे दर्शवतील:—

| | लक्ष रुपये |
|---|---|
| बिनलष्करी खर्च | ५४०७ |
| संरक्षण खर्च | १३३०० |
| एकूण खर्चाचा अंदाज | १८७०७ |
| चालू करांचें उत्पन्न | १४००० |
| तूट | ४७०० |

## डिसेंबरमधील आर्थिक उलाढाली

(२)

स्वत:साठी आणि साम्राज्य सरकारच्या वतीनें युद्धाप्रीत्यर्थ हिंदुस्थान सरकार दर महिन्यास वीस कोटि रुपये खर्च करीत आहे. एवढा पैसा जनतेमध्यें खारखा खेळत आहे. त्याच्या खर्चीत कांहीं बचत होऊन त्याचा कांहीं भाग सरकाराकडे परत कर्ज व ठेव यांच्या स्वरूपांत आला पाहिजे ही गोष्ट व्हाइसरॉयांनीं आपल्या श्रोत्यांच्या नजरेस आणली आहे. तिच्याच आनुषंगानें ओघानें येणाऱ्या हिंदुस्थान सरकारच्या इंग्लंडमधील कर्जासंबंधाच्या एका महत्त्वाच्या बाबीचा उल्लेख येथें करणें आवश्यक आहे. हिंदी सरकार खर्च करतें ह्या देशांत, पण त्याची भरपाई त्यास साम्राज्य सरकाराकडून मिळते लंडनमध्यें, रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या लंडनमधील शाखेंत. सरकारच्या खात्यावर हा पैसा जमा होतो आणि तो तेथें अल्प मुदतीनें रोख्यांत गुंतवावा लागतो. हिंदुस्थानच्या खात्यावर जमणारा हा पैसा इकडे कसा परत आणावयाचा हा येथें प्रश्न आहे. हिंदुस्थानचा पैसा लंडनमध्यें गुंतविला जाणें म्हणजे हिंदी सरकार तितक्यापुरतें तेथें धनको बनतें. परंतु हिंदुस्थान सरकारनें इंग्लंडमध्यें ब्रिटिश चलनांत परतफेड व्हावयाचीं कोट्यावधि रुपयांचीं कर्जें रेलवेजच्या व इतर भांडवली धंद्यासाठी मागें काढलेलीं असल्याकारणानें तें सरकार लंडनमध्यें ऋणकोहि आहे. त्या कर्जावरील व्याज पौंडांमध्यें इंग्लंडांत द्यावें लागतें आणि त्याबद्दलच्या देण्याची तरतूद रिझर्व्ह बँकेस करावी लागते. हातीं पैसा आला असतां तो कर्जाऊ देण्यापूर्वी त्यानें स्वत: काढलेलीं मागचीं कर्जें कोणीहि व्यवहारज्ञ मनुष्य अगोदर फेडील हें उघड आहे आणि हीच गोष्ट हिंदुस्थान सरकारनें केली आहे. त्याचीं लंडनमधील कर्जें मुदतबंदी व बिनमुदतीचीं अशीं दोन प्रकारांचीं होतीं त्यांपैकीं मुदतबंदी कर्जाची फेड आपल्या लंडनमधील शिलकेंतून गेल्या वर्षी मार्च महिन्यांत सरकारनें केली. ती शिल्लक साम्राज्य सरकारासाठी होणारा युद्ध सामुग्रीवर खर्च त्या देशांत सारखा वाढत असल्यानें पुन्हां फुगल्यामुळें, बिनमुदत कर्जाची फेड करण्याचें सरकारनें ठरवलें आहे.

हीं बिनमुदत विलायती कर्जें, साडेतीन, तीन व अडीच टक्के व्याजाचीं व सुमारें पावणे सोळा कोटि पौंडांचीं आहेत. त्यांची रुपयांत व्यक्त होणारी रकम अजमासें दोनशें दहा कोटि रुपये भरेल. त्यांतले एक कोटि पौंडांचे ३½ टक्के व्याजाचे, सुमारे निम्म्या रकमेचे रोखे ३½ टक्के व्याजाचे व निम्मे ३ टक्के व्याजाचे आहेत. बिनमुदतीच्या कर्जाची फेड करण्याचा हक्क सरकारास आहे. आणि त्याप्रमाणें सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर इंडिया ह्यांनीं ३½ टक्के दराच्या कर्जाची फेड १९४२ च्या जानेवारींत आपण करणार आहों अशी एक वर्षाची नोटीस रोखे धारण करणारांस दिली असून ३ व २½ टक्क्यांचे रोखे लोकांनीं आपल्या स्वाधीन करावे असें ब्रिटिश फडनवीशी खात्यानें त्यांस फर्मविलें आहे. तीन व अडीच टक्के व्याजाचे रोखे फेब्रुवारीच्या प्रारंभीं सरकारच्या हातीं येऊन त्यांचे पैसे मार्चमध्यें दिले जातील. सरकारी हुकुमाच्या तारखेस त्या दोन रोख्यांचे बाजारभाव होते त्या भावांनीं फेड केली जाईल. हिंदुस्थान सरकारनें सवरहू रोखे धारण करणाऱ्या हिंदुस्थानांतील लोकांस ब्रिटिश सरकाराप्रमाणेंच हुकूम काढला आहे. गेल्या वर्षी मुदतबंदी कर्जरोख्यांची फेड सरकारनें केली तेव्हां त्यांच्या मोबदल्यांत नवे हिंदी कर्जरोखे मूळ रोख्यांच्या मुदतीचे व व्याजाचे देण्याची व्यवस्था सरकारनें केली होती. त्या खेपेस नवीन रोखे बदलींत देण्याची तजवीज तूर्त न करण्याचें ठरलें आहे. सध्या तसल्या हिंदी रोख्यांचे बाजारभाव खाली गेले असल्याकारणानें हें धोरण सरकारनें स्वीकारलें असून परिस्थिति अनुकूल होतांच तसे रोखे काढण्यांत येतील असें दिसतें. बिनमुदत रोख्यांच्या फेडीची योजना पुढच्या वर्षी पुरी झाली म्हणजे हिंदुस्थानास बाहेरचें कर्जाचें देणें शिल्लक रहात नाहीं आणि हा देश विलायती कर्जामधून सर्वस्वी मुक्त होईल. (समाप्त)

## लॉर्ड डरहॅम

ब्रिटिश कॉमन्स सभेंतील नुकत्याच झालेल्या हिंदुस्थानविषयक चर्चेचें वेळीं सर पर्सी हॅरिस हे म्हणाले:—" वंशविषयक प्रश्न सोडविण्याचा ब्रिटिश साम्राज्याचा हा पहिलाच प्रसंग नाहीं. कॅनडा व आफ्रिका येथें हा प्रश्न आपणांपुढें उभा होताच. अमेरिकेचें उदाहरण सोडलें, तर बाकी प्रत्येक ठिकाणीं घटनाविषयक प्रश्न सोडविण्यांत आपण यशस्वी झालों आहों. हिंदुस्थानासंबंधींचा प्रश्न सोडविण्यांत फार दिरंगाई करतां कामा नये. कॅनडाविषयक प्रश्न सोडविण्यास आपणांस लॉर्ड डरहॅम उपयोगी पडले तसे दुसरे एकादे डरहॅम हिंदी प्रश्न सोडविण्यास आपणांस मिळणार नाहींत काय ?"

लॉर्ड डरहॅम ह्यांनीं कॅनडाचा प्रश्न कसा सोडविला ? १७८३ सालीं अमेरिकेंतील १३ वसाहतींनीं आपलें स्वातंत्र्य प्रस्थापित केल्यानंतर फक्त कॅनडाची वसाहत ग्रेट ब्रिटनकडे राहिली. अमेरिकन वसाहतींशीं ग्रेट ब्रिटनचें युद्ध झालें, त्यांत ग्रेट ब्रिटनकडून लढलेले लोक ब्रिटिश ताब्यांतील कॅनडाच्या वसाहतींमध्यें स्थाइक होऊं लागले. हे लोक प्रॉटेस्टंट पंथाचे होते; तर कॅनडांतील लोक फ्रेंच व रोमनकॅथॉलिक होते. फ्रेंच कॅथॉलिक व ब्रिटिश प्रॉटेस्टंट ह्यांचेमध्यें लवकरच बखेडे होऊं लागले. ह्यास उपाय म्हणून १७९१ सालीं कॅनडाचे ऑंटरियो व क्विबेक असे दोन भाग करण्यांत आले, परंतु तेथें अमलांत आणलेली प्रातिनिधिक राज्यपद्धति अयशस्वी ठरली व १८३७ सालीं लॉर्ड डरहॅम ह्यांची कॅनडाच्या प्रश्नाचा समाधानकारक निकाल लावण्याचे कामीं योजना झाली. लॉर्ड डरहॅम हे स्वत: कॅनडांत गेले व ब्रिटिश नमुन्याची जबाबदार पद्धति कॅनडांत अमलांत आणण्याचें महत्त्व त्यांनीं आपल्या रिपोर्टांत प्रतिपादन केलें. ह्या रिपोर्टास अनुसरून ब्रिटिश पार्लमेंटनें कॅनडाचे १७९१ सालीं केलेले विभाग रद्द केले व कॅनडाचें एकीकरण केलें. पुढें १८६७ सालीं ब्रिटिश उत्तर अमेरिकेचा विस्तृत कायदा पार्लमेंटनें मंजूर करून कॅनडाच्या राज्यकारभाराविषयक प्रश्न कायमचा सोडविला. लॉर्ड डरहॅम ह्यांच्या रिपोर्टाच्या आधारानें कॅनडांत जें शक्य झालें, तसेंच हिंदुस्थानांतहि होणें शक्य आहे व ह्या दृष्टीनें एक लॉर्ड डरहॅम हिंदुस्थानांत पाठवावा, अशी सर पर्सी हॅरिस ह्यांची सूचना होती.

## स्फुट-विचार

### बाजारभावांच्या चढउतारांचा क्रम

हिंदुस्थानांतील घाउक बाजारभावांच्या चढउतारांची परिस्थिति गेल्या दोन अडीच वर्षांत मागच्या काळाच्या मानानें कशी बदलत आली आहे ह्या विषयींची एकत्रित तुलनात्मक माहिती उपलब्ध झाली आहे ती येथें संक्षेपानें दिली असतां उपयुक्त वाटेल. त्या कल्पनेनें कांहीं ठळक आकडे आम्हीं नमूद करीत आहों. आर्थिक मंदी ह्या देशांत १९३० सालीं चालू झाली तिच्या पूर्वीच्या बाजारभावांच्या मानानें प्रस्तुत युद्धाच्या मागच्या कांहीं वर्षांत बाजारभाव खालावलेले होते. मागील महायुद्धाच्या प्रारंभापूर्वीचे सरासरीचे बाजारभाव १०० होते असें कल्पिलें तर १९२४-२९ ह्या काळांतला आकडा १५२ होता असा हिशेब निघतो. म्हणजे ह्या मुदतींतले बाजारभाव १९१४ च्या मानानें दीडपट होते. पुढें १९३३ मध्यें हें शतमान ८७ झालें. हा आकडा १९३० मध्यें चालू झालेल्या आर्थिक मंदीचा निदर्शक आहे. ही स्थिति थोडी सुधारली तरी १९३९ च्या ऑगस्ट महिन्यांत किंमतीच्या बाजारभावांच्या शतमानाचें प्रमाण १०० च्या वर गेलें नाहीं. १९१४ च्या महायुद्धाचे प्रारंभीं किंमती होत्या तशाच किंमती चालू युद्धाच्या सुरवातीस होत्या हा त्याचा अर्थ आहे. ह्यानंतर कांहीं महिने सट्टयांच्या व्यवहारांमुळें किंमती वर गेल्या आणि युद्धाच्या प्रारंभाच्या महिन्याचे मानानें २९ नीं चढल्या. चढीची ही लाट हळुहळू ओसरून किंमती घटल्या आणि १९४०च्या मध्यास १९३९च्या ऑगस्टपेक्षा केवळ १० टक्क्यांनीं त्या ज्यास्त होत्या. बाजारभावांचें प्रमाण १९४१ च्या आरंभीं आरंभीं स्थिर झाल्या-सारखें दिसलें आणि तें १९३९ च्या मानानें १५ टक्के अधिक होतें. पुढें १९४१ च्या मे महिन्यापासून बाजारभाव चढणीस लागले आणि सप्टेंबरमध्यें ४५ टक्क्यांची वाढ त्यांत झाली. कपाशीसारख्या कच्च्या मालाच्या किंमती मंदीच्या काळाच्या पूर्वीच्या प्रमाणापेक्षा खालीच होत्या, हें विशेष आहे. गहूं व तांदूळ ह्यांचे भाव चढीचे रहाण्याच्या मुळाशीं स्वतंत्र कारणें आहेत तीं प्रसिद्ध आहेत. गेल्या वर्षाच्या अखेरीस खाण्याच्या पदार्थांचे घाउक भाव १९३९ च्या ऑगस्ट महिन्याचे मानानें सुमारें ३० टक्क्यांनीं अधिक होते. कच्च्या मालाच्या किंमती मात्र ५० टक्के व पक्क्या मालाच्या ६४ टक्के वाढल्या.

---

### हिंदुस्थान सरकारचें गिर्यारोहण बंद

नव्या दिल्ली शहराची बांधणी करतांना उन्हाळ्यामध्येंहि हिंदुस्थान सरकारच्या कचेऱ्या राजधानीमध्येंच रहाव्या आणि त्यांस सिमल्याचा चढउतार दर वर्षीं करावा लागूं नये असा हेतु त्या योजनेच्या मुळाशीं होता. वर्षांतून सहा महिने सरकारचें ठाणें हिमालयांत हालवलें गेल्यानें त्याचा लोकमताशीं संबंध तुटतो आणि त्या कामीं खर्च होऊन सर्वांची गैरसोयहि होते अशा आशयाच्या टीकेस उत्तर म्हणून सरकारी कचेऱ्या उन्हाळ्यांतहि नव्या दिल्लींत रहाव्या असा बेत करण्यांत आला होता. तथापि, ह्या कल्पनेस मूर्त स्वरूप देण्याच्या बाबतींत दिरंगाई होत आली आहे. कांहीं सरकारी कचेऱ्या दिल्लीस ठेवाव्याच्या आणि कांहीं सिमल्यास हालवाव्याच्या असा प्रकार मध्यंतरीं चाललेला होता. अलीकडे युद्धामुळें सरकारी कचेऱ्या, अधिकारी व नोकर ह्यांच्या संख्येंत बेसुमार विस्तार झाला असून त्यांच्या रहाण्याची व्यवस्था करणें कठिण झालें आहे. सिमला येथें तर ही गैरसोय विशेषच आहे. युद्धामुळें रेल्वेजची वहातुक मर्यादित करण्याची आवश्यकता तातडीची झाली आहे आणि हिंदुस्थान सरकारचे मंत्रि व मुख्य अधिकारी दिल्लीमध्यें कायमचे राहणेंहि अपरिहार्य आहे. सध्यांची एकूण परिस्थिति लक्षांत घेऊन यंदा सरकारनें आपलें गिर्यारोहण बंद ठेवलें असल्याचें प्रसिद्ध केलें आहे. जागेच्या अभावीं कांहीं किरकोळ कचेऱ्यांचें सिमल्यास उन्हाळ्यांत स्थलांतर होईल, पण मुख्य सरकारी कचेऱ्या व अधिकारी दिल्लीमध्येंच रहाणार आहेत, ही घोषणा योग्य अशीच आहे. तिला अनुसरून व्यवस्था करण्याचें ठरलें नसतें, तर तेंच आश्चर्यमूलक टीकेस कारण झालें असतें. युद्धाच्या आणीबाणीच्या परिस्थितींत मध्यवर्ती सरकारचें ठाणें राजधानींतच संबंध वर्षभर राहणें अगत्याचें आहे. खर्च, औचित्य व कारभाराची कार्यक्षमता ह्यांच्या तिहेरी दृष्टीनें पाहिलें असतां हाच सरळ सिद्धांत निघतो.

---

### दोन मुत्सद्यांचे युद्धविषयक विचार

पॅसिफिक महासागराच्या क्षेत्रांत जपानचें आक्रमण झपाट्यानें होऊन लोकशाही राष्ट्रांस माघार घ्यावी लागल्यानें इंग्लंड व अमेरिका ह्या देशांत आणि सिंगापूरच्या खेदजनक प्रसंगामुळें विशेषतः इंग्लंडमध्यें मंत्रिमंडळावर टीकेचा भडिमार झाला. ब्रिटिश मंत्र्यांमध्यें कार्यक्षमता व तडफ ह्यांचा अभाव असल्यानें मि. चर्चिल ह्यांनीं आपले सहकारी बदलावे अशी मागणी करण्यांत आली. ती स्वीकारून ब्रिटिश मुख्य प्रधानांनीं आपल्या मंत्रिमंडळाची पुनर्घटना केली असून युद्धपरिस्थितीविषयीं मोकळ्या मनानें निवेदन केलें. अनेक रणक्षेत्रांत लढाऊ सामुग्री एकाच वेळीं पुरवावी लागल्यानें आणि रशियास हें सहाय देणें अगत्याचें असल्यानें मलायाच्या बाजूस विमानें भरपूर पुरवणें शक्य झालें नाहीं; सध्या युद्धपरिस्थिति प्रतिकूल झाली आहे हें कबूल केलें पाहिजे; पण रशियाचे अलीकडचे पराक्रम आणि अमेरिकेचें अपूर्व सहकार्य ह्या दोन गोष्टी अत्यंत उत्तेजनकारक आहेत. मि. चर्चिल ह्यांच्या भाषणाचा थोडक्यांत वरीलप्रमाणें सारांश आहे. प्रस्तुत युद्धाकडे दूरदृष्टीनें पाहिलें असतां आशेला भरपूर जागा आहे. कारण इंग्लंड, अमेरिका, चीन व ईस्ट इंडीज ह्यांचे एकत्रित युद्धप्रयत्न फलद्रूप होण्यास थोडा काळ लोटावा लागेल; ह्या अवधींत इंग्लंडमध्यें लोकांनीं एकदिलानें, नेटानें व निश्चयानें आपापलीं युद्धकार्यें चालू ठेवलीं पाहिजेत असा त्यांनीं संदेश दिला. कॉमन्स सभेंत सरकारी धोरणावर पुष्कळ टीका झाली तरी सर स्टॅफर्ड क्रिप्स ह्यांनीं मंत्रिमंडळाच्या वतीनें उत्तरादाखल भाषण केलें, त्यानें ब्रिटिश वृत्तपत्रांचें, बरेंच सांत्वन झालें असल्याचें त्यांच्या उद्गारांवरून दिसतें. युद्धधोरणांत नवा जोम व धडाडी उत्पन्न होण्याची आशा त्यांस वाटूं लागली आहे. प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांनीं युद्धपरिस्थितीचें पर्यालोचन नुकतेंच केलें, त्यांत अटलांटिक, पॅसिफिक व हिंदी महासागर ह्यांचेमध्यें शत्रूच्या आघातांचा प्रतिकार करून इंग्लंड, रशिया व चीन ह्यांस युद्धसामुग्री पुरवण्याचा आपला कृतनिश्चय त्यांनीं व्यक्त केला. नवीन जहाजें, विमानें, चिलखती गाड्या इत्यादि सामुग्रीची प्रचंड योजना आपण आखली आहे ती पुरी करून जपानचा पूर्ण पाडाव केल्यावांचून

अमेरिकन राष्ट्र रहाणार नाहीं अशी प्रतिज्ञा त्यांनीं केली. मि. रूझवेल्ट व मि. चर्चिल ह्यांच्या भाषणांत तत्त्वतः कितीतरी साम्य आहे. सध्याच्या प्रतिकूल परिस्थितीमधूनच विजयाचा मार्ग काढला पाहिजे आणि तो निश्चित निघणार असें दोघांनींहि स्पष्ट बोलून दाखवलें आहे.

---

### चीन-हिंदुस्थान सहकार्य

जनरॅलिसिमो आणि मॅडम चिआंग काय शेक ह्यांनीं ह्या देशांत येऊन हिंदुस्थान सरकारचे प्रतिनिधि व लोकांचे पुढारी ह्यांच्याशीं विचारविनिमय केला. त्याचे दीर्घगामी व महत्त्वाचे परिणाम स्पष्ट दिसूं लागले आहेत. जपानचा पाडाव होण्यास ब्रह्मदेशाच्या बाजूस चिनी व हिंदी सैन्यांनीं एकत्र लढण्याचें महत्त्व किती आहे ह्याची जाणीव त्यांनीं हिंदुस्थान सरकारास करून दिली असली पाहिजे. रंगूनच्या मार्गानें व बर्मारोडनें चीनला जाणारी युद्धसामुग्री तोडणें व त्या देशास असहाय करून टाकणें हा जपानचा प्रस्तुत उद्देश आहे. हिंदुस्थान व चीन ह्यांस जोडणारा नवीन रस्ता चालू करणें आणि हिंदी व चिनी फौजांच्या सहकार्याची व्यवस्था ब्रह्मदेशाच्या बचावासाठी अंमलांत आणणें हा जनरॅलिसिमो चिआंग काय शेक ह्यांच्या हिंदी अधिकाऱ्यांशीं झालेल्या वाटाघाटींचा मुख्य विषय असला पाहिजे. हिंदुस्थान व चीन ह्या देशांचें सांस्कृतिक साम्य व हजारों वर्षांचे परस्पर-स्नेहाचे संबंध आणि जपान व जर्मनी ह्यांच्या राक्षसी महत्त्वाकांक्षेपासून राष्ट्रीय स्वातंत्र्य वाचवण्याचें दोघांस वाटत असलेलें अगत्य ह्यांचें दृष्टीनें चालू युद्धांत हिंदी लोकांनीं चिनी राष्ट्राशीं पूर्ण सहकार्य करण्याची आवश्यकता जनरॅलिसिमो व त्यांच्या पत्नी ह्यांनीं मोठ्या कळकळीनें प्रतिपादली आहे. ब्रिटिश सरकारासहि त्यांनीं 'हिंदुस्थानचें युद्धकार्य अधिक उत्साहानें होण्यासाठी स्वीकारावयाच्या प्रगतिपर धोरणासंबंधानें सूचना केली आहे. चिनी फौजा ब्रह्मदेशांत जपान विरुद्ध लढत असून थायलंड, सयाम व चीन ह्यांच्या सरहद्दीवर त्या शत्रूचा प्रतिकार करीत आहेत. येत्या सातव्या तारखेस " चीन-दिन " ह्या देशांत पाळ्ण्यांत येणार आहे, त्याचा उद्देश हिंदुस्थान व चीन ह्या राष्ट्रांच्या सहकार्यास दृढता आणावी हाच आहे. प्रस्तुत युद्धांत आणि जगाच्या पुढील इतिहासांत चिनी जनरॅलिसिमो ह्यांची हिंदुस्थानास भेट हा अत्यंत महत्त्वाचा प्रसंग गणला जाईल ह्यांत संशय नाहीं.

---

### आकडेशास्त्रविषयक षण्मासिक

मुंबई येथील सिडनहॅम कॉलेजच्या स्टॅटिस्टिकल सोसायटीनें आकडे शास्त्रविषयक एक षण्मासिक सुरू केलें आहे. कॉलेजांतील तरुण संशोधक विद्यार्थ्यांचे आकडेशास्त्रविषयक उद्बोधक लेख प्रसिद्ध करणें व आकडेशास्त्रासंबंधीं महत्त्वाचे नवे प्रबंध सोप्या भाषेंत विद्यार्थ्यांस समजावून सांगणें, हा त्याचा उद्देश आहे. प्रो. संकपाळ हे त्याचे संपादक आहेत. पेट्रोल रेशनिंगचा मुंबईमधील शहरांतील वहातुकीवर परिणाम हा प्रो. संकपाळ ह्यांचा लेख मागेंच स्वतंत्रपणें प्रसिद्ध झाला होता व त्याची माहिती "अर्थ"मध्यें देण्यांत आली होती. प्रो.संकपाळ ह्यांच्या आकड्यांवरून, पेट्रोल रेशनिंगनंतर भाड्याच्या मोटारींची संख्या फारशी घटलेली नाहीं, असें अनुमान डॉ. एस. आर. सबूर ह्यांनीं आपल्या छोट्या लेखांत काढलें आहे. मनुष्याच्या सर्वांगीण आयुष्यक्रमाविषयींच्या आकडेवार माहितीचें महत्त्व प्रो. दिवाण ह्यांनीं वर्णिलें आहे व शेवटीं प्रो. संकपाळ ह्यांचा मुंबई शहराच्या लोकसंख्येच्या अजमासासंबंधींचा लेख दिलेला आहे. षण्मासिकाचा हा उपक्रम स्तुत्य आहे.

---

### जी. आय. पी. रेल्वे

जुनी गॅरंटीड कंपनीची रेल्वे लाइन व इंडियन मिडलंड रेल्वे कंपनीची रेल्वे लाइन मिळून ग्रेट इंडियन पेनिनशुला रेल्वे बनलेली आहे. बोरीबंदर ते ठाणें हा तिचा २१ मैलांचा फाटा प्रथम १८५३ मध्यें तयार झाला व ठाणें ते कल्याण हा फाटा १८५४ मध्यें वहातुकीस खुला झाला. कल्याण ते पुणें हा मार्ग कसकसा तयार होत गेला, ह्याची माहिती खाली दिली आहे:—

कल्याण ते कर्जत: १८५६
पळसदरी ते खंडाळा: १८६३
खंडाळा ते पुणें: १८५८

म्हणजे, घाटामधील रस्ता सुरू होण्यापूर्वी मुंबई ते कर्जत व खंडाळा ते पुणें वहातुकीस प्रारंभ झाला. पळसदरी ते खोपोली हा फाटा १८५६ सालींच तयार झाला.

जी. आय. पी. रेल्वेवरील सर्वांत बारीक त्रिज्येचें वळण बोरघाटांत ७५ आणि ७६ ह्या मैलांचें दरम्यान आहे. ह्या वळणाची त्रिज्या ९९० फूट आहे. घाटांतील उतार साधरणतः ३७ फुटांत १ फूट इतका आहे.


गरीब श्रीमंतीचा झगडा केव्हां संपेल

# संगम

नवयुग चित्र

भूमिका: मीनाक्षी, वत्सला कुमठेकर, साळवी, दामुअण्णा मालवणकर, जोग, विनायक

नवयुग चित्र

## ११ वा आठवडा

निर्माते:—विनायक.
लेखक:—खांडेकर
दिग्दर्शक:—जुन्नरकर

मिनर्व्हा—पुणें

रोज :—६॥ व १० वा.
शनि. रवि. सोम. मंगळ जादा खेळ ३। वा.

## सरकारी प्रॉमिसरी नोटा व स्टॉक सर्टिफिकिटें

"तुमचे सरकारी रोखे स्टॉकच्या स्वरूपांत ठेवणें सध्याच्या परिस्थितींत सर्वांत सुरक्षित आहे. पब्लिक डेट ऑफिस आपल्या प्रॉमिसरी नोटांचें स्टॉक सर्टिफिकेटसूमध्यें रूपांतर विनामूल्य करून देईल. त्यानंतर वॉरंटसूच्या स्वरूपांत व्याज दिलें जाईल. स्टॉकचें प्रॉमिसरी नोटांत पुनः रूपांतर मालकाच्या इच्छेनुरूप केव्हांहि करतां येईल व त्याबाबत फी आकारली जाणार नाहीं." रिझर्व्ह बँकेनें वरील प्रकारची जाहीर सूचना जनतेस केली आहे, तिचें जरा स्पष्टीकरण करणें आवश्यक आहे. हिंदी सरकारी कर्जरोखे मुख्यतः दोन प्रकारचे आहेत: (१) प्रॉमिसरी नोटा व (२) स्टॉक. स्टॉकचे स्वरूपांत कर्जरोखा धारण करणारास तो अमूक रुपयांच्या कर्जाचा मालक असल्याविषयींचें एक स्टॉक सर्टिफिकेट देण्यांत येतें. मालकाचें नांव पब्लिक डेट ऑफिसमध्यें नोंदलेलें असतें, तेव्हां स्टॉक विकल्यानें केवळ त्यावरील मालकीहक्क बदलत नाहीं. हा बदल पब्लिक डेट ऑफिसमध्यें नोंदला गेला पाहिजे. ह्याचा अर्थ, स्टॉक धारण करणारा निर्धास्त असूं शकतो. कारण, सर्टिफिकेट चोरीस गेलें अगर जळालें तरी त्याचा कर्जरोख्यावरील मालकीहक्क नाहींसा होत नाहीं. बिगर मालकाचे हातीं स्टॉक सर्टिफिकेट पडलें तरी त्यास त्याचा कांहीं उपयोग नाहीं; मूळ मालकास मात्र नवें सर्टिफिकेट मिळूं शकतें. सर्टिफिकेट दुसऱ्याचें नांवानें करावयाचें असलें तर त्यांतहि अडचण नसते. त्याबाबत छापील फॉर्म मिळतात. स्टॉक सर्टिफिकेटांवरील व्याज वॉरंटसच्या स्वरूपांत दिलें जातें व ह्या वॉरंटसचे आपण लिहून द्यावें त्या तिजोरींतून पैसे मिळूं शकतात. वरील वर्णनावरून, स्टॉक सर्टिफिकेटसचा सुरक्षितपणा स्पष्ट होईल. प्रॉमिसरी नोटांची देवघेव त्यांचे पाठीवर केवळ सही केल्यानें होऊं शकते व नोटेवरील व्याज घेतांना प्रॉमिसरी नोट दाखल करावी लागते. खोटी सही करण्याची तयारी असणाऱ्या व फौजदारीस तोंड देण्यास तयार असणाऱ्या मनुष्याचे हातीं प्रॉमिसरी नोटा पडणें धोक्याचें आहे. स्टॉक सर्टिफिकेटस् त्या मानानें अगदीं निर्धास्त आहेत. स्टॉक सर्टिफिकेटसूपेक्षा प्रॉमिसरी नोटाच अधिक लोकप्रिय आहेत. सध्याच्या युद्धपरिस्थितींत लोकांनीं आपल्या सरकारी प्रॉमिसरी नोटांचें रूपांतर स्टॉक सर्टिफिकेटांत करून घ्यावें, अशी रिझर्व्ह बँकेची सूचना आहे. पुढें पुनः त्यांचें प्रॉमिसरी नोटांत रूपांतर करतांना रिझर्व्ह बँक फी घेणार नाहीं असें तिनें जाहीर केलें आहे.

## नाशिक कॉलेजांत रानडे शतसांवत्सरिक उत्सव

मुं. प्रां. सहकारी बँकेचे मॅनेजिंग डायरेक्टर, श्री. वैकुंठराय मेहता, ह्यांनीं ता. ८ फेब्रुवारी रोजीं नाशिक येथील एच. पी. टी. कॉलेजांतील इतिहास व अर्थशास्त्रविषयक असोसिएशनमध्यें रानडे शतसांवत्सरिक दिनाचें प्रसंगानें न्यायमूर्तींच्या तैलचित्राचें अनावरण केलें. त्यावेळीं प्रिन्सिपॉल टी. ए. कुलकर्णी हे अध्यक्षस्थानीं होते. श्री. मेहता हे कै. ना. गोखल्यांचे शिष्य असल्याचें अध्यक्षांनीं आपल्या प्रास्ताविक भाषणांत सांगितलें. रानड्यांचें तैलचित्र रा. ब. जी. व्ही. प्रधान ह्यांनीं असोसिएशनला नजर केलेलें आहे. श्री. मेहता ह्यांनीं आपल्या भाषणांत रानड्यांच्या थोरवीचें व कामगिरीचें मुद्देसूदपणें वर्णन केलें. नाशिक येथील न्यू हायस्कूल व सरस्वती विद्यालय ह्या संस्थांच्या द्वितीय वार्षिक स्नेहसंमेलनाचा बक्षिस समारंभहि श्री. मेहता ह्यांचे हस्तें पार पडला. शिक्षणक्रम संपवून बाहेर पडलेला विद्यार्थी व्यवहारांतील जबाबदाऱ्या पार पडण्यास समर्थ असणें व उत्तम नागरिक बनणें कसें जरूर आहे, हें त्यांनीं आपल्या भाषणांत स्पष्ट करून सांगितलें.


मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् को-ऑपरेटिव् बँक, लिमिटेड.

(सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली)

स्थापना १९११.

मुख्य कचेरी–सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंग
९, बेक हाउस लेन, कोट मुंबई.

शाखा

| | |
|---|---|
| १ बारामती (जि. पुणें) | १८ अकलूज (जि. सोलापूर) |
| २ सातारा („ सातारा) | १९ विरमगांव („ अहमदाबाद) |
| ३ इस्लामपूर („ „) | २० धुळें („ प. खानदेश) |
| ४ कऱ्हाड („ „) | २१ दोंडाईचें („ „) |
| ५ तासगांव („ „) | २२ शिरपूर („ „) |
| ६ किर्लोस्करवाडी(„ „) | २३ शहादें („ „) |
| ७ शिराळें („ „) | २४ नंदुरबार („ „) |
| ८ कोरेगांव („ „) | २५ साक्री („ „) |
| ९ वाई („ „) | २६ शिंदखेडें („ „) |
| १० अहमदनगर („ अहमदनगर) | २७ तळोदें („ „) |
| ११ शेवगांव („ „) | २८ मालेगांव („ नाशिक) |
| १२ कोपरगांव („ „) | २९ सटाणा („ „) |
| १३ बेलापूर („ „) | ३० कळवण („ „) |
| १४ राहुरी („ „) | ३१ लासलगांव („ „) |
| १५ भिवंडी („ ठाणें) | ३२ नांदगांव („ „) |
| १६ पालघर („ „) | ३३ दोहद („ पंचमहाल) |
| १७ कल्याण („ „) | ३४ कालोल („ „) |

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेडऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.

महायुद्ध दाराशीं आलें
परदेशी औषधें
दुर्मिळ व महाग झालीं
पण
भिण्याचें कारण नाहीं !!!
— कारण —
आयुर्वेद रसशाळा पुणें लि०
या देशी औषधांच्या प्रसिद्ध कारखान्यानें
तयार केलेलीं
● रक्तवर्धक, ● उपनाह,
● बालजीवन, ● कॅल्सीप्राल
इत्यादि पेटंट, स्टँडर्ड व लोकप्रिय औषधें खात्री पटल्यामुळें
★ डॉक्टर्सहि वापरूं लागले आहेत. ★
दरसाल बिनचूक नफा वाटणाऱ्या ह्या कंपनीचे
शेअर्स व औषधें मागवा.
आयुर्वेद रसशाळा पुणें लि०
मुख्य दुकान गणपति चौक, लक्ष्मीरोड, पुणें २.

सर्व तऱ्हेची कापड छपाई व रंगाई (Calico Printing and Dyeing) करणारा कारखाना.
' पायोनियर डाइंग हाऊस '
कोचाचें कापड (Casement cloth), दाराचे पडदे, टेबल कव्हर इ. टिकाऊ रंगाचे, स्वदेशी तयार मिळतात. कारखानाः—
भिकारदास मारुती रोड, दातेवाडी, पुणें.

महाराष्ट्रांत लेखी गॅरंटीसह टिकाऊ व मनपसंत
साईन-बोर्डस्, रबरी शिक्के,
आकर्षक
सिनेमा स्लाइडस् व पिक्चर पेंटिंग
सतत २० वर्षे विश्वसनीय व वेळेवर मिळण्याचें
एकच ठिकाण
पेन्टर ए. जी. बेडेकर
( मराठी वळणाचे स्पेशॅलिस्ट )
बुधवार चौक, पुणें २ ( सिटी )
बाहेरगांवचीं कामें व्यवस्थित व वेळेवर पाठवूं.

कॉमनवेल्थचा वैभवशाली विस्तार
★ २७ हजारांचेवर पॉलिसी–होल्डर्स
★ एकूण चालू विमे २ कोटीचेवर
★ दोन हजारांहून अधिक कार्यकर्ते निरनिराळया प्रांतांत कॉमनवेल्थसाठी उत्साहानें काम करीत आहेत.


हेड ऑफिस बिल्डिंग

कॉमनवेल्थ
अॅशुअरन्स कंपनी लि.
THE COMMONWEALTH ASSURANCE CO. LTD. POONA CITY

चेअरमन
★ खा. ब. एम्. एन्. मेथा, C. I. E., M. B. E.

ॲक्टिंग ऑफिस सुपरिन्टेंडेंट ★ एम्. एन्. भागवत, B. A.

' कॉमनवेल्थ ' ची पॉलिसी घेऊन जीवन निश्चिंत व सुखी करा.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा प. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं ' दुर्गाधिवास, ' भांबुर्डा, प. नं. १२७।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.

खालील पत्त्यावर चौकशी करावी.

व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.

वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ८ पुणें, बुधवार, तारीख ११ मार्च, १९४२ अंक १०

## न्यायमूर्ति रानड्यांचे
## तीन अप्रसिद्ध लेख प्रसिद्ध झाले

**PLEA FOR PROTECTIONIST POLICY**

**INDIAN SUGAR INDUSTRY**

न्यायमूर्ति रानडे यांनीं १८९९ सालीं ' टाइम्स ऑफ इंडियांत ' स्वदेशी साखरेच्या धंद्यासंबंधीं लिहिलेले महत्त्वाचे तीन लेख, प्रो. वा. गो. काळे ह्यांच्या प्रस्तावनेसह प्रसिद्ध करण्यांत आले आहेत.

व्यवस्थापक, ' अर्थ ', पुणें ४

ह्या पत्त्यावर आठ आण्यांचीं तिकिटें पाठवून लेखांची प्रत मागवावी.

## श्रीराम सिल्क मिल्स लि., बंगलोर

[ कंपनीनें १९४० अखेर ६ टक्के डिव्हिडंड वांटला आहे. ]

युद्धसाहित्यपुरवठा–खात्याची पॅरेशूटकरितां लागणाऱ्या रेशमी कापडाची ऑर्डर पुरी करण्यासाठी लागणाऱ्या भांडवलाकरितां तूर्त एकूण रु. १ लक्षाच्या रकमेपर्यंत

## ठेवी घेणें आहेत

व्याजाचा दर ४॥ ते ६ टक्के. ठेव किमान रु. ५०० ची असावी. ठेवीवरील व्याज दर सहा महिन्यांनीं दिलें जातें.

श्रीराम सिल्क मिल्स लि.,
श्रीरामबाग,
बसवनगुडी, बंगलोर.

नारायण गोविंद नाईक,
( माजी अध्यक्ष, म्हैसूर चेंबर ऑफ कॉमर्स ) मॅनेजिंग डायरेक्टर

आमच्या कारखान्यांतील माल मुंबईस बॉम्बे स्वदेशी को–ऑपरेटिव्ह स्टोअर्समध्यें व पुण्यास लक्ष्मी रोडवरील रे म्यूझिअमच्या व्यापार–संवर्धन–गृहांत पहा.

## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

## वक्तशीर आणि मनपसंत काम करून देणारे
## मोहन वॉच कंपनी

रेग्युलेशन मोफत

कॉमनवेल्थ बिल्डिंगसमोर लक्ष्मी रोड, पुणें २.

**महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.**

बंबाचे माडीवर

# महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

# विविध माहिती

### इंडियन फार्मिंग

वरील नांवाचें मासिक इंपीरिअल कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्चमार्फत प्रसिद्ध होतें. त्यांत सामान्य जनतेस समजेल अशा सोप्या इंग्रजींत लेख प्रसिद्ध होतात. चित्रेंहि भरपूर असतात. मासिकास ८७० वर्गणीदार आहेत. दर अंकाच्या ७५ प्रती फुटकळ खपतात. २२५ प्रती दुसऱ्या मासिकांचेकडे बदली जातात व १२२ प्रती मोफत धाडण्यांत येतात.

### कोल्ड स्टोरेजमधील संत्रीं

लढकी येथील कोल्ड स्टोरेजमधील प्रयोगांवरून असें दिसून येतें, कीं नागपुरी संत्रीं ४०° फॅरनहीट उष्णतामानांत तीन महिने टिकूं शकतात, परंतु तीं नंतर थंडगार रेल्वे वॅगन्समधून पाठविलीं नाहींत, तर संत्र्यांस थोडासा आंबुस वास येऊं लागतो. काश्मिरी सफरचंदें चार महिनेपर्यंत ३२° फॅरनहीटमध्यें चांगलीं टिकतात. लिंबें ५२° फॅरनहीटमध्यें एक महिनाभर ठेवलीं तर त्यांस चांगला रंग येतो.

### ग्रेटब्रिटनमधील अन्न पुरवठा

१९४० च्या अखेरच्या मानानें १९४१ अखेर ग्रेट ब्रिटनमधील अन्नाचा साठा शेकडा ३० टक्क्यांनीं अधिक होता असें अधिकृत रीत्या जाहीर झालें आहे.

### ट्रेझरी बिलांवर १ रु. ० आ. ९ पै व्याजाचा दर

गेल्या आठवड्यांत रिझर्व्ह बँकेनें हिंदुस्थान सरकारचीं २ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा सरासरी दर दु. सा. द. शे. १ रु. ० आ. ९ पै इतका पडला.

### ब्रिटानिया बिस्किट कं. लि.

वरील कंपनीचें भांडवल १२½ लक्ष रुपये असून तिचे रिझर्व्ह ४ लक्ष, १५½ हजारांचे आहेत, ११½ लाखांचीं देणीं आहेत, ७½ लाखांचीं येणीं आहेत. ३० सप्टेंबर १९४१ संपलेल्या सहामाहींत कंपनीला निव्वळ नफा ३ लक्ष, ३७½ हजार रुपये झाला, त्यापूर्वीच्या सहामाहींत तो १ लक्ष, ४२½ हजार रुपये होता, अहवालाचे सहामाहींत कंपनीला सरकारी ऑर्डरी मोठ्या प्रमाणावर मिळाल्या, त्यामुळें तिचे कलकत्ता व मुंबई येथील कारखाने रात्रंदिवस चालू होते व चालू सहामाहींतहि ते तसेच चालू रहातील.

### हिंदू-मुस्लिम ऐक्यासाठी बजेटांत तरतूद

हिंदू-मुस्लिम ऐक्याचे प्रचारासाठी सिंधसरकारनें त्याच्या येत्या बजेटांत १ लक्ष रुपयांची तरतूद केली आहे.

### चहाचा खप

सबंध जगांत मिळून दरसाल ३०० अब्ज पेले चहा पिण्यांत येतो. चहाचा खप अद्याप वाढतच आहे. हिंदुस्थान, सिलोन व नेदरलंडस, ईस्ट इंडीज हे देश चहाची निर्गत करणारांत प्रमुख आहेत. ग्रेटब्रिटन, अमेरिका, रशिया, ऑस्ट्रेलिया, कॅनडा, हॉलंड, आयरा, हे देश चहाची आयात करणारांत अग्रेसर आहेत.

### बँक ऑफ म्हैसूर

वरील बँकेचें वसूल भांडवल २० लक्ष रुपयांचें असून तिच्या रिझर्व्ह फंडांत २७ लक्ष रुपये आहेत. तिचेकडे एकूण ३ कोटि, १७½ लाखांच्या ठेवी आहेत. १९४१ च्या दुसऱ्या सहामाहींत तिला २ लक्ष, ३ हजार रुपये नफा झाला. भागीदारांस १२% डिव्हिडंड मिळालें.

### मथुरा मिल्स कं. लि.

वरील कंपनीस १९४१ मध्यें २५ लक्ष रुपये नफा झाला. भागिदारांस १५% डिव्हिडंड मिळेल. कंपनीचें भाग भांडवल ८७½ लक्ष रुपये असून रिझर्व्ह व इतर फंड २३½ लाखांचे आहेत. ७१ लक्ष रुपये कर्जाऊ घेतलेले आहेत.

### कोळशाच्या बचतीची आवश्यकता

१९४१ मध्यें हिंदी रेल्वेजनीं मालाची वहातुक केली, त्यांपैकीं शेकडा ४० वजनाची वहातुक कोळशाची होती. बंगाल व बिहार येथील खाणींतून १०½ लक्ष वाघिणी कोळसा पाठविण्यांत आला. निर्गतीसाठीं रेल्वेजसाठीं व सरकारी निमसरकारी कामासाठी एकूण वाघिणींपैकीं ६५½% वाघिणी कोळसा लागला. रेल्वेजनी उतारूंच्या गाड्या कमी केल्या, त्याचें कोळशाच्या बचतीची आवश्यकता हेंहि एक प्रमुख कारण आहे.

### कोहिनूर मिल्स कं. लि.

वरील कंपनीनें १९४१ सालीं २ कोटि, ३५ लक्ष रुपयांची विक्री केली. गिरणींत ८१½ लाखांची कपास खपली. भागीदारांस २७% डिव्हिडंड मिळालें.

### साखरेची निर्गत

बेलापूरच्या साखर कारखान्यानें सरकाराची एक हजार टनांची साखरेच्या निर्गतीची युद्धविषयक ऑर्डर स्वीकारली आहे.

### शेड्यूल्ड बँकांसंबंधींचे आकडे

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया हिंदी शेड्यूल्ड बँकांची परिस्थिति दर्शविणारा एक तक्ता दर आठवड्यास प्रसिद्ध करीत असते. त्यांत ब्रह्मदेशांतील बँकांच्या व्यवहाराचे आकडेहि इतके दिवस देण्यांत येत असत. १३ फेब्रुवारी पासूनच्या तक्त्यांतून ते आतां वगळण्यांत येऊं लागले आहेत. त्याचें कारण ब्रह्मदेशांतील सद्यःस्थिति हें होय.

### पुस्तकें मिळणें अशक्य

१९३९ चे अखेर ब्रिटिश प्रकाशकांच्या यादींत असलेलीं ३७,०८५ पुस्तकें युद्धपरिस्थितीमुळें आतां विकत मिळणें अशक्य झालें आहे.

### कर्जरोख्यांच्या किमान किंमती

सरकारी कर्जरोख्यांची खरेदी-विक्री कोणत्या किमान दरानें करावी, हें हिंदुस्थानसरकारनें ठरवून टाकलें असून त्यापेक्षा कमी दरानें व्यवहार करणें बेकायदा होणार आहे.

### नवी दिल्ली

नव्या दिल्लींतील सरकारी कचेऱ्यांचें स्थलांतर यंदांचे उन्हाळ्यांत प्रतिवर्षीप्रमाणें होणार नाहीं, असें जाहीर झालें आहे. नवी दिल्ली हिंदुस्थान सरकारची राजधानी होण्यापूर्वी तो मान कलकत्ता शहरास होता. नव्या राजधानीच्या पायाचा दगड बादशहांनीं १५ डिसेंबर, १९११ रोजीं बसविला. नव्या दिल्लीचें वसाहतींवर १९२९ अखेर १४ कोटि रुपये खर्च झाले. नव्या दिल्लींतील रहाण्याच्या इमारती थंड हवेंतील रहाणीच्या उद्देशानेंच बांधलेल्या आहेत. उन्हांतील उष्णता इमारतींनीं शोषून घ्यावी, अशीच त्यांची रचना आहे. सहाजीकच, उन्हाळ्यांतील रहाणीस नव्या दिल्लीच्या इमारती गैरसोईच्या आहेत.

### तीन कोटि मोटारी बंद पडणार ?

रबराचे ऐवजी दुसऱ्या कशाचा तरी उपयोग करून टायर्स करतां आल्या नाहींत, तर अमेरिकेंतील तीन कोटि खासगी मोटारगाड्या, त्यांच्या सध्याच्या रबरी धावा झिजल्यावर, बंद ठेवण्याची पाळी येईल.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | ७६ | ७ स्टॉक सर्टिफिकेटांत रूपांतर ... ... | ७८ |
| २ मध्यवर्ती बजेट व हिंदुस्थानचें देणें घेणें ... | ७७ | ८ स्फुट विचार... ... मध्यवर्ती बजेटाची चर्चा—हिंदुस्थान आणि युद्धसामुग्रीचें उत्पादन—हिंदी व्यापारी मंडळाची वार्षिक सभा—सरकारी रोख्यांच्या किमान किंमती—ऑस्ट्रेलियाचें हवापाणी | ७९ |
| ३ युरोपांतील ब्रिटिश बँका ... ... | ७७ | ९ पिंपळे फार्मचें अपूर्व यश | ८१ |
| ४ एक ते दोन हजारांवर इन्कम टॅक्स ... | ७८ | | |
| ५ ब्रिटिश कारखानदारांच्या जाहिराती ... | ७८ | | |
| ६ मॅनेजिंग एजन्सीच्या व्यवस्थेखालील बँक ... | ७८ | | |


# अर्थ

बुधवार, ता. ११ मार्च, १९४२

## मध्यवर्ती बजेट आणि हिंदुस्थानचें इंग्लंडमधील देणेंघेणें

हिंदुस्थान सरकारचें १९४२–४३ सालचें चालू उत्पन्नखर्चाचें अंदाजपत्रक सर जरेमी रेसमन ह्यांनीं मध्यवर्ती असेंब्लीस सादर केलें, त्यांतल्या ठळक बाबी आणि येत्या सालीं येणाऱ्या तुटीची कराच्या मार्गानें योजलेली तरतूद ह्यांची माहिती आम्हीं गेल्या अंकांत दिली आहे. ज्यांचा प्रत्यक्ष उत्पन्नांतून भागवावयाच्या खर्चाशी संबंध नसतो, अशा रकमांचीहि व्यवस्था फडनवीसांस करावी लागते आणि त्यांचें विषयींचाहि अंदाज पुढें मांडावा लागतो. भांडवली स्वरूपाचा खर्च, कर्जाची उभारणी व परतफेड, विलायतेस पाठवावयाच्या व तेथून इकडे आणावयाच्या रकमा आणि हुंडणावळ ह्या बाबींचा सदरहु अंदाजांत समावेश होतो. ह्या संबंधांतल्या व्यवस्थेस वेज ॲण्ड मीन्सची तजवीज म्हणतात. येत्या वर्षाचें अंदाजपत्रक असेंब्लीपुढें मांडतांना सर जरेमी रेसमन ह्यांनीं केलेल्या भाषणांत ह्या विषयींची माहिती देण्यांत आली आहे, तिचा उल्लेख येथें करणें आवश्यक आहे.

डिफेन्स कर्ज काढण्यास १९४० च्या जूनमध्यें प्रारंभ झाला आणि गेल्या जानेवारी अखेर त्या कर्जाचे एकूण ११० कोटि २० लक्ष रुपये सरकारकडे जमा झाले. चालू वर्षांत ३ टक्के व्याजाच्या बाँडसचे उरलेले १०३ कोटि रुपये फेडण्यांत आले. बिनमुदतीचें स्टर्लिंग कर्ज बाजूस ठेवलें तर येत्या वर्षी जें कर्ज सरकारास फेडून टाकण्याची मुभा आहे, असें १९४२—४७ चें ५ टक्के व्याजाचें कर्जच काय तें शिल्लक आहे. पण त्याची बाकी फक्त ६५ लक्ष रुपये इतकीच आहे, म्हणजे हा बोजा म्हणण्यासारखा जड नाहीं.

सरकारचा पैसा विलायतेस पाठवणें, तिकडच्या रकमा इकडे आणणें, हुंडणावळीची व्यवस्था करणें, चलन पुरवणें इत्यादि गोष्टींची जबाबदारी रिझर्व्ह बँकेवर असल्यानें फडनवीशी खातें आणि ती बँक यांच्या व्यवहाराचा मेळ बसणें आवश्यक असतें. युद्धपरिस्थितीचा हिंदुस्थानच्या पैशाच्या व्यवहाराचे बाबतींतला एक महत्त्वाचा विषय ध्यानांत ठेवण्यासारखा आहे आणि तो ह्या देशांतून युद्धसामुग्री बाहेर पुरवली जात आहे तिच्या किंमतीचा बटवडा येथें होऊन तिची भरपाई लंडनमध्यें मिळते ह्या देण्या-घेण्याबाबतचा आहे. युद्धसामुग्रीचा हिंदुस्थानानें चालवला असलेला पुरवठा सारखा वाढत गेल्यानें रिझर्व्ह बँकेच्या लंडनमधील कचेरींतली शिल्लक मागील सालाच्या मानानें यंदा पुष्कळच अधिक झाली. चालू सालीं पहिल्या दहा महिन्यांत त्या बँकेनें सुमारें पावणेसहा कोटि पौंड किंमतीच्या लंडनवरील हुंड्या विकत घेतल्या आणि एवढी रकम लंडनमध्यें तिच्याजवळ जमा झाली. साम्राज्य सरकाराकडून माल पुरवल्याबद्दल सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर इंडिया ह्यांस सुमारें सवापाच कोटि पौंड चालू सालांत मिळतील. पुढील वर्षी ही रकम सुमारें साडेसोळा कोटि पौंड होईल असा अंदाज आहे. ह्या रकमेंत हिंदुस्थान सरकारच्या इंग्लंडमधील द्यावयाच्या देण्याचा हिशेब करण्यांत आलेला असून तो आकडा लंडनमधील निवळ येण्याचा आहे. रिझर्व्ह बँकेच्या इंग्लंडमधील शाखेंतील शिलका युद्धपरिस्थितीमुळें कशा फुगत आहेत याची ह्यावरून कल्पना येईल.

लंडनमध्यें रिझर्व्ह बँकेच्या कचेरींत जमलेल्या शिलकांचा उपयोग हिंदुस्थानचीं पौंड स्टर्लिंगमधलीं कर्जें फेडण्यांत केला जात आहे ह्याची माहिती आम्हीं वेळोवेळ दिलीच आहे. गेल्या वर्षी सरकारनें स्टर्लिंग रोखे सक्तीनें घेऊन ते धारण करणारांस त्यांची किंमत देऊन टाकली, तिची एकूण रकम ९७ कोटि भरली. ह्यापैकीं सुमारें साडेसहा कोटि पौंड इंग्लंडमध्यें देण्यांत आले. आणि १४३ कोटींची परतफेड ह्या देशांत झाली. पूर्वी बाजारांत खरेदी केलेले आणि परतफेडीच्या ह्या पहिल्या योजनेंत समाविष्ट झालेले रोखे ह्यांची एकूण बेरीज १० कोटि पौंड झाली. हिंदुस्थानचें स्टर्लिंगमधलें कर्ज ह्या रकमेनें कमी झालें असून त्यावरील सुमारें सवा पांच कोटि रुपयांचें वार्षिक व्याज लंडनमध्यें पौंडांत द्यावयाचें बंद झालें आहे.

कर्जफेडीची दुसरी योजना आतां हातीं घेण्यांत आली आहे. पहिल्या योजनेंत मुदतबंदी रोखे होते; आतांच्या योजनेंत बिनमुदतीचे रोखे आहेत. अडीच व तीन टक्क्यांच्या रोख्यांचे परतफेडीस ७ कोटि पौंड लागतील आणि पुढच्या वर्षी एवढीच रकम साडेतीन टक्क्यांच्या रोख्यांकरितां तयार ठेवावी लागेल. रिझर्व्ह बँकेजवळ लंडनमध्यें ह्या परतफेडीस आवश्यक असलेला पैसा जमा झालेला असेल आणि ह्यामुळें हे परतफेडीचे व्यवहार पुरे होण्यास अडचण पडणार नाहीं अशी अपेक्षा आहे. स्टर्लिंग रोख्यांची परतफेड होते तेव्हां तिच्या रकमेइतकें हिंदी कर्जरोख्यांतलें सरकारी देणें येथें उत्पन्न होतें. ह्या बाबतची व्यवस्था हिंदुस्थान सरकारास रिझर्व्ह बँकेच्या सहायानें समाधानकारक रीतीनें करतां आली आहे.

### युरोपांतील ब्रिटिश बँका

जर्मनीनें पादाक्रांत केलेल्या युरोपियन देशांतील ब्रिटिश बँकांच्या शाखांचें काम चालू ठेवण्याचें धोरण जर्मनीनें अंगीकारलें आहे. त्यांचें काम अर्थात्च स्थानिक स्वरूपाचें असणार. बार्केलेज ( फ्रान्स ) लि.च्या एक वगळून बाकी सर्व शाखा चालू आहेत. लॉइडस ॲंड नॅशनल प्रॉव्हिन्शिअल फॉरिन बँकेच्याहि सर्व शाखा चालू आहेत. वेस्टमिन्स्टर फॉरिन बँकेची पॅरिसमधील शाखा चालू आहे.

## एक हजार ते दोन हजार रुपयांवर इनकमटॅक्स

### बचतीचें महत्त्व

"एक हजार ते दोन हजार रुपयांवर प्रत्येक रुपयास ६ पै प्रमाणें इनकमटॅक्स घेतला जाईल. मात्र पहिल्या ७५० रुपयांवर कर आकारण्यांत येणार नाहीं. तथापि, हा कर एकादास भावयाचा नसेल, तर त्यास युक्ति आहे, ती अशी कीं, त्यानें विवक्षित रकम सेव्हिंग बँक खात्यांत ठेवली पाहिजे. ७५० रुपयांवरील प्रत्येक १५ रुपयांस १ रुपया ह्या प्रमाणें होणारी रकम म्हणजे कर आकारणीच्या सुमारें सवापट रकम त्यानें सेव्हिंग बँक खात्यांत ठेवावी. उदाहरणार्थ, १,२५० रुपयांच्या उत्पन्नावर इनकमटॅक्स १५ रु. १० आ. होईल व तो भावयाचा नसेल तर २० रुपये सेव्हिंग बँकेंत ठेवावे लागतील. उत्पन्न १,७५० रुपये असलें, तर त्यावरील प्राप्तीवरील कराची रकम ३१ रु. ४ आ. होईल-परंतु ती न देतां ४० रुपये सेव्हिंग बँकेंत ठेवले तरी चालेल. ही सेव्हिंग बँक म्हणजे पोस्ट ऑफिस डिफेन्स सेव्हिंग्ज बँक होय. त्यांतील रकम युद्धसमाप्तीनंतर एका वर्षानें परत मिळूं शकेल व त्यावर व्याज द. सा. द. शे. २½% नें मिळेल. ह्यावरून असें दिसून येईल, कीं प्रस्तुत योजना ही करयोजना नसून बचतीची योजना आहे. लोकांची क्रयशक्ति वाढत चालली आहे, त्या मानानें मालाचा पुरवठा मात्र मर्यादित आहे. ह्या दोहोंमध्यें एकवाक्यता घडवून आणण्याचें काम केवळ करवसुलीनें भागणार नाहीं आणि इतरहि मार्गांचा अवलंब केला पाहिजे. जनतेची कांहीं विशिष्ट क्रयशक्ति काढून घेतली, तर त्या मानानें कितीतरी पटीनें लोकांची खर्च करण्याची शक्ति मर्यादित होते, कारण क्रयशक्ति एकाचे हातांतून दुसऱ्याचे हातांत, अशी प्रसार पावत असते व आरंभींच तिला अटकाव केल्यानें जनतेच्या खर्चांत मोठी बचत होते. आतापर्यंतच्या इनकमटॅक्सच्या किमान मर्यादेचेहि खाली ज्यांची प्राप्ती आहे त्यांची क्रयशक्ति मर्यादित करण्याचा प्रयत्न, ह्या दृष्टीनेंच वरील योजनेकडे पाहिलें पाहिजे":— सर जेरमी रेसमन ह्यांनीं मध्यवर्ती असेंब्लीमध्यें बजेट मांडतांना केलेलें भाषण.

### ब्रिटिश कारखानदारांच्या जाहिराती

कांहीं ब्रिटिश मालाच्या जाहिराती वर्तमानपत्रांत प्रसिद्ध होत आहेत, त्यांत "युद्धपरिस्थिती सुधारली म्हणजे नेहमीप्रमाणें पुरवठा चालू होईल" अशी एक ओळ छापलेली असते, त्याचें कारण असें, कीं ब्रिटिश मालाचा पुरवठा सध्या पूर्ववत् चालू ठेवणें शक्य नाहीं. ब्रिटिश मालाचा इतर देशांत खप वाढविण्याचा आज प्रश्नच नाहीं; उलट मागणी कशी पुरवितां येईल, हीच अडचण आहे. तेव्हां पुनः शांतता प्रस्थापित होईपर्यंत गिऱ्हाइकांपुढें ब्रिटिश मालाचें नांव कायम राखण्याचें काम तेथील कारखानदारांस करावें लागत आहे. ग्रेट-ब्रिटनमधील माल ज्या ज्या देशांत खपतो, तेथें तेथें जाहिराती देऊन युद्ध संपताच पूर्वीप्रमाणें मालाचा उठाव होईल, असा प्रचार ब्रिटिश कारखानदार करीत आहेत, आपल्या मालाचा पुरवठा करतां आला नाहीं, तरी त्यांचा दर्जा कायम ठेवणें व संधी प्राप्त होतांच निर्गत व्यापार चालू करणें, हें ब्रिटिश कारखानदारांचें उद्दिष्ट आहे. ब्रिटिश मालाची पत राखण्याची आवश्यकता ब्रिटिश परराष्ट्रीय व्यापार खात्याचे सेक्रेटरी, मि. जॉनसन, ह्यांनीं आपल्या भाषणांत स्पष्ट करून सांगितली. "ब्रिटिश कारखानदारांचें धोरण त्यांच्या उद्गारांस धरूनच आहे. ब्रिटिश कारखानदारांचा दूरदर्शीपणा व अंतिम यशावरील विश्वास लक्षांत घेण्याजोगा आहे.

## मॅनेजिंग एजन्सीच्या व्यवस्थेखालील बँक

### यूनियन बँक ऑफ इंडिया लि.

वरील बँकेची स्थापना १९१९ सालीं झाली. १९२१ सालीं तिच्या प्रत्येक भागाची ५० रुपयांची किंमत कमी करून १५ रुपये ठरविण्यांत आली व पुनः १९२५ सालीं ती ५ रुपयांवर आणण्यांत आली. म्हणजे, मूळ अधिकृत भांडवल ५ कोटि रुपये होतें तें ५० लक्ष रुपये झालें. बँकेस पहिलीं कांहीं वर्षे वाईट गेलीं, परंतु पुढें हळुहळु बँक मजबूत होत चालली. १९२३ सालीं सेंट्रल बँकेनें तिचे बहुसंख्य भाग मिळविले व तिचेकडे यूनियनची मॅनेजिंग एजन्सीहि गेली. दुरुस्त कंपनी कायद्यानें बँकांस मॅनेजिंग एजंट्स असूं नयेत, असें ठरविलें परंतु एक बँक दुसऱ्या बँकेची मॅनेजिंग एजंट असण्यास मुभा ठेवण्यांत आली. २७७ एच ह्या कलमान्वयें सेंट्रल बँक ऑफ इंडिया मॅनेजिंग एजंट ह्या नात्यानें यूनियन बँकेचा कारभार पहात आहे. ह्या मॅनेजिंग एजंटास यूनियन बँकेकडून १९४१ मध्यें ५९,१४२ रुपये कामिशनच्या रूपानें मिळाले. यूनियन बँकेचे सर्व भाग पूर्णतः वसूल केलेले असून त्यांची रकम ३९,९०,००० रु. भरते. बँकेकडे २ कोटि, २६ लाखांच्या ठेवी आहेत. १९४१ मध्यें बँकेस, मागील शिलकी नफा धरून, ६ लक्ष ३२ हजार रुपये नफा झाला. भागीदारांस ५½% करमाफ डिव्हिडंड मिळेल.

### सरकारी प्रॉमिसरी नोटांचें स्टॉक सर्टिफिकेटांत रूपांतर

(१) प्रॉमिसरी नोटांचें स्टॉकमध्यें रूपांतर करावयाचें असल्यास, नोटा धारण करणारानें त्या पब्लिक डेट ऑफिसकडे पोंचत्या कराव्या. ज्या ट्रेझरींत नोटांचें व्याज मिळतें, त्या ट्रेझरींत त्या दिल्या तरी हरकत नाहीं. प्रत्येक नोट "गव्हर्मर जनरल ऑफ इंडिया इन कौन्सिल"च्या नांवाचें बेचन करावी.

(२) प्रॉमिसरी नोटा धारण करणारास नोटांचे ऐवजीं एक स्टॉक सर्टिफिकेट मिळेल.

(३) रूपांतराची मागणी करणाऱ्या अर्जांत नोटांचा नंबर, त्यांची रकम व त्यांचा इतर तपशील (कर्जाची मुदत) हीं नमूद करण्यांत आलीं पाहिजेत. अर्जाचा नमुना ट्रेझरींत मिळतो. आपल्या बँकेकडे चौकशी केल्यास, तीं रूपांतराची सर्व व्यवस्था, करील.

### साखरेचा उतारा

वेगवेगळ्या प्रांतांतील साखर कारखान्यांत साखरेचा उतारा किती पडतो, हें खालील तक्त्यावरून दिसून येईल:—

| | उतारा (१९३९–४०) | | | |
|---|---|---|---|---|
| | सं. प्रांत | बिहार | इतर प्रांत | संबंध हिंदुस्थान |
| कोणत्याहि कारखान्यांतील कमाल | १०.३४ | १०.३१ | १२.३१ | १२.३१ |
| " " किमान | ५.९३ | ८.३४ | ४.४९ | ४.४९ |
| सर्व कारखान्यांची सरासरी | ९.३७ | ९.२९ | ९.८८ | ९.४५ |

साखरेच्या उताऱ्याच्या हिंदी सरासरींत एका वर्षांत ०·१६% वाढ झालेली आहे. संयुक्त प्रांत व बिहार ह्यांतील उतारा अनुक्रमें ०·२३% व ०·२९% वाढला आहे.

# स्फुट-विचार

## मध्यवर्ती बजेटाची चर्चा

मध्यवर्ती असेंब्लीमध्यें सर जरेमी रेस्मन ह्यांनीं सादर केलेल्या हिंदुस्थान सरकारच्या १९४२-४३ च्या अंदाजपत्रकाची सर्वसाधारण स्वरुपाची चर्चा झाली. युद्धाप्रीत्यर्थ होणारा खर्च अपरिहार्य आणि आवश्यक असल्यानें त्याबाबत बिनसरकारी सभासदांची प्रतिकूल टीका होणें शक्यच नव्हतें. तथापि, सर जरेमी यांनीं सुचवलेल्या नवीन करयोजनांच्या बाबतींत कित्येकांनीं तक्रारवजा भाषणें केलीं. प्राप्तीवरील कराचा बोजा मध्यम स्थितींतल्या वर्गावर आणि उद्योगधंद्यांवर पडणार आहे ही गोष्ट सरकारच्या निदर्शनास आणण्यांत आली. कुटुंबवत्सल लोकांस प्राप्तीवरील कराचे संबंधांत इंग्लंडमध्यें सवलती देण्यांत येतात, त्याप्रकारची पद्धति हिंदुस्थानांत अंमलांत आणली जावी ह्या आशयाची सूचना करण्यांत आली आहे ती फडनवीसांनीं लक्षांत घेण्यासारखी आहे. वरिष्ठ सरकारी नोकरांच्या पगारांत कपात करण्यांत यावी अशीहि सूचना पुढें मांडण्यांत आली. सभासदांच्या टीका व सूचना ह्यांस अनुलक्षून सर जरेमी ह्यांनीं भाषण केलें, त्यांत खालील मुद्यांवर जोर देण्यांत आला. युद्धविषयक कारभाराचा सारखा विस्तार होत असतां, अधिकाऱ्यांच्या जागा कमी करून त्या उपायानें खर्च मर्यादित करणें शक्य नाहीं; सरकारी नोकरांच्या पगारांत कपात करणें अन्यायजनक होईल; त्यांच्या स्थितींतल्या बिनसरकारी लोकांच्या मानानें सरकारी नोकरांची आर्थिक स्थितींत सुधारणा झालेली नाहीं; हिंदी सरकारच्या करांचा बोजा गरीब जनतेवर पडतो, ह्या टीकेंत कांहींच तथ्य नाहीं; ह्या देशांत श्रीमान् वर्गावर त्या लोकांच्या पेपतीप्रमाणें जबर कर बसवण्यांत आले आहेत. हिंदुस्थानची आर्थिक स्थिति लक्षांत घेतां ज्यांची वर्षाची प्राप्ति एक किंवा दोन हजार रुपये आहे, अशा लोकांस गरीब म्हणतां येत नसून त्यांस मध्यम स्थितीच्या वर्गांत घालावें हें उचित आहे. ज्या मालाचा पुरवठाच मर्यादित झालेला आहे, त्यासंबंधांतली मागणी मर्यादित करून त्याच्या किंमती वाढूं न देणें हेंच सर्वांच्या हिताचें आहे. केवळ महागाई भत्ता वाढवल्यानें हा पुरवठा वाढत नाहीं आणि बाजारभाव आणखी चढावयाचे थांबत नाहींत; धान्यधुन्याचें उत्पादन वाढवणें हाच महागाईवर खरा उपाय आहे. तथापि युद्धसामुग्रीबाबतची मागणी अगोदर पुरवावयाची असल्यानें जनतेची मालाच्या पुरवठ्याचे संबंधांत गैरसोय थोडीफार होणें अपरिहार्यच आहे.

---

## हिंदुस्थान आणि युद्धसामुग्रीचें उत्पादन

हिंदुस्थान हें मुख्य केंद्र कल्पिलें जाऊन आस्ट्रेलिया, न्यूझीलंड वगैरे देशांनीं पुरवावयाच्या युद्धसामुग्रीची योजना दोन वर्षांमागें आखण्यांत आली आणि तीस अनुसरून उत्पादनाची व्यवस्था करण्यांत आली. पॅसिफिक महासागरांत जपानचें आक्रमण होईल ही कल्पना त्यावेळीं नसल्यानें पूर्व एशियांतील ब्रिटिश साम्राज्यांतर्गत देशांत युद्धसामुग्रीचें उत्पादन निर्वेधपणानें चालवण्यांत यावें आणि तिचा पुरवठा युरोप, आफ्रिका व पश्चिम एशिया येथील रणक्षेत्रांस व्हावा अशा हेतूनें ईस्टर्न ग्रुप सप्लाय कौन्सिलची स्थापना करण्यांत आली. लढाऊ सामानाच्या पुरवठ्याची वांटणी ह्या कौन्सिलच्या सल्ल्यास अनुसरून होत आली आहे. सिंगापूर पडलें, आव्हांत जपानचें आक्रमण चालू झालें आणि प्रत्यक्ष ऑस्ट्रेलियावर शत्रूनें हल्ले आरंभले ह्या कारणांनीं परिस्थितींत एकदम बदल झाला आहे. सप्लाय कौन्सिलमधले ऑस्ट्रेलियाचे प्रतिनिधी सर बर्टरॅम स्टीव्हन्स हे गेल्या आठवड्यांत मुंबईमध्यें आले असतां त्यांची मुलाखत घेण्यांत आली तेव्हां त्यांनीं काढलेले उद्गार लक्षांत घेण्यासारखे आहेत. पॅसिफिक महासागरांत युद्ध पसरल्याकारणानें समुद्रावरील वाहतुकीच्या अडचणी वाढल्या आहेत आणि ऑस्ट्रेलियास स्वतःच्या देशांत शत्रूशी सामना करावा लागणार आहे. तथापि, रणांगणावर आणि लढाऊ कारखान्यांत ऑस्ट्रेलियन लोक आपलें कर्तव्य धैर्यानें व विश्वासानें करण्यास चुकणार नाहींत असें त्यांनीं बोलून दाखवलें. ऑस्ट्रेलियाची भौगोलिक परिस्थिति अशी आहे कीं, तेथील लढाया जपानला सोप्या जाणार नाहींत आणि अमेरिकेकडून युद्धसामुग्रीचा पुरवठा मोठ्या प्रमाणावर होऊं लागला म्हणजे शत्रूच्या पीछेहाटीस प्रारंभ होईल असा विश्वास त्यांनीं प्रकट केला. युद्धसामुग्रीच्या बाबतींत हिंदुस्थान देशास महत्त्वाची कामगिरी करतां येईल आणि ह्यासाठी आवश्यक असलेल्या यंत्रसामुग्रीचा पुरवठा अमेरिकेकडून होईल ह्या दृष्टीनें अमेरिकेंतून येणाऱ्या शिष्टमंडळाची विशेष उपयुक्तता आहे असें ते म्हणाले. बदललेल्या परिस्थितीमुळें ईस्टर्न ग्रुप सप्लाय कौन्सिलच्या कार्याचें महत्व कमी झालें नसून त्याच्या मुळाशीं असलेलें सहकार्य जिव्हाळ्याचें आहे असे उद्गार सर बर्टरॅम ह्यांनीं काढले.

---

## हिंदी व्यापारी मंडळांची वार्षिक सभा

सर चुनीलाल बी. मेहता ह्यांच्या अध्यक्षतेखालीं दिल्ली येथें हिंदी व्यापारी मंडळांच्या मध्यवर्ती संस्थेची वार्षिक सभा गेल्या आठवड्यांत भरली. युद्धपरिस्थितीमुळें उद्भवलेल्या अनेक महत्वाच्या आर्थिक प्रश्नांची चर्चा तीमध्यें होणें स्वाभाविक होतें. असेंब्लीची बैठक दिल्लीमध्यें चालली आहे आणि हिंदुस्थानचें पुढील सालाबाबतचें अंदाजपत्रक तिच्यापुढें आहे. ह्या स्थितींत हिंदी व्यापारी मंडळांच्या सूचनांस विशेष महत्व आहे हें सांगावयास नकोच. देशांतील धान्याची पैदास वाढवण्याची व त्याच्या पुरवठ्याची योग्य स्थानिक वाटणी होण्याची आवश्यकता सर चुनिलाल ह्यांनीं आपल्या भाषणांत प्रतिपादली. ह्या बाबतींत समाधानकारक व्यवस्था सरकारनें केल्यावांचून जनतेनें निरनिराळ्या पदार्थांची खरेदी मर्यादित करावी असें म्हणण्यांत स्वारस्य नाहीं असें त्यांनीं सांगितलें. हिंदुस्थानच्या मालकीच्या लंडनमध्यें वाढणाऱ्या शिलकांचा विनियोग तेथील हिंदी कर्जाची फेड करण्यांत चालला आहे. त्या संबंधांत सर चुनीलाल ह्यांनीं केलेल्या सूचना सर जरेमी रेस्मन ह्यांनीं विचारांत घेण्यासारख्या आहेत. हलक्या व्याजाच्या दरांची सरकारी स्टर्लिंगमधलीं कर्जें फेडून टाकण्याऐवजीं भारी दरांचीं रेल्वेज, पोर्ट ट्रस्ट्स, कारखाने इत्यादींमध्यें स्टर्लिंग भांडवलाची गुंतवण झालेली आहे ती नाहींशी करण्याची योजना सरकारनें अंमलांत आणावी म्हणजे व्याजाचा मोठा बोजा दूर होईल आणि हें भांडवल हिंदी होईल असें त्यांनीं सुचविलें. दक्षिण आफ्रिकेंतील सोन्याच्या खाणींत गुंतलेलें ब्रिटिश भांडवल कमी करण्याचें ह्या प्रकारचें धोरण तेथील सरकारनें अंगि-

कारलें आहे. अमेरिकन धंद्यांत गुंततेलें ब्रिटिश भांडवल इंग्लंडमधील सरकारनें ह्याच तत्त्वावर स्वतःच्या हातीं घेऊन अमेरिकन देणें फेडण्याची व्यवस्था केली आहे हे दाखले देऊन हिंदुस्थान सरकारनें ह्या देशांतील ताग, तेल, रबर वगैरेंच्या धंद्यांत गुंतलेलें ब्रिटिश भांडवल हिंदी लोकांच्या हातीं येण्याची तजवीज कशी करतां येईल ह्याची अवश्य चौकशी करावी असें ते म्हणाले. त्यांच्या भाषणांतला आणखी एक मुद्दा येथें उल्लेखणें आवश्यक आहे. सध्या ब्रिटिश सरकार अमेरिकेकडून युद्धसामुग्री मोठ्या प्रमाणावर कर्ज-उसनवारीच्या पद्धतीनें घेत आहे. ह्या कर्जाची परतफेड कशी व्हावी ह्या संबंधाचे विशिष्ट व्यापारी स्वरूपाचे करार होत असले पाहिजेत. त्यांचा परिणाम युद्धोत्तर काळांतील आंतरराष्ट्रीय व्यापारावर होणार आहे. ह्या देशाच्या आर्थिक हितसंबंधास ही व्यवस्था बाधक होणार नाहीं ह्या विषयींची खबरदारी हिंदुस्थान सरकारनें वेळींच घ्यावी अशी सावधगिरीची सूचना सर चुनीलाल ह्यांनीं व्यावहारिक दूरदृष्टीनें केली आहे.

---

### सरकारी रोख्यांच्या किमान किंमती

हिंदुस्थान सरकारनें सरकारी रोख्यांच्या खरेदी-विक्रीच्या किमान किंमती ठरवून टाकल्या आहेत, त्या चालू बाजारभावापेक्षा तर अधिक आहेतच, परंतु मुंबई स्टॉक एक्सचेंजनें १९४० सालीं ठरवून टाकलेल्या किंमतीपेक्षाहि अधिक आहेत, अशी त्या संबंधांत तक्रार ऐकूं येते. त्याचप्रमाणें, किंमतीवर पडणारें व्याज सरकारनें लक्षांत घेतलेलें दिसत नाहीं, असेंहि दिसतें. १९५४-५९ च्या २½% रोख्यांचा भाव ९८ रुपये ठरविलेला आहे, व १९४७-५० च्या ३½% रोख्यांचा भाव ९७½ रुपये आहे. म्हणजे, दीर्घ मुदतीच्या रोख्यांचा भाव जास्त व कमी मुदतीच्या रोख्यांचा भाव कमी आहे. सबंध हिंदुस्थानांत लागू पडणारे भाव ठरविण्याचा सरकारचा हा, युद्ध चालू झाल्यानंतरचा पहिलाच प्रसंग आहे. हे किमान बाजारभाव टिकविण्यासाठी सरकार कोणतें धोरण स्वीकारणार, त्यावर किमान किंमती ठरविण्याची अंतिम उपयुक्तता अवलंबून रहाणार हें उघड आहे. किमान किंमती ठरल्यामुळें विमा कंपन्यांस सरकारी रोखे विकत घेण्यास अडचण भासणार नाहीं व कंपन्यांच्या ताळेबंदांत त्यांची किंमत लावण्यास एक निश्चित आधार मिळेल हा त्याचा परिणाम इष्ट असाच आहे.

---

### ऑस्ट्रेलियाचें हवापाणी

ऑस्ट्रेलियाचा आकार व त्याची श्रीमंती ह्याची कल्पना फारच थोड्या लोकांस आहे. ऑस्ट्रेलियाचें क्षेत्रफळ ३० लक्ष चौरस मैल म्हणजे हिंदुस्थानचे क्षेत्रफळाच्या दीडपट आहे. ऑस्ट्रेलियाच्या नैसर्गिक संपत्तीचा अद्याप पुरा फायदा करून घेण्यांत आलेला नाहीं. त्या देशाचा सबंध भाग व्यापण्यास तेथें लोकवस्ती पुरेशी नाहीं. ऑस्ट्रेलियाची नैसर्गिक संपत्ती किती आहे, ह्याचा अंदाज करणेंहि कठीण आहे. लोकर व गहू ह्यांचे संबंधांतील ऑस्ट्रेलियाचें महत्त्व आतां सबंद जगास कळून चुकलें आहे. चालू युद्ध संपल्यानंतर ऑस्ट्रेलियाला त्या देशांत बाहेरून लोक आणवून स्थानिक लोकसंख्या वाढवावी लागेल. तेथील कामगारांच्या रहाणीवर त्याचा परिणाम झाला तरी तो स्वार्थत्याग त्यांस करणें भाग आहे. ऑस्ट्रेलियाचे हवापाणी इतकें उत्कृष्ट आहे, कीं जे युरोपियन लहानपणीं त्या देशांत जाऊन स्थाइक होतात ते पुढें आपल्या पूर्वजांपेक्षां अधिक ताकदवान व धष्टपुष्ट बनतात. ऑस्ट्रेलियाइतकेंच इतर कांहीं देशांत अनुकूल हवापाणी असलें, तरी तेथें लोक आळशी बनतात परंतु ऑस्ट्रेलियांतील हवापाणी लोकांस चपळ बनवितें असें तें उत्तेजक आहे. ऑस्ट्रेलियाची लोकसंख्या ७० लक्षहि नाहीं.

---

### लॉर्ड विलिंग्डन

हिंदुस्थानचे माजी व्हाइसरॉय, लॉर्ड विलिंग्डन, ह्यांनीं आपल्या मृत्यूनंतर मागें सुमारें १८ लक्ष रुपये ठेवले.

### ३% हिंदी डिफेन्स लोन

वरील कर्जांत ३१ जानेवारी १९४२ अखेर एकूण ९७ कोटि, ७५ लक्ष रुपये गुंतविण्यांत आले, त्यापैकीं ४२¾ कोटि बंगालनें व ३७½ कोटि मुंबई प्रांतानें दिले.

### सुट्ट्यांची संख्या

मुंबई प्रांतिक सरकाराप्रमाणें मद्रास सरकारनेंहि युद्धकाळांत सुट्ट्यांची संख्या कमी करण्याचें ठरविलें आहे.

### सातारा पॉप्युलर मोटर ट्रॅन्सपोर्ट कं. लि.

बस सर्व्हिसचा धंदा करण्यासाठीं वरील कंपनी सातारा येथें नोंदण्यांत आली आहे, तिचे पहिले डायरेक्टर मि. पीरजादे हे आहेत.

### मद्रासमधील बसेस

पेट्रोलवर चालणाऱ्या मोटार बसेसचें व लॉऱ्यांचें कोळशावर चालणाऱ्या वहानांत रूपांतर ह्यापुढें करण्यास मद्रास सरकारनें एक हुकूम काढून प्रतिबंध केला आहे. मद्रास प्रांतांतील २,९०० बसेसपैकीं दोनतृतीयांश आतां कोळशावर चालतात; तेव्हां उरलेल्या पेट्रोलवरच चालाव्या, असें तेथील सरकारचें म्हणणें आहे.

### सिलोनला अन्नपुरवठा

सिलोनला हिंदुस्थानांतून अन्नपुरवठा होण्याचे संबंधांत सिलोनी शेतकी मंत्री, श्री. सेनानायक व हिंदी व्यापारमंत्री सर रामस्वामी मुदलियार, ह्यांचेमध्यें कांहीं योजना चर्चिली जाऊन ती त्यांस संमत झाली आहे असें कळतें.

---

### निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| ३½% रोखे ... ... ... ... | ८७—२ |
| सोनें तोळ्यास ... ... ... | ५५—६ |
| चांदी १०० तोळ्यास ... ... ... | ८९—८ |

**The Co-operators' Book Depot.**

9, BAKEHOUSE LANE,
FORT, BOMBAY.

**The Only Book Depot of its Kind in India.**

*Specialising in*

Books on Economics, Co-operation, Banking and Finance, Accountancy and Auditing, Commerce, Business Organisation, Rural Reconstruction and allied Subjects.

Books on all Subjects and of all Publishers in India, England and America are readily supplied at the published Prices.

## पिंपळे गिलिगन कॅटल ब्रीडिंग फार्मचें अपूर्व यश

### पांचवें अखिल भारतीय पशुप्रदर्शन

चालू वर्षी ता. १६ ते २१ फेब्रुवारीपर्यंत नवी दिल्ली येथें दरवर्षाप्रमाणें पांचवें अखिल भारतीय पशुप्रदर्शन मोठ्या प्रमाणांत भरलें. या प्रदर्शनास, जळगांव तालुका डेव्हलपमेंट अग्रिकल्चरल को–ऑपरेटिव्ह असोसिएशननें चालविलेल्या पिंपळे गिलिगन कॅटल ब्रीडिंग फार्मच्या नेमाडी जातीच्या गायी, कालवडी, वळू व बैलजोडी इत्यादि जनावरें, सालबादाप्रमाणें यंदांही पाठविलीं होतीं. हीं जनावरें प्रदर्शनांत नेमाडी जातींत उत्तम ठरून त्यांना पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या नंबरांचीं सर्व बक्षिसें मिळालीं. या प्रदर्शनांत नेमाडी जातीच्या सर्वोत्तम जनावरांकरितां इंदूर नरेशांनीं ठेविलेला रु. ५००/–. किंमतीचा " होळकर गव्हर्नमेंट चॅलेंज कप " याच फार्मच्या जोगेन नांवाच्या गायीस मिळाला. हा कप या फार्मचीं जनावरें चार वर्षांपासून लागोपाठ पटकावीत आहेत. यावरून जनावरांच्या उत्कृष्ट निगेबद्दलची कल्पना ठळकपणें डोळ्यांत भरते. फार्मचें हें सुयश म्हणजे खरोखरच फार्मास स्पृहणीय आहे. चॅलेंज कपाशिवाय प्रदर्शन कमिटीनें रु. ५००/–चें रोख बक्षीसहि दिलें.

शेतकीप्रधान हिंदुस्थानास उत्तम जनावरांची अत्यंत जरूरी आहे. परंतु उत्तम जनावरांची निपज करून ती शेतकऱ्यांना पुरविणें ही अत्यंत खर्चाची बाब आहे. पिंपळे फार्मचे चालक श्री. टी. टी. साळुंखे यांनीं हें बिकट काम अत्यंत मेहनतीनें, कळकळीनें, व हुशारीनें चालविलें आहे. त्याबद्दल त्यांचें अभिनंदन करावें तितकें थोडेंच. १९३२ सालापासून या कार्याकरितां दरसाल सुमारें १० हजार रुपये खर्च येतो. तरी सरकार, डिस्ट्रिक्ट लोकलबोर्ड व डिस्ट्रिक्ट रूरल डेव्हलपमेंट बोर्ड यांनीं सढळ हातानें या फार्मास मदत करून अखिल भारतीय प्रदर्शनांत वाखाणलेल्या कार्यास उत्साह व जोम आणून देशकल्याणाला हातभार लावावा.

---

### टिटाघर पेपर मिल्स लि.

वरील कंपनीस ३० सप्टेंबर, १९४१ अखेर संपलेल्या वर्षी कराची तरतूद करून, १७ लक्ष ९१ हजार रुपये नफा उरला. कंपनीच्या मालाची विक्री करण्यासाठी तिनें कमार्शिअल प्रॉडक्टस लि. नांवाची एक दुय्यम कंपनी स्थापन केली आहे. सरकारी ऑर्डरींना टिटाघर कंपनी प्राधान्य देत आहे. कंपनीचें भांडवल ६५ लक्ष, ८९ हजार असून तिचीं २५ लाखांची डिबेंचर्स आहेत. रिझर्व्ह व इतर फंडांत ९२ लक्ष, ८० हजार रुपये आहेत.

### तापी व्हॅली रेल्वे कं. लि.

३१ मार्च, १९४२ रोजीं ही कंपनी सरकारच्या मालकीची होईल, तेव्हां त्यानंतर तिचे हिशेब प्रसिद्ध होणार नाहींत. १९४१ मध्यें तिला ९३ लक्ष रुपये नफा झाला.

### कर्जफेड

५% १९४२–४७ चें आपलें कर्ज हिंदुस्थान सरकार १५ जून रोजीं फेडून टाकणार आहे. पौंडांतील कर्जाचे रुपयांतील कर्जांत रूपांतर करण्यांत आलें, त्यापैकीं हें कर्ज आहे.

### २३० कोटींची खरेदी

सप्लाय खात्यानें, युद्धास प्रारंभ झाल्यापासून डिसेंबर १९४१ अखेर एकूण २३० कोटि रुपयांच्या माल–पुरवठ्याच्या ऑर्डरी दिल्या.


## दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल ... ... ... | रु. | २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... ... ... | रु. | १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड ... ... ... | रु. | १,१८,००,००० |

मुख्य कचेरी : ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

मुंबईमधील शाखा : बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

इतर शाखा : अहमदाबाद ( भद्र, मुख्य ऑफिस ), अहमदाबाद ( एलिस ब्रिज शाखा ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अंधेरी ( मुंबई शेजारीं ), बांद्रे ( मुंबई शेजारीं ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस ), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर, कराची, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत.

लंडन एजन्ट्स : वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

डायरेक्टर्स : सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय.(अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई, सर जोसेफ के. नाइंट, मि. ए. गेडिस, सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई., मि. दिनशा के. दाजी, श्री. रामनिवास रामनारायण.

करंट डिपॉझिट अकाउंट्स :

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षा कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमीचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

एजंटः—टी. आर. लालवाणी.

---

## दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

हेड ऑफिस : पुणें शहर.

स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.

मुंबअी शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबअी.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | : रु. १०,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | : रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | : रु. ४,२५,८५० |
| वसूल झालेलें भांडवल | : रु. २,१२,९२५ |
| एकूण खेळतें भांडवल | : रु. ३३,००,००० |

डायरेक्टर्स

प्रो. वा. गो. काळे, अध्यक्ष

| | |
|---|---|
| श्री. धों. कृ. साठे | श्री. मा. रा. जोशी |
| श्री. न. ग. पवार | श्री. श्री. गो. मराठे |
| श्री. त्र्यं. वि. रानडे | श्री. र. चिं. सोहोनी |
| श्री. बा. पुं. वर्दे | मि. फ. दो. पदमजी |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदीविक्री कसोशीनें करून दिली जाते.

बँकेच्या शेअरवर १९४१ अखेर पुऱ्या होणाऱ्या वर्षी द. सा. द. शेंकडा ४ टक्के करमाफ डिव्हिडंड दिलें गेलें. बँकेची शेअरविक्री चालू आहे.

म. वि. गोखले
मॅनेजर.

महायुद्ध दाराशीं आलें
परदेशी औषधें
दुर्मिळ व महाग झालीं
पण
भिण्याचें कारण नाहीं !!!
— कारण —
आयुर्वेद रसशाळा पुणें लि०
या देशी औषधाच्या प्रसिद्ध कारखान्यानें
तयार केलेलीं
● रक्तवर्धक, ● उपनाह,
● बालजविन, ● कॅलसीप्राल
इत्यादि पेटंट, स्टँडर्ड व लोकप्रिय औषधें खात्री पटल्यामुळें
★ डॉक्टर्सहि वापरूं लागले आहेत. ★
दरसाल बिनचूक नफा वाटणाऱ्या ह्या कंपनीचे
शेअर्स व औषधें मागवा.
आयुर्वेद रसशाळा पुणें लि०
मुख्य दुकान गणपति चौक, लक्ष्मीरोड, पुणें २.

DECCAN BOOK STALL
Booksellers, Publishers & Subscription Agents
Fergusson College Road, Poona No. 4
(1) We stock and supply Educational books, General books & Library books.
(2) We supply Government of Bombay and Government of India publications.
(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.
(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.

अर्थशास्त्र
लेखक—प्रो. वा. गो. काळे व प्रो. दृ. गो. कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें १००, किंमत १ रुपये
या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

कॉमनवेल्थचा वैभवशाली विस्तार
★ २७ हजारांचेवर पॉलिसी-होल्डर्स
★ एकूण चालू विमे २ कोटीचेवर
★ दोन हजारांहून अधिक कार्यकर्ते निरनिराळ्या प्रांतांत कॉमनवेल्थसाठी उत्साहानें काम करीत आहेत.



हेड ऑफिस बिल्डिंग

कॉमनवेल्थ
ॲशुअरन्स कंपनी लि.
चेअरमन
* रा. ब. एम्. एन्. मेथा, C. I. E., M. B. E.
ॲक्टिंग ऑफिस सुपरिन्टेंडेंट * एम्. एन्. भागवत, B. A.
'कॉमनवेल्थ' ची पॉलिसी घेऊन जीवन निश्चिंत व सुखी करा.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. ९२७।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाविलास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
(टपाल हशील माफ)
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ८ | पुणें, बुधवार, तारीख १८ मार्च, १९४२ | अंक ११

न्यायमूर्ति रानड्यांचे
तीन अप्रसिद्ध लेख प्रसिद्ध झाले

PLEA FOR PROTECTIONIST POLICY
INDIAN SUGAR INDUSTRY

न्यायमूर्ति रानडे यांनीं १८९९ सालीं 'टाइम्स ऑफ इंडियांत' स्वदेशी साखरेच्या धंद्यासंबंधीं लिहिलेले महत्त्वाचे तीन लेख, प्रो. वा. गो. काळे ह्यांच्या प्रस्तावनेसह प्रसिद्ध करण्यांत आले आहेत.

व्यवस्थापक, 'अर्थ', पुणें ४

ह्या पत्त्यावर आठ आण्यांचीं तिकिटें पाठवून लेखांची प्रत मागवावी.

श्रीराम सिल्क मिल्स लि., बंगलोर
[कंपनीनें १९४० अखेर ६ टक्के डिव्हिडंड वांटला आहे.]
युद्धसाहित्यपुरवठा–खात्याची पॅरेशूटकारितां लागणाऱ्या
रेशमी कापडाची ऑर्डर पुरी करण्यासाठी लागणाऱ्या भांडवलाकरितां तूर्त एकूण रु. १ लक्षाच्या रकमेपर्यंत
ठेवी घेणें आहेत
व्याजाचा दर ४॥ ते ६ टक्के. ठेव किमान रु. ५०० ची असावी. ठेवीवरील व्याज दर सहा महिन्यांनीं दिलें जातें.

श्रीराम सिल्क मिल्स लि., श्रीरामबाग, बसवनगुडी, बंगलोर.
नारायण गोविंद नाईक, (माजी अध्यक्ष, म्हैसूर चेंबर ऑफ कॉमर्स) मॅनेजिंग डायरेक्टर

आमच्या कारखान्यांतील माल मुंबईस बॉम्बे स्वदेशी को–ऑपरेटिव्ह स्टोअर्समध्यें व पुण्यास लक्ष्मी रोडवरील रे म्यूझिअमच्या व्यापार–संवर्धन–गृहांत पहा.

'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

वक्तशीर आणि मनपसंत काम
करून देणारे
मोहन वॉच कंपनी
रेग्युलेशन मोफत
कॉमनवेल्थ बिल्डिंगसमोर लक्ष्मी रोड, पुणें २.

महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर
महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी
बुधवार चौक, पुणें

# विविध माहिती

### व्हिशी सरकारचीं वळ्याळें

जर्मनीनें आपल्या सत्तेखाली न घेतलेल्या फ्रान्सनें जर्मन सत्तेखालील फ्रान्समधील वेळेप्रमाणेंच आतां आपलीं घड्याळें लावलीं आहेत.

### जर्मनीस फ्रान्सचें सहाय

व्हिशी सरकारच्या सत्तेखालील फ्रान्समध्यें तयार होणाऱ्या मोटारींपैकी ८५% मोटारी जर्मनीकडे पाठविण्यांत आल्या. व्हिशी सरकारनें १९४१ सालीं जर्मनीला ३,५०० विमानें पुरवलीं.

### उत्तर चीनमधील लोकांवर सक्ती

उत्तर चीनमधील सुमारें एक कोटि चिनी लोकांना जपाननें मंचुरियांत नेऊन तेथें सक्तीनें कामास लावलें आहे.

### द्राक्षांचें उत्पादन

हिंदुस्थानांतील द्राक्षांचें दर एकरी उत्पादन इतर कोणत्याहि देशापेक्षा अधिक आहे.

### १० लक्ष टन कोळसा

युद्धास प्रारंभ झाल्यापासून आतांपर्यंत हिंदुस्थानानें मध्य आशियांतील देशांस व दोस्त राष्ट्रांस १० लक्ष टन कोळसा पुरविला आहे.

### हिंदी बटाटे

हिंदी बटाट्यांच्या वार्षिक उत्पादनाची किंमत एक कोटि रुपये भरते. दरसाल १० लक्ष मण बटाट्यांची हिंदुस्थानांत आयात होते. म्हणजे, बटाट्यांच्या लागवडीचे वाढीस येथें अद्याप पुष्कळ वाव आहे.

### श्री. भार्गव

श्री. बी. एम. भार्गव, एम. बी. ई., बी. ए., एलएल. बी., हे यूनीयन बँकेच्या स्थापनेपासून ( १९१९ ) तिचे सेक्रेटरी होते, त्यांनीं वैद्यकीय सल्ल्यास अनुसरून आपल्या जागेचा राजीनामा दिला आहे. त्यांचे जागीं मि. ए. जे. डॉक्टर ह्यांची नेमणूक झाली आहे. मेसर्स आनंदीलाल पोद्दार आणि कंपनीचे सल्लागार व जनरल मॅनेजर ही जागा श्री. भार्गव ह्यांनीं आतां पत्करली आहे.

### न खपलेल्या प्रती

वर्तमानपत्रांचे चालक आपल्या एजंटांकडे पत्राच्या प्रती पाठवितात व न खपलेल्या प्रती ते परत घेतात. त्यामुळें छपाईचा कागद वाया जातो. असें होऊं नये, म्हणून न खपलेल्या प्रती परत घेण्यास वर्तमानपत्रांचे चालकांस बंदी करण्यांत आली आहे. ह्यामुळें, जरूर त्यापेक्षा अधिक प्रती काढून पाठविणें बंद होईल.

### पुणें ते भुसावळ तारेचें जाळें

मुंबई व बाकीचा हिंदुस्थान ह्यांचेमधील संदेश-वहातूक अखंड रहावी, ह्याकरितां पुणें व भुसावळ ह्यांचे दरम्यान तार टाकण्यांत येत आहे. मुंबई–भुसावळ तारांची वहातूक बंद पडली, तर पुणें मार्गानें ती वहातूक चालू करतां येईल, अशी ही योजना आहे.

### काटकसर

ग्रेट ब्रिटनमधील लोकांची रहाणी आणखी काटकसरीची करण्याच्या उद्देशानें तेथील निर्बंध वाढविण्यांत येणार आहेत.

### शत्रुपक्षीयांस कपाशीचा तुटवडा

जर्मनी व इटली ह्यांचे नियंत्रणाखालील प्रदेशांत चालू वर्षी दरमाणशीं कपाशीचा खप तीन ते चार पौंड होईल; अमेरिकेंत तो चाळीस पौंड होतो. १९३६–३७ मध्यें जपाननें ८६½ लक्ष गाठी कपाशीचें कापड केलें; चालू वर्षी त्यास २० लक्ष गाठीहि मिळणार नाहींत.

### सात जणांस ११७ वर्षांची शिक्षा

अमेरिकेंतील सात हेरांवरील खटल्यांत त्यांस एकूण ११७ वर्षांची शिक्षा झाली. तिघांस प्रत्येकी २० वर्षें, तिघांस प्रत्येकी १५ वर्षें व एकास १२ वर्षें ह्याप्रमाणें शिक्षा झाल्या. सात हेरांपैकी एक स्त्री आहे.

### ऑस्ट्रेलियाचें नुकसान

ऑस्ट्रेलियानें मलाया व सिंगापूर येथील युद्धांत १७,०३१ सैनिक गमावले. ह्या आकड्यांत मृत व युद्धकैदी ह्या दोघांचाहि समावेश होतो.

### सिव्हिक गार्ड

मुंबई प्रांतांतील सिव्हिक गार्डांची संख्या ५,०८८ झाली आहे.

### मादागास्कर

मादागास्करची परिस्थिति इंडोचायनाप्रमाणेंच होते कीं काय, अशी भीति वाटत आहे. मादागास्कर जर्मनींच्या ताब्यांत आम्ही "खुशीनें" देणार नाहीं असें व्हिशी सरकारनें अभिवचन दिलें आहे, "खुशीनें" ह्या शब्दाचा स्पष्ट अर्थ कोणता, असें अमेरिकेनें व्हिशी सरकारला विचारलें आहे.

### कैद्यांना शिक्षण

निजाम संस्थानांतील तुरुंगामधील कैद्यांना व्यावसायिक शिक्षण देण्याची योजना करण्यांत आलेली आहे. प्रत्येक तुरुंगांत कांहीं विशिष्ट धंद्यांचे शिक्षणाची विशेष व्यवस्था केलेली आहे. तुरुंगांत तयार होणाऱ्या खादीइतकी टिकाऊ खादी इतर कोठेंहि तयार होत नाहीं.

### ग्वाल्हेर लाइट रेल्वे

वरील रेल्वे २ फूट गेजची आहे. २ फुटांच्या गेजची, ग्वाल्हेर लाइट रेल्वेइतकी मोठी रेल्वे जगांत दुसरीकडे कोठे नाहीं. ग्वाल्हेर लाइटची लांबी २५० मैल आहे. ही रेल्वे ग्वाल्हेर दरबारच्या मालकीची असून दरबारच तिची व्यवस्था पहातो. १९१३ पर्यंत जी. आय. पी. कडे तिची व्यवस्था होती.

### विजय टेक्स्टाइल्स लि.

वरील कंपनीची पहिली वार्षिक सभा ता. १३ रोजीं झाली. सभेनें ताळेबंद, नफा तोटापत्रक, डायरेक्टरांचा रिपोर्ट हीं एकमतानें मंजूर केलीं. सर्व डायरेक्टरांची व ऑडिटरची फेरनिवड झाली.

### माल्टा

ज्या माल्टा बेटावर जर्मनीचे बॉंबहल्ले अविरत चालू आहेत, त्याचें क्षेत्रफळ फक्त ९५ चौरस मैल आहे.

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | ८४ |
| २ दोन महत्त्वाच्या घोषणा | ८५ |
| ३ अंदमान आणि निकोबार बेटें ... | ८५ |
| ४ नट्टुकोटाइ चेट्टींची सावकारी ... | ८६ |
| ५ पेन्सिली ... | ८६ |
| ६ स्फुट विचार... ... इंग्लंडचा वाढता युद्धखर्च आणि बचत—विलायतेमधील हिंदी कर्जाची फेड—आखूड धाग्याची कपास पेरूं नका—अभिनंदनीय धडाडीचें नवें धोरण—आकस्मिक हरताळ बेकायदा—गेल्या आठवड्यांतील रोखे बाजार—रिझर्व्ह बँकेचें साप्ताहिक पत्रक | ८७ |
| ७ प्राप्तीवरील कराची आकारणी ... | ८८ |
| ८ दोन निवाडे ... | ८९ |


# अर्थ

बुधवार, ता. १८ मार्च, १९४२

## दोन महत्त्वाच्या घोषणा

आम्हा बेट हर्चांना सोडून पावें लागल्यानें जपानचा मोर्चा ऑस्ट्रेलियाकडे वळणार हें उघड झालें आहे. डार्विन बंदरावर व इतर ठिकाणांवर जपानी विमानांनीं हल्ले करून पुढील घटनेची सूचनाच दिली आहे. पण त्याहिपेक्षा अधिक महत्वाची गोष्ट म्हटली म्हणजे न्यूगिनीवर चाललेले जपानचे हल्ले आणि तेथें आपल्या फौजा उतरवण्याचा शत्रूचा प्रयत्न ही होय. एक एक ठिकाण पक्कें करीत पुढें जावयाचें हें जपानचें धोरण ऑस्ट्रेलियाच्या बाबतींत अंमलांत आणण्याचा शत्रूचा बेत आहे हें जाणून न्यूगिनीमध्येंच त्याचा चांगला समाचार घेण्याचें ऑस्ट्रेलियन सरकारनें ठरवलें असून त्या बेटाच्या किनाऱ्यावर त्यानें जपानी जहाजांचा संहार चालवला आहे. शत्रू चालून येण्याची वाट पाहून प्रत्यक्ष प्रसंग येईल तेव्हां बचावाची खटपट करावयाची हें धोरण आतां पॅसिफिक महासागरांत प्रकट रीतीनें सोडून देण्यांत आलें असून शत्रूवर सापडेल तेथें आघात करण्याचे डावपेंच अंगिकारण्यांत आले आहेत हें उत्तेजनकारक आहे. आम्हाची लढाई चालू असतांनाच जपाननें ब्रह्मदेशांत रंगूनच्या रोखानें आपलें सैन्य पुढें ढकलण्याच्या कामांत खळ पडून दिला नाहीं. अखेर शत्रूच्या बलाधिक्यामुळें आमच्या सैन्यास रंगून शहर सोडून देऊन उत्तर ब्रह्मदेशांत त्याच्याशीं दोन हात करण्याचें ठरवावें लागलें. रंगूनच्या मार्गानें चीनला लढाऊ सामुग्री जाणें बंद पाडण्याचा जपानचा ह्या मोहिमेंतला मुख्य उद्देश असल्यानें उत्तरेच्या बाजूस दुसरा रस्ता तयार करून तो उपयोगांत आणण्याची योजना मागेंच हातीं घेण्यांत आली आहे. उत्तर ब्रह्मदेशांत चिनी फौज लढत असल्याची बातमी मागेंच प्रसिद्ध झाली आहे.

ब्रह्मदेश ही हिंदुस्थानची पूर्व सीमा आहे आणि तिला शत्रूनें भय उत्पन्न केल्यामुळें ह्या देशाच्या संरक्षणाचा प्रश्न तातडीचा व जिव्हाळ्याचा होऊन गेला आहे. ही गोष्ट लक्षांत घेऊन व्हाइसरॉय, लॉर्ड लिनलिथगो, ह्यांनीं जनतेस उद्देशून संदेश प्रसिद्ध केला आहे, त्यांत स्वदेशरक्षणासाठी प्रत्येकानें पुढें सरसावण्याचें आगत्य किती आहे हें थोड्या वाक्यांत पण परिणामकारक रीतीनें सांगितलें आहे. सध्याच्या युद्धांत लढाई रणक्षेत्रांस मर्यादित होऊन रहात नाहीं, तिची आघाडी देशांत पुष्कळ लांबीपर्यंत पोचते. ह्याकरितां आबालवृद्धांनीं स्वतःच्या रक्षणाची तयारी ठेवली पाहिजे. ' धिमेपणानें वागा, शूरांस उत्तेजन द्या, घाबरटांस धीर द्या, अफवा पसरवणारांची कानउघाडणी करा आणि गुप्त घरभेद्यांचें उच्चाटन करा ' हें व्हाइसरॉयांच्या संदेशाचें सार आहे. संरक्षणाची व्यवस्था करून विजयास सहाय द्या, कारण आपल्या विजयावरच स्वतंत्र संस्था, संस्कृति व सहानुभूति हीं अवलंबून आहेत असें म्हणून चीन, अमेरिका, इंग्लंड व इतर स्वातंत्र्यप्रेमी राष्ट्रांच्या बरोबरीनें चालू युद्धांत प्रत्येकानें स्वतःचें कर्तव्य करावें असें त्यांनीं कळकळीनें सुचवलें आहे.

ह्याच संबंधांत ब्रिटिश मुख्य प्रधान मि. चर्चिल ह्यांनीं कॉमन्स सभेंत नुकत्याच केलेल्या घोषणेस विशेष महत्त्व आहे. युद्ध हिंदुस्थानच्या दाराशीं येऊन ठेपलें असल्यानें देशांतल्या सर्व विचारांच्या, धर्मांच्या व पक्षांच्या लोकांचें एकत्रित कार्य होणें अगत्याचें आहे. सबंद देशावर युद्धाचें संकट ओढवलें आहे अशा स्थितींत सरकार व विविध जनता ह्यांचें पूर्ण सहकार्य होण्यास त्यांच्यामधले मतभेद दूर झाले पाहिजेत. ह्या प्रकरणीं ब्रिटिश सरकारास राज्यव्यवस्था लोकमतानुवर्ती बनून त्यास लोकांचा हार्दिक पाठिंबा मिळावा ह्यासाठी कांहीं योजना अंमलांत आणण्याच्या सूचना करण्यांत आल्या होत्या. सध्याच्या आणीबाणीचा प्रसंग विचारांत घेऊन साम्राज्य सरकारानें आपल्या धोरणाविषयीं घोषणा करावी असें लोकांचें म्हणणें होतें. त्यास उद्देशून मि. चर्चिल ह्यांनीं गेल्या आठवड्यांत कॉमन्स सभेंत आपल्या मंत्रिमंडळानें हिंदी लोकांच्या मागण्यांसंबंधानें विशिष्ट योजना निश्चित केली असल्याचें आणि ती घेऊन सर स्टॅफर्ड क्रिप्स ह्या देशांत निरनिराळ्या विचारांच्या लोकांशीं चर्चा करण्यास येणार असल्याचें जाहीर केलें. युद्धाच्या व हिंदुस्थानच्या भवितव्याचे दृष्टीनें ही घोषणा अत्यंत महत्त्वाची असल्याबद्दल अभिप्राय चोहोंकडे व्यक्त करण्यांत आले आहेत. सर स्टॅफर्ड सारखा हिंदुस्थानच्या लोकांचा मित्र समजला जाणारा, पुरोगामी मताचा व कर्तबगार मुत्सद्दी ब्रिटिश मंत्रिमंडळानें एकमतानें आखलेली योजना स्वतः हिंदी पुढाऱ्यांपुढें मांडून तिला त्यांची मान्यता मिळवण्यासाठी येत आहे ही गोष्ट आशाजनक आहे ह्यांत शंका नाहीं. सर स्टॅफर्ड ह्यांनीं अंगिकारलेल्या नाजुक व महत्त्वाच्या कामगिरीस यश येऊन सरकार व जनता ह्यांचें पूर्ण हार्दिक व परिणामकारक सहकार्य जितक्या लवकर होईल तितकें तें इष्ट आहे.

## अंदमान आणि निकोबार बेटें

अंदमान आणि निकोबार ह्या बेटांचा समुच्चय बंगालच्या उपसागरांत आहे. त्यांचें मुख्य ठिकाण, पोर्ट ब्लेअर, हें कलकत्त्यापासून ७८० मैल, मद्रासपासून ७४० मैल व रंगूनपासून ३६० मैल आहे. अंदमानचें क्षेत्रफळ २,५०८ चौरस मैल असून निकोबारचें क्षेत्रफळ ६३५ चौरस मैल आहे. दोन्हींतील सुमारें १०,५०० एकर जमीन लागवडीखालीं आहे; बाकी सर्व जंगल आहे. एकूण लोकसंख्या २९½ हजार आहे. अंदमान व निकोबार बेटें चीफ कमिशनरचे ताब्यांत असतात. ज्यानें ह्या बेटावर वसति करण्याचा प्रथम प्रयत्न केला, त्याचे नांवानें तेथील मुख्य ठाण्यास पोर्ट ब्लेअर हें नांव देण्यांत आलेलें आहे. तद्देशीय लोकांची संख्या दोन–अडीच हजार असेल.

## नटुकोटाइ चेट्टींची सावकारी

### त्यांच्या व्यवहारांचें जाळें

नटुकोटाइ चेट्टी हे दक्षिण हिंदुस्थानांतील अत्यंत साहसी सावकार आहेत. मद्रास प्रांताच्या रामनाड जिल्ह्यांत व पदुकोटा संस्थानांत त्यांची घरेंदारें आहेत. चेटिनाड हें त्यांचें प्रमुख केंद्र आहे. ७८ खेडेगांवांत त्यांची वसाहत आहे. ह्यांपैकीं २० खेडीं पदुकोटांत व ५८ रामनाडमध्यें आहेत. मद्रास प्रांत, सिलोन, इंडोचायना, ब्रह्मदेश, मलाया, सुमात्रा, इत्यादि ठिकाणीं चेट्टींचा व्यवसाय आज शेकडों वर्षे अविरत चालू आहे. हिशेब लिहिण्याचें शिक्षण आठव्या वर्षापासूनच त्यांच्या मुलांस देण्यांत येतें. नटुकोटाइ चेट्टी आपल्या शाखांचे ठिकाणीं एजंट नेमतात व प्रत्येक तीन वर्षांनीं त्यांचीं बदली करतात. ह्या एजंटांना पगार व शिवाय नफ्याचा कांहीं अंशहि मिळतो. एका एजंटाची बदली होण्यापूर्वी दुसऱ्यास तेथें पाठवून स्थानिक माहिती दिली जाते. बदली केलेला एजंट चेटिनाडला परत येऊन हिशेबांची रुजवात करतो व थोड्या रजेनंतर दुसरीकडे कामावर जातो. हे एजंट ज्यांस कर्ज द्यावयाचें त्यांच्याच शेजारी रहात असल्याकारणानें कोणास किती कर्ज तारणाविना द्यावयाचें, हें त्यांस चांगलें समजतें. चेटींचेकडे ज्या ठेवी येतात, त्यांवर ते व्याज चांगलें देऊं शकतात व कर्जदारांकडून फारसें तारण ते मागत नाहींत, ह्या कारणानें त्यांची सावकारी मोठ्या प्रमाणावर चालू शकते. त्यांची विश्वासूपणाबद्दल ख्याती आहे. मदुरेचे असिस्टंट कमिशनर ऑफ इन्कमटॅक्स यांनीं नटुकोटाइ चेट्टींच्या संपत्तीचा अंदाज दहा वर्षांपूर्वी केला. त्या अंदाजाप्रमाणें त्यांच्या संपत्तीचा आकडा ८० कोटि रुपये भरतो. सावकारीच्या धंद्यांत त्यांचे स्वतःचें भांडवल ३६ कोटींचें असून घरें व दागिने ह्यांत त्यांचें १० कोटि रुपये आहेत. मलाया, सिलोन, ब्रह्मदेश इत्यादि ठिकाणीं शेती, रबराचे, नारळाचे व चहाचे मळे, इत्यादींत त्यांनीं १५ कोटि रुपये गुंतविलेले आहेत. त्यांचेकडे सुमारें २५ कोटि रुपयांच्या ठेवी आहेत, त्यांतील ८ कोटि रुपये चेट्टी स्त्रिया व मुलें ह्यांचेच आहेत, म्हणजे, त्यांचें स्वतःचें भांडवल ५८ कोटि रुपयांचें असून कर्जाऊ भांडवल १७ कोटींचें आहे. चेटिनाड मधील २४२ चेट्टींचें धंद्यांतील भांडवल ११ कोटि रुपये असून त्यांपैकीं ३ कोटि ब्रह्मदेशांत व २¾ कोटि मलायांत गुंतविलेले आहे. १९३८ च्या ॲग्रिकल्चरिस्ट्स रिलीफ ॲक्टामुळें चेटींचा धंदा बराच कमी झाला आहे.

नटुकोटाइ चेट्टींकडे मुख्यतः त्यांच्या नातेवाइकांच्या व स्नेह्यांच्या ठेवी असतात. इंपीरिअल व इतर जॉइंट स्टॉक बँकांकडून प्रसंगविशेषीं ते कर्जेहि घेतात. मद्रास, रंगून, सिंगापूर, पेनांग, कोलंबो इत्यादि ठिकाणीं तेथील चेट्टी प्रत्येक तामीळ महिन्यास जमून चालू व्याजाचा दर ठरवितात, व ह्या दरानें ते एकमेकाला कर्जे देतात. चेट्टी ठोक कर्जे देतात, तीं मुख्यतः प्रॉमिसरी नोटा घेऊनच होय. तामीळ भाषेंत लिहिलेल्या प्रॉमिसरी नोटांचे नमुने छापून तयार असतात, ते कर्जदार भरून देतात. व्याजाचा दर शेतीच्या मोसमास अनुसरून वर-खालीं जातो. कर्ज देतांना व्याज कापून घेण्यांत येतें व कर्जदार रोज अथवा मासिक हप्त्यांनीं कर्जफेड करतो. त्यांत चूक झाल्यास दंडादाखल भारी व्याज द्यावें लागतें. तांदूळ, तंबाखु, कपास इत्यादींच्या उभ्या पिकांचे तारणावरहि चेट्टी कर्जे देतात व पिकें विकून तीं वसूल करतात.

ब्रह्मदेश व मलाया येथें चेट्टींची सावकारी मोठ्या प्रमाणावर चालते. ब्रह्मदेशांत चेट्टींच्या सुमारें ९५ फर्म्स आहेत व त्या सावकारी करतात. त्यांनीं रंगूनजवळ एक शाळा स्थापन केलेली असून रंगून विश्वविद्यालयांतील बँकिंग व कॉमर्स ह्या विषयांच्या अध्यापकाच्या वेतनाची तरतूद त्यांनींच देणगी देऊन केली आहे. ब्रह्मदेशांतील चेट्टींनीं आपल्या नफ्याचा कांहीं भाग खासगी धर्मादायासाठीं व देवळांस देण्यासाठीं राखून ठेवलेला आहे. चितानाडचे सर अन्नमलाइ चेट्टियार ह्यांच्या उदारतेमुळेंच अन्नमलाइ विश्वविद्यालय स्थापन झालें आहे. एका व्यक्तीच्या देणगीतून निर्माण झालेली एवढी मोठी संस्था दुसरीकडे सांपडणार नाहीं. सर अन्नमलाइनीं आतांपर्यंत एक कोटि रुपयांचा दानधर्म केलेला आहे.

जपानी आक्रमणामुळें नटुकोटाइ चेट्टींचें किती नुकसान झालें असेल, ह्याची कल्पनाच केलेली बरी. इन्कम टॅक्सचे वसुलीचे संबंधांत आपणांस सवड व सवलत मिळावी, अशी विनंती त्यांनीं हिंदुस्थान सरकारकडे केली आहे.

---

### पेन्सिली

पेन्सिलींच्या उत्पादनांत जर्मनी अग्रेसर होता, परंतु आतां जर्मन पेन्सिलीची निर्गत सहाजीकच बंद आहे. ग्रेट ब्रिटनमध्यें पेन्सिलींचे ११ मोठे कारखाने आहेत, त्यांत दरसाल १२॥ लक्ष ग्रोस ( १ ग्रोस = १२ डझन ) पेन्सिली तयार होतात. युद्धापूर्वी हे कारखाने १२५ प्रकारच्या पेन्सिली तयार करीत असत; आतां फक्त २० प्रकारच्यांच पेन्सिली तेथें तयार करण्यांत येतात. युद्धसाहित्यांत पेन्सिलींसहि महत्त्वाचें स्थान आहे. गेल्या वर्षी ब्रिटिश सरकारनें १ कोटि, ४५ लक्ष पेन्सिली विकत घेतल्या व १ कोटि, ३० लक्ष पेन्सिली बाजारांत खपल्या. ४ कोटि, २० लक्ष पेन्सिलींची निर्गत झाली. "चायना ग्राफ" नांवाच्या खास पेन्सिली लिबियांत पाठविण्यांत येतात, त्या इतक्या नाजूक असतात, कीं, त्या वितळूं नयेत म्हणून थर्मासमध्यें ठेवाव्या लागतात.

### लिव्हरपूल विश्वविद्यालयाचें नुकसान

लिव्हरपूल विश्वविद्यालयाचें हवाई हल्ल्यांमुळें सुमारें १६ लक्ष रुपयांचें नुकसान झालें आहे. प्राणहानि फार झाली नाहीं व विश्वविद्यालयाच्या कामांत फार व्यत्ययहि आला नाहीं. वरील माहिती विश्वविद्यालयाचे चॅन्सेलर, लॉर्ड डर्बी, ह्यांनीं सांगितली.

### ब्रिटिश छापखानेवाल्यांची अडचण

ब्रिटिश छापखानेवाल्यांस पुस्तकांसाठीं पूर्वीच्या मानानें एक शतांशहि कागद मिळत नाहीं. छपाईच्या व बांइडिंगच्या कामास लागणारे कामगार फौजेंत दाखल झालेले असल्यामुळें त्या बाबतहि अडचण होती, ती दूर करण्यासाठीं सरकारशीं वाटाघाटी करून छापखानेवाल्यांनीं आतां स्त्री-कामगार मिळविले आहेत.

### बीर नरम झाली

बीर तयार करण्याच्या कारखान्यांत मनुष्यबळाचा तुटवडा पडत असल्याकारणानें व माल्टचा साठा ठेवणें आवश्यक असल्यानें, बीरचा कडकपणा ५% कमी करण्याचें ब्रिटिश सरकारनें ठरविलें आहे.

# स्फुट-विचार

## इंग्लंडचा वाढता युद्धखर्च आणि बचत

उत्पन्नाच्या मानानें ब्रिटिश सरकारचा युद्धखर्च सारखा वाढत आहे, आणि त्या वाढत्या खर्चाची तरतूद कॉमन्स सभेच्या संमतीनें कर्जाच्या मार्गानें फडनवीसांस करावी लागते. त्याप्रमाणें सर किंग्स्ले वुड ह्यांनीं पंचवीस कोटि पौंड अधिक उभारून खर्चण्याची परवानगी कॉमन्स सभेकडून गेल्या आठवड्यांत घेतली. पूर्वीच्या सहा आठवड्यांत इंग्लंडचा सरकारी खर्च दररोज सुमारें एकोणीस कोटि रुपये ह्या रकमेनें होत आला आहे, आणि तो आणखी वाढण्याचा संभव आहे असें त्यांनीं सांगितलें. गेल्या महायुद्धांतल्या अधिकांत अधिक झालेल्या खर्चास ह्या आकड्यांनीं केव्हांच मागें टाकलें आहे. दोन वर्षांमागें इंग्लंडचा दररोजचा खर्च साडेसहा कोटी रुपये होता, आणि त्यांतले सव्वापांच कोटि रुपये लष्करासाठी होते. चालू सालचा सरासरीचा मासिक खर्च सुमारें सोळा कोटि रुपये होईल असा अंदाज आहे. अमेरिकेकडून उसनवारीनें घेतल्या जाणाऱ्या सामुग्रीच्या किंमतीचा त्या आकड्यांत समावेश नाहीं. पुढच्या वर्षाच्या आरंभींच्या महिन्यांत व्हावयाच्या खर्चासाठी तेराशे कोटि रुपयांची मंजुरी सर किंग्स्ले वुड ह्यांनीं कॉमन्स सभेकडून घेतली. त्यांनीं व इतर सभासदांनीं, लोकांनीं आपल्या खाजगी खर्चांत करावयाच्या बचतीच्या महत्त्वावर विशेष जोर दिला. हा खर्च सर्वांनीं निश्चयानें न कमी केल्यास ब्रिटिश चलनाचें मोल उतरून महागाई पसरेल आणि राष्ट्रावर भलती आपत्ति ओढवेल अशी भीति त्यांनीं व्यक्त केली. सार्वत्रिक बचतीची आवश्यकता एकमुखानें प्रतिपादण्यांत आली.

---

## विलायतेमधील हिंदी कर्जाची फेड

सात कोटि पौंड किंमतीच्या अडीच व तीन टक्के दरांच्या व्याजाच्या बिनमुदत विलायती कर्जरोख्यांची फेड करून टाकण्याची योजना अंमलांत आणण्याचा आपला बेत सर जेरेमी रेस्मन ह्यांनीं अंदाजपत्रकाविषयींच्या आपल्या भाषणांत मध्यवर्ती असेंब्लींत जाहीर केला होता. हिंदुस्थान सरकारच्या खात्यांत लंडनमध्यें शिलका सारख्या वाढत आहेत. त्यांचा उपयोग ब्रिटिश सरकारच्या सहाय्यानें ह्या परतफेडीचे कामीं केला जात आहे. ह्याचें विवेचन आम्हीं मागें केलेंच आहे. अडीच टक्क्यांच्या रोख्यांचे ८९ कोटि, ७७ लाख आणि तीन टक्क्यांच्या रोख्यांचे ४ कोटि रुपये एकूण सुमारें ९४ कोटी रुपये परतफेडीची योजना पुरी करण्यास तयार ठेवणें आवश्यक होतें. विलायती कर्जरोख्यांच्या जागीं हिंदी रोखे येणें हाच वरील कर्जफेडीचा वास्तविक आशय आहे. इंग्लंडमधील रोखे धारण करणारांस हिंदुस्थान सरकारच्या वतीनें रिझर्व्ह बँकेनें ७९ कोटि, ७० लाख रुपये आपल्याजवळील शिलकेमधून देऊन टाकले आहेत, आणि हिंदुस्थानांतील रोखे धारण करणारांचें दहा कोटि रुपये अदा करण्यांत आले आहेत. रिझर्व्ह बँकेनें ८९ कोटी रुपयांची रकम पुरवली तिची फेड हिंदुस्थान सरकारनें त्या किंमतीचे तात्पुरते काढलेले रोखे तिच्या स्वाधीन करून केली आहे. ह्या रोख्यांपैकी ६९ कोटींचीं ट्रेझरी बिलें सरकारनें काढलीं आहेत असें दिसतें. ह्या व्यवहाराचा दुहेरी परिणाम झालेला आहे. रिझर्व्ह बँकेजवळील पौंडांतील लंडनमध्यें असलेले रोखे कमी होऊन हिंदी रोख्यांचें ह्या देशांतलें प्रमाण वाढलें आहे. तथापि हीं प्रमाणें कायदेशीर मर्यादेंत आहेत आणि चलनास भरपूर आधार शिल्लक आहे.

---

## आखूड धाग्याची कपास पेरूं नका

मुंबई प्रांतांतील शेतकऱ्यांनीं येत्या मोसमांत ज्वारी, बाजरी व तांदूळ ह्यांची मोठ्या प्रमाणावर लागवड करावी, असा प्रचार प्रांतिक शेतकी खातें करणार आहे. आखूड धाग्याच्या कपाशीस मागणी नसल्याकारणानें त्यास भाव येत नाहीं, तेव्हां त्या कपाशीची लागवड कमी करणें आवश्यक झालें आहे. तेव्हां कपाशीचे ऐवजीं धान्य पेरणें शेतकऱ्यांच्या अधिक हिताचें होणार आहे. ज्या विभागांत आखूड धाग्याच्या कपाशीची लागवड मोठ्या प्रमाणांत होते, अशा ठिकाणीं चार शेती पदवीधर प्रचारासाठी नेमण्यांत यावयाचे आहेत. अहमदनगर, पुणें व सोलापूर ह्या जिल्ह्यांत अनुक्रमें १,२९,०००, ९,५०० व ५२,५०० एकर जमीन आखूड धाग्याच्या कपाशीखालीं आहे. ह्यांपैकीं शक्य तेवढी जमीन ज्वारी–बाजरीखालीं आणण्याचा प्रयत्न केला जाईल. आखूड धाग्याच्या दुसऱ्या एक प्रकारच्या कपाशीखालीं आणखी अनुक्रमें ८००, ४,००० व ३,२०० एकर जमीन ह्या तीन जिल्ह्यांतून आहे, त्यांचेऐवजीहि दुसरीं पिकें लावलीं जावीं असा प्रचार करावा लागेल. इंग्रजी, मराठी, गुजराती, कानडी, उर्दू, ह्या सर्व भाषांतून प्रचारपत्रकें छापून तीं आवश्यक तेथें वाटण्यांत येणार आहेत.

---

## अभिनंदनीय चढाईचें नवें धोरण

मित्र राष्ट्रांची कल्पना नव्हती अशावेळीं अकस्मात् पॅसिफिक महासागरांत युद्ध चालू केल्यामुळें जपानला आतांपर्यंत जय मिळाले असून इंग्लंडला सारखी माघार घ्यावी लागली आहे. योजनात्मक पद्धतीनें युद्धाची जय्यत तयारी करून इंग्लंड व अमेरिका हीं राष्ट्रें गैरसावध असतांना जपाननें चढाई केली ती यशस्वी झाली. पण ह्या प्रगतीस अर्थातच मर्यादा आहे आणि ती मित्र राष्ट्रांच्या युद्धसामुग्रीच्या सिद्धतेची आहे. आतांपर्यंत केवळ बचावाचें धोरण मलाया, जाव्हा इत्यादि क्षेत्रांत मित्रराष्ट्रांनीं अंगिकारल्यानें आपली गति अशीच अकुंठितपणानें सारखी होणार असें जपानला वाटलें असल्यास त्यांत नवल नाहीं. पण आतां ऑस्ट्रेलिया व अमेरिका ह्यांनीं आपलें धोरण केवळ संरक्षणात्मक न ठेवतां तें चढाईचें करण्याचें ठरवलें आहे ही गोष्ट अभिनंदनीय आहे. शत्रूचीं जहाजें व विमानगृहें ह्यांचेवर हल्ले चढवून त्यासच स्वसंरक्षणाची व्यवस्था करणें भाग पाडून बाजू त्याचे अंगावर उलटवण्याचा आपला निश्चय ऑस्ट्रेलियन व अमेरिकन मुत्सद्यांनीं स्पष्टपणानें व्यक्त केला आहे. एअरमार्शल सर रिचर्ड पिअर्स ह्यांनीं ब्रह्मदेशांत आपल्या विमानदलानें उत्कृष्ट कामगिरी चालवून शत्रूवर हल्ले चढवण्याचा कार्यक्रम हातीं घेतला असल्याचें नुकतेंच सांगितलें आहे. जपानचीं रणक्षेत्रें आतां लांबवर पसरलीं असल्याकारणानें त्यास वहातुकीची अडचण अधिकाधिक भासत जाणार हें उघड आहे. ह्याचा फायदा ऑस्ट्रेलिया व अमेरिका ह्यांस पॅसिफिक महासागरांत घेतां येण्यासारखा आहे. जपानवर हल्ला हा ऑस्ट्रेलिया व हिंदुस्थान ह्यांच्या रक्षणाचा कार्यक्षम मार्ग आहे.

### " आकस्मिक " हरताळ बेकायदेशीर

कारखान्यांचे मालक आणि कामगार ह्यांचेमध्यें उत्पन्न होणारे वांधे तडजोडीनें मिटवले जावे आणि कामगारांनीं हरताळ पाडू त्यामुळें उद्योगधंद्यांचें होणारें नुकसान टाळलें जावें ह्या हेतूनें हिंदुस्थानांत कायदे केलेले आहेत. कामगारांच्या हितसंबंधांचें रक्षण होऊन दोन पक्षांमध्यें उपस्थित होणारी तेढ शांतपणानें दूर होण्यास वाव मिळावा हा ह्या कायद्यांचा उद्देश आहे. सध्याच्या युद्धपरिस्थितीमध्यें कारखाने निर्वेधपणानें चालवले जाऊन उत्पादनांत खळ पडूं नयें ही गोष्ट तर अत्यंत महत्त्वाची आहे. मालकांच्या विरुद्ध कामगारांचीं गाऱ्हाणीं असतील त्यांचा निकाल आकस्मिक अंगीकारलेल्या टाळेबंदीनें किंवा हरताळानें न होतां निःपक्षपाती तिऱ्हाइतांच्या मार्फत त्यांचा विचार व्हावा ही मामुली परिस्थितींतली इष्ट गोष्ट युद्धकाळांत जिव्हाळ्याची होऊन बसते. ह्यासाठी हिंदुस्थान सरकारनें राष्ट्रसंरक्षण कायद्याखाली नवीन हुकूम काढून उद्योगधंद्यांतले आकस्मिक हरताळ शिक्षेस पात्र ठरवले आहेत. चवदा दिवसांच्या अगाऊ सूचनेवांचून केलेला हरताळ बेकायदेशीर होईल आणि वांध्यांची चौकशी चालू असल्यास ती संपून दोन महिने लोटल्यावांचून कायदेशीर हरताळ पुकारला जाऊं शकत नाहीं ह्या दोन गोष्टी येथें लक्षांत ठेवल्या पाहिजेत. वांध्यांच्या बाबतींतील १९२९ च्या कायद्याअन्वयें ते मिटवण्यासाठी चौकशीचें कोर्ट किंवा लवाद नेमण्याचा अधिकार मुंबई सरकारास आहे. युद्धपरिस्थितींत कामगार वर्गास अन्याय होऊं नये ह्याविषयीं सरकार काळजी घेईल ह्यांत शंका नाहीं.

---

### गेल्या आठवड्यांतील रोखे बाजार

गेल्या आठवड्यांत रोखे बाजारावर मंदीचीच छाया होती. ब्रह्मदेशाशीं बँका व विमा कंपन्या ह्यांचा निकटचा संबंध असल्याकारणानें, त्यांच्या भागांच्या किंमती खालीं गेल्या. शत्रुहल्ला जेथें येण्याचा संभव कमी, अशा अंतर्गत ठिकाणच्या कारखान्यांचे भाग खरेदी करण्याची प्रवृत्ति बाजारांत आढळत असे, तिलाहि ब्रम्हदेशांतील युद्धाच्या परिस्थितीनें आळा घातला. चांदीच्या बाजारांत सट्टेबाजी जोरांत चालू होती. रिझर्व्ह बँकेनें पाटले देण्यास प्रारंभ करण्यावर चांदीच्या बाजाराची परिस्थिति अवलंबून आहे. हिंदुस्थान सरकारच्या रोख्यांच्या किमान किंमती ठरवून दिल्या तरी प्रांतिक सरकारांच्या रोख्यांचे किमान बाजारभाव निश्चित केलेले नव्हते. ते आतां करण्यांत आले आहेत. पौंडांतील कर्जरोख्यांच्या बदलीसंबंधीं तपशील दुसरीकडे देण्यांत आलेलाच आहे. चांदीची किंमत ८८ रुपये व सोन्याची किंमत ५४३⁄४ रुपये झाली आहे.

---

### रिझर्व्ह बँकेचें साप्ताहिक पत्रक

रिझर्व्ह बँकेच्या साप्ताहिक पत्रकावरून ९३% व ३% स्टर्लिंग रोख्यांच्या बदलीच्या व्यवहाराची कल्पना येते. ह्या रोख्यांची रकम—९४ कोटि रुपये—२ मार्च रोजीं देण्याची होती. बँकेचें पत्रक ६ मार्च ह्या तारखेचें आहे. ६ मार्चपर्यंत, बहुतेक सर्व रकमेची परतफेड झालेली आहे. स्टर्लिंग रोख्यांची संख्या ७९ कोटि रुपयांनीं कमी होऊन त्यांची जागा रुपयांतील रोख्यांनीं घेतली आहे. व्यवहारांतील चलनी नोटांत १० कोटींची वाढ झाली असून बँकेजवळील रुपयांची संख्या २८३⁄४ कोटि झाली आहे. रिझर्व्ह बँकेच्या बँकिंग खात्यांतील सरकारी ठेवी ४१⁄२ कोटींनीं वाढल्या व बँकांच्या ठेवींत २ कोटींची भर पडली. रिझर्व्ह बँकेच्या पत्रकांतील महत्त्वाचे आकडे खालीं दिले आहेत:—

| | २७ फेब्रुवारी | ६ मार्च |
|---|---|---|
| एकूण नोटा | ३८९ कोटि रु. | ३९८ कोटि रु. |
| स्टर्लिंग रोखे | २७३१⁄४ कोटि रु. | १९४ कोटि रु. |
| रुपयांतील रोखे | ४११⁄४ कोटि रु. | १२१ कोटि रु. |
| रुपये | २९३⁄४ कोटि | २८३⁄४ कोटि. |

---

### प्राप्तीवरील कराची आकारणी

नव्या दरानें इन्कमटॅक्सचा बोजा किती बसेल, ह्याची माहिती खालीं दिली आहे. सध्याच्या पद्धतीप्रमाणें, मूळ इन्कमटॅक्सवर व सुपरटॅक्सवर एक विशिष्ट शतमानाचा चार्ज बसविला जातो. नव्या पद्धतींत स्लॅब अथवा टप्प्यांची योजना केलेली आहे. उदाहरणार्थ, १,५०० ते ५,००० रुपयांच्या उत्पन्नावरील सरचार्ज रुपयांत ६ पै आहे; पुढील ५,००० हजारांवर ९ पै, त्यांपुढील ५,००० हजारांवर १ आ. २ पै व उरलेल्या पुढील उत्पन्नावर रुपयांत १ आ. ३ पै आहे. अशा रीतीनें, कराचा बोजा हळुहळु वाढवून, तो प्रारंभीच्या १३⁄४% चा २० लाख रुपये उत्पन्नावर ८५% करण्यांत आला आहे. ६ हजार रुपयांपर्यंतच्या उत्पन्नावरील सरचार्जचा दर ५०% पडत असला तरी कर भरणारास कांहीं रकम सेव्हिंग्ज बँकेंत टाकण्याची सवलत दिलेली असल्याकारणानें, ती विचारांत घेतां व विमा, प्रॉव्हिडंड फंड इत्यादींची तरतूद लक्षांत घेतां प्रत्यक्ष कराचें प्रमाण १·५% पासून ५·१% पर्यंत हळुहळु वाढत गेलेलें आढळतें.

| प्राप्ती | सर्व प्रकारच्या सवलती लक्षांत घेऊन, कराची रकम | | एकूण उत्पन्नाशीं प्रमाण |
|---|---|---|---|
| रु. | रु. | आ. | % |
| २,१५० | ३३ | ५ | १·५ |
| २,५०० | ५५ | ५ | २·२ |
| ३,००० | ८४ | ११ | २·८ |
| ३,५०० | ११५ | ३ | ३·३ |
| ४,००० | १४५ | १२ | ३·६ |
| ४,५०० | १७६ | ५ | ३·९ |
| ५,००० | २०६ | १४ | ४·१ |
| ५,५०० | २५९ | १५ | ४·७ |
| ६,००० | ३०७ | १ | ५·१ |
| ६,५०० | ३८४ | २ | ५·९ |
| ७,००० | ४३६ | ३ | ६·२ |
| ७,५०० | ४८८ | ५ | ६·५ |
| ८,००० | ५४० | ६ | ६·८ |
| ९,००० | ६४४ | ९ | ७·२ |
| १०,००० | ७४८ | ११ | ७·५ |
| ११,००० | ९१३ | ० | ८·३ |
| १२,००० | १,०७८ | ० | ९·० |
| १३,००० | १,२४३ | ० | ९·६ |
| १४,००० | १,४०८ | ९ | १०·१ |
| १५,००० | १,५७४ | ० | १०·५ |

## दोन निवाडे

### डायरेक्टरांच्या सभांचा कोरम

#### लाहोर हायकोर्टाचा निवाडा

गणेश फ्लोअर मिल्स लि. च्या जनरल मॅनेजरनें २८ ऑगस्ट १९३९ रोजीं कंपनीचे वतीनें राय बहादूर शेठ महन्नारायण यांचेवर दावा लावला, तो लायलपूरच्या फर्स्ट क्लास सबजज्जानें जनरल मॅनेजरास दावा लावण्याचा अधिकार नव्हता, ह्या मुद्यावर फेटाळला, त्यावर लाहोर हायकोर्टाकडे अपील करण्यांत आलें. डायरेक्टरांच्या ज्या सभेंत जनरल मॅनेजरला दावा लावण्यास अधिकार देण्यांत आला होता, तिला कंपनीच्या सहापैकीं पांचच डायरेक्टर हजर होते. बोर्डाच्या सभांचा कोरम किती असावा, हें बोर्डानें ठरविलेलें नव्हतें; तेव्हां सबंद बोर्डाचा अधिकार त्याचेपेक्षा लहान मंडळास चालवितां येणार नाहीं, सबब बोर्डाचा प्रस्तुत ठराव नियमबाह्य आहे, असें सबजज्जाचें म्हणणें पडलें. "कंपनी कायद्याप्रमाणें चालणाऱ्या मंडळीच्या बहुसंख्य सभासदांस सबंद मंडळाचा अधिकार आपोआपच प्राप्त होतो. नियमाप्रमाणें सभा बोलाविलेली असेल तर हजर असलेल्या सभासदांपैकीं बहुसंख्य सभासदांचें मत सबंध मंडळावर बंधनकारक असतें. अर्थात् कंपनीच्या आर्टिकल्समध्यें दुसरी कांहीं तरतूद असेल, तर गोष्ट वेगळी. गणेश फ्लोअर मिलच्या आर्टिकल्सनें डायरेक्टरांच्या सभेस आवश्यक असलेला कोरमचा आकडा ठरविलेला नव्हता. सबब, फर्स्टक्लास सबजज्जाचा हुकूम फिरविण्यांत येत आहे" असा निवाडा लाहोर हायकोर्टानें दिला.

### रद्द पॉलिसी सुरू करण्यासाठी भरलेले पैसे "विश्वस्त" आहेत काय ?

#### मद्रास हायकोर्टाचा निवाडा

श्री. रामकृष्ण अयर ह्यांनीं साउथ इंडियन जनरल ॲशुरन्स कं. लि. कडे आपली रद्द पॉलिसी सुरू व्हावी म्हणून रकमेचा भरणा केला, परंतु पॉलिसी पुनः सुरू होण्यापूर्वी कंपनी लिक्विडेशनमध्यें गेली. तेव्हां ही रक्कम विश्वस्त समजण्यांत येऊन, ती आपणांस इतर घेणेकऱ्यांचे आधी परत मिळावी असा दावा वादीनें ऑफिशिअल लिक्विडेटरवर मद्रास हायकोर्टांत आणला. "कंपनीला पैसे दिले ते कांहीं विशिष्ट कामासाठी दिलेले होते. ते तिनें दुसऱ्या कोणास द्यावयाचे नव्हते अथवा कांहीं विशिष्ट परिस्थितींनें ते तिनें परत करावे असाहि करार नव्हता. ज्या उद्देशानें अर्जदारानें पैसे भरले, तो उद्देश सफल झालेला नाहीं, तथापि ज्या वेळीं कंपनीनें पैसे स्वीकारले, त्यावेळीं तिनें ते विश्वस्त ह्या नात्यानें घेतले असें म्हणतां येणार नाहीं." असा हायकोर्टाचा निर्णय झाला. वादीचे नांवानें विमा पॉलिसींचें वेचन झालेलें होतें व पॉलिसीचे दोन वर्षांचे हप्ते देणें राहिले होते. हे हप्ते ( १४० रुपये ) वादीनें कंपनीकडे पाठवून पॉलिसी उभी करण्याचा यत्न केला. डॉक्टरचा मूळ विमेदाराच्या प्रकृतीबद्दलचा दाखला कंपनीनें मागविला, तो येईपर्यंत कंपनीनें ही रक्कम "अडवान्स प्रीमियम रिसीट" खाली टाकली. लवकरच कंपनीच्या लिक्विडेशनच काम चालू होऊन प्रस्तुत दावा उपस्थित झाला.


मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं

असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् को-ऑपरेटिव्ह् बँक, लिमिटेड.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी–सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंग

९, बेक हाउस लेन, कोट मुंबई.

शाखा

| | |
|---|---|
| १ बारामती ( जि. पुणें ) | १८ अकलूज ( जि. सोलापूर ) |
| २ सातारा ( „ सातारा ) | १९ विरमगांव ( „ अहमदाबाद ) |
| ३ इस्लामपूर ( „ „ ) | २० धुळें ( „ पु. खानदेश ) |
| ४ कऱ्हाड ( „ „ ) | २१ दोंडाईचें ( „ „ ) |
| ५ तासगांव ( „ „ ) | २२ शिरपूर ( „ „ ) |
| ६ किर्लोस्करवाडी ( „ „ ) | २३ शहादें ( „ „ ) |
| ७ शिराळें ( „ „ ) | २४ नंदुरबार ( „ „ ) |
| ८ कोरेगांव ( „ „ ) | २५ साक्री ( „ „ ) |
| ९ वाई ( „ „ ) | २६ शिंदखेडें ( „ „ ) |
| १० अहमदनगर ( „ अहमदनगर ) | २७ तळोदें ( „ „ ) |
| ११ शेवगांव ( „ „ ) | २८ मालेगांव ( „ नाशिक ) |
| १२ कोपरगांव ( „ „ ) | २९ सटाणा ( „ „ ) |
| १३ बेलापूर ( „ „ ) | ३० कळवण ( „ „ ) |
| १४ राहुरी ( „ „ ) | ३१ लासलगांव ( „ „ ) |
| १५ भिवंडी ( „ ठाणें ) | ३२ नांदगांव ( „ „ ) |
| १६ पालघर ( „ „ ) | ३३ दोहद ( „ पंचमहाल ) |
| १७ कल्याण ( „ „ ) | ३४ कालोल ( „ „ ) |

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेडऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.

महायुद्ध दाराशीं आलें
परदेशी औषधें
दुर्मिळ व महाग झालीं
पण
भिण्याचें कारण नाहीं !!!
— कारण —
आयुर्वेद रसशाळा पुणें लि०
या देशी औषधांच्या प्रसिद्ध कारखान्यानें
तयार केलेलीं
● रक्तवर्धक, ● उपनाह,
● बालजीवन, ● कॅल्सीप्राल
इत्यादि पेटंट, स्टँडर्ड व लोकप्रिय औषधें खात्री पटल्यामुळें
★ डॉक्टर्सहि वापरूं लागले आहेत. ★
दरसाल बिनचूक नफा वाटणाऱ्या ह्या कंपनीचे
शेअर्स व औषधें मागवा.
आयुर्वेद रसशाळा पुणें लि०
मुख्य दुकान गणपति चौक, लक्ष्मीरोड, पुणें २.

DECCAN BOOK STALL
Booksellers, Publishers & Subscription Agents
Fergusson College Road, Poona No. 4
(1) We stock and supply Educational books, General books & Library books.
(2) We supply Government of Bombay and Government of India publications.
(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.
(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.

अर्थशास्त्र
लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें ५००; किंमत ५ रुपये
या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

कॉमनवेल्थचा वैभवशाली विस्तार
★ २७ हजारांचेवर पॉलिसी-होल्डर्स
★ एकूण चालू विमे २ कोटीचेवर
★ दोन हजारांहून अधिक कार्यकर्ते निरनिराळ्या प्रांतांत कॉमनवेल्थसाठी उत्साहानें काम करीत आहेत.


हेड ऑफिस बिल्डिंग

कॉमनवेल्थ
ॲशुअरन्स कंपनी लि.
THE COMMONWEALTH ASSURANCE CO. LTD. POONA CITY

चेअरमन
* खा. ब. एम्. एन्. मेथा,
C. I. E., M. B. E.

ॲक्टिंग ऑफिस सुपरिन्टेंडेंट * एम्. एन्. भागवत, B. A.
'कॉमनवेल्थ' ची पॉलिसी घेऊन जीवन निश्चिंत व सुखी करा.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व
रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. १२७।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
(टपाल हंशील माफ)
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ८ पुणें, बुधवार, तारीख २५ मार्च, १९४२ अंक १२

न्यायमूर्ति रानड्यांचे
तीन अप्रसिद्ध लेख प्रसिद्ध झाले
PLEA FOR PROTECTIONIST POLICY
INDIAN SUGAR INDUSTRY
न्यायमूर्ति रानडे यांनीं १८९९ सालीं 'टाइम्स ऑफ इंडियांत' स्वदेशी साखरेच्या धंद्यासंबंधीं लिहिलेले महत्त्वाचे तीन लेख, प्रो. वा. गो. काळे ह्यांच्या प्रस्तावनेसह प्रसिद्ध करण्यांत आले आहेत.
व्यवस्थापक, 'अर्थ', पुणें ४
ह्या पत्त्यावर आठ आण्यांचीं तिकिटें पाठवून लेखांची प्रत मागवावी.

श्रीराम सिल्क मिल्स लि., बंगलोर
[कंपनीनें १९४० अखेर ६ टक्के डिव्हिडंड वांटला आहे.]
युद्धसाहित्यपुरवठा-खात्याची पॅरेशूटकरितां लागणाऱ्या
रेशमी कापडाची ऑर्डर पुरी करण्यासाठी लागणाऱ्या भांडवलाकरितां तूर्त एकूण रु. १ लक्षाच्या रकमेपर्यंत
ठेवी घेणें आहेत
व्याजाचा दर ४॥ ते ६ टक्के. ठेव किमान रु. ५०० ची असावी. ठेवीवरील व्याज दर सहा महिन्यांनीं दिलें जातें.
श्रीराम सिल्क मिल्स लि., श्रीरामबाग, बसवनगुडी, बंगलोर.
नारायण गोविंद नाईक, (माजी अध्यक्ष, म्हैसूर चेंबर ऑफ कॉमर्स) मॅनेजिंग डायरेक्टर
आमच्या कारखान्यांतील माल मुंबईस बॉम्बे स्वदेशी को-ऑपरेटिव्ह स्टोअर्समध्यें व पुण्यास लक्ष्मी रोडवरील रे म्युझिअमच्या व्यापार-संवर्धन-गृहांत पहा.

'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

वक्तशीर आणि मनपसंत काम करून देणारे
मोहन वॉच कंपनी
रेग्युलेशन मोफत
कॉमनवेल्थ बिल्डिंगसमोर लक्ष्मी रोड, पुणें २.

महायुद्धाची जाणीव! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.
बंबाचे माडीवर
महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी
बुधवार चौक, पुणें

# विविध माहिती

### बँकांच्या सुट्या कमी झाल्या

इतर कचेऱ्यांपेक्षा बँकांना सुट्या कमी असतात व त्यांचे-मध्येंहि आतां कपात होणार आहे. युद्धसाहित्याच्या निर्मितीचा वेग सुट्यांमुळें मंदावतो, म्हणून सार्वजनिक सुट्यांची संख्या कमी करण्यांत आलेली आहे. रामनवमी (२६ मार्च), ईस्टर (४ व ६ एप्रिल), झोर घोस्ट नो दिसो (१२ जून) पार्शी वर्षारंभ (४ सप्टेंबर), दिवाळी (७ नोव्हेंबर), नाताळ (२४ डिसेंबर), वर्षअखेर (३१ डिसेंबर) ह्या सुट्या आतां मिळणार नाहींत.

### चेक्सची देवघेव

मुंबई बँकर्स क्लिअरिंग हाऊसमध्यें १३ मार्च अखेर संपलेल्या आठवड्यांत २२ कोटि रुपये किंमतीच्या १,६३,७६९ चेक्सची देवघेव झाली.

### वॉर रिस्क इन्शुअरन्स

वॉर रिस्क (गुड्स) इन्शुअरन्सच्या (१९४०) ऑर्डिनन्सप्रमाणें उतरावयाच्या मालाच्या युद्धविषयक धोक्याच्या विम्याचा हप्ता येत्या तिमाहींत दरमहा दर शेकडा दोन आणे, म्हणजे सध्याच्या तिमाहींतील हप्त्याइतकाच, ठरविण्यांत आला आहे.

### फिनॅन्स बिल

मध्यवर्ती सरकारच्या येत्या वर्षांतील खर्चाची तरतूद करणारें फिनॅन्स बिल असेंब्लीनें ४९ विरुद्ध १६ मतांनीं मंजूर केलें. मुस्लिम लीगनें बिलाविरुद्ध मत दिलें.

### ऱ्होडस बेट

ऱ्होडस बेटावर ब्रिटिश नाविक दलानें जोराचा बॉंबवर्षाव केला. ह्या बेटाचें क्षेत्रफळ ५४२ चौरस मैल असून तें इटलीच्या ताब्यांत आहे. एशिया मायनरपासून पश्चिमेस तें १२ मैलांवर आहे.

### जपानचा नकार

हाँगकाँगमधील ब्रिटिश युद्ध-कैद्यांचा मध्यस्त ह्या नात्यानें काम करण्यास अर्जेंटिनाचे सरकारास जपाननें नकार दिला आहे.

### आगपेट्यांची किंमत

४० काड्यांच्या आगपेटीस दीड पैसा व ५० काड्यांच्या आगपेटीस दोन पैसे अशी किरकोळ विक्रीची कमाल किंमत सरकारनें ठरवून टाकली आहे.

### ऑल इंडिया ट्रेडिंग अँण्ड ट्रॅव्हलिंग टॉकीज लि.

वरील नांवाची सिनेमाविषयक कंपनी सोलापूर येथें श्री. शांताराम भगवंत महाजन (मॅनेजिंग डायरेक्टर) ह्यांनीं नोंदली आहे.

### फिरतीं देवळें

लंडनमधून अंतर्गत प्रदेशांत गेलेल्या ज्यू लोकांच्या सोईसाठी चाकावरून नेतां येण्याजोगीं ज्यू देवळें तयार करण्यांत येत आहेत.

### सोनें

ब्रिटिश साम्राज्यांतील ५ लक्ष कामगार सोन्याच्या खाणींत काम करीत आहेत. अमेरिकन सोन्याच्या खाणींत ५१ हजार कामगार आहेत. अमेरिकेकडे सोनें पाठवून डॉलर्सची हुंडणावळ ग्रेट ब्रिटनला मिळवितां येते.

### रद्दी लोखंड-पोलाद

१९३५ ते जानेवारी, १९४१ अखेर अमेरिकेनें २ कोटि टन वजनाचें रद्दी लोखंड व पोलाद इटली व जपान ह्या देशांकडे निर्गत केलें.

### वीजपुरवठा

मद्रास प्रांतांतील वीज कंपन्यांना ह्यापुढें नवीन ग्राहकांना वीज पुरवितां येणार नाहीं; अगदीं विशेष कारण असेल तरच नवीन लाइन टाकण्यांत येईल, असें मद्रास सरकारनें जाहीर केलें आहे.

### म्युनिसिपल हद्दींतील रेल्वेच्या इमारती

लोणावळे म्युनिसिपॅलिटीच्या हद्दीमधील रेल्वेच्या इमारती व जागा ह्यांवर म्युनिसिपल कराची आकारणी होऊं शकते किंवा नाहीं, ह्या प्रश्नाचा निकाल पुणें डिस्ट्रिक्ट जज्जांनीं नुकताच केला. सरकारी मालमत्तेवर कर घेतां येत नाहीं असें जी. आय. पी. चें म्हणणें होतें. ही मालमत्ता सरकारी असली तरी तिचा उपयोग नफा मिळविण्याकडे केला जातो, असें मुंबई सरकारचें म्हणणें होतें. सरकारी रेल्वेनें कर दिला पाहिजे, असा जज्जांचा अभिप्राय पडला.

### प्रीमिअर कन्स्ट्रक्शन कं. लि.

वरील कंपनीस १९४१ मध्यें ५ लक्ष ८४ हजार रुपये नफा झाला. ऑर्डिनरी भागीदारांस ६% कर माफ डिव्हिडंड मिळेल. मेसर्स वालचंद आणि कं. लि. ह्यांचेकडे प्रीमिअरची मॅनेजिंग एजन्सी आहे.

### हवामानाची माहिती

आपल्या हवामान खात्याचे अंदाज प्रसिद्ध करण्याचें हिंदुस्थान सरकारनें बंद केलें आहे. अमेरिकन सरकारनेंहि अशीच व्यवस्था केली आहे. वाऱ्याची दिशा व वेग, वादळें, हवेचा दाब इत्यादि माहिती आतां तेथें प्रसिद्ध होणार नाहीं.

### संघनायक

१९३२ सालीं लॉस एंजल्स येथें खेळांच्या जागतिक स्पर्धा झाल्या त्यांत जपानी पोहणारांनीं ६६ गुण मिळविले. अमेरिकेला फक्त २९ गुण मिळाले. रिझो कोइक हा जपानी संघांतील एक प्रमुख पोहणारा होता. आतां नुकतेंच असें प्रसिद्ध झालें आहे कीं, कौलून व हाँगकाँग ह्यांचेमधील अरुंद खाडींत पोहत जाऊन ब्रिटिश पाणसुरुंग बंदुकींच्या सहायानें उडवून देणाऱ्या जपानी संघाचाहि रिझो कोइक हा नायक होता! हे पाणसुरुंग निकामी केल्यामुळें जपानी फौजा घेऊन येणाऱ्या आगबोटींचा मार्ग सुकर झाला.

### बेलापूर कंपनी लि. ची प्रगति

| | १९२४ (जुनी यंत्रसामुग्री) | १९४२ नवीन यंत्रसामुग्री |
|---|---|---|
| ऊस गाळण्याची शक्ति | ४०० टन | १,००० टन |
| रोज होणारी साखर | १२३/४ टन | १२० टन |
| दर एकरी होणारा ऊस | २२१/२ टन | ४५१/२ टन |
| उसाचा प्रकार | पुंड्या, मांजाव व मॉरिशस | पी. ओ. जे. २८७८ ई. के. २८ व जी. ओ. ४१९ |
| शेतीचें क्षेत्र | ७,३६८ एकर | ११,००० एकर |
| उसाखालील क्षेत्र | १,२८८ एकर | ३,८०० एकर |
| कारखान्यांतील कामगार | ३८० | ५०० |
| शेतावरील कामगार | १,३०० | ३२५० |

अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | ९२ |
| २ निकराच्या युद्धप्रयत्नाचें अगत्य ... | ९३ |
| ३ युद्धाचा सुपारीचे भावावर परिणाम ... | ९४ |
| ४ ग्रामविरील कराची आकारणी ... | ९४ |
| ५ स्फुट विचार ... इंग्लंडमध्यें युद्धसामुग्रीचें उत्पादन–जनरल मॅक आर्थर–धान्याची पैदास व त्याचा पुरवठा–फिनॅन्स बिलावरील चर्चा–फिनॅन्स बिल मंजूर झालें–कारखानदार परिषद्–गेल्या आठवड्यांतील रोखे बाजार | ९५ |
| ६ मद्रास सहकारी चौकशी कमिटी ... | ९६ |
| ७ विमा कंपन्या व युद्धपरिस्थिति ... | ९६ |
| ८ आखूड धाग्याच्या कपाशीची खरेदी ... | ९७ |


# अर्थ

बुधवार, ता. २५ मार्च, १९४२

## निकराच्या युद्धप्रयत्नाचें अगत्य

लढाऊ सामुग्री आणि कांहीं फौज बाहेरील रणांगणांवर पाठवली कीं आपलें कर्तव्य संपलें ही परिस्थिति आतां प्रस्तुत युद्धाचे संबंधांत राहिलेली नाहीं आणि लढाई आपल्या दाराशी येऊन ठेपली आहे ह्याची जाणीव हिंदी जनतेस जितक्या तीव्रतेनें होईल तितकी ती इष्ट आहे. ब्रह्मदेशांत सध्या लढाई चालू आहे ही गोष्ट युद्ध ह्या देशाच्या किती जवळ आलें आहे हें सिद्ध करण्यास पुरेशी आहे. पण ह्याहिपेक्षा महत्त्वाची एक बाब ध्यानांत ठेवण्यासारखी आहे आणि ती म्हटली म्हणजे सध्याच्या युद्धांत प्रत्यक्ष रणांगणावरील फौजेइतकीच जबाबदारी आपापल्या घरीं असलेल्या सामान्य जनतेवर येऊन पडते ही होय. लोकांमध्यें बेदिली व फाटाफूट उत्पन्न करणें हें शत्रूच्या डावपेंचाचें एक महत्त्वाचें अंग आहे आणि त्यांस घाबरवून टाकणें हा त्या कार्यक्रमाचाच भाग आहे. हिंदुस्थानच्या एखाद्या दुसऱ्या शहरावर बॉंब टाकण्याची भीति दाखवून देशांत गोंधळ माजवण्याची युक्ति शत्रू लढवण्याचा संभव आहे. ह्या सर्व डावपेंचांस तोंड देण्याची व्यवस्था लोकांनीं संघटित रीतीनें करण्याचें अगत्य सर्वांच्या मनांवर ठसणें आवश्यक आहे. संकटाचे प्रसंगीं शिस्तीचें पालन व परस्परसहाय कसें करावें ह्याचे धडे जनतेनें एव्हांपासून शिकले पाहिजेत. ह्या दृष्टीनें सरकारी आणि बिनसरकारी प्रयत्न योजनात्मक पद्धतीनें व सहकार्यानें होणें आवश्यक आहे.

युद्ध–प्रयत्नाच्या तीन मुख्य दिशा आहेत; त्या राजकीय, आर्थिक, नागरिक, स्थानिक अशा आहेत. आपणांवर पडणाऱ्या स्थानिक संरक्षणाच्या व परस्परसहायाच्या लोकांनीं करावयाच्या प्रयत्नांचा उल्लेख वर करण्यांत आला आहे. पहिला मार्ग सरकार आणि लोकांचे पुढारी ह्यांनीं चोखाळावयाचा आहे. युद्ध–परिस्थितींत पक्षोपक्षांचे मतभेद बाजूस सारले जाऊन राष्ट्रीय राज्यकारभार एकहातानें चालावा लागतो. जनतेचें जीवित व मालमत्ता ह्यांच्या संरक्षणाचे व विविध गटांच्या व जमातींच्या लोकांनीं करावयाच्या स्वार्थत्यागाचे प्रश्न येथें येत असल्यानें एकसूत्री व एकविचारी अशी राज्यव्यवस्था युद्धकाळांत अंमलांत असली पाहिजे. इंग्लंडमध्यें सर्व पक्षांचें संयुक्त मंत्रिमंडळ राज्यकारभार पहात आहे, त्याचें रहस्य लक्षांत घेतलें असतां हिंदुस्थानांत मध्यवर्ती व प्रांतिक सरकारांत अशाच प्रकारची पद्धति चालू होण्याची आवश्यकता सर्वांस पटण्यासारखी आहे. खाण्यापिण्याचे पदार्थ व वापरावयाचे कपडे ह्यांवर ब्रिटिश सरकाराचें नियंत्रण अधिकाधिक कडक होत आहे, परंतु तें युद्ध यशस्वी होण्यास अगत्याचें असल्यानें इंग्लंडमधील जनतेनें त्यास कर्तव्यनिष्ठेनें, स्वार्थत्यागपूर्वक मान्यता दिली आहे. शांततेच्या काळांत जाचक वाटणारे निर्बंध युद्धपरिस्थितींत अपरिहार्य व आवश्यक होतात. बाजारभाव, उत्पादन, व्यापार, कर इत्यादि बाबतींत सरकारचा हस्तक्षेप ह्या देशांतहि राष्ट्रहिताच्या दृष्टीनें विस्तृत होण्यावांचून गत्यंतर नाहीं. ह्यासाठीं सरकार व जनता ह्यांची एकवाक्यता झाली असतां राज्यकारभार व युद्ध धोरणाची अंमलबजावणी हीं कार्यक्षम व सुकर होत असल्यानें लोकमतानुवर्ती मंत्रिमंडळांची स्थापना हिंदुस्थानांत करण्याचा विचार सध्या चालला असून त्या कार्यासाठीं सर स्टॅफर्ड क्रिप्स ह्यांची योजना ब्रिटिश मंत्रिमंडळानें केली आहे. त्यांचें कार्य जिव्हाळ्याचें व तातडीचें असल्यानें त्यांस सर्व पक्षांनीं सहाय देणें अगत्याचें आहे. सर स्टॅफर्ड ह्यांच्या शिष्टाईस यश येण्याकरितां ब्रिटिश मंत्रिमंडळ हिंदी आकांक्षांची तृप्ति होईल असें उदारपणाचें धोरण धडाडीनें पुढें मांडील अशी अपेक्षा आहे. ह्या प्रकरणीं सर्वच बाजूंनीं तडजोडीची, स्वार्थत्यागाची व सहकार्याची वृत्ति दाखवली पाहिजे.

हा राजकीय पेंच सुटला म्हणजे वर निर्दिष्ट केलेले आर्थिक प्रश्न सोडवणें सोपें जाईल. पॅसिफिक महासागरांत अलीकडे युद्धपरिस्थिति निर्माण झाली आहे तिच्या योगानें लढाऊ सामुग्रीचें उत्पादन व पुरवठा ह्यांच्या हिंदुस्थानांतील व्यवस्थेंत महत्वाचे बदल केले पाहिजेत. धान्याची पैदास वाढवणें व त्याची सर्व देशभर योग्य वाटणी करणें हा एकच प्रश्न घेतला तरी तो किती महत्वाचा आहे हें सांगण्याची आवश्यकता नाहीं. अमेरिकेंतून एक शिष्टमंडळ हिंदुस्थानांत येत आहे त्याचा उद्देश ह्या देशांत लढाऊ सामुग्रीच्या उत्पादनाची समाधानकारक तजवीज कशी करतां येईल ह्याची योजना आखणें हाच आहे. हिंदुस्थानांतल्या कारखान्यांस आवश्यक असलेली यंत्रसामुग्री अमेरिकाच पुरवूं शकेल हें उघड आहे. देशांतील मालाच्या वहातुकीचा प्रश्नहि बिकट होऊन बसला आहे. मध्यवर्ती सरकार प्रांतिक व संस्थानी सरकारांच्या सहकार्यानें हे प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न करीत आहे. येत्या शेतीच्या हंगामांत कोठें कोणतीं पिकें काढलीं जावीं ह्या विषयींच्या योजनेची आखणी लवकरच करण्यांत येणार आहे. सरकार आणि जनता ह्यांचें सहकार्य ह्या अनेक बाबतींत अगत्याचें आहे हें सांगणें नको.

### निजाम संस्थानांतून ज्वारीची आयात

निजाम संस्थानांतून मुंबई प्रांतांत ज्वारी आणण्यास संस्थानी सरकारनें परवानगी दिली आहे. ज्या व्यापाऱ्यांस ज्वारी मागवावयाची असेल, त्यांनीं डायरेक्टर ऑफ सिव्हिल सप्लाईज, सेक्रेटारिअट, मुंबई, येथें अर्ज करावा. हा अर्ज जिल्हा मॅजिस्ट्रेटांचे मार्फत केला पाहिजे.

## युद्धाचा सुपारीच्या भावावर परिणाम

परदेशांतून येणाऱ्या सुपारीपैकीं बरीचशी सुपारी स्ट्रेट्स सेटलमेंट्स व मलाया (पिनांग, जोहोर, सिंगापूर) जावा, सुमात्रा, ब्रह्मदेश, सीलोन, झांझीबार वगैरे देशांतून येत होती ती आतां येणें मुळींच शक्य दिसत नाहीं.

आतां पूर्वेकडे जोराचें युद्ध होणार असा रंग दिसत असल्यामुळें सिंगापूर, सुमात्रा, जावा, ब्रह्मदेश वगैरे देशांतील सुपारीच्या बागा थोड्याबहुत तरी उध्वस्त होण्याचा संभव दिसत आहे व जरी ह्या बागा बचावून सुरक्षित राहिल्या तरी खत, पाणी वगैरे योग्य ती निगा बागांना मिळणें शक्य नाहीं. यामुळें तेथील बागांचे नुकसान होण्याचा संभव आहे. आणखी दहावीस वर्षे तरी हिंदुस्थानाला स्वतःच्या म्हणजे मद्रास, म्हैसूर, बंगाल, आसाम व कोंकणपट्टींतील सुपारीवरच अवलंबून रहावें लागणार हें उघड आहे. म्हणजे नेहमींपेक्षा सुमारें दीड कोटी रुपये किंमतीच्या सुपारीपैकीं निदान एक कोटी रुपये किंमतीची सुपारी यंदा कमी पडेल. याचा परिणाम म्हणून अर्थातच सुपारीच्या भावाला तेजी येईल असें वाटतें. परंतु कोंकणांत तरी अद्यापपर्यंत सुपारी विकत घेणारे व्यापारी किंवा त्यांचे दलाल यांनीं सुपारीच्या भावांत विशेष बदल न करतां सुपारीच्या बागांच्या मालकांपासून सुपारी विकत घेण्याचा जवळजवळ पूर्वीचाच, थोडा कमीच, भाव कायम ठेवला आहे.

कोंकणाच्या पोफळींना, बांड, अळिंब, टोके वगैरे अनेक रोग होऊन बरेंच नुकसान होतें, हें सुपारीच्या बागाईतदारांना ठाऊक आहेच. सुपारीची लागवड करणारे आपआपल्या मताप्रमाणें सुचतील तसतसे या रोगांवर अनेक प्रकारचे उपाय करतात परंतु त्या उपायांनीं हे रोग आटोक्यांत आलेले नाहींत. उलट या रोगांची चढती कमानच आहे. रोगट झाडांची संख्या वाढतच आहे. बरीच ओरड करूनहि शेतकी खात्यानें या रोगांचें फारसें संशोधन केलेलें दिसत नाहीं किंवा केलेलें असल्यास त्या संशोधनाची किंवा संशोधन केल्यामुळें या रोगांवर सांपडलेल्या उपायांची माहिती प्रसिद्ध केलेली नाहीं; निदान ती सुपारीच्या बागांच्या मालकांच्या नजरेस आणलेली नाहीं.

सुपारीच्या जमिनीचा सारा एकरीं पंधरा रुपये आहे. तो देणें या रोगांमुळें नुकसान होऊन माल पदरांत पडत नसल्यामुळें मालकांना अतिशय जड जात आहे. शेतकी खात्यानें या रोगांचें संशोधन करून उपाय शोधून काढून प्रसिद्ध केले असते, तर सुपारीच्या बागांच्या मालकांचें रोगांमुळें होत असणारें नुकसान भरून निघालें असतें व महायुद्धामुळें बाहेरून माल येण्याचा बंद झाल्याकारणानें आलेल्या संधीचा फायदा घेतां आला असता.

हरि पुरुषोत्तम परांजपे

("शेती आणि शेतकरी")

### अनौरस संतति

अनौरस संततीच्या पालनपोषणाची जबाबदारी इटालिअन सरकारनें स्वतःकडे घेतली आहे.

### हातमाग

हिंदुस्थानांत एकूण २० लक्ष हातमाग चालू असून त्यांवर १८० कोटि वार कापड दरसाल निघतें. हिंदी गिरण्यांतील कापडाचें वार्षिक उत्पादन ४३० कोटि वार कापडाचें आहे.

## तापी व्हॅली रेल्वे कंपनी लि.

वरील कंपनीची रेल्वे १ एप्रिल रोजीं सरकारी मालकीची होणार आहे. ह्या रेल्वे कंपनीची स्थापना १८९६ सालीं किलिक निक्सन आणि कंपनीनें केली. हिंदी भांडवलाचे सहायानें हिंदुस्थानांत स्थापन झालेली ब्रॉडगेजची ही पहिलीच मोठी रेल्वे होय. बडोदें सरकारनें ह्या कंपनीचे बरेच भाग घेतले. तेव्हांचे व्हाइसरॉय, लॉर्ड एल्जिन, ह्यांनीं रेल्वेच्या बांधकामास प्रारंभ करणारा पहिला टिकाव मारला. प्रारंभींच्या भागीदारांस आतां त्यांच्या भांडवलाच्या दोन ते तीन पट व्याज मिळून चुकलें आहे. सरकार रेल्वे विकत घेतांना, तिला पडलेल्या मूळ खर्चाच्या १२०% किंमत देणार आहे. १७ एप्रिल रोजीं कंपनीच्या भागीदारांची सभा भरविण्यांत येऊन कंपनी लिक्विडेशनमध्यें नेण्यांत येईल. कंपनीचें वसूल भांडवल १,३१,७३,००० रुपये आहे. प्रत्येक भाग ५०० रुपयांचा आहे. रेल्वेची लांबी १५६ मैल असून ती सुरतेचें बंदर व खानदेश आणि मध्य हिंदुस्थान ह्यांस जोडते. ३१ मार्च १९३२ रोजीं सरकार रेल्वे कंपनी विकत घेऊं शकलें असतें; तो अधिकार आतां बजावण्यांत येत आहे. त्याचा फायदा आतां घेतला नसता तर पुनः दहा वर्षे थांबावें लागलें असतें. बी. बी. ॲण्ड सी. आय. रेल्वे तापी व्हॅलीची व्यवस्था पहात असे.

## प्राप्तीवरील कराची आकारणी

मागील अंकांत १५,००० रुपयांपर्यंतच्या प्राप्तीवरील करासंबंधीं आकडे दिले होते. त्या पुढील उत्पन्नाविषयीं माहिती येथें देत आहों.

| प्राप्ती | सर्व प्रकारच्या सवलती लक्षांत घेऊन, कराची रकम | कराचें उत्पन्नाशी प्रमाण |
|---|---|---|
| रु. | रु. | % |
| १८,००० | २,१५९ | १२·० |
| २१,००० | २,७४५ | १३·१ |
| २४,००० | ३,३३१ | १३·९ |
| २७,००० | ४,१९५ | १५·२ |
| ३०,००० | ४,९७२ | १६·६ |
| ३३,००० | ५,८३९ | १७·७ |
| ३६,००० | ६,८०० | १८·९ |
| ४०,००० | ८,४६० | २१·१ |
| ५०,००० | १२,६३० | २५·३ |
| ६०,००० | १७,२८५ | २८·८ |
| ७०,००० | २२,४१८ | ३२·० |
| ८०,००० | २७,५५७ | ३४·४ |
| ९०,००० | ३२,७०० | ३६·३ |
| १,००,००० | ३७,८४६ | ३७·८ |
| १,५०,००० | ६६,९३८ | ४४·० |
| २,००,००० | ९६,३१० | ४८·२ |
| ३,००,००० | १,६६,६८६ | ५५·५ |
| ४,००,००० | २,४१,६७८ | ६०·४ |
| ५,००,०८० | ३,२१,३६० | ६४·३ |
| १०,००,००० | ७,६६,६६४ | ७६·७ |
| २०,००,००० | १६,५७,२६४ | ८२·८ |
| ३०,००,००० | २५,४७,९०७ | ८४·९ |

## स्फुट-विचार

### इंग्लंडमध्यें युद्धसामुग्रीचें उत्पादन

अमेरिकेनें चालविलेल्या युद्धसामुग्रीच्या प्रचंड उत्पादनाची माहिती वारंवार देण्यांत येत आहे. आरमारी व व्यापारी जहाजें दररोज दोन किंवा तीन ह्या प्रमाणांत तयार होतील, पन्नास हजार लढाऊ विमानें व चाळीस हजार चिलखती गाड्या एका वर्षांत बनवण्यांत येतील आणि ह्या सर्व सामुग्रीचा पुरवठा रशिया, चीन व इंग्लंड ह्यांच्याहि उपयोगी पडेल असें प्रसिद्ध झालें आहे. ह्या बाबतींत इंग्लंडची कामगिरी काय आहे ह्याविषयीं जिज्ञासा उत्पन्न होणें स्वाभाविक आहे. ती तृप्त करण्यासाठी लॉर्ड हॅलिफॅक्स ह्यांनीं अमेरिकन जनतेस उद्बोधक माहिती नुकतीच दिली ती मनावर उत्साहक परिणाम करणारी अशी आहे. गेल्या ऑगस्टच्या मानानें दुप्पट चिलखती रणगाडे ब्रिटिश कारखान्यांत आतां बनवले जात आहेत. फेब्रुवारी, १९४१ च्या मानानें हें उत्पादन तिपटीनें आहे. चिलखती गाडींत आठ हजार निरनिराळे भाग पाडून ते स्वतंत्रपणानें बनवण्याचें काम सहा हजार कारखानदारांत वाटून देण्यांत आलें आहे. जर्मनीनें पादाक्रांत केलेल्या युरोपच्या भागांवर इंग्लंडमधून अधिक अधिक हल्ले केले जातील असें लॉर्ड हॅलिफॅक्स ह्यांनीं ध्वनित केलें. भूमध्यसमुद्राच्या पूर्वभागांत ह्यापुढें युद्धाचा जोर वाढण्याचा रंग दिसतो असेंहि ते म्हणाले. शक्य तितकी युद्धसामुग्री इंग्लंडच्या बाहेर निरनिराळ्या युद्धक्षेत्रांत पुरवण्यांत येत आहे आणि त्या पुरवठ्याचें प्रमाण सारखें वाढत आहे हा त्यांनीं दिलेल्या माहितीचा मथितार्थ आहे.

---

### जनरल मॅक आर्थर, सर सेनापति

पॅसिफिक महासागरांत जनरल मॅक आर्थर ह्यांची सर सेनापति म्हणून नेमणूक झाली असून त्यांनीं फिलिपाइन्स सोडून ऑस्ट्रेलियांत आपलें लष्करी ठाणें स्थापलें आहे ही आशियांतील युद्धाबाबतची अत्यंत महत्वाची अशी अलीकडील घटना होय. जनरल मॅक आर्थर ह्यांनीं फिलिपाइन्समध्यें मोठ्या तडफेनें व कौशल्यानें जपानी आक्रमणाचा प्रतिकार करण्यांत यश संपादन केलें आहे आणि त्यांच्या नेतृत्वाचा पूर्ण फायदा ऑस्ट्रेलियास मिळावा ह्या सूचनेस प्रेसिडेंट रूझव्हेल्ट ह्यांनीं तत्परतेनें मान्यता दिली. इंग्लंडचें लक्ष युरोप व आफ्रिका येथील रणक्षेत्रांत गुंतल्या कारणानें अमेरिका व ऑस्ट्रेलिया ह्यांचें सहकार्य पूर्व एशियांत अधिक जुटीनें व कार्यक्षमतेनें होणें अगत्याचें झालें. अमेरिकन सैनिक, वैमानिक व लढाऊ सामुग्री ऑस्ट्रेलियांत आली आहे आणि जपान पुढें डाव टाकीत आहे तो उधळून लावण्याची तयारी चालली आहे. शत्रूच्या विरुद्ध चढाईचें धोरण अंगिकारण्याची योजना अमेरिकन व ऑस्ट्रेलियन पुढाऱ्यांनीं हातीं घेतली आहे आणि ह्यासाठी लागणारी युद्धसामुग्री अमेरिकेकडून वाढत्या प्रमाणांत पुरवली जात आहे. अमेरिकन विमानांनीं जपानी आरमारांचा व सहायक जहाजांचा संहार अलीकडे केला आहे, त्यावरून नवीन स्वीकारण्यांत आलेल्या चढाईच्या धोरणाची कल्पना येईल. न्यू गिनीमध्यें आपले तळ स्थापून ऑस्ट्रेलियावर हल्ले चढवण्याचा जपानचा बेत दिसत आहे आणि तो हाणून पाडणें हें आतां जनरल मॅक आर्थर ह्यांचें ध्येय आहे.

---

### धान्याची पैदास व त्याचा पुरवठा

दुष्काळाचे प्रसंगीं धान्यांची पैदास कमी झाल्यामुळें त्यांची महागाई होते आणि त्यांचा पुरवठा बाहेरून करावा लागतो असा अनुभव हिंदुस्थानांत निरनिराळ्या प्रांतांत व जिल्ह्यांत अनेकवार आलेला आहे. मामुली मागणी-पुरवठ्याचे प्रमाण बिघडल्यामुळें अशी परिस्थिति निर्माण होते. सध्या युद्धामुळें वहातुकीचीं साधनें नेहमीच्या व्यापारी व्यवहारास अपुरीं पडत असल्यानें मागणी-पुरवठ्याचा मेळ बसण्याचे मार्गांत अडचणी उपस्थित झाल्या आहेत. तांदुळाचें उदाहरण घेतल्यास असें दिसून येईल कीं, कोंकणपट्टीच्या भागांत हें पीक बऱ्याच मोठ्या प्रमाणांत होत असलें तरी त्यानें मुंबई प्रांतांतली सर्व मागणी पुरवली जात नाहीं आणि रंगूनचा तांदूळ आयात करावा लागतो. हा माल येणें आतां अशक्य झाल्यानें शेजारच्या प्रांतांमधून तांदुळाची आयात करावी लागेल. गहूं, ज्वारी व बाजरी ह्या धान्यांचे बाबतींतहि मुंबई प्रांत स्वयंपूर्ण नाहीं, आणि उत्तर हिंदुस्थान व मद्रास ह्या भागांतून तीं आयात करावीं लागतात. तथापि त्या पिकांच्या लागवडीचा विस्तार करतां येणें शक्य आहे आणि विशेषत: आखूड धाग्याच्या कपाशीच्या जागीं सत्वरहु पिकें करतां येतील. ह्यासंबंधांत प्रांतिक शेतीखात्यानें योजना आखली असून ती अंमलांत आणण्याची व्यवस्था मुंबई सरकार करीत आहे. धान्यांची पैदास आणि त्यांची देशाच्या निरनिराळ्या भागांत समाधानकारक वांटणी ह्या गोष्टी प्रांतिक सहकार्यानेंच घडवून आणल्या पाहिजेत हें उघड आहे. ह्यासाठी दिल्ली येथें अखिल भारतीय परिषद् लवकरच भरावयाची आहे.

---

### फिनॅन्स बिलावरील चर्चा

फिनॅन्स बिलावरील पांच दिवसांच्या चर्चेनंतर, सरकारी फडनवीस सर जरेमी रेसमन ह्यांनीं चर्चेंत उपस्थित झालेल्या प्रश्नांस उत्तर दिलें. बजेट तयार करण्यास कित्येक महिन्यांचा अवधि लागतो; फेब्रुवारी अखेरची परिस्थिति दोन महिन्यांपूर्वी आली असती तर करांचें आणखी ओझें जनतेस सहन करावें लागेल अशी कर-योजना मी सुचविली असती, असें ते म्हणाले. खंडउसनवारीनें अमेरिकेकडून आणलेल्या मालाबद्दल बजेटांत केलेल्या तरतुदीचेंहि त्यांनीं समर्थन केलें. युद्धसमाप्तीनंतर कारखान्यांना उपलब्ध होणाऱ्या रीइक्विपमेंट रिझर्व्हचा भाग कारखान्यांची सुधारणा होण्याकडे खर्च होईल, डिव्हिडंडचा दर वाढविण्याकडे होणार नाहीं, अशी व्यवस्था सरकार करील असें त्यांनीं सांगितलें. ग्रेटब्रिटनचें हिंदुस्थानास देणें ब्रिटनमध्यें सांठत आहे, त्याचा विनियोग हिंदुस्थान सरकारचें परराष्ट्रीय कर्ज नाहीसें करण्याकडे, रेल्वेज विकत घेण्याकडे, वगैरे अत्यंत इष्ट कार्याकडे केला जात आहे व तो तसाच केला जाईल, असें त्यांनीं आश्वासन दिलें. विशेषत:, युद्धसमाप्तिनंतर यंत्रसामुग्री व रेल्वेचें सामान आणण्यास त्याचा उपयोग करतां येईल, म्हणजे हिंदुस्थानाच्या युद्धोत्तर पुनर्घटनेसाठी ती एक गंगाजळीच आहे, असें त्यांनीं सांगितलें.

---

### फिनॅन्स बिल मंजूर झालें

हिंदुस्थान सरकारचें फिनॅन्स बिल मध्यवर्ती असेंब्लीनें मंजूर केलें. त्यांतील एका महत्त्वाच्या दुरुस्तीस सरकारनें मान्यता दिल्याकारणा-

नें प्राप्तीवरील कराची मर्यादा एक हजार रुपये उत्पन्नाची दीड हजार रुपये झाली. कर देण्याऐवजीं पैसे शिलक टाकण्याची संधि लोकांना देणारी योजना कायम ठेवण्यांत आली आहे. ह्या योजनेस अनुसरून लोकांनीं केलेली बचत जप्त करण्याचा कोणत्याहि कोर्टास अधिकार असूं नये व ठेवीदार नादार झाला तरी ह्या रकमेवर जप्ती आणतां येऊं नये, अशा अर्थाची सरकारनें पुरस्कार केलेली एक उपसूचनाहि असेंब्लीनें मान्य केली. लोकांना सेव्हिंग डिपॉझिटच्या योजनेचा अंगीकार करण्यास शक्य तेवढें प्रोत्साहन मिळावें, हाच उद्देश प्रस्तुत उपसूचनेच्या मुळाशीं असला पाहिजे. आयात जकात २०% वाढविली आहे; परंतु कांहीं विशिष्ट प्रकारच्या यंत्रसामुग्रीस ही वाढ लागू करण्यांत येऊं नये, ही उपसूचनाहि सरकारनें मान्य केली. पोस्टाचे वाढलेले दर कमी करण्याचा प्रयत्न कांहीं सभासदांनीं केला, तो यशस्वी झाला नाहीं.

## कारखानदार परिषद

अखिल भारतीय कारखानदार परिषदेचें दुसरें अधिवेशन पुणें येथें ता. २१ व २२ मार्च रोजीं सर एम. विश्वेश्वरअया ह्यांचे अध्यक्षतेखालीं भरलें होतें. प्रथम स्वागताध्यक्ष, श्री. गंगाधर विष्णु पुराणिक, महाराष्ट्र रिजनल कौन्सिलचे अध्यक्ष, ह्यांचें भाषण झालें. त्यांत त्यांनीं औद्योगीकरणाचे कामीं महाराष्ट्रांत झालेल्या प्रयत्नांचा आढावा घेतला व सद्यःपरिस्थितीचाहि परामर्ष घेतला. सर मोक्षगुंडम ह्यांचें भाषण नेहमींप्रमाणें कळकळीचें झालें. त्यांनीं प्रगतीचा कार्यक्रम कसा असावा, ह्याचें विवेचन केलें. परिषदेनें सरकारी औद्योगिक धोरण, उद्योगधंद्यांस भांडवल पुरवठा, उद्योग व व्यापार ह्या खात्यांसाठी स्वतंत्र मंत्री असण्याची आवश्यकता, आर्थिक माहिती पद्धतशीर जमा करण्याचें महत्त्व, इकनॉमिक कौन्सिल्स, वॉर रिस्क इन्शुअरन्स, इत्यादि विषयांवर ठराव केले. ठरावांवरील भाषणांत सरकारी प्रतिगामी धोरणावर टीका करण्यांत आली, परंतु अशी टीका निरर्थक आहे; प्रस्तुत परिषदेसारख्या प्रसंगीं कांहीं गोष्टी गृहीत धरूनच निश्चयात्मक प्रगतीची आखणी केली पाहिजे व तिचा वरचेवर आढावा घेतला पाहिजे, असें एका वक्त्यानें सांगितलें.

## गेल्या आठवड्यांतील रोखे बाजार

ब्रह्मदेशांतील जपानी चढाईचा जोर कमी होत असून ऑस्ट्रेलियाकडे लढाई वळत आहे, ह्या भावनेमुळें गेल्या आठवड्यांत रोखे बाजारांत रोख्यांची विक्री मोठ्या प्रमाणावर चढत्या भावानें झाली. सर्व भागांचे बाजारभाव वाढले व खरेद्या रोखीनेंच बहुंशीं झाल्या. रिझर्व्ह बँकेचा भाग ८८½ रुपयांपर्यंत खालीं गेला होता तो १०० रुपयांवर आला. रिझर्व्ह बँकेच्या ताज्या पत्रकावरून असें दिसतें, कीं प्रचलित नोटांचें प्रमाण १० कोटींनीं वाढलें आहे. ब्रिटिश सरकारचे वतीनें हिंदुस्थान सरकारनें केलेल्या खरेदीचे पैसे त्यानें देऊन टाकले, त्याचा हा परिणाम आहे. स्टर्लिंग रोख्यांतील गुंतवणुकींत १६ कोटींची भर पडली आहे, तर रुपयांचा साठा ७० लाखांनीं कमी झाला आहे. स्टर्लिंग कर्जरोख्यांची सरकारनें परतफेड केली, त्यामुळें लोकांस मिळालेल्या रकमांची भर शेड्यूल्ड बँकांकडील ठेवींत पडावयास पाहिजे होती, परंतु त्यांच्या ठेवी २२ लाखांनीं घटलेल्याच आढळतात.

## मद्रास सहकारी चौकशी कमिटी

मद्रास सहकारी चौकशी कमिटीनें आपला अहवाल मद्रास सरकारला मे १९४० मध्यें सादर केला. सर टी. विजयराघवाचार्य हे ह्या कमिटीचे अध्यक्ष होते. मद्रास सरकारनें कमिटीच्या ३४० शिफारशींपैकीं १०० शिफारशी मान्य केल्या आहेत.

( १ ) आंध्र जिल्ह्यांकरितां एक व तामीळ जिल्ह्यांकरितां एक अशा दोन स्वतंत्र एपेक्स बँका स्थापाव्या व ( २ ) शेतीच्या मालाचे विक्रीसाठी एक स्वतंत्र मार्केटिंग खातें स्थापावें, ह्या दोन सूचना सरकारला अमान्य आहेत. प्रत्येक मुलकी जिल्ह्यास एक मध्यवर्ती बँक असावी, त्यांनीं आपल्या स्वतःच्या पैशावरच ठेवी वक्तशीर परत देण्यासाठी अवलंबून रहावें, अगदीं विशेष प्रसंगींच प्रांतिक बँकेनें मध्यवर्ती बँकांस कर्ज द्यावें, मध्यवर्ती बँकांनीं केवळ सोसायट्यांसच कर्ज द्यावें व व्यक्तींस देऊं नये, हुंड्यांचे वसुलीचे बाबतींत व्यापारी बँका व मध्यवर्ती सहकारी बँका ह्यांचें सहकार्य असावें, "कन्ट्रोल्ड" क्रेडिटच्या पद्धतीचा अवलंब व्यापक प्रमाणावर करावा, सोसायट्यांमार्फत खाद्य धान्यांची लागवड वाढविण्याची खटपट करावी, इत्यादि कमिटीच्या सूचना सरकारास मान्य आहेत.

## विमा कंपन्या व युद्धपरिस्थिति

हिंदी आयुर्विमा कंपन्यांना आपल्या पैशापैकीं ५५% रकम सरकारी रोख्यांत ठेवावी लागते. सध्याच्या युद्धपरिस्थितींत ह्या रोख्यांच्या किंमतींत घट होत आहे, तेव्हां ठराविक तारखेपासून युद्धसमाप्तीपर्यंत ४०% रकम रोख्यांत ठेवली तरी चालेल, अशी सवलत सरकार देणार आहे, असें समजतें. मलाया व ब्रह्मदेश येथील विमेदारांच्या पॉलिसी कंपन्यांनीं चालू ठेवाव्या, युद्धसमाप्तीनंतर त्यांनीं मामुली व्याजासकट हप्ते वसूल करावे, विमेदार मृत झाले असतील त्यांच्या वारसांस क्लेमचे पैसे द्यावे, इत्यादि बाबतींत सरकार व विमा कंपन्यांचे प्रतिनिधी ह्यांचेमध्यें ऐकमत्य झालें आहे. युद्ध चालू आहे, तोंवर विमा कंपन्यांवर बोनस न देण्याची सक्ती करावी, असें कांहीं कंपन्यांचें म्हणणें होतें, त्यास कांहीं प्रमुख कंपन्यांचा विरोध आहे. ह्या प्रश्नाविषयीं सरकारनें आपलें मत अद्याप बनविलेलें नाहीं.

## मनिऑर्डरीचे दर वाढले

प्रत्येक दहा रुपयांस दोन आणे, असा मनिऑर्डरीच्या कमिशनचा दर आतां ठरविण्यांत आला आहे. दहा रुपयांस दोन आणे, परंतु प्रत्येक पंचवीस रुपयांस चार आणे असा आजवरचा दर होता. व्ही. पी. च्या वसुलीसहि हा नवीन दर लागू आहे. पत्रें व बंग्या ह्यांवरील विम्याचे दरहि वाढविण्यांत आले आहेत. १ एप्रिलपासून त्यांची अंमलबजावणी होईल.

## गणिताचा अभ्यासक्रम

अमेरिकेंतील विद्यार्थ्यांच्या गणित विषयाचा अभ्यासक्रम सुधारण्यांत येत आहे. अंकगणित, बीजगणित व भूमिति ह्यांचा अभ्यास साकल्यानें होऊन त्यांचा परस्पर-संबंध विद्यार्थ्यांस कळावा, अशी योजना आहे. मीटरवरील आकडे, नकाशे, सफरीचा खर्च, नफा-तोटा, व्याज, कर, बजेट, विमा इत्यादि उपयुक्त प्रश्नांवर नवा अभ्यासक्रम आखलेला आहे. दशांश पद्धतीस महत्त्व देण्यांत येत आहे. बँकांचे व्यवहार व सट्टेबाजीपासून होणारें नुकसान हे विद्यार्थ्यांस शिकविण्यांत येत आहेत. युक्लिडच्या गणिताच्या तत्त्वांस धरूनच नवीन अभ्यासक्रम आहे, परंतु बीजगणितास प्राधान्य देण्याकडे प्रवृत्ति दिसते.

### आखूड धाग्याच्या कपाशीची खरेदी

आखूड धाग्याच्या कपाशीची निर्गत युद्धपरिस्थितीमुळें आणि विशेषतः जपान युद्धांत पडल्यामुळें जवळ जवळ बंद पडली असल्यकारणानें, ह्या कपाशीच्या उठावाचा बिकट प्रश्न उपस्थित झाला आहे. कपाशीचा भाव अतिशय उतरला असून शेतकऱ्यांस त्यांच्या पिकाचा उत्पादन खर्चहि मिळणें अशक्य झालें आहे. एकडे कपाशीची लागवड मागणीचे मानानें फाजील झाली आहे, तर दुसरीकडे धान्यांचा पुरवठा कसा पुरा पडेल, ह्याविषयीं काळजी वाटण्याजोगी परिस्थिति निर्माण झाली आहे. शेतकऱ्यांनीं कपास न पेरतां धान्यें पेरावीं, असा प्रचार प्रांतिक सरकारें करणार आहेत. तथापि, आज तयार होऊन पडलेल्या आखूड धाग्याच्या कपाशीचें काय करावयाचें हा अत्यंत तातडीचा प्रश्न आहे. हिंदुस्थान सरकारनें आखूड व मध्यम धाग्याची कपास विकत घेण्याकरितां एजंट नेमले आहेत व त्यांनीं सरकी काढलेली व न काढलेली, दोन्ही प्रकारची कपास सरकारतर्फे खरेदी करावी, असें त्यांस सांगण्यांत आलें आहे. एप्रिलच्या सहा, सात व आठ तारखेस दिल्ली येथें प्रांतिक सरकारांच्या व संस्थानांच्या प्रतिनिधींबरोबर हिंदुस्थान सरकार कपाशीच्या क्षेत्राचें नियंत्रण धान्यांच्या लागवडींत वाढ, किंमतींचें नियंत्रण इत्यादि प्रश्नांबाबत विचारविनिमय करणार आहे. ह्याच प्रश्नांचा विचार करण्यासाठी मुंबई प्रांताच्या शेतकी खात्याच्या प्रमुख अधिकाऱ्यांची एक परिषद् मुंबई येथें नुकतीच भरली होती. ह्या परिषदेनें प्रांतांतील धान्यें व इतर पिकें ह्यांचा आढावा घेतला व धान्यांच्या लागवडीची वाढ सत्वर कशी होईल, ह्यासंबंधीं योजना आखली. विशेषतः ज्या क्षेत्रांत धान्याचा तुटवडा आहे, अशा ठिकाणचें कपाशीचें पीक कमी करून धान्यांची लागवड वाढविण्याचा कसून प्रयत्न करण्याचें ठरलें. खाद्यधान्यें व इतर पिकें ह्यांच्या लागवडीच्या क्षेत्रांचें परिमाण ठरविण्याच्या इष्टानिष्टतेबद्दल व शक्याशक्यतेबद्दलहि विचार झाला. येत्या मोसमांत मुंबई प्रांतांतील कपाशीची लागवड ४० हजार एकरांनीं कमी होईल, अशी अपेक्षा आहे.

---

### पुणें विद्यार्थीगृह

या संस्थेंत नवीन विद्यार्थी दाखल करावयाचे आहेत. प्रवेश मिळवूं इच्छिणारांनीं ०३ चीं पोस्टाचीं तिकिटें पाठवून छापील अर्जनमुना व नियम मागवून घेऊन तारीख १५ एप्रिलचे आंत अर्ज भरून पाठवावा. सामान्य नियम असे आहेत—(१) विद्यार्थी स्पृश्य हिंदु असावा. (२) जन्मतारीख १।६।२७ ते १।६।३० चे दरम्यान असावी (३) तो निरोगी-अव्यंग-सुदृढ व अविवाहित असावा. (४) मराठी ७ वी अगर इंग्रजी ३, ४, ५ या इयत्तांचें शिक्षण झालेल्यानींच अर्ज करावेत. (५) निदान ११ वे वर्षी मराठी चौथी पास होऊन वयोमानानुसार पुढचें शिक्षण झालेलें असावें. (६) मराठी ७ वी झालेल्याची १ वर्षांत ३ इंग्रजी इयत्ता पूर्ण करण्याची सोय केलेली आहे. असा वर्ग संस्थेनें नाशिक येथें ठेविला आहे. वरील नियम लक्षांत ठेवून पत्रव्यवहार करावा.

---

### कस्टम्सचें उत्पन्न

हिंदुस्थान सरकारास १९४०–४१ मध्यें कस्टम्सचें ४० कोटि रुपये उत्पन्न मिळालें. हें वसूल करण्यास ८३ लक्ष रुपये खर्च आला. १९३९–४० मध्यें ४९ कोटि रुपयांची वसुली झाली होती.


## दि बँक ऑफ इंडिया लि.

[स्थापना : १९०६]

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... ... ... रु. | २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | ... ... ... रु. | १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड | ... ... ... रु. | १,१८,००,००० |

मुख्य कचेरी : ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

मुंबईमधील शाखा : बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

इतर शाखा : अहमदाबाद (भद्र, मुख्य ऑफिस), अहमदाबाद (एलिस ब्रिज शाखा), अहमदाबाद (स्टेशन शाखा), अंधेरी (मुंबई शेजारीं), बांद्रे (मुंबई शेजारीं), कलकत्ता (क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर, कराची, नागपूर (किंग्जवे), नागपूर (इतवारी बझार), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत.

लंडन एजन्ट्स : वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

डायरेक्टर्स : सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई, सर जोसेफ के नाइट, मि. ए. गेडिस, सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई., मि. दिनशा के. दाजी, श्री. रामनिवास रामनारायण.

करंट डिपॉझिट अकाउंट्स :

दररोजच्या रु. १०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षा कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमीचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

एजंटः—टी. आर. लालवाणी.

---

## दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

हेड ऑफिस : पुणें शहर.

स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.

मुंबअी शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबअी.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | : रु. १०,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | : रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | : रु. ४,२५,८५० |
| वसूल झालेलें भांडवल | : रु. २,१२,९२५ |
| एकूण खेळतें भांडवल | : रु. ३३,००,००० |

डायरेक्टर्स

प्रो. वा. गो. काळे, अध्यक्ष

| | |
|---|---|
| श्री. धों. कृ. साठे | श्री. मा. रा. जोशी |
| श्री. न. ग. पवार | श्री. श्री. मो. मराठे |
| श्री. त्र्यं. वि. रानडे | श्री. र. चिं. सोहोनी |
| श्री. वा. पुं. वर्दे | मि. फ. दो. पदमजी |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदीविक्री कसोशीनें करून दिली जाते.

बँकेच्या शेअरवर १९४१ अखेर पुऱ्या होणाऱ्या वर्षी द. सा. द. शेंकडा ४ टक्के करमाफ डिव्हिडंड दिलें गेलें. बँकेची शेअरविक्री चालू आहे.

म. वि. गोखले
मॅनेजर.

महायुद्ध द्वाराशीं आलें
परदेशी औषधें
दुर्मिळ व महाग झालीं
पण
भिण्याचें कारण नाहीं !!!
— कारण —
आयुर्वेद रसशाळा पुणें लि०
या देशी औषधाच्या प्रसिद्ध कारखान्यानें
तयार केलेलीं
● रक्तवर्धक, ● उपनाह,
● बालजविन, ● कॅलसीप्राल
इत्यादि पेटंट, स्टँडर्ड व लोकप्रिय औषधें खात्री पटल्यामुळें
★ डॉक्टर्सहि वापरूं लागले आहेत. ★
दरसाल बिनचूक नफा वाटणाऱ्या ह्या कंपनीचे
शेअर्स व औषधें मागवा.
आयुर्वेद रसशाळा पुणें लि०
मुख्य दुकान गणपति चौक, लक्ष्मीरोड, पुणें २.

DECCAN BOOK STALL
Booksellers, Publishers & Subscription Agents
Fergusson College Road, Poona No. 4
(1) We stock and supply Educational books, General books & Library books.
(2) We supply Government of Bombay and Government of India publications.
(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.
(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.

अर्थशास्त्र
लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें ३००, किंमत ३ रुपये
या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

कॉमनवेल्थचा वैभवशाली विस्तार
★ २७ हजारांवर पॉलिसी–होल्डर्स
★ एकूण चालू विमे २ कोटीचेवर
★ दोन हजारांहून अधिक कार्यकर्ते निरनिराळ्या प्रांतांत कॉमनवेल्थसाठी उत्साहानें काम करीत आहेत.


हेड ऑफिस बिल्डिंग

कॉमनवेल्थ
ॲशुअरन्स कंपनी लि.
चेअरमन
* खा. ब. एम्. एन्. मेथा,
C. I. E., M. B. E.
ॲक्टिंग ऑफिस सुपरिन्टेंडेंट * एम्. एन्. भागवत, B. A.
' कॉमनवेल्थ ' ची पॉलिसी घेऊन जीवन निश्चिंत व सुखी करा.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं ' दुर्गाधिवास, ' भांबुर्डा, घ. नं. १२७।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ८ पुणें, बुधवार, तारीख ८ एप्रिल, १९४२ अंक १४

न्यायमूर्ति रानड्यांचे
तीन अप्रसिद्ध लेख प्रसिद्ध झाले
PLEA FOR PROTECTIONIST POLICY
INDIAN SUGAR INDUSTRY

न्यायमूर्ति रानडे यांनीं १८९९ सालीं ' टाइम्स ऑफ इंडियांत ' स्वदेशी साखरेच्या धंद्यासंबंधीं लिहिलेले महत्त्वाचे तीन लेख, प्रो. वा. गो. काळे ह्यांच्या प्रस्तावनेसह प्रसिद्ध करण्यांत आले आहेत.

व्यवस्थापक, ' अर्थ ', पुणें ४

ह्या पत्त्यावर आठ आण्यांचीं तिकिटें पाठवून लेखांची प्रत मागवावी.

श्रीराम सिल्क मिल्स लि., बंगलोर
[ कंपनीनें १९४० अखेर ६ टक्के डिव्हिडंड वांटला आहे. ]
युद्धसाहित्यपुरवठा—खात्याची पॅरेशूटकरितां लागणाऱ्या
रेशमी कापडाची ऑर्डर पुरी करण्यासाठी लागणाऱ्या भांडवलाकरितां तूर्त एकूण रु. १ लक्षाच्या रकमेपर्यंत
ठेवी घेणें आहेत
व्याजाचा दर ४॥ ते ६ टक्के. ठेव किमान रु. ५०० ची असावी. ठेवीवरील व्याज दर सहा महिन्यांनीं दिलें जातें.

श्रीराम सिल्क मिल्स लि.,
श्रीरामबाग,
बसवनगुडी, बंगलोर.

नारायण गोविंद नाईक,
( माजी अध्यक्ष, म्हैसूर चेंबर ऑफ कॉमर्स ) मॅनेजिंग डायरेक्टर

आमच्या कारखान्यांतील माल मुंबईस बॉम्बे स्वदेशी को—ऑपरेटिव्ह स्टोअर्समध्यें व पुण्यास लक्ष्मी रोडवरील रे म्यूझिअमच्या व्यापार—संवर्धन—गृहांत पहा.

'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

वक्तशीर आणि मनपसंत काम
करून देणारे
मोहन वॉच कंपनी
रेग्युलेशन मोफत
कॉमनवेल्थ बिल्डिंगसमोर लक्ष्मी रोड, पुणें २.

महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर
महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी
बुधवार चौक, पुणें

## विविध माहिती

### संप संपला

जनरल मोटर्स इंडिया लि. च्या कारखान्यांतील संप गेल्या शनिवारीं संपला. लेबर कमिशनरच्या देखत कंपनीच्या वतीनें व कामगारांच्या वतीनें कराराच्या अटींचे पत्रकावर सह्या झाल्या. जानेवारी ते डिसेंबर, १९४१ ह्या मुदतींतील पगाराच्या एक बारांशाइतका बोनस कामगारांस दोन हप्त्यांत मिळावयाचा आहे. कामगारांच्या बाकीच्या मागण्यांचा विचार सरकारनें नेमावयाच्या पंचाकडे सोपविला जाईल.

### इमर्जन्सी कमिशनें

ब्रिटिश साम्राज्यांतील इतर देशांमधील ६८ लोकांना हिंदी लष्करांत कमिशनें देण्यांत आलेलीं आहेत. त्यांपैकी ९ ऑस्ट्रेलियन, ३० न्यूझिलंडर व २९ ऱ्होडेशियन आहेत.

### युद्धकैदी

इटली व ग्रेटब्रिटन ह्यांनीं एकमेकांजवळील युद्धकैदी दुसऱ्यास परत देण्यासंबंधीं त्या दोन राष्ट्रांत करार झाला आहे. ब्रिटिश युद्धकैद्यांपेक्षा इटालियन युद्धकैदी अधिक आहेत. स्मर्ना येथें युद्धकैद्यांची अदलाबदल होईल.

### इराणला गव्हाचा पुरवठा

रशिया, ग्रेट ब्रिटन आणि अमेरिका ह्यांनीं इराणकडे बराच गहूं पाठविला आहे.

### चेकसची देवघेव

मुंबई बँकर्स क्लिअरिंग हाऊसमध्यें २७ मार्चअखेर संपलेल्या आठवड्यांत २३ कोटि, ९१ लक्ष रुपये किंमतीच्या १,१३,९२६ चेक्सची देवघेव झाली.

### चहावर नियंत्रण

नऊ वर्षांवरील प्रत्येक इसमास ऑस्ट्रेलियांत ह्यापुढें प्रत्येक आठवड्यास फक्त एक औंस चहा मिळूं शकेल. एका औंसांत १० पेले चहा तयार होतो.

### युद्धास नांव सुचवा

चालू युद्धास योग्य असें नांव सुचविण्याविषयीं विनंति प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांनीं अमेरिकन जनतेस केली आहे. लोकशाहीचें संरक्षण करण्याचा प्रयत्न त्या नांवांत स्पष्ट झाला पाहिजे.

### जननसंख्या

डिसेंबर, १९४१ अखेरच्या तिमाहींत इंग्लंड व वेल्समध्यें एकूण १,४५,१०६ जन्म नोंदले गेले. गेल्या दहा वर्षांत ह्या तिमाहींत एवढे जन्म झालेले नव्हते.

### हिंदुस्थान एअरक्रॅफ्ट लि.

वरील कंपनी शेठ वालचंद हिराचंद ह्यांनीं बंगलोर येथें विमानांचें उत्पादन करण्याकरितां स्थापन केली होती व तिचे भाग हिंदुस्थानसरकार, म्हैसूर संस्थान व शेठ वालचंद ह्यांनी घेतले होते. तथापि, किफायतशीर व्यवसाय ह्या दृष्टीनें सध्या तरी कारखाना चालणें शक्य नसल्याकारणानें, हिंदुस्थानसरकारनें, शेठ वालचंद व त्यांचे सहकारी ह्यांचें कंपनींतील हितसंबंध विकत घेण्यास त्यांनी संमति दिली आहे. म्हैसूर सरकारनें आपलें भांडवल कायम ठेवलें असलें तरी कंपनीची व्यवस्था हिंदुस्थान सरकारकडे रहाण्यास त्यानें मान्यता दिली आहे.

### रजिस्टर्ड पत्रें

ब्रह्मदेशाकडे पाठविण्याचीं रजिस्टर्ड पत्रें स्वीकारण्यास पोस्ट खात्यानें प्रारंभ केला आहे.

### एम्पायर ऑफ इंडिया विमा कं. लि.

वरील कंपनीनें गेल्या वर्षी १ कोटि, ३४½ लक्ष रुपयांच्या ६,८४४ पॉलिसी दिल्या. खर्चाचें हप्त्यांच्या उत्पन्नाशीं प्रमाण २२·६% पडलें. कंपनीचा लाइफ फंड ५ कोटि, २१ लक्ष रुपयांचा आहे. भागीदारांस प्रत्येक भागास ३ रु. ८ आ. डिव्हिडंड व १३ रु. ८ आ. बोनस मिळून १७ रुपये मिळाले. कंपनीला रंगून येथील आपली कचेरी बंद करावी लागली आहे.

### हिंद सायकल्स लि.

कच्च्या मालाच्या किंमतींत वाढ, तज्ञ कामगारांचा तुटवडा, मजुरींत वाढ, आवश्यक यंत्रें मिळविण्याची अशक्यता, इत्यादि कारणांमुळें वरील कंपनीला गेल्यावर्षी अपेक्षेप्रमाणें दरमहा १०० सायकली बनवितां आल्या नाहींत. घसारा न काढतांहि कंपनीला २१ हजार रुपये नुकसान आलें.

### ट्रेझरी बिलें

रिझर्व्ह बँकेनें गेल्या आठवड्यांत हिंदुस्थान सरकारचीं २ कोटि रुपयांची ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा दर द. सा. द. शे. १ रु. २ आ. ११ पै इतका पडला.

### दारूची आयात बंद

पौंडांतील हुंडणावळीची बचत करण्याचे उद्देशानें, ऑस्ट्रेलियन सरकारनें ब्रँडी, व्हिस्की, दारू इत्यादींच्या आयातीस संपूर्ण बंदी केली आहे.

### "सिडने" आगबोटीवरील विमेदार

"सिडने" ही आरमारी बोट ऑस्ट्रेलियाच्या किनाऱ्यापासून १०० मैलांवर बुडाली, तरी ती ऑस्ट्रेलियन पाण्यांतच बुडाली असें समजून व युद्धविषयक मृत्यु आल्यास पैसे मिळणार नाहींत अशी विमा पॉलिसींत अट असतांहि ती अट रद्द करून, सिडने येथील ऑस्ट्रेलियन विमा कंपन्यांनीं "सिडने" बोटीबरोबर बुडालेल्या सर्व विमेदारांच्या विम्याचे सगळे पैसे दिले.

### अखिल भारतीय सहकारी परिषद्

वरील परिषदेचें पांचवें अधिवेशन ता. ४ व ५ एप्रिल रोजीं नागपूर येथें ना. व्ही. रामदास पंटलु ह्यांचे अध्यक्षतेखालीं भरलें होतें. स्वागतसमितीचे अध्यक्ष, सर माधवराव देशपांडे, के. बी. ई ह्यांच्या स्वागतपर भाषणानंतर सर जिऑफ्रे बर्टन (मध्यप्रांत सरकारचे आर्थिक सल्लागार) ह्यांचे हस्तें परिषदेचें उद्घाटन झालें.

### ओरिसाची राजधानी

युद्धपरिस्थितीमुळें कटक येथून राज्यकारभार चालविणें अशक्य झाल्यास, ओरिसाची राजधानी संबळपूर येथें हालविण्यांत येईल.

### हिंदी पोस्ट आणि तार खात्याची खरेदी

पोस्ट आणि तार खात्यानें १९४०-४१ मध्यें ७७¾ लक्ष रुपयांची एकूण खरेदी केली. त्यांपैकीं २¼ लक्ष रुपयांच्या मालाची आयात झाली.

अनुक्रमणिका

| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | १०८ | ६ स्फुट विचार | १११ |
| २ भावी राज्यघटनेची योजना. ... | १०९ | स्वदेशी साखरेविषयीं प्रश्न–स्वदेशी साखर आणि संरक्षण—म्हैसूर सिल्क फिलेचर्स लि. | |
| ३ हैद्राबादेंत कापूस संशोधन. ... | ११० | ७ कस्टम्सचें उत्पन्न ... | ११२ |
| ४ हिंदी उसाच्या पिकाचा अंदाज. ... | ११० | ८ बकिंगहॅम ॲण्ड कर्नाटक कं. लि. ... | ११२ |
| ५ इंडस्ट्रिअल इ. ट्रस्ट लि. | ११० | ९ सिलोन ... | ११३ |

अर्थ

बुधवार, एप्रिल ता. ८, १९४२

## भावी राज्यघटनेची योजना

हिंदुस्थानांत राजकीय वांधा उत्पन्न झाल्यामुळें युद्धप्रयत्नांस कमालीचा जोर लागत नाहीं ह्याची जाणीव ह्या देशांत तशीच इंग्लंडमध्येंहि सरकारास व जनतेस आज कित्येक महिने झालेली आहे. जर्मनी व जपान ह्यांच्या राक्षसी महत्त्वाकांक्षेचा बीमोड झाल्यावांचून जगांत राष्ट्रीय व वैयक्तिक स्वातंत्र्य कोणासहि लाभणें शक्य नाहीं आणि ह्या शत्रूंचा पूर्ण पाडाव होणें अमेरिका व इंग्लंड ह्या देशांप्रमाणें हिंदुस्थानच्या हिताच्या दृष्टीनें अगत्याचें आहे, ह्याविषयीं येथें सर्व जनतेचें एकमत आहे. जपानचें संकट ह्या देशास येऊन थडकल्यामुळें तर हिंदी लोकांनीं एकदिलानें व निश्चयानें स्वसंरक्षणाची शिकस्त केली पाहिजे ही कल्पना अधिक दृढ झाली आहे. हिंदी पक्षोपपक्षांचें परस्परांशीं व इंग्लंड व हिंदुस्थान ह्या देशांचें एकमेकांशीं हार्दिक सहकार्य युद्ध यशस्वी होण्याचे कामीं व्हावें अशी इच्छा ब्रिटिश जनतेंत व येथील लोकांत तीव्रतेनें जागृत झाली होती. तथापि, ब्रिटिश मंत्रिमंडळानें पुढाकार घेऊन हिंदुस्थानांतील राजकीय पेंच सोडवण्याची शिकस्त करावी, त्यावांचून इष्ट कार्य सिद्धीस जाणें शक्य नाहीं अशा आशयाच्या सूचना केल्या गेल्यामुळें ब्रिटिश मुत्सद्दी हा अवघड प्रश्न कसा सोडवतात इकडे सर्वांचे डोळे लागून राहिले होते. युद्धामध्यें हिंदुस्थानास प्रस्तुत प्रसंगीं अपूर्व महत्त्व प्राप्त झालें आहे आणि ऑस्ट्रेलिया, अमेरिका व चीन ह्यांनीं एकवटून जपानचा समाचार घेण्याचें धोरण अंगिकारणें आज अगत्याचें आहे. हिंदुस्थानच्या युद्धप्रयत्नांत शंभर टक्के कार्यक्षमता कशी निर्माण करतां येईल आणि हिंदुस्थानचें मनुष्यबळ व आर्थिक शक्ति हीं कशीं एकवटतां येतील हा प्रश्न इंग्लंडांत व येथें सर्वांच्या डोळ्यांपुढें सारखा उभा राहिला आहे.

हिंदुस्थानची भावी राज्यघटना आणि चालू राज्यव्यवस्था ह्यांचे विषयींच्या निरनिराळ्या पक्षांच्या मागण्यांची एकवाक्यता करून त्यांचें समाधान होईल अशी योजना ब्रिटिश मंत्रिमंडळानें आखली आणि हिंदी लोकांस ती समजावून देऊन तिला त्यांची मान्यता मिळवण्याचें कार्य सर स्टॅफर्ड क्रिप्स ह्यांचेकडे सोपविलें. त्यांनीं ह्या देशांत येऊन निरनिराळ्या विचारांच्या व आकांक्षांच्या पुढाऱ्यांचे पुढें आपली योजना मांडून तिची त्यांच्याबरोबर चर्चा केली. योजनेचा विचार करण्यास भिन्नभिन्न पक्षांस वेळ देऊन सर स्टॅफर्ड ह्यांनीं ती सामान्य जनतेच्या माहितीसाठी प्रसिद्ध केली. ब्रिटिश मंत्रिमंडळाच्या योजनेचे हेतु आणि तिचे दूरपरिणामकारक महत्त्व हीं सर्वांच्या मनांवर ठसावीं म्हणून त्यांनीं खाजगी व जाहीर रीतीनें तिच्यावर तपशीलवार भाष्य केलें आहे. वृत्तपत्रांच्या प्रतिनिधींस एक दिवसाआड मुलाखती देऊन आणि नभोवाणीच्या सहाय्यानें भाषण करून शिष्टाईचें आपलें कर्तव्य त्यांनीं उत्कृष्ट प्रकारानें बजावलें आहे. पक्षांच्या पुढाऱ्यांनींहि ब्रिटिश योजनेची आस्थेवाइकपणानें चर्चा केली असून आपला अभिप्राय ते जबाबदारीच्या भावनेनें प्रकट करीत आहेत ह्यांत शंका नाहीं. सर स्टॅफर्ड ह्यांनीं आपल्या बरोबर आणलेली योजना तत्त्वतः जशीच्या तशी हिंदुस्थानांत मान्य व्हावी अशी ब्रिटिश मंत्रिमंडळाची इच्छा आहे आणि ते हिंदी लोकांचा सर्वसामान्य होकार किंवा नकार घेऊन स्वदेशीं परत जाणार आहेत.

भावी राज्यघटनेंत हिंदुस्थानास पूर्ण राजकीय स्वातंत्र्य मिळेल. ती घटना लोक–प्रतिनिधींनीं तयार करावयाची असून तीमध्यें सामील व्हावयाचें कीं नाहीं हें निरनिराळ्या प्रांतांनीं व संस्थानांनीं आपापल्यापुरतें ठरवावयाचें आहे. भावी संयुक्त राज्यघटनेच्या बाहेर कोणत्याहि प्रांतास किंवा संस्थानास रहातां येईल आणि त्यांच्याशीं स्वतंत्र करार केले जातील. स्वातंत्र्य व स्वयंनिर्णयाचा अधिकार ह्या योजनेनें हिंदी लोकांस मिळतो आणि निरनिराळ्या हिंदी पक्षांचें समाधान होण्यास तीमध्यें वाव रहातो असें ह्यासंबंधांत सर स्टॅफर्ड ह्यांचें म्हणणें आहे. युद्ध बंद होतांच राज्यघटना तयार करणाऱ्या मंडळाची निवडणूक होईल आणि त्यावेळीं प्रांत व संस्थानें ह्यांस आपला स्वयंनिर्णयाचा अधिकार गाजवितां येईल. युद्ध चालू राहील तोंपर्यंत हिंदुस्थानच्या रक्षणाची पूर्ण जबाबदारी ब्रिटिश मंत्रिमंडळावर राहील आणि इतर राज्यव्यवस्था गव्हर्नर जनरल हिंदी पुढाऱ्यांच्या सहकार्यानें चालवतील. सर्व पक्षांचें आपणांस सहकार्य मिळेल अशा बेतानें गव्हर्नर जनरल आपल्या कार्यकारी मंडळाची निवड करतील आणि ह्याच पद्धतीनें प्रांतांचा राज्यकारभार चालेल असें सर स्टॅफर्ड यांचें स्पष्टीकरण आहे. सध्याचें युद्धच अशा प्रकारचें आहे कीं तें चालू असतांना हिंदुस्थानच्या राज्यकारभारव्यवस्थेंत फेरबदल करणें धोक्याचें व अनिष्ट होणार आहे; हिंदी जनतेच्या हिताच्या दृष्टीनेंहि ती व्यवस्था बदलणें आणि तिच्या बाबतची जबाबदारी लोकांवर टाकणें हितावह नाहीं असें त्यांचें म्हणणें आहे.

### सिंधी मंत्र्यांचा भत्ता

सिंध प्रांतिक सरकारच्या मंत्र्यांचा प्रवासी व रोजचा भत्ता ह्यासंबंधींचे नियम सुधारण्यांत आले आहेत. सरकारी कामासाठी जाणाऱ्या मंत्र्यास व त्याच्या कुटुंबांतील मंडळीसहि रेल्वे भाडें मिळेल. रस्त्याच्या प्रवासास पूर्वी मैली पांच आणे मिळत असत; आतां आठ आणे मिळतील. विमानानें प्रवास करण्यास व सबंध विमान भाड्यानें घेण्यास त्यास परवानगी आहे. प्रांताबाहेर मंत्री गेल्यास त्यास रोज २५ रुपये भत्ता मिळेल.

## हैद्राबादेंत कापूस-संशोधन

**हिंदी मध्यवर्ती कापूस समितीच्या साहाय्यानें केलेलें कार्य**

निजाम संस्थानांतील शेतकऱ्यांना पैसे देणाऱ्या प्रमुख पिकांपैकीं कापसाचें पीक आहे. अशा पिकांपासून शेतकऱ्यांना चांगला पैसा मिळतो. प्रतिवर्षी ३५ लाख एकर जमीनींत कापसाची लागवड होत असून कापसाचे सुमारें ५,००,००० गठे दरसाल तयार होतात. केवळ कापसाचें क्षेत्र आणि कापसाचें एकंदर उत्पादन यांवरूनच कापूस लागवडीचा प्रदेश म्हणून हैद्राबादेस महत्त्व आलें नाहीं. येथील कांहीं प्रकारच्या कापसाच्या जाती, विशेषतः हैद्राबाद गावराणी म्हणून ओळखली जाणारी, उत्कृष्ट प्रतीची असल्याचें सुप्रसिद्ध आहे. तथापि, लागवड करण्यांत येत असलेल्या कापसाच्या सर्वच जाती खरोखर निर्भेळ नसतात. सुमारें १० वर्षांपासून कांहीं जिल्ह्यांतून हैद्राबादेंतील श्रेष्ठ दर्जाच्या कापसाच्या ऐवजी मुंबई इलाखा व मध्यप्रांत येथून आणलेल्या अधिक सुपीक व आखूड धाग्याचे नमुने क्रमाक्रमानें कांहीं भागांत पेरण्यांत येत आहेत. ही प्रवृत्ति थांबविण्यासाठीं आणि चांगल्या प्रतीच्या कापसाच्या नमुन्याचें निर्मूलन होऊं नये म्हणून ज्या विभागांत उत्कृष्ट दर्जाचा माल उत्पन्न होतो तेथून शुद्ध गावराणी कापसाची सरकी मोठ्या प्रमाणांत खरेदी करून ती तकावी म्हणून शेतकऱ्यांना देण्याचा हैद्राबाद सरकारनें प्रारंभ केला आहे. पिकाचा उत्कृष्टपणा व दर्जा कायम रहावा म्हणून इतर कित्येक उपाययोजनाहि करण्यांत आल्या होत्या. तथापि, कपास पिकाची सुधारणा शास्त्रशुद्ध पायावर करण्यांत न आल्यानें या व इतर उपाययोजना केवळ तात्पुरत्या स्वरूपाच्या असल्याचें सिद्ध झालें.

### संशोधन कार्यास प्रारंभ

म्हणून हैद्राबाद सरकारच्या विनंतीवरून हिंदी मध्यवर्ती कापूस समितीनें इ. स. १९३९ मध्यें गावराणी कापूस सुधारण्याच्या कार्याची एक योजना मंजूर केली. त्यानंतर रायचूर जिल्ह्यांतील कुम्टा कापूस व परभणी जिल्ह्यांतील उमरा कापूस यांची सुधारणा करण्याच्या योजना मंजूर करण्यांत आल्या. हिंदी मध्यवर्ती कापूस समितीकडून मिळणारें सहाय्य सरकीची सुधारणा करण्यापुरतेंच मर्यादित नव्हतें तर तें कपास बोंडाचा नाश करणारे किडे, कापसाच्या पिकाची वनस्पतिशास्त्रदृष्ट्या पाहणी आणि रायचूर जिल्ह्यांतील एका भागांत निर्भेळ सरकी शेतकऱ्यांना देणें या सर्व बाबतींतहि उपयोगीं पडलें.

---

### जगाच्या युद्धोत्तर व्यवस्थेंत अमेरिकेचें स्थान

"फॉरच्युन" ह्या एका अमेरिकन मासिकानें, युद्धसमाप्तीनंतरच्या जागतिक व्यवस्थेबाबत जनतेचें मत मागविलें, त्याचा निष्कर्ष असा कीं, अमेरिकन लोकांना ब्रिटनशीं एकत्र होण्याची इच्छा नाहीं, परंतु ब्रिटिश साम्राज्याबरोबर अमेरिकेचा खुला व्यापार चालावा असें त्यांस वाटतें. तहाच्या वाटाघाटींत अमेरिकेचें मतच प्रभावी ठरावें, अशी चारपंचमांश अमेरिकन नागरिकांची प्रबळ इच्छा आहे, तर निम्म्या लोकांस त्या संबंधांत शंका वाटत नाहीं. जगावर देखरेख ठेवण्यास जागतिक सहकार्याचे बाबतींत अमेरिका इंग्लंडला भागीदार घेण्यास तयार आहे.

## हिंदी उसाच्या पिकाचा अंदाज (१९४१-४२)

| प्रांत अगर संस्थान | क्षेत्र (एकर). (१९४१-४२) | क्षेत्र (एकर). (१९४०-४१) |
|---|---|---|
| संयुक्त प्रांत ... | १,७४५,००० | २,५५५,००० |
| पंजाब ... | ४५६,००० | ५४९,००० |
| बिहार ... | ३८४,००० | ५०८,००० |
| बंगाल ... | ३१४,००० | ३३१,००० |
| मुंबई ... | १५६,००० | १६७,००० |
| मद्रास ... | ११२,००० | १६२,००० |
| सरहद्द प्रांत ... | ८५,००० | ९६,००० |
| आसाम ... | ४०,००० | ४१,००० |
| ओरिसा ... | ३२,००० | ३५,००० |
| मध्यप्रांत ... | ३२,००० | ३३,००० |
| सिंध ... | ९,००० | ९,००० |
| दिल्ली ... | २,००० | ३,००० |
| म्हैसूर ... | ४६,००० | ५३,००० |
| हैद्राबाद ... | ४१,००० | ४५,००० |
| भोपाळ ... | ९,००० | ८,००० |
| बडोदें ... | ३,००० | ३,००० |
| एकूण | ३,४६६,००० | ४,५९८,००० |

---

### इंडस्ट्रिअल इनव्हेस्टमेंट ट्रस्ट लि.

वरील कंपनीनें आपले पैसे संपूर्णतः रोख्यांतच गुंतविलेले आहेत, त्यांची वर्गवारी खालीं दिली आहे:—

| | % |
|---|---|
| रुपयांतील रोखे | ८६·२७ |
| स्टर्लिंग रोखे | १३·७३ |
| | १००·०० |

रोख्यांची त्यांच्या प्रकाराप्रमाणें वर्गवारी खालील प्रमाणें

| | % |
|---|---|
| सरकारी रोखे व डिबेंचर्स | ११·९४ |
| प्रेफरन्स भाग | २६·४६ |
| ऑर्डिनरी शेअर व स्टॉक | ६१·६० |
| | १००·०० |

१९४१ सालीं कंपनीला रोख्यांवर कर वजा जातां १८,६६९ रुपये व्याज मिळालें व भागांवरील डिव्हिडंडचे कर वजा जातां २,३२,१०० रुपये मिळाले. व्यवस्थेचा खर्च ९,९३३ रुपये आला. डायरेक्टरांस १२॥ हजार रुपये फी मिळाली. निव्वळ नफा २,२६,३२१ रुपये उरला. रिझर्व्ह फंडांत २५ हजार रुपये टाकून प्राप्तीवरील कराच्या तरतुदीसाठीं २० हजार रुपये बाजूस काढून ठेवले. भागीदारांस ४% करमाफ डिव्हिडंड मिळालें. सर किकाभाई प्रेमचंद हे ट्रस्टचे अध्यक्ष असून मेसर्स प्रेमचंद रॉयचंद ॲन्ड सन्सकडे मॅनेजिंग एजन्सी आहे.

# स्फुट-विचार

## स्वदेशी साखरेविषयीं प्रश्न

इतर मालाबरोबर हिंदी साखरेच्याहि किंमती वाढल्या आहेत आणि त्या ह्याच्यापुढें आणखी अधिक वर जाण्याचा संभव आहे. एकदोन वर्षांमागें स्वदेशी साखरेचा पुरवठा इतका वाढला होता कीं त्यांतला कांहीं भाग ब्रिटिश सरकारानें विकत घेण्यासंबंधीं चर्चा झाली होती. आतां परिस्थिति बदलली असून साखरेस भाव बरा येत आहे. तथापि, ह्या मालाच्या किंमतीचे संबंधांत नियमनाची कांहीं तरी तजवीज करणें प्राप्त आहे. प्रसिद्ध झालेल्या माहितीवरून असें दिसतें कीं गेल्या महिन्याच्या २० तारखेस दिल्ली येथें हिंदुस्थान सरकार आणि साखरेचे कारखानदार ह्यांच्या प्रतिनिधींमध्यें चर्चा झाली आणि साखरेचा पुरवठा व किंमती ह्यांचे संबंधांत स्वीकारावयाच्या धोरणाचा विचार झाला. ह्या चर्चेस अनुलक्षून शुगर मिल्स असोसिएशनच्या चिटनविसांनीं विशिष्ट माहिती नुकतीच प्रसिद्ध केली आहे तिच्यावरून दिल्ली येथें झालेल्या चर्चेच्या स्वरूपावर प्रकाश पडतो. साखरेच्या सर्व कारखान्यांचा तयार माल ठराविक किंमतीनें विकत घेण्याचा सरकारचा विचार आहे आणि ह्या योजनेविषयींची आपली नापसंती इंडियन शुगर मिल्स असोसिएशननें तार पाठवून हिंदुस्थान सरकारास कळवली आहे. ही योजना अव्यवहार्य असून गव्हाचे बाबतींत सरकारी नियंत्रण नुकतेंच अयशस्वी ठरलें त्याप्रमाणेंच ह्याहि संबंधांत अनुभव येण्याचा संभव आहे असें असोसिएशनचें म्हणणें आहे. हिंदुस्थानाबाहेर स्वदेशी साखर पाठवणेंहि अव्यवहार्य आहे आणि ही गोष्ट सरकारच्या व्यापारमंत्र्यांस अवगत आहे असा तिचा मुद्दा आहे. हिंदी साखरेचा धंदा आणि जनता ह्यांचे हिताचे दृष्टीनें स्वदेशी साखर बाहेर पाठवली जाणार नाहीं असें आश्वासन सरकारानें द्यावें अशीहि तिची मागणी आहे. कांहीं कारखानदार आपली साखर विशिष्ट भावानें निर्गतीसाठीं विकण्यास तयार असल्याच्या बातमीस उद्देशून असोसिएशन म्हणते कीं हा भाव नुकसानकारक आहे आणि होणारा तोटा सर्व कारखान्यावर वांटून देण्याची नियोजित कल्पना अन्यायकारक आहे असेंहि तिनें म्हटलें आहे. देशी साखरेचा पुरवठा आणि तिच्या किंमती ह्यांचेविषयीं कांहीं तरी समाधानकारक योजना अंमलांत आणणें अगत्याचें आहे ह्यासंबंधानें सामान्यतः मतभेद होईल असें वाटत नाहीं. अशी योजना मध्यवर्ती सरकारच्या विद्यमानें आणि सर्व हितसंबंध लक्षांत घेतले जाऊनच आखण्यांत आली पाहिजे ही गोष्ट निर्विवाद आहे. खाण्याच्या इतर जिनसांस जो नियम लागू केला जाईल त्यास अनुसरूनच ही व्यवस्था होणें अपरिहार्य आहे.

## स्वदेशी साखर आणि संरक्षण

स्वदेशी साखरेस आयात जकातीचें देण्यांत आलेलें संरक्षण आणखी पांच वर्षें मूळच्या कल्पनेप्रमाणें चालू रहावयाचें आहे. दहा वर्षांमागें संरक्षण जकातीस प्रारंभ झाला तेव्हां सात वर्षांनीं पुन्हां चौकशी करून तें जरूरीपेक्षा अधिक आहे किंवा काय ह्याचा निर्णय केला जावा असें ठरलें होतें. त्याप्रमाणें एकदा चौकशी होऊन फिरूनहि व्हावयाची चौकशी युद्धपरिस्थितीमुळें पुढें ढकलण्यांत आली. मध्यंतरी स्वदेशी साखरेच्या उत्पादनावर पट्टी बसवण्यांत आली आणि तींत वाढहि केली गेली. ह्या पट्टीच्या प्रमाणांत संरक्षण कमी झालेलें आहे हें उघड आहे. आतां स्वदेशी साखरेचें संरक्षण समूळ काढून टाकण्यांत यावें अशा आशयाची सूचना अंतर्भूत असलेलें कायद्याचें एक बिल बिनसरकारी सभासदांचे मार्फत मध्यवर्ती असेंब्लीपुढें मांडण्यांत आलें असून लोकांचे अभिप्राय त्यावर काय आहेत हें अजमावण्यासाठीं तें प्रसिद्ध होण्याचें ठरलें आहे. ह्या प्रसिद्धीकरणास मान्यता देतांना सरकारचे व्यापारमंत्री सर रामस्वामी मुदलिआर ह्यांनीं निरनिराळ्या हितसंबंधी लोकांचीं मतें प्रकट होण्याचें महत्त्व कबूल केलें. परंतु स्वदेशी साखरेच्या धंद्यास आज मिळत असलेलें संरक्षण चालू रहावें असें मत प्रांतिक सरकारांनीं व्यक्त केलें असल्याचें त्यांनीं सांगितलें. ह्या एकमतानें प्रकट झालेल्या प्रांतिक सरकारांच्या अभिप्रायाविरुद्ध जाण्यांत असलेला धोका व्यापारमंत्र्यांनीं असेंब्लीच्या सभासदांचे नजरेस आणला.

## म्हैसूर सिल्क फिलेचर्स लि०

(वार्षिक सभा : १२-४-४१)

वरील कंपनीस जुलै १९४१ ते डिसेंबर १९४१ अखेर घसारा काढून व मॅनेजिंग एजन्सीच्या कमिशनची तरतूद करून, २७,८७८ रुपये नफा झाला. त्यांतून ४,४६७ रुपये प्राथमिक खर्च पूर्णपणें काढून टाकण्याकडे खर्च करून, १,५८१ रुपये ब्रोकरेजखातीं लिहून व ३,५०० रुपये करासाठीं राखून ठेवून १८,३३० रुपये उरतात, त्यांत गेल्या वर्षीचा शिलकी नफा मिळविला म्हणजे २०,८०३ रुपये वाटणीसाठीं रहातात. भागीदारांस प्रत्येक १० रुपयांच्या भागास ८ आणे करमाफ डिव्हिडंड देण्याकडे १९,९२० रुपयांचा विनियोग करावा व ८८३ रुपये पुढील हिशेबांत ओढावे, अशी डायरेक्टरांची शिफारस आहे. म्हैसूर येथील सरकारी सिल्क विव्हिंग फॅक्टरींतील ३ एकर, १० गुंठे जागा म्हैसूर सरकारनें कंपनीस दिली आहे, तेथें फिलेचर्सची इमारत बांधण्याचें काम चालू आहे. टी. नरसिपूर येथील सर्व १३८ बेसिन्स चालू होण्यास कामगार वर्ग शिकून तयार व्हावयास पाहिजे, तो लवकर होत आहे. म्हैसूर येथील ४८ बेसिन्स चालू आहेत; आणखी ४८ बेसिन्स लवकरच तयार होतील. कुडूर येथील कारखान्याचें कामहि सत्वर चालू होईल. गेल्या सहा महिन्यांत कंपनीनें २¼ लक्ष रुपयांच्या मालाचा खप केला. कंपनीचें रेशमी कापड पॅराशूटच्या कामीं वापरण्यांत येत आहे. कंपनीचें वसूल भांडवल ३,८९,२०७ रुपये आहे. नाईक आणि कंपनीकडे म्हैसूर सिल्क फिलेचर्सची मॅनेजिंग एजन्सी आहे. श्री. नारायणराव जी. नाईक हे मॅनेजिंग एजन्सीचे प्रमुख भागीदार आहेत.

## जर्मन कामगार आजारी केव्हां म्हणावे ?

आयोडाइन, अॅस्पिरिन इत्यादि औषधें रोग्यांस न देण्याविषयीं सूचना जर्मन डॉक्टरांस देण्यांत आली आहे. कामगार काम करण्यास नालायक ठरविण्यापूर्वी त्याची कसून तपासणी करून, अगदीं विशेष प्रसंगींच त्यांस तसा दाखला द्यावा, अशीहि त्यांस सूचना देण्यांत आली आहे. १००·५° फॅ. पेक्षां ताप ज्यास्त नसेल, तर कामगारानीं काम केलेंच पाहिजे असा दंडक आहे. डॉक्टर व औषधें ह्यांची वाण आणि कामाचे दिवस बुडूं न देण्याचा प्रयत्न ह्याचे मुळाशीं आहे.

### हिंदुस्थान सरकारचें कस्टम्सचें उत्पन्न

१९४०-४१ मध्यें हिंदुस्थान सरकारास कस्टम्सचें सुमारें ४० कोटि रुपये उत्पन्न मिळालें व त्यासाठीं ८३ लक्ष रुपये खर्च आला. १९३९-४० च्या मानानें कस्टम्सचें उत्पन्न ९ कोटि रुपये कमी झालें. एकट्या साखरेमुळेंच ४ कोटि रुपये कमी मिळाले. रेशीम व रसायनें ह्यांची आयात वाढल्यामुळें त्यांचें कस्टम्सचें उत्पन्न वाढलें. खालील तक्त्यांत पांच वर्षांचे आकडे दिले आहेत:—

| वर्ष | ठोक उत्पन्न | रिफंड वगैरे | खर्च |
|---|---|---|---|
| | रु. | रु. | रु. |
| १९३६-३७ | ५५,५०,८२,८१९ | १,९३,३१,४९१ | १,४२,३१,१५३ |
| १९३७-३८ | ४७,४२,०४,११७ | १,५२,६५,५६० | १,०९,२०,३७१ |
| १९३८-३९ | ४४,५१,४८,०४० | १,४९,९४,६९५ | १,११,५६,००५ |
| १९३९-४० | ५०,४३,१९,४५३ | १,९९,९६,५९३ | ८२,८१,८२४ |
| १९४०-४१ | ४१,३७,४८,६६९ | १,७६,९६,४९० | ८२,५२,९१५ |

### बकिंगहॅम ॲण्ड कर्नाटक कं. लि.

वरील कंपनीस १९४१ सालीं १,२६,३८,६९२ रुपये ठोक नफा झाला, १९४० सालीं ५४,१८,६०५ रुपये नफा झाला होता. म्हणजे नफ्यांत १३३% वाढ झाली. नफ्याचा आकडा वाढला तरी नफा वाटणीस येणारा आकडा पूर्वीइतकाच आहे. कराची तरतूद म्हणून ७४ लक्ष रुपये बाजूस काढून ठेवावे लागले आहेत. १९४० चा तत्सम आकडा १९½ लक्ष रुपये आहे. कच्च्या मालाच्या किंमतीमधील चढ-उताराची तरतूद म्हणून ६½ लक्ष रुपयांचा फंड बाजूस काढून ठेवण्यांत आला आहे, हें १९४१ च्या ताळेबंदाचें वैशिष्ट्य आहे. निवळ नफा २०,६३,६४२ दाखविण्यांत आला आहे. कंपनीचा रिझर्व्ह फंड १ कोटि, ३१ लक्ष रुपयांचा झाला आहे.

### बॅंके को. क्वार्टर्ली

वरील त्रैमासिकाचा मार्च, १९४२ चा अंक नुकताच प्रसिद्ध झाला. अंकाचे प्रारंभीं श्री. आर. जी. सरय्या ह्यांचा हिंदी आसुड बाग्याच्या कपाशीसंबंधींचा महत्त्वाचा लेख देण्यांत आला आहे. सुप्रसिद्ध सहकारी कार्यकर्ते, कै. दिवाण बहादुर मळजी ह्यांच्या कार्याचें वर्णन करणारे लेख नंतर दिलेले आहेत. मुंबई येथें भरलेल्या हिंदी आर्थिक परिषदेंत सहकारी प्रश्नांची चर्चा झाली, त्याची माहिती प्रो. काळे ह्यांनीं आपल्या लेखांत दिली आहे. म्हैसूर को. लॅंड मॉर्गेज बॅंकेची माहिती, मद्रास प्रांतांतील सहकारी कोठारें व शेतमालाचा उठाव, वगैरे विषयांवरील लेखहि अंकांत आले असून नेहमींचीं सदरेंहि त्यांत आहेत. उपयुक्त माहितीनें व लेखांनीं अंक उपयुक्त झाला आहे.

### पॅराशूटचें कापड

काश्मीर संस्थानांतील रेशमाच्या गिरण्यांत दरमहा १५ हजार वार पॅराशूटचें कापड तयार करण्याची तयारी झाली आहे.

### निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| सोनें तोळ्यास ... ... ... | ५१—१२ |
| चांदी १०० तोळ्यांस ... ... ... | ८६—४ |


# दि बॅंक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

| | |
|---|---|
| आधिकृत भांडवल ... ... ... | रु. ३,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... ... ... | रु. १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड ... ... ... | रु. १,१८,००,००० |

**मुख्य कचेरी :** ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

**मुंबईमधील शाखा :** बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

**इतर शाखा :** अहमदाबाद ( भद्र, मुख्य ऑफिस ), अहमदाबाद ( एलिस ब्रिज शाखा ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अंधेरी ( मुंबई शेजारी ), बांद्रे ( मुंबई शेजारी ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस ), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर, कराची, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत.

**लंडन एजन्ट्स :** वेस्टमिन्स्टर बॅंक लिमिटेड.

**डायरेक्टर्स :** सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई, सर जोसेफ के. नाइट, मि. ए. गेडिस, सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई., मि. दिनशा के. दाजी, श्री. रामनिवास रामनारायण.

**करंट डिपॉझिट अकाउंट्स :**

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षा कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बॅंक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बॅंक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बॅंकेसंबंधीं नेहमीचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

एजंट:—टी. आर. लालवाणी.

# दि बॅंक ऑफ महाराष्ट्र लि.

**हेड ऑफिस : पुणें शहर.**

**स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.**

**मुंबअी शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबअी.**

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | : रु. १०,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | : रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | : रु. ४,२५,८५० |
| वसूल झालेलें भांडवल | : रु. २,१२,९२५ |
| एकूण खेळतें भांडवल | : रु. ३३,००,००० |

**डायरेक्टर्स**

प्रो. धा. गो. काळे, अध्यक्ष

| | |
|---|---|
| श्री. धों. कृ. साठे | श्री. मा. रा. जोशी |
| श्री. न. ग. पवार | श्री. श्री. गो. मराठे |
| श्री. त्र्यं. वि. रानडे | श्री. र. चिं. सोहोनी |
| श्री. बा. पुं. वर्दे | मि. फ. दो. पदमजी |

बॅंकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदीविक्री कसोशीनें करून दिली जाते.

बॅंकेच्या शेअरवर १९४१ अखेर पुऱ्या होणाऱ्या वर्षी द. सा. द. शेंकडा ४ टके करमाफ डिव्हिडंड दिलें गेलें. बॅंकेची शेअरविक्री चालू आहे.

म. वि. गोखले
मॅनेजर.

### सिलोन

सिलोनचें बेट पूर्वी कधींतरी हिंदुस्थानाचा एक भाग असलें पाहिजे, परंतु सध्यां तरी तेथील व हिंदुस्थानांतील झाडें, पशु, पक्षी ह्यांत इतकें अंतर दिसून येतें कीं, सिलोन हिंदुस्थानापासून अलग झालेल्यास फार काळ लोटला असला पाहिजे. सिलोनचें क्षेत्रफळ २५,३६५ चौरस मैल असून त्याची लोकसंख्या ५३ लक्ष आहे. सिलोन अगदी पूर्वी पोर्तुगीज लोकांच्या ताब्यांत होतें नंतर तें डचांच्या सत्तेखाली गेलें. १७९६ सालीं तेथें ब्रिटिश राज्य प्रस्थापित झालें. तेथें ब्रिटिश वजनें-मापें उपयोगांत आणलीं जातात व रुपयाचें चलन आहे.

सिलोनची दक्षिणोत्तर लांबी २६६ मैल असून त्याची सर्वांत मोठी रुंदी १४० मैल आहे. सिलोनचें क्षेत्रफळ आयर्लंडच्या तीन चतुर्थांशाइतकें येईल.

सिलोनमध्यें मोठी नदी अशी कोणतीच नाहीं. महावेली गंगा ही तेथील सर्वांत लांब नदी आहे. तिची लांबी १३४ मैल आहे. कँडीपर्यंत तिच्यांतून बोटी जाऊं शकतात. बाकीच्या नद्या डोंगरी स्वरुपाच्याच आहेत. कोलंबो ही सिलोनची राजधानी व प्रमुख बंदर आहे. चीन, ऑस्ट्रेलिया व कलकत्ता येथें जाणाऱ्या आगबोटी ह्या बंदरास लागतात. कँडी ही स्थानिक राज्यकर्त्यांची जुनी राजधानी होती. हें शहर कोलंबोपासून ७२ मैलांवर आहे. तेथील एका बुद्धधर्मीय देवळांत गौतमाचा दात राखून ठेवलेला आहे असा समज आहे. परंतु खऱ्या दाताचा पोर्तुगीजांनीं नाश करून टाकलेला आहे. सिंहली लोक बुद्धधर्मीय असून एकूण लोकसंख्येपैकीं ६५% लोक सिंहलीच आहेत. दक्षिण हिंदुस्थानांतील तामिळ लोकांची तेथील संख्या त्यांचे खालोखाल येते. ते मळ्यांतील मजुरीचें काम करतात. त्यांची संख्या एकूण लोकसंख्येच्या चतुर्थांशाइतकी येईल.

हिंदुस्थान व सिलोन देश रेल्वेनीं जोडण्याच्या योजना गेलीं ५० वर्षें आखण्यांत येत आहेत. रामेश्वरमचे अगदीं दक्षिणेकडील टोक म्हणजे धनुष्कोटीपर्यंत साउथ इंडियन रेल्वे गेलेली आहे. त्याचप्रमाणें, सिलोन गव्हर्मेंट रेल्वेचा फाटा मानारबेटापर्यंत आलेला आहे. ह्या दोन रेल्वेजमध्यें २१ मैलांचें अंतर आहे व तें नावेंतून तोडावें लागतें. त्याऐवजी तेथें रेल्वे बांधण्याच्या योजनेचा विचार अनेक वर्षें चालू आहे. १९१३ सालीं साउथ इंडियन रेल्वे कंपनीनें ह्यासंबंधांत चौकशी करवून असें ठरवलें कीं, ह्या २१ मैलांपैकीं, ७½ मैल लांबीचा रस्ता कोरड्या जागेवर करतां येईल, व बाकीचा रस्ता पाण्यावर कॉजवे घालून तयार करावा लागेल.

### हिंदी रेल्वेजची खरेदी

हिंदी रेल्वेजनीं १९४०-४१ मध्यें, त्यापूर्वीच्या वर्षापेक्षां १ कोटि १ लक्ष अधिक रुपयांचा हिन्दी बनावटीचा माल खरेदी केला. त्यांनीं आयात केलेल्या स्टोर्सची किंमत ७९ लाखांनीं कमी भरली. १९३९-४० मधील स्टोर्सची एकूण खरेदी १७ कोटि, ६७ लाखांची होती; १९४०-४१ मध्यें, ती १७ कोटि, ८९ लाखांची झाली. १९४०-४१ मध्यें हिंदी बनावटीच्या मालाच्या खरेदीचें एकूण खरेदीशीं प्रमाण ६८.५% पडलें; १९३९-४० मध्यें तें ६३.६% होतें. सरकारी व्यवस्थेखालील रेल्वेजनीं १९४०-४१ मध्यें ७ कोटि, ४८ लक्ष रुपयांची खरेदी केली व कंपन्यांचे व्यवस्थेखालील रेल्वेजची खरेदी ४ कोटि, ७७ लक्ष रुपयांची झाली.


मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् को-ऑपरेटिव् बँक, लिमिटेड.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी-सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंग ९, बेंक हाउस लेन, कोट मुंबई.

शाखा

| | |
|---|---|
| १ बारामती ( जि. पुणें ) | १८ अकलूज ( जि. सोलापूर ) |
| २ सातारा ( „ सातारा ) | १९ विरमगांव ( „ अहमदाबाद ) |
| ३ इस्लामपूर ( „ „ ) | २० धुळें ( „ प. खानदेश ) |
| ४ कऱ्हाड ( „ „ ) | २१ दोंडाईचें ( „ „ ) |
| ५ तासगांव ( „ „ ) | २२ शिरपूर ( „ „ ) |
| ६ किर्लोस्करवाडी ( „ „ ) | २३ शहादें ( „ „ ) |
| ७ शिराळें ( „ „ ) | २४ नंदुरबार ( „ „ ) |
| ८ कोरेगांव ( „ „ ) | २५ साक्री ( „ „ ) |
| ९ वांई ( „ „ ) | २६ शिंदखेडें ( „ „ ) |
| १० अहमदनगर ( „ अहमदनगर ) | २७ तळोदें ( „ „ ) |
| ११ शेवगांव ( „ „ ) | २८ मालेगांव ( „ नाशिक ) |
| १२ कोपरगांव ( „ „ ) | २९ सटाणा ( „ „ ) |
| १३ बेलापूर ( „ „ ) | ३० कळवण ( „ „ ) |
| १४ राहुरी ( „ „ ) | ३१ लासलगांव ( „ „ ) |
| १५ भिवंडी ( „ ठाणें ) | ३२ नांदगांव ( „ „ ) |
| १६ पालघर ( „ „ ) | ३३ दोहद ( „ पंचमहाल ) |
| १७ कल्याण ( „ „ ) | ३४ कालोल ( „ „ ) |

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेडऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.

महायुद्ध दाराशीं आलें
परदेशी औषधें
दुर्मिळ व महाग झालीं
पण
भिण्याचें कारण नाहीं !!!
— कारण —
आयुर्वेद रसशाळा पुणें लि०
या देशी औषधाच्या प्रसिद्ध कारखान्यानें तयार केलेलीं
• रक्तवर्धक, • उपनाह,
• बालजीवन, • कॅल्सीप्राल
इत्यादि पेटंट, स्टँडर्ड व लोकप्रिय औषधें खात्री पटल्यामुळें
★ डॉक्टर्सहि वापरूं लागले आहेत. ★
दरसाल बिनचूक नफा वाटणाऱ्या ह्या कंपनीचे शेअर्स व औषधें मागवा.
आयुर्वेद रसशाळा पुणें लि०
मुख्य दुकान गणपति चौक, लक्ष्मीरोड, पुणें २.



DECCAN BOOK STALL
Booksellers, Publishers & Subscription Agents
Fergusson College Road, Poona No. 4

(1) We stock and supply Educational books, General books & Library books.
(2) We supply Government of Bombay and Government of India publications.
(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.
(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.



अर्थशास्त्र
लेखक:—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें ९००, किंमत ६ रुपये
या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.



कॉमनवेल्थचा वैभवशाली विस्तार

★ २७ हजारांचेवर पॉलिसी-होल्डर्स
★ एकूण चालू विमे २ कोटीचेवर
★ दोन हजारांहून अधिक कार्यकर्ते निरनिराळ्या प्रांतांत कॉमनवेल्थसाठी उत्साहानें काम करीत आहेत.


हेड ऑफिस बिल्डिंग

कॉमनवेल्थ
ॲशुअरन्स कंपनी लि.

चेअरमन
• रा. ब. एम्. एन्. मेथा, C. I. E., M. B. E.

ॲक्टिंग ऑफिस सुपरिन्टेंडेंट • एम्. एन्. भागवत, B. A.

' कॉमनवेल्थ ' ची पॉलिसी घेऊन जीवन निश्चिंत व सुखी करा.


हें पत्र पुणें, पेठ मांगुडा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' मांगुडा, घ. नं. ९२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

**जाहिरातींचे दर.**

खालील पत्त्यावर चौकशी करावी.

व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

**वर्गणीचे दर.**

वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ८ पुणें, बुधवार, तारीख १५ एप्रिल, १९४२ अंक १५

**न्यायमूर्ति रानड्यांचे**

**तीन अप्रसिद्ध लेख प्रसिद्ध झाले**

**PLEA FOR PROTECTIONIST POLICY**

**INDIAN SUGAR INDUSTRY**

न्यायमूर्ति रानडे यांनीं १८९९ सालीं ' टाइम्स ऑफ इंडियांत ' स्वदेशी साखरेच्या धंद्यासंबंधीं लिहिलेले महत्त्वाचे तीन लेख, प्रो. वा. गो. काळे यांच्या प्रस्तावनेसह प्रसिद्ध करण्यांत आले आहेत.

व्यवस्थापक, ' अर्थ ', पुणें ४

ह्या पत्त्यावर आठ आण्यांचीं तिकिटें पाठवून लेखांची प्रत मागवावी.

**श्रीराम सिल्क मिल्स लि., बंगलोर**

[ कंपनीनें १९४० अखेर ६ टक्के डिव्हिडंड वांटला आहे. ]

**युद्धसाहित्यपुरवठा–खात्याची पॅरेशूटकरितां लागणाऱ्या**

रेशमी कापडाची ऑर्डर पुरी करण्यासाठी लागणाऱ्या भांडवलाकरितां तूर्त एकूण रु. १ लक्षाच्या रकमेपर्यंत

**ठेवी घेणें आहेत**

**व्याजाचा दर ४॥ ते ६ टक्के. ठेव किमान रु. ५०० ची असावी. ठेवीवरील व्याज दर सहा महिन्यांनीं दिलें जातें.**

श्रीराम सिल्क मिल्स लि.,
श्रीरामबाग,
बसवनगुडी, बंगलोर.

**नारायण गोविंद नाईक,**
( माजी अध्यक्ष, म्हैसूर चेंबर ऑफ कॉमर्स ) मॅनेजिंग डायरेक्टर

आमच्या कारखान्यांतील माल मुंबईस बॉम्बे स्वदेशी को–ऑपरेटिव्ह स्टोअर्समध्यें व पुण्यास लक्ष्मी रोडवरील रे म्यूझिअमच्या व्यापार–संवर्धन–गृहांत पहा.

**'अर्थ' ग्रन्थमाला.**

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

**वक्तशीर आणि मनपसंत काम करून देणारे**

**मोहन वॉच कंपनी**

**रेग्युलेशन मोफत**

कॉमनवेल्थ बिल्डिंगसमोर लक्ष्मी रोड, पुणें २.

**महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.**

बंबाचे माडीवर

# महिंद्रकर ब्रदर्स

**तयार कपड्याचे व्यापारी**

बुधवार चौक, पुणें

# विविध माहिती

### प्रॉमिसरी नोटेचा दावा

अहमदाबाद येथें लिहून दिलेल्या व मुंबई येथें पैसे देण्यासंबंधीं उल्लेख नसलेल्या प्रॉमिसरी नोटेसंबंधीं दावा मुंबई कोर्टाच्या कक्षेंत येत नाहीं, असा निवाडा मुंबई हायकोर्टानें केला आहे.

### टोकीयोवर बाँब हल्ला

लवकरच अमेरिकन बाँब टोकियोचा नायनाट करूं लागतील, असें हाउस मिलिटरी अफेअर्स कमिटीचे अध्यक्ष नुकतेच एका भाषणांत म्हणाले.

### स्पेनला पेट्रोलचा पुरवठा

अमेरिका स्पेनला कांहीं अटींवर पेट्रोल पुरविणार आहे. ह्या पेट्रोलच्या साठ्यावर व वापरावर अमेरिकेची देखरेख रहाण्यास स्पेननें मान्यता दिली आहे.

### ट्रेझरी बिलांवर १ रु. ३ आ. ७ पै व्याजाचा दर

रिझर्व्ह बँकेनें गेल्या आठवड्यांत हिंदुस्थान सरकारचीं २ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. १ रु. ३ आ. ७ पै इतका पडला.

### आगपेट्यांची किंमत

४० काड्यांच्या आगपेटीस १½ पैसा व ४० ते ५० काड्यांच्या आगपेटीस २ पैसे किमान दर हिंदुस्थान सरकारनें ठरवून टाकला आहे.

### अमेरिकेची साखरेची खरेदी

फ्रेंच सरकारकडून २ लक्ष टन साखर विकत घेण्याची वाटाघाट अमेरिकन सरकार करीत आहे.

### मुंबई प्रांतांची आघाडी

डिफेन्स कर्जांत गुंतविलेल्या रकमांचे प्रांतांतील दर माणशीं पडणाऱ्या प्रमाणाचा विचार केला असतां, मुंबई प्रांत अग्रेसर ठरतो. मुंबई प्रांतांतील लोकांनीं ह्या कर्जांत ३८¾ कोटि रुपये गुंतविले आहेत. म्हणजे दरमाणशीं प्रमाण १८ रु. ८ आ. पडतें. दिल्लीचा अनुक्रम दुसरा येतो. तेथें तें प्रमाण ८ रु. आहे. नंतर बंगाल (७ रु. २ आ.), बलुचिस्तान (३ रु. ६ आ.) असा अनुक्रम आहे. बाकी कोणत्याहि प्रांतांत २ रुपयांपेक्षा अधिक प्रमाण पडत नाहीं.

### ओरिअंट पेपर मिल्स लि.

वरील कंपनीनें ३० सप्टेंबर, १९४१ असेरच्या सहामाहीकरितां १५% दरानें डिव्हिडंड देण्याचें ठरविलें आहे. ह्यापूर्वीच्या सहामाही डिव्हिडंडच्या दर १०% होता. विक्रीचा आकडा त्या पूर्वीच्या सहामाहींत २२ लक्ष रुपये होता तो ३३ लक्ष रुपये झाला. तथापि, उत्पादनाचा खर्चहि १२ लाखांचा २२ लाखांवर गेला आहे. वाढत्या दरानें डिव्हिडंड देण्यासाठी शिलकी नफ्यांतून कांहीं रकम घ्यावी लागली आहे.

### प्रॉव्हिडंट फंड व इनकमटॅक्स

प्राव्हिडंट फंडांत मालक नोकराचे नांवानें एका वर्षांत जेवढी रकम टाकील, त्याच्या दुपटीपेक्षा जास्त रकम ५०० रुपयांपेक्षा कमी पैसे मिळणाऱ्या नोकरास त्या फंडांत टाकतां येणार नाहीं. त्याचप्रमाणें नोकर जेवढे पैसे टाकील, त्यापेक्षा जास्त रकमेचा बोनस मालक त्या फंडांत नोकराचे खातीं टाकूं शकणार नाहीं. वरील दोन नवे नियम करण्यांत येणार आहेत.

### पोस्टांत काम करणाऱ्या स्त्रिया

ग्रेटब्रिटनमधील पोस्टखात्यांत एक लक्ष स्त्रिया कामावर आहेत. गेल्या महायुद्धाचे वेळींहि कांहीं स्त्रिया टपाल वाटण्याचें काम करीत असत, परंतु आतांचे मानानें तेव्हांची संख्या फारच थोडी होती.

### शिंकांचा युद्धप्रयत्नांत व्यत्यय

साध्या पडशामुळें राष्ट्रीय नुकसान केवढें मोठें होतें, याचे आकडे एका ब्रिटिश वृत्तपत्रानें दिले आहेत. थंडी-पडशामुळें प्रत्येक कामगाराचे वर्षांतून दोन दिवस बुडतात ह्या हिशेबानें, दरसाल ३½ हजार रणगाडे, १ हजार बाँबर व १० लक्ष बंदुका कमी तयार होतात. हें नुकसान टाळण्यासाठी ब्रिटिश आरोग्य खात्यानें "हातरुमालाचा उपयोग करून जंतूंचा प्रसार थांबवा" असा प्रचार करण्यास प्रारंभ केला आहे. शिंकणाऱ्या मनुष्यापासून तीन फुटांवर कांच धरली व शिंकेचा फोटो घेतला, तर कांचेवर जंतूंचे १९ हजार पुंजके आढळतात. परंतु शिंकणारानें हातरुमालाचा उपयोग केला तर एखादाच पुंजका कांचेपर्यंत पोचूं शकतो.

### काश्मीर संस्थानाचें अंदाजपत्रक

काश्मीर संस्थानास १९४२-४३ मध्यें एकूण ३ कोटि, २०½ लक्ष रुपये उत्पन्न होऊन त्याचा खर्च ३ कोटि, १७½ लक्ष रुपये होईल, असा अजमास आहे. एकूण अपेक्षित उत्पन्नापैकी ८१½% उत्पन्न कस्टम्स, जंगल व उद्योगधंदे ह्या खात्यांचें आहे.

### स्वदेशी कॉटन मिल्स लि., कानपूर

वरील कंपनीला ३१ जानेवारी असेर संपलेल्या वर्षी ७२ लक्ष ६१ हजार रुपये ठोक नफा झाला. ऑर्डिनरी भागांस ९०% डिव्हिडंड मिळेल. गेल्या वर्षी ५०% दरानें डिव्हिडंड वाटलें होतें. सर हेन्री हॉर्समन हे कंपनीचे अध्यक्ष आहेत.

### २७ व्या कलमाचा अर्थ

हिंदी विमा कायद्याच्या २७ व्या कलमाच्या अर्थासंबंधीं सरकार व विमा कंपन्या ह्यांचेमध्यें मतभेद आहे. तेव्हां त्याचा अर्थ कोर्टामार्फत ठरवून घेण्यांत येणार आहे. त्यासाठी हिंदुस्थानसरकार कंपन्यांचे वतीनें २ हजार रुपये खर्च सोसण्यास तयार आहे.

### प्रॉव्हिडंट फंडाच्या रकमेवर इनकमटॅक्स

जमशेटपूरच्या टाटा आयर्न अँड स्टील कंपनीच्या नोकरास कंपनीनें ३,४४५ रुपये प्रॉव्हिडंट फंडाचा कंपनीचा हिस्सा म्हणून दिले. ह्या रकमेवर इनकमटॅक्स खात्यानें कर बसविला. हें प्रकरण पाटणा हायकोर्टाकडे गेलें, तेव्हां "कंपनीचे नियम तपासून पाहतां, ही रकम नोकराच्या पगाराचे स्वरूपाची नाहीं, सबब त्यावर इनकमटॅक्स बसवितां येत नाहीं" असा त्यानें निवाडा केला.

### अमेरिकेंत लढाऊ विमानांचें उत्पादन

दर महिन्यास तीन हजार लढाऊ विमानें आतां अमेरिकेच्या कारखान्यांमध्यें तयार होऊं लागलीं आहेत. अमेरिका व इतर मित्रराष्ट्रें मिळून सर्व शत्रु-राष्ट्रांच्या अडीच पट विमानें बनवण्यास समर्थ झालीं आहेत.

### रिझर्व्ह बँक

रिझर्व्ह बँकेच्या कलकत्ता येथील पब्लिक डेट ऑफिसचे कागदपत्र कानपूर येथें नेण्यांत येत आहेत. बँकेच्या मद्रास शाखेंतील इश्यू डिपार्टमेंट मुंबईस नेण्यांत आलें आहे.

अनुक्रमणिका

| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | ११६ |
| २ खाण्याच्या धान्यांची पैदास वाढवा ... | ११७ |
| ३ सहकारी संवत्सरी आणि परिचय ग्रंथ ... | ११८ |
| ४ पत राखण्यासाठी केलेला खर्च ... | ११८ |
| ५ स्फुट विचार ... सर स्टॅफर्ड क्रिप्स ह्यांचा अखेरचा संदेश—पूर्वेकडील युद्धक्षेम व हिंदुस्थान—कारखान्यांचा युद्धविषयक नुकसानीचा विमा—शेतीसुधारणेसाठी मध्यवर्ती ठिकाणें | ११९ |
| ६ खाद्योपयोगी पिकांची लागवड ... | १२१ |
| ७ बॉबे इ. अँड स. कंपनी | १२१ |
| ८ ग्रामसेवक विद्यालय, वर्धा ... ... | १२१ |

# अर्थ

बुधवार, एप्रिल ता. १५, १९४२

## "खाण्याच्या धान्यांची पैदास वाढवा"

"जनतेच्या रोजच्या जीवनास लागणाऱ्या खाद्य व पेय पदार्थांच्या उपयोगास मर्यादा घालून त्यांच्या पुरवठ्याचें नियंत्रण करणें इतर देशांत मागेंच आवश्यक झालें, तसा प्रसंग हिंदुस्थानावर आतांपर्यंत आला नव्हता. परंतु युद्ध आतां ह्या देशाच्या दारांशीं येऊन ठेपल्यामुळें धान्यधुन्याचे बाबतींत हिंदी लोकांनीं स्वयंपूर्ण झालें पाहिजे एवढेंच नव्हे तर वाढत्या मागणीकडे लक्ष देऊन ह्या जिनसांचें उत्पादन वाढवलें पाहिजे." ह्या आशयाचा संदेश व्हाइसरॉय लॉर्ड लिन्‌लिथगो, ह्यांनीं गेल्या आठवड्यांत मथळ्यांतील विषयाची चर्चा करण्यासाठी दिल्ली येथें भरलेल्या प्रांतिक व संस्थानी सरकारांच्या प्रतिनिधींच्या सभेकडे पाठवून दिला होता. धान्याच्या पिकांच्या विस्ताराचा उपयोग युद्ध-प्रयत्नास तर होईलच, पण ह्या कृषिप्रधान देशांत शेतीच्या धंद्याच्या उत्कर्षाचे दृष्टीनेंहि खावयाचीं धान्यें व जनावरांचा चारा ह्यांच्या लागवडीची योजनात्मक पद्धतीनें व्यवस्था करण्याचें विशेष महत्त्व आहे असेंहि त्या संदेशांत म्हटलें आहे. दिल्लीच्या परिषदेचे अध्यक्ष, हिंदुस्थान सरकारचे शिक्षणमंत्री, श्री. नलिनीरंजन सरकार, ह्यांच्या भाषणाचें सार "खाण्याच्या पदार्थांचें उत्पादन वाढवा" ह्या अर्थाच्या सल्ल्यांतच होतें.

हिंदुस्थानांत खाण्याच्या धान्यांच्या पुरवठ्याची आजची परिस्थिति काय आहे ह्याचें विवेचन करून वहातुकीच्या साधनांच्या तुटवड्यामुळें कोणत्या अडचणी उपस्थित झाल्या आहेत ह्याचें त्यांनीं वर्णन केलें. शेतीचा धंदा हा विषय राज्यकारभाराचे दृष्टीनें प्रांतिक सरकारांच्या कार्यक्षेत्रांत येत असला तरी त्याचे संबंधांतील प्रश्न सोडवण्यांत मध्यवर्ती सरकारास सहाय देतां येईल ह्या कल्पनेनें आपण कांहीं योजना आखीत असल्याचें त्यांनीं सांगितलें. धान्यांच्या किमान किंमती ठरवून टाकणें आणि त्यांच्या पुरवठ्याचे संबंधांतील माहिती सर्वांस मिळूं शकेल अशी व्यवस्था करणें ह्या विषयींच्या योजनांचा विचार मध्यवर्ती सरकार करीत आहे असें शिक्षणमंत्री म्हणाले. खाण्याच्या पिकांचा विस्तार करण्याची कोणतीहि योजना अमलांत आली तरी तिची व्यवस्था पहाण्यास समित्या व अधिकारी प्रांतांत व संस्थानांत नेमले गेले पाहिजेत असेंहि त्यांनीं सुचविलें.

दिल्ली येथें भरलेल्या धान्य-पुरवठा परिषदेनें अनेक महत्त्वाचे ठराव मान्य केले. धान्याच्या पिकांचें क्षेत्र शेतकऱ्यांनीं वाढवावें ह्यासाठी प्रांतिक सरकारांनीं तपशीलवार कार्यक्रम आखून ते अमलांत आणावे आणि ज्या पिकांविषयीं प्रचार केला जाईल त्यांचें बीं लोकांस मिळण्याची तजवीज करावी, तसेंच खतें व पाणी ह्यांचाहि पुरवठा होण्याकरितां तगाई कर्जें वगैरे द्यावीं अशी सूचना एका ठरावांत केलेली आहे. नवीन जमीन नांगरटीखालीं घेऊन तीमध्यें धान्य व गुरांचा चारा तयार करण्यांत येत असेल तर शेतकऱ्यांस साऱ्याच्या माफी सारख्या सवलती देण्यांत याव्या अशी शिफारस परिषदेनें केली आहे. धान्यांची पैदास वाढून त्यांच्या किंमती खालीं जाण्याची भीति आहे, ती दूर होण्यासाठी जरूर तितका माल स्वतः विकत घेऊन त्याचे भाव स्थिर ठेवण्याची व्यवस्था मध्यवर्ती सरकारनें करणें अगत्याचें आहे असा अभिप्राय तिनें व्यक्त केला आहे. आगगाड्या व मोटारी ह्यांची वहातुक सध्या मर्यादित झाली असतां, बैलगाड्या वगैरे जुनीं साधनें पुन्हां मोठ्या प्रमाणांत वापरांत येतील अशी योजना सरकारनें हातीं घ्यावी ही परिषदेची सूचना महत्त्वाची आहे. धान्याच्या पुरवठ्याविषयीं माहिती गोळा करून पुरवणें वगैरे कामें करण्याच्या हेतूनें एक मध्यवर्ती समिति हिंदुस्थान सरकारच्या विद्यमानें नेमली जावी ह्या आशयाच्या श्री. सरकार ह्यांच्या कल्पनेस दुजोरा परिषदेनें दिला.

आखूड धाग्याच्या कपाशीच्या ऐवजीं ज्वारी, बाजरी, गहूं व शक्य तेथें भात ह्यांचीं पिकें करा असा सल्ला देणारें पत्रक अहमदनगर, पुणें व सोलापूर ह्या जिल्ह्यांस अनुलक्षून मुंबई प्रांताच्या शेतीखात्यानें प्रसिद्ध केलें आहे, त्यांतला महत्त्वाचा भाग आजच्या अंकांत इतरत्र उद्धृत केलेला आहे, त्यावरून ह्या सूचनेचा हेतु व फायदा काय आहे हें स्पष्ट होईल. आखूड धाग्याच्या कापसास मागणी नाहीं व भावहि नाहीं ह्या कारणानें त्याच्या जागीं दुसरी पिकें करणें शेतकऱ्यांस कसें फायदेशीर आहे हें पिकांच्या उत्पन्नाचे तुलनात्मक आकडे देऊन शेतीखात्यानें दाखवून दिलें आहे, तिकडे शेतकरी वर्गाचें लक्ष जाणें अगत्याचें आहे. दिल्ली येथें भरलेल्या परिषदेनें मंजूर केलेल्या ठरावांचा मथितार्थ आम्हीं वर दिला आहे. त्या सूचनांस अनुसरून मुंबईच्या प्रांतिक शेतीखात्यानें प्रचाराचा उपक्रम केला आहे. त्या खात्यानें ह्यासंबंधांत विस्तृत योजना आखली आहे ती फलद्रूप होईल आणि तिचे परिणाम प्रत्यक्ष अनुभवास ठळक रीतीनें येतील अशा रीतीनें तिची अंमलबजावणी होईल अशी अपेक्षा आहे. ह्या कामीं दिल्ली परिषदेचे ठराव आणि तीमधील चर्चा हीं मार्गदर्शक झाल्यावांचून रहाणार नाहींत.

## सहकारी संवत्सरी आणि परिचय ग्रंथ

हिंदुस्थानांतील निरनिराळे प्रांत आणि संस्थानें ह्यांमधील सहकारी संस्थांविषयींची तपशीलवार माहिती सहकारी कार्यकर्त्यांस उपयुक्त व अगत्याची असल्यानें अशा प्रकारचा ग्रंथ तयार करावा व तो छापून प्रसिद्ध करावा असें अखिल भारतीय सहकारी इन्स्टिट्यूट्स व प्रांतिक सहकारी बँक्स ह्यांच्या असोसिएशन्सच्या गेल्या वर्षी जानेवारींत मुंबई येथें भरलेल्या संयुक्त परिषदेंत ठरलें. ह्या ग्रंथाचें संपादकत्व प्रसिद्ध सहकारी कार्यकर्ते नामदार रामदास पंटलू, ह्यांचेवर सोंपविण्यांत आलें. निरनिराळे प्रांत व संस्थानें ह्यांच्याविषयीं माहिती संकलित करण्यासाठी प्रांतिक व स्थानिक संपादकांची योजना झाली. हा नियोजित ग्रंथ आतां प्रसिद्ध झाला असून मूळ कल्पनेच्या मानानें पुष्कळच वाढला आहे.* मोठ्या आकाराचीं सुमारें सातशें पानें त्यांत आहेत आणि कागदाच्या किंमती वाढल्या आहेत ह्या गोष्टी लक्षांत घेतां ग्रंथाचें मूल्य ५ रुपये ठेवलें आहे तें सर्वथा माफक आहे ह्यांत शंका नाहीं.

प्रस्तुत ग्रंथांत तीन मुख्य भाग आहेत. पहिला सर्वसाधारण स्वरूपाचा व निबंधात्मक आहे आणि दुसऱ्यांत व तिसऱ्यांत प्रांत व संस्थानें ह्यांमधील सहकारी संस्थांचें वर्णन आहे. पहिल्या भागांतील प्रकरणें प्रसिद्ध सहकारी कार्यकर्त्यांनीं लिहिलीं असल्यानें तीं उदबोधक झालीं आहेत. हिंदी सहकारी चळवळीचें सिंहावलोकन श्री. रामदास पंटलू ह्यांनीं केलें आहे. श्री. वैकुंठराय मेथा ह्यांनीं रिझर्व्ह बँक व सहकारी बँकिंग ह्या विषयाचें विवेचन केलें आहे. खेडेगांवांतील कर्जबाजारीपणा हा डॉ. नारायणस्वामी नायडू ह्यांच्या लेखाचा विषय आहे. श्री. जे. सी. कुमाराप्पा व डॉ. पट्टाभिसीतारामय्या ह्यांनीं अनुक्रमें करून ग्रामोद्योग मंडळ व खादीचें अर्थशास्त्र ह्या विषयावर लिहिलें आहे. प्रमुख सहकारी कार्यकर्त्यांचा परिचय हें प्रकरण ह्या पहिल्या भागांत महत्त्वाचें आहे.

हिंदुस्थानच्या निरनिराळ्या भागांत सहकारी संस्थांची उत्क्रांति व प्रगति कशी झाली आहे हें ग्रंथाच्या दुसऱ्या व तिसऱ्या भागांत दिलेल्या सविस्तर माहितीवरून समजतें आणि तुलनात्मक अभ्यास ही माहिती सहायकारक होण्यासारखी आहे. ग्रंथाचे मुख्य संपादक, श्री. रामदास, ह्यांनीं लिहिलेली प्रस्तावनाहि वाचनीय आहे. योजल्याप्रमाणें ग्रंथ तयार करून तो प्रसिद्ध केल्याबद्दल संपादकांचें अभिनंदन केलें पाहिजे. अभ्यासकांच्या आणि जिज्ञासू व मेहनती कार्यकर्त्यांच्या दृष्टीनें प्रस्तुत ग्रंथ बहुमोल आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. पुस्तकाच्या पहिल्या भागांत विवेचनात्मक असे आणखी निबंध येणें आवश्यक होतें, परंतु ग्रंथ तयार करण्याच्या मार्गांतल्या परिचित अडचणी ध्यानांत आणल्या असतां असला अपुरेपणा अपरिहार्यच समजावा लागतो. संवत्सरी वेळोवेळ पुन्हां पुन्हां तयार करून छापावी लागणार आहे. सहकारी चळवळींत होणाऱ्या स्थित्यंतरांचा परामर्श अशा योजनेनेंच घेतला जाईल. ग्रंथांतील उणीवा व वैगुण्यें ह्यांची जाणीव प्रत्यक्ष संपादकांस आहेच. पुढच्या आवृत्तीच्या वेळीं ग्रंथ त्याहीपेक्षा अधिक उपयुक्त करण्यांत येईल, ह्याविषयीं आम्हांस संदेह वाटत नाहीं. सहकारी संस्था व कार्यकर्ते ह्यांनीं प्रस्तुत ग्रंथास आश्रय देऊन स्वतःचा फायदा व ग्रंथकर्त्यांच्या परिश्रमाचें चीज करावें असें आम्हीं इच्छितों. हिंदी सहकारी संघटनेच्या उद्योगाचें हें महत्त्वाचें फळ आहे हें येथें लक्षांत ठेवणें आवश्यक आहे.

* "Year Book and Directory of Indian Co-operation, 1942"–General Editor: The Hon'ble V. Ramdas Pantalu. Published by the All India Co-operative Institutes' Association and Indian Provincial Co-operative Banks' Association. Price Rs. 5/-

## पत राखण्यासाठी केलेला खर्च भांडवली स्वरूपाचाच आहे

### इनकम टॅक्सबाबत निवाडा

१९३७–३८ च्या इनकमटॅक्स वर्षाबद्दल सर होमी मेथा ह्यांच्या ५,२२,४०० रुपयांच्या प्राप्तीवर इनकमटॅक्स आकारण्यांत आला. त्यांत ९६,५३७ रुपये ही रकम शेअर्सच्या विक्रींतील नफ्याची होती. सर होमी मोदी ह्यांनीं ब्रिटिश इंडिया जनरल इन्शुअरन्स कंपनीचेतर्फे ३,२८,६४५ रुपये भरले ते त्यांचे प्राप्तींतून वगळण्यास इनकमटॅक्स अधिकाऱ्यानें परवानगी दिली नाहीं. सर होमी मोदी हे प्रस्तुत कंपनीचे उत्पादक व सध्या तिचे अध्यक्ष व मॅनेजिंग डायरेक्टर आहेत. कंपनीच्या १ लक्ष भागांपैकीं २५ हजार भाग त्यांचे नांवावर आहेत. सर होमी ह्यांचें म्हणणें असें, कीं ९६,५३७ रुपयांची वर निर्दिष्ट केलेली रकम ही भांडवली स्वरूपाची वाढ आहे. सबब ती प्राप्तीमध्यें समाविष्ट करण्यांत येऊं नये. त्याचप्रमाणें, त्यांनीं ब्रिटिश इंडिया कंपनींतून उत्पन्न मिळविण्यासाठी ३,२८,६४५ रुपये खर्च केलेले आहेत, म्हणून ती रकम एकूण उत्पन्नांतून वजा केली जावी. इनकमटॅक्स अधिकाऱ्यानें ह्या दोन्ही गोष्टी अमान्य केल्यावरून कमिशनर ऑफ इनकम टॅक्सनें हें प्रकरण सर होमी मेथांचे सांगण्यावरून, हायकोर्टाकडे नेलें.

हायकोर्टामध्यें सर होमींच्या वकिलानें पहिला मुद्दा सोडून दिला. "ब्रिटिश इंडिया विमा कंपनीस 'दि री इन्शुअरन्स कॉर्पोरेशन लि.' ह्या एका विदेशी कंपनीस ३,२८,६४५ रुपयांचा क्लेम द्यावयाचा होता; ही रकम सर होमींनीं दिली नसती, तर ब्रिटिश इंडिया कंपनी बुडाली असती व त्यामुळें सर साहेबांचे २५ हजार भाग, दरमहा १ हजार रुपये पगार, डायरेक्टर्स फीज, हीं सर्व बुडून शिवाय त्यांची पतहि कमी झाली असती. म्हणून ही रकम कंपनीतर्फे भरण्यांतील हेतु उत्पन्न मिळविणें हाच होता; भांडवली स्वरूपाचा तो खर्च नाहीं," असें त्यांचेतर्फे प्रतिपादन करण्यांत आलें. सर होमी मेथा ह्यांनीं केलेला खर्च दुसऱ्या कंपनींत आपली पत राखण्यासाठीच प्रामुख्यानें केलेला आहे; स्वतःच्या धंद्यासाठीं नव्हे; व हा खर्च भांडवली स्वरूपाचाच आहे, असा अभिप्राय हायकोर्टानें व्यक्त केला व दोन्ही प्रश्नांचे बाबतींत इनकम टॅक्स खात्याचें मतच त्यानें उचलून धरलें. कोर्ट खर्च सर होमी मेथांनींच द्यावयाचा आहे.

### विद्यार्थ्यांची सोय

ज्या विद्यार्थ्यांचे फीचे व रहाण्याच्या खर्चाचे पैसे त्यांच्या पालकांकडून मळाया अगर ब्रह्मदेश ह्या देशांतून येत असत परंतु ज्यांस ते सध्याच्या युद्धपरिस्थितींत पोचूं शकत नाहींत, अशा विद्यार्थ्यांना अडवान्स रकम देण्यास मद्रास सरकारनें फेब्रुवारीपासून प्रारंभ केला आहे.

# स्फुट-विचार

## सर स्टॅफर्ड क्रिप्स ह्यांचा अखेरचा संदेश

हिंदुस्थानांतील राजकीय लढा सोडवण्याचा प्रयत्न करण्याच्या हेतूनें सर स्टॅफर्ड क्रिप्स ब्रिटिश प्रधानमंडळानें आखलेली योजना घेऊन हिंदुस्थानांत आले होते आणि तिला हिंदी पक्षोपपक्षांची संमति मिळवण्यांत त्यांच्यासारख्या पुरोगामी, सदिच्छा-प्रवृत्त व हुशार मुत्सद्यास यश येईल अशी शेवटपर्यंत आशा वाटत होती. त्यांनीं तीन आठवडेपर्यंत अनेक हिंदी पुढाऱ्यांशीं वाटाघाटी केल्या आणि सर्वांचें म्हणणें ऐकून घेतलें व आपली बाजू त्यांस समजावून सांगितली. ब्रिटिश प्रधानमंडळाच्या योजनेचा सदोषपणा आपापल्या परी प्रत्येक गटाच्या प्रतिनिधींनीं व व्यक्तींनीं त्यांचे नजरेस आणला आणि सर स्टॅफर्ड ह्यांची शिष्टाई व्यर्थ जाते असें वाटण्यास कारणीभूत होण्यासारखे तीव्र मतभेद उघड होऊं लागले. तथापि, त्यांनीं आपला हिंदुस्थानांतील मुक्काम वाढवला आणि आपल्या योजनेचा कांहीं बाबतींत फेरविचार करण्याची इच्छा दर्शविली तेव्हां यशाविषयींच्या आशेस पुन्हां अंकुर फुटला. देशाच्या संरक्षणाची जबाबदारीहि हिंदी मंत्र्यावर सोपवण्याच्या प्रश्नाविषयींच्या चर्चेमध्यें बरीच घासाघीस झाली आणि ब्रिटिश प्रधानमंडळ व हिंदी पुढारी ह्यांची एकवाक्यता होणार अशीं चिन्हें दिसत होतीं. प्रेसिडेंट रूझव्हेल्ट ह्यांचे नुकतेच ह्या देशांत आलेले खास प्रतिनिधी कर्नल जॉन्सन ह्यांनीं चर्चेमध्यें भाग घेतला ह्यावरून ह्या अपेक्षेस दुजोरा मिळाला. तथापि योजलेल्या राज्यव्यवस्थेंत भावी हिंदी मंत्र्यांस पूर्ण सत्ता हवी तशी मिळत नाहीं आणि ब्रिटिश प्रधानमंडळ त्याच्यापुढें मांडलेली दुरुस्तीची सूचना मान्य करण्यास तयार नाहीं ह्या मुद्यावर शेवटीं सर्व वाटाघाटी फिस्कटल्या. जपानच्याविरुद्ध जुटीनें व कार्यक्षम रीतीनें हिंदुस्थानास युद्ध चालवतां यावें ह्या दृष्टीनें इंग्लंड व हिंदुस्थान ह्यांचेमध्यें तातडीनें तडजोड होणें अगत्याचें होतें आणि सर स्टॅफर्ड ह्यांची शिष्टाई व्यर्थ गेल्याबद्दल सर्वत्र खेदाचें वातावरण निर्माण होणें स्वाभाविक आहे. तरीहि देशावर आलेल्या संकटास सर्वांनीं उत्साहानें तोंड दिलें पाहिजे आणि जपानच्या चढाईचा प्रतिकार एकदिलानें सर्व पक्षांनीं व व्यक्तींनीं केला पाहिजे ह्याविषयीं हिंदुस्थानभर ऐकमत्य आहे ही समाधानाची गोष्ट आहे. सर स्टॅफर्ड ह्यांनीं आपल्या शिष्टाईच्या प्रयत्नांचा आढावा मतभेद व अपयश ह्यांनीं आपल्या शांत मनोवृत्तीचा तोल जाऊं न देतां घेतला आणि विचारवैचित्र्यापेक्षा मतैक्यावर जोर दिला. जपानच्या अमानुष हल्ल्यांपासून आपल्या मुलाबाळांचा बचाव हिंदी लोकांनीं करण्यास शिकस्तीनें झटावें आणि त्या कामांत इंग्लंड हरतऱ्हेची खटपट करील व अमेरिका सहाय देईल असा त्यांचा अखेरचा संदेश आहे.

---

## पूर्वेकडील युद्धक्षेत्र व हिंदुस्थान

शांतपणानें आणि शिस्तीनें शत्रूच्या हल्ल्यास तोंड देण्याची तयारी ठेवा असा उपदेश हिंदी जनतेस तिचे सर्व पुढारी व सरकारी अधिकारी करीत आले आहेत, त्याचें महत्त्व आतां अधिकाधिक वाढत आहे. जपानी विमानहल्ल्यांच्या बातम्या आजपर्यंत लोक दुरून ऐकत होते. आतां हिंदुस्थानच्या पूर्व किनाऱ्यावर विजागापटम् व कोकोनाडा ह्या बंदरांवर शत्रूच्या विमानांनीं नुकतेच हल्ले केल्यामुळें लोकांनीं स्वसंरक्षणाची व्यवस्था कडेकोट रीतीनें करणें अत्यंत अगत्याचें झालें आहे. विमानांच्या हल्ल्यांपासून बचाव करण्याचे उपाय जनतेस समजावून सांगण्यांत येत आहेत आणि दिवेबंदीची योजना अंमलांत आणली जात आहे. ह्यासंबंधांतलीं प्रात्यक्षिकें करण्यांत येत आहेत आणि जनतेस वेळोवेळ देण्यांत येणाऱ्या सूचनांप्रमाणें सर्वांनीं व्यक्तिशः व सामुदायिक रीतीनें कृति करणें आवश्यक आहे. आतां संकट जवळ आलें आहे असें समजून त्यांनीं वागलें पाहिजे आणि गैरसोयी व अडचणी ह्यांचा निष्कारण विचार करीत बसतां कामा नये. फिलिपाइन्स, ब्रह्मदेश, सिलोन, बंगालचा उपसागर ह्या सर्व भागांत एकाच वेळीं जपानानें धुमाकूळ चालवला आहे. सिलोनमध्यें कोलंबो व त्रिंकोमाली ह्या बंदरांवर जपानचे हवाई हल्ले अलीकडे झाले आहेत, पण त्या ठिकाणीं त्यांचा प्रतिकार कणखरपणानें करण्यांत आला आहे. फिलिपाइन्स बेटांतील बटान द्वीपकल्पांत अमेरिकन फौजेनें शत्रूशीं तीन महिने झगडा चालू ठेवला होता. पण जपाननें प्रचंड जमावानें चढाई केल्यामुळें तिला आतां अगतिक व्हावें लागलें आहे. तथापि इतरत्र ऑस्ट्रेलिया आणि अमेरिका ह्यांनीं शत्रूचा चांगला समाचार घेण्याचा क्रम चालू ठेवला आहे आणि जपानी जहाजें व विमानें ह्यांचा नाश मोठ्या प्रमाणावर केला आहे. एका बाजूनें जपानचें लढाऊ बळ घटत जात आहे आणि दुसऱ्या बाजूनें अमेरिका व ऑस्ट्रेलिया ह्यांची शक्ति एकवटत आहे व वाढत आहे. चिनी फौजांनीं स्वतःच्या देशांत व ब्रह्मदेशांत शत्रूच्या चढाईचा प्रतिकार अखंडपणानें चालवलाच आहे. एशिया खंडांतील युद्धामधलें हिंदुस्थानचें मध्यवर्ती व मोक्याचें स्थान आतां ठळकपणानें प्रत्ययास येत आहे. लढाऊ सामुग्रीच्या वाढत्या उत्पादनाची कार्यक्षम व्यवस्था होण्याचे दृष्टीनें अमेरिकन तज्ज्ञ येथें आले आहेत आणि ह्याविषयींच्या योजना ते आखीत आहेत.

---

## कारखान्यांचा युद्धविषयक नुकसानीचा विमा

कारखान्यांच्या युद्धविषयक धोक्याच्या विम्याची व्यवस्था करणारा एक ऑर्डिनन्स हिंदुस्थान सरकारनें काढला व तो अंमलांतहि आला आहे. शत्रूनें कारखान्यांची इमारत व यंत्रसामुग्री ह्यांची केलेली नासधूस व त्याचप्रमाणें शत्रूचा प्रतिकार करतांना झालेली नासधूस ह्या दोघांचाहि अंतर्भाव विम्याचे योजनेंत करण्यांत आलेला आहे. म्हणजे, सरकारी हुकुमास अनुसरून बुद्धिपुरःसर केलेल्या नाशाचा विमा पॉलिसींत अंतर्भाव झाला आहे. ह्या ऑर्डिनन्सला अनुसरून केव्हांहि विमा उतरविला, तरी गेल्या १ एप्रिल पासून त्यास संरक्षण मिळेल. ब्रिटिश हिंदुस्थानांतील जे कारखाने फॅक्टरी ॲक्टाखालीं येतात, त्या सर्वांस विम्याची सक्ती केली जाईल. विम्याच्या अर्जांचे तारखेस कारखान्याची जी किंमत असेल, तीच विम्यास आधारभूत धरली जाईल. कारखान्याच्या मालकावर विमा उतरविण्याची जबाबदारी असली, तरी त्यानें विमा उतरविला नाहीं तर ज्याचे ताब्यांत कारखाना आहे, त्यानें तो उतरविला पाहिजे. विम्याचा वार्षिक हप्ता मालमत्तेच्या किंमतीचे ४% इतका ठरविण्यांत आला आहे. म्हणजे कारखान्याची किंमत १ लक्ष रुपये असली, तर विम्याचा वार्षिक हप्ता ४ हजार रुपये बसेल

व तो एका रकमेनें भराशा न लागतां पैसे देण्याचे बाबत सवलत मिळेल. ३१ मार्च १९४४ अखेरपर्यंतची योजना तूर्त आखलेली आहे. कारखान्यास पोचणाऱ्या युद्धजन्य नुकसानीपैकी पहिले हजार रुपये अथवा क्लेमच्या २०% रकम, जी रकम जास्त भरेल ती, कारखानदारानें सोसावयाची आहे. उरलेली ८०% नुकसानी सरकार भरून देईल. अर्जाचे व पॉलिसींचे नमुने लवकरच प्रसिद्ध होतील. सरकारच्या मार्फत ह्या विम्याचें काम करणाऱ्या विमा कंपन्यांची यादीहि गॅझेटमध्यें प्रसिद्ध होईल.

---

## शेतीसुधारणेसाठी मध्यवर्ती ठिकाणें

शेतीच्या कामांत सुधारणा करण्याचा प्रत्यक्ष अनुभव शेतकऱ्यांस मिळावा ह्या हेतूनें मुंबई सरकारानें निवडक ठिकाणीं चांगलें बीं-बियाणें वगैरे पुरवण्याची व्यवस्था चालविली आहे. शेती-सुधारणेचे प्रयोग शेतकऱ्यांच्या जमीनींत त्यांच्या संमतीनें केले जातात. शेतीखात्याच्या अधिकाऱ्यांच्या नजरेखालीं शेतकऱ्यांनीं आपल्या शेतांत सुधारणा करावयाच्या असतात आणि त्यांस ह्या कामीं लागणारा सल्ला व सहाय दिलें जातें. सुधारलेल्या पद्धतीचा सर्व फायदा ती अंमलांत आणणाऱ्या शेतकऱ्यांच्या पदरांत पडतो. सुधारलेलें बीं व उपकरणें शेतीखातें प्रत्येक ठिकाणास फुकट पुरवतें आणि आणि तीं शेजारपाजारच्या शेतकऱ्यांस स्वस्त मिळण्याची सोय केलेली असते. १९३८-३९ सालीं ५४ शेती-सुधारणा ठिकाणें चालू करण्यांत आलीं आणि त्यांचें कार्य यशस्वी ठरल्यानें १९४१-४२ मध्यें आणखी ४० ठिकाणें उघडण्यांत आलीं. चालू वर्षी त्यांच्या संख्येंत ह्याच प्रमाणांत वाढ करण्याचें ठरलें आहे. सरकारी फार्मवर सुधारणेचे प्रयोग करून ते शेतकऱ्यांच्या नजरेस आणण्यापेक्षा त्यांच्याच हातून नवीन पद्धतींचे प्रयत्न करवून घेणें केव्हांहि अधिक श्रेयस्कर आहे हें उघड आहे. ह्या सुधारणा-क्षेत्रांचा जेवढा विस्तार होईल तेवढा तो इष्टच आहे.

---

## बागाइतदार शेतकऱ्यांची सभा

निरा लेफ्ट बँक कॅनालखालील बागाइतदार शेतकऱ्यांची जाहीर सभा तारीख २६-४-४२ रोजीं बारामती येथें शाम टॉकीजमध्यें सकाळीं ८ ते १० व दोनप्रहरीं २ ते ४ शेतकऱ्यांच्या इरिगेशनबाबत उत्पन्न होणाऱ्या अडचणींचा विचार करणेकरितां श्रीक्षेत्र पंढरपूर येथील सुप्रसिद्ध व शेतकऱ्यांचे पुढारी बाळासाहेब मोरे वकील, बी. ए. एलएल. बी. यांचे अध्यक्षतेखालीं भरणार आहे. तरी सर्व बागाइत शेतकरी बंधूंनीं व बागाईतदाराशी सहानुभूति दाखविणारे सद्गृस्थांनीं सभेस हजर राहावें अशी विनंति आहे. विचारासाठी कांहीं ठराव पाठविणेचें असल्यास ते तारीख २०।४।४२ चे आंत ऑनररी सेक्रेटरी श्री. जी. जे. पवार, बारामती या पत्त्यावर पाठवावेत.

| जी. जे. पवार<br>सेक्रेटरी | एम. बी. शेळके<br>जॉईंट सेक्रेटरी | कृष्णराव खासेराव काकडे<br>स्वागताध्यक्ष |
|---|---|---|

---

### मोटारी

ग्रेट ब्रिटनमधील खाजगी गाड्यांच्या लायसेन्समध्यें युद्ध सुरू झाल्यापासून ७५% घट पडली आहे.


# दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल ... ... ... | रु. | २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... ... ... | रु. | १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड ... ... ... | रु. | १,१८,००,००० |

**मुख्य कचेरी :** ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

**मुंबईमधील शाखा :** बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

**इतर शाखा :** अहमदाबाद ( भद्र, मुख्य ऑफिस ), अहमदाबाद ( एलिस ब्रिज शाखा ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अंधेरी ( मुंबई शेजारीं ), वांद्रे ( मुंबई शेजारीं ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस ), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर, कराची, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत.

**लंडन एजन्ट्स :** वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

**डायरेक्टर्स :** सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई, सर जोसेफ के. नाइट, मि. ए. गेडिस, सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई., मि. दिनशा के. दाजी, श्री. रामनिवास रामनारायण.

**करंट डिपॉझिट अकाउंट्स :**

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षा कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करतें. सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमीचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

एजंट—टी. आर. लालवाणी.



# दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

हेड ऑफिस : पुणें शहर.

स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.

मुंबई शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | : रु. | १०,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | : रु. | ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | : रु. | ४,२५,८५० |
| वसूल झालेलें भांडवल | : रु. | २,१२,९२५ |
| एकूण खेळतें भांडवल | : रु. | ३३,००,००० |

**डायरेक्टर्स**

प्रो. धा. गो. काळे, अध्यक्ष

| | |
|---|---|
| श्री. धों. कृ. साठे | श्री. मा. रा. जोशी |
| श्री. न. म. पवार | श्री. श्री. गो. मराठे |
| श्री. श्यं. वि. रानडे | श्री. र. चिं. सोहोनी |
| श्री. वा. पुं. बर्वे | मि. फ. दो. पदमजी |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदीविक्री कसोशीनें करून दिली जाते.

बँकेच्या शेअरवर १९४१ अखेर पुऱ्या होणाऱ्या वर्षी द. सा. द. शेंकडा ४ टके करमाफ डिव्हिडंड दिलें गेलें. बँकेची शेअरविक्री चालू आहे.

म. वि. गोखले
मॅनेजर.

## खाद्योपयोगी पिकांची लागवड जास्त करा; कापसाची लागवड कमी करा.

( मुंबई प्रांताच्या शेतकी खात्याचें पत्रक )

१. महायुद्धामुळें व विशेषतः महायुद्धाची मजल अतिपूर्वेपर्यंत आल्यामुळें आंखूड व सफाईदार धाग्याच्या म्हणजे ⅞" व त्याहून कमी धाग्याच्या हिंदी कापसाला परदेशांतून असलेली व हिंदी गिरण्यांतील मागणी जवळ जवळ अजिबात तुटली आहे, या जातीच्या कपाशीची लवकर विक्री होणेंच अशक्य आहे किंवा विक्री झालीच तर अगदी बिनकिफायती भावानें होईल. अहमदनगर, पुणें व सोलापूर जिल्ह्यांत आंखूड धाग्याच्या कापसाच्या मुख्य जाती म्हणजे एन्. आर. व एन्. आर. मिक्श्चर ह्या होत. या जातींच्या कोणत्याहि कापसाची लागवड करूं नका.

२. ⅞" व त्याहून कमी धाग्याचा " नकोशा " असणाऱ्या कापसाच्या जातीसिवाय हल्ली मुंबई प्रांतांत दुसऱ्याहि कांहीं अशा जातींची लागवड होत आहे कीं ती लागवड हल्लीइतक्या प्रमाणांत चालू राहिल्यास त्या जातीचा कापूस किफायतशीरपणें विकणें यापुढें खात्रीनें मुष्किलीचें होऊन बसेल. अशा कापसाच्या हिंदुस्थानांत होणाऱ्या फाजील पैदाशीमुळें यापुढें त्यांचा तो कापूस अगदी कमी भावानें विकला जाण्याचा संभव आहे. अहमदनगर, पुणें व सोलापूर जिल्ह्यांत, या " अनिश्चित फायद्याच्या " कापसाची मुख्य जात बनिला ही होय. तुम्ही बनिलाची लागवड करीत असल्यास पुढील हंगामांत कापसाच्या लागवडीचें तुमचें क्षेत्र कमी करा."

३ आंखूड व सफाईदार धाग्याच्या कापसाच्या लागवडीपेक्षा खाद्योपयोगी पिकांची ( ज्वारी, बाजरी, गहूं, भात, इ. ) लागवड केल्यानें अधिक पैका मिळेल. अशा खाद्योपयोगी पिकांसाठी बाजारांत नेहमी मागणी चालू राहील व युद्धकालांत तर तशी मागणी जास्त असून ती वाढण्याचाहि संभव आहे.

४. अहमदनगर, पुणें व सोलापूर या जिल्ह्यांत, अनुक्रमें, सुमारें १,२९,०००, ९,५०० व ५२,५०० एकर जमिनींत सध्या " नकोशा " असणाऱ्या कापसाच्या जाती, म्हणजे, एन. आर. व एन. आर. मिक्श्चर यांची लागवड करण्यांत येते. कापसाच्या लागवडीचे मुख्य मुख्य तालुके, म्हणजे, अहमदनगर जिल्ह्यांत अहमदनगर, श्रीगोंदें, कर्जत, जामखेड, पाथर्डी, शेवगांव, नेवासे व राहुरीचे कांहीं भाग व कोपरगांव हे; पुणें जिल्ह्यांत, इंदापूर, दौंड, शिरूर व भिमथडी तालुक्याचे भाग; व सोलापूर जिल्ह्यांत सोलापूर, बार्शी, पंढरपूर व माळशिरस या तालुक्यांचा भाग, सांगोले, माढें व करमाळें हे होत. " अनिश्चित फायद्याच्या " कापसाच्या बनिला जातीची लागवड अहमदनगर, पुणें व सोलापूर या जिल्ह्यांतील वर सांगितलेल्या तालुक्यांत सुमारें ८००, ४,००० व ३,२०० एकर जमिनींत करण्यांत येते.

५ आखूड धाग्याच्या एन. आर. व एन. आर. मिक्श्चरसारख्या कापसाच्या लागवडीपेक्षा खाद्योपयोगी पिकांची लागवड केल्यानें शेतकऱ्यांस माल विकून अधिक पैका कसा मिळतो, हें शेतांत तयार होणाऱ्या मालाच्या हल्लींच्या बाजारभावांच्या आधारावरून तयार केलेल्या पुढील पत्रकावरून शेतकऱ्यांस दिसून येईल.

### पाटाच्या पाण्यावर पिकें केलेलीं असतील तेव्हां

| पिकाचें नांव | प्रत्येक एकरामागें सरासरी किती पौंड पीक मिळतें: धान्य | वैरण | हल्लीच्या बाजारभावानें मालाची किंमत: धान्य | वैरण |
|---|---|---|---|---|
| | | | रु. | रु. |
| (१) एन. आर. किंवा एन. आर. मिक्श्चर | ७२० (कपास) | ... | २६-०-० | |
| (२) ज्वारी | १,२०० | २,५०० | ३७ ०-०+१५-०-० (५२-०-०) | |
| (३) गहूं | १,००० | ... | ६२-०-० | |
| (४) बाजरी | १,००० | १,५०० | ३७-८-०+४-८-० ( ४२-०-० ) | |

### कोरडवाहू जमिनींत पिकें केलेलीं असतील तेव्हां

| पिकाचें नांव | धान्य | वैरण | किंमत |
|---|---|---|---|
| (१) एन. आर. किंवा एन.आर. मिक्श्चर | २४० (कपास) | ... | १२-०-० |
| (२) ज्वारी | ५०० | २,००० | १५-०-०+१२ ०-० ( २७-०-० ) |
| (३) गहूं | ४५० | ... | २८-०-० |
| (४) बाजरी | ४०० | ८०० | १५-०-०+२-०-० ( १७-०-० ) |

---

### बॉंबे इलेक्ट्रिक सप्लाय ॲंड ट्रॅम्वे कं. लि.

१९४१ सालीं मुंबई शहरांत रात्रीच्या दिव्यांवरील निर्बंध कडकपणें अंमलांत आणण्यांत आल्यामुळें व जातीय दंगेहि नेहेमीपेक्षा दीर्घ काळ टिकल्यामुळें, वरील कंपनीस बस, ट्रॅम्वे व वीज ह्यांपासून मिळावयाच्या उत्पन्नावर प्रतिकूल परिणाम झाला. १५ ऑगस्ट १९४१ पासून पेट्रोल रेशनिंगला प्रारंभ झाला, तेव्हांपासून बस व ट्रॅम ह्यांचें उत्पन्न वाढलें आहे. १९४१ सालीं कंपनीनें ९२½ लक्ष रुपयांची वीज विकली. १९४० चे आकड्यांपेक्षा हा आकडा ८½ लाखांनीं मोठा आहे. दिवाळीची रोशणाई १९४१ सालीहि बंदच होती. भांडवली स्वरूपाचा सर्च शक्य तेवढा कमी करण्याचें कंपनीचें धोरण आहे. कंपनीला १९४१ सालीं, ७७ लक्ष, ३५ हजार रुपये निवळ नफा झाला. ऑर्डिनरी भागास १२% डिव्हिडंड मिळेल.

---

### ग्रामसेवक विद्यालय वर्धा

हिंदुस्थान देश हा मुख्यतः ग्रामीण स्वरूपाचा आहे. शाळा-कॉलेजांत शिकून बाहेर पडणारे विद्यार्थी बेकार होत आहेत. सध्याच्या युद्धपरिस्थितींत प्रत्येक ठिकाणीं आवश्यक त्या वस्तूंचें उत्पादन होणें, वहातुकीच्या साधनांचे अभावीं, आवश्यक झालें आहे. मोठ्या भांडवलाचे अभावीं प्रत्येक कुटुंबास लहानसा उद्योगधंदा चालू करणें आतां जरूर पडेल. तरुण पुरुष व स्त्रिया ह्यांस ग्रामकार्यांत तरबेज करून त्यांस खेडेगांवी धंदा शिकविण्याचें दृष्टीनें अखिल भारतीय ग्रामोद्योग संघ वर्धा येथें वर्ग चालवितो. ह्या वर्गास प्रारंभ १ जुलै रोजीं होईल. प्रवेशेच्छु, २२ वर्षांवरील तरुणांनीं ३१ मेचे आंत अर्ज करावेत.

---

**महायुद्ध दाराशीं आलें**
**परदेशी औषधें**
**दुर्मिळ व महाग झालीं**
पण
**भिण्याचें कारण नाहीं !!!**
— कारण —
**आयुर्वेद रसशाळा पुणें लि०**
या देशी औषधाच्या प्रसिद्ध कारखान्यानें
तयार केलेलीं
● रक्तवर्धक, ● उपनाह,
● बालजीवन, ● कॅल्सीप्राल
इत्यादि पेटंट, स्टँडर्ड व लोकप्रिय औषधें खात्री पटल्यामुळें
★ डॉक्टर्सहि वापरूं लागले आहेत. ★
दरसाल बिनचूक नफा वाटणाऱ्या ह्या कंपनीचे
शेअर्स व औषधें मागवा.
**आयुर्वेद रसशाळा पुणें लि०**
मुख्य दुकान गणपति चौक, लक्ष्मीरोड, पुणें २.

**DECCAN BOOK STALL**
Booksellers, Publishers & Subscription Agents
**Fergusson College Road, Poona No. 4**
(1) We stock and supply Educational books, General books & Library books.
(2) We supply Government of Bombay and Government of India publications.
(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.
(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.

**अर्थशास्त्र**
लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. धृ. गो. कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें १००; किंमत १ रुपये
या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

**कॉमनवेल्थचा वैभवशाली विस्तार**
★ २७ हजारांचेवर पॉलिसी—होल्डर्स
★ एकूण चालू विमे २ कोटीचेवर
★ दोन हजारांहून अधिक कार्यकर्ते निरनिराळ्या प्रांतांत कॉमनवेल्थसाठी उत्साहानें काम करीत आहेत.



हेड ऑफिस बिल्डिंग

**कॉमनवेल्थ**
**ॲशुअरन्स कंपनी लि.**

चेअरमन
* खा. ब. एम्. एन्. मेथा,
C. I. E., M. B. E.

ॲक्टिंग ऑफिस सुपरिन्टेंडेंट * एम्. एम्. भागवत, B. A.

' कॉमनवेल्थ ' ची पॉलिसी घेऊन जीवन निश्चिंत व सुखी करा.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद् वामन काळे, बी. ए., यांनीं ' दुर्गाविलास, ' भांबुर्डा, घ. नं. ९२७।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, 'अर्थ,'
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ३
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

' अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूली धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ८ पुणें, बुधवार, तारीख २२ एप्रिल, १९४२ अंक १६

न्यायमूर्ति रानड्यांचे
तीन अप्रसिद्ध लेख प्रसिद्ध झाले
PLEA FOR PROTECTIONIST POLICY
INDIAN SUGAR INDUSTRY
न्यायमूर्ति रानडे यांनीं १८९९ सालीं ' टाइम्स ऑफ इंडियांत ' स्वदेशी साखरेच्या धंद्यासंबंधीं लिहिलेले महत्वाचे तीन लेख, प्रो. वा. गो. काळे ह्यांच्या प्रस्तावनेसह प्रसिद्ध करण्यांत आले आहेत.
व्यवस्थापक, ' अर्थ ', पुणें ४
ह्या पत्त्यावर आठ आण्यांचीं तिकिटें पाठवून लेखांची प्रत मागवावी.

श्रीराम सिल्क मिल्स लि., बंगलोर
[ कंपनीनें १९४० अखेर ६ टक्के डिव्हिडंड वांटला आहे. ]
युद्धसाहित्यपुरवठा-खात्याची पॅरेशूटकरितां लागणाऱ्या
रेशमी कपड्याची ऑर्डर पुरी करण्यासाठी लागणाऱ्या भांडवलाकरितां तूर्त एकूण रु. १ लक्षाच्या रकमेपर्यंत
ठेवी घेणें आहेत
व्याजाचा दर ४॥ ते ६ टक्के. ठेव किमान रु. ५०० ची असावी. ठेवीवरील व्याज दर सहा महिन्यांनीं दिलें जातें.
श्रीराम सिल्क मिल्स लि., श्रीरामबाग, बसवनगुडी, बंगलोर.
नारायण गोविंद नाईक, ( माजी अध्यक्ष, म्हैसूर चेंबर ऑफ कॉमर्स ) मॅनेजिंग डायरेक्टर
आमच्या कारखान्यांतील माल मुंबईस बॉम्बे स्वदेशी को-ऑपरेटिव्ह स्टोअर्समध्यें व पुण्यास लक्ष्मी रोडवरील रे म्यूझिअमच्या व्यापार-संवर्धन-गृहांत पहा.

'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

वक्तशीर आणि मनपसंत काम करून देणारे
मोहन वॉच कंपनी
रेग्युलेशन मोफत
कॉमनवेल्थ बिल्डिंगसमोर लक्ष्मी रोड, पुणें २.

महायुद्धाची जाणीव! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.
बंबाचे माडीवर
महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी
बुधवार चौक, पुणें

# विविध माहिती

### कामाच्या बदललेल्या वेळा

मुंबई प्रांताच्या सरकारी कचेऱ्यांची कामाची वेळ मुंबई शहरांत व मुंबई उपनगर जिल्ह्यांत दररोज १० ते ५ व शनिवारीं १० ते १–३० अशी ठरविण्यांत आली आहे. कचेऱ्यांच्या मुख्यांनीं नोकरांस अर्धा तासापर्यंत मधली सुटी देण्यास हरकत नाहीं. विभागांच्या कमिशनरांनीं आपल्या हद्दींत ह्याचप्रमाणें कामाचे तास जरूर तर करावेत. कचेऱ्या हल्लींपेक्षा सकाळीं लवकर सुरू होऊन लवकर बंद होणार, असा ह्या बदलाचा अर्थ आहे.

### शत्रुपक्षीयांचे ब्रॉडकास्ट

शत्रुपक्षीयांचे रेडिओ ब्रॉडकास्ट ऐकण्याची लोकांना बंदी करण्याचा सरकारचा विचार नव्हता व नाहीं.

### हिंदी कपाशीचा हिंदी गिरण्यांतील उठाव

| | ब्रिटिश हिंदुस्थान | हिंदी संस्थानें |
|---|---|---|
| सप्टेंबर ते फेब्रुवारी | टन | टन |
| १९४०–४१ | १४,६२,३०२ | ३,०५,५४६ |
| १९४१–४२ | १६,९८,१५० | ३,५४,३६९ |

### बीर दारूचें व तंबाकूचें इंग्लंडमध्यें सेवन

ग्रेट ब्रिटनमध्यें बीर दारूचा वार्षिक खप ४४० कोटि रुपयांचा होतो आणि ४५० कोटि रुपये तंबाकू व सिगारेट्स ह्यांवर खर्च होतात.

### मुधोळ स्टेट सं. को. बँक लि.

वरील बँकेचा उद्घाटन समारंभ मुधोळ जुना राजवाडा या ठिकाणीं १८ एप्रिल रोजीं झाला. श्री. ए. व्ही. देसाई हे डायरेक्टर बोर्डाचे अध्यक्ष असून श्री. आर. एन. तांबे हे मॅनेजिंग डायरेक्टर आहेत.

### गोकाक मिल्स लि.

वरील कंपनीनें १९४१ मध्यें ६९½ लक्ष रुपयांची विक्री केली. तिच्या कापडाचे उत्पादनास ३७½ लक्ष रुपयांची कपास लागली. निवळ नफा १२½ लक्ष रुपये उरला. डिव्हिडंडचा दर ७% चा १२% झाला.

### नॅशनल सिटी बँक ऑफ न्यूयॉर्क

वरील अमेरिकन बँक आपला हिंदुस्थानांतील व्यवहार गुंडाळून टाकीत आहे. तिनें आपली कलकत्त्याची शाखा मागेंच बंद केली. मुंबई शाखेनेंहि आपल्या खातेदारांस ठेवी घेऊन जाण्याविषयीं कळविलें आहे. अमेरिकन सैनिकांच्या सोईसाठी बँकेची कचेरी चालू राहील.

### अदृश्य निर्गत

अमेरिकन सैनिक हिंदुस्थानांत मोठ्या प्रमाणावर दाखल होत आहेत. त्यांना पगार मोठा असतो व त्यांचा खर्चहि पुष्कळ असतो. ह्या सैनिकांच्या खर्चासाठी अमेरिकेंतून पैसे येत रहातील. म्हणजे एका प्रकारें हिंदुस्थानाची अदृश्य निर्गत वाढणार आहे.

### आयुर्विम्याचे कामांत वाढ

ग्रेट ब्रिटनमधील आयुर्विम्याचे कामांत १९४० सालीं २०% वाढ झाली.

### मॉडर्न टॅनर्स (इंडिया) लि.

कातडी मालाचें उत्पादन करण्यासाठी श्री. ई. बी. राजदरेकर ह्यांनीं खासगी भांडवलाची वरील कंपनी मुंबई येथें स्थापन केली आहे.

### वेस्टर्न इंडिया मॅच कं. लि.

वरील कंपनीनें १९४१ सालीं १९४० पेक्षा ४३% अधिक म्हणजे ३½ कोटि रुपयांच्या आगपेट्या विकल्या. उत्पादन खर्च ९०½ लक्ष रुपये आला व कंपनीनें १ कोटि, ८५ लक्ष रुपये एक्साइज पट्टी भरली. वाढत्या उत्पादनाबरोबर उत्पादन खर्चाचें प्रमाण उतरत आहे. भागीदारांना १२% डिव्हिडंड मिळेल. निवळ नफ्यापैकी ( ४२½ लक्ष रु. ) २६½ लक्ष रुपये इनकम् टॅक्स भरावा लागेल.

### सेंट्रल फ्रुटर्स, लि. मुंबई

फळें विकण्याकरितां वरील खासगी कंपनी नोंदविण्यांत आली आहे, तिचे डायरेक्टर श्री. बी. व्ही. जाधव हे आहेत.

### श्रीशिवाजी शुगर मिल्स लि., पुणें

२० लक्ष रुपये भांडवलाची ही कंपनी मेसर्स जगताप, उपलप आणि कं. लि. ( मॅनेजिंग एजंटस ) ह्यांनीं रजिस्टर केली आहे.

### ग्रामोफोनच्या तबकड्या

ग्रामोफोनच्या तबकड्यांचें उत्पादन अमेरिकेंत ७०% नीं कमी करण्यांत येणार आहे.

### जर्मनीचें प्रचंड नुकसान

जर्मनी व रशिया ह्यांचेमधील युद्धांतील पहिल्या नऊ महिन्यांत जर्मनीचें नुकसान खालील प्रमाणें झालें असें रशियन पत्र 'रेड स्टार' हें म्हणतें :—

वैमानिक : १८,०००

विमानें:—जून ते सप्टेंबर, १९४१ : ७,२००

ऑक्टोबर ते डिसेंबर, १९४१ : ५,५०० ते ५,७००

### पेट्रोल रेशनिंग

पेट्रोल रेशनिंगला प्रारंभ झाला, त्यावेळीं मोटारींना दरमहा जेवढें पेट्रोल मिळत होतें, तेवढ्या पेट्रोलमध्यें त्यांना आतां तीन महिने काढावे लागतील.

### सरकारचा उत्पन्न-खर्च

हिंदुस्थान सरकारास फेब्रुवारी, १९४२ मध्यें जेवढें उत्पन्न झालें त्यापेक्षां खर्च ३ कोटि रुपये अधिक झाला. १९४१–४२ च्या पहिल्या अकरा महिन्यांत सरकारनें उत्पन्नापेक्षां ५०½ कोटि रुपये जादा खर्च केला आहे. १९४०–४१ च्या तत्सम अकरा महिन्यांतील हा आकडा ४३ कोटि रुपये होता.

### तापी व्हॅली रेल्वे कं. लि. चे लिक्विडेटर

वरील कंपनी गुंडाळण्याचें काम तिचे मॅनेजिंग एजंटस किलिक निक्सन आणि कंपनी ह्यांजकडे सोपविण्याचें ठरलें आहे. लिक्विडेटरला त्याचे कामाबद्दल १५ हजार रुपये देण्यांत येतील.

### कारखान्यांचा युद्धविषयक विमा

वरील विम्याचा हप्ता मालमत्तेच्या ४% ठरविण्यांत आला आहे. हा हप्ता वार्षिक नसून, ३१ मार्च १९४४ पर्यंतच्या संरक्षणाकरितां ठरविलेली ती रकम आहे. म्हणजे हप्त्याचा दर २% पडेल असें म्हणण्यास हरकत नाहीं.

### हिंदुस्थान–अफगाणिस्थान रस्ता

सध्याचा पेशावर ते काबूल हा १९५ मैल लांबीचा रस्ता ८ हजार फूट उंचावरील लताबाद खिंडींतून जातो. टांगीचारमधून त्या रस्त्याचा फाटा काढून त्याची लांबी ३० मैलांनीं कमी करण्याचा प्रयत्न चालू आहे.

अनुक्रमणिका

| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | १२४ | मुख्य मुद्दे—मुंबईच्या गव्हर्नरांचा आश्वासनाचा संदेश—शत्रूविरुद्ध चढाई | |
| २ इंग्लंडचें अजस्र अंदाजपत्रक ... ... | १२५ | ६ हिंदी कामगार संघ ... | १२८ |
| ३ बाजार आणि देऊळ | १२५ | ७ पोस्टाच्या तिकिटांची काटकसर ... | १२९ |
| ४ अलीकडील आर्थिक घडामोडी ... ... | १२६ | ८ कोलारच्या सोन्याच्या खाणी ... ... | १२९ |
| ५ स्फुट विचार ... | १२७ | | |
| हिंदी साखरेच्या धंद्याचें नियंत्रण—मतभेदाचे | | | |

# अर्थ

बुधवार, एप्रिल ता. २२, १९४२

## इंग्लंडचें अजस्र अंदाजपत्रक

ब्रिटिश फडनवीस, सर किंग्स्ले वुड, ह्यांनीं १९४२–४३ सालाबाबतचें आपलें अंदाजपत्रक कॉमन्स सभेपुढें मांडलें आहे, त्यांतले खर्चाचे आकडे अवाढव्य स्वरूपाचे आहेत. प्रस्तुत युद्धांत इंग्लंडला किती विस्तृत क्षेत्रांत आणि केवढ्या अपूर्व प्रमाणावर युद्धसामुग्री पुरवावी लागत आहे ह्याची कल्पना ह्या अंदाजपत्रकावरून येते. तसेंच ब्रिटिश जनतेची युद्धाप्रीत्यर्थ स्वार्थत्याग करण्याची तयारी किती दूर पल्ल्यावर गेली आहे हें सर किंगस्ले वुड ह्यांच्या उत्पन्न–खर्चाच्या योजनांवरून स्पष्ट होत आहे. १९४१–४२ सालच्या खर्चाचा आकडा ४७७ कोटि पौंड आहे आणि १९४२–४३ सालीं ५२८ कोटि पौंड खर्च होतील असा अंदाज करण्यांत आला आहे. रुपयांत व्यक्त केल्या असतां त्या रकमा अनुक्रमें ६,२६० आणि ७,०४० कोटि रुपये अशा होतात. ह्यापैकीं अनुक्रमें २,७६० व ३,२०० कोटि रुपये करांच्या मार्गानें ब्रिटिश सरकारास मिळणाऱ्या उत्पन्नाचे आहेत आणि राहिलेल्या तुटीची व्यवस्था अन्य रीतीनें म्हणजे मुख्यत्वेंकरून लोकांकडून काढलेल्या कर्जाच्या सहायानें झाली आहे व होणार आहे. १९४२–४३ मध्यें खर्च व्हावयाच्या ५२८ कोटि पौंडांपैकी कांहीं रकमा इंग्लंडच्या बाहेर उभ्या केल्या जाणार असल्यानें खुद्द त्या देशांत तयार करावयाची रक्कम ४५० कोटि पौंड इतकी रहाते. तीपैकीं २४० कोटि पौंड म्हणजे ५३ टक्के इतकी रकम करांच्या उत्पन्नामधून येईल आणि तीमध्यें १५ कोटि पौंड नवीन बसवण्यांत येणाऱ्या करांच्या द्वारें मिळतील.

नवीन करांचें उत्पन्न १५ कोटि पौंड होईल, त्यांतलें ९ कोटि तंबाकूवरील करापासून होईल. आंत दहा सिगारेट्स असलेल्या पेटीची किंमत आज सुमारें साडेसात आणे आहे ती ह्या जादा कराच्या योगानें दहा आणे होईल. म्हणजे प्रत्येक सिगारेटला एक आणा किंमत पडेल. फौजेंतील शिपायांस ह्या बाबतींत सवलती देण्यांत येतील, पण सामान्य ब्रिटिश नागरिकांस धूम्रपान विशेष जड जाईल. चैनीच्या वस्तू महाग व दुर्मिळ करणें हा ब्रिटिश फडनवीसांच्या करयोजनेचा मूलभूत हेतु आहे हें येथें लक्षांत ठेवलें पाहिजे. ह्या वस्तूंच्या विक्रीच्या किंमतीच्या एक तृतीयांश सरकारी कर म्हणून घेण्यांत येत असे; आतां हें प्रमाण दोन तृतीयांश करण्यांत आलें आहे. व्हिस्कीवरील करांत जबर वाढ झाली आहे. प्राप्तीवरील करांत बदल केलेला नाहीं. मोठ्या उत्पन्नांवर ९७·९८ टक्के इतका हा कर आकारण्यांत येतच आहे आणि त्यांत वाढावा होण्यास वाव नाहीं असें दिसतें. ठराविक प्रतीचें व नियंत्रित किंमतीचें कापड आणि पादत्राणें ह्यांवरील खरेदीचा कर काढून घेण्यांत आला आहे. साम्राज्यांतर्गत देशांतून येणारी साखर व तंबाखू ह्यांवरील आयात जकातींतली सवलत चालू ठेवण्यांत आली आहे.

पदार्थांच्या किंमती योग्य मर्यादेंत स्थिर राखण्याचें आणि महागाईमुळें आवश्यक होणारी मजूरींतील वाढ टाळण्याचें सरकारचें धोरण यशस्वी ठरलें असल्याविषयीं सर किंग्स्ले वुड ह्यांनीं समाधान व्यक्त केलें आहे. पदार्थांच्या पुरवठ्याचे मानानें त्यांस अधिक मागणी येऊन महागाई होण्याची आपत्ति इंग्लंडमध्यें ओढवणार नाहीं अशी तरतूद आतांपर्यंत कार्यक्षम रीतीनें करण्यांत आली असून त्या कामीं सरकार व जनता ह्यांचें पूर्ण सहकार्य होत आहे. जनतेनें विकत घेऊन उपयोगांत आणावयाच्या जिनसांच्या पुरवठ्याचें नियंत्रण करण्याचें ब्रिटिश सरकारचें धोरण आहे आणि फडनवीशी खातें ह्यासंबंधांत आपल्या कर्तव्याचा भाग उचलित आहे असें सर किंगस्ले वुड म्हणाले. तंबाखू, सिगारेट्स, दारू, करमणुकीचीं साधनें वगैरेवर कर आपण वाढवले आहेत ह्याचें कारण वरील धोरणच होय असें त्यांनीं सांगितलें. ग्रेट ब्रिटनमध्यें लोक गेल्या वर्षी सुमारें ४४० कोटि रुपये किंमतीची बीर दारू प्याले आणि त्यापेक्षा थोडी अधिक रकम तंबाखू व सिगारेट्स ह्यांवर त्यांनीं खर्चली अशीहि माहिती त्यांनीं दिली. सात पेन्सांच्या वरील सिनेमाच्या तिकिटांचे सर्व दर दुप्पट करण्यांत आले आहेत. ग्रेट ब्रिटनमध्यें १४० कोटि वेळां सिनेमागृहांत प्रेक्षकांची उपस्थिति प्रति वर्षी होते ह्यावरून चित्रपट हें तेथील लोकांचें केवढें मोठें करमणुकीचें साधन आहे ह्याची कल्पना येते. कॉमन्स सभेंत ब्रिटिश फडनवीसांच्या अंदाजपत्रकाचें म्हणजे त्यांतील खर्चाच्या रकमा, करांच्या योजना, आणि जनतेनें वापरावयाच्या जिनसांच्या नियंत्रणाचें धोरण इत्यादि बाबींचें सर्वसाधारण रीतीनें स्वागत करण्यांत आलें ह्यावरून युद्ध यशस्वी करण्याचे कामीं अंमलांत आणल्या जाणाऱ्या सर्व योजनांस ब्रिटिश लोकांचें कसें पूर्ण पाठबळ आहे हें स्पष्ट दिसून येतें.

---

## बाजार आणि देऊळ

एका गृहस्थानें बाजारांत सामान विकत घेतलें आणि दुकानापाशी आपली ठेवलेली सायकल विसरून तो तसाच बसमधून घरीं गेला. तेथें बायकोनें त्यास सायकलची आठवण केल्यामुळें तो तडक दुकानाकडे परत गेला. तेव्हां आपल्या सायकलीस कोणीं हात लावला नाहीं हें पाहून त्यास आनंद झाला. बाजारांतील लोकांच्या नीतिमत्तेविषयींच्या कृतज्ञतेचें द्योतक म्हणून गृहस्थानें सायकलवरून वाटेंतील एका देवळांत जाऊन तेथील धर्मादायाच्या पेटींत कांहीं पैसे टाकले. नंतर सत्कृत्य केल्याच्या आनंदांत बाहेर येऊन पहातो. तों देवळाच्या दाराशीं उभी केलेली आपली सायकल कोणीं तरी लांबवली असल्याचें त्यास आढळून आलें !

## अलीकडील आर्थिक घडामोडी

[ प्रो. काळे ह्यांचें मुंबईच्या रेडिओवरील भाषण, ऑ. इं. रेडिओ अधिकाऱ्यांचे रुपेनें उद्धृत केलें आहे. ]

चालू युद्धाकडे आर्थिक दृष्टीनें पाहिलें असतां त्याप्रीत्यर्थ राष्ट्रास करावा लागत असलेला अवाढव्य खर्च डोळ्यांत भरल्यावांचून राहत नाहीं. आकाश, भूमि व पाणी ह्यांस व्यापून टाकणाऱ्या त्यामधील लढायांचें क्षेत्र जगांतील सर्व खंडांवर पसरलें आहे, लक्षावधि सैनिक विविध शस्त्रास्त्रांच्या सहाय्यानें प्रतिस्पर्ध्यांशीं निकरानें झुंजत आहेत आणि आधुनिक भौतिक शास्त्रांनीं शिकवलेल्या अजब युक्त्यांचा भरपूर उपयोग लढाऊ साधनांच्या बनावटींत व पुरवठ्यांत केला जात आहे. चाललेल्या लढायांत हजारों विमानें व चिलखती गाड्या ह्यांचा चक्काचूर होत आहे आणि शेकडों आरमारी व व्यापारी जहाजें समुद्रास्तृप्यंतु होत आहेत. एक साधें विमान म्हटलें तर त्यास कमींत कमी अर्धा लक्ष रुपये खर्च येतो आणि जहाजांचा खर्च प्रत्येकीं लक्ष व कोटि रुपयांत मोजावा लागतो. ह्या परिस्थितींत ग्रेट ब्रिटनचा युद्धकाळांतला खर्च दररोज सुमारें अठरा कोटि रुपये होत आहे ह्यांत आश्चर्य कसलें ? गेल्या महिन्याच्या अखेर पुऱ्या झालेल्या बारा महिन्यांतला ग्रेटब्रिटनचा एकूण खर्च ४७७ कोटि पौंड म्हणजे सुमारें ६,३५० कोटि रुपये इतका होऊन तूट २७० कोटि पौंडांची म्हणजे सुमारें ३,६०० कोटि रुपये पडली. जपान आणि जर्मनी ह्यांनीं दुसऱ्या राष्ट्रांच्या स्वातंत्र्याचा अपहार करण्याच्या हेतूनें बुद्धिपुरःसर युद्धसामुग्रीच्या पुरवठ्याची तयारी वर्षानुवर्ष चालवली होती. त्यांच्या बरोबरीनें शस्त्रास्त्रें बनवण्याची सिद्धता करण्यास आणि राष्ट्रीय स्वातंत्र्याचें रक्षण कार्यक्षम रीतीनें होईल अशी तजवीज करण्यास इंग्लंड व अमेरिका ह्यांस सहाजिकच कालावधि लागला आहे. इंग्लंड व अमेरिका ह्या संपन्न कर्तबगार राष्ट्रांनीं लढाऊ सामुग्रीच्या पुरवठ्याचे बाबतींत शत्रूवर सरशी होईल इतकी मजल आतां मारली आहे आणि त्यांचें शस्त्रास्त्रांचें उत्पादन झपाट्यानें आणखी वाढत आहे. त्यांच्या राष्ट्रीय सरकारांच्या खर्चाची कमान अर्थातच चढती आहे. हा पैसा शक्य तों करांच्या मार्गानें आणि त्याचा मोठासा भाग जनतेच्या बचतीमधून कर्जाच्या स्वरूपांत उभा केला जात आहे.

### सरकारचा वाढता खर्च

युद्ध आतां हिंदुस्थानाच्या सीमेस येऊन भिडलें असल्याकारणानें येथील सरकारासहि लढाऊ सामुग्रीचा वाढता पुरवठा तातडीनें तयार करण्यासाठी आवश्यक असलेल्या खर्चाची तरतूद केलीच पाहिजे. प्रस्तुत युद्ध चालू होण्यापूर्वीच हिंदी फौजेचें आधुनिक पद्धतीवर यंत्रीकरण होण्याची योजना हातीं घेण्यांत आली होती आणि तिचा भांडवली खर्च स्वतः सोसण्याचें साम्राज्य सरकारानें पत्करलें होतें. पण युद्धक्षेत्राच्या विस्ताराबरोबर सैनिकांची संख्या झपाट्यानें वाढली आणि तिला लागणाऱ्या सामुग्रीचें प्रमाणहि वाढलें. सरंजाम, विमानदल, आरमार, व चिलखती गाड्या ह्यांचा पुरवठा नव्यानेंच करावा लागला आहे. ह्या संबंधांतल्याहि खर्चाचा भाग साम्राज्य सरकारानें उचलला असून विशिष्ट प्रमाणाच्या मर्यादेंत हिंदुस्थानास युद्धखर्च करावयाचा आहे. तथापि, हाहि खर्च आतांपर्यंतच्या लष्करी खर्चाच्या मानानें किती तरी मोठा आहे हें सांगावयास नको. मागील महायुद्धांतल्या हिंदी सैनिकांच्या संख्येच्या दुप्पट सध्याची हिंदुस्थानची फौज आहे. आज दहा लक्षांच्या वर हिंदी सैन्य जय्यत सशस्त्र आहे, लष्कराचें आधुनीकरण जोरानें चालू आहे आणि लष्करी शिक्षण देणाऱ्या संस्थांचा सारखा विस्तार चालला आहे. दारूगोळा आणि इतर लढाऊ सामुग्रीच्या उत्पादनाची व्यवस्था मोठ्या प्रमाणावर झाली आहे. ह्या सर्व गोष्टींचा परिणाम हिंदुस्थान सरकारचा खर्च वाढत जाण्यांत होणें हें अपेक्षितच आहे.

### युद्धखर्च

हिंदुस्थान सरकारचे फडणवीस, सर जेरेमी रेस्मन, ह्यांनीं १९४२-४३ सालांचें आपलें अंदाजपत्रक मध्यवर्ती कायदेमंडळास सादर केलें त्यांत वाढत्या युद्धखर्चाचें प्रतिबिंब ठळक रीतीनें उमटलेलें पहावयास सापडतें. ब्रिटिश हिंदुस्थानाच्या इतिहासांत सरकारी वार्षिक खर्चाचे आकडे ह्या अंदाजपत्रकाप्रमाणें फुगलेले यंदा प्रथमच दृष्टीस पडले आहेत आणि हिंदुस्थान सरकारच्या चालू खर्चानें आज तरी उच्चांक गाठला आहे. १९४१-४२ सालाच्या दुरुस्त अंदाजपत्रकाप्रमाणें उत्पन्न सुमारें १६३ कोटि रुपयांनीं मूळ अंदाजाच्या मानानें वाढलें तरी खर्च २० कोटींनीं अधिक झाल्यानें अखेरची तूट १४ कोटि रुपयांची १७ कोटि रुपये झाली. संरक्षण खात्याप्रीत्यर्थ ८४ कोटींच्या जागीं १०३ कोटि रुपये खर्ची पडले, हेंहि तूट वाढण्याचें मुख्य कारण होय. स्थूलमानानें सांगावयाचें म्हणजे १९४१-४२ मध्यें १२९ कोटि रुपये उत्पन्न, १४६ कोटि खर्च व १७ कोटि रुपये तूट असा हिशेब झाला. चालू सालीं म्हणजे १९४२-४३ मध्यें उत्पन्न १४० कोटि व खर्च १८७ कोटि होईल असा अंदाज असल्यानें तूट ४७ कोटि रुपयांची आली असती, परंतु जादा करांचें उत्पन्न १२ कोटि रुपये होईल ह्या अदमासानें अखेरची तूट ३५ कोटि रुपये राहील असें हिंदुस्थान सरकारच्या फडनवीसांचें म्हणणें आहे. संरक्षण खात्याचा एकूण खर्च १९४१-४२ सालीं सुमारें १०३ कोटि रुपये झाला आणि त्याचा आकडा १९४२-४३ मध्यें १३३ कोटि करण्यांत आला असल्यानेंच ही तूट एवढी मोठी झाली आहे.

### बिन लष्करी खर्च

चालू सालाच्या १८७ कोटि रुपये खर्चापैकी लष्करी बाबींवरील खर्चाची रकम १३३ कोटि आहे व बिनलष्करी खर्चाची ५४ कोटि आहे. १९४१-४२ सालाच्या मानानें बिनलष्करी खर्चाचा आकडा साडे नऊ कोटींनीं अधिक धरण्यांत आला आहे. वाढत्या बिनलष्करी खर्चाच्या बाबींचाहि संबंध युद्धाशी निकटवर्ति असा आहे. उदाहरणार्थ, युद्धसामान पुरवठा खात्याचें काम झपाट्यानें वाढत चाललें आहे. चालू वर्षी ह्या खात्याचे मार्फत ७० कोटि वार लांबीचें कापड खरेदी केलें जाईल. युद्धाचे आरंभापासून गेल्या डिसेंबर अखेरपर्यंत त्या खात्यानें २३० कोटि रुपये किंमतीच्या मालाच्या ऑर्डरी दिल्या. उत्पादनाच्या नवीन योजना अंमलांत येत आहेत आणि नवीन कारखाने उभारले जात आहेत. हवाई हल्ल्यापासून लोकांच्या रक्षणाची व्यवस्था होत आहे तिच्यावर गेल्या वर्षी मध्यवर्ती सरकारचे एक कोटि रुपये खर्ची पडले. १९४२-४३ सालांत ह्या कामीं ४ कोटि रुपये खर्चले जातील असा अंदाज आहे. दारूगोळा वगैरे तयार करण्याच्या कारखान्यांत उपयोगी पडण्यासाठी कामगार शिकवले जात आहेत. त्यांची संख्या चालू साल अखेर ४८ हजारापर्यंत जाईल आणि ह्या बाबींवर १ कोटि ३२ लक्ष रुपये खर्च होतील. ( अपूर्ण )

## स्फुट-विचार

### हिंदी साखरेच्या धंद्याचें नियंत्रण

सध्याच्या युद्धपरिस्थितींत इतर मालाप्रमाणें स्वदेशी साखरेच्या वहातुकीची व किंमतींची समाधानकारक व्यवस्था लावण्याच्या प्रश्नाची चर्चा आज बरेच दिवस चाललेली आहे. हिंदुस्थान सरकारचे व्यापारमंत्री व साखर कारखानदार ह्यांचेमध्यें दिल्ली येथें अलीकडे वाटाघाटी झाल्या आणि त्यांचा परिणाम म्हणून विशिष्ट सरकारी योजना अंमलांत आणण्याचें ठरलें. तिच्या विरुद्ध कारखानदारांनीं कांहीं तक्रारी केल्या ह्याविषयींची माहिती आम्हीं "अर्था" मध्यें मागें दिलीच आहे. ह्या संबंधांतला ताजा वृत्तांत प्रसिद्ध झाला आहे तो असा आहे कीं, साखरेच्या धंद्याचें नियंत्रण करण्याच्या कामावर हिंदुस्थान सरकारनें श्री. एन. सी. मेथा, आय. सी. एस. यांची नेमणूक केली आहे आणि साखरेच्या किंमती कारखान्यांत निश्चित करणें, विक्रीसाठी अधिकृत केलेल्या व्यापाऱ्यांच्या याद्या तयार करणें, देशाच्या निरनिराळ्या भागांत खपावयाच्या साखरेच्या वांटणीची योजना करणें इत्यादि कामें त्यांच्यावर सोपवलीं आहेत. वहातुकीच्या साधनांचा काटकसरीनें उपयोग केला जावा म्हणून कोणत्या कारखान्यांची साखर कोणत्या टापूमध्यें खपावी आणि मालाच्या निरनिराळ्या प्रतींस अनुसरून त्यांच्या किंमती जनतेस सर्वत्र सारख्याच पडाव्या ह्यासाठी साखर कोणीं व कशी विकावी वगैरे बाबींचा कारभार त्यांनीं करावयाचा आहे. साखरेच्या धंद्यांत एकसूत्रीपणा यावा ह्या सूचनेस अनुसरून हिंदुस्थान सरकारनें प्रस्तुत मध्यवर्ती नियंत्रणाची योजना अमलांत आणली आहे. हें व्यापक स्वरूपांतलें नियंत्रण साखरेचे कारखानदार, ऊस पिकवणारे शेतकरी व जनता त्यांस हितावह होण्यासारखें नाहीं असें साखरेच्या धंद्याशीं संबंध असलेल्या संयुक्तप्रांत व बिहार येथील प्रमुख लोकांचें म्हणणें आहे. साखरेच्या वाढत्या किंमतीचा फायदा सरकारच्या नवीन योजनेमुळें कमाल भाव निश्चित व्हावयाचे असल्यानें यापुढें शेतकऱ्यांस मिळणार नाहीं आणि गेलीं दोन वर्षें साखरेचें उत्पादन मर्यादित करण्यांत आलें असून आतां कारखान्यांस व्हावयाच्या नफ्यास आणखी मर्यादा घालण्यांत येत आहे अशी तक्रार करण्यांत आली आहे. गुंतागुंतीची युद्ध परिस्थिति सारखी बदलत चालली आहे ही गोष्ट लक्ष्यांत घेतली जाऊन स्वदेशी साखरेच्या धंद्यांशीं ज्यांचे हितसंबंध निगडित झाले आहेत ते सर्व लोक व साखर वापरणारी जनता ह्यांच्या सोयीचा मेळ मध्यवर्ती सरकारच घालूं शकणार आहे हें आज निर्विवाद आहे. साखरेसारख्या महत्त्वाच्या स्वदेशी धंद्याचे बाबतींत अशा प्रकारची तडजोड व एकवाक्यता होणें अगत्याचें आहे. हिंदुस्थान सरकारच्या योजनेसंबंधानें कारखानदार व व्यापारी ह्यांनीं विधायक सूचना कराव्या आणि त्यांचा योग्य परामर्श सरकारनें घ्यावा हें उचित आहे. युद्धकाळांत सरकारचें धंद्यांस सहाय व त्यांत सहकार्य आणि त्याच्या अनुषंगानें येणारें नियमन अपरिहार्य झालें आहे हें येथें विसरून चालावयाचें नाहीं.

---

### मतभेदाचे मुख्य मुद्दे

हिंदुस्थान सरकारनें नेमलेल्या साखर, नियंत्रण अधिकाऱ्यानें अडीचशे व्यापाऱ्यांची यादी तयार केली आहे आणि त्यांच्या मार्फतीनें मालाची विक्री व्हावयाची आहे. साखर नियंत्रणाबाबत विक्रीची व्यवस्था केली जाणार आहे; तिच्या तपशीलाची चर्चा शुगर सिंडिकेटच्या प्रतिनिधींशीं व्हावयाची आहे. साखर कारखानदारांचें असें म्हणणें आहे कीं, साखरेचा भाव विशेष वाढलेला नसल्यानें तिच्या कमाल किंमती निश्चित करण्याची आवश्यकता नाहीं आणि सरकारी नियंत्रणामुळें माल बाजारांत न येऊन जनतेची गैरसोय होण्याचा संभव आहे. ते असेंहि म्हणत आहेत कीं देशांत साखरेचा पुरवठा अगदी बेताचा असल्यामुळें तिची निर्गत होऊं देणें अनिष्ट ठरणार आहे. ह्या तक्रारींस सरकारच्या बाजूनें असें उत्तर देण्यांत येत आहे कीं, कित्येक नफेबाज सट्टेवाल्यांनीं किंमतींच्या व विक्रीच्या नियंत्रणाविरुद्ध निष्कारण ओरड चालविली असून सरकारला स्वस्त भावानें साखर देशाबाहेर पाठवावयाची आहे म्हणून तें किंमत उतरवीत आहे असें ते भासवीत आहेत. वस्तुतः साखरेची निर्गत फार अल्प प्रमाणावर होणें शक्य आहे आणि तीहि बाहेरील रणक्षेत्रांत लढणाऱ्या हिंदी फौजेच्या उपयोगासाठीं होईल. दरमणी पावणेबारा रुपये ही सरकारनें निश्चित केलेली साखरेची किंमत दरमणी सात आण्यांच्या उसाच्या किंमतीवर आधारलेली आहे. तेव्हां शेतकऱ्यांस त्यांच्या मालास योग्य भाव मिळत नाहीं अशी तक्रार करण्यांत कांहींच हशील नाहीं. साखरेच्या विक्रीचें व किंमतीचें नियंत्रण सरकार करीत आहे त्याचा उद्देश हे व्यवहार सध्याच्या युद्धपरिस्थितींत सुरळीत चालावे आणि जनतेस सर्व देशभर ठराविक किंमतीनें साखरेचा अव्याहत पुरवठा व्हावा हाच आहे, असा खुलासा करण्यांत आला आहे.

---

### मुंबईच्या गव्हर्नरांचा आश्वासन-संदेश

बंगालचा उपसागर आणि हिंदी महासागर ह्यांचेमध्यें जपाननें अलीकडे थोडी गडबड केल्यामुळें मुंबईंत नाना तऱ्हेच्या गप्पांचा सुळसुळाट झाला होता. असल्या अफवांच्या वातावरणांत मुंबईच्या गव्हर्नरांनीं रेडिओवर भाषण करून वस्तुस्थिति जनतेस अधिकारयुक्त वाणीनें समजावून सांगितली ह्यामुळें भलत्या कल्पनांचा निरास होण्यास चांगलें सहाय होईल. मुंबई शहर सोडून बाहेर जाण्याची लोकांची धांदल चालली आहे तीस उद्देशून त्यांनीं आश्वासनपूर्वक असें सांगितलें कीं त्या शहराच्या सुरक्षितपणाविषयीं शंका घेण्याचें वस्तुतः कांहीं कारण नाहीं. तसाच प्रसंग येण्याचा संभव दिसतांच प्रत्यक्ष सरकारच लोकांनीं बाहेर जाण्याचे संबंधांत काय करावें, हें सांगेल. मुंबईमध्यें ज्यांस काम आहे त्यांनीं तें सोडून जाण्याचें प्रयोजन नाहीं. शहराच्या रक्षणाविषयीं आवश्यक असलेली व्यवस्था केली जात आहे आणि जनतेस लागणाऱ्या खाण्यापिण्याच्या वस्तूंचा पुरवठा करण्यांत येत आहे. व्यापाऱ्यांचे सहकार्यानें ही व्यवस्था यशस्वी केली जाईल आणि तीमध्यें कांहीं अडचण आल्यास सरकार स्वतः ती आपल्या स्वतःच्या हातीं घेईल असें आश्वासन सर रॉजर लम्ले ह्यांनीं दिलें. भलत्या अफवांस बळी पडून लोकांनीं स्वतःची दिशाभूल करून घेऊं नये आणि घाबरटपणानें शहर सोडून जाणें, ह्यासारखीं अविचाराचीं कृत्यें करूं नयेत; सरकार लोकांच्या संरक्षणासाठीं व सोयीसाठीं शक्य व जरूर त्या योजना अंमलांत आणीत आहे हा गव्हर्नरांच्या भाषणाचा सारांश आहे. अशा संदेशाची विशेष आवश्यकता होती आणि तो आतां देण्यांत आला आहे.

## शत्रूविरुद्ध चढाई

गेल्या आठवड्यांतील युद्धाची अत्यंत महत्त्वाची बातमी म्हटली म्हणजे अमेरिका, इंग्लंड व ऑस्ट्रेलिया ह्यांनीं जपान व जर्मनी ह्यांचे विरुद्ध चालू केलेल्या चढाईविषयींची होय. आतां आपण केवळ स्वतःच्या बचावाची तजवीज करीत न बसतां शत्रूवर चालून जाणार असें अमेरिकन व ऑस्ट्रेलियन पुढारी अलीकडे म्हणत आले आहेत आणि ह्या चढाईच्या धोरणाचा सध्या प्रत्यक्ष अनुभव येऊं लागला आहे. न्यूगिनी व फिलिपाइन्स ह्यांचे-कडील क्षेत्रांत जपानी ठिकाणांवर विमानी हल्ले प्रत्यक्ष होत असून ऑस्ट्रेलिआमधून जनरल मॅक आर्थर ह्यांच्या नेतृत्वाखाली पॅसिफिक महासागरांत एकसूत्रीपणानें आक्रमणात्मक युद्ध चालवयाचें आहे. आपला देश हजारो मैल मागें ठेवून दूरदूरच्या प्रदेशांत आक्रमण करण्याचें जपानचें धोरण आतां त्याच्या अंगलटीस येऊं लागल्याचीं चिन्हें दिसत आहेत. नुसत्या आघाताची जपानची भूमिका बदलून त्यास बचावाचीहि व्यवस्था करणें प्राप्त झालें आहे. टोकिओ, योकोहामा, कोबे इत्यादि जपानच्या प्रमुख शहरांवर विमानी हल्ले झाल्याच्या बातम्या शत्रूनेंच प्रथम प्रसिद्ध केल्या आहेत. ह्यावरून अमेरिकेचें लष्करी बळ व लढाऊ निश्चय दृढ झाल्याचीं स्पष्ट चिन्हें दिसत आहेत. ह्याच वेळीं ब्रिटिश वैमानिकांचे जबरदस्त हल्ले जर्मनीवर प्रत्यहीं होत आहेत आणि हिटलरला पूर्व व पश्चिम ह्या दोन्ही बाजूंनीं एकदम मार खाण्याचा प्रसंग आला आहे. व्हीशीच्या फ्रेंच मंत्रिमंडळावर दडपण टाकून मार्शल पेटॅं ह्यांस हतप्रभ करणें आणि लाव्हाल व डार्लां ह्यांचे-सारख्या राष्ट्रद्रोही पुढाऱ्यांच्या हातीं सत्ता देणें ह्या धोरणाचा पिच्छा हिटलरनें आज कित्येक महिने पुरवला होता. तें त्याचें कुटिल राजकारण यशस्वी होऊन लाव्हाल ह्या घर-भेद्याची स्थापना व्हीशीच्या मंत्रिमंडळांत प्रमुख स्थानावर झाली आहे. इंग्लंडविरुद्ध जर्मनीस उघड रीतीनें सहाय देणें हें लाव्हाल प्रभृतींचें कारस्थान आहे. अमेरिका व इंग्लंड ह्यांनीं तें अगोदरच ओळखलें असून जर्मनीवर युरोपांत चढाई करण्याच्या त्यांच्या योजना आखल्या जात आहेत. आपल्या उन्हाळ्यांतील नियोजित लष्करी डावपेचांत फ्रेंच आरमाराचा उपयोग अमेरिका व इंग्लंड ह्यांचे विरुद्ध करतां यावा हा हिटलरच्या प्रेरणेनें फ्रान्स-मध्यें झालेल्या उलाढालींचा हेतु आहे. पण ह्या कारस्थानाची कल्पना ब्रिटिश व अमेरिकन मुत्सद्यांस अगोदरच आली अस-ल्यानें त्यास यशस्वी रीतीनें तोंड देण्याची त्यांची तयारी आहे. त्यांच्या पुढाऱ्यांच्या लंडनमध्यें नुकत्याच झालेल्या वाटाघाटींची माहिती प्रसिद्ध झाली आहे तीवरून ही गोष्ट उघड होत आहे.

## हिंदी कामगार संघ

( १९२६ च्या इंडियन ट्रेड युनियन ॲक्टाखालील )

| | १९३८–३९ | १९३९–४० |
|---|---|---|
| संघांची संख्या | ५६२ | ६६६ |
| माहितीचे तक्ते भरून पाठविणारे संघ | ३९४ | ४५० |
| संघांचे सभासद | ३,९९,१५९ | ५,११,१३८ |
| पैकीं स्त्री सभासद | १०,९४५ | १८,६१२ |
| संघांचें उत्पन्न (रु.) | ८,८९,८२२ | ११,२१,७९७ |
| त्यांचेजवळील शिलक (रु.) | ६,११,४६४ | ७,३९,९३७ |
| प्रत्येक संघाचें सरासरी उत्पन्न (रु.) | २,२५८ | २,४९२ |


## दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल ... ... ... | रु. | २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... ... ... | रु. | १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड ... ... ... | रु. | १,१८,००,००० |

**मुख्य कचेरी :** ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

**मुंबईमधील शाखा :** बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

**इतर शाखा :** अहमदाबाद ( भद्र, मुख्य ऑफिस ), अहमदाबाद ( एलिस ब्रिज शाखा ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अंधेरी ( मुंबई शेजारीं ), बांद्रे ( मुंबई शेजारीं ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस ), कलकत्ता ( बडा बझार ), कलकत्ता ( चौरंगी स्क्वेअर ), जमशेदपूर, कराची, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत.

**लंडन एजन्ट्स :** वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

**डायरेक्टर्स :** सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाइट; मि. ए. गेडिस; सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई.; मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण.

**करंट डिपॉझिट अकाउंट्स :**

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षा कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टींचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधी नेहमीचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

एजंट—टी. आर. लालवाणी.

## दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

हेड ऑफिस : पुणें शहर.

**स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.**

**मुंबओ शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबओ.**

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | : रु. १०,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | : रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | : रु. ४,२५,८५० |
| वसूल झालेलें भांडवल | : रु. २,१२,९२५ |
| एकूण खेळतें भांडवल | : रु. ३३,००,००० |

### डायरेक्टर्स

प्रो. वा. गो. काळे, अध्यक्ष

| | |
|---|---|
| श्री. धों. कृ. साठे | श्री. मा. रा. जोशी |
| श्री. न. ग. पवार | श्री. श्री. गो. मराठे |
| श्री. त्र्यं. वि. रानडे | श्री. र. चिं. सोहोनी |
| श्री. वा. पुं. बर्वे | मि. फ. दो. पदमजी |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदीविक्री कसोशीनें करून दिली जाते.

बँकेच्या शेअरवर १९४१ अखेर पुऱ्या होणाऱ्या वर्षी द. सा. द. शेंकडा ४ टक्के करमाफ डिव्हिडंड दिलें गेलें. बँकेची शेअरविक्री चालू आहे.

म. वि. गोखले
मॅनेजर.

## पोस्टाच्या तिकिटांची काटकसर

मास्टर ऑफ सिक्युरिटी प्रिंटिंग व कंट्रोलर ऑफ स्टॅम्प्स, ले. कर्नल फिट्झमॉरिस, ह्यांनीं एक पत्रक काढून, लोकांनीं लहान किंमतीचीं जास्त तिकिटें लावण्याऐवजी मोठ्या किंमतीचीं कमी तिकिटें वापरावीं, कारण ज्या कागदावर तिकिटें छापण्यांत येतात तो टिकाचा कागद इंग्लंडहून आणणें कठीण पडत आहे अशी जनतेस विनंति केली आहे. कागदाचा हा तुटवडा गेल्या वर्षीपासूनच भासूं लागला आहे. केनिया व टांगानिका सरकारनीं हिंदुस्थान सरकारकडे तिकिटें छापून मागितलीं, परंतु ही विनंति त्यास अमान्य करावी लागली आणि केनिया व टांगानिका सरकारांस दक्षिण ऑफ्रिकेच्या सरकाराकडून त्यांचीं तिकिटें उसनी घेऊन त्यांवर आपल्या देशांचें नांव छापून घ्यावें लागलें. सुदान सरकारला हिंदुस्थान सरकारनें नुकतींच तिकिटें पुरविलीं, तीं वॉटरमार्क नसलेल्या कागदावर छपाई करूनच. पाकिटांचें टपाल हंशील एक आण्याचें सवा आणा केल्यानंतर, सवा आण्यावालीं तिकिटें सरकारनें छापलीं असतीं, तर आतांपर्यंत बराच कागद वांचला असता. दीड आण्याचीं तिकिटें आतां तरी छापून घेणें आवश्यक आहे. दुसऱ्या कोणत्या तरी तिकिटावर "१¼ आणा" असा शिक्का मारूनहि काम भागण्याजोगें आहे. हिंदी पोस्ट खात्याचा इतिहास पाहिला, तर टपालाच्या बदलत्या दरास अनुसरून वेळोंवेळीं नवीं तिकिटें छापल्याचे अनेक दाखले आपणांस आढळतील. उदाहरणार्थः—

| वर्ष | कोणतें तिकिट काढलें ? | कारण |
|---|---|---|
| १८५५ | ८ पै | सोजिरांच्या विलायतेस जावयाच्या पत्रांचें हशील. |
| १८६७ | ६ आ. ८ पै | विलायतेस जावयाच्या खासगी पत्रांचें हशील. |
| १८८२ | ९ पै | सोजिरांच्या विलायतेस जावयाच्या पत्रांचें हशील (नवा दर) |
| १८८६ | ४ आ. ६ पै | विलायतेस जावयाच्या खासगी पत्रांचें हशील ( उतरलेला दर ) |
| १८९१ | २ आ. ६ पै | वरील दर आणखी उतरला व ४½ आण्याचे तिकिटावर २½ आणे असा शिक्का मारला. नंतर २½ आण्यांचीं नवीं तिकिटें काढलीं. |

रजिस्टर्ड पत्रांस पूर्वी २ आणे रजिस्ट्रेशन व १ आणा टपाल हशील असे ३ आणे पडत, तेव्हां ३ आण्यांचें खास तिकीट उपलब्ध होतें. त्याचप्रमाणें, हा दर ३ आणे अधिक सवा आणा, म्हणजे ४¼ आणे झाल्यानंतर त्या किंमतीचें नवें तिकीट काढणें आवश्यक होतें. इंडियन्स स्टँप जर्नलचे संपादक, श्री. जाल कूपर, ह्यांनीं ह्या संबंधांत जर्नलच्या गेल्या ऑगस्टचे अंकांत उपयुक्त सूचना केल्या होत्या.

## चित्रपटांची चटक

चित्रपट पहाण्याची सवय इंग्लंडमध्यें किती विस्तृत आणि दृढमूल झाली आहे हें दरवर्षी १४० कोटि वेळां एकूण ब्रिटिश जनतेची उपस्थिति सिनेमागृहांत होते ह्यावरून दिसतें. स्त्रिया, पुरुष व मुलें धरून प्रत्येक ब्रिटिशर वर्षांतून सरासरीनें तीस वेळां चित्रपट पहातो असा हा हिशेब बसतो.

## म्हैसूर संस्थानांतील कोलारच्या सोन्याच्या खाणी

टिपू सुलतानाचे काळांत कोलार येथील नाल्यांतील वाळू धुवून सोनें गाळून गोळा करीत असत असें म्हणतात. कोलारच्या खाणींतील सोन्याचें उत्पादन १८८२ सालीं ९ औंस झालें; १९०५ सालीं तो आकडा ५,५६,५२७ औंस झाला व आतां तें उत्पादन तीस कोटि औंसांचे आसपास आलें आहे. गेल्या पांच वर्षांतील उत्खननाचे आकडे खालीं दिले आहेतः—

| वर्ष | उत्खनन ( लक्ष औंस ) | त्याची किंमत (लक्ष रु.) |
|---|---|---|
| १९३६ | ३३१८ | ३०७ |
| १९३७ | ३३०७ | ३०६ |
| १९३८ | ३२११ | ३०६ |
| १९३९ | ३१४५ | ३२६ |
| १९४० | २८९२ | ३२६ |
| | १५८७४ | १५७३ |

हिंदुस्थानांतील सोन्याचें उत्खनन बहुंशीं कोलारच्या खाणींतच होतें. सोनें व चांदी ह्यांच्या उत्खननाचे संबंधांत म्हैसूर सरकारास खालीलप्रमाणें रॉयल्टी मिळालीः—

| वर्ष | रॉयल्टी ( रु. ) लक्ष, हजार |
|---|---|
| १९३६ | २८ ४१ |
| १९३७ | २५ ७४ |
| १९३८ | २२ ८५ |
| १९३९ | २४ २८ |
| १९४० | २१ ४७ |
| एकूण | १२२, ७५ |

संस्थानास प्रतिवर्षी मिळणाऱ्या इन्कमटॅक्सच्या ३० लाखांच्या उत्पन्नापैकीं सोन्याच्या कंपन्यांचा २२ लाखांचा वाटा असतो. सोन्याच्या खाणींपासूनची सरकारची ही अप्रत्यक्ष प्राप्ती खालीलप्रमाणें आहेः—

| वर्ष | प्राप्तीवरील कर (रु.) लक्ष, हजार |
|---|---|
| १९३७–३८ | २१ ४४ |
| १९३८–३९ | २० ७७ |
| १९३९–४० | १९ ३५ |
| १९४०–४१ | २६ ६२ |
| १९४१–४२ | २२ ७४ |

सोन्याच्या खाणींत वीज पुष्कळ खपते. म्हैसूरच्या वीज खात्यास ह्यासंबंधांत खालीलप्रमाणें उत्पन्न मिळालें:—

| वर्ष | उत्पन्न रु. लक्ष, हजार |
|---|---|
| १९३६–३७ | २६ ६७ |
| १९३७–३८ | २७ ८३ |
| १९३८–३९ | २७ ५६ |
| १९३९–४० | २८ ४२ |
| १९४०–४१ | ३० ८४ |

कोलारच्या खाणींचे प्रदेशांतील दारूच्या एक्साइजचें वार्षिक उत्पन्न ५ लक्ष रुपयांचें आहे. खाणींमध्यें एकूण २९,०३५ कामगार १९४०–४१ मध्यें कामावर होते.

**महायुद्ध दाराशीं आलें**
**परदेशी औषधें**
**दुर्मिळ व महाग झालीं**

पण

**भिण्याचें कारण नाहीं !!!**

**— कारण —**

**आयुर्वेद रसशाळा पुणें लि०**

या देशी औषधाच्या प्रसिद्ध कारखान्यानें
तयार केलेलीं

● रक्तवर्धक, ● उपनाह,
● बालजीवन, ● कॅल्सीप्राल

*इत्यादि पेटंट, स्टँडर्ड व लोकप्रिय औषधें खात्री पटल्यामुळें*

**★ डॉक्टर्सहि वापरूं लागले आहेत. ★**

**दरसाल बिनचूक नफा वाटणाऱ्या ह्या कंपनीचे शेअर्स व औषधें मागवा.**

**आयुर्वेद रसशाळा पुणें लि०**

मुख्य दुकान गणपति चौक, लक्ष्मीरोड, पुणें २.



**DECCAN BOOK STALL**

**Booksellers, Publishers & Subscription Agents**
**Fergusson College Road, Poona No. 4**

(1) We stock and supply Educational books, General books & Library books.
(2) We supply Government of Bombay and Government of India publications.
(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.
(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.



**अर्थशास्त्र**

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें ३००, किंमत ३ रुपये
या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.



**कॉमनवेल्थचा वैभवशाली विस्तार**

★ २७ हजारांचेवर पॉलिसी–होल्डर्स
★ एकूण चालू विमे २ कोटींचेवर
★ दोन हजारांहून अधिक कार्यकर्ते निरनिराळ्या प्रांतांत कॉमनवेल्थसाठी उत्साहानें काम करीत आहेत.



हेड ऑफिस बिल्डिंग

**कॉमनवेल्थ**

**ॲशुअरन्स कंपनी लि.**

चेअरमन
रा. ब. एम्. एल्. मेथा, C. I. E., M. B. E.

ॲक्टिंग ऑफिस सुपरिंटेंडेंट ● एम्. एल्. भागवत, B. A.

' कॉमनवेल्थ ' ची पॉलिसी घेऊन जीवन निश्चिंत व सुखी करा.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं ' दुर्गाधिवास, ' भांबुर्डा, घ. नं. ६२४।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

# अर्थ

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ, ' दुर्गाविलास ' पुणें ४.

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ८ | पुणें, बुधवार, तारीख २१ एप्रिल, १९४२ | अंक १७

## न्यायमूर्ति रानड्यांचे
### तीन अप्रसिद्ध लेख प्रसिद्ध झाले
**PLEA FOR PROTECTIONIST POLICY**
**INDIAN SUGAR INDUSTRY**

न्यायमूर्ति रानडे यांनीं १८९९ सालीं ' टाइम्स ऑफ इंडियांत ' स्वदेशी साखरेच्या धंद्यासंबंधीं लिहिलेले महत्वाचे तीन लेख, प्रो. वा. गो. काळे ह्यांच्या प्रस्तावनेसह प्रसिद्ध करण्यांत आले आहेत.

व्यवस्थापक, ' अर्थ ', पुणें ४

ह्या पत्त्यावर आठ आण्यांचीं तिकिटें पाठवून लेखांची प्रत मागवावी.

## श्रीराम सिल्क मिल्स लि., बंगलोर
[ कंपनीनें १९४० अखेर ६ टक्के डिव्हिडंड वांटला आहे. ]
युद्धसाहित्यपुरवठा–खात्याची पॅरेशूटकरितां लागणाऱ्या
रेशमी कापडाची ऑर्डर पुरी करण्यासाठी लागणाऱ्या भांडवलाकरितां तूर्त एकूण रु. १ लक्षाच्या रकमेपर्यंत
## ठेवी घेणें आहेत
व्याजाचा दर ४॥ ते ६ टक्के. ठेव किमान रु. ५०० ची असावी. ठेवीवरील व्याज दर सहा महिन्यांनीं दिलें जातें.

श्रीराम सिल्क मिल्स लि., श्रीरामबाग, बसवनगुडी, बंगलोर.
नारायण गोविंद नाईक, ( माजी अध्यक्ष, म्हैसूर चेंबर ऑफ कॉमर्स ) मॅनेजिंग डायरेक्टर

आमच्या कारखान्यांतील माल मुंबईस बॉम्बे स्वदेशी को–ऑपरेटिव्ह स्टोअर्समध्यें व पुण्यास लक्ष्मी रोडवरील रे म्यूझिअमच्या व्यापार–संवर्धन–गृहांत पहा.

## 'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

वक्तशीर आणि मनपसंत काम करून देणारे
## मोहन वॉच कंपनी
रेग्युलेशन मोफत.
कॉमनवेल्थ बिल्डिंगसमोर लक्ष्मी रोड, पुणें २.

महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर

## महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी.

बुधवार चौक, पुणें

# विविध माहिती

### लक्ष्मी व विष्णु कंपन्या
### ३१ डिसेंबर १९४१ अखेरचें वर्ष

| | लक्ष्मी | विष्णु |
|---|---|---|
| विक्री | ५९१/२ लक्ष रु. | ६३१/२ लक्ष रु. |
| गिरण्यांतील कपाशीचा उठाव | २४ ,, ,, | २३१/२ ,, ,, |
| निवळ नफा | ९१/२ ,, ,, | ८१/२ ,, ,, |
| कराची तरतूद | २ ,, ,, | ३ ,, ,, |
| डिव्हिडंड | १६% | १६% |

### ट्रेझरी बिलांवरील व्याजाचा दर वाढत आहे

रिझर्व्ह बँकेनें गेल्या आठवड्यांत हिंदुस्थान सरकारचीं २ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. १ रु. ४ आ. ९ पै पडला. त्या पूर्वीच्या आठवड्यांत तो १ रु. ४ आ. इतका होता.

### श्री. शिवेश्वरकर

श्री. एस. डब्ल्यू. शिवेश्वरकर, आय. सी. एस. ह्यांस कॉन्सिल ऑफ सायंटिफिक अँड इंडस्ट्रिअल रिसर्चचे सेक्रेटरी नेमण्यांत आलें आहे.

### पेटंट्स

शत्रुपक्षीय मालकीच्या सर्व पेटंट्सचा उपयोग युद्धोपयोगी उत्पादनाकरितां करण्याचें अमेरिकन सरकारनें ठरविलें आहे. गेल्या महायुद्धानंतर शत्रुपक्षीयांच्या मालकीचीं पेटंट्स परत करण्यांत आलीं, तशीं आतां करण्यांत येणार नाहींत.

### रेखा पिक्चर्स लि.

वरील सिनेमा कंपनी मुंबई येथें स्थापन झाली आहे. तिचे श्री. जे. जी. भांडारकर हे मॅनेजिंग डायरेक्टर आहेत. कंपनी खासगी असून तिचें भांडवल १ लक्ष रुपयांचें आहे.

### अमेरिकन शिष्टमंडळ

औद्योगिक तज्ज्ञांचें एक शिष्टमंडळ अमेरिकेंतून हिंदुस्थानांत आलें आहे. येथील कारखान्यांतील उत्पादन वाढवण्याचे बाबतींत त्याच्या सभासदांनीं दिल्ली येथें प्रमुख हिंदी कारखानदारांशीं चर्चा केली. हा विचारविनिमय फलद्रूप होण्याचा चांगला संभव आहे असें दिसतें.

### मुंबई सरकार पुण्यास येत नाहीं

दरवर्षी मुंबई सरकारच्या कार्यकारी मंडळाचें ठाणें जून महिन्यांत पुण्यास हालवण्यांत येत असतें. युद्धपरिस्थितीमुळें हा ठाणें-बदल यंदा होणार नाहीं असें समजतें.

### जर्मन जुलुमाविरुद्ध वाढता असंतोष

जर्मनीनें पादाक्रांत केलेल्या सर्व युरोपिअन देशांत शत्रूच्या जुलुमाविरुद्ध असंतोष सारखा वाढत आहे. ही असंतुष्ट वृत्ति दडपून टाकण्याच्या जर्मनीच्या प्रयत्नांचा परिणाम ती अधिक तीव्र करण्यांत होत आहे.

### प्रोड्यूसर गॅस प्लँट

मद्रास सरकारनें मोटार वहानांना प्रोड्यूसर गॅस प्लँट बसविण्यास बंदी केली होती. ही बंदी आतां काढून घेण्यांत आली आहे.

### न्यू कॅलिडोनिया

पॅसिफिक महासागरांतील न्यू कॅलिडोनिया हें बेट स्वतंत्र फ्रेंच पुढाऱ्यांच्या हातांत असून त्याच्या रक्षणासाठी आतां अमेरिकन फौज तेथें उतरली आहे. निकेल, लोखंड, इत्यादि अनेक महत्त्वाच्या धातूंच्या खाणी त्या बेटांत आहेत. ह्याकारणानें त्याचें लढाऊ महत्त्व विशेष आहे. जपानच्या आक्रमणापासून न्यू कॅलिडोनियाचें रक्षण करण्याचें अमेरिकेनें ठरवलें असून स्थानिक फ्रेंचांची ह्या गोष्टीस पूर्ण संमति आहे.

### चलनाच्या विस्तारास अमेरिकेंत आळा

अमेरिकेंत युद्धसामुग्रीचें उत्पादन झपाट्यानें वाढत आहे, त्याकारणानें चलनाचाहि विस्तार तेथील व्यवहारांत जोरानें होत आहे. ह्या वाढत्या चलनाचा परिणाम बाजारभाव बेसुमार वाढण्यांत होऊं नये ह्याविषयीं अमेरिकन सरकार खबरदारी घेत आहे.

### जपान व जर्मनी ह्यांच्या जहाजांचा नाश

जपान युद्धांत पडल्यापासून आतांपर्यंत त्याच्या एकूण ६० लक्ष टन वजनाच्या व्यापारी जहाजांपैकी १० लक्ष टनांचा नाश होऊन गेला आहे. जर्मनीचा नाश ६० लक्ष टनांचा झाला असावा असा अंदाज आहे. व्यापारी जहाजांची बनावट अमेरिकेमध्यें प्रचंड प्रमाणावर चालली आहे.

### प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांस ११ लक्ष डॉलर्सची इस्टेट

प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांस त्यांच्या आईची १० लक्ष, ९० हजार डॉलर्सची इस्टेट मिळाली.

### बाजार भावाचें नियंत्रण

अमेरिकेंतील बाजारभावांच्या किंमती योग्य मर्यादेंत राखण्यासाठी तेथील सरकार मोठ्या प्रमाणावर मोहीम सुरू करणार आहे.

### मच्छीमारीचें शिक्षण देणाऱ्या शाळा

मच्छीमारीचें शिक्षण देणाऱ्या दोन शाळा, एक रत्नागिरी येथें व एक कारवार येथें स्थापन करण्याचें मुंबई सरकारनें ठरविलें आहे.

### डेक्कन ग्लास अँड एनॅमल वर्क्स लि.

वरील १ लक्ष रुपये भांडवलाची कंपनी कुर्डुवाडी येथें स्थापन झाली आहे.

### श्री. देसाई ह्यांची नेमणूक

रिझर्व्ह बँकेच्या सेंट्रल बोर्डानें पश्चिम विभागाच्या लोकल-बोर्डावरील के. दि. ब. मळजी ह्यांच्या रिकाम्या झालेल्या जागेवर श्री. एम. व्ही. देसाई, सरकारी वकील बडोदें, ह्यांची नेमणूक केली आहे.

### ऑस्ट्रेलियाकडे युद्धसाहित्याचा प्रवाह

जावाच्या संरक्षणासाठीं अमेरिकेंतून मागविलेलीं विमानें, बंदुकी, मशीनगन्स, रणगाडे, इत्यादि ऑस्ट्रेलियांत आतां दाखल होत आहेत. जावाच्या सरकारकडून ऑस्ट्रेलिया त्यांची खरेदी करीत आहे.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | १३२ | तथ्य चित्र—आर्थिक महत्त्वाच्या कायद्याचा एक प्रश्न—एक्साइज ड्यूटीव प्रांतिक कर | |
| २ अमेरिका आणि हिंदुस्थान ... | १३३ | ६ युद्धविषयक धोक्याचा विमा ... | १३६ |
| ३ अलीकडील आर्थिक घडामोडी ... | १३४ | ७ धान्याचें उत्पादन | १३६ |
| ४ सुशिक्षित बेकारांस सहाय ... | १३४ | ८ पेट्रोलच्या वापरांत आणखी बचत ... | १३७ |
| ५ स्फुट विचार ... | १३५ | | |
| जनरल वेव्हल यांचें निवेदन—वस्तुस्थितीचें यथा- | | | |


# अर्थ

बुधवार, एप्रिल ता. २९, १९४२

## अमेरिका आणि हिंदुस्थान

इंग्लंड, रशिया व चीन ह्या जर्मनी व जपान ह्यांच्या आक्रमणाचा प्रतिकार करणाऱ्या राष्ट्रांस युद्धसामुग्रीचा पुरवठा करून हिट्लरशाही नष्ट होण्याचे कामीं सहाय देणें हें प्रस्तुत युद्धाच्या पहिल्या दोन वर्षांत अमेरिकेचें मुख्य कार्य होतें. अमेरिकन खंडाच्या संरक्षणाकरितांहि ह्या सहायाची आवश्यकता होती हें प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांनीं अनेक वेळां बोलून दाखवलें आहे. जपाननें फिलिपाइन्सवर हल्ला चढवून अमेरिकेशी प्रत्यक्ष युद्ध आरंभिलें तेव्हां अमेरिकन राष्ट्रास इंग्लंड व रशिया ह्यांचे बरोबरीनें युद्धांत पडणें प्राप्तच झालें. तेव्हांपासून सध्याचें युद्ध जसें इंग्लंडचें व रशियाचें आहे तसेंच तें अमेरिकेचेंहि आहे ही भावना दृढ होऊन ह्या संयुक्त राष्ट्रांच्या लढाऊ हालचाली एकविचारानें व पूर्ण सहकार्यानें होऊं लागल्या. युद्धाच्या बदलणाऱ्या व विस्तार पावणाऱ्या ओघास अनुसरून हीं राष्ट्रें आपलें धोरण व डावपेच बदलीत आहेत. शस्त्रास्त्रांच्या उत्पादनाची अमेरिकेची शक्ति दांडगी आहे आणि ती अत्यंत कार्यक्षम रीतीनें उपयोगांत आणली जात आहे. कच्चा माल व भांडवल ह्यांच्या पुरवठ्याचे बाबतींत अमेरिका विलक्षण समृद्ध आहे. कारखानदारींतलें धाडस व कौशल्य ह्यांत अमेरिकन लोक अग्रगण्य आहेत. मालाचें प्रचंड प्रमाणावर उत्पादन करण्यांत अमेरिकेचा हात दुसरें कोणतेंहि राष्ट्र धरूं शकत नाहीं. जहाजें, विमानें, रणगाडे, इत्यादींचें उत्पादन अमेरिकन कारखान्यांत होत आहे त्याची बरोबरी सर्व शत्रु राष्ट्रें एकवटलीं तरी त्यांस करणें अशक्य आहे. जपानच्या पूर्व एशियांतील आक्रमणामुळें हिंदुस्थानास मध्यवर्ती मान्याच्या जागेचें स्थान प्राप्त झालें आहे आणि एशिया खंडांतील युद्धक्षेत्रांत लढाऊ सामुग्रीचा पुरवठा हिंदुस्थानांतूनच अत्यंत सोइस्कर रीतीनें होणें शक्य आहे अशी विशेष परिस्थिति आज निर्माण झाली आहे. अमेरिकेचें आर्थिक, यांत्रिक व संघटनात्मक सामर्थ्य आणि हिंदुस्थानचें मध्यवर्तित्व ह्यांची योग्य सांगड घातली गेली असतां ह्या देशांत लढाऊ सामुग्री आज तयार केली जात आहे तिचें प्रमाण किती तरी पट वाढेल आणि ह्या सामुग्रीचा उपयोग एशियांतील रणांगणांत सौकर्यानें करतां येईल. ह्या विचारानें अमेरिकन सरकारानें हिंदुस्थानांत औद्योगिक तज्ञांचें एक शिष्टमंडळ पाठवलें असून ह्या देशांत कारखान्यांचा विस्तार कसा करतां येईल ह्या बाबतींत चौकशी करून तें योजना आखीत आहे. भांडवल, यंत्रसामुग्री, यंत्रविशारद ह्यांचा पुरवठा अमेरिकेस करतां येईल आणि हिंदी धंदेवाल्यांचे सहायानें शस्त्रास्त्रांचें उत्पादन वाटेल तेवढें वाढवतां येईल. ह्या विषयींची अमेरिकेची भूमिका प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांनीं इकडे मुद्दाम पाठवलेले कर्नल जॉनसन हिंदी जनतेस स्पष्ट करून सांगत आहेत तिकडे लक्ष वेधणें आवश्यक आहे.

प्रेसिडेंट रूझव्हेल्ट ह्यांचे खास प्रतिनिधी या नात्यानें कर्नल जॉन्सन ह्यांनीं युद्धाचे संबंधांत बदलत्या परिस्थितीमुळें अमेरिका व हिंदुस्थान ह्यांचें नातें कसें जोडलें जात आहे ह्याचें स्पष्टीकरण केलें आहे तें मननीय आहे. सध्याचें युद्ध आतां शब्दशः जागतिक युद्ध असून इंग्लंड व अमेरिका ह्या राष्ट्रांस त्यांच्या सर्व रणांगणांत सारखीच तयारी ठेवावयाची आहे. ह्या कारणानें हिंदुस्थानचें शत्रूपासून रक्षण करणें म्हणजे स्वतःचेंच रक्षण करणें होय असें अमेरिकेस वाटत आहे. जपान सर्व संयुक्त राष्ट्रांचा शत्रू असल्यानें हिंदुस्थानवर त्यानें हल्ला केल्यास ह्या देशाचें रक्षण करणें हें त्याचें कर्तव्य होईल ह्या भावनेनें अमेरिकेनें आपलें लढाऊ धोरण आखलें आहे. ह्याच उद्देशानें आपली फौज त्या राष्ट्रानें हिंदुस्थानांत पाठवली असल्याची माहिती कर्नल जॉन्सन ह्यांनीं दिली. अमेरिकेचें औद्योगिक शिष्टमंडळ येथें आलें आहे त्याचा उद्देश केवळ युद्धोपयोगी सामानाचें उत्पादन वाढवण्यास सहाय करणें हा असून शांततेच्या काळांतील किंवा युद्धोत्तर आर्थिक व्यवस्थेशी त्याचा यत्किंचितहि संबंध नाहीं असें आश्वासन त्यांनीं दिलें. अमेरिकेचें सांपत्तिक वर्चस्व ह्या देशांत स्थापण्याचा त्या संपन्न राष्ट्राच्या कारखानदारांचा व भांडवलवाल्यांचा हेतु आहे अशी येणारी शंका त्यांनीं स्पष्ट शब्दांत दूर केली. माल खरेदीच्या कामावर अमेरिकेस पाठवण्यांत आलेले हिंदुस्थान सरकारचे प्रतिनिधी सर षण्मुखं चेट्टी ह्यांनींहि एका भाषणांत कर्नल जॉनसन ह्यांच्या ह्या आश्वासनास दुजोरा दिला आहे. परराष्ट्रांच्या मुलखावर व संपत्तीवर अमेरिकेचा डोळा आहे ही शंका कोणास वाटत असल्यास ती त्यांनीं आपल्या डोक्यांतून काढून टाकावी आणि ह्या बाबतींतलें अमेरिकेचें आतांपर्यंतचें उदार वृत्तीचें व निःस्वार्थी धोरण लक्षांत आणावें, असें त्यांनीं सुचवलें. प्रस्तुत युद्ध शक्य तितकें त्वरित जिंकणें हें हिंदुस्थानच्या, इंग्लंडच्या व अमेरिकेच्याहि हिताचें असल्यानें अमेरिकन राष्ट्र ह्या देशाशीं स्नेहाचे व सहकार्याचे संबंध जोडींत आहे ही गोष्ट प्रेसिडेंट रूझव्हेल्ट यांच्या वतीनें कर्नल जॉन्सन ह्यांनीं हिंदी जनतेच्या मनावर ठसवण्याचा प्रयत्न केला आहे. स्नेहाच्या व सहकार्याच्या ज्या भावनेनें अमेरिकेनें युद्धसहायाची योजना पुढें मांडली आहे त्याच भावनेनें हिंदुस्थानांत तिचें स्वागत होईल ह्यांत शंका नाहीं.

हिंदी वृत्तपत्रांच्या प्रतिनिधींच्या मार्फत पूर्वी दिलेला वरील आशयाचा संदेश कर्नल लुइस जॉन्सन ह्यांनीं रेडिओवर स्वतंत्र भाषण करून गेल्या गुरुवारीं विशद करून सांगितला. अमेरिकन राष्ट्राचे प्रेसिडेंट व जनता ह्यांच्या वतीनें त्यांनीं हिंदी लोकांस मित्रत्वाचें व भरपूर सहायाचें अभिवचन दिलें. अमेरिकेच्या इति-

ह्यांत स्पष्ट झालेल्या अमेरिकन राष्ट्राच्या स्वातंत्र्याच्या उच्च ध्येयांचा निर्देश करून चीन व हिंदुस्थान ह्या देशांच्या हातीं एशिया खंडाचें भवितव्य असून तें जपानच्या जुलमी कचाट्यांतून मुक्त करण्यासाठी आपले लोक मनःपूर्वक सहाय देण्यास झटतील असें त्यांनीं सांगितलें. अमेरिकन सैनिक हिंदुस्थानांत आले आहेत आणि आणखी येतील, ते केवळ हिंदी लोकांच्या बरोबरीनें जपानशीं लढून विजय मिळवण्यासाठी येथें आहेत असा खुलासा त्यांनीं केला. जपानविरुद्ध चढाई करण्याची योजना अंमलांत येत आहे तीमध्यें हे अमेरिकन सैनिक भाग घेतील आणि हिंदुस्थानच्या संरक्षणाचे कामीं सहाय देतील. कर्नल जॉन्सन ह्यांचें रेडिओवरील भाषण एकंदरीनें मोठ्या कळकळीचें, स्फूर्तिदायक व परिणामकारक असें झालें.

## अलीकडील आर्थिक घडामोडी

[ प्रो. काळे ह्यांचें मुंबईच्या रेडिओवरील भाषण, ऑ. इं. रेडिओ अधिकाऱ्यांचे रुपेनें उद्धृत केलें आहे. ]

अंदाजपत्रकांत तूट असूं नये आणि खर्चापेक्षां उत्पन्न कमी होईल असें दिसून आल्यास कर वाढवून ती तफावत भरून काढावी हा शांततेच्या काळांतला सामान्य दंडक युद्धपरिस्थितींत लागू करतां येत नाहीं. अशा वेळीं जनतेच्या रहाणीवर ताण पडणार नाहीं आणि उद्योगधंद्यांची कार्यक्षमता संपुष्टांत येणार नाहीं अशा बेतानें करवाढ करणें आणि राहिलेली तूट अनिवार्य म्हणून जनतेच्या बचतींमधून कर्जें घेऊन भरून काढणें हाच मार्ग आक्रमावा लागतो. ह्या नियमास अनुसरून सर जेरमी रेस्मन ह्यांनीं ४७ कोटींच्या तुटींपैकीं १२ कोटि मुख्यत्वेंकरून प्राप्तीवरील कर आणि आयात जकाती ह्यांमध्यें वाढ करून उभारण्याचें ठरवलें आहे. लोकांनीं आपल्या खर्चांत बचत करून तो पैसा सरकारी कर्जांत गुंतवावा ह्यासंबंधानें त्यांचा विशेष कटाक्ष आहे. कागदी चलनांत वाढ करून सरकारला लागणारा पैसा उभारणें अनिष्ट व निषेधार्ह ठरतें; कारण, तारणाच्या अभावीं असल्या चलनास किंमत रहात नाहीं आणि व्यवहारांत अमर्याद पैसा खेळत राहून बाजारभाव चढतात व रहाणी महागाईची होते. युद्धपरिस्थितींत सरकारच्यामार्फत जनतेमध्यें राष्ट्रीय खर्चाच्या मार्गानें चलनाचा फैलाव होत असतो, परंतु त्याच परिस्थितीमुळें जनतेनें विकत घ्यावयाच्या मालाचा पुरवठा आकुंचित होत असतो. अशा प्रसंगीं पुरवठा थोडा आणि त्यावर मागणीचा ताण अधिक असें होऊन किंमती भडकतात आणि जनतेस जाचक होतात. बचतीचें व तिच्या सहायानें महागाईस आळा घालण्याचें महत्त्व लोकांच्या मनांवर बिंबवण्याचा प्रयत्न करूनच हिंदुस्थान सरकारचे फडणवीस थांबले नाहींत.

### करयोजनेंत बचतीचा मार्ग

स्वतःच्या करयोजनेंतच ह्यासंबंधांत एक सवलत ठेवून बचतीचा मार्ग त्यांनीं सुकर केला आहे. दोन हजार रुपयांपेक्षां कमी वार्षिक उत्पन्न असणारांस प्राप्तीवरील कराची माफी असे. आतां ती दूर करण्यांत आली असून १५०० रुपये ही किमान मर्यादा निश्चित झाली आहे. पण ही मर्यादा व दोन हजार ह्यांच्या दरम्यानच्या उत्पन्नावर पहिले ७५० रुपये सोडून दर रुपयास ६ पै ह्या दरानें कर आकारला जाईल. तथापि त्याप्रमाणें होणाऱ्या आकारणीच्या सव्वापट रकम जो इसम डिफेन्स सेव्हिंग्ज बँकेंत गुंतवील त्यास २½ टक्केप्रमाणें तीबर व्याज मिळेल आणि रकम युद्ध संपल्यानंतर एक वर्षानें काढून घेतां येईल. बचतीस उत्तेजन देण्याची ह्याच प्रकारची योजना जादा नफ्यावर घेण्यांत येणाऱ्या कराचे बाबतींत करण्यांत आली आहे. जादा नफ्याच्या दोन-तृतीयांशाइतकी ह्या कराची आकारणी होते. पण त्यापैकीं एक पंचमांश जो इसम किंवा मंडळी पुढें खर्चास भांडवल उपयोगी पडावें म्हणून ठेवीच्या स्वरूपांत सरकारकडे ठेवील त्या कर देणारास एक दशांशाची माफी व ठेवीवर २ टक्के व्याज मिळेल. ह्या योजनांवरून लोकांची बचत आणि तिची सरकारी रोखे किंवा ठेवी ह्यांत गुंतवण ह्या गोष्टींस किती महत्त्व देण्यांत येत आहे त्याची कल्पना येईल.

### रेल्वेजचें वाढतें उत्पन्न

मध्यवर्ती सरकारास सध्याच्या अडचणीच्या काळांत रेल्वेजपासून मिळणाऱ्या उत्पन्नानें चांगलाच हात दिला आहे ह्यांत संशय नाहीं. ह्या देशांतील बहुतेक सर्व मोठ्या रेल्वेज सरकारच्या मालकीच्या असून त्यांचा कारभारहि कंपन्यांच्या हातांतून सरकारकडे आला आहे. रेल्वेजचा व्यवहार धंद्याच्या स्वरूपाचा असून त्यांचा मालक म्हणजे राष्ट्र ह्यास त्यांपासून होणाऱ्या नफ्याचा अंश मिळणें योग्य आहे ह्या तत्त्वावर प्रतिवर्षीं हिशेब होऊन विशिष्ट प्रमाणांत मध्यवर्ती तिजोरींत हा हिस्सा जमा व्हावा अशी व्यवस्था कित्येक वर्षें अमलांत आहे. मध्यंतरी मंदीमुळें रेल्वेजना निवळ नफा उरला नाहीं आणि घसारा व गंगाजळी ह्यांचीहि तरतूद करणें कठीण झालें. ह्यामुळें सरकारच्या तिजोरीस मिळावयाची रकम आदा झाली नाहीं. अलीकडे युद्ध-परिस्थितींत रेल्वे वहातुक फार वाढली आहे आणि तिचे दरहि चढवण्यांत आलेले आहेत. ह्या कारणानें रेल्वेजच्या उत्पन्नांत वाढ होऊन त्यांनीं सरकारास द्यावयाच्या नफ्याच्या रकमा त्याचेकडे जमा करण्याची सवड झाली आहे. १९४०-४१ मध्यें सरकारास रेल्वेजकडून १२ कोटि रुपये आले. गेल्या सालीं हा आकडा १९ कोटि झाला आणि चालू वर्षी त्यांचेकडून २० कोटींच्यावर उत्पन्न मिळेल असा अंदाज करण्यांत आला आहे. युद्धप्रयत्नास हिंदी रेल्वेजची अनेक मार्गांनीं मोठी मदत होत आहे. युद्धसामुग्रीची ने-आण व उत्पादन हीं त्यांनीं विस्तृत प्रमाणावर चालवलीं आहेतच आणि त्याबरोबरच सरकारी उत्पन्नांत त्यांनीं चांगली भर टाकली आहे. ( अपूर्ण )

### सुशिक्षित बेकारांस उद्योगधंदे काढण्यास सहाय

उद्योगधंदे सुरू करण्याकरितां सुशिक्षित बेकारांस मदत करण्याचें मुंबई सरकारनें योजिलें आहे. ही मदत ग्रँटचे स्वरूपांत केली जाईल. साधारणपणें कोणासहि एक हजारापेक्षां मोठी ग्रँट मिळणार नाहीं व दोन हजारांपेक्षां मोठी ग्रँट देण्यापूर्वी डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रीजला सरकारची मंजुरी घ्यावी लागेल. दोघांनीं किंवा अधिकांनीं मिळून धंदा काढल्यास, त्या प्रत्येकास जेवढी रकम स्वतंत्रपणें मिळूं शकेल, त्याच्या बेरजेइतकी रकम त्या धंद्यास मिळूं शकेल. ग्रँटपैकीं निम्मी रकम मदत व निम्मी रकम कर्ज म्हणून समजली जाईल. कर्जावर व्याज आकारलें जाणार नाहीं व त्याची परतफेड हप्त्यांनीं करावी लागेल. यंत्रसामुग्रीची खरेदी, यंत्रांची उभारणी, प्रारंभींच्या काळांतील नुकसानीची भरपाई व विशिष्ट प्रसंगीं खेळतें भांडवल ह्यांकरितां ग्रँट दिली जाईल.

## स्फुट विचार

### जनरल वेव्हल ह्यांचें निवेदन

सध्याच्या आणीबाणीच्या प्रसंगीं प्रत्येक नागरिकानें स्वसंरक्षणाचा प्रयत्न शांत मनानें व शिस्तीनें करणें अगत्याचें आहे ह्याची जाणीव आतां सार्वत्रिक होत आहे. तथापि, पसरणाऱ्या अफवांचा निरास होण्यास अधिकारानें वस्तुस्थितीची कल्पना जनतेस ज्यांस देतां येणें शक्य आहे अशांच्या वक्तव्याचा विशेष उपयोग होत असतो. ह्या दृष्टीनें सर रॉजर लम्ले ह्यांनीं मुंबईच्या लोकांस उद्देशून दिलेलें आश्वासन अत्यंत महत्त्वाचें असल्याचें आम्हीं आमच्या गेल्या आठवड्याच्या अंकांत सांगितलेंच आहे. तथापि, जपानी विमानें व आरमार हिंदुस्थानच्या किनाऱ्यानजीक वावरूं लागल्याकारणानें ह्या बाजूनें देशास शत्रूचें भय किती आहे आणि त्याच्या प्रतिकारार्थ कोणत्या योजना अंमलांत आणल्या जात आहेत हें जाणण्याची तीव्र इच्छा लोकांस असणें स्वाभाविक असून ती तृप्त करणें लष्करी संरक्षणाची जबाबदारी ज्यांचेवर आहे त्या अधिकाऱ्यांसच शक्य आहे. शत्रूच्या बलाबलाचा अंदाज बांधणें, त्याच्या हालचालींची दिशा अजमावणें आणि त्याचे विरुद्ध प्रतिकाराची व्यवस्था करणें ह्या गोष्टी हिंदुस्थानच्या सरसेनापतींच्या क्षेत्रांतल्या आहेत. ह्या कारणानें जनरल वेव्हल ह्यांनीं गेल्या आठवड्यांत रेडिओवर भाषण करून वस्तुस्थिति जनतेपुढें मांडली, त्या अधिकारयुक्त वक्तृत्वाचा इष्ट परिणाम झाल्यावांचून रहाणार नाहीं.

---

### वस्तुस्थितीचें यथातथ्य चित्र

मलाया व ब्रह्मदेश येथें जपानच्या चढाईमुळें आपल्या फौजांस माघारी घ्यावी लागली ह्यामुळें आणि सिंगापूर व रंगून येथून आलेल्या लोकांनीं सांगितलेल्या माहितीमुळें व जपानच्या भ्रामक प्रचाराचा परिणाम म्हणून हिंदी जनतेचीं मनें साशंक झालीं असणें साहजिक आहे असें सांगून वस्तुस्थितीचें यथातथ्य चित्र जनरल वेव्हल ह्यांनीं आपल्या भाषणांत पुढें मांडलें. अंतिम विजयाविषयींचा पूर्ण आत्मविश्वास त्यांनीं प्रथम व्यक्त केला. इंग्लंड, चीन व रशिया ह्यांच्यासारखीं चिवट व शूर राष्ट्रें ह्या युद्धांत एकत्र लढत असून अमेरिकेचें भरपूर सहाय त्यांस मिळत आहे हें आपल्या विश्वासाचें पहिलें कारण त्यांनीं सांगितलें. दुसऱ्या देशांत भीति उत्पन्न करण्याचे डावपेच शत्रूकडून अवलंबिले जात आहेत आणि त्याच्या लढाऊ सामर्थ्याच्या भलत्या व अतिशयोक्तिपूर्ण कल्पना पसरवण्यांत येत आहेत. सिंगापूर व रंगून ह्यांच्या हकीकतीनें कोणीहि दिशाभूल करून घेऊं नये; जपानचें लढाऊ बळ मोठें असलें तरी हिंदुस्थानावर स्वारी करून मलायाच्या इतिहासाची पुनरावृत्ति त्यास येथें करतां येणें अशक्य आहे ही गोष्ट लोकांनीं लक्षांत ठेवावी असें जनरल वेव्हल ह्यांनीं सुचवलें. विमानी हल्ल्यांविरुद्ध योजावयाच्या उपायांचा अवलंब जनतेनें केल्यास जपाननें स्वारीचाहि प्रयत्न केल्यास त्यास भिण्याचें कारण नाहीं असें आश्वासन त्यांनीं दिलें. देशाचा सबंध किनारा आणि त्यांतलीं सर्व शहरें ह्यांच्या लष्करी संरक्षणाचा बंदोबस्त आपणांस करतां येणार नाहीं; तथापि बचावाची तजवीज वाढत्या प्रमाणावर केली जात आहे ती पुरी होईल असा अभिप्राय त्यांनीं दिला. शत्रूच्या बळाची अवहेलना करून त्यापासून लोकांस मुळीच भीति नाहीं असें सुचवावयाचा त्यांचा उद्देश नव्हता. जपानी विमानें कांहीं शहरांवर हल्ले करतील आणि शत्रूच्या फौजा कांहीं ठिकाणीं उतरून तेथील प्रदेश व्यापण्याचा प्रयत्न करतील हें संभवतें; पण त्याची प्रगति होणें किंवा त्यास म्हणण्यासारखें यश मिळणें शक्य नाहीं ही गोष्ट सरसेनापतींनी विशद करून सांगितली. इंग्लंड व अमेरिका हीं राष्ट्रें हिंदुस्थानाच्या रक्षणासाठी आपली शिकस्त करतील आणि हिंदी फौज आपलें कर्तव्य करण्यास चुकणार नाहीं. ह्या कामीं हिंदी जनतेचें पूर्ण सहकार्य मिळण्याचें महत्त्व त्यांनीं प्रतिपादिलें. युद्धासंबंधानें बेजबाबदारपणाच्या, घाबरटपणाच्या किंवा बेफिकीरीच्या कल्पना अनिष्ट आहेत हें त्यांच्या समतोल विचाराच्या निवेदनावरून जनतेनें ओळखलें पाहिजे. सध्याच्या कठीण प्रसंगीं कांहीं झालें तरी प्रत्येकानें आपापलें कर्तव्य शांत वृत्तीनें बजावणें आवश्यक आहे असें लोकांचे पुढारी सांगत आहेत त्याचाहि उल्लेख सरसेनापतींनीं आपल्या निवेदनांत केला आहे. संरक्षणाचे बाबतींत दिसून येणारें हें ऐकमत्य अभिनंदनीय आहे.

---

### आर्थिक महत्त्वाच्या कायद्याचा एक प्रश्न

आपलें उत्पन्न वाढवण्याच्या हेतूनें हिंदुस्थानांतील कित्येक प्रांतिक सरकारांनीं आवश्यक ते कायदे करून मालाच्या विक्रीवर नवे कर बसवले आहेत. हिंदुस्थानच्या घटना कायद्यास अनुसरून ह्या प्रकारचा कर प्रांतांच्या कायदेमंडळांस बसवतां येतो का तो मध्यवर्ती सरकाराच्या कक्षेंत बसतो, असा प्रश्न उपस्थित झाला असून त्याचा निर्णय करण्याचें काम फेडरल कोर्टाकडे एका विशिष्ट दाव्यानें आलें आहे. मद्रासमध्यें तेथील सरकारानें १९३९ च्या मालविक्रीवरील कराच्या कायद्यास अनुसरून मेसर्स बोद्दू पैदाण्णा अँड सन्स ह्यांचेवर शेंगदाण्याच्या खरेदीवर कर आकारला आणि त्याचप्रमाणें त्यांनीं बनवलेल्या व विकलेल्या तेलावर व पेंडीवर कर घेतला. ह्यावर विजयानगरमच्या मुनसफ कोर्टांत दावा करण्यांत आला आणि मद्रासच्या कायदेमंडळास असल्या कराचा कायदा करतां येत नसून तो अधिकार मध्यवर्ती सरकाराचा आहे असा मुद्दा पुढें मांडण्यांत आला. फिर्यादीनें बनवलेल्या तेलावर व पेंडीवर आकारलेला कर एक्साइजच्या म्हणजे उत्पादनावरील कराच्या स्वरूपाचा असल्यानें तो मध्यवर्ती सरकाराच्या अधिकारकक्षेंत येतो असा निकाल कोर्टानें दिला. ह्यावर मद्रास हायकोर्टांत अपील करण्यांत आलें तें नामंजूर झालें. ह्या निकालावर आतां फेडरल कोर्टांत अपील करण्यांत आलें असून दोन बाजूंचें म्हणणें त्याचे पुढें मांडण्यांत आलें आहे.

---

### एक्साइज ड्यूटी व विक्रीवरील प्रांतिक कर

मध्यवर्ती कायदेमंडळाच्या अधिकारांतील करांच्या यादींत बाब ४५ "एक्साइज ड्यूटी" संबंधाची आहे आणि ती सर्वस्वी मध्यवर्ती सरकारच्या कक्षेंतील आहे. प्रांतिक करांच्या यादींत ४८ वी बाब विक्रीसंबंधाची आहे आणि सर्व प्रकारांच्या विक्रीस ती लागू आहे. मद्रास सरकारच्या वतीनें फेडरल कोर्टापुढें सर अलादि कृष्णस्वामी आयर ह्यांनीं असा मुद्दा मांडला आहे कीं, मध्यवर्ती सरकारास बाब ४५ खालीं मालाची पैदास किंवा उत्पादन ह्यावर कर घेतां येतो आणि प्रांतिक सरकारास विक्रीच्या सर्व व्यवहारांवर बाब ४८ खालीं कर बसवतां येतो, म्हणून ह्या दोहोंमध्यें कांहीं विरोध आहे असें मानण्याचें कारण नाहीं आणि मद्रास हायकोर्टानें ह्या आशयाचा निकाल द्यावयास हवा होता. उत्पादन आणि विक्री ह्या दोन व्यवहारांवर दोन निरनिराळे कर एकाच वेळीं असणें कायद्यास धरून आहे असें त्यांचें म्हणणें आहे. मद्रासप्रमाणें बंगाल व पंजाब ह्या प्रांतांत विक्रीवरील करांची आकारणी प्रांतिक कायद्यांस धरून होत असल्यानें फेडरल कोर्टाचा प्रस्तुत प्रकरणांतील निकाल महत्त्वाचा समजण्यांत येणार आहे. उत्पादनावरील एक्साइज पट्टी आणि मालविक्रीवरील कर ह्या बाबी भिन्नभिन्न सरकारांच्या अधिकारक्षेत्रांत घटना कायद्याप्रमाणें पडत असल्यानें त्यांच्या मर्यादा निश्चित होणें आवश्यक झालें आहे. फेडरल कोर्टाच्या अभिप्रायानें सध्या उत्पन्न झालेला अनिश्चितपणा दूर होईल.

---

## कारखान्यांचा युद्धविषयक धोक्याच्या सक्तीचा विमा

(१) हिंदुस्थान सरकारची जोखीम विमा उतरविलेल्या मालमत्तेच्या ८०% पेक्षा अधिक नाहीं.

(२) प्रत्येक क्लेमचे संबंधांतील पहिल्या १ हजाराचें नुकसान अथवा क्लेमच्या २०% रकम, जी ज्यास्त भरेल ती, विमेदार सोसेल.

(३) हिंदुस्थान सरकारची जोखीम विमा पॉलिसींत स्पष्ट केली जाईल, व तीवर सरकारतर्फे नेमण्यांत आलेला अधिकारी सही करील.

(४) कारखान्यांचें बांधकाम चालू असेल त्यांच्या विम्याचाहि समावेश योजनेंत होऊं शकेल.

(५) क्लेम मंजुरीनंतर सरकार त्याची व्यवस्था खालीलप्रमाणें करील:—

(अ) नुकसान होण्यापूर्वी ज्या परिस्थितींत मालमत्ता असेल त्या परिस्थितींत शक्य तेवढी ती पुनः आणण्यासाठी सरकार त्यास योग्य वाटेल त्या मार्गानें व इष्ट वाटतील त्या हप्त्यांत रकमेची भरपाई करील. अर्थात्, सरकारनें स्वीकारलेल्या जोखमीचे रकमे बाहेर त्याची रकम जाणार नाहीं. अथवा

(ब) सरकार नुकसानभरपाई करील, तिची रकम ठरवितांना विमापॉलिसीच्या तारखेचे वेळची किंमत व नुकसान आलें त्या वेळची किंमत ह्या दोघांपैकीं जी कमी भरेल, तीच विचारांत घेतली जाईल. विमा पॉलिसी चालू असतांना मालमत्तेचा झालेला घसाराहि ध्यानांत घेण्यांत येईल.

(६) युद्धविषयक धोक्याचा विमा टाळण्याकरितां सरकार जे नियम अथवा सूचना करील, त्या कारखानदारास पाळाव्या लागतील.

(७) सरकारनें नुकसानभरपाईची रोख रकम दिली तर, सरकारनें तसें सांगितल्यास, कारखानदारास कारखाना पूर्ववत बांधावा लागेल किंवा तो दुसरीकडे हलवावा लागेल.

(८) ह्या विम्याचे बाबत सरकार एक फंड [वॉर रिस्क (फॅक्टरीज) इंशुरन्स फंड] निर्माण करील व त्यांत हप्त्यांच्या व दंडाच्या रकमा दाखल केल्या जातील आणि फंडांतून क्लेम्स भागवले जातील. ह्या योजनेसाठी नेमलेल्या एजंटांचा पगार व खर्च फंडांतूनच दिला जाईल.

(९) एकादा क्लेम भागविण्यास फंडांत रकम कमी पडली, तर कमी पडणारी रकम मध्यवर्ती सरकार फंडास उसनी देईल.

(१०) कोणत्याहि वेळेस सरकारास असें आढळलें कीं, फंडांत जरूरीपेक्षा ज्यास्त रकम आहे, तर सरकार फाजील असलेली रकम मध्यवर्ती तिजोरीकडे वर्ग करील.

(११) फंडाचा हिशेब सरकार दरसाल किंवा त्यापेक्षां लवकर लवकर तयार करून प्रसिद्ध करील.

(१२) सरकारनें एकाद्या कारखानदारावर त्याचा कारखाना दुसरीकडे हलविण्याबाबत सक्ती केली, तर कारखाना हलविण्यास येणारा खर्च सरकार फंडांतून देईल.

## धान्यांचें उत्पादन

[धान्यांचें उत्पादन वाढविण्यासंबंधीं सरकारी प्रयत्न चालू आहेत. धान्यांचे संबंधांतील सद्यःस्थितीची कल्पना खालील माहितीवरून येईल. ना. एन. आर. सरकार ह्यांनीं फूड प्रॉडक्शन परिषदेंत केलेल्या भाषणांतून ही माहिती घेण्यांत आली आहे.]

तांदूळ, गहू, ज्वारी-बाजरी व हरबरा हीं हिंदी प्रमुख धान्यें होत. एकूण धान्यांच्या उत्पादनांपैकीं ८०% उत्पादन ह्या धान्यांचें होतें. तांदुळाचें वार्षिक उत्पादन २६५ लक्ष टन, गव्हाचें १०० लक्ष टन, ज्वारी-बाजरीचें ९२ लक्ष टन व हरबऱ्याचें ३५½ लक्ष टन भरतें. साधारणपणें, हिंदुस्थान खाद्य-धान्यांचे बाबतींत स्वयंपूर्ण आहे, तथापि त्यास दरसाल १४ लक्ष टन तांदळाची ब्रह्मदेशांतून आयात करावी लागते. चालू वर्षी हिंदी तांदळाचें उत्पादन ९ लक्ष टन कमी आहे. ब्रह्मदेशांतूनहि तांदूळ येऊं शकत नाहीं; तेव्हां सुमारें २३ लक्ष टनांची टंचाई पडेल. युद्धावर गेलेल्या सैनिकांना तांदूळ फार लागत नाहीं, तथापि ब्रह्मदेशाच्या तांदळावर बहुंशीं अवलंबून असलेल्या सिलोनकडे हिंदुस्थानास कांहीं तांदूळ पाठवावा लागेल. गव्हाचे बाबतींतहि परिस्थिति असमाधानकारक आहे. एकूण १०० लक्ष टनांच्या उत्पादनांत एकट्या पंजाबचा हिस्साच ३३ लक्ष टनांचा असतो. मध्य-हिंदुस्थान, सिंध, मध्यप्रांत, संयुक्तप्रांत येथेंहि उत्पादन पुष्कळ होतें. चालू वर्षी सुमारें ३½ लक्ष टनांची तूट अपेक्षित आहे. ज्वारी-बाजरी व तूर ह्यांचे संबंधांत विशेष सांगण्यासारखें कांहीं नाहीं.

धान्यांचे तुटीबरोबरच वहातुकीवरील ताणहि फार जाणवूं लागला आहे. वहातुक अखंड चालू न रहाण्याची शक्यता लक्षांत घेतली, म्हणजे तर परिस्थितीचा बिकटपणा स्पष्टपणें लक्षांत येतो. धान्याची बाहेरून आयात होण्याचा प्रश्नच विचारांत घेण्याचें प्रयोजन नाहीं. म्हणून धान्यांचें उत्पादन वाढविण्याचा कसून प्रयत्न करणें अत्यावश्यक झालें आहे. अन्नपुरवठ्यावर पडणाऱ्या वाढत्या ताणाचा सार्वजनिक शांततेवर वाईट परिणाम होण्याचा संभव आहे, तो टाळला पाहिजे. वहातुकीच्या साधनांचा अभाव अधिकाधिक तीव्रतेनें जाणवूं लागेल, ह्या दृष्टीनें प्रत्येक प्रांतानें आपल्या विभागापुरती स्वयंपूर्तता साधण्याचा प्रयत्न करावा. धान्यांची लागवड वाढविणें हें काम वास्तविकपणें प्रांतिक व संस्थानी सरकारांचें आहे. तथापि, सध्याची विशिष्ट परिस्थिति लक्षांत घेतां व सर्व प्रांतांच्या व संस्थानांच्या प्रयत्नांमध्यें एकवाक्यता येण्याचे दृष्टीनें हिंदुस्थान सरकारनें ह्याबाबत त्यांस सहाय करण्याचें ठरविलें आहे.

## माल-विक्रीची कला

पुस्तकें विकणारा:—हें पहा सुंदर पुस्तक नुकतेंच प्रसिद्ध झालें आहे. तें तुम्हांला फार आवडल्यावांचून रहाणार नाहीं.

गृहस्थ:—मी पुस्तकें कधींच वाचीत नाहीं.

पुस्तकें विकणारा:—पण तुमच्या घरीं बायकामुलांस तें वाचायला चांगलें उपयोगी पडेल.

गृहस्थ:—माझ्या घरीं बायकामुलें कोणी नाहींत. एक कुत्रा काय तो आहे.

पुस्तकें विकणारा:—फारच छान! कुत्र्याचा कधी मधी राग आला असतां त्याचेवर फेकून मारावयास हें पुस्तक उत्कृष्ट आहे.

## पेट्रोलच्या वापरांत आणखी बचत

### १ मे नंतर अंमलांत यावयाची योजना

(१) म्युनिसिपालिट्यांस ३३% पेट्रोल कमी मिळेल. प्रोड्यूसर गॅस प्लँट बसवून अथवा बैलगाड्या वाढवून म्युनिसिपालिट्यांनीं अडचण भागवावी.

(२) शाळांच्या बसेस व अॅंब्युलन्सेसच्या पेट्रोलमध्यें ३३⅓% काट करण्यांत येईल.

(३) सर्व खासगी गाड्यांना पेट्रोलच्या मूळ वाटणीच्या ६६⅔% पेट्रोल मिळेल. जादा पेट्रोलमध्येंहि त्याच प्रमाणांत कपात केली जाईल.

(४) टॅक्सींना खासगी गाड्यांइतकी रेशनिंगची अडचण भासणार नाहीं. मुंबईमधील टॅक्सींना ४५ गॅलन, पुण्यांतील टॅक्सींना ४० गॅलन व इतर ठिकाणच्या टॅक्सींना ३६ गॅलन पेट्रोल दरमहा मिळेल.

(५) शहरांतील बसेसना २०% पेट्रोल कमी मिळेल. रेल्वेच्या मार्गानेंच जाणाऱ्या बसेस बंद ठेवाव्या लागतील व इतर बसेसनाहि शहरांतील बसेसच्या मानानें कमी पेट्रोल मिळेल. एकूण बचत ३८% होईल.

(६) लॉऱ्यांना त्यांच्या वजनाचे प्रमाणांत हल्लीं ८०, ६०, ४५ व ३० गॅलन पेट्रोल मिळतें त्याचे ऐवजी ६५, ५०, ४० व २५ गॅलन पेट्रोल दरमहा मिळेल.

(७) औद्योगिक कारणांसाठी उपयोगांत आणावयाच्या पेट्रोलमध्यें १०% कपात होईल.


**N. V. WADNERKAR**

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver, Electro-plater & Manufacturer of Sporting Trophies, Medals, Cups etc.

- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -

POONA CITY.





**मधुमेहावरील औषध**

**तीन आठवड्यांचे औषधास फक्त रु. ७**

— मागविण्याचा पत्ता —

मॅनेजिंग डायरेक्टर, रूरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड.

९२३ ए, सदाशिव, पुणें २.



## दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल ... ... ... | रु. | २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... ... ... | रु. | १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड ... ... ... | रु. | १,१८,००,००० |

**मुख्य कचेरी**: ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

**मुंबईमधील शाखा**: बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

**इतर शाखा**: अहमदाबाद (भद्र, मुख्य ऑफिस), अहमदाबाद (एलिस ब्रिज शाखा), अहमदाबाद (स्टेशन शाखा), अंधेरी (मुंबई शेजारीं), बांद्रे (मुंबई शेजारीं), कलकत्ता (क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर, कराची, नागपूर (किंग्जवे), नागपूर (इतवारी बझार), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत.

**लंडन एजन्ट्स**: वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

**डायरेक्टर्स**: सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाइट; मि. ए. गेडिस, सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई.; मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण.

**करंट डिपॉझिट अकाउंट्स :**

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षा कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमीचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

एजंटः—टी. आर. लालवाणी.



## दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

हेड ऑफिस : पुणें शहर.

स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.

मुंबअी शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबअी.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | : रु. १०,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | : रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | : रु. ४,२५,८५० |
| वसूल झालेलें भांडवल | : रु. २,१२,९२५ |
| एकूण खेळतें भांडवल | : रु. ३३,००,००० |

**डायरेक्टर्स**

प्रो. वा. गो. काळे, अध्यक्ष

| | |
|---|---|
| श्री. धों. कृ. साठे | श्री. मा. रा. जोशी |
| श्री. न. ग. पवार | श्री. श्री. गो. मराठे |
| श्री. त्र्यं. वि. रानडे | श्री. र. चिं. सोहोनी |
| श्री. वा. पुं. वर्दे | मि. फ. दो. पदमजी |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदीविक्री कसोशीनें करून दिली जाते.

बँकेच्या शेअरवर १९४१ अखेर पुऱ्या होणाऱ्या वर्षी द. सा. द. शेंकडा ४ टक्के करमाफ डिव्हिडंड दिलें गेलें. बँकेची शेअरविक्री चालू आहे.

म. वि. गोखले
मॅनेजर.

महायुद्ध दाराशीं आलें
परदेशी औषधें
दुर्मिळ व महाग झालीं
पण
भिण्याचें कारण नाहीं !!!
— कारण —
आयुर्वेद रसशाळा पुणें लि०
या देशी औषधाच्या प्रसिद्ध कारखान्यानें
तयार केलेलीं
● रक्तवर्धक, ● उपनाह,
● बालजीवन, ● कॅल्सीप्राल
इत्यादि पेटंट, स्टँडर्ड व लोकप्रिय औषधें खात्री पटल्यामुळें
★ डॉक्टर्सहि वापरूं लागले आहेत. ★
दरसाल बिनचूक नफा वाटणाऱ्या ह्या कंपनीचे
शेअर्स व औषधें मागवा.
आयुर्वेद रसशाळा पुणें लि०
मुख्य दुकान गणपति चौक, लक्ष्मीरोड, पुणें २.

DECCAN BOOK STALL
Booksellers, Publishers & Subscription Agents
Fergusson College Road, Poona No. 4
(1) We stock and supply Educational books, General books & Library books.
(2) We supply Government of Bombay and Governmeht of India publications,
(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.
(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.

अर्थशास्त्र
लेखक—प्रो. बा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें १००, किंमत १ रुपये
या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

कॉमनवेल्थचा वैभवशाली विस्तार
★ २७ हजारांचेवर पॉलिसी—होल्डर्स
★ एकूण चालू विमे २ कोटींचेवर
★ दोन हजारांहून अधिक कार्यकर्ते निरनिराळ्या प्रांतांत कॉमनवेल्थसाठी उत्साहानें काम करीत आहेत.



हेड ऑफिस बिल्डिंग

कॉमनवेल्थ
ॲशुअरन्स कंपनी लि.
THE COMMONWEALTH ASSURANCE CO. LTD. POONA CITY

चेअरमन
* रा. ब. एम्. एन्. मेथा,
C. I. E., M. B. E.

ॲक्टिंग ऑफिस सुपरिन्टेंडेंट * एम्. एन्. भागवत, B. A.
' कॉमनवेल्थ ' ची पॉलिसी घेऊन जीवन निश्चिंत व सुखी करा.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं ' दुर्गाधिवास, ' भांबुर्डा, घ. नं. ९२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
(टपाल हंशील माफ)
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रौ. वा. गो. काळें

वर्ष ८ | पुणें, बुधवार, तारीख १३ मे १९४२ | अंक १९

## काळजीचे दिवस आहेत !

पाऊसकाळची तरतूद
मुंग्यासुद्धां करतात,
आणि बुद्धिमान मनुष्य मात्र
बेफिकीरींत मोठेपणा मानतो !

परिणामः मागें राहाणारांच्या कपाळीं
दैन्य, दुःख, दारिद्र्य.

आयुष्याचा विमा उतरून जीविताच्या सर्व
धोक्याविरुद्ध तजवीज करा.

वेस्टर्न इंडियाची पॉलिसी
म्हणजे संरक्षणाची अत्यंत खंबीर ढाल.

चांगली तजवीज करा. आतां,
या क्षणीं; पुढें वेळ आईल;
क्षणाचाहि विलंब धोक्याचा.

युद्धजन्य धोक्यासुद्धां सर्व
धोक्यांविरुद्ध

पुणें शाखा:—
१७९, बुधवार,
लक्ष्मीरोड, पुणें २.

वेस्टर्न इंडिया
विमा कंपनी लिमिटेड, सातारा.

## विविध माहिती

**रेडिओची वाढती लोकप्रियता**

| | चालू लायसेन्स |
|---|---|
| मार्च, १९४१ अखेर | १,२५,३४७ |
| मार्च, १९४२ अखेर | १,५५,७३३ |

**नॅशनल बँक ऑफ इंडिया**

नॅशनल बँक ऑफ इंडियानें आपल्या रंगून व मंडाले येथील शाखांचें दप्तर अमृतसर शाखेंत आणलें आहे.

**हायकोर्टांचे न्यायमूर्ती**

जन्या हिन्दी घटना कायद्यानें हिंदी हायकोर्टांतील न्यायमूर्तीपैकीं एक तृतीयांश आय. सी. एस. मधीलच असले पाहिजेत, असा दंडक घातलेला होता. परंतु १९३५ च्या घटना कायद्यानें तो दंडक काढून घेतला तरी आय. सी. एस. मधील लोकांची न्यायमूर्तींचे जागीं भरती चालूच आहे, कारण त्यांस न्यायमूर्ती नेमूं नये, असें कायद्यानें सांगितलेलें नाहीं. हायकोर्टांतील सर्वच न्यायमूर्तींची निवड कायदेपंडितांतून करावी अशी सरकारास विनंति करणारा एक ठराव मध्यप्रांताच्या बार कौन्सिलनें मंजूर केला आहे.

**आफ्रिकेंतील कामासाठी रशियनांची भरती**

जर्मनीच्या ताब्यांतील रशियन मुलुखामधील १७ ते ४२ वयाच्या रशियन लोकांना लिबियांत कामास लावण्यासाठी पकडून नेण्यांत येत आहे. जे पळून जाऊं पहातील त्यांस देहांत शासन मिळेल.

**चांदीच्या निर्गतीस बंदी**

अमेरिकेनें युरोपकडे चांदीची निर्गत करण्यास बंदी केली आहे. तटस्थ राष्ट्रांकडे जाणारी चांदी हळुहळु शत्रुराष्ट्रांस मिळत असे, म्हणून ही बंदी करण्यांत आली आहे. स्पेन, पोर्तुगाल, स्वित्सरलंड, स्वीडन, फ्रान्स, तुर्कस्तान, फ्रेंच आफ्रिका, यांस वरील बंदी मुख्यतः लागू पडेल.

**युद्धास देणगी**

चालू युद्धास प्रारंभ झाल्यापासून आतांपर्यंत ब्रिटिश सरकारास तेथील जनतेनें युद्ध चालविण्यासाठी सुमारें ३० कोटि रुपयांच्या देणग्या दिलेल्या आहेत. बिगरव्याजी कर्जांत तेथील लोकांनीं ८५ कोटि रुपये गुंतविले आहेत.

**अमेरिकेंतील पेट्रोल रेशनिंग**

अमेरिकेंतील पेट्रोल रेशनिंगच्या, १५ मे रोजीं अंमलांत यावयाच्या पद्धतीप्रमाणें प्रत्येक मोटारवाल्यास दर आठवड्यास सरासरीनें २½ ते ५ गॅलन पेट्रोल मिळेल. म्हणजे त्यास दर आठवड्यास ३७½ ते ७५ मैल मोटार चालवितां येईल. एवढी चक्कर म्हणजे अमेरिकन मोटारवाल्यास घराभोंवतीं एक वळण घेण्याइतकी लहान वाटेल व लक्षावधि मोटारवाले आपल्या वहानाचा त्याग करतील. संध्याकाळीं १५० मैलांची चक्कर करणें म्हणजे अमेरिकन मोटारवाल्यास कांहींच वाटत नाहीं. त्यामुळें पेट्रोलचें रेशनिंग त्यास चांगलेंच जाणवणार आहे. अमेरिकन मोटारी दर गॅलनला सरासरीनें १५ मैलांचेपेक्षा जास्त जात नाहींत.

**अमेरिकेचा युद्धखर्च**

अमेरिकेचा मार्च १९४२ मधील युद्धखर्च सुमारें ९ अब्ज रुपये भरला. ह्या खर्चाचें प्रमाण वाढतच आहे व तें लवकरच सालिना १५० अब्जांवर जाईल.

**युद्धफंड**

मुंबई युद्धफंडाचा आकडा एक कोटि रुपयांवर गेला आहे.

**तापी व्हॅली रेल्वे कंपनी लि.**

वरील कंपनीच्या रेल्वेनें गेल्या ४६ वर्षांत एकूण ५ कोटि, ८० लक्ष उतारूंची व १ कोटि, ३८ लक्ष टन मालाची वहातूक केली. १९०१ ते १९४१ ह्या मुदतींत तिनें दिलेल्या डिव्हिडंडची सरासरी ६½% पडते.

**नॅशनल सिटी बँक ऑफ न्यूयॉर्क**

नॅशनल सिटी बँक ऑफ न्यूयॉर्क आपली मुंबईतील शेख मेमन स्ट्रीटवरील शाखा बंद करणार आहे. हॉर्नबी रोडवरील स्थानिक मुख्य कचेरी चालू राहील. शेख मेमन स्ट्रीट शाखेंतील खातीं मुख्य कचेरीकडे वर्ग केलीं जाणार नाहींत.

**वॉर फंड**

व्हाइसरॉयांच्या वॉर फंडाचा आंकडा मार्च, १९४१ अखेर ६ कोटि, ५५ लक्ष रुपयांवर गेला.

**तांदळाऐवजीं ज्वारी-बाजरी खा**

मुंबई प्रांतांत मागें त्यास लागणाऱ्या तांदळापैकीं ४०% तांदूळ ब्रह्मदेशांतून येत असे. हा पुरवठा आतां बंद झाला आहे. त्यामुळें तांदूळ खाणारांनीं तांदळाची काटकसर करणें आवश्यक झालें आहे. तांदळाऐवजीं त्यांनीं ज्वारी अथवा बाजरी खाण्यास प्रारंभ केला पाहिजे. ह्या धान्यांचा पुरवठा मुबलक व गव्हाचा पुरवठा पुरेसा होत राहील, असें मुंबई सरकारनें जाहीर केलें आहे.

**आगबोटींचा नाश**

इटली युद्धांत पडल्यापासून आतांपर्यंत भूमध्य समुद्रांत शत्रुपक्षाचीं सुमारें १२½ लक्ष टनांचीं व्यापारी जहाजें बुडविण्यांत आलीं आहेत.

**चेक्सची देवघेव**

मुंबई बँकर्स क्लिअरिंग हाऊसमध्यें १ मे, १९४२ अखेर संपलेल्या आठवड्यांत २१ कोटि रुपये किंमतीच्या १,१५,४४९ चेक्सची देवघेव झाली.

**विक्रीवरील प्रांतिक कर**

मालाच्या विक्रीवरील मद्रास सरकारचा कर हा एक्साइज ड्यूटीच्या स्वरूपाचा असल्यानें तो बसविण्याचा अधिकार प्रांतिक सरकारास नाहीं, असा निवाडा मद्रास हायकोर्टानें केला होता, त्यावर मद्रास सरकारनें फेडरल कोर्टाकडे अपील केलें होतें. हें अपील फेडरल कोर्टानें मंजूर करून प्रांतिक सरकारचा विक्रीवरील कर कायदेशीर ठरवला व त्याप्रमाणें फेरनिवाडा करण्यास मद्रास हायकोर्टास हुकूम दिला.

**आयात कमी करण्याचा प्रयत्न**

हिंदुस्थानाची आयात आणखी कमी करण्याचा प्रयत्न हिंदुस्थान सरकार करीत आहे. युद्धोपयोगी मालास शक्यतोंवर प्राधान्य मिळावें, हा त्याचा हेतु आहे.

**कोळशाचें उत्पादन वाढविणार**

ग्रेट ब्रिटनमधील कोळशाचें उत्पादन वाढविण्यासाठी फौजेंत दाखल झालेल्या, खाणींतील ६ हजार ब्रिटिश मजुरांना खाणींत काम करण्यासाठीं परत बोलावण्यांत येत आहे. इतर उद्योगधंद्यांत गुंतलेल्या ४ हजार मजुरांसहि परत आणण्यांत येईल.

**लोंकरीच्या सांठ्याचा युद्धसमाप्तीनंतर उपयोग**

आस्ट्रेलियांत लोंकरीचा मोठा सांठा तयार आहे. सुमारें १६५ कोटि पौंड लोंकर तयार आहे, ती ११ कोटि लोकांच्या कपड्यांस उपयोगी पडेल. दर माणशीं १५ पौंड लोंकर लागते ह्या हिशेबानें वरील अंदाज केला आहे.

अनुक्रमणिका

| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | १४८ |
| २ माडागास्कर ... | १४९ |
| ३ युद्धविषयक सक्तीचा विमा ... ... | १४९ |
| ४ सहकारी क्रे. सोसायटी-चा सेक्रेटरी ... | १५० |
| ५ कारखान्यांचा विमा | १५० |
| ६ स्फुट विचार ... | १५१ |
| साखरेची नियंत्रित किंमत वाढली—चढाईचें धोरण स्वीकारा—हिंदुस्थान सरकारचें द्रव्यसहाय—हिंदी चित्रपटांची लांबी कमी होणार—शत्रूच्या प्रतिकारार्थ राष्ट्रीय फळी | |
| ७ हैद्राबाद डोमिनियन बँक | १५३ |
| ८ होळकर संस्थानांतील कापडाच्या गिरण्या | १५३ |

अर्थ

बुधवार, ता. १३ मे, १९४२

## माडागास्कर

आकाराच्या मानानें जगांतील बेटांतील चौथ्या प्रतीचें माडागास्कर हें बेट दक्षिण आफ्रिकेच्या पूर्व किनाऱ्याच्यालगत असून तें फ्रेंच साम्राज्याचा एक भाग आहे. ह्या बेटांतील अत्यंत महत्त्वाचें बंदर डीगोस्वारेझ हें आहे आणि त्याच्या दिशेनें ब्रिटिश फौजेनें अचानक हल्ला केल्याची बातमी गेल्या आठवड्यांत आली. माडागास्करवरील ह्या ब्रिटिश स्वारीच्या योगानें जपानी व फ्रेंच मुत्सद्यांच्या हिंदी महासागरामधील युद्धाच्या कारवायांचे बेत फिसकटले आहेत. माडागास्कर आपल्या वर्चस्वाखालीं आणण्यांत ब्रिटिशांचा कोणता हेतु आहे ? व्हीशीच्या फ्रेंच सरकारानें आतांपर्यंत जपानला पॅसिफिक महासागरांत सवलती देऊन संयुक्त राष्ट्रांच्या मार्गांत कांटे पेरले आहेत हें येथें प्रथम लक्षांत ठेवलें पाहिजे. दुसरें असें कीं आलिकडे लाव्हाल, डार्लां इत्यादि जर्मनीचे दोस्त व्हीशीच्या मंत्रिमंडळांत सत्ताधीश झालेपासून त्यांचें धोरण हिटलरला वाढतें युद्धसहाय देणें हें आहे. तिसरी गोष्ट ही आहे कीं जपानी आरमाराची हालचाल हिंदी महासागरांत जोरानें चालू झाली आहे आणि तिचा रोख हिंदुस्थान व पूर्व एशिया ह्यांच्याशीं असलेलें अमेरिकेचें व इंग्लंडचें दळणवळण धोक्यांत आणण्याकडे आहे. उन्हाळ्याच्या मोहिमेंत जर्मनीनें भूमध्य समुद्राच्या पूर्व भागांत चाल करावी आणि जपाननें हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्यास वळसा घालून ह्या मोहिमेस सहाय करावें असा व्यूह शत्रुत्रिकुटानें रचला असल्याविषयीं शंका येण्यास भरपूर कारण आहे. जपाननें ह्याप्रमाणें झडप घालून माऱ्याचीं ठिकाणें अचानक हस्तगत केलीं आहेत आणि त्या उदाहरणांवरून बोध घेणें संयुक्त राष्ट्रांस अत्यंत आवश्यक होतें. माडागास्करवर आपला डोळा मुळीच नव्हता आणि त्यावरील हल्ला हा ब्रिटिशांनीं केलेला अत्याचार आहे असा कांगावा जपाननें चालवला असून व्हीशी सरकारनें त्याची री ओढली आहे. जपान व व्हिशी मंत्रिमंडळ ह्यांच्या आतांपर्यंतच्या वर्तनाचा विचार करतां ब्रिटिशांनीं माडागास्करवर केलेली स्वारी यथाकाल व यथायोग्य होती ह्यांत संशय रहात नाहीं. उलट, हें माऱ्याचें बेट मोकळें सोडण्यांत संयुक्त राष्ट्रांनीं चूकच केली असती. आज नाहीं उद्यां जपाननें तेथें आपलें ठाणें व्हीशीच्या संमतीनें दिलें असतें आणि संयुक्त राष्ट्रांच्या हिंदी महासागरांतील हालचालींस व्यत्यय उत्पन्न केला असता. माडागास्करवरील आपली स्वारी संयुक्त राष्ट्रांच्या वतीनें केलेली आहे आणि तें बेट युद्ध चालू असेतोंपर्यंतच आपल्या कब्जांत आपण ठेवूं व पुढें तें फ्रान्सला परत देऊं असें स्पष्ट अभिवचन इंग्लंडनें दिलें आहे. ह्या गोष्टीस आपला पूर्ण पाठिंबा असल्याचें अमेरिकेनें जाहीर केलें आहे आणि जरूर पडल्यास माडागास्करचा उपयोग आपण स्वतः करूं असें अमेरिकन मुत्सद्यांनीं म्हटलें आहे. माडागास्करची लांबी एक हजार फूट आणि सरासरीची रुंदी अडीचशें फूट आहे. डीगोस्वारेझ हें त्याच्या उत्तरेच्या टोकाला असलेलें बंदर मोठें, सोईस्कर व बंदिस्त असें आहे. तें आपल्या ताब्यांत घेण्यांत इंग्लंडनें दूरदर्शीपणा दाखवला आहे तो सर्वस्वी अभिनंदनीय आहे.

माडागास्करचा ब्रिटिशांनीं घेतलेला ताबा हें संयुक्त राष्ट्रांच्या ह्यापुढील युद्धविषयक धोरणाचें गमक आहे असें म्हणावयास प्रत्यवाय नाहीं. युरोपमध्यें जर्मनी व एशियामध्यें जपान ह्यांचीं कारस्थानें हाणून पाडण्यासाठी ह्या राष्ट्रास निरनिराळ्या रणक्षेत्रांचा साकल्यानें विचार करावा लागत असून आपल्या लढाऊ डावपेचांची दिशा प्रसंग येत आहेत त्याप्रमाणें आखणें आवश्यक झालें आहे. ब्रह्मदेशांतून ब्रिटिश फौजा शत्रूशीं लढत लढत माघार घेत आहेत आणि जपाननें मंडाले व लाशियो घेऊन प्रत्यक्ष चीन देशांत मुसंडी मारली आहे. चीनचें हिंदुस्थानशीं असलेलें दळणवळण तोडून आणि त्यास बाहेरून मिळणारी लढाऊ मदत बंद पाडून त्या देशाचा कोंडमारा करण्याचा जपानचा इरादा दिसतो. चिनी फौजा निकरानें लढून हा बेत हाणून पाडण्याचा शिकस्तीचा प्रयत्न करीत आहेत. फिलिपाइन्समधलें कॉरिजिडॉर हें बंदिस्त ठाणें कित्येक आठवडे अत्यंत प्रतिकूल व असहाय परिस्थितींत लढून अखेर जपानला शरण गेलें आहे. आतां ह्यापुढें जपान आपला मोर्चा कोणीकडे वळवणार ह्यासंबंधानें तर्क चालू आहेत. ऑस्ट्रेलियास बगल देऊन जपान सिलोन व हिंदुस्थान ह्यांचेकडे आपली वक्रदृष्टी फिरवणार का ऑस्ट्रेलियाचे मागें लागणार हा प्रश्न चोहोंकडे विचारला जात आहे. ह्याकरितांच हिंदुस्थानच्या संरक्षणाची तयारी जोरानें चालली आहे आणि रंगूनमध्यें अमेरिकन विमानें शत्रूच्या मागें हात धुवून लागलीं आहेत. तसेंच, सिलोनमध्यें आफ्रिकेमधून आलेली फौज उतरली आहे. बिटिशांनीं माडागास्कर हस्तगत केला आहे, त्यांतल्या धडाडीचा ह्या सर्व तयारीच्या कामीं उत्कृष्ट उपयोग होणार आहे.

### कारखान्यांचा युद्धविषयक सक्तीचा विमा

वरील विम्याच्या अर्जाचे फॉर्म छापून तयार होत आहेत. ते मागवून व भरून कारखानदारांनीं पहिल्या तिमाहीच्या हप्त्यांसह सरकारी एजंटांकडे पाठवावे. आगीचा अथवा अपघाताचा विमा उतरविणाऱ्या कांहीं कंपन्यांना सरकारनें आपले एजंट नेमलेले आहे. ह्या एजंट—कंपन्यांपैकी एकादीकडे कारखान्याचा आगीचा विमा उतरविलेला असेल तर तिचेमार्फतच युद्धविषयक सक्तीचा विमा उतरविणें इष्ट आहे. २० मेचे पूर्वी कारखान्यांचे विमे उतरण्यांत आले पाहिजेत. ह्या विम्यांचे पॉलिसीवर स्टँप ड्यूटी माफ आहे.

## सहकारी क्रेडिट सोसायटीचा सेक्रेटरी

(रा. ब. गं. मु. काळभोर ह्यांच्या खालील लेखांत शेती पतपेढ्यांच्या सेक्रेटरींच्या नेमणुकीबाबत योजना पुढें मांडली आहे. तिची चर्चा होऊन तिच्यासंबंधांत कोणास सूचना करावयाच्या असतील त्या त्यांचेकडे पाठवण्यांत याव्या अशी त्यांची इच्छा आहे.)

(१)

अलिकडे शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, वगैरे अनेक प्रकारच्या चळवळी सुरू असून त्या चालविण्याकरितां अनेक संस्था व सोसायट्या स्थापन झालेल्या आहेत. कांहीं ठिकाणीं अशा संस्थांवर ऑनररी सेक्रेटरी असतात. परंतु असे ऑनररी सेक्रेटरी बहुतेक कार्याला वाहून घेणारे असले कारणानें त्यांचे हातून संस्थेस अपायकारक अशीं कृत्यें होत नाहींत. शिवाय अशा संस्थेचे चेअरमन अगर प्रेसिडेन्ट तितक्याच उत्साहाचे असले कारणानें त्यांची सेक्रेटरीचे कामावर योग्य नजर असते. म्हणून संस्थेस बाधक अशीं कृत्यें होत नाहींत. परंतु ऑनररी सेक्रेटरीचे हातून लिहिण्याचीं वगैरे कामें स्वतांचीं कामें संभाळून बक्शीर होणें फार कठीण जातें. म्हणून अशा ठिकाणीं पगारी सेक्रेटरी त्यांचे मदतीस दिले जातात. अशा पगारी सेक्रेटरींवर, चेअरमन, प्रेसिडेन्ट अगर ऑनररी सेक्रेटरी यांची योग्य नजर असलेकारणानें त्यांचे हातून संस्थेस विघातक असें कांहींच घडून येण्याचा संभव असत नाहीं. येथें एक गोष्ट नमूद करणें आवश्यक आहे कीं, वरील तऱ्हेच्या संस्था बहुतेक शहराचे ठिकाणीं अगर जनता साधारण सुशिक्षित म्हणजे अशा संस्था चालविण्याचें ज्ञान ज्यास्त चांगलें असतें अशा ठिकाणीं स्थापन झालेल्या असतात. तसें असूनहि अशा ठिकाणीं पगारी सेक्रेटरी असल्यास त्याजवर योग्य दाब ठेवण्याचा प्रयत्न संस्थेचे सर्व अधिकारी करीत असतात. यावरून एक गोष्ट सिद्ध होते कीं, कोणत्याहि पगारी सेक्रेटरींवर योग्य दाब असल्यासेरीज त्याचेकडून संस्थेस विघातक असें कृत्य होण्याचें टाळतां येणें शक्य नाहीं.

हिंदुस्तानांतील अफाट बहुजन समाज शिक्षणांत फारच मागें असलेकारणानें, कांहीं शहरांतूनसुद्धां म्युनिसिपालिटी, लोकलबोर्ड वगैरे लोकमतानुवर्ती संस्था पक्षोपपक्षामुळें लोकहिताचे विरुद्ध कामें करतात व तशीं कामें न करण्याबद्दल व कारभार सुधारणेबद्दल ताकिदी देऊनसुद्धां अशा संस्था न सुधारलेमुळें सस्पेंण्ड करण्याची पाळी बरेच वेळा सरकारवर आलेली आहे, याची जाणीव बहुतेकांस आहेच. संस्था चालविण्याचें शिक्षण शहराचे ठिकाणींसुद्धा जर इतकें कमी प्रमाणांत आहे, तर खेडेगांवांत जेथें निव्वळ अशिक्षित शेतकऱ्यांचा भरणा आहे व जेथें आंगठेवाले यांचें प्राबल्य आहे, तेथें लोकमतानुवर्ती संस्था चांगल्या तऱ्हेनें चालकांवर योग्य दाब ठेवल्यासेरीज चालविल्या जातील, अशी अपेक्षा करणें शहाणपणाचें आहे, असें कोणीही सुज्ञ माणूस म्हणणार नाहीं. मुंबई इलाख्यांत को-आपरेटिव्ह चळवळ सुरू होऊन आज अदमासें ४० वर्षे झालीं आहेत. तेव्हांपासून खेडोपाडीं स्थापन झालेल्या सोसायट्यांवर योग्य सेक्रेटरीची निवड न करितां अगर त्यांचेवर योग्य दाब न ठेवतां त्यांचे नोकरीची व पगाराची शाश्वतीची वगैरे कोणतेहि प्रकारची तजवीज न करितां त्या उत्तम तऱ्हेनें चालाव्यात अशी अपेक्षा करणें किती विलक्षण आहे, हें सहज ध्यानांत येईल. अशा वेळीं प्रत्यक्ष कृती लोकांस पटवून देऊन सोसायट्यांची उपयुक्तता दाखविणारा एक सेक्रेटरी शंभर व्याख्यात्यांपेक्षां जास्त काम करून दाखवील, असा आमचा ग्रह झालेला आहे. एखाद्या सोसायटीपासून चांगल्या रीतीनें तिचा फायदा त्या खेड्यांतील बऱ्याच लोकांस होऊं लागला म्हणजे आसपासचे १० ते २० खेड्यांतील लोकांस आपले गांवांत अशी सोसायटी असावी अशी साहाजिकच इच्छा उत्पन्न होईल. असें झालें तरच सहकारी चळवळीच्या तत्त्वाचें योग्य प्रकारें प्रसरण होत आहे अशी खात्री बाळगण्यास हरकत नाहीं. परंतु ही गोष्ट वर वर्णन केल्याप्रमाणें वागणारे सेक्रेटरी व त्यावर दाब ठेवणारे अधिकारी लाभल्यासच शक्य आहे, हें उघड आहे.

को-ऑपरेटिव्ह चळवळ प्रथम सुरू झाली, तेव्हांपासून सोसायट्यांच्या सेक्रेटरीच्या प्रत्येक हालचालीकडे जसें काळजीपूर्वक लक्ष द्यावयास पाहिजे होतें तसें दिलें गेलें नाहीं, असें मोठ्या दिलगिरीनें म्हणावें लागतें. प्रथम या चळवळीवर देखरेख करण्याचें काम शहरांतील बुद्धिजीवी माणसांकडे सोंपविण्यांत येऊन प्रॉ. को. इन्स्टिट्यूट या नांवाची संस्था अस्तित्वांत आली, व तीस सरकाराकडून भरभक्कम ग्रँट मिळाल्यामुळें जिल्हा इन्स्टिट्यूटसारख्या संस्था चोहोंकडे स्थापन करण्यांत आल्या व त्या शाखांच्या सभासदांमार्फत अशिक्षित व मूक जनतेस सहकारी तत्त्वाचे धडे देण्यांत येऊं लागले. परंतु अशा सभासदांपैकीं सेक्रेटरीच्या परिस्थितीबद्दल कोणताच प्रयत्न कोणाचेहि हातून झालेला दिसत नाहीं. फक्त सरकारी मिळत असलेली ग्रँट, वर्षाच्या अखेरीपर्यंत, प्रवास भत्ता, क्लास खर्च व परिषदा यांमध्यें कसा खर्च होईल एवढ्याच बाबीकडे विशेष लक्ष दिलें जात होतें. पुढें हा उपक्रम टाकाऊ आहे व त्यापासून खेड्यांतील जनतेस कोणत्याच तऱ्हेनें फायदा झालेला नाहीं असें सरकारास वाटून त्यांनीं ती प्रथा बंद पाडली व त्यांनीं यूनिअन्सची स्थापना करून त्यांमार्फत सोसायट्यांवर योग्य देखरेख ठेवण्याचा उपक्रम सुरू करण्यांत आला. त्यानंतर जिल्हा युनिअन बोर्ड, व नुकतेच प्रॉव्हिन्शिएल बोर्ड या संस्था अस्तित्वांत आल्या आहेत. परंतु यूनिअन्सच्या सौम्य देखरेखीमुळें योग्य दाब बसला नाहीं व अशा युनिअन्सवर देखरेख करणाऱ्या अनेक संस्था जरी निर्माण झाल्या तरी त्यांचा तादृशहि उपयोग नाहीं अशी आमची समजूत आहे.

---

### युद्धाच्या धोक्याबाबत कारखान्यांचा विमा

युद्धामुळें कारखान्यांस असलेल्या धोक्याचा विमा उतरण्याची योजना सरकारनें केली आहे, तिच्या संबंधांतल्या अडचणी व त्या दूर करण्याची आवश्यकता ह्यांचा विचार पुणें येथें गेल्या आठवड्यांत मराठा चेंबरच्या विद्यमानें भरलेल्या व्यापाऱ्यांच्या सभेंत करण्यांत आला. मुंबईच्या इंडियन चेंबर ऑफ कॉमर्सनें ह्याच प्रश्नावर कित्येक विधायक सूचना हिंदुस्थान सरकारकडे तारेनें पाठवल्या आहेत. कारखान्यांच्या विम्याचा सरकारी वटहुकूम अधिक स्पष्ट करण्यांत यावा, त्याचें क्षेत्र व्यापक केलें जावें आणि त्यांत शत्रूच्या हातीं जाण्याच्या सर्व मालमत्तेचा अंतर्भाव व्हावा आणि शत्रूस उपयोगी पडूं नये म्हणून नाश केलेल्या मालमत्तेचें सबंध नुकसान भरून देण्यांत येण्याची तरतूद असावी अशा दुरुस्त्या चेंबरनें सुचवल्या आहेत. विम्याच्या प्रिमियमचे सध्याचे दर भारी आहेत असा अभिप्राय तिनें व्यक्त केला असून ह्या बाबतींतले नियम प्रसिद्ध होण्यापूर्वी त्यांच्याविषयींचें आपलें मत प्रकट करण्याची संधि व्यापारी वर्गास देण्यांत यावी असें चेंबरनें आपल्या तारेंत म्हटलें आहे. ह्या सूचनांचा योग्य परामर्श हिंदुस्थान सरकाराकडून घेतला जाईल अशी आम्हांस आशा आहे.

# स्फुट विचार

## साखरेची नियंत्रित किंमत वाढली

हिंदी कारखान्यांत तयार होणाऱ्या साखरेच्या विक्रीचें व बाजारभावाचें नियंत्रण हिंदुस्थान सरकारनें स्वतःच्या हातीं घेतलें आहे आणि त्यासाठी एका खास अधिकाऱ्याची नेमणूक केली आहे ह्याची माहिती मागें देण्यांत आलीच आहे. सध्याच्या युद्धपरिस्थितींत ह्या सरकारी नियंत्रणाचा उद्देश काय आहे ह्याचें विवेचनहि आम्हीं केलें आहे. कारखानदारांस मिळणारा साखरेचा भाव आणि ऊस पिकवून तो त्यांस विकणाऱ्या शेतकऱ्यांस दिल्या जाणाऱ्या किंमती ह्यांचा परस्पर संबंध साखरेच्या किंमती निश्चित करण्यांत हिशेबांत घेतला जातो हें येथें लक्षांत ठेवलें पाहिजे. संयुक्त प्रांत आणि बिहार ह्या प्रांतांतील बहुसंख्य कारखान्यांस लागणारा ऊस शेतकऱ्यांकडून पुरवला जातो आणि ह्या मालास योग्य किंमत दिली जावी ही गोष्ट महत्त्वाची आहे. पण साखरेस चांगला भाव आला तरच उसास चांगली किंमत देणें कारखानदारांस परवडेल हें उघड आहे. ह्यासाठी साखर व ऊस ह्यांच्या किंमतींचा मेळ घालूनच गेल्या महिन्यांत हिंदुस्थान सरकारच्या नियंत्रक अधिकाऱ्यांनीं निरनिराळ्या प्रतीच्या साखरेचे भाव ठरवून दिले होते. तथापि हे भाव शेतकऱ्यांस उसाच्या योग्य किंमती मिळाव्या हा उद्देश सफल होण्यास पुरेसे नाहींत असें अलिकडे चौकशीअंतीं हिंदुस्थान सरकारास दिसून आलें आहे. म्हणून त्यांनीं साखरेचे भाव दर मणास साडेसात आणे ह्याप्रमाणें, चढवले जावे, असा हुकूम नुकताच सोडला आहे. निरनिराळ्या प्रतींच्या साखरेच्या किंमतींचें कोष्टकहि प्रसिद्ध करण्यांत आलें आहे.

---

## चढाईचें धोरण स्वीकारा

जनरल अलेक्झांडर ह्यांच्या हाताखालच्या आणि चिनी फौजांनीं ब्रह्मदेशांत अत्यंत अवघड परिस्थितींत जपानला अडवून धरल्यामुळें हिंदुस्थानवरचा शत्रूचा हल्ला लांबणीवर पडला आणि त्या देशास लढाऊ तयारी करण्यास त्यामुळें अवसर सापडला असला तरी आतां सर्वांनीं जुटीनें व निश्चयानें लढ्यास सज्ज झालें पाहिजे, ह्या आशयाचा संदेश गेल्या गुरुवारीं व्हाइसरॉय लॉर्ड लिन्लिथगो त्यांनीं आपल्या रेडिओवरील भाषणांत जनतेस दिला. जनरल वेव्हल ह्यांनीं कांहीं दिवसांमागें सांगितल्याप्रमाणें हिन्दुस्थानांत लढाऊ साधनें अधिकाधिक सज्ज ठेवण्यांत येत आहेत तरी सर्व बिन-लढाऊ लोकांची त्या घटनेस व प्रयत्नांस पाठिंबा देण्याची आवश्यकता असल्याचें त्यांनीं प्रतिपादलें. आपणांजवळ शस्त्रें नाहींत म्हणून नागरिकांनीं अडून बसण्याचें कारण नाहीं; त्यांस आपापल्या परीनें युद्धास सहाय करतां येईल. प्रस्तुत युद्धांतले संयुक्त राष्ट्रांचे उद्देश स्पष्ट आहेत आणि ते सफल होण्याविषयींची खटपट प्रत्येकानें करावयाची आहे. शक्य व योग्य आहे त्यांनीं सैन्यांत शिरावें, संरक्षणासाठी नागरिक दलांत इतरांनीं सामील व्हावें, स्वतःचा रोजचा अनाठाई खर्च सर्वांनीं कमी करावा, शेतकऱ्यांनीं धान्याची पैदास वाढवावी, जनतेनें अगदी जरुरीच्या कामांवांचून रेल्वे-प्रवास करण्याचें टाळावें, इत्यादि युद्धसहायक बाबी सामान्य जनतेच्या आटोक्यांत आहेत. आपला दर्जा व नित्याचा व्यवसाय कांहीं असो, आपणांस युद्ध जिंकण्याच्या कामीं अप्रत्यक्ष रीतीनें पुष्कळ कार्य करतां येण्यासारखें आहे हें व्हाइसरॉय ह्यांनीं तपशीलवार उदाहरणें देऊन समजावून सांगितलें. “ बेफिकीरपणा सोडून देऊन लढाऊ वृत्तीचा अंगिकार करा आणि चढाऊ धोरणानें युद्धांत यश प्राप्त होण्यास सहाय द्या ” हें त्यांच्या संदेशाचें सार आहे. राष्ट्रीय आघाडी निर्माण करण्याचे संघटित प्रयत्न सध्या चालू आहेत त्यांस स्फूर्तिदायक होईल असें त्यांचें भाषण झालें.

---

## हिंदुस्थान सरकारचें द्रव्यसहाय

खाण्याच्या धान्यांची पैदास वाढवणें आणि आखूड धाग्याच्या कपाशीच्या ऐवजी त्यांचीं पिकें काढणें ह्याबाबतच्या योजना अमलांत आणण्याचें प्रांतिक सरकारांनीं ठरवलें आहे. नेहमी आपल्या जमिनींत कपाशीचें पीक करणाऱ्या शेतकऱ्यांस हा बदल करणें अवघड जाऊं नये म्हणून त्यांस विशेष सवलती व सहाय देणें अगत्याचें असण्याची जाणीव मध्यवर्ती व प्रांतिक सरकारांस आहे. हिंदुस्थान सरकारपाशी कपाशीच्या आयातीवर बसवण्यांत आलेल्या जकातीच्या पैशाचा निधी जमा झाला आहे, व होत आहे त्यामधून शेतकऱ्यांस सहाय देण्याकरितां त्यांनीं एक कोटि रुपये बाजूस काढले आहेत. मध्यप्रांतांत आखूड धाग्याच्या कपाशीचें पीक विस्तृत असल्यानें पंचवीस लक्ष रुपये वरील फंडामधून तेथील सरकाराच्या स्वाधीन करण्यांत आले आहेत. अशा सहायाचे बाबतींत ह्या आपापल्या योजना इतर प्रांतांच्या सरकारांनीं मध्यवर्ती सरकाराकडे पाठवाव्या असें त्यांस कळवण्यांत आलें आहे. प्रतिवर्षी कपाशीखाली असणाऱ्या जमिनींपैकीं तीस चाळीस टक्के क्षेत्रांत शेतकऱ्यांनीं धान्याचीं पिकें करावीं असें मध्यप्रांताच्या सरकारानें सुचवलें असून दर एकरी दोन रुपये ह्याप्रमाणें सहाय देण्याचें आपलें धोरण त्यांस कळवलें आहे. कित्येक जिल्ह्यांतल्या जमिनीच्या साऱ्याची वसुली त्यांनीं तहकूब केली आहे आणि कांहीं सारा माफहि केला आहे. धान्याचीं पिकें काढण्यास शेतकऱ्यांस उत्तेजन देणें हा ह्या सर्व योजनेचा उद्देश आहे. तो यशस्वी होण्यास हिंदुस्थान सरकारच्या द्रव्यसहायाचा चांगला उपयोग होणार आहे.

---

## हिंदी चित्रपटांची लांबी कमी होणार

ह्यापुढें ज्या नवीन हिंदी चित्रपटांचें काम सुरू करण्यांत येईल, त्यांची लांबी ११ हजार फुटांपेक्षा अधिक भरतां कामा नये असें सरकारनें ठरविलें आहे. हिंदुस्थानांत कच्ची फिल्म तयार होत नसल्याकारणानें व आयात अवघड होत चालल्यामुळें फिल्मची काटकसर करणें आवश्यक झालें आहे. हिंदी चित्रपटांच्या प्रदीर्घतेबद्दलची तक्रार फार जुनी आहे. हिंदी फिल्म्सची लांबी कमी केल्यास त्या अधिक करमणूक करूं शकतील असें मत बंगाल बोर्ड ऑफ फिल्म सेन्सॉर्सच्या अध्यक्षांनीं नुकतेंच व्यक्त केलें होतें. विशेषतः दक्षिण हिंदुस्थानांत तयार होणाऱ्या चित्रपटांची लांबी फारच जास्त, कधीं कधीं १५½ हजार फुटांहूनहि अधिक असते. १९४१ सालीं दाखविण्यांत आलेल्या ४२ हिंदी चित्रपटांच्या लांबीची सरासरी १२½ हजार फुटांपेक्षा थोडी अधिक भरली. ग्रेट ब्रिटनमध्यें चित्रपटांची लांबी कमी असते तरी तेथील सरकारनें फिल्म कंपन्यांना फिल्म कमी वापरण्यासंबंधीं

सूचना दिलेली आहे. हिंदी सरकारचा प्रस्तुत हुकूम दुहेरी फायद्याचा आहे. कच्च्या फिल्मची काटकसर ह्यामुळें घडून येईल हा तात्कालिक फायदा झाला. त्याबरोबरच हिन्दी चित्रपट-निर्मात्यांस कमी लांबीमध्यें आपल्या फिल्म्स आवरण्याचें शिक्षण आपोआप मिळेल. देशी चित्रपट दाखविणाऱ्या सिनेमागृहांतून शिक्षणविषयक फिल्म्सची अथवा प्रचारपटांची एक दोन रिळें दाखविण्यासहि त्यामुळें सवड मिळेल.

---

### शत्रूच्या प्रतिकारार्थ राष्ट्रीय फळी

ब्रह्मदेशांतील आपल्या मोहिमेनंतर जपान हिंदुस्थानाकडे वळण्याचा निःसंशय संभव आहे. त्यासंबंधांतले शत्रूचे बेत कांहीं असोत, त्याचे विरुद्ध हिंदुस्थानचें संरक्षण करण्याचें महत्त्व सरकार व जनता ह्यांस पटलें आहे. शत्रूच्या लढाऊ प्रतिकाराची सिद्धता लष्करी अधिकाऱ्यांनीं चालवली असल्याचें आश्वासन जनरल वेव्हल त्यांनीं दिलेंच आहे. तथापि, लोकांस भुलथापा देणें, त्यांच्यामध्यें भीतीचें वातावरण निर्माण करणें, सामाजिक व्यवहारांत गोंधळ उत्पन्न करणें अशीं कृत्यें शत्रूकडून होतील, त्यांस जनतेनेंच संघटितपणानें तोंड दिलें पाहिजे. सध्याचें युद्ध केवळ सशस्त्र शिपायांनीं रणांगणांवर चालवावयाच्या लढायांचें नसून, त्यांत समाजाचे सर्व घटक खेचले जात आहेत. त्याकरितां सबंद जनतेनें शत्रूच्या प्रतिकारासाठी कंबर बांधली पाहिजे. राजकीय, जातीय इत्यादि सर्व मतभेद बाजूस ठेवून प्रत्येकानें त्या कामांतला स्वतःचा भाग उचलला पाहिजे. त्या घटनेस मूर्त स्वरूप देण्याचे हेतूनें व्हाइसरॉय आणि प्रांतिक गव्हर्नर ह्यांनीं शत्रूच्या प्रतिकारार्थ राष्ट्रीय फळी निर्माण करण्याची सूचना केली आहे. बिनसरकारी संघटनेनें हें कार्य व्हावयाचें असल्यानें मुंबई विश्वविद्यालयाचे व्हाइस चॅन्सेलर, श्री. मसानी, ह्यांचेकडे ह्या प्रांतांतील शत्रु-प्रतिकार योजनेचें नेतृत्व सोपवण्यांत आलें आहे. ह्या संघटनेचें लोण सर्व जिल्ह्यांत, तालुक्यांत, शहरांत व खेड्यांत पोंचवलें जाईल. स्वतःचें रक्षण आणि शत्रूचा प्रतिकार ह्यांसाठी योजावयाच्या अनेक उपायांची माहिती जनतेस पुरवली जाईल आणि विश्वास, जूट व शिस्त ह्यांचें वातावरण सर्वत्र निर्माण करण्याचा संघटित प्रयत्न होईल. ह्या योजनेंत प्रत्येक नागरिकास भाग घेतां येईल आणि त्यानें तो तसा घेणें अगत्याचें आहे. विविध कार्यें निरनिराळ्या गटांकडे सोपवण्यांत येतील आणि त्यांच्या मार्गदर्शनाची व्यवस्था केली जाईल. राष्ट्रीय फळीची कल्पना यशस्वी करण्यांत प्रत्येक नागरिकाचें हित असल्यानें त्यानें तें साधणें स्वतःचें कर्तव्य आहे, ह्या भावनेनें कार्य करणें अगत्याचें आहे. बेफिकीरपणा आणि कुचराई हीं सद्यःस्थितींत घातक आहेत हें कोणीहि विसरूं नये आणि हल्लीचे आपले मतभेद बाजूस सारून प्रत्येकानें सहकार्यानें कामास लागावें हें उचित आहे.

---

### हिंदी कपाशीचें पीक व उत्पादन

सबंद हिंदुस्थानाचा, कपाशीच्या लागवडीचा व उत्पादनाचा सरकारी ताजा अंदाज प्रसिद्ध झाला आहे, त्यांत खालील आकडे आहेत :—

| | | |
|---|---|---|
| लागवड | २,३५,४७,००० | एकर |
| उत्पादन | ५०,८०,००० | गांठी |


पुणें सेंट्रल को. ऑपरेटिव्ह बँक, लि. पुणें २.

## नोटीस.

ह्या नोटीसी अन्वयें सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं, सोमवार ता. ११ मे १९४२ पासून पुनः जाहीर करीपर्यंत बँकेच्या हेड ऑफिसच्या कामाच्या वेळा शनिवारखेरीज इतर दिवशीं सकाळीं ९-३० ते दुपारीं २ व शनिवारीं सकाळीं ९-३० ते १२-३० याप्रमाणें राहातील.

द. वि. चितळे.
मॅनेजिंग डायरेक्टर

लक्ष्मीरोड, पुणें. ७-५-१९४२.

---

## दि बँक ऑफ महाराष्ट्र. लि.

कामाच्या वेळांत बदल

बँकेचे भागीदार, खातेदार व बँकेशीं संबंध येणाऱ्या सर्व लोकांस विनंतिपूर्वक कळविण्यांत येतें कीं बँकेच्या मुख्य कचेरीच्या कामाची वेळ शनिवार व सुट्टीचे दिवस खेरीज करून सकाळीं १० ते ३॥, शनिवारीं १० ते १ पर्यंत होती ती सोमवार ता. ११-५-४२ पासून अनुक्रमें सकाळीं

९॥ ते २
व
९॥ ते १२॥

करण्यांत आली आहे.

M. V. GOKHALE
मॅनेजर.

पुणें शहर, ता. ७।५।१९४२.

---

**L.S.G.D.** Training Classes for officers of Local Self-Government Service under the auspices of the Government of Bombay and the Local Self-Government Institute, will begin from *1st June 1942 at Bombay, Ahmedabad and Poona.*

**Fees Rs. 75**

*Apply for Prospectus to—*

**THE HONORARY SECRETARY,**
**410, Shanwar, Poona 2**
OR
**THE DIRECTOR,**
**Elephinstone Circle, Fort, Bombay**

## हैद्राबाद डोमिनिअन बँकेचें कार्य

निजाम संस्थानांत सहकारी बँकिंग व्यवहारास अलीकडेच सुरवात करण्यांत आली आहे. १९१५ पर्यंत हा व्यवहार सुरू करण्यांत आला नव्हता. त्या वर्षी मर्यादित जोखीम असलेली एक मध्यवर्ती सोसायटी म्हणून हैद्राबाद सहकारी मध्यवर्ती बँक स्थापण्यांत आली आणि त्याचे मागील वर्षी पास झालेल्या हैद्राबाद को-ऑपरेटिव्ह सोसायटीज् ॲक्टान्वयें तिची नोंद करण्यांत आली. या बँकेच्या कारभारास फक्त ७६ सभासद मिळाल्यावर प्रारंभ झाला. या संख्येपैकीं व्यक्तिशः सभासद ७० असून बाकीचे ६ पतपेढ्या होते. जमा झालेलें शेअरांचें भांडवल सुरवातीस केवळ २४,११० रुपये होतें, परंतु या बँकेची भरभराट ताबडतोब सुरू झाली. ठेवी, व जनतेस आणि प्राथमिक सोसायट्यांना दिलेल्या कर्जाची रकम पहिल्या वर्षीच प्रत्येक बाबतींत वरील आंकड्याच्या सुमारें तिप्पट होती. नंतरच्या दहा वर्षांत जिल्ह्यांतून अशाच प्रकारच्या इतर अनेक बँका स्थापण्यांत आल्या. मध्यंतरींच्या काळांत संस्थानासाठीं एका आर्थिक मदत करणाऱ्या सहकार केन्द्राची वाढत्या प्रमाणांत सर्वत्र जाणीव होऊं लागली, आणि १९२४ मध्यें हैद्राबाद को-ऑपरेटिव्ह सेंट्रल बँकेचें एका मुख्य बँकेंत रूपान्तर करण्याचें आणि त्यासंबंधांत ५ लाख रुपयांचें अधिकृत भांडवल १० लाख रुपयांपर्यंत वाढविण्याचें १९२४ मध्यें ठरविण्यांत आलें. अशा प्रकारें को-ऑपरेटिव्ह डोमिनिअन बँक म्हणून या बँकेनें आपल्या कार्यक्षेत्राच्या दुसऱ्या टप्प्यांत पदार्पण केलें.

तथापि, थोड्या जिल्ह्यांतील प्राथमिक सोसायट्यांशीं प्रत्यक्ष संबंध अनेक कारणांमुळें चालूच असे. डोमिनिअन बँकेनें अगोदरच दिलेली कर्जाऊ रकम स्वतःकडे घेण्यास स्थानिक मध्यवर्ती बँका असमर्थ होत्या. या अडचणींचें लवकर निवारण करण्यांत आलें. १९१५ मधील तिचें जमा झालेलें भांडवल जें अगदीं थोडें म्हणजे २४,११० रुपये होतें तें गतवर्षीपावेतों ५,६०,५०५ रुपये इतकें वाढलें, आणि राखून ठेवलेली एकंदर रकम जवळजवळ आतां १० लाख रुपये झाली आहे. राखून ठेवलेल्या रकमेचा प्रत्यक्ष आंकडा ९,५८,४९७ रुपये आहे. स्वतःची आर्थिक स्थिति जास्त बळकट व्हावी म्हणून राखून ठेवलेल्या रकमेंत सारखी भर घालण्याचें बँकेचें धोरण आहे.

बँक स्थापण्यांत आल्याच्या वर्षी म्हणजे १९१५ मध्यें जमा करण्यांत आलेल्या ठराविक मुदतीच्या ठेवींची रकम ७०,४९७ होती. ती गतवर्षी १९,३५,५२१ रुपये इतकी होती. बँकेच्या चालू आणि सेव्हिंग अकाउंट्समध्यें इ. स. १९२३ सालीं जी अनुक्रमें २२,३११ रुपये व १०,५१० रुपये रकम होती ती गतवर्षी अनुक्रमें २,३६,६२६ आणि ४,३५,४६८ रुपये इतकी वाढली. गतवर्षीच्या शेवटीं मध्यवर्ती बँका व पतपेढ्या यांच्या ठेवींची एकंदर रकम ५,१३,०९१ रुपये होती. इ. स. १९२४ पर्यंत मध्यवर्ती बँकांना दिलेल्या कर्जाऊ रकमेवर शेंकडा ९ टक्के व्याज आकारण्यांत आलें होतें. त्यानंतर वेळोवेळीं हा व्याजाचा दर कमी करण्यांत येऊन जानेवारी १९४० मध्यें तो शेंकडा ५ टक्के इतका करण्यांत आला. मध्यवर्ती बँकांना दिलेल्या सर्व कर्जावरील व्याजाचा दर गतवर्षीच्या आक्टोबर महिन्यांत शेंकडा ४॥ टक्के करण्यांत आला. गेल्या दहा वर्षांत डोमिनिअन बँकेनें मध्यवर्ती बँकांना दिलेल्या कर्जाची प्रतिवर्षाची सरासरी ५ लाख रुपये होती.

सहकारी तारणावर देण्यांत येत असलेल्या पैशाच्या व्यवहाराविषयीं धोरण बांधण्यासाठीं सरकारी नोकरांना कर्ज देण्यास या बँकेस सरकारनें परवानगी दिली आहे. नोकराच्या पगाराच्या बारापट कर्ज देण्याची मर्यादा घालण्यांत आली असून त्याचा व्याजाचा दर शेकडा ६ टक्के ठरविण्यांत आला आहे. साठ हप्त्यांत ही कर्जाची रकम फेडावयाची असते. गतवर्षीपावेतों येणें कर्जाची एकंदर रकम ७,८६,७५७ रुपये इतकी होती, आणि व्यवहाराच्या या बाबतींत गेल्यां सहा सालांत बँकेस मिळालेल्या वार्षिक फायद्याची सरासरी ४८,००० रुपये होती. स्वतःच्या मालकीच्या इमारतींत ही बँक असून आपल्या नोकर लोकांसाठीं तिनें 'प्रॉव्हिडंट फंड' उभारला आहे. प्रत्येकानें आपल्या पगाराचा $\frac{1}{16}$ वा हिस्सा या फंडास द्यावयाचा असतो. दर वर्षाच्या अखेरीस नोकराची जितकी रकम या फंडास आली असेल तितकीच रकम बँक स्वतः या नोकरांच्या नांवानें सदरील फंडांत जमा करते व या दोन्ही रकमेवर शेंकडा ६ टक्के व्याज दिलें जातें. शिक्षण व प्रचारकार्यासाठीं गतवर्षी सेंट्रल को-ऑपरेटिव्ह युनिअनला आपणास मिळालेल्या फायद्यांतून बँकेनें २,००० रुपये दिले.

## होळकर संस्थानांतील कापडाच्या गिरण्या

इंदूरमधील पहिल्या कपास कापडाच्या गिरणीची स्थापना १८६६ सालीं झाली. त्यावेळीं, इंदुरापर्यंत आगगाडीचा रस्ता गेलेला नव्हता, म्हणून यंत्रसामुग्रीच्या वहातुकीस हत्तींचें सहाय घ्यावें लागलें. १९०४ सालीं ह्या गिरणींत ४६६ माग व २७,९०० चात्या होत्या. इंदूरच्या गिरण्यांची प्रगति खालील तक्त्यावरून दिसून येईल:—

| वर्ष | मागांची संख्या | चात्यांची संख्या | कामगार संख्या | कापडाचें उत्पादन (लक्ष पौंड) |
|---|---|---|---|---|
| १९१७ | २,३४१ | ८०,९१२ | ४,४२५ | ८५ |
| १९२२ | ३,३१९ | ८८,[illegible] | ७,६०७ | ११७ |
| १९२७ | ४,६७४ | १,५७,२६२ | १०,१५९ | २०६ |
| १९३२ | ५,५१४ | १,९१,९३० | १२,७३४ | ३३६ |
| १९३६ | ५,८५४ | २,०७,२०२ | १५,४१९ | ३७१ |
| १९४० | ६,२९६ | २,१४,७२४ | १९,८६५ | ४२८ |

होळकर संस्थानांतील प्रगतीची हिंदुस्थानांतील प्रगतीशीं तुलना येथें केली आहे:—

| | होळकर संस्थान | | हिंदुस्थान | |
|---|---|---|---|---|
| | माग | चात्या | माग | चात्या |
| १९१७ | २,३४१ | ८०,९१२ | १,१४,६२१ | ६७,३८,६९७ |
| १९३९ | ६,०७९ | २,०२,००७ | २,०१,००० | १००,५९,००० |

इंदूरमधील गिरण्यांत १½ कोटि रुपये वसूल भांडवल असून त्याचें उत्पादन १९ कोटि वारांपेक्षां अधिक आहे. एकूण हिंदी उत्पादनाच्या ५% इतकें तें लवकरच होईल. इंदूर हें कपाशीच्या मुलखाचे केंद्रस्थानीं आहे. त्याचप्रमाणें तेथून तयार माल बाहेर पाठविण्याचे दृष्टीनेंहि इंदूरचें स्थान सोईचें आहे. मध्यप्रांतांतील कोळशाचा इंदूरला जाण्यास मुंबई अथवा अहमदाबाद् येथें जाण्यापेक्षां कमी खर्च लागतो. मजुरीचे दरहि इंदूरमध्यें कमी आहेत. तेथील मजूरवर्ग संघटित नाहीं.

महायुद्ध दाराशीं आलें
परदेशी औषधें
दुर्मिळ व महाग झालीं
पण
भिण्याचें कारण नाहीं !!!
— कारण —
आयुर्वेद रसशाळा पुणें लि०
या देशी औषधाच्या प्रसिद्ध कारखान्यानें
तयार केलेलीं
● रक्तवर्धक, ● उपनाह,
● बालजीवन, ● कॅल्सीप्राल
*इत्यादि पेटंट, स्टँडर्ड व लोकप्रिय औषधें खात्री पटल्यामुळें*
★ डॉक्टर्सहि वापरूं लागले आहेत. ★
दरसाल बिनचूक नफा वाटणाऱ्या ह्या कंपनीचे
शेअर्स व औषधें मागवा.
आयुर्वेद रसशाळा पुणें लि०
मुख्य दुकान गणपति चौक, लक्ष्मीरोड, पुणें २.

N. V. WADNERKAR
Gold & Silver Smith, Jeweller & Engraver,
Electro-plater & Manufacturer of Sporting
Trophies, Medals, Cups etc.
- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -
POONA CITY.


मधुमेहावरील
औषध
तीन आठवड्यांचे
औषधास फक्त रु. ७
— मागविण्याचा पत्ता —
मॅनेजिंग डायरेक्टर, रूरल प्रॉडक्ट्स
कंपनी लिमिटेड.
९२३ ए, सदाशिव, पुणें २.

DECCAN BOOK STALL
Booksellers, Publishers & Subscription Agents
Fergusson College Road, Poona No. 4
(1) We stock and supply Educational books, General books & Library books.
(2) We supply Government of Bombay and Government of India publications.
(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.
(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.

'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

अर्थशास्त्र
लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें ३००; किंमत ३ रुपये
या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन
स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.
बंबाचे माडीवर
महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी
बुधवार चौक, पुणें

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व
रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
(टपाल हशील माफ)
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र्

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ८ पुणें, बुधवार, तारीख २० मे १९४२ अंक २०

## काळजीचे दिवस आहेत !

पाऊसकाळची तरतूद
मुंग्यासुद्धां करतात,
आणि बुद्धिमान मनुष्य मात्र
बेफिकीरींत मोठेपणा मानतो !

परिणामः मागें राहाणारांच्या कपाळीं
दैन्य, दुःख, दारिद्र्य.

आयुष्याचा विमा उतरून जीविताच्या सर्व
धोक्याविरुद्ध तजवीज करा.

वेस्टर्न इंडियाची पॉलिसी
म्हणजे संरक्षणाची अत्यंत खंबीर ढाल.

चांगली तजवीज करा. आतां,
या क्षणीं; पुढें वेळ जाईल;
क्षणाचाहि विलंब धोक्याचा.

युद्धजन्य धोक्यासुद्धां सर्व
धोक्यांविरुद्ध

पुणें शाखाः—
१७९, बुधवार,
लक्ष्मीरोड, पुणें २.

वेस्टर्न इंडिया
विमा कंपनी लिमिटेड, सातारा.

# विविध माहिती

**प्री-कॅडेट शाळा**

हिंदी लष्करांत कमिशन मिळविणाऱ्या उमेदवारांची संख्या एकसारखी वाढत आहे. गेल्या वर्षी दरमहा १५० उमेदवार दाखल होत होते; आतां ह्यांची संख्या ३०० चे वर जाते. जे उमेदवार थोडे कच्चे असतात, त्यांस शिक्षण देऊन लायक करण्यासाठी लाहोर येथें प्री कॅडेट स्कूल सुरू केलें तें यशस्वी ठरलें आहे. त्याच धर्तीवर मुंबई प्रांतांत एक शाळा चालू करण्यांत आली आहे. मद्रास प्रांतांत तशी शाळा लवकरच सुरू होईल. उमेदवारांची परीक्षा घेण्यापूर्वीच त्यांस कवाईत, भूगोल व इतर विषयांत तरबेज करणें हा ह्या शाळांचा हेतु आहे. परीक्षेंत जरा कच्च्या वाटणाऱ्या उमेदवारांस लाहोरच्या शाळेंत पक्के करण्याचा यत्न केला जातो.

**युरोपांतील अन्नपुरवठा**

डेन्मार्कमध्यें अन्नपुरवठा भरपूर आहे. नॉर्वे, नेदरलंडस् व झेकोस्लोव्हेकिया येथील पुरवठा युद्धपूर्व पुरवठ्याचे मानानें पुष्कळ कमी असला, तरी त्याचे दुष्परिणाम जाणवण्याइतका अपुरा नाहीं. बेल्जम आणि फ्रान्समधील शहरवासीयांस मधूनमधून अन्नाचा तुटवडा चांगलाच भासतो व युगोस्लाव्हियाचा पुरवठाहि कमी करण्यांत आला आहे. बेल्जम आणि नॉर्वे ह्यांस अत्यावश्यक अन्नाचा पुरवठा होत आहे. ग्रीस, पोलंड व जर्मनाचे ताब्यांतील रशिया येथें मात्र दुःस्थिति आढळते. वरील माहिती ब्रिटिश कॉमन्स सभेंत आर्थिक युद्ध खात्याच्या पार्लमेंटरी सेक्रेटरींनीं दिली.

**युद्धाचे कामीं आले**

चालू युद्धास प्रारंभ झाल्यापासून ३ सप्टेंबर, १९४१ अखेर म्हणजे युद्धाच्या पहिल्या दोन वर्षांत ब्रिटिश साम्राज्याचे एकूण १,८३,५५० सैनिक कामास आले. त्यांची वाटणी ४८,९७३ मृत, ४६,३६३ जखमी, ५८,४५८ युद्धकैदी व २९,७५६ बेपत्ता, अशी आहे.

**इजिप्तमध्यें लोखंडाच्या खाणी**

उत्तर इजिप्तमध्यें नाइल नदीच्या पूर्वेस लोखंड भूपृष्ठाजवळ सापडलें, तेथें २० कोटि टन कच्चें लोखंड मिळूं शकेल. ह्या खाणीचें काम लवकरच सुरू होईल.

**ट्रेझरी बिलें**

गेल्या आठवड्यांत रिझर्व्ह बँकेनें विकलेल्या हिंदुस्थान सरकारच्या २ कोटि रुपयांच्या ट्रेझरी बिलांवर द. सा. द. शे. १ रु. ४ आ. व्याजाचा दर पडला.

**साखरेची किंमत**

साखरेच्या किरकोळ विक्रीची कमाल किंमत दर शेरास ५३ आणे अशी संयुक्त प्रांत सरकारनें निश्चित केली आहे. अलमोरा व गढवाल जिल्हे आणि नैनिताल व डेहराडून हीं पर्वतावरील ठिकाणें येथील भाव तेथील जिल्हाधिकाऱ्यांनीं साखर-वहातुकीचा जादा खर्च लक्षांत घेऊन ठरवावयाचे आहेत.

**कपाशीच्या खरेदीचा करार**

जर्मनीनें तुर्कस्थानाची १७,५५० गाठी कपास खरेदी केली आहे. पुढील मोसमांतहि एवढी कपास घेण्याचा अधिकार जर्मनीनें राखून ठेवला आहे.

**आगीच्या विम्याचा हप्ता**

कराची शहरांत पाण्याचा तुटवडा असल्याकारणानें तेथील आगीच्या विम्याचा हप्ता २५% नें अधिक आहे.

**विम्याचे पैसे मिळविण्याकरितां पत्नीचा खून केल्याचा आरोप**

पत्नीस प्राणघातक अपघात झाल्यास विम्याचे २० हजार रुपये मिळावयाचे होते, ते मिळविण्यासाठी मनसुखानी ह्या कराची येथील सरकारी नोकरानें आपल्या पत्नीस ६० फूट उंचीच्या कड्यावरून समुद्रांत लोटलें, अशा आरोपावर त्याचेवर खटला होऊन त्यास देहांत शासन मिळालें होतें. त्यावर त्यानें दोनदां अपील केलें, तें निरर्थक ठरलें. चीफ कोर्टापुढील तिसऱ्या अपिलांत आरोपी दोषमुक्त ठरला. त्याच्या पत्नीचा पाय घसरून ती पडली व बुडाली असें आरोपीतर्फे सांगण्यांत आलें.

**विजेच्या खपावर पट्टी**

विद्युद्गृहांचें हवाई हल्ल्यांपासून संरक्षण करण्याकरितां येणारा खर्च भागविण्यासाठीं संयुक्त प्रांत सरकारनें विजेच्या खपावर पट्टी बसविण्याचें ठरविलें आहे. ही पट्टी विजेच्या बिलांवर ६१% पेक्षा जास्त असणार नाहीं.

**दरमहा अर्धा लाख सैन्यभरती**

हिंदी लष्करांत दरमहा सरासरीनें ५० हजार सैनिकांची भरती होत आहे. गेल्या डिसेंबरांत ६० हजार सैनिक दाखल झाले. यांत्रिक विभागांत शिकलेल्या उमेदवारांची आवश्यकता आहे. ही उणीव भरून काढण्याकरितां कॉलेजांतून व विश्वविद्यालयांतून उत्साह निर्माण करण्याचा प्रयत्न चालू आहे.

**धडे लिहून घ्या**

अफगाणिस्तानांत कागदाचा व पुस्तकांचा तुटवडा भासत असल्याकारणानें विद्यार्थ्यांना धडे लिहून घेण्यास सांगण्यांत येत आहे.

**मुदत वाढविली**

कारखान्याचा युद्धविषयक धोक्याचा विमा उतरण्याची मुदत २९ मे पर्यंत वाढविण्यांत आली आहे. कारण, त्यास लागणारे फॉर्म अद्याप हातीं आलेले नाहींत.

**मिठाचा तुटवडा**

अफगाणिस्तानांत मिठाचा तुटवडा भासूं लागला आहे, असें समजतें.

**युद्धकैदी**

ब्रिटिश व इटालियन १,०४८ आजारी व जखमी युद्धकैद्यांची देवघेव नुकतीच पार पाडण्यांत आली. इटलीनें जेवढे ब्रिटिश सैनिक कैद केले, त्यांचे दुप्पट इटालियन युद्धकैदी ग्रेट-ब्रिटनचे ताब्यांत आहेत. तुर्की सरकारचे मध्यस्तीनें ही देवघेव पार पडली. १२९ ब्रिटिश युद्धकैद्यांचे बदली ९१९ इटालियन युद्धकैदी देण्यांत आले.

**परीक्षा**

इलेक्ट्रिकल वायरमेन आणि सुपरवायझर्सच्या परीक्षा मुंबई, पुणें व अहमदाबाद येथें ता. २७ जुलै रोजीं सुरू होतील.

**दीर्घकाळ टिकणारी आगकाडी**

पाचशें वेळां ओढली तरी टिकणारी आणि काम देणारी आगकाडी एका शास्त्रज्ञानें तयार केली आहे. ती महाग पडत नाहीं हें विशेष आहे.

# युद्धकालांतहि

## पैसे गुंतविण्याची निर्धोक सोय

### साखरेच्या राष्ट्रीय धंद्याची स्थिति आज विशेष मजबूत आहे म्हणून

—संचालक मंडळ—

(१) श्रीमंत अप्पासाहेब पंत, बी. ए. ( ऑक्सन ), बार—ॲट—लॉ, प्राईम मिनिस्टर ( औंध )
(२) रा. ब. व्ही. ए. ताम्हणे, एम्. एस्सी., एम्. एजी., रिटायर्ड आय. ए. एस., पुणें ४.
(३) डॉ. एन्. एम्. गोडबोले, एम्. ए., बी. एस्सी., पीएच्. डी. ( बर्लिन ), इंडस्ट्रियल केमिस्ट. बनारस हिंदु युनिव्हर्सिटी
(४) श्री. सी. एम्. ऊर्फ बाबासाहेब वारद, लँड्लॉर्ड व व्यापारी, सोलापूर
(५) रावबहादूर जी. जी. शेंबेकर, लँडलॉर्ड व ऊस–तज्ज्ञ, बारामती, जि. पुणें.
(६) श्रीमंत अप्पाजी तिमराव देसाई, जहागिरदार जमगी ( सं. औंध )
(७) श्री. एन्. पी. देसाई, एम्. ए., एलएल्. बी., वकील, विजापूर
(८) श्री बी. डी. पटवर्धन, बी. ए., बी. एस्सी., एलएल् बी., बागलकोट ( मॅ. एजंट्स् नॉमिनी )
(९) श्री. जी. एच. भागवत, बी. एजी., साखरतज्ज्ञ ( एक्स ऑफिशियो ) पुणें २.

# दि शुगरकेन प्रॉडक्टस् ॲन्ड इंडस्ट्रीज लि.

( कंपनी ॲक्टान्वयें मुंबईस नोंदलेली )

### मध्यें पैसे गुंतवून सोन्याच्या संधीचा लाभ घ्या.

उसापासून साखर, मक्यापासून स्टार्च, एरंडीपासून टर्कीरेड तेल इत्यादि बागायती शेतीपासून पक्का माल करण्याच्या धनोत्पादक व व्यवहार्य योजना कंपनीपुढें असून भांडवलावर चांगलेंच व्याज सुटेल. कर्नाटकांतील गलगलें गांवानजिक प्रगतिपर औंध संस्थाननें दिलेल्या आकर्षक सवलतींच्या आश्रयानें कृष्णाकांठच्या गुणवाळ तालुक्यांतील सुपीक जमिनींत कार्यास सुरवात झाली असून येत्या डिसेंबरमध्यें साखरेचा कारखाना उभारला जाईल अशी अपेक्षा आहे.

**कंपनीनें ६,००,००० रु. ( सहा लक्ष रुपये ) भांडवल विक्रीस काढलें असून त्यापैकीं सुमारें निम्में भांडवल गाजावाजा न करतां खपलें आहे.**

### – शेअर्स –

६ टक्के व्याजाचे क्युम्यु० प्रेफरन्स शेअर्स प्रत्येकी रु. १०० चा ( अर्जासोबत रु. ३० व अर्जमंजुरीनंतर रु. ३० )
ऑर्डिनरी ,, ,, ,, ५० चा ( ,, ,, १५ व ,, ,, १५ )
डिफर्ड ,, ,, ,, ५० चा ( ,, ,, २५ व ,, ,, २५ )

### डिव्हिडंड मिळण्याचा विमाच उतरला !

महाराष्ट्र व कर्नाटक यांतील जनता, संस्थानी प्रजा व संस्थानचे लोकप्रिय अधिपति यांच्या सहकार्यानें चालू झालेली ही पहिलीच साखर कंपनी असून किमान मेहनतान्यावर अनुभवी, तज्ज्ञ व कर्तबगार मॅनेजिंग एजंट्स् कंपनीस मिळाल्यामुळें भांडवलावर नफा मिळण्याचा एक प्रकारें विमाच उतरला गेला आहे.

### आकर्षक व्याजावर ठेवी घेणें आहेत.

कारखान्याचे कामास लवकर सुरुवात व्हावी म्हणून पांचशें रु. पासून पुढें मुदतीच्या ठेवी ६। टक्के व्याजापर्यंत सध्यां घेणें असून पैसे आज गुंतविल्यास तें विशेष फायदेशीर ठरेल.

*शेअर अर्जांकरितां व अधिक माहितीसाठी आजच लिहा.*

**मॅनेजिंग एजंटस् :**

**मे. जी. एच. भागवत आणि कंपनी** ( पार्टनर श्री. जी. एच. भागवत व श्री. वि. पां. देसाई, विजापूर )
मेनरोड : विजापूर.

# स्फुट विचार

## मि. चर्चिल ह्यांचें सिंहावलोकन

ब्रिटिश मुख्य प्रधान मि. चर्चिल ह्यांच्या तोंडून युद्ध परिस्थितीविषयींचे विचार ऐकण्याची उत्कंठा लोकांस सर्वत्र लागलेली असते त्याचें कारण उघड आहे. परिस्थितीवर प्रकाश पाडण्याचें काम त्यांच्या इतकें अधिकारी रीतीनें दुसऱ्या कोणासहि करतां येणें शक्य नाहीं आणि वस्तुस्थितीचें यथातथ्य चित्र रेखाटण्याची त्यांची हातोटी सुप्रसिद्ध आहे. ह्या कारणांनीं मि. चर्चिल ह्यांच्या भाषणास विशेष महत्व असतें. अवास्तव आशावादित्वाचा अंगिकार ते कधींच करीत नाहींत आणि प्रतिकूल सत्य पुढें मांडण्यास ते कचरत नाहींत. ब्रिटिश नभोवाणीवरून त्यांनीं नुकतेंच भाषण केलें तें नेहमीपेक्षा अधिक जोरदार, उत्साहंजनक व आत्मविश्वासमूलक होतें, ह्यामुळें सर्व संयुक्त राष्ट्रांत समाधान पसरलें आहे. त्या भाषणांत त्यांनीं युद्धाच्या स्थित्यंतरांचें सिंहावलोकन मोठ्या मार्मिकपणानें केलें आणि संयुक्त राष्ट्रांचें लढाऊ सामर्थ्य कसें सारखें वाढत आलें आहे ह्याची स्पष्ट कल्पना पुढें मांडली. जर्मनींतल्या औद्योगिक महत्त्वाच्या शहरांवर ब्रिटिश वैमानिकांचे जबरदस्त हल्ले प्रत्यही चालू आहेत त्यांचा उल्लेख करून चढाईचें हें धोरण ह्यापुढें अधिक जोरांत अंमलांत येणार असें त्यांनीं ध्वनित केलें. हिटलरच्या विमानांस ब्रिटिश शहरांवर बॉम्ब फेकून बिनलष्करी इमारती व माणसें ह्यांचे बळी घेण्याची संवय झाली आहे. जर्मन जनतेला असल्या हल्ल्यांचा प्रत्यक्ष अनुभव येत नाहीं. पण रशियन मोहिमेंत हिटलर विषारी वायूचा उपयोग अमानुष रीतीनें करणार असल्याविषयींच्या बातम्यांच्या उल्लेख करून असा प्रकार खरोखर घडल्यास आपणहि त्या साधनांचा उपयोग करण्यास मागें पुढें पहाणार नाहीं असें मि. चर्चिल ह्यांनीं बजावलें. हिटलरनें रशियन रणांगणावरील आपली मोहिम पुनश्च चालू केली आहे असें आतां दिसत असल्यानें ब्रिटिश मुख्य प्रधानांच्या भाषणाचा परिणाम संयुक्त राष्ट्रांवर उत्साहजनक होणें हें इष्टच आहे.

## मुंबई प्रांताचें औद्योगिक खातें

मुंबई प्रांताच्या औद्योगिक खात्याचा १९४०-४१ चा अहवाल प्रसिद्ध झाला आहे. युद्धामुळें उद्योगधंद्यांस चालना मिळाली व पक्क्या मालाचे भाव चढीचे राहिले. त्यामुळें औद्योगिक उत्पादन वाढलें. खात्यानें औद्योगिक उपक्रमांस एकूण ७५, ८५० रुपयांचीं कर्जें दिलीं. भिंगांच्या कांचांचे उत्पादनाच्या संशोधनासाठी औद्योगिक खात्यानें ग्रँट दिली. कानडा जिल्ह्यांतील प्लायवुडचे उत्पादनाचे उपक्रमास जंगल खात्याकडून सवलती मिळवून देण्यात आल्या. ग्रामोद्योगाचें संशोधनात्मक वर्कशॉप पुणें येथें ऑगस्ट, १९४० मध्यें सुरू झालें. त्यानें कांहीं नवीन यंत्रें योजिलीं. घाण्यांचें संबंधांत प्रयोग केले व काच माल आणि बांगड्या ह्यांच्या उत्पादनाचें काम लोकांस शिकविलें. औद्योगिक खात्याच्या विणकर शाळा उपयुक्त कार्य करीत आहेत. पुणें येथील हँड वीव्हिंग इन्स्टिट्यूटमध्यें पॉवरलूम बसविल्यामुळें संस्थेची उपयुक्तता वाढली आहे. इतर अनेक प्रकारच्या ग्रामीण धंद्यांस खात्यानें मदत केली व विद्यार्थ्यांस धंदा सुरू करण्यास सहाय दिलें. हातमागाच्या कापडाचा उठाव करण्याकरितां नऊ ठिकाणीं सहकारी संस्था स्थापन करण्यांत आल्या. त्या सर्वांनीं मिळून सुमारें १ लक्ष, ९० हजार रुपयांचा माल विकला. अहमदनगर असोसिएशनला लष्करासाठी लागणाऱ्या ब्लँकेटांची मोठी ऑर्डर मिळाली, ती पुरी पाडण्याकरितां महाराष्ट्र व कर्नाटक यांतील कित्येक खेडेगावांतून काम करवून घेण्यांत आलें. ऑल इंडिया स्पिनर्स असोसिएशन, अखिल भारतीय ग्रामोद्योग संघ,इत्यादींच्या खात्यास मान्य असलेल्या योजनांस ग्रँट देण्यांत आली. कोळी लोकांच्या धंद्याची सुधारणा करण्याचा औद्योगिक खात्याचा प्रयत्न चालू आहे.

## हिंदी रेल्वेजचें वाढतें उत्पन्न

हिंदुस्थान सरकारच्या उत्पन्नांत हिंदी राष्ट्रीय मालकीच्या रेल्वेजच्या निवळ प्राप्तीचा वाढता अंश भर घालीत आहे हें सर जरेमी रेस्मन त्यांच्या चालू सालच्या अंदाजपत्रकावरून स्पष्ट झालें आहे. सरकारी तिजोरीस रेल्वेजकडून जेवढी मोठी रकम मिळेल तेवढी कर देणाऱ्या प्रजेस अप्रत्यक्ष मदतच आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. अंदाजपत्रकांत गृहित धरलेल्या प्रमाणापेक्षा अधिक उत्पन्न रल्वेजना होईल तर तें इष्टच आहे हें सांगावयास नको. ह्या दृष्टीनें पहातां गेल्या महिन्यांत हिंदी रेल्वेजना मिळालेल्या एकूण उत्पन्नाचे आंकडे प्रसिद्ध झाले आहेत ते उत्तेजनकारक आहेत त्यांत शंका नाहीं. एप्रिलमध्यें रेल्वेजचें एकूण ठोकळ उत्पन्न ११ कोटि, २७ लक्ष रुपये भरलें. गेल्या वर्षाच्या एप्रिलमधील उत्पन्नाच्या तत्सम आकड्यापेक्षा ही रकम १ कोटि २२ लक्षांनीं अधिक आहे. ही वाढीवा सुमारें १२ टक्के भरतो ही गोष्ट समाधानकारक आहे. अर्थातच एका महिन्याच्या आकड्यांवरून सबंद वर्षाच्या उत्पन्नाचा अंदाज बांधणें सुरक्षित नाहीं हें खरें. तथापि, हिंदी रेल्वेजच्या उत्पन्नास वर्षारंभ अनुकूल लाभला आहे ह्यांत संशय नाहीं.

## ब्रह्मदेशीय चलनी नोटा

जपानी फौजांनीं ब्रह्मदेश व्यापल्याकारणानें येथील हिंदी रहिवाशी ह्या देशांत परत येत आहेत. त्यांच्या बरोबर ब्रह्मी चलनी नोटाहि हिंदुस्थानांत येत आहेत. पाच, दहा व त्यापेक्षा अधिक रुपये किंमतीच्या ब्रह्मदेशीय चलनी नोटा ह्या देशांत कायदेशीर चलन मानल्या जात नाहींत. ह्यामुळें त्या धारण करणारांस त्या वटवण्याची अडचण भासणार आहे. ती दूर करण्याची व्यवस्था रिझर्व्ह बँकेनें जाहीर केली आहे. शेकडा चार आणे बट्टा दिला असतां ब्रह्मी नोटा धारण करणारांस त्या रिझर्व्ह बँकेंत वटवून मिळतील. इतर बँकाहि त्या वटवून देतील, पण त्यांचेकडे वटावाचा दर अधिक पडेल. एक रुपया किंमतीच्याहि ब्रह्मदेशीय नोटा आहेत, पण त्या हिंदी चलनी नोटाच असल्यानें त्यांच्या बट्ट्याचा व वटावाचा प्रश्नच उद्भवत नाहीं.

## धोतरजोड्यांची खरेदी

कठीण परिस्थिति निर्माण झालीच तर प्रांतास धोतरजोड्यांचा तुटवडा भासूं नये, ह्या धोरणानें बंगाल सरकार वेगवेगळ्या गिरण्यांकडून लक्षावधि धोतरजोड्या विकत घेऊन ठेवणार आहे.

## मुंबई प्रांतांतील कपाशीचें पीक

( २० मार्च, १९४२ अखेरचा आढावा )

ह्या आढाव्यांतील कपाशीचें पीक एकूण हिंदी पिकाच्या २४·७% भरतें. खालील आकड्यांत मुंबई प्रांतांतील सर्व ब्रिटिश व संस्थानी मुलखाचा समावेश आहे, परंतु बडोदें संस्थानाचा नाहीं.

एकूण लागवड

| | एकर |
|---|---|
| ब्रिटिश जिल्हे | ३६,३१,००० |
| हिंदी संस्थानें | २०,६९,००० |
| एकूण | ५७,००,००० |

हा आकडा गेल्या वर्षाच्या आकड्यापेक्षां १·२% नें लहान आहे.

कपाशीचें उत्पादन

| | गाठी |
|---|---|
| ब्रिटिश जिल्हे | ७,०९,००० |
| हिंदी संस्थानें | ३,८४,००० |
| एकूण | १०,९३,००० |

हा आकडा गेल्या वर्षीच्या आकड्यापेक्षां ०·५% नें लहान आहे.

एकूण उत्पादनापैकीं ५३·५% उत्पादन गुजरातमधील ब्रिटिश जिल्हे व संस्थानें आणि वेस्टर्न इंडिया एजन्सींतील संस्थानें ह्यांच्या वाटणीस जाईल. २७% उत्पादन महाराष्ट्रांतील जिल्हे व संस्थानें ह्यांचे वाट्यास येईल व उरलेलें १९·५ उत्पादन कर्नाटकांत होईल.

## नादारीच्या कायद्याविषयीं निवाडा

" एकाद्याला कोर्टानें नादार ठरविलें व ह्या हुकुमाविरुद्ध त्यानें वरिष्ठ कोर्टांत अपिल केलें, परंतु अपिलाचा निकाल लागण्यापूर्वी तो मरण पावला, तर त्याचे कायदेशीर वारसास दावा पुढें चालविता येतो किंवा नाहीं ? " ह्या प्रश्नाचें उत्तर लाहोर हायकोर्टाच्या फुल बेंचानें अस्तिपक्षी दिलें आहे. अपिलाचा अधिकार हा व्यक्तिगत असून, व्यक्तीच्या मृत्यूनंतर तो नाहींसा होतो, असा निवाडा हिसारच्या डिस्ट्रिक्ट जज्जानें दिला होता. त्यावर लाहोर हायकोर्टाचे न्या. दीनमहंमद ह्यांचेपुढे अपील करण्यांत आलें. प्रस्तुत प्रश्नाविषयीं दुमत आढळल्यावरून त्यांनीं हा प्रश्न फुल बेंचापुढें ठेवला. फुल बेंचानें प्रारंभीं सांगितल्याप्रमाणें अभिप्राय व्यक्त केला.

## ब्रह्मी चलनी नोटा

ब्रह्मदेशांतून हिंदुस्थानांत पुष्कळ लोक आले आहेत, त्यांनीं येतांना ब्रह्मी चलनी नोटा बरोबर आणल्या आहेत. पांच, दहा व त्यापेक्षा अधिक रुपये किंमतीच्या ब्रह्मी नोटा हिंदुस्थानांत चालत नाहींत. परंतु रिझर्व्ह बँक दर शेकडा ४ आणे ( किमान ४ आणे ) घेऊन त्यांचे पैसे देते. इतरहि बँका ब्रह्मी चलनी नोटांची मोड देतात, परंतु त्या कसर ज्यास्त कापतात. एक रुपयावाल्या ब्रह्मी व हिंदी नोटा सारख्याच आहेत.

## हिंदुस्थानानें संयुक्त राष्ट्रांशीं सहकार्य करण्याची आवश्यकता

### अमेरिकन मत

"हिंदुस्थानांतील युद्धविषयक औद्योगिक उत्पादन बरेंच वाढलें असलें, तरी अद्याप त्या वाढीस पुष्कळच वाव आहे. फार ईस्टर्न सप्लाय ग्रुप कौन्सिलला लागणाऱ्या मालापैकीं ७५% माल हिंदुस्थान पुरवितो; तथापि त्याचें पोलादाचें उत्पादन जागतिक उत्पादनाच्या १% सुद्धां नाहीं. ट्रकसला लागणारें विशेष प्रकारचें ६ लक्ष टन पोलाद बाहेरूनच आणलें पाहिजे. विमानें व रणगाडे ह्यांचेंहि उत्पादन हिंदुस्थानांत होत नाहीं; त्यांच्या आयातीवरच त्यास अवलंबून रहावें लागतें. अमेरिका व ग्रेट ब्रिटन ह्यांच्याकडून आवश्यक ती यंत्रसामुग्री, हत्यारें व माल हीं मिळूं शकलीं, तरच हिंदुस्थानांतील युद्धविषयक मालाचें उत्पादन चालू राहील व वाढेल, हें उघड आहे. हिंदी आरमारांतील खलाशांची संख्या वाढली असली, तरी हिंदी बंदरें व ७ हजार मैलांचा किनारा ह्यांचें संरक्षण करण्याची जबाबदारी ब्रिटिश व संयुक्त राष्ट्रांच्या आरमारावरच येऊन पडली आहे. युद्धास प्रारंभ झाल्यापासून विमानांचे चार हिंदी काफिले तयार झाले आहेत व अमेरिकन वैमानिक दलाचा कांहीं भाग हिंदुस्थानांत ठेवण्यांत आला आहे. ग्रेट ब्रिटनशीं कुरबुर काढण्यांत हिंदुस्थानाचें हित नाहीं. संयुक्त राष्ट्रांशीं सहकार्य करण्यावरच त्याचें भवितव्य अवलंबून आहे. " अमेरिकेंतील फॉरिन पॉलिसी असोसिएशननें घेतलेला आढावा.

### बंगाल टाइम

कलकत्ता शहरांतील व बंगालमधील घड्याळांचे काटे १ ऑक्टोबर, १९४१ रोजीं पुढें लावण्यांत आले, ते १५ मे रोजीं पुनः मागें करण्यांत आले. अशा रीतीनें, बंगाल टाइमचें आयुष्य आठ महिन्यांत संपुष्टांत आलें. बिहार सरकारहि पुनः स्टँडर्ड टाइमप्रमाणेंच घड्याळें लावणार आहे. युद्ध चालू असेपर्यंत तरी लोकांच्या व्यवहारांस उजेडाचा अधिक वेळ मिळावा, ह्या हेतूनें केलेला उपक्रम अशा रीतीनें लष्करी अधिकाऱ्यांचे सल्ल्यानुसार बंद ठेवण्यांत आला आहे. हिंदुस्थानांत सर्व ठिकाणीं एका वेळीं सर्व घड्याळांनीं एकच वेळ दाखविणें आवश्यक आहे. नाहींतर घोटाळा उडेल असें त्यांचें म्हणणें आहे.

### बॉम्बे बोर्ड ऑफ फिल्म सेन्सॉर्स

वरील बोर्डानें १ एप्रिल १९४१ ते ३१ मार्च १९४२ ह्या मुदतींत १,८४५ फिल्म्स तपासल्या व त्यांपैकीं १,८४१ पास केल्या. त्यांतील ४५ फिल्म्समध्यें कांहीं छाटाछाट सुचविण्यांत आली. एका फिल्मला सर्टिफिकेट नाकारण्यांत आलें. इतर प्रांतिक बोर्डांनीं मंजूर केलेल्या ७९६ फिल्म्स मुंबई प्रांतांत दाखविण्यासाठी आणण्यांत आल्या त्यांतील कोणतीच फिल्म आक्षेपार्ह वाटली नाहीं. फिल्म तपासण्याबद्दल बोर्ड फी वसूल करतें, तिची रकम बोर्डाच्या खर्चापेक्षा ३,९९० रुपयांनीं अधिक भरली व वर्षअखेर बोर्डाजवळ २३,६०० रुपये सरकारी रोख्यांचे स्वरूपांत शिल्लक राहिले.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | १५६ | ६ बॉम्बे बोर्ड ऑफ फिल्म सेन्सॉर्स ... | १५८ |
| २ अमेरिकेचें व हिंदुस्थानाचें वाढतें लढाऊ उत्पादन ... | १५७ | ७ स्फुट विचार ... | १५९ |
| ३ मुंबई प्रांतांतील कपाशीचें पीक ... | १५८ | मि. चर्चिल ह्यांचें सिंहावलोकन—मुंबई प्रांताचें औद्योगिक खातें—हिंदी रेल्वेजचें वाढतें उत्पन्न—ब्रह्मदेशी चलनी नोटा | |
| ४ नादारीचा कायदा | १५८ | ८ कर्नल जॉनसन ... | १६१ |
| ५ हिंदुस्थानाचें संयुक्त राष्ट्रांशीं सहकार्य | १५८ | ९ सांगली बँक लि:... | १६० |



# अर्थ

बुधवार, ता. २० मे, १९४२


## अमेरिकेचें व हिंदुस्थानाचें वाढतें लढाऊ उत्पादन

यांत्रिक साधनांच्या पुरवठ्याचें महत्त्व प्रस्तुत युद्धांत किती मोठें आहे ह्याची कल्पना आतांपर्यंतच्या अनुभवावरून सामान्यतः आली आहे. मनुष्यबळाच्या मानानें यंत्रशक्ति अधिक प्रभावी ठरत असून तीच अखेर निर्णायक होणार आहे, याविषयीं शंका राहिलेली नाहीं. उदाहरणार्थ, विमानांच्या संख्येवर कित्येक लहानमोठ्या लढायांत विजय अवलंबून राहिलेला अनुभवास आला आहे. विमानांनीं केलेल्या बॉम्बहल्ल्यामुळें लढाऊ सामानाची ने-आण करण्यांत गुंतलेलीं जहाजें नाश पावत असून त्यायोगानें अडचणी उत्पन्न होत आहेत. ह्यावरून विचार करतां युद्धाच्या यांत्रिक साधनांचें उत्पादन किती जिव्हाळ्याचें झालें आहे हें ध्यानांत येईल. जर्मनी व जपान ह्यांची ह्यासंबंधांतली शक्ति कितीहि मोठी असली तरी इंग्लंड व अमेरिका ह्यांच्या कारखान्यांतलें उत्पादन इतक्या झपाट्यानें वाढत आहे कीं शत्रुराष्ट्रांवर त्यांची आजच सरशी झाली आहे ही गोष्ट उत्साहजनक आहे ह्यांत संशय नाहीं. प्रेसिडेंट रुझव्हेल्ट ह्यांनीं अमेरिकन कारखान्यांच्या उत्पादनाची योजना आखली आहे ती पूर्णपणें साध्य होत असून कांहीं बाबतींत तिच्या मर्यादेच्या पुढें त्याची मजल गेली आहे. दर वर्षास दीड कोटि टन वजनाचीं जहाजें बांधलीं जात आहेत ही नुकतीच प्रसिद्ध झालेली बातमी अमेरिकेच्या युद्धप्रयत्नाची निदर्शक आहे. जी गोष्ट व्यापारी जहाजांची तीच आरमाराची, विमानांची व चिलखती गाड्यांची. अमेरिका हें लढाऊ साहित्य स्वतःसाठी आणि इंग्लंड, रशिया, चीन वगैरे मित्र राष्ट्रांस पुरवण्यासाठीं तयार करीत असून त्यांच्या ओघ रणांगणांकडे सारखा वाहात आहे. अमेरिकन युद्धसामुग्रीच्या उत्पादनाची व्यवस्था पहाणारांनीं अलीकडे आपल्या कार्याविषयीं उद्गार काढले आहेत त्यांमधून समाधानाचा स्पष्ट सूर निघत आहे. आमच्या मूळ संकेताच्या मर्यादा ओलांडूनहि हें उत्पादन झपाट्यानें पुढें चाललें आहे असें ते सांगत आहेत. पाण्याखालून जाणाऱ्या शंभर सशस्त्र नावा बांधण्याची योजना अमेरिकेंत हातीं घेतली जात आहे आणि त्याकरितां लागणाऱ्या पैशाची तरतूद झाली असल्याचें वृत्त प्रसिद्ध झालें आहे. युद्धसाधनाची अशी एकहि बाब नाहीं कीं जिचा भरपूर पुरवठा करण्याची अमेरिकेची तयारी नाहीं. संयुक्त राष्ट्रांचा अंतिम विजयाविषयींचा आत्मविश्वास असल्या यांत्रिक बळावर आधारला आहे, तो सर्वस्वी साधार आहे हें सिद्ध करण्यास दुसऱ्या पुराव्याची आवश्यकता नाहीं.

आपल्या स्वतःच्या देशांतच केवळ उत्पादन वाढवून अमेरिका थांबलेली नाहीं. हिंदुस्थान हें युद्धविषयक मालाच्या पुरवठ्याचें केंद्रस्थान समजून येथें मोठ्या प्रमाणावर उत्पादन सुरू करण्यास अमेरिका बहुमोल सहाय करीत आहे. लीज-लँडच्या योजनेची माहिती मागील एका अंकांत दिलेलीच आहे. ईस्टर्न ग्रुप योजनाहि यशस्वी होण्यास अमेरिकेची मदतच कारणीभूत होत आहे. हिंदुस्थानांतील उत्पादन हें संयुक्त राष्ट्रांच्या युद्धविषयक गरजा संघटितपणें भागविणाऱ्या ईस्टर्न ग्रुप योजनेंतील महत्त्वाचा भाग झाल्यापासून हिंदी उद्योगधंद्यांस विशेष महत्त्व प्राप्त झालें. ईस्टर्न ग्रुप योजनेस अनुसरून सुरू केलेलें काम अपेक्षेप्रमाणें पार पडत असून, ग्रेट ब्रिटन व अमेरिका येथून येणाऱ्या यंत्रसामुग्रीची कांहीं उपक्रम वाट पहात आहेत. १९४२ अखेर सर्व काम पार पडेल अशी अपेक्षा होती, ती बहुंशीं खरी ठरली आहे. ह्या योजनांस १२½ कोटि रुपयांचा खर्च ब्रिटिश सरकार देणार आहे, हें मागेंच जाहीर झालेलें आहे. दारुगोळ्याचें व तदनुषंगिक उत्पादन हा प्रस्तुत योजनेचा महत्त्वाचा भाग आहे. पॅरॅशूटला लागणारें रेशीम तयार करण्यासाठीं एक कारखाना स्थापण्यास सरकार १८½ लक्ष रुपये खर्च करणार आहे. अशा रीतीनें हिंदी युद्धविषयक उत्पादनास आतां जोराची चालना मिळालेली असून तें उत्पादन आणखी मोठ्या प्रमाणावर आणि कार्यक्षमतेनें व्हावें ह्यासाठी सूचना करण्याकरितां डॉ. ग्रेडी प्रभृति अमेरिकन तज्ज्ञांचें मंडळ हिंदुस्थानांतील प्रमुख केंद्रांस भेटी देत आहे. अमेरिकन भांडवलाच्या गुंतवणुकीस हिंदुस्थानांत वाव मिळावा, ह्या दृष्टीनें हें शिष्टमंडळ येथें आलेलें नाहीं, हें डॉ. ग्रेडी ह्यांनीं नुकतेंच स्पष्ट केलें. ह्यासंबंधांतील भीति निराधार आहे आणि युद्धप्रयत्नास द्रुतगति प्राप्त करून देण्यास मदत करण्यापलीकडे अमेरिकेचा त्यांत दुसरा हेतु नाहीं, असें त्यांनीं सांगितलें.

## संरक्षणासाठी राष्ट्रीय संघटन

शत्रूविरुद्ध लढाऊ वृत्ती जनतेमध्यें निर्माण करण्याच्या हेतूनें बिनसरकारी संघटन चालू झालें आहे त्याचा औपचारिक प्रारंभ गेल्या शनिवारीं मुंबई येथें झाला. कावसजी जहांगीर हॉलमध्यें प्रातिनिधिक स्वरूपाची जाहीर सभा भरवण्यांत आली होती आणि तिच्या कार्यक्रमाचें उद्घाटन गव्हर्नरांनीं केलें. खोट्या बातम्या देणें, लोकांमध्यें बेदिली उत्पन्न करणें, त्यांस स्वसंरक्षणाच्या प्रयत्नांपासून परावृत्त करणें, संयुक्त राष्ट्रांविरुद्ध प्रचार करणें इत्यादि प्रकारच्या कारवाया शत्रूच्या मार्फत चाललेल्या आहेत, त्यांचा प्रतिकार करून जनतेस निर्भय बनवणें आणि तिच्यामध्यें लढाऊ वृत्ति संघटित रीतीनें राष्ट्रीय भूमिकेवर उत्पन्न करणें हीं कार्यें बिनसरकारी स्फूर्तीनें व खटपटीनें होण्याचें अगत्य किती आहे हें त्यांनीं विशद करून सांगितलें. सभेमध्यें वरील आशयाचा कार्यक्रम गर्भित असलेला ठराव मान्य करण्यांत आला. सध्याची गंभीर परिस्थिति आपापसांतले सर्व मतभेद विसरून शत्रूस एकदिलानें, नेटानें व निश्चयानें तोंड देण्याची आहे हें सभेमध्यें निरनिराळ्या पक्षांच्या प्रतिनिधींनीं स्पष्ट केलें. जपानी आक्रमणाचा प्रतिकार कार्यक्षमरीतीनें झालाच पाहिजे ह्यासंबंधानें हिंदुस्थानांत ऐकमत्य आहे. ह्या राष्ट्रीय भावनेस मूर्तस्वरूप देण्याचें संघटित कार्य आतां व्हावयाचें आहे आणि तें यशस्वी रीतीनें घडून येण्यास त्यास सर्वांनीं हातभार लावणें अगत्याचें आहे.

### कर्नल जॉनसन

प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांचे हिंदुस्थानांतील खास प्रतिनिधि, कर्नल लुइस आर्थर जॉनसन ह्यांचा जन्म १८९१ सालीं झाला. २१ व्या वर्षी त्यांनीं कायद्याची परीक्षा दिली व वकिलीस प्रारंभ केला. गेल्या महायुद्धास प्रारंभ झाल्यावर त्यांनीं लष्करांत प्रवेश केला. १९१८ सालीं ते फ्रान्समध्यें गेले व जर्मनीचा पाडाव झाल्यानंतर बंदोबस्तासाठी तेथें ठेवलेल्या फौजेंत ते होते. त्यांस लष्करांत-चांगला दर्जा प्राप्त झाला. परत आल्यावर त्यांनीं आपला धंदा पुनः सुरू केला, परंतु लष्करी बाबतींत त्यांचें लक्ष असे. आजहि ते ऑफिसर्स रिझर्व्ह कोअरमध्यें इन्फन्ट्रीचे लेफ्टनन्ट कर्नल आहेत. प्रेसिडेंट रूझवेल्ट अमेरिकेचे अध्यक्ष झाल्यानंतर कर्नल जॉनसनना अमेरिकेच्या राज्यकारभारांत जागा मिळाली व त्यांत त्यांची प्रगति होत गेली. १९३७ सालीं त्यांची असिस्टंट सेक्रेटरी ऑफ वॉरचे जागीं नेमणूक झाली. ह्या जागीं त्यांची कामगिरी अतिशय बहुमोल झाली. अमेरिकन लष्करासाठीं खरेदी करणें व अमेरिकन कारखान्यांतून मालाच्या पुरवठ्याचा प्रवाह चालू ठेवणें, हीं त्यांचेकडे कामें होतीं. युद्धविषयक मालाच्या उत्पादनांत झपाट्यानें वाढ घडवून आणण्यांत त्यांनीं यश संपादन केलें. अमेरिकन कारखान्यांत युद्धोपयोगी मालाचें उत्पादन सुरू करण्यास उशीर लागू नये, ह्या दृष्टीनें त्यांनीं सर्व तयारी केली. योजना आखून त्या तत्परतेनें व कार्यक्षमपणें पार पाडण्याची त्यांची हातोटी सुप्रसिद्ध आहे आणि ह्या गुणांमुळेंच हिंदुस्थानांतील महत्त्वाची जागा त्यांस देण्यांत आली. डॉ. ग्रेडी ह्यांच्या नेतृत्वाखाली हिंदुस्थानांत आलेल्या तज्ज्ञांच्या मंडळाचें काम कर्नल जॉनसन ह्यांच्या देखरेखीखालींच चालू आहे. कर्नल जॉनसन ह्यांस 'प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांचा प्रतिनिधि' असा हुद्दा देण्यांत आला आहे. कर्नल जॉनसन हे प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांचेशीं विचारविनिमय करण्यासाठीं अमेरिकेकडे परत जात आहेत. हिंदुस्थानांत समक्ष मिळविलेल्या माहितीच्या व अनुभवाच्या आधारावर आणि ग्रेडी मंडळाच्या सूचनांचा विचार करून ते प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांस हिंदी युद्धोपयोगी उत्पादन वाढविण्याचे बाबतींत बहुमोल सल्ला देऊं शकतील, हें उघड आहे. अमेरिकेंत त्यांनीं यशस्वी रीतीनें बजावलेल्या कामगिरीचे प्रकाराचीच ही कामगिरी आहे.

---

### सांगली बँक, लि.

( वार्षिक सभा : ५-५-१९४२ )

३१-१२-४१ अखेरच्या वर्षी सांगली बँकेस ३१½ हजार रुपये निव्वळ नफा झाला. त्यांतून ६,४०० रुपये रिझर्व्ह फंडांत, २,५०० रुपये इ. फ. फंडांत, १९०० रुपये बुडीत व संशयित फंडांत व १,००० रु. कॉटिन्जन्सी फंडांत टाकून व ४,३१० रुपये ज्युबिलीचा खर्च भागवून ७% डिव्हिडंड वाटण्यांत आलें. बँकेचें वसूल भांडवल २ लक्ष रुपये असून तिचे फंड्स १ लक्ष, ५५½ हजारांचे आहेत. बँकेकडील ठेवी २४ लक्ष, ८६ हजारांच्या आहेत. बँकेच्या येणें बाजूस इनव्हेस्टमेंट्स खातीं १० लक्ष, ६७ हजार रुपये व कर्जखातीं १२ लक्ष, १५ हजार रुपये आहेत. बँकेच्या शहापूर, रबकवी, शिरहट्टी, करठे, तेरदळ, मंगळवेढें, विलिंग्डन कॉलेज, तुपारी व उगार येथें शाखा आहेत. बँकेची सुस्थिति व सुरक्षितपणाचें धोरण हें हिशेबाचे तक्त्यांवरून दिसून येतात. रावसाहेब एच. बी. कुलकर्णी हे बँकेचे चेअरमन असून श्री. पी. एस. मोकाशी हे मॅनेजर आहेत.


## दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... ... ... रु. | २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | ... ... ... रु. | १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड | ... ... ... रु. | १,१८,००,००० |

मुख्य कचेरी: ओरिएन्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

मुंबईमधील शाखा : बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

इतर शाखा : अहमदाबाद ( भद्र, मुख्य ऑफिस ), अहमदाबाद ( एलिस ब्रिज शाखा ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अंधेरी ( मुंबई शेजारी ), बांद्रे ( मुंबई शेजारी ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस ), कलकत्ता ( बडा बझार ), कलकत्ता ( चौरंगी स्क्वेअर ), जमशेदपूर, कराची, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत.

लंडन एजन्ट्स : वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

डायरेक्टर्स : सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई, सर जोसेफ के. नाईट, मि. ए. गेडिस, सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई., मि. दिनशा के. दाजी, श्री. रामनिवास रामनारायण.

करंट डिपॉझिट अकाउंट्स :

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षा कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग्ज बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमींचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

एजंट—टी. आर. लालवाणी.

---

## दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

हेड ऑफिस : पुणें शहर.

स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.

मुंबअी शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबअी.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | : रु. १०,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | : रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | : रु. ४,३५,०५० |
| वसूल झालेलें भांडवल | : रु. २,१७,५२५ |
| एकूण खेळतें भांडवल | : रु. ३५,००,००० |

### डायरेक्टर्स

प्रो. वा. गो. काळे, अध्यक्ष

| | |
|---|---|
| श्री. धों. कृ. साठे | श्री. मा. रा. जोशी |
| श्री. म. ग. पवार | श्री. श्री. गो. मराठे |
| श्री. द्यं. वि. रानडे | श्री. र. चिं. सोहोनी |
| श्री. वा. पुं. वर्दे | मि. फ. वो. पदमजी |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदीविक्री कसोशीनें करून दिली जाते.

बँकेच्या शेअरवर १९४१ अखेर पुऱ्या होणाऱ्या वर्षी द. सा. द. शेंकडा ४ टके करमाफ डिव्हिडंड दिलें गेलें. बँकेची शेअरविक्री चालू आहे.

म. वि. गोखले
मॅनेजर.

**महायुद्ध दाराशीं आलें**
**परदेशी औषधें**
**दुर्मिळ व महाग झालीं**

पण

**भिण्याचें कारण नाहीं !!!**

— कारण —

**आयुर्वेद रसशाळा पुणें लि०**

या देशी औषधाच्या प्रसिद्ध कारखान्यानें तयार केलेलीं

- रक्तवर्धक,
- उपनाह,
- बालजीवन,
- कॅल्सीप्राल

*इत्यादि पेटंट, स्टँडर्ड व लोकप्रिय औषधें खात्री पटल्यामुळें*

★ डॉक्टर्सहि वापरूं लागले आहेत. ★

दरसाल बिनचूक नफा वाटणाऱ्या ह्या कंपनीचे शेअर्स व औषधें मागवा.

**आयुर्वेद रसशाळा पुणें लि०**

मुख्य दुकान गणपति चौक, लक्ष्मीरोड, पुणें १.

**N. V. WADNERKAR**

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver, Electro-plater & Manufacturer of Sporting Trophies, Medals, Cups etc.

- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -
POONA CITY.



**मधुमेहावरील औषध**

तीन आठवड्यांचे औषधास फक्त रु. ७

— मागविण्याचा पत्ता —

मॅनेजिंग डायरेक्टर, रूरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड.
९२३ ए, सदाशिव, पुणें २.

**DECCAN BOOK STALL**

Booksellers, Publishers & Subscription Agents
Fergusson College Road, Poona No. 4

(1) We stock and supply Educational books, General books & Library books.

(2) We supply Government of Bombay and Government of India publications.

(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.

(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.

**'अर्थ' ग्रन्थमाला.**

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

**अर्थशास्त्र**

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें ३००; किंमत ३ रुपये
या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

**महायुद्धाची जाणीव! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.**

बंबाचे माडीवर

# महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

**जाहिरातींचे दर.**
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

**वर्गणीचे दर.**
वार्षिक वर्गणी
रु. ४
(टपाल हंशील माफ)
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ८ | पुणें, बुधवार, तारीख २७ मे १९४२ | अंक २१

## वक्तशीर आणि मनपसंत काम करून देणारे
## मोहन वॉच कंपनी
रेग्युलेशन मोफत
कॉमनवेल्थ बिल्डिंगसमोर    लक्ष्मी रोड, पुणें २.

## दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

हेड ऑफिस : पुणें शहर.
स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.
मुंबई शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | : रु. १०,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | : रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | : रु. ४,३५,०५० |
| वसूल झालेलें भांडवल | : रु. २,१७,५२५ |
| एकूण खेळतें भांडवल | : रु. ३५,००,००० |

### डायरेक्टर्स

प्रो. वा. गो. काळे, अध्यक्ष

| | |
|---|---|
| श्री. धों. कृ. साठे | श्री. मा. रा. जोशी |
| श्री. न. ग. पवार | श्री. श्री. गो. मराठे |
| श्री. त्र्यं. वि. रानडे | श्री. र. चिं. सोहोनी |
| श्री. वा. पुं. बर्वे | मि. फ. र्वो. पदमजी |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदीविक्री कसोशीनें करून दिली जाते.

बँकेच्या शेअरवर १९४१ अखेर पुऱ्या होणाऱ्या वर्षी द. सा. द. शेंकडा ४ टके करमाफ डिव्हिडंड दिलें गेलें. बँकेची शेअरविक्री चालू आहे.

म. वि. गोखले
मॅनेजर.

## श्रीराम सिल्क मिल्स लि., बंगलोर
[कंपनीनें १९४० अखेर ६ टक्के डिव्हिडंड वांटला आहे.]
युद्धसाहित्यपुरवठा–खात्याची पॅरेशूटकरितां लागणाऱ्या
रेशमी कापडाची ऑर्डर पुरी करण्यासाठी लागणाऱ्या भांडवलाकरितां तूर्त एकूण रु. १ लक्षाच्या रकमेपर्यंत

## ठेवी घेणें आहेत

व्याजाचा दर ४॥ ते ६ टक्के. ठेव किमान रु. ५०० ची असावी. ठेवीवरील व्याज दर सहा महिन्यांनीं दिलें जातें.

श्रीराम सिल्क मिल्स लि.,
श्रीरामबाग,
बसवनगुडी, बंगलोर.

नारायण गोविंद नाईक,
(माजी अध्यक्ष, म्हैसूर चेंबर ऑफ कॉमर्स) मॅनेजिंग डायरेक्टर

आमच्या कारखान्यांतील माल मुंबईस बॉम्बे स्वदेशी को–ऑपरेटिव्ह स्टोअर्समध्यें व पुण्यास लक्ष्मी रोडवरील रे म्यूझिअमच्या व्यापार–संवर्धन–गृहांत पहा.

**L.S.G.D.** Training Classes for officers of Local Self-Government Service under the auspices of the Government of Bombay and the Local Self-Government Institute, will begin from *1st June 1942 at Bombay, Ahmedabad and Poona.*

**Fees Rs. 75**

*Apply for Prospectus to—*

THE HONORARY SECRETARY,
410, Shanwar, Poona 2
OR
THE DIRECTOR,
Elphinstone Circle, Fort, Bombay

# विविध माहिती

### जपानाविषयी राजनिष्ठेची सक्ति

नेदरलंड्स ईस्ट इंडीजमधील सर्व परदेशीय लोकांस, (डच, इतर युरोपियन, चिनी, अरब, इत्यादि ) जपानाविषयीं राजनिष्ठेची शपथ घ्यावी लागत आहे. जे अशी शपथ घेणार नाहींत त्यांस नागरिकत्वाचे हक्क मिळणार नाहींत.

### श्री. दाबके

मुंबईच्या गिरणी मालक संघाचे एक सभासद व मराठा चेंबरचे एक उपाध्यक्ष श्री. बी. एस. दाबके बी. कॉम, ह्यांची हिंदुस्थान सरकारनें नेमलेल्या पोस्ट वॉर रीकन्स्ट्रक्शन कमिटीचे. सभासद म्हणून नेमणूक झाली आहे.

### कोयनेलच्या ५० लक्ष गोळ्या

हिंदुस्थान सरकारनें चिनी सरकारला ५० लक्ष कोयनेलच्या गोळ्या पुरविण्याचें मान्य केलें आहे. त्यांपैकीं २५ लक्ष गोळ्या रवाना झाल्या आहेत.

### ब्रिटिश लोकसंख्येचा उच्चांक

सध्याच्या प्रमाणांत ब्रिटिश जननांचें प्रमाण घटत राहिलें, तर ब्रिटिश लोकसंख्येचा उच्चांक ( ४ कोटि, ७० लक्ष ते ४ कोटि, ८० लक्ष ) १९५१ व १९६१ चे दरम्यान प्राप्त होईल व त्या-नंतर लोकसंख्या घटूं लागेल. ग्रेट ब्रिटनमध्यें मध्यम वयाच्या लोकांचें प्रमाण बरेंच ज्यास्त झालें आहे; ह्याचें कारण १८७६ ते १९१४ ह्यांचे दरम्यान वार्षिक जननांची संख्या १० लाखांवर गेली, ती त्यानंतर ७ लाखांवर आली आहे. वयस्क लोकांचे संख्येंत ह्यापुढें वाढ होत राहील असें दिसतें.

### सुताचें उत्पादन वाढणार

मूळ योजनेप्रमाणें सुताचें उत्पादन होत नसल्याकारणानें लँकेशायरच्या गिरण्यांत पूर्वी काम करीत असलेल्या परंतु आतां दुसरीकडे लागलेल्या १२ हजार कामगारांना परत आणण्यांत येणार आहे.

### त्रिंकोमाळी

त्रिंकोमाळी हें बंदर सिलोनच्या ईशान्य किनाऱ्यावर आहे. नैसर्गिक बंदर ह्या दृष्टीनें त्याचा अनुक्रम जगांतील बंदरांत फार वर लागेल. सिलोनवर ताबा ठेवावयाचा म्हणजे त्रिंकोमाळी-वर सत्ता पाहिजे असा एक काळ होता व ह्या बंदराचे ताब्या-साठी पोर्तुगीज, डच, फ्रेंच व ब्रिटिश आरमारांचे झगडे झालेले आहेत. १७९५ सालीं ब्रिटिशांनीं त्रिंकोमाळींतून डच लोकांस घालवून दिलें तेव्हांपासून तें बंदर ब्रिटिशांचे स्वाधीन आहे. सुएझ कालव्यांतून वहातुकीस प्रारंभ झाल्यानंतर त्रिंकोमाळीचें महत्त्व कमी होऊं लागलें व कोलंबो येथें बंदर तयार करण्यांत आलें; कारण त्रिंकोमाळी इंग्लंड व ऑस्ट्रेलिया ह्यांचे मार्गावर पडेना. १९०५ सालीं तेथील नाविक दलहि काढून घेण्यांत आलें. आतां पुनः त्रिंकोमाळीची तटबंदी चालू आहे.

### कारकुनांचे दुकानदार

बेळप्रसंगीं सरकारी कारकुनांना किरकोळ विक्रीचीं दुकानें चालवितां यावींत ह्यासाठी त्यांस शिक्षण देण्याची योजना बंगाल सरकारनें आंखली आहे.

### लंडन बँकर्स क्लिअरिंग हाउस

वरील क्लिअरिंग हाउसमध्यें १९४१ सालीं ४३ अब्ज पौंड किंमतीच्या चेकची देवघेव झाली.

### पॅटॉस बेट

सुमारें १७० एकर क्षेत्रफळाचें पॅटॉस हें व्हेनेझुएलाचे किनाऱ्या-जवळील तीन मैलाचे आंतील बंदर ग्रेट ब्रिटननें व्हेनेझुएलाच्या सरकारास दिलें आहे. ह्या बेटाचे मालकीविषयीं अनेक वर्षे ह्या दोन देशांत वाद चालला होता.

### लॉर्ड लंडनडेरी

एकाच वेळीं बांधकामावर ५०० पौन्डापेक्षा अधिक रकम खर्च केल्याबद्दल लॉर्ड लंडनडेरी ह्यांस ५० पौंड दंड करण्यांत आला. लॉर्ड साहेबांच्या कन्येचा विवाह झाल्यानंतर तिचे बिऱ्हा-डासाठी घरदुरुस्तीवर त्यांनीं १,७०० पौंड खर्च केले. दिवाबत्ती, फुंवारे काम इत्यादीसाठी वेगळीं कंत्राटें दिलीं तर ५०० पौंड खर्चाचा नियम लागू होणार नाहीं, असें लॉर्डसाहेबांस वाटलें परंतु त्याचा परिणाम वरीलप्रमाणें दंडांत झाला.

### जाहिरातींवर नियंत्रण

कागदाचा खप कमी व्हावा ह्या करितां ब्रिटिश वर्तमानपत्रां-वर त्यांनीं जाहिराती किती द्याव्या ह्यासंबंधीं नियंत्रण घालण्यांत आलें आहे. सकाळीं प्रसिद्ध होणाऱ्या पत्रांनीं ४०% व संध्याकाळीं प्रसिद्ध होणाऱ्या पत्रांनीं ४५% पेक्षा ज्यास्त जागा जाहिरातींस देतां कामा नये.

### क्राइसलर मोटार कंपनीचें अबाढव्य कर्ज

क्राइसलर कंपनीनें दारुगोळ्याच्या उत्पादनासाठी १० कोटि डॉलर्सच्या कर्जाची व्यवस्था केली आहे. ह्या व्यवस्थेंत १७५ बँका सामील आहेत. पांच वर्षांत कंपनीनें केव्हाहि रकमेची उचल करावी परंतु तिनें कर्ज घेतलें नाहीं तरी ५ लक्ष डॉलर्स कमिशन म्हणून तिनें बँकांस दिलेंच पाहिजे. व्याजाचा दर १½% आहे. कंपनीचें वार्षिक उत्पादन १७५ कोटि डॉलर्स किंमतीचें आहे. भाग भांड-वल वाढविण्याऐवजी बँकांकडून कर्ज काढून कंपनीनें भागी-दारांचें हितच पाहिलें आहे.

### युद्धांतील मृत सैनिक

१९३९ सालीं चालू युद्धास प्रारंभ झाला, तेव्हांपासून १९४१ अखेर एकूण १५ लक्ष सैनिक युद्धांत मरण पावले असावेत, असा मेट्रोपॉलिटीन लाइफ इं. कंपनीचा अंदाज आहे. गेल्या महायुद्धामध्यें ह्याच मुदतींत ५० लक्ष सैनिक कामास आले होते. जून, १९४१ च्या अखेरपर्यंत चालू युद्धांत फारच थोडे सैनिक मेले. बहुसंख्य मृत्यू १९४१ च्या उत्तरार्धांतीलच आहेत. १९३९ सालीं फ्रान्सचे २,००० सैनिक दगावले; १९१४ सालीं २ लक्ष दगावले होते. १९४० सालांतील मृत्यूंची संख्या १ लाखावर गेली नाहीं.

### डनलॉप रबर कंपनी ( इंडिया ) लि.

वरील कंपनीस १९४१ सालीं ७१ लक्ष रुपये नफा झाला. ऑर्डिनरी भागांस करमाफ २०% डिव्हिडंड मिळालें. प्राप्तीवरील करासाठीं २०½ लक्ष रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे. कंपनीनें ए. आर. पी. साठी १½ लक्ष रुपये खर्च केले.

### विमानांतला प्रवास

विमानाच्या लढाया व त्यांचें वाढतें उत्पादन ह्यांच्या अनु-भवामुळें युद्धानंतरच्या काळांत विमानांतला प्रवास कल्पनातीत वाढेल असें एका अमेरिकन तज्ज्ञाचें म्हणणें आहे. पृथ्वीपासून तीस हजार फूट उंचीवर दरताशीं तीनशें मैल वेगानें विमानें उतारूंस सुखानें वाटेल तिकडे नेतील आणि लांबच्या प्रवासाचें लोकांस कांहीं वाटणार नाहीं आणि परदेशांत जाऊन येणें ही नित्यक्रमाची साधी गोष्ट होऊन बसेल असें तो म्हणतो.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | १६४ | ६ ग्रॅंबर बॉम्बिंग इन्स्टिट्यूट | १६६ |
| २ युद्धाचा हेतु आणि त्याची मीमांसा ... | १६५ | ७ के. झारापकर ... | १६६ |
| ३ प्राप्तीवरील कराऐवजी पोस्टांत ठेव ... | १६५ | ८ स्फुट विचार ... अमेरिकन शिष्टमंडळाच्या सूचना—सूचनांचें स्वरूप—धान्याची पैदास वाढवा— | १६७ |
| ४ सहकारी बँकांची परिषद | १६६ | ९ सहकारी क्रेडिट सोसायटीचा सेक्रेटरी. | |
| ५ विमा कंपनीचें सरकारकडील डिपॉझिट ... | १६६ | | |



# अर्थ

बुधवार, ता. २७ मे, १९४२


## युद्धाचा हेतु आणि त्याची सांगता

आपण स्वतः शांततेचे भोक्ते असून तिच्या पायावर युरोपची राजकीय व आर्थिक घडी आपणांस बसवावयाची आहे, पण चर्चिल व प्रेसिडेंट रूझव्हेल्ट हे युद्धाचे व आंतरराष्ट्रीय वैमनस्याचे चहाते आहेत आणि त्यांनीं महत्त्वाकांक्षेस बळी पडून सध्याचें भयंकर युद्ध चालू ठेवलें आहे अशी बतावणी हिटलर वारंवार करीत असतो. त्याची शांततेची व युरोपच्या पुनर्घटनेची कल्पना काय आहे ह्याचा अनुभव पोलंड, हॉलंड, बेल्जम, नॉर्वे, ग्रीस इत्यादि राष्ट्रांस येऊन चुकलाच आहे आणि तीं हिटलरशाहीच्या जुलमाविरुद्ध सक्रिय बंड पुकारण्याच्या संधीची वाट पहात आहेत. जर्मन जेत्यांचे विरुद्ध वरील जित राष्ट्रांत द्वेषाग्नि धुमसत आहे आणि तो सर्वस्वी विझवून टाकण्याचा यत्न नात्सी लोक करीत आहेत त्याचीं उदाहरणें प्रत्यहीं घडत आहेत. प्रत्यक्ष पॅरिस शहरांत स्वातंत्र्यप्रेमी फ्रेंच नागरिक जर्मनांच्या आक्रमणाचा व जुलमाचा सूड घेत आहेत आणि त्याचें पारिपत्य शेकडो निरपराधी लोकांस देहांत शिक्षा देऊन जर्मन अधिकारी करीत आहेत. जित देशांतले कामकरी वेठीस धरण्यांत येत आहेत आणि जर्मनीचे लढाऊ कारखाने व शेती चालावी म्हणून त्यांस सक्तीनें कामास लावण्यांत येत आहे. जर्मनीचें शिष्यत्व पत्करून जपाननें पूर्व एशियांतील लोकांस स्वतःच्या सत्तेखालीं आणून येथें पुनर्घटना करण्याचा चंग बांधला आहे. चीनमध्यें व पूर्वी कोरियामध्यें जपाननें अनन्वित अत्याचार केले आहेत त्याची माहिती सर्व जगास असल्यामुळें ह्या राष्ट्राच्या वचनांस व ध्येयवादास काडीची किंमत दिली जाणें शक्य नाहीं. एशिया खंडाचें पुढारीपण जपाननें अनाहूतपणानें स्वतःकडे घेतलें आहे त्यास कोणतेंहि स्वाभिमानी व स्वातंत्र्यप्रेमी एशियाटिक राष्ट्र मान्यता देणार नाहीं. जर्मनी व जपान ह्यांचा पूर्ण बीमोड करण्याचाच संयुक्त राष्ट्रांचा निश्चय आहे आणि जगाच्या पुनर्घटनेच्या तत्त्वांची त्यांची योजनाहि निराळी आहे. जपानच्या आक्रमणाचा प्रतिकार करून त्याच्या जुलमी व महत्त्वाकांक्षी सत्तेचा नायनाट करण्यास सहाय देण्याचा आणि ह्या कामीं चीनशीं सहकार्य करण्याचा निश्चय हिंदुस्थानांतील लोकांनीं एकमतानें केला आहे त्याचें रहस्य वरील विवेचनावरून ध्यानांत येण्यासारखें आहे.

एशिया खंडाच्या पुनर्घटनेबाबत जपानचा प्रचार चालला आहे त्यांतला मायावीपणा नीट लक्षांत येण्यासाठीं प्रस्तुत युद्धांतल्या संयुक्त राष्ट्रांच्या हेतूंच्या मुळाशीं असलेल्या तत्त्वांचा पुनरुच्चार वारंवार केला जाणें अगत्याचें आहे. त्यांचा उद्देश जागतिक शांततेची स्थापना हाच आहे. पण तिच्या मुळाशीं वैयक्तिक व राष्ट्रीय स्वातंत्र्य हीं तत्त्वें आहेत. अमेरिकेंतील "नॅशनल रिसोर्सेस अँड प्लॅनिंग बोर्ड" ह्या समितीनें पुनर्घटनेचीं मूलभूत तत्त्वें निश्चित केलीं आहेत आणि प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांनीं त्यांस मान्यता देऊन त्यांचे संबंधांतला रिपोर्ट कॉंग्रेसकडे पाठवला आहे. त्यामध्यें नवविध स्वातंत्र्य ग्रथित करण्यांत आलें आहे. काम करून पोटास मिळवण्याचा व्यक्तींचा हक्क, समाजोपयोगी कामाचा त्यांस योग्य मोबदला मिळण्याचा अधिकार, सर्वांस अन्न, वस्त्र, संरक्षण वगैरे मिळण्याच्या सोयी, विचार व आचार ह्यांचें सार्वत्रिक स्वातंत्र्य, पूर्ण समता व न्याय ह्यांची स्थापना, शिक्षण व संस्कृति ह्यांचा प्रसार इत्यादि प्रकारचीं हीं पुनर्घटनेचीं तत्त्वें आहेत आणि तीं व जर्मनी-जपान ह्यांच्या पुनर्घटनेच्या घोषित होणाऱ्या फसवेगिरीच्या योजना ह्यांचेमध्यें जमीन–अस्मानाचें अंतर आहे हें सांगावयास नको. हिटलरशाहीचें कायमचें निर्मूलन होऊन जगाची नवीन घडी बसविण्याच्या निरनिराळया योजना अमेरिकेंत पुढें मांडण्यांत आल्या आहेत. प्रसिद्ध अमेरिकन अर्थशास्त्रज्ञ, प्रो. आयर्व्हिंग फिशर ह्यांनीं प्रस्तुत विषयावर नुकतेच विचार प्रदर्शित केले आहेत, त्यांचा उल्लेख येथें करणें उचित आहे. हिटलरचा जागतिक पुनर्घटनेचा जुलमी व दडपशाहीचा मार्ग त्याज्य असल्यानें अमेरिकेनें पुढाकार घेऊन वैयक्तिक व राष्ट्रीय स्वातंत्र्य प्रस्थापित होईल अशी कायमची व्यवस्था करण्यास झटलें पाहिजे असें त्यांचें म्हणणें असून रूझव्हेल्ट-चर्चिल योजनेस मूर्तस्वरूप देण्याच्या आवश्यकतेवर त्यांनीं भर दिला आहे. आधुनिक सुधारणेबरोबर आंतरराष्ट्रीय दळणवळण वाढलें, पण राष्ट्रांच्या परस्पर संबंधांच्या नियमनाची योजना झालेली नाहीं, ती मोठ्या प्रमाणावरील व भक्कम पायावर उभारलेल्या राष्ट्रसंघामार्फत झाली पाहिजे अशी प्रो. फिशर ह्यांची सूचना आहे. "सर्व देशांतील सर्व लोकांस स्वतंत्रतेनें जगतां यावें" ह्या विषयींची कार्यक्षम उपाययोजना होण्याची आवश्यकता त्यांनीं प्रतिपादली आहे.

### प्राप्तीवरील कराऐवजी पोस्टांत ठेव

प्राप्तीवरील करास पात्र असलेल्या किमान वार्षिक उत्पन्नाची रकम १९४२ च्या फिनॅन्स ॲक्टानें १,५०० रुपयांवर आणली असली, तरी दीड ते दोन हजारांचे दरम्यान प्राप्ती असणारांस पोस्ट ऑफिस डिफेन्स सेव्हिंग बँकेंत ठेव ठेवून कर वांचवितां येतो. ७५० रुपयांपेक्षा ज्यास्त उत्पन्नाच्या प्रत्येक २५ रुपयांमागें किमान १ रुपया तरी ठेव ठेवली पाहिजे. इनकमटॅक्स अधिकाऱ्यांकडून जाहीर नोटीस मिळते तेव्हांपासून साठ दिवसांचे आंत ही ठेव ठेवून त्यासंबंधींचे सर्टिफिकेट योग्य त्या अर्जासह इनकमटॅक्स अधिकाऱ्याकडे पाठविलें पाहिजे. त्यानंतर ठेवीची सवलत मिळणार नाहीं. ह्या प्रकारें ठेवलेल्या ठेवीवर कोर्टाची डिक्री बजावतां येत नाहीं.

## सहकारी बँकांची परिषद्

ह्या प्रांतांतील मध्यवर्ती व अर्बन बँकांच्या मंडळाच्या ( बाँबे प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँक्स असोसिएशन ) विद्यमानें ह्या बँकांच्या प्रतिनिधींची परिषद् पुणें येथें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेच्या मुख्य दिवाणखान्यांत श्री. सरय्या ह्यांचे अध्यक्षतेखाली गेल्या शनिवारीं व रविवारीं भरली होती. सहकारी बँकांच्या पुढें अनेक अवघड प्रश्न आज उभे आहेत. त्यांचा परिषदेंत विचार होऊन चर्चेस अनुसरून योग्य ठराव मान्य करण्यांत आले. परिषदेस प्रांताच्या सर्व भागांतून प्रतिनिधी आले होते आणि सहकारी खात्याचे रजिस्ट्रार व इतर अधिकारी उपस्थित होते.त्याचप्रमाणें रिझर्व्ह बँकेच्या शेतीविषयक खात्याच्या प्रतिनिधींनीं चर्चेमध्यें भाग घेतला. रजिस्ट्रारनीं परिषदेपुढें आलेल्या बहुतेक प्रश्नांसंबंधानें माहिती व सल्ला दिल्याकारणानें तिचें कार्य पुष्कळ सुकर झालें.

### श्री सरय्या यांचें भाषण

श्री. सरय्या यांनीं आपल्या अध्यक्षीय भाषणांत युद्धजन्य परिस्थितीचे शेतकरी वर्गावर व सहकारी संस्थांवर झालेल्या परिणामांचें विवेचन केलें आणि बँक्स असोसिएशननें हाताळलेल्या निरनिराळया मुख्य विषयांचें दिग्दर्शन केलें. सध्याच्या युद्धाचा हा विशेष आहे कीं त्याचे परिणाम समाजांतील सर्व लोकांस कमी-अधिक प्रमाणांत सारखेच भोगावे लागत आहेत आणि त्याच्या सर्वव्यापी स्वरूपामुळें ते कमींत कमी जाचक व्हावे ह्या दृष्टीनें व्यवस्था करणें आवश्यक आहे. जनतेच्या आर्थिक व्यवहारांवर युद्धपरिस्थितीचे योगानें नाना प्रकारांची सरकारी नियंत्रणें बसणें अपरिहार्य झालें आहे. तथापि त्यांचेमुळें बहुसंख्य शेतकरी वर्गाच्या प्राप्तीमध्यें अवास्तव घट होऊन त्याच्या राहाणींत कमीपणा उत्पन्न होऊं नये ह्याबाबत सरकारनें दक्षता बाळगणें अगत्याचें आहे ह्या मताचा पुरस्कार श्री. सरय्या त्यांनीं कळकळीनें केला. धान्याच्या पिकांची लागवड विस्तृत प्रमाणावर केली जावी ह्यासंबंधानें प्रचार सध्या चालला आहे त्याला त्यांनीं हार्दिक पुष्टि दिली. त्याचबरोबर शेतीच्या पिकांच्या किंमती पडल्यामुळें आणि कपाशीच्या ऐवजी दुसरीं उपयुक्त पिकें करण्याच्या योजनेमुळें शेतकऱ्यांस अडचणी भासत आहेत आणि भासणार आहेत त्यांचें निवारण होण्यास सरकारनें हातभार लावला पाहिजे अशी त्यांनीं सूचना केली. ह्या बाबतींत सरकारनें विचारयुक्त योजनात्मक धोरण अंमलांत आणणें अगत्याचें आहे असें ते म्हणाले. हिंदुस्थान हा कृषिप्रधान देश आहे आणि त्यांतील बहुसंख्य लोकांची उपजीविका शेतीच्या धंद्यावर अवलंबून आहे. ह्यास्तव शेतकरी वर्गाच्या हिताची जोपासना होण्याविषयींची खबरदारी सरकारनें हरतऱ्हेनें घ्यावी हें त्यांच्या प्रतिपादनाचें सार होतें. ह्या त्यांच्या मतास अनुसरून परिषदेनें एक ठराव मंजूर केला, त्यामध्यें शेतकऱ्यांच्या मार्गांत येणाऱ्या युद्धजन्य अडचणी सहकारी संस्थांनीं मध्यवर्ती व प्रांतिक सरकारच्या नजरेस आणाव्या आणि त्या सरकारांनीं शेतकरी वर्गास जरूर त्या सवलती देऊन विविध मार्गांनीं सहाय करावें असें सुचविण्यांत आलें.

---

### विमा कंपनीच्या सरकारकडील डिपॉझिटचे दोन भाग

नवजीवन इन्शुअरन्स कं. लि. ही आयुर्विम्याचें व इतर प्रकारच्या ( मिसलेनिअस ) विम्याचेंहि काम करीत असे. तिनें मिसलेनिअस विम्याचें काम नोव्हेंबर, १९४० मध्यें बंद केलें. जानेवारी, १९४० अखेर कंपनीनें सरकारकडे तीन हप्त्यांमध्यें १½ लक्ष रुपये डिपॉझिटचा भरणा केला होता. मिसलेनिअस विम्याचें काम बंद केल्यानंतर त्यासंबंधांतील ५० हजार रुपये डिपॉझिट तिनें परत मागितले. "विमा कायद्याच्या ७ व्या कलमान्वयें ठेवावयाच्या डिपॉझिटचे दोन भाग असतात व त्याबरहुकूम डिपॉझिटच्या हप्त्यांचेहि भाग पाडतां येतात. दोन तृतीयांश रकम आयुर्विम्याची व एक तृतीयांश रकम मिसलेनिअस विम्याची, असें समजलें पाहिजे. म्हणून, आयुर्विम्याचें पुरें डिपॉझिट ठेवून झालें नसलें, तरी मिसलेनिअस विम्याचे पोटीं केलेला डिपॉझिटचा भरणा परत मागतां येतो. अर्थात् त्या विम्यासंबंधांतील सर्व देणें कंपनीनें भागविलेलें असलें पाहिजे. नाहीं तर डिपॉझिटची रकम परत करतेवेळीं जरूर तेवढी रकम कापून घ्यावी लागेल" असा निवाडा ह्यासंबंधांतील दाव्यांत कलकत्ता हायकोर्टानें केला.

---

### पॉवर वीव्हिंग इन्स्टिटयूट, सोलापूर

पुणें येथील सरकारी हॅन्ड वीव्हिंग इंस्टिटयूटचें रूपांतर पॉवर वीव्हिंग इन्स्टिटयूटमध्यें करण्यांत येणार आहे.ह्या इन्स्टिटयूटमध्यें मॅट्रिकचे खालील विद्यार्थ्यांस हातमाग चालविण्याचें शिक्षण दिलें जात असे. तथापि आतां हातमाग मागें पडूं लागले असून पॉवर लूम्सची संख्या वाढत आहे व हॅन्डलूम्सचें रूपांतरहि पॉवरलूम्समध्यें करण्यांत येत आहे. विशेषतः जेथें स्वस्त विजेचा पुरवठा मुबलक आहे, अशा ठिकाणीं ही प्रवृत्ति ज्यास्त आढळते. मुंबई प्रांताच्या औद्योगिक खात्यानें हातमागाच्या व्यवसायाचें शिक्षण देणारी व्यवस्था केली आहे. परंतु पॉवरलूम्सचें शिक्षण देणारी संस्था नव्हती. म्हणून सरकारनें हॅन्ड वीव्हिंग इन्स्टिटयूटचें रूपांतर पॉवर वीव्हिंग इन्स्टिटयूटमध्यें केलें आहे. ह्या इन्स्टिटयूटचें स्थलांतर सोलापूर येथें केलें जाईल, कारण तें केंद्र त्या संस्थेसाठी जास्त सोईचें आहे. दरवर्षी इन्स्टिटयूटमध्यें तीस विद्यार्थ्यांस प्रवेश मिळेल.

---

### कै. रामचंद्र कान्होबा झारापकर

सावंतवाडी संस्थानांतील एक कर्तबगार व लोकप्रिय पुढारी श्री. रामचंद्र कान्होबा झारापकर यांना शुक्रवार दिनांक १५ सायंकाळीं ४ वाजतां देवाज्ञा झाली ही गोष्ट कळविण्यास अत्यंत दुःख वाटतें. श्री. झारापकर यांनीं सावंतवाडी संस्थानमध्यें बरींच वर्षें अव्वल कारकुनीचे जागेवर काम केलें होतें. संस्थानांतील अनेक प्रकारच्या सार्वजनिक कामामध्यें ते नेहमीं तत्परतेनें भाग घेत असत. सार्वजनिक कार्याची आवड, बुद्धिमत्ता, हातीं घेतलेलें काम तडीस नेण्याची धडाडी, स्वतः कष्ट सोसून दुसऱ्यांच्या उपयोगीं पडणें, हे त्यांचे गुण संस्थानांतील व बाहेरीलहि बहुतेकांच्या परिचयाचे आहेत. सुप्रसिद्ध झारापकर बंधूंचे ते वडील होत. त्यांच्या निधनानें जुन्या पिढींतील एक कर्तबगार पुढारी नाहींसा झाला आहे.

## स्फुट विचार

### अमेरिकन शिष्टमंडळाच्या सूचना

संयुक्त राष्ट्रांच्या युद्ध-योजना पूर्ण सहकार्यानें व एकविचारानें होण्याचें महत्त्व किती आहे हें सांगावयास नको. लढाया अनेक क्षेत्रांत एकाच वेळीं चाललेल्या असल्या तरी त्यांचें धोरण साकल्यानें व एकसूत्रीपणानें आखणें व अंमलांत आणणें अगत्याचें आहे. हिंदुस्थानच्या मध्यवर्तित्वाचा ह्या दृष्टीनें अधिकांत अधिक उपयोग करून घेण्यास ह्या देशांतील युद्धसामुग्रीचें उत्पादन मोठ्या प्रमाणावर आणि पद्धतशीर रीतीनें वाढवणें अत्यावश्यक आहे. ही गोष्ट लक्षांत घेऊन हिंदुस्थान सरकारनें अमेरिकेस सहायाची व सहकार्याची विनंति केली. हिंदुस्थानच्या कारखान्यांचा विस्तार होण्याच्या मार्गातील मुख्य अडचण म्हटली म्हणजे यंत्रसामुग्री व हत्यारें ह्यांच्या पुरवठ्याविषयींची होय. हा पुरवठा येथें होऊं शकत नाहीं आणि सध्याच्या परिस्थितींत इंग्लंडला तो करतां येत नाहीं. ही गरज केवळ अमेरिकेसच भागवतां येईल. प्रेसिडेंट रूझव्हेल्ट ह्यांस ही गोष्ट पटून त्यांनीं सदरहु प्रश्नाची चौकशी करून शिफारसी स्वतःस करण्यासाठी एक तज्ज्ञांचें शिष्टमंडळ डॉ. ग्रेडी ह्यांच्या नेतृत्वाखालीं तात्काळ हिंदुस्थानास पाठवलें. गेल्या पांच-सहा आठवड्यांच्या अवधींत अमेरिकन शिष्टमंडळानें बंगाल व मुंबई प्रांतांतील कारखान्यांची पहाणी करून त्यांच्या गरजांचा अंदाज केला आहे आणि त्याच्यावर आधारलेल्या आपल्या सूचना प्रेसिडेंट रूझव्हेल्ट ह्यांस सादर केल्या आहेत व त्या व्हाइसरॉय ह्यांच्याकडेहि पाठवल्या आहेत.

### सूचनांचें स्वरूप

अमेरिकन लोकांच्या तातडीनें कामें करण्याच्या पद्धतीनें, ग्रेडी शिष्टमंडळानें हिंदी कारखान्यांच्या चालू गरजा भागवल्या जाऊन यंत्रें व हत्यारें ह्यांचे संबंधांतल्या अडचणी तात्काळ दूर व्हाव्या ह्या हेतूनें जरूर तो माल पुरविण्याची सूचना आपल्या सरकारास केली आहे. तथापि, अधिक महत्त्वाचें त्याचें कार्य आहे तें युद्धसामुग्रीचें उत्पादन हिंदुस्थानांत मोठ्या प्रमाणावर होण्यासाठी कराव्या लागणाऱ्या कारखान्यांच्या घटनेसंबंधाचें आहे. त्यासाठी अवजड यंत्रसामुग्री आणि ती बसविणारे तज्ज्ञ अमेरिकेंतून इकडे यावे लागतील आणि अनुकूल परिस्थितींत त्यांच्या करवीं नवे कारखाने स्थापावे लागतील. हिंदुस्थान सरकारच्या लष्करी सल्लागारांनीं आपल्या योजनांस अनुलक्षून स्वतःच्या लढाऊ सामुग्रीविषयींच्या गरजा निश्चित कराव्या म्हणजे कारखान्यांची त्याप्रमाणें आखणी करणें सोइस्कर होईल असें ग्रेडी शिष्टमंडळाचें म्हणणें आहे. तसेंच, उत्पादन, पुरवठा व वहातुक ह्यांच्यांशीं संबंध असलेल्या सरकारी खात्यांच्या कार्यांचा व अधिकाऱ्यांचा मेळ घातला जावा म्हणजे सबंध योजनेंत एकसूत्रीपणा उत्पन्न होईल असें त्यानें सुचविलें आहे. ह्यासाठी उत्पादनाची जबाबदारी ज्यावर टाकतां येईल असा निराळा मंत्री गव्हर्नर जनरलच्या कार्यकारी मंडळांत असावा असें अनुमान त्याच्या योजनेवरून निघतें. त्याचप्रमाणें, इंग्लंडमधील मंत्रिमंडळाचें लहानसें युद्धमंडळ कार्यक्षमतेच्या दृष्टीनें बनवण्यांत आलें आहे, तसें युद्धमंडळ व्हाइसरॉयांच्या अध्यक्षतेखालीं नेमलें जावें अशीहि सूचना करण्यांत आली आहे असें समजतें.

### "धान्याची पैदास वाढवा"

चालू आठवड्यांत ह्या प्रांतांतील शेतकरी वर्गात "धान्याची पैदास वाढवा" ह्या सूत्रांत ग्रथित झालेल्या धोरणाच्या प्रचाराची मोहीम चालवण्यांत येत आहे. खरीफ हंगामाच्या पेरण्या आतां जवळ येऊन भिडल्या आहेत अशा स्थितींत कपाशीसारखीं बिन-मागणीचीं पिकें सोडून देऊन धान्याचीं पिकें करण्याचें अगत्य शेतकऱ्यांच्या मनावर ठसवून त्यांच्या हातून हा बदल घडवून आणण्याचें कार्य तातडीनें म्हणून केलें जावयाचें आहे. युद्धाच्या परिस्थितींत अन्नाचा पुरवठा अबाधित रहाणें अत्यावश्यक आहे आणि त्यासाठी खाण्याच्या धान्यांच्या पिकांचा विस्तार व्हावयास हवा आहे. शेतकऱ्यांच्या पदरांत रोकड टाकणाऱ्या पिकांस आज मागणी नसल्यानें तीं, नेहमींप्रमाणें करीत रहाण्यांत त्यांचा तोटा आहे. तेव्हां, शेतकऱ्यांनीं त्यांच्याऐवजीं खाण्याच्या धान्यांचीं पिकें करण्यांत दुहेरी फायदा आहे. एक तर युद्धपरिस्थितींत जनतेस अन्नाचा भरपूर पुरवठा त्या योगानें निश्चित होईल आणि दुसरें, त्या योगानें शेतकऱ्यांचें नुकसान न होतां हित साधेल. चालू आठवड्यांतील ह्यासंबंधांत होत असलेल्या प्रचार मोहिमेस अनुलक्षून गव्हर्नरांनीं जिल्ह्यांच्या कलेक्टरांस एक संदेश पाठवला असून ह्या अधिकाऱ्यांनीं प्रस्तुत मोहीम यशस्वी होण्यासाठी शिकस्त करावी असें त्यांत म्हटलें आहे. हा संदेश यथाकाल व यथोचित आहे आणि तो इष्ट परिणाम घडवून आणील अशी आम्हांस आशा आहे.

---

### ११, डाउनिंग स्ट्रीट

सर स्टॅफर्ड क्रिप्स ह्यांस ११, डाउनिंग स्ट्रीट येथें कचेरी देण्यांत आली आहे. ब्रिटिश मुख्य प्रधानांची कचेरी १०, डाउनिंग स्ट्रीट येथें आहे.

### ॲबिसिनिआंत ब्रिटिश सल्लागार

एथिओपियाच्या बादशहांनीं आपल्या फडणिशी, न्याय, व्यापार, वहातुक, पोस्ट व तार, शिक्षण, इत्यादि खात्यांसाठीं ब्रिटिश सल्लागार नेमले आहेत अगर ते लवकरच नेमले जातील, असें कॉमन्स सभेंत सांगण्यांत आलें.

### बादशहांचा वाढदिवस

बादशहांचे वाढदिवसानिमित्त चालू वर्षी सध्याची विशिष्ट युद्धपरिस्थिति लक्षांत घेऊन : *हिंदुस्थानांत सुट्टी दिली जाणार नाहीं.*

### हिंदी चित्रपटांचा धंदा

मि. ॲलेक्झँडर शॉ, हिंदी फिल्म ॲडव्हायसरी बोर्डाचे माजी डायरेक्टर, ह्यांनीं हिंदी चित्रपट व्यवसायावर लंडनमध्यें नुकतेंच भाषण केलें, त्यांत त्यांनीं हिंदी फिल्म्स व फिल्म कंपन्या ह्यांवर कडक टीका केली. पुण्याची 'प्रभात' व कलकत्त्याची 'न्यू थिएटर्स' ह्या दोन कंपन्यांचा त्यांनीं विशेष अपवाद म्हणून उल्लेख केला. 'शेजारी' बोलपटाचा विषय आणि दामले, फत्तेलाल व मेहबूब ह्यांचें दिग्दर्शन चातुर्य ह्यांची त्यांनीं स्तुति केली.

## सहकारी क्रेडिट सोसायटीचा सेक्रेटरी
(१)

( रा. ब. काळभोर यांचा लेख )

सहकारी चळवळ ही एक -सासळी धरल्यास व खात्याचे अधिकारी व सुपरवायझर्स हे तिचे दुवे धरल्यास सेक्रेटरी हा त्या सासळीचा शेवटचा परंतु फार महत्वाचा दुवा आहे, असें समजलें पाहिजे. रेव्हिन्यु खात्यामुळें सरकारच्या तिजोरींत जरी मुख्य भर पडत असली तरी तें काम कलेक्टर, कमिशनर, प्रांत हे प्रत्यक्ष करीत नसून मामलेदारांच्या हाताखाली त्याच्या पूर्ण ताब्यांत तलाठी दिले असलेमुळें तें काम बीनबोभाट होत आहे, हें आपण पाहतों. एखादा लहान गांव असला व तेथें स्वतंत्र तलाठी ठेवतां येत नसला तरी त्याचेकडे तीन चार गांवांचा गट देऊन काम बीनबोभाट केलें जात आहे. सोसायटीचा सेक्रेटरी हा तितकाच महत्वाचा व तितक्याच दर्जाचा. त्याचप्रमाणें ३,४ गांवें मिळून एक गट करून तो त्याचे ताब्यांत दिल्यास सोसायटीचें काम तलाठ्याप्रमाणें सुनियंत्रितपणें चालणार नाहीं असा कोणता चारित्र्यवान म्हणूं शकेल? सेक्रेटरी किमान दर्जाचा, ठराविक प्रमाणांत बढती मिळणारा, नोकरीची शाश्वती मिळून चांगलें काम केल्यास चीज होणारच अशा दृढ भावनेचा, जर योजून नेमला गेला व त्याचेवर जर युनिअनची हल्ली असलेली योग्य देखरेख व भरपूर दाब ठेवण्यांत आला तर खालावत चाललेल्या सर्व सोसायट्यांची स्थिति सुधारल्याशिवाय खात्रीनें राहणार नाहीं, असा आमचा दृढ विश्वास आहे.

आज निरनिराळया शेतकी को. सोसायट्यावर जे निरनिराळे सेक्रेटरी नेमण्यांत आलेले आहेत, त्यापैकीं बरेच सेक्रेटरी स्थानिक सेक्रेटरी असून सेक्रेटरीच्या कामाची मुळींच माहिती नसलेले आहेत. तसेंच सोसायटीचा जरी नाममात्र पगार असला तरी तो घेऊन सवड सापडली तर दप्तर उघडावयाचें अशाच मगदुराचे बरेच सेक्रेटरी आहेत. या सेक्रेटरींपैकीं प्रामाणिक व निरुपद्रवी कांहीं जण असल्यास त्यांना कामाची माहिती नाहीं, माहिती करून घेण्याची इच्छा नाहीं व कोणाच्या हुकमतीखालीं काम करण्याची तयारी नाहीं. यांपैकी जे उद्योगी सेक्रेटरी आहेत, ते युनिअननें केलेले हुकूम हे हुकूम नसून पसंत पडल्यास त्याप्रमाणें वागावें अशा दृष्टीनें त्याकडे पाहणारे असतात. हे सर्व सेक्रेटरी स्थानिक असलेमुळें जवळजवळ त्यांना मिळत असलेल्या पगारापुरते ते वतनदारच होऊन बसलेले आहेत. यामुळें युनिअनला कामाच्या सोईच्या दृष्टीनें या लोकांची बदली करणें अवश्य झाल्यास अशक्य होऊन बसलें आहे व कमी करणें झाल्यास प्रसंगीं सोसायट्यांतील सर्व सभासदांची भीड खर्ची घालून बदली रहीत करण्याचे प्रयत्न होतात त्यामुळें तेंही अशक्य झालें आहे. कांहीं ठिकाणीं ग्रुप सेक्रेटरी आहेत. परंतु तेहि नाममात्र ग्रुप सेक्रेटरी असून जवळ जवळ वतनदारच झाले आहेत. युनिअननें बदली करण्याचें ठरविल्यास हव्या त्या युक्त्या योजून बदली तहकूब करण्याचें धोरण त्यांचें नेहमीच असतें. म्हणजे एका सोसायटीवर असणारा स्थानिक सेक्रेटरी व हे ग्रुप सेक्रेटरी यांचेमध्यें फारसा भेद नसून स्थानिक लोक एक गावचे वतनदार झाले तर ग्रुप सेक्रेटरी त्यांचे ताब्यांत जितक्या सोसायट्या असतील तितक्या गांवचे वतनदार झाले आहेत. या सर्व परिस्थितीमुळें सेक्रेटरींचा प्रश्न फार गुंतागुंतीचा झाला असून युनिअनचे अधिकारी व सुपरवायझर हे कसें तरी चुचकारून होईल तें काम त्यांचेकडून करून घेतात व आपली अब्रू कायम राखतात अशी परिस्थिति प्राप्त झाली आहे. कांहीं ठिकाणीं जाइंट एक्स्पेण्डिचर स्कीमखाली पूर्वी खात्यानें नेमलेले परंतु हल्ली संपूर्णपणें युनिअनचे नियंत्रणाखाली असलेले कांहीं ग्रुप सेक्रेटरी आहेत. तेवढे मात्र यूनिअनचे पूर्ण अधिकाराखाली असून त्यांच्या बदल्या करणें वगैरे बाबतींत युनिअनला पूर्ण अधिकार आहे. परंतु यामध्येंहि पगारवाढ व चांगलें काम केल्यास योग्य बढती इत्यादि गोष्टींचा अंतर्भाव होणें जरूर आहे. तसें न झाल्यास कांहीं दिवसांनीं त्यांचा अनिष्ट परिणाम झाल्याशिवाय राहणार नाहीं.

वरील स्वरूप बदलून तें पूर्णपणें शेतकऱ्याचे फायद्याचें करणें झाल्यास कांहीं किरकोळ स्वरूपाचे परंतु अत्यंत महत्त्वाचे नियमांत बदल करून सर्व सोसायट्यांस एकसारखे नियम लागू करण्यांत आले पाहिजेत. उदाहरणार्थ, कांहीं सोसायट्यांचा सेक्रेटरी साधारण सभा निवडते. कांहीं सोसायट्यांचे सेक्रेटरीची असि. रजिस्टार साहेब अगर त्यांनीं अधिकार दिलेली संस्था यांच्या मंजुरीनें पंच कमिटी नेमणूक करिते. कांहीं सोसायट्या यूनिअनचे संमतीनें सेक्रेटरी नेमल्यास त्यास मान्यता देतात. त्याचप्रमाणें यूनिअनचे पोट नियमांत ग्रुप सेक्रेटरी नेमण्याचा अधिकार युनिअनला आहे व बदली करणें झाल्यास सोसायट्यांची संमति घ्यावी लागते. अशा प्रकारचे निरनिराळे ज्यांची अंमलबजावणी करणें अतिकठीण असे पोटनियम करण्यांत आलेले आहेत. खात्यांतील वरिष्ठ अधिकाऱ्यांनीं ते सर्व बदलून हुशार व लायक सेक्रेटरी किमान पगारावर नेमण्यास, त्यांना प्रमोशन देण्यास त्यांची बदली करण्यास वगैरे सर्व अधिकार यूनिअनला दिले आहेत व ते सर्व सोसायट्यांवर सारखे बंधनकारक असले पाहिजेत, अशा तऱ्हेच्या नियमदुरुस्त्या करण्याची आतां वेळ आलेली आहे असें आम्हांस वाटतें. यासंबंधींचे बारीकसारीक नियमदुरुस्त्या करण्याचे हक्क खात्यानें ताबडतोब हातीं घ्यावे, अशी आमची सूचना आहे. मात्र यासंबंधींचे आमचे साधारण विचार यावेळीं दिग्दर्शित न केल्यास आम्हीं करीत असलेल्या विचारांची पूर्तता होणार नाहीं, म्हणून या बाबतींत आमची सर्वसाधारण ठोकळ योजना पुढें देत आहोंत.

### सेक्रेटरीबाबत योजना

नोकरीस सरकारी मान्यता:—ज्याप्रमाणें या खात्यांतील सुपरवायझिंग स्टाफची नोकरी सरकारनें मान्य करून तिला मूर्त स्वरूप दिलें आहे, त्याप्रमाणें सोसायटीच्या सेक्रेटरी व इतर नोकरवर्गाच्या नोकरीस मान्यता देऊन त्यांचे केडर बनवावें.

२. पगाराकरितां जमवावयाचा फंड:—

अ. हल्लीच्याप्रमाणें आडिट फी भांडवलाच्या शेकडा दोन आणे व युनिअन फी शेकडा आठ आणे सोसायटीकडून सक्तीनें वसूल केली जाते, त्याप्रमाणें प्रत्येक सोसायटीच्या खेळत्या भांडवलाच्या मानानें, परंतु ग्रेडेशन पद्धतीनें मॅनेजमेंट चार्जेस म्हणून रकम वसूल करावी व ती जिल्ह्याची एकत्र करावी.

ब. ही गोष्ट को. खात्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नजरेस आणून त्यांचेकडून या कार्याकरितां नॉमिनल ग्रांट मिळविणें.

क. कर्तव्यप्रेरित सेक्रेटरी नेमला गेल्यास शेतकी सोसायट्यांस कर्ज देणाऱ्या बँकेचा आपोआपच फायदा

होणार आहे. तरी या फंडास बँकेकडून ग्रँट शक्य तर मिळविणें.

ड. सोसायटीचे गांवीं ग्रामपंचायत, व्हिलेज अप्लिफ्ट, आरोग्य-संरक्षण वगैरे इतर चळवळी असल्यास व त्या खात्याकडून सेक्रेटरीच्या पगाराकरितां योग्य ग्रँट मिळाल्यास ती स्वीकारणें.

टीप—सदर प्रमाणें सोसायटीचे नोकरवर्गावर इतर खात्याची हुकमत चालू नये, या मताचे आम्हीं आहोंत. सबब कोणत्याहि दुसऱ्या खात्याकडून ग्रँट घेतली जाऊं नये, असें आमचें स्पष्ट मत आहे.

सेक्रेटरी कोणास नेमावें:—

१. कमींत कमी व्हर्नाक्युलर फायनल झालेला मनुष्य, ज्याची सोसायटीचें काम करण्याची इच्छा आहे, त्यास नेमण्यास हरकत नाहीं.
२. अशा रीतीनें नेमलेला प्रत्येक सेक्रेटरी सेक्रेटरीची परीक्षा पास झाला असला पाहिजे. त्याशिवाय तो कायम होण्यास लायक नाहीं.
३. जुने सेक्रेटरी, ज्यांची सर्व्हिस दहा वर्षांपेक्षां ज्यास्त झालेली आहे, अशा सेक्रेटरीस त्यांची इच्छा असल्यावर कामावर चालू ठेवण्यास हरकत नाहीं. मात्र त्यांनीं दोन वर्षांत परीक्षा पास झालेंच पाहिजे.
४. सेक्रेटरीचा किमान व कमाल पगार ठरवून त्यामध्यें टाईमस्केल, प्रमोशन दिलें जावें.
५. वरील स्केलप्रमाणें बसणाऱ्या पगारांत जितक्या सोसायटया कमींत कमी लागतील तितक्या बाध्यात. मात्र ग्रुप करतांना ३ पेक्षा कमी व ५ पेक्षा ज्यास्त असू नये.
६. सेक्रेटरीची बदली कमींत कमी तीन वर्षांनीं व ज्यास्तींत ज्यास्त पांच वर्षांनीं करण्यांत आली पाहिजे.
७. सेक्रेटरीचे जागी स्थानिक माणसास केव्हांहि नेमूं नये.
८. सेक्रेटरी लोकांस काम करतांना सरकारी नियमाप्रमाणें त्यास किरकोळ व हक्काची रजा देण्यांत यावी.
९. सेक्रेटरीकरितां प्रॉव्हिडंट फंड अगर तत्सम एखादी योजना करण्यांत यावी.

सेक्रेटरीचा ताबा:—

१. सर्वसाधारणपणें तालुका युनिअनचे खास देखरेखीखालीं सेक्रेटरीनें काम केलें पाहिजे व त्यानें युनिअनचे हुकूम पाळले पाहिजेत.
२. प्रत्येक पांच वर्षांनीं युनिअननें सेक्रेटरीच्या बदल्या एकदम न करितां आळीपाळीनें कराव्यात.
३. एखाद्या सोसायटीवर सेक्रेटरी काम करीत असतांना सतत दोन वर्षे ऑडिटरचा वाईट शेरा मिळाल्यास ते दोष काढून टाकण्याकरितां सेक्रेटरीने प्रयत्न केला नाहीं, तर त्यास दंड अगर शिक्षा करण्याचा अधिकार युनिअनला असावा.
४. वरील सर्व गोष्टींत आपणांवर अन्याय झाला आहे असें सेक्रेटरीस वाटल्यास यूनिअन्स बोर्डाकडे अगर प्रॉव्हिन्शियल बोर्डाकडे अपील करण्याचा अधिकार सेक्रेटरीस आहे. मात्र अशा अपिलाचा निकाल होईपर्यंत युनिअनचे हुकूम अंमलांत राहतील.

येणेप्रमाणें ढोकळ मानानें विचार करून सुचवितां येतील तितक्या सूचना करण्याचें धारिष्ट्य आम्हीं केलें आहे व आमची अशी पक्की खात्री आहे की, खात्यानें अशा कांहीं तरी सुधारणा केल्याशिवाय रद्द होऊं घातलेल्या सोसायट्यांची संख्या दिवसेंदिवस कमी होणें शक्य नाहीं व असें झाल्यास खात्यावर सारखा दोष येण्याची भीति राहाणारच. म्हणून खात्यांतील वरिष्ठ अधिकाऱ्यांनीं या आमच्या वरील सूचनांकडे जरूर लक्ष द्यावें अशी आग्रहाची विनंति आहे. (समाप्त)


## — दी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि., पुणें —

“आधीं केलें मग सांगितलें”

चालू हंगामाचा खर्च, घसारा ( Depreciation ) व ठेवींवरील व्याजें भागवून अंदाजी

## दोन लक्ष पन्नास हजार रुपये नफा

साखरेचा उतारा शेकडा दहा टक्क्यांपेक्षां जास्त

वरील नफ्यांतून

गेल्या हंगामाचा तोटा भरून काढून

चालू वर्षी

## शेअरवर डिव्हिडंड देतां येईल.

कॉमनवेल्थ बिल्डिंग,
लक्ष्मी रोड
पुणें २.

चंद्रशेखर गोविंद आगाशे
बी. ए. एलएल. बी.,
मॅनेजिंग एजंटस्
सी. जी. आगाशे अँड को.

महायुद्ध दाराशीं आलें
परदेशी औषधें
दुर्मिळ व महाग झालीं
पण
भिण्याचें कारण नाहीं !!!
— कारण —
आयुर्वेद रसशाळा पुणें लि०
या देशी औषधाच्या प्रसिद्ध कारखान्यानें
तयार केलेलीं
● रक्तवर्धक, ● उपनाह,
● बालजीवन, ● कॅल्सीप्राल
इत्यादि पेटंट, स्टँडर्ड व लोकप्रिय औषधें खात्री पटल्यामुळें
★ डॉक्टर्सहि वापरूं लागले आहेत. ★
दरसाल बिनचूक नफा वाटणाऱ्या ह्या कंपनीचे
शेअर्स व औषधें मागवा.
आयुर्वेद रसशाळा पुणें लि०
मुख्य दुकान गणपति चौक, लक्ष्मीरोड, पुणें २.

N. V. WADNERKAR
Gold & Silver Smith, Jeweller & Engraver,
Electro-plater & Manufacturer of Sporting
Trophies, Medals, Cups etc.
- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -
POONA CITY.



मधुमेहावरील
औषध
तीन आठवड्यांचे
औषधास फक्त रु. ७
— मागविण्याचा पत्ता —
मॅनेजिंग डायरेक्टर, रूरल प्रॉडक्ट्स
कंपनी लिमिटेड.
१२३ ए, सदाशिव, पुणें २.

DECCAN BOOK STALL
Booksellers, Publishers & Subscription Agents
Fergusson College Road, Poona No. 4
(1) We stock and supply Educational books, General books & Library books.
(2) We supply Government of Bombay and Government of India publications.
(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.
(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.

'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

अर्थशास्त्र
लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें ३००; किंमत ३ रुपये
या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.
बंबाचे माडीवर
महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी
बुधवार चौक, पुणें


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनी 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ८ | पुणें, बुधवार, तारीख ३ जून १९४२ | अंक २२

## — दी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि., पुणें —

" आधीं केलें मग सांगितलें "

चालू हंगामाचा खर्च, घसारा ( Depreciation ) व ठेवींवरील व्याजें भागवून अंदाजी

## दोन लक्ष पन्नास हजार रुपये नफा

साखरेचा उतारा शेकडा दहा टक्क्यांपेक्षां जास्त
वरील नफ्यांतून
गेल्या हंगामाचा तोटा भरून काढून
चालू वर्षी

## शेअरवर डिव्हिडंड देतां येईल.

कॉमनवेल्थ बिल्डिंग,
लक्ष्मी रोड
पुणें १.

चंद्रशेखर गोविंद आगाशे
बी. ए., एलएल्. बी.,
मॅनेजिंग एजंटस्.
सी. जी. आगाशे ॲण्ड को.

महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर

## महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

## SIR PARASHURAMBHAU COLLEGE, POONA 2

The College opens on June 20, 1942. Students should secure their admission early by enrolling their names in the college office. The College Prospectus giving all necessary information and containing the required application forms (for the hostels—both for men and women) will be sent gratis on request.

The college office will remain open for admission of students from Thursday, 4th June 1942 between 12 noon and 4 p. m.

R. D. KARMARKAR,
Principal.


# विविध माहिती

### अफगाण स्वातंत्र्याचा वाढदिवस

अफगाणिस्तानाच्या स्वातंत्र्याचा २४४ वा वार्षिक दिन मुंबईतील अफगाण वकिलातींत गेल्या आठवड्यांत साजरा करण्यांत आला. त्या प्रसंगीं इतर देशांचे वकील, सरकारी अधिकारी, कांहीं प्रमुख नागरिक इत्यादि उपस्थित होते.

### वॉर रिस्कसंबंधीं क्लेम

हिंदी कारखान्यांच्या युद्धविषयक धोक्याच्या विम्याचे योजनेस अनुसरून सरकारकडे आतांपर्यंत दोन क्लेम्स आले आहेत. त्यांपैकीं एक कोकोनाडा येथील व दुसरा आसाममधील आहे. मालाच्या विम्याबाबत अद्याप एकहि क्लेम आलेला नाहीं.

### धरमसी मोरारजी केमिकल कं. लि.

वरील कंपनीस १९४१ मध्यें २,३८,२८० रुपये नफा झाला. कंपनीचा कारखाना, इमारत व माल ह्यांचा ८½ लाखांचा विमा उतरलेला आहे.

### हिंदुस्थानांत ब्रह्मी परीक्षा

ब्रह्मदेशांतील हायस्कूल फायनलच्या व रंगून विश्वविद्यालयाच्या परीक्षा हिंदुस्थानांत एका सोइस्कर केंद्रांत जुलै १९४२ चे अखेरीस घेण्यांत येणार आहेत.

### ट्रेझरी बिलांवर १ रु. १ आ. व्याजाचा दर

गेल्या आठवड्यांत हिंदी रिझर्व्ह बँकेनें हिंदुस्थान सरकारचीं २ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. १ रु. ३ आ. पडला.

### महाराणी मेरी

महाराणी मेरी ह्यांचा ७५ वा वाढदिवस गेल्या आठवड्यांत साजरा झाला.

### बिलांची रकम लवकर मिळण्याची व्यवस्था

हिंदुस्थान सरकारच्या सप्लाय खात्यास माल पुरविणारांना त्यांचे पैसे लवकर मिळत नाहींत, अशी तक्रार आल्यावरून ह्या संबंधांतील तक्रारी दूर करण्याचे कामीं श्री. राव ह्या एका सेवानिवृत्त अकौंटंट जनरलची सप्लाय खात्याचे कचेरींत नेमणूक झाली आहे.

### जो लुईवर इनकम टॅक्सची आकारणी

सुप्रसिद्ध मुष्टियुद्ध प्रवीण जो लुई ह्यास १९४१ सालाबद्दल १,१७,००० डॉलर्स इनकम टॅक्स बसला.

### विमानांचें प्रचंड उत्पादन

चालू वर्षी अमेरिकेंत ६० हजार विमानांचें उत्पादन होईल.

### जॉन बॅरीमूर

सुप्रसिद्ध सिनेमा नट जॉन बॅरीमूर हा गेल्या आठवड्यांत मरण पावला.

### युद्धफंड

व्हाइसरॉयांच्या युद्धफंडाचा आकडा पावणे सात कोटि रुपयांवर गेला आहे.

### मोटारचें जळण म्हणून रॉकेलचा उपयोग

मोटार चालविण्यासाठी रॉकेलचा पेट्रोलचे ऐवजी उपयोग करण्यांत येऊं नये, अशी सरकारनें मार्च, १९४२ मध्यें सूचना दिली असतांहि तसा उपयोग कांहीं लोक करीत असल्याचें आढळून आलें आहे म्हणून, सरकारनें अशा वापरास बंदी करणारा हुकूम आतां काढला आहे.

### चेक्सची देवघेव

मुंबईच्या बँकर्स क्लिअरिंग हाउसमध्यें गेल्या आठवड्यांत १९½ कोटि रुपयांच्या १,०६,८६४ चेक्सची देवघेव झाली.

### झोर थोस्ट नो डिसो

१२ जून रोजीं झोर थोस्ट नो डिसो निमित्त दरसालप्रमाणें बँकांस सुट्टी असावयाची, ती यंदा कमी करण्यांत आली आहे.

### विषारी वायूंपासून बचाव

युद्धांत वापरण्यांत येणारे विषारी वायू, त्यांचे गुणधर्म व त्यांवरील उपाय ह्यांची थोडक्यांत माहिती देणारें एक चोपडें ब्रिटिश सरकारनें जनतेच्या माहितीसाठी प्रसिद्ध केलें आहे.

### हिंदी कपाशीच्या पिकाचा अंदाज

| | १९४१–४२ | गेल्या वर्षी |
|---|---|---|
| एकूण लागवड ( एकर ) | ५,७०,००,००० | ५७,७०,००० |
| एकूण उत्पादन ( गांठीं ) | १०,९३,००० | १०,८७,००० |

### हिंदी तिळाच्या पिकाचा अंदाज

| | १९४१–४२ | गेल्या वर्षी |
|---|---|---|
| एकूण लागवड ( एकर ) | ६,८३,००० | ७,८६,००० |
| एकूण उत्पादन ( टन ) | ८६,०.०० | १,०३,००० |

### हिंदी गव्हाच्या पिकाचा अंदाज

| | १९४१–४२ | गेल्या वर्षी |
|---|---|---|
| एकूण लागवड ( एकर ) | ३,३५,४३,००० | ३,४१,१०,००० |
| एकूण उत्पादन ( टन ) | ९९,४८,००० | १,०२,६५,००० |

### पॅरॅशूटकरितां रेशिम

पॅरॅशूटला लागणाऱ्या रेशमाचे सुतास असणारी वाढणी मागणी पुरी करण्याकरितां, त्याचें उत्पादन वाढविण्याची योजना सरकारनें आखली आहे. त्यास येणारा १८½ लक्ष रुपयांचा भांडवली खर्च सरकार सोसणार आहे. ही योजना अंमलांत आली म्हणजे फिलेचर्समध्यें ज्यास्त रेशीम तयार होऊं लागून पॅरॅशूटला योग्य असें १० लक्ष पौंड रेशीम अधिक उपलब्ध होईल असा अंदाज आहे.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | १७२ | हिंदुस्थानांत यांत्रिक सुधारणा–नाणेबाजारांतील हालहवाल ... | |
| २ मुंबई प्रांतांतील रस्ते | १७३ | ६ प्रोड्यूसर गॅस प्लँट ... | १७६ |
| ३ फ्लॅटरेट विरुद्ध मेसेज रेट | १७४ | ७ पॉवर आल्कोहोलचें उत्पादन ... | १७७ |
| ४ पॅसिफिक महासागरांतलें रणक्षेत्र ... | १७४ | ८ डिबेंचर्सचें तारण ... | १७७ |
| ५ स्फुट विचार ... | १७५ | | |
| ब्रह्मदेशांतील मोहीम समाप्त– | | | |


# अर्थ

बुधवार, ता. ३ जून, १९४२

## मुंबई प्रांतांतील रस्ते

हिंदी रस्ते आणि वहातुकीचीं साधनें ह्यांच्या विषयींच्या प्रश्नांस स्वतःस वाहून घेतलेली "इंडिअन रोड्स अँड ट्रॅन्सपोर्ट डेव्हलपमेंट असोसिएशन" ह्या नांवाची अखिल भारतीय संस्था आहे. तिच्या मुंबई येथील शाखेच्या वार्षिक सभेचे प्रसंगीं डॉ. आंतिया ह्यांनीं आपल्या अध्यक्षीय भाषणांत मुंबई प्रांतांतील रस्त्यांच्या परिस्थितीसंबंधानें विचार प्रदर्शित केले आणि ती सुधारण्यासाठीं कित्येक सूचना केल्या त्यांच्याकडे लक्ष वेधणें आवश्यक आहे. प्रांतिक रस्त्यांच्या सुधारणेसंबंधानें मुंबई सरकारनें अलीकडे अधिक दक्षतेचें धोरण अंगिकारलें असलें तरी एकंदरीनें पहातां प्रांतांतील रस्त्यांची स्थिति अभिमानास्पद नाहीं हा त्यांच्या भाषणांतला पहिला व महत्वाचा मुद्दा होता. वहातुकीच्या कामाचा बोजा सहन करण्याची शक्ति त्यांचेमध्यें असेल तरच रस्ते कार्यक्षम आहेत असें म्हणतां येईल आणि ही कसोटी मुंबई प्रांतांतील रस्त्यांस लावली असतां ते तिला उतरत नाहींत असें आपलें मत डॉ. आंतिया ह्यांनीं दिलें. ह्या असमाधानकारक स्थितीचें मुख्य कारण मुंबई सरकारनें गेलीं कित्येक वर्षें रस्त्यांच्या परामर्शाकरितां केलेली पैशाची अपुरी तरतूद हें आहे असें त्यांनीं निदान केलें. पब्लिक वर्क्स खात्याच्या कक्षेंतील रस्त्यांच्या जोपासनेप्रीत्यर्थ १९२७–२८ सालीं ३५ लक्ष रुपयांची तरतूद सरकारनें केली होती. रस्त्यांवरची वहातुक वाढत चालली असतांहि १९३२–३३ मध्यें हा आकडा वाढण्याचे ऐवजीं २५ लक्षांवर उतरला. १९४१ मध्यें काय तें चवदा वर्षांपूर्वींच्या आकड्याकडे सरकार परतलें. ह्या अनास्थेचा परिणाम असा झाला आहे कीं, प्रांतिक रस्त्यांची कित्येक ठिकाणीं कायमची खराबी होऊन ते पुन्हां तयार करण्याचा प्रसंग आला आहे. थोडे अपवाद सोडून बाकीच्या रस्त्यांवरून विशिष्ट वजनापेक्षा अधिक जड अशीं वाहनें जाऊं नयेत असा नियम सरकारास करावा लागला आहे तो रस्त्यांच्या दुबळेपणानें होय आणि ह्या कारणानें वहातुक मर्यादित होणें आणि त्या मानानें आर्थिक कार्यक्षमता कमी होणें स्वाभाविक आहे असा डॉ. आंतिया ह्यांचा युक्तिवाद आहे.

सध्याच्या युद्ध-परिस्थितींत रेल्वेज आणि मोटार बसेस ह्यांच्या वहातुकीच्या प्रश्नास विशेष महत्व प्राप्त झालें असून पेट्रोलच्या पुरवठ्यावरील नियंत्रणाचे योगानें त्याचें अगत्य तर अधिक वाढलें आहे. रबरी धावा व त्यांतील रबरी नळया ह्यांचें व पेट्रोलचें नियंत्रण अधिक कडक करणेंहि आवश्यक होईल. ह्याचा अर्थ असा आहे कीं, उपलब्ध असलेल्या वहातुकीच्या साधनांकडून अधिकांत अधिक काम घेण्यांत आलें पाहिजे आणि रस्ते चांगल्या स्थितींत ठेवणें हा ह्या कार्मी महत्वाचा सहायक उपाय आहे असें डॉ. आंतिया ह्यांनीं सुचवलें आहे. चांगल्या रस्त्यांमुळें गाड्यांची झीज कमी होऊन त्यांच्याकडून अधिक काम घेतां येतें, असें त्यांचें म्हणणें आहे. रस्ते तयार करण्यास लागणारें पोलादासारखें सामान मिळणें सध्या कठीण झालें आहे खरें; तथापि, ही अडचण इंजिनिअरांस दूर करणें अशक्य होईल असें त्यांस वाटत नाहीं. १९४२–४३ सालासाठीं रस्त्यांप्रीत्यर्थ ४१ लक्ष रुपये खर्चले जाण्याची व्यवस्था मुंबई सरकारनें केली आहे ती समाधानकारक आहे तरी ५६ लक्षांची मर्यादा गाठली गेल्यावांचून रस्त्याविषयींची तरतूद पुरेशी आहे असें म्हणतां येणार नाहीं असें मत त्यांनीं व्यक्त केलें आहे. मुंबई-पुणें आणि मुंबई-नाशिक ह्या महत्वाच्या रस्त्यांची सुधारणा प्रगति करीत आहे ह्याबद्दल त्यांनीं प्रांतिक सरकाराचें अभिनंदन केलें. तथापि, मुंबई सरकारनें चांगल्या रस्त्यांचें महत्व योग्य तऱ्हेनें अजून ओळखलें नाहीं हें त्यांच्या भाषणाचें पालुपद होतें. पब्लिक वर्क्स खात्यांत मद्रास प्रांतांत अधिक वरिष्ठ अधिकारी आहेत आणि मुंबई प्रांतांत थोड्या अधिकाऱ्यांकडून पुष्कळ काम करून घेण्यांत येत आहे हाहि मुद्दा त्यांनीं आपल्या मताच्या पुष्ट्यर्थ पुढें मांडला.

युद्धपरिस्थितींत मोठमोठ्या दीर्घकालीन मार्ग–योजना हातीं घेणें अशक्य व अनिष्ट असलें तरी युद्ध-प्रयत्नांस अप्रत्यक्ष रीतीनें परिपोषक होतील अशा योजना सरकारास हातीं घेतां येतील आणि विशेषतः खेडेगांवीं रस्ते तयार करतां येतील असें डॉ. आंतिया ह्यांनीं सांगितलें. सर पुरुषोत्तमदास अध्यक्ष असलेल्या आर्थिक व औद्योगिक चौकशी समितीनें खेडेगांवी रस्त्यांच्या अपुरेपणाविषयीं केलेल्या विधानांचा ह्या बाबतींत त्यांनीं आधार घेतला. समितीच्या म्हणण्याप्रमाणें कित्येक जिल्ह्यांत ४० ते ७५ टक्के इतक्या क्षेत्रफळांत मुळीच रस्ते नाहींत आणि पावसाळ्यांत त्यांमधील ७० ते ८० टक्के इतक्या खेड्यांचें बाहेरच्या जगाशीं दळणवळण बंद पडतें. ही परिस्थिति असमाधानकारक असून ती सुधारण्याचा यत्न सरकारनें करावा असें समितीनें सुचवलें होतें. पेट्रोलची दुर्मीळता लक्षांत घेऊन लोकांनीं युद्धप्रयत्नास सहाय म्हणून ह्या विषयींच्या नियंत्रणास पाठिंबा द्यावा असें डॉ. आंतिया ह्यांनीं सांगितलें आणि पेट्रोलच्या ऐवजीं प्रोड्यूसर गॅस वापरला जावा ह्या उद्देशानें सरकार त्याच्या उपयोगास उत्तेजन देत आहे त्याबद्दल त्याचें त्यांनीं अभिनंदन केलें.

## 'फ्लॅट रेट' विरुद्ध 'मेसेज' रेट

### टेलिफोनच्या दराची आकारणी

मुंबई शहरांतील टेलिफोनवाल्यांकडून 'मेसेज रेट' पद्धतीनें पैसे घेण्याचा आपला विचार मुंबई सरकारनें जाहीर केला आहे. सध्या 'फ्लॅट रेट' पद्धतीनें आकारणी केली जाते; म्हणजे टेलिफोनवाल्यानें कितीहि वेळां टेलिफोनचा उपयोग केला तरी त्यास ठराविक वार्षिक अथवा मासिक दरापेक्षा अधिक पैसे द्यावे लागत नाहींत. "मेसेज" रेट पद्धतींत किमान मासिक अथवा वार्षिक दर निश्चित असतोच, परंतु प्रत्येक कॉलसाठी आणखी स्वतंत्रपणें पैसे द्यावे लागतात. मुंबईमधील टेलिफोनवाल्यांना 'मेसेज'रेट प्रमाणें आपल्या टेलिफोनचे पैसे देण्याचा विकल्प ठेवण्यांत आलेला आहे व त्यांस दररोज पहिल्या चार कॉल्सना पैसे पडत नाहींत. १९२५ सालीं मुंबईच्या टेलिफोन कंपनीनें 'फ्लॅट'रेटची पद्धति बदलून 'मेसेज' रेट अंमलांत आणण्याचा विचार केला, त्यांतील हेतु कंपनीचें उत्पन्न वाढविणें हा होता. १९३९ सालीं 'मेसेज'रेटचा विकल्प ठेवण्यांत आला. १९४१ सालीं हिंदुस्थान सरकारनें प्रयोगादाखल पांच शहरांत पुरेसे मीटर्स मिळतांच 'मेसेज' रेट पद्धति सुरू करण्याचें आपलें धोरण जाहीर केलें.

'मेसेज' रेटचे फायदे सांगतांना 'इंडियन इन्फर्मेशन'नें १९४१ सालीं खालील गोष्टींचा उल्लेख केला होताः—टेलिफोन बसविणें व ते चालू राखणें ह्यांस खर्च येतो त्यापैकीं कांहीं भांडवली स्वरूपाचा असतो व कांहीं चालू स्वरूपाचा असतो. टेलिफोन किती वेळां करण्यांत येतो ह्यावर भांडवली खर्च अवलंबून नसतो; परंतु चालू खर्च हा टेलिफोन्सच्या वापराचे प्रमाणांत बदलत असतो. टेलिफोनची पद्धत नव्यानेंच सुरू करतेवेळीं पैशाची आकारणी 'फ्लॅट' रेटनें करणें सोईचें पडतें, कारण त्यावेळीं लोकांना टेलिफोनची सवय झालेली नसते. लोकांना टेलिफोनची चटक लागली, म्हणजे पुरेसें कारण नसतांहि लोक टेलिफोन करूं लागतात व चालू खर्च त्यामुळें वाढतो. टेलिफोनचा वापर थोड्या प्रमाणांत करणारांवर खर्चाचा बोजा निष्कारण ज्यास्त पडतो. ग्रेट ब्रिटनमध्यें १९२० सालापर्यंत 'फ्लॅट' रेट पद्धति चालू होती; आतां तेथें 'मेसेज' रेट पद्धति चालू आहे. त्यावेळीं त्यास सर्वत्र विरोध दिसून आला. मुंबई सरकारच्या नवीन उपक्रमाविरुद्ध मुंबईच्या इंडियन मर्चंटस चेंबरने जोराची तक्रार केली असून, आकारणीची पद्धत बदलण्याची आवश्यकता नाहीं असें आपलें मत तिनें नमूद केलें आहे.

### टेलिफोनचा प्रसार कसा होईल

'मेसेज' रेट आतां सुरू करण्यांत उत्पन्न वाढविणें हा हेतु नसून टेलिफोनचा प्रसार वाढावा हाच त्याचा हेतु आहे असें सरकारचें म्हणणें आहे. ह्यास उत्तर म्हणून चेंबरनें कलकत्ता व मद्रास येथील तुलनात्मक आकडे दिले आहेत.

| वर्ष | कलकत्त्यांतील टेलिफोन ('मेसेज रेट') | मुंबईमधील टेलिफोन (फ्लॅट रेट) |
|---|---|---|
| १९२५ | ६,८०० | ६,७०० |
| १९३९-४० | १६,६०० | २३,१२१ |

मद्रासमध्येंहि 'मेसेज' रेट खालीं १९३० मध्यें १,८०० टेलिफोन होते ते १९४१ सालीं फक्त ३,५९० झाले. वरील आकड्यांवरून फ्लॅट रेटच्या पद्धतीनें टेलिफोनच्या प्रसारांत निदान अडथळा तरी आणलेला नाहीं, हें चेंबरनें दाखवून दिलें आहे.

---

## पॅसिफिक महासागरांतलें रणक्षेत्र

### बेटांचें जाळें

पूर्व एशियांत सध्या युद्ध चाललें आहे त्या सागरक्षेत्राची कल्पना सामान्य माणसास सहज येण्यासारखी नाहीं. एका इंग्रजी मासिकांत त्या संबंधांत मनोरंजक माहिती आली आहे ती संक्षेपतः येथें देण्यांत येत आहे. पॅसिफिक महासागराच्या पाण्यानें पृथ्वीचा निम्मा पृष्ठभाग व्यापला आहे, एवढा त्याचा विस्तार आहे. सुमारें पावणेसात कोटि चौरस मैल इतकें त्याचें क्षेत्र असून त्यांत हजारों लहान-मोठीं बेटें पसरलीं आहेत. डच ईस्ट इंडीज बेटांचा त्यांमध्यें प्रामुख्यानें समावेश होतो. ह्या बेटांच्या व्यापाची कल्पना वरील मासिकांत मोठ्या मनोरंजक रीतीनें देण्यांत आली आहे. त्यांतला लेखक म्हणतो कीं, आयर्लंडच्या पश्चिम किनाऱ्यावर सुमात्रा बेट आहे आणि इस्ट इंडीजपैकीं सर्वांत पूर्वेकडचें बेट इराणमध्यें आहे अशी कल्पना करा म्हणजे ह्या हॉलंडच्या एशियाटिक साम्राज्याचा आकार केवढा मोठा आहे ह्याचा बोध होईल. पॅसिफिक महासागरांतील बेटें निरनिराळ्या राष्ट्रांच्या वसाहती आहेत. फिलिपाइन्स ह्या अमेरिकन वसाहतींत सात हजार लहान लहान बेटें आहेत. जपानी फौजांस व विमानांस ह्या रणक्षेत्रांत उतरणें कां सोपें गेलें ह्याची मीमांसा ह्या नैसर्गिक घटनेवरून सहज होईल. त्याच्या पूर्वेस जपानच्या मालकीचा कॅरोलाइन गट आहे आणि त्यांत ६५२ निरनिराळीं बेटें आहेत. हे प्रदेश बेटांचीं पसरलेलीं जाळींच होत. मलाया द्वीपकल्प आइल ऑफ वाइट एवढें क्षेत्रफळांत आहे. तें आणि सुमात्रा बेट ह्यांचेमध्यें एका टोकास केवळ पन्नास मैल रुंदीची मलाक्काची सामुद्रधुनी आहे. मलायांत १३२ जातींचे साप आहेत आणि जळवा व भयंकर मुंग्या ह्यांचा तेथें सुळसुळाट आहे. सुमात्रा, बोर्निओ ह्यांच्या पूर्वेकडे जाव्हा बेटांची वगैरे एक रांगच आहे. त्यांतच पोर्तुगालचे टायमोर बेट आहे. सर्वांच्या पूर्वेस न्यूगिनी बेट आहे. ह्या निरनिराळ्या बेटांच्या आकाराचा अंदाज तुलनात्मक रीतीनें असा आहे. इंग्लंडचें क्षेत्रफळ ५० हजार चौरस मैल आहे; न्यूगिनीचें तीन लक्षांचें वर आहे; बोर्निओचें २ लक्ष ९८ हजार मैल आहे; सुमात्रा दीड लक्ष चौरस मैलांवर, सेलिबिस ४८ हजार मैल आणि जाव्हा ४६ हजार मैल आहे. ह्या सर्व बेटांचें एकूण क्षेत्रफळ इंग्लंडच्या सोळापटीइतकें आहे. इंग्लंडच्या फिजी बेटांचें क्षेत्रफळ ७ हजार चौरस मैल आहे. त्याशिवाय सॉलोमान, न्यू हेब्रिडिज, टॉंगा, फिनिक्स, गिल्बर्ट वगैरे किती तरी बेटें आहेत. पश्चिम पॅसिफिकमध्यें युद्ध कोणत्या भौगोलिक परिस्थितींत चाललें आहे हें ध्यानांत घेण्यास वर दिलेल्या माहितीचा उपयोग होईल.

---

# स्फुट विचार

## ब्रह्मदेशांतील मोहीम समाप्त

जपानचें पश्चिम पॅसिफिकमध्यें बळ प्रस्थापित झालें आणि त्याच्या योगानें रंगून पडलें तेव्हां ब्रह्मदेशांतील ब्रिटिश व चिनी फौजांची कुचंबणा होणें अपरिहार्यच झालें. हिंदुस्थानचें ब्रह्मदेशाशीं दळणवळण काय तें रंगून बंदराच्या मार्गानेंच होणें शक्य आहे. शिवाय त्या देशांतील विमानगृहें जपानच्या हातीं गेलीं व ब्रिटिश वैमानिक दळ पुरेसें नव्हतें. रॉयल एअर फोर्स आणि अमेरिकन स्वयंसेवक विमानें ह्यांनीं शत्रूवर वारंवार हल्ले करून त्यास सतावून सोडलें आहे. तथापि, जनरल अलेक्झांडर ह्यांच्या हाताखालील ब्रिटिश व हिंदी फौजांस वहातुकीच्या साधनांच्या अभावी मोठ्या शौर्यानें व चिकाटीनें जपानचा त्यांस घेरण्याचा प्रयत्न हाणून पाडावा लागला. समुद्राच्या मार्गानें व थायलंडमधून शत्रूस सैनिकांच्या तुकड्या व लढाऊ सामुग्री आणणें सोयीचें होतें. जनरल अलेक्झांडरची परिस्थिति ह्याच्या उलट होती. हिंदुस्थानांतून खुष्कीनें त्यांस मदत पोचणें चांगले रस्ते ह्या बाजूकडे नसल्यानें अशक्य होतें. अशा स्थितींत शत्रूशीं लढत लढत हळुहळु माघार घेणें आणि त्याचा आपणांस घेरण्याचा बेत विफल करणें हें अवघड काम जनरल अलेक्झांडर ह्यांस करावयाचें होतें आणि तें त्यांनीं आतां पुरें केलें आहे. निबिड जंगलांतून त्यांनीं आपली फौज हिंदुस्थानांत परत सुखरूप आणली आहे. जनरल वेव्हल ह्यांनीं ह्या फौजेचें धैर्य, चिवटपणा इत्यादि गुणांचें नुकतेंच स्तुतिपूर्ण वर्णन केलें तें यथार्थ आहे. ब्रह्मदेशांतील नैसर्गिक परिस्थिति अनुकूल असती तर जनरल अलेक्झांडरच्या फौजेनें तेथें युद्ध चालू ठेवलें असतें. पण पावसाळ्यापूर्वीं ती फौज सुरक्षितपणानें हिंदुस्थानांत परत आणणें हेंच दूरदर्शीपणाचें होतें आणि ही कामगिरी यशस्वी रीतीनें पार पाडण्यांत आली आहे. परत आलेलें सैन्य थोड्या विश्रांतीनंतर पुन्हां सज्ज होऊन हिंदुस्थानच्या संरक्षणाच्या व ब्रह्मदेश फिरून जिंकण्याच्या कामीं उत्कृष्ट रीतीनें उपयोगी पडेल असा विश्वास जनरल वेव्हल ह्यांनीं प्रकट केला आहे तो वाजवी आहे. ब्रह्मदेश आतां शत्रूस मोकळा झाल्यानें 'हिंदुस्थानच्या रक्षणाची जबाबदारी वाढली आहे आणि तिच्या जाणीवेनें आपण सर्व तयारी करीत आहों असें आश्वासन त्यांनीं दिलें आहे.

---

## हिंदुस्थानांत यांत्रिक सुधारणा

" नडलें म्हणजे नवीन उपाय सुचतात ". अशा आशयाची एक इंग्रजी म्हण आहे. तिला अनुसरून सध्या युद्धाच्या तातडीच्या गरजा भागवावयाच्या असतां मामुली साधनांच्या मर्यादेपलीकडे जाऊन नवीन साधनें शोधून काढण्याच्या प्रवृत्तीस उत्तेजन मिळत आहे ही समाधानाची गोष्ट आहे. हिंदुस्थान सरकारच्या पुरवठा खात्यांत उत्पादनाची कार्यक्षमता वाढवण्याच्या प्रश्नांचा विचार करण्यासाठी एक शाखा स्थापन झालेली आहे. तिच्याकडे कित्येक कल्पकांनीं यांत्रिक कार्यक्षमता वाढवण्याच्या आपल्या सूचना पाठवल्या असून त्यांपैकीं कांहीं अंमलांतहि आल्या आहेत. विमानें, चिलखती गाड्या, दारूगोळा, ही युद्धोपयोगी सामुग्री अधिक उपयुक्त, सोयीची व स्वस्त करतां आली तर तें सर्वस्वी इष्टच आहे. उत्पादनाच्या कृतीची सुधारणा म्हणजे सहज मिळणाऱ्या व स्थानिक अशा कच्च्या साधनांचा पुरवठा होणें व सध्या वाया जाणाऱ्या पदार्थांचा फायदेशीर विनियोग करतां येणें इत्यादि संबंधांतली प्रगति होय. बाहेरून आणतां न लागतां, हिंदुस्थानांत उपलब्ध होणाऱ्या कांहीं पदार्थांचा शस्त्रास्त्रांच्या बनावटींत उपयोग होऊं शकतो असें आढळून आलें असून ह्याप्रमाणें त्वरित पुढें पाऊल पडेल तर इष्ट आहे. हिंदुस्थानांतील पोलादाचा पुरवठा वाढवून तो युद्धापूर्वीच्या मानानें दुप्पट करण्यासाठी नवीन कारखान्यांची योजना अंमलांत आणण्याची धडाडी कांहीं कारखानदार दाखवीत असून जरूर ती यंत्रसामुग्री बाहेरून आणण्याचे कामीं त्यांस हिंदुस्थान सरकारचें सहाय मिळत आहे असें समजतें. ही प्रवृत्ति अभिनंदनीय आहे.

---

## नाणें-बाजारांतली हालहवाल

मुंबईच्या नाणें-बाजारांत गेल्या आठवड्यांत खेळत्या पैशाची विपुलता असलेली दिसून आली. ह्याचें एक लक्षण म्हटलें म्हणजे ट्रेझरी बिलांस आलेली वाढती मागणी आणि त्यांवर सुटलेला कमी व्याजाचा दर हें होय. हा व्याजाचा दर पूर्वीच्या आठवड्यांच्या मानानें आठ पयांनीं उतरून दरसाल दरशेकडा १ रु. २ आणे इतका झाला. बँकांकडे कॉलमनी व तीन महिने मुदतीच्या ठेवी अल्प व्याजानें येत आहेत. सरकारी ट्रेझरी बिलांची विक्रीहि मर्यादित करण्यांत आली आहे. पावसाळ्यांत व्यापारासाठी खेळत्या पैशाची आवश्यकता म्हणण्यासारखी असत नाहीं आणि आतां ह्या मंद व्यवहाराच्या मोसमास प्रारंभ होत असल्याचीं स्पष्ट चिन्हें आहेत. गेल्या महिन्याच्या मध्याचे सुमारास शेड्यूल्ड बँकांचे एकवटलेले आकडे पाहिले असतां ह्या मंद प्रवृत्तीची प्रचीति येते. बँकांच्या बिनमुदत ठेवींत सवातीन कोटि रुपयांची वाढ झाली आणि त्यांनीं दिलेल्या कर्जांत अडीच कोटींची घट झाली. म्हणजे एका बाजूनें आंत पैसा अधिक आला आणि दुसऱ्या बाजूनें तो कमी बाहेर गेला. युद्ध-खर्चाच्या वाढीबरोबर चलनाचा विस्तार हळुहळु सारखा होत आहे. गेल्या आठवड्याची ही वाढ ५ कोटि रुपयांची होती आणि त्याच प्रमाणांत हिंदुस्थान सरकारच्या रोख्यांमध्यें चलन निधींत वाढ झाली. चलनाची एकूण रकम आतां ४६० कोटी रुपयांच्या घरांत गेली असून चलन निधींतल्या स्टर्लिंग रोख्यांची किंमत २५१ कोटि रुपये आहे. रुपयांची रोकड २७½ कोटि रुपये आहे. चांदीच्या भावांत म्हणण्यासारखी चलबिचल झाली नाहीं आणि तो १०० तोळ्यांस ७७ ते ७८ रुपयांच्या दरम्यान राहिला. सोनें जरा तेजींत होतें आणि त्याचा भाव दर तोळ्यास ४९ रु. ६ आण्यांपर्यंत चढला. चांदी-सोन्याचे व्यापारी मुंबईस परत येऊन पुन्हां पूर्ववत् व्यवहार करूं लागले आहेत असें ह्या चढीच्या भावांवरून दिसतें.

---

## बालनट साबूचा चित्रपट कंपनीशी करार

हॉलिवुडमध्यें प्रसिद्धीस आलेला हिंदी बालनट साबू ह्याचा युनिव्हर्सल ह्या अमेरिकन चित्रपट कंपनीशी करार झाला आहे, त्या अन्वयें त्यास प्रत्येक आठवड्यास एक हजार डॉलर ह्या प्रमाणें वर्षांतून किमान ४० आठवडे प्राप्ती मिळेल. हा करार सात वर्षें मुदतीचा आहे.

### प्रोड्यूसर गॅस प्लँट

पेट्रोल रेशनिंगमुळें प्रोड्यूसर गॅस प्लँट्सचा उपयोग वाढूं लागला आहे व त्यांस मागणी मोठ्या प्रमाणावर येत आहे. एकट्या मद्रास प्रांतांतच चार ते पांच हजार बसेसना व लॉऱ्यांना गॅस प्लँट्स बसविण्यांत आलीं आहेत. गॅस प्लँट्सच्या बनावटीसंबंधानें कित्येक प्रांतिक सरकारांनीं तपशीलवार नियम केले आहेत. त्यांचा उद्देश प्लँट्सची कार्यक्षमता उच्च दर्जाची रहावी हाच आहे.

पेट्रोलचे मानानें गॅस प्लँटची कार्यक्षमता ६०% असते तेव्हां इंजिन वगैरे उत्कृष्ट स्थितींत असणें अत्यावश्यक आहे. पातळीवरील धावेस गॅस प्लँटची शक्ति पुरेशी पडते. परंतु उंच चढावे वेळीं गॅसमध्यें पेट्रोल मिसळणें जरूर असतें. गॅस जितका थंड असेल तितकें उत्तम ह्या दृष्टीनें प्लँटमध्यें फिल्टरिंगची व्यवस्था चांगली असावयास पाहिजे.

प्रोड्यूसर गॅस हा कोळशापासून केला जातो व त्यांत राख व इतर अशुद्ध द्रव्यें थोड्याफार प्रमाणांत रहातात. ही अशुद्धता शक्य तेवढी कमी करण्यासाठी उत्कृष्ट कोळशाची निवड व त्याचा पुरवठा करण्याची व्यवस्था प्रांतिक जंगल खातीं करीत आहेत. एंजिनमध्यें गॅस जाण्यापूर्वी तो अगदीं शुद्ध झाला पाहिजे, ही गोष्ट प्लँट विकत घेतेवेळीं प्रामुख्यानें पहाणें जरूर आहे.

पेट्रोल ऐवजी पोड्यूसर गॅस वापरल्यानें बसचा जळणाचा खर्च दर मैली १·७५ आणे कमी येतो, असा अनुभव आहे. दर महिन्यास बसची धाव २,००० मैल झाली तर ही बचत २४८ रुपयांची होईल. म्हणजे, गॅस प्लँटचा खर्च लवकरच भरून येईल.


# काळजीचे दिवस आहेत !

## पाऊसकाळची तरतूद मुंग्यासुद्धां करतात,

आणि बुद्धिमान मनुष्य मात्र बेफिकीरींत मोठेपणा मानतो !

**परिणामः** मागें राहाणारांच्या कपाळीं दैन्य, दुःख, दारिद्र्य.

आयुष्याचा विमा उतरून जीविताच्या सर्व धोक्याविरुद्ध तजवीज करा.

वेस्टर्न इंडियाची पॉलिसी म्हणजे संरक्षणाची अत्यंत खंबीर ढाल.

चांगली तजवीज करा. आतां, या क्षणीं: पुढें वेळ आईल: क्षणाचाहि विलंब धोक्याचा.

युद्धजन्य धोक्यासुद्धां सर्व धोक्यांविरुद्ध

पुणें शाखाः— १७९, बुधवार, लक्ष्मीरोड, पुणें २.

## वेस्टर्न इंडिया

विमा कंपनी लिमिटेड, सातारा.

### पॉवर अल्कोहोलचें उत्पादन

सध्याच्या युद्धपरिस्थितींत पेट्रोलचा पुरवठा अपुरा पडत असल्याकारणानें, मोटारींस लागणाऱ्या जळणाच्या पुरवठ्यांत भर घालणें आवश्यक झालें आहे. प्रोड्यूसर गॅसचा पेट्रोलचे जागीं उपयोग आतां सर्रास होऊं लागला आहे. पॉवर अल्कोहोल पेट्रोलचे ऐवजीं वापरतां येणें शक्य आहे व साखरेच्या कारखान्यांतील वाया जाणाऱ्या मोलॅसेसपासून त्याचें उत्पादन करतां येण्याजोगें आहे, परंतु त्या उत्पादनास लागणारी यंत्रसामुग्री अमेरिकेंतुन आणविली पाहिजे. ज्यांनीं अशी यंत्रसामुग्री अगोदरच मागविली आहे अथवा ज्यांस ती मागवावयाची आहे, अशांस हिंदुस्थान सरकार शक्य तें सहाय करणार आहे; तेव्हां त्यांनीं प्रांतिक सरकारामार्फत मध्यवर्ती सरकारास जरूर तो तपशील कळवावा. पॉवर अल्कोहोलचे कारखाने कोठें स्थापन करावयाचे, हें निश्चित करतांना वेगवेगळ्या प्रकारचीं मिश्रणें एकाच केंद्रांत होणार नाहींत, ह्याविषयीं दक्षता बाळगली पाहिजे.

### डिबेंचर्सचें तारण

कलकत्ता कॉर्पोरेशन, कलकत्ता इंप्रूव्हमेंट ट्रस्ट व कलकत्ता पोर्टट्रस्ट ह्यांनीं काढलेलीं डिबेंचर्स कर्जास तारण म्हणून आपल्या अर्जाबरोबर पाठविण्यांत येऊं नयेत, असें एक सर्क्युलर इंपीरिअल बँकेनें कलकत्ता येथील बँकांकडे पाठविलें आहे. हीं डिबेंचर्स बाजरांत सत्वर विकलीं न जाण्याचा संभव आहे, ह्या दृष्टीनें इंपीरिअल बँकेनें हें सर्क्युलर काढलें असावें; तथापि त्यांची खरेदी-विक्री मोठ्या प्रमाणावर होते व ट्रस्ट सिक्युरिटीजमध्यें त्यांची गणना होते ही गोष्ट दृष्टीआड करून चालणार नाहीं. तेव्हां रिझर्व्ह बँकेनें ह्या संबंधांत स्पष्ट खुलासा करावा, अशी तिला बंगाल नॅशनल चेंबर ऑफ कॉमर्सनें विनंति केली आहे.


SUN LIFE ASSURANCE COMPANY OF CANADA

# एक मोठी विमा कंपनी

**१८६५** सालीं सन लाइफ ॲशुअरन्स कंपनी ऑफ कॅनडाची स्थापना झाली, तेव्हांपासून आतांपर्यंतच्या प्रदीर्घ काळांत कंपनीची प्रगति अखंड व अविरत चालू आहे हें आयुर्विम्यामुळें मिळणाऱ्या खंबीर संरक्षणाचें बिनचुक व निश्चित निदर्शक आहे. सन लाइफ ऑफ कॅनडाच्या दहा लाखांपेक्षां अधिक विमेदारांस निश्चित सुरक्षितपणा प्राप्त करून देणाऱ्या आयुर्विम्याच्या सहकारी तत्त्वांची दृढताहि त्यानें सिद्ध होते.

**१९४१** सालीं कंपनीनें २४,१९,००,००० रुपयांपेक्षां अधिक रकम विमेदारांस व त्यांचे कुटुंबीयांस दिली. कंपनीच्या पहिल्या पॉलिसीपासून आजतागायत तिनें ४,०४,९५,००,००० रुपये वाटले आहेत. ५१,२४,००,००० रुपयांचें विम्याचें नवें काम तिनें ह्यावर्षीं पुरें केलें, म्हणजे एकूण चालू कामाचा आकडा ८,१४,१७,००,००० रुपयांवर गेला. कंपनीची एकूण जिंदगी आतां २,७२,७४,००,००० रुपयांची आहे.

सन लाइफचें विस्तृत कार्यक्षेत्र आणि तिच्यातर्फे काम करणारांचा उच्च दर्जा व त्यांची उत्कृष्ट लायकी ह्यांचिमुळें विमेदारांच्या हितासंबंधाचें तत्परतेनें, हुशारीनें व कार्यक्षमतेनें रक्षण होतें.

पी. व्ही. लाड,
यूनिट ऑर्गनायझर फॉर डेक्कन,
लक्ष्मीरोड, पुणें २.

**Sun Life of Canada**
HEAD OFFICE MONTREAL
(Incorporated in Canada in 1865 as a Limited Company).

A LEADER IN PUBLIC SERVICE

## FERGUSSON COLLEGE, POONA

Opens on 20th June 1942. Students should apply to the Principal in time for admission (both to the classes and to Hostel) on prescribed forms with the necessary fee. There is accommodation for 56 students in the Women's Hostel. Details will be found in the prospectus supplied free on request. Admissions will be granted on working days (12 noon to 3 p.m.).

G. S. MAHAJANI,
Principal.

## THE WILLINGDON COLLEGE, SANGLI.

Reopens for the academic year on 20th June 1942. The registration of names will commence on 6th June. The College provides for instruction in the Arts and Science Courses in the first two years, for B.A. Degree courses Pass & Honours, and for Postgraduate instruction. About a hundred seats are available in the College Hostels. Healthy surroundings, inexpensiveness and efficiency are the special features of the college.

The tuition fees are Rs. 60 per term, and the room rent per term is Rs. 12 for a double room and Rs. 15 for a single room. Further information can be had on application.

Separate accommodation for lady students is available in the Sakhubai Gokhale Hostel on the College premises.

V. K. GOKAK,
Principal.

## DECCAN INSTITUTE OF COMMERCE, POONA

**( RECOGNISED BY GOVERNMENT )**

Opens for the 1942-43 Session on Thursday the 25th June 1942.

Students coached up for the following examinations:

1. Government Diploma in Commerce (G.D.C).
2. D. Com. Diploma of the Indian Merchants' Chamber, Bombay, in specialised Company Secretarial Banking, Insurance, Accountancy and Business Organisation.
3. London Chamber of Commerce.
4. The Indian Institute of Bankers (for Bank employees only).
5. R. A. (1st Part) for Graduates only.
6. G. D. C. & A. for Graduates only.

Special arrangements in SHORTHAND AND TYPEWRITING. Highly qualified and experienced staff. Admission upto 15th July. For particulars see personally or apply to:

592/3 Budhwar Peth, Opp. New English School, Poona. } S. H. DHUPKAR, Secretary.


## विमेदार नि हवाई हल्ला

शत्रु राष्ट्राकडून हवाई हल्ला अगर तत्सम उपद्रव यापासून बिन-लढाऊ नागरिकांच्या जीविताला येणाऱ्या धोक्याचा समावेश विमा पॉलिसीच्या अटींत होतो काय व त्यासाठीं जादा प्रिमिअम भरावा लागेल काय ! असा प्रश्न साहजिकच नागरिकांमध्यें चर्चिला जात आहे.

## ट्रस्ट ऑफ इंडिया

विमा कंपनीच्या

विमा पॉलिसीमध्यें हवाई हल्ल्यामुळें जीविताला होणाऱ्या अपायाचा अंतर्भाव होतो त्याकरितां जादा प्रिमिअम नाहीं.

तरी विलंब न लावतां—

तुमच्या नि तुमच्या आप्तेष्टांचा विमा

## ट्रस्ट ऑफ इंडिया

विमा कंपनींतच उतरा.

अध्यक्षः—श्रीमंत सरदार जगन्नाथ महाराज पंडित

माहितीपत्रकें विनामूल्य पाठवूं

ट्रस्ट ऑफ इंडिया विमा कं. लि. लक्ष्मी रोड, पुणें २ } वि. ह. देशमुख, बी. ए. जनरल मॅनेजर

## महायुद्ध दाराशीं आलें परदेशी औषधें दुर्मिळ व महाग झालीं

पण

**भिण्याचें कारण नाहीं !!!**

— कारण —

## आयुर्वेद रसशाळा पुणें लि०

या देशी औषधाच्या प्रसिद्ध कारखान्यानें तयार केलेलीं

- रक्तवर्धक,
- उपनाह,
- बालजीवन,
- कॅल्सीप्राल

इत्यादि पेटंट, स्टँडर्ड व लोकप्रिय औषधें खात्री पटल्यामुळें

★ डॉक्टर्सहि वापरूं लागले आहेत. ★

दरसाल बिनचूक नफा वाटणाऱ्या ह्या कंपनीचे शेअर्स व औषधें मागवा.

## आयुर्वेद रसशाळा पुणें लि०

मुख्य दुकान गणपति चौक, लक्ष्मीरोड, पुणें २.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. १२७।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
(टपाल हशील माफ)
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ८ | पुणें, बुधवार, तारीख १० जून १९४२ | अंक २३

## दि बँक ऑफ इंडिया लि.

[स्थापना : १९०६].

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल ... ... ... | रु. | २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... ... ... | रु. | १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड ... ... ... | रु. | १,१८,००,००० |

मुख्य कचेरी: ओरिएण्टल बिल्डिङ्ज, मुंबई.

मुंबईमधील शाखा : बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

इतर शाखा : अहमदाबाद (भद्र, मुख्य ऑफिस), अहमदाबाद (एलिस ब्रिज शाखा), अहमदाबाद (स्टेशन शाखा), अंधेरी (मुंबई शेजारीं), बांद्रे (मुंबई शेजारीं), कलकत्ता (क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्केअर), जमशेदपूर, कराची, नागपूर (किंग्जवे), नागपूर (इतवारी बझार), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत.

लंडन एजन्ट्स : वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

डायरेक्टर्स : सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाईट; मि. ए. गेडिस; सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई.; मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण.

### करंट डिपॉझिट अकाउंट्स :

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० एकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षा कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमीचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

एजंट—टी. आर. लालवाणी.

## दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

हेड ऑफिस : पुणें शहर.

स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.

मुंबअी शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबअी.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | : रु. १०,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | : रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | : रु. ४,३५,०५० |
| वसूल झालेलें भांडवल | : रु. २,१७,५२५ |
| एकूण खेळतें भांडवल | : रु. २५,००,००० |

### डायरेक्टर्स

प्रो. वा. गो. काळे, अध्यक्ष.

| | |
|---|---|
| श्री. श्रों. कृ. साठे | श्री. मा. रा. जोशी |
| श्री. न. ग. पवार | श्री. श्री. गो. मराठे |
| श्री. त्र्यं. वि. रानडे | श्री. द. चिं. सोहोनी |
| श्री. वा. पुं. वर्दे | मि. फ. बो. पदमजी |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदीविक्री कसोशीनें करून दिली जाते.

बँकेच्या शेअरवर १९४१ अखेर पुऱ्या होणाऱ्या वर्षी द. सा. द. शेंकडा ४ टक्के करमाफ डिव्हिडंड दिलें गेलें. बँकेची शेअरविक्री चालू आहे.

म. वि. गोखले
मॅनेजर.

महायुद्धाची जाणीव! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर

# महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

## विविध माहिती

### ट्रेझरी बिलांवर १ रु. १ आ. ७ पै व्याजाचा दर

रिझर्व्ह बँकेनें गेल्या आठवड्यांत हिंदुस्थान सरकारचीं ३ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. १ रु. १ आ. ७ पै इतका पडला.

### हिंदी रेल्वेजच्या उत्पन्नांत वाढ

हिंदी रेल्वेजच्या उत्पन्नांत वाढ होत आहे. उत्पन्नाची रोजची सरासरी गेल्या वर्षी २६ लक्ष रुपये होती; चालू वर्षी ती २७ लक्ष रुपये आहे. म्हणजे, गेल्या वर्षीचे मानानें चालू वर्षी हिंदी रेल्वेजना दररोज एक लक्ष रुपये उत्पन्न अधिक मिळत आहे.

### मि. के. एच. सेटलवाड

युनिव्हर्सल फायर अँड जनरल इं. कं. च्या मॅनेजिंग एजन्सीचे एक प्रमुख भागीदार, मि. के. एच. सेटलवाड हे आपल्या वयाच्या ६६ व्या वर्षी गेल्या आठवड्यांत मरण पावले.

### ५% व्याजाचे कर्जरोखे

पांच टक्के व्याजाच्या, १९४२-४७ च्या परतफेडीच्या स्टर्लिंगमधील कर्जाचें रूपांतर रुपयांमधील कर्जांत केलें होतें. हें कर्ज आतां १५ जून रोजीं परत केलें जाईल. त्या तारखेनंतर व्याज मिळणार नाहीं.

### वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ॲक्ट

वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ॲक्टान्वयें १९४०-४१ मध्यें मुंबई प्रांतांतील कामगारांस एकूण ४,६०,७४० रुपये नुकसानभरपाई देण्यांत आली. हा कायदा गेलीं १७ वर्षे अंमलांत आहे. परंतु कित्येक कारखानदारांना ह्यासंबंधांतील त्यांच्या जबाबदारीची जाणीव नाहीं, असें आढळतें. आपल्या सभासदांस नुकसानभरपाईची रकम मिळवून देण्याची खटपट अहमदाबाद टेक्सटाईल लेबर असोसिएशननें कसोशीनें केली, तशी इतर कोणत्याच मजूर संघानें केली नाहीं.

### पेमेंट ऑफ वेजेस ॲक्ट

ह्या कायद्यान्वयें सरकारकडे ७२ अर्ज आले, त्यांपैकीं ६८ मंजूर होऊन अर्जदारांस २३,२९४ रुपये मिळवून देण्यांत आले. मजुरी वेळेवर न मिळाल्याबद्दलच्या तक्रारीचे अर्ज ७२ होते.

### संसर्गजन्य रोगांचें इस्पितळ

पुणें येथील संसर्गजन्य रोगांच्या इस्पितळांत ६५२ रोगी १९४० मध्यें दाखल झाले, त्यांपैकी ८६ मरण पावले.

### पिसाळलेल्या कुत्र्यांच्या विषाची बाधा

१९४० सालीं पिसाळलेल्या कुत्र्यांच्या चावण्यामुळें १४५ लोक मुंबई प्रांतांत मरण पावले. अहमदनगर १६, अहमदाबाद १३, सातारा १२, सोलापूर ११, खेडा १० व पुणें १० अशी त्यांची वर्गवारी आहे.

### मुंबई शहरांत ४८ हजार घरें

मुंबई शहरांत ४८ हजार खासगी घरें आहेत. त्यांपैकीं १८ हजारांमध्यें प्रत्येकीं एक किंवा दोन खोल्या आहेत. बाकीच्या घरांत एक किंवा अधिक बिऱ्हाडांची सोय आहे किंवा तीं बंगले, कोठारें इत्यादि स्वरूपाचीं आहेत.

### सर्पदंश

१९४० सालीं सर्पदंशानें मुंबई प्रांतांत १,००४ लोकांचा बळी घेतला. त्यांपैकी १६० लोक रत्नागिरी जिल्ह्यांतील होते.

### ब्रह्मी सरकारचें ठाणें

ब्रह्मदेशचे गव्हर्नर व ब्रह्मी सरकारची कचेरी ह्यांचें ठाणें सिमला येथें आहे.

### जपाननें केलेला विषारी वायूचा उपयोग

गेल्या पांच वर्षांच्या अवधींत जपाननें चीनमधील युद्धांत एक हजार वेळां विषारी वायूचा उपयोग केल्याचें प्रसिद्ध झालें आहे. ह्या वायूपासून स्वतःचा बचाव करण्याचें साधन चिनी लोकांपाशी नसल्यानें त्यांस काय यातना भोगाव्या लागल्या असतील ह्याची कल्पना करवत नाहीं.

### हंगेरियन स्त्रियांवर युद्ध-कार्याची सक्ती

आपल्या अंकित झालेल्या राष्ट्रांस हिट्लर स्वतःच्या युद्धासाठीं शिपाई पुरवण्याचा तगादा लावीत आहे. त्याचाच परिणाम म्हणून हंगेरीमध्यें युद्ध-कार्यासाठीं स्त्रियांस सक्तीनें बोलावण्यांत येत आहे. हंगेरीच्या इतिहासांत असला प्रसंग हा पहिलाच आहे.

### ब्रिटन—बेल्जम करार

स्वतंत्र बेल्जम आणि इंग्लंड ह्यांचेमध्यें दोन करार नुकतेच झाले आहेत. युद्ध यशस्वी रीतीनें पुरें होईपर्यंत हीं दोन राष्ट्रें जुटीनें लढतील आणि त्यांत स्वतंत्र बेल्जम फौजा भाग घेतील ही तरतूद पहिल्या करारांत आहे. बेल्जम कॉंगोमधील महत्त्वाचा युद्धोपयोगी माल इंग्लंडनें खरेदी करण्याबाबतचा दुसरा करार आहे.

### स्वस्त दुधासाठी पंचवीस कोटि रुपये सरकारी खर्च

जनतेस दूध स्वस्त व स्थिर किंमतीनें विकत मिळावें म्हणून ब्रिटिश सरकारानें जी योजना अंमलांत आणली आहे तिचा राष्ट्रीय तिजोरीस २५ कोटि रुपये खर्च येतो.

### छोटेखानी धंदेवाल्यांस मिन्हाइक

हिंदुस्थान सरकारास युद्धसामुग्री लागते, तीपैकीं व्यावहारिक दृष्ट्या शक्य आहे तितकी छोटेखानी धंदेवाल्यांकडून घेण्याचें धोरण स्वीकारण्यांत आलें आहे. अशा विकत घेतलेल्या मालाची किंमत गेल्या वर्षी सुमारें ५ कोटि रुपये भरली. चालू सालीं हा आंकडा सहा कोटींवर जाईल.

### मुंबई प्रांतांतील आत्महत्या

१९४० सालीं मुंबई प्रांतांत आत्महत्येमुळें ७६० मृत्यु घडल्याची नोंद आहे. त्यांची जिल्हावार आणि कारणवार माहिती खालीं दिली आहे.

| जिल्हा | बुडणें | विष | गळफास | जखम | रेल्वे | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| धारवाड | ९५ | ... | ४५ | ... | ... | १४० |
| विजापूर | ३६ | १ | ४५ | १ | ... | ८३ |
| बेळगांव | २१ | ५ | ३७ | २ | १ | ६६ |
| पुणें | १ | १४ | ५ | १७ | ... | ३७ |
| सुरत | १९ | ५ | ११ | १ | ... | ३६ |
| ठाणें | ८ | २ | २० | १ | ... | ३१ |
| सातारा | ९ | ६ | १५ | १ | ... | २१ |
| नाशिक | १४ | ४ | ४ | ६ | ... | २८ |

अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | १८० |
| २ हिंदुस्थानाचें युद्धोपयोगी औद्योगिक उत्पादन | १८१ |
| ३ सहकारी बँकांच्या परिषदेचे ठराव | १८२ |
| ४ अबकारी उत्पन्न | १८२ |
| ५ स्फुट विचार ... | १८३ |
| ६ बाजारभावाचें नियंत्रण करणाऱ्या समित्या—ब्रह्मी चलनी नोटा व रिझर्व्ह बँक मुंबईतील रहाणीचें मान—स्थानिक संस्थांच्या कर्जरोख्यांस पाठिंबा. | |
| ६ हिंदूवर एक पत्नीत्वाची सक्ती | १८४ |
| ७ ऐक्य-शिक्षण विशेषांक | १८४ |
| ८ सन लाइफ ऑफ कॅनडा | १८४ |
| ९ शुगरकेन कंपनी | १८४ |



# अर्थ

बुधवार, ता. १० जून, १९४२


## हिंदुस्थानाचें युद्धोपयोगी औद्योगिक उत्पादन

### अमेरिकन तज्ज्ञ मंडळाचा अहवाल

संयुक्त राष्ट्रांच्या युद्धयोजना सहकार्यानें व एकविचारानें होण्याचें महत्त्व व ह्या योजनांतील हिंदुस्थानास प्राप्त झालेलें स्थान, ह्यांची कल्पना आतां सार्वत्रिक परिचयाची झाली आहे. अमेरिका युद्धांत प्रत्यक्ष पडल्यापासून तिच्याकडे औद्योगिक उत्पादनाचें नेतृत्व सहजच आलें. लीज—लेंड योजनेस अनुसरून लोकशाहीच्या वतीनें लढणाऱ्या राष्ट्रांस अमेरिका सढळ हातानें मदत करीत आली आहे, तथापि, हिंदुस्थानाचें युध्यमान राष्ट्रांतील विशिष्ट स्थान अमेरिकन सरकारनें ओळखून, हिंदुस्थानचा मध्यवर्तित्वाचा अधिकाधिक उपयोग कसा करून घेतां येईल व त्या दृष्टीनें तेथील युद्धसामुग्रीचें उत्पादन पद्धतशीर रीतीनें कसें वाढवितां येईल ह्यासंबंधीं चौकशी करण्याकरितां हिंदुस्थान सरकारच्या संमतीनें अमेरिकन सरकारनें डॉ. ग्रेडी ह्यांच्या नेतृत्वाखाली एक शिष्टमंडळ पाठविलें. ह्या शिष्टमंडळाच्या कार्यक्रमासंबंधीं हिंदी व्यापारी वर्गानें शंका प्रदर्शित केली. तथापि अमेरिकन सरकारचें हिंदुस्थानाविषयींचें धोरण कोणत्याहि प्रकारचें आक्रमक स्वरूपाचें नाहीं, असा डॉ. ग्रेडी ह्यांनीं खुलासा केला. शिष्टमंडळाचा अहवाल सारांशरूपानें आतां प्रसिद्ध झाला आहे.

युद्धविषयक उत्पादनाचें कार्यक्षम मार्गदर्शन करण्याकरितां तीन ते पांच सभासदांचें एक युद्धमंडळ नेमण्यांत यावें व त्याचेकडे उत्पादन, वहातूक, रेल्वेज, लष्कर व फडणिशी हीं खातीं देण्यांत यावीत, अशी ग्रेडी मंडळीची सूचना आहे. ह्या युद्धमंडळाच्या घटकांची निवड करण्याचें काम अर्थातच हिंदुस्थान सरकारचें आहे. लोकांच्या पुढाऱ्यांचा त्यांत समावेश ज्या प्रमाणांत होऊं शकेल, त्या प्रमाणांत प्रस्तुत वॉर कॅबिनेटचें कार्य प्रभावी होईल, हें उघड आहे. वॉर कॅबिनेटचें धोरण कार्यक्षम रीतीनें पार पाडण्याचे कामीं सहाय करण्याकरितां त्यास चांगले मदतनीस देण्यांत यावेत, असेंहि ग्रेडी शिष्टमंडळानें सुचविलें आहे. हिंदी लष्कराची वाढ मोठ्या प्रमाणांत करण्यांत यावी, हिंदी आर्थिक व औद्योगिक जीवन सुव्यवस्थित रीतीनें नियंत्रित करण्यांत यावें, विमानें व आगबोटी ह्यांच्या उत्पादनापेक्षा त्यांच्या दुरुस्तीकडे हिंदुस्थानानें अधिक लक्ष द्यावें इत्यादि सूचना शिष्टमंडळानें केल्या आहेत.

हिंदुस्थान सरकारच्या सप्लाय खात्याचे प्रमुख सर एच. पी. मोदी ह्यांनीं दिल्ली येथें वृत्तपत्रांच्या प्रतिनिधींस ग्रेडी शिष्टमंडळाचे सूचनांविषयींचा आपला अभिप्राय थोडक्यांत नमूद केला. गेल्या बारा महिन्यांत हिंदुस्थानांतील युद्धविषयक औद्योगिक उत्पादनांत पुष्कळच वाढ झाली आहे व त्याबद्दल शिष्टमंडळानें समाधान व्यक्त केलें आहे. तथापि ह्यापेक्षाहि त्यांत वाढ झाली पाहिजे, असा शिष्टमंडळाचा आग्रह आहे. कांहीं विशिष्ट मालाच्या उत्पादनास बंदी, जे कारखाने नीट चालविण्यांत येत नाहींत ते कारखानदारांकडून काढून घेणें, विशिष्ट प्रकारचाच माल काढण्याची कारखानदारांवर सक्ति, इत्यादि प्रकारानें अमेरिकेंत युद्धविषयक उत्पादनाचें केंद्रीकरण करण्यांत येत आहे. हिंदुस्थानांत हें घडून येण्याचे मार्गांत अनेक अडचणी आहेत, तरीहि सरकार शक्य तो प्रयत्न करीत आहे, असें सर एच्. पी. मोदी ह्यांनीं सांगितलें. लोखंड, पोलाद, रसायनें, मशीन टूल्स, पेट्रोल इत्यादींवर जबर नियंत्रण बसविण्यांत आलें आहे व तें आणखीहि वाढवण्यांत येणार आहे असें त्यांनीं स्पष्टीकरण केलें. उत्पादनासंबंधीं कांहीं आकडे देऊन हिंदुस्थानाच्या युद्धप्रयत्नाचें स्वरूप मोठें असल्याचें त्यांनीं दाखवून दिलें. दारुगोळ्यांच्या पुरवठ्याचे बाबतींत हिंदी उत्पादन समाधानकारक वाढत आहे, असेंहि ते म्हणाले. लहान आणि मध्यम आकाराच्या उद्योगधंद्यांचेंहि सरकार सहाय घेत आहे व जरी आज उत्पादन वाढलें आहे तरी हें अद्याप पुष्कळच वाढावयास पाहिजे ह्याची सरकारास जाणीव आहे व त्यासंबंधांत प्रयत्न चालू आहे, असें त्यांनीं सांगितलें. अमेरिकन पद्धत हिंदुस्थानांतील विशिष्ट परिस्थितींत प्रत्येक बाबतींत यशस्वी होईल असें म्हणतां येणार नाहीं, तथापि अमेरिकेच्या मदतीनें हिंदुस्थान चांगली कामगिरी करून दाखवील, असें त्यांनीं आश्वासन दिलें.

ग्रेडी शिष्टमंडळाच्या सर्व शिफारसी त्यांच्या मूळ स्वरूपांत अद्याप प्रसिद्ध झालेल्या नाहींत. तथापि त्याच्या सूचना चांगल्या भावनेनें केलेल्या असल्या तरी त्या अंमलांत येण्यास अडचणी बऱ्याच आहेत, असा सर होमी मोदींचे उद्गारांवरून ग्रह होतो. उद्योगधंद्याची अमेरिकन पद्धत व त्या पद्धतीनें चालणारा तेथील कामगारवर्ग ह्यांचा हिंदुस्थानांत अभाव आहे; तेव्हां एकाएकीं ती पद्धत येथें अंमलांत आणणें सोईचें होणार नाहीं, असा सरसाहेबांच्या बोलण्याचा मथितार्थ दिसतो. शिष्टमंडळाच्या तपशीलवार सूचनांवर हिंदुस्थान सरकारचें म्हणणें काय आहे, हें अद्याप प्रसिद्ध व्हावयाचें आहे. अमेरिकन वृत्तपत्रांच्या प्रतिनिधींस सर होमींचें वक्तव्य पसंत पडलेलें दिसत नाहीं; ग्रेडी शिष्टमंडळाच्या सूचना स्वीकारण्यास सरकार विशेष तत्पर नाहीं व सरकार आजच पुष्कळ कार्य करीत आहे, त्यांत शिष्टमंडळाच्या सूचना अमलांत आल्यानें फारशी भर पडणार नाहीं, असा सरकारचा अभिप्राय असल्याचा ग्रह अमेरिकन बातमीदारांनीं करून घेतलेला दिसतो. तो किती यथार्थ आहे याविषयीं स्पष्ट खुलासा प्रसिद्ध होणें आवश्यक आहे. ग्रेडी शिष्टमंडळाची उडी मोठी असून ती हिंदुस्थान सरकारास झेपण्यासारखी नाहीं असें आतांपर्यंत झालेल्या माहितिवरून अनुमान काढण्यास जागा आहे. शिष्टमंडळाच्या

कांहीं सूचनांत मध्यवर्ती सरकारच्या घटनेंत महत्त्वाचे बदल गर्भित आहेत असा तर्क आहे. हिंदुस्थान सरकारचा सविस्तर निर्णय लवकरच बाहेर पडणार आहे असें सर होमी ह्यांनीं सांगितलें आहे. ह्या निर्णयास प्रसिद्धि मिळाली म्हणजे शिष्टमंडळाच्या मुख्य योजना काय आहेत आणि त्यांचे संबंधांत हिंदुस्थान सरकारचें काय म्हणणें आहे हें लोकांस स्पष्ट समजण्यास साधन उपलब्ध होईल.

## सहकारी बँकांच्या परिषदेचे ठराव

गेल्या महिन्यांत पुणें येथें सहकारी बँकांच्या प्रतिनिधींची एक परिषद् भरली होती, तीमध्यें मंजूर झालेल्या प्रमुख ठरावांचा गोषवारा खालीं दिला आहे:—

( १ ) प. वा. दिवाणबहादुर मळजी ह्यांच्या मृत्यूबाबत दुःखप्रदर्शन.

( २ ) सध्याच्या युद्ध परिस्थितींत बाजारभाव, वहातुक इत्यादि बाबतींत सरकारी निमंत्रणें घालण्यांत आलीं आहेत. ह्या निर्बंधांचा अनिष्ट परिणाम शेतकरीवर्गाच्या जीवनावर कांहीं बाबतींत होत आहे असें आढळून आल्यास त्या बँक्स असोसिएशनच्या मार्फत सहकारी संस्थांनीं मध्यवर्ती व प्रांतिक सरकारांच्या नजरेस आणाव्या आणि भासणाऱ्या अडचणी दूर व्हाव्यात ह्यासाठी व्यावहारिक उपाय त्यांस सुचवावे. शेतकरी, खेडेगांवीं मजूर व कारागीर ह्यांच्या रहाणीस युद्ध-परिस्थिति बाधक होणार नाहीं ह्याविषयीं सरकारांनीं दक्षता बाळगून ह्या लोकांस हरतऱ्हेचें सहाय द्यावें.

( ३ ) मुंबई शहरांत माल विक्रीसाठी मध्यवर्ती प्रांतिक सहकारी सोसायटी स्थापन झाली आहे तिचें स्वागत करण्यांत येत आहे. सहकारी संस्थांची खरेदी-विक्रीची ही एकमेव संस्था ह्या नात्यानें सरकारनें तिला वहातुकीसंबंधाच्या जरूर त्या सवलती द्याव्या.

( ४ ) धान्य वगैरेच्या पिकांचा विस्तार होण्याबाबत सरकार व सहकारी संस्था ह्यांचा प्रचार चालू आहे त्यास परिषदेचा पाठिंबा आहे. हें धोरण अवलंबण्यांत शेतकऱ्यांस ज्या अडचणी भासतील त्या दूर करण्यास सरकारनें सहाय द्यावें. बियाचा पुरवठा, अल्प व्याजानें कर्जें, वहातुकीच्या सवलती व बाजारभाव बरे येण्याची व्यवस्था इत्यादि स्वरूपांत ही मदत देण्यांत यावी. सहकारी संस्थांनीं आणि विशेषतः सेंट्रल बँकांनीं धान्य वगैरे पिकांच्या विस्ताराविषयींच्या प्रयत्नांत आपापल्या क्षेत्रांत शक्य त्या सर्व मार्गांनीं हातभार लावावा.

( ५ ) जेथें शेतकरी कर्ज निवारणाचा कायदा अंमलांत आणलेला आहे त्या क्षेत्रांतील बँकांनीं कायद्याच्या अंमलबजावणीचा त्यांस आलेला अनुभव बँकांच्या असोसिएशनच्या कार्यकारी मंडळाच्या नजरेस आणावा म्हणजे ह्या प्रकरणीं येणाऱ्या अडचणींकडे सरकारचें लक्ष वेधणें सोयीचें होईल.

( ६ ) हिंदुस्थानांतील ( संस्थानें धरून ) सर्व सहकारी बँकांची यादी तयार करून ती प्रसिद्ध करण्याविषयींची विनंति रिझर्व्ह बँकेस करावी.

( ७ ) सोसायट्यांच्या कर्जांच्या वसुलीसाठी जे खास अधिकारी नेमण्यांत येतात त्यांचें काम सबंध वर्षभर चालावें आणि त्यांनीं सहकारी खात्याच्या रजिस्ट्रारांच्या हुकमतीखालीं आपलें कार्य करावें. अशा व्यवस्थेच्या मार्गांत येणाऱ्या कायद्याच्या अडचणी त्यांत जरूर त्या दुरुस्त्या करून दूर केल्या जाव्या. वरील वसुली अधिकाऱ्यांच्या प्रीत्यर्थ होणाऱ्या खर्चांतून त्यांच्या रजा, पेन्शनें वगैरेबद्दलच्या तरतुदींच्या रकमा वगळण्यांत याव्या, म्हणजे ह्या खर्चाचा बोजा बँकांवर निष्कारण पडावयाचा नाहीं.

( ८ ) बँकांच्या परिषदेचें अधिवेशन निदान तीन वर्षांतून एकदां भरवण्याची असोसिएशनला विनंति करण्यांत यावी. असोसिएशनच्या कार्यकारी मंडळास अशी विनंति करण्यांत यावी कीं त्यानें परिषदेचे नियम तयार करावे आणि त्यांवर बँकांचे अभिप्राय घेऊन त्यांस असोसिएशनच्या संयुक्त बोर्डाची अनुमति मिळवावी. प्रस्तुत परिषदेच्या ठरावांची पुढील व्यवस्थाहि कार्यकारी मंडळानें लावावी.

( ९ ) मुंबई शहरांतील अ आणि ब वर्गांतल्या बँकांची हिशेब तपासणी बिनअधिकारी धंदेवाईक ऑडिटर्सकडून घेण्याची मुभा देणाऱ्या सरकारनें काढलेल्या हुकुमाचें स्वागत करण्यांत येत आहे. पुणें व अहमदाबाद सारख्या ठिकाणच्या वरील प्रकारच्या बँकांसहि ही नवीन व्यवस्था लवकरच लागू केली जावी अशी सरकारास विनंति आहे. सरकारी ऑडिटची फी सध्या आकारण्यांत येते, तिचें मान कमी केलें जावें आणि ही सवलत विशेषतः आपल्या ऑडिटची निराळी व्यवस्था करणाऱ्या बँकांस देण्यांत यावी.

( १० ) बँकांच्या अधिकाऱ्यांच्या निवडणुकीमध्यें ह्या संस्थांच्या नोकरवर्गास मत देण्याचा असलेला हक्क काढून घेणें योग्य नाहीं. पण जेथें त्या हक्काचा दुरुपयोग होत असल्याचें आढळून येईल तेथें गुप्तमतदान पद्धतीची व्यवस्था करण्यास रजिस्ट्रारनीं भाग पाडावें. ( अपूर्ण )

### अबकारी उत्पन्न

मुंबई प्रांताचें अबकारी उत्पन्न १९४०-४१ मध्यें १९३९-४० मधील उत्पन्नाचे मानानें १६ लक्ष रुपयांनीं वाढून तें १ कोटि, ७७½ लक्ष रुपये भरलें. विलायती दारूनें १९३९-४० मध्यें १६½ लक्ष रुपये दिले; १९४०-४१ मध्यें हा आकडा ४८ लाखांवर गेला. सरकारच्या अबकारी धोरणांतील झालेल्या फरकाचा हा परिणाम आहे. मुंबई, मुंबई उपनगर, ठाणें, भडोच, कानडा व अहमदनगर ह्या जिल्ह्यांत देशी दारूचा खप कमी झाला तो खेडा, सुरत, बेळगांव, सोलापूर, पुणें, नाशिक, खानदेश ह्या जिल्ह्यांतील वाढलेल्या खपानें ५०% भरून निघाला. "पीक बरें आलें व त्यास किंमत चढीची मिळाली ह्यामुळें शेतकऱ्यांची क्रयशक्ति वाढल्यामुळें, शेजारच्या दारूबंदीच्या क्षेत्रांत चोरून दारू नेण्यांत आल्यामुळें व महागलेल्या विलायती दारूची जागा कांहीं अंशीं देशी दारूनें घेतल्यामुळें ही वाढ झालेली आहे." ताडीपासून मिळणारें उत्पन्न ४३ लाखांवरून ४१ लाखांवर आलें.

# स्फुट विचार

## बाजारभावांचें नियंत्रण करणाऱ्या समित्या

नित्याच्या उपयोगास लागणाऱ्या जिनसांचा पुरवठा देशाच्या निरनिराळया भागात समाधानकारक रीतीनें व्हावा आणि त्यांच्या किंमती योग्य मर्यादेंत शक्य तितक्या स्थिर रहाव्या ह्याकरितां आवश्यक असलेल्या योजनांची चर्चा होऊन विशिष्ट निर्णय मान्य करण्यांत आल्याचें मागेंच प्रसिद्ध झालें आहे. कोणताहि प्रांत किंवा संस्थान जिनसांच्या पुरवठ्याचे बाबतींत स्वयंपूर्ण असूं शकत नाहीं ह्या तत्त्वावरच किंमतीच्या नियंत्रणाची कोणतीहि योजना अधिष्ठित झाली पाहिजे हें स्पष्ट आहे. त्याच-प्रमाणें पदार्थांच्या पुरवठ्याची तजवीज झाल्यावांचून त्यांच्या नुसत्या किंमती निश्चित करणें अव्यवहार्य आहे हा सिद्धांतहि सामान्यपणें मान्य झाला आहे. ह्या दृष्टीनें पहातां देशाचे धान्यादिक पदार्थांचें उत्पादन व पुरवठा ह्यांस अनुसरून गट पाडणें आणि त्यांतील व्यापारी व्यवहारांचें नियमन करण्यासाठी समित्या नेमणें हाच उपाय कार्यक्षम होणार असल्यानें सरकारनें त्याचाच अवलंब केला असल्याचें आतां प्रसिद्ध झालें आहे. मध्यवर्ती सरकारचे मार्फत पत्रक निघालें आहे त्यांत ब्रिटिश प्रांत व संस्थानें ह्यांचे पांच गट बनवण्यांत आले असून त्यांत समित्या नेमल्या आहेत असें म्हटलें आहे. त्यांपैकीं कांहीं समित्यांच्या सभा भरून त्यांनीं आपल्या कार्यास प्रारंभहि केला आहे. त्यांस येणारा अनुभव पाहून सरकारला आपली योजना अधिक कार्यक्षम होईल अशी व्यवस्था करावी लागेल.

---

## ब्रह्मी चलनी नोटा व रिझर्व्ह बँक

ब्रह्मदेश आतां शत्रूच्या ताब्यांत गेल्यामुळें तेथें प्रचलित असलेल्या रिझर्व्ह बँकेच्या चलनी नोटांबद्दल रोकड देण्याच्या जबाबदारीचें काय करावयाचें हा प्रश्न उपस्थित होऊन त्याचा निकाल लावणें हिंदुस्थान सरकारास आवश्यक झालें. ब्रह्मदेश विभक्त झाला तरी हिंदुस्थानच्या मध्यवर्ती बँकेच्याच चलनी नोटा तेथें कायदेशीर रीतीनें चालत होत्या. ह्या नोटांचा उपयोग शत्रूस होणार नाहीं अशी व्यवस्था प्रथम व अवश्य झाली पाहिजे हें उघड आहे. त्याचप्रमाणें ब्रह्मदेशांतले देवघेवीचे व्यवहार बेकायदेशीर शत्रुव्यवहार गणले जाणें जरूर असल्यानें तेथील चलनी नोटांसंबंधाच्या जबाबदारींतून रिझर्व्ह बँकेस मुक्त करणें अगत्याचें आहे. ही तजवीज आतां हिंदुस्थान सरकारनें केली असल्याचें प्रसिद्ध झालें आहे. ब्रह्मदेशांत खेळणाऱ्या चलनी नोटा आणि त्यांच्याबद्दल रोकड देतां यावी ह्या हेतूनें रिझर्व्ह बँकेनें आपल्यापाशीं बाळगलेला निधी हिंदुस्थान सरकारनें आपल्या हातीं घेतला आहे. रिझर्व्ह बँकेच्या ताज्या साप्ताहिक पत्रकांत ब्रह्मी नोटांची रकम २८ कोटि ८१ लक्ष रुपये होती असें नमूद केलेलें आहे. ह्यापुढें सदरहू आंकडा त्या पुस्तकांत दाखल केला जाणार नाहीं हें उघड आहे.

---

## युद्धाच्या हालचाली

गेल्या आठवड्यांतील महत्त्वाच्या युद्धाच्या हालचाली म्हटल्या म्हणजे लिबियांतील घनघोर लढाया, ब्रिटिश वैमानिकांचे जर्मन शहरांवरील प्रचंड हल्ले व जपानची चीनच्या पूर्व भागांत चाललेली चढाई ह्यांचे संबंधाच्या आहेत. रशियाच्या सबंध आघाडीवर तात्पुरती थोडी स्थिरता दिसून आली. तीवरील दक्षिणेच्या बाजूस जर्मनीची प्रगति रशियन सेनानींनीं कुंठित करून टाकली आहे. लिबियामध्यें धुमश्चक्री चालू राहिली. रॉमेलनें मोठ्या तयारीनें टोब्रुककडे मुसंडी मारण्याचा प्रयत्न केला पण ब्रिटिश फौजांनीं विमानें, तोफा व चिलखती गाड्या ह्यांच्या सहाय्यानें तो हाणून पाडला. जर्मनीवर प्रचंड जमावानें जाऊन कारखान्यांसाठीं प्रसिद्ध असलेल्या शहरांवर बॉम्बचा वर्षाव करून शत्रूचें लढाऊ बळ खच्ची करण्याची ब्रिटिश विमानांनीं नवीन प्रथा आरंभली. एका वेळीं हजार विमानांचे हे हल्ले एसन सारख्या जर्मन शहराचा धुव्वा उडवून देत आहेत. हे हल्ले जर्मनीची कल्पना व अपेक्षा ह्यांच्या पलीकडे गेले आहेत आणि ते असेच चालू ठेवण्याचा निश्चय मि. चर्चिल ह्यांनीं जाहीर केला आहे. त्यांचा परिणाम इतर आघाडींवरील जर्मनीच्या लढाऊ बळावर झाल्यावांचून रहाणार नाहीं. टोकिओ वगैरे शहरांवर झालेले अमेरिकन विमानांचे हल्ले चीनमधील पूर्व भागांतील विमानगृहांपासून झाले असले पाहिजेत ह्या समजुतीनें हा प्रदेशच आपल्या ताब्यांत आणण्याची खटपट जपान करीत आहे. पॅसिफिक महासागरांत अमेरिका व ऑस्ट्रेलिया ह्यांचीं विमानदलें व आरमारें जपानची समुद्रांतली प्रगति थांबवून धरीत आहेत इतकेंच नाहीं, तर तीं शत्रूनें पादाक्रांत केलेल्या प्रदेशावर हल्लेहि करीत आहेत. अमेरिकेचें पॅसिफिकमधलें सामर्थ्य खच्ची करण्याच्या हेतूनें जपानी आरमारानें मिडवे आयलंडवर हल्ला करण्याचा घाट घातला, पण त्या साहसांत त्यास पूर्ण अपयश प्राप्त होऊन भयंकर हानि सोसावी लागली असल्याचें उत्तेजनदायक वृत्त नुकतेंच आलें आहे. मिडवे बेटांच्या लढाईंत जपानचीं कित्येक विमानें नेणारीं आणि लढाऊ व सामान वाहणारीं जहाजें बुडालीं व जाया झालीं आहेत. जपानी आरमारास अमेरिकेनें दिलेला हा जोराचा धक्का आहे आणि पुढें मिळणाऱ्या संपूर्ण विजयाचा तो प्रारंभ आहे असें समजलें जात आहे तें अन्वर्थक आहे. मिडवे ( रस्त्याचा मध्य ) बेटाचा विजय हा अंतिम अमेरिकन विजयाच्या मार्गांतील निम्मा पल्ला आहे असें एका अमेरिकन वक्त्यानें म्हटलें आहे तें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. सुसज्ज अशा अमेरिकेशीं दोन हात होण्याचा प्रत्यक्ष प्रसंग आला असतां जपानची स्थिति अखेर काय होईल ह्याचें प्रस्तुत लढाई हें उत्कृष्ट निदर्शक आहे.

---

## मुंबईतील रहाणीचें मान

मुंबईतील रहाणीचें मान अधिक महाग होत चाललें असल्याचें प्रांतिक सरकारच्या निदर्शनास आलें आहे. जिनसांचा साठा मर्यादित होणें आणि बाहेरून येणाऱ्या मालाच्या वहातुकींत अडचणी हीं ह्या परिस्थितीचीं प्रमुख कारणें आहेत. इतर प्रांतांतून आणि संस्थानें ह्यांमधून माल यावा अशी व्यवस्था मुंबई सरकार करीत आहे असें समजतें. युद्धोपयोगी मालाच्या वहातुकीस रेल्वेजवर प्राधान्य देण्यांत येतें ही गोष्ट अपरिहार्य आहे. तथापि, खाण्यापिण्याच्या जिनसांचा सामान्य जनतेस पुरवठा केला जाणें ही युद्धोपयोगी बाबच आहे हें लक्षांत ठेवणें आवश्यक आहे. खाद्यपदार्थांच्या वहातुकीस रेल्वेजवर प्राधान्य दिलें गेल्यास मुंबईमध्यें त्या जिनसांचा पुरवठा योग्य प्रमाणांत होऊं शकेल असें मुंबईच्या ट्रॅन्स्पोर्ट बोर्डासहि वाटत आहे. तथापि, ही गोष्ट

मध्यवर्ती सरकारच्या अनुमतीवर अवलंबून आहे. गहू, ज्वारी व तांदूळ ह्यांची आयात मुंबईमध्यें होण्याची तजवीज झाली आहे असें समजतें. तरीहि, एकंदरीनें पहातां खाद्यपदार्थांचा मुंबई-चा साठा असावा तेवढा नाहीं ह्याविषयीं सरकारी अधिकाऱ्यां-सहि शंका नाहीं. हिंदुस्थान सरकारनें मुंबई शहरांतील ह्या परिस्थितीकडे योग्य लक्ष देणें अगत्याचें आहे.

### स्थानिक संस्थांच्या कर्जरोख्यांस पाठिंबा

सरकारी कर्जरोख्यांच्या किंमती युद्धपरिस्थितीमुळें भरमसाट रीतीनें उतरूं नयेत ह्याविषयींची व्यवस्था हिंदुस्थान सरकार आणि रिझर्व्ह बँक ह्यांनीं केली आहे. रोख्यांच्या किमान किंमती निश्चित केल्या गेल्यानें सट्टेबाजीचा किंवा घाबरटपणाचा अनिष्ट परिणाम त्यांचेवर होण्याची भीति नाहींशी झाली आहे. परंतु पोर्ट ट्रस्ट्स, म्युनिसिपालिट्या व इंप्रूव्हमेंट ट्रस्ट्स असल्या संस्थांच्या रोख्यांचें काय होणार अशी शंका उत्पन्न झाली होती. ह्याहि रोख्यांत लोकांनीं रकमा गुंतवल्या आहेत आणि वरील संस्था निमसरकारी आहेत. महत्त्वाच्या रोख्यांचे भाव भलतीकडे घसरणार नाहींत आणि पैशाच्या गुंतवणीचे व्यवहार अबाधित-पणानें चालू रहातील ह्यासंबंधानें सरकारनें दक्षता बाळगावी लागेल. ह्या धोरणास अनुसरून हिंदुस्थान सरकारनें आतां जाहीर केलें आहे कीं, पोर्ट ट्रस्ट्स व म्युनिसिपालिट्या ह्यांच्यासारख्या संस्थांस जरूर तेव्हां सरकारी पाठिंबा देण्यांत येईल आणि त्यांच्या रोख्यांचें व्याज व मुद्दल योग्य वेळीं रोखे धारण करणारास मिळण्या-सारखी त्यांची सांपत्तिक स्थिति राहील अशी व्यवस्था केली जाईल. त्या आश्वासनाच्या पुढें जाऊन सरकारनें असें जाहीर केलें आहे कीं, तशी आवश्यकता दिसून आल्यास मध्यवर्ती सर-कारच्या अनुमतानें रिझर्व्ह बँक वरील स्थानिक संस्थांचे रोखे ठराविक भावानें विकतही घेईल. प्रांतिक सरकारच्या रोख्यांच्या किंमती निश्चित करण्यांत आलेल्या आहेत. त्यांच्या अनुरोधानेंच ह्या रोख्यांच्या किंमती ठरवल्या जातील. विकणारास आपल्या रोख्यांबद्दल योग्य मोबदला मिळावा आणि त्यांच्या किंमती नेह-मींच्या बाजारी प्रमाणाप्रमाणें निश्चित केल्या जाव्या हें सरकारनें जाहीर केलेलें धोरण वाजवी आहे ह्यांत शंकाच नाहीं. सरकारचें प्रस्तुत आश्वासन आवश्यक होतें आणि तें वेळींच देण्यांत आलें आहे.

## हिंदूवर एकपत्नीत्वाची सक्ती

### राव कमिटीचें बिल

विवाहासंबंधींच्या हिंदु कायद्याचें कलमवार कायद्यांत रूपांतर करणाऱ्या, राव कमिटीनें तयार केलेल्या बिलांत, एकपत्नीत्वाची सक्ती करण्यांत आली आहे. हिंदु वैदिक पद्धतीनें केलेल्या विवाहास एक पत्नीत्वाची आज सक्ती नाहीं, परंतु स्पेशल मॅरेज ॲक्टान्वयें (नोंदणी पद्धतीनें) केलेल्या विवाहास ती आहे. वैदिक पद्धतीच्या विवाहासहि बहुपत्नित्व संमत नसावें, अशी राव कमिटीच्या बिलांत योजना आहे. मूळ हिंदु कायदा एक पत्नीत्वाचीच महती सांगतो, तेव्हां मनूचा कायदा पुनः प्रस्थापित करण्याचाच राव कमिटीचा उद्देश आहे. आजहि कांहीं हिंदू लोक अनेक पत्नी करीत असले, तरी एकपत्नीत्वाचीच रूढी सर्वत्र आढळते. तेव्हां बहुपत्नित्व बेकायदा ठरविण्यास हरकत दिसत नाहीं, असें राव कमिटीचें म्हणणें आहे.

### ऐक्य-शैक्षणिक विशेषांक

सातारा येथील ऐक्य साप्ताहिकानें मे, १९४२ चा शेवटचा अंक शैक्षणिक विशेषांक म्हणून प्रसिद्ध केला आहे. त्यांत प्रथम पांचगणी हिंदु हायस्कूलच्या स्थापनेच्या व वाढीचा इतिहास देण्यांत आला असून नंतर सातारा जिल्ह्यांतील ठिकठिकाणच्या सर्व शिक्षणसंस्थांची उत्कृष्ट माहिती देण्यांत आली आहे. सातारा जिल्ह्यांतील शैक्षणिक प्रगतीचा आढावा त्यांत घेतलेला आहे. शैक्षणिक प्रगति कोणत्या मार्गानें घडवून आणतां येईल, साता-ऱ्यास आर्टस कॉलेज काढावें कीं इंडस्ट्रिअल कॉलेज काढावें, त्याचें स्वरूप कोणतें असावें, इत्यादि प्रश्नांची चर्चा करण्यास प्रस्तुत अंक उपयोगी पडेल. जिल्ह्यांतील शिक्षणाच्या प्रसाराची आकडेवार माहिती अंकांत दिली आहे व शिक्षण-विषयक कांहीं लेखहि त्यांत आले आहेत.

### सन लाइफ ॲशुअरन्स कंपनी ऑफ कॅनडा

वरील लिमिटेड कंपनीची १८६५ सालीं कॅनडामध्यें स्थापना झाली. कंपनीनें पहिली पॉलिसी दिल्यानंतर तीस वर्षांनीं तिची जिंदगी १०५ लक्ष डॉलर होती, ती १९१४ सालीं ६४० लक्ष डॉलर भरली. १९१८ सालीं ती ९७० लक्ष डॉलर झाली. १९३० अखेर जिंदगीचा आंकडा ५९ कोटींपर्यंत गेला व आतां तो १०० कोटि डॉलरच्या घरांत आहे. गेलें महायुद्ध, त्यानंतरची जागतिक मंदी व चालू युद्धाचीं अडीच वर्षें पुरीं झाल्यानंतरहि कंपनीची प्रगति अखंड चालू आहे. एकूण क्लेम्समध्यें युद्धजन्य क्लेम्सचें प्रमाण अत्यंत अल्प आहे. कंपनीच्या एकूण व्यवहारापैकीं फक्त १३% व्यवहार ग्रेट ब्रिटनमध्यें असून युरोप खंडांत ती कामच करीत नाहीं ही गोष्ट ध्यानांत ठेवण्याजोगी आहे. १९४१ सालीं कंपनीनें ५१½ कोटि रुपयांचें विम्याचें नवें काम पुरें केलें; तिच्या चालू कामाचा आकडा ८१४ कोटि रुपयांपेक्षा ज्यास्त आहे.

### दि शुगरकेन प्रॉडक्ट्स ॲंड इंडस्ट्रीज लि.

उसापासून साखर, मक्यापासून स्टार्च, एरंडीपासून टर्की रेड तेल इत्यादि धनोत्पादक योजना वरील कंपनीपुढें आहेत, त्या-पैकीं साखरेच्या उत्पादनास प्रथम प्रारंभ केला जाईल. येत्या डिसेंबरमध्यें साखरेचा कारखाना उभारला जाईल, अशी अपेक्षा आहे. विक्रीस काढलेल्या ६ लाखांच्या भांडवलापैकीं निम्में भांडवल अगोदरच खपून गेलें आहे. क्यु. प्रेफरन्स, ऑर्डिनरी व डिफर्ड असे तीन प्रकारचे भाग कंपनीनें काढले असल्यामुळें लोकांना आपल्या इच्छेप्रमाणें भागांत पैसे गुंतविण्याची सोय झाली आहे. कंपनी मुदतीच्या ठेवीहि स्वीकारते. श्री. अप्पासाहेब पंत, औंधचे मुख्य प्रधान हे कंपनीच्या डायरेक्टर बोर्डाचे अध्यक्ष असून बोर्डाचे सभासदांत अनेक अनुभवी व तज्ञ लोक आहेत. विशेष माहितीसाठीं मे. जी. एच. भागवत आणि कं., (मॅनेजिंग एजंट्स) मेनरोड, विजापूर ह्या पत्त्यावर चौकशी करावी.

### मध्यवर्ती विधिमंडळाच्या मुदतींत वाढ

हिंदी मध्यवर्ती असेंब्लीची मुदत सप्टेंबर अखेर संपते. ती आणखी एका वर्षानें वाढविण्यांत आली आहे. असेंब्लीची ठराविक मुदत संपल्यानंतर आतांपर्यंत ती चारदां वाढविण्यांत आलेली आहे. कौन्सिल ऑफ स्टेटची मुदतहि वाढली आहे.

४ जून १९३५ या तारखेला दि ट्रस्ट ऑफ इंडिया विमा कंपनी इंडियन कंपनीज ॲक्टान्वयें नोंदण्यांत आली. हा दिवस संस्थापनेचा धरून ता. ४ जून १९४२ ला कंपनीनें, ७ वर्षें पुरीं केलीं. या सातही वर्षांत कंपनीची क्रमशः प्रगतीच होत आली आहे व ही प्रगति स्थैर्याची सुसंगत व वाजवी खर्चाचे प्रमाणांतच होत आहे.

१ ल्या वर्षी १९३६ मध्यें १,१९,५६० रु. चें काम पूर्ण झालें
२ ऱ्या वर्षी १९३७ मध्यें २,०६,८२५ रु. चें काम पूर्ण झालें
२ ऱ्या वर्षी १९३८ मध्यें ३,७४,९३८ रु. चें काम पूर्ण झालें
४ थ्या वर्षी १९३९ मध्यें ४,०७,५२० रु. चें काम पूर्ण झालें
५ व्या वर्षी १९४० मध्यें ५,८३,१७२ रु. चें काम पूर्ण झालें
६ व्या वर्षी १९४१ मध्यें ७,०१,८५६ रु. चें काम पूर्ण झालें

# पहिल्याच मूल्यमापनांत विमेदारांस त्रैवार्षिक हजारीं रु. ३० व ३६ बोनस जाहीर केला

ता. ४ जून १९३५ रोजीं इंडियन कंपन्यांच्या कायद्याप्रमाणें दि ट्रस्ट ऑफ इंडिया विमा कंपनी, नोंदण्यांत आली व ता. १७ जानेवारी १९३६ रोजीं, कामास सुरुवात झाली. १३-१-१९३९ रोजीं नवीन विमा कायद्याप्रमाणें कंपनी रजिस्टर झाली. ता. १९-१-१९४० रोजीं, ग्वाल्हेर संस्थानचे कायद्याप्रमाणें, ता. २-११-१९४१ रोजीं, म्हैसूर संस्थानचे कायद्याप्रमाणें व ता. २१-२-४१ रोजीं बडोदा संस्थानच कायद्याप्रमाणें कंपनी रजिस्टर झाली.

कंपनीचे भागीदार, विमेदार व एजन्टस यांच्या आपुलकीच्या सहकार्यानेंच चालू वर्षींही कंपनीचें पुढें पाऊल पडेल असा भरंवसा आहे.

मेसर्स, व्ही. के. फाटक आणि कं., चीफ एजन्टस्—मध्यप्रांत, वऱ्हाड.

व्ही. एच्. देशमुख, बी. ए. जनरल मॅनेजर.

# दि ट्रस्ट ऑफ इंडिया विमा कंपनी लिमिटेड, पुणें.

## N. V. WADNERKAR

**Gold & Silver Smith, Jeweller & Engraver, Electro-plater & Manufacturer of Sporting Trophies, Medals, Cups etc.**

**- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -**

**POONA CITY.**

## THE WILLINGDON COLLEGE, SANGLI.

Reopens for the academic year on 20th June 1942. The registration of names commenced from 6th June. The College provides for instruction in the Arts and Science Courses in the first two years, for B.A. Degree courses Pass & Honours, and for Postgraduate instruction. About a hundred seats are available in the College Hostels. Healthy surroundings, inexpensiveness and efficiency are the special features of the college.

The tuition fees are Rs. 60 per term, and the room rent per term is Rs. 12 for a double room and Rs. 15 for a single room. Further information can be had on application.

Separate accommodation for lady students is available in the Sakhubai Gokhale Hostel on the College premises.

V. K. GOKAK,
Principal.

## DECCAN INSTITUTE OF COMMERCE, POONA

**( RECOGNISED BY GOVERNMENT )**

**Opens for the 1942–43 Session on Thursday the 25th June 1942.**

**Students coached up for the following examinations:**

1. Government Diploma in Commerce (G.D.C).
2. D. Com. Diploma of the Indian Merchants' Chamber, Bombay, in specialised Company Secretarial Banking, Insurance, Accountancy and Business Organisation.
3. London Chamber of Commerce.
4. The Indian Institute of Bankers (for Bank employees only).
5. B. A. (1st Part) for Graduates only.
6. G. D. C. & A. for Graduates only.

**Special arrangements in SHORTHAND AND TYPEWRITING. Highly qualified and experienced staff. Admission upto 15th July. For particulars see personally or apply to:**

592/3 Budhwar Peth,
Opp. New English School,
Poona.

S. H. DHUPKAR,
Secretary.

## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार —

## DECCAN BOOK STALL

**Booksellers, Publishers & Subscription Agents**

**Fergusson College Road, Poona No. 4**

(1) We stock and supply Educational books, General books & Library books.

(2) We supply Government of Bombay and Government of India publications.

(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.

(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.

## महायुद्ध दाराशीं आलें परदेशी औषधें दुर्मिळ व महाग झालीं

पण

**भिण्याचें कारण नाहीं !!!**

**— कारण —**

## आयुर्वेद रसशाळा पुणें लि०

या देशी औषधाच्या प्रसिद्ध कारखान्यानें तयार केलेलीं

● रक्तवर्धक, ● उपनाह,
● बालजीवन, ● कॅल्सीप्राल

*इत्यादि पेटंट, स्टँडर्ड व लोकप्रिय औषधें खात्री पटल्यामुळें*

**★ डॉक्टर्सहि वापरूं लागले आहेत. ★**

**दरसाल बिनचूक नफा वाटणाऱ्या ह्या कंपनीचे शेअर्स व औषधें मागवा.**

## आयुर्वेद रसशाळा पुणें लि०

मुख्य दुकान गणपति चौक, लक्ष्मीरोड, पुणें २.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनी छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनी 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२४।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

**जाहिरातींचे दर.**
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ, 'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

**वर्गणीचे दर.**
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हशील माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ८ पुणें, बुधवार, तारीख १७ जून १९४२ अंक २४

## दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... ... ... रु. | २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | ... ... ... रु. | १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड | ... ... ... रु. | १,१८,००,००० |

**मुख्य कचेरी:** ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

**मुंबईमधील शाखा:** बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

**इतर शाखा:** अहमदाबाद ( भद्र, मुख्य ऑफिस ), अहमदाबाद ( एलिस ब्रिज शाखा ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अंधेरी ( मुंबई शेजारीं ), बांद्रे ( मुंबई शेजारीं ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस ), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर, कराची, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत.

**लंडन एजन्ट्स:** वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

**डायरेक्टर्स:** सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई, सर जोसेफ के. माइंट, मि. ए. गेडिस, सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई., मि. दिनशा के. दाजी, श्री. रामनिवास रामनारायण.

**करंट डिपॉझिट अकाउंट्स:**

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० एकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षा कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमीचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

एजंट—टी. आर. लालवाणी.

## दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

हेड ऑफिस : पुणें शहर.

स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.

मुंबई शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | : रु. १०,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | : रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | : रु. ४,३५,०५० |
| वसूल झालेलें भांडवल | : रु. २,१७,५२५ |
| एकूण खेळतें भांडवल | : रु. ३५,००,००० |

**डायरेक्टर्स**

प्रो. वा. गो. काळे, अध्यक्ष

| | |
|---|---|
| श्री. धों. कृ. साठे | श्री. मा. रा. जोशी |
| श्री. न. ग. पवार | श्री. श्री. गो. मराठे |
| श्री. त्र्यं. वि. रानडे | श्री. र. चिं. सोहोनी |
| श्री. वा. पुं. वर्दे | मि. फ. वो. पदमजी |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदीविक्री कसोशीनें करून दिली जाते.

बँकेच्या शेअरवर १९४१ अखेर पुऱ्या होणाऱ्या वर्षी द. सा. द. शेंकडा ४ टक्के करमाफ डिव्हिडंड दिलें गेलें. बँकेची शेअरविक्री चालू आहे.

म. वि. गोखले
मॅनेजर.

**महायुद्धाची जाणीव! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.**

बंबाचे माडीवर

# महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

# विविध माहिती

### बुडालेलें सोनें वर काढलें

१९४० सालीं न्यूझीलंडचे किनाऱ्यालगत कॅनडा-ऑस्ट्रेलिया सेपा करणारी "नायगारा" ही आगबोट सुरुंगामुळें बुडाली, त्या वेळीं तिचेबरोबर बरेंच सोनेंहि समुद्रतळास गेलें. हें सोनें बँक ऑफ इंग्लंडच्या मालकीचें होतें. युनायटेड साल्व्हेज सिंडिकेटनें त्यापैकीं २४ लक्ष पौंड किंमतीचें सोनें वर काढलें आहे. आगबोट खोल पाण्यांत बुडाली असल्याकारणानें सोनें वर काढणें विशेष अवघड होतें.

### सर फ्रेड्रिक साइक्स ढाल

सर फ्रेड्रिक साइक्स ग्रामसुधारणा ढाल मुंबई प्रांतांतील उत्तर, मध्य व दक्षिण भागांतील ग्रामसुधारणेचे कार्मी पुढें असलेल्या खेडेगांवांस दरवर्षी देण्यांत येते. उत्तर भागाकरितां ठेवलेली ढाल यंदा ठाणें जिल्ह्यांतील तुर्भे ह्या गांवास मिळाली आहे. ह्या गांवाची लोकसंख्या ७४५ आहे. शेतीसुधारणा, रस्त्यांच्या योजना, धान्याची बँक, वळूंची योजना, कोंबड्यांची पैदास, इत्यादि बाबतींत गांवानें विशेष प्रगति दाखविली आहे.

### पारशी मुलांचें स्थलांतर

मुंबई शहरांतील पारशी पंचायतीनें २०० पारशी मुलें धोक्यापासून दूर असावीं ह्या दृष्टीनें नवसरी येथें रहाण्यासाठीं पाठविलीं होतीं, तीं गेल्या आठवड्यांत सुखरूप परत आणण्यांत आलीं.

### चेक्सची देवघेव

मुंबई बँकर्स क्लिअरिंग हाऊसमध्यें ५ जून अखेर संपलेल्या आठवड्यांत २२ कोटि रुपये किंमतीच्या १,०६,९६४ चेक्सची देवघेव झाली.

### सरकारी पत्रकाचा खुलासा

इतके दिवस चलनी नोटा काढण्याच्या आपल्या अधिकारांत रिझर्व्ह बँक ब्रह्मी नोटांचे ऐवजीं हिंदी नोटा देत असे; ह्यापुढें ती बँक हिंदुस्थान सरकारच्या वतीनें हें काम करील. ह्यासंबंधांतील सरकारी पत्रकाच्या अर्थाविषयीं घोटाळा उत्पन्न झाला, म्हणून हा खुलासा प्रसिद्ध करण्यांत आला आहे.

### दोन वर्षांतील हानि

चालू युद्धांत २ सप्टेंबर १९४१ अखेर ब्रिटिश साम्राज्याचे किती सैनिक कामास आले, ह्यासंबंधींचे आकडे मि. ॲटली ह्यांनीं कॉमन्स सभेंत सांगितले, ते खालीं दिले आहेतः—

| | मृत | जखमी | कैदी | माहिती नाहीं |
|---|---|---|---|---|
| ग्रेट ब्रिटन | ४२,२६७ | ३२,९०३ | ५३,६३४ | १६,२०८ |
| साम्राज्यांतील | | | | |
| स्वायत्त देश | ४,६५६ | ७,२७९ | ३,१०४ | ८,७८५ |
| हिंदुस्थान व ब्रह्मदेश | १,४२९ | ५,३७४ | १,७१४ | ६४ |
| ब्रिटिश वसाहती | ६११ | ८३७ | ६ | ४,६९९ |

### अमेरिकेची लोकसंख्या

१ जून, १९४० ते १ जून, १९४१ ह्या मुदतींत अमेरिकेची लोकसंख्या १३ कोटि, ३० लाखांची १३ कोटि, ४१ लक्ष झाली. म्हणजे, लोकसंख्येंत ·८२% वाढ झाली. उद्योगधंद्यांतील चलती हें प्रस्तुत वाढीचें कारण सांगण्यांत येतें.

### ग्रीसचे राजे अमेरिकेंत

ग्रीसचे राजेसाहेब वॉशिंग्टन येथें दाखल झाले आहेत.

### बिनपत्त्याचीं पत्रें

हिंदुस्थानांत दररोज सरासरीनें २१६ पत्रें त्यांवर पत्ता न लिहितां पोस्टांत टाकण्यांत येतात.

### बँक ऑफ स्कॉटलंडचा नोकरवर्ग

वरील बँकेच्या नोकरवर्गापैकीं ५४६ नोकर लष्करांत दाखल झाले आहेत, व आणखीहि ज्यास्त लवकरच जातील. म्हणजे, मूळ संख्येच्या ४५% नोकर शिलक राहतील. लष्करांत गेलेल्यांपैकीं अकरा जण कामास आले, दहा युद्धकैदी झाले व चौदा जणांना जखमी अथवा इतर कारणांनीं म्हणून परत धाडण्यांत आलें. त्यांना बँकेंत परत कामावर घेण्यांत आलें आहे.

### वाढतें धूम्रपान

ग्रेट ब्रिटनमध्यें युद्धकालांत धूम्रपानाचें प्रमाण एकसारखें वाढत आहे. १९४० चे मानानें १९४१ सालीं तें १६% अधिक झालें व १९४१ च्या शेवटच्या तिमाहींतील वाढ तर २६% भरली. तंबाखूवर जबर कर असल्याकारणानें, वाढतें धूम्रपान फडनविसांना संतोषदायकच वाटत असेल.

### सहकारी प्रचारक

सहकारी ऑनररी ऑर्गनायझर नेमण्यास पुनः प्रारंभ करण्याचें व त्यांचें पूर्वीप्रमाणें जिल्हा ऑर्गनायझर व तालुका ऑर्गनायझर असें वर्गीकरण करण्याचें मुंबई सरकारनें योजिलें आहे. तालुका ऑर्गनायझरांची नेमणूक रजिस्ट्रार करतील व जिल्हा ऑर्गनायझर नेमण्याचा अधिकार सरकारकडे राहील.

### डॉक्टरांस खेडेगांवांत रहाण्यास प्रोत्साहन

खेडेगांवांतील लोकांस औषधपाणी मिळावें ह्या हेतूनें सरकारनें तेथें काम करणाऱ्या खासगी डॉक्टरांना वार्षिक ग्रँट देण्याचा उपक्रम चालू केलेला आहे. अशा डॉक्टरांस तेथें स्थायी होण्यास उत्तेजन मिळावें, ह्यासाठीं त्यांना खेडेगांवांत घर बांधण्यास अथवा विकत घेण्यास सरकार एक हजार रुपयांपर्यंत बिनव्याजीं कर्ज देणार आहे. ही रकम त्यांच्या वार्षिक ग्रँटमधून दरमहा थोडी थोडी वळती करून घेण्यांत येईल. सरकारी जमीन उपलब्ध असून पाहिजे असल्यास, ३० वर्षांच्या करारानें डॉक्टरास मिळूं शकेल. त्याचें भाडें घेतलें जाणार नाहीं, परंतु त्यावरील बिगर शेतसारा भाडेकऱ्यास भरावा लागेल.

### रेडिओचा बिगर-परवाना वापर

रेडिओचा परवाना नसतांना रेडिओ सेट्स बाळगल्याबद्दल १९४२ च्या पहिल्या तिमाहींत सबंध हिंदुस्थानांत १३० लोकांना शिक्षा झाली.

### अमेरिकन तज्ज्ञाची नेमणूक

ॲग्रिकल्चरल मार्केटिंग ॲडव्हायसरचें काम मि. लिव्हिंगस्टन ह्यांचेकडे सोंपविलेलें होतें. ते गेल्या वर्षी सेवानिवृत्त झाल्यानंतर त्याचे जागीं डॉ. दास ह्यांची तात्पुरती नेमणूक झाली. परंतु ती जागा विभूषित करण्याकरितां एका अमेरिकन तज्ज्ञाची निवड करण्यांत येणार आहे व ही निवड हिंदुस्थान सरकारचें वतीनें त्या सरकारचे अमेरिकेंतील एजंट जनरल सर गिरिजाशंकर वाजपेय हे करणार आहेत, असें प्रसिद्ध झालें आहे.

### कागदाचें महत्त्व

कागद अथवा कार्डबोर्ड जाळणें, त्याचा नाश करणें अगर तो केराच्या पेटींत टाकणें हा ग्रेट ब्रिटनमध्यें गुन्हा ठरविण्यांत आला आहे.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | १८८ |
| २ आयुर्विमा व्यवसाय आणि युद्धपरिस्थिति | १८९ |
| ३ सहकारी बँकांच्या परिषदेचे ठराव | १९० |
| ४ स्फुट विचार ... | १९१ |
| ब्रिटन-रशिया करार—ब्रिटिश बँकांचा तरता पैसा—मेडी मंडळाच्या शिफारसींची अंमलबजावणी | |
| ५ मोटारींच्या वापरांत पद्धतशीर बचत | १९३ |
| ६ उसाच्या चिपाडाचा नवा उपयोग | १९३ |
| ७ गेल्या वर्षांतील पीकपाणी | १९३ |
| ८ जादा नफ्यावरील कर | १९३ |



# अर्थ

बुधवार, ता. १७ जून, १९४२


## आयुर्विमा-व्यवसाय आणि युद्ध-परिस्थिति

सध्याच्या युद्धपरिस्थितींत आयुर्विमा मंडळांच्या नफा मिळविण्याच्या शक्तीवर प्रतिकूल परिणाम होणें अपरिहार्य आहे हें सांगावयास नको. नफ्यामधून बोनस विमेदारांस वांटण्याची त्यांचेमध्यें चढाओढ चालते ती प्रस्तुत तंगीच्या काळांत विम्याच्या धंद्यास घातुक झाल्यावांचून राहणार नाहीं ह्या विचारानें कित्येक हिंदी कंपन्यांनीं विमेदारांस बोनस देऊं नये, असा कायदा करण्याविषयीं प्रयत्न चालविला होता, त्यास ओरिएंटल विमा कंपनीचे अध्यक्ष, सर पुरुषोत्तमदास ठाकुरदास, ह्यांनीं कंपनीचे वार्षिक सभेचे प्रसंगीं दिलेलें उत्तर लक्षांत घेण्याजोगें आहे. हिंदुस्थानांत विम्याचा प्रसार अद्याप फार झालेला नाहीं, ह्या दृष्टीनें विमेच्छूंस आकर्षक वाटणारी बोनसची वाटणी बंद ठेवणें हिंदी विमाव्यवसायाच्या प्रगतीच्या हिताचें होणार नाहीं, असें त्यांनीं सांगितलें. सरकारनेंच स्वतःकडे विम्याचें सर्व काम घेतलें व विम्याच्या जॉइंट स्टॉक कंपन्या बंद केल्या, तर बोनसची आवश्यकता उरणार नाहीं; परंतु कांहीं कंपन्यांनीं भरमसाट खर्च करावा, तर कांहींनीं पद्धतशीर व काटकसरीनें व्यवहार करून बाढावा उरवावा आणि बोनसची वाटणी बंद करून त्या सर्वांस सरकारनें सारखेच लेखावें, ही गोष्ट चांगल्या कंपन्यांस अन्यायकारक व वाईट कंपन्यांच्या अननुभवी व उथळपट्टीच्या व्यवहारावर पांघरूण घालणारी आहे, असें सर पुरुषोत्तमदास ह्यांनीं आपलें मत स्पष्टपणें सांगितलें. ह्या प्रकरणीं ओरिएंटलच्या बोर्डानेंहि ह्याच प्रकारचें आपलें मत दिलेलें आहे.

प्रस्तुत युद्धास प्रारंभ झाल्यानंतरच्या कांहीं काळांत हिंदी लोकांना आयुर्विम्याच्या अंतिम उपयुक्ततेविषयीं संदेह उत्पन्न झाला होता व कित्येकांनीं आपले हप्तेहि थांबवण्यास प्रारंभ केला होता. आतां ती परिस्थिति उरलेली नसली तरी कायद्यानें बोनस बंद ठेवून विम्याचा आकर्षकपणा कमी करणें म्हणजे हिंदी विमा व्यवसायाची प्रगति कुंठित करणेंच ठरलें असतें व हा दुष्परिणाम नाहींसा होण्यास युद्धसमाप्तीनंतरहि कित्येक वर्षें लोटावीं लागलीं असतीं. लहान कंपन्यांस मदत करण्याचे मार्ग वेगळे आहेत, ते वाटले तर सरकारनें अवलंबावे; परंतु चांगल्या-वाईट कंपन्यांस एकाच खाड्यांत अडकवून विमाव्यवसायास पायबंद घालणें हितकारक होणार नाहीं, असा सर पुरुषोत्तमदास ह्यांच्या भाषणाचा भावार्थ होता. सुस्थितीच्या कंपनीचे प्रतिनिधि ह्या दृष्टीनें तर त्यांचें म्हणणें सयुक्तिक आहेच आणि हिंदुस्थानांतील विमा व्यवसायाचा मागसलेपणा व लोकांची बोनसकडे पहाण्याची वृत्ति ही लक्षांत घेतांहि त्यांच्या म्हणण्यांत तथ्यांश आहे असें दिसून येईल. जोंपर्यंत विमा कंपन्यांत स्पर्धा चालणार तोंवर चांगल्या कंपनीस तिच्या सुस्थितीचा फायदा घेतां आलाच पाहिजे; इतर कंपन्यांचा कारभार उथळपट्टीचा अथवा बुडित आहे म्हणून चांगल्या कंपनीचा पाय मागें ओढतां कामा नये असा त्यांच्या म्हणण्याचा मथितार्थ आहे. कंपनीनें बोनस वाटावयाचा, तो योग्य रिझर्व्ह बाजूस काढून व खऱ्याखुऱ्या वाढाव्यांतून वाटणें आवश्यक आहे; तेव्हां कंपन्यांच्या बोनस वाटण्याच्या आधाशीपणावर कडक नजर ठेवली पाहिजे व बुडित कंपन्यांचा व्यवहार विमेदारांस नुकसानकारक होणार नाहीं अशी व्यवस्था केली पाहिजे. तसेंच, योग्य कंपन्यांस वाढ करण्यास संधि व सवडहि दिली पाहिजे. सर पुरुषोत्तमदास ह्यांनीं हिंदी विमा-व्यवसायाच्या दृष्टीनें बोनसची तरफदारी केली, त्याच वेळीं बोनस वांटूं न शकणाऱ्या कंपन्यांच्या भवितव्याविषयींहि आपले विचार मांडले असते, तर बरें झालें असतें.

प्रुडेन्शल आणि पर्ल ह्यांच्यासारख्या प्रमुख ब्रिटिश आयुर्विमा मंडळांच्या कारभाराचे वृत्तांत आणि त्यांच्या अध्यक्षांचीं वार्षिक सभांचे वेळचीं भाषणें प्रसिद्ध झालीं आहेत, त्यांवरून ह्या मंडळांच्या सांपत्तिक स्थितीवर युद्धाचे काय परिणाम झाले आहेत ह्याची कल्पना येते. विमा मंडळांचीं मूल्यमापनें त्रैवार्षिक, पंचवार्षिक किंवा वार्षिक असल्यानें ही कल्पना अर्थातच स्पष्ट व पूर्ण असणें शक्य नाहीं. पण गेल्या वर्षी मंडळांस द्याव्या लागणाऱ्या क्लेम्सच्या रकमा युद्धाचे पूर्वीच्या वर्षाचे मानानें मोठ्या असणें स्वाभाविक आहे. युद्धापूर्वी उतरलेल्या विम्यांच्या अटींस युद्धामुळें आलेल्या मृत्यूंचा अपवाद केलेला नसल्यामुळें मंडळांच्या सांपत्तिक स्थितीवर ताण पडेल यांत शंका नाहीं. आयुर्विम्याचे फायदेशीर व्यवस्थेबाबत मृत्यूचें प्रमाणच तेवढें महत्त्वाचें असतें असें नसून मंडळांच्या गुंतवलेल्या पैशावर सुटणारें व्याज ही बाबहि निर्णायक असते. चक्रवाढ व्याजानें वाढत जाणाऱ्या जमा झालेल्या प्रिमियमच्या हप्त्यांवर विमा-मंडळांचा नफा अवलंबून असतो हें येथें लक्षांत ठेवलें पाहिजे. अलीकडे व्याजाचे दर उतरले असल्यानें नफा मर्यादित होण्याची आणि नफ्याचा अंश मिळण्याच्या अटीवर उतरलेल्या विम्यांवरील बोनस कमी होण्याची प्रवृत्ति वाढली आहे. सुरक्षितपणा व मजबुती ह्यांचे दृष्टीनें प्रत्यक्ष मिळालेल्या व्याजाचे दरापेक्षां कमी दर मूल्यमापनांत धरून आपले रिझर्व्ह वाढवण्याचा ब्रिटिश विमामंडळांचा स्तुत्य प्रघात आहे. त्यास अनुसरून १९४१ चे अखेर केलेल्या प्रुडेन्शलच्या मूल्यमापनांत व्याजाचा दर अडीच टक्के प्रमाणभूत धरण्यांत आला आहे. मागें भक्कम रिझर्व्ह बाजूस काढण्याचें धोरण स्वीकारलें गेल्यामुळें आपल्या कंपनीस असें करतां येऊन तिची सांपत्तिक शक्ति कायम ठेवतां आली

असल्याचें तिचे अध्यक्ष, सर जॉर्ज बार्स्टो, ह्यांनीं भागीदारांस कळविलें आहे. पर्ल कंपनीनें हिशेबांत धरलेला व्याजाचा दर पावणेतीन टक्के आहे. ह्या सावधगिरीच्या धोरणाचा परिणाम असा होतो कीं, मूल्यमापनांत दिसून येणारी येणें-देण्यांतली तफावत कमी होते आणि देतां येणाऱ्या बोनसची रकम मर्यादित होते. युद्ध-परिस्थितींत बोनस वाढण्याचें नांवच नको आणि तें वाढवणें नफ्याचे आकाराचे दृष्टीनें शक्य असलें तरी तें वाढवलें जावयाचें नाहीं. भक्कम सांपत्तिक स्थितीमुळें पूर्वीचें बोनस देणें समर्थनीय आहे असें दिसल्यास त्याचें प्रमाण चालू ठेवण्यांत येईल किंवा थोडें कमी केलें जाईल असें मानण्यास जागा आहे. येथें ध्यानांत वागवावयाची गोष्ट आहे ती विमामंडळयांनीं आपल्या रिझर्व्हचा भरपूरपणा अबाधित राखण्याच्या महत्त्वाविषयींची आहे. ब्रिटिश आयुर्विमा मंडळयांच्या कारभाराच्या वृत्तांतावरून ह्या प्रश्नावर चांगला प्रकाश पडत आहे. ह्या मंडळ्या जुन्या व मोठ्या आहेत हें खरें; तथापि, त्यांच्या सांपत्तिक व्यवस्थेच्या मुळाशी असलेल्या तत्वाचा शक्य तितका अंगिकार ह्या देशांत केला जाणें इष्ट आहे ह्याबद्दल दुमत होण्याचें कारण नाहीं.

ग्रेट ब्रिटनमधील विमा कंपन्यांचा नोकरवर्ग व त्यांचे एजंट युद्धकार्यांत गुंतले आहेत. त्याचा परिणाम कंपन्यांस मिळावयाच्या नवीन कामावर झाला आहे. कित्येक कंपन्यांनीं आपल्या कचेऱ्या मोठ्या शहरांतून अंतर्भागांत नेल्या आहेत. तरुण व मध्यम वयाचे लोकच मुख्यत: विमा उतरतात; परंतु ते लष्करांत मोठ्या प्रमाणावर दाखल होत असल्यानें विमेच्छूंची संख्याहि घटली आहे. त्यामुळें, कंपन्यांना नवीन काम मिळविण्यासाठीं थोड्या अधिक वयाच्या लोकांनाच विमा उतरविण्यास उद्युक्त करावें लागत आहे. आयुर्विम्यामुळें अपघातापासून आर्थिक संरक्षण मिळतें. त्याचप्रमाणें कंपनीकडे भरलेल्या रकमेंत समाधानकारक वाढहि होत रहाते. ह्या दुसऱ्या फायद्याचें महत्त्व प्रामुख्यानें लोकांच्या नजरेस आणिल्यानें सरकारी रोख्यांचे आकर्षणास बाध येईल, ह्या भावनेनें विमा कंपन्या अकस्मात् मृत्युजन्य आपत्तीमुळें येणाऱ्या आर्थिक संकटाचें निवारण, हाच विम्याचा प्रमुख फायदा आज जोरानें पुढें मांडीत आहेत. विमा कंपन्यांची जिंदगी बहुंशीं सरकारी रोख्यांतच गुंतविली जात असल्यानें, विमा कंपन्यांचा व्यवहार हा एक राष्ट्रोपयोगी व्यवसाय विशेष अर्थानें झाला आहे. ब्रिटिश जनतेचा विम्याचे संरक्षणावरील विश्वास युद्धकाळांतहि दृढ आहे, हा विम्याचे मूलभूत तत्त्वाचा प्रचंड विजय समजला पाहिजे.

## सहकारी बँकांच्या परिषदेचे ठराव

(२)

मागील अंकांत पुणें येथें भरलेल्या सहकारी बँकांच्या परिषदेंत मान्य झालेल्या पहिल्या दहा ठरावांचा गोषवारा दिला होता. आज बाकीच्या ठरावांचा मथितार्थ खालीं देत आहों:—

(११) सहकारी बँकांच्या डायरेक्टरांनीं कर्जाबद्दल कोणासहि जामीन राहूं नये.

(१२) कंपन्यांच्या कायद्याखालीं रजिस्टर झालेल्या संस्थांस बँकांनीं कर्जें देण्याबाबत प्रांतिक सरकारानें अलीकडे हुकूम काढला आहे त्याचा फेरविचार व्हावा अशी विनंति आहे. सरकारी रोखे व इतर ट्रस्टी सिक्युरिटीज आणि माल ह्यांचे तारणावर योग्य मर्यादेंत वरीलसारखीं कर्जें देण्यासंबंधानें रिझर्व्ह बँकेनें व्यक्त केलेला अभिप्राय लक्षांत घेतला जाऊन तीं बँकांनीं देण्यास सरकारची अनुमति मिळावी.

(१३) अर्बन बँकांनीं स्थावर मिळकतीच्या तारणावर कर्जें विशिष्ट अटींवर व प्रमाणांत द्यावीं. ह्यासंबंधांत बँकांच्या असोसिएशनच्या कार्यकारी मंडळानें नियम तयार केले आहेत ते योग्य वाटल्यास बँकांनीं उपयोगांत आणावे.

(१४) रिकामा पडून राहिलेला आपला पैसा गुंतविण्याची विशेष अडचण बँकांस भासत असल्यानें सहकारी कायद्याखालीं सरकारनें नवीन नियम करून रजिस्ट्रारनीं मान्य केलेल्या सिक्युरिटीजमध्यें तो पैसा गुंतवण्याची सोय करून द्यावी.

(१५) प्रत्येक जिल्ह्यांतला सहकारी संस्थांचा रिकामा पैसा जिल्ह्यांच्या सेंट्रल बँकेमध्यें एकत्रित होणें आवश्यक आहे. तथापि, विशिष्ट परिस्थितींत अर्बन बँकांस आपला मोकळा पैसा इतर बँकांत व प्रांतिक सहकारी बँकांत ठेवण्याची मुभा असावी हेंच तत्त्व सेंट्रल बँक व प्रांतिक बँक ह्यांच्या परस्परसंबंधास लागू केलें जावें.

(१६) अर्बन बँक्स व सेंट्रल बँक्स ह्यांचे पैशाच्या अंतर्गत ने-आणीच्या बाबतींत परस्परसंबंध कसे असावे ह्या प्रश्नाचा विचार असोसिएशनच्या कार्यकारी मंडळानें तपशीलवार लवकर करावा.

(१७) सहकारी कायद्याखालीं अलीकडे केलेला ४५ वा नियम सरकारनें रद्द करावा आणि त्यास अनुसरून रजिस्ट्रारनीं दंड करूं नयेत. एका व्यक्तीचें देणें एका सोसायटीस असावें म्हणजे एका व्यक्तीस एकाच सोसायटीकडून कर्ज घेतां यावें अशी व्यवस्था होण्याच्या हेतूनें असोसिएशनच्या कार्यकारी मंडळानें नवीन नियम सुचवावा.

(१८) सहकारी संस्थांच्या करास प्राप्त होणाऱ्या मिळकतीची आकारणी प्राप्तीवरील करासाठीं करतांना (जेथें कर मुळांतच कापून घेतला जातो तेथें) ह्या मिळकतीसाठीं लागलेला खर्च योग्य प्रमाणांत वजा केला जावा, अशी विनंति सेंट्रल बोर्ड ऑफ रेव्हिन्यूस करण्यांत यावी.

(१९) सेंट्रल बँका आणि प्रांतिक बँकेच्या शाखा ह्यांचे मधून इंपीरिअल बँकेच्या मार्फत प्रांतिक बँकेकडे पैसा पाठवण्याचे बाबतींत अलीकडे कांहीं सवलती मिळाल्या आहेत, त्यांचा फायदा अर्बन बँकांस मुंबईस पैसा पाठवण्याचे कामीं दिला जावा.

(२०) जमिनीच्या लिलांवाच्या वगैरे तारखा निश्चित करण्यापूर्वी स्पेशल रिकव्हरी अधिकाऱ्यांनीं हितसंबंधीं संस्थांचा विचार घ्यावा.

(२१) जमीन गहाणाच्या बँकांचा विस्तार व सुधारणा होण्याच्या दृष्टीनें मद्रास प्रांताप्रमाणें ह्या प्रांतांतहि त्या बँकांसाठी स्वतंत्र कायदा केला जावा अशी मुंबई सरकारास आग्रहाची विनंति आहे.

(२२) सरकारनें सहकारी कायद्याखालील नियम ८ दुरुस्त करावा आणि भरलेलें भाग भांडवल, गंगाजळी व इमारत-फंड ह्यांच्या बारा पट देणें करण्यास (म्हणजे ठेवी स्वीकारण्यास मुभा ठेवावी; मात्र देण्याची रकम निश्चित होतेवेळीं भरलेल्या भांडवलाच्या दुपटीइतक्या बँकेच्या मालकीच्या सरकारी रोख्यांची किंमत वजा केली जावी आणि रजिस्ट्रारनीं ठरवलेल्या प्रमाणांत तरत्या पैशाची योजना बँकेपाशी असण्याची खबरदारी घेतली जावी.

(२३) सहकारी कायद्याच्या ५९ (अ) कलमाच्या अन्वयें जमिनीची तबदिली होईल तेव्हां ती सबंद्ध गहाण किंवा कबजांत घेतलेल्या मिळकतीची व्हावी अशी शिफारस करण्यांत येत आहे.

## स्फुट विचार

### ब्रिटन–रशिया तह

हिटलरशाहीचा बीमोड करण्याचा निश्चय इंग्लंड व रशिया ह्यांनीं केला आणि इंग्लंडनें रशियास युद्धसामुग्री पुरवण्याचा क्रम चालू ठेवला तेव्हां ह्या दोन देशांचे दरम्यान पूर्ण सहकार्याचा रीतसर औपचारिक करार होणें अपरिहार्य व अगत्याचें झालें. एकाच उद्दिष्टानें प्रेरित होऊन जर्मनीविरुद्ध चालवलेल्या युद्धांत मित्रराष्ट्रें लढण्याचें धोरण एकमेकांच्या सहायानें निश्चित करीत आहेत. प्रेसिडेंट रूझव्हेल्ट ह्यांनीं अनेकवार बोलून दाखवलें आहे कीं जर्मनीच्या विरुद्ध लढणाऱ्या सर्व लोकांस अमेरिकेचें सहाय मिळेल आणि जर्मनीच्या बाजूनें युद्धांत उडी टाकून जपाननें प्रत्यक्ष अमेरिकेवरच शस्त्र उचललें तेव्हां इंग्लंड, अमेरिका, रशिया व चीन ह्यांच्या धोरणांत आणि लढाऊ हालचालींत एकसूत्रीपणा साहजिकपणेंच उत्पन्न झाला. युद्धाचें उद्दिष्ट आणि त्याच्या समाप्तीनंतर व्हावयाच्या पुनर्घटना ह्यासंबंधानें ह्या राष्ट्रांची एकवाक्यता झाली असतां त्यांचे युद्धप्रयत्न अधिक कार्यक्षम व परिणामकारक झाल्यावांचून रहाणार नाहींत हें उघड आहे. अटलांटिक सनद ह्या नांवानें ओळखला जाणारा करार मि. चर्चिल व प्रेसिडेंट रूझव्हेल्ट ह्यांचेमध्यें झाला आणि त्यांत युद्धाचे हेतु, त्याचे अपेक्षित परिणाम इत्यादि बाबतींत खुलासा करण्यांत आला ह्याचें कारणहि हेंच होतें. आतां युरोप, एशिया व आफ्रिका ह्यांचे बाजूकडे युद्धास निर्णायक स्वरुप प्राप्त होण्याचा स्पष्ट रंग दिसत असल्यानें इंग्लंड व रशिया ह्यांचे दरम्यान मित्रत्वाचा तह नुकताच झाला असल्याचें मि. ईडन ह्यांनीं कॉमन्स सभेंत सांगितलें, त्याचें रहस्य लक्षांत घेणें आवश्यक आहे. चालू युद्धाचा यशस्वी शेवट होईतोंपर्यंत इंग्लंड व रशिया ह्यांचें हार्दिक व व्यावहारिक सहकार्य तर होईलच. पण त्यांनीं एकमेकांच्या संमतीवांचून स्वतंत्र तह करावयाचा नाहीं आणि युद्धोत्तर परिस्थितींत जागतिक पुनर्घटनेच्या कामीं अटलांटिक सनदेच्या तत्त्वावर धोरण ठेवून हिटलरशाही पुन्हां डोकें वर उचलणार नाहीं अशी तजवीज करावयाची ह्या आशयाचीं कलमें नव्या ब्रिटन–रशिया तहांत आहेत. हा तह प्रेसिडेंट रूझव्हेल्ट ह्यांच्या दस्तगिरीनेंच झालेला आहे. विखुरलेल्या युद्धांत मित्र-राष्ट्रांचा प्रयत्न एकजीव करण्यास त्याचा उत्कृष्ट उपयोग होणार आहे.

---

### ब्रिटिश बँकांचा "तरता" पैसा

आपल्या घेणेकरांचा म्हणजे ठेवीदारांचा पैसा मागणीबरहुकूम परत देतां यावा ह्या बेतानें बँकांस तो गुंतवावा लागतो. म्हणजे विशेष प्रमाणांत रोकड बाळगावी लागून पुष्कळ पैसा अल्प व्याजानें व अल्प मुदतीसाठीं गुंतवणें त्यांस आवश्यक असतें. युद्धपरिस्थितीसारख्या स्थितिमध्यें तर आपल्या जवळील पैशाचा बराच मोठा भाग "द्रव" स्वरूपांत म्हणजे तरता ठेवणें बँकांस सुरक्षितपणाचें वाटतें. ह्या पद्धतीनें व्याजाचें उत्पन्न व नफ्याचें प्रमाण कमी होतें, पण बँकांची सुरक्षितता वाढते. ब्रिटिश बँकांचे १९४१ सालाचे ताळेबंद प्रसिद्ध झाले आहेत त्यांवरून पैसा द्रव स्वरूपांत ठेवण्याची म्हणजे तो गोठूं न देण्याची प्रवृत्ति दृढावली असल्याचें दिसून येते. १९४० च्या मानानें १९४१ मध्यें ३८ प्रमुख ब्रिटिश व आयरिश बँकांच्या ठेवींचा आकडा ३५० कोटि पौंडांचा ४१२ कोटि पौंड झाला. त्यांचे पैकीं ७ अग्रगण्य बँकाच घेतल्या तरी त्यांच्या ठेवी २६१ कोटि पौंडांवरून ३१२ कोटि पौंडावर गेल्या. पण ह्या वाढाव्याच्या प्रमाणांत ह्या सात बँकांनीं दिलेलीं कर्जें वाढलीं नाहींत आणि त्यांनीं आपला हा फाजील पैसा सरकारी रोख्यांत गुंतवला. कर्जांचे (ॲडव्हान्सेस) ठेवींशीं प्रमाण १९३९ मध्यें २४½ टक्के व १९४० मध्यें २७ टक्के असें होतें, तें १९४१ मध्यें २९½ टक्के झालें. शिवाय, सरकारी ट्रेझरी डिपॉझिटसमध्यें गुंतवलेल्या रकमेचें प्रमाण १९४० मध्यें ११½ टक्के होतें तें १९४१ मध्यें २१ टक्क्यांचे वर गेलें. अल्प मुदतीच्या सरकारी रोख्यांत बँकांनीं अधिक पैसा घातल्यामुळें त्यांचा पैसा द्रव स्थितींत जास्त प्रमाणांत राहून सरकारास युद्धखर्चाची तोंडमिळवणी करण्यास सहाय मिळालें. ब्रिटिश बँका इतक्या दृढमूल झालेल्या आहेत कीं, त्यांस ठेवींचा पैसा एकदम परत द्यावा लागण्याची विशेष भीति नाहीं. तथापि, युद्धपरिस्थितीमुळेंच त्यांच्या तरत्या स्वरूपांतल्या पैशाचें प्रमाण वाढलें आहे आणि ह्या प्रवृत्तीचा दुहेरी उपयोग होत आहे.

---

### ग्रेडी मंडळाच्या शिफारसींची अंमलबजावणी

अमेरिकन तज्ज्ञ मंडळाच्या शिफारसींचें स्वरूप मागील "अर्थ"-च्या अंकांत दिग्दर्शित करण्यांत आलें आहे. ह्या शिफारसींचा विचार गव्हर्नर जनरलांनीं आपल्या कौन्सिलच्या सल्ल्यानें केला व त्यांतील शक्य तेवढ्या सूचना तात्काळ अंमलांत आणण्याचें त्यांनीं ठरविलें. तज्ज्ञ मंडळानें वॉर कॅबिनेटच्या स्थापनेविषयीं सूचना केली होती व त्या कॅबिनेटकडे उत्पादन, वहातूक, रेल्वेज, लष्कर, फडणिशी हीं खातीं देण्यात यावीत असा मंडळाचा अभिप्राय होता. आतां निर्माण करण्यांत आलेल्या युद्ध-मंडळाचें नांव "वॉर रिसोर्सेस कमिटी ऑफ कौन्सिल" असें देण्यांत आलें आहे व तें यथार्थच आहे, असें दिसून येईल. युद्धविषयक उत्पादन, वहातूक, फडणिशी, रेशनिंग, इत्यादि बाबी ह्या कमिटीकडे सोपविलेल्या आहेत. गव्हर्नर जनरल हे तिचे अध्यक्ष असून सप्लाय खात्याचे प्रमुख (सर होमी मोदी) हे त्याचे उपाध्यक्ष आहेत. ह्या कमिटीची सभा दररोज भरेल व तिचे निर्णय सर्वांवर बंधनकारक रहातील. आगबोटींच्या दुरुस्त्यांचे कामाबद्दल जबाबदार असलेल्या सप्लाय खात्यांत एक स्वतंत्र पोटखातें स्थापन करण्यांत आलें असून, तें कार्यक्षम होण्याची व्यवस्था करण्यांत आली आहे.

---

### मराठा चेंबरची वार्षिक सभा

मराठा चेंबर ऑफ कॉमर्स ॲंड इंडस्ट्रीजची आठवी वार्षिक सभा रविवार ता. १४ रोजीं केसरीच्या सभागृहांत भरली होती, त्यावेळीं सुमारें चाळीस सभासद हजर होते. चेंबरचे अध्यक्ष, श्री. ग. स. मराठे, ॲक्चुअरी, त्यांची प्रकृति बरी नसल्यामुळें ते सभेस येऊं शकले नाहींत; त्यांचे जागीं उपाध्यक्ष श्री. धोंडूमामा साठे ह्यांची योजना झाली. चेंबरची घटना व नियम ह्यांत दुरुस्ती, अहवाल व हिशेब ह्यांस मंजुरी, अधिकारी मंडळाची निवड, इत्यादि कामें सभेंत झालीं. श्री. ग. स. मराठे ह्यांस पुढील वर्षाचे अध्यक्ष निवडण्यांत आलें. श्री. आ. रा. भट, एम. कॉम. चेंबरचे कार्यवाह ह्यांनीं चेंबरची उपयुक्तता वाढविण्याकरितां सहाय करण्याविषयीं सभासदांस विनंति केली.

### भारत सेवक समाज

भारत सेवक समाजाची स्थापना कै. नामदार गोखले ह्यांनीं केली त्यास १२ जून रोजीं ३७ वर्षें पुरीं झालीं. सोसायटीच्या गेल्या वर्षाच्या अहवालांत तिच्या सभासदांनीं विविध क्षेत्रांत केलेल्या कामगिरीचा थोडक्यांत आढावा घेतलेला आहे, त्यावरून सोसायटीच्या कार्यविस्ताराची कल्पना येते. ना. पंडित हृदयनाथ कुंझरू हे सोसायटीचे अध्यक्ष व श्री. अमृतलाल ठक्कर हे उपाध्यक्ष होते. श्री. दत्तोपंत आंबेकर हे सेक्रेटरी होते. सोसायटीचें कार्य चालू रहाण्यास व त्याचा विस्तार करण्यास तिला आर्थिक सहायाची आवश्यकता आहे. हिंदुस्थानाचे सेवेसाठी राष्ट्रीय वृत्तीचे सेवक तयार करणें व धर्म, जात इत्यादि भेद न मानतां हिंदी लोकांचें हितसंवर्धन करणें हा उद्देश कै. गोखले ह्यांनीं सोसायटीपुढें आदर्श म्हणून ठेवला आहे व त्यास अनुसरून सोसायटीचे सभासद शक्य तों प्रयत्न करीत आहेत.

राहाणेची व भोजनाची उत्तम सोय




फोन नं. ७७९ गणपति चौक, व्यवस्थापक.

### दोन रुपयेवाल्या चलनी नोटा

हिंदी रिझर्व्ह बँक लवकरच दोन रुपयेवाल्या चलनी नोटा प्रसृत करणार आहे. ह्या नोटांमुळें एक रुपयाच्या नोटांवरील ताण कमी होऊन कागदाची बचत होईल. एक रुपयाच्या नोटा सध्या हिंदुस्थान सरकार काढीत आहे, त्या रुपयाच्या नाण्यासमान आहेत. रिझर्व्ह बँकेची नवी चलनी नोट ही दहा अथवा पांच रुपयांच्या नोटेच्या दर्जाची आहे; म्हणजे त्या नोटेचे बदली "रुपये" मागण्याचा अधिकार जनतेस राहील. गेल्या महायुद्धाचे वेळीं अडीच रुपयेवाल्या नोटा हिंदुस्थान सरकारनें काढल्या होत्या. १९२६ नंतर मात्र त्या काढण्याचें बंद ठेवण्यांत आलें होतें.

### बँकांस सुट्टी

जून अखेरीचे हिशेब पुरे करण्यासाठीं १ जुलै रोजीं बँकांचे व्यवहारास सुट्टी देण्याचा मुंबई सरकारचा विचार आहे.

**Gokhale Institute of Politics and Economics**

**Servants of India Society's Home, Poona 4**

ADMISSIONS TO STUDENTS reading for the M. A. Examination by papers or by thesis in Economics. One scholarship of Rs. 25 P. M. to be awarded to a research student.

D. R. GADGIL,
Director.

**— दी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि., पुणें —**

"आधीं केलें मग सांगितलें"

चालू हंगामाचा खर्च, घसारा ( Depreciation ) व ठेवींवरील व्याजें भागवून अंदाजी

**दोन लक्ष पन्नास हजार रुपये नफा**

**साखरेचा उतारा शेकडा दहा टक्क्यांपेक्षां जास्त**

वरील नफ्यांतून

गेल्या हंगामाचा तोटा भरून काढून

चालू वर्षी

**शेअरवर डिव्हिडंड देतां येईल.**

कॉमनवेल्थ बिल्डिंग,
लक्ष्मी रोड,
पुणें २.

चंद्रशेखर गोविंद आगाशे
बी. ए., एलूएल्. बी.,
मॅनेजिंग एजंटस्.
सी. जी. आगाशे अँण्ड को.

## मोटारींच्या वापरांत पद्धतशीर बचत

डेट्रॉइटपासून तीस मैलांवर असलेल्या पाँटाइक गांवीं मोटारींच्या वहातुकीच्या काटकसरीचा प्रयोग करण्यांत आला आहे, त्यांतील पद्धतशीरपणा अनुकरणीय आहे. ही योजना सर्वत्र अमेरिकेंत अंमलांत आणली जाईल. पाँटाइकमधील ६६ हजार नागरिकांच्या सहकार्यामुळेंच ही योजना यशस्वी होऊं शकली आहे. मोटारगाड्यांचा उपयोग शक्य तोंवर कमी करण्यासाठी लहान अंतरांवर चालत जाणें; कारखान्यांच्या, दुकानांच्या व शाळांच्या वेळांत योग्य तो फेरफार करून चालू बसेसचा व मोटारींचा अधिकांत अधिक उपयोग करून येणें व जाण्यायेण्यासाठी लोकांनीं इतरांस आपल्या मोटारींत जागा देणें हे उपाय योजिलेले आहेत.

पाँटाइकमध्यें कामावर जाणारे २५,८४१ लोक आहेत, त्यांपैकीं फक्त ४,४०८ लोक बसनीं जातात. बाकीचे २१,४३३ एकूण १५,१५२ खासगी मोटारींतून जातात. म्हणजे प्रत्येक मोटारगाडीमागें १३ कामगार अशी सरासरी पडते. आखलेल्या योजनेप्रमाणें ९ हजार कामगारांनीं बसेसचा उपयोग करावा व १८ हजार कामगारांनीं फक्त ४३ हजार मोटारींचा वहातुकीसाठीं उपयोग करावा, अशी तरतूद आहे. म्हणजे प्रत्येक गाडींत चौघांनीं बसावें, असा अर्थ होतो. हें घडून आलें, म्हणजे ११ हजार मोटारींची झीज थांबेल. कामगारांनीं आलटून पालटून गाड्या वापरून सर्व गाड्या वापरांत ठेवाव्या. कारण, मोटारगाडी वापरांत असली तरच ती चांगली टिकते. अशा रीतीनें पेट्रोल, टायर्स व सुटे भाग ह्यांचेमध्यें ७०% बचत होईल. खरेदी करण्यासाठीं बाजारांत जाणारांनीं शक्य तोंवर चालत जाण्यास उत्तेजन मिळावें, ह्या दृष्टीनें दुकानांनीं आपल्या कामाचे तास सोइस्कर ठेवावयाचे आहेत. सर्व शाळांच्या उघडण्याचे व बंद होण्याचे तास एकच न ठेवतां वेगवेगळे ठेवले, म्हणजे मुलांना बसनीं जातां येईल. कारखान्यांच्या कामाचे तासांतहि अशाच प्रकारें सोइस्कर बदल करण्यांत येईल. कारखाने नीट चालण्यास कामगारांची तेथें वक्तशीर पोंचण्याची व्यवस्था झाली पाहिजे. मोटारींतूनच कामगार कामास मुख्यतः जातात व ह्या दृष्टीनेंच वरील योजना आखलेली आहे. शेकडा७५% कामगारांना आपल्या जाण्या येण्यासाठीं मोटारीवरच अवलंबून रहावें लागणार आहे.

### उसाच्या चिपाडांचा नवा फायदेशीर उपयोग

ऊस चरकांतून पिळून काढला असतां चिपाडें मागें रहातात. त्यांच्यापासून विस्तवापासून सुरक्षित व बळकट असे पोलादाच्या किंवा लाकडाच्या फळ्यांसारखे उपयुक्त जिन्नस तयार करण्याची युक्ती शास्त्रीय प्रयोगांअंतीं शोधून काढण्यांत आली आहे. ह्या पदार्थास " केनेक्स " असें नांव देण्यांत आलें असून त्यावरून उसापासून झालेला जिन्नस अशी त्याची ओळख पटावी हा हेतु आहे. उसाच्या चिपाडांचें दर एकरीं वीस-पंचवीस टन वजन भरतें आणि त्यांचा मुख्यत्वें करून जाळण्याकडे उपयोग केला जातो. त्यांतलें पुष्कळ चिपाड वाया जातें असें अनुभवास आल्यावरून अमेरिकेंत लुइझिएनामध्यें त्याचें " केनेक्स ", त्यावर रासायनिक क्रिया करून, बनवण्यांत येऊं लागलें आहे. हा पदार्थ मोठ्या दाबाखालीं तयार होतो आणि त्याचा रंग काळ्या रबरासारखा दिसतो आणि तो चौकटीमध्यें घालून त्याच्या निरनिराळ्या आकारांच्या फळ्या बनवतात. मोटारींच्या बॉडीज, विमानांचे पंख, छपरावर घालण्यासाठीं कौलें, रेडिओच्या पेट्या, बंदुकांचे दस्ते, पेले-बशा, बटनें इत्यादि अनेक जिन्नस त्यापासून तयार करतां येतात.

## गेल्या वर्षांतील पीकपाणी

### मुंबई प्रांतांतील लागवडीखालील जमीन

पावसाळ्यास अनुकूल प्रारंभ झाल्यामुळें एकूण लागवड गेल्या दहा वर्षांतील कोणत्याहि वर्षापेक्षां गेल्या सालीं अधिक झाली व शेतीचें उत्पादनहि अधिक झालें. गेल्या ५० वर्षांत झाला नाहीं एवढा मोठा झंजावात ऑक्टोबर १९४१ मध्यें उत्तर कोकणांत व सुरत जिल्ह्याच्या दक्षिण भागांत झाला. मोठ्या पर्जन्ययुक्त वादळामुळें पश्चिम खानदेश जिल्ह्यांतील कपाशीचें व रब्बीच्या पिकांचें थोडें नुकसान झालें व बेळगांव जिल्ह्यांतील उसावरहि त्याचा प्रतिकूल परिणाम झाला. खाद्य पिकाखालील क्षेत्रांत १९३९–४० चे मानानें गेल्या वर्षीं १·४% वाढ झाली. तुरीची लागवड १३·२% व उसाची लागवड १७%नें वाढली. इतर पिकांची लागवड १·१% नें वाढली, परंतु तंबाखूखालील क्षेत्र ४·९% कमी झालें. फळें व भाजीपाला ह्यांचे क्षेत्रांत ५०० एकरांची घट झाली. पाटाच्या पाण्याखालील क्षेत्र ७७ हजार एकरांनीं कमी झालें. लागवडीखालील एकूण जमिनीशी पाटाच्या पाण्यानें भिजणाऱ्या जमिनीचें प्रमाण ३·९% होतें, त्यांपैकीं ०·८% जमिनीस सरकारी कालव्यांनीं पाणी दिलें. शेतीच्या पिकांच्या किंमतीमधील चढउतार हें गेल्या वर्षीचें वैशिष्ट्य म्हणतां येईल. ज्वारी व बाजरी स्वस्त होती, परंतु तांदुळाची किंमत भरमसाट वाढली. गहूं व कपास ह्यांचे बाजारभावहि चढीच्या मार्गांत होते परंतु शेंगदाण्याची वाढती लागवड व त्याची आखडती निर्गत ह्यांमुळें त्याची किंमत खालीं गेली.

### जादा नफ्यावरील कर हा उत्पन्नावरील कर आहे काय ?

जेम्स फिनले अँन्ड कं. लि. ही कंपनी फिनले मिल्स लि. ची मॅनेजिंग एजंट आहे. रिझर्व्ह, घसारा, प्राप्तीवरील कर, सुपर टॅक्स " अथवा उत्पन्नावरील इतर कोणताही कर " ह्यांची तरतूद करण्यापूर्वीच फिनले मिल्सच्या निवळ नफ्याचा १०% हिस्सा मॅनेजिंग एजंटास मिळावा, असा त्यांचा करार आहे. " उत्पन्नावरील इतर कोणताहि कर " ह्या सदरांत एक्सेस् प्रॉफिट टॅक्स ( जादा नफ्यावरील कर ) पडतो किंवा नाहीं, हा वादाचा मुद्दा उपस्थित झाला, त्याचा निवाडा मुंबई हायकोर्टानें नुकताच केला. एक्सेस प्रॉफिट टॅक्स हा " उत्पन्नावरील इतर कोणताहि कर " ह्या व्याख्येंत आला, तर त्याची तरतूद करण्यापूर्वी मॅनेजिंग एजंटाचा निवळ नफ्याचा १०% हिस्सा बाजूस काढण्यांत येईल, असें उभयपक्षीं ठरलें. युद्धजन्य नफ्यावर कर बसविण्याकरितां इंग्लंडमध्यें गेल्या महायुद्धाचे वेळीं ह्या कराची योजना केली गेली. युद्धास प्रारंभ होण्यापूर्वीच्या नफ्याचे प्रमाणापेक्षा अधिक होणाऱ्या नफ्याचे रकमेवर हा कर बसविला जातो. " हा कर प्राप्तीवरील करच आहे; तो भांडवलावर बसत नाहीं व त्याचा धंद्यांत गुंतलेल्या भांडवलाशी संबंधहि नाहीं. " असें हायकोर्टाचें मत पडलें.

### मुंबई प्रांतांतील युरोपियन व अँग्लो-इंडियन

मुंबई प्रांतांतील युरोपियनांची संख्या १८,०२८ आहे. १९४० सालीं २८९ युरोपियन मुंबई प्रांतांत जन्मले. मुंबई प्रांतांत १४,१७६ अँग्लो-इंडियन आहेत. त्यांच्या संख्येंत जननानें १५५ ची भर पडली.

मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं
असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् को-ऑपरेटिव् बँक, लिमिटेड.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी-सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंग
९, बेक हाउस लेन, कोट मुंबई.

शाखा

| | |
|---|---|
| १ बारामती ( जि. पुणें ) | १८ अकलूज ( जि. सोलापूर ) |
| २ सातारा ( „ सातारा ) | १९ विरमगांव ( „ अहमदाबाद ) |
| ३ इस्लामपूर ( „ „ ) | २० धुळें ( „ प. खानदेश ) |
| ४ कऱ्हाड ( „ „ ) | २१ दोंडाईचें ( „ „ ) |
| ५ तासगांव ( „ „ ) | २२ शिरपूर ( „ „ ) |
| ६ किर्लोस्करवाडी ( „ „ ) | २३ शहादें ( „ „ ) |
| ७ शिराळें ( „ „ ) | २४ नंदुरबार ( „ „ ) |
| ८ कोरेगांव ( „ „ ) | २५ साक्री ( „ „ ) |
| ९ वांई ( „ „ ) | २६ शिंदखेडें ( „ „ ) |
| १० अहमदनगर ( „ अहमदनगर ) | २७ तळोदें ( „ „ ) |
| ११ शेवगांव ( „ „ ) | २८ मालेगांव ( „ नाशिक ) |
| १२ कोपरगांव ( „ „ ) | २९ सटाणा ( „ „ ) |
| १३ बेलापूर ( „ „ ) | ३० कळवण ( „ „ ) |
| १४ राहुरी ( „ „ ) | ३१ लासलगांव ( „ „ ) |
| १५ भिवंडी ( „ ठाणें ) | ३२ नांदगांव ( „ „ ) |
| १६ पालघर ( „ „ ) | ३३ दोहद ( „ पंचमहाल ) |
| १७ कल्याण ( „ „ ) | ३४ कालोल ( „ „ ) |

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात
आणि
इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.



'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार



## DECCAN BOOK STALL

**Booksellers, Publishers & Subscription Agents**

**Fergusson College Road, Poona No. 4**

(1) We stock and supply Educational books, General books & Library books.

(2) We supply Government of Bombay and Government of India publications.

(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.

(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.



## महायुद्धामुळें आलें परदेशी औषधें दुर्मिळ व महाग झालीं

पण

भिण्याचें कारण नाहीं !!!

— कारण —

## आयुर्वेद रसशाळा पुणें लि०

या देशी औषधाच्या प्रसिद्ध कारखान्यानें तयार केलेलीं

● रक्तवर्धक, ● उपनाह,
● बालजीवन, ● कॅल्सीप्राल

इत्यादि पेटंट, स्टँडर्ड व लोकप्रिय औषधें खात्री पटल्यामुळें

★ डॉक्टर्सहि वापरूं लागले आहेत. ★

दरसाल बिनचूक नफा वाटणाऱ्या ह्या कंपनीचे शेअर्स व औषधें मागवा.

## आयुर्वेद रसशाळा पुणें लि०

मुख्य दुकान गणपति चौक, लक्ष्मीरोड, पुणें २.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनी छापलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. ९२४।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ८ पुणें, बुधवार, तारीख २४ जून १९४२ अंक २५

## दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... ... ... रु. | २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | ... ... ... रु. | १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड | ... ... ... रु. | १,१८,००,००० |

मुख्य कचेरी: ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

मुंबईमधील शाखा : बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

इतर शाखा : अहमदाबाद ( भद्र, मुख्य ऑफिस ), अहमदाबाद ( एलिस ब्रिज शाखा ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अंधेरी ( मुंबई शेजारीं ), बांद्रे ( मुंबई शेजारीं ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस ), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर, कराची, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत.

लंडन एजन्ट्स : वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

डायरेक्टर्स : सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय.(अध्यक्ष); श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाइट; मि. ए. गेडिस; सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई.; मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण.

करंट डिपॉझिट अकाउंट्स :

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षा कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमीचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

एजंट—टी. आर. लालवाणी.

## दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

हेड ऑफिस : पुणें शहर.

स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.

मुंबअी शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबअी.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | : रु. १०,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | : रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | : रु. ४,३५,०५० |
| वसूल झालेलें भांडवल | : रु. २,१७,५२५ |
| एकूण खेळतें भांडवल | : रु. ३५,००,००० |

डायरेक्टर्स

प्रो. वा. गो. काळे, अध्यक्ष

| | |
|---|---|
| श्री. धों. कृ. साठे | श्री. मा. रा. जोशी |
| श्री. न. ग. पवार | श्री. श्री. गो. मराठे |
| श्री. त्र्यं. वि. रानडे | श्री. र. चिं. सोहोनी |
| श्री. वा. पुं. वर्दे | मि. फ. दो. पदमजी |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदीविक्री कसोशीनें करून दिली जाते.

बँकेच्या शेअरवर १९४१ अखेर पुऱ्या होणाऱ्या वर्षी द. सा. द. शेंकडा ४ टक्के करमाफ डिव्हिडंड दिलें गेलें. बँकेची शेअरविक्री चालू आहे.

म. वि. गोखले
मॅनेजर.

महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर

## महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

# विविध माहिती

### सातारा नामदेव को. बँक

सातारा नामदेव को. बँकेच्या ठेवीदारांना, त्यांच्या ठेवीच्या तिसऱ्या हप्त्याची रुपयास दोन आणेप्रमाणें वाटणी ता. १-७-४२ पासून करण्यांत येणार आहे, असें बँकेचे लिक्विडेटर श्री. के. बा. गजेंद्रगडकर वकील हे कळवितात.

### पुणें-भोर मोटार युनियन, लि.

वरील नांवाची खाजगी कंपनी श्री. एम्. एन्. नाईक ह्यांनीं नोंदली आहे, तिचें भांडवल एक लक्ष रुपयांचें आहे.

### विदेशी बँकेचा हिंदी नोकरवर्ग

"ज्या देशांत बँकेचें काम चालतें तेथील तद्देशीय नोकर लोकांवर अधिकाधिक जबाबदारी टाकण्याचें बँकेचें धोरण आहे. युरोपियन नोकरांचें प्रमाण कमी होत चालल्यानें, तद्देशीय नोकरांवरील, विशेषतः हिंदुस्थानांतील नोकरांवरील, जबाबदारी वाढत आहे. ह्या परीक्षेस हिंदी नोकर उत्कृष्ट रीतीनें उतरत आहेत" चार्टर्ड बँक ऑफ इंडिया, ऑस्ट्रेलिया अँड चायनाचे अध्यक्ष, मि. ग्रॅन्थम ह्यांनीं बँकेच्या वार्षिक सभेचे प्रसंगीं वरील उद्‌गार काढले.

### साखरेची आयात व निर्गत

गेल्या दोन वर्षांत हिंदुस्थानांत साखर किती आली व हिंदुस्थानांतून किती बाहेर गेली ह्याविषयीं आकडे खालीं दिले आहेत:-

१ एप्रिल ते ३१ मार्च (आकडे रुपयांचे आहेत)

| वर्ष | निर्गत | आयात | आयातीपैकी निर्गत |
|---|---|---|---|
| १९४०-४१ | २७,१९,९६४ | ३६,१०,०८९ | १६,१९,५२० |
| १९४१-४२ | ३१,७८,४४८ | १०७,५४,४९८ | ७०,९३,६२९ |

### ताशी वेग ६० मैल

अमेरिकेंत व कॅनडांत १९४१ सालीं दररोज सरासरीनें १,४६२ उतारूंच्या आगगाड्या चालू होत्या व त्यांच्या दर ताशी वेगाची सरासरी ६० मैल होती.

### आफ्रिकेंतील नवे रस्ते

भूमध्य समुद्र व सुएझचा कालवा ह्यांतून माल-वहातूक होणें कठीण झाल्यामुळें मध्य आफ्रिकेंत वहातुकीसाठी रस्ते तयार करणें आवश्यक झालें. मध्य आफ्रिकेंत असे १५ हजार मैल लांबीचे रस्ते तयार करण्यांत आले आहेत व त्यांपैकीं दोन लांब रस्ते पूर्व-पश्चिम जाणारे आहेत. ह्या रस्त्यांमुळें लष्करी वहातुकीची सोय झाली आहे.

### मोटारींच्या वेगावर नियंत्रण

"आज अमेरिकेंत एकूण तीन कोटि मोटार गाड्या चालू आहेत. त्यांचे चाकांवरील रबरी धावा जास्त टिकविण्याचा मोटार मालकांनीं प्रयत्न केला पाहिजे. जलद गतीमुळें टायर्स झिजतात, असें तज्ज्ञ सांगतात तेव्हां माफक वेगानें मोटारी हाकल्यास टायर्स जास्त टिकतील. मोटार वाहनांचा कमाल वेग ४० मैल निश्चित केल्यास सर्व मोटारवाल्यांची सोय होणार आहे. असें नियमन करणारा कायदा जारी केला पाहिजे." प्रेसिडेंट रुझवेल्ट ह्यांनीं वरीलप्रमाणें एक पत्र अमेरिकेंतील स्टेट गव्हर्नरांना पाठविलें आहे.

### अमेरिकेच्या इतिहासाच्या शिक्षणाचें महत्त्व

ब्रिटिश बोर्ड ऑफ एज्युकेशननें एक पत्रक प्रसिद्ध केलें आहे, त्यांत त्यानें म्हटलें आहे कीं, अमेरिकेचें जगांतील राष्ट्रांमधील प्रमुख स्थान व अमेरिका आणि ग्रेट ब्रिटन ह्यांचा निकट संबंध हीं लक्षांत घेतां ब्रिटिश मुलांस अमेरिकन इतिहास व अमेरिकन रहाणी ह्यांची माहिती असणें आवश्यक आहे. प्राचीन इतिहास कमी करून त्याची जागा अमेरिकन इतिहासानें घ्यावी, अशी त्याची सूचना आहे.

### अमेरिका-क्युबा करार

अमेरिका आणि क्युबा ह्यांचेमध्यें करार झाला आहे, त्या अन्वयें क्युबाला जर्मन पाणबुड्यांस तोंड देण्यास समर्थ करण्याचें अमेरिकेनें कबूल केलें आहे.

### महागाई भत्ता

मुंबई शहरांतील गिरणी कामगारांस रहाणीच्या खर्चाच्या वाढत्या मानाचे प्रमाणांत महागाई भत्ता मिळत आहे. रहाणीच्या खर्चाचें मान आणखी वाढत जाणार असल्याचीं चिन्हें दिसत असल्यानें, ह्या वाढत्या मानास अनुसरून भत्ता देण्याचें गिरणी-मालकांनीं ठरविलें आहे.

### हिंदुस्थान सरकारचा उत्पन्न-खर्च

एप्रिल, १९४२ मध्यें हिंदुस्थान सरकारनें आपल्या उत्पन्नापेक्षा ८½ कोटि रुपये अधिक खर्च केला. उत्पन्नांत एप्रिल १९४१ चे मानानें १½ कोटींची भर पडली, परंतु लष्करी खर्चांत ३ कोटींची वाढ झाली. सरकारचें कायम कर्ज ७५ लाखांनीं कमी झालें.

### हिंदी कापडाची निर्गत

हिंदुस्थानानें १९४१-४२ मध्यें ३८½ कोटि रुपयांचें सर्व तऱ्हेचें मिळून कापड निर्गत केलें. १९४०-४१ मधील निर्गतीची किंमत १८ कोटि रुपये भरली होती. १९३८-३९ मधील कापडाची निर्गत ८½ कोटि रुपयांचीसुद्धा नव्हती.

### रहाणीचा वाढता खर्च

मुंबई शहरांतील कामगारांच्या रहाणीच्या खर्चाचें मान जून १९३४ अखेरच्या वर्षीं १०० होतें असें मानल्यास, १५ मे, १९४२ अखेरच्या महिन्यांत तें १४२ झालें. केवळ खाद्य पदार्थांची महागाई १०० ची १६४ झाली.

### रात्रपाळी

मार्च, १९४२ अखेर मुंबई शहरांतील ६१ गिरण्यांत व अहमदाबादमधील ५७ गिरण्यांत रात्रपाळी चालू होती व त्या पाळींत अनुक्रमें ७१,७९२ व ३९,१९६ कामगार काम करीत होते.

### १० अब्ज रुपयांचा पंचवार्षिक कार्यक्रम

चालू युद्ध संपल्यानंतर, हिंदुस्थानास पंचवार्षिक औद्योगिक योजना हातीं घ्यावी लागेल व तिचेवर सुमारें १० अब्ज रुपये खर्चावे लागतील, असें सर एम. विश्वेश्वर अय्या हे आपल्या एका भाषणांत नुकतेच म्हणाले.

### हिंदी चलनी नोटांत वाढ

२५ ऑगस्ट, १९३९ ते ५ जून, १९४२ ह्या मुदतींत चलनाचा विस्तार सुमारें २ अब्ज, ६६ कोटि रुपयांनीं झाला आहे, असें रिझर्व्ह बँकेनें प्रसिद्ध केलेल्या आंकड्यांवरून दिसून येतें.

### ट्रॅम व बसच्या दरांत वाढ

मद्रासमधील बस व ट्रॅम ह्यांच्या दरांत १ जुलैपासून वाढ करण्यांत येणार आहे.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | १९६ | व महाराष्ट्रांतील कारखाने—गेल्या आठवड्यांतील भाव—बाजार—रेल्वेचे कॉंक्रीटचे स्लीपर्स | |
| २ चर्चिल-रूझव्हेल्ट चर्चा | १९७ | ७ कचरा पेटींतील संपत्ति | २०० |
| ३ देशी कपाशीचा उठाव | १९८ | ८ इन्कमटॅक्स अधिकाऱ्याकडे अर्ज ... | २०१ |
| ४ सरकारी रेल्वेजचा हिशेब | १९८ | ९ मुंबई प्रांतांतील जन्म-मृत्यु ... | २०१ |
| ५ रेल्वेजमधील भांडवलावरील व्याज ... | १९८ | | |
| ६ स्फुट विचार ... | १९९ | | |
| हिंदुस्थानांत चहाचा तुटवडा नाहीं—महादेशी चलनी नोटा—सासरेचा पुरवठा | | | |


# अर्थ

बुधवार, ता. २४ जून, १९४२

## चर्चिल—रूझव्हेल्ट चर्चा

ब्रिटिश मुख्य प्रधान, मि. चर्चिल, प्रेसिडेंट रुझव्हेल्ट ह्यांच्याशीं युद्धविषयक चर्चा करण्यासाठी गेल्या आठवड्यांत अनपेक्षित रीतीनें अमेरिकेस गेले. गेल्या दहा महिन्यांतली त्यांची अमेरिकेस ही तिसरी भेट होय. मागच्या ऑगस्टमधील त्यांच्या प्रेसिडेंट रुझव्हेल्ट ह्यांच्याशीं झालेल्या वाटाघाटींतून "अटलांटिक सनद" बाहेर पडली. नंतर डिसेंबरांत जी त्यांची चर्चा झाली तिचा परिणाम मित्रराष्ट्रांचें सहकार्य दृढ करण्यांत झाला. आतां ह्या तिसऱ्या प्रसंगीं युद्धपरिस्थितीचा विचार होऊन तात्काळ अंगिकारण्यांत यावयाच्या धोरणाची योजना निश्चित केली जाईल असें अनुमान काढण्यास हरकत नाहीं. सध्या युद्धास आणीबाणीचें स्वरूप प्राप्त झालें असून निरनिराळ्या रणक्षेत्रांत चालवावयाच्या मोहिमांच्या दिशा ठरवून त्याप्रमाणें कृति घडवून आणणें अगत्याचें झालें आहे. इंग्लंड व रशिया ह्यांच्यामध्यें नुकताच तह झाला आहे आणि रशिया व अमेरिका ह्यांचाहि करार झाला आहे. ह्या घडामोडींचे धागेदोरे नीट एकत्रित करून मित्र-राष्ट्रांचे प्रयत्नांत एकसूत्रीपणा निर्माण करणें अत्यंत आवश्यक आहे. युरोपांत जर्मनीविरुद्ध दुसरी आघाडी निर्माण करण्यासंबंधांत मि. चर्चिल व प्रेसिडेंट रुझव्हेल्ट ह्यांचें बोलणें होऊन त्यांतून निश्चित धोरण बाहेर येईल असा तर्क आहे. कांहीं झालें तरी चीन व रशिया ह्यांस सहाय देणें, लिबियामध्यें चाललेल्या लढायांचे संबंधांत पुढची दिशा ठरवणें आणि समुद्रवहातुकीच्या प्रश्नाचा समाधानकारक निकाल लावणें ह्या गोष्टींचा खल त्या चर्चेत होईल ह्यांत शंका नाहीं. मि. चर्चिल मुद्दाम अमेरिकन प्रेसिडेंटांचे भेटीस गेले ह्यावरून सध्याच्या युद्ध-परिस्थितीस किती महत्त्व देण्यांत येत आहे, ह्याची कल्पना येते. दुरून किंवा सल्लागारांच्या व प्रतिनिधींच्या मार्फत केलेल्या वाटाघाटींमध्यें कालक्षेप होऊन तपशीलवार निर्णय करणें कठीण असतें. ही गोष्ट लक्षांत घेऊन ब्रिटिश व अमेरिकन राष्ट्रांच्या मुख्यांनीं स्वतःच प्रत्यक्ष विचारविनिमय केला आहे ह्यावरून परिणामकारक योजना निश्चित होऊन युद्धास निरनिराळ्यां क्षेत्रांत मित्र-राष्ट्रांकडून तात्काळ नवीन वळण लावण्यांत येईल असें अनुमान काढण्यास हरकत नाहीं. रूझव्हेल्ट—चर्चिल चर्चेचें चोहोंकडे स्वागत करण्यांत आलें आहे हें ह्या अपेक्षेमुळेंच होय.

गेल्या आठवड्यांत लिबियामध्यें विलक्षण झपाट्यानें युद्धाच्या घडामोडी झाल्या आहेत. टोब्रुकच्या पश्चिमेस व दक्षिणेस असलेलीं मजबूत ठाणीं जनरल रिची ह्यांस शत्रूच्या चिलखती व सशस्त्र गाड्यांनीं पुढें धडका मारल्यामुळें सोडून द्यावीं लागलीं. समुद्रकिनाऱ्यानें जाणारा टोब्रुकच्या पूर्वेचा रस्ताहि शत्रूनें अडवून टाकला. लिबियांतल्या लढाया वस्तुतः इजिप्तच्या सरहद्दीच्या रक्षणासाठी ब्रिटिश फौजा लढत आल्या आहेत. मागें टोब्रुकला शत्रूनें कित्येक महिने वेढा दिला असतांहि तें ठाणें त्यास घेतां आलें नाहीं तथापि ह्या खेपेस तें एक दिवसांतच खाली करावें लागलें आहे. जनरल रिची ह्यांस आपलें सैन्य मागें आणावें लागलें तरी त्यांचें मुख्य काम इजिप्तचें संरक्षण हें आहे आणि ती कामगिरी बजावण्याचें सामर्थ्य त्यास आहे. ह्यामुळें जनरल रॉमेलनें मारलेली मुसंडी शत्रूस अंतिम उद्दिष्टाचे दृष्टीनें विशेष सहायकारक होण्यासारखी नाहीं. जनरल रॉमेलची लिबियांतली मोहीम आणि जर्मनांचा सेबॅस्टापोलवरील हल्ला ह्यांचें ध्येय एकच असल्यानें त्यांचा एकत्र विचार केला पाहिजे. भूमध्य समुद्राच्या पूर्व भागांत आणि कॉकेशसच्या पूर्व रशियन प्रदेशांत हिटलरला आपलें वर्चस्व स्थापावयाचें आहे. सेबॅस्टापोल हें मान्याचें ठाणें जोपर्यंत सर झालें नाहीं तोंपावेतों हा हेतु सफल होऊं शकत नाहीं ह्या जाणीवेनें जर्मन फौजा त्या बंदिस्त ठिकाणावर जोराच्या व निकराच्या धडक्या देत आहेत. रशियन लढवय्ये शत्रूच्या ह्या हल्ल्यांस मोठ्या चिकाटीनें व शौर्यानें तोंड देत आहेत. खारकॉव्ह आघाडीवर त्यांनीं जर्मनांचा प्रतिकार यशस्वी रीतीनें करून त्याची प्रगति कुंठित करून टाकली आहे. एशियामध्यें जपान सध्यां आपलें शक्तिसर्वस्व चीनच्या किनाऱ्यालगतच्या प्रांतांत एकवटून त्या देशाचा कोंडमारा करूं पहात आहे. ब्रह्मदेशांतून चीनमध्यें जाणारा रस्ता आतां निरुपयोगी झाल्यानें चिनी सैन्यास लढाऊ सामुग्रीचा पुरवठा होणें कठिण होऊन बसलें आहे. चीनचा काटा एकदा काढून टाकला म्हणजे दुसऱ्या युद्धक्षेत्रांत हालचाली करणें सोयीचें होईल ह्या कल्पनेनें जपाननें आपलें पॅसिफिक महासागरांतलें धोरण आखलें आहे. चीनमध्यें परिस्थिति कठिण झाली असली तरी तेथील लोक निकरानें लढत आहेत आणि जपानचा अखेर पराभव होईपर्यंत झगडण्याचा त्यांचा निश्चय कायम आहे. चीनला सर्व प्रकारांनीं सहाय देण्याची जबाबदारी अमेरिकेनें आपल्या शिरावर घेतली असून पॅसिफिक महासागरांतील युद्धाचें नेतृत्व सर्वस्वी त्या राष्ट्राकडे आलेलें आहे. निरनिराळ्या रणक्षेत्रांतील परिस्थितीचें वर सिंहावलोकन केलें आहे त्यावरून प्रेसिडेंट रुझव्हेल्ट आणि मि. चर्चिल ह्यांच्यामधील चर्चेत कोणते प्रश्न प्रामुख्यानें पुढें आले असतील ह्याची कल्पना करतां येण्यासारखी आहे आणि त्यांच्या वाटाघाटींत सर्वत्र अपूर्व महत्व देण्यांत येत आहे ह्याचें रहस्यहि समजण्यासारखें आहे. रशिया व चीन ह्या देशांस युद्धसामुग्रीचा पुरवठा वहातुकीच्या अडचणींस तोंड देऊन करण्याची व्यवस्था, हिंदुस्थानांत लढाऊ सामानाच्या उत्पादनाची कार्यक्षम संघ-

टना आणि युरोपमध्यें जर्मनीस पायबंद बसावा म्हणून पश्चिमेकडे दुसरी आघाडी चालू करण्याची आवश्यकता ह्या बाबी अत्यंत जिव्हाळ्याच्या म्हणून मि. चर्चिल व प्रेसिडेंट रुझव्हेल्ट ह्यांनीं चर्चिल्या असल्या पाहिजेत, ह्या कित्येक चाणाक्ष लोकांनीं काढलेल्या अनुमानास पुष्कळ जागा आहे ह्यांत शंका नाहीं.

मि. चर्चिल अमेरिकेस जावयास निघाले तेव्हां लिबियांतली परिस्थिति म्हणण्यासारखी प्रतिकूल नव्हती आणि जर्मन फौजांस तेथें आडवून धरतां येईल असें वाटत होतें. पण उत्तर आफ्रिकेंतली परिस्थिति एकाएकी बदलली आणि टोब्रुक मार्गें लढत ठेवणें जनरल रिची ह्यांस श्रेयस्कर वाटलें नाहीं आणि आपली सर्व लढाऊ शक्ति इजिप्तच्या सरहद्दीवर एकवटणें त्यांस योग्य दिसल्यानें आपल्या फौजेची पुनर्घटना त्यांनीं त्या दिशेनें केली आहे. युद्धांतल्या डावपेचांचा निर्णय एखाद-दुसऱ्या आघाडीकडे पाहून करावयाचा नसतो. सबंध युद्धधोरणाच्या दृष्टीनें सैन्यांच्या हालचाली सत्ताधिकाऱ्यांस कराव्या लागतात ही गोष्ट लिबियांतील तात्पुरत्या प्रतिकूल परिस्थितीचा विचार करतांना ध्यानांत ठेवणें आवश्यक आहे. चर्चिल–रुझव्हेल्ट चर्चेमध्यें लिबिया व सबॅस्टापोल ह्यांस अत्यंत महत्त्वाचें स्थान दिलें जाईल हें सांगावयास नको.

## हिंदुस्थानांतील गिरण्यांत देशी कपाशीच्या उठावांत वाढ

हिंदी कपास कापडाच्या गिरण्यांचें कापडाचें उत्पादन वाढत आहे व त्यामुळें त्यांचेमधील कपाशीचा उठावहि अधिक होत आहे. १ सप्टेंबर ते २८ फेब्रुवारी ह्या १९४१–४२ च्या सहामाहींत हिंदुस्थानांतील गिरण्यांत देशी कपाशीच्या २०½ लक्ष गाठींचा उठाव झाला. १९४०–४१ च्या व १९३९–४० च्या तत्सम मुदतींतील उठावाचे आकडे अनुक्रमें १७¾ लक्ष गाठी व १५½ लक्ष गाठी असे आहेत. म्हणजे, वाढीचें प्रमाण अनुक्रमें १५·८% व ३३⅓% असें पडलें. बंगालखेरीज बाकी सर्व ठिकाणीं कपाशीचा उठाव अधिक झाला. खालील तक्त्यांत ह्या संबंधींचे तुलनात्मक आकडे दिले आहेत:—

( ४०० पौंड कपाशीची गाठ )

| प्रांत व संस्थानें | १९४१–४२ | १९४०–४१ | १९३९–४० |
|---|---|---|---|
| मुंबई प्रांत | ९,१४,२२१ | ७,५२,२७३ | ६,२२,६३५ |
| मद्रास | २,९०,८६७ | २,६४,३८८ | २,३९,११४ |
| संयुक्तप्रांत | २,१९,१११ | १,९०,६११ | १,७१,६९४ |
| मध्यप्रांत-वऱ्हाड | ९४,१५२ | ७८,१९७ | ८०,५९० |
| बंगाल | ६३,३८९ | ६६,५२४ | ४८,१४८ |
| पंजाब व दिल्ली | ९१,४७५ | ८५,१११ | ७२,९५५ |
| इतर ब्रिटिश हिंदुस्थान | २४,९१५ | २४,१९८ | २३,५९१ |
| हैद्राबाद | ४२,२५२ | ३५,१७१ | ३४,६३२ |
| म्हैसूर | ३६,२७७ | ३५,१२४ | ३३,०१५ |
| बडोदें | ४५,८५२ | ४४,५३५ | ३८,१५९ |
| ग्वालेर | ५०,००१ | ४६,९४४ | ४२,७३९ |
| इंदूर | ८५,६१६ | ७१,४६३ | ५९,६६१ |
| इतर ब्रि. संस्थानें | ९४,३७१ | ७२,२८९ | ७१,५९४ |

मुंबई प्रांतांतील देशी कपाशीच्या उठावांत पुष्कळच वाढ झालेली दिसून येते. बंगालमधील उठाव घटलेला आढळतो. मार्च, १९४२ मध्यें कामगार शहरें सोडून गेल्यामुळें सर्वच प्रांतांत कपास कमी खपली.

## हिंदी सरकारी रेल्वेजचा हिशेब

हिंदी रेल्वेजच्या १९४१–४२ च्या अहवालांतील खालील माहिती उद्बोधक वाटेल:—

| | |
|---|---|
| एकूण ठोक उत्पन्न | १२७ कोटि रुपये |
| गेल्या वर्षीपेक्षा वाढ | १३·५% |
| व्यवस्थेचा खर्च | ७३ कोटि रुपये |
| निव्वळ उत्पन्न | ५४¾ कोटि रुपये |
| व्याज दिलें | २८½ कोटि रुपये |
| वाढावा | २६¼ कोटि रुपये |
| उतारूंच्या वहातुकीचें उत्पन्न | ३५½ कोटि रुपये |
| माल वहातुकीचें उत्पन्न | ८४¼ कोटि रुपये |
| सैनिकांच्या खास गाड्या सोडल्या ( पहिले नऊ महिने ) | २,००० |
| रेल्वेंत गुंतलेलें भांडवल | ७५८ कोटि रुपये |
| रेल्वे रस्त्यांची लांबी | ३३,२८९ मैल |
| उतारूंची संख्या | ५७½ कोटि |

एका उतारूनें एक मैलाचा प्रवास केला कीं रेल्वेला ३·२९ पै मिळतात व एक टन मालाची एक मैल वहातुक केली कीं रेल्वेस ६·१९ पै चें उत्पन्न होतें, असा हिशेब आहे. प्रत्येक उतारूनें सरासरीनें ३४½ मैल प्रवास केला व प्रत्येक टन माल सरासरीनें २७३ मैल वहाण्यांत आला.

## रेल्वेजमधील भांडवलावर किती व्याज सुटलें ?

हिंदी सरकारी रेल्वेजच्या हिशेबाची व मध्यवर्ती सरकारच्या इतर हिशेबांची १९२४–२५ मध्यें फारकत करण्यांत आली, तेव्हांपासून आतांपर्यंत रेल्वेजमध्यें गुंतलेल्या भांडवलावर किती व्याज सुटलें, ह्याचे आंकडे खाली दिले आहेत:—

| वर्ष | | व्याज (%) |
|---|---|---|
| १९२४–२५ | | ५·८ |
| १९२५–२६ | | ५·२ |
| १९२६–२७ | | ४·९ |
| १९२७–२८ | | ५·३ |
| १९२८–२९ | | ५·० |
| १९२९–३० | | ४·५ |
| १९३०–३१ | | ३·५ |
| १९३१–३२ | | ३·० |
| १९३२–३३ | | २·९ |
| १९३३–३४ | | ३·१ |
| १९३४–३५ | | ३·४ |
| १९३५–३६ | | ३·५ |
| १९३६–३७ | | ४·१ |
| १९३७–३८ | | ४·२ |
| १९३८–३९ | | ४·१ |
| १९३९–४० | | ४·४ |
| १९४०–४१ | | ६·२ |
| १९४१–४२ | ( दुरुस्त अंदाज ) | ७·२ |
| १९४२–४३ | ( अंदाज ) | ७·२ |

१९२४–२५ पासून आतांपर्यंत हिंदी रेल्वेजनीं ९३½ कोटि रुपये निवळ नफा मिळविला व १०१½ कोटि रुपये मध्यवर्ती सरकारास दिले. रेल्वे रिझर्व्ह फंडांत ७ कोटि रुपये आहेत. घसारा फंडांतून काढून घेतलेल्या रकमेपैकी अद्याप १५½ कोटि रुपयांची परतफेड व्हावयाची आहे.

## स्फुट विचार

### हिंदुस्थानांत चहाचा तुटवडा नाहीं

मध्यंतरीं रॉयटरच्या मार्फत अशी बातमी प्रसिद्ध झाली होती कीं अमेरिका, इंग्लंड व दक्षिण आफ्रिका ह्यांच्या सरकारांनीं जगांतील चहाचा सबंद पुरवठा खरेदी करून आपणांमध्यें स्वतः-च्या लोकांच्या गरजेप्रमाणें वांटून घेण्याचें ठरवलें आहे. विशिष्ट युद्धपरिस्थितीमुळें उद्भवणाऱ्या या अडचणींस चहासारख्या सामान्य जरूरीच्या जिनसाचा पुरवठा निश्चित होईल अशी व्यवस्था वरील राष्ट्रांच्या सरकारांनीं करण्याची योजना हातीं घेतलीं असल्यास त्यांत आश्चर्य नाहीं. पण ह्याचा अर्थ असा होऊं शकत नाहीं कीं चहा मोठ्या प्रमाणावर पिकवणाऱ्या देशांतील लोकांच्या मागणी-कडे दुर्लक्ष करून त्यांतला सर्वच्या सर्व पुरवठा अमेरिका, इंग्लंड व दक्षिण आफ्रिका ह्यांनीं उचलावा. हिंदुस्थान, सिलोन व चीन हे देश चहाच्या उत्पादनाचे बाबतींत प्रमुख आहेत आणि ह्या देशांत मिळणाऱ्या एकूण चहापैकीं अगदीं थोडा भाग हिंदी जनतेस मामुली परिस्थितींत लागतो व बाकीचा परदेशांत निर्गत केला जातो. ह्या कारणानें चहाचा तुटवडा हिंदुस्थानांत भासण्याचें वास्तविक कारण नाहीं. परंतु वर निर्दिष्ट केलेली बातमी प्रसिद्ध झाल्यामुळें गैरसमजास जागा उत्पन्न झाली आणि त्याचा परिणाम सट्टेबाजीनें चहाच्या किंमतीवर चढण्यांत झाला असें निदर्शनास आल्यावरून हिंदुस्थान सरकारानें आतां असें जाहीर केलें आहे कीं, अमेरिका व इंग्लंड ह्यांनीं चहाची खरेदी ह्या देशांत मोठ्या प्रमाणावर केली तरी हिंदी जनतेस लागणारा चहा राखून ठेवण्याची योग्य तजवीज करण्यांत येईल. पुढें चहाचा तुटवडा पडेल ह्या समजुतीनें व्यापाऱ्यांनीं त्याची खरेदी एव्हांपासून करण्याचें प्रयोजन नाहीं अशी सूचना सर-कारनें केली आहे. तिच्याकडे जनतेचें लक्ष वेधलें जाणें अगत्याचें आहे. पुढील तुटवड्याच्या समजुतीनें आज आगाऊ चहाची खरेदी होणें म्हणजे कृत्रिम रीतीनें त्याची किंमत वाढणें हें होय. ह्यासाठीं जरूर दिसल्यास सरकारनें योग्य नियंत्रण केलें पाहिजे.

### ब्रह्मदेशी चलनी नोटा

ब्रह्मदेशांत प्रचलित असलेल्या हिंदी चलनी नोटांचे पैसे हिंदुस्थान सरकारच्या परवानगीवांचून रिझर्व्ह बँकेनें देऊं नयेत असा हुकूम मागें काढण्यांत आला आहे आणि ह्या नोटा व त्यांचें तारण सरकारनें स्वतःच्या ताब्यांत घेतलें आहे. ह्या व्यवस्थेचा उद्देश ब्रह्मदेशीय नोटांचा पैसा जपानच्या हातीं लागू नये हा आहे. शत्रूनें ब्रह्मदेश व्यापला असल्यानें तेथें प्रचलित असलेल्या नोटांचा उपयोग स्वतःच्या फायद्यासाठी करण्यासाठी युक्त्या योजण्यास तो कचरणार नाहीं. तथापि, ब्रह्मदेशांतून परत आलेल्या हिंदी लोकांच्या जवळ असलेल्या नोटांचा पैसा त्यांस मिळणें वाजवी असल्यानें त्याबद्दलची योग्य चौकशी होऊन हिंदुस्थान सरकारकडून जरूर ती तजवीज होईल. बँक ऑफ इंग्लंडच्या नोटा फ्रान्समध्यें जर्मनांच्या हातीं लागल्या होत्या तेव्हां वरीलप्रमाणेंच त्या मोडल्या जाण्याबाबत निर्बंध घालण्यांत आले होते. ब्रह्मदेशांत प्रचलित असलेल्या हिंदी नोटांची रकम गेल्या महिन्याच्या २९ तारखेस २९ कोटि रुपये होती आणि त्या दिवशीं एकूण नोटांच्या तारण निधीचें प्रमाण सुमारें ६२ टक्के होतें. ह्या प्रमाणांत ब्रह्मी नोटांच्या तारणाचा आंकडा सुमारें १७½ कोटि होतो आणि त्यांत सोनें व स्टर्लिंग पौंडांतील कर्जरोख्यांचा अंत-र्भाव होतो. ब्रह्मी नोटांच्या मोडीचे पैसे ह्या निधीमधून हिंदुस्थान सरकारास देतां येईल. ब्रह्मदेशांत राहिलेल्या नोटांच्या पैशाचें काय करावयाचें ह्या प्रश्नाचा निकाल तो देश शत्रूच्या हातून परत आल्यावर करावा लागेल. त्यावेळीं जरूर पडेल त्यामानानें नोटांच्या निधीचा विनियोग करतां येईल. ब्रह्मी नोटांचे संबंधांत सरकारनें वटहुकूम काढून व्यवस्था केली आहे तिचा हिंदी चलन व्यवस्थेवर कांहींच प्रतिकूल परिणाम होणार नाहीं. ही व्यवस्था मामुली रीतीनें चालेल आणि हिंदी चलनी नोटांस नेहमीप्रमाणें कायदेशीर तारण भरपूर राहील.

### साखरेचा पुरवठा व महाराष्ट्रांतील कारखाने

हिंदुस्थानांतील साखरेच्या पुरवठ्यावर नियंत्रण घालण्यांत आलें आहे, त्याचा अवास्तव फायदा घाउक व्यापारी घेऊं लागले आहेत, असें दिसतें. किरकोळ व्यापाऱ्यांस साखरेचा पुरवठा होत नाहीं व गिऱ्हाइकांना ठराविक दरानें साखर मिळूं शकत नाहीं, अशी परिस्थिति मुंबई शहरांत झाली असल्याचें प्रसिद्ध झालें आहे. मुंबई सरकारनें ह्या संबंधांत कसून चौकशीस प्रारंभ केला असून, कायदा मोडणारांवर खटले भरण्यांत येणार आहेत. व्यापाऱ्यांनीं त्यासहि दाद न दिल्यास, सरकार स्वतःच सर्व साखरेचा साठा करून ती लोकांना उपलब्ध करील. सरकारी धान्याच्या दुकानांत साखर विक्रीस ठेवण्यांत आली आहे, ती नियंत्रित दरापेक्षा थोडी स्वस्त विकण्यांत येत आहे. एका वेळेस एक शेरापर्यंत तेथें साखर मिळूं शकते. मुंबई शहरांत साखरेचा साठा पुरेसा आहे व प्रांतांतील जिल्ह्यांतहि साखरेचा पुरवठा नीट व्हावा, ह्या दृष्टीनें सरकारनें महाराष्ट्रांतील साखर-कारखान्यांच्या सहायानें व्यवस्था केली आहे. ह्या कारखान्यांजवळ १,४४,००० पोतीं साखर शिल्लक आहे, तिचा पुरवठा अहमदनगर, खानदेश, नाशिक, पुणें, सोलापूर, सातारा व विजापूर ह्या जिल्ह्यांस होऊं शकेल. बाकीच्या जिल्ह्यांसाठी बाहेरून साखर आणवून द्यावी लागेल. महाराष्ट्रांत गेल्या कांहीं वर्षांत प्रतिकूल परिस्थितीस तोंड देऊनहि साखरेचा धंदा स्थापन करण्यांत आला त्याचें महत्त्व सद्यःपरिस्थितींत सहज लक्षांत येईल. ह्या कारखान्यांचे अभावीं, मुंबई प्रांतास साखरेसाठी सर्वस्वीं बाहेरील पुरवठ्यावर अवलंबून रहावें लागलें असतें. महाराष्ट्र हा उंसाच्या लागवडीस व साखर-कारखान्यांच्या स्थापनेस विशेष सोईचा प्रदेश आहे; तेव्हां हिंदुस्थानांतील दोन प्रांतांत साखरेचे कारखाने पुष्कळ निघाले म्हणून महाराष्ट्रांत ते निघूं नयेत ह्या तक्रारीस महाराष्ट्रानें न जुमानतां येथें साखर-कारखाने काढले, ही गोष्ट कशी हितावह झालेली आहे, ह्याचें थोडेसें प्रत्यंतर साखरेच्या सध्याच्या दुर्मिळतेमुळें येत आहे.

### रेल्वेचे कॉंक्रीटचे स्लीपर्स

ग्रेट ब्रिटनमधील रेल्वेजच्या रुळांचे बैठकीकरितां दरसाल सुमारें ४० लक्ष स्लीपर्स लागतात, ते सर्व बाल्टिक समुद्राचे जवळच्या देशांतून व कॅनडांतून आयात होत असत. आतां त्यांची आयात होणें कठीण झालें आहे. ग्रेट ब्रिटनमधील लाकडाचा त्या कामीं उपयोग केला, तरी तें लाकूड टिकाऊ नसतें. मोठ्या वहातुकीच्या रस्त्यासाठीं चांगल्या लाकडी स्लीपर्सचा उपयोग करावयाचा व साइडिंग आणि किरकोळ शाखा ह्यांचे-साठीं कॉंक्रीटच्या बैठकी तयार करावयाच्या, असें ठरविण्यांत

आले आहे. कॉंक्रीटचे स्लीपर्स बनविण्याचा प्रयत्न कित्येक वर्षे चालू आहे. परंतु जलद वेगानें जीवरून गाड्या जातात, अशा रेल्वे रुळांना ते सोसकर पडत नाहींत असा अनुभव आला आहे. लाकडाच्या स्लीपरसारखाच कॉंक्रीटचा स्लीपर केला, तर त्याचें लाकडी वजन स्लीपरच्या तीन-चार पट भरेल. म्हणून कॉंक्रीटचा स्लीपर वेगळया तऱ्हेनें बनविण्यांत येतो. कॉंक्रीटचे ठोकळे ओतण्यांत येतात व प्रत्येक रुळाखाली एक असे ते अंतराअंतरानें मांडण्यांत येतात. ह्यांच्या जोड्या मधून मधून पोलादी कांबींनीं जोडून घेतल्या जातात. कॉंक्रीटच्या प्रत्येक ठोकळ्यांत २२ फूट लांब पोलादी तार असते; व १२ ठोकळ्याचें वजन एक टन भरतें.

## गेल्या आठवड्यांतील नाणेबाजार

अल्प मुदतीच्या पैशाचा पुरवठा विपुल झाल्यानें त्यावर सुटणाऱ्या व्याजाचा दर उतरला हें मुंबईच्या नाणें बाजाराच्या गेल्या आतवड्यांतील परिस्थितींचें वैशिष्ट्य होतें. "कॉलमनी"चा दर चार आणे आणि तीन ते सहा महिन्यांच्या मुदतीच्या ठेवींचा दर एक रुपया झाला. खेळत्या पैशाच्या विपुलतेचें लक्षांत येण्याजोगें गमक सरकारी ट्रेझरी बिलांस आलेल्या मोठ्या मागणींत सापडतें. ह्या बिलांस साडेचौदा कोटी रुपयांची मागणी आली. व्याजाचा दर सुमारें साडेपंधरा आणे होता तो सुमारें पावणे चौदा आण्यांवर खाली आला. ह्या स्वस्त पैशाचा फायदा सरकारनें घ्यावा हें स्वाभाविक आहे आणि ट्रेझरी बिलांवर वाढत्या उड्या पडत आहेत हें पाहून त्यांनीं आठवड्याची आपली मागणी दोन कोटींनीं वाढवून ती आठ कोटि केली आहे. अनुकूल परिस्थिति दिसतांच हिंदुस्थान सरकारास मध्यम मुदतीचें कर्ज काढणें सोयीचें होईल. तोपर्यंत स्वतःची पैशाची जरूर भागवण्याचा तीन महिने मुदतीच्या ट्रेझरी बिलांचा मार्ग त्यास श्रेयस्कर वाटत आहे. शेड्यूल्ड बँकांच्या शिलका रिझर्व्ह बँकेकडे ठेव म्हणून ठेवण्यांत येतात त्यांच्या रकमेनें उच्चांक गाठून ती एकूणसाठ कोटि रुपये झाली हेंहि पैशाच्या पुरवठ्याची विपुलता सिद्ध करीत आहे. रिझर्व्ह बँकेचा आठवड्याचा तक्ता प्रसिद्ध झाला आहे त्यावरून प्रचलित चलनी नोटांच्या रकमेंत थोडी वाढ झाल्याचें दिसतें. पावणे एकोणतीस कोटी रुपये किंमतीच्या ब्रह्मदेशांतील नोटांची जबाबदारी सरकारनें उचलल्याकारणानें तेवढी रकम बँकेच्या तक्त्यांत कमी झाली आहे आणि त्याचबरोबर चलननिधींतून सुमारें सत्तावीस कोटींचे हिंदुस्थान सरकारचे रोखे कमी झाले आहेत. ह्याविषयींचें स्पष्टीकरण इतरत्र आजच्या अंकांत आलेंच आहे. सरकारी रोख्यांच्या किंमती सामान्यतः भक्कमच राहिल्या. साडेतीन टक्क्यांची प्रॉमिसरी नोट स्थिर राहिली तरी बाकीचे रोखे थोडे वर सरकले. सोन्याचा भावहि एकूण पन्नास रुपयांच्या आसपास साधारणपणें स्थिर होता. सॉव्हिरिनची किंमत ह्या भावाच्या आनुषंगानें साडेसदतीस-पावणे-अडतीसाच्या सुमारांत होती. चांदीचा भाव थोडा अस्थिर झाला तरी अखेर शंभर तोळ्यांस साडेपंचायशी रुपये इतक्या अजमासांत तो राहिला.

## प्राप्तीवरील कराचा बोजा

मि. चर्चिल ह्यांस ब्रिटिश सरकारकडून सालीना १० हजार पौंड पगार मिळतो, त्यांतून प्राप्तीवरील कर वजा जातां त्यांस गेल्या वर्षी २,१६८ पौंड उरले. कर भागवून स्वतःचे असे १० हजार पौंड उरविण्यास त्यांस १,६६,९६. पौंडांचें वार्षिक उत्पन्न हवें, असा हिशेब गेल्या जूनमध्यें इन्कमटॅक्स-तज्ज्ञांनीं केला होता.

## कचरापेटींतील संपत्ती

चालू युद्धपरिस्थितींत कचरापेटींतील कचऱ्यास विशेष महत्त्व प्राप्त झालें आहे. ग्रेट ब्रिटनमधील प्रत्येक मोठ्या शहरांत कचरा तपासण्याची व्यवस्था केलेली आहे. लंडनमध्यें हायजेनिक लि. नें ह्या बाबतींत पुष्कळच आघाडी मारली आहे. ह्या कंपनीच्या कारखान्याचें काम अगदीं नवीन पद्धतीनें चालतें. शहरांतील कचऱ्याच्या गाड्या कारखान्यांत दाखल झाल्यानंतर त्या कचरा खाली लोटून देतात, तो यारीच्या साहाय्यानें पट्ट्यावर घेण्यांत येतो. हा पट्टा हळूहळू पुढें सरत जातो व त्याचे दोन्ही बाजूस उभ्या असलेल्या मुली कचऱ्यांतील काचा, धातूचे तुकडे, चिंध्या, धरण्याचे तुकडे, इत्यादि वेचून त्यासाठी स्वतंत्र ठेवलेल्या डब्यांत टाकतात. ज्यांचा पुनः उपयोग होऊं शकेल, अशा बाटल्या वगैरे वेचून त्या धुण्यासाठी पाठविल्या जातात. कागदहि वेगळे काढण्यांत येतात. त्यानंतर लोहचुंबक कचऱ्यांतील लोखंडी तुकडे आकर्षून घेतात व वेगळया डब्यांत टाकतात. हें संपल्यानंतर कचरा एका मोठ्या बंदिस्त हौदांत घातला जातो. ह्या हौदांत कचऱ्याचा दळून चूर केला जातो. अगदीं बारीक छिद्रांच्या पोलादी चाळणींतून बाहेर न पडणाऱ्या चुऱ्यावर जंतुयुक्त पाणी उडविलें जातें. हें पाणी चुऱ्यास भिजवून टाकतें व पाण्यांतील जंतू चुऱ्याचें खतांत रूपांतर करितात. पाण्यांतील जंतूंची संख्या व त्यांचें स्वरूप, ह्यावरच कचऱ्याचें खत होणें अवलंबून असल्यानें ही क्रिया अत्यंत महत्त्वाची आहे. पाण्यानें भिजलेला कचरा २०० टन आकाराच्या हौदांत भरला जातो. हे हौद बंद करून त्यांत दाबाखालील हवा भरण्यांत येते. त्यामुळें कचऱ्यांत ऊब उत्पन्न होते व कचऱ्यावर रासायनिक क्रिया होण्यास प्रारंभ होतो. १६ दिवसांत साध्या कचऱ्याचें मौल्यवान खत तयार होतें. ह्या हौदांतील वायू वर सांगितलेल्या पाण्याचे साठ्यांत मुद्दाम सोडण्यांत येतात. अशा प्रकारें पाण्यांतील जंतूंचा पुरवठा कायम राखण्यांत येतो. तयार होणारें खत उत्कृष्ट दर्जाचें असतें व त्यास इतकी मागणी असते, कीं तें तयार होतांच बाहेर उभ्या असलेल्या मालाच्या लॉऱ्यांत भरून गिऱ्हाइकाकडे रवाना होतें.

कचऱ्यांतून निवडून काढलेल्या जिनसा त्यासंबंधांतील कारखान्यांत उपयोगी पडाव्या ह्या दृष्टीनें त्यांचेवर क्रिया करण्यांत येतात. कचऱ्यांत कोणता जिन्नस सांपडत नाहीं, हेंच सांगणें कठीण आहे. टायर्स, फर्निचर, घड्याळें, सतरंज्या, खाद्य पदार्थ, इत्यादीहि त्यांत असतात. चांगला कागद कागदाच्या गिरण्यांकडे पाठविला जातो, त्यांचा नवा कागद बनवितां येतो. स्वच्छ वर्तमानपत्रांचाहि नवा कागद होऊं शकतो. वाईट प्रकारच्या कागदापासून पुठ्ठ्याचे कागद वगैरे होऊं शकतात. हाडांपासून डिंक बनविण्यांत येतो. बाटल्या व धरण्या मोरंब्याच्या कारखान्यांस उपयोगी असतात. कचऱ्यापासून अचंबा वाटण्याजोग्या नव्या वस्तू होऊं शकतात.

## चीनची हिंदुस्थानांतील खरेदी

चिनी सरकारनें पेकिन सिंडिकेट लि. च्या मार्फत हिंदुस्थानांत २½ कोटि रुपये किंमतीच्या मालाचे खरेदीच्या ऑर्डरी दिल्या आहेत. ह्यांतील मुख्य बाबी म्हणजे कापड, सूत, पेट्रोल व किरकोळ यंत्रसामुग्री ह्या होत. बहुतेक सर्व खरेदी ब्रिटिश सरकारनें केलेल्या पैशाच्या देवघेवीच्या व्यवस्थेस अनुसरून होते व कांहीं खरेदी रोखीनेंहि केली जाते. चिनी सरकारास हव्या असलेल्या किरकोळ जिनसा सुद्धां मिळवून देण्याची व्यवस्था हिंदुस्थान सरकार करीत असते.

## इन्कमटॅक्स खात्याच्या अधिकाऱ्याकडे करावयाच्या अर्जास लागणाऱ्या स्टँप व कोर्ट-फीसंबंधीं आवश्यक माहिती

(लेखकः—श्री. के. बा. गजेंद्रगडकर, वकील, सातारा)

ॲफिडेव्हिट म्हणजे शपथेवर कोणतीहि गोष्ट सांगणें होय. इन्कमटॅक्स खात्याचे अधिकारी म्हणजे इन्कमटॅक्स ऑफिसर, असिस्टंट इन्कमटॅक्स कमिशनर अथवा इन्कमटॅक्स कमिशनर ह्यांचेपुढें अर्ज करणें झाल्यास ते दोन रुपयाच्या स्टँपावर केले पाहिजेत. इन्कमटॅक्स खात्याचे कोणीहि अंमलदार हे 'कोर्ट' या सदराखाली येऊं शकत नाहींत. म्हणून स्टँप ॲक्ट शेड्यूल १ कलम४ ह्यामध्यें सांगितल्याप्रमाणें ॲफिडेव्हिटास रुपये दोनचा स्टँप लाविला पाहिजे.

२. एखाद्या इसमानें इन्कमटॅक्स ऑफिसरपुढें काम करण्यास लायख असणाऱ्या वकिलास मुखत्यारपत्र अगर वकीलपत्र दिलें तर त्यास फक्त जरूर ती कोर्टफी लागेल. उदाहरणार्थ, मुंबई इलाख्यांत इन्कमटॅक्स ऑफिसर अथवा असिस्टंट इन्कमटॅक्स कमिशनर यांचेपुढें काम करण्याकरितां वकीलपत्रास आठ आण्याचें कोर्ट-फी तिकीट लागेल. परंतु इन्कमटॅक्स ट्रायब्यूनलपुढें अगर हायकोर्टांत काम करण्याकरतां वकीलपत्रास दोन रुपयाचें तिकीट लागेल. मध्यप्रांतांत अनुक्रमें बारा आणे व दोन रुपये आठ आण्याचें कोर्ट-फी तिकीट वकीलपत्रास लावावें लागेल. इन्कमटॅक्स कायद्याच्या कलम ६१ प्रमाणें ज्यांना इन्कमटॅक्स खात्याच्या अधिकाऱ्यापुढें काम चालविण्याची परवानगी आहे अशा लोकांव्यतिरिक्त दुसऱ्या कोणास आपल्याकरितां हजर राहून काम चालविण्यास मुखत्यारपत्र देणें असल्यास दोन रुपये स्टँपावर मुखत्यारपत्र लिहून द्यावें लागेल. अशा माणसांनीं दिलेले जबाब अगर केलेलें स्पष्टीकरण मुखत्यारपत्र देणारावर बंधनकारक होईल. परंतु नुसते जमाखर्च हजर करणें अगर जमाखर्चांचा तपशील सांगणें ह्यांकरितां एखादा माणूस आपण इन्कमटॅक्स ऑफिसरकडे पाठविल्यास त्यास मुखत्यारपत्राची जरूर नाहीं. असा माणूस फक्त जमाखर्च वह्यांचा रखवालदार किंवा काळजी घेणारा (Custodian) असें समजण्यांत येईल. त्यांनीं दिलेले जबाब मूळ मालकावर बंधनकारक होणार नाहींत.

३. इन्कमटॅक्स कामांतील कोणत्याहि हुकुमाची नक्कल अगर हजर केलेल्या जमाखर्चाच्या उताऱ्याची नक्कल दुसऱ्या कोणत्याहि कामांत गुदरणें झाल्यास ३६० शब्दांस अगर त्याच्या कोणत्याहि भागास आठ आणे ह्या दरानें त्या नकलेच्या कागदास कोर्ट फी स्टँप लाविला पाहिजे.

४ इन्कमटॅक्सची आकारणी केलेला हुकूम, इनकमटॅक्स वाढविण्याबद्दल केलेला हुकूम, २५ कलमान्वयें दंड करण्याबद्दल केलेला हुकूम किंवा अपील कोर्टानें केलेला हुकूम ह्या सर्व हुकुमाच्या नकलेस अशा नकला दुसऱ्या कोणत्याहि कामांत गुदरणें झाल्यास त्यांना कोर्टफीचें तिकीट खालीलप्रमाणें लाविलें पाहिजे. जर असे हुकूम हायकोर्टाव्यतिरिक्त दुसऱ्या कोणीहि केले असतील तर ५० रुपयांपर्यंत झालेल्या हुकुमाच्या नकलेस चार आणेचें कोर्ट-फी तिकीट व पन्नास रुपयांपुढें झालेल्या हुकुमाच्या नकलेस आठ आण्याचें तिकीट लावावें लागेल. असा हुकूम हायकोर्टानें केला असल्यास त्यास एक रुपयाचें कोर्ट-फी तिकीट लावावें लागेल.

५. कर बसल्याबद्दल जो हुकूम इन्कमटॅक्स ऑफिसरकडून येतो त्याची नक्कल विनामूल्य मिळूं शकते. परंतु ती नक्कल जर अपील अर्जाबरोबर गुदरावयाची असेल तर त्या नकलेस योग्य तें कोर्ट फीचें तिकीट लाविलें पाहिजे.

६. इन्कमटॅक्स अधिकाऱ्याकडे कोणत्याहि कागदाची नक्कल मिळण्याबद्दल करावयाच्या अर्जास दोन आण्याचें कोर्ट फी तिकीट लावावें लागेल.

७. इन्कमटॅक्स ऑफिसरानें केलेल्या हुकुमाविरुद्ध जर अपील करावयाचें असेल तर त्या अपिलाच्या अर्जास आठ आण्याचें कोर्ट-फी तिकीट लावावें लागेल. परंतु कमिशनरकडे जर ३३ कलमान्वयें तपासणी अर्ज करावयाचा असेल तर अशा अर्जास कोर्ट-फी तिकीट लागणार नाहीं. त्याचप्रमाणें एकदां कर भरला असेल तर तो परत मिळण्याकरितां कलम ४८, ४८ अ व ४९ या कलमान्वयें अर्ज करणें असेल तर त्या अर्जास कोर्ट-फी तिकीट लागणार नाहीं.

---

### मुंबई प्रांतांतील जन्म-मृत्यु

मुंबई प्रांताची एकूण लोकसंख्या सुमारें २ कोटि, १३ लक्ष आहे. १९४० मध्यें प्रांतांत एकूण ७,५५,८१७ जन्म नोंदले गेले व मृत्यूंची संख्या ५,०१,४६५ भरली. म्हणजे जननाचें व मृत्यूचें दर हजारीं प्रमाण अनुक्रमें ३७·५१ व २४·८९ पडलें. भडोच जिल्ह्यांत जननाचें प्रमाण सर्वांत अधिक (५३·४८) व मुंबई उपनगर जिल्ह्यांत सर्वांत कमी (३०·७५) आढळलें. मुळशी पेट्यांत जननाचें प्रमाण ६९·७१ होतें, तर दक्षिण वसई तालुक्यांत तें १९·८२ होतें. मुंबई शहरांत एकूण ३८,८३३ जन्म झाले, म्हणजे तेथें प्रमाण ३२·३४ पडलें. प्रांतांतील एकूण जन्मामध्यें प्रत्येक १०० मुलींस १०६·२२ मुलगे, असें प्रमाण आहे. १९४० सालीं एकूण ५,०१,०६५ मृत्यू घडले. मृत्यूचे प्रमाणांत अहमदाबाद व भडोच ह्यांचा अनुक्रम वर लागला. रत्नागिरी व मुंबई उपनगर ह्या जिल्ह्यांत मृत्यूचें प्रमाण सर्वांत कमी असल्याचें आढळलें. एकूण मृत्यूपेक्षा जन्मांची संख्या २,५४,३५२ नें ज्यास्त भरली, म्हणजे लोकसंख्येंत १·४१% वाढ झाली. एका वर्षाखालील बालकांच्या मृत्यूंची संख्या १,२८,१०३; म्हणजे हजार जन्मांमागें १६९·३६ इतकी भरली. १९३१ सालीं हेच आकडे अनुक्रमें १,११,४२५ व १५२·९०% असे होते.

---

राहाणेची व भोजनाची उत्तम सोय




फोन नं. ७७९ गणपति चौक, व्यवस्थापक.

मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं

असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् को-ऑपरेटिव् बँक, लिमिटेड.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी–सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंग

९, बेक हाउस लेन, कोट मुंबई.

शाखा

| | |
|---|---|
| १ बारामती ( जि. पुणें ) | १८ अकलूज ( जि. सोलापूर ) |
| २ सातारा ( „ सातारा ) | १९ विरमगांव ( „ अहमदाबाद ) |
| ३ इस्लामपूर ( „ „ ) | २० धुळें ( „ प. खानदेश ) |
| ४ कऱ्हाड ( „ „ ) | २१ दोंडाईचें ( „ „ ) |
| ५ तासगांव ( „ „ ) | २२ शिरपूर ( „ „ ) |
| ६ किर्लोस्करवाडी ( „ „ ) | २३ शहादें ( „ „ ) |
| ७ शिराळें ( „ „ ) | २४ नंदुरबार ( „ „ ) |
| ८ कोरेगांव ( „ „ ) | २५ साक्री ( „ „ ) |
| ९ वाई ( „ „ ) | २६ शिंदखेडें ( „ „ ) |
| १० अहमदनगर ( „ अहमदनगर ) | २७ तळोदें ( „ „ ) |
| ११ शेवगांव ( „ „ ) | २८ मालेगांव ( „ नाशिक ) |
| १२ कोपरगांव ( „ „ ) | २९ सटाणा ( „ „ ) |
| १३ बेलापूर ( „ „ ) | ३० कळवण ( „ „ ) |
| १४ राहुरी ( „ „ ) | ३१ लासलगांव ( „ „ ) |
| १५ भिवंडी ( „ ठाणें ) | ३२ नांदगांव ( „ „ ) |
| १६ पालघर ( „ „ ) | ३३ दोहद ( „ पंचमहाल ) |
| १७ कल्याण ( „ „ ) | ३४ कालोल ( „ „ ) |

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.



## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार



## DECCAN BOOK STALL

**Booksellers, Publishers & Subscription Agents**
**Fergusson College Road, Poona No. 4**

(1) We stock and supply Educational books, General books & Library books.

(2) We supply Government of Bombay and Government of India publications.

(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.

(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.



## महायुद्ध दाराशीं आलें परदेशी औषधें दुर्मिळ व महाग झालीं

पण

भिण्याचें कारण नाहीं !!!

— कारण —

## आयुर्वेद रसशाळा पुणें लि०

या देशी औषधाच्या प्रसिद्ध कारखान्यानें तयार केलेलीं

- रक्तवर्धक,
- उपनाह,
- बालजीवन,
- कॅल्सीप्राल

इत्यादि पेटंट, स्टँडर्ड व लोकप्रिय औषधें खात्री पटल्यामुळें

★ डॉक्टर्सहि वापरूं लागले आहेत. ★

दरसाल बिनचूक नफा वाटणाऱ्या ह्या कंपनीचे शेअर्स व औषधें मागवा.

## आयुर्वेद रसशाळा पुणें लि०

मुख्य दुकान गणपति चौक, लक्ष्मीरोड, पुणें २.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२४।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

**जाहिरातींचे दर.**
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

**वर्गणीचे दर.**
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ८ | पुणें, बुधवार, तारीख ८ जुलै १९४२ | अंक २७

## दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल ... ... ... | रु. २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... ... ... | रु. १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड ... ... ... | रु. १,१८,००,००० |

**मुख्य कचेरी:** ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

**मुंबईमधील शाखा :** बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

**इतर शाखा :** अहमदाबाद ( भद्र, मुख्य ऑफिस ), अहमदाबाद ( एलिस ब्रिज शाखा ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अंधेरी ( मुंबई शेजारी ), बांद्रे ( मुंबई शेजारी ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस ), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर, कराची, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत.

**लंडन एजन्ट्स :** वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

**डायरेक्टर्स :** सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय.(अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाइट; मि. ए. गेडिस; सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई., मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण.

**करंट डिपॉझिट अकाउंट्स :**

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षा कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमीचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

एजंट—टी. आर. लालवाणी.

## दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

हेड ऑफिस : पुणें शहर.

स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.

मुंबई शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | : रु. १०,००,०००. |
| विक्रीस काढलेलें भांडवल | : रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | : रु. ४,४०,३५० |
| वसूल झालेलें भांडवल | : रु. २,२०,१७५ |
| एकूण खेळतें भांडवल | : रु. २५,००,००० |

**डायरेक्टर्स**

प्रो. वा. गो. काळे, अध्यक्ष

| | |
|---|---|
| श्री. धों. कृ. साठे | श्री. मा. रा. जोशी |
| श्री. न. ग. पवार | श्री. श्री. गो. मराठे |
| श्री. त्र्यं. वि. रानडे | श्री. र. चिं. सोहोनी |
| श्री. वा. पुं. वर्दे | मि. फ. दो. पदमजी |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदीविक्री कसोशीनें करून दिली जाते.

बँकेच्या शेअरवर १९४१ अखेर पुऱ्या होणाऱ्या वर्षी द. सा. द. शेंकडा ४ टक्के करमाफ डिव्हिडंड दिलें गेलें. बँकेची शेअरविक्री चालू आहे.

म. वि. गोखले
मॅनेजर.

**महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.**

बंबाचे माडीवर

# महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

## विविध माहिती

### अलाहाबाद बँक लि.

वरील बँकेस ३१ मार्च, १९४२ अखेर संपलेल्या वर्षी ४१ लक्ष रुपये व्याजाचे रूपानें व ७½ लक्ष रुपये डिस्कौंट व कमिशनचे रूपानें मिळाले. ठेवींवर तिनें १२½ लक्ष रुपये व्याज दिलें. व्यवस्थेचा खर्च २४½ लक्ष रुपये आला व निवळ नफा १०½ लक्ष रुपये उरला. भागीदारांस १२% डिव्हिडंड व ६% बोनस मिळालें. ७½ लक्ष रुपये इन्व्हेस्टमेंट रिझर्व्ह खातीं वर्ग करण्यांत आले आहेत. बँकेचें भांडवल ३५½ लक्ष रुपये असून तिचा रिझर्व्ह फंड ५६ लाखांचा आहे. तिचेकडे १३ कोटींच्या ठेवी आहेत व तिनें ५ लक्ष रुपये कर्जाऊ दिलेले आहेत. एकूण ठेवींशीं कर्जाऊ दिलेल्या रकमेचें प्रमाण ३८·५% पडतें. १९४० मध्यें तें ५८% व १९४१ मध्यें ४५% होतें.

### भुईमूग

भुईमुगाच्या उत्पादनाचे बाबतींत हिंदुस्थान सर्व देशांत अग्रेसर आहे, परंतु भुईमुगाच्या तेलाचे आंतरराष्ट्रीय व्यापारांत हिंदी तेलास महत्त्वाचें स्थान नाहीं. हिंदी घाऊक व्यापाऱ्यानें एक रुपया दिला तर त्यापैकीं शेतकऱ्याचे वाट्यास फक्त १० आणे येतात व लंडनमधील विक्रीचा एक रुपया आला, तर त्यापैकीं ७½ आणेच फक्त हिंदी शेतकऱ्याचे पदरांत पडतात. मालाचा दर्जा सुधारून तो बाजारांत आणण्याचे पद्धतींत सुधारणा होणें अगत्याचें आहे.

### बँक ऑफ इंडिया लि.

१९४१ च्या पहिल्या सहामाहीचा नफा
११,७०,४१७ रु. ४ आ. ३ पै
त्यांतून इन्कमटॅक्स व सुपरटॅक्ससाठी
वजा २,००,००० रु.

| | |
|---|---|
| उरलेला निवळ नफा | ९,७०,४१७–४–३ |
| मागील सालांतील शिलकी नफा | ९,४१,६५५–१–० |
| एकूण | १९,१२,०७२–५–३ |

बँकेचें भरणा झालेलें भांडवल १ कोटि रुपये आहे. त्यावर ११% दरानें (प्रत्येक भागास २ रु. १२ आ.) करमाफ पहिल्या सहामाहीचें डिव्हिडंड देण्याचें डायरेक्टर बोर्डानें ठरविलें आहे, त्यास ५ लक्ष, ५० हजार रुपये लागतील. उरलेली १३,६२,०७२ रु. ५ आ. ३ पै ही रकम पुढील सहामाहीच्या हिशेबांत ओढण्यांत येईल.

### युद्धसमाप्तीनंतरच्या अन्नपुरवठ्याची तयारी

शत्रुपक्षीयांनीं पादाक्रांत केलेल्या देशांतील लोकांना युद्धसमाप्तीनंतर अन्नपुरवठा कमी पडूं नये, ह्यासाठी ग्रेट ब्रिटन, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, अमेरिका व अर्जेंटिना येथील सरकारांनीं १० कोटि बुशेल गव्हाचा साठा करण्याचें ठरविलें आहे. त्यापैकीं निम्मा गहूं अमेरिका देईल व बाकीचा निम्मा ग्रेट ब्रिटन व कॅनडा हे देतील.

### चेक्सची देवघेव

मुंबई बँकर्स क्लिअरिंग हाउसमध्यें गेल्या आठवड्यांत २१ कोटि, २०½ लक्ष रुपये किंमतीच्या १,०८,३९७ चेक्सची देवघेव झाली.

### उत्तर आयर्लंडमध्यें अमेरिकन नाविक ठाणें

लंडनडेरी (अल्स्टर) येथें अमेरिकेनें एक मोठें नाविक ठाणें तयार केलें आहे.

### ४ जुलै, १७७६

४ जुलै, १७७६ रोजीं अमेरिकेंतील १३ ब्रिटिश वसाहतींनीं फिलॅडेलफिया येथें स्वातंत्र्याची घोषणा केली व युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका हें नवें राष्ट्र स्थापन केलें. १७८२ सालीं इंग्लंडनें अमेरिकेचें स्वातंत्र्य मान्य केलें, तें १७८३ च्या व्हर्साईच्या तहानें पक्कें झालें. ४ जुलै हा स्वातंत्र्यदिन अमेरिकेंत नुकताच साजरा झाला.

### ब्रह्मी नोटांची मोड

इंपीरिअल बँकेच्या हिंदुस्थानांतील सर्व शाखांत सध्या ब्रह्मी नोटांची मोड मिळूं शकते. ही व्यवस्था १४ जुलैनंतर चालू रहाणार नाहीं. त्यानंतर आसामांत कांहीं ठिकाणीं व रिझर्व्ह बँकेच्या कलकत्ता, कानपूर आणि मद्रास येथील शाखांतच फक्त त्यांची मोड मिळेल.

### चहाच्या मळेवाल्यांची भीति

चहाची हिंदुस्थानांतील किमान किंमत सरकारनें नियंत्रित करावी अथवा सरकारनें सर्व हिंदी उत्पादन स्वतः विकत घ्यावें; नाहीं तर चहाची किंमत फार खालीं जाऊन लहान मळेवाल्यांचें अतिशय नुकसान होईल, अशी भीति निलगिरीमधील लहान मळेवाल्यांनीं व्यक्त केली आहे.

### रक्तांतरासाठी रक्त पाहिजे

बॉंब हल्ल्यांत जखमी झालेल्यांसाठीं रक्तदान करण्यास पुढें येणाऱ्या लोकांची आवश्यकता आहे. दात्यांचें रक्त घेऊन साठवून ठेवण्याची व्यवस्था हिंदुस्थानांत ठिकठिकाणीं करण्यांत येत आहे.

### रहाणीच्या खर्चाचें वाढतें मान

जून, १९३४ अखेरच्या वर्षी मुंबई शहरांतील रहाणीच्या खर्चाचें मान १०० होतें असें मानल्यास १५ जून १९४२ अखेरच्या महिन्यांतील रहाणीच्या मानाचा आंकडा १५२ वर गेला. खाद्यपदार्थांची किंमत १०० ची १७७ झाली.

### मुंबईंतील चोऱ्या

चालू वर्षाच्या पहिल्या सहामाहींत मुंबई शहरांत एकूण ६½ लक्ष रुपयांचा माल चोरीस गेल्याची नोंद आहे. त्यापैकीं २½ लक्ष रुपयांचा माल परत मिळाला. १९४१ च्या पहिल्या सहामाहीचे तत्सम आकडे अनुक्रमें ५ लक्ष, ६३ हजार व ७६ हजार असे आहेत.

### बँक ऑफ बरोडा, लि.

वरील बँकेस ३० जून अखेरच्या सहामाहींत मागील शिलकी नफा धरून, ५ लक्ष, ६७ हजार रुपये नफा झाला. भागीदारांस ह्या सहामाहीचें १०% करमाफ इंटेरिम डिव्हिडंड मिळेल.

### रोहिलखंड अँड कुमान रेल्वे कं. लि.

३० सप्टेंबर १९४१ अखेर संपलेल्या वर्षाबद्दल वरील कंपनीच्या भागीदारांस २०% डिव्हिडंड मिळेल. पहिल्या प्रतीच्या हिंदी रेल्वेजपैकीं रोहिलखंड अँड कुमान रेल्वे ही सर्वांत कमी लांबीची आहे. ह्या रेल्वेचा सरकारशी असलेला करार संपला असून कंपनीच्या भागीदारांस त्यांच्या १०० रुपयांच्या भागास किमान ३०० रुपये परत मिळतील, असा अंदाज आहे.

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | २१२ | महागाईविरुद्ध मोहिम—सरकार व जनता ह्यांचें सहकार्य—हिंदुस्थान सरकारचें नवें कर्ज—युद्ध-परिस्थिति | |
| २ मि. चर्चिल ह्यांचा पार्लमेंटमध्यें विजय ... | २१३ | ६ वेस्टर्न इंडियाच्या सभेंत श्री. आपटे ह्यांचें भाषण | २१५ |
| ३ वेस्टर्न इंडिया विमा कं. लि. | २१४ | ७ हिंदी नोटा ... ... | २१७ |
| ४ हिंदुस्थानांतील सहकारी चळवळ ... ... | २१४ | ८ युद्धकैदी ... ... | २१७ |
| ५ स्फुट विचार ... | २१५ | | |



# अर्थ

बुधवार, ता. ८ जुलै, १९४२


## मि. चर्चिल ह्यांचा पार्लमेंटमध्यें दणदणीत विजय

उत्तर आफ्रिकेंत ब्रिटिश सैन्यास अनपेक्षित रीतीनें एकाएकी अपयश आल्यामुळें इंग्लंडमधील लोकांचीं मनें अस्वस्थ झालीं. त्या रणांगणावर ब्रिटिशांचें वैमानिक आणि चिलखती गाड्यांचें बळ भरपूर असून त्याच्यापुढें रोमेलसारख्या साहसी सेनानीचीहि मात्रा चालावयाची नाहीं अशी इंग्लंडमध्यें लोकांची दृढ समजूत झालेली होती. टोब्रूकसारखें मजबूत ठाणें दोन दिवसांत ब्रिटिश फौजेस खाली करण्याचा प्रसंग आला तेव्हां सर्वांच्या मनास धक्का बसला. हें बंदिस्त ठिकाण मागें कित्येक महिने लढत राहिलें होतें आणि त्यानें शत्रूस दाद दिली नाहीं. असें असतां तें रोमेलला इतक्या सहज कसें घेतां आलें ह्याचा उलगडा कोणासहि होईना. लिबियामध्यें ब्रिटिशांची लष्करी तयारी जय्यत असतां ती ह्या तऱ्हेनें फुकट जाऊन त्यांचे सैनिक व लढाऊ सामान शत्रूच्या हातीं सांपडलें ह्यावरून इंग्लंडच्या प्रधानमंडळाचें धोरण सदोष असलें पाहिजे आणि ह्या अपयशाची जबाबदारी मि. चर्चिल ह्यांचेवर टाकल्यावांचून गत्यंतर नाहीं असें कित्येक पुढाऱ्यांच्या मनानें घेतलें. मुख्य प्रधान व युद्ध मंडळाचे अध्यक्ष ही दुहेरी जबाबदारी मि. चर्चिल ह्यांस झेपण्यासारखी नसल्यानें त्या बाबतींत जरूर तो बदल करण्यांत आला पाहिजे असें कित्येकांचें मत झालें. ह्या विचारसरणीचा प्रतिध्वनि अखेर पार्लमेंटांत उमटला आणि मुख्य प्रधान व त्यांचे सहकारी ह्यांचे संबंधानें अविश्वासाचा ठराव कॉमन्स सभेंत मांडण्यापर्यंत कित्येक सभासदांची मजल गेली. ह्याच वेळीं मि. चर्चिल अमेरिकेंत युद्ध-धोरणाबाबतच्या महत्त्वाच्या व निकडीच्या प्रश्नांची चर्चा प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांच्यांशीं करण्यांत गुंतले होते आणि त्यांच्या पाठीमागें त्यांचेविरुद्ध अविश्वासाचा ठराव कॉमन्स सभेंत पुढें आला. ह्यामुळें इंग्लंडमध्यें खळबळ उडून जाणें अगदी स्वाभाविक होतें. सध्याच्या युद्ध-परिस्थितींत अविश्वासाच्या ठरावावर चर्चा होणें इष्ट नसल्यानें तो सर जॉन वॉर्डलॉ मिल्न ह्यांनीं परत घेऊन त्याचा विचार पुढें ढकलावा असें सुचविण्यांत आलें असतां त्या आशयाची सूचना मंत्रिमंडळाकडून आल्यास आपण ती मान्य करूं असें ते म्हणाले. परंतु मि. चर्चिल ह्यांचा स्वाभिमान व आत्मविश्वास जागृत होऊन त्यांनीं अगभर अगोदरच चर्चेचा विषय झालेला अविश्वासाचा प्रश्न लोंबकळत ठेवण्यांत हंशील नाहीं असें रोखठोक उत्तर दिलें.

सर जॉन वॉर्डलॉ मिल्न ह्यांच्या ठरावावर दोन दिवस अनेक भाषणें झालीं. लिबियांतील अपयशामुळें इंग्लंडमध्यें व कॉमन्स सभेंत असमाधानाचें वातावरण पसरलें होतें तरी युद्ध-धोरणांत सुधारणा अगत्य व्हावी ह्याच्या पलीकडे जाऊन मि. चर्चिल ह्यांस मुख्य प्रधानाच्या जागेवरून दूर करावें किंवा त्यांचें स्थान अपमानास्पद व्हावें असें बहुसंख्य लोकांस मुळीच वाटत नव्हतें. ह्या कारणानें भाषणें कांहीं झालीं तरी अखेर मि. चर्चिल ह्यांचा दणदणीत विजय होणार हें स्पष्टच होतें. त्यांच्या बाजूनें ४७५ आणि विरुद्ध केवळ २५ एवढ्या बहुमतानें सर जॉन ह्यांचा ठराव हाणून पाडला गेला. मंत्रिमंडळानें ब्रिटिश सैन्यास चांगली लढाऊ सामुग्री पुरवली नाहीं, मि. चर्चिल ह्यांचें धोरण वारंवार चुकलें, इत्यादि आशयाच्या वैयक्तिक आणि सर्वसाधारणपणाच्या टीकेचा भडिमार मुख्य प्रधानांवर करण्यांत आला. त्यांच्या अखेरच्या उत्तरांत वस्तुस्थितीचें प्रांजलपणाचें निवेदन भरलें होतें आणि मुख्य प्रधानाच्या जागेची जबाबदारी व युद्ध-धोरणाचें नेतृत्व ह्यांची फारकत करण्याचा अप्रयोजकपणा व अव्यावहारिकता त्यांनीं श्रोत्यांच्या नजरेस आणून दिली. गेल्या कांहीं महिन्यांतल्या युद्धाच्या हालचालींचें सिंहावलोकन करून शस्त्रास्त्रांचें उत्पादन इंग्लंडमध्यें कसें व किती झालें, युद्धसामुग्री रशियास कशी पुरवण्यांत आली, इत्यादि बाबींची माहिती देऊन टीकाकारांस त्यांनीं व्यवस्थित उत्तर दिलें. रशियन सैनिकांच्या पराक्रमाची स्तुति करून ब्रिटिश फौजेच्या शौर्याविषयीं त्यांनीं समाधान व्यक्त केलें. लिबियांतील ब्रिटिश सेनानींवर स्वतःचें मत आपण कधींच लादलें नाहीं असें सांगून इजिप्तमध्यें चाललेल्या लढाईत शक्य तितकी मदत दिली जात असल्याविषयीं त्यांनीं आश्वासन दिलें. रणांगणावर लढणारी सेना आणि तिच्या हालचाली निश्चित करणारे सेनानायक ह्यांस आपल्या वरिष्ठांचा म्हणजे मध्यवर्ती युद्ध मंडळाचा पूर्ण विश्वास आहे असें असंदिग्धपणानें वाटलें पाहिजे, तरच त्यांचे हातून चांगली कामगिरी होऊं शकते. त्याचप्रमाणें, मंत्रिमंडळास पार्लमेंटच्या पाठिंब्याची खात्री वाटली पाहिजे ही विचारसरणी पुढें मांडून कॉमन्स सभेस आपले मंत्री बदलण्याची पूर्ण मुभा असून स्वतःची त्या सभेचा निकाल निमूटपणें मान्य करण्याची तयारी मि. चर्चिल ह्यांनीं दाखविली. प्रस्तुत युद्ध चालू सालीं पुरें होणार नसून खडतर मार्गानें संयुक्त राष्ट्रांस अजून जावें लागणार आहे ह्या आपल्या मताचा त्यांनीं पुनरुच्चार केला. तथापि एकूण परिस्थितीचें सूक्ष्म दृष्टीनें अवलोकन केलें असतां ती हळु हळु सुधारत असून निराशेस मुळींच जागा नाहीं असा विश्वास त्यांनीं प्रकट केला. त्यांच्या कुशल व ठसकेबाज भाषणाचा अनुकूल परिणाम कॉमन्स सभेवर होऊन केवळ पंचवीस कट्टर विरोधक बाजूस राहून प्रचंड बहुमतानें त्यांस पाठिंबा दिला. इंग्लंडमधील दूषित राजकीय वातावरण ह्या रीतीनें निवळल्याकारणानें शत्रूंची जशी निराशा होईल तसा संयुक्त राष्ट्रांचा हुरूप वाढेल ह्यांत संशय नाहीं. इंग्लंडमधील व अमेरिकेंतील वृत्तपत्रांचे अभिप्राय प्रसिद्ध झाले आहेत त्यांचे योगानें ह्या विचारास पुष्टी मिळते.

## वेस्टर्न इंडिया विमा कं. लि.

वरील कंपनीची सुस्थिति, भक्कमपणा, तिच्या चालकांचें व्यवहारी व काटकसरीचें धोरण, तिनें विमेदारांस दिलेल्या सवलती, इत्यादींचा उल्लेख आम्हीं वारंवार करीत आलों आहों. वेस्टर्न इंडियाचा १९४१ असेरचा अहवाल आतां प्रसिद्ध झाला आहे, त्यावरून कंपनीनें आपला सर्व बाबतींतील लौकिक कायम राखला असल्याचें दिसून येतें. कंपनीचे अध्यक्ष, श्री. अण्णासाहेब आपटे, ह्यांनीं तिच्या ३० जून १९४२ च्या सर्वसाधारण सभेंत भाषण केलें, त्याचा सारांश आजच्या अंकांत दुसरीकडे छापला आहे, तो बोधप्रद आहे. १९४१ मध्यें कंपनीस मिळालेल्या कामांत दोन लाखांचेवर वाढ झाली, लाइफ ॲशुअरन्स फंडांत १६ लक्ष ८२ हजारांची भर पडून तो १ कोटि,४४$\frac{3}{4}$ लाखांवर गेला, इन्व्हेस्टमेंटची हिशेबांतील १ कोटि २३ $\frac{1}{2}$ लक्ष रुपयांची रकम त्याच्या बाजारभावानें होणाऱ्या किंमतीपेक्षा १५ लाखांनीं कमी आहे व ही अनुकूल तफावत हिशेबांत धरलेली नाहीं, खर्चाचें प्रमाण २२·५१% चें २१·४१% झालें आहे, लॅप्सचें प्रमाण नेहमींप्रमाणेंच कमी आहे, कंपनीनें पुरस्कार केलेली युनायटेड वेस्टर्न बँक चांगला नफा दाखवीत आहे, इत्यादि बाबी त्यांचे भाषणांत ठळकपणें दिसतात.

सध्याच्या युद्धजन्य परिस्थितींत विम्याचे संरक्षणासंबंधीं कांहीं लोक साशंक झालेले आढळतात. युद्धाच्या धामधुमींत विमेदारास मृत्यु आल्यास त्याच्या विम्याचे पैसे देण्यास हिंदी विमा कंपन्या बांधलेल्या आहेत, ही गोष्ट त्यांनीं जाहीर केलीच आहे. विमा कंपन्या आपले पैसे एकाच ठिकाणीं न गुंतवितां त्या आपली जिंदगी ठिकठिकाणीं पेरून ठेवतात. त्यामुळें, कंपन्यांच्या सबंध जिंदगीचा नाश होण्याचा संभव बिलकूल नसतो. तसेंच विमा कंपन्यांकडून लहरीप्रमाणें पैसे मागण्याचा अधिकार विमेदारांस नसतो. कराराप्रमाणें क्लेम उपस्थित झाल्यावरच कंपनी त्याचे पैसे देते. युद्धजन्य मृत्यूंचें व त्यांच्या क्लेम्सचें प्रमाण गेल्या महायुद्धांत किती अल्प होतें व चालू युद्धांत त्याहिपेक्षां तें कसें कमी आहे, ह्याची माहिती "अर्था"मध्यें आलेलीच आहे. तेव्हां, क्लेम्सची गर्दी उडून जाण्याचा प्रसंग उद्भवण्याचा संभव बिलकुल नाहीं व विमा कंपन्या आपले करार पार पाडूं शकतील, हें स्पष्ट दिसतें.

सर्वसाधारण विमा कंपन्यांसंबंधीं लागू पडणाऱ्या वरील विधानांची सत्यता वेस्टर्न इंडियाचे बाबतींत विशेष प्रामुख्यानें आढळून येईल. तिचे ताळेबंदांत सहा लाखांची गंगाजळी दाखविलेली आहे, त्याखेरीज १५ लाखांचा गुप्त रिझर्व तिचेजवळ आहे. हा २१ लाखांचा निधि बाजारभावांतील भरमसाट चढउतारासहि तोंड देण्यास समर्थ आहे. एकूण जिंदगीशीं रिझर्व्हसूचें इतकें अनुकूल प्रमाण इतरत्र क्वचितच आढळेल. वेस्टर्न इंडियावरील जनतेचा विश्वास अढळ आहे, ह्याचें चिन्ह म्हणजे कंपनीनें खर्चाचें प्रमाण १·१०% नें खालीं आणूनहि तिच्या कामांत गेल्या वर्षी २ लाखांनीं वाढ झाली व ती ९८$\frac{1}{2}$ लक्ष रुपयांचे विमे उतरवूं शकली. मूल्यमापनांत गृहीत धरलेल्या प्रमाणापेक्षा रिन्युअल खर्चाचें प्रमाण पुष्कळच अल्प आहे व विमे रद्द होण्याचें प्रमाण वेस्टर्न इंडियाचे बाबतींत नेहमींच कमी असतें, ते १९४१ मध्यें आणखी खालीं गेलें आहे. म्हणजे विमेच्छू वेस्टर्न इंडियाची विमा उतरण्यासाठी निवड करीत आहेत व जुने विमेदार सध्याच्या बिकट परिस्थितींतहि विश्वसनीय आधार ह्या दृष्टीनें तिचेकडे पाहून आपले विमे निःशंकपणें चालू ठेवीत आहेत. सावधगिरीच्या व काटकसरीच्या धोरणानें वेस्टर्न इंडियानें हिंदी कंपन्यांत अग्रस्थान पटकावलें आहे व विमेदारांस सढळ बोनस वाटूनहि तिनें आपली मजबुती कायम राखली आहे व वाढविली आहे. १९४१ सालाचा कंपनीचा अहवाल तिला भूषणावह असून, तिच्या चालकांचें कंपनीच्या अखण्ड प्रगतीबद्दल अभिनंदन केलें पाहिजे.

### सुपरिंटेंडेंट ऑफ इन्शुअरन्सची मराठा चेंबरला भेट

हिंदुस्थान सरकारचे सुपरिंटेंडेंट ऑफ इन्शुअरन्स मि. जे. एच. टॉमस ह्यांनीं मराठा चेंबरला ता. ६ रोजीं सायंकाळीं अनौपचारिक रीत्या भेट दिली, त्यावेळीं युद्धपरिस्थितीमुळें निर्माण झालेले आयुर्विमाविषयक प्रश्न व विमा कायद्यांत आवश्यक असलेली सुधारणा ह्याविषयीं चेंबरनें आपलें म्हणणें त्यांचेपुढें मांडलें. मि. टॉमस ह्यांनीं त्यावर मोकळेपणानें चर्चा केली. कंपन्यांच्या खर्चाचें प्रमाण मर्यादित रहाण्यावर त्यांनीं विशेष भर दिला. बाकीचे बहुतेक सर्व प्रश्न, खर्च मर्यादित झाल्यास, आपोआप सुटण्यासारखे आहेत, असा त्यांचे म्हणण्याचा आशय होता.

### हिंदुस्थानांतील सहकारी चळवळीसंबंधीं आकडेवार माहिती

| सोसायटीचा प्रकार | संख्या | सभासद | खेळतें भांडवल | टीपा |
|---|---|---|---|---|
| | | | (रुपये) | (१) सभासद–सोसायट्या धरून |
| प्रांतिक बँका | १० | २३,२८१ (१) | १३,४१,२९,५०७ | (२) सभासद–सोसायट्या धरून |
| सेंट्रल बँका व बँकिंग यूनियन्स | ६०० | १,८४,२२५ (२) | २९,२१,५०,९५७ | (३) २४३ लँड मॉर्गेज बँका धरून |
| सुपरवायझिंग यूनियन्स | ५२१ | २८,१७० | | (४) १ विमा सोसायटी धरून |
| शेतकी क्रेडिट | १,०१,६४४(३) | } ४१,९०,९०९(५) | } ३६,७७,६३,११२(६) | (५) लँ. मॉर्गेज बँकांचे ९२,४३० |
| नॉन क्रेडिट | १७,३४४ (४) | | | व विमा सोसायटीचे ५३ धरून |
| बिगर शेती क्रेडिट | ६,९५१ | } १८,९०,६८३(८) | } २७,६९,६२,६१७ | (६) लँ. मॉर्गेज बँकेचे ६ कोटि,२५ |
| नॉन क्रेडिट | ९,८०९ (७) | | | लक्ष, ६६ हजार रु. धरून |
| | | | | (७) १३ विमा सोसायट्या धरून |
| एकूण... | १,३६,८७९ | ६०,८१,५७० (९) | १,०७,०९,८९,११३ | (८) ३५,६४७ वि. सोसायट्याच ध- |
| | | | | (९) फक्त प्राथमिक सोसायटीचेच सभासद |

## स्फुट विचार

### महागाईविरुद्ध मोहीम

कामगारवर्गाच्या रोजच्या रहाणीस लागणाऱ्या जिनसांच्या किंमतीमध्यें होणाऱ्या फेरबदलांचें टाचण करून त्यांची तुलनात्मक मांडणी करण्याचें कार्य मुंबई सरकारच्या एका लहान खात्याकडे सोपवलेलें आहे. मुंबईत व इतर औद्योगिक क्षेत्रांमध्यें किमती वरखाली होतात त्यांची मांडणी करण्याचा हेतु असा आहे कीं तेथील कामकऱ्यांस मिळणाऱ्या मजुरीचा पुरेपणा अथवा अपुरेपणा ध्यानांत यावा आणि तिच्यामध्यें वाढावा करण्याच्या आवश्यकतेचा विचार व्हावा. कारखान्यांचे मालक आणि कामकरी ह्यांचेमध्यें मजुरीबद्दल वांधे उत्पन्न होतात तेव्हां त्यांचा निकाल लावण्यास किंमतीच्या आकड्यांचा उपयोग होतो. त्यांच्या चरितार्थास लागणाऱ्या जिनसांची महागाई झाली असतां कामकऱ्यांच्या रहाणीवर प्रतिकूल परिणाम होतो आणि मजुरीचे दरांत वाढ करण्याची आवश्यकता उत्पन्न होते. पदार्थांच्या किंमतीविषयीं जून १५ तारखेस पुऱ्या होणाऱ्या महिन्याबाबतचे आकडे प्रसिद्ध झाले आहेत, त्यांवरून असें दिसतें कीं त्या महिन्यांत पूर्वीच्या तत्सम मुदतीच्या मानानें किंमतींत बराच वाढावा एकदम झाला. खाद्य पदार्थांची महागाई विशेषच वाढली असें आकडे सांगत आहेत. मुंबई शहरांत धान्य, साखर, कोळसा, राकेल, इत्यादि जिनसांच्या किंमतीचें व पुरवठ्याचें कडक नियंत्रण करण्याचे प्रयत्न सरकारनें चालवले आहेत त्यांचें महत्त्व वरील माहितीवरून सिद्ध होत आहे. तांदूळ व साखर ह्यांच्या पुरवठ्याचे संबंधांत करण्यांत आलेली नियंत्रणाची सरकारी योजना प्रसिद्ध झाली आहे. कामकरीवर्ग व सामान्य जनता ह्यांच्या हिताचे दृष्टीनें अशा योजना कार्यक्षम रीतीनें अंमलांत येणें अगत्याचें आहे.

---

### सरकार व जनता यांचें सहकार्य

खाण्यापिण्याच्या जिनसांची महर्घता झाली असतां समाजाची सर्वत्र आर्थिक घडी विस्कटते आणि अल्प प्राप्तीच्या लोकांस त्रास होतो. युद्धपरिस्थितींत किंमती स्थिर राहण्याचें महत्त्व किती आहे हें सांगण्याचें प्रयोजन नाहीं. जरूरीच्या मालाचा पुरवठा व्यवस्थित होण्यासाठी व्यापारी, सरकार आणि सामान्य जनता ह्यांचें पूर्ण सहकार्य होणें आवश्यक आहे. माल जवळ असतांना अधिक नफ्याच्या आशेनें तो विक्रीस बाहेर न काढणाऱ्या किंवा अवास्तव किंमतीस तो विकणाऱ्या व्यापाऱ्यांच्या विरुद्ध गाऱ्हाणीं अलीकडे बरींच ऐकूं येऊं लागलीं आहेत. मालाच्या पुरवठ्याचे संबंधांत व्यापाऱ्यांच्या कांहीं तक्रारी असल्यास त्या दूर करण्याचा शक्य तेवढा प्रयत्न सरकारनें करावा हें उचित आहे. तथापि, व्यापारी व दुकानदार ह्यांनीं सध्याच्या अडचणीच्या परिस्थितीकडे लक्ष देऊन जनतेची सोय पहाणें हें त्यांचें सामाजिक कर्तव्य आहे हें विसरून चालावयाचें नाहीं. किंमतींच्या तुलनात्मक आकड्यांची मांडणी करण्याच्या पद्धतीचा उल्लेख वर केला आहे. असे आकडे सर्व प्रांतांत एका विशिष्ट तत्त्वावर तयार केले गेल्यास त्यांचा विशेष उपयोग होईल ह्या बुद्धीनें हिंदुस्थान सरकारच्या विद्यमानें दिल्ली येथें गेल्या आठवड्यांत कारखानदार व कामगार ह्यांच्या प्रतिनिधींची एक परिषद भरली होती. तिच्या चर्चेमधून सर्वमान्य अशी अखिल भारतीय योजना बाहेर पडेल अशी अपेक्षा आहे.

---

### हिंदुस्थान सरकारचें नवें कर्ज

हिंदुस्थान सरकारनें आपल्या नवीन कर्जाच्या अटी जाहीर केल्या आहेत. १९५१–५४ च्या ३% जुन्या कर्जाप्रमाणेंच त्याची योजना आहे. कर्जाची परतफेड १९५१ ते १९५४ ह्यांचे दरम्यान सरकारच्या सोईप्रमाणें करण्यांत येईल. ८ जुलैपासून कर्जासाठी अर्ज स्वीकारण्यांत येतील. ११ जुलैपर्यंत शंभर रुपयांचा रोखा १०० रु. १० आ. ८ पैस मिळेल व त्यानंतर किंमतींत दर शेकडा दर आठवड्यास ८ पैंची वाढ होईल. शंभर रुपयांचें आठवड्यांत जेवढें व्याज होतें, त्याचा हिशेब करूनच ही वाढीची किंमत ठरविण्यांत आलेली आहे. कर्जावरील व्याज दर सहामाहीस, १५ सप्टेंबर व १५ मार्च रोजीं दिलें जाईल व तें देतांना प्राप्तीवरील कर कापून घेतला जाईल. १९४९–५२ चें कर्ज (दुसरें युद्ध कर्ज) सरकारनें १ फेब्रुवारी, १९४१ रोजीं जाहीर केलें होतें व त्याचे रोखे १४ फेब्रुवारी, १९४२ पर्यंत ठराविक किंमतीस घेतां येत असत. ह्या कर्जाचे रूपानें सरकारास ५९ कोटि, ६ लक्ष रुपये मिळाले. पुढें रोखेबाजाराची परिस्थिति बदलली व ह्या रोख्यांस मागणी राहिली नाहीं, इतकेंच नव्हे तर सरकारी किंमतीपेक्षा शेकडा तीन रुपयांनीं स्वस्त ते बाजारांत मिळूं लागले होते. ह्या कारणानें सरकारनें ३% १९४९–५२ च्या रोख्यांची विक्री बंद केली व परिस्थिति सुधारल्यावर नवें कर्ज काढण्याचें ठरविलें. त्याप्रमाणें १९५१–५४ चें नवें कर्ज हिंदुस्थान सरकारनें जाहीर केलें आहे.


---

### युद्धपरिस्थिति

रशियांत व इजिप्तमध्यें घनघोर संग्राम चालू झाला आहे आणि युद्धाच्या धडामोडींत निकराचे प्रसंग निर्माण झाले आहेत असें ताज्या बातम्यांवरून दिसतें. हिटलरच्या उन्हाळ्याच्या मोहिमेस आतां प्रारंभ झाला आहे ह्याविषयीं संशय नाहीं. ही मोहीम कांहीं आठवड्यांमागेंच चालू व्हावयाची, पण सेबॅस्टापोल येथें रशियन फौजेनें अतुल पराक्रम करून जर्मन सैन्याची प्रगति थोपवून धरली ह्यामुळें हिटलरची योजना फलद्रूप होऊं शकली नाहीं. सेबॅस्टापोल जर्मनांच्या हातीं गेलें आहे, पण तें ठाणें घेण्यासाठी हिटलरला लाखों सैनिक बळी द्यावे लागले असून त्याची लढाऊ सामुग्री नष्ट झाली आहे तिचें प्रमाण फार मोठें आहे. रशियन सैन्यानें सेबॅस्टापोल इतके महिने शत्रूच्या भयंकर हल्ल्यांस दाद न देतां शौर्यानें लढवलें ह्याचें चोहोंकडे कौतुक केलें जात आहे तें यथार्थच आहे. आतां खार्कोव्हच्या पूर्वेस व उत्तरेस रशियन फौजेची फळी फोडण्याची शत्रू शिकस्त करीत आहे. त्याचा हेतु कॉकेशस प्रांताचा मार्ग मोकळा करणें हा उघड आहे आणि त्याच्या सिद्धिप्रीत्यर्थ हिटलर आपले सैनिक व लढाऊ सामुग्री बेपर्वाईपणानें युद्धकुंडांत फेंकीत आहे. इजिप्तमध्यें रोमेलनें अलेक्झांड्रियाच्या मार्गानें धडक मारली; पण एल अलामीन येथें जनरल ऑकिन्लेक ह्यांनीं त्यास थोपवून धरलें असून ब्रिटिश विमानें व चिलखती गाड्या ह्यांचे हल्ले शत्रूवर जोरानें होत आहेत.

---

# विकासाचा अखंड बहर !



## चारहि बाजूंनीं प्रमाणबद्ध प्रगति

(आमच्या अठ्ठाविसाव्या वार्षिक इतिवृत्तावरून)

### मजबूती

कंपनीची एकूण जिनगी वीस लाखांनीं वाढली. पूर्वी कोणत्याहि वर्षी झाली नाहीं इतकी मोठी ही वाढ आहे. १९४१ अखेर एकूण जिनगी १ कोटी ६६ लक्षांहून अधिक आहे.

### वाढ

या वर्षांत एकूण ६८,७३,१४९ रुपयांचें नवें काम मिळालें. हें काम गतवर्षीच्या कामाहून शें. ३१ टक्के अधिक आहे. एकंदर चालू विम्यांत या वर्षी २१ लाखांची भर पडली. १९३५ पासून गेल्या सहा वर्षांत चालू काम २ कोटी ७६ लक्षांवरून ५ कोटी ३४ लक्षांवर गेलें.

### काटकसर

राहणीच्या खर्चाचें मान बेसुमार वाढलें असून सुद्धां खर्चाचें प्रमाण शेंकडा २२·५१ वरून २१·४१ वर आलें आहे. सतत टिकूं शकणाऱ्या भरभराटीची ही खूण आहे, तसेंच इतक्या लहान वयाच्या कंपनीस हें कमी खर्चाचें प्रमाण म्हणजे मोठें अभिमानाचें लक्षण आहे.

### सेवा

उतरलेले विमे रद्द होण्याचें प्रमाण कमी असणें हें विमेदारांचा संतोष संपादण्याबद्दल कंपनीची दक्षता आणि एजंटमंडळींची कर्तव्यक्षमता या दोन्हींचें निदर्शक आहे. विमे रद्द होण्याचें कंपनीचें १९४१ मधील प्रमाण हें पूर्वीच्या कोणत्याहि वर्षांपेक्षां कमी आहे. अखिल भारतांतसुद्धां हेंच कमींत कमी प्रमाण आहे.

## वेस्टर्न इंडिया विमा कंपनी लि., सातारा

पुणें शाखा:—१७९ बुधवार पेठ, बेलबाग चौक, पुणें २

## वेस्टर्न इंडिया विमा कंपनीची वार्षिक सभा

### चेअरमन, प्रो. ल. गो. आपटे, यांचें भाषण

१९४१ मध्यें कंपनीकडे एकंदर ८०,०३,७९५ रुपयांचें नवीन काम दाखल झालें. पैकी ६८,७३,१४९ रुपयांचें नवीन काम हप्ते येऊन पुरें झालें. या वर्षाच्या नव्या कामाची गेले सालच्या कामाशीं तुलना केल्यास या वर्षी दोन लाखांचे वर नवीन कामांत वाढ झाली असल्याचें आपणांस आढळून येईल. अहवालाच्या सालीं प्रीमिअमचें एकूण उत्पन्न रिइन्शुअरन्स प्रीमिअम वजा जातां रु. २५, ९३, १८२ चें झालें. इन्व्हेस्टमेंट वरील निव्वळ व्याजाचें व भाड्याचें उत्पन्न रु. ५, ५८, ०५१ जमा आहे. सर्व तऱ्हेचा खर्च वजा जातां या सालीं कंपनीला लाइफ अॅशुअरन्स फंडांत रु. १६, ८१, ९३३, ची भर घालता आली. त्यामुळें कंपनीचा एकंदर विमा फंड आतां रु. १, ४४, ७४, ६३१ इतका झाला आहे.

कंपनीच्या इन्व्हेस्टमेन्टची हिशेबी नोंदलेली खरेदीची एकूण किंमत रु. १, ३३, ३१, ९१९ असून कंपनीचे हिशेबाचे वर्षी ता. ३१-१२-४१ ला बाजारभावानें त्याची किंमत रु. १,४८, ३९, ०५१ इतकी होत आहे. कंपनीच्या लाइफ फंडावर सरासरी ३·९९ इतका व्याजाचा दर पडला आहे. १९४० सालीं हा दर ४·३२ इतका होता. हल्लींच्या परिस्थितींत उत्तम प्रतीच्या इन्व्हेस्टमेन्टवर शक्य तितकें जास्त व्याज मिळविण्याच्या दृष्टीनें डायरेक्टरांचे प्रयत्न चालू आहेत. अहवालाचे सालीं खर्चाचें प्रमाण शेंकडा २१·४१ आहे. १९४० सालीं तें २२·५१ होतें. नवीन कामांत वाढ असूनहि खर्चाचें प्रमाण कमी झालें आहे. त्याचप्रमाणें अहवालाच्या सालीं कंपनीच्या कामाचें लॅप्सचें प्रमाण नेहमींप्रमाणें कमी आहे.

आपल्या कंपनीची प्रगति सर्व बाजूंनीं चांगल्या प्रकारें प्रमाणबद्ध होत आहे व त्यामुळेंच हिंदी वरिष्ठ कंपन्यांत तिला मानाचें स्थान प्राप्त झालें आहे.

सांप्रतच्या परिस्थितींत नवीन भर पडणाऱ्या कामावरील हप्त्याच्या मोठमोठ्या रकमा पूर्वीप्रमाणें चांगलें व्याज येणेचे दृष्टीनें गुंतविणें दुर्घट झालें आहे. कंपनीच्या कामाचा प्रसार अधिक विस्तृत पायावर करण्याचें काम चिकाटीनें चालू आहे.

---

## वेस्टर्न इंडिया विमा कं. लि.

### वेस्टर्न इंडियाची सन १९४१ मधील प्रगति

| | |
|---|---|
| एकंदर चालू विमे | ५,३४,००,००० रु. |
| एकंदर जिंदगी | १,६६,७३,५८६ रु. |
| १९४१ मधील नवें काम | ६८,७३,१४९ रु. |
| वार्षिक प्राप्ति | ३१,६०,४३० रु. |
| लाइफ आणि रिझर्व फंड | १,५०,७१,३३९ रु. |
| ठेवींची मूळ किंमत | १,३३,३१,९१९ रु. |
| ठेवींची आजची बाजारी किंमत | १,४८,३९,०५१ रु. |
| यावरून दिसून येणारा गुप्त निधि | १५,०७,१३१ रु. |
| हिशेबांत दाखविलेला रिझर्व फंड | ५,९६,७०७ रु. |
| भागीदारांना नफा | शें. १० |
| खर्चाचें शेंकडा प्रमाण | २१·४१ |
| त्रैवार्षिक बोनस (प्रति सहस्र) हयातींतील | रु. ५४ |
| हयातीनंतरचे | रु. ६७॥ |

## हिंदी चलनी नोटा

### १९४१-४२

### नोटांची लोकप्रियता

व्यवहारांत खेळणाऱ्या चलनी नोटांपैकी दहा रुपयेवाली नोट सर्वांत अधिक (३९·६%) लोकप्रिय आहे त्याचे खालोखाल शंभर रुपयेवाली (३३·५%) व पांच रुपयेवाली नोट (१८·३%) येते. एक रुपयावाली नोट ही रुपयाच्या नाण्यासमान समजली जात असल्याकारणानें, तिचा विचार येथें केलेला नाहीं.

### 'जुन्या' नोटा

जी नोट चाळीस वर्षांत मोडण्याकरितां रिझर्व्ह बँकेकडे येणार नाहीं, ती खेळती नाहीं, असें समजण्यास रिझर्व्ह बँक कायद्याच्या ३४ व्या कलमानें बँकेस अधिकार दिलेला आहे. त्यास अनुसरून, १,१९,३८० रुपयांच्या नोटा गेल्या वर्षी 'जुन्या' ठरविण्यांत आल्या.

### गहाळ व चुरगळलेल्या नोटा

गेल्या वर्षी खालील तक्त्यांत दिल्याप्रमाणें गहाळ, नष्ट अथवा चुरगळलेल्या नोटांचे पैसे रिझर्व्ह बँकेनें त्यांच्या मालकांस दिले.

| नोटांचा प्रकार | संख्या | दिलेली रकम |
|---|---|---|
| गहाळ अथवा पूर्णतः: | | |
| नाश पावलेल्या नोटा | २४९ | १३,८५० |
| अर्ध्या नोटा | ७५९ | २३,५४५ |
| चुरगळलेल्या नोटा | ७५,२९१ | ६,५१,१९८ |

### बनावट नोटा

गेल्या वर्षी रिझर्व्ह बँकेकडे ८,१८८ बनावट नोटा दाखल झाल्या. १९४०-४१ मधील दाखल झालेल्या बनावट नोटांची संख्या १,३६६ होती. बनावट नोटांपैकी शेंकडा ८८ नोटा एक रुपयावाल्या होत्या. शेंकडा १० नोटा दहा रुपयेवाल्या होत्या.

---

## युद्धकैदी

ब्रिटिशांनीं मार्च, १९४२ अखेर शत्रुपक्षाचे ५,२०,००० सैनिक कैद केले आहेत, त्यांपैकी बहुतेक इटालियन व आफ्रिकन आणि कांहीं जर्मन आहेत. ब्रिटिशांचे, १,७५,००० सैनिक कैद झालेले आहेत, त्यांचा तपशील खालीं दिला आहे:—

### ब्रिटिशांचे कैदी सैनिक

डंकर्क : ४०,०००
नॉर्वे : ९५०
ग्रीस व क्रीट : १५,०००
लिबिया : (पूर्वीच्या लढाया) ४,०००, (टोब्रुक वगळून चालू लढाई) ९,८००.
टोब्रुक : २५,०००
हॉंगकॉंग : १०,०००
सिंगापूर : ७०,०००

### शत्रुपक्षीयांचे कैदी सैनिक

युरोपियन : लिबिया : १,६१,०००
पूर्व आफ्रिका : १,९३,०००
आफ्रिकन : लिबिया : १५,०००
पूर्व आफ्रिका : २,३०,०००

## N. V. WADNERKAR

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver,
Electro-plater & Manufacturer of Sporting
Trophies, Medals, Cups etc.

- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -

POONA CITY.


## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार


राहाणेची व भोजनाची उत्तम सोय




फोन नं. ७७९ गणपति चौक, व्यवस्थापक.



## DECCAN BOOK STALL

**Booksellers, Publishers & Subscription Agents**
**Fergusson College Road, Poona No. 4**

(1) We stock and supply Educational books, General books & Library books.

(2) We supply Government of Bombay and Government of India publications.

(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.

(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.



## विमेदार नि हवाई हल्ला

शत्रु राष्ट्राकडून हवाई हल्ला अगर तत्सम उपद्रव यापासून चिनलढाऊ नागरिकांच्या जीविताला येणाऱ्या धोक्याचा समावेश विमा पॉलिसीच्या अटींत होतो काय व त्यासाठी जादा प्रिमिअम भरावा लागेल काय ? असा प्रश्न साहजिकच नागरिकांमध्यें चर्चिला जात आहे.

## ट्रस्ट ऑफ इंडिया

**विमा कंपनीच्या**

**विमा पॉलिसीमध्यें हवाई हल्ल्यामुळें जीविताला होणाऱ्या अपायाचा अंतर्भाव होतो त्याकरितां जादा प्रिमिअम नाहीं.**

**तरी विलंब न लावतां—**
**तुमच्या नि तुमचा आप्तेष्टांचा विमा**

## ट्रस्ट ऑफ इंडिया

**विमा कंपनींतच उतरा.**

अध्यक्षः—श्रीमंत सरदार जगन्नाथ महाराज पंडित

माहितीपत्रकें विनामूल्य पाठवूं

ट्रस्ट ऑफ इंडिया विमा कं. लि.
लक्ष्मी रोड, पुणें २

वि. ह. देशमुख, बी. ए.
जनरल मॅनेजर



## महायुद्ध दाराशीं आलें
## परदेशी औषधें
## दुर्मिळ व महाग झालीं

पण

## भिण्याचें कारण नाहीं !!!

— कारण —

## आयुर्वेद रसशाळा पुणें लि०

या देशी औषधाच्या प्रसिद्ध कारखान्यानें तयार केलेलीं

- रक्तवर्धक,
- उपनाह,
- बालजिवन,
- कॅल्सीप्राल

*इत्यादि पेटंट, स्टँडर्ड व लोकप्रिय औषधें खात्री पटल्यामुळें*

**★ डॉक्टर्सहि वापरूं लागले आहेत. ★**

दरसाल बिनचूक नफा वाटणाऱ्या ह्या कंपनीचे शेअर्स व औषधें मागवा.

## आयुर्वेद रसशाळा पुणें लि०

मुख्य दुकान गणपति चौक, लक्ष्मीरोड, पुणें २.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व
रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनी 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ, ' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ८ पुणें, बुधवार, तारीख १५ जुलै १९४२ अंक २८

## विमेदार नि हवाई हल्ला

शत्रु राष्ट्राकडून हवाई हल्ला अगर तत्सम उपद्रव यापासून बिन-लढाऊ नागरिकांच्या जीविताला येणाऱ्या धोक्याचा समावेश विमा पॉलिसीच्या अटींत होतो काय व त्यासाठी जादा प्रिमिअम भरावा लागेल काय ? असा प्रश्न साहजिकच नागरिकांमध्यें चर्चिला जात आहे.

## ट्रस्ट ऑफ इंडिया

विमा कंपनीच्या

विमा पॉलिसीमध्यें हवाई हल्ल्यामुळें जीविताला होणाऱ्या अपायाचा अंतर्भाव होतो त्याकरितां जादा प्रिमिअम नाहीं.

तरी विलंब न लावतां—
तुमच्या नि तुमचा आप्तेष्टांचा विमा

## ट्रस्ट ऑफ इंडिया

विमा कंपनींतच उतरा.

अध्यक्षः—श्रीमंत सरदार जगन्नाथ महाराज पंडित

माहितीपत्रकें विनामूल्य पाठवूं

ट्रस्ट ऑफ इंडिया विमा कं. लि.
लक्ष्मी रोड, पुणें २

वि. ह. देशमुख, बी. ए.
जनरल मॅनेजर

## महायुद्ध दाराशीं आलें परदेशी औषधें दुर्मिळ व महाग झालीं

पण

भिण्याचें कारण नाहीं !!!

— कारण —

## आयुर्वेद रसशाळा पुणें लि०

या देशी औषधाच्या प्रसिद्ध कारखान्यानें तयार केलेलीं

- रक्तवर्धक,
- उपनाह,
- बालजीवन,
- कॅल्सीप्राल

इत्यादि पेटंट, स्टँडर्ड व लोकप्रिय औषधें खात्री पटल्यामुळें

★ डॉक्टर्सहि वापरूं लागले आहेत. ★

दरसाल बिनचूक नफा वाटणाऱ्या ह्या कंपनीचे शेअर्स व औषधें मागवा.

## आयुर्वेद रसशाळा पुणें लि०

मुख्य दुकान गणपति चौक, लक्ष्मीरोड, पुणें १.

महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर

## महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

# विविध माहिती

### मांसविक्रीवर निर्बंध

जुलै ८ ते जुलै २२ ह्या मुदतींत मांसाची विक्री करण्यास स्वित्सरलंडमध्यें मनाई करण्यांत आली आहे. शेतीचा विस्तार, वैरणीचा तुटवडा व जनावरांच्या संख्येंत घट, ह्यामुळें मांसाचा पुरवठा टिकणें अवघड झालें आहे, त्यासाठी ही योजना आहे.

### मुंबई पोर्ट ट्रस्ट

मुंबई पोर्ट ट्रस्टच्या ३१ मार्च १९४२ अखेर संपलेल्या वर्षाच्या हिशेबांत ९२ लक्ष रुपयांचा वाढावा दिसून येतो.

### टिटाघर पेपर मिल्स कं. लि.

वरील कंपनी १८८२ मध्यें रजिस्टर करण्यांत आली, म्हणजे चालू वर्ष हें तिच्या हीरक महोत्सवाचें वर्ष होय. युद्धपरिस्थिति लक्षांत घेऊन, हा उत्सव विशेष रीतीनें साजरा न करण्याचें कंपनीनें ठरविलें आहे. कंपनीच्या भांडवलापैकी हिंदी मालकीचें भांडवल किती आहे हें नक्की सांगणें कठीण आहे, परंतु तें सुमारें ७०% असावें, अशी माहिती कंपनीनें टारीफ बोर्डास दिली होती. वरिष्ठ नोकरवर्ग बाहेरून आणण्यांत येतो, परंतु केमिस्ट बहुतेक हिंदी आहेत. कंपनीनें कागद करण्यास प्रारंभ १८८४ मध्यें केला.

### ट्रेझरी बिलांवर १० आ. ३ पै व्याज

गेल्या आठवड्यांत रिझर्व्ह बँकेनें हिंदुस्थान सरकारचीं ८ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. १० आणे ३ पै इतका पडला.

### हिंदी कापडाचें उत्पादन

१९४०–४१ मध्यें हिंदी कापडाचें उत्पादन ४२६ कोटि वार झालें. त्याच्या पूर्वीच्या सालांतला हा आकडा ४०१ कोटि वार होता.

### इटालिअनांस स्वदेशीं पोचविलें

सुमारें १० हजार बिन-लष्करी इटालिअन लोकांस आफ्रिकेंतून इटलींत ब्रिटिशांच्या देखरेखीखाली स्विस सरकारचे मार्फत पोचविण्यांत आलें.

### माहिती-खात्याचा खर्च

ब्रिटिश माहिती-खात्याचा चालू वर्षीचा खर्च सुमारें १२ कोटि रुपये होईल. म्हणजे, गतवर्षीपेक्षां तो ३½ कोटींनीं अधिक भरेल.

### ब्रिटिश रेडियोवर ४३ भाषांतून भाषणें

बी. बी. सी. वरून दर आठवड्यास ४३ भाषांतून बातम्या व भाषणें ब्रॉडकास्ट केलीं जातात.

### कोयनेलचा पुरवठा

हिंदुस्थानांतील कोयनेलच्या साठ्याच्या पुरवठ्याचें योग्य जतन करण्याची योजना आखण्याकरितां ११ जुलै रोजीं दिल्ली येथें एक परिषद भरविण्यांत आली. साठ्याची नीट वाटणी केली व त्याची निर्गत थांबविली तर युद्धसमाप्तीपर्यंत साठा पुरेल असें समजतें.

### प्रातिनिधिक चित्रपट

अमेरिकन जीवनाचें प्रातिनिधिक ह्या दृष्टीनें कांहीं चित्रपट निवडून काढावे म्हणजे आशिया खंडांतील लोकांस ते दाखवून खरें अमेरिकन जी[illegible] त्यांस समजावून देतां येईल, अशी विनंति मिस बक ह्यांनीं [illegible]रिकन चित्रपटविषयक मासिकांत केली आहे.

### स्कॉटलंडमध्यें देवीची सांथ

ग्लासगो (स्कॉटलंड) येथें देवीची सांथ आल्यामुळें तेथील ४ लक्ष लोकांनीं आपण होऊन टोचून घेतलें. मुंबईहून आलेल्या आगबोटींतील एका मनुष्यास देवी आल्या, त्यामुळें सांथ पसरली. आगबोटीशी संबंध आल्यामुळें स्कॉटलंडमध्यें १० व इंग्लंडमध्यें ३ लोकांना देवी आल्या, परंतु त्यांचा आगबोटीशी संबंध आलेला नव्हता. १९२० सालीं देवीचा प्रादुर्भाव झाला, त्यावेळीं ५४२ लोकांना देवी आल्या होत्या.

### जर्मन रणगाडे

जर्मन रणगाड्यांत हवा खेळती व थंड ठेवण्याची विशेष व्यवस्था केलेली आढळत नाहीं व त्या बाबतींत ब्रिटिश रणगाड्यांपेक्षा जर्मन रणगाडे श्रेष्ठ म्हणतां येत नाहींत असें मि. लिटिल्टन ह्यांनीं कॉमन्स सभेंत सांगितलें.

### यांत्रिक शिक्षणाचा प्रचार

पुणें जिल्ह्यांत हिंदुस्थान सरकारच्या टेक्निकल ट्रेनिंगच्या योजनेचा प्रचार करण्याकरितां वाघोलीचे जहागिरदार सरदार सर्जेराव रामराव जाधवराव व पुणें येथील रावसाहेब वाय. डी. खोले, एल. एस. जी. डी. ह्यांची नेमणूक झाली आहे.

### शालेय पुस्तकें बदलूं नका.

शालेय पुस्तकांत शक्य तेवढा कमी बदल करण्याविषयीं सूचना मद्रासच्या डायरेक्टर ऑफ पब्लिक इंस्ट्रक्शननें कागदाचा तुटवडा लक्षांत घेऊन त्या प्रांतांतील शाळांस केली आहे.

### सैनिकांस पोहण्याचें शिक्षण

ब्रह्मदेश व मलाया येथें आलेल्या अनुभवाचा फायदा घेऊन हिंदी सैनिकांस आतां नद्या पोहून जाण्याचें शिक्षण देण्यास प्रारंभ करण्यांत आला आहे. प्रथम स्तब्ध पाण्यांत त्यांस पोहण्यास शिकवून नंतर त्यांस मोठ्या नद्या उतरून जाण्यास तयार केलें जातें.

### ब्रह्मदेशांतील परिस्थितीचें निवेदन

ब्रह्मदेशचे गव्हर्नर, सर रेजिनाल्ड डॉर्मन स्मिथ, ह्यांनीं इंग्लंडमध्यें जाऊन ब्रह्मदेशांतील परिस्थिति ब्रिटिश सरकारास निवेदन केली, परंतु ही माहिती तूर्त प्रसिद्ध करण्यांत येणार नाहीं, असे भारतमंत्रि, मि. एमरी ह्यांनीं कॉमन्स सभेंत सांगितलें.

### ग्रेडी शिष्टमंडळाच्या शिफारसी

ग्रेडी शिष्टमंडळाच्या शिफारसींचा संपूर्ण अहवाल प्रसिद्ध करण्यांत येणार नाहीं; अहवालाचा मथितार्थ प्रसिद्ध केला आहे, तो मूळ अहवालाचा यथातथ्य सारांश आहे, असें मि. एमरी ह्यांनीं कॉमन्ससभेंत जाहीर केलें.

### सेंट्रल बँक ऑफ इंडिया, लि.

वरील बँकेस १९४२ च्या पहिल्या सहामाहींत, मागील शिल्की नफा धरून, २३ लक्ष रुपये नफा झाला. पहिल्या सहामाहीचें ८% करमाफ डिव्हिडंड डायरेक्टरांनीं जाहीर केलें आहे.

### गव्हाचें पीक

गेल्या २५ वर्षांत अमेरिकेंत कधींहि आलें नाहीं, इतकें चांगलें गव्हाचें पीक यंदा येईल, असा अंदाज आहे.

### हिंदी रेल्वेजचें उत्पन्न

१९४१-४२ मध्यें हिंदी रेल्वेजचें एकूण उत्पन्न १२८ कोटि, ७४ लक्ष रुपये भरलें. दुरुस्त अंदाजापेक्षाहि प्रत्यक्ष उत्पन्न पावणेदोन कोटींनीं अधिक झालें आहे.

अनुक्रमणिका

पृष्ठ
१ विविध माहिती ... २२०
२ गेल्या तीन वर्षांचा आढावा ... ... २२१
३ सोनें व चांदी ... २२२
४ नाणीं ... ... २२२
५ स्फुट विचार ... २२३
चीनचा अनुकरणीय पराक्रम—खर्च कमी करा—रोख्यांत पैसे गुंतवा—साखरेचा पुरवठा
६ टाटा आयर्न अँड स्टील कंपनी ... ... २२४
७ माल्टा ... ... २२४
८ जळगांव तालुका डेव्हलपमेंट अँग्रि. असोसिएशननें धान्य-पेरणीवाढीसंबंधीं केलेला विचार... ... २२५
९ धान्य परिषद ... २२५

# अर्थ

बुधवार, ता. १५ जुलै, १९४२

## गेल्या तीन वर्षांचा आढावा

### सर रामस्वामी मुदलियार ह्यांचें भाषण

चालू महायुद्धास प्रारंभ झाल्यानंतर कांहीं काळ त्याचा आर्थिक परिणाम हिंदुस्थानास फारसा जाणवला नाहीं, तरी हळूहळू परिस्थिति विकट होत गेली व हिंदुस्थानाचें परराष्ट्रीय गिऱ्हाइक कमी कमी होऊं लागलें. युद्धविषयक उत्पादनाची हिंदुस्थानांत वाढ करण्याची आवश्यकता निर्माण झाली व त्यासाठी ईस्टर्न ग्रुप सप्लाय कौन्सिलमार्फत योजनाहि आखण्यांत आली. कपाशी, भुईमूग, इत्यादि व्यापारी पिकांची निर्गत रोडावल्याकारणानें त्यांच्या मागणी-पुरवठ्याचा मेळ बसेनासा झाला व बाजारभाव घसरले. हिंदी पिकांचा जगांतील इतर देशांत उठाव कसा करतां येईल व हिंदुस्थानांतहि त्यांस मागणी कशी वाढवितां येईल, हा प्रश्न हिंदी शेतकऱ्यांचे दृष्टीनें अत्यंत जिव्हाळ्याचा होऊन बसला. हिंदुस्थान सरकारचे व्यापारमंत्री, सर रामस्वामी मुदलियार, ह्यांची आतां ब्रिटिश युद्धमंत्रिमंडळावर हिंदुस्थान सरकारचे प्रतिनिधि म्हणून नेमणूक झाली असल्यानें, त्यांनीं आपल्या मद्रास येथील भाषणांत आपल्या गेल्या तीन वर्षांच्या कारकीर्दीचा आढावा घेतला. त्यांत त्यांनीं हिंदुस्थानानें बदललेल्या परिस्थितीस कसें तोंड दिलें, ह्याची माहिती सांगितली. शेतकऱ्यांच्या हितास प्राधान्य देऊनच सरकारनें आपल्या योजना आखल्या, असें ते म्हणाले. शेतीच्या मालाची किंमत उचलून धरण्याची आवश्यकता निर्माण झाली व सरकारास मोठ्या तातडीनें त्यासंबंधांत व्यवस्था करावी लागली. भुइमुगाचे बाबतींत सरकारनें किंमत कशी ठरविली, कांहीं व्यापारी अगदीं अल्प किंमतीस भुइमूग कसा मिळवूं शकले, सरकारनें त्यांचेकडून किमान किंमत व त्यांनीं प्रत्यक्ष दिलेली किंमत ह्यांचेमधील तफावत कशी वसूल करून घेतली, ह्या रकमेचा फंड निर्माण करून त्याचा विनियोग शेतकऱ्यांचे हितासाठी कसा केला जाईल, इत्यादीविषयीं त्यांनीं माहिती दिली व इतर बाबतींतहि सरकारनें असेच नेटाचे प्रयत्न केले असल्याचें सांगितलें.

औषधें, रसायनें, शास्त्रीय उपकरणें, इत्यादींचे बाबतींत हिंदुस्थान शत्रुपक्षीय देशांवर मुख्यतः अवलंबून होता. युद्धपरिस्थितीमुळें हिंदुस्थानांतील त्यांची आयात स्वाभाविकच थांबली आहे. हिंदुस्थान सरकारनें त्यांच्या उत्पादनाचा प्रश्न तात्काळ हातीं घेतला व आज त्यासंबंधांतील एकूण मागणीपैकीं तीन-चतुर्थांश मागणी हिंदुस्थानांतील उत्पादनानें पुरी होत आहे, असें व्यापारमंत्र्यांनीं सांगितलें. बोर्ड ऑफ इंडस्ट्रिअल अँड सायंटिफिक रिसर्चतर्फे सुमारें २०० शास्त्रज्ञांचें सहाय हिंदुस्थान सरकारास मिळत आहे. एखाद्या विशिष्ट धंद्यापुरतें संशोधन चालू न ठेवतां एकंदर सर्व कारखाने व धंदे ह्यांस उपयोगी पडेल अशा रीतीनें ह्या बोर्डाचें काम चालू आहे. सहाजिकच, ह्या संशोधनाचें फळ तात्काळ दिसण्याजोगें नाहीं. औद्योगिक संशोधनाकडे सरकारनें आजवर पुरेसें लक्ष पुरविलें नव्हतें; आतां प्रस्तुत बोर्डाच्या स्थापनेमुळें संशोधनाबाबतची आपली जबाबदारी सरकारनें मान्य केली आहे. परंतु त्याचे महत्त्वास अनुसरून त्यावर अधिक खर्च केला जाणें अगत्याचें आहे, असें लोकमत बोर्डाचे स्थापनेवेळींच व्यक्त झालें होतें. महागाई मर्यादेंत राखून बाजारभावांचें योग्य नियमन करणें अत्यंत अवघड आहे, हें व्यापारमंत्र्यांनीं कबूल केलें. किंमतींच्या नियमनाचे बाबतींत सरकारास यावें तितकें यश अद्याप आलेलें नाहीं, असा त्याचा अर्थ निघतो. प्रांतिक सरकारांनीं अगोदरच अनेक कामांनीं बेजार झालेल्या सारावसुलीच्या अंमलदारांकडे बाजारभाव-नियंत्रणाचें काम न सोपवितां त्यासाठी स्वतंत्र इन्स्पेक्टरांची योजना करावी, असें त्यांनीं सुचविलें. गव्हाच्या किंमतींचे नियंत्रणाकरितां योजिलेल्या लायसेन्सच्या पद्धतीचाहि त्यांनीं उल्लेख केला.

आगबोटी, मोटारगाड्या, विमानें, इत्यादींच्या उत्पादनास व्यापारमंत्र्यांचे अमदानींत प्रारंभ होऊं शकला नाहीं, ह्याचें समर्थन करण्याचा प्रयत्न त्यांनीं केला. ह्या तिन्हींच्या उत्पादनासाठी कारखाने काढण्यास हिंदी लोक तयार होते व त्यासंबंधांतील योजनाहि तयार झाल्या होत्या. मोटारगाड्यांच्या उत्पादनासाठी काढावयाच्या कारखान्याची सर एम. विश्वेश्वर अय्या ह्यांची योजना सुप्रसिद्धच आहे. शेठ वालचंद ह्यांनीं विमानांचे कारखान्यासाठी पुष्कळ प्रयत्न केले व आगबोटींच्या धंद्याचा इतिहास तर पुष्कळ जुना आहे. सरकारनें ह्या प्रश्नाकडे मागेंच लक्ष पुरविलें असतें, तर आज युद्धप्रयत्नास त्याचा पुष्कळच उपयोग झाला असता. बाहेरून सुटे भाग आणून ते येथें जुळविल्यानें खरा कारखाना निर्माण होत नाहीं; माल तयार होण्यापूर्वीच्या सर्व क्रिया हिंदुस्थानांत होऊं शकतील अशी व्यवस्था अगोदर झाली पाहिजे असें व्यापारमंत्र्यांनीं सांगितलें. म्हणजे, रासायनिक उत्पादन वाढलें पाहिजे, इंजिनिअरिंगचा धंदा प्रस्थापित झाला पाहिजे, संशोधन शाळा काढल्या पाहिजेत, आवश्यक तें पोलाद व अल्युमिनियम तयार झालें पाहिजे, म्हणजे मग मोठे कारखाने काढतां येतील हा त्यांचा युक्तिवाद आहे. सर एम. विश्वेश्वर अय्या ह्यांच्या योजनेंत प्रथम तयार सुट्या भागांची जुळवाजुळव, नंतर एक एक भागाच्या उत्पादनास प्रारंभ व कांहीं वर्षांनीं स्वयंपूर्णत्व असा कार्यक्रम होता.

## सोनें व चांदी

मुंबई शहरांतील सोन्याच्या किंमतीमध्यें १९४१-४२ मध्यें कसा चढउतार झाला, हें खालील तक्ता दर्शवितोः—

तोळ्याची किंमत ( रु. )

| | सर्वांत जास्त | सर्वांत कमी |
|---|---|---|
| एप्रिल १९४१ | ४३—९—० | ४२—६—० |
| मे | ४२-१२—३ | ४२—०—३ |
| जून | ४२—६—९ | ४२—१—६ |
| जुलै | ४२—६—६ | ४१-११—० |
| ऑगस्ट | ४२—३—९ | ४१-१५—९ |
| सप्टेंबर | ४२—६—९ | ४२—२—० |
| ऑक्टोबर | ४२—३—९ | ४२—०—९ |
| नोव्हेंबर | ४४-१३—० | ४२—३—० |
| डिसेंबर | ५०—२—० | ४४—६—६ |
| जानेवारी १९४२ | ४७-१२—० | ४६—१—० |
| फेब्रुवारी | ५१—०—० | ४६-१५—० |
| मार्च | ५८—४—० | ५०—६—० |

गेल्या तीन वर्षांतील सोन्याचा भाव किती होता, हें खालील तक्त्यांत दाखविलें आहे :—

तोळ्याची किंमत ( रु. )

| | सर्वांत जास्त | सर्वांत कमी | सरासरी |
|---|---|---|---|
| १९३९-४० | ४३-८-० | ३६-९-० | ३९-१४-७ |
| १९४०-४१ | ४३-८-० | ४०-२-६ | ४२-७-११ |
| १९४१-४२ | ५८-४-० | ४१-११-० | ४४-१०-१० |

७ डिसेंबर, १९४१ रोजीं पूर्व एशियांत युद्धास प्रारंभ होतांच सोन्यास एकदम मागणी वाढली व त्याचा भाव ५० रु. २ आ. झाला, तो २४ तारखेस ४५ रु. ५ आण्यांवर आला. महिना अखेर तो ४७ रु. २ आण्यांवर आला. फेब्रुवारींचे शेवटच्या तारखेस सोन्याचा भाव ५१ रुपये झाला व १२ मार्च रोजीं त्यानें ५८ रु. ४ आ. चा उच्चांक गांठला. सॉव्हरीन्सला मागणी वर्षभर चांगली होती. १२ मार्च रोजीं त्याची किंमत सर्वांत जास्त म्हणजे ४२ रु. ८ आ. होती.

मुंबई शहरांतील चांदीच्या सर्वांत जास्त व कमी किंमतीचे तुलनात्मक आंकडे येथें दिले आहेत :—

प्रत्येक तोळ्याची किंमत ( रु. )

| | सर्वांत जास्त | सर्वांत कमी |
|---|---|---|
| १९३९-४० | ६६-४-० | ४४—७-६ |
| १९४०-४१ | ६४-१३-० | ५४-१०-० |
| १९४१-४२ | ९६-८-० | ६२—०-० |

सोन्याची किंमत वर-खालीं जाण्यास जीं कारणें कारणीभूत झालीं, त्याच कारणांनीं चांदीच्या बाजारांत आंदोलनें चढवून आणलीं. नोव्हेंबरपर्यंत बाजारांत चलबिचल नव्हती. जपानशीं युद्धास प्रारंभ होताक्षणीच चांदीचा भाव चढूं लागला. १९४१-४२ मधील बाजारभावाचीं स्थित्यंतरें पुढील तक्त्यांत दर्शविलीं आहेत:—

प्रत्येक १०० तोळ्यांची किंमत

| | सर्वांत ज्यास्त | सर्वांत कमी |
|---|---|---|
| एप्रिल १९४१ | ६३—६—० | ६२—६—० |
| मे | ६३—१—० | ६२—०—० |
| जून | ६२—१—० | ६२—९—० |
| जुलै | ६३—२—० | ६२-१२—० |
| ऑगस्ट | ६२-१५—० | ६२-११—० |
| सप्टेंबर | ६३—१—० | ६२-११—० |
| ऑक्टोबर | ६३—१—० | ६२—६—० |
| नोव्हेंबर | ६३—३—० | ६३—०—० |
| डिसेंबर | ७१-११—० | ६३—१—० |
| जानेवारी १९४२ | ७१—२—० | ६९—५—० |
| फेब्रुवारी | ८०—०—० | ६९-१४—० |
| मार्च | ९६—८—० | ८०—०—० |

## नाणीं

गेल्या वर्षीं मुंबई व कलकत्ता येथील टांकसाळींत किती नाणीं पाडलीं ह्याची माहिती खालील तक्त्यांत दिली आहे :—

| नाणें | मुंबई (रु.) | कलकत्ता (रु.) | एकूण (रु.) |
|---|---|---|---|
| रुपया | २५,०५,००,००२ | ... | २५,०५,००,००२ |
| अधेला | १,६५,००,००० | ... | १,६५,००,००० |
| पावली | ६७,३७,५८४ | ६५,५५,१७१ | १,३२,९२,७५६ |
| चवली | ११,६८,६७७ | ५६,४०,००० | ६७,९८,६७७ |
| आणेली | २७,९८,६६० | ५३,०६,५०० | ८१,०५,१६० |
| अर्धा आणा | २,४८,२८१ | ६,६९,७५० | ९,१८,०३१ |
| पैसा | १,८७,१८० | १८,९४,९०० | २०,८२,०८० |
| अधेला | ६,००० | ५५,७०० | ६१,७०० |
| पै | १,०३,३०० | १२,३०० | १,१५,६०० |
| | २७,८२,३९,६८६ | २,०१,३४,३२१ | २९,८३,७४,००८ |

### नवी अर्धी आणेली

पैशाच्या नाण्यास मागणी भयंकर वाढल्या कारणानें जानेवारी, १९४२ मध्यें सरकारनें नवी अर्धी आणेली काढण्यास प्रारंभ केला त्यामुळें नाण्याची बचत होत आहे. अर्धी आणेली, व चवली ह्यांच्या बनावटींत आतां ७९% तांबें, २०% कथील व १% निकेल घालण्यांत येतें.

### नाण्यांतील चांदीची बचत

चांदीच्या मामुली रुपयाच्या नाण्याचे जागीं ६ ठ्या जॉर्ज बादशहांच्या मुखवट्याचे रुपये प्रसृत करण्याच्या धोरणास अनुसरून १ एप्रिल १९४१ रोजीं व्हिक्टोरियाच्या मुखवट्याचे रुपये व अधेल्या परत मागण्यांत आल्या. पुढें एडवर्ड छापाचे रुपये व व अधेल्या ह्याहि ३१ मे नंतर चलन म्हणून स्वीकारण्यांत येणार नाहींत, असें जाहीर करण्यांत आलें. चांदीचीं नाणीं किती परत आलीं त्यांचा तपशील खालीं दिला आहे.

| नाणें | ( लक्ष रुपये ) |
|---|---|
| चवथा विल्यम १८३५ | ०.९६ |
| व्हिक्टोरिया १८४० | ८.६७ |
| जॉर्ज ( पांचवा ) १९११ | ०.०१ |
| ऑफ छाप | ०.०१ |
| झिजलेलीं नाणीं | १०.४३ |
| इतर नाणीं | २६.६७ |
| रुपये | ३८,९८.७९ |
| एकूण | ३९,०५.५४ |

## स्फुट विचार

### चीनचा अनुकरणीय पराक्रम

जपाननें चीनच्या स्वातंत्र्याचा व प्रदेशाचा अपहार करण्याच्या बुद्धीनें त्या देशाशी युद्ध आरंभलें त्यास गेल्या आठवड्यांत पांच वर्षें पुरीं होऊन सहावें वर्ष लागलें. या प्रसंगास अनुलक्षून आधुनिक चिनी राष्ट्राचे निर्माते, जनरल चियांग काय शेक, ह्यांचेवर इंग्लंड, अमेरिका, हिंदुस्थान, ऑस्ट्रेलिया इत्यादि देशांतून अभिनंदनपर संदेशांचा वर्षाव झाला हें यथायोग्यच झालें. चीनमध्यें संघटित राज्यव्यवस्था आणि लष्करी तयारी नाहीं असें पाहून जपाननें त्या देशावर स्वारी करून हळुहळु तो पादाक्रांत करण्याचा क्रम सारखा चालू ठेवला. ह्या संकटास तोंड देण्यासाठी चियांग काय शेक ह्यांनीं आपल्या लोकांत जूट घडवून आणली आणि स्वतःच्या स्फूर्तिदायक नेतृत्वाखाली शत्रूस पांच वर्षें सामना दिला आहे ही गोष्ट कौतुकास्पद आहे. जपाननें चालू युद्धाच्या आखाड्यांत उतरून फिलिपाइन्सवर हल्ला चढवून मलाया वगैरे देश पादाक्रांत केल्यापासून मित्र राष्ट्रें व चीन ह्यांची युद्धाची एकच फळी झाली. पूर्व एशियांत आज चिनी राष्ट्र जपानशी केवळ स्वतःच्या स्वातंत्र्याकरितां लढत नसून संयुक्त राष्ट्रांची बाजू त्यानें उचलून धरली आहे. चीनला एकाकी गाठून त्यास चीत करण्याचा जपाननें घाट घातला आहे. ह्या परिस्थितींत अमेरिका चिनी लोकांस शक्य तितकी लढाऊ मदत देण्याचा प्रयत्न करीत आहे. चीनचा दुर्दम्य आत्मविश्वास, त्याचें शौर्य, त्याची चिकाटी ह्या गोष्टींनीं जगास थक्क करून सोडलें आहे, आणि पूर्ण विजय प्राप्त होईतोंपर्यंत लढण्याचा त्या राष्ट्राचा निश्चय सर्वांस स्फूर्तिदायक होईल ह्यांत संशय नाहीं. आधुनिक शस्त्रास्त्रांच्या अभावीं तसल्या सामुग्रीनें सज्ज अशा शत्रूचा पांच वर्षें सारखा प्रतिकार करीत रहाणें ही चीनची सामान्य कर्तबगारी नव्हे, ह्याची सर्व जगास जाणीव झाली आहे. चीनला अधिक लढाऊ सहाय मिळून जपानचा पराभव होण्याचे कामीं तिचा व्यावहारिक उपयोग होईल अशी अपेक्षा आहे.

---

### "खर्च कमी करा; रोख्यांत पैसा गुंतवा"

हिंदुस्थान सरकारचें नवीन कर्ज निघालें आहे त्यास नाणे बाजाराची परिस्थिति हवी तशी अनुकूल आहे या गोष्टीचें दिग्दर्शन आम्हीं ह्यापूर्वींच केलें आहे. बँकांच्याकडे ठेवींचा पैसा पडून आहे आणि व्याजाचे दर उतरले आहेत. सरकारच्या ट्रेझरी बिलांस अपेक्षेच्या मानानें अधिक मागणी असून ती हलक्या व्याजानें विकलीं जात आहेत. तीन महिने मुदतीचा पैसा विशिष्ट मर्यादेच्या पलीकडे कर्जाऊ घेणें सरकारास सोयीचें नाहीं आणि त्याचें रूपांतर दशवार्षिक मुदतीच्या रोख्यांत करणें आवश्यक आहे. ह्याकरितांच सरकारचें नवें कर्ज निघालें आहे. त्यास उद्देशून गेल्या आठवड्यांत हिंदुस्थान सरकारचे फडनवीस, सर जेरेमी रेस्मन, ह्यांनीं रेडिओवर भाषण केलें आणि लोकांनी स्वतःच्या खर्चांत काटकसर करून तो बचतीचा पैसा नवीन रोख्यांत गुंतवावा असा उपदेश केला. असें करण्यानें नागरिकांस स्वार्थ आणि परमार्थ हीं दोन्हीं साधतां येतील, किंबहुना, त्यांच्या स्वार्थाच्या दृष्टीनेंहि हाच मार्ग श्रेयस्कर आहे असा युक्तिवाद त्यांनीं आपल्या भाषणांत पुढें मांडला. देशाचें आर्थिक यंत्र सुरळीत चालण्यांत पैसेवाल्यांचें हित आहे. त्यांची मालमत्ता सुरक्षित रहाण्यास देशांत आर्थिक व सांपत्तिक स्थैर्य अगत्याचें आहे आणि हें स्थैर्य सरकारच्या हातीं कर्जाच्या मार्गानें येणाऱ्या पैशावर अवलंबून आहे. युद्धपरिस्थितींत सर्व लोक एकाच नावेंत बसले आहेत आणि ती नाव सुरक्षित राहून पैलतीरावर जावी म्हणून प्रत्येकानें हातभार लावणें त्याच्या हिताचें आहे. ह्या कारणासाठी हिंदी जनतेनें स्वतःच्या खर्चांत शक्य तितकी बचत करून तो सरकारी कर्जांत घालावा अशी कळकळीची सूचना सर जेरेमी ह्यांनीं केली. सध्याचें युद्ध मोठ्या खर्चाचें आहे आणि तो खर्च सरकारास कर्ज काढूनच भागवला पाहिजे. लोकांनीं करावयाच्या काटकसरीचा दुहेरी उपयोग होतो. एक तर युद्ध चालवण्यास लागणारा पैसा तिच्या योगें सरकारच्या हातीं येऊन शत्रूवर मिळवावयाच्या विजयास सहाय दिल्याचें श्रेय जनतेच्या पदरीं पडतें. दुसरें असें कीं काटकसरीमुळें देवघेवींचे व्यवहार मर्यादित होऊन चलनांत बचत होते आणि महागाईस आळा बसतो. चलनाचा पुरवठा वाढून बाजारभाव चढणें अनिष्ट असल्यानें लोकांनीं काटकसरीचा आश्रय करून ही महागाईची प्रवृत्ति बंद पाडली पाहिजे ह्या मुद्यावरहि फडनवीसांनीं जोर दिला. "आज अत्यावश्य नसलेला खर्च उद्यावर ढकला" हें त्यांच्या भाषणांतलें मुख्य सूत्र होतें.

---

### साखरेचा पुरवठा

अलीकडे साखरेची दुर्मिळता व महर्घता ह्यांचे संबंधानें चोहोंकडे लोकांचीं गाऱ्हाणीं ऐकूं येत आहेत. सध्या साखरेचा पुरवठा व त्याची देशभर वांटणी ह्यांचें नियमन एका खास नेमलेल्या सरकारी अधिकाऱ्याकडे सोपवण्यांत आलें आहे. साखरेचा व्यापार आतां सर्वस्वी योजनात्मक पद्धतीनें व सरकारच्या देखरेखीखालीं होत असल्यानें येत्या हंगामांत तिचें उत्पादन किती व्हावें ह्याविषयीं चर्चा व निर्णय करण्यासाठी मध्यवर्ती साखर सल्लागार मंडळाची सभा दिल्ली येथें चालू महिन्याच्या शेवटच्या आठवड्यांत भरणार आहे. हिंदी साखरेचें उत्पादन एक वर्षीं कमी तर दुसऱ्या वर्षीं जास्ती झाल्याकारणानें तिच्या किंमती जोराचे हेलखावे खातात असें दिसून आलें आहे. पाऊसपाण्याच्या प्रतिकूलतेमुळें संयुक्त प्रांत व बिहार येथें उसाचें व साखरेचें उत्पादन कधी कधी मर्यादित होतें आणि हा तुटवडा भरून काढण्यासाठी दुसरे वर्षी उंसाची लागवड वाढवण्यांत येऊन साखर अधिक तयार होते. गेल्या वर्षी हिंदी साखरेचें एकूण उत्पादन नऊ लक्ष टन झालें आणि उस चांगला आला व साखरेस मागणी असली तर हा पुरवठा पन्नास टक्क्यांनीं वाढवतां येणें शक्य आहे. पण सध्याची मुख्य अडचण उत्पादनाबाबतची नसून रेल्वे वाहतुकीची आणि देशाच्या सर्व भागांस साखरेचा पुरवठा नीट होईल अशी व्यवस्था करण्याविषयींची आहे. गेल्या हंगामांतील साखरेपैकीं निम्मा माल कारखान्यांच्या साठ्यांत अजून पडून आहे असें म्हणतात आणि हें खरें असल्यास साखरेचा तुटवडा व महर्घता होण्याचें वास्तविक कांहींच कारण नाहीं. साखरेच्या व्यवहाराच्या नियंत्रणाची आखलेली व्यवस्था ठिकठिकाणीं नीट अंमलांत आलेली नसल्यानें अडचण भासत आहे असें सांगण्यांत येत आहे. ह्या प्रकरणीं पूर्ण चौकशी होणें अगत्याचें आहे.

---

## टाटा आयर्न अँड स्टील कं. लि.

इनकम् टॅक्स, सुपरटॅक्स, जादा नफ्यावरील कर, इत्यादींची तरतूद करून, १½ कोटि रुपये घसाऱ्यासाठीं बाजूस काढून व नोकरवर्गाच्या युद्धविषयक धोक्यासाठी २० लक्ष रुपयांचा तरतूद करून, टाटा कंपनीस १९४१–४२ अखेर ३ कोटि, ६७½ लक्ष रुपये निवळ नफा झाला. मागील वर्षांतील शिलकेचे १२ लक्ष रुपये व प्रेफरन्स भागावरील कापलेल्या इनकम् टॅक्सचे ११¾ लक्ष रुपये त्यांत मिळविले, म्हणजे नफावाटणीसाठी ३ कोटि, ९१¾ लक्ष रुपये येतात. त्यापैकीं १ कोटि रुपये रिझर्व्ह फंडांत टाकून डायरेक्टरांनीं खालीलप्रमाणें डिव्हिडंड वाटण्याचें ठरविलें आहेः—

| | रु. |
|---|---|
| फर्स्ट प्रेफरन्स भाग प्रत्येकीं ९ रु. | ४,५०,००० |
| सेकंड प्रेफरन्स भाग प्रत्येकीं ७ रु. ८ आ. | ५२,०३,६२२ |
| ऑर्डिनरी भाग प्रत्येकीं १५ रु. | ५२,६०,००० |
| डिफर्ड भाग प्रत्येकीं ७२ रु. ४ आ. ४ पै | ३५,२३,२०३ |
| ऑर्डिनरी भाग प्रत्येकीं १२ रु. ( डिपॉझिट सर्टिफिकेटचे स्वरूपांत ) | ४२,००,००० |
| डिफर्ड भाग प्रत्येकीं ८६ रु. ( डिपॉझिट सर्टिफिकेटचे स्वरूपांत ) | ४१,९२,५०० |
| नोकरवर्गास बोनस | ५१,६०,००० |
| पुढील वर्षांत ओढण्यास | ११,६३,७५१ |
| | २,९१,३३,०९६ |

ऑर्डिनरी व डिफर्ड भागांवरील डिव्हिडंडचा कांहीं अंश ( अनुक्रमें १२ रु. व ८६ रु. ) बेअरर डिपॉझिट सर्टिफिकेटांचे स्वरूपांत देण्यांत येत आहे. कंपनीला त्यामुळें सुमारें १ कोटि रुपये अल्प व्याजानें खेळतें भांडवल म्हणून वापरण्यास मिळेल.

### माल्टा

जर्मन बॉंब हल्ल्यांस आज इतका दीर्घ काळ चिकाटीनें तोंड देत असलेल्या माल्टा बेटाची माहिती येथें दिली आहे. इटली व आफ्रिका ह्यांचेमधील भूमध्य समुद्रांत, जेथें दोन्ही प्रदेशांतील अंतर सर्वांत कमी आहे, अशा ठिकाणीं माल्टा बेट आहे व त्या समुद्रांतून चालणाऱ्या आगबोटींच्या वहातुकीचे मार्गावरच तें आहे. वास्तविक कित्येक बेटांच्या समुच्चयास मिळून माल्टा असें नांव आहे, परंतु त्यांतील सर्वांत मोठ्या बेटासहि माल्टा म्हणतात. त्याची लांबी १७ मैल व रुंदी ९ मैल असून त्याचें क्षेत्रफळ ९१ चौरस मैल आहे. खिस्तापूर्वी सुमारें १४०० वर्षें फिनिशिअन्सनीं माल्टाचा ताबा मिळविला. त्यानंतर ग्रीक, कार्थेजिनिअन्स, रोमन्स, अरब, नॉर्मन्स, फ्रेंच व अखेर ब्रिटिश ह्यांनीं त्यावर सत्ता गाजविली. सन १८०० पासून माल्टावर ब्रिटिशांचा अंमल आहे. माल्टाची लोकसंख्या सुमारें २ लक्ष, ४० हजार, म्हणजे दर चौरस मैलास २०० आहे. माल्टांतून २ लक्ष, ५० हजार पौंड किंमतीच्या मालाची निर्गत होते, परंतु त्यांतील आयात ४० लाखांचे वर आहे. म्हणजे, ब्रिटिश आरमाराच्या संरक्षणावरच माल्टाचें जीवन अवलंबून आहे. शांततेच्या काळांतहि ब्रिटिश आरमाराचा तेथील वार्षिक खर्च १० लक्ष पौंडाचे वर आहे.

**अर्थशास्त्र**
लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें ३००; किंमत ३ रुपये
या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

**वक्तशीर आणि मनपसंत काम करून देणारे**
**मोहन वॉच कंपनी**
रेग्युलेशन मोफत
कॉमनवेल्थ बिल्डिंगसमोर लक्ष्मी रोड, पुणें २.



**मधुमेहावरील औषध**
तीन आठवड्यांचे औषधास फक्त रु. ७
— मागविण्याचा पत्ता —
मॅनेजिंग डायरेक्टर, रूरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड.
९२३ ए, सदाशिव, पुणें २.

**श्रीराम सिल्क मिल्स लि., बंगलोर**
[ कंपनीनें १९४१ अखेर ६ टक्के डिव्हिडंड वांटला आहे. ]
युद्धसाहित्यपुरवठा–खात्याची पॅरेशूटकरितां लागणाऱ्या
रेशमी कापडाची ऑर्डर पुरी करण्यासाठी लागणाऱ्या भांडवलाकरितां तूर्त एकूण रु. १ लक्षाच्या रकमेपर्यंत
**ठेवी घेणें आहेत**
व्याजाचा दर ४॥ ते ६ टक्के. ठेव किमान रु. ५०० ची असावी. ठेवीवरील व्याज दर सहा महिन्यांनीं दिलें जातें.
श्रीराम सिल्क मिल्स लि., श्रीरामबाग, बसवनगुडी, बंगलोर.
नारायण गोविंद नाईक, ( माजी अध्यक्ष, म्हैसूर चेंबर ऑफ कॉमर्स ) मॅनेजिंग डायरेक्टर
आमच्या कारखान्यांतील माल मुंबईस बॉम्बे स्वदेशी को–ऑपरेटिव्ह स्टोअर्समध्यें व पुण्यास लक्ष्मी रोडवरील रे म्युझिअमच्या व्यापार–संवर्धन–गृहांत पहा.

## जळगांव तालुका डेव्हलपमेंट ॲग्रि. असोसिएशननें धान्य-पेरणीवाढीसंबंधीं केलेला प्रचार

( लि. आ. म. )

महायुद्धामुळें व विशेषतः महायुद्धाची मजल अतिपूर्वेपर्यंत आल्यामुळें आखूड धाग्याच्या हिंदी कापसाला परदेशांतून असलेली मागणी जवळ जवळ अजिबात तुटली आहे. अशा प्रकारच्या कापसासाठी हिंदी गिरण्यांतून हल्ली जवळ जवळ कांहींच मागणी येत नाहीं. तसेंच परदेशी वाहतुकीस अडथळा व धोका निर्माण झाल्यामुळें कापसाच्या उठावासंबंधीं पेंचप्रसंग उत्पन्न झाला आहे. अशा परिस्थितींत चालू पेरणीचे हंगामांत कोणत्या पिकाची लागवड करावी याचें शेतकऱ्यांना योग्य मार्गदर्शन करण्याचें जळगांव असोसिएशननें ठरविलें आहे. या बाबतींत करावयाच्या प्रचाराची दिशा ठरविण्यासाठीं ता. १७।५।४२ ला असोसिएशननें आपल्या ऑफिसांत मॅ. कमिटीचे सभासदांची सभा भरविली. या सभेस सहकारी व शेतकी खात्याच्या अधिकाऱ्यांनाही बोलावण्यांत आलें होतें. "धान्य पिकें जास्त पेरा" हा प्रचार करण्यासाठीं ता. २४।५।४२ ते ३०।५।४२ अखेरपर्यंत प्रचारसप्ताह पाळण्याचें ठरविण्यांत आलें. प्रचाराचे सोयीसाठी जळगांव तालुक्यांतील लोकवस्तीच्या सर्व ८९ गांवांचे २४ विभाग पाडण्यांत आले व ते जमलेल्या मॅ. क. मेंबर्स असोसिएशनचा फील्ड स्टाफ व इतर ऑफिसर्स यांच्यांत वांटण्यांत आले. एकूण २४ ऑफिसर्स नेमण्यांत आले होते. या सप्ताहांत प्रत्येकानें आपापल्या भागांतील प्रत्येक खेड्यास भेटी दिल्या. खेड्यापाड्यांतून सभा भरविल्या, भाषणें केलीं व लोकांना अशा युद्धपरिस्थितींत या खरीपाचे हंगामांत कापूस, भुईमूग व यांसारखीं पिकें कमी पेरणें किती जरूरीचें आहे व ज्वारी, बाजरी, उडीद, गहूं, तूर अशा प्रकारच्या खाद्य पदार्थांची लागवड करणें किती महत्त्वाचें व जरूरीचें आहे हें पटवून दिलें.

वरील सप्ताहांत झालेल्या सभांना एकंदर ६,७२६ शेतकरी हजर होते. त्यांना खालील गोष्टी सांगण्यांत आल्या.

(१) मनुष्य खाऊन जगतो. तेव्हां जगण्यासाठी ज्वारी, बाजरी, गहूं, उडीद, तूर या खाद्य-पदार्थांची लागवड मोठ्या प्रमाणांत करा. खाद्य-पदार्थांची चांगल्या भावांत विक्री होईल व त्यामुळें फायदा होईल. तसेंच सरकारनें धान्याचे चालू भाव कायम ठेवण्याचें आश्वासन दिलें आहे. तरी या वर्षी खाद्य-पदार्थांची लागवड जास्त करा. ऐसपुरी ज्वारी, अकोला बाजरी, गहूं, साळ, भुईमुग शेंगा, उडीद हें बियाणें असोसिएशननें सांठवून तें शेतकऱ्यांना पुरविण्याची व्यवस्था केली आहे.

( २ ) आंखूड धाग्याच्या कापसाची लागवड करूं नका. कपाशीचें क्षेत्र ½ नें कमी करा.

( ३ ) जुन्या विहिरी दुरुस्त करून चालू करण्यासाठी सरकार तगाई रूपानें मदत करणार आहे. तरी या संधीचा शेतकऱ्यांनीं अवश्य फायदा घ्यावा.

अशा रीतीनें जळगांव तालुक्यांतील प्रत्येक गांवांत हा प्रचार करण्यांत आला. शेतकऱ्यांनीं चालूं खरीपाचे हंगामांत धान्य पिकें जास्त पेरण्याचें आश्वासन दिलें.

ता. २६।५।४२ रोजीं जळगांव येथें नटवर थिएटरमध्यें असो.च्या सर्व मेंबरांची सभा मे. जे. एम. कोरीन, आय. सी. एस. पू. खा. यांचे अध्यक्षतेखाली भरविण्यांत आली होती. सभेस ५०० चे वर शेतकरी हजर होते. मे. कलेक्टरांनीं आपल्या अध्यक्षीय भाषणांत चालू युद्धमान परिस्थितीची व तिचे प्रत्यक्ष परिणाम यांची माहिती देऊन खाद्यपदार्थ मोठ्या प्रमाणांत पिकविण्याचा मुद्दा शेतकऱ्यांच्या मनावर बिंबवून दिला. जमलेल्या सर्व शेतकऱ्यांनीं त्याप्रमाणें करण्याचें आश्वासन दिलें.

सप्ताहांतील प्रचारावरून असा विश्वास वाटतो कीं, गेल्या वर्षापेक्षा यंदा खाद्य–पिकांच्या लागवडीचें क्षेत्र २५ ते ३०% नें वाढेल.

---

## महाराष्ट्र खाद्य-धान्य उत्पादन-पुरवठा परिषद्

मराठा चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज या संस्थेच्या विद्यमानें पुणें येथें टिळक स्मारक-मंदिरांत रविवार ता. १९ जुलै १९४२ या दिवशीं महाराष्ट्रांतील खाद्य-धान्य व चारा यांचें उत्पादन व गरजा यांचा विचार करून मुंबई सरकारला या प्रश्नाबाबत विधायक सूचना करण्याकरितां या विषयाचा अभ्यास केलेले अर्थशास्त्रज्ञ, बागाइतदार, शेतकरी व व्यापारी यांची परिषद् रा.ब. सहस्रबुद्धे ह्यांचे अध्यक्षतेखाली भरणार आहे.

परिषदेंत प्रामुख्यानें पुढील विषयांचा विचार होणार आहे. (१) महाराष्ट्रांतील खाद्य-धान्यांचें व चाऱ्याचें उत्पन्न व गरजा यांचा विचार करून स्थानिक उत्पादन कमी पडत असल्यास ती वाण भरून काढण्याच्या उपायांचा विचार करणें. (२) जमीनधारा धान्याच्या रूपानें सरकारनें घेण्याची आवश्यकता आहे की काय याचा विचार करणें. (३) ज्या जिल्ह्यांत पुरेसें खाद्य-धान्यांचें उत्पादन होत नसेल त्या जिल्ह्यांत बाहेरून माल आणण्याकरितां लागणाऱ्या वाहतुकीच्या साधनांचा विचार करणें. (४) खाद्यधान्याचें उत्पादन वाढून अगर अन्य कारणानें शेतीमालाचा भाव पडूं लागल्यास शेतकऱ्यांना योग्य भाव मिळण्याकरितां सरकारनें काय करावें याचा विचार करणें. (५) महायुद्धकालीन गरज म्हणून व्यापारी पिकांचें उत्पादन कमी करून त्याऐवजीं खाद्य-धान्यें पिकवलीं जात आहेत. महायुद्धोत्तरकालीं खाद्य-धान्याबाबत जे प्रश्न नव्यानें उत्पन्न होतील त्यांचा आगाऊ विचार करण्याकरितां पुनर्घटना-समिति नेमण्याबाबत मुंबई सरकारला शिफारस करणें. (६) खाद्य-धान्यें व चारा यांचें उत्पादन वाढण्याबाबत सरकारकडून जे प्रयत्न चालू आहेत त्यांबाबत बिन सरकारी तज्ज्ञ व व्यापारी संघ यांच्या प्रतिनिधींचा सल्ला घेण्याची सरकारला शिफारस करणें.

---

### हरिजन विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण

दादर येथील झारापकर टेलरिंग कॉलेजमध्यें दरवर्षाप्रमाणें चालू वर्षी पांच हरिजन विद्यार्थ्यांना गव्हर्मेंट टेलर्स कोर्सचें कर्तनशिक्षण मोफत द्यावयाचें आहे. हें शिक्षण घेऊं इच्छिणाऱ्या हरिजन विद्यार्थ्यांनीं शिफारसपत्रांसह दि. २० जुलै १९४२ पर्यंत झारापकर टेलरिंग कॉलेज, दादर मुंबई नं. १४ या पत्त्यावर अर्ज करावे.

मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानी
असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् को-ऑपरेटिव् बँक, लिमिटेड.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी-सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंग
९, बेक हाउस लेन, कोट मुंबई.

शाखा

| | |
|---|---|
| १ बारामती ( जि. पुणें ) | १८ अकलूज ( जि. सोलापूर ) |
| २ सातारा ( „ सातारा ) | १९ विरमगांव ( „ अहमदाबाद ) |
| ३ इस्लामपूर ( „ „ ) | २० धुळें ( „ प. खानदेश ) |
| ४ कऱ्हाड ( „ „ ) | २१ दोंडाईचें ( „ „ ) |
| ५ तासगांव ( „ „ ) | २२ शिरपूर ( „ „ ) |
| ६ किर्लोस्करवाडी ( „ „ ) | २३ शहादें ( „ „ ) |
| ७ शिराळें ( „ „ ) | २४ नंदुरबार ( „ „ ) |
| ८ कोरेगांव ( „ „ ) | २५ साक्री ( „ „ ) |
| ९ वांई ( „ „ ) | २६ शिंदखेडें ( „ „ ) |
| १० अहमदनगर ( „ अहमदनगर ) | २७ तळोदें ( „ „ ) |
| ११ शेवगांव ( „ „ ) | २८ मालेगांव ( „ नाशिक ) |
| १२ कोपरगांव ( „ „ ) | २९ सटाणा ( „ „ ) |
| १३ बेलापूर ( „ „ ) | ३० कळवण ( „ „ ) |
| १४ राहुरी ( „ „ ) | ३१ लासलगांव ( „ „ ) |
| १५ भिवंडी ( „ ठाणें ) | ३२ नांदगांव ( „ „ ) |
| १६ पालघर ( „ „ ) | ३३ दोहद ( „ पंचमहाल ) |
| १७ कल्याण ( „ „ ) | ३४ कालोल ( „ „ ) |

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी
स्वीकारल्या जातात

आणि

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा
व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिस अगर शाखा-
कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.

## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

राहाणेची व भोजनाची उत्तम सोय




फोन नं. ७७९ गणपति चौक, व्यवस्थापक.

## N. V. WADNERKAR

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver,
Electro-plater & Manufacturer of Sporting
Trophies, Medals, Cups etc.

- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -
POONA CITY.

## DECCAN BOOK STALL

Booksellers, Publishers & Subscription Agents
**Fergusson College Road, Poona No. 4**

(1) We stock and supply Educational books, General books & Library books.

(2) We supply Government of Bombay and Government of India publications.

(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.

(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व
रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
(टपाल हंशील माफ)
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्य अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ८ | पुणें, बुधवार, तारीख २२ जुलै १९४२ | अंक २९

## विमेदार नि हवाई हल्ला

शत्रु राष्ट्राकडून हवाई हल्ला अगर तत्सम उपद्रव यापासून बिन-लढाऊ नागरिकांच्या जीविताला येणाऱ्या धोक्याचा समावेश विमा पॉलिसीच्या अटींत होतो काय व त्यासाठी जादा प्रिमिअम भरावा लागेल काय ! असा प्रश्न साहजिकच नागरिकांमध्यें चर्चिला जात आहे.

## ट्रस्ट ऑफ इंडिया

विमा कंपनीच्या
विमा पॉलिसीमध्यें हवाई हल्ल्यामुळें जीविताला होणाऱ्या अपायाचा अंतर्भाव होतो त्याकरितां जादा प्रिमिअम नाहीं.

तरी विलंब न लावतां—
तुमचा नि तुमच्या आप्तेष्टांचा विमा
**ट्रस्ट ऑफ इंडिया**
विमा कंपनींतच उतरा.

अध्यक्षः—श्रीमंत सरदार जगन्नाथ महाराज पंडित
माहितीपत्रकें विनामूल्य पाठवूं

ट्रस्ट ऑफ इंडिया विमा कं. लि. लक्ष्मी रोड, पुणें २ | वि. ह. देशमुख, बी. ए. जनरल मॅनेजर

## महायुद्ध दाराशीं आलें
## परदेशी औषधें
## दुर्मिळ व महाग झालीं

पण
भिण्याचें कारण नाहीं !!!
— कारण —
**आयुर्वेद रसशाळा पुणें लि०**
या देशी औषधाच्या प्रसिद्ध कारखान्यानें तयार केलेलीं

- रक्तवर्धक,
- उपनाह,
- बालजीवन,
- कॅल्सीप्राल

इत्यादि पेटंट, स्टँडर्ड व लोकप्रिय औषधें खात्री पटल्यामुळें
★ डॉक्टरसहि वापरूं लागले आहेत. ★
दरसाल बिनचूक नफा वाटणाऱ्या ह्या कंपनीचे शेअर्स व औषधें मागवा.

**आयुर्वेद रसशाळा पुणें लि०**
मुख्य दुकान गणपति चौक, लक्ष्मीरोड, पुणें २.

**महायुद्धाची जाणीव !** कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशांचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर

## महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

## विविध माहिती

**सर सी. व्ही. रामन**

सर सी. व्ही. रामन ह्यांस फ्रँकलिन पदक अर्पण करण्याचा समारंभ बंगलोर येथें नुकताच पार पडला. फिलॅडेल्फिया येथील फ्रँकलिन इंस्टिट्यूटनें हें पदक सर चंद्रशेखर ह्यांस त्यांच्या शास्त्रीय संशोधनाबद्दल नजर केलें आहे.

**इंपीरिअल बँक ऑफ इंडिया**

चालू वर्षाच्या पहिल्या सहामाहींत वरील बँकेस ५१ लक्ष रुपये नफा झाला, त्यांत मागील सालांतील शिलकी नफा मिळविला, म्हणजे ९६ लक्ष, ३१ हजार रुपये होतात. त्यांचा विनियोग खालीलप्रमाणें करण्यांत आला :—

| | रुपये |
|---|---|
| भागीदारांस १२% करमाफ डिव्हिडंड | ३३,७५,००० |
| रिझर्व्ह फंड | ७,५०,००० |
| पेन्शन फंड | १,२३,३०० |
| नोकरवर्गास बोनस | ८,५०,००० |
| पुढील हिशेबांत ओढण्यासाठी | ४५,१२,००० |

**कृत्रिम रबर**

अमेरिकेंत चालू वर्षी सुमारें ३२,३०० टन कृत्रिम रबर तयार होईल. पुढील वर्षी त्यांचा आकडा ३,२८,००० टनांवर जाईल व १९४४ मध्यें त्याचें उत्पादन ७ लक्ष भरेल असा अंदाज आहे.

**ट्रेझरी बिलांवर १० आणे व्याज**

गेल्या आठवड्यांत रिझर्व्ह बँकेनें हिंदुस्थान सरकारचीं ८ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं त्यांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शें. १० आणे इतका पडला.

**तुर्कस्थानाकडे हिंदी माल**

३५ लक्ष तुर्की पौंड किंमतीचें कापड हिंदुस्थानांतून तुर्कस्थानास पोंचलें आहे. १½ कोटि पौंडांचा आणखी माल ( कातडीं, कापड, सूत, इ. ) तिकडे लवकरच पाठविण्यांत येणार आहे.

**पाटी वापरा**

कागदाची काटकसर करण्याकरितां शाळांतून शक्य तेथें कागदाऐवजीं पाटीचा उपयोग करावा, अशी सूचना भोपाळमधील शाळांच्या चालकांस देण्यांत आली आहे.

**आगबोटींचा नाश**

७ डिसेंबरपासून १८ जुलैपर्यंत पश्चिम अटलांटिक महासागरांत दोस्त राष्ट्रांच्या व तटस्थ राष्ट्रांच्या मिळून ३७९ आगबोटी बुडाल्या, असें समजतें.

**कृत्रिम रबरी धावा**

कृत्रिम रबराच्या टायर्स कशा काय टिकतात हें पहाण्यासाठी अमेरिकेंतील लष्करी वाहनांस 'ब्यूना' टायर्स बसविण्यांत येणार आहेत.

**घड्याळाचे काटे पुढें सारण्यांत येणार**

येत्या सप्टेंबरपासून हिंदुस्थानांतील सर्व घड्याळें एक तास पुढें सारण्यांत यावयाचीं आहेत. प्रांतिक सरकारांचा ह्यासंबंधांत सल्ला विचारण्यांत आला आहे. विजेच्या खपांत त्यामुळें बचत होईल, कारण दिवसाचीं कामें एक तास अगोदर सुरू होतील व लोकांना रात्रीं लवकर निजावें लागेल.

**स्वस्तिक ऑइल मिल्स लि.**

वरील कंपनीस १९४१ सालीं ८९ हजार रुपये नफा झाला. भागीदारांस प्रत्येक भागास करमाफ १२ रु. मिळाले.

**मलाया व स्ट्रेट्स सेटलमेंटस ह्यांचीं युद्धकर्जें**

मलाया आणि स्ट्रेट्स सेटलमेंटस ह्यांनीं उभारलेल्या युद्धकर्जांवरील व्याजाची जबाबदारी सरकार घेईल काय, असें कॉमन्स सभेंत फडनविसांना विचारण्यांत आलें, तेव्हां ह्या प्रश्नाचा विचार सरकार अत्यंत काळजीपूर्वक व बारकाईनें करीत आहे, असें त्यांनीं उत्तर दिलें. ह्या युद्धकर्जाची रकम ब्रिटिश सरकारमार्फतच खर्च झाली होती व ब्रिटिश सत्तेखालील कोणत्याहि वसाहतीच्या कर्जाबाबत असा प्रश्न आजवर कधीं उपस्थित झाला नव्हता.

**राजमहेंद्री येथील कागदाची गिरणी**

मद्रास प्रांतांत राजमहेंद्री येथें दररोज आठ टन वजनाचा कागद तयार करण्याची शक्ति असलेली गिरणी आहे. पण ती कांहीं अंतर्गत वादामुळें गेले वर्षभर बंद पडली आहे. सध्या युद्धपरिस्थितीमुळें कागद दुर्मिळ झाला असतां असल्या कारखान्याचें महत्त्व मोठें आहे हें सांगावयास नको. आतां असें समजतें कीं, ही गोष्ट लक्षांत घेऊन मद्रास सरकारनें हिंदुस्थान सरकारास अशी सूचना केली आहे कीं, त्यांनीं राष्ट्रसंरक्षण-कायद्याखालीं राजमहेंद्रीची गिरणी आपल्या ताब्यांत घेऊन चालवावी. आंध्र प्रांतांतील कांहीं धंदेवाले हिंदुस्थान सरकारच्या व्यापारमंत्र्यांची गांठ घेऊन ह्या सूचनेस पाठिंबा देणार आहेत.

**इंग्लंडमधील बेकार कमी झाले**

युद्धापूर्वी इंग्लंडमधील बेकार लोकांची संख्या लक्षांनीं मोजली जात असे. युद्धामुळें काम करणाऱ्या लोकांस वाटेल तेवढी मागणी उत्पन्न झाली असल्यानें ही संख्या आतां एक लक्षाच्या खालीं गेली आहे. बेकारांची गणती करण्याची पद्धति इंग्लंडमध्यें चालू झाल्यापासून प्रथमच त्यांचें प्रमाण इतकें उतरलें आहे. युद्धकामासाठी माणसांची चणचण असतां एक लक्षहि बेकार वास्तविक राहूं नयेत.

**सरकारचें कस्टम्सचें उत्पन्न**

जून १९४२ मध्यें हिंदुस्थान सरकारास कस्टम्सचें २ कोटि ५२ लक्ष रुपये उत्पन्न मिळालें. मे, १९४२ मध्यें व जून १९४१ मध्यें तत्सम आकडा अनुक्रमें २ कोटि, ६८ लक्ष व ३ कोटि ९१ लक्ष रुपये होता.

**तांदळाच्या खरेदीविषयीं चौकशी**

सिलोन सरकारतर्फे हिंदुस्थानांत तांदूळ व इतर खाद्यपदार्थ ह्यांची सुमारें ८० लक्ष रुपयांची खरेदी करण्यांत आली, त्यासंबंधीं सिलोनमध्यें तक्रारी आल्याकारणानें तेथील सरकारनें चौकशीसाठी आपल्या ऑडिटर जनरलला मुंबईस पाठविलें आहे. सिलोनचे ट्रेड कमिशनर सिलोनकडे परतले आहेत. मुंबई, बेझवाडा व मद्रास येथील खरेदी व त्यास दिलेली किंमत ह्याविषयींचा हिशेब ऑडिटर जनरल तपासून पहातील.

**हैद्राबाद रेडिओ**

हैद्राबाद रेडिओवरून गेल्या महिन्यांत एकूण १७१ तास कार्यक्रम ऐकविण्यांत आले त्यांपैकीं ३४½ तासांचा विनियोग भाषणें, नाटिका इत्यादींकडे, २७½ तासांचा विनियोग बातम्यांकडे व १०९½ तासांचा विनियोग संगीताकडे करण्यांत आला.

अनुक्रमणिका

| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती | २२८ | सरकारची योजना—युद्धपरिस्थितींचें सिंहावलोकन. | |
| २ शेतीच्या जमिनीचें रक्षण | २२९ | ५ हिंदी जॉइंट स्टॉक बँका | २३२ |
| ३ युद्धपरिस्थितींत खाद्यपदार्थांचा पुरवठा | २३० | ६ ठेवींत वाढ | २३२ |
| ४ स्फुट विचार | २३१ | ७ ट्रेझरी बिलें | २३२ |
| मालमत्तेच्या युद्धविषयक नुकसानीचा विमा—मुंबई | | | |

# अर्थ

बुधवार, ता. २२ जुलै, १९४२

## शेतीच्या जमिनीचें रक्षण

हिंदुस्थानांत शेतजमिनीचा कस कमी होत आहे आणि तिची उत्पादनशक्ति ऱ्हास पावत आहे असें गाऱ्हाणें आज कित्येक वर्षें ऐकूं येत आहे. ह्या ऱ्हासाच्या एका मुख्य कारणाकडे मात्र जितकें लक्ष जावें तितकें तें जात नसून त्यावर परिणामकारक उपाययोजना व्हावी तशी होत नाहीं अशी वस्तुस्थिति आहे. शेतीच्या जमिनीची वरची माती पावसानें वर्षानुवर्ष वाहून गेल्यानें तिची पिकें देण्याची शक्ति सारखी क्षीण होत चालली आहे ह्या गोष्टीकडे मुंबई प्रांतांत अलिकडे लक्ष वेधलें गेल्याकारणानें सरकारानें मातीचा ऱ्हास थांबवण्याचे कांहीं प्रयत्न चालवले आहेत हें खरें आहे. परंतु ह्या प्रयत्नांस म्हणण्यासारखें यश येण्यास ते फार मोठ्या प्रमाणावर आणि पद्धतशीर रीतीनें झाले पाहिजेत हें येथें सांगणें आवश्यक आहे. पावसाच्या पाण्याबरोबर शेतजमिनीची माती किती व कशी वाहून जाते आणि त्या योगानें शेतीचें व समाजाचें किती भयंकर नुकसान होतें ह्याची यथार्थ कल्पना आल्यावांचून त्यावर कार्यक्षम उपाययोजना करण्याचें महत्त्व मनावर ठसावयाचें नाहीं. शेतांमध्यें बांधबंधारे घालून शेतकऱ्यांस जमिनीचा ऱ्हास थांबवतां येतो ह्याविषयींची माहिती प्रात्यक्षिकांच्या द्वारें देऊन त्यांच्या हातून संरक्षणाच्या योजना करवून घेण्याचा उपक्रम ह्या प्रांतांत सरकारमार्फत झालेला आहे आणि जमीन वाहून गेल्यामुळें काय आपत्ति उद्भवते ह्याचें पूर्ण ज्ञान मिळावें म्हणून शास्त्रीय प्रयोगहि केले जात आहेत. तथापि, वर म्हटल्याप्रमाणें आवश्यक असलेलें कार्य इतकें विस्तृत आहे कीं त्या संबंधांतली उपाययोजनाहि फार मोठ्या प्रमाणावर अंमलांत येणें अगत्याचें आहे.

ह्या प्रांतांतील जंगल खात्याचे एक कॉन्झर्व्हेटर मि. डॅली, ह्यांनीं रेडिओ क्लबाच्या एका सभेंत अलिकडे प्रस्तुत विषयावर एक माहितीनें भरलेला असा निबंध वाचला, त्यामध्यें त्यांनीं जमीन वाहून जात असल्यामुळें शेतकऱ्यांचें किती आर्थिक नुकसान होत आहे हे दर्शवणारे कांहीं आकडे देऊन तें वांचवण्याचे उपायहि सुचविले. त्यांनीं सांगितलेली माहिती अत्यंत उद्बोधक असल्यानें तिचें दिग्दर्शन आम्हीं येथें करीत आहों. सोलापूर येथें शास्त्रीय प्रयोग करण्यांत आले आहेत त्यांत जमिनीचीं तीन सारखीं क्षेत्रें, ऐशींत एक ह्या प्रमाणांत उतार असलेलीं अशीं होतीं. पहिल्यांत प्रयोगाखातर गवत व झुडपें स्वाभाविक रीतीनें वाढूं दिलीं, दुसऱ्यांत तीं वेळोवेळ कापण्यांत येऊन त्यांची वाढ होऊं दिली गेली नाहीं व तिसऱ्यांत मामुली पद्धतीनें बाजरीचें पीक करण्यांत आलें. एक वर्षाच्या अवधींत असें आढळून आलें कीं पहिल्या क्षेत्रांतली फक्त एक पंचमांश टन माती वाहून गेली, दुसऱ्यांतली सत्तावीस टन गेली आणि तिसऱ्यापैकी सत्तावन टन नाहींशी झाली. उतार अधिक असेल तर माती अधिक मोठ्या प्रमाणांत वाहून जाऊन कांहीं वर्षांनीं ती शेतीच्या कामास निरुपयोगी होईल हें उघड आहे.

कुरणांची व जंगलांतली जमीन सोडून देऊन केवळ नांगरटींतलें क्षेत्र हिशेबांत घेतलें असतां ह्या प्रांतांत सुमारें तीन कोटि एकर इतकें शेतीचें क्षेत्र आहे. कालवे व पाट ह्यांच्या खालच्या जमिनी आणि भाताचीं व सपाट क्षेत्रें वगळलीं तर ऐशींत एक हें उताराचें प्रमाण असलेलीं बाकीचीं एकूण शेतें दीड कोटि एकर क्षेत्रफळाचीं आहेत असें समजण्यास हरकत नाहीं. ह्या एकूण क्षेत्रांतून दर एकरीं प्रतिवर्षी साठ टन माती वाहून जाते असा सावधगिरीचा अजमास केला तरी सबंध नुकसानीची बेरीज नव्वद कोटि टन इतकी होते. शेतांतल्या वरच्या थराच्या मातीची दर टनास म्हणजे दोन गाड्यांस दोन रुपये किंमत येत असली तरी मि. डॅली ह्यांनीं ती चार आणे धरून असें दाखवलें आहे कीं मुंबई प्रांतांत जमीन पाण्यानें वाहून गेल्याकारणानें प्रतिवर्षी शेतकऱ्यांचें साडेबावीस कोटि रुपये नुकसान होतें.

ह्या हिशेबांत खोल न जातां असें म्हणतां येईल कीं त्यांत व्यक्त होणारें नुकसान जबरदस्त असून तें बंद पाडण्याचा प्रश्न प्रत्यक्ष शेतकरीवर्ग व सबंध राष्ट्र ह्यांच्या हिताचे दृष्टीनें जिव्हाळ्याचा आहे. मि. डॅली ह्यांच्या मतें जमिनीचें संरक्षण करण्याचे अनेक मार्ग आहेत. त्या सर्वांच्या मुळाशीं दोन महत्त्वाच्या गोष्टी आहेत; राष्ट्रांतल्या प्रत्येक शेतकऱ्याचें पूर्ण सहकार्य झालें पाहिजे आणि संरक्षणाची योजना एकसूत्रीपणानें अंमलांत आली पाहिजे असें त्यांचें म्हणणें आहे. उंचीवरून खालीं पाणी वहात जात असल्यानें प्रत्येक क्षेत्रांतल्या जमिनींची एक योजना आखली गेली पाहिजे आणि ती यशस्वी करण्यांत अंशभागी होण्याची कायद्यानें मालकांवर सक्ति केली गेली पाहिजे. अमेरिकेंत व पंजाबमध्यें अशा तऱ्हेचे कायदे करण्यांत आले आहेत. परंतु सक्तीपेक्षा शेतकऱ्यांचीं मनें वळवण्याचा मार्ग अधिक ग्राह्य आहे ह्यांत शंका नाहीं आणि जमिनीच्या मालकांमध्यें जोराचा प्रचार झाला पाहिजे. परंतु बहुमताविरुद्ध कांहीं व्यक्ती हट्टीपणानें सुधारणेच्या योजनेस विरोध करूं लागल्यास कायद्याची सक्ति अपरिहार्य होते. जमिनीच्या संरक्षणाच्या योजनेस एक स्वतंत्र तज्ज्ञ अधिकाऱ्याचें खातें हवें आणि सरकारनें शेतकऱ्यांस पैशाची मदत जरूर तेथें दिली पाहिजे. शेतकऱ्यांच्या परस्पर सहायक मंडळ्यांच्या मार्फत योजना अंमलांत आणणें कमी खर्चाचें व अधिक सोयीचें ठरतें असा अनुभव आला आहे. ह्या बाबतींत पंजाबचा कित्ता मुंबईमध्यें गिरवण्यासारखा आहे.

## युद्धपरिस्थितींत खाद्यपदार्थांचा पुरवठा

[ प्रो. वा. गो. काळे ह्यांचें मुंबई रेडिओवरील भाषण, रेडिओ अधिकाऱ्यांचे रूपेनें उद्धृत केलें आहे.]

चालू युद्धाचा विस्तार इतका वाढला आहे आणि त्याच्या धाग्यादोऱ्यांची जनतेच्या आर्थिक जीवनाशीं इतकी गुंतागुंत झाली आहे कीं, समरांगणावरील लढाऊ आघाडीइतकीच राष्ट्रीय " घरची " आघाडी महत्त्व पावली आहे. युद्ध जिंकण्यासाठी संयुक्त राष्ट्रांस लढाऊ सामुग्रीचें उत्पादन व पुरवठा ह्यांवर आपलें शक्तिसर्वस्व एकवटावें लागत आहे आणि उद्योगधंदे, व्यापार व वहातुकीचीं साधनें ह्यांचा अधिकांत अधिक उपयोग ह्या कार्याप्रीत्यर्थ करावा लागत आहे. आपल्या राज्यकर्त्यांचा युद्धकार्यक्रम यशस्वी होण्यासाठी नागरिक स्वार्थत्यागपूर्वक त्यांच्याशीं सहकार्य करीत आहेत. घरच्या आघाडीचें महत्त्व ध्यानांत बाळगून राज्यकर्तेहि आपल्या लोकांस नित्याच्या जीवनास लागणाऱ्या वस्तूंचा शक्य तेवढा पुरवठा करून त्यांची रहाणी खालवणार नाहीं अशी खबरदारी घेत आहेत. ब्रिटिश जनतेची अन्नसामुग्री मोठ्या प्रमाणांत बाहेरून आणावी लागते ह्या दृष्टीनें तेथील खाद्यपदार्थांच्या पुरवठ्याचे मंत्री, लॉर्ड वूल्टन, ह्यांनीं काटकसर व स्वार्थत्याग ह्यांचे संबंधांत नुकतीच इशारत दिली ती लक्षांत ठेवण्यासारखी आहे. हिंदुस्थानांतली प्रस्तुत बाबतींतली परिस्थिति अगदी तीच आहे. तरीहि देशाचा मोठा विस्तार, त्याच्या निरनिराळ्या भागांतील नैसर्गिक वैशिष्ट्यें, उत्पादनाचीं ठिकाणें व बाजारपेठा ह्यांच्यामधलीं दीर्घ अंतरें इत्यादि कारणांमुळें खाद्यपदार्थांच्या पुरवठ्याची व्यवस्था इंग्लंडप्रमाणें येथेंहि योजनात्मक पद्धतीनें आणि संघटनात्मक रीतीनें केली जाणें आवश्यक आहे. ह्या देशांत नैसर्गिक व आर्थिक दृष्टीनें भिन्नभिन्न थर पडतात, तसेच निरनिराळे विभाग राज्यकारभाराचे दृष्टीनें निरनिराळ्या हुकमतीखालीं मोडतात. ह्या कारणानें अन्नपुरवठ्याची व्यवस्था ब्रिटिश प्रांत व संस्थानें ह्यांतील स्थानिक राज्यकर्ते व अधिकारी ह्यांस करावी लागली. तरी त्या व्यवस्थेंत एकसूत्रीपणा व परस्परपूरकता येण्यास मध्यवर्ती सरकारच्या सत्तेची व सहकार्याची जोड आवश्यक आहे.

### मध्यवर्ती सल्लागार मंडळ

हिंदुस्थान सरकारच्या विद्यमानें अन्नपुरवठ्यासाठी अधिकारी व बिनअधिकारी लोकांचें एक अखिल भारतीय मध्यवर्ती सल्लागार मंडळ अलीकडे स्थापन झालें आहे तें ह्या दृष्टीनेंच होय. मनुष्यें व जनावरें ह्यांच्या खाद्यपदार्थांविषयींची माहिती मिळवून एकत्रित करणें, देशाच्या निरनिराळ्या भागांत ह्या पदार्थांच्या उत्पादनाच्या योजना आखणें आणि त्या अमलांत आणण्याचे संबंधांत सल्ला देणें आणि खाद्यपदार्थांच्या उपलब्ध पुरवठ्याची निरनिराळ्या टापूंमध्यें योग्य वाटणी कशी व्हावी ह्याबद्दल प्रांतिक व स्थानिक अधिकाऱ्यांस सूचना करणें हीं कामें मुख्यत्वेंकरून ह्या मंडळानें करावयाचीं आहेत. देशाबाहेरून अन्नसामुग्री आणण्याची इंग्लंडप्रमाणें हिंदुस्थानांत अडचण नसली तरी ह्या देशाच्या वैशिष्ट्यास अनुसरून त्या सामुग्रीची सार्वत्रिक वाटणी करण्याचा प्रश्न सोपा नाहीं. खाद्यपदार्थांचा पुरवठा सर्व देशभर सम प्रमाणांत व्हावा आणि ह्या नित्योपयोगी, आवश्यक जिनसांच्या किंमती भरमसाठपणानें वाढूं नयेत ह्या हेतूनें प्रांतिक सरकार व हिंदुस्थान सरकार ह्यांनीं सतत प्रयत्न चालवले आहेत. हे प्रयत्न त्रिविध आहेत. धान्याच्या पिकांच्या लागवडीचें क्षेत्र वाढवणें, विशेषतः आखूड धाग्याची कपाशी व ताग ह्यांचे सारख्या, ज्यांस मागणी नसल्यानें योग्य किंमत येऊं शकत नाहीं अशा शेतीच्या मालाच्या ऐवजीं खाद्यपदार्थांच्या पैदाशीस उत्तेजन देणें हा पहिला उपाय होय. दुसरा, देशांत तयार होणाऱ्या खाद्यपदार्थांची वाटणी निरनिराळ्या भागांत जरूरीप्रमाणें व्हावी त्यासाठी त्याच्या ने-आणीची तजवीज करणें हा आहे. युद्धपरिस्थितीचा अवास्तव फायदा व्यापारी लोकांनीं घेऊं नये आणि पदार्थांच्या किंमती कृत्रिम रीतीनें चढवूं नयेत म्हणून बाजारभावांचें व खरेदीविक्रीचें नियंत्रण करणें हा तिसरा उपाय होय. ब्रह्मदेशांतून येणारा तांदूळ सोडला तर हिंदुस्थान देश खाद्यपदार्थांच्या पुरवठ्याचे बाबतींत पूर्णपणें स्वावलंबी आहे. तांदुळाची आयात आतां अशक्य झाल्यानें ह्या पिकाची पैदास वाढवून ब्रह्मदेशच्या मालाची जागा शक्य तितकी भरून काढणें आवश्यक आहे. प्रत्येक पिकास विशिष्ट प्रकारची जमीन व हवापाणी ह्यांची आवश्यकता असते. ह्या कारणानें नैसर्गिक मर्यादा संभाळूनच पिकांच्या क्षेत्राचा विस्तार केला पाहिजे हें उघड आहे. निरनिराळ्या प्रकारच्या सवलती देऊन प्रांतिक सरकारांनीं शेतकऱ्यांस ह्याकामीं सहाय केलें आहे. चालू हंगामांत धान्याची पैदास अशा प्रकारच्या हेतुपूर्वक आखलेल्या व अमलांत आणलेल्या योजनेच्या योगानें बरीच वाढेल अशी अपेक्षा करण्यास प्रसिद्ध झालेल्या माहितीवरून चांगला आधार मिळत आहे.

### प्रांतांचें परस्परावलंबन

खाद्यपदार्थांचें देशांतलें एकूण उत्पादन वाढवणें हा त्यांच्या तुटवड्यावरच्या भीतीवर इलाज आहे; तथापि जनतेस आवश्यक असलेले नित्योपयोगी जिन्नस प्रत्येक प्रांतांत किंवा जिल्ह्यांत पुरेसे उत्पन्न व तयार होतात असें नाहीं. ह्या बाबतींत प्रत्येक प्रांतांत कांहींतरी वैशिष्ट्य असतें. उदाहरणार्थ, पंजाबांत गहूं आणि बंगाल्यांत व मद्रासेंत तांदूळ ह्यांचें वैपुल्य असतें आणि हीं धान्यें इतर प्रांतांचीहि गरज भागवीत असतात. डाळी, बाजरी, जोंधळे, गहूं, साखर ह्यांची परिस्थितीहि अशीच आहे. ह्यारीतीनें प्रांत आणि त्यांचे भाग परस्परावलंबी असून त्यांचा परस्परांमध्यें आयात-निर्गतीनें विनिमय होतो आणि मालास असलेली मागणी व त्याचा पुरवठा त्यांचा मेळ बसतो. आपापल्या टापूंतला फाजील माल ठिकठिकाणीं पाठवून आणि त्यांत आवश्यक असलेला माल परठिकाणांहून मागवून घाऊक व्यापारी जनतेची मागणी किरकोळ व्यापारी व दुकानदार ह्यांचे मार्फत भागवतात. पण ही मामुली व्यवस्था झाली; युद्धपरिस्थितींत ती अमलांत येण्याच्या मार्गांत अनेक अडचणी उभ्या रहातात. एकतर वहातुकीचीं साधनें मर्यादित झाल्या कारणानें मालाची नेआण आणि उठाव नेहमीच्या प्रमाणांत होऊं शकत नाहीं आणि बाहेरून होणारा पुरवठा अपुरा पडून व्यापारी मालाच्या किंमती चढवतात व लोकांच्या नित्याच्या गरजा भागणें कठिण होतें. ठिकठिकाणची मागणी आणि निरनिराळ्या जातींचा माल मिळण्याचीं स्थळें ह्यांचा विचार करून जरूर असलेल्या पुरवठ्याची तजवीज सरकारास आपल्या अधिकारानें करावी लागते ती त्यासाठीच होय. ह्या बाबतींत प्रांतिक व मध्यवर्ती सरकार आणि वहातुकीचीं मुख्य साधनें म्हणजे रेलवेज ह्यांचें सहकार्य आवश्यक होतें. ( अपूर्ण )

## स्फुट विचार

### मालमत्तेच्या युद्धविषयक नुकसानीचा विमा

हिंदुस्थान सरकारनें कारखान्यांच्या युद्धविषयक नुकसानीच्या विम्याची व्यवस्था केलेली असून ही योजना अमलांत येऊन बरेच दिवस झाले. हे कारखाने वगळून बाकीच्या मालमत्तेच्या विम्याची योजनाहि सरकारनें आखावी, अशा सूचना करण्यांत येत होत्या. त्यांस अनुसरून मुंबई सरकारनें आपल्या योजनेचा मसुदा प्रसिद्ध केला आहे. मुंबई शहर, मुंबई उपनगर, पुणें, खडकी व अहमदाबाद ह्या शहरांत ए. आर. पी. ची कार्यक्षम व्यवस्था झालेली आहे म्हणून ह्या शहरांतच तूर्त युद्धविषयक नुकसानीच्या विम्याची योजना अमलांत यावी अशी सरकारची सूचना आहे. ह्या शहरांतील जी मालमत्ता विम्याचे योजनेखाली येण्याजोगी आहे, तिची किंमत ३२५ कोटि रुपये भरते. ह्यावरून विम्याच्या संरक्षणाची आवश्यकता व त्याचें प्रमाण ह्याची कल्पना येईल. मुंबई सरकारनें आपली योजना आखतांना ग्रेट ब्रिटनमधील तत्सम योजना आदर्श म्हणून घेतली होती हें योग्यच आहे. तेथील योजना खालीलप्रमाणें आहे. दोन वर्षांत होणाऱ्या नुकसानीचा प्रथम अंदाज केला तो मालमत्तेच्या एकूण किंमतीच्या ४% इतका भरला. मालमत्तेच्या मालकांनीं मालमत्तेच्या किंमतीच्या २% इतकी रकम भरावी व ह्या रकमेचा जो फंड जमेल, त्यांतून २० कोटि पौंडांइतक्या नुकसानीची भरपाई करण्यांत यावी असें ठरलें. नुकसानीचा प्रत्यक्ष आकडा २० कोटींवर गेला तर पुढील २० कोटि पौंडांची जबाबदारी सरकारनें उचलली. ४० कोटि पौंडांपेक्षांहि नुकसानी जास्त झाली, तर तिची भरपाई करण्यास लागणाऱ्या रकमेची तरतूद मालमत्ता धारण करणारे व सरकार ह्यांनीं सम प्रमाणांत करावी, अशी त्या योजनेंत तरतूद करण्यांत आली.

---

### मुंबई सरकारची योजना

मुंबई सरकारच्या योजनेंत मालकांची अपेक्षित नुकसानीच्या २% इतक्या हप्त्याची जबाबदारी, त्यानंतरच्या २% इतक्या हप्त्याबद्दलची सरकारची हमी, योजनेची दोन वर्षांची मुदत, हप्त्यांच्या वसुलीस चार वर्षांचा काळ व सहामाही हप्त्याची सवलत, इत्यादि प्रमुख बाबी आहेत. मुंबई सरकारची ही योजना तूर्त केवळ एक मसुदा म्हणून पुढें मांडण्यांत आली असून त्यावर सरकारनें लोकांचीं मतें मागविलीं आहेत. अशा तऱ्हेचा 'विमा घरमालकांस पाहिजे किंवा नको, ते नियोजित हप्ते देण्यास तयार आहेत किंवा नाहींत, इत्यादींसंबंधीं लोकमत कळावें, ह्या दृष्टीनें १० ऑगस्टपर्यंत सरकारकडे लोकांनीं आपल्या सूचना पाठवाव्या, असें प्रसिद्ध करण्यांत आलें आहे. प्रस्तुत योजना अमलांत आली, म्हणजे विम्याचे हप्ते सक्तीनें भरावे लागतील ही गोष्ट येथें स्पष्ट करणें आवश्यक आहे. सरकारी योजना सक्तीची नसावी, हप्ता कमी असावा, मुंबई शहराबाहेरील मालमत्ता व मुंबईतील मालमत्ता ह्यांचेमधील फरक नीट लक्षांत घेण्यांत यावेत, मालमत्तेची किंमत ठरवितांना तिचे खालील जमिनीची किंमत लक्षांत घेण्यांत येऊं नये, हिंदी सरकारनेंच शत्रूची कुचंबणा करण्यासाठी मालमत्तेचा नाश केला तरी नुकसानभरपाई दिली जाईल ह्याचा योजनेंत स्पष्ट खुलासा करावा, इत्यादि सुधारणा सुचविण्यांत आल्या आहेत. मुंबई शहराबाहेरील घरमालकांनीं प्रस्तुत योजनेसंबंधीं नीट विचार चालविला असल्याचें दिसत नाहीं. कारखान्यांच्या विम्याची योजना हिंदुस्थान सरकारनें पक्की केली, त्यावेळीं तिचेविषयीं सूचना करण्यास लोकांना सवड मिळाली नव्हती. प्रस्तुत योजनेचे वेळीं मुंबई सरकारनें ती दिलेली आहे.

---

### युद्धपरिस्थितीचें सिंहावलोकन

गेल्या एक दोन आठवड्यांत मित्रराष्ट्रांतील लोकांचें लक्ष मुख्यत्वेंकरून दोन गोष्टींनीं वेधलें होतें आणि त्या दोन्ही युद्धपरिस्थितीच्या गंभीरपणाशीं संबद्ध होत्या. ह्यांतली पहिली बाब रशियाच्या दक्षिण विभागांत डॉन नदीच्या आसपासच्या विभागांत चाललेल्या घनघोर संग्रामाबाबतची होय. उन्हाळ्यांतील मोहिमेच्या योजनेंतला पहिला भाग हिटलरच्या मनांतून कॉकेशस प्रांताच्या दारावर धडक मारणें हा असल्यानें जर्मन फौजा डॉन नदीच्या रोखानें पुढें सरसावल्या आणि त्यांनीं मास्को व रॉस्टॉव्ह ह्यांस जोडणारी रेल्वे कांहीं ठिकाणीं तोडली. टिमोशेंको ह्यानें धैर्यानें व चिकाटीनें पावलागणिक शत्रूचा नाश करून व्यवस्थित रीतीनें जरूर तेथें माघार घेण्याचें धोरण अवलंबिल्यामुळें रशियन फौजा घेरून कोंडून टाकण्याचा जर्मन सेनानींचा बेत फसला आहे. ह्या मोहिमेंत जर्मनांची अतोनात हानी झाली आहे आणि रशियन सैन्याचा दम न खचतां त्याचा निश्चय वाढता आहे. पूर्व रणांगणांत जर्मनीस पायबंद बसावा ह्यासाठी इंग्लंड व अमेरिका ह्या राष्ट्रांनीं पश्चिम युरोपांत शत्रूवर चढाई करावी अशा सूचना अलीकडे त्यांस करण्यांत आल्या आहेत. पश्चिमेकडे आघाडी चालू करतां येण्याजोगी अनुकूल परिस्थिति आहे असें दिसतांच ह्या योजनेचा तात्काळ अंमिकार होईल ह्यांत शंका बाळगण्याचें कारण नाहीं. तथापि, ह्या बाबतींतली तयारी वहातुकीच्या जहाजांच्या पुरवठ्यावर अवलंबून आहे आणि शत्रूच्या पाणबुड्यांनीं अटलांटिक महासागरांत चालवलेल्या दोस्तराष्ट्रांच्या जहाजांच्या संहाराचा प्रश्न अत्यंत जिव्हाळ्याचा झाला आहे. ब्रिटिश पार्लमेंटाच्या गुप्त बैठकींत त्या विषयाची चर्चा नुकतीच झाली आहे आणि ह्यासंबंधांतली कची माहिती देणें सार्वजनिक हिताच्या दृष्टीनें योग्य नसल्यानें त्याबाबतींतली लोकांची जिज्ञासा तृप्त करणें शक्य झालेलें नाहीं. तथापि ब्रिटिश व अमेरिकन सरकारांनीं शत्रूच्या हल्ल्यापासून आपल्यावर होणाऱ्या हल्ल्यांचें संरक्षण करण्यासाठी शक्य ते उपाय अमलांत आणण्याची शिकस्त चालवली आहे हें निर्विवाद आहे. तसेंच नवीन आगबोटी बांधण्याचें काम अमेरिकेंत झपाट्यानें चाललें आहे हें त्यासंबंधांतले उत्पादनाचे आकडे प्रसिद्ध झाले आहेत व होत आहेत त्यांवरून समजून येतें. इजिप्तमध्यें रोमेलच्या फौजेस जनरल ऑकिन्लेक ह्यांनीं थोपवून धरलें आहे आणि त्यास मागें हटवण्याचा प्रयत्न चालवला आहे ही गोष्ट त्या रणांगणावरील अनुकूल परिस्थितीची निदर्शक आहे. सध्यां सर्वांचें लक्ष डॉन नदीच्या भागांत रशियन फौजा बचावाच्या व प्रसंगीं उलट हल्ल्यांच्या लढाया लढत आहेत, तिकडे वेधलें जावें स्वाभाविक आहे.

---

## हिंदी जॉइंट स्टॉक बँका

३० जून, १९४२ अखेर संपलेल्या तिमाहींत शेड्यूल्ड बँकांच्या यादींत एकाहि नवीन बँकेची भर पडली नाहीं. एक्सचेंज बँकांची संख्या १७ व इतर शेड्यूल्ड बँकांची संख्या ४५ ही कायम राहिली. मार्च, १९४२ अखेरच्या तिमाहींत शेड्यूल्ड बँकांच्या एकूण कचेऱ्यांत १० ची घट पडून त्यांची संख्या १,४४४ झाली. इंपीरिअल बँकेच्या शाखांची संख्या ४०१ ची ४०० झाली, पांच प्रमुख बँकांच्या शाखा ३४३ झाल्या म्हणजे त्यांच्या शाखांत २ शाखांची भर पडली, एक्सचेंज बँकांच्या कचेऱ्यांचा आंकडा ९९ वरून ९४ वर आला व इतर शेड्यूल्ड बँकांच्या कचेऱ्या ६१३ च्या ६०७ झाल्या. खालील तक्त्यांत हा तपशील दिला आहे:—

| | कचेऱ्यांची संख्या | | |
|---|---|---|---|
| | ३१–३–४२ | ३१–१२–४१ | ३१–३–४१ |
| इंपीरिअल बँक | ४०० | ४०१ | ३९१ |
| पांच प्रमुख बँका | ३४३ | ३४१ | ३१३ |
| एक्सचेंज बँका | ९४ | ९९ | १०३ |
| इतर शेड्यूल्ड बँका | ६०७ | ६१३ | ५७६ |
| | १,४४४ | १,४५४ | १,३८५ |

### ठेवींत वाढ

शेड्यूल्ड बँकांकडील ठेवींत झालेली वाढ, रिझर्व्ह बँकेकडील त्यांच्या शिलकी रकमांतील वाढ, त्यांनीं दिलेल्या कर्जांच्या रकमेंत घट, इत्यादींचें स्वरूप खालील तक्त्यांत दिसून येईल:—

| | (कोटि रुपये) | | |
|---|---|---|---|
| | २६–६–४२ | २७–३–४२ | २७–६–४१ |
| शेड्यूल्ड बँका | ५९ | ५९ | ५९ |
| त्यांचेकडील ठेवी | ३६४ | ३२४ | २८७ |
| रोख व रिझर्व्ह बँकेकडील त्यांच्या ठेवी | ७५ | ५० | ४० |
| दिलेलीं कर्जे | ९६ | ११६ | १२८ |
| कर्जांचें ठेवींशीं प्रमाण | २६·२८% | ३५·७१% | ४४·३८% |

### ट्रेझरी बिलें

मध्यवर्ती सरकारास ट्रेझरी बिलांचे रूपानें मोठाल्या रकमा अल्प व्याजानें मिळण्यास अडचण कशी बिलकुल वाटत नाहीं हें खालील आकड्यांवरून दिसून येईल:—

| | लोकांच्या मागणीची रकम | स्वीकारलेलीं टेंडर्स | पडलेला सरासरी दर |
|---|---|---|---|
| १९४२ | (लक्ष रु.) | (लक्ष रु.) | रु. आ. पै |
| एप्रिल | ११,१२ | ८०० | १–३–८ |
| मे | १,८५८ | १००० | १–३–८ |
| जून | ४९८२ | २१०० | ०–१४–० |

### हिंदी रेडिओवर जपानी भार्षेतून बातम्या

गुरुवार, ता. १६ जुलैपासून हिंदी रेडिओवर जपानी भाषेंतून बातम्या सांगण्यास प्रारंभ करण्यांत आला. हिंदुस्थानी, बंगाली, तामीळ, तेलगु, मराठी व गुजराथी ह्या हिंदी भाषांतून आणि ब्रह्मी, मलायी, फ्रेंच, चिनी, थाई, पुश्तो, पार्शियन, अरेबिक व इंग्रजी ह्या विदेशी भाषांतून बातम्या सांगण्यांत येतात, त्यांत आतां जपानीची भर पडली आहे.

## दी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेटच्या भागीदारांस विनंति

ता. १७-७-१९४२ च्या केसरींत श्रीयुत तात्यासाहेब केळकर व आणखी ६ भागीदार यांनीं विनंतिपत्रक प्रसिद्ध केलें आहे. सदर पत्रकांत श्रीयुत केळकर व श्रीयुत बर्वे यांनीं एक महत्त्वाची 'क्रांतिकारक व प्रतिगामी' वस्तुस्थिति भागीदारांच्यापासून लपवून ठेविली आहे.

चालू वर्षाच्या म्हणजे १९४२ च्या फेब्रुवारी व मार्च महिन्यांत संचालकांची व श्रीयुत आगाशे यांची संमति नसतांना मेसर्स डहाणूकर यांना एकट्याला दहा लक्ष रुपयांचे शेअर देऊन त्यांच्या एकट्याच्या स्वाधीन कंपनीची व्यवस्था करण्याचा प्रयत्न श्रीयुत केळकर व श्रीयुत बर्वे यांनीं केला. मेसर्स डहाणूकर यांचे एकट्याचेच दहा लक्ष रुपयांचे शेअर झाल्यास बहुमताच्या जोरावर त्यांना पसंत असतील ते डायरेक्टर व पसंत असेल ती घटना अंमलांत आली असती. वरील योजना कंपनीच्या मूलभूत कल्पनेशीं व स्वरूपाशीं अत्यंत विसंगत होती. वरील योजना कंपनीच्या विद्यमान भागीदारांना, संचालकांना व महाराष्ट्राला भूषणावह नव्हती व नाहीं म्हणून सदर योजना फेटाळली गेली.

पांच पांच हजारांचे शेअर आज जरी शंभरदोनशें भागीदारांचे नसले, तरी पांच ते दहा हजारांच्या डिपॉझिट रकमा दिलेले शेदोनशे महाराष्ट्रीय खास आहेत. यशाबद्दल विश्वास वाटूं लागला कीं, शेदोनशे महाराष्ट्रीयांच्याकडून पांच हजारांचे शेअर मिळूं शकतील अशी खात्री आहे.

**विनंतिपत्रक काढणाऱ्या ७ जणांपैकीं पांच जणांचें कंपनींत असलेलें शेअरभांडवल**

| | | |
|---|---|---|
| श्रीयुत केळकर | ... ... | २५० रुपये |
| श्रीयुत बर्वे | ... ... | ५० रुपये |
| श्रीयुत लिमये | ... ... | २५ रुपये |
| श्रीयुत हरि गणेश फाटक | ... | १० रुपये |

श्री. बोंडाळे यांनीं दोन वर्षांत शेअर विकून देऊं, असें आगाशे यांच्याकडून आश्वासन घेऊन शेअर घेतलेले आहेत. कायमचे शेअर घेतलेले नाहींत हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

पत्रक काढणारांनीं शेअरभांडवल जमविण्याची योजना सुचविली नाहीं. गेलीं सात वर्षे शेअरभांडवल जमण्याची वाट पाहिली. डिपॉझिटच्या ऐवजीं शेअर कां घेत नाहीं, याचें कारण डायरेक्टरांचे पांच ते दहा हजारांचे शेअर असले म्हणजे आमचें शेअर-भांडवल सुरक्षित आहे असा विश्वास वाटतो असें सांगण्यांत येत असे व आहे. अशा मताच्या भागीदारांकडून पांच हजारांचा नियम करण्याबद्दल मागणी आली व त्याप्रमाणें सभा बोलाविली. पांच हजारांचा नियम करावा अशा मताचे श्रीयुत बोंडाळे, श्रीयुत गोरे व श्रीयुत हरि गणेश फाटक हे होते व त्यांनीं वरीलप्रमाणें ठराव आणावा ह्या मागणीपत्रकावर सह्या केल्या आहेत. हल्लीं त्यांचीं मतें बदललेलीं आहेत.

भांडवल जमणार नाहीं व कंपनी यशस्वी होणार नाहीं असें श्रीयुत केळकर यांचें मत, तसेंच डिपॉझिट रकमा घेण्याच्या म्हणजे कर्ज काढण्याच्या ते विरुद्ध. डिपॉझिट रकमा घेऊन कारखाना यशस्वी करावा व नंतर शेअर खपवून डिपॉझिट रकमा परत कराव्या अशी योजना १९३७ सालीं आंखल्याबरोबर माझा राजीनामा आजच मंजूर करा असें श्रीयुत केळकर यांनीं पत्रें पाठविलें. तें पत्र भागीदारांच्या माहितीकरितां खालीं दिलें आहे.

## THE KESARI AND THE MAHRATTA OFFICE

Dated 21-3-1937.

Dear Mr. Agashe,

I am unable to attend to-day's meeting of the Directors of the Brihan-Maharashtra Sugar Syndicate Co., Ltd., owing to certain domestic ceremonial. But I wish hereby to convey to you my views and request you to place my letter before the Board.

Unfortunately I do not share the view that sufficient share capital will be collected in the time required. Of course, I am against raising any loan.

The idea of reorganising the Board of Directors is a very sound one at this time. You should have on the Board only such Directors as hope to raise the necessary share capital. These alone will be a source of strength to you. I wish voluntarily to resign my seat on the Board, because with the mentality of diffidence, I shall be a source of weakness to you.

I have no right to put a damper on your hopes and your enthusiasm. I have nothing but admiration for the strenuous work you have done so far.

As for myself, I wish that my resignation should be accepted and recorded *as from to-day*; that is to say, before you proceed to allot the shares now held in abeyance, and also before you decide to order the machinery. I do not wish to be a party to the allotment and the order.

Yours sincerely,
Sd./- N. C. KELKAR.

वरील पत्रांत शेअर–भांडवल जमवूं शकतील असे डायरेक्टर बोर्डांत घ्यावेत असें खुद्द श्रीयुत केळकर यांनीं कळविलें आहे. पांच हजारांचे शेअर देणारे डायरेक्टर घेतल्यास शेअर–भांडवल जमेल असा भागीदारांच्याकडूनच ठराव आल्याबरोबर श्रीयुत केळकर यांनीं विरोध कां करावा तें समजत नाहीं. एकट्या मेसर्स डहाणूकरांच्या स्वाधीन कंपनी करण्याच्या श्रीयुत केळकर व बर्वे यांच्या योजनेपेक्षां पांच हजारांचे शेअर घेणाऱ्या पंचवीस महाराष्ट्रीयांच्या संचालकत्वाखाली कंपनी चालविणें भागीदारांच्या फायद्याचें नाहीं काय ?

डायरेक्टरांची संख्या ११ आहे. ती कमी करण्यांत आली नाहीं. विद्यमान डायरेक्टरांच्या पैकीं ८ डायरेक्टरांचे स्वतःचे पांच हजारांचे शेअर नाहींत. दोन डायरेक्टरांनीं पांच हजारांचे शेअर घेण्याचें आश्वासन दिलें आहे. बाकी डायरेक्टरांनीं अद्यापि आश्वासन दिलेलें नाहीं. पांच हजारांचा नियम मंजूर झाला व आश्वासन न दिलेल्या ६ डायरेक्टरांनीं राजीनामे दिले तर ७ डायरेक्टर नाहींत म्हणून आर्टिकल्सप्रमाणें कंपनीच्या कामाला हरकत येऊं नये म्हणून किमान मर्यादा साताची पांच करण्याचा ठराव आला. विद्यमान डायरेक्टरांपैकीं आणखी दोन डायरेक्टारांनीं चार हजारांचे आणखी शेअर घेण्याचें आश्वासन दिल्यास सातांचे पांच असा नियम करण्याची जरूरी राहणार नाहीं.

गेल्या वर्षीच्या जनरल सभेमध्यें कळविल्याप्रमाणें इंपीरिअल टेक्नॉलॉजिकल इन्स्टिट्यूट, कानपूर येथील तज्ज्ञांना बोलाविण्यांत आले होते. जो तज्ज्ञ येणार होता तो आजारीपणामुळें रजेवर गेल्याचें उत्तर आलें. त्यानंतर कानपूर येथील इंपीरिअल टेक्नॉलॉजिकल इन्स्टिट्यूटचे डायरेक्टर मुंबईस येणार असल्याचें पत्र आलें. परंतु दिल्ली येथें त्यांना जावयाचें असल्यामुळें इकडील साखरकारखान्यांना भेट देण्याचा कार्यक्रम त्यांनीं रद्द केल्याचें पत्र आलें. म्हैसूर शुगर फॅक्टरीचे तज्ज्ञ बोलाविले आहेत. सदर तज्ज्ञ येऊन त्यांचा रिपोर्ट आला म्हणजे तो भागीदारांना कळविण्याची योग्य तजवीज होईल,

### श्रीयुत केळकरांची टीप

डायरेक्टरांच्या पात्रतेला थोडे शेअर असावेत असें श्रीयुत केळकरांचें मत म्हणून त्यांनीं फक्त २५० रुपयांचे शेअर घेतले. पण त्यांचें मत जनतेला पटलें नाहीं व जनतेनें शेअर घेतले नाहींत इतकेंच नव्हे तर खुद्द श्रीयुत केळकर यांच्या सह्यांचीं पत्रें घेऊनहि शेअर–भांडवल जमविण्याला त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं असा प्रत्यक्ष अनुभव आलेला आहे.

भागीदारांनी आणलेला ठराव 'Special Resolution' आहे. तो मंजूर होण्याला तीनचतुर्थांश बहुमत पाहिजे.

वरील कारणामुळें अल्प प्रयासानें ठराव नामंजूर करून घेण्याची संधि साधण्याचा प्रयत्न, भागीदारांच्या हक्करक्षणाची भूमिका घेऊन विरोधक करीत आहेत असें दिसतें. कंपनीला शेअर-भांडवल मिळून ती यशस्वी करणें हें कार्य त्यांना दुय्यम प्रतीचें वाटत आहे. एक हजाराच्या भागीदारांच्या हक्काच्या थोड्याशा त्यागानें शेअर–भांडवल वाढवून कंपनी पूर्णपणें यशस्वी स्थितींत राखणें हें भागीदारांचें आद्य कर्तव्य आहे, याची जाणीव श्रीयुत केळकर यांना १९४२ सालीं नसावी ही खेदाची गोष्ट आहे. पांच हजारांचा ठराव आणणारांना भागीदारांच्या व्यक्तिशः हक्काची पूर्ण जाणीव आहे; पण त्यापेक्षां शेअरभांडवल लवकर जमून कंपनी पूर्ण सुस्थितींत व यशस्वी राखण्याची त्यांना जास्त काळजी वाटत आहे.

ठराव भागीदारांचा आहे तो मंजूर करणें भागीदारांच्याकडे आहे.

( डॉक्टर ) व्ही. डी. फाटक

## भागीदारांस विनंति

पुणें. ता. १७–७–१९४२

डायरेक्टरांनीं पांच हजारांचे शेअर घ्यावेत हा ठराव प्रथम मी सुचविला. त्याप्रमाणें ता. ११–१२–४१ रोजीं पहिली रिक्विझिशन लिहून त्यावर श्री. बोडाळे, श्री. शं. वि. गोरे, श्री. हरि गणेश फाटक यांनीं सह्या केल्या. हल्लीं विरोधी पत्रकावर त्यांनीं सह्या केल्या आहेत.

कंपनीला आर्थिक अडचण किती होती हें मला स्वतःला माहीत आहे. मशिनरी घेण्याकरितां व उसाची लागवड करण्याकरितां वेळोवेळीं पन्नास हजार रुपयांपर्यंत आर्थिक मदत कंपनीला माझ्याकडून झालेली आहे. अशीच आर्थिक मदत रा. ब. रावजी जनार्दन भिडे, श्रीयुत धोंडूमामा साठे, प्रिन्सिपॉल धनंजयराव गाडगीळ, श्रीयुत महादेवराव तांबे, मुंबई, श्रीयुत साळवेकर, मुंबई, व श्रीयुत रघुनाथराव सोहोनी, पुणें, यांनीं केलेली आहे. दहा व पंचवीस रुपयांच्या शेअरविक्रीनें पंधरा लक्ष रुपयांचें शेअरभांडवल लवकर जमत नसतें, ही साधी गोष्ट पांच हजारांच्या ठरावाला विरोधी पत्रक काढणारांच्या लक्षांत यावयास पाहिजे होती. बँकेंत केशरजवळूनहि मोठ्या रकमेची सिक्युरिटी घेण्यांत येते, मग बारा ते चौदा लक्ष रुपयांच्या डिपॉझिट रकमा व सुमारें सात लक्ष रुपयांची शेअरची रक्कम ज्यांच्याजवळ कारखाना यशस्वी चालण्याकरितां द्यावयाची, त्यांनीं पांच हजारांचे शेअर घ्यावेत असा ठराव करणेंच योग्य आहे व तो भागीदारांच्या फायद्याचा आहे, नुकसानीचा नाहीं.

गूळ कंपनी, पुण्यांतील कांहीं बँका, यांचें शेअर-भांडवल १५ लक्ष रुपये नसतांनासुद्धां डायरेक्टरांनीं पांच हजारांचे शेअर घेण्याचा नियम आहे. "पैसाफंड" तत्त्वानें मोठाले कारखाने उद्यास येत नाहींत व यशस्वी होत नाहींत. डायरेक्टरांचे पांच हजारांचे शेअर असतील, तर हजार रुपयांचे शेअर घेण्याला जनतेला विश्वास वाटतो. ज्यांचे पांच हजारांचे शेअर आहेत ते कंपनी चालविण्यास नालायक आहेत असा पुरावा श्रीयुत केळकर व त्यांची री ओढणारे दुसरे भागीदार यांनीं दाखवावा. पांच हजारांचे शेअर असणारा डायरेक्टर आपल्या स्वतःच्या रकमेला जपणार, त्यामुळें लहान रकमेच्या भागीदारांच्या रकमा सहजच सुरक्षित रहाणार. २५० रुपयांचे शेअर घेणारा डायरेक्टर कितीहि प्रामाणिक असला, तरी आपले स्वतःचे पंचवीस हजार रुपये त्याच्या ताब्यांत देण्यास मनुष्यस्वभाव तयार होत नाहीं. मनुष्यस्वभाव जमेंत धरूनच योजना आंखली पाहिजे.

वरील सर्व गोष्टींचा भागीदारांनीं पूर्ण विचार करावा व त्यांचें शेअर-भांडवल सुरक्षित राहण्याकरितां डायरेक्टरांनीं पांच हजारांचे शेअर घेतले पाहिजेत हा ठराव मंजूर करावा. ठराव "Special Resolution" म्हणून असल्यामुळें तीन चतुर्थांश बहुमत लागेल व तें मिळविण्याचें काम मी श्री. आगाशे यांना सांगितलें. त्याप्रमाणें पत्रक काढलें. तरी ज्या भागीदारांना सभेस हजर राहणें अशक्य होईल त्यांनीं श्रीयुत आगाशे यांच्या नांवाच्या मतपत्रिका पाठवाव्यात अशी विनंति आहे. ठराव आणलेल्या भागीदारांनीं पसंत केलेलें पत्रक खालीं दिलें आहे.

गणेश लक्ष्मण ढेकणे,
रिटायर्ड फर्स्ट क्लास सब-जज्ज.

## विनंति-पत्रक

पुणें, ता. ११-७-१९४२.

रा. न. वि. वि.—

गेल्या वर्षाचा तोटा भरून काढून कंपनी पुनः फायद्यांत चालू झाली आहे. कंपनीचें शेअरभांडवल अद्यापि सात लक्ष रुपयांचेवर गेलेलें नाहीं. बाकी भांडवल फिक्स्ड डिपॉझिटचें आहे. कंपनीच्या ११ डायरेक्टरांपैकीं ७ डायरेक्टरांनीं फक्त एक हजार रुपयांचे शेअर घेतलेले आहेत. डायरेक्टरांनीं प्रत्येकीं पांच हजारांचे शेअर घेतले, तर जनतेचा विश्वास बसून शेअर खपतील, असें कंपनीच्या भागीदारांचें मत आहे. त्याप्रमाणें त्यांनीं ठराव आणण्याकरितां एक्स्ट्रा-ऑर्डिनरी सभा बोलवावी म्हणून कळविलें; त्याप्रमाणें सदर सभा ता. २-८-१९४२ रोजीं बोलावली आहे. ज्या भागीदारांनीं सभा बोलाविली आहे, त्यांत रावसाहेब ढेकणे, रिटायर्ड फर्स्ट क्लास सब-जज्ज; रावसाहेब कुमठेकर, रिटायर्ड डिस्ट्रिक्ट जज्ज; प्रोफेसर दाणी; प्रिन्सिपॉल धनंजयराव गाडगीळ; डॉक्टर मोडक; श्रीयुत पी. आर. वैद्य; रावबहादुर रावजी जनार्दन भिडे, एक्स फायनान्स मिनिस्टर, ग्वालिअर स्टेट; श्रीयुत महादेवराव तांबे, मुंबई; श्रीयुत साळवेकर, सरदारगृहाचे मालक; श्री. आर. बी. भट; डॉक्टर फाटक; श्रीयुत धोंडुमामा साठे असे भागीदार आहेत. डायरेक्टरांनीं पांच हजारांचे शेअर घेतल्यास शेअर खपण्यास चांगली मदत होईल असा माझा अनुभव आहे.

कंपनीचें ध्येय औद्योगिक आहे. त्याला भांडवलाची विशेष जरूरी. पांच हजारांचा नियम करण्यांत एक हजारांचे शेअर घेणारांना डायरेक्टर होतां येणार नाहीं असा आक्षेप घेण्यांत येतो. परंतु व्यक्तीपेक्षां संस्थेचें हित पाहिले पाहिजे असें वरील भागीदारांचें म्हणणें आहे.

ठराव भागीदारांचा आहे तो मंजूर होणें जरुरीचें आहे. त्यामुळें मतपत्रिका घेणें जरुरीचें झालें आहे. तरी सोबतची मतपत्रिका सही करून तारीख व साक्ष घालून पाठविण्याबद्दल विनंति आहे. साक्ष नसल्यास मतपत्रिका कायदेशीर होणार नाहीं. मतपत्रिका ता. २५-७-४२ च्या आंत मिळेल अशी तजवीज व्हावी अशी विनंति आहे. म्हणजे ठराव मंजूर होईल. कळावें, कृपा लोभ ठेवावा ही विनंति.

आपला,
चंद्रशेखर गोविंद आगाशे

Approved


(1) G. L. Dhekne (रिटायर्ड फर्स्ट क्लास सब-जज्ज)
(2) K. M. Kumthekar (रिटायर्ड डिस्ट्रिक्ट जज्ज)
(3) ध. रा. गाडगीळ (डायरेक्टर, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया)
(4) R. J. Bhide (एक्स-फायनॅन्स मिनिस्टर, ग्वालिअर स्टेट)
(5) धों. कृ. साठे (उपाध्यक्ष, बँक ऑफ महाराष्ट्र लि.)
(6) P. G. Dani
(7) P. R. Vaidya
(8) V. D. Phatak
(9) G. V. Salvekar
(10) R. B. Bhat
(11) M. R. Tambe

## महाराष्ट्र खाद्य धान्य परिषद्

पुणें, ता. १९ रोजीं महाराष्ट्र खाद्य धान्य उत्पादन-पुरवठा परिषदेचें अधिवेशन रा. ब. डॉ. डी. एल. सहस्रबुद्धे यांच्या अध्यक्षतेखालीं टिळक स्मारक-मंदिरांत पार पडलें. सकाळीं स्वागताध्यक्ष श्री. ग. स. मराठे, अध्यक्ष रा. ब. डॉ. सहस्रबुद्धे व श्री. न. गं. आपटे यांचीं भाषणें झाल्यावर परिषदेंत एकूण सात ठराव संमत झाले. त्यांत धान्याच्या किंमतीशीं जुळेल इतका सारा ठरविणें व सारा धान्यरूपानें देण्याची मुभा शेतकऱ्यांना ठेवणें, जमिनी घेतल्यास भरपूर नुकसानभरपाई देणें, स्वस्त धान्याचीं दुकानें काढणें, धान्याचा साठा करून ठेवणें नि मावळ व कोंकण विभागांत भाताचें उत्पन्न वाढविण्याच्या योजना आखणें वगैरेंची विनंती सरकारला करणारे हे ठराव होते.

परिषदेबरोबर भरलेल्या प्रदर्शनांत महाराष्ट्रांत तयार होणारीं धान्यें व चारा यांचे नमुने होते व कापसाची लागवड कमी करून धान्य पिकविण्याच्या आवश्यकतेबद्दलचे फलक होते.

राहाणेची व भोजनाची उत्तम सोय




फोन नं. ७७९ गणपति चौक. व्यवस्थापक.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनी छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, एम्. ए., यांनी 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२४/१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. R. ३४३४

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
(टपाल हंशील माफ)
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ८ पुणें, बुधवार, तारीख २९ जुलै १९४२ अंक ३०

## विमेदार नि हवाई हल्ला

शत्रु राष्ट्राकडून हवाई हल्ला अगर तत्सम उपद्रव यापासून बिन-लढाऊ नागरिकांच्या जीविताला येणाऱ्या धोक्याचा समावेश विमा पॉलिसीच्या अटींत होतो काय व त्यासाठी जादा प्रिमिअम भरावा लागेल काय ! असा प्रश्न साहजिकच नागरिकांमध्यें चर्चिला जात आहे.

## ट्रस्ट ऑफ इंडिया

विमा कंपनीच्या

विमा पॉलिसीमध्यें हवाई हल्ल्यामुळें जीविताला होणाऱ्या अपायाचा अंतर्भाव होतो त्याकरितां जादा प्रिमिअम नाहीं.

तरी विलंब न लावतां—

तुमचा नि तुमच्या आप्तेष्टांचा विमा

## ट्रस्ट ऑफ इंडिया

विमा कंपनींतच उतरा.

अध्यक्षः—श्रीमंत सरदार जगन्नाथ महाराज पंडित

माहितीपत्रकें विनामूल्य पाठवूं

ट्रस्ट ऑफ इंडिया विमा कं. लि.
लक्ष्मी रोड, पुणें २

वि. ह. देशमुख, बी. ए.
जनरल मॅनेजर

## महायुद्ध दाराशीं आलें

परदेशी औषधें

दुर्मिळ व महाग झालीं

पण

भिण्याचें कारण नाहीं !!!

— कारण —

## आयुर्वेद रसशाळा पुणें लि०

या देशी औषधांच्या प्रसिद्ध कारखान्यानें तयार केलेलीं

- रक्तवर्धक,
- उपनाह,
- बालजीवन,
- कॅल्सीप्राल

*इत्यादि पेटंट, स्टँडर्ड व लोकप्रिय औषधें खात्री पटल्यामुळें*

★ डॉक्टर्सहि वापरूं लागले आहेत. ★

दरसाल बिनचूक नफा वाटणाऱ्या ह्या कंपनीचे शेअर्स व औषधें मागवा.

## आयुर्वेद रसशाळा पुणें लि०

मुख्य दुकान गणपति चौक, लक्ष्मीरोड, पुणें १.

महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर

## महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

# दि बँक ऑफ महाराष्ट्र, लिमिटेड

## चालू खात्यांवरील व्याजाच्या दरांत बदल

बँकेचे खातेदार, ठेवीदार व बँकेशीं व्यवहार असणारे सर्व लोक ह्यांस विनंतिपूर्वक कळविण्यांत येतें कीं, ता. १५ ऑगस्ट १९४२ पासून बँकेकडील (शाखांसह) चालू खात्यांवरील व्याजाचा दर द. द. शेकडा १ टक्क्याऐवजीं अर्धा (½) टक्का केला जाईल.

पुणें शहर
ता. २७-७-४२

M. V. GOKHALE
मॅनेजर


# विविध माहिती

### नवी रेल्वे

ब्रह्मदेशांतील एका नदीच्या पाण्याचे प्रवाहाच्या जोरावर वीज निर्माण करण्याकरितां एक वीजगृह बांधण्यांत येणार आहे. मंडाले व इंडोचायना ह्यांस शान संस्थानाचे मधून रेल्वेनें जोडण्यांत येईल व ती रेल्वे चालविण्यासाठी वरील वीजगृहाची वीज वापरण्यांत येईल. बर्लिन येथील रेडिओनें ही माहिती प्रसिद्ध केली आहे.

### परदेशांतील ब्रिटिश नागरिक

परदेशांतील ब्रिटिश नागरिकांवर ब्रिटिश लष्करांत दाखल होण्याची सक्ती करण्यांत यावयाची आहे व ह्या सक्तीस इजिप्तपासून प्रारंभ होईल. परदेशांतील जे ब्रिटिश नागरिक ग्रेट ब्रिटनमध्येंच राहिले असते व त्यामुळें ज्यांस लष्करांत दाखल व्हावेंच लागलें असतें, अशा नागरिकांवरच सक्ती केली जाईल. फ्रान्ससारख्या कांहीं देशांत ह्या नियमाची अंमलबजावणी करणें अर्थातच कठीण जाईल.

### युद्धखर्चाची वांटणी

हिंदुस्थानांत होणाऱ्या लष्करी खर्चापैकी ग्रेट ब्रिटनचा वांटा किती आहे, हें स्पष्टपणें जाहीर करण्यांत यावें, असें संयुक्त प्रांताच्या चेंबर ऑफ कॉमर्सनें हिंदुस्थान सरकारास सुचविलें आहे. ग्रेट ब्रिटननें खर्चाचा मोठा वांटा उचलणें रास्त आहे व ह्यासंबंधांतील अखेरची योजना हिंदी व्यापारी वर्ग व विधिमंडळ ह्यांच्या सल्ल्यावांचून आंखण्यांत येऊं नये, असें चेंबरचें म्हणणें आहे.

### २१ तोफांची सलामी करा

त्रावणकोर संस्थानांतील लोकसंख्येची वाढ, साक्षरतेचा प्रसार, इत्यादि लक्षांत घेतां त्याचा दर्जा २१ तोफांच्या सलामीचा करण्यांत यावा, अशी ब्रिटिश सरकारास विनंति करणारा ठराव तेथील विधिमंडळानें पास केला आहे. उत्पन्नाचे दृष्टीनें त्रावणकोरचा अनुक्रम हैदराबाद व म्हैसूर ह्यांचे खालोखाल तिसरा लागतो. ग्वालेर, काश्मीर व म्हैसूर ह्यांचे महाराज आणि हैदराबादचे निजाम ह्यांस २१ तोफांच्या सलामीचा मान आहे. त्रावणकोरचा दर्जा भोपाळ, इंदूर, कोल्हापूर, उदेपूर ह्यांचा बरोबरीनें १९ तोफांच्या सलामीचा आहे.

### गव्हापासून पेट्रोल

गव्हापासुन पेट्रोल तयार करण्यासाठी चार मोठे कारखाने ऑस्ट्रेलियांत उभारण्यांत येत आहेत.

### जपानी रबराची जर्मनीकडे निर्गत

दक्षिण अमेरिका व दक्षिण आफ्रिका ह्यांस वळसा घालून जाणाऱ्या आगबोटींतून जर्मनी व जपान ह्यांचेमध्यें अल्प प्रमाणावर महत्त्वाच्या युद्धविषयक मालाची देवघेव चालू झाली आहे. जपान रबर पाठवूं लागला असून जर्मनींतून बॉल बेअरिंज व मशीन टूल्स ह्यांची निर्गत होते.

### पोस्टाचीं तिकिटें

ग्रेट ब्रिटनमधील पोस्टांतून दरसाल ७ अब्ज पोस्टाच्या तिकिटांची विक्री होते. वेगवेगळया किंमतीचीं २ कोटि तिकिटें रोज छापण्यांत येतात. रंगाची बचत करण्यासाठी कांहीं तिकिटांचा रंग थोडा फिक्का करण्यांत आला आहे.

### ट्रेझरी बिलांवर १ आ. १ पै व्याजाचा दर

गेल्या आठवड्यांत हिंदी रिझर्व्ह बँकेनें हिंदुस्थान सरकारचीं ८ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शें. १ आ. १ पै इतका पडला.

### "राष्ट्रीय" फूल

प्रत्येक राष्ट्राचे समारंभाचे वेळीं उपयोगांत आणण्यासाठी "राष्ट्रीय" फूल ठरलेलें असतें. अशा तऱ्हेचें ठराविक फूल अमेरिकेंत नाहीं. मूळ आपल्याच देशांतील, सर्वत्र सहज येणारें, राष्ट्रीय सुट्टीच्या वेळीं बहर येणारें, इतर राष्ट्रांच्या फुलांहून वेगळें व देशाभिमानास पोषक असें "राष्ट्रीय" फूल अमेरिकेसाठी निवडून काढण्यासाठी तेथील एका वृत्तपत्रानें एक कमिटी नेमली आहे.

### इंटरनॅशनल बँक ऑफ इंडिया, लि., अहमदाबाद

वरील शेड्यूल्ड बँकेनें राजकोट येथें आपली शाखा नुकतीच उघडली आहे. मुंबई, आनंद, नडिआद व धोलका येथें तिच्या शाखा आहेत. बँकेचें खेळतें भांडवल ८० लक्ष रुपये आहे.

### मिठाचा पुरवठा भरपूर आहे

हिंदुस्थानांत दरसाल सुमारें ५ कोटि, ३० लक्ष मण मिठाचा खप होतो. तेवढ्या मिठाचें उत्पादन करण्याची व्यवस्था असल्यानें, मिठाचा तुटवडा पडण्याची भीति नाहीं, असें सरकारनें जाहीर केलें आहे.

### दारूगोळ्याचें उत्पादन

अमेरिकेंतील दारूगोळ्याचें उत्पादन १९४१ च्या मानानें आता चौपट वाढलें आहे. कॅनडांतील उत्पादनांत तिपटीची वाढ झाली आहे. दोन्ही देशांत उत्पादन आणखीहि मोठ्या प्रमाणांत ह्यापुढें होईल.

### विधिमंडळाच्या सभासदांचा भत्ता

मध्यवर्ती असेंब्लीच्या एकाद्या सभासदास एकाद्या रेल्वेवर मोफत प्रवास करण्याची परवानगी असल्यास, त्या प्रवासाच्या पहिल्या वर्गाच्या भाड्याचे तीन पंचमांश रकमेइतकाच भत्ता त्यास मिळूं शकेल, असें हिंदुस्थान सरकारनें ठरविलें आहे.

### कर्ज तडजोड मंडळें

गेल्या वर्षी निजाम राज्यांत शेतकऱ्यांच्या कर्जाची तडजोड करणारीं १६ बोर्डें काम करीत होतीं. त्यांनीं २,०१३ अर्जदारांचीं २२ लक्ष रुपयांचीं कर्जें प्रत्यक्ष तपासून, ९९८ अर्जदारांच्या ११ लक्ष रुपयांच्या कर्जाची तडजोड केली व शेतकऱ्यांस ११½ लक्ष रुपयांची सूट मिळवून दिली.

अनुक्रमणिका

पृष्ठ

१ विविध माहिती ... २३६
२ युद्धोत्तर पुनर्घटनेविषयीं घोषणा ... ... २३७
३ युद्धपरिस्थितींत खाद्यपदार्थांचा पुरवठा ... २३८
४ स्फुट विचार ... २३९
हिंदी फडनवीसांची लंडनला भेट–प्रांतिक सरकारांचें उत्पन्न आणि खर्च–किरकोळीनें विक्री करणाऱ्या व्यापाऱ्यांच्या तक्रारी–अमेरिकेंत खासगी खर्चांचें नियंत्रण.
५ बक्षिस समारंभ ... २४०
६ ट्रस्ट ऑफ इंडियाची वार्षिक सभा ... २४१

# अर्थ

बुधवार, ता. २९ जुलै, १९४२

## युद्धोत्तर पुनर्घटनेविषयीं घोषणा

युद्धोत्तर काळांत राष्ट्रांचे परस्पर-संबंध, विशेषतः आर्थिक संबंध कसे रहावे ह्याविषयींचे आपले विचार ब्रिटिश आणि अमेरिकन मुत्सद्दी वारंवार प्रकट करीत आहेत. युद्धानंतर पुढें काय व्यवस्था करावी ह्याची चर्चा तें चालू असतांना कशास हवी ? असें कोणास वाटण्याचा संभव आहे. परंतु प्रस्तुत युद्धाचें उद्दिष्ट स्पष्ट झाल्यावांचून तें यशस्वी करण्याचे प्रयत्न पाहिजे तसे उत्साहपूर्ण व कार्यक्षम होऊं शकणार नाहींत हें येथें लक्षांत ठेवलें पाहिजे. विशिष्ट निश्चित ध्येयानें प्रेरित झालेलीं राष्ट्रेंच चिकाटीनें व धैर्यानें लढण्यास समर्थ होतात, कारण, त्यांचें युद्ध तत्त्वांच्या रक्षणासाठी असतें आणि त्याच्या सिद्धीकरतां तीं वाटेल तो स्वार्थत्याग करण्यास तयार होतात. प्रेसिडेंट रूझव्हेल्ट ह्यांनीं प्रस्तुत युद्धांतलें आपलें ध्येय अनेकवेळां स्पष्ट करून सांगितलें आहे आणि त्याचा अंतर्भाव " अटलांटिक सनदेंत " करण्यांत आला आहे. स्वातंत्र्यासाठी आणि जर्मन व जपानी जुलमाविरुद्ध झगडण्याकरितां सर्व राष्ट्रांस अमेरिका भरपूर सहाय्य देईल असें आश्वासन प्रेसिडेंट रूझव्हेल्ट ह्यांनीं दिलें आहे. जगाच्या युद्धोत्तर पुनर्घटनेंत व्यक्ती व राष्ट्रें ह्यांचें स्वातंत्र्य अबाधित राखणें, त्यांचें दारिद्र्यापासून संरक्षण करणें व सर्व राष्ट्रांस अन्न व कच्चा माल ह्यांचा अनिर्बंध पुरवठा होण्याची तजवीज करणें ह्या ध्येयांचा स्पष्ट उल्लेख अटलांटिक सनदेमध्यें आहे. गेल्या आठवड्यांत इंग्लंडचे परराष्ट्रमंत्री, मि. अँथनी ईडन आणि अमेरिकेचे सेक्रेटरी ऑफ स्टेट, मि. कॉर्डेल हल ह्यांनीं प्रस्तुत विषयावर भाषण करून युद्धोत्तर योजनेच्या तत्त्वांची पुन्हां घोषणा केली. त्याचप्रमाणें, ब्रिटिश लॉर्डांच्या सभेंत युद्धोत्तर काळांतील सांपत्तिक व्यवस्थेची चर्चा झाली. सध्या इंग्लंड व अमेरिका ह्यांचें युद्धासंबंधांतलें धोरण पूर्ण सहकार्याचें व एकसूत्री असें आहे. हा एकसूत्रीपणा आणि त्याच्या मुळाशीं असलेलें ध्येयवादित्व युद्धानंतरच्या शांततेच्या परिस्थितींतहि अबाधित रहावें अशी वर उल्लिखिलेल्या भाषणांतली विचारसरणी आहे.

नाझी लोकांनीं युरोपांत जित राष्ट्रांवर जे अत्याचार चालविले आहेत त्यांचें प्रायश्चित्त- योग्य वेळीं त्यांस देण्याचा इंग्लंड व अमेरिका ह्यांच्या कृतनिश्चय आहे असें मि. ईडन म्हणाले. गेलें महायुद्ध आपण जिंकलें पण त्याच्या अखेरीस स्थापन झालेल्या शांततेचें रक्षण करण्यांत आपणांस यश आलें नाहीं; ह्याचें कारण युद्ध आपण नेटानें शेवटास नेलें, पण त्याच नेटानें युद्धोत्तर व्यवस्था राखण्यांत आली नाहीं, पण ही चूक ह्या खेपेस होऊं देतां कामा नये असें त्यांनीं बजावलें. शत्रुराष्ट्राचें पूर्ण निःशस्त्रीकरण केलें जाईल आणि युद्धामुळें निकृष्टावस्थेस पोंचलेल्या राष्ट्रांस अन्नवस्त्राचा पुरवठा करण्यांत येऊन आपल्या आर्थिक जीवनाची घडी पुन्हां बसवण्यास त्यांस सहाय दिलें जाईल, ह्यासंबंधांत मि. ईडन ह्यांनीं पुढें मांडलेला मुद्दा असा होता कीं, युद्धानंतर पुनर्रचनेमध्यें ज्यांस सहाय देण्यांत येईल त्या राष्ट्रांचें स्वातंत्र्य कायम राखण्याची व्यवस्था होईल आणि त्यांचेवर कोणतेंहि परावलंबन लादण्यांत येणार नाहीं. राजकीय दृष्ट्या मागसलेल्या लोकांस स्वतःची प्रगति घडवून आणण्यासाठी उत्तेजन व सहाय मिळेल. युद्धोत्तर आंतरराष्ट्रीय संबंध नैतिक पायावर उभारण्यांत आले पाहिजेत आणि सर्व राष्ट्रांच्या जरूरीच्या आर्थिक गरजा सहकार्यानें भागवल्या जाण्याची तरतूद त्यामध्यें असली पाहिजे. ह्या नवीन युगाची पूर्वतयारी एव्हांपासून करण्यांत आली पाहिजे आणि तिचेविषयीं इंग्लंड व अमेरिका ह्यांचें पूर्ण ऐकमत्य आहे असें मि. ईडन ह्यांनीं सांगितलें. त्यांचा ध्येयवाद आणि नियोजित कार्यक्रम यांस मि. कॉर्डेल हल ह्यांनीं आपल्या भाषणांत दुजोरा दिला.

लॉर्डांच्या सभेंत युद्धोत्तर काळांतील आंतरराष्ट्रीय सांपत्तिक व्यवस्था ह्या विषयावर चर्चा झाली. तीमध्यें लॉर्ड ॲडिसन म्हणाले कीं प्रचंड कर्जें व चलनें ह्यांची समाधानकारक व्यवस्था लावण्यास एक आंतरराष्ट्रीय कमिशन स्थापावें लागेल आणि त्यास सर्व देशांत मजुरीचे दर निश्चित करावे लागतील. लॉर्ड पेरी म्हणाले कीं युद्ध खर्चाचा फार मोठा बोजा इंग्लंड वहात असून आपल्या जबाबदारीचा हिस्सा तें राष्ट्र पत्करील पण इतर राष्ट्रांनीं तिच्यामध्यें अंशभागी होणें आवश्यक आहे. ब्रिटिश मंत्रिमंडळाच्या वतीनें भाषण करतांना लॉर्ड सायमन ह्यांनीं सांगितलें कीं, कांहीं लोक युद्धानंतर सुवर्ण मूल्यमापनपद्धतीचें चलन पुन्हां स्थापन करण्याची भाषा बोलत आहेत; पण मागील युद्धाच्या अखेरच्या काळांत झालेल्या चुकांची पुनरावृत्ति न होण्याची खबरदारी घेण्याचा निश्चय करण्यांत आलेला आहे. युद्धाचा खर्च पैशांत मोजला जाणार नाहीं अशा अर्थाच्या प्रेसिडेंट रूझव्हेल्ट ह्यांच्या घोषणेचा निर्देश करून आपण त्यांच्याशीं सर्वस्वी सहमत असल्याचें त्यांनीं सांगितलें. युद्धाचा फायदा कोणात्याहि एका राष्ट्रास मिळतां कामा नये आणि आर्थिक पुनर्घटनेमध्यें सर्व राष्ट्रांनीं सारखीच भागीदारी उचलणें अगत्याचें आहे असें म्हणून ह्या उच्च नैतिक भूमिकेवर इंग्लंड व अमेरिका ह्यांचें एकसूत्री धोरण आहे व राहील असे उद्गार लॉर्ड सायमन ह्यांनीं काढले. युरोपांतलीं अनेक राष्ट्रें जर्मनीनें उध्वस्त केलीं आहेत आणि चीनमध्यें जपाननें भयंकर अत्याचार करून त्या राष्ट्राचा नाश केला आहे. शत्रुराष्ट्रांनीं सर्व जगावर आर्थिक आपत्ति आणली आहे. ह्या दुष्ट विध्वंसाचे परिणाम नष्ट करून मानवी जीवनाची व्यवस्थित व सुरक्षित घडी बसण्याचें कार्य किती प्रचंड व अवघड आहे ह्याची कल्पना येणें देखील कठिण आहे. तें यशस्वी होण्यास मित्र राष्ट्रांनीं उच्च नैतिक भूमिकेवरूनच पुनर्रचनेचे प्रयत्न करणें अगत्याचें आहे. ह्याची जाणीव इंग्लंड व अमेरिका ह्या देशांत जागृत आहे हें समाधानकारक आहे.

## युद्धपरिस्थितींत खाद्यपदार्थांचा पुरवठा

(२)

( प्रो. धा. गो. काळे यांचें मुंबई रेडिओवरील भाषण, रेडिओ अधिकाऱ्यांचे कृपेनें उद्धृत केलें आहे. )

सरकारांनीं ह्या कामावर खास अधिकारी नेमले आहेत आणि ते रेलवेज व घाउक व्यापारी ह्यांच्याशीं विचार विनिमय करून जरूरीच्या खाद्य पदार्थांची जनतेची मागणी पुरी पाडतां येईल अशी व्यवस्था करतात. गव्हाच्या सार्वत्रिक पुरवठ्याचें व त्याच्या उत्पादनक्षेत्रांचें वैशिष्ट्य लक्षांत घेऊन मध्यवर्ती सरकारानें त्या मालाच्या व्यवस्थित वांटणीचें नियमन करण्यासाठीं एक खास अधिकारी नेमला आहे. कोठें, कोठून व किती गहूं रेलवेनें पाठवला जावा हें त्यानें ठरवावयाचें असून पुरवठ्याची समाधानकारक वांटणी करावयाची आहे. साखरेच्या पुरवठ्याचे बाबतींत अशीच तजवीज केलेली आहे. देशाच्या निरनिराळ्या भागांत साखरेचे कारखाने असले तरी संयुक्त प्रांत व बिहार येथें साखरेचें उत्पादन फार मोठ्या प्रमाणावर होतें आणि तेथून दूरदूरच्या प्रांतांत साखर पुरवण्यांत येते. हा व्यापार मामुली पद्धतीनें चालू दिल्यास साखरेचा पुरवठा नीट वांटला न जातां तिच्या किंमती मात्र चढतील असें दिसून आल्यावरून किंमती व विक्री ह्यांचें नियंत्रण एका खास सरकारी अधिकाऱ्याकडून केलें जात आहे. किंमती ठरविलेल्या आहेत आणि परवाना असलेल्या व्यापाऱ्यांमार्फत विक्री होत आहे.

### व्यापारी व्यवहारांचें यंत्र

पावसाळ्याच्या प्रारंभापासून धान्याचीं पिकें हातीं येतील तोंपर्यंतच्या अवधींत खाद्य पदार्थांचा पुरवठा घाउक व्यापाऱ्यांच्या साठवणीमधून होणें अपरिहार्य असतें. ह्यावेळीं प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या हातांतून त्यांनीं केलेलीं पिकें व्यापारी वर्गाकडे गेलेलीं असतात आणि त्यांस स्वतःस हाच माल लागेल तसतसा विकत घ्यावा लागतो. शहरी लोकांचें व कामकऱ्यांचें व्यापाऱ्यांवरचें अवलंबन ह्या दृष्टीनें आश्चर्यकारक वाटण्याचें कारण नाहीं. शांततेच्या काळांत व मामुली परिस्थितींत व्यापारी व्यवहारांचें यंत्र सुरळीत चालतें आणि तें सामान्य जनतेस उपयुक्तहि ठरतें; सुगीच्या वेळीं खरीदलेला सांठवणींतील माल बेताबेतानें विक्रीस काढणें आणि पुढें त्याचा तुटवडा होण्याचा संभव आहे असें दिसून आल्यास त्याचे भाव थोडे चढवून मागणी-पुरवठ्याचा मेळ घालणें ही व्यापारी वर्गाची सामाजिक कामगिरी होय आणि व्यापारांतला नफा हा तिचा मोबदला समजला जातो. मामुली परिस्थितींत सुरळीतपणानें चालणारें हें व्यापारी व्यवहारांचें यंत्र युद्धासारख्या काळांत मात्र चांगलें काम देऊं शकत नाहीं. एखाद्या ठिकाणीं विशिष्ट मालाच्या किंमती चढल्या असतां त्याचा फायदा घेण्यासाठी धंदेवाले बाहेरून तो माल आणतात आणि ह्या रीतीनें स्थानिक पुरवठा वाढला म्हणजे किंमती उतरतात. परंतु हा नियम पुरवठ्याची व वहातुकीची परिस्थिति बदलल्यामुळें लागू पडत नाहीं. वहातुकीचें प्रमुख साधन आगगाड्या होत. त्यांचा उपयोग युद्धोपयोगी जिनसांची ने-आण करण्यांत प्रथम झाला पाहिजे हें निर्विवाद आहे. लष्करी गरजांचें अग्रेसरत्व गृहीत धरून आणि जनतेच्या निकडीच्या मागण्यांस त्यांच्या खालोखाल महत्त्व देऊन त्या भागवण्याची व्यवस्था सरकारास करावी लागते. ह्या विषयीची जबाबदारी सरकारावर येऊन पडते तेव्हां ती पार पाडण्यास व्यापारी व्यवहारांचें नियंत्रण करणें ओघानेंच प्राप्त होतें. मागणी-पुरवठ्याचें व वैयक्तिक आर्थिक स्वातंत्र्याचें तत्त्व येथें गैरलागू आहे आणि व्यापारी व जनता यांनीं नियंत्रणाच्या योजना यशस्वी होण्यासाठी सहकार्य करणें अगत्याचें आहे. लोकांनीं खाण्यापिण्याचे जिन्नस, कापड इत्यादि नित्याच्या जरूरीच्या वस्तु किती वापराव्या त्याचें नियंत्रण किती तरी अधिक कडक रीतीनें इंग्लंडमध्यें तेथील सरकारनें केलें आहे. त्या सर्वव्यापी नियंत्रण योजनेच्या मानानें हिंदुस्थानांतील व्यवस्था अतिशय सौम्य आहे ह्यांत शंका नाहीं. सामान्य लोकांच्या गरजा व सोयी ह्यांच्याकडे प्रथम पाहून जरूर वाटणारे निर्बंध आर्थिक व्यवहारांवर घालणें सरकारचें आद्य कर्तव्यच आहे. व्यापाऱ्यांप्रमाणें नागरिकांनीं मात्र जरूरीपेक्षा अधिक माल साठवता कामा नये.

### नियंत्रणाची अंमलबजावणी

गेल्या महिन्यांत देशाच्या निरनिराळ्या भागांत आणि ह्या प्रांतांत व मुंबई शहरांतहि कित्येक महत्वाच्या खाद्य व इतर पदार्थांच्या किंमती बेसुमार वाढल्या, पुढें किंमती आणखी वाढतील आणि त्याचा फायदा आपणांस मिळवतां येईल किंवा पुढें मालाचा तुटवडा होईल तो कमी जाचक व्हावा म्हणून कांहीं व्यापाऱ्यांनीं ठिकठिकाणीं माल दडपून ठेवला किंवा त्याबद्दल अवास्तव किंमती घेतल्या अशा तक्रारी होऊन सामाजिक हितास विघातक अशीं हीं कृत्यें करणारांस शासनहि झालें आहे. एकीकडे आवश्यक जिनसा मिळण्याची लोकांस अडचण भासत असतां दुसरीकडे कांहीं व्यापाऱ्यांचे जवळ माल साठलेला होता ही स्थिति चालू देणें लोकहिताच्या दृष्टीनें सरकारास शक्यच नसल्यानें नियंत्रणाची अंमलबजावणी कडक रीतीनें त्यास करावी लागली आहे. तांदूळ व साखर ह्या जिनसांच्या विक्रीच्या व किंमतीचें नियंत्रणाची योजना मुंबई सरकारनें अलीकडे अंमलांत आणली आहे तिच्यावरून ह्या परिस्थितीवर उत्कृष्ट प्रकाश पडतो. मुंबई शहरांत तांदुळाच्या किंमती विलक्षण वाढल्या तेव्हां चौकशी अंती असें आढळून आलें कीं बेताच्या भावानें खरीदलेला माल कित्येक व्यापाऱ्यांच्या ताब्यांत असून त्यांनीं भरमसाट नफेबाजी चालवली होती. हा अनिष्ट प्रकार बंद पाडण्यासाठीं सरकारनें भिन्नभिन्न प्रकारच्या तांदुळाच्या घाऊक व किरकोळ किंमती ठरवून टाकल्या असून त्यांच्यापेक्षां अधिक भावानें माल विकणें हा गुन्हा ठरवला आहे. ह्या नियंत्रणांतून निसटण्याचा कांहीं व्यापारी प्रयत्न करतील आणि ठराविक किंमतीस विकण्यासाठी आपला माल बाहेर काढणारच नाहींत हें संभवनीय असल्यानें सरकारनें तांदुळाच्या साठ्यांचेंच नियंत्रण केलें आहे. घाउक व्यापाऱ्यांनीं सरकारच्या परवानगीवांचून आपल्या साठ्यांतून तांदूळ हालवतां कामा नये किंवा किरकोळ व्यापाऱ्यांस व इतरांस विकतां कामा नये असा हुकूम काढण्यांत आला आहे. प्रांताबाहेरून तांदूळ आणण्याची व स्थानिक पुरवठा वाढवण्याची व्यवस्थाहि सरकार करीत असून तिचे योगानें ह्या मालाचा तुटवडा होण्याची भीति उरणार नाहीं.

( संपूर्ण )

## स्फुट विचार

### हिंदी फडनवीसांची लंडनला भेट

हिंदुस्थान सरकारचे फडनवीस, सर जेरमी रेस्मन, हे नुकतेच लंडनला गेले आहेत आणि ते ब्रिटिश फडनविशी खात्याशी महत्त्वाच्या सांपत्तिक प्रश्नांची चर्चा करणार आहेत असें प्रसिद्ध झालें आहे. युद्धाच्या घडामोडींमुळें हिंदुस्थानच्या सांपत्तिक परिस्थितीबाबत अनेक गुंतागुंतीचे प्रश्न उपस्थित झाले असून ब्रिटिश सरकाराच्या संमतीनें त्यांचा निकाल लावून घेणें सर जेरमी ह्यास आवश्यक झालें आहे. हिंदुस्थानांत लष्करी खर्च सारखा वाढत आहे. त्यांतला किती भाग ब्रिटिश तिजोरीवर पडावा ह्याचा निर्णय व्हावयाचा आहे. युद्धखर्चाच्या वाटणीचा प्रश्न सोडवतांना त्याची आपल्या पुरती योग्य जबाबदारी ब्रिटिश सरकारनें उचलली पाहिजे असा आग्रह हिंदुस्थानच्या फडनवीसांनीं धरणें स्वाभाविक आहे आणि हिंदी लोकमताच्या दृष्टीनें तें अगत्याचेंहि आहे. तसेंच, अमेरिकेनें पुरवलेल्या युद्ध सामुग्रीच्या देण्याबाबतचा हिशेब "लीज अँड लेंड"च्या व्यवस्थेस अनुसरून किती व कसा व्हावयाचा हाहि प्रश्न महत्वाचा आहे. ह्या सामुग्रीचें देणें उधारीच्या खात्यानें हिशेबीं धरण्याची पद्धति अवलंबण्याचे संबंधांत समाधानकारक निर्णय झाला पाहिजे. साम्राज्य सरकारच्या वतीनें हिंदुस्थान सरकार ह्या देशांत कोट्यवधि रुपयांच्या रकमांचा वटवटा करीत आहे. ह्या रकमा हिंदुस्थान सरकारच्या रिझर्व्ह बँकेच्या खात्यांत लंडनमध्यें जमा होत आहेत, त्यांचें काय करावयाचें हेंहि सर जेरमी ह्यांस ठरवून घ्यावें लागेल. हिंदुस्थानचें विलायतेंतलें कर्ज फेडून टाकून ह्या शिलकांची वजावाट करण्याच्या उपायाचा अवलंब आतांपर्यंत झाला आहे आणि होत आहे. मुदतबंदी विलायती कर्जांची फेड झाली आहे आणि साडेतीन टक्के व्याजाच्या बिनमुदती कर्जांची फेड पुढील वर्षी केली जाईल. ह्या प्रकारच्या कर्जफेडीस पुरून उरेल इतक्या हिंदुस्थानच्या शिलका लंडनमध्यें साठूं लागल्या असतां तो पैसा इकडे कसा परत आणावयाचा हा येथें प्रश्न आहे. तो पैसा लंडनमध्यें गुंतवावा कीं काय आणि तसा गुंतवावयाचा म्हटल्यास कोणत्या तऱ्हेनें ही गुंतवण करावी ह्याची चर्चा हिंदी फडनवीस लंडनमध्यें ब्रिटिश तिजोरीशी करतील. हिंदुस्थानच्या चलन खात्याच्या निधीपैकीं २६६ कोटि रुपये स्टर्लिंग रोख्यांत आज लंडनमध्यें गुंतलेले आहेत असें रिझर्व्ह बँकेच्या ताज्या हिशेबी तक्त्यावरून दिसतें. ह्या बँकेच्या बँकिंग शाखेंत ८४ कोटि रुपये ह्याप्रमाणेंच बाहेर गुंतलेले आहेत असें त्या हिशेबांत नमूद आहे. लंडनमध्यें फुगणाऱ्या हिंदी शिलकांची विल्हेवाट हा सर जेरमी ह्यांच्या तेथील चर्चेंतला एक प्रश्न असणें अपेक्षित आहे. हिंदी फडनवीस लंडनहून परत आले म्हणजे आपल्या वाटाघाटींतून कोणते निर्णय बाहेर पडले ह्याची माहिती ते येथें देतील तेव्हां प्रस्तुत प्रश्नावर आवश्यक तो प्रकाश पडेल असें समजण्यास हरकत नाहीं.

### प्रांतिक सरकारांचें उत्पन्न आणि खर्च

हिंदुस्थानचा लष्करी खर्च मध्यवर्ती सरकारावरच सर्वस्वी पडत असल्याकारणानें त्याच्या जमाखर्चांत तूट येणें स्वाभाविक आहे. जादा खर्च, जादा कर व वाढतें कर्ज हे मध्यवर्ती सरकाराच्या सांपत्तिक स्थितीचें युद्धकालीन विशेष आहेत. ह्या बाबतींत प्रांतिक सरकारांची स्थिति भिन्न आहे. कारण, लष्करी खर्च त्यांच्या वाट्यास येत नाहीं. तथापि, युद्धजन्य परिस्थितीचा परिणाम त्यांच्याहि तिजोऱ्यांवर थोडा बहुत झाल्यावांचून रहात नाहीं. ह्या देशांतील अकरा प्रांतिक सरकारांचा खर्च १९४०–४१ च्या मानानें १९४२–४३ च्या अंदाज-पत्रकाप्रमाणें ९ कोटि रुपयांनीं वाढला आहे. १९४०–४१ च्या पुऱ्या झालेल्या हिशेबांत प्रांतिक सरकारांचें एकूण उत्पन्न ९५ कोटि रुपये होतें आणि चालू वर्षांत तत्सम आकडा १०४ कोटि रुपयांचा धरण्यांत आला आहे. गेल्या वर्षाच्या दुरुस्त अंदाज पत्रकाप्रमाणें त्यांचा खर्च १०५ कोटि रुपये झाला आहे. १९४०–४१ आणि १९४२–४३ ह्या तीन वर्षांच्या अवधींत प्रांतिक उत्पन्न ७ कोटि रुपयांनीं वाढलें आहे. ह्या तीन वर्षांचे आंकडे अनुक्रमें करून ९७, १०९ व १०४ असे आहेत. प्रांतिक खर्चांत झालेल्या वाढीचा संबंध अप्रत्यक्ष रीतीनें युद्ध परिस्थितीशीं येतो. पोलिस खातें, बिन लष्करी संरक्षण, महागाई भत्ता, जमीन महसुलांत सूट, युद्धोत्तर बाबींविषयींची सांपत्तिक तरतूद (मुंबई व संयुक्त प्रांत) इत्यादि बाबींवर अधिक खर्च झालेला आहे. प्रांतिक सरकारांचें उत्पन्न वाढण्याचें प्रमुख कारण प्राप्तीवरील कराच्या वसुलींतला वाढलेला त्यांचा हिस्सा आणि मध्यवर्ती सरकारकडून त्यांस मिळालेलें द्रव्य-सहाय हें होय. जमीन-महसूल आणि जंगलांचें व एक्साइज खात्याचें उत्पन्न ह्यांतहि वाढ झाली आहे.

### किरकोळीनें विक्री करणाऱ्या व्यापाऱ्यांच्या तक्रारी

गेल्या आठवड्यांत मुंबईंतील धाऊक दुकानांवर किरकोळ विक्रीच्या दुकानदारांनीं निरोधन करण्यास प्रारंभ करून आपलीं गाऱ्हाणीं वेशीस टांगलीं व डायरेक्टर ऑफ सिव्हिल सप्लाइज, मि. पंजाबी ह्यांची ग्रेन डीलर्स असोसिएशननें गांठ घेऊन त्यांचेपुढें आपल्या तक्रारी मांडल्या. असोसिएशननें सुचविलेल्या सुधारणा पुढीलप्रमाणें आहेत : सर्व प्रकारचा तांदूळ नियंत्रित किंमतीस मिळावा. परवाने सत्वर मिळण्याची व्यवस्था व्हावी. किरकोळीनें विक्री करणाऱ्या व्यापाऱ्यांस माल मिळण्याच्या पद्धतींत आमूलाग्र सुधारणा घडून यावी. भिवंडी, पनवेल व कल्याण जातींच्या तांदळांतील फरकाप्रमाणें किंमती ठरविण्यास धाऊक व्यापाऱ्यांस भाग पाडावें. व्यापाऱ्यांस दररोज ४०० पोतीं साखर मिळते, तीं ५०० पोतीं करण्यांत यावींत. साखरेच्या पोत्यांचें वजन निश्चित असावें व किरकोळ व्यापाऱ्यांस पोतीं वजन करून मिळावींत. लहानसहान खरेदीदारांसहि बिलें करून देण्याची व्यापाऱ्यांवर सक्ती नसावी. ज्यांना शिक्षा झालेली आहे, अशांना विक्रीचा परवाना कंट्रोलरनें नाकारूं नये. घाऊक व्यापाऱ्यांनींच स्वतः नफा मिळविण्यासाठी किरकोळ विक्रीचीं दुकानें उघडूं नयेत. मालावर नियंत्रण बसवितांना किरकोळ व्यापाऱ्यांचे प्रतिनिधींचा सल्ला घेण्यांत यावा, इत्यादि. मि. पंजाबी ह्यांनीं असोसिएशनचें म्हणणें ऐकून घेऊन त्यांच्या तक्रारींचा काळजीपूर्वक विचार करण्याचें आश्वासन दिलें. तांदळाचा पुरवठा अपुरा नाहीं, असें गव्हर्नरांचे सल्लागार मि. नाईट ह्यांनीं जाहीर केलेंच आहे. तेव्हां त्याच्या पुरवठ्याच्या व्यवस्थेंत कार्यक्षमता निर्माण होऊन जनतेची व व्यापाऱ्यांची सोय पहाण्यास अडचण पडूं नये.

### अमेरिकेंत खाजगी खर्चाचें नियंत्रण

युद्धांत पडलेल्या सर्व राष्ट्रांचा खर्च सहाजिकच विलक्षण रीतीनें वाढतो आणि तो पैसा लोकांच्या हातीं जाऊन त्यांची पदार्थ विकत घेण्याची शक्ति वृद्धिंगत होते आणि दुसऱ्या बाजूस जिनसांचा पुरवठा युद्धपरिस्थितीमुळेंच मर्यादित झाल्यानें मागणी-पुरवठ्यांचा परस्पर-संबंध बिघडून महागाई सार्वत्रिक होऊं लागते आणि तिची तीव्रता अधिकाधिक होत जाते. देशांत महर्गतेचा पारा सारखा चढत राहिल्यास तिचा ताण सामान्य

जनतेच्या राहणीवर होऊन ह्या परिस्थितीवर उपाय म्हणून कामकरी व नोकरवर्ग ह्यांची पगारवाढीविषयींची सारखी टोचणी चालू राहते. ह्या मागणीस अनुसरून पगारवाढ झाली की पदार्थ विकत घेण्याचें जनतेचें सामर्थ्य आणि चलन ह्यांचा विस्तार होतो आणि महागाईच्या प्रवृत्तीस पुन्हां जोर लागतो. युद्धकाळांतली ही अडचणीची परिस्थिति अमेरिकेसारख्या देशांत, तेथें युद्धखर्च बेसुमारपणानें चढत असल्यानें, विशेषच जाणवावी हें स्वाभाविक आहे. बेसुमार चलनवाढीचा प्रश्न तेथें वस्तुतः अत्यंत निकडीचा झाला आहे. त्याचे संबंधांत प्रेसिडेंट रूझवेल्ट कॉंग्रेसपुढें आपली एक योजना मांडणार आहेत असें समजतें. मजुरीच्या दरांच्या वाढीवर आणि जिनसांच्या बाजारभावांवर नियंत्रण असें तिचें दुहेरी स्वरूप राहील असें दिसतें. महागाईच्या प्रमाणांत मजुरीचे दर वाढवले जाणें योग्य व न्यायाचें होणार आहे ह्यांत शंका नाहीं. पण ह्या महागाईस आळा घालावयाचा म्हणजे पदार्थांच्या पुरवठ्याचें नियंत्रण व्यवस्थित व्हावें लागेल. अशा रीतीनें हा प्रश्न मोठ्या गुंतागुंतीचा असून तो सोडवण्याच्या उपायानें कामकरी वर्गाचें समाधान होणें अगत्याचें आहे. ह्यासंबंधांत स्वतंत्र कायदा करण्याची आवश्यकता नाहीं; अमेरिकेच्या प्रेसिडेंटास कार्यकारी सरकारचे मुख्य ह्या नात्यानें जे अधिकार आहेत त्यांच्या कक्षेंत मजुरीचे दर व बाजारभाव ह्यांचें नियंत्रण बसतें. नागरिकांनीं कोणते जिन्नस वापरावे आणि ते किती वापरावे ह्याचें नियमन होणें हेंहि ह्या नियंत्रणांत अगत्याचें असतें हें सांगावयास नको. प्रेसिडेंट रूझवेल्ट आपल्या पुढचा अवघड प्रश्न कसा सोडवतात ह्याची माहिती बोधप्रद झाल्यावांचून राहणार नाहीं.

## बक्षिस समारंभ.

नासिक, सिन्नर, निफाड, दिंडोरी व चांदवड तालुक्यांतील को-ऑपरेटिव्ह सोसायटींच्या यशस्वी सेक्रेटरींना प्रशस्ति-पत्रकें व बक्षिसें देण्याचा समारंभ तारीख ९-७-४२ रोजीं मे. जी. एस. डी. काळीया, असिस्टंट कलेक्टर, नासिक यांचे अध्यक्षतेखाली साजरा करण्यांत आला. सभेस रावबहादूर वंडेकर, एम्. जे. दीक्षित, रिटायर्ड, कलेक्टर, श्री. एम्. आर. दळवी व सहकारी खात्याचे प्रमुख अधिकारी व इतर सहकारप्रेमी मंडळी उपस्थित होती. प्रथमतः रा. ब. वंडेकर यांच्या विनंतीवरून मे. काळीया साहेब यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारलें. त्यानंतर श्री. एल. डी. कानडे, एज्युकेशनल सुपरवायझर यांनीं सहकारी शिक्षणाच्या योजनेबद्दलची सविस्तर माहिती दिली. नंतर मे. जी. के. प्रधान, ऑडिटर साहेब नासिक, यांनीं सहकारी शिक्षणाच्या महत्त्वाबद्दल उद्बोधक व उपदेशात्मक भाषण केलें. त्यानंतर श्री. एम्. आर. दळवी, नासिक जिल्हा राष्ट्रीय युद्ध आघाडी समितीचे प्रमुख कार्यकर्ते, यांनीं सोसायटीच्या सेक्रेटरींना चालू युद्धांत कोणत्या प्रकारची मदत करतां येईल याबद्दलच्या महत्त्वाच्या सूचना दिल्या. त्यानंतर सेक्रेटरी लोकांना अध्यक्षसाहेबांनीं प्रशस्ति पत्रकें दिलीं. व त्यांत श्री. एन्. एम्. गोंडेगांवकर व श्री. व्ही. आर. कोष्टी यांना आपआपल्या क्लासला पहिले आल्याबद्दल "सहकारी सोसायट्यांची अंतरव्यवस्था" हें पुस्तक व रौप्य पदकें हीं बक्षिसें दिलीं, व सेक्रेटरी लोकांना खेडोपाडीं राहून ग्रामीण जीवन सुधारण्याबद्दल संदेश दिला. ह्यानंतर रा. ब. वंडेकर यांनीं सहकारी चळवळ व शिक्षणक्रम याबद्दल माहितीपूर्ण भाषण करून अध्यक्षांचे आभार मानून त्यांना पुष्पहार घातला. सभेच्या कामाकरितां रा. ब. वंडेकर यांनीं हॉल दिल्याबद्दल त्यांचे श्री. जी. के. प्रधान साहेब यांनीं आभार मानल्यावर हा समारंभ संपला.


## दि बँक ऑफ इंडिया लि.

[स्थापना १९०६]

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल ... ... ... रु. | २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... ... ... रु. | १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड ... ... ... रु. | १,१८,००,००० |

मुख्य कचेरीः ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

मुंबईमधील शाखाः बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

इतर शाखाः अहमदाबाद (भद्र, मुख्य ऑफिस), अहमदाबाद (एलिस ब्रिज शाखा), अहमदाबाद (स्टेशन शाखा), अंधेरी (मुंबई शेजारीं), बांद्रे (मुंबई शेजारीं), कलकत्ता (क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर, कराची, नागपूर (किंग्जवे), नागपूर (इतवारी बझार), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत.

लंडन एजन्ट्सः वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

डायरेक्टर्सः सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई, सर जोसेफ के. नाईट, मि. ए. गेडिस, सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई., मि. दिनशा के. दाजी, श्री. रामनिवास रामनारायण.

करंट डिपॉझिट अकाउंट्स:

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षा कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमींचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

एजंट—टी. आर. लालवाणी.

## दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

हेड ऑफिस : पुणें शहर.

स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.

मुंबई शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | : रु. १०,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | : रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | : रु. ४,४०,३५० |
| वसूल झालेलें भांडवल | : रु. २,२०,१७५ |
| एकूण खेळतें भांडवल | : रु. ३५,००,००० |

### डायरेक्टर्स

प्रो. वा. गो. काळे, अध्यक्ष

| | |
|---|---|
| श्री. धों. कृ. साठे | श्री. मा. रा. जोशी |
| श्री. न. ग. पवार | श्री. श्री. गो. मराठे |
| श्री. त्र्यं. वि. रानडे | श्री. र. चिं. सोहोनी |
| श्री. बा. पुं. वर्दे | मि. फ. दो. पदमजी |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदीविक्री कसोशीनें करून दिली जाते.

बँकेच्या शेअरवर १९४१ अखेर पुऱ्या होणाऱ्या वर्षी द. सा. द. शेंकडा ४ टक्के करमाफ डिव्हिडंड दिलें गेलें. बँकेची शेअरविक्री चालू आहे.

म. वि. गोखले
मॅनेजर.

## दि ट्रस्ट ऑफ इंडिया, अॅशुअरन्स कंपनीची वार्षिक सभा

रविवार ता. २८ जून रोजीं दि ट्रस्ट ऑफ इंडिया अॅशुअरन्स कंपनीच्या भागीदारांची वार्षिक सभा झाली. सभेंत वार्षिक ताळेबंद व रेव्हेन्यू अकौंटला मंजुरी, डायरेक्टर व ऑडिटर यांची निवडणूक झाली. अध्यक्षांच्या भाषणाचा गोषवारा खालीं थोडक्यांत दिला आहे.

**नवीन कामः**—युद्धामुळें एकंदर व्यापारउदीमालाच मंदीची झळ लागत असून, युद्ध हिंदुस्थानचे दारांतच येऊन ठेपल्यानें ही परिस्थिति जास्तच बिकट होऊं पहात आहे. परंतु याही परिस्थितींत कंपनीचे १९४१ सालचे नवीन कामाचे आंकडे गतवर्षीपेक्षा प्रगतीचेच आहेत. पुढील तुलनात्मक आंकड्यांवरून या कठीण परिस्थितींतहि सालोसाल स्थैर्याशीं सुसंगत अशी, प्रगति करण्याचा क्रम कंपनीनें अबाधित राखल्याचें आपल्याला दिसून येईल.

| वर्ष | पॉलिसीची रक्कम | हप्त्याचें उत्पन्न | लाईफ फंड |
|---|---|---|---|
| १९३९ | रु. ४,०७,५२०/- | रु, ७०,६५६/- | रु. ४८,७०६/- |
| १९४० | रु. ५,८३,१७२/- | रु. ७३,७९४/- | रु. ६१,४५५/- |
| १९४१ | रु. ७,०१,८५६/- | रु. ८३,३३७/- | रु. ९८,०५५/- |

विमा हप्त्याचें उत्पन्न, लाईफ फंड व नवीन काम या सर्वांमध्यें दिसून येणारी वाढ कंपनीची सर्वांगिण प्रगति होत असल्याचें द्योतक आहे.

**खर्च :**—सध्याच्या बिकट परिस्थितींतहि या कंपनीचा खर्च नेहमींप्रमाणेंच काटकसरीचा रहावा याबद्दल आम्ही शक्य तों दक्षता घेत आहों. आपलें खर्चाचें प्रमाण अनेक जुन्या व प्रतिथयश कंपन्यांच्या प्रमाणाशी तुलना करून पाहिल्यास समाधानकारक असल्याचें दिसून येईल. यंदाचे वर्षी बेझवाडा, नेलोर इत्यादि ठिकाणीं नवीन एजन्सीज देण्यांत आल्या आहेत. तरीहि प्रचारकार्यार्थ केलेल्या खर्चाच्या रकमेपैकी कांहींहि रकम भांडवली खर्च म्हणून दाखविण्याची आवश्यकता भासली नाहीं.

**कंपनीच्या इन्व्हेस्टमेंटस :**—१९४१ अखेर आपल्यापाशीं एक लाख, सत्त्याहत्तर हजाराचे ( बाजार भावाप्रमाणें ) सरकारी व निमसरकारी रोखे होते. विमा कायद्याप्रमाणें रिझर्व्ह बँकेकडे दहा हप्त्यानें म्हणजे १९४७ अखेर आपल्याला दोन लाखांचें डिपॉझिट पुरें करतां येईल. परंतु ता. ३१-१२-१९४१ पासून आजपर्यंत नवीन रु. २३, १८९/ चे रोखे घेऊन आपण एकंदर दोन लाखांचे सरकारी व निमसरकारी रोखे खरेदिले आहेत.

**मूल्यमापन :**—१९४१ अखेर कंपनीचीं दुसरीं तीन वर्षें पुरी झाल्यामुळें कंपनीचें मूल्यमापन करून सरप्लसमधून बोनस जाहीर करावा, अशी अपेक्षा असणें सहाजिकच आहे. परंतु आपल्याला हें माहीतच असेल कीं, विमा क्षेत्रांतील अनेक तज्ज्ञांनीं व कांहीं जुन्या विमा कंपन्यांनींहि लढाईमुळें निर्माण होणाऱ्या आपत्तीस तोंड देण्यासाठीं विमा कंपन्यांनीं आपली मालमत्ता जपण्याचेंच धोरण अनुसरावें व नफा दिसून आल्यास तो बोनस म्हणून खर्ची टाकूं नये असें मत प्रतिपादन केलें आहे. कायद्यानेंच असा निर्बंध घालण्यांत यावा, अशीहि मागणी करण्यांत आली असून त्याबाबत विमा कंपन्यांचीं मतेंहि गोळा करण्यांत आलीं आहेत. आम्हीहि या सावधगिरीच्या धोरणाशीं सहमत असल्यानें चालू सालचें मूल्यमापन पुढें ढकलण्यांत आलें आहे.

**नागरिकांच्या जीविताची युद्ध जोखीमः**—युद्धाचीं पावलें हिंदुस्थानकडे वळूं लागलेलीं दिसत असल्यामुळें नागरिकांना विम्याचें संपूर्ण संरक्षण देणें हा अत्यंत महत्त्वाचा विषय आज विमा कंपन्यांपुढें आहे. सदर प्रसंग तात्काळ लक्षांत घेऊन कसलाहि जादा हप्ता न आकारतां युद्ध कालांतहि विमेदारांना विम्याचें संपूर्ण संरक्षण देण्याची तजवीज कंपनीनें केली आहे. ही कंपनीची महत्त्वपूर्ण योजना वर्तमानपत्रांतून पूर्वींच जाहीर केली आहे. त्याचप्रमाणें ए. आर. पी. मध्यें काम करणाऱ्या आमच्या नागरिक विमेदारांनाहि वरील सोईचा फायदा मिळणार असल्याचें प्रसिद्ध केलें आहे. आमच्या कंपनीचे जुने विमेदार आपल्या मूळ पॉलिसीज वाढवून घेऊन व इतर नागरिक नव्या पॉलिसीज घेऊन वरील सोईचा जास्तीत जास्त फायदा घेतील असा माझा विश्वास आहे. त्याचप्रमाणें ए. आर. पी. मध्यें काम करणारे आमचे जुने विमेदार याबद्दल आम्हांस धन्यवाद देऊन युद्धाचे खाईंत स्वतःला संपूर्ण संरक्षण निर्माण करतील, अशी माझी उमेद आहे.

**मॅनेजिंग एजन्सीचा अस्तः**—नव्या विमा कायद्यानें जून १९४२ अखेर कंपनीची मॅनेजिंग एजन्सी रद्द होत आहे. आपले कंपनीचे मॅनेजिंग एजंटसनीं आजपर्यंत कंपनीची जी निःस्वार्थी व निरपेक्षपणानें सेवा बजाविली त्याबद्दल त्यांना याप्रसंगीं धन्यवाद देणें आवश्यक आहे. त्याचप्रमाणें कंपनीला आज जी प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे, त्याचें सर्व श्रेय मॅनेजिंग एजन्सी फर्मचे दोघे भागिदार श्रीमंत सरदार विंचुरकर आणि श्री. देशमुख यांनीं कंपनीसाठी केलेल्या निःस्वार्थी सेवेलाच दिलें पाहिजे. वैयक्तिक हिताचा किंचितसुद्धां मोह न धरतां निव्वळ स्वार्थत्याग बुद्धीनें त्यांनीं आजपर्यंत कंपनीसाठी कष्ट सोसले हें आम्ही जाणतों, इतकेंच नव्हे तर आज कंपनीला विमा व्यवसायांत मिळालेलें महत्वपूर्ण स्थान हें त्यांच्याच कष्टाचें प्रतीक होय, असें म्हटलें तर त्यांत थोडीसुद्धां अतिशयोक्ती होणार नाहीं अशी मी ग्वाही देतों. कंपनीशीं असलेले त्यांचे जुने संबंध तुटण्याचे प्रसंगीं श्रीमंत सरदार विंचुरकर व श्री. देशमुख यांचे तुम्हां सर्वांतर्फे मी आभार मानतों.

निवृत्त होणाऱ्या मॅनेजिंग एजन्सी फर्मपैकीं श्री. विश्वनाथ हरि देशमुख, बी. ए. यांना कंपनीचे मॅनेजर म्हणून नेमण्यांत आलें आहे. त्यांचे नेतृत्वाखालीं कंपनीची उत्तरोत्तर भरभराटच होईल, असा मला विश्वास वाटतो.

---

### हिंदुस्थान–अमेरिका व्यापार

हिंदुस्थानाचा अमेरिकेशीं होणारा व्यापार दिवसानुदिवस वाढत आहे. १९४०–४१ मध्यें आयात त्यापूर्वीच्या वर्षाच्या मानानें सुमारें दुप्पट होऊन त्याची किंमत १४½ कोटींची २७ कोटि रुपये झाली व निर्गतींत ४½ कोटींची भर पडून ती ३२ कोटि रुपये झाली. निर्गत मालांत ताग, कातडीं, लाख, फळें, भाज्या, कपास, लोकर इत्यादींचा भरणा आहे. आयातींत मुख्यतः यंत्रसामुग्री, मोटारी, खनिज तेलें, रसायनें, रंग कापास व कातडीं कमावण्यास लागणारीं द्रव्यें, कागद, इत्यादि जिन्नस होते.

मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् को-ऑपरेटिव् बँक, लिमिटेड.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी-सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंग ९, बेक हाउस लेन, कोट मुंबई.

**शाखा**

| | |
|---|---|
| १ बारामती ( जि. पुणें ) | १८ अकलूज ( जि. सोलापूर ) |
| २ सातारा ( „ सातारा ) | १९ विरमगांव ( „ अहमदाबाद ) |
| ३ इस्लामपूर ( „ „ ) | २० धुळें ( „ प. खानदेश ) |
| ४ कऱ्हाड ( „ „ ) | २१ दोंडाईचें ( „ „ ) |
| ५ तासगांव ( „ „ ) | २२ शिरपूर ( „ „ ) |
| ६ किर्लोस्करवाडी( „ „ ) | २३ शहादें ( „ „ ) |
| ७ शिराळें ( „ „ ) | २४ नंदुरबार ( „ „ ) |
| ८ कोरेगांव ( „ „ ) | २५ साक्री ( „ „ ) |
| ९ वाई ( „ „ ) | २६ शिंदखेडें ( „ „ ) |
| १० अहमदनगर ( „ अहमदनगर ) | २७ तळोदें ( „ „ ) |
| ११ शेवगांव ( „ „ ) | २८ मालेगांव ( „ नाशिक ) |
| १२ कोपरगांव ( „ „ ) | २९ सटाणा ( „ „ ) |
| १३ बेलापूर ( „ „ ) | ३० कळवण ( „ „ ) |
| १४ राहुरी ( „ „ ) | ३१ लासलगांव ( „ „ ) |
| १५ भिवंडी ( „ ठाणें ) | ३२ नांदगांव ( „ „ ) |
| १६ पालघर ( „ „ ) | ३३ दोहद ( „ पंचमहाल ) |
| १७ कल्याण ( „ „ ) | ३४ कालोल ( „ „ ) |

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.



## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार



राहाणेची व भोजनाची उत्तम सोय




फोन नं. ७७९ गणपति चौक, व्यवस्थापक.



## N. V. WADNERKAR

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver,
Electro-plater & Manufacturer of Sporting Trophies, Medals, Cups etc.

- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -
POONA CITY.



## DECCAN BOOK STALL

Booksellers, Publishers & Subscription Agents
Fergusson College Road, Poona No. 4

(1) We stock and supply Educational books, General books & Library books.

(2) We supply Government of Bombay and Government of India publications.

(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.

(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, एं. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
(टपाल हशील माफ)
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ८ | पुणें, बुधवार, तारीख ५ ऑगस्ट १९४२ | अंक ३१

## विमेदार नि हवाई हल्ला

शत्रु राष्ट्राकडून हवाई हल्ला अगर तत्सम उपद्रव यापासून बिनलढाऊ नागरिकांच्या जीविताला येणाऱ्या धोक्याचा समावेश विमा पॉलिसीच्या अटींत होतो काय व त्यासाठी जादा प्रिमिअम भरावा लागेल काय ! असा प्रश्न साहजिकच नागरिकांमध्यें चर्चिला जात आहे.

## ट्रस्ट ऑफ इंडिया

विमा कंपनीच्या
विमा पॉलिसीमध्यें हवाई हल्ल्यामुळें जीविताला होणाऱ्या अपायाचा अंतर्भाव होतो त्याकरितां जादा प्रिमिअम नाहीं.

तरी विलंब न लावतां—
तुमचा नि तुमच्या आप्तेष्टांचा विमा
ट्रस्ट ऑफ इंडिया
विमा कंपनींतच उतरा.

अध्यक्षः—श्रीमंत सरदार जगन्नाथ महाराज पंडित
माहितीपत्रकें विनामूल्य पाठवूं

ट्रस्ट ऑफ इंडिया विमा कं. लि.
लक्ष्मी रोड, पुणें २

वि. ह. देशमुख, बी. ए.
जनरल मॅनेजर

## महायुद्ध दाराशीं आलें
## परदेशी औषधें
## दुर्मिळ व महाग झालीं

पण

भिण्याचें कारण नाहीं !!!

— कारण —

## आयुर्वेद रसशाळा पुणें लि॰

या देशी औषधाच्या प्रसिद्ध कारखान्यानें
तयार केलेलीं

- रक्तवर्धक,
- उपनाह,
- बालजीवन,
- कॅल्सीप्राल

इत्यादि पेटंट, स्टँडर्ड व लोकप्रिय औषधें खात्री पटल्यामुळें

★ डॉक्टर्सहि वापरूं लागले आहेत. ★

दरसाल बिनचूक नफा वाटणाऱ्या ह्या कंपनीचे शेअर्स व औषधें मागवा.

आयुर्वेद रसशाळा पुणें लि॰
मुख्य दुकान गणपति चौक, लक्ष्मीरोड, पुणें २.

महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर

## महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

# विविध माहिती

**अमेरिकन सैनिकांसाठी अमेरिकन लष्करी कोर्ट**

ग्रेट ब्रिटनमधील अमेरिकन सैनिकांवरील फौजदारी दावे चालविण्याचा अधिकार ब्रिटिश कोर्टाकडे न रहातां तो अमेरिकन लष्करी कोर्टाकडे देण्यांत येईल. ह्या संबंधांत ब्रिटिश व अमेरिकन सरकारांचा करार झाला असून त्यास कायदेशीर स्वरूप देण्यासाठी लॉर्डांचे सभेंत एक बिल तातडीनें मांडण्यांत आलें आहे.

**जळणाचा पुरवठा**

अमेरिकन कारखाने चालू ठेवण्यास १९४४ मध्यें १९४१ चे मानानें ५० टक्के अधिक जळण लागेल व त्यासाठी केवळ त्याच्या घरगुती वापरांत काटकसर करून भागणार नाहीं, नवीन जळणाचीं साधनें निर्माण केलीं पाहिजेत, असें तज्ज्ञ मत अमेरिकेंत व्यक्त करण्यांत आलें आहे.

**युद्धकार्यासाठी ब्रिटिश जनतेचा स्वार्थत्याग**

१९४१ सालीं ब्रिटिश जनतेच्या एकूण ६ अब्ज, ३४ कोटि रुपयांच्या उत्पन्नापैकीं तेथील सरकारनें कराच्या रूपानें २ अब्ज ५६ कोटि रुपये घेतले म्हणजे, एकूण प्राप्तीच्या दोन पंचमांश रकम सरकारास मिळाली. १९४० सालीं हें प्रमाण एक तृतीयांश व १९३८ सालीं एक चतुर्थांश असें होतें. १९४१ सालांतील जनतेच्या एकूण प्राप्तीपैकीं६०% रकम युद्धकार्याकडे खर्च झाली.

**कांहीं प्रमुख आयुर्विमा कंपन्यांचें नवीन काम**

| कंपनीचें नांव | १९४१ मधील नवीन काम (लक्ष रु.) |
|---|---|
| ओरिएंटल | ८१६ |
| हिंदुस्थान को-ऑपरेटिव्ह | २७० |
| न्यू इंडिया | १७७ |
| बॉंबे म्युच्युअल | १७१ |
| नॅशनल | १६६ |
| भारत | १४० |
| एम्पायर ऑफ इंडिया | १३४ |
| युनायटेड इंडिया | ११८ |
| लक्ष्मी | १०१ |

**गुजरात रेल्वेज कं. लि.**

वरील कंपनीनें ३१ मार्च, १९४२ अखेर संपलेल्या वर्षाचे ४½% दरानें डिव्हिडंड जाहीर केलें आहे. पहिल्या सहामाहीचें अँड-इंटेरिम ४% डिव्हिडंड जाहीर केलें होतें त्यांत दुसऱ्या सहामाहीचें ४½% डिव्हिडंड मिळविलें, म्हणजे संबंद वर्षाचें ४½% डिव्हिडंड होतें. डिव्हिडंडमधून कर वजा केला जाईल.

**पुणें इलेक्ट्रिक सप्लाय कं. लि.**

वरील कंपनीनें जून, १९४२ अखेरचें सहामाहीचें अँड-इंटेरिम डिव्हिडंड जाहीर केलें आहे. प्रेफरन्स भागांस ७% (कर माफ नाहीं) व ऑर्डिनरी भागांस ४% (करमाफ) डिव्हिडंड मिळेल.

**युद्धफंड**

व्हाइसरॉयांच्या युद्धफंडाचा आकडा ७ कोटि, ४ लक्ष रुपये झाला आहे. त्यांतून ६ कोटि रुपयांचा विनियोग करण्यांत आला असून ७४½ लक्ष रुपये लवकरच प्रत्यक्ष दिले जातील. शिल्लक रकम २७½ लक्ष रुपये आहे.

**ब्रह्मदेशांतून हिंदुस्थानांत आलेले निर्वासित**

ब्रह्मदेशांतून हिंदुस्थानांत १ जानेवारी ते ९ मे ह्या मुदतींत विमानमार्गे आणून सोडलेल्या लोकांची अधिकृत वर्गवारी प्रसिद्ध करण्यांत आली आहे. एकूण ११,२१० लोक आणून सोडले, त्यांपैकी ४१२५ हिंदी व बाकीचे युरोपियन, अँग्लो-इंडियन व अँग्लो-जर्मन होते.

**भोंगे**

हवाई हल्ल्याचा इषारा देणारे आणखी पांच भोंगे हैद्राबाद शहरांत व त्याच्या उपनगरांत बसविण्यांत आले असून अशा रीतीनें आतांपावेतों एकंदर अकरा भोंग्यांची व्यवस्था करण्यांत आली आहे.

**पोस्टांतील सुरक्षित पैसा**

नडियाद येथील एका मनुष्याच्या पणजानें, आजानें व बापानें पोस्टांत उघडलेल्या सेव्हिंग खात्याचे पैसे त्यानें आपला हक्क शाबीत करून नुकतेच मिळविले. ह्यापैकीं दोन खात्यांत १८८६ पासून व एका खात्यांत १८८७ पासून मुळींच देवघेव झाली नव्हती.

**मशीन टूल्सचे कारखाने**

हिंदुस्थानांतील सुमारें १०० कारखाने दारूगोळयाच्या निर्मितीस आवश्यक असलेल्या मशीन टूल्सच्या उत्पादनांत गुंतलेले आहेत.

**ब्रह्मदेशांतील हिंदी नागरिक**

ब्रह्मदेशांतील एकूण हिंदी नागरिकांपैकीं सुमारें निम्मे नागरिक हिंदुस्थानकडे परतले आहेत. बंगालमध्यें व आसाममध्यें प्रत्येकीं २ लक्ष लोक चालत आले. समुद्रमार्गानें आलेल्यांची संख्या ७० हजार भरली व विमानमार्गानें १२ हजार लोक दाखल झाले.

**सुताच्या विक्रीवर नियंत्रण**

सप्टेंबर १९४२ नंतर मुंबई प्रांतांत कोणीहि सरकारी परवान्याविना कपाशीचें सूत विकतां कामा नये अथवा विक्रीकरितां सांठवितां कामा नये, असें मुंबई सरकारनें जाहीर केलें आहे.

**शेतकामासाठी कैद्यांचें स्थलांतर**

सिलोनमधील धान्याचें उत्पादन वाढविण्याकरितां शेतकामाकडे कैद्यांचा उपयोग करण्यांत येणार आहे. शहरांतील तुरुंगांमधील कैद्यांचें शेतांकडे स्थलांतर करण्यांत येईल.

**वाढती महागाई**

मुंबई शहरांतील जून १९३४ अखेरच्या वर्षीच्या रहाणीच्या खर्चाचें प्रमाण १०० धरलें, तर तें १५ जुलै १९४२ अखेरच्या महिन्यांत १६८ झालें. त्यापूर्वीच्या महिन्यांत तें १५२ होतें.

**रॉकेलऐवजीं कोळसा वापरा**

ज्या ठिकाणीं मोठ्या प्रमाणावर रॉकेल लागतें अशा हॉटेल्स वगैरे ठिकाणीं त्याचा शक्य तेवढा वापर कमी व्हावा, म्हणून जळण म्हणून रॉकेलचे ऐवजीं कोळसा वापरावा, अशी मुंबई सरकारनें विनंति केली आहे. जेथें गॅस व वीज मिळूं शकत नाहीं, अशा ठिकाणच्या लोकांची गैरसोय वांचविण्याचा हा प्रयत्न आहे.

**जपानी हेर**

ब्रह्मदेशांतून हिंदुस्थानांत आलेल्या लोकांबरोबर कांहीं जपानी सरकारचे हेरहि आले असण्याचा संभव आहे. अशा हेरास पकडून देणारास अथवा त्याची माहिती देणारास ५ हजारांपर्यंत बक्षीस मिळेल, असें आसाम सरकारनें जाहीर केलें आहे.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | २४४ | स्थिति—रिझर्व्ह बँकेची कामगिरी—पडघाळें एक तास पुढें होणार—रिझर्व्ह बँकेच्या भागांची वाटणी—श्री. मराठे ह्यांची ज्युबिली | |
| २ हिंदी पोलादाच्या धंद्यास युद्धाचें उत्तेजन ... | २४५ | ७ साखरेचा पुरवठा ... | २४९ |
| ३ २७ व्या कलमाचा अर्थ | २४६ | ८ इंदूर पु. स. पेढी ... | २४९ |
| ४ प्राप्तीवरील कराऐवजीं पोस्टांत ठेव ... | २४६ | ९ बँक ऑफ सिटिझन्स | २४९ |
| ५ डिव्हिडंड ... | २४६ | | |
| ६ स्फुट विचार ... | २४७ | | |
| प्रांतिक सहकारी संस्थांची | | | |



# अर्थ

बुधवार, ता. ५ ऑगस्ट, १९४२


## हिंदी पोलादाच्या धंद्यास युद्धाचें उत्तेजन.

हिंदी पोलादाच्या धंद्यास प. वा. जमशेटजी टाटा ह्यांच्या विलक्षण धाडसी, चिकाटीच्या व दूरदर्शी औद्योगिक धोरणामुळेंच प्रारंभ होऊं शकला. पण ह्या धंद्याचा उत्कर्ष टाटा कंपनीच्या धाडसास सरकारच्या औद्योगिक संरक्षणाची जोड १९२४ सालीं मिळाली नसती तर झाला नसता. हिंदी लोकमतास अनुसरून आणि टॅरिफ कमिशनच्या शिफारसींस अनुसरून त्या वर्षी हिंदुस्थान सरकारनें संरक्षणाचें धोरण स्वीकारलें त्या योगानें अनेक हिंदी धंद्यांची प्रगति घडून आलेली आहे. पोलादाच्या धंद्यास जकातीच्या संरक्षणाचें सहाय मिळालें त्याचा पूर्ण फायदा त्यानें घेऊन राष्ट्रीय हिताच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाची कामगिरी बजावली आहे. ह्या प्रगतीचा उपयोग प्रस्तुत युद्धपरिस्थितींत किती होत आहे ह्याची कल्पना हिंदी जनतेस येणें अगत्याचें आहे. आधुनिक युद्ध-सामुग्रींत पोलादाच्या भरपूर पुरवठ्यावांचून सैन्याचें, आरमाराचें, विमानदलाचें किंवा वहातुकीच्या साधनांचें पाऊल पुढें पडणें अशक्य झालें आहे, हें सुप्रसिद्धच आहे. शक्य तेवढीं शस्त्रास्त्रें हिंदुस्थानांत निर्माण करणें अगत्याचें असल्यानें सरकारचें लक्ष स्वदेशी पोलादाच्या धंद्याकडे जाऊन त्याचा विस्तार केला जाणें स्वाभाविक आहे. ह्या देशांत पोलादाच्या बनावटीस लागणारी प्राथमिक स्वरूपाची सर्व साधनसामुग्री आहे. अशोधित लोखंड, कोळसा इत्यादि स्वरूपाचा माल येथें विपुल आहे त्याचा उपयोग करण्यांत येऊन आतां ह्या देशाचें पक्क्या पोलादाचें उत्पादन युद्धकालांत पन्नास टक्क्यांनीं वाढलें आहे आणि तें लवकरच दुप्पट होईल अशी अपेक्षा आहे. पोलादाचे नवे कारखाने काढणें किंवा पूर्वी तयार होत नसलेल्या पोलादाच्या जातींच्या बनावटीची तयारी करणें सोपें नाहीं. ह्या विस्तारास निरनिराळ्या प्रकारचीं यंत्रें लागतात आणि पाणी व वीज ह्यांचा पुरवठा सोयीचा मिळावा लागतो. ह्या तऱ्हांच्या अडचणी हिंदी पोलादाच्या धंद्याची प्रगति आणखी झपाट्यानें होण्याच्या मार्गांत उभ्या राहिल्या आहेत. तथापि, त्या दूर करण्याचे कसोशीचे प्रयत्न चालू आहेत आणि हिंदी पोलादाच्या कारखान्यांत पूर्वी तयार न होणारा माल बनवला जात आहे.

युद्धकालाचे पूर्वी हिंदुस्थानचें पोलादाचें उत्पादन साडेसात लक्ष टन होतें आणि हा माल बहुतेक रेल्वेज व इंजिनिअरिंग कारखाने ह्यांस पुरवला जात असे. देशाच्या इतर गरजा भागण्यास तीन लाख टन वजनाचें निरनिराळ्या जातींचें पोलाद बाहेरून आणावें लागत असे. शांततेच्या काळाच्या परिस्थितीस योग्य अशी ही व्यवस्था युद्धसामुग्रीच्या गरजांस जुळती करून घेणें हें काम अत्यंत अवघड होतें, पण तें तडीस नेण्यांत स्वदेशी पोलादाच्या धंद्यानें यश मिळवलें आहे हें त्याच्या चालकांस भूषणावह आहे. तोफांच्या गोळ्यांचीं वेष्टनें, रणगाड्यांची वगैरे दारूगोळ्यास दाद न देणारीं चिलखतें, इत्यादि अनेक जातींचें पोलाद आतां हिंदी कारखान्यांत तयार होत आहे. असें आहे तरी इतर कित्येक देशांच्या मानानें हा स्वदेशी धंदा अगदी लहान प्रमाणांतला आहे ह्यांत शंका नाहीं आणि त्याचा विविध विस्तार होण्यास लागणारीं यंत्रें बाहेरून घेण्याची आवश्यकता आहे. ही मूलभूत असलेली यंत्रसामुग्री देशांतल्या देशांत तयार होत नाहीं हेंच स्वदेशी पोलादाच्या धंद्याच्या मागसलेपणाचें स्पष्ट लक्षण आहे. मागच्या महायुद्धांत हा धंदा अगदी प्राथमिक अवस्थेंत होता आणि त्यास युद्धपरिस्थितीमुळें थोडेंबहुत उत्तेजन मिळाल्यावांचून राहिलें नाहीं. त्याच्या राष्ट्रीय व संरक्षणात्मक महत्त्वाचे दृष्टीनें आणि देशी धंद्यांच्या उत्कर्षासाठी औद्योगिक संरक्षणाचें धोरण सरकारनें अवलंबणें अगत्याचें आहे ह्या ठाम समजुतीमुळें त्यास परदेशी मालावरील जकातीचें सहाय सहेतुक देण्यांत आलें. प्रस्तुत युद्धांत पोलादाचा धंदा देशांत उभा असल्यामुळें त्याचा विस्तार करणें आणि त्यांत लढाऊ उपयोगाचा माल काढणें शक्य झालें आहे. चार लक्ष टन वजनाचें पोलाद एका हिंदी कारखान्यांत निघण्याची योजना आखण्यांत आली आहे आणि ती पुरी होण्यासाठी त्याचे चालक जरूर असलेले सदुसष्ट लक्ष रुपये खर्चणार आहेत. पोलादाच्या उत्पादनाचा हा विस्तार होण्यास आवश्यक असलेलें लोखंड देशांत होण्याची व्यवस्था असल्यानें ह्या कामीं त्याची अडचण येणार नाहीं आणि भांडवलाचा पुरवठाहि बिन सरकारी रीतीनें केला जात आहे. नवी यंत्र-सामुग्री बाहेरून आणण्यास हिंदुस्थान सरकार सवलती व मदत देत आहे आणि विस्ताराची योजना लवकर फलद्रूप होईल अशी अपेक्षा आहे. टिनच्या पत्र्यांस लागणारे पोलादी पत्रे देशांत तयार होतात, पण जस्ताचा पुरवठा मर्यादित असल्यानें त्याच्याऐवजी ताग व शेलॅक ह्यांच्या मिश्रणाचा उपयोग करण्याचा उपक्रम यशस्वी रीतीनें होत आहे. कित्येक जातींचा कच्चा व पक्का माल युद्धसामुग्रीसाठी आवश्यक आहे आणि तो बाहेरून येणें कठिण असल्यानें त्याची जागा ह्या देशांत उपलब्ध होणाऱ्या जिनसांनीं भरून काढण्याचे शास्त्रीय प्रयत्न चालले आहेत आणि त्यांस चांगलें यशहि प्राप्त होत आहे हें समाधानकारक आहे.

### युद्धविषयक धोक्याचा विमा

मालाचा युद्धविषयक धोक्याचा विमा उतरलेला असला व तो माल शत्रूच्या ताब्यांत गेला, तर त्यास मिळणारें विम्याचें संरक्षण संपुष्टांत येतें; त्यानंतर मालाचा नाश झाल्यामुळें विमेदारांचें नुकसान झालें, तर तें त्यास सरकारकडून भरून मिळणार नाहीं, मग हें नुकसान शत्रूनें केलेलें असो अथवा आपल्या सैनिकांनीं शत्रूस सामना देतांना तें झालेलें असो, असें सरकारनें जाहीर केलें आहे.

## विमा कायद्याच्या २७ व्या कलमाचा अर्थ

### सरकारी रोख्यांत किती रकम गुंतवावी ?

हिंदी विमा कायद्याच्या २७ व्या कलमाचे अर्थासंबंधीं सरकार आणि विमा कंपन्या ह्यांचेमध्यें मतभेद आहे. तेव्हां त्याचा अर्थ कोर्टामार्फत लावून घ्यावा असें ठरून हिंदुस्थान सरकारनें कंपन्यांचे वतीनें येणारा सुमारें दोन हजार रुपयांचा खर्च सोसण्याचें मान्य केलें. त्यास अनुसरून इंडियन लाइफ ॲशुअरन्स ऑफिसेस असोसिएशनचे तर्फे मुंबईच्या नवभारत विमा कंपनीनें सुपरिंटेंडेंट ऑफ इन्शुअरन्सवर मुंबई हायकोर्टांत दावा दाखल केला आहे.

दाव्याचा विषय असलेलें २७ वें कलम विमा कंपन्यांच्या रकमांचे गुंतवणुकीवरील निर्बंधासंबंधीचें आहे. प्रत्येक विमा कंपनीनें सरकारी व तत्सम रोख्यांत आपल्या जिंदगीपैकीं किती रकम गुंतवावी हें त्यांत सांगितलेलें आहे.

(अ) विमेदारांस देणें असलेली रकम (आजची किंमत)
+(ब) क्लेम्सची रकम

=(क) एकूण देण्याची रकम
−(ड) कंपनीनें रिझर्व्ह बँकेकडे ठेवावयाचें डिपॉझिट
−(इ) विमा पॉलिसींवरील कर्जाची येणें बाकी

=(फ) २७ व्या कलमाच्या अंमलबजावणीसाठीं विचारांत घ्यावयाची रकम

वरील (फ) रकमेच्या निदान २५% रकम केवळ सरकारी रोख्यांत गुंतविली पाहिजे व निदान ३०% रकम सरकारी रोखे, इतर तत्सम (मान्य केलेले) रोखे अथवा ग्रेट ब्रिटनचे रोखे किंवा ज्या रोख्यांच्या मुद्दलाची व्याजाची ब्रिटिश सरकारनें हमी घेतलेली आहे असे रोखे ह्यांत गुंतविण्यांत आली पाहिजे, असा २७ व्या कलमाचा मथितार्थ आहे व सुपरिंटेंडेंट ऑफ इन्शुअरन्स त्याच अर्थास धरून आहे. विमा पत्रकांबाबतच्या देण्याच्या व क्लेम्सच्या ५५% रकम सरकारी व तत्सम रोख्यांत गुंतविली पाहिजे हें विमा कंपन्यांस मान्य आहे, परंतु कंपनीनें रिझर्व्ह बँकेकडे ठेवलेलें डिपॉझिट ५५% गुंतवणुकीमध्येंच धरलें पाहिजे असें कंपन्यांचें म्हणणें आहे. म्हणजे, एकूण देण्याच्या रकमेच्या ५५% मध्यें उपरिनिर्दिष्ट डिपॉझिटचा समावेश होईल व त्यामानानें सरकारी रोख्यांतील गुंतवणूक कमी होईल. ५५% ची रकम ठरविण्यापूर्वी डिपॉझिट बाजूस काढण्यास कंपन्यांचा विरोध आहे. एकूण देण्याची रकम १०० रुपये, रिझर्व्ह बँकेकडील डिपॉझिट २० रुपये व पॉलिसींवरील येणें कर्ज १० रुपये आहे असें समजल्यास, कायद्याच्या सध्याच्या अर्थाप्रमाणें १०० − २० − १० = ७० रुपयांच्या ५५% म्हणजे ३८ रु. ८ आ. इतकी रकम सरकारी रोख्यांत गुंतविली पाहिजे. विमा कंपन्यांनीं केलेल्या अर्थाप्रमाणे शंभर रुपयांच्या ५५% इतकी रकम म्हणजे ५५ रुपये रोख्यांत गुंतविले पाहिजेत व त्यांतच २० रुपयांचा समावेश केला पाहिजे. म्हणजे, प्रत्यक्ष रोख्यांत गुंतविलेली रकम ५५ − २० = ३५ रुपये इतकी असली पाहिजे. विमा कायद्याच्या अर्थासंबंधींचा मतभेद व प्रत्यक्ष व्यवहारांत घडून येणारी तफावत, ह्याचा बोध वरील विवेचनावरून होईल. सरकारी रोख्यांत गुंतविण्याच्या रकमेचें प्रमाण कमी व्हावें, ह्या दृष्टीनें विमा कंपन्यांचा प्रयत्न चालू आहे, तो यशस्वी झाल्यास कमी व्याजाच्या रोख्यांत गुंतवाव्या लागणाऱ्या रकमेचें एकूण रकमेशी प्रमाण अल्प पडेल व कंपन्यांची गुंतवणूक अधिक किफायतशीर होऊं शकेल. विमेदारांचे हिताचे दृष्टीनें सरकारी रोख्यांतील गुंतवणुकीचें प्रमाण भारी असणें आवश्यक असलें तरी प्रत्यक्ष कायद्याचा त्याविषयीं अर्थ काय होतो, तो प्रस्तुत दाव्यानें स्पष्ट होणार आहे.

---

### प्राप्तीवरील कराऐवजी पोस्टांत ठेव

एक हजार ते दोन हजार रुपयांच्या प्राप्तीवर रुपयास ६ पै प्रमाणें इनकमटॅक्स बसविण्यांत आला आहे. मात्र, पहिल्या ७५० रुपयांवर हा कर आकारण्यांत येणार नाहीं. ७५० रुपयांवरील प्रत्येक २५ रुपयांस १ रुपया ह्याप्रमाणें होणारी रकम म्हणजे कर आकारणीच्या सुमारें सवापट रकम पोस्टल सेव्हिंग्ज बँकेंत ठेवली, तर ती युद्धसमाप्तीनंतर एक वर्षानें परत मिळूं शकेल व त्यावर व्याज २½% दरानें मिळेल. उदाहरणार्थ, एकाद्याची प्राप्ती १,७५० रुपये असल्यास त्यावरील प्राप्तीवरील कराची आकारणी ३१ रु. ४ आ. होईल. ही रकम न देतां ४० रुपये पो. ऑ. से. डिफेन्स बँकेंत ठेवले तरी चालेल. ह्या सवलतीचा फायदा ज्यांस घ्यावयाचा असेल, त्यांनीं इनकमटॅक्स अधिकाऱ्याकडे एक ठराविक फॉर्म त्यासंबंधांतील नोटिशीपासून ६० दिवसांचे आंत भरून पाठविण्याचा आहे. २ हजार रुपयांखालील उत्पन्नदारांस ६० दिवसांची मुदत अतिशय कमी पडते, अशी तक्रार आल्यावरून, हिंदुस्थानसरकारनें योजनेचें नाविन्य लक्षांत घेतां फॉर्म भरून पाठविण्याची मुदत ३१ ऑगस्ट अखेर लांबविली आहे. पोस्टांत योग्य तेवढी ठेव ठेवली असल्याचें सर्टिफिकेट योग्य तो फॉर्म भरून इनकमटॅक्स अधिकाऱ्याकडे पाठविलें पाहिजे. ह्या प्रकारें ठेवलेल्या ठेवीवर कोर्टाची डिक्री बजावतां येणार नाहीं, असें सरकारनें जाहीर केलें आहे.

---

### डिव्हिडंड

लिमिटेड कंपन्यांच्या डिव्हिडंडसंबंधीं लक्षांत ठेवण्याजोग्या प्रमुख बाबी म्हणजे तें कंपन्यांच्या सभासदांचे सभांत मंजूर व्हावें लागतें व डायरेक्टरांनीं सुचविलेल्या दरापेक्षा अधिक दरानें डिव्हिडंड देण्याचा ठराव त्या सभांस करतां येत नाहीं. इंटेरिम डिव्हिडंड देण्याचा अधिकार डायरेक्टरांस आहे. सबंद वर्ष संपण्याचे अगोदर कंपनीची डिव्हिडंड देण्याजोगी निश्चित परिस्थिति असल्यास, सहामाहीचें इंटेरिम डिव्हिडंड देण्याची कित्येक ठिकाणीं पद्धति आहे. केवळ नफ्याचे रकमेंतूनच डिव्हिडंड वांटतां येतें व डिव्हिडंडची वांटणी सुचविण्यापूर्वी योग्य ते रिझर्व्ह निर्माण करण्याचा अधिकार डायरेक्टरांस आहे. एकदा डिव्हिडंड जाहीर झालें, की तें कंपनीचें कर्ज म्हणून समजलें जातें. तथापि, कंपनी गुंडाळण्यांत येण्याचे वेळीं कांहीं डिव्हिडंड प्रत्यक्ष देण्याचें राहिलें असल्यास कंपनीच्या इतर सावकारांच्या कर्ज फेडीस अग्रहक्क मिळतो. कारण, डिव्हिडंडचें देणें हें भागीदारांस म्हणजे कंपनीच्या सभासदांसच द्यावयाचें घरगुती स्वरूपाचें असतें. क्युम्युलिटिव्ह प्रेफरन्स भागांवर डिव्हिडंड न देतांहि रिझर्व्ह निर्माण करण्याचा अधिकार डायरेक्टरांस आहे, कारण डायरेक्टरांना सर्व प्रकारचे भाग धारण करणारांच्या हिताकडे पहावयाचें असतें व कंपनी व्यवस्थित चालविण्याची जबाबदारी त्यांचेवर असते. एका प्रकारच्या (उ. प्रेफरन्स) भागांस डिव्हिडंड दिल्यानें कंपनीच्या प्रगतीस अडचण येत असल्यास, कंपनीच्या सुस्थितीकडे प्रथम लक्ष देणें सर्वांच्याच हिताचें ठरतें.

## स्फुट विचार

### प्रांतिक सहकारी संस्थांची प्रगति

मुंबई प्रांतांतील सहकारी संस्थांच्या परिस्थितीविषयींचा सहकारी खात्याचा १९४०-४१ सालाचा वृत्तांत प्रसिद्ध झाला आहे. स्थूलमानानें पाहिलें असतां त्यावरून असें दिसतें कीं वृत्तांताच्या वर्षी पूर्वीच्या सालाच्या मानानें सहकारी संस्थांची स्थिति चांगली व आशाजनक होती. १९४०-४१ मध्यें ९३ नवीन संस्था रजिस्टर करण्यांत आल्या आणि ८४ रद्द झाल्या. कर्जे आणि मालाची विक्री ह्यांची सांगड घालणाऱ्या संस्थांचा ह्या नवीन सोसायट्यांमध्यें भरणा होता. शहरांमध्यें पगारदार नोकरांच्या संस्थांस विशेष मागणी होती. वृत्तांताच्या वर्षांत सोसायट्यांची संख्या व त्यांचे सभासद ह्यांचेमध्यें वाढ झाली नसली तरी त्यांच्या सांपत्तिक स्थितींत समाधानकारक सुधारणा दिसून आली. शेती पतपेढ्यांची संख्या १९ नीं कमी झाली, ह्याचें कारण सोसायट्यांची पुनर्घटना व सावधगिरीची प्रगति ह्या तत्वांवर आखलेलें धोरण हें होय. ह्या पतपेढ्यांनीं वसूल केलेल्या कर्जांची रकम १९३९-४० सालच्या मानानें मात्र ५ लक्ष रुपयांनीं कमी झाली पण वसूल व्हावयाची रकमच अकरा लक्षांनीं कमी असल्यामुळें ही घट स्वाभाविकच होती. शेतीच्या मालाच्या किंमती खालीं गेल्या नसत्या तर वसुलीचा आकडा थोडा मोठा दिसला असता. कित्येक पतपेढ्यांस हिशेब तपासणींत वरचा वर्ग मिळाला आहे आणि त्यांच्या संशयित व बुडींत कर्जांत थोडी घट झाली आहे हीं सांपत्तिक स्थितींत होत असलेल्या सुधारणेचीं निदर्शक चिन्हें आहेत. मिलु लोकांच्या सोसायट्या आणि मल्टिपर्पज सोसायट्या ह्यांची वृत्तांताच्या वर्षी प्रगति होत राहिली. जमीन-गहाणाच्या बँकांची संख्या १७ कायम राहिली. शेतकरी ऋणविमोचनाचा कायदा आणि कर्जावरील व्याजाच्या दरांत वाढ ह्यांचे योगानें ह्या बँकांच्या व्यवहारांत म्हणण्यासारखी प्रगति होऊ शकली नाहीं; तथापि सामान्यतः त्यांची परिस्थिति बरी होती असे म्हणण्यास हरकत नाहीं. बिगरपतीच्या शेती- सोसायट्या व बिगर शेतीच्या पतीच्या सोसायट्या ह्यांचे व्यवहार एकंदरीनें पहातां ठीक होते. सात नवीन संस्थांची भर घरांविषयींच्या सोसायट्यांच्या संख्येंत पडली.त्यांची एकूण संख्या १०४ असून त्यांपैकीं ५५ एकट्या अहमदाबाद शहरांतच आहेत. जिल्हा औद्योगिक सोसायट्यांची संख्या ७ होती आणि त्यांचे व्यवहारांत प्रगति दिसून आली. विणकरांची स्थिति सुधारण्याचे कामीं त्यांचें सहाय होत आहे. जिल्हा बँकांची संख्या अकरा होती आणि त्यांच्या भांडवलांत व गंगाजळयांत समाधानकारक वाढ झाली. जुन्या कर्जांची वसुली आणि नवीन कर्जे देण्यांत सावधगिरी ह्यांचेमुळें ह्या बँकांचे शेती पतपेढ्यांशीं असलेले व्यवहार मर्यादित झाले आहेत. तथापि, मालाच्या खरेदी-विक्रीसाठी भांडवल पुरवण्याची त्यांची प्रवृत्ति वाढत आहे. शहरी सोसायट्यांची प्रगति ह्या प्रांतांत खेडेगावी संस्थांच्या मानानें अधिक झपाट्यानें होत आहे.

### रिझर्व्ह बँकेची कामगिरी.

गेल्या जून अखेरच्या वर्षांत रिझर्व्ह बँकेस १ कोटि, ४१ लक्ष रुपये इतका नफा झाला असून तिनें साडेतीन टक्क्यांचें डिव्हिडंड कायम ठेवलें आहे. चलनाचा पुरवठा देशांत व्यवस्थितपणानें करून परराष्ट्रीय हुंडणावळ स्थिर व समाधानकारक राखणें ही दुहेरी कामगिरी रिझर्व्ह बँकेवर टाकण्यांत आली असल्या कारणानें युद्धपरिस्थितीचा ह्या कार्यावर परिणाम होत आहे त्याचें विवेचन तिच्या वृत्तांतांत येणें अपेक्षितच आहे. व्यवहारांत खेळणाऱ्या चलनाचा पुरवठा फाजील होऊन त्याचा परिणाम महागाई वाढण्यांत होण्याची भीति युद्धकाळांत नेहमीच असते. व्यवहारास चलन लागलें कीं तें पुरवणें हें रिझर्व्ह बँकेचें कार्यच आहे पण चलनास येणाऱ्या वाढत्या मागणीस मर्यादेंत ठेवणें हें तिच्या कार्यकक्षेच्या बाहेरचें आहे असें बँकेच्या ताज्या वृत्तांतांत म्हटलें आहे. चलनाच्या वाढीस कह्यांत ठेवण्यांचे उपाय सरकारच्या हातीं असून ते योजले जात आहेत. व्यापारी व्यवहारांवर घातलेलीं नियंत्रणें, करांमध्यें वाढ, कर्जांच्या मार्गानें जनतेच्या हातांतला पैसा सरकारी तिजोरींत येण्याची व्यवस्था आणि खाद्य पदार्थांच्या पैदाशीचा विस्तार इत्यादि योजनांचा उद्देश चलनाचा पुरवठा मर्यादित करून त्याचे योगानें महागाईस उत्तेजन मिळूं नये अशी तजवीज करणें हाच आहे. रिझर्व्ह बँकेची दुसरी जबाबदारी हिंदुस्थानच्या परराष्ट्रीय देण्या-घेण्याची हुंड्यांचे मार्फत तोंड-मिळवणी करण्याचे बाबतींतली आहे. सरकारच्या लंडनमधील बँकेच्या खात्यांत शिल्लका तुंबत आहेत, त्यांची व्यवस्था लावण्यासाठी हिंदुस्थानाचें ब्रिटिश कर्ज फेडलें जात आहे आणि देशाच्या देण्या-घेण्याची वजावाट केली जात आहे. साडेतीन टक्के व्याजाच्या स्टर्लिंग कर्जाची परतफेड होऊन शिल्लक उरेल तिचा विनियोग हिंदी रेलवेजच्या डिबेंचरांची फेड करण्यांत वगैरे होण्याच्या योजनेचा विचार सरकारनें करावा असें रिझर्व्ह बँकेनें सुचवलें आहे. सर जेरेमी रेसमन ह्यांच्या लंडनमध्यें वाटाघाटी चालू आहेत त्यांत ह्या विषयाची चर्चा झालीच असली पाहिजे असें म्हणण्यास हरकत नाहीं. युद्धकाळांतले अवघड सांपत्तिक प्रश्न सोडवण्यास रिझर्व्ह बँक, हिंदुस्थान सरकार व ब्रिटिश फडनवीस ह्यांचें पूर्ण सहकार्य अगत्याचें आहे हें उघड आहे.

### घड्याळें एक तास पुढें होणार

३१ ऑगस्ट रोजीं रात्रीं १२ वाजतां सबंध हिंदुस्थानांतील घड्याळांचे काटे एक तास पुढें लावण्यांत येतील, असें हिंदुस्थान सरकारनें जाहीर केलें आहे. हा बदल लष्करी खात्याच्या सोईसाठी मुख्यतः आहे. सूर्यप्रकाशाचा अधिकांत अधिक उपयोग करून घेतां येईल, हाहि त्याचा फायदा आहे. सूर्य बरोबर डोक्यावर आला म्हणजे मध्यान्ह होते व त्यावेळेस घड्याळांत बारा वाजविले म्हणजे ती अचूक स्थानिक वेळ समजली जाते. एके ठिकाणीं ज्या वेळेस मध्यान्ह झालेला असतो, त्याच वेळेस त्या ठिकाणच्या पूर्वेस असलेल्या ठिकाणीं मध्यान्ह होऊन गेलेला असतो व पश्चिमेकडील स्थळीं अद्याप १२ वाजावयाचे असतात. प्रत्येक गांवीं स्थानिक वेळ चालू राहिल्यास वेळेसंबंधीं घोटाळा माजेल, म्हणून प्रत्येक देशांत तेथील एखाद्या मध्यवर्ती ठिकाणची वेळ सबंध देशाची प्रमाण वेळ म्हणजे स्टँडर्ड टाइम समजली जाते. पूर्व रेखांश ८२½ वरील वेळ हिंदुस्थानांत स्टँडर्ड टाईम मानण्यांत येते. ही वेळ मुंबई टाइमचे ३९ मिनिटें पुढें आहे. म्हणजे, मुंबई शहरांत मध्यान्ह होण्यापूर्वीच ३९ मिनिटें तेथील स्टँडर्ड टाइमवालीं घड्याळें १२ वाजलेले दर्शवितात. उलट, पूर्वेकडील प्रदेशांत मध्यान्ह होऊन लोटल्यानंतर कांहीं वेळानें १२

वाजतात. कारखान्यांतील विजेच्या खपाचे वेळीं घरगुती, कचेऱ्यांतील व रस्त्यांतील दिवे जळत राहिले तर त्या मानानें विजेच्या पुरवठ्यावर ताण पडतो, ह्या दृष्टीनें घड्याळांप्रमाणें दिवस लवकर संपवून लोकांचे खासगी जीवनाचा कारखान्यांतील उत्पादनावर परिणाम घडूं न देण्यासाठी घड्याळें एक तास पुढें लावण्याचें ठरलें आहे. मुंबईसारख्या पश्चिम हिंदुस्थानांतील ठिकाणीं, जेथें अगोदरच खऱ्या वेळेपेक्षां ३९ मिनिटांनीं घड्याळें पुढें आहेत, तेथें आणखी ६० मिनिटांनीं तीं पुढें करणें थोडें गैरसोईचें होणार आहे ह्यांत संशय नाहीं. दुकानें रात्रीं नऊ वाजतांच बंद झालीं, तरी पूर्वीच्या मानानें सूर्यप्रकाशाच्या मापानें तीं एक तास अगोदर म्हणजे ८ वाजतांच बंद होतील, ह्या एका उदाहरणावरून नवीन वेळेचा आपल्या नित्य व्यवहारावर काय परिणाम होईल हें लक्षांत येईल.

## रिझर्व्ह बँकेच्या भागांची वांटणी

रिझर्व्ह बँकेचें भांडवल प्रारंभीं सबंध हिंदुस्थानांत व्यवस्थित रीतीनें वांटण्यांत आलें, तरी पुढें बँकेचे भाग मुंबई विभागांत एकत्रिक होऊं लागले व भागीदारांची संख्या कमी होऊं लागली. ही प्रवृत्ति थांबविण्यासाठी रिझर्व्ह बँकेच्या कायद्यांत दुरुस्ती करण्यांत येऊन २६ मार्च, १९४० नंतर कोणालाहि २०० पेक्षा अधिक भाग घेतां येऊं नयेत असा नियम करण्यांत आला. तथापि त्याचा फारसा उपयोग झालेला दिसत नाहीं. बँकेच्या स्थापनेचे वेळीं तिच्या भागीदारांची संख्या ९२,०४७ होती ती आतां ५१,१७१ झाली आहे. ३० जून, १९४२ अखेर संपलेल्या वर्षीं ५३,४६८ भागीदारांचे ५१,१७१ भागीदार झाले. खालील तक्त्यांत ही प्रवृत्ति स्पष्ट करून दाखविली आहे:—

| विभाग | भागीदारांची संख्या | | |
|---|---|---|---|
| | १-४-३५ | ३०-६-४१ | ३०-६-४२ |
| मुंबई | २८,००० | १९,०७२ | १८,४४१ |
| कलकत्ता | २३,८९० | १२,२४६ | ११,६४७ |
| दिल्ली | २३,००० | १२,८१३ | १२,१८१ |
| मद्रास | १४,१०० | ७,९७३ | ७,६९७ |
| रंगून | ३,१५७ | १,३६४ | १,२०५ |
| | ९२,०४७ | ५३,४६८ | ५१,१७१ |

## श्री. ग. स. मराठे ह्यांची ज्युबिली

श्री. ग. स. मराठे, एम. ए., ए. आय. ए., ॲक्चुअरी, ह्यांच्या ६१ व्या वाढदिवसानिमित्त त्यांस आयुर्विमाव्यवसायांतील मंडळींनीं सोमवार ता. ३ रोजीं मानपत्र अर्पण केलें व थाटाची मेजवानी केली. श्री. मराठे ह्यांनीं ॲक्चुअरीच्या व्यवसायांत अग्रेसरत्व मिळविलें आहे. हिंदी विम्याच्या धंद्याचे वाढीकरितां त्यांनीं स्वतः प्रयत्न केले आणि अनेक विमाव्यवसायी निर्माण करून त्यांस प्रोत्साहन दिलें. महाराष्ट्रांतील विमाव्यवसायाची वाढ ही त्यांच्याच स्फूर्तीनें झाली आहे. महाराष्ट्रीय उद्योगधंद्यांच्या वाढीविषयींची त्यांची आस्था सुप्रसिद्ध आहे. अनेक कंपन्यांच्या स्थापनेंत त्यांचा भाग असून कित्येक कंपन्यांचे डायरेक्टर अथवा सल्लागार म्हणून ते काम करीत आहेत. कोठल्याहि लोकहिताच्या कार्यास त्यांचा पाठिंबा असतो. आपल्या वाढदिवसानिमित्त त्यांनीं हजारों रुपयांच्या देणग्या दिल्या आहेत. श्री. मराठे ह्यांच्या ६१ व्या वाढदिवसानिमित्त आम्ही त्यांचें अभिनंदन करून त्यांस दीर्घायुष्य चिंतितों.




**श्री. ग. स. मराठे,**

एम्. ए., ए. आय्. ए. ( ॲक्चुअरी )

**ता. १ ऑगस्ट १९४२ रोजीं, सुप्रसिद्ध हिंदी विमा-तज्ज्ञ श्री. ग. स. मराठे, ॲक्चुअरी यांचे वयास ६० वर्षें पुरीं होतात. श्री. मराठे यांचे ६१ वे वाढदिवसानिमित्त आम्हीं त्यांचें अभिनंदन करून त्यांना आयुरारोग्य चिंतितों.**

सन १९१८ सालीं त्यांनीं ॲक्च्युअरीच्या व्यवसायास प्रारंभ केला. त्यावेळीं हिंदी विमा-व्यवसाय संपूर्ण बाल्यावस्थेंतच होता. आज १९४२ सालीं हिंदी विमा-व्यवसायाची जी प्रगति दिसून येत आहे त्याचें फारच मोठें श्रेय श्री. मराठे यांना आहे. दि ट्रस्ट ऑफ इंडिया विमा कंपनीचे सुरुवातीपासूनच कंपनीस श्री. मराठे यांचा अनुभवी सल्ला लाभला आहे.

*ट्रस्ट ऑफ इंडिया विमा कंपनीचे १ ल्या मूल्यमापनाचे वेळीं श्री. मराठे यांनीं कंपनीविषयीं खालील मत व्यक्त केलें:—*

"हें मूल्यमापन अवघ्या तीनच वर्षाचें आहे. शिवाय हे दिवस आगामी कायद्यानें निर्माण झालेल्या साशंक वातावरणानें, विशेषतः सर्वच नव्या विमा कंपन्यांना अत्यंत कष्टाचे गेले. या दोन्ही गोष्टींचा विचार करतां झालेली प्रगति ही निःसंशय समाधानकारक होय. कंपनीचें खर्चाचे मान काळजीपूर्वक आपण कमी राखल्यानेंच ही गोष्ट शक्य झाली असावी.

तारीख १७ एप्रिल १९३९"

**त्रैवार्षिक बोनस हजारीं रु. ३० व ३६**

# दि ट्रस्ट ऑफ इंडिया

**विमा कंपनी लि., पुणें.**

मॅनेजर, व्ही. एच्. देशमुख, बी. ए.

### साखरेचा पुरवठा

साखरेचा तुटवडा व महर्घता ह्यांचे संबंधानें ओरड झाल्या-कारणानें सरकारनें मुंबईत व इतरत्र जरूर असलेला माल ठराविक किंमतीनें लोकांस मिळेल अशी तजवीज केली आहे. मुंबई प्रांतां-तला साखरेच्या वार्षिक खप सुमारें दोन लक्ष टन इतका आहे. ह्यापैकीं निम्मी साखर ह्याच प्रांतांतील कारखान्यांत तयार होते आणि बाकीची बाहेरून यावी लागते, ती संयुक्त प्रांत व बिहार ह्यांक-कडून येते. मुंबई प्रांतांत तयार होणाऱ्या साखरेच्या खपाचे बाब-तींत ह्यापूर्वी बरीच स्पर्धा चालत असे आणि ह्यापैकीं कांहीं माल कारखान्यापासून दूरदूरच्या बाजारपेठांमध्यें पाठवावा लागत असे. आतां सरकारनें कारखान्यांत मिळावयाच्या किंमती ठरवून दिल्या असल्यानें त्यांची चढाओढ व धावपळ नाहींशी झाली आहे. प्रत्येक कारखान्यास त्याच्या मालाच्या विक्रीचा टापू ठरवून देण्यांत येऊन मुंबई शहरासाठी उत्तर हिंदुस्थानांतून साखर आणून पुरवण्याची व्यवस्था सरकार करीत आहेत. तांदुळाप्रमाणें साखरेचे साठे व्यापाऱ्यांजवळ किती आहेत ह्याविषयींची माहिती वेळोवेळ त्यांनीं सरकारास पुरवण्याची सक्ती करण्यांत येत आहे. ह्या नियंत्रणाचा योग्य उपयोग होईल अशी अपेक्षा करण्यास हरकत नाहीं. देशांतील साखरेस जी एकूण मागणी आहे तिच्या मानानें देशांत उपलब्ध असलेला ह्या मालाचा पुरवठा तोकडा आहे आणि ह्या कारणानें साखरेची किंमत वाढणें अपरिहार्य आहे ही कांहीं लोकांनीं पसरविलेली कल्पना निराधार आहे असें हिंदुस्थान सरकारचे तर्फेनें प्रसिद्ध करण्यांत आलें आहे.

---

### इंदूर परस्पर सहकारी पेढी; मर्यादित, इंदूर

शिलकी नफा ६४ रुपये धरून वरील बँकेस गेल्या वर्षी १२,७०८ रुपये नफा झाला. भागीदारांस ६% दरानें डिव्हिडंड देण्याकडे ६ हजार रुपयांचा विनियोग करण्यांत आला. बँकेच्या रिझर्व्ह फंडांत सुमारें ९४ हजार रुपये आहेत, तिचें भांडवल ९९ हजार रुपयांचें आहे व तिचेकडे ६½ लक्ष रुप-यांच्या ठेवी आहेत. पेढीचे कामगारांस एप्रिल १९४२ पासून महागाई भत्ता देणें सुरू केलें आहे.

---

### दि बँक ऑफ सिटिझन्स लि., बेळगांव.

वरील बँकेचें खपलेलें व वसूल भांडवल अनुक्रमें १,२७,८०० रु. व ६१,२७० रु. आहे. बँकेकडे ६ लक्ष, ४२ हजारांच्या ठेवी आहेत. गतसालीं हा आकडा २ लक्ष, ५९ हजार रु. होता. बँकेनें सोनें व माल गहाणावर २ लक्ष, ९४ हजार रुपये व कॅश क्रेडिटचे रूपांत ८९½ हजार रुपये दिले आहेत. बँकेनें रोख्यांत व बँकांकडे कायम ठेवींत १ लक्ष ९ हजार रुपये गुंतविले आहेत व १ लक्ष, १४ हजार रुपये रोख राखले आहेत. वरील माहिती-वरून बँकेच्या प्रगतीची व तिच्या जिंदगीच्या तरतेपणाची कल्पना येईल. गेल्या वर्षी बँकेनें खानापूर व अलनावर येथें शाखा उघ-डल्या त्या व गणपत गल्ली ( बेळगांव ) येथील पे ऑफिस हीं सर्व ठीक चाललीं आहेत. गेल्या वर्षीप्रमाणें आतांहि ५% करमाफ डिव्हिडंड देण्यांत येत आहे.

---

### अमेरिकेंतून अन्नपुरवठा

एप्रिल १९४१ ते फेब्रुवारी १९४२ अखेर अमेरिकेनें इंग्लंड-कडे १ अब्ज, ८० कोटि टन इतक्या अन्नाचा पुरवठा केला.


**अर्थशास्त्र**

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे

पृष्ठसंख्या सुमारें ३००; किंमत ३ रुपये

या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

**वक्तशीर आणि मनपसंत काम करून देणारे**

**मोहन वॉच कंपनी**

रेग्युलेशन मोफत

कॉमनवेल्थ बिल्डिंगसमोर लक्ष्मी रोड, पुणें २.



**मधुमेहावरील औषध**

तीन आठवड्यांचे औषधास फक्त रु. ७

— मागविण्याचा पत्ता —

मॅनेजिंग डायरेक्टर, रूरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड.

९२३ ए, सदाशिव, पुणें २.

**श्रीराम सिल्क मिल्स लि., बंगलोर**

[ कंपनीनें १९४१ अखेर ६ टक्के डिव्हिडंड वांटला आहे. ]

युद्धसाहित्यपुरवठा–खात्याची पॅरेशूटकरितां लागणाऱ्या

रेशमी कापडाची ऑर्डर पुरी करण्यासाठी लागणाऱ्या भांडवलाकरितां तूर्त एकूण रु. १ लक्षाच्या रकमेपर्यंत

**ठेवी घेणें आहेत**

व्याजाचा दर ४॥ ते ६ टक्के. ठेव किमान रु. ५०० ची असावी. ठेवीवरील व्याज दर सहा महिन्यांनीं दिलें जातें.

श्रीराम सिल्क मिल्स लि., श्रीरामबाग, बसवनगुडी, बंगलोर. } नारायण गोविंद नाईक, ( माजी अध्यक्ष, म्हैसूर चेंबर ऑफ कॉमर्स ) मॅनेजिंग डायरेक्टर

आमच्या कारखान्यांतील माल मुंबईस बॉम्बे स्वदेशी को–ऑपरे-टिव्ह स्टोअर्समध्यें व पुण्यास लक्ष्मी रोडवरील रे म्युझिअमच्या व्यापार–संवर्धन–गृहांत पहा.

मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् को-ऑपरेटिव् बँक, लिमिटेड.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी-सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल् बिल्डिंग
९, बेक हाउस लेन, कोट मुंबई.

शाखा

| | |
|---|---|
| १ बारामती ( जि. पुणें ) | १८ अकलूज ( जि. सोलापूर ) |
| २ सातारा ( „ सातारा ) | १९ विरमगांव ( „ अहमदाबाद ) |
| ३ इस्लामपूर ( „ „ ) | २० धुळें ( „ प. खानदेश ) |
| ४ कऱ्हाड ( „ „ ) | २१ दोंडाईचें ( „ „ ) |
| ५ तासगांव ( „ „ ) | २२ शिरपूर ( „ „ ) |
| ६ किर्लोस्करवाडी ( „ „ ) | २३ शहादें ( „ „ ) |
| ७ शिराळें ( „ „ ) | २४ नंदुरबार ( „ „ ) |
| ८ कोरेगांव ( „ „ ) | २५ साक्री ( „ „ ) |
| ९ वाई ( „ „ ) | २६ शिंदखेडें ( „ „ ) |
| १० अहमदनगर ( „ अहमदनगर ) | २७ तळोदें ( „ „ ) |
| ११ शेवगांव ( „ „ ) | २८ मालेगांव ( „ नाशिक ) |
| १२ कोपरगांव ( „ „ ) | २९ सटाणा ( „ „ ) |
| १३ बेलापूर ( „ „ ) | ३० कळवण ( „ „ ) |
| १४ राहुरी ( „ „ ) | ३१ लासलगांव ( „ „ ) |
| १५ भिवंडी ( „ ठाणें ) | ३२ नांदगांव ( „ „ ) |
| १६ पालघर ( „ „ ) | ३३ दोहद ( „ पंचमहाल ) |
| १७ कल्याण ( „ „ ) | ३४ कालोल ( „ „ ) |

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.


'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार


राहाणेची व भोजनाची उत्तम सोय




फोन नं. ७७९ गणपति चौक. व्यवस्थापक.

**N. V. WADNERKAR**

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver, Electro-plater & Manufacturer of Sporting Trophies, Medals, Cups etc.

• • Raviwar Peth, Saraff Bazar, • •
POONA CITY.

**DECCAN BOOK STALL**

Booksellers, Publishers & Subscription Agents
Fergusson College Road, Poona No. 4

(1) We stock and supply Educational books, General books & Library books.

(2) We supply Government of Bombay and Government of India publications.

(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.

(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व
रा. श्रीपाद वामन काळे. एम्. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ८ पुणें, बुधवार, तारीख १२ ऑगस्ट १९४२ अंक ३२

## दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल ... ... ... | रु. | २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... ... ... | रु. | १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड ... ... ... | रु. | १,१८,००,००० |

मुख्य कचेरी: ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

मुंबईमधील शाखा : बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

इतर शाखा : अहमदाबाद ( भद्र, मुख्य ऑफिस ), अहमदाबाद ( एलिस ब्रिज शाखा ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अंधेरी ( मुंबई शेजारीं ), बांद्रे ( मुंबई शेजारीं ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस ), कलकत्ता ( बडा बझार ), कलकत्ता ( चौरंगी स्क्वेअर ), जमशेदपूर, कराची, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत.

लंडन एजन्ट्स : वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

डायरेक्टर्स : सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई, सर जोसेफ के. नाइट, मि. ए. गेडिस, सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई., मि. दिनशा के. दाजी, श्री. रामनिवास रामनारायण.

### करंट डिपॉझिट अकाउंट्स :

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षा कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमीचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

एजंट:—टी. आर. लालवाणी.

## दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

हेड ऑफिस : पुणें शहर.

स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.

मुंबअी शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबअी.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | : रु. | १०,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | : रु. | ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | : रु. | ४,४५,९५० |
| वसूल झालेलें भांडवल | : रु. | २,२२,७९५ |
| एकूण खेळतें भांडवल | : रु. | ३७,००,००० |

### डायरेक्टर्स

प्रो. वा. गो. काळे, अध्यक्ष

| | |
|---|---|
| श्री. धों. कृ. साठे | श्री. मा. रा. जोशी |
| श्री. न. ग. पवार | श्री. श्री. गो. मराठे |
| श्री. ड्यं. वि. रानडे | श्री. र. चिं. सोहोनी |
| श्री. वा. पुं. घर्दे | मि. फ. दो. पदमजी |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदीविक्री कसोशीनें करून दिली जाते.

बँकेच्या शेअरवर १९४१ अखेर पुऱ्या होणाऱ्या वर्षी द. सा. द. शेंकडा ४ टक्के करमाफ डिव्हिडंड दिलें गेलें. बँकेची शेअरविक्री चालू आहे.

म. वि. गोखले
मॅनेजर.

महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बँबाचे माडीवर

## महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

## बार्शी सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.

( स्थापना १९०६ )

### – नोटीस –

ह्या बँकेच्या सभासदांस कळविण्यांत येतें कीं, बँकेची वार्षिक साधारण सभा रविवार दिनांक ६ सप्टेंबर १९४२ इ. रोजीं दुपारीं ३ वाजतां, बँकेच्या नोटीसबोर्डावर प्रसिद्ध केलेल्या विषयांचा विचार करण्याकरितां, बँकेमध्यें भरणार आहे. तरी सर्व सभासदांनीं सभेस अगत्यपूर्वक यावें अशी विनंती आहे.

बोर्डाचे हुकुमावरून

बार्शी, ता. ५ ऑगस्ट १९४२. ... र. प. पटवर्धन, मॅनेजर.


## विविध माहिती

### कर्जतहकुबी

हिंदुस्थानांत आलेल्या निर्वासितांपैकीं ज्यांस हिंदुस्थानांत देणें झालेलें आहे व ज्यांची मालमत्ता मूळ देशांत अडकलेली आहे अशांना कर्जफेडीची तहकुबी देण्याचा हिंदुस्थान सरकारचा विचार आहे.

### झेकोस्लोव्हेकिया

१९३८ च्या म्यूनिकच्या करारामुळें झेकोस्लोव्हेकियाच्या मुलुखाच्या झालेल्या लांडगेतोडीस ब्रिटिश सरकारनें नाइलाजानें मान्यता दिलेली होती. त्यानंतरच्या घडलेल्या गोष्टी लक्षांत घेऊन झेकोस्लोव्हेकियास अपमानकारक व नुकसानकारक असलेला हा करार रद्द करून त्या देशास पूर्वस्थिति प्राप्त करून देण्याचा आपला निर्धार ब्रिटिश सरकारनें जाहीर केला आहे.

### लष्करी खर्चाची वाटणी

१९४०–४१ मध्यें हिंदुस्थानांत प्रत्यक्ष लष्करी बाबींवर १२७ कोटि रुपये खर्च झाला, त्यापैकीं ७३½ कोटि रुपयांचा खर्च हिंदुस्थानावर पडला. बाकीच्या खर्चाचा बोजा ग्रेट ब्रिटननें उचलला.

### युद्धकर्ज

हिंदुस्थान सरकारच्या तिसऱ्या डिफेन्स लोनचा आंकडा १ ऑगस्ट अखेर संपलेल्या आठवड्यांत ४४,१४,७०० रुपये झाला. सर्व डिफेन्स लोन्समध्यें मिळून एकूण सुमारें ११५ कोटि रुपये जमा आहेत.

### रेशनिंग

कॅनडामध्यें चहा व कॉफी ह्यांच्या रेशनिंगला प्रारंभ झाला आहे. प्रत्येकास दरमहा एक चतुर्थांश पौंड चहा अथवा एक पौंड कॉफी मिळेल.

### लंडनमध्यें मशीद

ब्रिटिश सरकारास मुस्लिम संस्कृतीबद्दल वाटणारा आदर व्यक्त करण्याकरितां त्या सरकारनें एक लक्ष पौंड बाजूस काढून ठेवले, त्यापैकीं साठ हजार पौंडांची २¼ एकर जागा त्यानें लंडनमध्यें विकत घेतली आहे. शांतता प्रस्थापित झाल्यानंतर त्या जागेवर एक मशीद बांधण्यांत येईल.

### महागाई भत्ता

रेल्वे कामगारांच्या महागाई भत्त्यांत हिंदुस्थान सरकारनें पुनः वाढ केली आहे.

### युद्ध खर्च

ऑस्ट्रेलियन सरकारच्या येत्या वर्षाच्या खर्चाचा आकडा शांततेच्या काळांतील खर्चाच्या आकड्याच्या सहा पट आहे.

### युद्धकार्यासाठीं नांवें नोंदविण्यास १६ वर्षांची वयोमर्यादा

सोळा वर्षांवरील सर्व स्त्री–पुरुषांस ग्रेट ब्रिटनमध्यें युद्धकार्यासाठीं नांव नोंदावें लागतें.

### अमेरिकेंत मुबलक गहूं

अमेरिकेमध्यें गव्हाचा पुरवठा इतका भरपूर झाला आहे कीं, त्याच्या साठवणुकीस जागा अपुरी पडूं लागली आहे. तबेले, वसतिगृहें, शाळा, इत्यादींत गहूं साठवून ठेवण्याची पाळी आली आहे. सध्याचा साठा अमेरिकेस दोन वर्षें तरी पुरेल. पॅसिफिक महासागरांत युद्धास प्रारंभ झाल्यामुळें गव्हाची निर्गत बंद पडली आहे, त्या कारणानें साठवणीचा प्रश्न अधिकच बिकट झाला आहे.

### ग्रेट ब्रिटनमध्यें गव्हाचें वाढतें उत्पादन

ग्रेट ब्रिटनमध्यें गव्हाचें शास्त्रीय पद्धतीनें मोठ्या प्रमाणावर उत्पादन चालू आहे. अमेरिकेंत दर एकरी उत्पादन १३ ते १४ बुशेल आहे; ग्रेट ब्रिटनमधील दर एकरी उत्पादनाची सरासरी ३४ बुशेल इतकी आहे. १ लक्ष ट्रॅक्टर जमीन नांगरणीसाठी उपयोगांत आणले जात आहेत.

### चीन

हिंदुस्थानांतील ५० लक्ष कोयनेलच्या गोळ्या चीनला देण्यांत येत आहेत.

### कलकत्ता शहरांतील भिक्षेकरी

कलकत्ता शहरांतील भिक्षेकऱ्यांची संख्या सहा हजारांपेक्षा अधिक आहे, त्यांपैकीं चार हजार तरी निदान धडधाकट आहेत. त्यांना शहराबाहेर काढण्याचा बंगाल सरकारचा विचार आहे.

### ज्यू लोकांची कत्तल

सध्या जर्मन सत्तेखालील देशांत ७० लक्ष ज्यू लोक आहेत, त्यांपैकीं १० लक्ष लोकांचा प्राण निर्दयपणानें जर्मनीनें घेतला आहे.

### कोयनेलऐवजी दुसरीं औषधें

हिंदुस्थानांत दरसाल ७० हजार पौंड कोयनेल तयार होतें व २ लक्ष पौंड कोयनेल खपतें. वास्तविक, १० लक्ष पौंड कोयनेलची आवश्यकता आहे; कारण हिंवतापानें आजारी पडणाऱ्या १० कोटि लोकांपैकीं फक्त ८० लक्ष लोकांसच उपचार होऊं शकतो. हिंदुस्थानांतील कोयनेलचा तुटवडा भरून काढण्याकरितां अटेब्रीन व प्लॅस्मोचिन ह्यासारख्या मलेरियाप्रतिबंधक औषधाच्या उपयोगाची शक्यता व इष्टता अधिकाऱ्यांनीं विचारांत घ्यावी, असें डॉ. वाड ह्यांनीं आपल्या मुंबई येथील भाषणांत नुकतेंच सांगितलें.

### लॉऱ्यांना पेट्रोल मिळणार नाहीं

१ सप्टेंबर नंतर कोळशाच्या गॅसप्लँटवर चालणाऱ्या लॉऱ्यांनाच फक्त चालण्यास परवानगी मिळेल, असें संयुक्त प्रांत सरकारनें जाहीर केलें आहे. सर्व लॉरीवाल्यांना त्याप्रमाणें कळण्यांत आलें आहे. पेट्रोलच्या तुटवड्यामुळें असें करणें आवश्यक झालें आहे.

### कचेरीची वेळ एक तास पुढें जाणार

सप्टेंबरपासून घड्याळाचे काटे एक तास पुढें करण्यांत येणार आहेत, ह्यासाठीं मद्रासमधील सरकारी कचेऱ्यांच्या कामाच्या वेळांतहि एका तासाचा बदल करण्यांत येणार आहे, असें समजतें.

अनुक्रमणिका

| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती | २५२ | त्यांच्या अडचणी—प्रांतिक सहकारी इंस्टिट्यूटची पुनर्घटना—नमुनेदार सेंडें बनवलें. | |
| २ आयुर्विमा कंपन्यांचें मूल्यमापन | २५३ | ६ गिरणीस कुलुप | २५६ |
| ३ यु. किं. कमर्शिअल कॉर्पोरेशन | २५४ | ७ मुंबई प्रांताचें औद्योगिक खातें | २५७ |
| ४ सह्याद्रि विमा कं.लि. | २५४ | | |
| ५ स्फुट विचार | २५५ | | |
| मुंबईंत तांदुळाच्या व्यापा- | | | |

अर्थ

बुधवार, ता. १२ ऑगस्ट, १९४२

## आयुर्विमा कंपन्यांचें मूल्यमापन

आयुर्विमा कंपन्यांच्या येण्यादेण्याचा हिशेब करून त्यांचें ठराविक कालांतरानें मूल्यमापन करण्याचा प्रघात आहे. प्रत्येक धंद्याचाच हिशेब असा वरचेवर काढावा लागतो व आयुर्विमा कंपन्यांचें मूल्यमापन मुख्यतः त्याच स्वरूपाचें असतें. कंपन्यांच्या जिंदगीचें मूल्य निश्चित ठरविणें सोपें असतें. परंतु येणें रकमांचा देणें होणाऱ्या रकमांचा अंदाजच करावा लागतो. देण्यापेक्षां येणें अधिक भरलें, तर मूल्यमापनांत वाढावा सापडतो; नाहीं तर कंपनीच्या हिशेबांत तूट दिसून येते. आयुर्विमा कंपन्यांच्या व्यवहारांत तूट येणें इष्ट नाहीं, हें उघड आहे. इतर धंद्यांचा आढावा व विमा कंपन्यांचा आढावा ह्यांत एक महत्त्वाचा फरक आहे, तो म्हणजे विमा कंपन्यांच्या येण्या-देण्याचा केवळ अंदाजच करावा लागतो. इतर धंद्यांतील देणींयेणींहि त्यांच्या आढाव्यांत हिशेबांत घ्यावी लागतात, परंतु तीं निश्चितपणें सांगतां येतात. आयुर्विमा कंपन्यांच्या मूल्यमापनांत, त्यांना हप्त्यांच्या रूपानें मिळणाऱ्या रकमा व त्यांना क्लेम्स इत्यादि रूपानें द्याव्या लागणाऱ्या रकमा ह्यांची आजची किंमतच धरावी लागते. कंपनीला तिच्या रकमांवर व्याजाचा दर काय पडेल, विमेदारांच्या मृत्यूंची संख्या किती भरेल, खर्चाचें प्रमाण काय राहील, इत्यादि गोष्टींच्या अंदाजावरच विमा-गणित्याचें मूल्यमापन अवलंबून रहातें. निश्चित कालांतरानें, म्हणजे दरसाल, प्रत्येक तीन वर्षांनीं अथवा पांच वर्षांनीं मूल्यमापन करण्यांत येतें. त्यांत नफा आढळून आला, तर त्यास तीन कारणें संभवतात:—(१) अपेक्षेपेक्षा व्याजाचा दर चांगला पडला असेल, (२) मृत्यूंचें प्रमाण उतरून क्लेम्स कमी आले असतील, किंवा (३) खर्चाची तरतूद प्रत्यक्ष खर्चापेक्षा अधिक ठरून त्यांत बचत झाली असेल. हीं तीनहि कारणें एकत्र आल्यास वाढावा चांगला येईल. वाढावा दिसून आला तर विमेदारांना तो वाटलाच पाहिजे, असें नाहीं. पुढची तरतूद ह्या दृष्टीनें तो वाढावा अजिबात न वाटतां तसाच कायम राखणें हें कित्येक प्रसंगीं दूरदर्शीपणाचें ठरेल. हिंदी विमा कंपन्यांनीं सध्या बोनस वाटूं नये, अशी खटपट कांहीं कंपन्या करीत आहेत, त्याचा मुख्य हेतु सध्याच्या अनिश्चित युद्धपरिस्थितींत बोनसच्या वाटणीच्या रूपानें कंपन्यांचा मजबूतपणा कमी होऊं न देणें हा आहे. ज्यांना बोनस सहज वाटतां येणें शक्य आहे, अशा मजबूत कंपन्यांचा त्यास विरोध आहे. म्यूच्युअल कंपनीमध्यें विमेदारांसच वाढाव्याचा फायदा मिळतो; भागीदारांच्या भांडवलाच्या कंपनीमध्यें भागीदारांसहि वाढाव्याचा कांहीं अंश मिळतो.

मूल्यमापन ज्या मुदतीचें असेल, त्या मुदतीनंतरच बोनस जाहीर होऊं शकतें. परंतु मध्यंतरीच्या काळांतच एखाद्या पॉलिसीवरील रकमेचें विमेदाराच्या मृत्यूमुळें, विम्याची मुदत भरल्यामुळें अथवा अन्यकारणामुळें क्लेममध्यें रूपांतर झालें, तर त्या विमेदारास बोनस कसें मिळणार? उदाहरणार्थ, १९४० अखेरच्या पांच वर्षांच्या मूल्यमापनानंतर पुढचें मूल्यमापन १९४५ अखेर होईल, असें मानल्यास १९४० ते ४५ ह्या मुदतीमधील क्लेमला १९४५ अखेरच्या मूल्यमापनांतील वाढाव्याचा फायदा कसा मिळणार? पॉलिसी १९४५ अखेर चालू असती, तर तो फायदा मिळाला असता. ह्यावर तोड अशी कीं दोन बोनस वाटणीच्या मधल्या काळांत विमेदाराचा क्लेम उपस्थित झाल्यास विमा कंपनी त्यास इंटेरिम बोनस देते. उदाहरणार्थ:—

**१९४० चें मूल्यमापन :** बोनस वार्षिक हजारी १० रु. पांच वर्षें चालू असलेल्या हजाराची पॉलिसी १,०५० रुपयाची होईल.

**१९४५ चें मूल्यमापन :** बोनस वार्षिक हजारी १५ रु. दहा वर्षें चालू असलेल्या हजाराची पॉलिसी १,१२५ रुपयांची होईल.

विमेदारास १९४२ सालीं मृत्यू आला, तर त्याच्या विम्यास हजारी १० रुपये ह्या दरानें इंटेरिम बोनस मिळेल. परंतु तो १९४५ अखेर जगला, तर हजारी १५ रुपये ह्या दरानें त्याच्या विम्यास बोनस मिळेल. म्हणजे, इंटेरिम बोनस हा मागील मूल्यमापनाचे वेळीं जाहीर केलेल्या बोनसवरच अवलंबून असतो. एखाद्या कंपनीची परिस्थिति थोडी बिघडली व पूर्वीच्या दरानें बोनस वाटण्याजोगी स्थिति पुढील मूल्यमापनाचे वेळीं रहाणार नाहीं असें आढळलें, तर इंटेरिम बोनसचा दर कमी करणें जरूर असतें. उलट, पुढील मूल्यमापन अत्यंत अनुकूल होण्याजोगें असेल, तर इंटेरिम बोनसचा दर पूर्वीच्या बोनसपेक्षा अधिकहि असूं शकतो.

विमा कंपन्यांच्या मूल्यमापनाचें काम विभागगणिती अथवा ॲक्चुअरी हे करतात. लाइफ ॲशुअरन्स फंड व कंपनीच्या अपेक्षित देण्यांची आजची किंमत ह्यांमधील अनुकूल तफावत, म्हणजेच वाढावा होय. मागील मूल्यमापनांतील कांहीं वाढावा शिलकी राखलेला असल्यास तो त्यांत मिळवला, म्हणजे कंपनीच्या खऱ्या नफ्याचा आकडा मिळतो. मागील मूल्यमापनांतील शिलकी तूटहि वरील प्रमाणेंच हिशेबांत घ्यावी लागते. आयुर्विमा कंपन्यांचें अचूक मूल्यमापन ही किती महत्त्वाची गोष्ट आहे, हें वरील विवेचनावरून ध्यानांत येईल. अनेक वर्षें यशस्वी रीतीनें चाललेल्या कंपन्यांचें मूल्यमापन कितीहि कसून केलें, तरी त्या वाढावा दाखवून बोनस देऊं शकतात. तथापि, उदयोन्मुख कंपन्यांस प्रारंभीं काम मिळवितांना अधिक खर्च करावा लागतो व हा खर्च त्यांस मिळणाऱ्या कामाचे मानानें प्रमाणबद्ध नसतो. त्यांची तुलना मात्र जुन्या कंपन्यांबरोबरच होते. सहाजिकच, नव्या कंपन्यांना विमेदारांस आकर्षणासाठी विशेष सवलती द्याव्या लागतात, हप्ते बेतानें ठेवावे लागतात व जुन्या कंपन्यांप्रमाणें वाढावा दाखवून

कोनसहि वाटावा लागतो. म्हणून, नव्या कंपन्यांचें मूल्यमापन करतांना त्यांची मजबुती, कामाची अपेक्षित वाढ व खर्चांतील अपेक्षित बचत, इत्यादि गोष्टींकडे सहानुभूतिपूर्वक लक्ष देणें आवश्यक ठरतें. विशेषतः जुन्या विदेशी कंपन्यांशीं तोंड देऊन आपलें स्थान मजबूत करूं इच्छिणाऱ्या व शकणाऱ्या कंपन्यांना ॲक्चुअरी-कडून वाजवी सहानुभूति मिळाली, तर तिचें चीज होऊन विमा व्यवसायास उर्जितावस्था प्राप्त होते. उद्योन्मुख कंपन्यांच्या चालकांचे कर्तृत्वावरच मुख्यतः कंपन्यांची प्रगति अवलंबून असते, हें उघड आहे. श्री. ग. स. मराठे, ॲक्चुअरी, ह्यांनीं पुणें येथें नुकतेंच एक भाषण करून आपली भूमिका स्पष्ट केली, तिचें रहस्य लक्षांत येण्यास वरील विवेचन उपयोगी पडेल.

---

## युनायटेड किंग्डम कमर्शिअल कॉर्पोरेशन

युद्ध-परिस्थितींत खासगी व्यापारी मंडळयांस जीं व्यापार-विषयक कामें करतां येत नाहींत, तीं करण्याकरितां वरील संस्थेची स्थापना झाली. तिला ब्रिटिश तिजोरींतून भांडवलाचा पुरवठा झाला व महत्त्वाच्या बाबतींत ब्रिटिश सरकारच्या सल्ल्यानुसार ती आपलें धोरण आखते. ह्या कॉर्पोरेशनच्या कारभारासंबंधीं हिंदुस्थानांत बऱ्याच तक्रारी झाल्या व ईस्ट इंडिया कंपनीशीं तिची तुलना करण्याइतकी लोकांची मजल गेली. हिंदी निर्गत व्यापाराचे बाबतींत तिला विशेष सवलती मिळतात व त्यांचा हिंदी व्यापार आणि उद्योगधंदे ह्यांचेवर फार दूरगामी प्रतिकूल परिणाम होईल, असें लोकमत व्यक्त होऊं लागलें. कॉर्पोरेशन ही निम-सरकारी संस्था असल्याकारणानें प्रत्येक बाबतींत तिला प्राधान्य मिळतें व तिला होणाऱ्या भांडवल-पुरवठ्यामुळें निर्गत व्यापारांत तिला अवास्तव स्पर्धा करतां येऊन सप्लाय खात्याकडूनहि तिला वाटेल त्या सवलती मिळूं शकतात, असा सर्व तक्रारींचा सारांश आहे. खरी स्थिति समजावून सांगण्याचे दृष्टीनें हिंदुस्थान सरकारच्या व्यापार खात्यानें एक खुलासा प्रसिद्ध केला आहे.

युद्धजन्य परिस्थितीमुळें कित्येक देशांबरोबरच्या व्यापाराची साखळी तुटली आहे, तिचे दुवे जोडणें, ब्रिटिश साम्राज्यांतील मालाचा दोस्त व मित्र राष्ट्रांस पुरवठा करणें, निर्गत व्यापार कमी झाल्यामुळें मालाच्या वाढलेल्या साठ्यांचा उठाव होण्यास सहाय करणें इत्यादि कामें युनायटेड किंग्डम कमर्शि-अल कॉर्पोरेशनच्या कार्यक्षेत्रांत प्रामुख्यानें येतात. रशियाला मालाचा पुरवठा चालू ठेवणें हें कॉर्पोरेशनचें हिंदुस्थानांतील मुख्य काम आहे. वाहतुकीची अडचण लक्षांत घेऊन कोणत्या मालाच्या पुरवठ्यास किती प्राधान्य दिलें पाहिजे, तें ठरवून कॉर्पोरेशनला मालपुरवठा करावा लागतो. हें काम खाजगी व्यापाऱ्यांच्या कक्षे-बाहेरचें आहे. विशेषतः हिंदुस्थान व रशिया ह्यांचे दरम्यान पूर्वी मोठ्या प्रमाणावर व्यापार चालू नव्हता. तेव्हां कॉर्पोरेशनसारख्या संस्थेलाच हा निर्गत व्यापार सुरू ठेवणें शक्य आहे. हिंदी बाजार-पेठांतच प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षपणें कॉर्पोरेशन मालाची खरेदी करते. इराणशीं व्यापार करतांना कॉर्पोरेशनला विशेष सवलतीचा फायदा मिळत नाहीं. युद्धविषयक महत्त्वाच्या मालाची निर्गतच केवळ कॉर्पोरेशन करते व हा माल एकूण इराणकडील निर्गतीच्या १०% हि भरत नाहीं. गहूं व साखर ह्यांचे व्यापारा-बाबत कॉर्पोरेशनला विशेष सवलती व प्राधान्य हीं मिळतात, अशी तक्रार आहे; परंतु सध्याच्या आणीबाणीचे प्रसंगीं इराण व इतर मध्यपूर्वेतील देश ह्यांचा अन्नपुरवठा अबाधित राखणें आवश्यक आहे. हा पुरवठा करण्यासाठी अनेक देशांतून माल पाठविला पाहिजे व हें काम एका संस्थेच्या हातीं केंद्रीभूत होणें जरूर आहे. हिंदुस्थानांतील अन्नपुरवठ्याची परिस्थिति लक्षांत घेऊन नोव्हेंबर, १९४१ पासून कॉर्पोरेशननें हिंदुस्थानांत गव्हाची खरेदी स्थगित केली आहे. साखरेच्या बाबतहि अशीच परिस्थिति आहे. हिंदुस्थानांत १२ रुपये मण ह्या दरानें साखर खरेदी करून ३७ रुपये मण ह्या दरानें ती इराणमध्यें विकली जाते, ह्या म्हणण्यांत सत्यांश बिलकूल नाहीं. खर्चाकरितां योग्य तेवढी कूस ठेवण्यापलीकडे कॉर्पोरेशन नफा घेत नाहीं. कस्टम्स ड्यूटी, अंतर्गत कर, दलालांचा नफा, इत्यादि खर्चामुळें खरेदी-विक्रीचे दरांत थोडी तफावत पडणारच.

तांदूळ, इतर धान्यें, कणीक, तेलें, गळिताचीं धान्यें, सूत इत्यादींच्या निर्गतीचे संबंधांत कॉर्पोरेशननें विशेष अधिकार मिळविले आहेत, असें म्हटलेलें ऐकूं येतें. साउदी अरबस्तानच्या विनंतीवरून कॉर्पोरेशननें त्याकडे दोनदा तांदूळ पाठविला तो हिंदी व्यापाऱ्यांचे वतीनेंच होय. त्याचप्रमाणें, लंडनमधील व्यापाऱ्यांचे वतीनें कॉर्पोरेशननें थोडा तांदूळ सिलोनला विकला. ह्याखेरीज कॉर्पोरेशननें तांदळाचा व्यवहार केलेला नाहीं. तेलें व गळिताचीं धान्यें ह्यांच्या वहातुकीस आगबोटींत जागा मिळणार नाहीं, असें जाहीर झाल्यानंतरहि कॉर्पोरेशननें पाठविलेल्या मालास जागा दिली जात असे व त्याचे बाबतींत अपवाद होत असे. परंतु अधिकाऱ्यांचे नजरेस ही चूक दाखविली गेल्याबरोबर ती दुरुस्त करण्यांत आली. सिरिया आणि पॅलेस्टाइन ह्यांचे सरकारांच्या विनंतीवरून त्या देशांकडे थोडें सूत पाठविण्याचें कॉर्पोरेशननें मान्य केलें. ह्याखेरीज सुताच्या व्यापारांत ती शिरली नाहीं. एकूण हिंदी निर्गतीच्या ·५% इतकीहि कॉर्पोरेशनची निर्गत भरली नाहीं. वहातुकीचे बाबतींत युद्धविषयक मालाचे संबंधांतच कॉर्पोरेशनला प्राधान्य मिळालेलें आहे व हें प्राधान्य कोणाहि निर्गत व्यापाऱ्यास मिळूं शकतें. माल मिळविण्याकरितां कॉर्पोरेशनला सप्लाय खात्याच्या कचेरींचा व नोकरवर्गाचा उपयोग होतो, असें ध्वनित करण्यांत येतें. नियंत्रित मालाची खरेदी तेवढी सप्लाय खात्यामार्फत केली जाते; बिन-लष्करी उपयोगाच्या मालाचे बाबतींत सप्लाय खात्याकडून कॉर्पो-रेशनला कोणत्याहि प्रकारचें सहाय होत नाहीं. कॉर्पोरेशन आप-ल्या मालाची खरेदी निर्गत मालाच्या व्यापाऱ्यांचे मार्फतच करते; तेव्हां कॉर्पोरेशनच्या अमर्याद भांडवलामुळें निर्गत व्यापाऱ्यांशीं त्याची घातुक स्पर्धा चालते, हें म्हणणें चुकीचें आहे. चालू व्यापाराची घडी न विघडवितां, तिचा उपयोग करून व्यवहार सुलभ करणें, हेंच कॉर्पोरेशनचें काम आहे. हिंदुस्थान सरकारनें केलेल्या वरील खुलाशावरून कॉर्पोरेशनच्या कार्यक्षेत्राबर व कार्यपद्धतीवर चांगला प्रकाश पडतो. लोकांनीं गैर-माहितीनें केलेल्या विधानांचा खरेखोटेपणा पहाण्यास त्यांचा उपयोग होईल.

---

## स्फुट विचार

### मुंबईत तांदुळाच्या व्यापाऱ्यांच्या अडचणी

मुंबई शहरांत तांदूळ विकत मिळण्याच्या बाबतींत जनतेस अडचण भासत असून किरकोळीनें विक्री करणारे दुकानदार त्या संबंधांतली जबाबदारी घाउक व्यापाऱ्यांवर टाकीत आहेत. तांदुळाचा साठा शहरांत भरपूर आहे आणि आगगाडीनें माल सारखा येत आहे असें सरकारचें म्हणणें आहे. तांदुळाच्या व्यापारी लोकांच्या मंडळानें एक विस्तृत पत्रक प्रसिद्ध करून सामान्य गिऱ्हाइकांस व किरकोळ दुकानदारांस माल मिळण्याच्या मार्गांत अडचणी येत आहेत त्यांची मीमांसा सरकारच्या नियंत्रण पद्धतींतले दोष दाखवून केली आहे. उंची दर्जाच्या तांदुळाच्या किंमती ठरलेल्या नसल्यानें आणि तो हलक्या दरानें विकणें शक्य नसल्यानें ह्या मालाचा साठा व्यापाऱ्यांपाशी असून त्याचा सामान्य जनतेस उपयोग नाहीं असें व्यापारी मंडळाचें म्हणणें आहे. सरकारनें निरनिराळ्या जातींच्या तांदुळाच्या किंमती ठरवल्या आहेत त्यांत बदल होणें इष्ट असल्याचें त्यांच्या पत्रकांत विधान आहे. सरकारची स्वतःची तांदूळ खरेदी चालू आहे, तीपैकी बाहेरून आणलेला माल बाजारांत न येतां त्याच्या साठ्यांत शिलकी पडतो आणि आपणांस प्रांताबाहेरून माल आणतां येत असतांहि रेल्वे वहातुकीच्या सवलती मिळत नसल्यानें पुरवठा वाढवतां येत नाहीं अशी व्यापारी मंडळाची तक्रार आहे. किरकोळ व्यापाऱ्यांस तांदुळाचे परवाने मिळण्यांत बरीच दिरंगाई होते ह्या कारणानें दुकानदारांस विक्रीस हवा तितका व तसा माल मिळत नाहीं, ह्यासाठी सध्याच्या परवान्यांच्या पद्धतींत सुधारणा होणें आवश्यक आहे असें त्यानें सुचवलें आहे. व्यापारी मंडळाच्या ह्या गाऱ्हाण्यांचा विचार करून तीं तात्काळ दूर होण्याची शक्य ती व्यवस्था सरकारनें करावी अशी लोकांची इच्छा असणें स्वाभाविक आहे. इंडियन मर्चंट्स चेंबरचे अध्यक्ष, मि. जे. सी. सेटलवाड ह्यांनीं त्या संस्थेच्या दुसऱ्या त्रैमासिक सभेचे प्रसंगीं व्यापारी व सरकार ह्यांस धान्याच्या पुरवठ्याविषयीं सूचना केल्या आहेत त्यांकडे त्यांचें लक्ष जाणें अगत्याचें आहे. लोकांच्या जीवनास अत्यावश्यक असलेल्या जिनसांचा पुरवठा योग्य रीतीनें व किंमतीनें होण्याची जबाबदारी व्यापारी व सरकार ह्यांनीं सहकार्यानें पार पाडली पाहिजे असें त्यांनीं म्हटलें आहे. व्यापारीवर्गाचें हित पहाणाऱ्या मध्यवर्ती संस्थेच्या अध्यक्षांचें भाषण ह्या नात्यानें मि. सेटलवाड ह्यांच्या सूचनांस विशेष महत्त्व आहे. गरीब लोकांच्या सोयीसाठी श्रीमंत वर्गांनीं राकेलसारख्या जिनसांच्या वापरांत काटकसर करण्याची आवश्यकता त्यांनीं प्रतिपादली आहे हें लक्षांत घेण्यासारखें आहे.

### प्रांतिक सहकारी इंस्टिट्यूटची पुनर्घटना

ह्या प्रांतांतील सहकारी संस्थांची मध्यवर्ती समिती प्रॉव्हिन्शल को-ऑपरेटिव्ह इंस्टिट्यूट ही असून त्यांच्या वतीनें शिक्षणाचें, प्रचाराचें व संघटनेचें कार्य ती करीत आली आहे. सहकारी संस्था आणि सहकारी खातें ह्यांच्या परस्पर-सहाय्यानें सहकारी चळवळीची प्रगति घडवून आणण्यासाठी प्रयत्न करणें हें तिचें व्यापक ध्येय असून इंस्टिट्यूटच्या स्थापनेपासून त्यास मुंबई सरकारनें पाठबळ व ग्रँट्सच्या स्वरूपांत मदत हीं दिलीं आहेत. त्या संस्थेच्या घटनेचें व कार्याचें जाळें सर्व जिल्ह्यांवर पसरलें होतें आणि तिची कामगिरी सहकारी चळवळीच्या प्रगतीस पोषक होत होती. गेलीं पांचसहा वर्षें इंस्टिट्यूटची घटना बदलून जिल्ह्यांत होणाऱ्या कामांत श्रमविभागाच्या तत्त्वावर सोसायट्यांवरील देखरेख, सहकारी शिक्षण व प्रचार ह्यांचे बाबतींत नवीन, कमी खर्चाची, सुटसुटित व कार्यक्षम पद्धति चालू करावी ह्या विचारानें प्रांतिक सरकारनें विशिष्ट योजना सुचवल्या व त्यांची चर्चा रेंगाळत राहिली होती. इंस्टिट्यूटच्या शाखा बंद कराव्या, त्याचें मुख्य कार्य सहकारी शिक्षण हें असावें आणि त्याची घटना सहकारी संस्थांच्या संघांचें मध्यवर्ती मंडळ (फेडरेशन) ह्या स्वरूपाची असावी हें ह्या योजनांचें मूलभूत तत्त्व होतें. त्यांचे योगानें इंस्टिट्यूटच्या उद्देशांची व कार्यांची मूळची व्यापकता मर्यादित होणार असल्यानें बिन सरकारी कार्यकर्त्यांनीं त्यांमध्यें अनेक दुरुस्त्या सुचवल्या आणि त्यांची सरकारशीं चर्चा केली. व्यक्तिशः कार्यकर्त्यांचा इंस्टिट्यूटच्या घटनेशी संबंध राखणें, सहकारी संस्थांच्या हिताच्या प्रश्नांची चर्चा करून त्यांचे संबंधांत सरकारला बिनसरकारी मत कळविणेची संधि त्यास देणें, जिल्ह्यांतील सुपरव्हिजन बोर्डांशीं इंस्टिट्यूटचा प्रत्यक्ष घटनात्मक संबंध ठेवणें इत्यादि बाबतींतल्या सूचना मान्य करून सरकारनें अखेरची घटना निश्चित केली आणि तिला अनुसरून तयार झालेले पोटनियम गेल्या पहिल्या तारखेस इंस्टिट्यूटची सर्व साधारण सभा भरून तींत मंजूर झाले. घटनेस अनुसरून इंस्टिट्यूटच्या निरनिराळ्या घटकांनीं कार्यकारी मंडळासाठी सभासद निवडण्याविषयींचे नियम अजून तयार व्हावयाचे असल्यानें वरील साधारण सभेनेंच हें निवडण्याचें काम केलें आहे. प्रारंभीं हा मार्ग अपरिहार्यच होता. कार्यकारी मंडळानेंच इंस्टिट्यूटचा अध्यक्ष व चिटनवीस ह्यांची निवड करावयाची आहे. शिक्षण हेंच इंस्टिट्यूटचें आतां प्रमुख कार्य असल्यानें सेंट्रल एज्युकेशन बोर्ड आजपर्यंत स्वतंत्र रीतीनें काम करीत असे त्याची आवश्यकता राहिलेली नाहीं. इंस्टिट्यूटच्या पुनर्घटनेची गाडी अनिश्चितपणा, वाद व चर्चा ह्यांच्या गाळांत रुतून पडली होती, ती एकदाची बाहेर निघून पुन्हां चालू झाली आहे ही समाधानाची गोष्ट आहे. नवीन संघटनेबाबत अनुकूल–प्रतिकूल मतें प्रदर्शित करण्याचें आतां कारण नाहीं. संकुचित क्षेत्रांतहि खऱ्याखुऱ्या कार्यकर्त्यांस विधायक काम करण्यास नेहमींच पुष्कळ वाव असतो हें लक्षांत ठेवलें पाहिजे. पुनर्घटित प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूटच्या हातून त्यास आंखून दिलेल्या क्षेत्रांत भरीव कामगिरी होईल अशी आम्ही आशा बाळगतों.

### नमुनेदार खेडें बनवलें

सुधारणेच्या निश्चित कल्पना डोळ्यांपुढें ठेवून संघटित प्रयत्न केल्यास सुंदर व निरोगी खेडेगांवें बनवतां येतात याचें उदाहरण मार्गदर्शक होण्यासारखें असल्यानें त्याविषयींची माहिती येथें दिली आहे. सन १९३९ साल अखेर कुलाबा जिल्ह्यांतील पनवेल तालुक्यापैकीं शिवकर ह्या नांवाचें खेडें आगीनें भस्मसात झालें. गांवांत मुख्यत्वेंकरून आग्री लोकांची वस्ती होती आणि त्यांच्या एकूण ५६६ लोकसंख्येपैकीं ४८२ इसम निराश्रित झाले. त्यांच्या मदतीसाठी उभारलेल्या फंडांत ३,८७० रुपये जमा झाले आणि मुंबई सरकारनें एक हजार रुपयांचें द्रव्यसहाय देऊन घरें पुन्हां बांधण्यासाठीं २,४०० रुपये किंमतीचें लाकूड पुरवलें. गांवाचा ४६० रुपयांचा जमीन महसूलहि माफ करण्यांत आला. अत्यंत मागसलेल्या रहिवाशांचा गांव आणि तो आगीनें सबंध जळून खाक झालेला अशा स्थितींत तेथें सर्वस्वी नवीन वसाहत करण्या-

सारखाच प्रसंग होता. पण आपत्तीमधून सुस्थिति उत्पन्न करण्याची संधि केव्हां केव्हां येते, तसाच प्रकार शिवकर गांवाचा झाला. जिल्ह्याचें ग्रामसुधारणा बोर्ड व रेव्हिन्यू खातें ह्यांनीं परस्पर सहायानें त्याची पुनर्रचना पद्धतशीरपणानें व सुधारलेल्या रीतीनें करावयाचें ठरवून आपली योजना थोड्या काळांत पार पाडली. निराश्रित कुटुंबांस नव्या घरांसाठीं जागा आखून देण्यांत आल्या आणि तसि फूट रुंदीचे रस्ते गांवांत ठेवण्यांत आले. घरबांधणीसाठी जरूर तेथें लोकांस तगाई देण्यांत आली. पुनर्रचनेच्या योजनेंत शाळा व चावडी ह्यांची तरतूद झालेली आहे. गांवांतून वहाणाऱ्या ओढ्यावर पूल बांधला आहे, हरिजनांसाठी एक विहीर आहे, आंब्याचीं झाडें लावलीं आहेत आणि घाण पाणी जाण्यासाठी मोऱ्या केल्या आहेत. पुनर्रचनेची माहिती सरकारास कळवतांना जिल्ह्याच्या कलेक्टरांनीं असें म्हटलें आहे कीं गांवांतले लोक इतके मागसलेले आहेत कीं तेथें सहकारी बँक काढण्यास अनुकूल परिस्थिति नाहीं. तथापि, सध्याचीं मुलें मोठीं झालीं म्हणजे त्यांस भोंवतालच्या सुधारणांचा फायदा घेतां येऊन प्रगति घडवून आणतां येईल अशी आशा करण्यास हरकत नाहीं. लोकशिक्षण व आर्थिक संघटन हें ग्रामसुधारणेचें एक महत्त्वाचें अंग आहे. ह्यां दृष्टीनें पुनर्रचित शिवकर गांवांत सहकारी संस्था स्थापण्याचाहि प्रयत्न केला जाणें इष्ट आहे. अर्थात् हें दीर्घ परिश्रमाचें व श्रद्धावान कार्यकर्त्यांचें काम आहे. भिल्ल लोकांमध्यें असें कार्य चाललें आहे, त्याच धर्तीवर येथेंहि खटपट व्हावी लागेल.

## यंत्रसामुग्री उत्तम, बाजारभाव अनुकूल परंतु गिरणीस कुलूप

राजमहेंद्री येथील कामगार संघांनीं हिंदुस्थान सरकारच्या व्यापारमंत्र्याकडे नेलेल्या गाऱ्हाण्यांवरून आंध्र पेपर मिल्सच्या परिस्थितीवर बराच प्रकाश पडतो. ही गिरणी प्रथम " कर्नाटक पेपर मिल्स लि." ह्या नांवानें स्थापन झाली. ती १९२९ मध्यें लिक्विडेशनमध्यें गेल्यावर तिची व्यवस्था मोती पायघा आणि कंपनीचे ताब्यांत गेली. त्यांना गिरणी किफायतशीर चालवितां न येऊन एकामागून एक ह्याप्रमाणें अनेकांच्या ताब्यांत तिची व्यवस्था गेली. अखेर मेसर्स दयाराम अँड सन्स ह्यांनीं मॅनेजिंग डायरेक्टर्स ह्या नात्यानें आपल्याकडे व्यवस्था घेतली. त्यांनीं १५ लक्ष रुपये गुंतविले, तरी गिरणी नीट चालेना. त्यांनीं गिरणीचा ताबा डिबेंचर धारण करणारांना दिला व त्यांनीं कॅनरा पल्प अँड पेपर मिल्सला गिरणी भाड्यानें चालविण्यास दिली. कंपनीनें गिरणी यशस्वी रीतीनें चालविली. १४ लक्ष रुपये ही खरेदीची किंमत ठरली, परंतु ही रकम मॅनेजिंग एजंटांनीं आपलें येणें आहे म्हणून तिचेवर हक्क सांगितला. ह्या खरेदीचा व्यवहार पुरा झाला. तर भागीदारांस कांहींच मिळणार नाहीं, म्हणून त्यास हरकत घेण्यांत आली व कोर्टांत दिवाणी व फोजदारी कामास प्रारंभ झाला. इकडे गिरणी बंद पडली. गिरणीला दररोज २,५०० रुपये नफा होण्याजोगा आहे. म्हणजे, दर वर्षीच्या नफ्याचा आकडा १४ लक्ष रुपये भरतो. मे, १९४१ पासून गिरणी बंद आहे. ह्यावरून नुकसानीची कल्पना येईल. गिरणीचा कोणत्याहि पक्षास ताबा मिळून ती चालू होण्यास सहाजिकच आतां वेळ लागणार. गिरणींतील यंत्रसामुग्री सुसज्ज आहे, कागदास भाव व मागणी उत्कृष्ट आहे, परंतु गिरणीस कुलूप आहे ! तूर्त सरकारनें गिरणी ताब्यांत घेऊन चालू करावी, असें सुचविण्यांत येत आहे.

**अर्थशास्त्र**

लेखक:—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें ३००; किंमत ३ रुपये
या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

**श्रीराम सिल्क मिल्स लि., बंगलोर**

[ कंपनीनें १९४१ अखेर ६ टक्के डिव्हिडंड वांटला आहे. ]
युद्धसाहित्यपुरवठा–खात्याची पॅरेशूटकरितां लागणाऱ्या
रेशमी कापडाची ऑर्डर पुरी करण्यासाठी लागणाऱ्या भांडवलाकरितां तूर्त एकूण रु. १ लक्षाच्या रकमेपर्यंत

**ठेवी घेणें आहेत,**

व्याजाचा दर ४॥ ते ६ टक्के. ठेव किमान रु. ५०० ची असावी. ठेवीवरील व्याज दर सहा महिन्यांनीं दिलें जातें.

श्रीराम सिल्क मिल्स लि., श्रीरामबाग, बसवनगुडी, बंगलोर.
नारायण गोविंद नाईक, ( माजी अध्यक्ष, म्हैसूर चेंबर ऑफ कॉमर्स ) मॅनेजिंग डायरेक्टर

आमच्या कारखान्यांतील माल मुंबईस बॉम्बे स्वदेशी को–ऑपरेटिव्ह स्टोअर्समध्यें व पुण्यास लक्ष्मी रोडवरील ? म्यूझिअमच्या व्यापार–संवर्धन–गृहांत पहा.

**महायुद्ध दाराशीं आलें
परदेशी औषधें
दुर्मिळ व महाग झालीं**

पण

**भिण्याचें कारण नाहीं !!!**

— कारण —

**आयुर्वेद रसशाळा पुणें लि०**

या देशी औषधाच्या प्रसिद्ध कारखान्यानें तयार केलेलीं

● रक्तवर्धक, ● उपनाह,
● बालजीवन, ● कॅल्सीप्राल

*इत्यादि पेटंट, स्टँडर्ड व लोकप्रिय औषधें खात्री पटल्यामुळें*

★ डॉक्टर्सहि वापरूं लागले आहेत. ★

दरसाल बिनचूक नफा वाटणाऱ्या ह्या कंपनीचे शेअर्स व औषधें मागवा.

**आयुर्वेद रसशाळा पुणें लि०**

मुख्य दुकान गणपति चौक, लक्ष्मीरोड, पुणें २.

## मुंबई प्रांताचें औद्योगिक खातें.

### ( १९४०-४१ )

### उद्योगधंद्यांची सर्वसामान्य स्थिति

युद्धामुळें अहवालाचे सालीं प्रांतांतील उद्योगधंद्यांत भरमसाट वाढ झाली. कित्येक नवे कारखाने सुरू झाले व उद्योगधंद्यांतून तयार होणाऱ्या मालांत फारच मोठ्या प्रमाणांत वाढ झाली. युद्धामुळें मिळालेल्या ऑर्डरीमुळें कापड तयार करण्याच्या गिरण्यांचा धंदा फार जोरांत चालू होता, आणि ( ब्रिटिश ) साम्राज्यांतील बऱ्याचशा देशांतून आलेली कापडाची वाढती मागणी गिरण्यांना भागवावी लागली. सूत व कापड यांचे भाव खूप वाढले व धंदा चांगलाच किफायतशीर चालेल अशीं सुचिन्हें दिसूं लागलीं. वूलन ( लोकरी कापड तयार करणाऱ्या ) गिरण्यांचा धंदाहि जोरांत सुरू होता. लष्करासाठी लागणारा कपडालत्ता पुरविण्याच्या पुष्कळ ऑर्डरी या गिरण्यांस मिळाल्या व त्या आर्डरीप्रमाणें तसा कपडा त्यांनीं पुरविला. सोनेरी कलाबतू तयार करण्याचा उद्योगधंदा व सिगारेट करण्याचा उद्योगधंदा या धंद्यांवर आपसांतील चढाओढीचा परिणाम झाला; आणि आर्टिफिशिअल सिल्कच्या गिरण्यांचा धंदा व गॅस मँटल, केमिकल, साखर, मॅच ( काड्याच्या पेट्या ), कागद व कांच हे पदार्थ तयार करण्याचे उद्योगधंदे, तेलाच्या गिरण्या, वनस्पतिजन्य तूप व साबण तयार करण्याचे उद्योगधंदे व लिमलेट व चॉकलेट तयार करण्याचा उद्योगधंदा हे समाधानकारक प्रगति करीत असल्याचें दिसून आलें.

२. पुढील नवीन उद्योगधंदे अहवालाचे सालीं स्थापन किंवा सुरू करण्यांत आले :—

स्क्वाश, पॅकेटांत घातलेले पोहे, लिव्हर एक्स्ट्रॅक्ट, डायक्रोमेट, धान्य दळण्याच्या चक्क्या, ॲसिटिक ॲसिड, मक्यापासून स्टार्च आणि पेस्टबोर्ड हे तयार करणें.

आजवर ज्या वस्तू आयात करण्यांत येत असत त्या तयार करण्याचे कित्येक उद्योगधंदे सुरू करण्याची संधि युद्धामुळें निर्माण झालेल्या परिस्थितीमुळें मिळाली. अहवालाचे सालीं पुढील नवीन उद्योगधंदे सुरू करणें कोठवर शक्य आहे याविषयीं खात्याकडून चौकशी करण्यांत आली. ते धंदे म्हणजे स्ट्रॉबोर्ड तयार करणें, टॅनिन् एक्स्ट्रॅक्ट तयार करणें हे आणि बारामती येथील क्षारयुक्त जमिनींतून सोडियम सल्फेट काढणें कोठवर शक्य आहे तें, हे होत.

३. सुसंघटित उद्योगधंद्यांना मदतः—( माल ) तयार करण्याच्या कृति करतांना आलेल्या व्यावहारिक अडचणी दूर करण्याच्या कामीं शास्त्रीय सल्ला देण्यांत आला.

डिपार्टमेंटच्या एंजिनियरिंग वर्कशॉपमध्यें कित्येक गृहस्थांच्या वतीनें प्रयोग करण्यांत आले आणि कित्येक कृतिविषयक सूचना व व्यावहारिक प्रात्यक्षिकेंहि कांहीं बाबतींत करून दाखविण्यांत आलीं.

कित्येक कारखान्यांनीं तयार केलेल्या मालाचें पृथकरण करून त्याविषयींचे रिपोर्ट संबंध असलेल्या कारखान्यांस देण्यांत आले. प्रांतांत व प्रांताबाहेर असलेल्या खरीद करणाऱ्या अधिकाऱ्यांस प्रांतांतील उद्योगधंद्यांत तयार होणाऱ्या मालाची शिफारस करण्याचे कामीं सर्वसाधारण मदतहि करण्यांत आली.

अहवालाचे सालीं व्यापारविषयक व उद्योगधंद्यांविषयक ज्या चौकशा करण्यांत येऊन उत्तरें देण्यांत आलीं त्यांची संख्या १,५०० च्याहि वर होती.

४. उद्योगधंद्यांस सरकारी मदत—अहवालाचे सालीं उद्योगधंद्यांस पुढील कर्जें देण्यांत आलीं:—

(१) इलेक्ट्रिक ब्लॉक तयार करणाऱ्या फर्मला रु. २०,००० कर्जाऊ दिले.

(२) निरनिराळ्या प्रकारचीं टॉयलेट्स व इतर सुवासिक द्रव्यें तयार करणाऱ्या फर्मला रु. ३,००० कर्जाऊ दिले.

(३) कटलरी ( चाकू, कातऱ्या वगैरे वस्तू ) तयार करण्यासाठी रु. ८०० कर्जाऊ दिले.

(४) ग्लेझ्ड सॅनिटरी वेअर्स तयार करणाऱ्या फर्मला रुपये ६०,००० कर्जाऊ दिले.

अहवालाचे सालीं मंजूर करण्यांत आलेली परंतु देण्यांत न आलेली कर्जाची रक्कम रु. १९,५०० होती. यालेरीज भाताच्या गिरणीस लागणारीं यंत्रें वगैरे तयार करणाऱ्या एका इंजिनियरिंग फर्मला एका बँकेकडून ५०,००० रुपयांपावेतों रोख रक्कम उधार मिळण्याबद्दल सरकारनें हमी दिली.

प्रयोगशाळेंतील ( लॅबोरेटरींतील ) कांहीं उपकरणें तयार करण्यासंबंधीं संशोधन कार्य करण्यासाठीं १४४० रुपयांपावेतों ग्रँट देण्यांत आली; बल्ब्याची कांच तयार करण्याच्या कामीं संशोधन करण्यासाठी १,२५० रुपयांची ग्रँट देण्यांत आली; आणि फोटोग्राफिक पेपर तयार करण्याच्या कामीं प्रयोग करण्यासाठी १,७५० रुपयांची ग्रँट देण्यांत आली.

प्लायवुड तयार करण्याचा कारखाना सुरू करण्यासाठी एका गृहस्थास जंगलसंबंधीं कित्येक सवलती मंजूर करण्यांत आल्या.

५. इंडस्ट्रियल इंजिनियरचें वर्कशॉप कृत्रिम-कलाबतू.—टँकमध्यें तांब्याच्या तारेवर टिकाऊ ब्रास प्लेटिंग करण्यासाठी एक प्रकारचें नवीन डायल्यूट मिश्रण तयार करण्याचें काम पूर्ण झालें. तयार करण्यांत आलेला उत्कृष्ट प्रकारचा कलाबतू लुगड्यांच्या किनारींत विणण्यासाठीं, व्यावहारिक कसोटी लावून, योग्य असल्याचें आढळून आलें.

कांच व कांचेच्या बांगड्या तयार करणें.—रत्नागिरी, बेळगांव व विजापूर जिल्ह्यांतून कांच तयार करण्यास योग्य अशी वाळू मिळूं शकते असें शोधाअंतीं कळून आलें. कांचेच्या बांगड्यांवर डिझाइन्स इनामेल करण्याचे प्रयोग चालू आहेत.

सण व ताग.—कॅन्व्हस व तशाच प्रकारचें इतर कापड तयार करण्यासाठी योग्य असें सूत करण्याकरितां सणाचे व तागाचे तंतू ब्लीच करून नरम करण्याकसंबंधीं आणखी प्रयोग करण्यांत आले. पायानें चालवावयाचें एक नवीन प्रकारचें ( धागा ) कातण्याचें व त्यांस पीळ देण्याचें यंत्र या खात्याकडून तयार करण्यांत आलें. हातानें चालवितां येईल असें ड्रम टाईपचे तंतू कातण्याचें एक लहान यंत्र तयार करण्याचे प्रयोग चालू होते.

तेलाचे घाणे.—निरनिराळ्या प्रकारच्या घाण्यांसंबंधींचे प्रयोगवजा कार्य पुरें करण्यांत येऊन निरनिराळ्या ठिकाणीं त्यांचा उपयोग करून पाहण्याचें काम पुणें येथील व्हिलेज इंडस्ट्रीज् एक्स्पेरिमेंटल वर्कशॉपकडे सोंपविण्यांत आलें.

फिटमेंट्स तयार करणें.—कित्येक नवीन प्रात्यक्षिकें व चळवळी यांत आवश्यक वाटलेलीं निरनिराळ्या प्रकारचीं यंत्रें, फिटमेंट्स, लहानसहान हातानें वापरावयाचीं हत्यारें, वगैरे, तयार करण्यांत आलीं.

मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् को-ऑपरेटिव् बँक, लिमिटेड.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी-सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंग
९, बेक हाउस लेन, कोट मुंबई.

**शाखा**

| | |
|---|---|
| १ बारामती ( जि. पुणें ) | १८ अकलूज ( जि. सोलापूर ) |
| २ सातारा ( „ सातारा ) | १९ विरमगांव ( „ अहमदाबाद ) |
| ३ इस्लामपूर ( „ „ ) | २० धुळें ( „ प. खानदेश ) |
| ४ कऱ्हाड ( „ „ ) | २१ दोंडाईचें ( „ „ ) |
| ५ तासगांव ( „ „ ) | २२ शिरपूर ( „ „ ) |
| ६ किर्लोस्करवाडी( „ „ ) | २३ शहादें ( „ „ ) |
| ७ शिराळें ( „ „ ) | २४ नंदुरबार ( „ „ ) |
| ८ कोरेगांव ( „ „ ) | २५ साक्री ( „ „ ) |
| ९ वांई ( „ „ ) | २६ शिंदखेडें ( „ „ ) |
| १० अहमदनगर ( „ अहमदनगर ) | २७ तळोदें ( „ „ ) |
| ११ शेवगांव ( „ „ ) | २८ मालेगांव ( „ नाशिक ) |
| १२ कोपरगांव ( „ „ ) | २९ सटाणा ( „ „ ) |
| १३ बेलापूर ( „ „ ) | ३० कळवण ( „ „ ) |
| १४ राहुरी ( „ „ ) | ३१ लासलगांव ( „ „ ) |
| १५ भिवंडी ( „ ठाणें ) | ३२ नांदगांव ( „ „ ) |
| १६ पालघर ( „ „ ) | ३३ दोहद ( „ पंचमहाल ) |
| १७ कल्याण ( „ „ ) | ३४ कालोल ( „ „ ) |

**या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात**

आणि

**इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.**

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.



## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार



राहाणेची व भोजनाची उत्तम सोय




फोन नं. ७७९ गणपति चौक, व्यवस्थापक.



## N. V. WADNERKAR

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver,
Electro-plater & Manufacturer of Sporting Trophies, Medals, Cups etc.

- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -
POONA CITY.



## DECCAN BOOK STALL

Booksellers, Publishers & Subscription Agents
**Fergusson College Road, Poona No. 4**

(1) We stock and supply Educational books, General books & Library books.

(2) We supply Government of Bombay and Government of India publications.

(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.

(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत ग. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व
रा. श्रीपाद वामन काळे. एम्. ए. यांनीं 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. ९२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ८ पुणें, बुधवार, तारीख १९ ऑगस्ट १९४२ अंक ३३

## दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल ... ... ... | रु. | २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... ... ... | रु. | १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड ... ... ... | रु. | १,१८,००,००० |

**मुख्य कचेरी:** ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

**मुंबईमधील शाखा:** बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

**इतर शाखा:** अहमदाबाद ( भद्र, मुख्य ऑफिस ), अहमदाबाद ( एलिस ब्रिज शाखा ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अंधेरी ( मुंबई शेजारीं ), बांद्रे ( मुंबई शेजारीं ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस ), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर, कराची, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत.

**लंडन एजन्ट्स:** वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

**डायरेक्टर्स:** सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय.(अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई, सर जोसेफ के. नाइट, मि. ए. गेडिस, सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई., मि. दिनशा के. दाजी, श्री. रामनिवास रामनारायण.

करंट डिपॉझिट अकाउंट्स :

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षा कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमीचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

एजंटः—टी. आर. लालवाणी.

## दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

हेड ऑफिस : पुणें शहर.

स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.

मुंबअी शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबअी.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | : रु. | १[illegible],००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | : रु. | [illegible],००० |
| खपलेलें भांडवल | : रु. | ४,४५,९५० |
| वसूल झालेलें भांडवल | : रु. | २,२२,७९५ |
| एकूण खेळतें भांडवल | : रु. | ३७,००,००० |

### डायरेक्टर्स

प्रो. वा. गो. काळे, अध्यक्ष

| | |
|---|---|
| श्री. धों. कृ. साठे | श्री. मा. रा. जोशी |
| श्री. न. ग. पवार | श्री. श्री. गो. मराठे |
| श्री. श्यं. वि. रानडे | श्री. र. चिं. सोहोनी |
| श्री. वा. पुं. वर्दे | मि. फ. दो. पदमजी |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदीविक्री कसोशीनें करून दिली जाते.

बँकेच्या शेअरवर १९४१ अखेर पुऱ्या होणाऱ्या वर्षी द. सा. द. शेंकडा ४ टक्के करमाफ डिव्हिडंड दिलें गेलें. बँकेची शेअरविक्री चालू आहे.

म. वि. गोखले
मॅनेजर.

महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर

# महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

# विविध माहिती

### तंबाखूची लागवड

तंबाखूचे लागवडीचे बाबतींत हिंदुस्थान अग्रेसर आहे. १५ लक्ष एकर जमीन ह्या देशांत तंबाखूखालीं आहे.

### आगी विझविण्यांत तज्ज्ञ

इंग्लंडमधील फायर ब्रिगेडचे ५९ तज्ज्ञ अधिकारी मुंबईत दाखल झाले. त्यांचें ग्रीन्स रेस्टॉरंटमध्यें हिंदुस्थान व मुंबई सरकारतर्फे स्वागत करण्यांत आलें. बाँबमुळें लागणाऱ्या आगी विझविण्याचा अनुभव असलेले अधिकारी हिंदुस्थानांत पाठविण्यासंबंधीं हिंदुस्थान सरकारनें ब्रिटिश सरकारास विनंति केली होती, तिला अनुसरून निवड केलेल्या ३०० अधिकाऱ्यांपैकीं ५९ अधिकाऱ्यांची पहिली तुकडी येथें आली आहे.

### मधमाशा

मधमाशा मध गोळा करण्याकरितां कधीं कधीं दहा मैलहि दूर जातात, परंतु साधारणपणें दोन मैलांपलीकडे त्या जात नाहींत.

### ट्रेझरी बिलांवरील व्याजाचा सरासरी दर

ट्रेझरी बिलांवर १९४२ च्या पहिल्या सहामाहींत सरासरीनें द. सा. द. शे. १ रु. ० आ. ९ पै. इतका व्याजाचा दर पडला. १९४१ च्या पहिल्या सहामाहींतील सरासरी दर १२ आ. २ पै इतका होता.

### जुन्या शर्टच्या चिंध्यांच्या नोटा

वापरून टाकलेल्या शर्टसची फ्रान्समधून इंग्लंडमध्यें होणारी आयात आतां बंद पडली आहे. त्या कारणानें बँक ऑफ इंग्लंडला एक पेच निर्माण झाला आहे. जुन्या शर्टच्या चिंध्यापासून होणारा कागद बँकेच्या नोटांस फार सोईचा असतो. ब्रिटिश लोक पांढरे शर्ट कमी प्रमाणांत वापरतात, त्यामुळें फ्रान्समधून जुने पांढरे शर्ट आयात करावे लागत.

### रेल्वेचें सान्निध्य

इंग्लंडमधील कोणतेंहि गांव आगगाडीच्या रस्त्यांपासून १८ मैलांपेक्षा दूर नाहीं.

### ट्रेझरी बिलांवर ७ आ. ११ पै व्याजाचा दर

रिझर्व्ह बँकेनें गेल्या आठवड्यांत हिंदुस्थान सरकारचीं ६ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं. त्यांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. ७ आ. ११ पै इतका पडला. ६ कोटींच्या ट्रेझरी बिलांकरितां ११ कोटि, १२½ लक्ष रुपयांच्या ट्रेझरी बिलांच्या मागणीचे अर्ज आले होते.

### किनाऱ्यावरील वहातूक

हिंदुस्थानाच्या पश्चिम किनाऱ्यावर कराची आणि कोचीन ह्यांचे दरम्यान मचव्यांतून मालवहातूक कशी वाढवितां येईल ह्यासंबंधीं चौकशी करण्याकरितां हिंदुस्थान सरकारनें डॉ. सोर्ले, आय. सी. एस. व रा. ब. माणेकलाल लल्लुभाई ह्यांची नेमणूक केली आहे. त्यांस कोणास कांहीं सूचना करावयाच्या असल्यास त्या १ सप्टेंबर पूर्वी कराव्यात.

### ब्रह्मदेशाचे गव्हर्नर

ब्रह्मदेशाचे गव्हर्नर, सर रेजिनॉल्ड डॉर्मन-स्मिथ हे आपल्या कामावर रुजू होण्यासाठी इंग्लंडहून निघाले आहेत.

### थिएटरांत सरकारी कचेऱ्या

अमेरिकेची राजधानी, वॉशिंग्टन, येथें आतां युद्धपरिस्थितीमुळें काम इतकें वाढलें आहे कीं, कचेऱ्यांना नीट जागा मिळणें अशक्य झालें आहे. कांहीं सरकारी कचेऱ्या जुन्या थिएटरांत भरूं लागल्या आहेत.

### मुंबईत तांदुळाचा पुरवठा

मुंबई शहरांत तांदुळाचा पुरवठा पुरेसा आहे व तेथें मद्रास सरकारकडून दरमहा ६ हजार टन तांदूळ आयात होत आहे, असें मुंबईच्या गव्हर्नरांचे सल्लागार, मि. नाइट, ह्यांनीं सांगितलें.

### सिलोनमधील घड्याळांचे काटे पुढें करणार

आठ महिन्यांपूर्वी सिलोनमधील घड्याळें अर्धा तास पुढें लावण्यांत आलीं, म्हणजे आज तेथील घड्याळें इंडियन स्टँडर्ड टाइमच्या पुढें अर्धा तास आहेत. हिंदुस्थानांतील घड्याळें एक तास पुढें करण्यांत येणार आहेत, त्यांच्या बरोबर आपलीं घड्याळें यावीत ह्यासाठी सिलोनमधील घड्याळांचे काटे आणखी ३० मिनिटें पुढें लावण्यांत यावयाचे आहेत. म्हणजे, हिंदुस्थान व सिलोन ह्या दोन्हीं ठिकाणचीं घड्याळें ग्रीनिच टाइमच्या ६½ तास पुढें होतील.

### तांबें व पोलाद

अमेरिकन सरकारनें आपल्या सर्व विद्युत् योजना स्थगित केल्या आहेत. तांबे व पोलाद ह्यांचा युद्धविषयक उपयोग ज्यास्त तातडीचा आहे.

### बी. बी. सी. ला सरकारी ग्रँट

मार्च, १९४३ अखेर संपणाऱ्या वर्षाकरितां ब्रिटिश ब्रॉडकास्टिंग कॉर्पोरेशनला ब्रिटिश सरकारनें १ कोटि रुपयांची ग्रँट मंजूर केली आहे. गेल्या वर्षीपेक्षां चालू वर्षी ग्रँट ३१ लक्ष पौंडांनीं अधिक आहे.

### जगांतील सर्वांत उंच इमारत

न्यूयॉर्क येथील एंपायर स्टेट बिल्डिंग ही सर्व जगांतील इमारतींत अग्रेसर आहे, असें समजण्यांत येतें. तिची उंची १,२४८ फूट आहे. मॉस्को येथील पॅलेस ऑफ सोव्हिअट्सची उंची १,३६५ फूट आहे, परंतु त्यांत लेनिनच्या पुतळ्याची उंची ( ३२८ फूट ) धरलेली आहे.

### इंपीरिअल बँकेचा ब्रह्मदेशांतील व्यवहार

ब्रह्मदेश शत्रूचे हातीं पडल्यामुळें इंपीरिअल बँकेला आपल्या त्या देशांतील कचेऱ्यांचें स्थलांतर करावें लागलें. त्या कचेऱ्यांचीं ब्रह्मदेशांतील जीं येणीं वसूल होण्याजोगीं नाहींत त्यांची तरतूद बँकेनें हिशेबांत केली असून बँकेची स्टेशनरी, फर्निचर इत्यादींची किंमत आगाऊ बाजूस काढलेल्या रिझर्व्हमधून लिहून टाकण्यांत आली आहे.

### म्हैसूर सरकारचें १९४२-४३ चें बजेट

| | |
|---|---|
| अपेक्षित उत्पन्न | ४ कोटि ७४½ लक्ष रु. |
| अपेक्षित खर्च | ४ कोटि ७३ लक्ष रु. |
| वाढावा | १½ लक्ष रु. |

### हिंदी गिरण्यांत देशी कपाशीच्या उठावांत वाढ

| | गासड्या |
|---|---|
| जून, १९४२ | ३,३८,२३३ |
| जून, १९४१ | २,९१,६५२ |
| सप्टेंबर १९४१ ते जून १९४२ | ३३,२५,४४९ |
| सप्टेंबर १९४० ते जून १९४१ | २९,६१,६९२ |

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | २६० | पोस्ट व तार खातें—बार्शी सें.को.बँक लि.—इंडियन इन्स्टिटयूट ऑफ बँकर्स | |
| २ रिझर्व्ह बँकेचा किफायतशीर कारभार ... | २६१ | ५ गव्हर्मेंट टेलिफोन्स बोर्ड | २६४ |
| ३ कपाशीच्या विक्रीचा नवा करार ... | २६२ | ६ बेळगाव बँक लि. ... | २६४ |
| ४ स्फुट विचार ... शेडयूल्ड बँकेच्या पात्रतेची कसोटी—हिंदी | २६३ | ७ सह्याद्रि विमा कं. लि. | २६५ |


# अर्थ

बुधवार, ता. १९ ऑगस्ट, १९४२

## रिझर्व्ह बँकेचा किफायतशीर कारभार

### सुमारें ३½ कोटि रुपये निवळ नफा

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचा ३० जून, १९४२ अखेरचा वार्षिक अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला आहे, त्यावरून अहवालाचे वर्षी बँकेस ३,४१,५३,६८१ रुपये नफा झाला असल्याचें दिसून येतें. त्या पूर्वीच्या नफ्याचा आकडा २,७९,२६,४४७ रुपये इतका होता. बँकेच्या नफा तोटा पत्रकावरून तिच्या व्यवहाराची थोडक्यांत कल्पना येईल.

| | रु. | आ. | पै |
|---|---|---|---|
| **जमा** | | | |
| व्याज, डिस्कौंट, एक्सचेंज, कमिशन इ. | ४,५६,४४,५११ | १ | ० |
| | ४,५६,४४,५११ | १ | ० |
| **खर्च** | | | |
| नोकरांचा पगार | ३९,०८,२६६ | २ | ५ |
| डायरेक्टर व लोकलबोर्डाचे सभासद ह्यांची फी व भत्ता | ८५,८३३ | ८ | ० |
| ऑडिटरांची फी | १२,००० | ० | ० |
| कर, पट्टी, विमा, दिवाबत्ती | ४,५६,४६१ | १२ | ७ |
| वकिलांची फी, इ. | १,४६७ | ० | ३ |
| टपाल व तारखर्च | १,१५,५८१ | ० | ११ |
| पैशाची वर्गावर्गी | १९,५०,५१६ | १० | १ |
| स्टेशनरी इ. | १,५५,९९७ | १५ | ३ |
| चेक, नोटा, इ. ची छपाई | ८,८८,२१५ | १२ | ५ |
| मालमत्तेचा घसारा व दुरुस्ती | ४,२५,३७८ | १ | २ |
| एजन्सी खर्च | २९,६७,१३४ | १ | ११ |
| नोकरवर्गाचे फंडांस बँकेचा वाटा | ७५,३०० | ० | ० |
| इतर किरकोळ खर्च | ४,४८,६७७ | १२ | ० |
| निवळ नफा | ३,४१,५३,६८१ | २ | ० |
| | ४,५६,४४,५११ | १ | १ |

रिझर्व्ह बँकेस एवढा मोठा नफा झाला, तरी भागीदारांस ३½% डिव्हिडंडच केवळ मिळणार आहे. बँकेच्या नफ्याची वाटणी कशी करावयाची, हें बँकेच्या कायद्यांतील ४७ व्या कलमांत सांगितलें आहे. भागीदारांस ३½% क्युम्युलेटिव्ह डिव्हिडंड मिळाल्यानंतर कांहीं नफा उरला, तर त्याचा कांहीं अंश डिव्हिडंडकडे व कांहीं अंश मध्यवर्ती सरकारास देण्याकडे खर्च व्हावा, अशी त्यांत योजना आहे. रिझर्व्ह फंडाची रकम भांडवलाचे रकमेपेक्षां कमी असेल, तर किमान ५० लक्ष रुपये त्या फंडांत टाकले पाहिजेत. परंतु बँकेचा रिझर्व्ह फंड भांडवलाचे रकमेइतका म्हणजे ५ कोटि रुपये केव्हांच झालेला आहे. तेव्हां, रिझर्व्ह फंडांत भर पडण्याचा तूर्त प्रश्न उपस्थित होत नाहीं. गेल्या वर्षीच्या नफ्यांतून डिव्हिडंडची तरतूद केल्यानंतर ४ कोटीपेक्षां अधिक रकम उरत नाहीं (सबंध नफ्याची रकमच ४ कोटि रुपये भरत नाहीं) म्हणून त्याची भागदारांत कशी वाटणी व्हावी, हा प्रश्नच उपस्थित होत नाहीं. भागीदारांस अधिक डिव्हिडंड न मिळतां सर्वच्या सर्व शिलकी नफा हिंदुस्थान सरकारास मिळेल. ४ कोटी रकमेवरील पहिल्या १½ कोटीचा ¼ वा हिस्सा डिव्हिडंडसाठी खर्च करावा व नंतरच्या १½ कोटीचा ⅛ वा हिस्सा डिव्हिडंडसाठी मिळावा त्यावरील १½ कोटींचा पुनः १/१६ वा हिस्सा मिळावा अशी डिव्हिडंड वाटणीची योजना आहे तिचा फायदा भागदारांस अद्याप मिळालेला नाहीं. ५ कोटि रुपयांच्या भांडवलावर ३½% डिव्हिडंड वाटण्यास १७½ लक्ष रुपये लागतात. रिझर्व्ह फंडांत रकम टाकण्याचें आतां बंधन नाहीं. जेव्हां बँकेस ४ कोटि, १७½ लक्षांपेक्षां अधिक निवळ नफा उरेल, तेव्हां फक्त डिव्हिडंडचा दर ३½% चे वर जाण्याचा संभव उपस्थित होईल.

खालील तक्त्यांत, रिझर्व्ह बँकेस तिच्यां स्थापनेपासुन आतांपर्यंत सालोसाल किती नफा मिळाला व त्याचा विनियोग कसा करण्यांत आला, ह्यासंबंधीं आकडे दिले आहेत :—

(आकडे लक्ष रुपयांचे आहेत)

| वर्षअखेर | निवळ नफा | डिव्हिडंड | हिंदुस्थान सरकारचा वाटा |
|---|---|---|---|
| १–१–३५ ते ३१–१२–३५ | ५६ | १३ | ४३ |
| ३१–१२–३६ | ५३ | १८ | ३५ |
| ३१–१२–३७ | २८ | १८ | १० |
| ३१–१२–३८ | ३८ | १८ | २० |
| ३१–१२–३९ | २३ | १८ | ५ |
| ३०—६–४० | २९ | ९ | २० |
| ३०—६–४१ | २७९ | १८ | २६२ |
| ३०—६–४२ | ३४१ | १८ | ३२४ |

नोटा काढण्याचा व चलनाची व्यवस्था करण्याचा अधिकार हिंदुस्थान सरकारनें रिझर्व्ह बँकेस दिला आहे. नोटा काढण्यामुळें होणारा फायदा रिझर्व्ह बँकेचा नफा वाढविण्यास कारणीभूत होत आहे. चलनाचा विस्तार ज्या मानानें वाढेल, त्या मानानें बँकेचा नफा वाढत जाईल. नोटा काढतांना त्यांच्या किंमतीइतकें सोनें अथवा तत्सम अन्य तारण ठेवावयाचें असतें, तर नोटा काढणाऱ्या संस्थेस नफा उरूं शकला नसता. बँकेच्या इश्यू खात्यांत रुपये (रुपयाच्या नोटा सुद्धां) सोन्याचीं नाणीं व सोनें, हिंदुस्थान सरकारचे रोखे व ट्रेझरी बिलें आणि ब्रिटिश सरकारचे रोखे ह्या स्वरूपांत कांहीं ठराविक तारण ठेवावें लागतें. बँकेच्या इश्यू खात्याच्या ताळेबंदाची बेरीज जून १९४२ अखेर ४६१½ कोटि रुपये झाली आहे. त्यापूर्वीच्या वर्षअखेर ती

२९१½ कोटि रुपये होती. चलनी नोटांचा विस्तार हें ह्या वाढीचें कारण आहे. व्यवहारांतील सेळत्या नोटांचा आकडा एका वर्षांत २९० कोटि रुपयांचा ४४७ कोटि रुपयांवर गेला आहे, परंतु त्याच्या तारणांत असलेल्या सोनें व सोन्याचीं नाणीं ह्यांचा आकडा ४४½ कोटि रुपये कायम आहे. स्टर्लिंग रोखे ११९ कोटि रुपयांचे २६७ कोटि रुपये झाले. रुपये ( रुपयाच्या नोटा धरून) २६३¾ कोटींचे २८ कोटि रुपयांवर आले. हिंदुस्थान सरकारच्या रोख्यांचा आकडा ९१½ कोटि रुपयांचा १२२½ कोटि रुपये झाला. हिंदुस्थान सरकारनें चलनाचें किफायतशीर काम रिझर्व्ह बँकेस देऊन, तिच्या रिझर्व्ह फंडाची व किमान डिव्हिडंडची तरतूद झाल्यावर स्वतःस नफ्याचा मोठा हिस्सा मिळण्याची व्यवस्था केली आहे.

---

## कपाशीच्या विक्रीचा नवा करार

### "भडोच" कपाशीची जागा "जरिला" नें घेतली

हिंदी कपाशीच्या पिकास 'जागतिक' किंमत निर्माण झालेली असून मुंबई येथें कपाशीचा मोठा व्यापार चालतो. कपाशीच्या खरेदी-विक्रींतील पुढारीपणाचा मान न्यूयॉर्कच्या बाजारास पात्र झालेला आहे, व तेथील बाजारभावाचा मुंबई येथील बाजारभावावर तात्काळ परिणाम होतो. कपास निर्गत करणारें प्रमुख बंदर, पश्चिम हिंदुस्थानचें औद्योगिक केंद्र व कापडाच्या गिरण्यांचें आगर ह्या दृष्टीनें मुंबई हें कपास बाजाराचें केंद्र बनलें आहे. हिंदी उत्पादनापैकीं तिसरा हिस्सा कपास मुंबई येथें येते. हिंदुस्थानांतील बंगाल, भडोच, उमरा, इत्यादि अनेक प्रकारच्या कपाशीचा मुंबई बाजारांत व्यवहार चालत असला तरी भडोच कापूस हा प्रातिनिधिक समजला जात असे व त्याच्या किंमतीच्या मानानें इतर कपाशीच्या किंमती ठरत असत. ज्या वेळीं भडोच कपाशीस हा मान देण्यांत आला, तेव्हां खरोखरच तिला प्रातिनिधिक स्वरूप होतें. हिंदी कपाशीच्या वार्षिक उत्पादनाचा आकडा आतां ४० लाखांचा ६० लक्ष गासड्या इतका झाला असून सुधारलेल्या कपाशीची म्हणजे ¾" इंच अथवा त्यापेक्षा जास्त लांब धाग्याच्या कपाशीची लागवड वाढत आहे. हिंदी गिरण्यांतील कपाशीचा वार्षिक उठावहि २० लाखांवरून ४० लाख गासड्यांपर्यंत वाढला आहे. अशा परिस्थितींत, प्रातनिधिक कपाशीची नवीन निवड सध्याच्या कपास बाजारांतील परिस्थिति लक्षांत घेऊन करणें आवश्यक झालें. ईस्ट इंडिया कॉटन असोसिएशनच्या देखरेखीखालीं मुंबईच्या कपास बाजाराचें काम चालतें. त्या असोसिएशनचे अध्यक्ष, सर पुरुषोत्तमदास ठाकूरदास ह्यांनीं १५ जुलै, १९४२ रोजीं सकाळीं ११–१५ वाजतां नव्या प्रातिनिधिक कपाशीच्या आधारावरील कपाशीचा पहिला हेजिंगचा वायदा केला. खरेदी-विक्रीपासून भावी नुकसान टाळण्यासाठी मुदतीच्या करारानें खरेदी-बरोबर विक्री व विक्री-बरोबर खरेदी करणें, ह्यास हेजिंग असें म्हणतात. ह्या नवीन प्रातिनिधिक कपाशीच्या करारासंबंधीं माहिती श्री. आर. जी. सरय्या, ओ. बी. ई. ह्यांनीं इंडियन टेक्स्टाइल जर्नलच्या ताज्या अंकांत दिली आहे.

### " इंडियन कॉटन कॉन्ट्रॅक्ट "

हिंदी कपाशीच्या खरेदीविक्रीचे करार ह्यापुढें ¾" धाग्याच्या फाइन एम. जी. खानदेश जिल्ह्यांत लागवड होत असलेल्या जरिला कपाशीचे आधारावर केले जातील. जेव्हां भडोच कपास ही करारास प्रमाणभूत धरण्यांत आली तेव्हां तिचा धागा जवळ जवळ ¾ लांबीचा असे. परंतु, हळुहळु ती लांबी कमी कमी होत जाऊन कपाशीचा दर्जा उतरूं लागला. सहाजिकच, ह्या कपाशीस भाव कमी येऊं लागला व हिंदी कपाशीचा भाव त्यामुळें खाली जाऊं लागला. नव्या योजनेंत किमान ¾" लांबीचा धागा आवश्यक केला असल्याकारणानें जरीला कपाशीचा दर्जा उतरणार नाहीं, अशी अपेक्षा आहे. भडोच, पंजाब, अमेरिकन, ओलरा, कुमठा, वेस्टर्न, विजापूर, बागलकोट, मिरज इत्यादि जातींची कपासहि मुंबई कपास बाजारांत हेजिंगच्या व्यवहाराकरितां स्वीकारली जाईल, परंतु त्यांचा दर्जा जरीलापेक्षा कमी असल्यामुळें त्याची व्यवहारांत त्यामानानें जमवाजमव करून घेतली जाईल. चालू मोसमांतील कपाशीचीच फक्त विक्री करतां येईल. सट्टेवाल्यांच्या कारवायांस प्रतिबंध करतां येईल अशी व्यवस्था नव्या हेज करारांत करण्यांत आली आहे. वहातुकीच्या सध्याच्या विशिष्ट अडचणीच्या परिस्थितींत, विक्रेत्यास मुंबई येथें कपास वेळेवर दाखल करणें अशक्य होण्याचा संभव आहे व त्यानें आपल्या कराराची मुदत लांबविली, तर त्याचें नुकसान होण्याचा संभव आहे. डिलिव्हरी देतां आली नाहीं, तर पडणारा दंड ( खंडीस २५ रुपये ) अशा परिस्थितींत कमी ( खंडीस ७ रु. ८ आ. ) करण्यांत आला आहे व खरेदीदारास इतर ठिकाणीं डिलिव्हरी मागण्याचा अधिकार देण्यांत आला आहे. तेथेंहि विक्रेता आपला करार पाळूं शकला नाहीं, तर दंड मूळ दरानेंच पडेल. युद्धपरिस्थितीमुळें निर्माण होणाऱ्या आणीबाणीचे प्रसंगीं करार पाळणें अशक्यप्राय झालें तर असोसिएशनच्या बोर्डास वायद्याच्या कराराच्या किंमती ठरवून टाकण्याचा अधिकार दिलेला आहे. नव्या हेज कराराची रूपरेषा थोडक्यांत वर दिली आहे. ह्या करारांतील अटी प्रत्यक्ष व्यवहारांत किती सोईच्या ठरतात, हें अनुभवानंतरच समजून यावयाचें आहे. बोर्डास मिळालेल्या मोठ्या अधिकाराचा उपयोग कसा केला जातो, हेंहि अजून कळून आलेलें नाहीं. आखूड धाग्याच्या कपाशीस नव्या करारांत स्थान नाहीं. ही कपास मुख्यतः बाहेर निर्गत होई. परराष्ट्रीय व्यापार थांबल्याकारणानें आखूड धाग्याची कपास पेरणाऱ्या शेतकऱ्यांस नुकसानी आलेली आहे. ह्या दोन्ही कारणांमुळें लांब धाग्याच्या कपाशीचें लागवडीस उत्तेजन मिळेल, अशी अपेक्षा आहे. आखूड धाग्याची कपास मुंबईच्या गिरण्यांत फारच थोडी खपते; तेव्हां रेल्वे वहातुकींत अडचण असतांना ती कपास मुंबईस मोठ्या प्रमाणावर येणेंहि अशक्य आहे. तेव्हां, तूर्त तरी आखूड धाग्याच्या कपाशीस मुंबई बाजारांत स्थान नाहीं. नवीन करारांतील योजना सध्याच्या युद्धपरिस्थितीस अनुसरूनच आखलेली आहे व युद्ध संपतांच त्या योजनेंत फेरबदल व सुधारणा घडवून आणणें प्राप्त होईल हें उघड आहे. श्री. सरय्या ह्यांनीं आपल्या लेखाचे शेवटीं नवीन " इंडियन कॉटन कॉन्ट्रॅक्ट " मधील प्रमुख बाबींची यादी दिली असून तिची " भडोच कॉन्ट्रॅक्ट "शी तुलना करून त्यांतील फरक स्पष्ट करून दाखविला आहे.

---

# स्फुट विचार

### शेड्यूल्ड बँकेच्या पात्रतेची कसोटी

रिझर्व्ह बँकेच्या कायद्याच्या ४६ व्या कलमांत कोणत्याहि बँकेस शेड्यूल्ड बँकांच्या यादींत दाखल करण्यापूर्वी तिनें कोणत्या अटी पार पाडल्या आहेत, हें सांगितलें आहे. त्यांतील प्रमुख बाब म्हणजे त्या बँकेचें भरणा झालेलें भांडवल व रिझर्व्ह ह्यांची किंमत किमान पांच लक्ष रुपये भरली पाहिजे, ही होय. शेड्यूल्ड बँकांच्या यादींत दाखल करून घेण्याचें काम हिंदुस्थान सरकारचें असून, अर्ज करणाऱ्या बँकेचें भांडवल व रिझर्व्ह ह्यांची किंमत पांच लक्ष रुपये आहे किंवा नाहीं, हें ठरवितांना सरकार रिझर्व्ह बँकेचें सहाय घेतें. आवश्यक वाटलें तर रिझर्व्ह बँक अर्जदार बँकेचे कागदपत्रहि तपासतें. शेड्यूल्ड बँकांच्या यादींत बँकेचें नांव दाखल झालें म्हणजे ती त्या यादींत कायम राहील असा मात्र त्याचा अर्थ नाहीं. पांच लक्ष रुपयांखाली बँकेचें भांडवल व रिझर्व्ह ह्यांची किंमत गेली, तर तिला यादींतून काढून टाकण्याचा अधिकार सरकारास आहे. सरकारचे सांगण्यावरून रिझर्व्ह बँक अशा बँकेचे हिशेब व कागदपत्र तपासून योग्य तो सल्ला देते. रिझर्व्ह बँकेच्या ४६ व्या कलमांतील "किंमत" ह्या शब्दाचा "खरी अथवा देवघेवींतील किंमत" असा अर्थ करून सरकारनें गेल्या वर्षी कांहीं शेड्यूल्ड बँकांना नोटिसा देऊन रिझर्व्ह बँकेकडून आपले हिशेब व बह्या तपासून घेण्यास सांगितलें. रिझर्व्ह बँकेकडून हें काम पुरें होण्यापूर्वींच युद्धपरिस्थिति व बाजार भावांतील चलबिचल ह्यांमुळें बँकांच्या जिंदगीची निश्चित किंमत ठरविण्याचें काम तूर्त पुढें ढकलावें लागलें. शेड्यूल्ड बँकांच्या ताळेबंदांत योग्य त्या रकमेचें भाग भांडवल व रिझर्व्ह हीं दिसत असलीं, तरी ५ लक्षांइतकें तरी भांडवल व रिझर्व्ह हीं सुटीं नसतील तर त्यांस शेड्यूल्ड बँकांच्या यादींतून वगळलें जाईल, असा ह्याचा मथितार्थ आहे. शेड्यूल्ड बँकांचा कांहीं पैसा ज्यास देवघेवींत किंमत नाहीं अशा स्वरूपांत अडकला असेल तर तो वजा करूनहि बँकेचें भांडवल व रिझर्व्ह हीं सुटीं राहिलीं पाहिजेत. उदाहरणार्थ, एकाद्या बँकेच्या मालमत्तेंत गुडविल खातीं कांहीं रकम दाखविली असेल, तर ती हिशेबांत धरली जाणार नाहीं. बँकेच्या येण्यादेण्याची रिझर्व्ह बँकेनें छाननी केल्यानंतर तिला, बाकीचीं देणीं भागविल्यानंतर बँकेजवळ पांच लक्ष रुपयांइतकी तरी जिंदगी भांडवल व रिझर्व्ह ह्यांचे पोटीं आहे असें आढळलें पाहिजे, असा भांडवल व रिझर्व्ह ह्यांची खरी किंमत पांच लक्ष रुपये तरी असली पाहिजे, ह्या म्हणण्याचा अर्थ आहे. ती रकम पांच लाखांहून खाली जाऊं लागल्यास त्या मानानें भाग भांडवल वाढविणें हा तावडतोबीचा उपाय आहे. ४६ व्या कलमाचा असा कडक अर्थ केल्या कारणानें शेड्यूल्ड बँकांच्या यादींत रहाणें कांहीं बँकांना कठीण जाईल, परंतु त्यास उपाय आहे तो त्यांनीं सत्वर अवलंबिल्यास त्यांस आपलें नांव यादींत राखण्यास अडचण येणार नाहीं.

---

### हिंदी पोस्ट व तार खातें

हिंदी पोस्ट व तार खात्याचे १९४०-४१ चे पक्के हिशेब प्रसिद्ध झाले आहेत, त्यावरून ह्या खात्यास हिशेबाचे वर्षी १½ कोटि रुपये नफा झाल्याचें दिसून येतें. एकूण उत्पन्न १३ कोटि, २८ लक्ष रुपये होऊन खर्च १२ कोटि, ३ लक्ष रुपये झाला व १½ कोटींचा वाढावा उरला. इतके दिवस तार व रेडिओ ह्या दोन बाबींत नुकसानी येई ती पोस्टास भरून काढावी लागे; परंतु १९४०-४१ मध्यें पोस्ट, तार, टेलिफोन व रेडिओ ह्या सर्व बाबींनीं नफा दाखविला आहे. कलकत्ता, मद्रास व मुंबई येथील टेलिफोन कंपन्यांचा कारभार पोस्ट व तार खातें गव्हर्मेंट टेलिफोन्स बोर्डामार्फत आपल्याकडे घेणार आहे. बंगाल टेलिफोन कॉर्पोरेशनचे सर्व भाग टेलिफोन्स बोर्डानें खरीदले आहेत. बॉम्बे टेलिफोन कंपनीचे ९८७ भाग व मद्रास कंपनीचे ७०% भाग त्यास मिळाले आहेत. १९४३ अखेर ह्या कंपन्यांचा कारभार टेलिफोन बोर्डामार्फत चालू होईल अशी अपेक्षा आहे. मुंबईच्या कंपनीच्या कांहीं भागीदारांनीं हायकोर्टांत आपल्या भागास अधिक मोबदला मिळण्याविषयीं अर्ज केला आहे, परंतु कंपनी ताब्यांत घेण्यास आवश्यक तेवढ्या भागीदारांनीं त्यांस देऊं केलेल्या किंमतीस आपले भाग देऊन टाकले आहेत.

---

### बार्शी सें. को. बँक लि.

**( वार्षिक सभा: ६-९-४२ )**

वरील बँकेचे वर्षअखेर ९३९ सभासद आहेत. त्यांपैकीं ५१ सोसायट्या व ८८८ व्यक्तिशः सभासद आहेत. भाग भांडवलाची रकम ७३,८३० रुपये आहे. रिझर्व्ह, बिल्डिंग, बॅड डेट, डिव्हिडंड ईक्वलायझेशन इत्यादि फंडांत मिळून ७०,१८० रुपये आहेत. बँकेकडे ५ लक्ष, ९९ हजारांच्या ठेवी आहेत, म्हणजे अहवालाचे वर्षी ठेवींत ९९ हजारांची वाढ झालेली आहे. बँकेनें २ लक्ष, २८ हजार रुपये रोख व बँकांत ठेवले असून तिच्या इन्व्हेस्टमेंट खातीं १ लक्ष, ४१ हजार रुपये आहेत. ३ लक्ष, ७० हजारांचीं कर्जे दिलेलीं आहेत. सालाचे प्रारंभीं असलेली ७०,९४० रुपयांची थकबाकी कर्जांत १३ हजारांची वाढ होऊनहि ५४,१८६ रुपयांवर आली व सोसायट्यांकडे थकबाकी नाहीं ही गोष्ट निःसंशय अभिनंदनीय आहे. बँकेच्या वैराग शाखेचें काम समाधानकारक चाललें आहे. बँक 'अ' वर्गांत आहे. अहवालाचे वर्षी बँकेस ७,३७८ रुपये निवळ नफा झाला. भागीदारांस ५॥= दरानें डिव्हिडंड मिळेल. बँकेची सुस्थिति व प्रगति ह्यांची उत्कृष्ट कल्पना ताळेबंदावरून येते. श्री. ग. रा. साने वकील हे बँकेचे चेअरमन असून श्री. र. प. पटवर्धन, सी. ए. आय. आय. बी. हे मॅनेजर आहेत.

---

### इंडियन इन्स्टिटयूट ऑफ बँकर्स

वरील संस्थेच्या पटावर ४,३४४ सभासद आहेत. तिच्या 'असोसिएट'च्या परीक्षेस १९४१ सालीं एकूण १७३४ उमेदवार बसले, त्यांची परीक्षा १०५ केंद्रांत घेण्यांत आली. १९२९ सालीं ह्या परीक्षेस प्रारंभ झाला, त्यावेळीं फक्त ८९ उमेदवार व १९ केंद्रें होतीं. इन्स्टिटयूटतर्फे एक त्रैमासिक प्रसिद्ध करण्यांत येतें, त्यांत हिंदी बँकिंगविषयक ताजे आकडे व लेख प्रसिद्ध होतात. कलकत्ता, मद्रास, अहमदाबाद, कराची, लाहोर, पुणें व दिल्ली येथे इन्स्टिटयूटच्या शाखा व उपशाखा आहेत. प्रो. काळे हे पुणें उपशाखेचे अध्यक्ष आहेत. १९४१ सालीं इन्स्टिटयूटचें उत्पन्न ४५ हजार रुपये झालें व त्यापेक्षा खर्च २,८२४ रुपये अधिक झाला.

## गव्हर्मेंट टेलिफोन्स बोर्ड

**कंपनी कायद्याच्या १५३ व्या कलमाची अंमलबजावणी.**

गव्हर्मेंट टेलिफोन्स बोर्ड लि. नें १ मार्च, १९४१ च्या तारखेचें एक सर्क्युलर ता. १६ एप्रिल, १९४१ रोजीं बॉंबे टेलिफोन कं. लि. च्या सर्व भागीदारांस रजिस्टर करून पोस्टानें पाठविलें होतें. त्यांत एकूण भागांच्या किंमतीच्या तीनचतुर्थांशापेक्षा कमी नाहीं, इतक्या रकमेचे भाग धारण करणाऱ्या भागीदारांची संमति मिळाल्यास बॉंबे टेलिफोन कंपनीचें सर्व भाग-भांडवल प्रत्येक भागास ८९ रुपये १५ आणे देऊन विकत घेण्याचा आपला मानस गव्हर्मेंट टेलिफोन्स बोर्डानें कळविला होता. सर्क्युलर पाठविल्यानंतर चार महिन्यांचे आंत म्हणजे ५ ऑगस्ट, १९४१ पूर्वी तीनचतुर्थांश भाग धारण करणारांनीं ह्या योजनेस संमति दर्शविली. जे भागीदार ह्या योजनेस तयार नव्हते, त्यांस वर सांगितलेली चार महिन्यांची मुदत संपल्यानंतर दोन महिन्यांचे आंत नोटीस देऊन कळविण्यांत आलें कीं, त्यांचे भाग सक्तीनें घेण्यांत येतील. नोटिशीनंतर एक महिन्याचे आंत अर्ज करून ह्या भागीदारांनीं कोर्टाकडून सक्तीची वर्गावर्गी थांबविली नाहीं, तर गव्हर्मेंट टेलिफोन बोर्डास त्यांचे भाग जाहीर केलेल्या अटींवर म्हणजे प्रत्येक भागास ८९ रुपये १५ आणे देऊन, सक्तीनें वर्ग करून मिळवितां येतात असा कायदा आहे. एकाद्या भागीदारानें कोर्टाकडे आपला भाग वर्ग होऊं नये असा अर्ज केला व तो कोर्टानें फेटाळला, तर नोटिशीच्या तारखेपासून एक महिन्यानंतर व अर्जाचें काम संपलें नसेल तर तें संपल्यावर, बॉंबे टेलिफोन कंपनीकडे गव्हर्मेंट टेलिफोन बोर्ड नोटिशीची एक प्रत पाठवून भागांची ठरलेली किंमत भरील व त्या कंपनीला गव्हर्मेंट टेलिफोन्स बोर्डाचे नांवानें भाग नोंदावे लागतील. अशा रीतीनें बॉंबे टेलिफोन कंपनीकडे जे पैसे जमा होतील, ते ती एका स्वतंत्र बँक खात्यांत टाकील व ज्यांचे भागांसाठी त्या रकमा जमा आहेत त्यांचेसाठी त्या रकमा राखून ठेवील. बॉंबे टेलिफोन कंपनीच्या तीन चतुर्थांशापेक्षा अधिक भाग धारण करणारांनीं आपले भाग गव्हर्मेंट टेलिफोन्स बोर्डास वर्ग करण्यास संमति दिली आहे, परंतु १२७ भागीदारांस ती योजना पसंत नाहीं. त्यांचे भागांची सक्तीनें वर्गावर्गी न होण्यासाठी त्यांनीं कोर्टाकडे अर्ज केला.

**भागांची ठरलेली किंमत अयोग्य आहे**

प्रत्येक भागास ८९ रु. १५ आ. ही किंमत फार कमी आहे; ती १३४ रु. असली पाहिजे असें अर्जदारांचें म्हणणें होतें. मुंबई हायकोर्टानें ह्या संबंधांत खालीलप्रमाणें निवाडा केला आहेः-

"ज्या वेळीं कंपनीच्या भागीदारांना शेअरची किंमत कळविण्यांत आली, त्यावेळीं भागीदारांकडे कंपनीच्या डायरेक्टरांचें एक पत्रक व मॅनेजिंग डायरेक्टर मि. पारकर ह्यांचें एक पत्र हीं पाठविण्यांत आलीं. ह्या कागदपत्रांवरून भागीदारांनीं त्यांस देऊं केलेली ८९ रु. १५ आ. ही किंमत योग्य होती किंवा नाहीं हें ठरवावयाचें होतें. खरेदीची किंमत त्या वेळच्या दरानें केली पाहिजे म्हणजे मार्च, १९४१ मधील किंमत हिशेबांत घेतली पाहिजे. सरकारनें कंपनीच्या मालमत्तेची केलेली किंमत गृहीत धरून बोर्डानें भागांची किंमत निश्चित केली, परंतु ज्यांचे आधारावर मालमत्तेची किंमत ठरविण्यांत आली, त्या गोष्टी आक्षेपार्ह नाहींत ना? अर्जदारांनीं अनेक मुद्यांवर तक्रारी मांडल्या आहेत, परंतु त्यांतील सर्वांत महत्त्वाची तक्रार म्हणजे मालमत्तेची किंमत मार्च, १९४० ची धरण्यांत आली आहे ती मार्च, १९४१ ची असावयास हवी होती, ही होय. बोर्डानें किंमत ठरवितांना योग्य गोष्टी लक्षांत घेतल्या नाहींत हें अर्जदारांनीं कोर्टास पटवून दिलें आहे. तथापि त्यामुळें भागीदारांचें नुकसान झालें नाहीं हें बोर्डानें दाखवून देणें त्यांचें कर्तव्य आहे. मार्च १९४० मधील किंमतीनें मार्च, १९४१ मध्यें पूर्वीइतकीच मालमत्ता घेतां येईल असें मानण्यास मुळींच जागा नाहीं. मार्च १९४० मध्यें मालमत्तेची किंमत ठरवितांना कंपनीच्या जमिनी, इमारती, जमिनीखालून नेलेल्या तारा इत्यादींची योग्य ती किंमत धरलेली नाहीं व कांहीं जुन्या जिनसांची किंमत तर अजिबात हिशेबांत घेतलेली नाहीं. गव्हर्मेंट बोर्डानें ह्यासंबंधांत कांहीं प्रकाश पडेल अशी माहिती कोर्टास दिलेली नाहीं. ठरविलेली किंमत अयोग्य असल्याची व त्याकरितां लागणाऱ्या गोष्टी सिद्ध करण्याची जबाबदारी अर्जदारावर आहे असें म्हणून तें स्वस्थ बसलें आहे. केवळ कायद्याचे दृष्टीनें पाहतां ही भूमिका इष्ट नाहीं व कोर्टाचे कामाचे दृष्टीनेंहि ती सहायकारक नाहीं. अर्जदारांचे भाग प्रत्येकीं ८९ रु. १५ आ. देऊन सक्तीनें वर्ग करून घेण्याचा गव्हर्मेंट टेलिफोन्स बोर्डास अधिकार नाहीं."

---

## बेळगांव बँक लिमिटेड

**( वार्षिक सभा ३०–८–४२ )**

अहवालाचे वर्षी म्हणजे ३०-६-४२ अखेर वरील बँकेचें भाग भांडवल १२½ हजार रुपयांनीं वाढून तें ८६,५३० रुपये झालें आहे. रिझर्व्ह, बॅड डेट, डिव्हिडंड ई. फंड इत्यादींत मिळून १६½ हजार रुपये आहेत. बँकेकडील ठेवींचा आकडा ७½ लक्ष रुपये आहे, म्हणजे गेल्या वर्षी ठेवींत १ लक्ष, ५४ हजारांची भर पडली आहे. बँकेनें २ लक्ष, ५ हजार रुपये रोख व इतर बँकांत ठेवले असून तिनें १ लक्ष, १५ हजार रुपये सरकारी व तत्सम रोखे ह्यांत गुंतविले आहेत व ५ लक्ष, ४ हजार रुपयांचीं कर्जें दिलेलीं आहेत. ह्या कर्जांपैकीं ९६ हजारांचीं कॅश क्रेडिट्स आहेत. बँकेच्या संकेश्वर, होसूर व गोकाक ह्या तिन्ही शाखा फायद्यांत चालल्या आहेत. अहवालाचे सालीं बँकेनें ५,८८४ रुपयांचीं बुडीत कर्जें खर्चीत टाकूनहि तिला ४,१४२ रुपये नफा झाला त्यांत डिव्हिडंड ई. फंडांतील १,८७७ रुपये घालून त्यांतून करमाफ ६¼% दरानें डिव्हिडंड देण्यासाठीं ४,९१८ रुपयांची तरतूद करावी, अशी डायरेक्टर बोर्डाची शिफारस आहे. रिझर्व्ह फंडांत ८५० रुपये व इनव्हेस्टमेंट फंडांत २५० रुपये पडतील. बँकेची सर्वांगीण प्रगति होत आहे, असें अहवालावरून दिसून येतें. तिचें खेळतें भांडवल आतां सुमारें ८½ लक्ष रुपये झालें आहे. ३० जून अखेरचा ताळेबंद १५ महिन्यांचा आहे.

---

## प्रोड्यूसर गॅसवर चालणारीं वाहनें

ग्रेट ब्रिटनमधील १,५०० वहानें आज प्रोड्यूसर गॅस प्लँटवर चालू आहेत. त्यांची संख्या लवकरच १० हजार होईल. गॅसवर चालविण्याच्या ५० हजार मोटारींबाबत योजना नुकतीच लॉर्डांचे सभेत मांडण्यांत आली. जर्मनीमध्यें प्रोड्यूसर गॅसवर चालणाऱ्या वाहनांची संख्या सुमारें २ लक्ष आहे. स्वीडनमध्यें गेल्या वर्षी ती ६० हजार होती.

## सह्याद्रि विमा कं. लि., नाशिक

वरील कंपनीचें १९४१ अखेरचें मूल्यमापन कंपनीचे व्हॅल्यु-एशन करणारे ॲक्चुअरी, श्री. के. बालसुब्रह्मण्यम्, ह्यांनीं केलें आहे. १९४१ सालीं कंपनीनें १० लक्ष, २७ हजार रुपयांचें काम पुरें केलें. १९४० सालांतील कामाचा आकडा ६ लक्ष, २६ हजार रुपये होता. ॲक्चुअरीनें मूल्यमापन करतांना १९ लक्ष, १ हजार रुपयांच्या पॉलिसी लक्षांत घेतल्या, म्हणजे चालू कामाचा आकडा तेवढा होता. मूल्यमापनाचे मुदतींत (१४ मे, १९३६ ते ३१ डिसेंबर, १९४१) कंपनीला पहिल्या वर्षाच्या हप्त्यांचे १ लक्ष, ४½ हजार रुपये व रिन्युअल हप्त्यांचे ९८½ हजार रुपये मिळाले. मूल्यमापनाचे तारखेस कंपनीचा निवळ लाइफ फंड ७५,६४५ रुपये होता व तिचें विमा-पत्रकांचें देणें ७५,१२२ रुपये भरलें. म्हणजे ५२३ रुपयांचा वाढावा राहिला. मूल्यमापन करतांना ४% व्याजाचा दर गृहीत धरण्यांत आला, परंतु पडलेला दर ४·८१% आहे. गृहीत दरापेक्षां आधिक दरानें व्याज पडल्यास कंपनीची स्थिति ज्यास्त सुधारून पुढील मूल्यमापनास त्याचा फायदा मिळेल. १९४१ सालीं कंपनीनें कमिशन न देतां बरेच काम मिळविलें व खर्चांतहि पुष्कळ काटकसर केली, त्यामुळें खर्चाचें प्रमाण अल्प पडलें आहे. त्यापूर्वीच्या वर्षीचें खर्चाचें जरा भारी प्रमाण व १९४१ मधील अल्पप्रमाण ह्या दोहोंसहि विशेष महत्त्व न देतां, ॲक्चुअरीनें रिन्युअल प्रीमिअमच्या १८% इतकें खर्चाचें प्रमाण गृहीत धरलें आहे व त्यापेक्षाहि खर्च कमी येऊन पुढें आणखी वाढावा उरण्यास त्याचा फायदा मिळेल, अशी त्यांनीं आशा व्यक्त केली आहे. "सध्याची आर्थिक परिस्थिति, विमा कंपन्यांमधील घातुक व खर्च वाढवणारी स्पर्धा, सरकारी रोख्यांत पैसे गुंतविण्यासंबंधीं व रिझर्व्ह बँकेकडे डिपॉझिट ठेवण्यासंबंधीं कायद्याचे निर्बंध, इत्यादि लक्षांत घेतां चांगल्या चाललेल्या नव्या कंपनीसहि कठीण चाचणीच्या मूल्यमापनांत वाढवा दाखविणें अशक्यप्राय आहे." ह्या दृष्टीनें पहातां, सह्याद्रि विमा कंपनीच्या मूल्यमापनांतील दिसून येणारा वाढावा अभिनंदनीय समजला पाहिजे. कंपनीच्या येत्या मूल्यमापनांत पुष्कळ आधिक वाढावा उरेल. ह्या अपेक्षेनें दरहजारी दरसाल ७ रु. ८ आ. ह्या दरानें इंटेरिम बोनस देण्यांत यावें, असें ॲक्चुअरीनें सुचविलें आहे, व ही सूचना कंपनीनें मान्य केली आहे. इंटेरिम बोनसचा खुलासा आमचे मागील अंकांत स्पष्ट करून सांगितलेलाच आहे. कंपनीनें पहिल्याच मूल्यमापनांत मिळविलेल्या यशाबद्दल ती अभिनंदनास पात्र आहे.

## साखर असून ती विकली नाहीं

महादेव महादू नांवाच्या किरकोळीनें विक्री करणाऱ्या मुंबईतील एका व्यापाऱ्यावर त्याचे जवळ साखर शिल्लक असूनहि त्यानें ती विकली नाहीं, ह्या मुद्यावर भारत संरक्षण कायद्याखालील नियमानुसार खटला भरण्यांत आला. तेव्हां त्यास प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेटनें एक महिना सक्तमजुरीची शिक्षा दिली. त्यानें हायकोर्टाकडे अपील केलें. आपल्या नेहमीच्या गिऱ्हाइकास साखर देतां यावी, ह्यासाठीं एकाद्या गिऱ्हाइकास एक आण्याचे वर साखर दिली नाहीं, एवढ्यानें व्यापाऱ्यावर गुन्हा शाबीत होत नाहीं, असें हायकोर्टाचें मत पडलें व व्यापाऱ्यास झालेली शिक्षा रद्द करण्यांत आली.


अर्थशास्त्र

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे

पृष्ठसंख्या सुमारें ३००, किंमत ३ रुपये

या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

श्रीराम सिल्क मिल्स लि., बंगलोर

[कंपनीनें १९४१ अखेर ६ टक्के डिव्हिडंड वांटला आहे.]

युद्धसाहित्यपुरवठा-खात्याची पॅरेशूटकरितां लागणाऱ्या रेशमी कापडाची ऑर्डर पुरी करण्यासाठी लागणाऱ्या भांडवलाकरितां तूर्त एकूण रु. १ लक्षाच्या रकमेपर्यंत

ठेवी घेणें आहेत

व्याजाचा दर ४॥ ते ६ टक्के. ठेव किमान रु. ५०० ची असावी. ठेवीवरील व्याज दर सहा महिन्यांनीं दिलें जातें.

श्रीराम सिल्क मिल्स लि., श्रीरामबाग, बसवनगुडी, बंगलोर.

नारायण गोविंद नाईक, (माजी अध्यक्ष, म्हैसूर चेंबर ऑफ कॉमर्स) मॅनेजिंग डायरेक्टर

आमच्या कारखान्यांतील माल मुंबईस बॉम्बे स्वदेशी को-ऑपरेटिव्ह स्टोअर्समध्यें व पुण्यास लक्ष्मी रोडवरील रे म्यूझिअमच्या व्यापार-संवर्धन-गृहांत पहा.

महायुद्ध दाराशीं आलें

परदेशी औषधें

दुर्मिळ व महाग झालीं

पण

भिण्याचें कारण नाहीं!!!

— कारण —

आयुर्वेद रसशाळा पुणें लि०

या देशी औषधाच्या प्रसिद्ध कारखान्यानें तयार केलेलीं

● रक्तवर्धक, ● उपनाह,

● बालजीवन, ● कॅल्सीप्राल

इत्यादि पेटंट, स्टँडर्ड व लोकप्रिय औषधें खात्री पटल्यामुळें

★ डॉक्टरसहि वापरूं लागले आहेत. ★

दरसाल बिनचूक नफा वाटणाऱ्या ह्या कंपनीचे शेअर्स व औषधें मागवा.

आयुर्वेद रसशाळा पुणें लि०

मुख्य दुकान गणपति चौक, लक्ष्मीरोड, पुणें २.

मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् को-ऑपरेटिव् बँक, लिमिटेड.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी-सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंग
९, बेक हाउस लेन, कोट मुंबई.

**शाखा**

| | |
|---|---|
| १ बारामती ( जि. पुणें ) | १८ अकलूज ( जि. सोलापूर ) |
| २ सातारा ( „ सातारा ) | १९ विरमगांव ( „ अहमदाबाद ) |
| ३ इस्लामपूर ( „ „ ) | २० धुळें ( „ प. खानदेश ) |
| ४ कऱ्हाड ( „ „ ) | २१ दोंडाईचें ( „ „ ) |
| ५ तासगांव ( „ „ ) | २२ शिरपूर ( „ „ ) |
| ६ किर्लोस्करवाडी ( „ „ ) | २३ शहादें ( „ „ ) |
| ७ शिराळें ( „ „ ) | २४ नंदुरबार ( „ „ ) |
| ८ कोरेगांव ( „ „ ) | २५ साक्री ( „ „ ) |
| ९ वाई ( „ „ ) | २६ शिंदखेडें ( „ „ ) |
| १० अहमदनगर ( „ अहमदनगर ) | २७ तळोदें ( „ „ ) |
| ११ शेवगांव ( „ „ ) | २८ मालेगांव ( „ नाशिक ) |
| १२ कोपरगांव ( „ „ ) | २९ सटाणा ( „ „ ) |
| १३ बेलापूर ( „ „ ) | ३० कळवण ( „ „ ) |
| १४ राहुरी ( „ „ ) | ३१ लासलगांव ( „ „ ) |
| १५ भिवंडी ( „ ठाणें ) | ३२ नांदगांव ( „ „ ) |
| १६ पालघर ( „ „ ) | ३३ दोहद ( „ पंचमहाल ) |
| १७ कल्याण ( „ „ ) | ३४ कालोल ( „ „ ) |

**या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात**

आणि

**इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.**

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.



## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार



राहाणेची व भोजनाची उत्तम सोय




फोन नं. ७७९ गणपति चौक, व्यवस्थापक.



## N. V. WADNERKAR

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver,
Electro-plater & Manufacturer of Sporting Trophies, Medals, Cups etc.

- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -
POONA CITY.



## DECCAN BOOK STALL

Booksellers, Publishers & Subscription Agents
Fergusson College Road, Poona No. 4

(1) We stock and supply Educational books, General books & Library books.

(2) We supply Government of Bombay and Government of India publications.

(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.

(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे. बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ, 'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ८ पुणें, बुधवार, तारीख २६ ऑगस्ट १९४२ अंक ३४

## दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल ... ... ... | रु. | २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... ... ... | रु. | १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड ... ... ... | रु. | १,१८,००,००० |

मुख्य कचेरी: ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

मुंबईमधील शाखा : बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

इतर शाखा : अहमदाबाद ( भद्र, मुख्य ऑफिस ), अहमदाबाद ( एलिस ब्रिज शाखा ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अंधेरी ( मुंबई शेजारीं ), बांद्रे ( मुंबई शेजारीं ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस ), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्केअर), जमशेदपूर, कराची, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत.

लंडन एजन्ट्स : वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

डायरेक्टर्स : सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाइट; मि. ए. गेडिस; सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई.; मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण.

**करंट डिपॉझिट अकाउंट्स :**

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षा कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमीचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

एजंट—टी. आर. लालवाणी.

## दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

हेड ऑफिस : पुणें श...

स्थानिक शाखा : [illegible] मखाना, पुणें ४.

मुंबअी शाखा : दल[illegible], फोर्ट, मुंबअी.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | १०,००,००० |
| विक्रीस काढलेलें भां[illegible] | ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | ४,४५,९५० |
| वसूल झालेलें भांड[illegible] | २,२२,७९५ |
| एकूण खेळतें भांडवल | [illegible] २७,००,००० |

**डायरेक्टर्स**

प्रो. वा. गो. काळे, अध्यक्ष

| | |
|---|---|
| श्री. धों. कृ. साठे | श्री. मा. रा. जोशी |
| श्री. न. ग. पवार | श्री. श्री. गो. मराठे |
| श्री. त्र्यं. वि. रामदे | श्री. र. चिं. सोहोनी |
| श्री. वा. पुं. वर्दे | मि. फ. दो. पदमजी |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदीविक्री कसोशीनें करून दिली जाते.

बँकेच्या शेअरवर १९४१ अखेर पुऱ्या होणाऱ्या वर्षी द. सा. द. शेंकडा ४ टक्के करमाफ डिव्हिडंड दिलें गेलें. बँकेची शेअरविक्री चालू आहे.

म. वि. गोखले
मॅनेजर.

**महायुद्धाची जाणीव! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.**

बंबाचे माडीवर

# महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

## विविध माहिती

**प्रार्थना–दिन**

रविवार ता. ६ सप्टेंबर हा दिवस युद्धास प्रारंभ होऊन तीन वर्षे झाल्यानंतरचा पहिला रविवार, ह्या दृष्टीनें प्रार्थना–दिन म्हणून पाळण्यांत यावा, अशी व्हाइसरॉयांनीं विनंति केली आहे.

**टाटा ऑइल मिल्स कं. लि.**

वरील कंपनीस ३१ मार्च, १९४२ अखेर संपलेल्या वर्षी ८½ लक्ष रुपये नफा झाला. कंपनीनें ह्या वर्षी १ कोटि, ३ लक्ष रुपयांचा माल विकला.

**पॅरेमाऊंट इन्व्हेस्टमेंट कं. लि.**

स्टॉक्स व शेअर्सचा धंदा करण्यासाठी वरील नांवाची एक खासगी लिमिटेड कंपनी मुंबई येथें स्थापन झाली आहे. तिचे गव्हर्निंग डायरेक्टर श्री. आर. जे. सावंत हे आहेत.

**भारत इं. कं. लि.**

वरील विमा कंपनीनें १९४१ सालीं १ कोटि, ४१ लक्ष रुपयांचें काम मिळविलें. तिच्या पॉलिसीच्या रकमेची सरासरी २,१९१ रुपये पडली.

**इंडियन स्कूल ऑफ माइन्स, धनबाद**

धनबाद येथील खाणींच्या कामाचें शिक्षण देणारी वरील संस्था तूर्त बंद ठेवण्यांत आली आहे. त्याचें कारण प्रसिद्ध झालेलें नाहीं.

**रशियन युद्धकैदी**

रशियन युद्धकैद्यांना जर्मनी शेतकाम करावयास लावीत आहे, असें समजतें.

**शत्रूचें नुकसान**

नॉर्थ समुद्र व इंग्लिश खाडी ह्यांचेमध्यें १५ जुलै अखेरच्या मुदतींत ब्रिटिशांनीं १० लक्ष टनांच्या शत्रूच्या आगबोटी बुडविल्या आहेत.

**मुंबई प्रांतांतील सिव्हिक गार्ड**

मुंबई प्रांतांतील सिव्हिक गार्डांची संख्या ५,३२० झाली आहे.

**हिंदुस्थान सरकारचें कस्टम्सचें उत्पन्न**

| | |
|---|---|
| जुलै, १९४२ | २९८ लक्ष |
| जून, १९४२ | २५३ लक्ष |
| जुलै, १९४१ | ४१४ लक्ष |

**आखूड धाग्याच्या कपाशीचे पेरणीस बंदी**

पांच अष्टमांश इंचापेक्षां कमी धाग्याची कपास पेरण्यास म्हैसूर संस्थानांतील कांहीं जिल्ह्यांत बंदी करण्यांत आली आहे.

**हिंदुस्थान–सिलोन सलोखा**

सिलोनकडे हिंदुस्थानांतील मजूर जाण्यास प्रतिबंध होता. तो नाहींसा करण्याचें हिंदुस्थान सरकारनें ठरविलें आहे. सिलोन सरकार हिंदी लोकांविरुद्ध असलेले आपले कायदे रद्द करणार आहे. नव्या सलोख्याचे धोरणानें दोन्ही देश युद्धसमाप्तीनंतर नवीन करार करतील.

**मध्यवर्ती सरकारचा उत्पन्न–खर्च**

एप्रिल ते जून, १९४२ ह्या तिमाहींत हिंदुस्थान सरकारचा खर्च त्याच्या उत्पन्नापेक्षां २९½ कोटि रुपये अधिक झाला. ह्या मुदतींत उत्पन्नांत ३½ कोटींची भर पडली; परंतु लष्करी खर्चांत १४ कोटींनीं वाढ झाली.

**रेल्वे कामगार व ज्यादा काम**

रेल्वे कामगारांच्या कामाचे कमाल तासांवरील नियंत्रण दूर करणारा एक ऑर्डिनन्स हिंदुस्थान सरकारनें काढला आहे. ज्यादा कामास मामुली दराच्या दीडपट दरानें वेतन मिळेल.

**पारशी विवाह**

१९४१ सालीं एकूण ५९३ पारशी विवाह मुंबई प्रांतांत नोंदण्यांत आले, त्यांपैकीं ४६३ विवाहांची नोंद मुंबई येथें झाली.

**स्पेशल मॅरेज ॲक्ट**

मुंबई प्रांतांत नोंदणी पद्धतीनें (स्पेशल मॅरेज ॲक्ट) गेल्या वर्षी ३१९ विवाह झाले, त्यांपैकीं मुंबईच्या सब रजिस्ट्रारनें १९३ विवाह नोंदले. रजिस्टर पद्धतीनें होणाऱ्या विवाहांची संख्या एका वर्षांत ४९ नें वाढली.

**स्टँप व्हेन्डॉर**

मुंबई सरकारचे स्टँप्स विकणारे मुंबई प्रांतांत एकूण ६२३ लायसनदार आहेत. त्यांना त्यांच्या विक्रीवर १९४१ सालीं एकूण ८७,४२९ रुपये कमिशन मिळालें.

**राष्ट्रसंघाची वर्गणी**

हिंदुस्थानानें १९४०–४१ मध्यें राष्ट्रसंघास वर्गणीदाखल ९ लक्ष, ४१ हजार रुपये दिले. १९३९–४० मध्यें त्यानें ७ लक्ष, ५० हजार रुपये वर्गणी दिली होती. राष्ट्रसंघाच्या एकूण खर्चाचा एकदशांश हिस्सा हिंदुस्थान सोसतो. वर्गणी वाढण्याचें कारण असें कीं, जरी राष्ट्रसंघाचा खर्च कमी झाला असला तरी त्यापेक्षा अधिक प्रमाणांत त्याचे सभासद कमी झाले आहेत.

**वॉर रिस्क इन्शुअरन्स**

कारखान्याच्या हद्दीचे बाहेरील परंतु कारखान्याच्या मालकीची व त्याच्या कामास उपयोगी पडणारी यंत्रसामुग्री हिचाहि ह्यापुढें युद्धविषयक विमा उतरला पाहिजे, अशी नियमांत दुरुस्ती करण्यांत आली आहे.

**पेन्शनांत वाढ**

ब्रिटिश सरकारनें आपल्या पेन्शनरांच्या पेन्शनमध्यें बरीच वाढ केली आहे.

**रेल्वेजच्या हिशेबांत वाढावा**

ओळीनें अकरा वर्षे हिंदी रेल्वेजच्या हिशेबांत, सर्व व्याज भागवून व मध्यवर्ती सरकारचें देणें देऊन वाढावा उरला नाहीं, तो १९४०-४१ चे हिशेबांत दिसून आला आहे.

**ट्रेझरी बिलांवर ७ आणे व्याजाचा दर**

गेल्या आठवड्यांत रिझर्व्ह बँकेनें हिंदुस्थान सरकारचीं ६ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा दर द. सा. द. शे. ७ आणे इतका पडला.

**वृत्तपत्रांना सरकारी रिपोर्टांच्या प्रती**

ज्या वृत्तपत्रांचा खप निदान ५ हजार प्रतींइतका तरी आहे, अशांना सरकारी खात्यांचे रिपोर्ट मोफत मिळतील व बाकीच्या वृत्तपत्रांना त्यांच्या योग्यतेप्रमाणें ते पुरवले जातील, असें मुंबई सरकारनें जाहीर केलें आहे.

**चीनमध्यें तांदुळाचें पीक**

चीनमध्यें चालू मोसमांत तांदुळाचें मोठें पीक येईल, अशी बातमी आहे.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | २६८ |
| २ ग्रामसुधारणा खात्याचें कार्य ... | २६९ |
| ३ एक्सचेंज बँकांचा कारभार ... | २७० |
| ४ पान्याचा पुरवठा ... | २७० |
| ५ स्फुट विचार ... | २७१ |
| अंतर्गत शांतता आणि जूट ह्यांची आवश्यकता—इंग्लंड-मध्यें ग्रामसुधारणा—मामलेगिरीपासून सावध रहा—रशियांतील रणांगण | |
| ६ स्टँप खात्याचा अहवाल | २७२ |
| ७ पेट्रोलऐवजी प्रोड्यूसर गॅस ... | २७३ |
| ८ विमा कंपन्यांची असोसिएशन | २७३ |


# अर्थ

बुधवार, ता. २६ ऑगस्ट, १९४२

## ग्रामसुधारणा खात्याचें कार्य

मुंबई प्रांतांतील सरकारी ग्रामसुधारणा खात्याच्या १९४१ सालाच्या मार्च अखेर झालेल्या कार्याचा वृत्तांत प्रसिद्ध झाला असून त्याचा गोषवाराहि सरकाराकडून पुरवण्यांत आला आहे. खेडेगांवाच्या आर्थिक सुधारणेचें महत्व ओळखून मुंबई सरकारानें ती घडवून आणण्याच्या हेतूनें आवश्यक असलेली कार्यकारी घटना तयार केली व तत्वरतेनें अंमलांतहि आणली. शेतीचें खातें व सहकारी खातें ह्यांचा रेव्हेन्यू खात्याप्रमाणेंच खेडेगांवांतील लोकांशीं निकट संबंध येत असल्यामुळें त्यांच्या स्वतंत्र प्रयत्नांचा मेळ घालणें अगत्याचें आहे असें वाटल्यावरून सरकारानें आपल्या योजनेंत सहकारी खात्यास प्राधान्य दिलें आणि त्या खात्यास "को-ऑपरेटिव्ह अँड रूरल डेव्हलपमेंट डिपार्टमेंट" असें नांव देऊन त्याचें कार्यक्षेत्र विस्तृत केलें आणि त्याच्यामार्फत ग्रामसुधारणेच्या कारभारास प्रारंभ केला. सहकारी खात्याच्या नेतृत्वाखाली त्याप्रमाणें चालावयाची व्यवस्था समाधानकारक नसल्याचें आढळल्यावरून सरकारनें त्यामध्यें महत्वाचे फेरफार करून मूळच्या योजनेची पुनर्रचना केली आहे. "सहकार आणि ग्रामसुधारणा" ह्या संयुक्त खात्याची नोव्हेंबर १९४० मध्यें फाळणी करण्यांत आली. ह्या विभक्तीकरणाचा असा परिणाम झाला कीं "ॲग्रिकल्चरल डिपार्टमेंटचे तज्ञ अधिकारी आपल्या मूळच्या खात्यांत परत आले. डायरेक्टर ऑफ ॲग्रिकल्चर ह्यांनीं कॉटन सीड डिस्ट्रिब्यूशन स्कीम्स (कपाशीचें बियाणें वांटण्यासंबंधींच्या योजना) वर नियंत्रण ठेवण्याचें काम व तसेंच तालुका डेमॉन्स्ट्रेशन सेंटर्स (तालुक्यांतील प्रात्यक्षिकें करून दाखवण्याच्या कामांचीं केंद्रें) वर नियंत्रण ठेवण्याचें काम पुन्हां हातीं घेतलें. तथापि मार्केटिंग खात्याचा नोकरवर्ग पूर्वीप्रमाणें को-ऑपरेटिव्ह सोसायट्यांचे रजिस्ट्रार व रूरल डेव्हलपमेंटचे रजिस्ट्रार यांच्या नियंत्रणाखाली असण्याचें चालू राहिलें. रूरल डेव्हलपमेंट इन्स्पेक्टर्स व असिस्टंट रूरल डेव्हलपमेंट इन्स्पेक्टर्स मिळून बनलेल्या जिल्ह्यांतील नोकरवर्गाची पुनर्रचना करण्यांत येऊन तो रेव्हेन्यू, ॲग्रिकल्चरल व को-ऑपरेटिव्ह डिपार्टमेंटांत विभागण्यांत आला."

निरनिराळ्या खात्यांतील कामाचा संबंध जेथें जेथें ग्रामसुधारणेच्या कार्यक्रमाशीं येईल तेथें तेथें दोहोंचा मेळ घालण्याची जबाबदारी प्रत्येक जिल्ह्याच्या कलेक्टरवर टाकण्यांत आली आहे. "रूरल डेव्हलपमेंटचें काम सरकारनें स्वतः केलेल्या डिस्ट्रिक्ट रूरल डेव्हलपमेंट बोर्डामार्फत चालवण्यांत येत आहे. या बोर्डाच्या सुधारलेल्या घटनेअन्वयें कलेक्टर हा या बोर्डाचा चेअरमन असतो व जिल्ह्यांतील निरनिराळ्या खात्यांतील अंमलदार हे हुद्याच्या नात्यानें त्या बोर्डाचे सभासद असतात. तसेंच निरनिराळ्या हितसंबंधाचे प्रतिनिधी असणारे अनेक बिनसरकारी सभासदसुद्धां बोर्डांत असतात." जिल्ह्यांतील ग्रामसुधारणेच्या कार्याविषयींची जबाबदारी मुलकी अंमलदारांवर टाकली असल्याकारणानें निरनिराळ्या खात्यांच्या कामांत एकसूत्रीपणा आणण्याचें कामहि त्यांचेवरच सोपविण्यांत आलें आहे."हा एकसूत्रीपणा परिणामकारक होण्यासाठी सरकारनें निरनिराळ्या खात्यांच्या मुख्य अधिकाऱ्यांना आपल्या हाताखालच्या नोकरवर्गास संपूर्ण व मनापासून सहकार्य करण्याबाबत फर्मावण्याबद्दलचे हुकूम काढले आहेत. त्याचप्रमाणें संबंध असलेल्या खात्यांमध्यें अधिक सहकार्य व्हावें ह्या हेतूनें सभा भरवण्याविषयीं कलेक्टरांस सूचनाहि करण्यांत आल्या आहेत." प्रत्येक सरकारी खात्यानें स्वतःच्या कक्षेंतील कारभाराकडे मुख्यतः लक्ष पुरवावें आणि त्याच्या मर्यादेबाहेर नजर टाकूं नये हें स्वाभाविक आहे. परंतु जनतेचा संबंध ह्या अनेक खात्यांशीं येतो आणि त्यांच्या हिताविषयींच्या गोष्टींचा त्वरित निकाल होण्यास त्यांत एकसूत्रीपणा असणें आवश्यक आहे ह्याचा अनुभव आला आहे. खेडेगांवीं जीवनाच्या सुधारणेंत तर निरनिराळ्या सरकारी खात्यांनीं आपापल्यापुरतें पाहून मुळींच चालावयाचें नाहीं. ह्या दृष्टीनें ग्रामसुधारणेच्या कार्यक्रमांत सर्व संबंधी खात्यांचें सहकार्य होण्याची व्यवस्था झाली आहे हें योग्य आहे. ही तजवीज यशस्वी रीतीनें अंमलांत येत आहे व ज्यांचा रूरल डेव्हलपमेंट (ग्रामसुधारणेच्या) कार्याशीं अगदीं दूरचा संबंध आहे अशीं खातीं सुद्धां या कार्यांत अधिक लक्ष देत आहेत" असें सरकारी वृत्तांतांत म्हटलें आहे तें समाधानकारक आहे.

ग्रामसुधारणेचा कार्यक्रम १९४०-४१ सालीं कसा अंमलांत आणला गेला त्याची माहिती ह्या वृत्तांतांत दिली आहे. शेतीच्या सुधारणेच्या संबंधांत खालील बाबी हातीं घेण्यांत आल्या:— जमिनीची सुधारणा; लागवड करण्याची सुधारलेली पद्धत, सुधारलेलीं साधनें व खतें; बियाण्यांची पैदास व त्यांची वाटणी; रोगजनक कीड, पिकांचे रोग व जंगली जनावरें ह्यांचेपासून पिकांचें संरक्षण; बागाइत कामाची वाढ; गुराढोरांची पैदास; कुरणें व बैरण ह्यांत सुधारणा. सहकारी संस्थांचें मुख्य कार्य पतपेढ्यांवर केंद्रित झालेलें असलें तरी ग्रामसुधारणेच्या कामांत त्या अप्रत्यक्षपणानें भरीव कामगिरी करीत आहेत. तालुका डेव्हलपमेंट असोसिएशन्स, बेटर फार्मिंग सोसायटीज व मल्टि-पर्पज सोसायट्या ह्यांचें काम प्रत्यक्षपणानें सहकार्य करण्याचें आहे. धान्याचे डेपो चालवणें, खेडेगांवीं उद्योगधंद्यांस सहाय देणें, दळणवळणाचीं साधनें सुधारणें, पाणीपुरवठ्याचा विस्तार करणें, सार्वजनिक आरोग्य व स्वच्छता यांचेकडे लक्ष पुरवणें, निरक्षरतेचा निरास, शाळांच्या इमारती बांधणें, शारीरिक शिक्षणाची तरतूद, खेडेगांवीं पुस्तकालयें चालवणें, प्रदर्शनें, प्रात्यक्षिकें व वर्ग ह्यांच्याद्वारें प्रचारकार्य करणें इत्यादि बाबींचा अंतर्भाव ग्रामसुधारणेच्या कार्यक्रमांत होत आहे. जिल्ह्याजिल्ह्यांतून ह्या

निरनिराळया प्रकरणीं कसे विविध प्रयत्न चालू आहेत ह्याची माहिती प्रस्तुत वृत्तांतांत देण्यांत आली आहे. खेडेगांवांत रहाणाऱ्या जनतेची आर्थिक स्थिति सुधारणें हें विस्तृत व अवघड काम आहे आणि त्यावर कितीतरी पैसा खर्चावा लागेल व त्यासाठी परिश्रम करावे लागतील. ग्रामसुधारणेच्या कामाचें महत्त्व सर्वांस पटलें असून तें पद्धतशीरपणें चालू झालें आहे ही उत्तेजनदायक गोष्ट आहे.

## एक्सचेंज बँकांचा पौर्वात्य देशांतील व्यवहार

ग्रेट ब्रिटनच्या व्यापाराचें जाळें सर्व जगभर पसरलेलें आहे, व त्याच्या व्यवहारांस पैसा पुरविणाऱ्या बँकांचा विस्तारहि त्याच प्रमाणांत झाला आहे. परराष्ट्रीय व्यापारांत निघणाऱ्या हुंड्यांची उलाढाल करणें हा जरी त्यांचा प्रमुख व्यवहार असला, तरी व्यापारी बँकांचीं मामुली कामेंहि त्या करतात. उद्योगधंदे व व्यापार ह्यांचें प्राबल्य असलेल्या पाश्चात्य राष्ट्रांत असल्या बँका निघून त्यांचें प्राबल्य मागसलेल्या राष्ट्रांतून व्हावें, हें क्रमप्राप्तच आहे. हिंदुस्थानाचा परराष्ट्रीय व्यापार मोठ्या प्रमाणांत चालत असूनहि, एकहि हिंदी एक्सचेंज बँक अस्तित्वांत नाहीं, ह्यावरून जुन्या एक्सचेंज बँकांशीं स्पर्धा करून नवी बँक काढणें किती अवघड आहे, ह्याची कल्पना येईल. हिंदुस्थानांत व्यवहार करणाऱ्या एक्सचेंज बँकांची संख्या १७ असून त्यांच्या ९९ कचेऱ्यांचें येथें काम चालू आहे. ह्या शाखांपैकीं पाऊण शाखा मुंबई, कलकत्ता, मद्रास, कराची, दिल्ली, कानपूर, लाहोर व अमृतसर येथें केंद्रीभूत झालेल्या आहेत. हिंदुस्थानाप्रमाणें चीन, हाँगकाँग, मलाया, डच ईस्ट इंडीज, ब्रह्मदेश, इत्यादि पौर्वात्य राष्ट्रांतहि एक्सचेंज बँकांचा अतिशय मोठ्या प्रमाणावर व्यवहार चालतो. ह्या बँकांचा कारभार अत्यंत दक्षतापूर्वक व सावधगिरीनें चालविण्यांत येतो, अशी त्यांची ख्याति आहे. व्यापारी देवघेवी सुलभ करणें, ही त्यांची कामगिरी चटकन लक्षांत येते, परंतु तिचेबरोबरच ह्या बँकांनीं दरसाल कितीतरी रकम डिव्हिडंडच्या रूपानें ग्रेट ब्रिटनकडे नेलेली आहे. आपल्या नफ्याचा बराच मोठा भाग त्यांनीं पौर्वात्य राष्ट्रांतच गुंतविलेला आहे. त्यांच्या डिव्हिडंडचे रूपानें पैशाचा ओघ ग्रेट ब्रिटनकडे चालू रहातोच. ह्या बँकांनीं आपल्या नोकरवर्गास दिलेले भरपूर पगार व पेन्शनें ह्यांच्या रकमेचा मोठा भाग ग्रेट ब्रिटनकडेच रवाना होतो.

जपाननें युद्धांत प्रवेश करून चीनमधील प्रमुख बंदरें, हाँगकाँग, मलाया, डच ईस्ट इंडीज व ब्रह्मदेश हीं काबीज केल्याकारणानें एक्सचेंज बँकांच्या व्यवहारावर बराच परिणाम झाला आहे. त्याची कल्पना खालील तक्त्यांत कांहीं प्रमुख बँकांच्या एकूण कचेऱ्यांची संख्या व ह्यांपैकीं शत्रूचे ताब्यांत गेलेल्या कचेऱ्यांची संख्या ह्यांचे आकडे दिले आहेत, त्यांवरून येईल.

| एक्सचेंज बँक | एकूण कचेऱ्या | शत्रूचे प्रदेशांत | डिव्हिडंड १९४० | डिव्हिडंड १९४१ |
|---|---|---|---|---|
| हाँगकाँग अँड शांघाई | ४२ | ३६ | ५ पौंड | २½ पौंड |
| चार्टर्ड | ४८ | ३७ | १०% | ७½% |
| मर्कन्टाइल | २५ | १२ | १२% | ९% |
| नॅशनल | ३० | २ | १६% | १२% |
| इंपीरिअल | १७९ | ६ | १२%* | १२%* |
| ईस्टर्न | १३ | १ | ६% | ४½% |

* ३० जून अखेरचें वर्ष

एक्सचेंज बँकांचा व्यवहार आजवर अत्यंत सावधगिरीनें व दक्षतापूर्वक चालविण्यांत आलेला असल्यानें, त्यांच्या कित्येक शाखा शत्रूचे ताब्यांतील देशांत गेल्या तरी त्यांचेवर आपत्ति कोसळलेली नाहीं, हें लक्षांत ठेवण्याजोगें आहे. १९४१ च्या नफ्यांतून त्यापूर्वीइतकेंच डिव्हिडंड देऊं शकल्या असत्या, इतका नफा त्या वर्षी त्यांनीं वास्तविक मिळविलेला आहे. ब्रिटिश बँकांस पूर्वस्थिति प्राप्त करून देण्याचें मुख्य साधन आर्थिक स्वरूपाचें नसून तें लष्करी स्वरूपाचें आहे, असें "एकॉनॉमिस्ट" पत्रानें म्हटलें आहे, तें यथार्थ आहे. शत्रूच्या ताब्यांत गेलेले देश मोकळे झाल्याखेरीज पुढचें पाऊल टाकतां येणार नाहीं; तथापि तेवढ्यानें भागेल, असें नाहीं. जपान बसवूं पहात असलेली घडी व त्यानें घेतलेल्या देशांत चालू केलेली नवी चलनव्यवस्था हीं प्रस्तुत बँकांच्या पुनर्घटनेंत बाबतींत अडथळा उत्पन्न करतील हें उघड आहे. पौर्वात्य राष्ट्रांत राष्ट्रीय भावनेचा विकास होत आहे. स्वयंपूर्णतेचें धोरण तीं अंगीकारीत आहेत व मामुली आंतरराष्ट्रीय व्यापार कमी होत आहे. अशा परिस्थितींत, केवळ परराष्ट्रीय व्यापारास मदत करणाऱ्या एक्सचेंज बँकांनीं आपलें धोरण बदलणें आवश्यक होणार आहे. स्थानिक बँकिंगमध्यें दिवसानुदिवस अधिक भाग घेण्यास त्या प्रारंभ करण्याचा संभव आहे. स्थानिक लोकांची नोकरवर्गांत भरती करून व आपल्या दीर्घ अनुभवाचा व आर्थिक शक्तीचा उपयोग करून त्या मागसलेल्या पौर्वात्य राष्ट्रांत आपलें स्थान सहज पक्कें करूं शकतील. चालू युद्धामुळें होणारें त्यांचें नुकसान भरून काढून नवीन धंदा वाढविण्याइतकें सामर्थ्य त्यांच्या जवळ आहे.

युद्धसमाप्तीनंतर ब्रिटिश पैशाची गुंतवणूक व ग्रेट ब्रिटनचा व्यापार, ह्यांच्या आधारावर एशियांतील अंतर्गत बँकिंगमध्यें एक्सचेंज बँकांचा प्रवेश अधिकाधिक होऊं लागेल, असा रंग दिसतो. ह्या क्षेत्रांत त्यांना पूर्वी इतर मोठा नफा मिळणार नाहीं; तथापि त्यांचें व्यवहारक्षेत्र किनाऱ्याचे पट्टीपुरतेंच न रहातां तें व्यापक होईल, हें उघड आहे.

## पाऱ्याचा पुरवठा

साधारण जनतेस माहीत नसलेल्या अनेक प्रकारच्या युद्धकार्यांस पाऱ्याची आवश्यकता असते. जागतिक पुरवठ्यापैकीं तीन-चतुर्थांश पुरवठा इटली व स्पेन ह्यांचे ताब्यांत असल्याकारणानें त्यांनीं पाऱ्याची किंमत चौपट चढविली. त्याचा परिणाम अमेरिका, मेक्सिको, इत्यादि देशांत पाऱ्याच्या खाणींतून पुनः पारा काढण्यास प्रारंभ करण्याकडे झाला. १९३९ सालीं अमेरिकेंत १८,६३३ फ्लास्क (१ फ्लास्क = ७६ पौंड) पाऱ्याचें उत्पादन झालें होतें; १९४० सालीं त्याचा आकडा ३७,७७७ फ्लास्क झाला. मेक्सिकोंतील उत्पादनाचे तत्सम आकडे अनुक्रमें ७,३७६ फ्लास्क व ११,९५१ फ्लास्क असे आहेत. १९४१ सालीं ह्या दोन्ही देशांतील उत्पादन आणखी वाढलें व कॅनडा आणि बोलिव्हिया ह्यांनीं पाऱ्याचें उत्पादन नव्यानें सुरू केलें. चालू युद्धास प्रारंभ होण्यापूर्वी अमेरिका मोठ्या प्रमाणावर पाऱ्याची आयात करीत असे; आतां तो निर्गत करूं लागला आहे. स्पेनमधून होणारा पुरवठा बंद झाला, तरी दोस्त राष्ट्रांस पाऱ्याचा तुटवडा पडणार नाहीं.

## स्फुट विचार

### अंतर्गत शांतता आणि जूट ह्यांची आवश्यकता

गेल्या पंधरा दिवसांत देशामध्यें कित्येक ठिकाणीं गडबड व दंगेधोपे होऊन सरकारी व बिनसरकारी मालमत्तेचा नाश झाला आहे आणि कांहीं लोक मृत्युमुखी पडले आहेत. असल्या प्रसंगीं शांतता राखण्यासाठी सरकारास कडक उपायांचा अवलंब करणें प्राप्त होतें आणि त्या योगानें सामान्य जनतेची गैरसोय होते व तिला नुकसान सोसावें लागतें. शत्रू दाराशीं येऊन ठेपला असतां देशांत पूर्ण शांतता नांदणें आणि सर्वांचे प्रयत्न रक्षणाच्या उपायांवर एकवटणें अगत्याचें असतें. अत्याचार केव्हांहि गर्ह्य व निषेधार्ह होत आणि ते तातडीनें बंद पाडणें अगत्याचें व उचित आहे. शत्रूचा निश्चयानें प्रतिकार करण्याची आवश्यकता तर वस्तुतः देशांतील सर्व लोकांस पूर्ण पटली असतां विरोध, अत्याचार व अशांतता ह्यांनीं डोकें वर काढावें ही खेदाची गोष्ट आहे. दंग्याधोप्यामुळें युद्धप्रयत्नांत आडकाठी उत्पन्न होऊन जनतेचें जीवित धोक्याचें व कष्टमय झाल्यावांचून रहाणें शक्य नाहीं. ह्यासाठी अत्याचारांवर उपाय योजीत असतां हिंदुस्थान सरकारानें राजकीय मतभेद नाहींसे व्हावे म्हणून तडजोडीची योजना तातडीनें हातीं घ्यावी अशा सूचना व्यापारी मंडळें व कित्येक पुढारी ह्यांनीं सरकारास केल्या आहेत, त्यांचा स्वीकार तात्काळ केला जाणें अगत्याचें आहे. अत्याचारांचा कडक उपायांनींहि बीमोड करणें हें सरकारचें स्पष्ट कर्तव्यच आहे; तसेंच,निरनिराळ्या पक्षांच्या व विचारांच्या पुढाऱ्यांशीं चर्चा करून शांततेचा व विधायक युद्धकार्याचा मार्ग काढण्याचीहि जबाबदारी त्याचेवरच येऊन पडते. सर स्टॅफर्ड क्रिप्स ह्यांनीं राजकीय पुनर्घटनेची पुढें मांडलेली योजना मान्य झाली नाहीं म्हणून ब्रिटिश सरकारनें स्वस्थ बसण्याचें कारण नाहीं. त्या योजनेंत कित्येकांनीं सुचवलेल्या दुरुस्त्यांचा विचार करून बहुसंख्य लोकांस पसंत पडेल अशी एखादी व्यवस्था त्यांस अंमलांत आणतां येईल. हें काम जितक्या तातडीनें होईल तितकें तें इष्ट आहे.

---

### इंग्लंडमध्यें ग्रामसुधारणा

स्वस्त मिळेल तेथून माल घ्यावा आणि महाग असेल तेथें तो विकावा ह्या वैयक्तिक इच्छाप्रेरित आर्थिक स्वातंत्र्याच्या तत्त्वावर इंग्लंडमध्यें व्यवहार चालत असत. त्या देशांत उद्योगधंदे मोठ्या प्रमाणावर चालून ब्रिटिश मालाची बाहेर निर्गत होई आणि त्याच्या मोबदल्यांत कच्चा माल व अन्नसामुग्री ह्यांची आयात केली जात असे. ह्या अनिर्बंध व्यापाराच्या योगानें प्रत्येक देश सर्वांत कमी खर्चांत तयार होऊं शकणारा माल स्वतः बनवून अधिक खर्च लागणारा माल दुसरीकडून आणीत असल्यानें सदरहू व्यवस्था सर्वांच्या हिताची आहे अशा समजुतीनें उद्योगधंदे व व्यापार ह्यांचे बाबतींत सरकारनें हात घालूं नये ह्या तत्त्वाचा पुरस्कार केला जात असे. ह्या कारणानें इंग्लंडमध्यें मोठमोठे कारखाने भरभराटीस आले आणि परराष्ट्रीय व्यापार विस्तृत प्रमाणांत होऊं लागला. त्याचाच परिणाम असा झाला कीं शेतीचा धंदा मागें पडला आणि शहरांची वाढ झपाट्यानें झाली. ज्याप्रमाणें हिंदुस्थानांत उद्योगधंदे मागसलेल्या स्थितींत असल्याकारणानें बहुसंख्य लोकांस शेतीवर अवलंबून रहावें लागलें आणि ह्या देशाची आर्थिक घटना एकांगी व सदोष बनली त्याचप्रमाणें इंग्लंडमध्यें मोठ्या कारखान्यांचें स्तोम माजून शेतीच्या धंद्यांची अनास्था झाली. युद्ध-परिस्थितीच्या अनुभवानें जागे होऊन ब्रिटिश लोकांस ही स्थिति बदलण्याचें महत्त्व पटूं लागलें आहे आणि सरकारच्या विद्यमानें आर्थिक योजनात्मक धोरणाचा अंगीकार करण्याची आवश्यकता इंग्लंडमध्यें भासत आहे. आतां हा केवळ तात्विक चर्चेचा प्रश्न राहिला नसून तो व्यवहाराच्या कक्षेंत आला आहे. ह्याचें उत्कृष्ट गमक खेडेगावीं जमिनीचा चांगला उपयोग कसा करावा ह्यासंबंधानें चौकशी करण्यासाठी नेमलेल्या समितीनें प्रसिद्ध केलेल्या शिफारसींमध्यें सापडण्यासारखें आहे. खेडेगावांची स्थिति असमाधानकारक असल्यानें ती सुधारण्यासाठी पंचवार्षिक योजना ब्रिटिश सरकारानें हातीं घ्यावी असें त्या समितीनें सुचविलें आहे. चांगलीं घरें, रस्ते, विजेचा पुरवठा इत्यादींची तरतूद केली जाऊन खेडेगांवी कामकऱ्यांचें जीवन सुखमय केलें जाण्याचें अगत्य तिनें प्रतिपादलें आहे. हिंदुस्थानांत औद्योगिक प्रगति आणि ग्रामसुधारणा दोन्ही बरोबरीनें योजनात्मक पद्धतीनें व्हावयास पाहिजेत हा येथील आर्थिक घटनेचा विशेष आहे हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

---

### भामटेगिरीपासून सावध रहा

अलीकडे पोस्ट ऑफिसें व बँका ह्यांच्या खिडक्यांजवळ भामट्यांनीं उचलेगिरी केल्याचीं उदाहरणें बरींच घडलीं असल्यानें त्यासंबंधांत जनतेनें विशेष सावधगिरी बाळगणें आवश्यक झालें आहे. मुंबई शहरांत भुरट्या चोरांच्या कारवाया चालतात,त्यांच्या प्रसिद्ध झालेल्या माहितीवरून लोकांनीं योग्य बोध घेतला पाहिजे. लोकांच्या निष्काळजीपणाचा फायदा पुष्कळ वेळां भामट्यांस आयताच मिळतो असें आढळून आलें आहे आणि ह्याकरतां दक्षतेचें अगत्य विशेष आहे. गेल्या महिन्यांत मुंबई शहरांत एक लक्ष तेरा हजार रुपये किंमतीची मालमत्ता चोरांस गेली, तिच्या पैकी चवदा हजारांचा माल त्याच्या मालकांच्या निष्काळजीपणामुळें नाहींसा झाला. ह्या विषयींचीं दोन उदाहरणें देण्यांत आलीं आहेत तीं उद्बोधक आहेत. एका पेट्रोल पंपाच्या मालकाकडे एक गृहस्थ गेला आणि शंभर रुपये किंमतीची नोट मोडून तो मागूं लागला. पंपाच्या मालकानें आपल्या तिजोरीमधून सताराशे रुपये किंमतीच्या नोटा बाहेर काढल्या आणि त्या टेबलावर ठेवून तो ऑफिसच्या मागें कांहीं निकडीच्या कामाकरितां गेला. थोड्या वेळानें परत येऊन पहातो तों टेबलावरच्या सर्व नोटा आणि मोड मागणारा माणूस दोन्हींचा पत्ता नाहीं! दुसऱ्या उदाहरणांतील गृहस्थ एका बिलिअर्ड सलूनमध्यें आपला कोट काढून ठेवून झोंपी गेला. कोटाच्या खिशांत ४२० रुपये होते. स्वारी जागी होऊन पहाते तों कोटाचे खिसे रिकामे! आणखी एक उदाहरण येथें नमूद करण्यासारखें आहे. एका कंपनीचा शिपाई रिझर्व्ह बँकेंत शंभर रुपयांच्या पांच चलनी नोटा मोडण्यासाठी गेला आणि कोणत्या खिडकींत मोड मिळते ह्याचा तपास करूं लागला. आपण बँकेचे नोकर आहों असा बहाणा करून एका उचल्यानें त्या शिपायाकडून नोटा घेतल्या आणि त्यांची एक घडी करून घेऊन पसार झाला. हें काय झालें म्हणून बिचारा शिपाई पहात आहे इतक्यांत भामटा दिसेनासा झाला! असल्या कुशल धंदेवाइक उचल्यांपासून कामासाठी बँकेत जाणाऱ्या किंवा तेथें आपले नोकर पाठवणाऱ्या लोकांनीं सावध राहिलें पाहिजे. चालू वर्षाच्या पहिल्या सात महिन्यांत साडेसात लक्ष रुपयांची मालमत्ता चोरांनीं लांबवल्याचें मुंबईच्या पोलिसांच्या निदर्शनास आलें आहे. लोक अधिक जागरूक राहिल्यास उचल्यांच्या करामतीस आळा बसल्यावांचून रहाणार नाहीं.

---

### रशियांतील रणांगण

प्रेसिडेंट रूझव्हेल्ट ह्यांची गांठ घेऊन मि. चर्चिल ह्यांनीं युद्ध-परिस्थितीची तपशीलवार चर्चा केली आणि निरनिराळ्या रणांगणांवर चालवावयाच्या हालचाली तज्ज्ञांच्या सल्यानें निश्चित केल्या. जर्मन फौजा डॉन नदीच्या व कॉकेशसमधील रॉकेलच्या प्रदेशांत रशियास मागें रेटीत नेण्याची शिकस्त करीत असतां शत्रूची ही प्रगति कुंठित करण्यासाठी पश्चिम युरोपांत ब्रिटिशांनीं बहुतशीरपणाची स्वारी करावी असें ह्या दोघां मुत्सद्यांमध्यें ठरलें असलें पाहिजे असा तर्क करण्यास जागा उत्पन्न झाली. कॉकेशस प्रांतांत जर्मनीची चाल अनपेक्षित त्वरेनें झाल्या कारणानें आणि शत्रूच्या हातांत महत्त्वाचे रशियन प्रदेश जात चालल्यामुळें पश्चिमेकडील आघाडीची आवश्यकताच सामान्यतः विशेष तीव्रतेनें भासूं लागली. ती ब्रिटिश युद्धमंडळास पटली असली तरी दुसरी आघाडी कोठें, कशी व केव्हां चालू करावी हें ठरवणें सोपें नसल्यानें तिच्यासंबंधानें प्रत्यक्ष कृति अजून घडलेली नाहीं. पश्चिम फ्रान्समध्यें डिएपच्या भागांत चाचणीदाखल एक मर्यादित पण जोरदार व संघटित रीतीची स्वारी ब्रिटिशांनीं केली, तीवरून दुसऱ्या आघाडीची पूर्व तयारी चालली असल्याविषयीं सहजच अनुमान निघतें. तथापि, ह्यासंबंधांत रशियांत जाऊन स्टालिनशीं मि. चर्चिलनीं प्रत्यक्ष वाटाघाट करून अमेरिका, इंग्लंड व रशिया ह्यांच्या युद्धविषयक धोरणांत एकसूत्रता व ऐक्यमत्य निर्माण केलें आहे ह्यावरून दुसऱ्या आघाडीबाबत मित्रराष्ट्रांचा निश्चित निर्णय झाला आहे ह्यांत शंका रहात नाहीं. सध्या रशियन रणभूमीवर अत्यंत निकराच्या लढाया चालल्या आहेत त्यांत स्टालिनच्या फौजा प्रत्येक पावलास शत्रूचे भयंकर बळी घेत असून अगदीं निरुपाय होईल तेथेंच व तेव्हांच माघार घ्यावयाची ह्या तत्त्वानें वागत आहेत. त्या शत्रूवर उलट हल्लेहि चढवीत आहेत. ह्या रणांगणांत रशियन फौजा दाखवीत असलेलें शौर्य, चिकाटी व धडाडी हीं वाखाणण्यासारखीं आहेत आणि तीं सर्व जगाच्या कौतुकाचा विषय होऊन बसलीं आहेत. त्यांच्या पराक्रमाचें फळ मित्रराष्ट्रांच्या सहकार्यानें लवकरच दिसून येईल अशी अपेक्षा करण्यांत येत आहे.

### स्टॅम्प खात्याचा अहवाल

मुंबई सरकारच्या स्टँप खात्याचें, ३१ मार्च, १९४२ अखेर संपलेल्या वर्षी एकूण १ कोटि, ६३½ लक्ष रुपये ठोक उत्पन्न झालें व खर्च वजा जातां निवळ उत्पन्न १ कोटि, ४४½ लक्ष रुपये उरलें. उत्पन्नापैकीं १ कोटि ४½ लक्ष रुपये स्टँप ॲक्टाखालील व ५९ लक्ष रुपये कोर्ट फीज ॲक्टाखालील आहेत.

#### कोर्ट फी स्टँप

मुंबई शहरांत कोर्ट फी स्टँपाची विक्री २१ लक्ष, ८८ हजारांची झाली. त्याचे खालोखाल पुणें ( ३ लक्ष, ७५ हजार रु. ), पूर्व खानदेश ( ३ लक्ष, ८७ हजार ) व अहमदाबाद ( ३ लक्ष, ५९ हजार ) असे आकडे आहेत. हुंड्यांच्या स्टँपाची विक्री, मुंबईत २२½ हजारांची, पुण्यांत ७८२ रुपयांची व अहमदाबादला ४४९ रुपयांची झाली.

#### इन्शुअरन्स स्टँप

विम्याच्या स्टँपांच्या विक्रीचे आकडे मुंबई २ लक्ष, ९८ हजार रु., सातारा २,९७० रुपये, पुणें २,२०३ रु. व धारवाड १३३ रुपये, असे आहेत. बाकीच्या जिल्ह्यांत त्यांची विक्री अजीबात झाली नाहीं. भागांच्या वर्गावर्गीसाठीं लागणारा स्टँप मुंबईत १५ लक्ष, ६० हजारांचा, अहमदाबादला १ लक्ष, ११ हजारांचा, सुरतला ३० ½ हजारांचा, पुण्यास ६९९ रुपयांचा व साताऱ्यास ३७५ रुपयांचा खपला.


मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् को-ऑपरेटिव् बँक, लिमिटेड.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी—सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंग, ९, बेक हाउस लेन, कोट मुंबई.

शाखा

| | |
|---|---|
| १ बारामती ( जि. पुणें ) | १८ अकलूज ( जि. सोलापूर ) |
| २ सातारा ( „ सातारा ) | १९ विरमगांव ( „ अहमदाबाद ) |
| ३ इस्लामपूर ( „ „ ) | २० धुळें ( „ प. खानदेश ) |
| ४ कऱ्हाड ( „ „ ) | २१ दोंडाईचें ( „ „ ) |
| ५ तासगांव ( „ „ ) | २२ शिरपूर ( „ „ ) |
| ६ किर्लोस्करवाडी ( „ „ ) | २३ शहादें ( „ „ ) |
| ७ शिराळें ( „ „ ) | २४ नंदुरबार ( „ „ ) |
| ८ कोरेगांव ( „ „ ) | २५ साक्री ( „ „ ) |
| ९ वाई ( „ „ ) | २६ शिंदखेडें ( „ „ ) |
| १० अहमदनगर ( „ अहमदनगर ) | २७ तळोदें ( „ „ ) |
| ११ शेवगांव ( „ „ ) | २८ मालेगांव ( „ नाशिक ) |
| १२ कोपरगांव ( „ „ ) | २९ सटाणा ( „ „ ) |
| १३ बेलापूर ( „ „ ) | ३० कळवण ( „ „ ) |
| १४ राहुरी ( „ „ ) | ३१ लासलगांव ( „ „ ) |
| १५ भिवंडी ( „ ठाणें ) | ३२ नांदगांव ( „ „ ) |
| १६ पालघर ( „ „ ) | ३३ दोहद ( „ पंचमहाल ) |
| १७ कल्याण ( „ „ ) | ३४ कालोल ( „ „ ) |

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.

## पेट्रोलऐवजीं प्रोड्यूसर गॅस

पेट्रोलची व खनिज तेलांची बचत करण्याची आवश्यकता अत्यंत तातडीची आहे, ह्यासंबंधीं प्रश्नच नाहीं. पेट्रोल रेशनिंगची अंमलबजावणी सर्वत्र कडक रीतीनें करण्यांत येत आहे. पेट्रोलच्या ऐवजीं दुसरें एखादें जळण वापरतां येणें कितपत शक्य आहे ह्यासंबंधीं वाटाघाटी चालू असून मोटार लॉऱ्यांना प्रोड्यूसर गॅस प्लँट्स बसविण्यांत येत आहेत. जेथें क्रूड ऑईलवर वीज निर्माण करण्यांत येते, अशा ठिकाणींहि क्रूड ऑइलचेऐवजीं प्रोड्यूसर गॅस वापरण्याचे प्रयत्न चालू आहेत. हिंदुस्थानाप्रमाणें ग्रेट ब्रिटनमध्येंहि प्रोड्यूसर गॅसचा वापर वाढवून तेवढ्या पेट्रोलची बचत करण्याची योजना चालू आहे. गॅसवर लवकरच ५० हजार लॉऱ्या तेथें चालू होतील. प्रोड्यूसर गॅस म्हणजे काय ह्याची माहिती येथें थोडक्यांत दिली आहे.

गॅस इंजिन चालविण्याकरितां स्वस्तांत तयार करण्यांत आलेल्या गॅसला प्रोड्यूसर गॅस हें नांव आहे. कोळसा, कोक, ह्यांसारख्या जळणापासून तो तयार करण्यांत येतो. स्लॅक, अँथ्रसाइट, टर्थ, लिग्नाइट, इत्यादि कोळशाचेच प्रकार आहेत, त्यांचाहि प्रोड्यूसर गॅससाठी उपयोग केला जातो. साधें लाकूडहि कांहीं ठिकाणीं वापरण्यांत येतें. गॅस प्रोड्यूसरमध्यें कोळशाचा जाडा थर (अथवा वर सांगितल्याप्रमाणें तत्सम इतर जळण) मंदपणें जळत ठेवण्यांत येतो व त्यांत पाण्याच्या वाफेचा फवारा सोडण्यांत येतो. जळणाच्या उष्णतेनें वाफेचें उष्णतामान इतकें वाढतें कीं, ज्यांची वाफ बनलेली आहे त्यांमध्यें म्हणजे ऑक्सिजन व हैड्रोजनमध्यें तिचें परत रूपांतर होतें. हे वायू जळणाच्या थरांतून वर जातात. जळण आंतल्या आंतच धुमसून जळत असल्याकारणानें कॉर्बन मोनॉक्साइडचा त्यापासून जन्म होतो. हवेंतील नैट्रोजन, वाफेंतून बाहेर पडलेला ऑक्सिजन व हैड्रोजन आणि कार्बन मोनॉक्साइड हीं मिळून गॅस इंजन चालविण्यास समर्थ असणारा प्रोड्यूसर गॅस बनतो. हें मिश्रण स्वच्छ करण्यांत येऊन साठवणीच्या टँकमधून इंजन चालविण्याकडे त्याचा उपयोग केला जातो.

प्रोड्यूसर गॅस वापरण्यांतील प्रमुख अडचणी म्हणजे गॅस प्रोड्यूसरचें (जळणाचें) मोठें वजन व आकारमान, त्यापासून अल्प प्रमाणावर उत्पन्न होणारी उष्णता, शक्ति लवकर कमी होत जाण्याचा संभव, यंत्र चालू ठेवण्यासाठीं घ्यावी लागणारी दक्षता व डागडुजी ह्या होत. जळणाची साठवण करण्याची सोय, लागेल तेव्हांच त्याचा गॅस करतां येणें व जळण स्वदेशांतच उपलब्ध असणें ह्या त्यांतील प्रमुख सोई म्हणतां येतील. लॉरीवर प्रोड्यूसर गॅस प्लँट बसविण्यास सुरुवातीस मोठा खर्च येतो खरा, परंतु तो पुढें भरून येतो. कारण पेट्रोलपेक्षां प्रोड्यूसर गॅस स्वस्त पडतो. डीझेल ऑईल मात्र प्रोड्यूसर गॅसपेक्षां स्वस्त पडतें. पेट्रोल व खनिज तेलें ह्यांवर भारी दरानें जकात व एक्साइज पट्टी द्यावी लागते ती हिशेबांत घेऊनच वरील तुलना केलेली आहे.

ग्रेट ब्रिटनमध्यें प्रोड्यूसर गॅस प्लँटमध्यें अँथ्रसाइट व कोक हीं वापरण्यांत येतात. ह्या दोन्हींचा इतर ठिकाणीं उपयोग होत असला व तीं अशा तऱ्हेनें जाळणें इतर वेळीं इष्ट नसलें, तरी पेट्रोल हें अधिक विरळ होऊं लागल्यामुळें पेट्रोलऐवजीं त्याचा उपयोग करणें व्यवहार्य ठरत आहे. लॉरीस पेट्रोल पुरविण्यापेक्षां गॅस प्रोड्यूसर पुरविणें कमी कठीण होईल. स्थानिक जळणांचा उपयोग कसा करतां येईल, इकडे प्रत्येक देशांतील सरकारचें लक्ष आहे. ३०% आर्द्रता असलेलें लाकूड जर्मनींतील गॅस प्रोड्यूसरमध्यें जळण म्हणून काम देत आहे. जर्मनी, डेनमार्क, स्वीडन, नॉर्वे, इत्यादि युरोपांतील कित्येक देशांनीं शेतांतील ट्रॅक्टर, नदीवरील बोटी, मासेमारीच्या बोटी, इत्यादींवर गॅस प्लँट बसवून पेट्रोलची बचत चालविली आहे. स्थानिक भौगोलिक परिस्थितीस अनुसरून सर्वांत कार्यक्षम परंतु स्वस्त व सोइस्कर अशा जळणांची गॅस प्लँटकरितां योजना केली जात आहे. युद्धसमाप्तीनंतरहि प्रोड्यूसर गॅसचा वापर चालू राहील अशीं चिन्हें दिसत आहेत. कोळसा, कोक, सोडा इत्यादींस त्यामुळें नवें गिऱ्हाईक निर्माण होणार आहे. स्थानिक जळणावर लॉऱ्या, पिठाच्या गिरण्या, विजेचीं इंजिनें इत्यादि चालू लागल्यास पेट्रोलवरील अवलंबन दूर होईल. प्रोड्यूसर गॅसचें स्थान कायम होण्यापूर्वी त्याच्या वापराचे संबंधांतील सर्व तपशीलांत सुधारणा घडून येणें अगत्याचें आहे, हें उघड आहे.

## महाराष्ट्रीय विमा कंपन्यांची असोसिएशन

पुणें हें केंद्र धरून, महाराष्ट्रांत निघालेल्या किंवा महाराष्ट्रीय लोकांनीं चालविलेल्या विमा कंपन्यांची एक असोसिएशन स्थापन करण्याचा प्रयत्न चालू आहे. आजमितीस महाराष्ट्रामध्यें निघालेल्या किंवा महाराष्ट्रीयांनीं चालविलेल्या अशा आयुर्विमा कंपन्या किंवा प्रॉव्हिडंट कंपन्या सुमारें १५ आहेत. परंतु निरनिराळ्या कंपन्यांच्या चालकांची परस्पर हिताचा विचार करण्याच्या दृष्टीनें क्वचितच गांठभेट पडते. तसेंच नवीन विमा कायदा आणि सुपरिन्टेंडेंट ऑफ इन्शुअरन्स यांचे दृष्टीनें विमा कंपन्यांना जें धोरण ठेवावें लागतें आणि जीं कायदेशीर बंधनें पाळावीं लागतात त्या बाबतींतील कायदेशीर किंवा तांत्रिक अशा ज्या अडचणी येतात त्या सोडविणेस किंवा त्याबाबत पेचप्रसंग पडल्यास सरकारकडे दाद मागण्यास एखादी संस्था असणें अत्यंत अवश्य आहे असें वाटूं लागलें आहे आणि या उद्देशानें लवकरच असोसिएशन प्रस्थापित करण्यांत येणार आहे. इंडियन लाईफ इन्शुरन्स कंपनीज असोसिएशन या संस्थेमध्यें नव्या कंपन्यांना सभासद होणें कठीण पडतें. तसेंच महाराष्ट्रांतील एखाद दुसरीच कंपनी या संस्थेचे सभासद आहे आणि म्हणून असोसिएशनची आवश्यकता आतां वाटूं लागली आहे.

ह्यासंबंधीं विचारविनिमय करण्याकरितां सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यांत महाराष्ट्रीय विमा कंपन्यांच्या चालकांची एक सभा पुणें येथें भरणार आहे, असें समजतें. अशा संस्थेची आवश्यकता व उपयुक्तता निर्विवाद आहे. विमा कंपन्यांच्या सहकार्यानें तिची स्थापना सत्वर होऊन ती लवकरच भरीव कार्य करूं लागेल अशी अपेक्षा आहे.

## अर्ल हेग

गेल्या महायुद्धांतील ग्रेट ब्रिटनच्या कमांडर-इन-चीफचे चिरंजीव अर्ल हेग हे मध्य-पूर्व रणक्षेत्रांत युद्धकैदी झाले असल्याची बातमी आहे. अर्ल हेग हे रॉयल आर्मर्ड कोअरमध्यें कॅप्टनचे हुद्दयावर असून त्यांचें वय २५ आहे.

## अर्थशास्त्र

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे

पृष्ठसंख्या सुमारें ३००; किंमत ३ रुपये

या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

## श्रीराम सिल्क मिल्स लि., बंगलोर

[ कंपनीनें १९४१ अखेर ६ टक्के डिव्हिडंड वांटला आहे. ]

युद्धसाहित्यपुरवठा–खात्याची पॅरेशूटकरितां लागणाऱ्या रेशमी कापडाची ऑर्डर पुरी करण्यासाठी लागणाऱ्या भांडवलाकरितां तूर्त एकूण रु. १ लक्षाच्या रकमेपर्यंत

**ठेवी घेणें आहेत**

व्याजाचा दर ४॥ ते ६ टक्के. ठेव किमान रु. ५०० ची असावी. ठेवीवरील व्याज दर सहा महिन्यांनीं दिलें जातें.

श्रीराम सिल्क मिल्स लि., श्रीरामबाग, बसवनगुडी, बंगलोर.

नारायण गोविंद नाईक, ( माजी अध्यक्ष, म्हैसूर चेंबर ऑफ कॉमर्स ) मॅनेजिंग डायरेक्टर

आमच्या कारखान्यांतील माल मुंबईस बॉम्बे स्वदेशी को–ऑपरेटिव्ह स्टोअर्समध्यें व पुण्यास लक्ष्मी रोडवरील रे म्यूझिअमच्या व्यापार–संवर्धन–गृहांत पहा.

## महायुद्ध द्वाराशीं आलें परदेशी औषधें दुर्मिळ व महाग झालीं

पण

**भिण्याचें कारण नाहीं !!!**

— कारण —

## आयुर्वेद रसशाळा पुणें लि०

या देशी औषधाच्या प्रसिद्ध कारखान्यानें तयार केलेलीं

- रक्तवर्धक,
- उपनाह,
- बालजीवन,
- कॅल्सीप्राल

इत्यादि पेटंट, स्टँडर्ड व लोकप्रिय औषधें खात्री पटल्यामुळें

**★ डॉक्टर्सहि वापरूं लागले आहेत. ★**

दरसाल बिनचूक नफा वाटणाऱ्या ह्या कंपनीचे शेअर्स व औषधें मागवा.

## आयुर्वेद रसशाळा पुणें लि०

मुख्य दुकान गणपति चौक, लक्ष्मीरोड, पुणें २.

## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार

२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक

३ व्यापारी उलाढाली

४ सहकार

राहाणेची व भोजनाची उत्तम सोय




फोन नं. ७७९ गणपति चौक, व्यवस्थापक.

## N. V. WADNERKAR

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver, Electro-plater & Manufacturer of Sporting Trophies, Medals, Cups etc.

- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -

POONA CITY.

## DECCAN BOOK STALL

Booksellers, Publishers & Subscription Agents

Fergusson College Road, Poona No. 4

(1) We stock and supply Educational books, General books & Library books.

(2) We supply Government of Bombay and Government of India publications.

(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.

(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, एम. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हशील माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ८ पुणें, बुधवार, तारीख २ सप्टेंबर १९४२ अंक ३५

## दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल ... ... ... | रु. | २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... ... ... | रु. | १,००,००,००० |
| रिसर्व्ह फंड ... ... ... | रु. | १,१८,००,००० |

मुख्य कचेरी: ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

मुंबईमधील शाखा : बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

इतर शाखा : अहमदाबाद ( भद्र, मुख्य ऑफिस ), अहमदाबाद ( एलिस ब्रिज शाखा ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अंधेरी ( मुंबई शेजारीं ), बांद्रे ( मुंबई शेजारीं ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस ), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर, कराची, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत.

लंडन एजन्ट्स : वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

डायरेक्टर्स : सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाइट; मि. ए. गेडिस; सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई.; मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण.

### करंट डिपॉझिट अकाउंट्स :

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षा कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमीचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

एजंट:—टी. आर. लालवाणी.

## दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

हेड ऑफिस : पुणें शहर.

स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.

मुंबअी शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबअी.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | : रु. | १०,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | : रु. | ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | : रु. | ४,४५,९५० |
| वसूल झालेलें भांडवल | : रु. | २,२२,७९५ |
| एकूण खेळतें भांडवल | : रु. | ३७,००,००० |

### डायरेक्टर्स

प्रो. वा. गो. काळे, अध्यक्ष

| | |
|---|---|
| श्री. धों. कृ. साठे | श्री. मा. रा. जोशी |
| श्री. म. ग. पवार | श्री. श्री. गो. मराठे |
| श्री. त्र्यं. वि. रानडे | श्री. र. चिं. सोहोनी |
| श्री. बा. पुं. वर्दे | मि. फ. दो. पदमजी |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदीविक्री कसोशीनें करून दिली जाते.

बँकेच्या शेअरवर १९४१ अखेर पुऱ्या होणाऱ्या वर्षी द. सा. द. शेंकडा ४ टके करमाफ डिव्हिडंड दिलें गेलें. बँकेची शेअरविक्री चालू आहे.

म. वि. गोखले
मॅनेजर.

महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर

## महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

फक्त पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेडचे
सभासदांकरितां

## नोटीस

या बँकेची पुढील साधारण सभा रविवार ता. २० सप्टेंबर १९४२ रोजीं दुपारीं ५ वाजतां ( नवीन वेळेप्रमाणें ) पुणें येथें नूतन मराठी विद्यालयाचे इमारतींत भरून अहवाल, ताळेबंद, नफ्याची वाटणी मंजूर करणें, हिशेबतपासणीसांची नेमणूक, डायरेक्टर्स, चेअरमन व व्हाईस चेअरमन यांची निवडणूक, पोट नियमांत दुरुस्त्या करणें वगैरे कामें नेहमींप्रमाणें करण्यांत येतील. तरी सर्व सभासदांनीं सभेस अगत्य यावें अशी विनंती आहे. डायरेक्टरांच्या निवडणुकीसाठी व ऑडिटरांच्या नेमणुकीसाठी मतनोंदणीस वेळ मात्र त्याच दिवशीं सदर जागीं फक्त सकाळीं ९ ते दुपारीं १ ( नवीन वेळेप्रमाणें ) ठेवली आहे.

द. दि. चितळे,
मॅनेजिंग डायरेक्टर.

ता. २० ऑगस्ट १९४२

## नोटीस

दि कराड अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि. कराड

बँकेच्या भागीदारांची २५ वी वार्षिक साधारण सभा रविवार तारीख १३ सप्टेंबर १९४२ रोजीं कराड येथें बँकेचे इमारतींत सकाळीं नऊ वाजतां भरणार आहे. त्यावेळीं नियमाप्रमाणें डायरेक्टर्सची निवडणूक, अध्यक्ष व व्हाइस चेअरमन यांची निवडणूक, पोटनियम दुरुस्ती : वगैरे कामें केलीं जातील. डायरेक्टर्सचे निवडणुकीबाबत मतें देण्याची वेळ सकाळीं ९-३० ते १२-३० अशी आहे. तरी सभासदांनीं येणेचें करावें अशी विनंति आहे.

कराड म. वि. खंडकर
२८-८-४२ मॅनेजर

टीप—वरील सर्व वेळा नवीन स्टँ. टाईमप्रमाणें समजाव्यात.

# विविध माहिती

### स्त्रियांचें युद्धकार्य

अमेरिकेंतील १ कोटी ३० लक्ष स्त्रिया कोणत्या ना कोणत्या तरी युद्धकार्यांत गुंतल्या आहेत. त्यांपैकीं २० लक्ष प्रत्यक्ष कारखान्यांत आहेत.

### रहाणीच्या खर्चाचें वाढतें मान

अमेरिकेंत रहाणीच्या खर्चाचें मान वाढत चाललें आहे, त्यास पायबंद घालण्याचा प्रेसिडेंट रूझवेल्ट यांनीं निर्धार केला आहे.

### जुलै महिन्यांतील आगबोटींचें उत्पादन

गेल्या महिन्यांत अमेरिकन आगबोटी जेवढ्या बुडाल्या त्यांपेक्षां अधिक आगबोटी अमेरिकेनें बांधल्या. चालू वर्षांत, बुडालेल्या बोटीपेक्षां ज्यास्त बोटी तयार झाल्याचें हें पहिलेंच उदाहरण आहे.

### टपालासाठी विमान

कराची व मुलतान ह्यांचेमध्यें टपालाची ने-आण करण्याकरितां विमानाची दररोज वहातूक सुरू करण्यांत आली आहे.

### इंग्रजी ऐवजी जपानी भाषा

जपाननें पादाक्रांत केलेल्या देशांत इंग्रजीचें उच्चाटण करून जपानी भाषा हीच मुख्य कामकाजाची भाषा ठरविण्यांत येत आहे.

### बँकांस सुटी

ता. ३ रोजीं गोकुळ अष्टमीनिमित्त बँका बंद रहातील. ता. ४ व ५ रोजीं पारशी वर्षारंभानिमित्त सुटी मागें जाहीर केलेली होती. त्यांपैकीं ४ तारखेची सुटी रद्द करण्यांत आली आहे. ५ तारखेस सुटी आहे.

### मोफत वैद्यकीय मदत

ग्रेट ब्रिटनमधील धर्मार्थ चालविण्यांत येणारीं व म्युनिसिपॅलिट्यांचीं इस्पितळें सरकार आपल्या स्वतःकडे व्यवस्थेसाठी घेणार आहे व त्यांत सर्वांना मोफत वैद्यकीय मदत दिली जाणार आहे. ह्या योजनेशीं सहकार्य करणारे डॉक्टर हे सरकारी नोकर समजले जातील व त्यांना खासगी धंदा करतां येणार नाहीं.

### ॲलेक्झँड्रियामधील फ्रेंच युद्धनौका

ॲलेक्झँड्रियाचे बंदरांत अडकून पडलेल्या फ्रेंच युद्धनौका तुर्कस्तानास विकण्याचा प्रयत्न व्हिशी सरकारनें चालविला आहे.

### ट्रेझरी बिलांवर ६ आ. ७ पै व्याजाचा दर

रिझर्व्ह बँकेनें गेल्या आठवड्यांत हिंदुस्थान सरकाराचीं ६ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. ६ आ. ७ पै इतका पडला. सुमारें १२ कोटि रुपयांच्या ट्रेझरी बिलांच्या मागणीचे अर्ज आले होते.

### गव्हर्मेंट टलिफोन्स बोर्ड लि.

बाँबे टेलिफोन कं. लि. च्या भागांची खरेदीची किंमत गव्हर्मेंट टेलिफोन्स बोर्ड लि. नें ८९ रु. १५ आ. अशी ठरविली ती योग्य नव्हती व ती किंमत मान्य नसणारांचे भाग बोर्डाला सक्तीनें मिळवितां येणार नाहींत असा ता. १० ऑगस्ट रोजीं मुंबई हायकोर्टानें निकाल दिला. योग्य किंमत ठरविण्याचा अधिकार आतां हायकोर्टास आहे किंवा नाहीं ह्या मुद्यावर कोर्टानें आपला निर्णय नास्तिपक्षी दिला आहे. टेलिफोन बोर्डानें अर्जदार भागीदारांचा कोर्ट-खर्च सोसावयाचा आहे.

### सिलोनमध्यें दुधाचा तुटवडा

सिलोनमध्यें दुधाचें दुर्भिक्ष्य भासूं लागलें आहे, तें दूर करण्याकरितां हिंदुस्थानांतून, तेथें एक हजार गाईंची आयात करण्यांत येणार आहे. दुधाचें आइस्क्रीम बनविण्यास तेथें मनाई आहे.

### सिलोनी खोबरें

सिलोनमधील सर्व खोबऱ्याची खरेदी ब्रिटिश सरकारनें केली आहे. तिचा कांहीं वाटा हिंदुस्थानास देण्यांत येईल.

### ब्रह्मी चलनी नोटा

१५ जुलैनंतर ब्रह्मदेशाच्या चलनी नोटांची मोड मिळण्याची सोय आसाममध्यें कांहीं ठिकाणीं व रिझर्व्ह बँकेच्या कलकत्ता, कानपूर व मद्रास येथील कचेऱ्यांत केलेली आहे असें हिंदुस्थान सरकारनें जाहीर केलें होतें. त्यापूर्वी त्यांची मोड इंपीरिअल बँकेच्या कोणत्याहि शाखेंत मिळत असे. जिल्हाधिकाऱ्याच्या दर्जाचे अधिकाऱ्याची शिफारस असल्याखेरीज ब्रह्मी नोटांची मोड मिळणें ३१ ऑगस्टनंतर बंद करण्यांत आलें आहे.

### पगारवाढ

ब्रिटिश सैनिकांच्या पगारांत लवकरच वाढ जाहीर केली जाईल, असें समजतें.

### नवीन स्टॉक एक्सचेंज

द. हैद्राबाद येथें स्टॉक एक्सचेंजची स्थापना लवकरच होणार आहे, असें समजतें.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | २७६ |
| २ खाण्याच्या धान्यांचा पुरवठा ... | २७७ |
| ३ एक्सचेंज बँकांच्या अध्यक्षांचीं भाषणें... | २७८ |
| ४ शेअरची वर्गावर्गी ... | २७८ |
| ५ रजिस्ट्रेशन खात्याचा अहवाल ... | २७८ |
| ६ स्फुट विचार ... | २७९ |
| पुणें सें. को. बँकेची ज्युबिली—मुंबईस धान्याचा पुरवठा—साखर करारांतून हिंदुस्थानची मुक्तता | |
| ७ प्रॉमिसरी नोटेवर लावलेलीं तिकिटें ... | २८१ |
| ८ इस्लामपूर पी. को. बँक ... | २८१ |
| ९ मुं. प्रां. स. लँड मॉर्गेज बँक ... | २८१ |


# अर्थ

बुधवार, ता. २ सप्टेंबर, १९४२

## खाण्याच्या धान्यांचा पुरवठा

मध्यवर्ती खाद्यपदार्थ समितीची बैठक गेल्या आठवड्यांत दिल्ली येथें भरली होती, तीमध्यें सर जोगेंद्रसिंग ह्यांनीं कांहीं महत्त्वाची माहिती विवाद्य विषयाचे संबंधांत दिली ती हिंदुस्थानांतील अन्नपुरवठ्याचे बाबतींत अत्यंत महत्त्वाची आहे. जनतेच्या नित्याच्या जीवनास अत्यावश्यक असलेल्या जिनसांची दुर्मीळता व महागाई ह्यांचे योगानें सामान्य लोकांची गैरसोय होत असल्याच्या तक्रारी चोहोंकडून ऐकूं येत असून प्रांतिक सरकार व स्थानिक अधिकारी, पदार्थांचे भाव ठरवणें व त्यांच्या पुरवठ्याची तरतूद करणें ह्यांचेविषयीं योजना अंमलांत आणण्यासाठी झटत आहेत. खाद्यपदार्थांचें उत्पादन, पुरवठा, वाटणी, वहातुक, विक्री व किंमती ह्यांचें नियंत्रण अशा अनेक बाजू प्रस्तुत प्रश्नास असून त्यांचा समुच्चयानें निर्णय होणें अगत्याचें आहे आणि ह्या सर्व बाबतींत मध्यवर्ती व प्रांतिक सरकारांचें धोरण एकसूत्री असलें पाहिजे. ह्यासंबंधांतलें सविस्तर विवेचन "अर्थां"त अनेकवार आलें आहे. हिंदुस्थान सरकारच्या वियमानें प्रातिनिधिक समिति व सल्लागारमंडळ ह्यांचा विचारविनिमय केला जातो आणि योग्य धोरणाची चर्चा वेळोवेळ केली जाते ह्याचा उद्देश उघड आहे. चालू आणि पुढें येणाऱ्या परिस्थितीच्या दृष्टीनें देशाच्या निरनिराळ्या भागांतल्या अन्नसामुग्रीच्या पुरवठ्याची व किंमतीची निश्चिति होण्याचे मार्ग आंखले जाणें आवश्यक आहे.

आखूड धाग्याचा कापूस व ताग ह्यांस असलेली मागणी मर्यादित झाल्यानें तीं पिकें करणें शेतकऱ्यांस तोट्याचें आहे म्हणून त्यांचे ऐवजीं धान्याच्या पिकांची लागवड वाढवल्यानें खाद्यपदार्थांच्या पुरवठ्याचा विस्तार होईल आणि ह्या धोरणाचा परिणाम सर्वांसच अनुकूल असा होईल ह्या कल्पनेनें धान्याच्या पैदाशींत भर घालण्याचे प्रयत्न सर्व देशभर झाले आहेत. कपाशीच्या आयातीवर बसविण्यांत आलेल्या जकातीच्या उत्पन्नाचा फंड स्वतंत्रपणें बाजूस काढलेला आहे त्यांतून कपाशीच्या ऐवजीं खाद्यपदार्थांचीं पिकें काढण्यासाठी चार प्रांत व तीन संस्थानें ह्यांस सहाय देण्यांत आलें आहे असें सर जोगेंद्रसिंग ह्यांनीं सांगितलें. पन्नास लक्ष एकर जमिनीचा उपयोग कपास व ताग ह्यांच्या ऐवजी खाद्यपदार्थांच्या पिकांच्या लागवडीकडे करण्यांत आला आहे अशी माहिती त्यांनीं दिली. धान्याच्या पुरवठ्यांत त्या योगानें फार मोठी भर पडण्यासारखी नसली तरी खाद्यपदार्थांची पैदास जेवढी वाढेल तेवढी आजमितीस हवीच आहे. जीमध्यें पिकें करतां येतील अशी पडिक जमीन देशांत साडेदहा कोटि एकर इतकी आहे. म्हणजे विशेष मेहनत व खर्च केल्यास माणसें व जनावरें ह्यांच्या खाण्याच्या पिकांची तजवीज भरपूर होण्यासारखी आहे हें उघड आहे. शेतीच्या क्षेत्राचा विस्तार पडिक क्षेत्रांत व्हावयाचा असेल तर तो घडवून आणण्याचे कामीं सरकारनेंच पुढाकार घ्यावा लागेल.

ब्रह्मदेशांतून तांदूळ येण्याचें बंद झाल्यामुळें बावीस लक्ष टन इतका ह्या महत्त्वाच्या धान्याचा तुटवडा पडला आहे. शक्य तेथें भाताच्या पिकाची लागवड होण्याची खटपट चालली आहे. तिचा परिणाम साडेआठ लक्ष टन तांदुळाची भर पुरवठ्यांत टाकून हा तुटवडा मर्यादित करण्यांत होईल अशी अपेक्षा आहे. पाऊसपाणी चांगलें झाल्यास १९४३–४४ सालीं तांदुळाचा तुटवडा अकरा लक्ष टनांवर खाली येईल असा अंदाज आहे. तांदुळास असलेली मागणी व त्याचा पुरवठा ह्यांची तोंडमिळवणी होणें अशक्य आहे हें स्पष्ट झालें असल्या कारणानें ह्या मालाची वहातुक व वाटणी देशभर व्यवस्थित योजनात्मक रीतीनें होण्याचें महत्त्व स्वाभाविकपणेंच सिद्ध आहे. जनतेच्या खाण्यांत तांदुळाची जागा दुसऱ्या धान्यानें किती प्रमाणांत घेतां येणें शक्य आहे ह्या प्रश्नाचाहि विचार होणें आवश्यक आहे. तांदुळाच्या जागी येणाऱ्या दुसऱ्या धान्याचा पुरवठा व किंमती ह्यांचे संबंधांत विशेष अनुकूलता असेल तर हा बदल होणें शक्य आहे. गव्हाच्या पैदाशींत विस्तार होईल असा अंदाज आहे ही समाधानाची गोष्ट आहे. खाद्यपदार्थांची पैदास वाढवण्याची खटपट चालली आहे तिचे योगानें गव्हाच्या पुरवठ्यांत साडेचार लक्ष टनांचा वाढावा होईल आणि १९४३–४४ मध्यें देशांत मुळींच तुटवडा भासणार नाहीं असें सर जोगेंद्रसिंग ह्यांचें म्हणणें आहे. सध्याच्या पाऊसपाण्याच्या परिस्थितीवरून असें अनुमान काढण्यांत आलें आहे कीं, बाजरी व ज्वार ह्यांच्या पैदाशींत सुमारें नऊ लक्ष टनांचा वाढावा होईल. येत्या वर्षी म्हणजे १९४३ च्या जानेवारीपासून गहू व तांदूळ ह्यांचें पीक किती येईल हें सांगणें आज शक्य नसलें तरी तांदुळाचें पीक लवकरच हातीं येईल तें नव्वद लक्ष टन होईल. त्याचे नंतर पासष्ट लक्ष टन ज्वार, पंचवीस लक्ष टन बाजरी व वीस लक्ष टन मका म्हणजे एकूण ह्या तीन पिकांचे एकशेंदहा लक्ष टन बाजारांत येतील आणि जनतेची मागणी पुरवतां येईल असा अजमास आहे. चालू वर्षाच्या चार महिन्यांची धान्यांची बेगमी समाधानकारक आहे असें सर जोगेंद्रसिंग ह्यांनीं दिलेल्या माहितीचें सार आहे. हा पैदाशीचा प्रश्न झाला. पण वर सुचवल्याप्रमाणें देशाच्या निरनिराळ्या भागांत पिकणाऱ्या धान्याची वाटणी वहातुकीच्या साधनांच्या सहायानें योग्य प्रकारें होण्याच्या मार्गांतल्या अडचणी दूर होतील अशी पद्धतशीर व निश्चित तजवीज करण्यांत आली पाहिजे.

## एक्सचेंज बँकांच्या अध्यक्षांच्या भाषणांतील उतारे

### १९४१ मधील व्यवहारासंबंधीं खुलासा

" आपणांस जपान, चीन, मलाया, ब्रह्मदेश ह्या देशांत गुंतलेल्या रकमांवर कांहींहि व्याज कांहीं काळ तरी मिळणार नाहीं. ह्या देशांत आपले फारसे पैसे अडकलेले नाहींत. त्यांवरील उत्पन्न बुडालें तर ऑर्डिनरी भागांवर २½ % व्याजाचा परिणाम होईल. हिंदुस्थान, सिलोन आणि ऑस्ट्रेलिया येथें गुंतलेल्या रकमांवरील उत्पन्नहि ऑर्डिनरी भागांवरील २½ % व्याजाइतकें आहे. म्हणजे जे देश आज शत्रूनें व्यापले आहेत, अथवा ज्यांवर त्याची स्वारी होण्याचा संभव आहे, अशा ठिकाणच्या रकमांवरील उत्पन्नाची बेरीज ऑर्डिनरी भागांवरील ५% व्याजाइतकी होते."
:—अलायन्स ट्रस्ट कं. लि. च्या अध्यक्षांचें भाषण.

* * *

" गेल्या वर्षांत हिंदी उद्योगधंद्यांची वाढ आणखी झपाट्यानें झाली व आश्चर्य वाटेल इतक्या प्रकारचे नवे कारखाने हिंदुस्थानांत निघाले. ह्याचा अर्थ, युद्धानंतर हिंदुस्थानाच्या आर्थिक संसारांत बराच फरक झालेला आढळेल. त्याचा परिणाम लोकांचे रहाणीचें मान वाढण्यांत व त्यांची क्रयशक्ति सुधारण्यांत झाला, तर जागतिक व्यापाराचें मान त्यामुळें पुष्कळच बदलेल. हिंदुस्थानच्या इंग्लंडमधील बहुतेक सर्व कर्जांची युद्ध सुरू झाल्यापासून आतां फेड झालेली आहे, ही गोष्टहि महत्त्वाची आहे.... आपल्या बँकेच्या कित्येक शाखा शत्रूनें जिंकलेल्या प्रदेशांत असल्या कारणानें, बँकेचा नफा कमी होणें स्वाभाविक आहे. हिंदुस्थान, सिलोन व मॉरिशस येथेंच सध्या आपला व्यवहार चालू आहे. तूर्त भागीदारांनीं पूर्वीपेक्षा जरा कमी डिव्हिडंडवरच संतुष्ट राहिलें पाहिजे. युद्धाच्या निकालावरच बँकेचें भवितव्य अवलंबून आहे. लवकरच युद्ध-परिस्थिति सुधारून येत्या वर्षीं चांगली हकीकत सांगण्याची संधि मला मिळेल, अशी आशा आहे.":— मर्कंटाइल बँकेचे अध्यक्ष.

* * *

"सिंगापूरमध्यें आपली फारशी रकम गुंतलेली नाहीं व अखेरीस बँकेस फार नुकसान सोसावें लागणार नाहीं; हिंदुस्थान आणि सिलोन ह्यांतील परिस्थितीची माहिती वृत्तपत्रांतून आपणांस समजतेच. बँकेच्या गिऱ्हाइकांची गैरसोय होऊं न देतां, शत्रूच्या संभाव्य हालचालींपासून बँक-सुरक्षित रहावी, अशी तेथें दक्षता बाळगण्यांत येत आहे. इराकशी चालणारा नेहमींचा परराष्ट्रीय व्यापार कमी पडत असला तरी तेथील ब्रिटिश फौजांच्या पैशाचा व्यवहार वाढला आहे व तो आपणांमार्फतच होतो. इराकी सरकारचा आर्थिक कारभार नीटपणें चालू आहे.":—ईस्टर्न बँक लि० चे अध्यक्ष.

* * *

" जपान युद्धांत पडण्याचा आपल्या व्यवहारावर परिणाम होणें क्रमप्राप्त आहे. संयुक्त राष्ट्रांनीं शत्रूच्या नाविक कारवायांवर प्रभावी नियंत्रण ठेवलें नाहीं तर बंगालमधील बंदरांतून चालणाऱ्या व्यापारावर परिणाम घडून येईल. सिलोनच्या व्यापारासहि थोडी झळ लागेल.":—नॅशनल बँक ऑफ इंडियाचे अध्यक्ष.

---

### कोऱ्या फॉर्मवर सही करून शेअरची वर्गावर्गी

" मुमताझ फतमा बेगम ( मयत ) हिचे नांवानें बंगाल सिल्क मिल्स लि. मध्यें सहा शेअर होते. तिचा नातू ( अर्जदार ) महमद अरिफ ह्यानें आपल्या आजीचे शेअर स्वतःचे नांवानें करणारा ट्रॅन्स्फर फॉर्म ४ मार्च १९४१ रोजीं कंपनीकडे पाठविला. परंतु डायरेक्टरांनीं शेअर वर्गाची नोंद करण्याचें नाकारलें. फतमा बेगमचे नांवानें १८९७ सालीं शेअर नोंदलेले होते. १९२८ मध्यें तिनें कोऱ्या ट्रान्स्फर फॉर्मवर सही करून २,१०० रुपयांस ते भाग मि. सुरावर्दी ह्यास विकले. १० डिसेंबर १९४० रोजीं त्यानें तोच कोरा ट्रॅन्स्फर फॉर्म अर्जदाराकडून २,४०० रु. घेऊन त्याचे स्वाधीन केला. हा व्यवहार कायदेशीर नाहीं. कारण १९४० सालीं शेअरच्या ट्रॅन्स्फरची नोंद व्हावी असा अर्जदाराचा अर्ज आहे, परंतु कोऱ्या फॉर्मवर सही करून देणारा सुरावर्दी हा १९३५ सालींच मयत झालेला आहे, असें एक कारण डायरेक्टरांनीं शेअरच्या वर्गाची नोंद कां केली नाहीं हें सांगतांच कंपनीचा एक डायरेक्टर युसुफ अरिफ ह्यानें कोर्टास सांगितलें. अर्जदारास भागीदार करून घेण्यास बोर्डाचें प्रतिकूल मत असल्याचें कोठेंच दिसून आलें नाहीं. तसेंच, वर्ग करणाऱ्याच्या अधिकाराचा प्रश्नहि उपस्थित झाला नाहीं. तेव्हां, आतां एकच प्रश्न उरतो, तो म्हणजे मूळ भागीदाराच्या मृत्यूनंतर कोऱ्या फॉर्मच्या सहाय्यानें भागांची केलेली वर्गवारी कायदेशीर होते किंवा नाहीं हा होय. कोरा फॉर्म भरण्याचा अधिकार, त्यावर शेअर विकणारा सही करून, तो विकत घेणारास देत असतो. परंतु हा अधिकार मूळ भागीदाराच्या मृत्यूनंतर संपुष्टात येतो काय ? तसें होत नाहीं असा कलकत्ता हायकोर्टानें निर्णय दिला आहे." " शेअर विकणारा व तो विकत घेणारा ह्यांचेमधील व्यवहाराचें स्वरूप कराराचें असो अथवा अधिकारस्वीकाराचें असो; शेअर विकत घेणारास मूळ मालकाच्या मृत्यूनंतरहि ट्रन्स्फर फॉर्म भरण्याचा व त्यावर एक तारीख घालण्याचा अधिकार आहे." तो नाहीं असें मानल्यास " ब्लँक ट्रॅन्स्फरच्या मार्गानें शेअर्सची होणारी वर्गावर्गी बंद करावी लागेल. कारण मूळ मालक हयात आहे किंवा नाहीं, हें ठरविणें सोपें व सोईस्कर नाहीं. अर्जदारानें सुरावर्दीकडून भाग घेतांना शेअर ट्रॅन्स्फर फॉर्मवर १० डिसेंबर १९४० ही तारीख घालण्यास हरकत नाहीं व तसें केल्यास त्याचे नांवावर कंपनीनें शेअर नोंदले पाहिजेत." हायकोर्टानें वरीलप्रमाणें निकाल दिला.

---

### मुंबई प्रांताच्या रजिस्ट्रेशन खात्याचा अहवाल

१९४१ सालीं मुंबई प्रांतात एकूण २,७०,५८४ दस्तऐवज नोंदण्यांत आले. १९४० सालाचा तत्सम आंकडा २,६०,७८९ होता. विक्रीच्या व गहाणाच्या खतांमध्यें १९४१ सालीं अनुक्रमें ३.६% व ६.५% वाढ झाली. युद्धजन्य परिस्थितीमुळें लोकांचें स्थावर मिळकतीकडे अधिक लक्ष लागल्याचें हें चिन्ह आहे. सहकारी पतपेढ्यांचे संबंधांतील खतांची संख्या १३,३०६ भरली, त्यांवरील फीचे ३४,७४२ रुपये माफ करण्यांत आले. १,५५६ खतें लँड मॉर्गेज बँकांचे संबंधांतील होतीं, त्यांवरील १२,४०७ रुपयांची फी माफ केली गेली. १९४१ सालीं खात्यास एकूण १५ लक्ष, ६२ हजार रुपये उत्पन्न झालें व त्याचा ५ लक्ष, ९३ हजार रुपये खर्च झाला.

## स्फुट विचार

### पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेची ज्युबिली

पुणें जिल्ह्याची सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक स्थापन झाल्यास येत्या शुक्रवारीं पंचवीस वर्षे पुरीं होतील. ह्या प्रसंगास अनुलक्षून सर जनार्दनराव मदन ह्यांचे अध्यक्षतेखालीं ज्युबिली समारंभ साजरा केला जावयाचा आहे. ह्या इलाख्यांतील सहकारी बँकिंगच्यां क्षेत्रांत पुण्याच्या मध्यवर्ती बँकेनें अग्रेसरत्वाचें स्थान प्राप्त करून घेतलें आहे आणि पंचवीस वर्षांच्या अवधींत तिनें जी यशस्वी कामगिरी केली आहे तिच्याबद्दल ह्या संस्थेच्या चालकांचें हार्दिक अभिनंदन करणें आवश्यक आहे. जिल्ह्यांतील सहकारी पतपेढ्यांस भांडवल पुरवण्याच्या उद्देशानें सार्वजनिक हितासाठीं झटणाऱ्या कित्येक पुढाऱ्यांच्या प्रयत्नानें पुणें सेंट्रल बँकेची स्थापना पंचवीस वर्षांमागें झाली आणि ह्याच भावनेनें तिच्या अनेक डायरेक्टरांनीं ह्या संस्थेच्या वाढीस हातभार लावलेला आहे. जनतेच्या, विशेषतः शेतकरीवर्गाच्या आर्थिक अडचणी दूर करण्याच्या हेतूनें निःस्वार्थीपणानें संस्था चालविण्याची परंपरा अव्याहत रीतीनें ह्या बँकेंत पाळण्यांत येत आहे हा तिचा विशेष येथें नमूद करण्यासारखा आहे. तिच्यामध्यें व्यक्तिशः कर्जे किंवा इतर फायदा मिळवण्याचा प्रश्न नसल्याकारणानें जिल्ह्यांतील प्रमुख मंडळींनें केवळ सार्वजनिक हिताच्या आस्थेनें बँकेचे डायरेक्टर्स या नात्यानें कामें केलीं आहेत, ह्या योगानें जनतेच्या विश्वासास बँक वाढत्या प्रमाणांत पात्र होऊन तिचा सांपत्तिक संसार मूळ अपेक्षेपेक्षाहि अधिक विस्तार पावला आहे. जिल्ह्याची मध्यवर्ती सहकारी बँक ह्या भूमिकेवर ह्या संस्थेनें कार्यक्षेत्र मर्यादित झालेलें आहे आणि तिच्याकडे येणाऱ्या ठेवींच्या पैशाचा विनियोग सहकारी कक्षेंत करणें अशक्य झालें आहे. तथापि, भाग भांडवल, गंगाजळी, सरकारी रोख्यांत गुंतवलेल्या रकमा व रोकड ह्यांच्या दृष्टीनें बँकेची स्थिति अत्यंत बळकट अशी आहे. प्रांतांतल्या इतर सेंट्रल बँकांशीं तुलना केली असतां पुण्याच्या बँकेची सांपत्तिक परिस्थिति विशेष अनुकूल व समाधानकारक असल्याचें दिसून येतें. आर्थिक मंदीमुळें पतपेढ्या खालावल्या असल्या तरी सेंट्रल बँकेनें आपली मजबुती व त्यांस सहाय्य देण्याची वृत्ति हीं अबाधित राखलीं आहेत. ठेवीदारांचा व सामान्य जनतेचा बँकेवरील विश्वास स्पृहणीय असून तो तिच्या चोख व कार्यक्षम व्यवस्थेवर आधारलेला आहे. बँकेचे संस्थापक, माजी व आजी डायरेक्टर्स, व्यवस्थापक व नोकर वर्ग ह्यांस प्रस्तुत ज्युबिली समारंभानें साभिमान समाधान वाटावें असा ह्या संस्थेचा इतिहास आहे आणि आजची स्थितीहि तशीच अभिनंदनीय आहे. बँकेचा असाच उत्तरोत्तर उत्कर्ष होवो असें आम्हीं मनापासून इच्छितों.

---

### मुंबईस धान्याचा पुरवठा

खाद्य पदार्थांचें उत्पादन आणि त्यांची वहातुक व वांटणी ह्यांचे संबंधांत उत्पन्न झालेल्या प्रश्नांचें विवेचन आम्हीं आजच्या अग्रलेखांत केलें आहे. मुंबई सारख्या शहरास खाण्याच्या जिनसांचा पुरवठा बाहेरून व्हावा लागत असल्यानें मालाच्या रेल्वेवहातुकीचें त्यास विशेष महत्त्व आहे. युद्धपरिस्थितीमुळें रेल्वे वाघिणींवर मालाच्या ने-आणीचा मोठा ताण पडत आहे आणि प्रांतिक सरकारास धान्याच्या वहातुकीस अग्रतेचें स्थान मिळवण्याची खटपट करावी लागत आहे. सामान्य जनतेच्या नित्याच्या गरजा निर्वेधपणानें भागल्या जाण्याचें अगत्य ध्यानांत बाळगून मुंबई सरकार त्यासंबंधांत शिकस्तीचे प्रयत्न करीत आहे. त्या सरकारचे सल्लागार, मि. नाइट हे सदरहु खटपटीची माहिती वृत्तपत्रांच्या प्रतिनिधींस वेळोवेळीं देत असल्यानें परिस्थितीचें ज्ञान जनतेस होण्याचें सोइस्कर साधन उपलब्ध झालें आहे. पंजाब व सिंध ह्या प्रांतांतून गहूं मुंबईकडे येण्यासाठी रेल्वे वॅगन्स मिळण्याची व्यवस्था झाली असून तिचा पूर्ण फायदा घेतला जात आहे अशी माहिती मि. नाइट ह्यांनीं नुकतीच दिली. मद्रासच्या बाजूनें तांदूळ व हैदराबादकडून ज्वार येण्याचीहि तजवीज झालेली आहे. महाराष्ट्रांत कालव्यांचे काठीं तयार होणारा गूळ त्याचा उठाव होऊं न शकल्यानें जागजागीं पडून राहूं नये म्हणून त्याची वहातुक मुंबई शहर व मध्यप्रांत ह्यांचेकडे होण्याची तजवीज झाली आहे असेंहि सांगण्यांत आलें. गुळाची कुचंबणा दूर होत आहे ही समाधानाची गोष्ट आहे. मुंबईस कोळशाचा पुरवठा होण्याचे मार्गांत अडचणी आल्या आहेत. मध्यप्रांतांतला कोळसा संयुक्त प्रांतांत जात आहे. तथापि, ह्याहि बाबतींत सरकार खटपट करीत असल्याचें आश्वासन मि. नाइट ह्यांनीं दिलें आहे. केरोसीनच्या तुटवड्यावर उपाय म्हणून राकेलांत भुइमुगाचें तेल मिसळून पहाण्याचे प्रयोग चालू असून ते यशस्वी झाल्यास तो प्रश्नहि सुटण्यास मदत होईल असें ते म्हणाले, नडीच्या गरजा भागवण्यासाठी युक्त्यांची योजना करावी लागते आणि एकाच्या ऐवजीं दुसऱ्या पदार्थाच्या उपयोगानें कार्यभाग साधावा. लागतो ह्या आर्थिक नियमाचें हें उदाहरण आहे. तांदुळाचा तुटवडा पडल्यास त्याची जागा अंशतः जोंधळे व बाजरी ह्यांनीं भरून काढणें आवश्यक होत आहे हा त्यांतलाच प्रकार आहे. जनतेच्या रहाणीवर युद्धपरिस्थितीचा परिणाम अपरिहार्य रीतीनें कसा होत आहे हें विचार करण्यासारखें आहे.

---

### आंतरराष्ट्रीय साखर–करारांतून हिंदुस्थानाची मुक्तता

लंडनमध्यें १९३७ चे आरंभीं एक आंतरराष्ट्रीय साखर परिषद् भरली होती, त्या परिषदेंतील निर्णयांस अनुसरून एक पंचवार्षिक कराराचा मसुदा तयार करण्यांत आला. त्यावर हिंदुस्थान सरकारतर्फे सही करण्यांत आली होती. ह्या परिषदेचे वेळीं हिंदुस्थान सरकारनें स्वकीय हितसंबंधी लोकांचा सल्ला घेतला नाहीं व ब्रह्मदेशाखेरीज इतर देशांकडे साखर निर्गत न करण्याचें बंधन सरकारनें स्वीकारलें. हिंदी मध्यवर्ती असेंब्लीनें ह्या करारास संमति देण्याचें नाकारलें, परंतु अर्थातच त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. ह्या गैरवाजवी नियंत्रणाचा व्यावहारिक परिणाम त्यावेळीं हिंदुस्थानास फारसा प्रतिकूल झाला नाहीं व सध्याच्या युद्धपरिस्थितीमुळें तर १९३७ चा करार आतां नाममात्रच राहिला आहे. साखरेची निर्गत करणारे कांहीं देश शत्रूचे ताब्यांत गेले आहेत व कांहीं देशांना आपली साखर निर्गत करणें क्रमप्राप्त झालें आहे. हिंदी साखरेचें वाढलेलें उत्पादन, तिचा सुधारलेला दर्जा, तीस आजूबाजूच्या राष्ट्रांतून येत असलेली मागणी, सध्याची युद्ध–परिस्थिति इत्यादि अनुकूल गोष्टींमुळें हिंदी साखरेच्या निर्गतीवरील बंधन ह्यापुढें जाचक होणें स्वाभाविक आहे. हें बंधन दूर व्हावें, अशी हिंदी व्यापारी व कारखानदार ह्यांची मागणी होती, ती हिंदुस्थान सरकारच्या ताज्या निर्णयामुळें पुरी झाली आहे. सरकारनें

प्रांतिक सरकारें व हितसंबंधी लोक ह्यांचा सल्ला घेऊन आंतरराष्ट्रीय कराराच्या मुदतवाढींत भाग घ्यावयाचा नाहीं, असें ठरविलें आहे. हिंदुस्थान कांहीं वर्षांपूर्वी साखर मोठ्या प्रमाणावर आयात करीत असे, तो आतां निर्गत करूं लागेल ही अभिमानाची गोष्ट आहे. १ सप्टेंबर रोजीं साखर कराराची मुदत संपली आहे.

---

**हिंदुस्थानांतील गव्हाची लागवड**

**( १९४१–४२ च्या पिकाचा सरकारी अंदाज )**

एकूण लागवड = ३,४८,४९,००० एकर
गेल्या वर्षीचे मानानें घट = २·५%
एकूण उत्पादन = १,००,७०,००० टन
गेल्या वर्षीचे मानानें वाढ = ०·४३%

**लागवड व उत्पादन ह्यांचा तपशील**

| प्रांत अथवा संस्थान | क्षेत्रफळ १००० ए. | उत्पादन १,०००टन | दर एकरीं उत्पादन |
|---|---|---|---|
| पंजाब ... | ११,६१० | ४,३९३ | ८४८ |
| सं. प्रांत ... | ८,००१ | २,६५७ | ७४४ |
| मध्यप्रांत–वऱ्हाड ... | २,९२६ | ४०० | ८०६ |
| मुंबई ... | १,९२० | ३३६ | ३०२ |
| सिंध ... | १,२७६ | ४१० | ७२० |
| बिहार ... | १,३०० | ४८५ | ८३६ |
| सरहद्द प्रांत ... | १,०६२ | २३८ | ५०२ |
| बंगाल ... | १७० | ४१ | ५४० |
| दिल्ली ... | ४५ | ११ | ५४८ |
| अजमीर–मारवाड ... | १५ | ५ | ७४७ |
| ओरिसा ... | ४ | १ | ८०४ |
| मध्य हिंदुस्थान ... | १,९१९ | २८८ | ३३६ |
| ग्वाल्हेर ... | १,३१४ | २९९ | ५१० |
| रजपुताना ... | १,२२० | ३३१ | ६०८ |
| हैद्राबाद ... | १,१२५ | १३४ | २६७ |
| बडोदें ... | ६९ | ४१ | १,३३१ |
| म्हैसूर ... | ३ | ...... | २३७ |
| एकूण ... | ३३,९७९ | १०,०७० | ६६४ |
| १९४०–४१ ची एकूण... | ३४,८४९ | १०,०२७ | ६४५ |

**सुताच्या व्यापाऱ्यांस लायसेन्स**

सुताच्या व्यापाऱ्यांना सरकारी परवाना आवश्यक करणारा नियम १ सप्टेंबर ऐवजी १ ऑक्टोबरपासून अंमलांत येईल, असें मुंबई सरकारनें जाहीर केलें आहे.

**मध्यवर्ती असेंब्ली**

मध्यवर्ती असेंब्लीच्या येत्या बैठकीस ता. १४ सप्टेंबर रोजीं प्रारंभ होईल. १९४३ च्या बजेटाच्या अधिवेशनापूर्वी असेंब्लीचें आणखी दुसरें एकादें अधिवेशन भरणार नाहीं.

**ट्रंक कॉल**

हैद्राबाद संस्थानांतील टेलिफोन अखिल भारतीय टेलिफोन्सच्या जाळ्याशी जोडण्यांत आले आहेत, त्यामुळें हैद्राबाद व सिकंदराबाद ह्या शहरांतील लोकांचें ट्रंक कॉलसचे स्वरूपांत बाहेर दळणवळण सुरू झालें आहे.


मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् को-ऑपरेटिव् बँक, लिमिटेड.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी–सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंग, ९, बेक हाउस लेन, कोट मुंबई.

**शाखा**

| | |
|---|---|
| १ बारामती ( जि. पुणें ) | १८ अकलूज ( जि. सोलापूर ) |
| २ सातारा ( „ सातारा ) | १९ विरमगांव ( „ अहमदाबाद ) |
| ३ इस्लामपूर ( „ „ ) | २० धुळें ( „ प. खानदेश ) |
| ४ कऱ्हाड ( „ „ ) | २१ दोंडाईचें ( „ „ ) |
| ५ तासगांव ( „ „ ) | २२ शिरपूर ( „ „ ) |
| ६ किर्लोस्करवाडी( „ „ ) | २३ शहादें ( „ „ ) |
| ७ शिराळें ( „ „ ) | २४ नंदुरबार ( „ „ ) |
| ८ कोरेगांव ( „ „ ) | २५ साक्री ( „ „ ) |
| ९ वांई ( „ „ ) | २६ शिंदखेडें ( „ „ ) |
| १० अहमदनगर ( „ अहमदनगर ) | २७ तळोदें ( „ „ ) |
| ११ शेवगांव ( „ „ ) | २८ मालेगांव ( „ नाशिक ) |
| १२ कोपरगांव ( „ „ ) | २९ सटाणा ( „ „ ) |
| १३ बेलापूर ( „ „ ) | ३० कळवण ( „ „ ) |
| १४ राहुरी ( „ „ ) | ३१ लासलगांव ( „ „ ) |
| १५ भिवंडी ( „ ठाणें ) | ३२ नांदगांव ( „ „ ) |
| १६ पालघर ( „ „ ) | ३३ दोहद ( „ पंचमहाल ) |
| १७ कल्याण ( „ „ ) | ३४ कालोल ( „ „ ) |

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.

## प्रॉमिसरी नोटेवर लावलेलीं तिकिटें सही वगैरे करून रद्द न केल्यास काय होतें ?

### लाहोर हायकोर्टाचा निवाडा

हकिकतः—अत्ताउल्लानें सजान शहापासून ५,००० रुपये कर्जाऊ घेतले व त्याबाबत त्यास एक प्रॉमिसरी नोट लिहून दिली. ५,००० रुपयांच्या प्रॉमिसरी नोटेवर ०-४-० चीं तिकिटें लावावयास पाहिजे होतीं; त्याप्रमाणें एक एक आण्याचीं चार तिकिटें त्या प्रॉमिसरी नोटेवर लावण्यांत आलीं. तीं सर्व तिकिटें त्यावर सही करून अथवा तारीख लिहून रद्द करावयास पाहिजे होतीं; परंतु त्यापैकीं फक्त ३ तिकिटें अशा प्रकारें रद्द करण्यांत आलीं व चौथें तिकिट तसेंच कोरें ठेवण्यांत आलें. काझम शहानें त्या प्रॉमिसरी नोटेवरून दावा आणला. अत्ताउल्लानें वादीचा दावा सर्वस्वीं नाकबूल केला. प्रतिवादीनें लिहून दिलेली प्रॉमिसरी नोट वादी पुराव्यांत दाखल करूं लागला. तेव्हां प्रतिवादीतर्फे अशी हरकत घेण्यांत आली कीं, 'ज्याअर्थी वादांतील प्रॉमिसरी नोटेवरील चारपैकीं फक्त तीनच तिकिटें रद्द करण्यांत आलीं आहेत व चौथें अगदींच कोरें आहे त्याअर्थी ती प्रॉमिसरी नोट पुराव्यांत स्वीकारतां येत नाहीं.' कोर्टानें त्या हरकतीबाबत आपला निकाल राखून ठेवला व पुरावा घेण्यास सुरुवात केली. पुरावा संपण्यापूर्वी त्या कोर्टाची बदली झाली व त्याचे जागीं नवीन कोर्ट ( जज्ज ) आलें. नवीन कोर्टानें वादांतील प्रॉमिसरी नोट पुराव्यांत घेतां येत नाहीं असें ठरवून वादीचा दावा काढून टाकला, म्हणून त्यानें हें अपील केलें होतें.

मुद्दे व विवेचन—वादांतील प्रॉमिसरी नोटेवरील सर्व तिकिटें रद्द करण्यांत आलीं नसल्यामुळें ती प्रॉमिसरी नोट पुराव्यांत घेतां येते किंवा नाहीं तें आपल्याला पहावयाचें आहे. प्रॉमिसरी नोटेवर तिकिटें कशीं लावावींत, तीं रद्द कशीं करावींत व रद्द न केल्यास पुराव्याचे दृष्टीनें त्या प्रॉमिसरी नोटेवर काय परिणाम होतो ह्या बाबतचा मजकूर स्टँप ॲक्टच्या क्र. २ (११) व क्र. १२ मध्यें सांपडतो. त्यांत असें म्हटलें आहे कीं, "योग्य किंमतीचीं तिकिटें प्रॉमिसरी नोटेवर लावावींत व त्या तिकिटांवर सही करून अथवा तारीख लिहून तीं तिकिटें रद्द करावींत.असें न केल्यास त्या प्रॉमिसरी नोटेवर मुळींच तिकिटें लावण्यांत आलीं नाहींत असें समजलें जाईल" प्रॉमिसरी नोटेवरील तिकिटें अथवा अन्य प्रकारच्या पावत्या अथवा रसिदीवरील तिकिटें रद्द करण्यांत हाच उद्देश असतो कीं, तिकिटें पुन्हां उपयोगांत आणली जाण्याची मुळींच शक्यता असूं नये. वादांतील प्रॉमिसरी नोटेवरील एक तिकीट अगदीं कोरें आहे व तें पुन्हां उपयोगांत आणलें जाण्याचा संभव आहे. सबब आमचें मत असें आहे कीं, वादांतील प्रॉमिसरी नोटेवर मुळीं तिकिटेंच लावण्यांत आली नाहींत, असें समजलें पाहिजे. तिकिटें नसलेली प्रॉमिसरी नोट पुराव्यांत घेतां येत नाहीं. सबब वादांतील प्रॉमिसरी नोट देखील पुराव्यांत घेतां येत नाहीं. प्रॉमिसरी नोट लिहून दिली व कर्ज घेतलें ह्या दोन्ही गोष्टी प्रतिवादी नाकबूल करीत आहे. त्या गोष्टी सिद्ध करण्यासाठीं वादीजवळ जो पुरावा आहे, तो वरील कारणास्तव विचारांत घेतां येत नाहीं. अशा परिस्थितींत वादीचा दावा काढून टाकण्याखेरिज दुसरा इलाज नाहीं.

निकालः—वरील कारणास्तव आम्ही हें अपील खर्चासह काढून टाकतों.व वादीचा दावा काढून टाकण्यांत यावा असा हुकूम देतों.

सारांशः—प्रॉमिसरी नोटेवर तिकिट लावल्यानंतर त्या तिकिटावर प्रॉमिसरी नोट लिहून देणाराची सही घेऊन, तारीख लिहून अथवा अन्य प्रकारें तें तिकिट रद्द करवून घ्यावें. प्रॉमिसरी नोटेवर जितकीं तिकिटें असतील तितकीं सर्व अशा प्रकारें रद्द करविलीं पाहिजेत. तिकिटें रद्द करविलीं नाहींत तर प्रॉमिसरी नोटेवर तिकिटें लावण्यांत आलींच नाहींत असें समजलें जातें व तशी प्रॉमिसरी नोट पुराव्यांत घेतली जात नाहीं. तशा प्रॉमिसरी नोटेवरून दावा लावल्यास तो काढून टाकण्यांत येईल. तिकिटें रद्द करविण्यांत एवढाच उद्देश असतो कीं, तीं तिकिटें पुन्हां उपयोगांत आणलीं जाऊं नयेत. जेणेंकरून ती तिकिटें पुन्हां उपयोगांत आणली जाण्याची शक्यता नाहींशी होईल अशा प्रकारें ती रद्द करावीं. सही करणें अथवा तारीख घालणें हे तिकिटें रद्द करण्याचे दोन राजरोस मार्ग आहेत. (न्यायबोध)

---

### इस्लामपूर को.पीपल्स बँक लि.

( वार्षिक सभा : ५-९-४२ )

वरील बँकेचें भाग भांडवल २९,२१५ रुपये असून तिच्या रिझर्व्ह व इतर फंडांत सुमारें २२ हजार रुपये आहेत. ठेवींची रक्कम २०३/४ हजार रुपये असून बँक कर्जे १२३/४ हजारांचीं आहेत. बँकेकडे येणें कर्जाची रक्कम आतां ५६,०७९ रु. आहे. चौकशीचे तारखेपासूनची ( १०-९-३७ ) बँकेचा कारभार नेटानें चालविलेला असून तिला वसुलीचे कामीं बरेंच यश आलें आहे. अफरातफरीच्या येण्यापैकी ३,८५७ रु. वसूल झालें आहेत व बाकीच्या वसुलीचे प्रयत्न चालू आहेत. "डिसेंबर, १९४० मध्यें ठेवींची रक्कम परत देण्यास बँक असमर्थ होती; परंतु तेव्हांपासून आतांपर्यंतचा खर्च भागवून बी. पी. सी. बँकेकडील कॅश क्रेडिटखात्यास ४,९३७ रु. देऊन आणि ठेवीदारांस ४,७४१ रु. देऊनहि आज ११,८१९ रु. रोकड शिलकेची तरतूद झाली आहे." ३० जून अखेर संपलेल्या वर्षी बँकेस ४,४९१ रुपये नफा झाला, त्यांत मागील शिलकी नफा २८८ रुपये मिळवून त्यांतून व्याज अनामतसाठी ३,४७९ रुपये व रिझर्व्ह फंडांकडे ५३४ रुपये काढून डिव्हिडंडसाठी ७७० रुपये रहातात. त्यांतून भागीदारांस ३% डिव्हिडंड मिळावयाचें आहे. अडचणींत आलेल्या बँकेनें आपला व्यवहार सुरळीत व नेटानें चालवून पुनः प्रगतिपथावर येणाऱ्या प्रस्तुत बँकेचें उदाहरण अनेक संस्थांना उत्साहवर्धक वाटेल. श्री. जी. के. कुलकर्णी हे बँकेचे चेअरमन असून श्री. जी. बी. अंकलगी हे मॅनेजर आहेत.

---

### मुंबई प्रांतिक सहकारी लँड मॉर्गेज बँक लि.

वरील बँकेचें भाग भांडवल आतां ४,९२,७०० रुपये झालें. प्रांतांतील १७ प्राथमिक लँड मॉर्गेज बँका प्रांतिक बँकेकडून जेवढें कर्ज घेतील, त्याच्या ५% इतक्या रकमेचें तरी त्यांनीं प्रांतिक बँकेचें भाग घेतले पाहिजेत, असा नियम आहे. प्रांतिक बँकेचें प्राथमिक बँकांकडे ३० लक्ष, ८३ हजार रु. कर्ज येणें आहे. १९४१-४२ मध्यें प्रांतिक बँकेनें ५ लक्ष, ५४ हजारांचीं नवीं कर्जे दिलीं. येणें असलेले कर्जाचे हप्ते व व्याज ह्यांची अनुक्रमें ८६·१% व १००% वसुली झाली. वर्षअखेरीस बँकेस २१,७६६ रुपये नफा झाला, त्यांतून भागीदारांस २१/२% दरानें डिव्हिडंड मिळणार आहे.

## अर्थशास्त्र

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें ३००; किंमत ३ रुपये
या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

## श्रीराम सिल्क मिल्स लि., बंगलोर

[ कंपनीनें १९४१ अखेर ६ टक्के डिव्हिडंड वांटला आहे. ]

युद्धसाहित्यपुरवठा–खात्याची पॅरेशूटकरितां लागणाऱ्या रेशमी कापडाची ऑर्डर पुरी करण्यासाठी लागणाऱ्या भांडवलाकरितां तूर्त एकूण रु. १ लक्षाच्या रकमेपर्यंत

# ठेवी घेणें आहेत

व्याजाचा दर ४॥ ते ६ टक्के. ठेव किमान रु. ५०० ची असावी. ठेवीवरील व्याज दर सहा महिन्यांनीं दिलें जातें.

श्रीराम सिल्क मिल्स लि., श्रीरामबाग, बसवनगुडी, बंगलोर.

नारायण गोविंद नाईक, ( माजी अध्यक्ष, म्हैसूर चेंबर ऑफ कॉमर्स ) मॅनेजिंग डायरेक्टर

आमच्या कारखान्यांतील माल मुंबईस बॉम्बे स्वदेशी को–ऑपरेटिव्ह स्टोअर्समध्यें व पुण्यास लक्ष्मी रोडवरील रे म्युझिअमच्या व्यापार–संवर्धन–गृहांत पहा.

## महायुद्ध दाराशीं आलें

परदेशी औषधें दुर्मिळ व महाग झालीं

पण

भिण्याचें कारण नाहीं !!!

— कारण —

## आयुर्वेद रसशाळा पुणें लि०

या देशी औषधाच्या प्रसिद्ध कारखान्यानें तयार केलेलीं

- रक्तवर्धक,
- उपनाह,
- बालजीवन,
- कॅल्सीप्राल

*इत्यादि पेटंट, स्टँडर्ड व लोकप्रिय औषधें खात्री पटल्यामुळें*

★ डॉक्टर्सहि वापरूं लागले आहेत. ★

दरसाल बिनचूक नफा वाटणाऱ्या ह्या कंपनीचे शेअर्स व औषधें मागवा.

## आयुर्वेद रसशाळा पुणें लि०

मुख्य दुकान गणपति चौक, लक्ष्मीरोड, पुणें २.

## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

राहाणेची व भोजनाची उत्तम सोय




फोन नं. ७७९ गणपति चौक, व्यवस्थापक.

## N. V. WADNERKAR

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver, Electro-plater & Manufacturer of Sporting Trophies, Medals, Cups etc.

- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -

POONA CITY.

## DECCAN BOOK STALL

Booksellers, Publishers & Subscription Agents
Fergusson College Road, Poona No. 4

(1) We stock and supply Educational books, General books & Library books.

(2) We supply Government of Bombay and Government of India publications.

(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.

(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.


हे पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे. बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
(टपाल हंशील माफ)
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ८ पुणें, बुधवार, तारीख ९ सप्टेंबर १९४२ अंक ३६

## विमेदार नि हवाई हल्ला

शत्रु राष्ट्राकडून हवाई हल्ला अगर तत्सम उपद्रव यापासून बिन-लढाऊ नागरिकांच्या जीविताला येणाऱ्या धोक्याचा समावेश विमा पॉलिसीच्या अटींत होतो काय व त्यासाठी जादा प्रिमिअम भरावा लागेल काय ! असा प्रश्न साहजिकच नागरिकांमध्यें चर्चिला जात आहे.

## ट्रस्ट ऑफ इंडिया

विमा कंपनीच्या

विमा पॉलिसीमध्यें हवाई हल्ल्यामुळें जीविताला होणाऱ्या अपायाचा अंतर्भाव होतो त्याकरितां जादा प्रिमिअम नाहीं.

तरी विलंब न लावतां—
तुमचा नि तुमच्या आप्तेष्टांचा विमा

## ट्रस्ट ऑफ इंडिया

विमा कंपनींतच उतरा.

अध्यक्षः—श्रीमंत सरदार जगन्नाथ महाराज पंडित

माहितीपत्रकें विनामूल्य पाठवूं

ट्रस्ट ऑफ इंडिया विमा कं. लि.
लक्ष्मी रोड, पुणें २

वि. ह. देशमुख, बी. ए.
जनरल मॅनेजर

## महायुद्ध दाराशीं आलें
## परदेशी औषधें
## दुर्मिळ व महाग झालीं

पण

भिण्याचें कारण नाहीं !!!

— कारण —

## आयुर्वेद रसशाळा पुणें लि०

या देशी औषधाच्या प्रसिद्ध कारखान्यानें तयार केलेली

- रक्तवर्धक,
- उपनाह,
- बालजीवन,
- कॅल्सीप्राल

इत्यादि पेटंट, स्टँडर्ड व लोकप्रिय औषधें खात्री पटल्यामुळें

★ डॉक्टर्सहि वापरूं लागले आहेत. ★

दरसाल बिनचूक नफा वाटणाऱ्या ह्या कंपनीचे शेअर्स व औषधें मागवा.

## आयुर्वेद रसशाळा पुणें लि०

मुख्य दुकान गणपति चौक, लक्ष्मीरोड, पुणें २.

महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर

# महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

# विविध माहिती

### बँकांस सुटी

गुरुवार ता. १० रोजीं सुरवाद सालनिमित्त बँका बंद रहातील.

### ब्रिटिश व जर्मन स्त्रियांची देवघेव

सुमारें २८० ब्रिटिश स्त्रिया व मुलें आणि तितक्याच जर्मन स्त्रिया व मुलें ह्यांची देवघेव घडवून आणण्याचा प्रयत्न चालू आहे. ऑक्टोबरच्या प्रारंभीं तुर्कस्तानाकरवीं ही योजना पुरी होईल, अशी अपेक्षा आहे.

### ॲबिसीनिया

ॲबिसिनिया हें राष्ट्र आतां संपूर्णतः स्वतंत्र झालें आहे, असें मानण्यास हरकत नाहीं. आडिस आबाबांतून सर्व ब्रिटिश फौजा काढून घेण्यांत आल्या, त्यावेळीं त्यांस ॲबिसिनियाच्या बादशहांनीं थाटाची मेजवानी दिली. ॲबिसिनियांतील रेल्वे लाइन व फ्रेंच सोमाली लँड जवळील मुलुख हीं वगळून बाकीच्या ठिकाणच्या ब्रिटिश फौजा लवकरच काढून घेण्यांत येतील.

### जर्मन हानी

"युद्धास प्रारंभ झाल्यापासून आतांपर्यंत जर्मनीचे १५ लक्ष सैनिक मृत झाले आहेत. हिटलरला आपल्या विजयाच्या विनिमयांत जर्मन तरुणांचें रक्त द्यावें लागलें आहे. अमेरिका युद्धांत पडल्याबरोबर युद्धाचा निर्णय जाहीर झाल्यासारखाच आहे. १९४२ सालीं युद्ध संपणार नाहीं." पोलंडचे मुख्य प्रधान, जनरल सिकोर्स्की, ह्यांचे उद्गार.

### गणेश चतुर्थीचे प्रसंगीं दुकानांस सवलत

फुलें, भाज्या, मिठाई, नारळ इत्यादींची विक्री करणारीं दुकानें गणेश चतुर्थीचे वेळीं, ता. १३ व ता. १४ रोजीं रात्रीं १० पर्यंत उघडीं राहिलीं तरी चालतील व गणपतीच्या मूर्ती विकणारीं दुकानें मध्यरात्रींपर्यंत उघडीं रहाण्यास हरकत नाहीं. रात्रीं ९ नंतर गणपतीच्या मूर्ती फक्त रस्त्यानें हिंडत विकण्यास प्रत्यवाय नाहीं. दुकानांच्या नोकरवर्गास ठराविक तासांपेक्षां अधिक काम पडलें तर त्यास बॉंबे शॉप्स अँड एस्टॅब्लिशमेंट्स ॲक्टनें सांगितलेल्या दरानें जादा वेतन मिळेल.

### इंपीरिअल बँक ऑफ इंडिया

इंपीरिअल बँकेच्या मुंबई स्थानिक बोर्डावर सर विठ्ठलराव चंदावरकर व मि. स्टिलमन ह्यांची फेरनिवड झाली आहे.

### हैद्राबाद संस्थानांतील शहरें

हैद्राबाद संस्थानांतील चार प्रमुख शहरांची लोकसंख्या खालीलप्रमाणें आहे:—हैद्राबाद: ७,३९,१५९; वरंगळ: ९२,८०२; गुलबर्गा: ५३,५५१ व औरंगाबाद: ५०,९२४. संस्थानांतील लहान शहरांचा अनुक्रम खालीलप्रमाणें आहे:—जालना: ३८,०९६; नांदेड: ३६,६८९; रायचूर: ३४,९७३ व निजामाबाद: ३२,७४१. लातूर, परभणी व बिदर ह्यांची लोकसंख्या अनुक्रमें २४,९८५; २१,६८३; व २०,५१४ अशी आहे. उरलेल्या १२७ शहरांपैकीं २७ शहरांची लोकसंख्या १० व २० हजारांचे दरम्यान असून बाकीच्या १०० शहरांची लोकसंख्या ५ आणि १० हजारांच्या दरम्यान आहे.

### कलकत्ता कॉर्पोरेशनला सरकारी मदत

कलकत्ता कॉर्पोरेशनची तातडीची आर्थिक अडचण दूर करण्याकरितां बंगाल सरकार त्यास १० लक्ष रुपये उसनवार देणार आहे.

### ३% डिफेन्स कर्जरोखे

३% १९५१-५२ च्या डिफेन्स कर्जरोख्यांच्या खालील किंमती सरकारनें जाहीर केल्या आहेत, त्या दरानें हे रोखे मिळूं शकतील.

| | रु. आ. पै |
|---|---|
| १५ सप्टेंबर ते १९ सप्टेंबर | १००—०—० |
| २१ सप्टेंबर ते २६ सप्टेंबर | १००—०—८ |
| साप्ताहिक वाढ | ०—०—८ |

१४ मार्च, १९४३ अखेरच्या सहामाहीचें व्याज १५ मार्च रोजीं मिळेल.

### हिंदी डिफेन्स कर्जरोखे

सर्व प्रकारच्या डिफेन्स लोन्समध्यें मिळून जून १९४० पासून २९ ऑगस्ट अखेर एकूण १२० कोटि, ६४३ लक्ष रुपये जमा झाले आहेत.

### दिल्ली-सिमला येथील कचेऱ्या

सिमल्यांतील कित्येक कचेऱ्या थंडीचे मोसमासाठी दिल्ली येथें १० ऑक्टोबर रोजीं येतील. ईस्टर्न ग्रुप सप्लाय कौन्सिलची कचेरी सिमला येथेंच राहील. गेल्या थंडीचे मोसमाचे मानानें येत्या मोसमांत जास्त लोकांची दिल्ली येथें रहाण्याची सोय होणार आहे.

### हत्तींची सक्तीनें नोंद

आसाम प्रांतांतील सर्व हत्तींची नोंद केलीच पाहिजे, असें जाहीर करणारा हुकूम आसाम सरकारनें डिफेन्स ऑफ इंडिया रूल्सखालीं काढला आहे.

### रशियन पेट्रोल

कॉकेशस विभागांतील पेट्रोलच्या खाणी वगळल्या तरी बाकीच्या रशियन खाणींचें पेट्रोलचें उत्पादन बरेंच वाढलें आहे.

### खराब रबर टाकून देऊं नका

खराब अथवा रद्दी झालेलें रबर नष्ट करणें अथवा टाकून देणें हा ग्रेटब्रिटनमध्यें गुन्हा समजण्यांत येतो.

### ९० हजार रुपयांची 'मिळकत' प्राप्ति

कर वजा केला असतां अमेरिकेंत कोणाचेंहि वार्षिक उत्पन्न ९० हजार रुपयांपेक्षां अधिक असतां कामा नये, असे उद्गार प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांनीं नुकतेच काढले. त्यामुळें अमेरिकेंतील लखाधीशांत खळबळ उडाली आहे.

### धर्माचें महत्त्व

युद्धोत्तर जीवनांत धार्मिक बाबींस योग्य तें स्थान मिळालें पाहिजे, अशी सूचना तेथील हुजर पक्षानें केली आहे. राष्ट्रीय जीवनास धार्मिक पाया असल्याविना त्यास बळकटी येणार नाहीं, असें त्यांचें म्हणणें आहे.

### केरोसीनऐवजी तेलाचें मिश्रण

केरोसीनऐवजी ३० % केरोसीन, ६९% भुइमुगाचें तेल व १% सल्फ्युरेटेड एरंडेल ह्यांचें मिश्रण जाळलें असतां चांगला उजेड पडूं शकतो, असा शोध हैद्राबाद येथील एका शास्त्रज्ञानें लावला आहे. तो यशस्वी ठरल्यास लोकांना हें मिश्रण वापरण्याची शिफारस सरकार करील, असें मि. नाइट, मुंबईच्या गव्हर्नरांचे सल्लागार ह्यांनीं सांगितलें.

अनुक्रमणिका

| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | २८४ | ५ युद्धोत्तर आर्थिक सुस्थितीची व्यवस्था ... | २८६ |
| २ ब्रिटिश बँकांच्या व्यवहारांची नवीन दिशा | २८५ | ६ स्फुट विचार ... | २८७ |
| ३ चेकचा पावतीसारखा उपयोग ... ... | २८६ | युद्धाची तीन वर्षे—व्यापाऱ्यांच्या कारवाया—कराड अर्बन को. बँक लि. | |
| ४ विमा पॉलिसीसंबंधीं निवाडा ... ... | २८६ | ७ पुणें सें. को. बँकेचा रौप्यमहोत्सव ... | २८८ |

अर्थ

बुधवार, ता. ९ सप्टेंबर, १९४२

## ब्रिटिश बँकांच्या व्यवहारांची नवी दिशा

हिंदुस्थानांतील बँकांचें भाग भांडवल, ठेवी, रोख्यांतील गुंतवण आणि कर्जें ह्यांवर युद्धपरिस्थितीचा परिणाम कसा होत चालला आहे ह्याकडे वेळोवेळ लक्ष पुरवणें आवश्यक आहे. युद्धसामुग्रीच्या बनावटींत गुंतलेल्या कारखान्यांत भांडवल व कामकरी मुख्यत्वेंकरून गुंतल्याकारणानें जनतेच्या मामुली व्यवहारांस पैसा कमी प्रमाणांत लागतो आणि तो रिकामा रहाण्याची प्रवृत्ति वाढते. ह्याच कारणामुळें लोकांचा नेहमीचा खर्च मर्यादित होतो. सामान्य उपयोगाच्या जिनसांचें उत्पादन व व्यापार ह्यांचा व्याप आकुंचित झाल्याचा हा परिणाम आहे.. कर व सरकारी कर्जें ह्यांच्या मार्गानें जनतेचा पैसा सरकारी तिजोरीकडे वळतो हें खरें असलें तरी त्यांतली बरीचशी शिल्लक उरते आणि ती बँकांच्याकडे ठेवींच्या स्वरूपांत आश्रय घेते. अलीकडे हिंदी बँकांनीं आपले व्याजाचे दर उतरवले आहेत तरी त्यांच्याकडे जाणारा ठेवींचा ओघ कमी न होतां वाढतच असल्याचें दिसतें हें वरील प्रवृत्तीचें स्पष्ट लक्षण आहे. हिंदुस्थान सरकारच्या ट्रेझरी बिलांत बँकांचा व इतर संस्थांचा पैसा मोठ्या प्रमाणावर घातला जात असून त्यांवरील व्याजाचा दरसाल दरशेंकडा दर सहा आणे सहा पै इतका अल्प झाला आहे हें तरी चिन्ह ह्याच परिस्थितीचें आहे. युद्धामुळें कांहीं लोकांची कमाई वाढते, पण तिचा संबंध खर्च माल न मिळाल्यामुळें होऊं शकत नाहीं आणि ह्या शिलकेची देशांतल्या मोकळ्या पैशांत भर पडते. एका बाजूनें बँकांचेकडे ठेवींचा पैसा येतो, पण दुसऱ्या बाजूनें तो कर्जाऊ देण्यास पुरेसा वाव मिळत नाहीं. मामुली धंदे व व्यापार ह्यांचें क्षेत्र संकुचित झाल्यानें बँकांकडून कर्जाऊ पैसा घेण्याची त्यांस विशेष संधी नसते. ह्यामुळें बँकांच्या ताळेबंदांचें मामुली स्वरूप बदलून जातें आणि त्यांच्या देण्याघेण्याच्या परस्पर-प्रमाणांत महत्वाचे बदल घडून येतात.

ह्या बाबतींत ब्रिटिश बँकांच्या व्यवहारांचा कल कोणीकडे आहे ह्याचें दिग्दर्शन स्टॅटिस्ट नांवाच्या सांपत्तिक विषयांच्या चर्चेस वाहिलेल्या इंग्लिश साप्ताहिकानें नुकतेंच केलें आहे तें ह्या देशांतील बँकिंगच्या परिस्थितीच्या दृष्टीनें बोधप्रद आहे. गेल्या डिसेंबर अखेरच्या बारा महिन्यांत प्रमुख ब्रिटिश बँकांच्या एकूण ३३२ कोटि पौंडांच्या ठेवींत पूर्वीच्या वर्षीच्या मानानें सुमारें ५३ कोटि पौंडांचा वाढावा झाला. १९४० च्या बारा महिन्यांचे हे आकडे अनुक्रमें करून २८० कोटि व ३६ कोटि पौंड असे होते. म्हणजे १९४० मध्यें सुमारें १५ टक्क्यांचा वाढावा झाला होता तो १९४१ सालीं १९ टक्केपर्यंत चढला. इकडे ठेवी वाढत असतां बँकांचें भाग भांडवल आहे तसेंच रहातें. तेव्हां ह्या दोहोंचें परस्पर प्रमाण काय असावें असा प्रश्न उभा रहातो. ठेवींचा विस्तार होऊं लागला कीं त्यांच्या वाढीच्या मानानें बँकांनीं आपलें भाग भांडवल वाढवावें किंवा कसें? ठेवी ह्या बँकांनीं घेतलेलीं एक प्रकारचीं कर्जें असल्यानें त्यांचा त्यांच्या एकूण भाग भांडवलाशी वस्तुतः कांहीं निश्चित संबंध नाहीं, तरीहि ठेवींच्या मुदती आणि त्या परत करण्यास लागणारा मोकळा पैसा ह्यांचें परस्पर प्रमाण लक्षांत घेऊन स्वतःच्या भागांचें भांडवल वाढवण्याच्या आवश्यकतेचा विचार बँका करीत असतात असें स्टॅटिस्ट म्हणतो. सात प्रमुख ब्रिटिश बँकांच्या प्रसिद्ध झालेल्या १९३९–४१ ह्या तीन वर्षांच्या आकड्यांचें निरीक्षण केलें असतां असें दिसतें कीं त्यांचें भाग-भांडवल व गंगाजळी मिळून होणाऱ्या रकमेचें संबंद देण्याशी प्रमाण १९३९ मध्यें ५·१, १९४० मध्यें ४·६ व १९४१ मध्यें ३·९ टक्के असें होतें. ह्याच तीन वर्षांत वरील बँकांनीं रोख्यांत गुंतवलेल्या एकूण रकमांची वाढ ५६ कोटि पौंडांपासून ९३ कोटि पौंडांपर्यंत झाली. ह्या रोख्यांच्या बाजारी किंमतींत थोडीशी घट झाली तरी त्या योगानें बँकांस नुकसानीविषयीं काळजी उत्पन्न होते. स्टॅटिस्ट पत्र म्हणतें कीं, प्रत्येक चांगल्या बँकेपाशी प्रसिद्ध न केलेली अशी गंगाजळी नेहमीं असते आणि वरील प्रकारच्या नुकसानीचे अडचणींचे प्रसंगीं ह्या रिझर्व्हचा उपयोग करतां येतो. ह्या कारणानें ब्रिटिश बँकांस आपलें भाग भांडवल वाढविण्याची जरूर भासेल असें वाटत नाहीं. शिवाय, बँकांच्या गुंतवणींचे रोखे बहुतेक अल्प मुदतीचे आहेत आणि आपल्या कर्जांवरील व्याजाचा दर हलका राखण्याचें व युद्ध संपल्यावरहि कांहीं काळपर्यंत रोखे-बाजाराचें नियंत्रण कायम ठेवण्याचें आश्वासन ब्रिटिश सरकारनें दिलें आहे. तसेंच, सरकारी नियंत्रण दूर होण्याचा प्रसंग येईतों बराच काळ लोटावयाचा असल्यानें बँकांनीं धारण केलेल्या रोख्यांच्या किंमतींत घट होऊन त्यांस नुकसान येण्याची फारशी भीति नाहीं असें स्टॅटिस्ट पत्राचें मत आहे. असें असलें तरी ठेवी सारख्या वाढत गेल्यास त्यांच्या वाढाव्याच्या प्रमाणांत बँकांस स्वतःचें भाग भांडवल वाढवणें आवश्यक झाल्यावांचून रहाणार नाहीं. रोख्यांत अधिक गुंतवण व गिऱ्हाइकांस दिलेल्या कर्जांत घट अशी दुहेरी प्रवृत्ति ब्रिटिश बँकांच्या व्यवहारांत दिसून येते ती युद्धपरिस्थिति लक्षांत घेतां अपरिहार्य असल्याचें वर आम्हीं दर्शवलेंच आहे.

ब्रिटिश बँकांच्या ताळेबंदांतलीं वैशिष्ट्यें आज हिंदी बँकांच्या व्यवहारांतहि आढळतात. ही परिस्थितीच्या साम्यामुळें स्वाभा-

विक गोष्ट आहे असें म्हटलें पाहिजे. हिंदी शेड्यूल्ड बँकांविषयींचे महत्त्वाचे अलीकडचे आकडे खाली दिले आहेत:—

| | कोटि रुपये |
|---|---|
| बिनमुदत ठेवी | २९६ |
| मुदतीच्या ठेवी | ९६ |
| रोकड | १२ |
| रिझर्व्ह बँकेंत शिलक | ६६ |
| दिलेलीं कर्जे | ८३ |

एकूण ठेवी ३९२ कोटी रुपये आणि दिलेलीं कर्जे ८३ कोटि रुपये, म्हणजे ठेवींच्या केवळ २२ टक्के कर्जे असें प्रमाण पडलें. कर्जाच्या मार्गानें किफायतशीर रीतीनें पैसा गुंतवतां न आल्या-कारणानें बँकांस तो रोख्यांत कमी व्याजानें अडकावून ठेवणें अपरिहार्य होतें. ठेवींवरच्या व्याजाचा -दर उतरवण्यावांचूनहि त्यांस गत्यंतर नसतें हें उघड आहे.

## चेकचा पावतीसारखा उपयोग

चेकनें व्यवहार केला तरी त्याची वेगळी पावती घेण्याची वहिवाट आहे आणि त्यामुळें कागद आणि मनुष्यबळ व वेळ ह्यांचा निष्कारण व्यय होतो, हें सध्याच्या युद्धपरिस्थितींत विशेषत्वानें दिसून आलें आहे. चेकचा व्हाउचर म्हणून उपयोग होऊं शकला, तर हा व्यर्थ व्यय टळण्याजोगा आहे. चेकवरतीच पावतीवजा मजकूर लिहावा, अशी सूचना करण्यांत येते, ती मात्र बँकिंगचे व्यवहारास धरून नाहीं. चेकवर पैशाची पोच दिली तरच त्याचे पैसे बँकेनें द्यावे असें म्हटलें तर चेकचें बिल ऑफ एक्सचेंजचें स्वरूप नाहींसें होईल. बिल ऑफ एक्सचेंज (चेक, हुंडी, प्रॉमिसरी नोट) मध्यें पैसे देण्याबद्दलचा हुकूम नमूद असतो, तो कोणत्याहि अटींनीं नियंत्रित असलेला चालत नाहीं.

चेकचे पैसे, त्याबद्दल चेकवर पावती लिहून मिळाल्यासच चुकते करावे, असा बँकेस हुकूम दिल्यास व बँकेनें तो मानल्यास, बिल ऑफ एक्सचेंजच्या कायद्याचें बँकेस संरक्षण मिळणार नाहीं हें उघड आहे. बँकेनें बिनशर्त पैसे द्यावेत असा चेकचा हुकूम असेल, तर चेकवरील पैशाच्या पावतीची सही ही 'एन्डॉर्समेंट' समजली जाणार नाहीं, म्हणजे त्या सहीनें चेकच्या मालकी हक्काची वर्गावर्गी करितां येणार नाहीं. अमेरिकेमध्यें चेकचें व्हाउचर असलें म्हणजे वेगळ्या पावतीची मागणी सहसा केली जात नाहीं, परंतु इंग्लंडमध्यें अथवा हिंदुस्थानांत हिशेब तपासनीस प्रत्यक्ष पावतीच पहावयास मागतात. चेकचे पाठीवर दोन सह्या केल्या—एक एन्डॉर्समेंटची व दुसरी पावतीची—तर काम भागण्याजोगें आहे, परंतु बँकेला दिलेला हुकूम हा मात्र बिनशर्त असला पाहिजे. ह्याहिपेक्षां आणखी सोपा असा एक उपाय सुचविण्यांत आला आहे; सध्याच्या चेकचे ऐवजीं 'नॉन ट्रॅन्स्फरेबल' म्हणजे ज्याचे पैसे फक्त ज्याचे नांवानें चेक काढला असेल त्यासच मिळतील असा चेक व्यवहारांत आणावा, हा तो उपाय होय.

चेकवर एकाखाली एक ह्या प्रमाणें अनेक सह्या (एन्डॉर्समेंट) करून चेकवरील मालकी हक्काची सुलभतेनें वर्गावर्गी करतां येते, परंतु बहुसंख्य चेकचे पैसे ज्याचें मूळ नांव घातलें आहे, असाच इसम बँकेंतून चेकचे पैसे मोडून आणतो, असा अनुभव आहे. तेव्हां वर सांगितल्याप्रमाणें 'नॉन ट्रॅन्स्फरेबल' चेकच वापरले तर पावती मिळण्याची अडचण उरणार नाहीं, हें उघड आहे. ज्यांचें बँकेंत खातें नाहीं, अशा लोकांना मिळालेल्या चेकचे पैसे वसूल करणें अवघड जाईल, परंतु बँकांना योग्य चौकशी करून त्यांचीहि सोय पहातां येईल.

विमा पॉलिसीसंबंधीं निवाडा

## झालेला रोग गुप्त राखल्याचा परिणाम

### मुंबई हायकोर्टाचा निकाल

नगिनदासनें ग्रेट ईस्टर्न लाइफ ॲशुअरन्स कंपनीची १५ हजार रुपयांची विमा पॉलिसी १८ ऑगस्ट, १९३७ रोजीं घेतली व ती ७ नोव्हेंबर, १९३७ रोजीं जमनादासला बेचन केली. नगिनदासनें १ डिसेंबर, १९३७ रोजीं त्याच कंपनीकडे आणखी १० हजारांचा विमा उतरविला व तें विमापत्र मगनलालला बेचन केलें. नगिनदास २६ जानेवारी १९३८ रोजीं आपल्या वयाच्या ४४ व्या वर्षी मरण पावला.

"नगिनदास गुप्त रोगानें पीडित होता व त्यासाठीं डॉ. वैष्णव ह्यांचें ११ जून ते २७ जुलै १९३६ पर्यंत व पुनः एप्रिल १९३७ मध्यें त्यास औषध चालू होतें. नगिनदासनें ही गोष्ट कंपनीच्या प्रपोजल फॉर्ममधील उत्तरांत सांगितली नाहीं, सबब महत्त्वाची गोष्ट गुप्त राखल्यामुळें दोन्ही पॉलिसींचा पायाच नाहींसा होतो" असें कंपनीचें म्हणणें होतें व त्यास अनुसरून कंपनीनें विम्याचे पैसे वादी जमनादास व मगनलाल ह्यांस देण्याचें नाकारलें. मुंबई हायकोर्टांत हा प्रश्न आला, तेव्हां हायकोर्टानें त्यांचें अपील नामंजूर केलें. नगिनदासच्या अखेरच्या दुखण्यांत ज्या डॉक्टराचें औषध चालू होतें, त्यानें रोगी तीन आठवड्यांच्या हगवणीनें मेला, अशी साक्ष दिली. तथापि, हायकोर्टानें डॉ. वैष्णवांचेंच म्हणणें ग्राह्य ठरविलें. "त्यांनीं रोगाचें निदान "सिफिलिस" असें केल्यानंतर हें निदान बरोबर होतें कीं चूक होतें, हा प्रश्नच उद्भवत नाहीं. प्रपोजल फॉर्मवरील प्रश्नाचें उत्तर देतांना नगिनदासनें त्यास झालेला रोग नमूद करणें आवश्यक होतें. हें नमूद न करणें म्हणजे कंपनीची जाणूनबुजून दिशाभूल, व फसवणूक करणें होय. सबब, दोन्ही पॉलिसींचा आधारच नाहींसा होतो." असा हायकोर्टाचा अभिप्राय पडला व निवाडा कंपनीतर्फे झाला.

## युद्धोत्तर आर्थिक सुस्थितीची व्यवस्था

### ग्रेटब्रिटनचे प्रेसिडेंट ऑफ दि बोर्ड ऑफ ट्रेड, मि. ह्यू डाल्टन, ह्यांचे उद्गार

"ब्रिटिश लोकांना पुरवावयाच्या नित्योपयोगी जिनसांत ह्यापुढें आणखी फारशी कपात करणें शक्य होणार नाहीं व ज्या जिनसांची मामुली काळांत वास्तविक निर्गत व्हावयाची अशा जिनसा ग्रेटब्रिटनमध्येंच उपयोगांत आणाव्या लागतील. युद्धोत्तर काळांत निर्गतीचें महत्व पुष्कळच राहील. आपली अदृश्य निर्गत बरीच कमी होईल व अन्नपुरवठा आणि कच्चा माल ह्यांच्या आयातीची आवश्यकता कायम राहील. हा आंतरराष्ट्रीय प्रश्न सोडविण्याचें कामीं आपण पुढाकार घेतला पाहिजे. ब्रिटिश साम्राज्य, अमेरिका व रशिया ह्यांचेमध्यें चालू असलेलें सहकार्य युद्धानंतरहि टिकलें पाहिजे."

## स्फुट विचार

### युद्धाचीं तीन वर्षें

चालू युद्धास प्रारंभ होऊन तीन वर्षें पुरीं झालीं आहेत आणि चौथ्या वर्षांत त्यानें पदार्पण केलें आहे. ह्या प्रसंगीं एकूण युद्ध-परिस्थितीचा आढावा घेऊन पुढील घडामोडींची कल्पना करणें आवश्यक आहे. हें कार्य हिंदुस्थानचे सर सेनापति, जनरल वेव्हेल, ह्यांनीं रेडिओवरील आपल्या भाषणांत गेल्या आठवड्यांत अधिकारयुक्त रीतीनें केलें असल्यानें त्यांतील मुख्य मुद्दे लक्षांत घेणें सोयीचें व उपयुक्त ठरेल. आपल्या स्वतःच्या दोषांचा व निराशाकारक घटनांच्या अपयशाचा सारखा विचार करीत राहून शत्रूचें बल व यश ह्यांचा बडेजाव करण्याची कित्येकांची प्रवृत्ति असते. तिच्याऐवजी स्वतःस अनुकूल असलेली परिस्थिति व शत्रूच्या अडचणी ह्यांचा हिशेब मांडणें अधिक चांगलें आहे असें म्हणून सर सेनापतींनीं ह्या बाबतींतला आढावा पुढें मांडला. त्यांतली अत्यंत महत्त्वाची अनुकूल बाब म्हटली म्हणजे मित्र-राष्ट्रांच्या बाजूस असलेलें महान् देशांचें बळ ही होय. ब्रिटिश साम्राज्य, अमेरिका, रशिया व चीन हे देश आपल्या बाजूस एकवटले असून, पोलंड, ग्रीस, बेल्जम, नॉर्वे इत्यादि देशांची सहानुभूति व सहाय यांची जोड त्यांस मिळाली आहे. आपा-पल्या लोकांच्या निश्चयाचे व ध्येयवादाचे मि. चर्चिल, प्रेसिडेंट रूझव्हेल्ट, स्टॅलिन व चँग-काय शेक ह्यांच्यासारखे खंबीर पुढारी मित्रराष्ट्रांस लाभले आहेत ही दुसरी उत्तेजनदायक महत्त्वाची बाब आहे. तिसरी बाब युद्धसामुग्रीच्या वाढत्या पुरवठ्या-संबंधाची आहे; आणि अखेर ज्या उच्च ध्येयासाठी मित्रराष्ट्रें लढत आहेत, त्यांचें स्फूर्तिदायकत्व ही चौथी गोष्ट अत्यंत सहाय-कारक म्हणून नमूद केली पाहिजे. त्याच्या उलट शत्रु-राष्ट्रांच्या स्थितीकडे पहा. जर्मनीस कांहीं जय मिळाले असले तरी त्यास कोणीहि मित्र नाहीं आणि कोणतेंहि राष्ट्र त्याच्या कह्यांत रहा-ण्यास तयार नाहीं. हंगेरी व रुमानिया कुत्र्यांप्रमाणें जर्मनीच्या मागें जात आहेत, एवढेंच. युद्धक्षेत्र युरोपांत विस्तार पावत जात आहे त्या मानानें वाढत जाणाऱ्या अंतरामुळें शत्रूच्या वहातुकी-च्या अडचणी अधिकाधिक जाचक होत आहेत. सबंध युरोपभर जर्मनीस कट्टे शत्रू निर्माण झाले असून त्यांचीं बंडें मोडून टाकण्या-साठी त्यास निरपराधी लोकांचे बळी द्यावे लागत आहेत. भविष्य-काळासंबंधानें प्रत्यक्ष जर्मन सैन्यांत चिंता उत्पन्न झाली आहे. जर्मन जनतेची उपासमार चालली असून तिचें मन उदास झालें आहे. इटलीविषयीं बोलावयाचें तर त्याचा पराजय होऊन त्याचें युद्ध केव्हांच संपलें आहे. जपानला प्रथम विजय सहज मिळूं शकले, पण आतां ह्यापुढें प्रगति होण्याची आशा खुंटावयास ला-गून त्याच्या भाग्यास ओहोटी लागली आहे. ह्याचा अर्थ असा नव्हे कीं, मित्रराष्ट्रांनीं आतां आपले प्रयत्न शिथिल करावे असें बजावून जनरल वेव्हल म्हणाले कीं, शत्रूवर पूर्ण विजय मिळेपर्यंत त्यांनीं आपली शिकस्त करीत राहिलें पाहिजे आणि उत्पन्न होत असलेल्या अनुकूल परिस्थितीचा सर्व प्रकारांनीं फायदा घेतला पाहिजे.

---

### व्यापाऱ्यांच्या निषिद्ध कारवाया

अनधिकारानें मालाचा व्यवहार करणें, ठरलेल्या भावापेक्षा गिऱ्हाइकांकडून अधिक किंमती घेणें इत्यादि कायद्याविरुद्ध कृत्यें व्यापारी व दुकानदार ह्यांचे हातून घडत असल्याविषयीं तक्रारी ह्या देशांत व प्रांतांत ऐकूं येत असून असल्या गुन्ह्यांस शिक्षाहि दिल्या जात आहेत. ह्या विषयींचा बंदोबस्त अधिक कडक रीतीनें केला जावा आणि जनतेच्या अडचणी दूर व्हाव्या अशा सूचना प्रांतिक सरकारास करण्यांत आल्या आहेत. अन्नसामु-ग्रीच्या पुरवठ्याचे बाबतींत इंग्लंडमध्यें जारी असलेल्या कायद्या-विरुद्ध वर्तन करणारांवर खटले मोठ्या प्रमाणावर होत आहेत अशी एतद्विषयक माहिती प्रसिद्ध झाली आहे तीवरून दिसून येतें. गेल्या एप्रिल महिन्यांत २४८७ लोकांवर खटले भरण्यांत आले व २३२३ जणांवर आरोप शाबीत झाला. त्यांपैकीं ७९७ लोकांस प्रत्येकी एक पौंड दंड झाला; ८२६ इसमांस प्रत्येकी १ ते ५ पौंड; २४६ जणांस प्रत्येकी ५ ते १० पौंड, १०६ जणांस १० ते २० पौंड आणि १०८ इसमांस २० पौंडांचेवर दंड झाला. ५६ इसमांस कारागृहवासाची शिक्षा देण्यांत आली. एकूण आरोपींपैकीं २७८ घाऊक व्यापारी होते, ९८९ किरकोळ व्यापारी होते व १०५६ इतर होते. मोठ्या प्रमाणावर बेकायदा व्यवहार करणाऱ्या कारवायांविरुद्ध मोहीम चालवण्याचा आपला विचार असल्याचें ब्रिटिश बोर्ड ऑफ ट्रेडनें जाहीर केलें आहे. त्या कारवायांचा जनतेस अधिक उपद्रव होत असल्यानें त्यांचा बीमोड व्हावा आणि अपराध्यांस होणाऱ्या शिक्षांविषयीचे आकडे प्रसिद्ध केले जावे असें लोकमत इंग्लंड-मध्यें व्यक्त केलें जात आहे. आमचे इकडे त्यापासून योग्य तो बोध घेतला जाईल अशी आशा आहे.

---

### कराड अर्बन को. बँक लि.

#### ( वार्षिक सभाः १३-९-४२ )

वरील बँकेच्या ७११ सभासदांनीं ४९,३८० रुपयांचे भाग घेतलेले आहेत. बँकेच्या रिझर्व्ह फंडांत १९३⁄४ हजार रुपये असून, इतर फंड २८३⁄४ हजारांचे आहेत. बँकेंत एकूण ५ लक्ष, २१ हजारांच्या ठेवी आहेत. तिची हातांतील व इतर बँकांतील शिल्लक मिळून ८४३⁄४ हजार रुपये आहेत. बँकेनें २ लक्ष ६५ हजारांचे सरकारी रोखे घेतले आहेत, ते धरून एकूण इन्व्हेस्टमेंट २ लक्ष, ७१ हजारांची आहे. मिळकत खरेदी खातीं १५३⁄४ हजार रुपये असून, बँकेनें दिलेल्या कर्जाचा आंकडा २ लक्ष, ७३ हजार रुपये आहे. त्यापैकीं जंगम माल व सोनें ह्यांच्या तारणावरील कर्ज २ लक्ष, २८ हजारांचें आहे. बँकेचें भाग भांडवल, ठेवी, रिझर्व्ह फंड, खेळतें भांडवल ह्यांत सालोसाल वाढ होत असून थकबाकीचें प्रमाणहि उतरत आहे. अहवालाचे सालअखेर तें ९% आहे. वर्षअखेर बँकेस निवळ नफा ९,३७६ रुपये झाला. भागीदारांस ७३⁄४% दरानें डिव्हिडंड देण्याकडे ३,६७५ रुपयांचा विनियोग होईल. कराड सहकारी खरेदी-विक्री सोसायटी लि. चें कामकाज बँकेच्या देखरेखीखालीं चांगलें चाललें आहे. तिचेमार्फत अहवालाचे वर्षी १ लक्ष २७ हजार रुपये किंमतीच्या मालाची विक्री झाली. ह्या सोसायटीचा वर्ग बँकेच्या दीड वर्षाचे कारभाराचे मुदतींत 'ड' चा 'ब' झाला आहे, ही गोष्ट विशेष उल्लेखनीय आहे. बँकेच्या इमार-तीच्या दुसऱ्या मजल्याचें काम पुरें झाल्यावर चालू वर्षांत बँकेच्या रौप्य ज्युबिलीचा उत्सव साजरा होईल, अशी अपेक्षा आहे. "बँकेचे चेअरमन, श्री. ल. म. देशपांडे बँकेच्या कारभारांत कळकळीनें लक्ष घालतात. इतर डायरेक्टर व मॅनेजिंग डायरेक्टर ह्यांचा त्यांना पूर्ण पाठिंबा आहे" असा अभिप्राय गव्हर्मेंट स्पेशल ऑडिटरनीं व्यक्त केला आहे. श्री. व्यंकटेश पांडुरंग जोशी हे बँकेचे मॅ. डायरेक्टर असून श्री. ग. वि. खंडकर हे मॅनेजर आहेत.

---

# पुणें सेंट्रल को. बँकेचा रौप्यमहोत्सव

पुणें सेंट्रल को. बँकेचा रौप्यमहोत्सव शुक्रवार, ता. ४ सप्टेंबर रोजीं गोखले हॉलमध्यें सकाळीं ९ वाजतां सर जनार्दनपंत मदन, मुंबई सहकारी खात्याचे माजी रजिस्ट्रार व गव्हर्नरांचे सल्लागार ह्यांचे हस्तें मोठ्या उत्साहानें पार पडला. स्वागतपर पद्यानंतर, बँकेचे अध्यक्ष, श्री. म. धों. विद्वांस ह्यांचें स्वागतपर भाषण झालें. मॅनेजिंग डायरेक्टर, श्री. द. दि. चितळे ह्यांनीं समारंभासाठीं आलेले संदेश वाचून दाखविल्यानंतर सर जे. ए. मदन ह्यांचें अध्यक्षीय भाषण झालें. प्रो. वा. गो. काळे व श्री. ना. वि. भोंडे ह्यांच्या आभार-प्रदर्शक भाषणानंतर वंदेमातरम् गीत होऊन समारंभ समाप्त झाला.

## श्री. विद्वांस यांचें भाषण

बँकेच्या स्थापनेपासून गतवर्षापर्यंत बँकेच्या अध्यक्षस्थानीं अकरा सद्गृहस्थ विराजमान झाले. या बँकेचें भाग्य एवढें मोठें आहे कीं, ते सर्व विद्यमान् असून त्यांपैकीं बहुतेक सर्व आज येथें उपस्थित आहेत.

हिंदुस्थानांत मध्यवर्ती सहकारी बँकांची एकूण संख्या जरी ६०० पर्यंत असली तरी पांच लाखांचेवर ज्यांचें भागांचें भांडवल व गंगाजळी मिळून रक्कम जाते अशा बँका हाताचे बोटावरच मोजण्याइतक्या आहेत. मात्र त्यांतून रेल्वे नोकरांच्या बँका वगळल्या आहेत, कारण त्यांचें कार्यक्षेत्र एकाहून अधिक जिल्हाभर असतें. ज्यांचें भांडवल व गंगाजळी पांच लाखांचेवर जातें अशा मध्यवर्ती जिल्हाबँका १४ आहेत. त्यांपैकीं १ बंगालमध्यें ( मैमनसिंग येथील ), ५ मद्रासमध्यें ( १ अर्काट डिस्ट्रिक्ट, २ चिंगलपेठ, ३ त्रिचनापल्ली, ४ मदुरा रामनद व, ५ गुंतुर ), ३ पंजाबमध्यें, ( १ लाहोर, २ जालंदर, ३ ल्यालपूर ) व १ म्हैसूर संस्थानांत ( बंगलोर ) याप्रमाणें आहेत. मुंबई प्रांतांत अशा दर्जाच्या ४ बँका आहेत; त्या सुरत, पूर्वखानदेश, पुणें व धारवाड येथील कर्नाटक बँक, या होत. यावरून असें दिसून येईल कीं, आपली बँक ही हिंदुस्थानांतील अव्वल दर्जाच्या मध्यवर्ती जिल्हा सहकारी बँकांपैकीं एक आहे.

जून १९३९ मध्यें रिझर्व बँकेनें एक पत्रक काढून मध्यवर्ती सहकारी बँकांचा व्यवहार सुस्थिर चालावा म्हणून कांहीं मर्यादा घालून दिल्या आहेत व सूचना केल्या आहेत.

रिझर्व बँकेनें ज्या सूचना केल्या आहेत त्या करतांना तिनें व्यापारी व सहकारी बँका ह्यांमधील फरक दृष्टीआड केला आहे, ही गोष्ट लक्षांत ठेवूनच आपण रिझर्व बँकेच्या मर्यादा व सूचना आपल्या बँकेचे बाबतींत कितपत लागू पडतात याचा विचार केला पाहिजे.

रिझर्व बँकेनें केलेल्या वेगवेगळ्या सूचनांचा विचार करतां आपल्या बँकेकडे कोणत्याही प्रकारचा उणेपणा येत असल्याचें आढळून येत नाहीं. विशेषतः तरल्या भांडवलाचे बाबतींत तर आपली बँक फारच खंबीर आहे. याचें श्रेय ज्यांनीं या बँकेची स्थापना पद्धतशीरपणें मजबूत पायावर केली व अहर्निश ज्यांनीं तिच्या हिताची चिंता वाळगली त्यांना तर आहेच, परंतु तिला जनतेनें आपुलकीनें जो पाठिंबा दिलेला आहे व गेल्या २५ वर्षांत सहकारी खात्याच्या प्रमुखांनीं व विशेषतः मि. राथफिल्ड, श्री. व्ही. एस. भिडे व आपले आजचे अध्यक्ष व आजचे रजिस्ट्रार यांनीं ज्या सहानुभूतीनें आपल्या बँकेच्या प्रगतीस हातभार लावला त्यांसही आहे. मला आशा आहे कीं, या संस्थेचा सुवर्ण महोत्सव पहाण्याचा सुप्रसंग आपणांस यथाकाल प्राप्त होईल.

## सर जे. ए. मदन ह्यांचें भाषण

पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक स्थापन झाल्यापासून आतां पंचवीस वर्षें पुरीं झालीं आहेत. ह्या अवधींत ती अनेक संकटांतून यशस्वी रीतीनें पार पडली आहे. तुमची सभासदांची संख्या आतां वाढली आहे. आतां ती १६७ पासून २८७४ इतकी झाली आहे. व त्यांत जिल्ह्यांतील २७० प्राथमिक सहकारी संस्थांचाही समावेश होतो. तुमच्या शेअर-भांडवलाची जवळजवळ चार लाखापर्यंत वाढ झाली आहे, व तुमचा रिझर्व्ह फंड व इतर फंड यांचा आंकडाही जवळजवळ तेवढाच झाला आहे. ही प्रगति माझ्या मतें प्रशंसनीय आहे. कारण ह्याच प्रमाणांत प्रगति चालू राहिल्यास, लवकरच ह्या सर्व फंडांच्या रकमा शेअर-भांडवलाच्या रकमेपेक्षांही अधिक होतील. तुमच्या ठेवींच्या रकमेंतही चांगलीच वाढ झाली आहे. माझ्या माहितीप्रमाणें त्यांचा आंकडा ५१ लाख एवढा आहे. व्याजाचा सर्वसाधारण दर कमी करण्यांत आल्यामुळें तुम्हीं आपल्या कर्जावर द्यावयाच्या व्याजाचे दर कमी केले असतांही तुमच्याकडे ठेवण्यांत येणाऱ्या ठेवींच्या रकमेंत सारखी वाढ होत आहे; यावरून तुम्हीं संपादन केलेली इभ्रत व नांवलौकिक आणि बँकेवरील लोकांचा विश्वास हीं स्पष्टपणें दिसून येतात.

मला इतकें मात्र म्हटलें पाहिजे कीं, तुमच्या ठेवींत व कामचलाऊ भांडवलांत दिसून येणारी वैशिष्ट्यपूर्ण प्रगति तुम्हीं आपल्या सभासद-मंडळ्यांस व सभासद-व्यक्तींस कर्जाऊ दिलेल्या रकमांत दिसून येत नाहीं. मागील कांहीं वर्षांत अशा रीतीनें कर्जाऊ देण्यांत आलेल्या रकमांत हळूहळू घट झाल्याचें दिसून येतें. आतां, तुम्हीं मंडळ्यांना दिलेल्या कर्जाऊ रकमांचा एकूण आंकडा ११ लाख एवढा आहे, व व्यक्तींना दिलेल्या कर्जाऊ रकमांचा आंकडा ५½ लाख एवढा आहे. तेव्हां तुमच्यापाशीं सहकारी चळवळींत गुंतविण्यांत न येणारें असें फार मोठें व बहुशः सारखें वाढणारें, असें भांडवल आहे व हें जादा भांडवल आतां सहकारी क्षेत्राबाहेर कोठेंतरी गुंतवावयाचें आहे. 'जादा फंडाच्या' प्रश्नाचा काळजीपूर्वक विचार करणें आवश्यक आहे.

जुन्या बुडित कर्जांची हळूहळू करण्यांत आलेली वसुली व फक्त चालू शेतकीबाबत गरजा व लहान मुदतीचीं इतर कामें यांकरितां स्पष्ट केलेल्या मर्यादेनुसार कर्जें देण्यांत यावीं वगैरे तऱ्हेचीं नव्या कर्जाबाबत घालण्यांत आलेलीं बंधनें यामुळेंच बरेच अंशीं, मंडळ्यांकडे गुंतविण्यांत येणाऱ्या रकमांत घट आलेली आहे. अशा रीतीनें 'जादा फंडांचा' प्रश्न गुंतागुंतीचा आहे. प्राथमिक सहकारी मंडळ्यांच्या गरजा भरपूर आहेत, परंतु अधिकाधिक रकमा निर्धास्तपणें देण्याजोगी त्यांची स्थिति नाहीं. सहकारी चळवळीच्या गरजा मोठ्या आहेत; शेतकीमध्यें पुष्कळच मोठे फंड गुंतवितां येण्यासारखे आहेत व शेतकऱ्यांच्या बिनपतीच्या संस्था, योग्य मार्गानें चालवितां आल्या तर त्यांत बँकेचे 'जादा फंड' गुंतविण्यांत येण्यासारखे आहेत. सहकारी

कार्यास पुरवठा व विक्री या दोन महत्त्वाच्या आघाड्यांवर शेतकऱ्यांची पिळवणूक करणाऱ्या इसमांशीं युद्ध करावयाचें आहे. आतांपर्यंत सहकारी कार्य, पत संपादन करण्याचे कामीं केंद्रित करण्यांत आलें होतें. परंतु मागील कांहीं वर्षांत ग्रामीण जनतेच्या इतर गरजांवर विशेष भर देण्यांत आला, व आतां सहकारी विक्रीचा व पुरवठा यांचें महत्त्व नुसतें मान्यच करण्यांत आलें आहे असें नसून, त्याबाबत प्रत्यक्ष उपायही योजण्यांत आले आहेत.

ह्या देशांतील सहकारी चळवळ सुरुवातीस जरी सर्वस्वी नव्हे तरी मुख्यतः पतीपुरतीच मर्यादित असणें साहजिक होतें. सहकारी कार्याची सुरुवात पतीनें करण्यांत आली. सहकारी कार्याच्या बिनपतीच्या स्वरूपाकडे अधिक लक्ष देण्याची, जास्तींत जास्त नफ्यानें शेतकऱ्यांचें उत्पादन विकण्याचे कामीं त्यास मदत करण्याची, व त्यांस लागणारा माल शक्य तितक्या स्वस्त दरानें मिळवून अशा तऱ्हेनें झालेल्या बचतींतून, त्यांस पुढील वर्षाच्या पिकाच्या उत्पादनासाठीं लागणाऱ्या भांडवलाची गरज भागविण्याची वेळ आली नाहीं काय ? जर पतपेढीस त्याच्या पिकावर ताबा चालवितां येईल व तें जास्तींत जास्त नफ्यानें विकून विक्रीच्या पैशांतून त्यांस जरूर असलेलें भांडवल पुरवितां येईल तर तो पूर्वीपेक्षा बराचसा स्वतंत्र होईल, व त्यांस पूर्वीपेक्षा पुष्कळच अधिक नफा मिळेल. अशा तऱ्हेची परिस्थिति हळूहळूच निर्माण करतां येईल, परंतु तें आपलें ध्येय असलें पाहिजे व तें साध्य करण्यासाठीं करावयाची पहिली व अत्यंत आवश्यक गोष्ट म्हणजे सहकारी-विक्री-संस्था स्थापन करणें ही होय. सहकारी-विक्री-संस्था स्थापन करणें हें काम सहकारी पतपेढ्या स्थापन करण्याच्या कामापेक्षा पुष्कळच अवघड आहे. परंतु ह्या बाबतींत सहकारी खातें व योग्य व्यवस्थापकांनीं चालविलेल्या उच्च प्रकारच्या सहकारी संस्था, ह्यांची मदत मिळाल्यास लहान संस्था व सभासद व्यक्ति यांस बहुमोल सहाय्य होईल. सहकारी-विक्री-संस्थांच्या स्थापनेमुळें पतपेढ्या व त्यांना पैसे पुरविणाऱ्या मध्यवर्ती बँका ह्यांच्याशीं निगडित असलेला दुसरा मूलभूत प्रश्न, म्हणजे मुदतीबाहेर गेलेल्या कर्जाचा प्रश्न, सोडविण्याचे कामींही पुष्कळशी मदत होईल.

कारणें कांहींही असोत, कर्जवसुलीचें काम फार अवघड असतें हें खरें आहे व तुम्हांस आपलीं कर्जें पुढें वसूल होतील या आशेनें तावडतोब मुदतवाढ मंजूर करून स्वतःचें समाधान करून घ्यावें लागतें. ढिलाईच्या आर्थिक धोरणामुळें बुडित कर्जें कशीं उद्भवलीं, जागतिक संकटामुळें इतर बुडीत कर्जें कशीं उपस्थित झालीं, आणि कर्जें परत करण्याच्या नाखुशीमुळें आणखी बुडित कर्जें कशीं वाढलीं वगैरे तऱ्हेचे मागील कालांतील दोष शोधून काढण्याकरितां या प्रश्नाचा तुम्हीं अधिक काळजीपूर्वक विचार करावा असा मी तुम्हांस सल्ला देतों. प्रत्येक प्रकरणाची बारकाईनें चौकशी करणें, कर्जदारांस हत्तेफेड पुढें ढकलण्यास सहजासहजी परवानगी न देण्याचें धोरण स्वीकारणें तसेंच उत्पादक कामांसाठीं नवीन भांडवल देणें आणि एकंदरींत साधारणपणें कारभाराचीं सूत्रें अधिक ताणून धरणें या गोष्टींचा अवलंब केल्यानें परिस्थितींत सुधारणा घडून येणें शक्य आहे. कर्जदाराच्या मालाची चांगल्या रीतीनें विक्री करण्याची सोय केल्यानें व त्याच्या गरजा अधिक चांगल्या तऱ्हेनें भागविल्यानें सुद्धां या कठीण परिस्थितींत सुधारणा होणें शक्य आहे.

महायुद्धानंतर जगांत नवीन घडी अस्तित्वांत येईल. या घडींत पेढ्यांस त्यांची पूर्वीची प्रतिष्ठा प्राप्त होईल व बँकिंग हें निरनिराळ्या योजनापूर्तींचें एक प्रभावी साधन होऊन बसेल. म्हणून तयार रहा, जेव्हां वेळ येईल तेव्हां आपली कामगिरी करण्याच्या तयारींत असा. यापुढील तुमच्या संस्थेच्या उत्तम भरभराटीच्या पंचवीस वर्षांचे अवधींत तुमची योजनाबद्ध प्रगति ही तुमच्या संस्थेनें आतांपर्यंत संपादन केलेली इभ्रत व देशाच्या व सहकारी चळवळीच्या गरजा यांस अनुरूपच असेल याबद्दल मला संशय वाटत नाहीं.

अध्यक्षमहाराज व बंधुभगिनींनो, मला तुम्हीं तुमच्या संस्थेच्या रौप्य महोत्सव प्रसंगीं अध्यक्षस्थान स्वीकारण्याचा मान दिल्याबद्दल मी तुम्हां सर्वांचे आभार मानतों. कारण त्यामुळें बँकेशीं व तिच्या जुन्या व नव्या कार्यकर्त्यांशीं असलेला माझा पूर्वापार संबंध, पुन्हां जडून आल्यामुळें मला आनंद वाटत आहे. बँकेची सर्वांगिण उन्नति होवो अशीच मी इच्छा करतों.

### प्रो. काळे ह्यांचें आभारप्रदर्शनात्मक भाषण

पुणें सेंट्रल को ऑपरेटिव्ह बँकेच्या रौप्यमहोत्सवाचे अध्यक्ष, सर जनार्दनराव मदन, ह्यांचे आभार मानतांना प्रो. काळे म्हणाले:—आजच्या समारंभाचे अध्यक्ष सहकारी रजिस्ट्रार होते. शेतकी कमिशनचे चिटनवीस व प्रांतिक बँकिंग कमिटीचे अध्यक्ष ह्या नात्यानें त्यांनीं कामें केलीं असून प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूटचे अध्यक्ष म्हणून त्यांची निवडणूक नुकतीच झाली आहे. हा "जनता—जनार्दनाचा" अभिनंदनीय संयोग होय. सेंट्रल बँकेच्या संस्थापकांच्या कल्पनेबाहेर तिचा विस्तार झाला आहे. तिच्याकडे ठेवी पडून रहात आहेत हा अनुभव इंग्लंडमधील व हिंदी शेड्यूल्ड बँकांसहि येत आहे आणि तो युद्धपरिस्थितीचा परिणाम आहे. अध्यक्षांनीं सुचवल्याप्रमाणें बँकेचा पैसा सहकारी चळवळींत व शेतकऱ्यांच्या हितासाठीं गुंतण्यास मुंबई सरकारनें हातीं घेतलेली ग्रामसुधारणेची योजना यशस्वी रीतीनें अंमलांत येणें अगत्याचें आहे. शेतीच्या धंद्याच्या सुधारणेवर ह्या बँकेचा कारभार अवलंबून रहाणें अपरिहार्य असल्यानें तिच्या चालकांस सावधगिरीचें धोरण आखावें लागत आहे. बँकेच्या व्यवहारांत सातत्य रहावें ह्यासाठीं तिचे अध्यक्ष व डायरेक्टर्स ह्यांच्या निवडणुकींत स्थिरता असण्याच्या आवश्यकतेचा उल्लेख रजिस्ट्रारनीं आपल्या भाषणांत केला. डायरेक्टरांस बँकेच्या कामाचा अनुभव यावा आणि त्यांचेमधून अध्यक्षाची निवड व्हावी अशी बँकेंत परंपरा पडल्याकारणानें तिच्या धोरणाच्या सातत्यांत खंड पडत नाहीं अशी आजवरची व्यवस्था आहे. बँकिंगचें ज्ञान व जबाबदारी ह्यांचा अनुभव शक्य तितक्या अधिक कार्यकर्त्यांस मिळण्याची संधि देण्याचें महत्त्वाचें कार्य सेंट्रल बँकेनें केलें आहे. सर जनार्दनराव ह्यांनीं केलेल्या सूचनांचा विचार सहकारी बँका व रजिस्ट्रार करीतच आहेत. ह्या कामीं आतां त्यांच्यासारख्या अनुभवी कार्यकर्त्यांच्या सहायाचा लाभ मिळणार आहे. सर जनार्दनराव ह्यांनीं मुंबईहून मुद्दाम समारंभासाठी येण्याचे श्रम घेऊन उपयुक्त सूचना केल्या ह्याबद्दल मी सर्वांचे वतीनें त्यांचे मनःपूर्वक आभार मानतों.

## अर्थशास्त्र

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे

पृष्ठसंख्या सुमारें ३००, किंमत ३ रुपये

या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

## श्रीराम सिल्क मिल्स लि., बंगलोर

[ कंपनीनें १९४१ अखेर ६ टक्के डिव्हिडंड वांटला आहे. ]

युद्धसाहित्यपुरवठा-खात्याची पॅरेशूटकरितां लागणाऱ्या

रेशमी कापडाची ऑर्डर पुरी करण्यासाठी लागणाऱ्या भांडवलाकरितां तूर्त एकूण रु. १ लक्षाच्या रकमेपर्यंत

**ठेवी घेणें आहेत**

व्याजाचा दर ४॥ ते ६ टक्के. ठेव किमान रु. ५०० ची असावी. ठेवीवरील व्याज दर सहा महिन्यांनीं दिलें जातें.

श्रीराम सिल्क मिल्स लि.,
श्रीरामबाग,
बसवनगुडी, बंगलोर.


**नारायण गोविंद नाईक,**
( माजी अध्यक्ष, म्हैसूर चेंबर ऑफ कॉमर्स ) मॅनेजिंग डायरेक्टर

आमच्या कारखान्यांतील माल मुंबईस बॉम्बे स्वदेशी को-ऑपरेटिव्ह स्टोअर्समध्यें व पुण्यास लक्ष्मी रोडवरील रे म्यूझिअमच्या व्यापार-संवर्धन-गृहांत पहा.

राहाणेची व भोजनाची उत्तम सोय




फोन नं. ७७९ गणपति चौक, व्यवस्थापक.




## मधुमेहावरील औषध

तीन आठवड्यांचे औषधास फक्त रु. ७

— मागविण्याचा पत्ता —

मॅनेजिंग डायरेक्टर, रूरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड.
९२३ ए, सदाशिव, पुणें २.

## N. V. WADNERKAR

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver, Electro-plater & Manufacturer of Sporting Trophies, Medals, Cups etc.

- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -
POONA CITY.

वक्तशीर आणि मनपसंत काम करून देणारे

## मोहन वॉच कंपनी

रेग्युलेशन मोफत

कॉमनवेल्थ बिल्डिंगसमोर लक्ष्मी रोड, पुणें २.

## DECCAN BOOK STALL

Booksellers, Publishers & Subscription Agents
Fergusson College Road, Poona No. 4

(1) We stock and supply Educational books, General books & Library books.

(2) We supply Government of Bombay and Government of India publications.

(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.

(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे. बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ, 'दुर्गानिवास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ८ पुणें, बुधवार, तारीख १६ सप्टेंबर १९४२ अंक ३७

## विमेदार नि हवाई हल्ला

शत्रु राष्ट्राकडून हवाई हल्ला अगर तत्सम उपद्रव यापासून बिन-लढाऊ नागरिकांच्या जीविताला येणाऱ्या धोक्याचा समावेश विमा पॉलिसीच्या अटींत होतो काय व त्यासाठीं जादा प्रिमिअम भरावा लागेल काय ? असा प्रश्न साहजिकच नागरिकांमध्यें चर्चिला जात आहे.

## ट्रस्ट ऑफ इंडिया

विमा कंपनीच्या
विमा पॉलिसीमध्यें हवाई हल्ल्यामुळें जीविताला होणाऱ्या अपायाचा अंतर्भाव होतो त्याकरितां जादा प्रिमिअम नाहीं.

तरी विलंब न लावतां—
तुमचा नि तुमच्या आप्तेष्टांचा विमा
**ट्रस्ट ऑफ इंडिया**
विमा कंपनींतच उतरा.

अध्यक्षः—श्रीमंत सरदार जगन्नाथ महाराज पंडित
माहितीपत्रकें विनामूल्य पाठवूं

ट्रस्ट ऑफ इंडिया विमा कं. लि. लक्ष्मी रोड, पुणें २ | वि. ह. देशमुख, बी. ए. जनरल मॅनेजर

## महायुद्ध दाराशीं आलें परदेशी औषधें दुर्मिळ व महाग झालीं

पण
भिण्याचें कारण नाहीं !!!
— कारण —
**आयुर्वेद रसशाळा पुणें लि०**
या देशी औषधाच्या प्रसिद्ध कारखान्यानें तयार केलेलीं
● रक्तवर्धक, ● उपनाह,
● बालजीवन, ● कॅल्सीप्राल
इत्यादि पेटंट, स्टँडर्ड व लोकप्रिय औषधें खात्री पटल्यामुळें
★ डॉक्टर्सहि वापरूं लागले आहेत. ★
दरसाल बिनचूक नफा वाटणाऱ्या ह्या कंपनीचे शेअर्स व औषधें मागवा.

**आयुर्वेद रसशाळा पुणें लि०**
मुख्य दुकान गणपति चौक, लक्ष्मीरोड, पुणें १.

महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर

# महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

## मुंबई प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड.

जाहीर करण्यांत येतें कीं ह्या बँकेची ३१ वी सर्वसाधारण सभा शनिवार ता. २६ सप्टेंबर १९४२ रोजीं दुपारीं ३ वाजतां (स्टँ. टा.) तिच्या रजिस्टर्ड ऑफिसांत, सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंग, ९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई, खालील कामाकरितां भरविण्यांत येणार आहे.

(१) ३० जून १९४२ रोजीं संपणाऱ्या वर्षाचे तपासलेले हिशेब व डिरेक्टरांचा रिपोर्ट स्वीकारणें.
(२) नफ्याची वांटणी (डिव्हिडंड) ठरविणें.
(३) डिरेक्टरांची निवडणूक करणें.
(४) ऑडिटर्स नेमून त्यांचें वेतन ठरविणें.

बोर्डाच्या हुकमावरून,
मुंबई } वैकुंठ ल. मेहता
ता. २२-८-४२ } मॅनेजिंग डायरेक्टर.

भागांच्या तबदिलीचें काम (ट्रान्सफर बुकें) १८ सप्टेंबर ते ८ ऑक्टोबर १९४२ पर्यंत (दोन्ही दिवस धरून) बंद राहील.


## विविध माहिती

### हिंदुस्थान को. इ. सोसायटी, लि.

वरील विमा कंपनीनें १९४१ सालीं ९ कोटि, ७२ लक्ष रुपये किंमतीचे १४,००० विमे उतरविले. कंपनीकडे १९ कोटि रुपयांचे विमे चालू आहेत.

### वहातुकीवर नियंत्रण

लष्करी महत्त्वाच्या मालाच्या वहातुकीची सोय करण्यासाठीं व जळण आणि रबर ह्यांची काटकसर करण्याचे हेतूनें ग्रेट ब्रिटन-मधील आगगाड्यांची व बसेसची मामुली वहातूक आणखी कमी करण्यांत येणार आहे. गेल्या थंडीचे मानानें येत्या थंडींत त्या देशांतील रेल्वेवहातुकींत दररोज २५० युद्धविषयक गाड्यांची भर पडणार आहे. बसेसमध्यें नेहमीच्या जागेंत मावतील त्यापेक्षां २० ते ३० अधिक उभे राहून प्रवास करूं शकतील ह्या दृष्टीनें बसेसमध्यें सुधारणा करण्यांत येत आहे.

### इराणमध्यें गव्हाची आयात व लागवड

इराणमधील गव्हाचा तुटवडा कमी करण्याकरितां रशिया अजून इराणकडे गहू निर्गत करीत आहे. गव्हाच्या बियाण्यासाठीं इराणला हिंदुस्थानाकडून २ हजार टन गहू हवा आहे.

### स्पेन व अर्जेंटिना ह्यांचेमध्यें सांस्कृतिक करार

स्पेन व अर्जेंटिना ह्यांचेमध्यें एक सांस्कृतिक करार झाला आहे. त्याअन्वयें त्या दोन राष्ट्रांत पुस्तकें, मासिकें व चित्रपट ह्यांची देवघेव होईल.

### पस्ट्रेला बॅटरीज लि.

नोव्हेंबर १९३९ मध्यें वरील कंपनीची स्थापना होऊन तिनें जॅस्को केमिकल्स अँड अलाइड इंडस्ट्रीज कंपनीचा बॅटऱ्यांचा कारखाना विकत घेतला. ३१ मार्च १९४२ अखेर संपलेल्या वर्षी कंपनीला ४८ हजार रुपये निवळ नफा झाला. बॅटरीवर चालणारे ए. आर. पी. चे दिवे, आरमार खात्यास लागणारे ॲक्युम्युलेटर, वगैरेंचें उत्पादन कंपनीनें सुरू केलें आहे. कंपनीनें ६% डिव्हिडंड दिलें.

### गव्हर्मेंट टेलिफोन बोर्ड

गव्हर्मेंट टेलिफोन बोर्डानें बाँबे टेलिफोन कंपनीच्या भागी-दारांस देऊं केलेली किंमत (८९ रु. १५ आ.) ही अयोग्य होती, असें हायकोर्टानें ठरविल्यामुळें, ज्या भागीदारांना वरील किंमत मान्य नाहीं, ते मार्च १९४३ अखेर कंपनीचे भागीदार रहातील. मार्च, १९४३ अखेर कंपनीच्या लायसेन्सची मुदतच संपत आहे.

### प्रांतिक सरकारांचीं नवीं कर्जें

मुंबई, मद्रास, पंजाब व मध्यप्रांत हे चार प्रांत अनुक्रमें ३½, १½, २½ व ½ कोटि रुपयांचीं कर्जें उभारणार आहेत, असें समजतें. व्याजाचा दर ३% राहील. १८ तारखेचे सुमारास कर्ज-रोख्यांच्या विक्रीस प्रारंभ होईल, अशी अपेक्षा आहे.

### उत्तर चीनमध्यें जपान्यांची लूट

उत्तर चीनमध्यें जपान्यांनीं नवीन रेल्वे बांधल्या आहेत, कोळशाच्या खाणींतून मोठ्या प्रमाणावर कोळसा ते काढीत आहेत, लोखंडाच्या खाणी त्यांनीं सुरू केल्या आहेत व शेतीचा माल ठराविक दरानें ते आपल्या लष्कराकरितां खरेदी करीत आहेत. नॅनकिंगच्या "स्वतंत्र" चीनचाच उत्तर चीन हा एक भाग आहे असें जपानी म्हणतात, परंतु नॅनकिंग सरकारनें संयुक्त राष्ट्रांवर युद्ध पुकारलेलें नाहीं हें त्यांस दाखवून दिलें म्हणजे उत्तर चीन आम्हीं व्यापला आहे, असें ते निर्लज्जपणें बोलतात. रॉयटरच्या खास बातमीदारानें वरील हकीकत प्रसिद्ध केली आहे.

### ट्रेझरी बिलांवर ७ आ. ९ पै व्याजाचा दर

रिझर्व्ह बँकेनें गेल्या आठवड्यांत हिंदुस्थान सरकारचीं ६ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. ७ आ. ९ पै इतका पडला.

### सर रामस्वामी व जामसाहेब

हिंदुस्थानचें वॉर कॅबिनेट व पॅसिफिक वॉर कौन्सिल ह्यांवरील प्रतिनिधी, सर रामस्वामी मुदलियार आणि नवानगरचे जामसाहेब, हे ता. ८ रोजीं इंग्लंडला पोचले. सर रामस्वामी हे हिंदुस्थान सरकारचे प्रतिनिधी असून जामसाहेब हे संस्थानिकांतर्फे गेले आहेत. जामसाहेब इंग्लंडला ह्यापूर्वी २३ वेळां जाऊन आलेले आहेत. सर रामस्वामींची प्रस्तुतची ११ वी खेप आहे.

### चेकसची देवघेव

मुंबई बँकर्स क्लिअरिंग हाउसमध्यें गेल्या आठवड्यांत १८ कोटि, ८१½ लक्ष रुपये किंमतीच्या ९६,५९९ चेकसची देवघेव झाली.

### दोन दिवसांऐवजी थोड्याशा तासांत चर्चा आटोपली

ब्रिटिश मुख्य प्रधान मि. चर्चिल ह्यांच्या कॉमन्स सभेंतील भाषणावरील चर्चेसाठी दोन दिवस सरकारनें ठेवले होते, परंतु तीन सभासदांच्या भाषणानंतर कोरम मोडला. मोजणी करतेवेळीं आवश्यक तेवढे (चाळीस) सभासद दाखल झाले परंतु चवथ्या सभासदाचे भाषणानंतर कोणीच बोलावयास उठलें नाहीं व दोन दिवस चालावयाची चर्चा थोड्या तासांचे अवधींतच संपली. उठून गेलेल्या सभासदांचे वर्तनाबद्दल कॉमन्स सभेचे नेते सर स्टॅफर्ड क्रिप्स ह्यांनीं तीव्र नापसंति व्यक्त केली. मि. चर्चिल ह्यांचे भाषणानंतर बोलण्याजोगें कांहीं उरलेंच नाहीं व हा मि. चर्चिल ह्यांचा विजय आहे असें सरकारच्या सहायकांचें मत आहे.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | २९२ | त्याचा प्रयत्न—प्रे. रूझवेल्ट ह्यांचें समर्थन— | |
| २ बाजारभावांचें नियंत्रण | २९३ | प्रचंड युद्धसर्च—युद्धपरिस्थितीचा आढावा— | |
| ३ हैद्राबाद संस्थानांतील साखर निर्मिती ... | २९४ | ५ हिंदी कारखान्यांतील मजुरांचे वांधे | |
| ४ सरकारी कर्जरोख्यांचे किमान बाजारभाव ... | २९४ | ६ सहकारी बँकांचे अहवाल ... | २९६ |
| ५ स्फुट विचार ... | २९५ | | |
| रहाणीचें मान स्थिर ठेव- | | | |


# अर्थ

बुधवार, ता. १६ सप्टेंबर, १९४२

## बाजारभावांचें नियंत्रण

### व्यापार मंत्री, श्री. सरकार ह्यांचें भाषण

हिंदुस्थान सरकारचे व्यापार मंत्री, श्री. एन. आर. सरकार, ह्यांच्या अध्यक्षतेखालीं पांचवी बाजारभाव नियंत्रण परिषद् गेल्या आठवड्यांत दिल्ली येथें भरली होती. गहूं, साखर, इत्यादि खाद्य पदार्थांच्या बाजारभावांच्या नियंत्रणासंबंधीं चर्चा परिषदेनें केली. गहूं, तांदूळ, इत्यादींची लागवड कांहीं प्रांतांत जास्त होते परंतु कांहीं प्रांतांत ती अपुरी पडते. जेथें पीक ज्यास्त येते, तेथून इतर प्रांतांत त्याची निर्गत करण्याची आवश्यकता परिषदेनें विचारांत घेतली. त्याचप्रमाणें, सुताच्या खरेदी-विक्रीवरील नियंत्रण आणि ठराविक दर्जाचें कापड ठराविक किंमतीस जनतेस उपलब्ध करून देण्याची सरकारी योजना, ह्यांचेवरहि परिषदेंत खल झाला. मालाचा पुरवठा आणि त्याचा बाजारभाव ह्यांचें नियंत्रण करणाऱ्या मध्यवर्ती योजनेंत सल्लागार मंडळाच्या विचार-विनिमयास स्थान असावें व त्यासाठी व्यापारी आणि कारखानदार ह्यांचीं सल्लागार मंडळें स्थापन करण्यांत यावीं, असें परिषदेनें सुचविलें. बाजारभावांचें नियंत्रण प्रभावी होण्यासाठीं काय उपाययोजना करावी, ह्याचाहि विचार परिषदेनें केला. योग्य किंमतीस माल देणारीं दुकानें ठिकठिकाणीं उघडण्यांत आलीं. तर त्याचा परिणाम आजूबाजूच्या दुकानांतील विक्रीच्या दरांवर स्वाभाविकच होईल, ह्या दृष्टीनें सरकार, स्थानिक स्वराज्य संस्था व सरकारनें मान्य केलेलीं व्यापारी मंडळें अथवा धर्मादाय संस्था ह्यांनीं वाजवी भावानें माल विकणारीं दुकानें सुरू करावीं, अशी सूचना परिषदेनें केली.

परिषदेचे अध्यक्ष, श्री. सरकार, ह्यांनीं बाजारभावांच्या नियंत्रणाचा हेतु व त्याची पार्श्वभूमि विशद करून सांगितली. "समाजाच्या कोणत्याहि घटकानें, दुसऱ्या घटकाचें नुकसान करून स्वःतचा फायदा करून घेतां कामा नये" असें त्यांनीं सांगितलें. उत्पादकाचें हित त्याच्या मालास अधिकांत अधिक बाजारभाव येण्यांत असतें. उलट, गिऱ्हाइकास स्वस्तांत स्वस्त माल पाहिजे असतो. धान्याची किंमत वाढली, तर शेतकऱ्यास अधिक पैसा मिळतो, तो गिऱ्हाइकानेंच दिलेला असतो. खाद्य धान्यांस चांगली किंमत आली नाहीं तर त्यांची लागवड वाढणार नाहीं. ह्याकरितां, त्यांस चांगली किंमत तर आली पाहिजे, परंतु गरीब गिऱ्हाइकासहि ती देण्यास परवडली पाहिजे. पुरेसें उत्पादन चालू रहाण्याइतकी ती आकर्षकहि असली पाहिजे. ह्या सर्वांचा मध्यबिंदु काढूनच बाजारभावाचें नियमन केलें पाहिजे. "कोणत्याहि वर्गाचें विशेष नुकसान न होतां अधिकांत अधिक सामाजिक हित साधलें पाहिजे." भाव नियंत्रणाच्या योजनेचें वर्णन श्री. सरकार ह्यांनीं वरील शब्दांत केलें. अनधिकारानें मालाचा व्यवहार करणें, नियंत्रित भावास बगल देऊन गिऱ्हाइकाकडून भरमसाट किंमत घेणें, इत्यादि गैरकायदा कृत्यें करणारे व्यापारी आढळतात. त्यांच्या कारवाया बंद पाडणें मोठें अवघड काम आहे. अन्नसामुग्रीच्या नियंत्रणाबाबत जारी असलेल्या कायद्याविरुद्ध वर्तन करणारांवर ग्रेटब्रिटनमध्यें खटले भरण्यांत येतात, त्यांची माहिती "अर्था" च्या गेल्या अंकांत देण्यांत आली आहे. ह्या परिस्थितीचा उल्लेख व्यापार मंत्र्यांनीं आपल्या भाषणांत केला व इंग्लंडप्रमाणें हिंदुस्थानांतहि अशा कारवाया करणारांस कडक शासन होण्याची आवश्यकता त्यांनीं प्रतिपादन केली. व्यापारी वर्गानें ह्या संबंधांत सरकारला शक्य तेवढें सहकार्य करावें, अशी त्यांनीं विनंति केली. भावनियंत्रणामुळें व्यापारीवर्गाचें उच्चाटण होत नाहीं, हें त्यांनीं स्पष्ट करून सांगितलें.

केवळ मालाच्या बाजारभावांचें नियंत्रण करून भागणार नाहीं; मालाचा पुरवठा आणि त्याची समतोल वाटणी हे प्रश्नहि त्याबरोबरच विचारांत घेतले पाहिजेत. नियंत्रित मालाऐवजीं इतर प्रकारचा तत्सम माल पुरविण्यास व विकण्यास उत्तेजन मिळतां कामा नये. वेगवेगळ्या प्रदेशांतील मालाचा साठा, तेथील मागणी, इत्यादिसंबंधीं अचुक तपशीलवार माहिती गोळा करून आवश्यक तेथें जरूर तो माल व्यवस्थित पुरविण्याचें काम सुरळीतपणें चालू राहिलें पाहिजे. उत्पादनाचे प्रदेशांतील मालाचा बाजारभाव व त्याची दुसऱ्या ठिकाणीं विक्रीची किंमत, ह्यांचा योग्य संबंध राखण्याचा प्रश्न येथें उपस्थित होतो. ह्या विवेचनावरून यशस्वी नियंत्रणाचा प्रश्न किती बिकट आहे आणि तो सोडविण्यास मध्यवर्ती व प्रांतिक सरकारें, व्यापारी आणि सर्वसाधारण जनता ह्यांचें सहकार्य किती आवश्यक आहे ह्याची कल्पना येईल. सरकारनें आपलें धोरण ठरवितांना परिस्थितींत वेळोवेळ होणारा बदल लक्षांत घेणें इष्ट आहे, ह्याची कल्पना श्री. सरकार ह्यांस आहे, असें त्यांच्या भाषणावरून दिसतें. जनतेच्या अन्नाच्या रोजच्या गरजा भागविते वेळीं लष्कराच्या गरजांकडेहि लक्ष पुरवावें लागतें, ही गोष्ट दृष्टीआड करून चालणार नाहीं. श्री. सरकार ह्यांनीं आपल्या भाषणांत केलेल्या सूचनांस परिषदेनें दुजोरा दिला आणि धान्याची समतोल वाटणी, त्याचा योग्य बाजारभाव, मध्यवर्ती प्राइस अँड सप्लाय बोर्ड व सिव्हिल सप्लाइज अॅडव्हायसरी कौन्सिल, स्वस्त धान्याच्या दुकानांची स्थापना, इत्यादि बाबतच्या प्रश्नांचा परिषदेनें विचार केला. बाजारभावांच्या नियंत्रणाचा प्रश्न मालाचें उत्पादन, त्याची वहातुक, वेगवेगळ्या

ठिकाणच्या गरजा, मालाची समतोल वाटणी, नियंत्रणामुळें इतर तत्सम मालाचे किंमतीवर होणारा परिणाम, नियंत्रणाची कसून अंमलबजावणी इत्यादि अनेक प्रश्नांशीं निगडित आहे व त्या सर्वांचा विचार साकल्यानें होणें आवश्यक आहे.

## हैद्राबाद संस्थानांतील साखर निर्मिति

### निजामसागर कारखाना

हिंदुस्थानांत सन १९२९ मध्यें साखरेचे फक्त २४ लहान कारखाने होते व या कारखान्यांतून प्रतिवर्षी ७०,००० टन साखर तयार होत असे; परंतु आज सर्व हिंदुस्थानभर पसरलेले, विशेषतः उत्तर हिंदुस्थानांत, १४५ हून अधिक कारखाने असून तेथें दरवर्षी १२,००,००० पासून ते १४,००,००० टन साखर तयार होत आहे.

पुष्कळसे कारखाने संयुक्तप्रांत व बिहारमध्यें आहेत; तथापि, निजामसागर प्रॉजेक्टचें काम पूर्ण झाल्यामुळें व बोधन येथें निजामसागर कारखाना काढण्यांत आल्यानें गेल्या पांच वर्षांत हैद्राबाद संस्थानांतील परिस्थितींत संपूर्ण पालट झाला. संस्थानांत खपत असलेल्या साखरेचे शेंकडा ६० टक्के पांढरी साखर या कारखान्यांत तयार होत असून निजामाबादेंत उसाच्या लागवडीस बोधन येथील कारखान्यामुळें मोठी चालना मिळाली आहे. दहा वर्षांपूर्वी बिदर, औरंगाबाद व उस्मानाबाद जिल्ह्यांत व कांहीं अंशीं रायचूर, मेदक व निजामाबाद जिल्ह्यांत फक्त उसाची लागवड होत असे. परंतु आज एकट्या निजामाबादेंतच उसाच्या लागवडीखालीं असलेलें जमिनीचें क्षेत्र १०,००० एकर आहे. दहा वर्षांपूर्वी निजामसागर प्रॉजेक्टचें काम पूर्ण झाल्यानें या जिल्ह्याच्या बऱ्याचशा मोठ्या विभागांत लागवडीसाठीं सतत पाणी-पुरवठा मिळण्याची सोय झाली आहे. १९३६ मध्यें गुळाची किंमत तात्पुरती घसरल्यानें उसाच्या लागवडीचें प्रमाण कमी झालें आणि निजामाबाद जिल्ह्यांत या पिकाची १५,००० एकरांत होत आलेली लागवड फक्त ५,००० एकरावर आली. तथापि, १९३९ मध्यें निजाम सरकारच्या मदतीनें निजामसागर क्षेत्रांत बोधन येथें निजाम साखर कारखाना काढण्यांत आला. शेंकडा ४ टक्के नाममात्र व्याजानें निजाम सरकारनें या नवीन कामासही १६ लाख रुपये कर्ज दिलें. याचा प्रत्यक्ष परिणाम असा झाला कीं, संस्थानांतील उसाच्या लागवडीखालील क्षेत्रांत दरवर्षी सारखी वाढ होत असल्याची नोंद करण्यांत आली, आणि प्रतिवर्षी आतां १२ ते १५ हजार एकरांत उसाची लागवड केली जाईल असा अंदाज आहे.

हा कारखाना उभारण्यास लागणारा प्राथमिक खर्च शहरांतील व त्यास लागत असलेली जमीन विकत घेण्यासाठीं रु. ५१ लाख लागले. यापैकीं शेअरच्या रूपानें ३५ लाख रुपये जमा झाले व बाकीची रक्कम दरसाल दर शेंकडा ४ रुपये नाममात्र व्याजानें सरकारकडून कर्जाऊ घेतली. या कारखान्यांत अेकंदर २०,००० टन साखर तयार होईल अशी अपेक्षा आहे. कारखान्याची शेती ८,००० टन अेकर असून त्यापैकीं ३,००० अेकरांत सध्या उसाची लागवड होत आहे. या कारखान्यांत गाळण्यांत येत असलेल्या उसाचे शेंकडा ४० टक्के ऊस या जमिनींत प्रतिवर्षी तयार होतो.

उसाच्या लागवडीच्या आधुनिक पद्धतीचें शिक्षण शेतकऱ्यांच्या मुलांना देण्याचें कार्य साखर कारखान्यांतील अधिकाऱ्यांनीं हातीं घेतलें आहे, आणि आतांपावेतों ७५ तरुणांनीं उसाच्या लागवडीचें संपूर्ण शिक्षण घेतल्यानंतर ते आपापल्या खेड्यांना परत गेले आहेत. प्रतिवर्षी २५ तरुणांची एकेक तुकडी या कारखान्यांत शिकून तयार होत आहे. स्वतःच्या खर्चानें खासगी शेतकऱ्यांचा उस कारखान्यांत आणवून घेण्याची व्यवस्थाही बोधन कारखान्यानें केली आहे. अशी व्यवस्था हिंदुस्थानांतील इतर साखर कारखान्यांत नाहीं. कांहीं निवडक खेड्यांसाठीं केंद्रें स्थापण्यांत आलीं असून अशा प्रत्येक विभागांतील शेतकरी लोक आपला ऊस या केंद्रांत आणून टाकतात व निजाम स्टेट रेल्वेनें किंवा या कारखान्यासाठीं काढण्यांत आलेल्या पोषक रेल्वे लाईननें अथवा बैलगाडींतून हा माल या केंद्रांतून साखर-कारखान्यांत आणला जातो. कारखान्यांतील प्रदेशांत हंगामाच्या काळांत सुमारें ५,००० बैलगाड्या ऊस वाहून नेण्याचें काम करीत असतात. या कारखान्यास सर्व साधनांनीं युक्त असलेलें संशोधन-केंद्र जोडण्यांत आलें आहे. शेतांतील माती आणि उसास लागणाऱ्या आवश्यक विविध बाबी व खतें यासंबंधीं संशोधन चालू आहे.

साखर तयार झाल्यावर राहिलेली मळी व सोऱ्या यांसारख्या मालाचा फायदेशीर रीतीनें उपयोग करण्यांत येत आहे. मळीपासून मिश्र अल्कोहोल तयार करण्यांत येत आहे आणि दरवर्षी ४,००,००० गॅलन मिश्र अल्कोहोल तयार होतें. यापैकीं कांहीं गॅलन अल्कोहोल एन. एस. रेल्वेस देण्यांत येतें. उलटपक्षीं, उसाच्या सोऱ्यांत नायट्रोजन, फॉस्फोरिक ॲसिड, पोटॅश व चुना चांगल्या प्रमाणांत असल्यानें त्यांचा उपयोग खतासाठीं व जमिनींची सुधारणा करण्याकडे केला जात आहे.

कारखान्यांतील नोकरांसाठीं ५ लाख रुपये खर्चून आधुनिक पद्धत्यनुसार बांधलेल्या घरांची अेक वसाहत तयार केली. २,००० हून अधिक लोकांचा या वसाहतींत समावेश होऊं शकतो. कारखान्याच्या शेतीवर असलेल्या मजूर वर्गाकरितां १० मैल त्रिज्जांत अशाच वसाहती स्थापण्यांत आल्या आहेत.

## सरकारी कर्जरोख्यांचे किमान भाव

हिंदुस्थान सरकारनें ता. २२ मार्च रोजीं निरनिराळ्या सरकारी कर्जरोख्यांचे किमान भाव निश्चित केले होते व त्या भावापेक्षां कमी भावानें व्यवहार करण्यास भारत–संरक्षण कायद्यान्वयें बंदी केली होती. तथापि त्या वेळीं ठरविलेले भाव साधारण परिस्थितीस धरून नसल्यामुळें हिंदुस्थान सरकारनें एका हुकुमान्वयें खालीलप्रमाणें किमान भाव निश्चित केले आहेत.

| कर्जरोख्याचें नांव | | | किमान भाव |
|---|---|---|---|
| ५% | टॅक्स फ्री लोन | १९४५-५५ | रु. १०७ |
| ३% | डिफेन्स बॉन्ड | १९४६ | रु. १०३ |
| ३½% | लोन | १९४७-५० | रु. १०३८८ |
| २¾% | " | १९४८-५३ | रु. ९७ |
| ४% | " | १९४८-५३ | रु. १०४८८ |
| ३% | " | १९४९-५२ | रु. ९८८८ |
| ४½% | " | १९५०-५५ | रु. १०७८८ |
| ३% | " | १९५१-५४ | रु. ९७८८ |
| ३½% | " | १९५४-५९ | रु. १०० |
| ४½% | " | १९५५-६० | रु. १०६८८ |
| ४½% | " | १९५८-६८ | रु. १०६८८ |
| ४% | " | १९६०-७० | रु. १०६८८ |
| ३% | " | १९६३-६५ | रु. ९१ |
| ३% | नॉन-टर्मिनेबल लोन | | रु. ७७ |
| ३½% | " | | रु. ९० |

## स्फुट विचार

### रहाणीचें मान स्थिर ठेवण्याचा अमेरिकेंत प्रयत्न

अमेरिकेंत युद्धाची सामुग्री तयार करण्याचा आणि तें प्रत्यक्ष चालवण्याचा सर्च इतका अवाढव्य झाला आहे कीं, त्याचा परिणाम जनतेच्या रहाणीच्या मानावर अनिष्ट रीतीनें होत असून बाजारभाव भडकत चालले आहेत. बाजारभाव, मजुरीचे दर व युद्धखर्च हे सर्व सारखे चढत राहिल्यास अमेरिकन राष्ट्रावर भयंकर आर्थिक आपत्ति ओढवल्यावांचून रहाणार नाहीं ही गोष्ट प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांनीं आपल्या लोकांच्या व कायदेमंडळाच्या नजरेस मागेंच आणली होती, परंतु महागाईस आळा घालण्यासाठी आवश्यक असलेले निर्बंध घातले जाणें अमेरिकेंतील कित्येक लोकांच्या स्वार्थास प्रतिकूल असल्यानें त्यांचा ह्या प्रकारच्या नियंत्रणास विरोध आहे. शेतीच्या मालाच्या किंमती बेसुमार वाढत आहेत आणि त्यांस मर्यादा वेळींच न घातली गेल्यास युद्ध चालू ठेवण्याच्या प्रयत्नांत भयंकर व्यत्यय उत्पन्न होण्याची भीति आहे ही गोष्ट प्रेसिडेंट रूझवेल्टनीं कॉंग्रेसच्या नजरेस आणली असून ह्यासंबंधांत जरूर असलेले कायदे तिनें तात्काळ करावे असें निक्षून सुचवलें आहे. या गोष्टीचें त्यांस एवढ्या तीव्रतेनें तातडीचें महत्त्व वाटत आहे कीं कॉंग्रेसनें आपलें कर्तव्य सुचवल्याप्रमाणें केलें नाहीं तर आपण स्वतःच्या अधिकारांत इष्ट ती व्यवस्था घडवून आणण्याचा निश्चय केला असल्याचेंहि त्यांनीं जाहीर केलें आहे. कित्येक अमेरिकनांस ही धमकी अनिष्ट वाटत असून तिच्यावर ते प्रतिकूल टीका करीत आहेत आणि प्रेसिडेंट भलतीच सत्ता कायदेमंडळास बाजूस सारून स्वतःच्या हातीं घेत आहेत असें ते म्हणत आहेत. त्या योगानें अमेरिकन लोकमतांत सळवळ उडाली आहे असें दिसतें.

### प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांचें स्वतःच्या धोरणाचें समर्थन

युद्ध चालू असतांना अमेरिकन आर्थिक घटना उलथून पडावयाची नसेल तर बाजारभाव, समाजांतील निरनिराळ्या वर्गांची प्राप्ती इत्यादींवर एकाच वेळीं विस्तृत व परिणामकारक नियंत्रण घालण्यांत आलें पाहिजे अशी प्रेसिडेंटांची खात्री झाली असून आपल्या मताच्या पुष्ट्यर्थ त्यांनीं कित्येक बोधप्रद आकडे पुढें मांडले आहेत. युद्धखर्चाचा परिणाम लोकांची मिळकत वाढण्यांत झाला असून विकत घ्यावयाच्या जिनसांच्या पुरवठ्याचा तुटवडा पडल्यानें किंमती भडकत आहेत आणि त्या युद्धखर्च वाढवण्यास सहाय करीत आहेत. १९३९ सालीं मजुरी व पगार ह्यांची अमेरिकेंतील एकूण रकम ४,३७० कोटि डॉलर होती, ती १९४२ मध्यें ७,५०० कोटि डॉलर होत आहे. म्हणजे तीन वर्षांत त्या बाबतींत ७८ टक्के वाढ झाली आहे असें दिसून येतें. कामाचा विस्तार व जादा कामासाठीं दिली जाणारी जादा मजुरी ह्यांच्यामुळें पगार व मजुरी ह्यांच्या वार्षिक राष्ट्रीय मोबदल्याच्या एकूण रकमेंत दर महिन्यास १०० कोटि डॉलर ह्याप्रमाणें भर पडत आहे! १९४१ सालच्या प्रारंभापासून अमेरिकेच्या राष्ट्रीय प्राप्तींत दर महिन्यास १ टक्के वाढत होत आहे आणि ही प्राप्ती विक्रीस बाजारांत येऊं शकणाऱ्या एकंदर मालाच्या किंमतीपेक्षा दोन हजार कोटि डॉलरनीं अधिक आहे. अन्नसामुग्रीचे बाजारभाव सारखे चढत आहेत आणि ह्या भस्मासुर वेळींच नष्ट न केल्यास तो अमेरिकन राष्ट्रास गिळून टाकील असें प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांनीं स्पष्ट शब्दांत सांगितलें आहे. कॉंग्रेसला बाजारभावांचें नियंत्रण होण्याचे बाबतींत कायदे करण्याचा आदेश त्यांनीं एवढ्या आग्रहानें दिला आहे, त्याच्या मुळाशीं त्यांनीं वर्णिलेली विलक्षण परिस्थितीच आहे. कांहीं टीकाकारांनीं त्यांच्या धोरणास विरोध दर्शवला असला तरी योग्य विचाराअंतीं बहुसंख्य अमेरिकन लोकांस त्यांचें म्हणणें पटल्यावांचून रहाणार नाहीं. व्यक्तींच्या व वर्गांच्या स्वार्थत्यागावांचून युद्धप्रयत्न कार्यक्षम होणें शक्य नाहीं ही गोष्ट सर्वांच्या लक्षांत आणण्याचा त्यांचा मुख्य उद्देश आहे. स्वतःच्या हातीं अधिक अधिकार केंद्रित करून अनियंत्रित सत्ताधीश बनण्याचा नाहीं हें उघड आहे.

### प्रचंड युद्धखर्च

अमेरिकेचा युद्धखर्च कोणत्या अवाढव्य प्रमाणांत चालला आहे ह्याची कल्पना प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांनीं नुकतीच दिली आहे. युद्धप्रयत्नाचा जसजसा विस्तार होत आहे तसतसा हा सर्च सारखा वाढत जाणें अपरिहार्य आहे. ग्रेट ब्रिटनचा युद्धखर्च अमेरिकेच्या खालोखाल प्रचंड आहे. त्यासंबंधाचे कांहीं आकडे ब्रिटिश फडनवीस सर किंग्स्ले वुड, ह्यांनीं कॉमन्स सभेस सादर केले ते लक्षांत घेण्यासारखे आहेत. शंभर कोटि पौंड उभारण्यास त्यांनीं सभेची संमति मागतांना असें सांगितलें कीं, युद्धाचे प्रारंभापासून आतांपर्यंत कॉमन्सनीं मंजूर केलेल्या रकमांची एकूण बेरीज १,१०५ कोटी पौंड म्हणजे सुमारें १४,७३० कोटि रुपये होते. अलीकडचा इंग्लंडचा दररोजचा युद्धखर्च सुमारें साडेसोळा कोटि रुपये इतका होत आहे असें सर किंग्स्ले वुड ह्यांनीं सांगितलें. इंग्लंडच्या खर्चाचें अंदाजपत्रक १९४०-४१ मध्यें ३८८ कोटि पौंडांचें होतें, तें चालू सालीं ५२८ कोटि पौंडांचें झालें आहे. युद्धाच्या पहिल्या तीन वर्षांत इंग्लंडचा एकूण युद्धखर्च एक हजार कोटि पौंड झाला असून एकूण खर्च १,२१० कोटि पौंड म्हणजे सुमारें १६,००० कोटि रुपये झाला आहे. जनतेनें स्वतःच्या खर्चांत बचत करून सरकारी कर्जास मदत करावी म्हणून चाललेल्या प्रयत्नांस चांगलें यश आलें आहे. ह्या मार्गानें आतांपर्यंत ४२० कोटि रुपये उभे करण्यांत आले आहेत. लोकांच्या बचतीचें प्रमाण सारखें वाढत असून तें आणखी वाढलें पाहिजे असें ब्रिटिश फडनविसांनीं सांगितलें.

### युद्धपरिस्थितीचा आढावा

ब्रिटिश मुख्य प्रधान मि. चर्चिल स्वतः मास्को येथें जाऊन रशियन पुढाऱ्यांशीं युद्धाबाबत चर्चा करून स्वदेशीं परत आल्यापासून त्यांच्या तोंडून सद्यःपरिस्थिति व पुढील धोरण ह्यांचे संबंधानें निवेदन ऐकण्याची तीव्र इच्छा सर्वत्र अनुभवास येणें स्वाभाविक होतें. मि. चर्चिल ह्यांनीं इजिप्तमधील रणांगणास भेट देऊन सेनानींशीं वाटाघाटी केल्या असल्यानें मित्रराष्ट्रें ह्यामुळें काय करणार ह्याविषयीं माहिती त्यांचेकडून मिळण्याची अपेक्षा मुख्य प्रधानांनीं आतां पुरी केली आहे. त्यांनीं कॉमन्स सभेंत केलेल्या भाषणाचा लोकमतावर उत्साहजनक परिणाम होण्यासारखा आहे. अमेरिकेचे प्रेसिडेंट मि. रूझव्हेल्ट ह्यांनीं याच सुमारास युद्धधोरणाबाबत खुलासा जाहीर रीतीनें केला आहे. ह्या दोन मुत्सद्यांच्या भाषणाचा रोख शत्रूविरुद्ध चढाईस लवकरच

प्रारंभ होणार असल्याचें स्पष्टपणानें ध्वनित करण्याकडे होता. रशियन सैन्याची पीछेहाट होत असली तरी त्यांची फळी फुटणार नाहीं आणि त्यास कुमक लवकरच जाऊन पोहोंचेल. तसेंच जर्मनीविरुद्ध दुसरी, तिसरीहि आघाडी चालू होण्याचा चांगला रंग दिसत आहे. ईजिप्तमध्यें मित्रराष्ट्रांचें लढाऊ सामर्थ्य वाढलें आहे आणि त्याचा जोर शत्रूच्या अनुभवास आतां येणार आहे. शत्रूकडून होणाऱ्या मित्रराष्ट्रांच्या जहाजांच्या नाशास आळा बसत चालला आहे. मि. चर्चिल ह्यांच्या भाषणांतील वरील मुद्यांस मि. रुझव्हेल्ट ह्यांनीं व्यक्त केलेल्या विचारांचा उत्साहजनक दुजोरा मिळाला आहे. त्यांची भाषाहि लढाऊ स्वरूपाची व निश्चयात्मक होती. त्या दोन मुत्सद्यांच्या भाषणांच्या योगानें उत्साहवर्धक असें युद्धप्रयत्नांचें वातावरण निर्माण होण्यास सहाय मिळालें आहे.

### हिंदी कारखान्यांतील मजुरांचे वांधे

१९४१ सालीं १९४० चे मानानें हिंदी कारखान्यांत संप अधिक झाले तरी त्यांत सामील झालेल्या कामगारांची संख्या बरीच कमी भरली व कामाचे दिवसहि कमी बुडाले.

| वर्ष | संप | त्यांतील कामगार | बुडालेले दिवस |
|---|---|---|---|
| १९४० | ३२२ | ४,५२,५३९ | ७५,७७,२८१ |
| १९४१ | ३५९ | २,९१,०५४ | ३३,३०,५०३ |

कपाशीच्या आणि तागाच्या गिरण्यांतच मुख्यतः मोठे संप झाले. एकूण २३७ संपांतील कामगारांची मागणी पगार अथवा बोनस ह्यासंबंधीं होती. १८९ संपांत कामगार यशस्वी झाले. १९४१ मधील प्रमुख संपांची माहिती खाली दिली आहे:—

| संप | कामगार | बुडालेले दिवस |
|---|---|---|
| कॅरेज वॅगन वर्कशॉप (अजमीर) | ७,९८३ | १,२४,३०३ |
| हुकुमचंद ज्यूट मिल (बंगाल) | ९,४९५ | २८,४८५ |
| कस्तुर कोलयरीज (बिहार) | २,३२० | १,८१,९५० |
| स्वदेशी मिल्स (कुर्ला) | ६,८०० | ६,८०० |
| मुंबईतील पांच गिरण्या | २०,६९५ | ५८,७६७ |
| जी. आय. पी. वर्कशॉप (परेळ) | ६,८४६ | ६८,४६० |
| एम्प्रेस मिल्स (नागपूर) | १४,००० | ५,८८,००० |
| मॉडेल मिल्स (नागपूर) | ४,००० | १,९६,००० |
| टेक्स्टाइल मिल्स (कोइमतूर) | ११,०१२ | १,७९,७२५ |
| कानपूरमधील गिरण्या | २३,५५० | २,०६,३२१ |

### सिंधमधील भयंकर पूर

सिंधमधील लोकसंख्येच्या एक चतुर्थांश लोक पुरामुळें घरादारांस मुकले आहेत व लागवडीखालील जमिनींपैकीं एक तृतीयांश जमीन प्रत्यक्ष पाण्याखालीं आहे, अशी माहिती सिंधच्या मुख्य प्रधानांनीं नुकतीच सांगितली.

### अमेरिकन विमानें

अमेरिकेंत आतां दरमहा ५ हजार विमानांचें उत्पादन होतें. शत्रुपक्षीयाच्या विमानांच्या एकूण उत्पादनापेक्षा अमेरिकन उत्पादन अधिक आहे.

### प्रोडयूसर गॅस प्लँट

हिंदुस्थानांत एकूण ६ हजार मोटार गाड्यांवर आतां प्रोड्यूसर गॅस प्लँट बसविण्यांत आलीं आहेत. आणखी १२ हजार गॅस प्लँटसाठी पोलादाचा पुरवठा करण्यांत येत आहे.


## दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

अधिकृत भांडवल ... ... ... रु. २,००,००,०००
वसूल झालेलें भांडवल ... ... ... रु. १,००,००,०००
रिझर्व्ह फंड ... ... ... रु. १,१८,००,०००

मुख्य कचेरी : ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

मुंबईमधील शाखा : बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

इतर शाखा : अहमदाबाद (भद्र, मुख्य ऑफिस), अहमदाबाद (एलिस ब्रिज शाखा), अहमदाबाद (स्टेशन शाखा), अंधेरी (मुंबई शेजारीं), बांद्रे (मुंबई शेजारीं), कलकत्ता (क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर, कराची, नागपूर (किंग्जवे), नागपूर (इतवारी बझार), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत.

लंडन एजन्ट्स : वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

डायरेक्टर्स : सर पुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई, सर जोसेफ के. नाइट, मि. ए. गेडिस, सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई., मि. दिनशा के. दाजी, श्री. रामनिवास रामनारायण.

### करंट डिपॉझिट अकाउंट्स :

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,०००. रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षा कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमीचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

एजंटः—टी. आर. लालवाणी.



## दि बँक ऑफ़ महाराष्ट्र लि.

हेड ऑफिस : पुणें शहर.

स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.

मुंबअी शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबअी.

अधिकृत भांडवल : रु. १०,००,०००
विक्रीस काढलेलें भांडवल : रु. ५,००,०००
खपलेलें भांडवल : रु. ४,४५,९५०
वसूल झालेलें भांडवल : रु. २,२२,७९५
एकूण खेळतें भांडवल : रु. ३७,००,०००

### डायरेक्टर्स

प्रो. वा. गो. काळे, अध्यक्ष

श्री. धों. कृ. साठे
श्री. न. ग. पवार
श्री. त्र्यं. वि. रामडे
श्री. वा. पुं. वर्दे
श्री. मा. रा. जोशी
श्री. श्री. गो. मराठे
श्री. र. चिं. सोहोनी
मि. फ. दो. पंदमजी

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदीविक्री कसोशीनें करून दिली जाते.

बँकेच्या शेअरवर १९४१ अखेर पुऱ्या होणाऱ्या वर्षी द. सा. द. शेंकडा ४ टक्के करमाफ डिव्हिडंड दिलें गेलें. बँकेची शेअरविक्री चालू आहे.

म. वि. गोखले
मॅनेजर.

## सहकारी बँकांचे अहवाल

### सातारा जिल्हा को. ऑ. क्लिअरिंग बँक लि.

( वार्षिक सभा २०–९–४२ )

वरील बँकेच्या पटावर 'अ' वर्ग बिगर कर्जदार ५२ व 'अ' वर्ग कर्जदार ८१० असे सभासद असून त्यांनीं अनुक्रमें १५,५५० व २०,९९५ रुपयांचे भाग घेतलेले आहेत. "ज्यांना बँकेकडील कर्ज नको आहे अगर ज्यांना कर्ज मिळण्यासारखें नाहीं अशा सभासदांची संख्या बँकेचे स्थापनेपासून फारच मोठी असून त्यांना आपली रकम 'परत पाहिजे असें आढळून आल्यावरून गतसालापासून पोटनियमास अनुसरून अशा सभासदांची रकम परत करण्यास सुरवात केली आहे. अहवाल सालीं रु. ९९० चें सत्तर सभासदांचें शेअर भांडवल परत करण्यांत आलें." ह्या वर्षी बँकेनें ४६ सभासदांना ५०,७०० रुपयांचें नवीन कर्ज दिलें म्हणजे, सालअखेर एकूण ३१६ सभासदांकडे ३,६२,३२५ रुपयांचें कर्ज आदा करण्यांत आलेलें आहे. "सरसहा येतील ते अर्ज घेण्याची पद्धत बंद करून नवीन अर्ज घेतांना मॅनेजरकडून प्राथमिक छाननीची पद्धत सुरू करण्यांत आल्यानें अर्ज मंजूर होण्याचें प्रमाण कमी झालें आहे.अहवाल सालीं अखेर मंजुरीस पाठविलेले अर्जापैकीं एकहि अर्ज नामंजूर झाला नाहीं, हें ह्या बँकेस भूषणावह आहे."अहवालाचे वर्षी सुरवातीपासूनच बँकेनें प्रचार चालू ठेवला,त्यामुळें कर्जाचे अर्ज अधिक आले, बँकेनें वरिष्ठ बँकेचा हप्ता मुदतींत भागविला आहे. "वहातुकीच्या अडचणीमुळें ऐन हंगामांत शेतकरीवर्गास युद्धजन्य परिस्थितींत मागाहून वाढलेल्या भावाचा फायदा मिळावा तितका मिळूं शकला नाहीं, तथापि झालेला वसूल हा बँकेनें वेळींच केलेल्या सौम्य पण चिकाटीचेंच फळ आहे." अहवालाचे वर्षी बँकेनें ४८ हजाराच्या कर्जांत ८,११८ रुपयांची सूट मिळवून दिली. बँकेस गेल्या सालचा तोटा रुपये १७९५ भरून व थकलेलें सर्व येणें व्याज रुपये ३,१६८ ची तरतूद करून अहवाल सालीं रुपये १,७३४ निवळ नफा झालेला आहे. त्यांतून ८६७ रुपये रिझर्व्ह फंडांत टाकून व मागील शिलकी नफा त्यांत मिळवून नफा वांटणीस १०५८ रुपये येतात. त्यांतून २½ % डिव्हिडंडसाठी ९११ रुपयांचा विनियोग करावा, अशी बोर्डाची शिफारस आहे. कागदाचे भाव फार वाढलेमुळें अहवाल, ताळेबंद, वगैरे छापून घेतलेले नाहींत, म्हणून आम्हीं बँकेचा वृत्तांत जरा विस्तारानें दिला आहे. त्यावरून बँकेच्या प्रगतिपर कारभाराची चांगली कल्पना येते. कर्जासाठी अर्ज मिळविण्याचा प्रचार, त्याची कसून छाननी, कर्जवसुलीचे चिकाटीचे प्रयत्न इत्यादि गोष्टी त्यांत प्रामुख्यानें दिसतात. बँकेचा डिव्हिडंडचा दर कायम राहिल्यास शेअर भांडवल परत मागण्याच्या प्रवृत्तीस आळा बसेल. बँकेच्या प्रभावी यशाचीं चिन्हें रिपोर्टांत दिसत आहेत. रावसाहेब आ. ना. कल्याणी,एम. एल. ए. हे बँकेचे चेअरमन असून श्री. एम. एस. पुराणीक हे मॅनेजर आहेत.

---

### धुळें अर्बन को. बँक लि.

( वार्षिक सभा ३०-९-४२ )

वरील बँकेच्या पटावर १३५१ सभासद असून त्यांचें शेअर भांडवल ८८½ हजार रुपयांचें आहे रिझर्व्ह व इतर फंड १ लक्ष, ३०½ हजार रुपयांचे आहेत. म्हणजे एकूण खेळत्या भांडवलापैकीं एक तृतीयांश भांडवल बँकेचें स्वतःचें आहे. बँकेकडे ३ लक्ष ५७ हजारांच्या ठेवी आहेत. बँकेच्या जिंदगीच्या बाजूस १ लक्ष, १९ हजार रुपये रोख, १ लक्ष, २७ हजार रुपये सरकारी कर्जरोखे इ., ३ लक्ष, ४९ हजार रुपये सभासदांस कर्जे असे आंकडे आहेत. म्हणजे, बँकेचा पैसा पूर्णपणें तरता आहे. वर्षअखेर बँकेस १८,१४२ रुपये निवळ नफा झाला. ७½% डिव्हिडंड देण्यास ६,४३५ रुपये लागतील; बाकीच्या नफ्याचा विनियोग मुख्यतः फंडांच्या मजबुतीकडेच होईल. सालअखेर कर्जदार सभासदांकडील बाकीचा आकडा १ लक्ष ३७ हजार आहे, त्यापैकीं हुकुमनाम्याची बाकी १ लक्ष ११½ हजार रुपये आहे. थकबाकीचा आंकडा सालोसाल कमी होत आहे. श्री. शाह गोविंदजी खिमजी हे बँकेचे चेअरमन व मॅनेजिंग डायरेक्टर आहेत व श्री. ए. एस. देशपांडे, बी. कॉम. हे मॅनेजर आहेत.

---

### दि को. पीपल्स बँक लि. लिंब.

( वार्षिक सभा : १९-९-४२ )

ह्या बँकेचें शेअर भांडवल ३,३५० रुपये असून रिझर्व्ह व इतर फंड ३½ हजारांचे आहेत. "गेल्या डिसेंबरपासून बॉ. प्रॉ. बँकेचें कॅश क्रेडिट सुरू झाल्यामुळें आतां व्यवहार पुष्कळच सुरळीत चालला आहे." ह्या वर्षी बँकेनें सुमारें १,१०० रु. च्या ठेवी परत केल्या आहेत व शिल्लक ठेवी सुमारें ५ हजारांच्या आहेत. "मुंबईचें खातें चालू झाल्यापासून हुंडी खात्याचा व्यवहार सुरू झाला." अहवालाचे वर्षी बँकेस ५७८ रुपये नफा झाला, त्यांत मागील दोन वर्षांचा शिल्लक नफा धरून ताळेबंदांत २०१८ रुपये नफा दिसत आहे. चालू सालचा नफा शिल्लक ठेवून मागील दोन सालच्या १४४० रु. नफ्याची वांटणी व्यवस्थापक मंडळानें सुचविली आहे. दोन वर्षांचें ६% प्रमाणें डिव्हिडंडसाठी त्यांत ४०२ रुपयांची तरतूद केली आहे.

---

### दि लक्ष्मी को. बँक लि. सोलापूर.

( वार्षिक सभा : २७-९-४२ )

वरील बँकेचें भाग भांडवल २२,३९० रुपये असून रिझर्व्ह व इतर फंडांत मिळून ११,३२६ रुपये आहेत. तिचेकडे एकूण ठेवी ६२ हजारांच्या आहेत. बँकेच्या सभासदांची संख्या ५८५ आहे. बँकेनें ४२½ हजार रुपये रोख व इतर बँकांत ठेवींचे रूपांत ठेवले आहेत व इन्व्हेस्टमेंट खातीं ५½ हजार रुपये आहेत. येणें कर्ज ४९½ हजारांचें आहे. थकबाकी बरीचशी वाढली होती, म्हणून नवीन कर्जदारांस कर्जाऊ रकमा देण्याचे वेळीं थोडेसें ज्यास्त सावधगिरीचें धोरण स्वीकारावें लागलें. थकबाकीची रकम आणखी कमी झाल्यावर पुनः धान्याच्या तारणावर रकमा कर्जाऊ देण्याचें बँक सुरू करणार आहे. अहवालाचे वर्षी बँकेस १८३५ रुपये निवळ नफा झाला. त्यांतून ४६० रुपये रिझर्व्ह फंडांत टाकून भागीदारांस ५% दरानें डिव्हिडंड, देण्यासाठी ४६० रुपयांचा विनियोग करावा अशी बोर्डाची शिफारस आहे.

---

## अर्थशास्त्र

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे

पृष्ठसंख्या सुमारें ३००; किंमत ३ रुपये

या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

## श्रीराम सिल्क मिल्स लि., बंगलोर

[ कंपनीनें १९४१ अखेर ६ टक्के डिव्हिडंड वांटला आहे. ]

युद्धसाहित्यपुरवठा-खात्याची पॅरेशूटकरितां लागणाऱ्या रेशमी कापडाची ऑर्डर पुरी करण्यासाठी लागणाऱ्या भांडवलाकरितां तूर्त एकूण रु. १ लक्षाच्या रकमेपर्यंत

# ठेवी घेणें आहेत

व्याजाचा दर ४॥ ते ६ टक्के. ठेव किमान रु. ५०० ची असावी. ठेवीवरील व्याज दर सहा महिन्यांनीं दिलें जातें.

श्रीराम सिल्क मिल्स लि.,
श्रीरामबाग,
बसवनगुडी, बंगलोर.

नारायण गोविंद नाईक,
( माजी अध्यक्ष, म्हैसूर चेंबर ऑफ कॉमर्स ) मॅनेजिंग डायरेक्टर

आमच्या कारखान्यांतील माल मुंबईस बॉम्बे स्वदेशी को-ऑपरेटिव्ह स्टोअर्समध्यें व पुण्यास लक्ष्मी रोडवरील रे म्यूझिअमच्या व्यापार-संवर्धन-गृहांत पहा.

राहाण्याची व भोजनाची उत्तम सोय




फोन नं. ७७९ गणपति चौक, व्यवस्थापक.

## मधुमेहावरील औषध




तीन आठवड्यांचे औषधास फक्त रु. ७

— मागविण्याचा पत्ता —

मॅनेजिंग डायरेक्टर, रूरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड.
९२३ ए, सदाशिव, पुणें २.

## N. V. WADNERKAR

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver, Electro-plater & Manufacturer of Sporting Trophies, Medals, Cups etc.

- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -
POONA CITY.

## वक्तशीर आणि मनपसंत काम करून देणारे

# मोहन वॉच कंपनी

रेग्युलेशन मोफत

कॉमनवेल्थ बिल्डिंगसमोर लक्ष्मी रोड, पुणें २.

## DECCAN BOOK STALL

Booksellers, Publishers & Subscription Agents
Fergusson College Road, Poona No. 4

(1) We stock and supply Educational books, General books & Library books.

(2) We supply Government of Bombay and Government of India publications.

(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.

(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.


हे पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, एम्. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3454

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
(टपाल हशील माफ)
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ८ | पुणें, बुधवार, तारीख २३ सप्टेंबर १९४२ | अंक ३८

## विमेदार नि हवाई हल्ला

शत्रु राष्ट्राकडून हवाई हल्ला अगर तत्सम उपद्रव यापासून बिन-लढाऊ नागरिकांच्या जीविताला येणाऱ्या धोक्याचा समावेश विमा पॉलिसीच्या अटींत होतो काय व त्यासाठी जादा प्रिमिअम भरावा लागेल काय? असा प्रश्न साहजिकच नागरिकांमध्यें चर्चिला जात आहे.

## ट्रस्ट ऑफ इंडिया

विमा कंपनीच्या
विमा पॉलिसीमध्यें हवाई हल्ल्यामुळें जीविताला होणाऱ्या अपायाचा अंतर्भाव होतो त्याकरितां जादा प्रिमिअम नाहीं.

तरी विलंब न लावतां—
तुमचा नि तुमच्या आप्तेष्टांचा विमा

## ट्रस्ट ऑफ इंडिया

विमा कंपनींतच उतरा.

अध्यक्षः—श्रीमंत सरदार जगन्नाथ महाराज पंडित
माहितीपत्रकें बिनामूल्य पाठवूं.

ट्रस्ट ऑफ इंडिया विमा कं. लि.
लक्ष्मी रोड, पुणें २

वि. ह. देशमुख, बी. ए.
जनरल मॅनेजर

## महायुद्ध दाराशीं आलें
## परदेशी औषधें
## दुर्मिळ व महाग झालीं

पण

भिण्याचें कारण नाहीं !!!

— कारण —

## आयुर्वेद रसशाळा पुणें लि०

या देशी औषधाच्या प्रसिद्ध कारखान्यानें तयार केलेलीं

● रक्तवर्धक, ● उपनाह,
● बालजिवन, ● कॅल्सीप्राल

इत्यादि पेटंट, स्टँडर्ड व लोकप्रिय औषधें खात्री पटल्यामुळें

★ डॉक्टरसहि वापरूं लागले आहेत. ★

दरसाल बिनचूक नफा वाटणाऱ्या ह्या कंपनीचे शेअर्स व औषधें मागवा.

## आयुर्वेद रसशाळा पुणें लि०

मुख्य दुकान गणपति चौक, लक्ष्मीरोड, पुणें २.

महायुद्धाची जाणीव! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर

## महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

# विविध माहिती

### हैद्राबाद संस्थानांतील लिमिटेड कंपन्या

गेल्या वर्षी निजाम राज्यांत एकूण ११ नव्या कंपन्या स्थापन झाल्या, त्यांपैकी २ बँकिंगच्या व १ विम्याची होती. वर्षअखेर ७७ कंपन्या चालू होत्या.

### ट्रेझरी बिलांवर ९ आ. १० पै व्याजाचा दर

रिझर्व्ह बँकेनें गेल्या आठवड्यांत हिंदुस्थान सरकारची ६ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. ९ आ. १० पै इतका पडला.

### इटलींतील गिरण्या

कच्च्या मालाचा तुटवडा पडल्याकारणानें, ज्या गिरण्या स्वतःस लागणारी वीज स्वतःच तयार करतात त्या वगळून बाकीच्या कपास कापडाच्या गिरण्या डिसेंबर, जानेवारी व फेब्रुवारी ह्या महिन्यांत बंद ठेवण्यांत येणार आहेत. बंद पडलेल्या गिरण्यांतील कामगारांस शेतांवर काम दिलें जाईल.

### सैनिकांचा गणवेश

ऑस्ट्रेलियाच्या युद्धमंत्रिमंडळानें आपल्या सैनिकांसाठी अधिक रुबाबदार गणवेश योजण्याचें ठरविलें आहे. अमेरिकन सैनिकांच्या उत्कृष्ट गणवेशाचा सर्वत्र बोलबाला झाला आहे, त्याचाच हा परिणाम आहे. सैन्याची शिस्त व कणखरपणा चांगल्या गणवेशावर अवलंबून असतो, असा अनुभव आहे.

### युरोपियन कुटुंबांस सरकारी मदत

पूर्व आशियांतील शत्रूनें जिंकलेल्या देशांमध्यें जे युरोपियन ब्रिटिश नागरिक अडकून पडले आहेत अशांच्या हिंदुस्थानांतील कुटुंबीयांस आर्थिक सहाय करण्याचा हिंदुस्थान सरकारचा विचार आहे. जीं कुटुंबें अथवा नातलग असहाय असतील, अशांना परतफेडीच्या अटींवर मदत करण्याचें सरकारनें ठरविलें आहे.

### व्हिक्टोरिया क्रॉस

गेल्या महायुद्धाचे ५२ महिन्यांत एकूण ६३३ लोकांना व्हिक्टोरिया क्रॉस मिळाले. चालू युद्धाच्या पहिल्या ३२ महिन्यांत त्यांची संख्या फक्त ३३ भरली. गेल्या युद्धांत दर आठवड्यास ३ व्हिक्टोरिया क्रॉस अशी सरासरी पडली; चालू युद्धांत ती महिन्यास १ अशी पडते.

### विद्युत्पुरवठ्यावर नियंत्रण

तेलावर चालणाऱ्या इंजिनांचे सहायानें मुंबई प्रांतांतील ज्या वीज कंपन्या वीज तयार करतात, त्यांच्या विद्युत्पुरवठ्याच्या वेळा नियंत्रित कराव्या लागल्या आहेत.

### मुंबई शहराचें एक कोटीचें कर्ज

मुंबई शहराच्या नागरिकांना स्वस्त धान्याचा पुरवठा करण्यासाठी कॉर्पोरेशननें एक कोटि रुपयांचें कर्ज काढण्याची सरकारकडे परवानगी मागितली, ती आली आहे. कर्ज उभारणीची योजना आखण्याचें काम कॉर्पोरेशननें म्युनिसिपल कमिशनरकडे सोपविलें आहे.

### जनरल अॅश्युअरन्स सोसायटी, लि. अजमीर

वरील विमा कंपनीनें १९४१ सालीं ६८ लक्ष, ६८ हजार रुपयांचें काम पुरें केलें.

### तांदळाचें दर एकरी उत्पादन

हिंदुस्थानाचा तांदळाचे उत्पादनांत सबंद जगांत दुसरा अनुक्रम लागतो, तरी त्यास तांदूळ आयात करावा लागतो. १९३७–३८ मध्यें हिंदुस्थानानें २,५०,००० टन तांदूळ बाहेर धाडला व १३,९८,००० टन तांदळाची आयात केली. उत्पादन २ कोटि, ९५½ लक्ष टन झालें. हिंदुस्थानांत दर एकरी उत्पादन वाढविण्यास पुष्कळच वाव आहे. हिंदुस्थानांत त्याची सरासरी ७३१ पौंड पडते. अमेरिका, जपान, इजिप्त व इटली येथें ती अनुक्रमें १,४८१, २,३०७, २,०७९ व ३,००० पौंड आहे.

### पाचोरा जामनेर रेल्वे कं. लि.

वरील कंपनीस मार्च, १९४२ अखेर संपलेल्या वर्षी ९७,४३३ रुपये नफा झाला. भागीदारांस ४½% (कर त्यांतून वजा करावयाचा) डिव्हिडंड मिळालें.

### दौंड–बारामती रेल्वे कं. लि.

वरील कंपनीस मार्च, १९४२ अखेर संपलेल्या वर्षी ५१,०२७ रुपये नफा झाला. भागीदारांस ४¾% (कर ह्यांतून वजा करावयाचा) डिव्हिडंड मिळालें.

### ऑस्ट्रेलियन सैनिक

एकूण २८,२७१ ऑस्ट्रेलियन सैनिक युद्धकैदी आहेत अथवा त्यांचा अद्याप पत्ता लागत नाहींत. त्यांपैकी ७,६९७ मुख्यतः ग्रीस व क्रीट येथें पकडले गेले व १६,२८६ लोकांचा मलायांतून बाहेर पडतांना हिशेब लागला नाहीं.

### कराची कॉर्पोरेशनचें कर्ज

कराची शहराच्या पाणी पुरवठ्यासाठी कॉर्पोरेशननें ४० लक्ष रुपयांचें कर्ज उभारण्याचें ठरविलें आहे.

### युद्धकार्यासाठी हत्तींचा उपयोग

केनियामधील हत्तींचा युद्धकार्याकडे उपयोग करण्याची व्यवहार्यता कितपत आहे, ह्याचा विचार ब्रह्मदेशांतील तज्ज्ञ केनियांत जाऊन करीत आहेत.

### हिंदी गिरण्यांत हिंदी कपाशीचा उठाव

(४०० पौंड वजनाच्या गासड्या)

| | |
|---|---|
| सप्टेंबर, १९४१ ते जुलै १९४२ | ३६,९२,१४३ |
| सप्टेंबर, १९४० ते जुलै १९४१ | ३२,९१,३८९ |

### रेडिओ

हिंदुस्थानांत होणारी रेडिओ सेट्सची आयात बंद पडली आहे परंतु आतां हिंदुस्थान सरकारनें विक्रीसाठी लीजलेंड योजनेखालीं अमेरिकेंतून ४० हजार रेडिओ मिळविले आहेत.

### सावकाराचा कोर्टखर्च

सावकारानें एका कंपनीस १० लक्ष रुपये कर्जाऊ दिले. कंपनीस कर्ज देण्याबाबतच्या कराराचा त्यानें भंग केल्याबद्दल कंपनीनें सावकारावर दावा आणला व त्याचेकडून नुकसान-भरपाई मागितली. सावकारानें आपल्या बचावासाठी केलेला खर्च त्याच्या प्राप्तींतून वजा करून बाकी प्राप्तीवरच इनकम टॅक्स बसवावा, असा कमिशनर ऑफ इन्कमटॅक्स, बिहार वि. महाराजा ऑफ दरभंगा ह्या दाव्यांतील निवाडा आहे.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | ३०० | ५ स्फुट विचार ... | ३०३ |
| २ मुंबई सरकारचें नवें कर्ज ... ... | ३०१ | प्रांतिक ग्रामसुधारणा बोर्डांची सभा—रॉकेलचा पुरवठा व उपयोग—जनतेच्या रहाणींत बदल—बँकेच्या व्याख्येंत दुरुस्ती | |
| ३ हिंदुस्थानांतील सेकत्या चलनी नोटा ... | ३०२ | ६ कराराचे पैसे परत ... | ३०४ |
| ४ जी. जी. दांडेकर मशीन वर्क्स ... | ३०२ | ७ सहकारी संस्थांचे अहवाल ... ... | ३०५ |


# अर्थ

बुधवार, ता. २३ सप्टेंबर, १९४२

## मुंबई सरकारचें नवें कर्ज

मुंबई सरकारनें ३% दराचें, १३ वर्षे मुदतीचें, १८ सप्टेंबर, १९५५ रोजीं परत फेडावयाचें ३½ कोटि रुपयांचें कर्ज उभारण्याचें ठरविलें. त्याचप्रमाणें मद्रास, पंजाब आणि मध्यप्रांत सरकारांनींहि अनुक्रमें १½ कोटि, २½ कोटि व ½ कोटि रुपयांचीं कर्जें जाहीर केलीं. चारहि प्रांतिक सरकारांस हवीं तीं कर्जें तात्काळ मिळालीं, कारण कर्जरोख्यांची विक्री १८ सप्टेंबर रोजींच फक्त चालू होती, आणि त्या दिवशींहि ती लवकर बंद करावी लागली. मुंबई सरकारचे कर्जरोखे १५ मिनिटांतच खपून गेले व त्यांची विक्री बंद करावी लागली. वरील चार कर्जांच्या परतफेडीची तारीख व त्यांवरील व्याजाचा दर एकच असला, तरी त्यांच्या विक्रीच्या किंमतींत तफावत होती. १०० रुपयांचा पंजाब व मध्यप्रांताचा रोखा ९७ रुपयांस विकण्यांत आला, परंतु मद्रास सरकारच्या रोख्याची किंमत ९७ रु. ८ आ. होती. मुंबई सरकारच्या रोख्याची किंमत सर्वांत अधिक म्हणजे ९८ रु. ८ आ. ठेवलेली होती. त्याचप्रमाणें, मुंबई प्रांताच्या नव्या कर्जाची रकमहि सर्वांत अधिक होती. कोणत्याहि प्रांतास कर्ज मिळण्यास अडचण पडली नाहीं. तथापि मुंबई प्रांतास ३½ कोटि रुपये कर्ज इतरांपेक्षा अधिक अनुकूल अटींवर मिळालें ही गोष्ट नमूद केली पाहिजे.

मुंबई प्रांताचें वार्षिक उत्पन्न सुमारें १४ कोटि, ३० लक्ष रुपये आहे. १९३६-३७ सालापासून मुंबई प्रांताच्या हिशेबांत वाढावाच आढळून येत आहे. ह्यासंबंधांतील आकडे खाली दिले आहेत. रोड डेव्हलपमेंट फंड व स्पेशल डेव्हलपमेंट ह्यांच्या आकड्यांचा हिशेब त्यांत धरलेला नाहीं.

| वर्ष | वाढावा (लक्ष रु.) |
|---|---|
| १९३६-३७ | ४०½ |
| १९३७-३८ | २९½ |
| १९३८-३९ | १५ |
| १९३९-४० | ५६ |
| १९४०-४१ | १८७½ |
| १९४१-४२ | २९०½ |

ह्या वाढाव्यांतून १९३८–३९ ते १९४१–४२ ह्या मुदतींत स्पेशल डेव्हलपमेंट फंडांत ३ कोटि, २ लक्ष रुपये टाकण्यांत आले व ७५ लक्ष रुपयांचे दीर्घ मुदतीचे रोखे घेण्यांत आले. १९४१-४२ अखेर शिलकी वाढाव्याची रक्कम सुमारें ३ कोटि रुपये होती. सुमारें ४ कोटि, ३५ लक्ष रुपये मुंबई सरकारकडे पडून आहेत, ते कर्जाचे स्वरूपांत नसले तरी त्यावर दरसाल १६ लक्ष, २४ हजार रुपये व्याज द्यावें लागतें. ह्या कर्जास परतफेडीचे हप्ते नाहींत, हें उघड आहे. मुंबई सरकारनें मुंबई कॉर्पोरेशनच्या ७ कोटि, ४४ लक्ष रुपयांच्या कर्जाची व प्रांतिक लँड मॉर्गेज बँकेच्या ३० लक्ष रुपयांच्या डिबेंचर्सची हमी घेतलेली आहे. उलट, सरकारनें स्थानिक स्वराज्य संस्था, शेतकरी, इत्यादींस कर्जें दिलीं आहेत त्यांची रक्कम मार्च १९४२ अखेर १ कोटि, १६ लक्ष रुपये भरते. ३१ मार्च रोजीचें मुंबई सरकारचें निवळ देणें खालीलप्रमाणें निघतें:—

| | (लक्ष रुपये) | |
|---|---|---|
| | २१५० | हिंदुस्थान सरकारचें देणें |
| वजा | ३८८ | मुंबई कॉर्पोरेशननें देणें |
| | १७६२ | |
| अधिक | ४३५ | लक्ष रुपये प्रॉव्हिडंट फंड, इ. |
| | १ | डेव्हलपमेंट कर्जाची बाकी |
| | २१९८ | |
| वजा | ११६ | स्थानिक स्वराज्य संस्था व शेतकरी ह्यांजकडून येणें निवळ कर्ज. |

एकूण २०८२ लक्ष रुपये

भांडवली खर्चासाठी मुंबई प्रांतिक सरकारनें १९३६–३७ नंतर एकहि कर्ज उभारलेलें नाहीं. हा खर्च मुख्यत: शिलकी रकमांतूनच भागविण्यांत आला आहे. १९२० सालीं मुंबई सरकारनें डेव्हलपमेंट लोन काढलें होतें, तें १९३५ सालीं फेडण्यांत आलें. ३% १९५५ चें नवें कर्ज काढतेवेळीं मुंबई सरकारनें आपल्या आर्थिक परिस्थितीचें निवेदन करणारें एक पत्रक काढलें, त्यावरून ह्या प्रांताची कर्जविषयक सुस्थिति लक्षांत येते. मुंबई प्रांतास हिंदुस्थान सरकारचें २१½ कोटि रुपये देणें आहे, तें ४५ वर्षांत फेडण्यांत यावयाचें आहे. त्यावर व्याजाचा दर ४½% आहे. ह्या कर्जफेडीबाबत व व्याजासाठी मुंबई सरकारास दरसाल १ कोटि, १६ लक्ष, ३८ हजार रुपयांची तरतूद करावी लागते. ह्या २१½ कोटि रुपयांपैकीं ३ कोटि, ८८ लक्ष रुपये मुंबई कॉर्पोरेशनकडून यावयाचे आहेत. मुंबई कॉर्पोरेशन सरकारास दरसाल सुमारें १८ लक्ष रुपये त्या पोटीं देत असते. म्हणजे, मुंबई सरकारच्या निवळ कर्जाचा आकडा १७ कोटि, ६२ लक्ष रुपये होतो व त्यापायीं त्यास दरसाल ९८ लक्ष, ४२ हजार रुपयांची व्यवस्था करावी लागते. मुंबई सरकारास कर बसविण्याचा अधिकार निर्विवाद असला व त्यांतून कोणतीहि कर्जें फेडतां आलीं, तरी सरकारच्या आर्थिक व कर्जविषयक सुस्थितीचें खरें निदर्शक सरकारची किफायतशीर मालमत्ता हेंच असतें. सरकारी जमिनी, इमारती, कालवे, रस्ते, इत्यादींची किंमत प्रांताच्या एकूण देण्यापेक्षा कितीतरी अधिक आहे. सरकारचें वार्षिक उत्पन्न खर्चापेक्षा ज्यास्त आहे. ह्याविषयींचे आकडे वर दिले आहेतच, ह्या सर्व माहितीवरून मुंबई सरकारची पत कशी उच्च दर्जाची आहे हें दिसून येईल.

## हिंदुस्थानांतील खेळत्या चलनी नोटा

( रिझर्व्ह बँकेचे आकडे )

| | | |
|---|---|---|
| १९३९ | | ( कोटि रुपये ) |
| ऑगस्ट | २५ | १९९ |
| सप्टेंबर | २९ | १९३ |
| ऑक्टोबर | २७ | २०० |
| नोव्हेंबर | २४ | २०९ |
| डिसेंबर | २९ | २२४ |
| १९४० | | |
| जानेवारी | २६ | २२५ |
| फेब्रुवारी | २३ | २२५ |
| मार्च | २९ | २२५ |
| एप्रिल | २६ | २२६ |
| मे | २४ | २३२ |
| जून | २८ | २३४ |
| जुलै | २६ | २२५ |
| ऑगस्ट | ३० | २१९ |
| सप्टेंबर | २७ | २१७ |
| ऑक्टोबर | २४ | २७७ |
| नोव्हेंबर | २९ | २१७ |
| डिसेंबर | २७ | २२८ |
| १९४१ | | |
| जानेवारी | २४ | २१२ |
| फेब्रुवारी | २८ | २३२ |
| मार्च | २८ | २४० |
| एप्रिल | २५ | २४९ |
| मे | ३० | २५५ |
| जून | २७ | २५९ |
| जुलै | २५ | २५४ |
| ऑगस्ट | २९ | २५८ |
| सप्टेंबर | २६ | २६७ |
| ऑक्टोबर | ३१ | २७४ |
| नोव्हेंबर | २८ | २८७ |
| डिसेंबर | २६ | ३१४ |
| १९४२ | | |
| जानेवारी | ३० | ३३३ |
| फेब्रुवारी | २७ | ३७४ |
| मार्च | २७ | २८१ |
| एप्रिल | २४ | ४१३ |
| मे | २९ | ४३१ |
| जून | २४ | ४३८ |
| जुलै | २९ | ४४९ |
| ऑगस्ट | २६ | ४६६ |
| सप्टेंबर | ९ | ४८९ |

( चलनी नोटांतील एकूण वाढ ३२० कोटि रु. )

### जी. जी. दांडेकर मशिन् वर्क्स लि., भिवंडी

( वार्षिक सभा २७-९-४२ )

वरील कंपनीस ३० जून, १९४२ असेर संपलेल्या वर्षी २०,२९३ रुपये निवळ नफा झाला. ११,९७२ रुपयांचा घसारा व ७,९९१ रुपये बुडीत येण्याच्या तरतुदीसाठी बाजूस काढल्यावर आणि ३ हजार रुपयांची बोनसची तरतूद केल्यावर हा नफा उरत आहे. गेल्या वर्षी नफा १८,७५१ रुपये झाला होता व त्या पूर्वीच्या वर्षी तो १२,४४० रुपये होता. शिलकी नफा हिशेबांत घेतल्यावर नफा वाटणीस २३,५५१ रुपये येतात, त्याचा विनियोग खालीलप्रमाणें सुचविण्यांत आला आहे:—

| | | रुपये |
|---|---|---|
| इंडे गुडविल लिहून टाकण्यासाठी | | १,००० |
| इनकम टॅक्स व सुपरटॅक्ससाठी | | ३,५०० |
| डिव्हिडंडसाठी | रु. | |
| क्यु. प्रेफरन्स भागांवर ५% | २,६०८ | |
| ऑर्डिनरी भागांवर ६% | ८,३६५ | |
| | १०,९७३ | १०,९७३ |
| पुढील वर्षांत ओढण्यासाठी | | ८,०७७ |
| | | २३,५५१ |

डिव्हिडंडमधून प्राप्तीवरील कर काढून घेतला जाईल. ऑर्डिनरी भागांस पहिल्या वर्षी ४%, दुसऱ्या वर्षी ५% व आतां ६% डिव्हिडंड मिळत आहे. पुढील वर्षांत ओढलेल्या शिलकी नफ्याची रकमहि वाढली आहे. कंपनीजवळील शिलकी मालाची किंमत करतांना, मूळ पडलेली अथवा बाजारभावानें होणारी, ह्यांपैकी कमी भरलेली किंमतच ताळेबंदांत धरलेली आहे. कंपनीचे मॅनेजर श्री. के. एल. भिडे ह्यांस कंपनीनें टाटा केमिकल्सच्या मिठापूर येथील कारखान्यांत ओताई कामावरील देखरेखीसाठी पाठविलें होतें. त्यांस टाटा कंपनीनें दांडेकर कंपनीच्या परवानगीनें आपल्या स्वतःचे अधिकारी वर्गांत सामील करून घेतलें आहे. कंपनीनें अहवालाचे वर्षी एकूण २ लक्ष, २५ हजार रुपयांच्या उत्पादनाची विक्री केली. म्हणजे तो आकडा एका वर्षांत दुप्पट झाला आहे. कंपनीच्या बोर्डाचे अध्यक्ष श्री. व्ही. पी. वर्दे, बी. कॉम. हे असून श्री. गोपाळ गणेश दांडेकर, कारखान्याचे संस्थापक, ह्यांचेकडे कंपनीची सर्व व्यवस्था आहे. कंपनीस ठेवींचे द्वारां खेळतें भांडवल वाढत्या प्रमाणावर मिळत आहे आणि मागणी केलेलें बहुतेक सर्व भांडवल (२ लक्ष, ५९ हजार रु.) वसूल झालेलें आहे.

### जर्मनीची तयारी

रशियांतील आपल्या युद्ध–आघाडीचे मागें जर्मनी संरक्षक तटबंदी करीत आहे. हिंवाळ्याची तरतूद करण्यांत तो गुंतला आहे आणि त्यासाठी सबंध युरोपांतील कानाकोपरा धुंडाळण्यांत येत आहे. थंडी संपल्यावर पुनः युद्धास प्रारंभ करण्याचीहि तयारी जर्मनींत चालू आहे. मिळेल तेथील जुनें लोखंड जमा करण्यांत येत आहे. ज्या यंत्रसामुग्रीचा युद्धकाळांत उपयोग नाहीं, अशी मौल्यवान् यंत्रसामुग्रीहि मोडून त्याचा युद्धकार्याकडे उपयोग केला जात आहे. जर्मन सैनिकांजवळील १९४३ मधील साहित्य ह्या पूर्वीच्या वर्षीइतकेंच परिपूर्ण असेल, अशी दक्षता बाळगण्यांत येत आहे. जर्मनींतील नागरिकांस अर्थातच ह्या सर्वांची झळ सोसावी लागत आहे. ग्रेट ब्रिटनमधील मिनिस्ट्री ऑफ एकनॉमिक वॉरफेअरचे पार्लमेंटरी सेक्रेटरी, मि. डिंगलफूट, ह्यांनीं आपल्या एका भाषणांत वरील माहिती नुकतीच सांगितली.

## स्फुट विचार

### प्रांतिक ग्रामसुधारणा बोर्डाची सभा

युद्ध परिस्थितीच्या अनेक अडचणींमध्येंहि ग्रामसुधारणेचा कार्यक्रम मुंबई सरकारच्या विद्यमानें ह्या प्रांतांत अव्याहत चालू ठेवण्यांत आला आहे ही समाधानाची गोष्ट आहे. गेल्या गुरुवारीं व शुक्रवारीं पुणें येथील कौन्सिलहॉलमध्यें भरलेल्या प्रांतिक ग्रामसुधारणा बोर्डाच्या सभेपुढें आलेल्या महत्त्वाच्या विषयांवरून ह्या गोष्टीची प्रचीति येते. ह्या बोर्डाची मागील बैठक गेल्या जानेवारी महिन्यांत मुंबई येथें भरली होती आणि गेल्या आठ महिन्यांत ग्रामसुधारणेच्या कार्यानें केलेल्या प्रगतीचा आढावा मागच्या आठवड्यांतील पुण्याच्या सभेंत घेण्यांत आला. ह्या बैठकीचेंहि उद्घाटन सर रॉजर लम्ले ह्यांनीं केलें. युद्धपरिस्थितीचा शेतीच्या धंद्यावर होणाऱ्या परिणामांचा उल्लेख त्यांनीं प्रामुख्यानें करणें स्वाभाविकच होतें. वहातुकीच्या साधनांच्या अडचणींमुळें मालाची ने-आण कठीण झाली आहे आणि बाजारभावांचें नियंत्रण फलद्रूप होण्याच्या मार्गांत व्यत्यय येत आहे,ह्या गोष्टीचा उल्लेख करून खाद्य-पदार्थांचें उत्पादन वाढवण्याबाबत झालेल्या प्रयत्नांस येत असलेल्या यशाविषयीं गव्हर्नरांनीं समाधान व्यक्त केलें. हलक्या कपाशीच्या लागवडींत घडवून आणलेली घट आणि धान्याच्या पिकांचा विस्तार होण्याबद्दल झालेली खटपट ह्यांचे योगानें खाद्य-पदार्थांच्या पुरवठ्यांत होणाऱ्या वाढीसंबंधाची माहिती बोर्डाच्या सभेंत देण्यांत आली ती उत्तेजनकारक आहे. ग्रामसुधारणेच्या कार्यक्रमाच्या अनेक अंगांचा ह्या सभेंत विचार होऊन पुढील प्रगतीची दिशा आखण्यांत आली.

---

### रॉकेलचा पुरवठा व उपयोग

प्रांतिक ग्रामसुधारणा बोर्डाच्या सभेंत त्याचे अध्यक्ष, मि. नाइट, ह्यांनीं खाद्यपदार्थांच्या पुरवठ्याचे बाबतींतल्या परिस्थितीची सविस्तर माहिती दिली. त्याचबरोबर राकेल तेलाच्या पुरवठ्याविषयीं सरकार काय करीत आहे आणि जनतेनें त्यासंबंधांतली आपली गरज कशी भागवावी ह्याचेंहि दिग्दर्शन सभेंत करण्यांत आलें. रॉकेलच्या पुरवठ्याचे मामुली मार्ग युद्धपरिस्थितीमुळें नेहमीप्रमाणें खुले नसल्याकारणानें ह्या जिनसांचा हिंदुस्थानांतला पुरवठाच मोठ्या प्रमाणांत कमी झालेला आहे. जनतेस आणि विशेषतः मध्यम स्थितींतल्या व गरीब लोकांस स्वस्त मिळणाऱ्या राकेलची संवय लागली आहे आणि त्याचा प्रसार खेडेगांवांतून चोहोकडे झाला आहे. ह्या कारणानें मर्यादित झालेला रॉकेलचा पुरवठा पुरवून कसा वाटता व वापरतां येईल हा आज प्रश्न आहे. अत्यंत जरूरीच्या गरजा आणि विशेषतः गरीब लोकांच्या तीव्रतेनें भासणाऱ्या गरजा ह्यांचेकडे अग्रतेच्या मानानें लक्ष पुरवलें गेलें पाहिजे हें उघड आहे. राकेलचा उपयोग आज दुहेरी होत आहे. स्टोव्हमध्यें जाळण्यासाठी व उजेडाच्या दिव्यांसाठी रॉकेल वापरण्यांत येत आहे. ह्या दोहोंपैकीं उजेडाचें महत्त्व सर्वसाधारण समाजाचे दृष्टीनें अधिक असल्याकारणानें लोकांस त्या कामाकरितां अधिकांत अधिक रॉकेल कसें मिळूं शकेल हें पहाणें अगत्याचें आहे. ह्या अडचणींवर मुंबई सरकारनें उपाय योजला आहे तो उचित व कार्यक्षम आहे असें म्हटलें पाहिजे. भुईमुगाचें तेल विशिष्ट प्रमाणांत रॉकेलांत मिसळलें असतां हें मिश्रण उजेडासाठी दिव्यांत जाळतां येतें, पण तें स्टोव्हमध्यें निरोपयोगी ठरतें. ह्या रीतीचें मिश्रित तेलच पुरवलें गेल्यास त्याचा दुहेरी अनुकूल परिणाम होईल. स्टोव्हमध्यें आज जळणाऱ्या तेलाची बचत होऊन मिश्रणामुळें दिव्यांत वापरावयाच्या तेलाचा एकूण पुरवठा वाढेल आणि सध्या रॉकेलच्या बाबतींत जनतेची विलक्षण गैरसोय होत आहे ती दूर होण्यास सहाय मिळेल अशी अपेक्षा आहे.

---

### जनतेच्या रहाणींत बदल

उत्पादन, वहातुकीचीं साधनें, व्यापार व लोकांची सामान्य रहाणी ह्यांवर युद्धपरिस्थितीचा अकल्पित रीतीनें कसा परिणाम होत आहे हें राकेलच्या मर्यादित वापरावरून स्पष्ट दिसून येत आहे. नेहमीच्या गरजा भागण्याचे मार्गांत व्यत्यय उत्पन्न झाला असतां त्या गरजांत प्रतवारी लावून त्यांपैकीं अधिक जाचक असतील. त्या भागवण्याकडे लक्ष पुरवावें लागतें. त्याचप्रमाणें, गरजा भागवण्याच्या अनेक मार्गांपैकीं कमी त्रासाचा व खर्चाचा उपाय शोधावा व अंगिकारावा लागतो. राकेलच्या ऐवजी गोडें तेल, मोटारच्या ठिकाणीं बैलगाडी, तांदुळाच्या बदली जोंधळे-बाजरी, साखरेच्या ठिकाणीं गूळ, ह्याप्रमाणें बदल होणें आतां अपरिहार्य झालें आहे आणि त्याची लोकांनीं संवय स्वतःस लावून घेणें प्राप्त आहे. उदाहरणार्थ, मुंबई प्रांताच्या तांदुळाच्या पुरवठ्याची परिस्थिति विचारांत घेतली असतां असें दिसतें कीं, सरकारनें मद्रासकडून तांदूळ आणावयाची तजवीज केली आहे तरी रंगूनचा माल येणें बंद झाल्याकारणानें ह्या महत्त्वाच्या खाद्यपदार्थाचा तुटवडा पडल्यावांचून रहाणें अशक्य आहे. ह्या कारणानें कांहीं प्रमाणांत तांदुळाची जागा बाजरी व जोंधळा ह्यांनीं भरून काढणें अगत्याचें होणार आहे. खाद्य पदार्थांच्या पुरवठ्याशीं वहातुकीच्या साधनांचा निकट संबंध असून तो सर्व प्रांतभर व्यवस्थितपणानें वाटला जाण्याचें विशेष महत्त्व आहे. तसेंच, जिनसांच्या निश्चित किंमती ठरवण्याचा प्रश्नहि त्या वाटणीशीं संलग्न झालेला आहे. ह्या योगानें केवळ भावनियंत्रणानें कार्यभाग होण्यासारखा नाहीं हें उघड आहे. ह्या सर्व बाबतींत मि. नाइट ह्यांनीं प्रांतिक सरकार करीत असलेल्या प्रयत्नांची माहिती दिली ती उद्बोधक आहे. खरीपाचें पीक चांगलें होण्याची अपेक्षा आहे ही अत्यंत समाधानाची गोष्ट असून रब्बीच्या हंगामाकडे आतां लक्ष पुरवलें जात आहे.

---

### बँकेच्या व्याख्येंत दुरुस्ती

बँकिंग कंपनीची व्याख्या करणें अतिशय अवघड काम आहे. बँक ह्या संस्थेचें वैशिष्ट्य कशामध्यें आहे, हें निश्चितपणें सांगणें कठीण जातें. १९३६ च्या दुरुस्त कंपनी कायद्यामध्यें २७७ एफ ह्या कलमांत बँकिंग कंपनीची व्याख्या देण्यांत आली आहे. "ज्या कंपनीचा प्रमुख धंदा चालू खात्यावर अगर अन्य मार्गानें ठेवी स्वीकारणें–ज्या ठेवी ठेवीदारांस चेकनें, ड्राफ्टनें अगर ऑर्डरनें काढतां येतील–हा असतो, तिला बँकिंग कंपनी असें म्हणावें" अशी ती व्याख्या आहे. ह्या कलमांत पुढें नमूद केलेले अनेक व्यवहार तिनें केले, तरी तिच्या "बँकिंग कंपनी"च्या स्वरूपास बाध येत नाहीं. वरील कंपनी कायदा अमलांत आल्यानंतर, बँकिंग कंपनीचा व्यवहार करण्यासाठी एखादी कंपनी

स्थापन झाली अथवा तिच्या नांवांत "बँक", "बँकिंग", "बँकर" असे शब्द आले, तर तिच्या मेमोरँडममध्यें तिचे उद्देश २७७ एफ् ह्या कलमाप्रमाणें निर्बंधित असल्याविना कंपनी नोंदविली जाणार नाहीं, असें २७७ जी (१) हें कलम सांगतें. ह्याचा अर्थ, १५ जानेवारी, १९३७ पूर्वी नोंदण्यांत आलेल्या कांहीं कंपन्या स्वतःस बँक म्हणवूनहि बँकिंग कंपन्यांवरील निर्बंध टाळूं शकतात. कारण, बँकिंगची व्याख्या आम्हांस लागू पडत नाहीं, असें त्या सांगतात. बँकिंगसंबंधींच्या कायद्यांत व्यापक सुधारणा करण्याचा प्रश्न सरकारनें तूर्त लांबणीवर टाकला आहे, तथापि कांहीं सुधारणा तातडीनें हातीं घेणें आवश्यक झालें. २७७ (एफ्) ह्या कलमांत दुरुस्ती करणारें एक बिल मध्यवर्ती असेंब्लीपुढें चर्चेसाठी लवकरच येईल. त्या अन्वयें, एखादी कंपनी चालू खात्यावर अगर अन्य मार्गानें ठेवी स्वीकारण्याचा—ज्या ठेवी ठेवीदारास चेकनें, ड्राफ्टनें अथवा ऑर्डरनें काढतां येतील—धंदा मुख्यतः करो अगर न करो, तिच्या नांवांत "बँक", "बँकर" किंवा "बँकिंग" हे शब्द आले कीं तिला बँकिंग कंपनी मानण्यांत यावयाचें आहे. बँकिंग कंपनीच्या व्याख्येंत अशा कंपन्या आल्या कीं, त्यांस कंपनी कायद्याचा १० अ हा भाग लागू होईल आणि त्यांचे व्यवहार, भांडवल, रिझर्व्ह फंड, रोख रकमा, व्यवहाराचे वेळोवेळ तक्ते पुरवणें इत्यादींवर निर्बंध येतील. सरकारी गॅझिटांत कायद्यांतील ही दुरुस्ती प्रसिद्ध केल्यानंतर एका वर्षानें ती अंमलांत येईल.

## करार पार पाडतां आला नाहीं, तर पैसे परत

### एक महत्त्वाचा निवाडा

व्यापारी देवघेवीच्या कायद्यांत बदल घडवून आणणारा एक महत्त्वाचा निकाल हाऊस ऑफ लॉर्ड्सनें नुकताच दिला आहे, त्याचा परिणाम दीर्घगामी होणार आहे. पुष्कळ वेळां असें घडतें, कीं मनुष्य करार पुरा होण्यापूर्वींच कांहीं रकम आगाऊ देतो व त्या दुसऱ्याचे सत्तेबाहेरील कांहीं गोष्टींमुळें त्यास करार पार पाडतां येत नाहीं. चँडलर विरुद्ध वेबस्टर हा ह्या संबंधांतील सुप्रसिद्ध दावा होय व त्याच्या आधारानें अनेक दावे आजवर निकालांत निघाले आहेत. सातव्या एडवर्ड बादशहांच्या राज्यारोहणाची मिरवणूक पहाण्याकरितां वादीनें १०० पौंड देऊन प्रतिवादीच्या घराची एक खिडकी मुकर केली परंतु बादशहांच्या आजारीपणामुळ राज्यारोहणाची तारीख पुढें ढकलली गेली. वादीनें प्रतिवादीकडून १०० पौंड परत मागितले, परंतु कोर्टानें ते त्यास दिले नाहींत. करार पार पाडण्यास प्रतिवादीची तयारी होती, तेव्हां राज्यारोहणच वेळेवर झालें नाहीं, त्यास प्रतिवादीचा इलाज नव्हता, असें त्याचें समर्थन होतें. ह्या निवाड्यांतील तत्त्वाचा फेरविचार आतां झाला आहे. १९३९ सालीं लीड्स येथील एका कंपनीनें एका पोलिश कंपनीस पोलंडमधील बंदरांत यंत्रसामुग्री पोचती करून विकण्याचें अंगावर घेतलें, व जुलैमध्यें १ हजार पौंड अडव्हान्सहि घेतले. सप्टेंबरमध्यें जर्मनीनें पोलंडवर स्वारी केली व पोलंड शत्रुपक्षीय ठरला. कंपनीला करार पाळणें अशक्य झालें. पोलिश कंपनीनें अडव्हान्सची रकम परत मागितली तेव्हां कोर्ट ऑफ अपीलानें चँडलर वि. वेबस्टर ह्या निवाड्याकडे बोट दाखविलें परंतु हाउस ऑफ लॉर्ड्स त्याचा फेरविचार करील असें सुचविलें. हाउस ऑफ लॉर्डसनें ह्या ३८ वर्षांपूर्वींच्या निवाड्यांतील तत्त्व अमान्य करून वादीची बाजू उचलून धरली.


## दि बँक ऑफ इंडिया लि.

[स्थापना : १९०६]

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल ... ... ... | रु. | २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... ... ... | रु. | १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड ... ... ... | रु. | १,१८,००,००० |

मुख्य कचेरी: ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

मुंबईमधील शाखा : बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

इतर शाखा : अहमदाबाद (भद्र, मुख्य ऑफिस), अहमदाबाद (एलिस ब्रिज शाखा), अहमदाबाद (स्टेशन शाखा), अंधेरी (मुंबई शेजारीं), बांद्रे (मुंबई शेजारीं), कलकत्ता (क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर, कराची, नागपूर (किंग्जवे), नागपूर (इतवारी बझार), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत.

लंडन एजन्ट्स : वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

डायरेक्टर्स : सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई, सर जोसेफ के. नाईट, मि. ए. गेडिस, सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई., मि. दिनशा के. दाजी, श्री. रामनिवास रामनारायण.

### करंट डिपॉझिट अकाउंट्स :

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रकम ५ रु. पेक्षा कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमीचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

एजंट:—टी. आर. लालवाणी.

## दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

हेड ऑफिस : पुणें शहर.

स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.

मुंबई शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | : रु. १०,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | : रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | : रु. ४,४५,९५० |
| वसूल झालेलें भांडवल | : रु. २,२२,७९५ |
| एकूण खेळतें भांडवल | : रु. ३७,००,००० |

### डायरेक्टर्स

प्रो. वा. गो. काळे, अध्यक्ष

| | |
|---|---|
| श्री. धों. कृ. साठे | श्री. मा. रा. जोशी |
| श्री. म. ग. पवार | श्री. श्री. गो. मराठे |
| श्री. त्र्यं. वि. रानडे | श्री. र. चिं. सोहोनी |
| श्री. बा. पुं. घर्डे | मि. फ. दो. पदमजी |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदीविक्री कसोशीनें करून दिली जाते.

बँकेच्या शेअरवर १९४१ अखेर पुऱ्या होणाऱ्या वर्षीं द. सा. द. शेंकडा ४ टक्के करमाफ डिव्हिडंड दिलें गेलें. बँकेची शेअरविक्री चालू आहे.

म. वि. गोखले
मॅनेजर.

# सहकारी संस्थांचे अहवाल

## मुंबई प्रांतिक सहकारी बँक लि.

( वार्षिक सभा : २६-९-४२ )

वरील बँकेकडील ठेवींत अहवालाचे वर्षी बरीच वाढ झाली, तरी सहकारी पतपेढ्यांस दिलेल्या कर्जांत एक लक्ष रुपयांची घटच पडली. सरकारी व इतर रोख्यांचे तारणावरील कर्जें थोडीं वाढलीं व बँकेच्या वैयक्तिक सभासदांस शेतीच्या मालाचे तारणावर दिलेल्या कर्जांत पूर्वीच्या वर्षीच्या मानानें १० लाखांची वाढ झाली. बँकेनें ६ लक्ष, ३० हजार रुपयांच्या डिबेंचरसचे पैसे अहवालाचे सालीं चुकते केले व त्या संबंधांतील सिंकिंग फंडाचा विनियोग लँडमार्गेज खात्यांतील तूट भरून काढण्याकडे, इनव्हेस्टमेंट रिझर्व्ह व बिल्डिंग रिझर्व्ह निर्माण करण्याकडे, संशयित कर्ज फंड वाढविण्याकडे आणि रिझर्व्ह फंडांत वाढ करण्याकडे केला. सरकारी रोख्यांची पडलेली किंमत आणि त्यांचा बाजारभाव ह्यांतील तफावत भरून काढण्याकडे इनव्हेस्टमेंट रिझर्व्हची तरतूद भरपूर असली, तरी नफ्यांतून २५½ हजार रुपये त्यासाठी बाजूस काढून ठेवण्यांत येणार आहेत. मुं. प्रां. स. इन्स्टिट्यूटच्या मालकीची सर विठलदास मेमोरिअल इमारत बँकेनें आपल्या कर्जाच्या पोटीं घेतली आहे,त्या इमारतीच्या घसाऱ्याचे तरतुदीसाठी बिल्डिंग रिझर्व्हची योजना आहे. बँकेनें लँड मॉर्गेज खातें बंद केलें असून, त्या खात्यांतील तुटीच्या भरीसाठी सरकारनें २४ हजार रुपये दिले आहेत. अहवालाचे वर्षी मुदतीबाहेरील येणें व्याजाची रकम ६० हजारांनीं कमी झाली व प्रत्यक्ष थकलेल्या व्याजापेक्षां त्याच्या बुडीची बँकेनें केलेली तरतूद ६० हजारांनीं अधिक आहे. वरील हकीकतीवरून, मागील वर्ष बँकेस चांगलें गेलें असून निवळ नफा दाखविण्यापूर्वी बँकेची मजबुती वाढविण्याकडे डायरेक्टरांनीं विशेष लक्ष पुरविलेलें दिसून येतें. मागील शिलकी नफा धरून बँकेस १,००,७६२ रुपये नफा झाला, त्यांतून भागीदारांस ३½% दरानें डिव्हिडंड देण्याकडे ४५,४९४ रुपयांचा विनियोग होईल. बँकेचें खेळतें भांडवल २ कोटि, ९० लक्ष रुपये झालें आहे.

## श्री लक्ष्मी सें. को. बँक लि., फलटण

( वार्षिक सभा: २९-९-४२ )

बँकेच्या पटावर ६६ सहकारी संस्था व २१८१ वैयक्तिक भागीदार असून त्यांनीं अनुक्रमें ३४,६१० व २८,५३० रुपयांचे भाग घेतलेले आहेत. बँकेच्या रिझर्व्ह व इतर फंडांत मिळून ६३ हजार रुपये आहेत. ठेवींचा आकडा ४ लक्ष, ८२ हजार रुपये झाला आहे. बँकेनें १ लक्ष, २२ हजार रुपये रोख व इतर बँकांत आणि १ लक्ष, ८१ हजार रुपये सरकारी खजिन्यांत व इतरत्र गुंतविलेले आहेत. सहकारी पेढ्यांस दिलेल्या कर्जाचा आकडा २ लक्ष, ७१ हजार रुपये असून एकूण कर्जाची रकम ३ लक्ष, ६० हजार रुपये आहे. मुदतींत व्याज देणाऱ्या पेढ्यांना व भागीदारांना व्याजाच्या रकमेवर २% सूट देण्यांत येते, त्यासाठी बँकेनें नफ्यांतून स्वतंत्र रिबेट फंड काढलेला आहे. शेतकऱ्यांच्या मागणीप्रमाणें शेतीचीं उपकरणें वगैरे आणवून देण्यासाठी बँकेनें प्रथमपासून दुकानशाखा चालू ठेवली आहे. अहवालाचे वर्षी बँकेस ७,६६९ रुपये नफा झाला. भागीदारांस ६¼% दरानें डिव्हिडंड मिळणार आहे. बँकेनें तिच्या स्थापनेपासून १९३१-३२ अखेर ७% व त्यानंतर आतापर्यंत ६¼% दरानें डिव्हिडंड दिलें आहे. बँकेस जोडलेल्या सहकारी पेढ्यांच्या सभासदांपैकी शेतीचे हिशेब ठेवणारांस बक्षिसें देण्याची योजना बँकेनें केली आहे, ती अनुकरणीय आहे.

## पुणें सें. को. बँक लि., पुणें

वरील बँकेचा रौप्यमहोत्सव नुकताच साजरा झाला, त्याचे अनुरोधानें बँकेच्या प्रगतीसंबंधीं आम्हीं अगोदरच लिहिलेलें आहे. बँकेचें एकूण खेळतें भांडवल ६५ लक्ष, १५ हजार रुपये असून त्याचा तपशील ३ लक्ष, ९१ हजार रुपये भागांची रकम; ५४ लक्ष, ७६ हजार रुपये ठेवी; १ लक्ष ५१ हजार रुपये रिझर्व्ह फंड; ४ लक्ष, ९७ हजार रुपये इतर फंड आणि नफ्याची शिल्लक वगैरे असा आहे. ह्या भांडवलापैकी ५ लक्ष ४१ हजार रुपये रोख व बँकांत असून, ९ लक्ष १८ हजार रुपये इमारत व इतर मालमत्तेंत गुंतले आहेत. ४३ लक्ष, ३१ हजारांचे सरकारी व तत्सम रोखे आहेत, ४ लक्ष १४ हजार रुपये वैयक्तिक सभासदांकडून येणें आहेत व ११ लक्ष, ११½ हजार रुपये सोसायट्यांकडे बाकी कर्ज आहे. ठेवी मर्यादेंत ठेवण्याबद्दल आटोकाट प्रयत्न करूनहि त्या तशा राहूं शकल्या नाहींत. बँकेस जोडलेल्या शेतकी सोसायट्यांची वर्गवारी अ ५, ब २७, क ४२ व ड १०२ अशी आहे. सेफ कस्टडी व्हॉल्टचा अहवालाचे वर्षी युद्धजन्यपरिस्थितींत खातेदारांस विशेष फायदा झाला. वैयक्तिक सभासदांना विशिष्ट मर्यादेंत जामिनकीवर अथवा विम्याचे पॉलिसीवर कर्ज देण्याबाबत बोर्डानें नियम करून सहकारी खात्याकडे मंजुरीसाठी पाठविले आहेत. जिल्ह्यांत नवीन पतपेढ्या स्थापन करण्याबाबत सहकारी खात्याचें धोरण आतां अनुकूल असून त्याबाबत बँकेनें प्रयत्न सुरू केले आहेत. घरांचे तारणावरील कर्जाच्या परतफेडीची मुदत ३ वर्षांची ५ वर्षे करण्यांत आली आहे. अहवालाचे वर्षी बँकेस ३५,००७ रुपये नफा झाला. त्यांतून भागीदारांस ४% डिव्हिडंड व १% ज्युबिली बोनस असें एकूण ५% डिव्हिडंड देण्यांत आलें व नोकरवर्गास महिन्याच्या ½ पगाराऐवजी पुऱ्या महिन्याच्या पगाराइतका बोनस देण्यांत आला. बँकेचें मुंबई प्रांतांतीलच नव्हे, तर संबंध हिंदुस्थानांतील सेंट्रल बँकांत स्थान अत्यंत उच्च असून तिच्या आजच्या नकळत आर्थिक परिस्थितीस सुव्यवस्थित कारभार व जनतेचा अविरत विश्वास कारणीभूत झालेला आहे.

## डेक्कन मर्चंटस् को. बँक लि.

वरील बँकेचा रौप्यमहोत्सव भोरचे राजेसाहेब ह्यांचे अध्यक्षतेखालीं ता. १९ रोजीं साजरा झाला. तिनें केलेल्या प्रगतीची कल्पना खालील तक्त्यावरून येईल.

| वर्ष | भांडवल व रिझर्व्ह | खेळतें भांडवल | वार्षिक देवघेव | खर्चाचें प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १९३६ | ४४,४८९ | २,९५,१५० | २,७३,४१,१४६ | २.५% |
| १९३७ | ६५,७८५ | ३,९३,२०३ | ३,२७,७६,३४२ | २.५% |
| १९३८ | ७४,९३५ | ५,२१,९३९ | ४,७७,३७,७९४ | २.२५% |
| १९३९ | ८४,५१९ | ५,७६,०३३ | ४,४३,८१,५६४ | २.४% |
| १९४० | ९७,९९२ | ६,३०,५५४ | ४,२०,६३,९३५ | २.४% |
| १९४१ | १०५,२७६ | ९,१२,१०१ | ४,९२,७८,३५५ | २% |
| १९४२ | १०९,५२७ | ९,७९,७६७ | ६,७१,८९,०५३ | २.४% |

## अर्थशास्त्र

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें ३००; किंमत ३ रुपये
या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धान्तांचें विवेचन केलें आहे.

## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

## श्रीराम सिल्क मिल्स लि., बंगलोर

[ कंपनीनें १९४१ अखेर ६ टक्के डिव्हिडंड वांटला आहे. ]

युद्धसाहित्यपुरवठा–खात्याची पॅरेशूटकरितां लागणाऱ्या
रेशमी कापडाची ऑर्डर पुरी करण्यासाठी लागणाऱ्या भांडवलाकरितां तूर्त एकूण रु. १ लक्षाच्या रकमेपर्यंत

## ठेवी घेणें आहेत

व्याजाचा दर ४॥ ते ६ टक्के. ठेव किमान रु. ५०० ची असावी. ठेवीवरील व्याज दर सहा महिन्यांनीं दिलें जातें.

श्रीराम सिल्क मिल्स लि., श्रीरामबाग, बसवनगुडी, बंगलोर.

**नारायण गोविंद नाईक,** ( माजी अध्यक्ष, म्हैसूर चेंबर ऑफ कॉमर्स ) मॅनेजिंग डायरेक्टर

आमच्या कारखान्यांतील माल मुंबईस बॉम्बे स्वदेशी को–ऑपरेटिव्ह स्टोअर्समध्यें व पुण्यास लक्ष्मी रोडवरील रे म्यूझिअमच्या व्यापार–संवर्धन–गृहांत पहा.

राहाणेची व भोजनाची उत्तम सोय




फोन नं. ७७९ गणपति चौक, व्यवस्थापक.

## N. V. WADNERKAR

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver, Electro-plater & Manufacturer of Sporting Trophies, Medals, Cups etc.

- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -
POONA CITY.




## मधुमेहावरील औषध

तीन आठवड्यांचे औषधास फक्त रु. ७

— मागविण्याचा पत्ता —
मॅनेजिंग डायरेक्टर, रूरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड.
१२३ ए, सदाशिव, पुणें २.

## DECCAN BOOK STALL

Booksellers, Publishers & Subscription Agents
**Fergusson College Road, Poona No. 4**

(1) We stock and supply Educational books, General books & Library books.
(2) We supply Government of Bombay and Government of India publications.
(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.
(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.

## वक्तशीर आणि मनपसंत काम करून देणारे

## मोहन वॉच कंपनी

रेग्युलेशन मोफत
कॉमनवेल्थ बिल्डिंगसमोर लक्ष्मी रोड, पुणें २.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, एम्. ए. यांनी 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

**जाहिरातींचे दर.**
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

**वर्गणीचे दर.**
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हशील माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ८ | पुणें, बुधवार, तारीख ३० सप्टेंबर १९४२ | अंक ३९

## विमेदार नि हवाई हल्ला

शत्रु राष्ट्रकडून हवाई हल्ला अगर तत्सम उपद्रव यापासून बिनलढाऊ नागरिकांच्या जीविताला येणाऱ्या धोक्याचा समावेश विमा पॉलिसीच्या अटींत होतो काय व त्यासाठी जादा प्रिमिअम भरावा लागेल काय ? असा प्रश्न साहजिकच नागरिकांमध्यें चर्चिला जात आहे.

## ट्रस्ट ऑफ इंडिया

**विमा कंपनीच्या**

विमा पॉलिसीमध्यें हवाई हल्ल्यामुळें जीविताला होणाऱ्या अपायाचा अंतर्भाव होतो त्याकरितां जादा प्रिमिअम नाहीं.

तरी विलंब न लावतां—
तुमचा नि तुमच्या आप्तेष्टांचा विमा

## ट्रस्ट ऑफ इंडिया

विमा कंपनींतच उतरा.

अध्यक्षः—श्रीमंत सरदार जगन्नाथ महाराज पंडित
माहितीपत्रकें बिनामूल्य पाठवूं

ट्रस्ट ऑफ इंडिया विमा कं. लि.
लक्ष्मी रोड, पुणें २.
वि. ह. देशमुख, बी. ए.
जनरल मॅनेजर

## महायुद्ध दाराशीं आलें
## परदेशी औषधें
## दुर्मिळ व महाग झालीं

पण

**भिण्याचें कारण नाहीं !!!**

— कारण —

## आयुर्वेद रसशाळा पुणें लि०

या देशी औषधाच्या प्रसिद्ध कारखान्यानें तयार केलेलीं

- रक्तवर्धक,
- उपनाह,
- बालजीवन,
- कॅल्सीप्राल

*इत्यादि पेटंट, स्टँडर्ड व लोकप्रिय औषधें खात्री पटल्यामुळें*

**★ डॉक्टर्सहि वापरूं लागले आहेत. ★**

दरसाल बिनचूक नफा वाटणाऱ्या ह्या कंपनीचे शेअर्स व औषधें मागवा.

## आयुर्वेद रसशाळा पुणें लि०

मुख्य दुकान गणपति चौक, लक्ष्मीरोड, पुणें २.

**महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.**

बंबाचे माडीवर

# महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

# विविध माहिती

### संपांत सामील न होणारे कामगार

कारखान्यांतील कामगार संपावर गेले तरी कांहीं कामगार संपांत सामील होत नाहींत. अशांचें विनाकारण नुकसान होऊं नये, म्हणून त्यांना चार दिवसांची नोटीस अथवा त्याऐवजी चार दिवसांचा पगार देण्यांत यावा, अशी कायद्यांत दुरुस्ती करण्याचा हिंदुस्थान सरकारचा विचार आहे.

### अमेरिकेंतील युद्धविषयक उत्पादन

अमेरिकेंतील एकूण उत्पादनाच्या ४०% उत्पादनाचा युद्ध-कार्याकडे विनियोग होत आहे. हें प्रमाण लवकरच ६० होईल.

### भाड्याच्या मोटारींची संख्या कमी केली

न्यूयॉर्कमधील भाड्याच्या मोटारींची संख्या ता. १९ पासून एकतृतीयांशानें कमी करण्यांत आली आहे. म्हणजे ११,७०० टॅक्सीपैकीं ३,९०० टॅक्सी आतां बंद रहातील. त्यामुळें सालिना १ कोटि गॅलन पेट्रोलची बचत होईल व १५,००० नव्या टायर्सची आवश्यकता उरणार नाहीं.

### कॉरोनर्स कायद्यांत दुरुस्ती

अपघातानें मृत्यु आल्यास त्या मृत्यूचे संबंधांत १८७१ च्या कॉरोनर्स कायद्यान्वयें मुंबई प्रांतांत कॉरोनर चौकशी करतात. शत्रूच्या हल्ल्यांमुळें येणाऱ्या मृत्यूंची चौकशी त्यांनीं करूं नये, अशी सदरहु कायद्यांत दुरुस्ती करण्यांत येणार आहे.

### यांत्रिक शिक्षणाचीं केंद्रें

हिंदुस्थान सरकारच्या यांत्रिक शिक्षणाच्या योजनेस अनुसरून, जुलै १९४२ अखेर मुंबई प्रांतांत एकूण ५८ केंद्रांत २,०१७ तरुण शिकत होते. सबंध हिंदुस्थानांतील २९५ केंद्रांत शिकणारांची संख्या २७,३५६ होती. अद्याप ६,१४० जागा रिकाम्या आहेत, त्यांपैकीं १,२३४ मुंबई प्रांतांतील केंद्रांत आहेत.

### हिंदी व ब्रिटिश अधिकाऱ्यांचें प्रमाण

| | ब्रिटिश अधिकारी | | हिंदी अधिकारी |
|---|---|---|---|
| हिंदी लष्कर | ४·७५ | : | १ |
| रॉयल इंडियन नेव्ही, रॉयल इंडियन रिझर्व्ह, रॉयल इंडियन व्हॉलंटियर रिझर्व्ह | २·४ | : | १ |
| इंडियन एअर फोर्स | ६·२५ | : | १ |

### जॉस्ट्स एंजिनिअरिंग कं. लि.

वरील कंपनीस मार्च १९४२ अखेर संपलेल्या वर्षी ७३,६६० रुपये नफा झाला. भागीदारांस करमाफ १५% डिव्हिडंड मिळालें. इलेक्ट्रिकल व मेकॅनिकल इंजिनिअरिंगचा आणि कंत्राटाचा धंदा ही कंपनी करते.

### मध्यम आकाराच्या कारखान्यांस कंत्राटें

हिंदुस्थान सरकारच्या सप्लाय खात्यानें १९४१–४२ मध्यें मध्यम आकाराच्या कारखान्यांस ५ कोटि रुपयांच्या मालाच्या ऑर्डरी दिल्या. १९४२–४३ मध्यें आतांपर्यंत दिलेल्या तत्सम ऑर्डरींचा आकडा ७ कोटि रुपये भरतो.

### हिंदी सैनिक

चालू युद्धांत एकूण ९८,३८८ हिंदी सैनिक मृत झाले, जखमी झाले अथवा युद्धकैदी झाले.

### "बेव्हिन" योजना

ग्रेट ब्रिटनमध्यें हिंदी कामगारांस यांत्रिक शिक्षण देण्याच्या "बेव्हिन" योजनेप्रमाणें आतांपर्यंत ३०४ हिंदी लोकांची शिक्षणक्रमासाठी निवड झालेली आहे. त्यांपैकीं ५० मुसलमान आहेत.

### अंदमानमधील कैदी

जपाननें अंदमान बेटावर स्वारी केली, त्यावेळीं तेथें ५,८५० हिंदी कैदी होते, अशी माहिती मध्यवर्ती असेंब्लींत सांगण्यांत आली.

### रुपयावाल्या चलनी नोटा

दररोज २५ लक्ष एक रुपयेवाल्या नोटांची छपाई करण्यांत येते.

### दरमहा २० कोटि रुपयांचीं बिलें

हिंदुस्थान सरकारच्या सप्लाय खात्यामार्फत दरमहा २० कोटि रुपयांचीं ४५ हजार बिलें दिलीं जातात.

### मिठाचा खप

हिंदुस्थानांतील मिठाचा वार्षिक खप सुमारें ५ कोटि, ३० लक्ष मण इतका आहे.

### शेतींत वाढ

चालू युद्धास प्रारंभ झाल्यापासून आतांपर्यंत ६० लक्ष एकर आणखी जमीन ग्रेटब्रिटनमध्यें पिकाखालीं आणण्यांत आली आहे.

### नवीन दीड आणावालीं पोस्टाचीं पाकिटें

सहाव्या जॉर्जच्या मुखवट्याचीं दीड आणावालीं पोस्टाचीं नवीं पाकिटें तयार असून तीं कांहीं पोस्टांत विकत मिळूं लागलीं आहेत. हीं पाकिटें बदामी कागदाचीं आहेत.

### दुप्पट दंड

न्यूयॉर्कमधील मोटारींच्या कमाल वेगाची मर्यादा रात्रीचे वेळीं आतां ताशीं ३५ मैल ठरविण्यांत आली आहे, तिचें उल्लंघन करणारांच्या दंडाचें प्रमाण तेथील मॅजिस्ट्रेटांनीं दुप्पट केलें आहे.

### सुताच्या व्यापाऱ्यांस लायसेन्स

सुताच्या व्यापाऱ्यांस लायसेन्स आवश्यक करणाऱ्या हुकुमाची अंमलबजावणी १ ऑक्टोबरऐवजीं १ नोव्हेंबर रोजीं सुरू होईल.

### रोमेल जर्मनीस परतला !

फील्ड मार्शल रोमेल ह्यास घसादुखी झाली असून उपचारासाठी तो जर्मनीस परतला आहे, अशी बातमी आहे. त्याच्या आठव्या सैन्यानें पराभव केला तरी त्याच्या वैयक्तिक कीर्तीस बाध येऊं नये ह्या उद्देशानें वरील बातमी प्रसृत करण्यांत आली असावी, असा समज आहे. एल अलामेनवरील हल्ल्याचे प्रसंगीं रोमेलची प्रकृति बरी नव्हती, अशी बातमी त्यावेळीं बाहेर आली होती.

### कोळशाचा उपयोग काटकसरीनें करा

"ग्रेट ब्रिटनमधील चालू वर्षीतील कोळशाचा उठाव त्याच्या उत्पादनापेक्षा दर आठवड्यास २½ लक्ष टन अथवा सबंद वर्षाचा १ कोटि, ३० लक्ष टन अधिक होत आहे. तेथील रेल्वेज बंद ठेवतां आल्या तर ही तूट कशीबशी टाळतां येईल. कारखान्यांतील कोळशाच्या उपयोगांत, उत्पादनावर प्रतिकूल परिणाम न होऊं देतां काटकसर करण्यास बराच वाव आहे.":—जळण व सर्पण खात्याचे ब्रिटिश मंत्रि, मेजर लॉइड जॉर्ज, ह्यांचें भाषण.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | ३०८ | ७ स्फुट विचार ... | ३११ |
| २ हिंदी फडनविसांच्या लंडनमधील वाटाघाटी | ३०९ | युद्धोत्तर पुनर्घटनेची दिशा—व्यापाऱ्यांची तक्रार मिटवा——ग्राम सुधारणा बोर्डांच्या कांहीं सूचना—बीबे को. कार्टेलीं | |
| ३ रेल्वे कायद्यांत दुरुस्ती | ३१० | ८ सहकारी संस्थांचे अहवाल... ... | ३१३ |
| ४ इंडेक्स नंबर | ३१० | | |
| ५ दौंड बारामती रेल्वे | ३१० | | |
| ६ पाचोरा जामनेर रेल्वे | ३१० | | |



# अर्थ

बुधवार, ता. ३० सप्टेंबर, १९४२


## हिंदी फडनविसांच्या लंडनमधील वाटाघाटी

हिंदुस्थान सरकारचे फडनवीस, सर जरेमी रेसमन, हे ग्रेट-ब्रिटन व हिंदुस्थान ह्यांचेमधील देण्याघेण्यासंबंधीं तपशीलवार समक्ष विचारविनिमय करण्याकरितां इंग्लंडला जुलै महिन्यांत गेले होते. तेथें त्यांनीं ब्रिटिश फडनविशी खात्याशी महत्त्वाच्या सांपत्तिक प्रश्नांची चर्चा केली. प्रस्तुत युद्धाच्या घडामोडींमुळें हिंदी सांपत्तिक परिस्थितीबाबत महत्त्वाचे व गुंतागुंतीचे अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत, त्यांचा निकाल लावून घेणें, हा त्यांच्या भेटीचा मुख्य उद्देश होता. हिंदुस्थानांतील वाढत्या लष्करी खर्चाची ग्रेटब्रिटन व हिंदुस्थान ह्यांचेमध्यें कोणत्या तत्त्वावर व कोणत्या प्रमाणांत वाटणी व्हावी, हा ह्या संबंधांतील महत्त्वाचा प्रश्न आहे. साम्राज्य सरकारच्या वतीनें हिंदुस्थान सरकार कोट्यवधि रुपये येथें खर्च करीत आहे. ह्या रकमा अर्थात् रिझर्व्ह बँकेच्या खात्यांत लंडनमध्यें जमा होत आहेत. हिंदुस्थानांतील विलायतेमधील कर्ज फेडण्याकडे त्यांचा विनियोग केला, तरी शिल्लक एकसारखी वाढत आहे. ही उरलेली बाकी हिंदुस्थानांत कशी आणावयाची हा प्रश्नहि अत्यंत महत्त्वाचा आहे. तो पैसा लंडनमध्येंच गुंतवावयाचा म्हटल्यास त्याची गुंतवणूक कशी करावयाची, ह्याचीहि चर्चा फडनविसांनीं लंडनमध्यें केली असली पाहिजे. हिंदुस्थानच्या चलन खात्याच्या निधीपैकीं २६६ कोटि रुपये दोन महिन्यांपूर्वी स्टर्लिंग रोख्यांत गुंतलेले होते; त्याचा आकडा आतां २३० कोटि रुपये इतका झाला आहे.

हिंदुस्थान सरकार व ब्रिटिश सरकार ह्यांचेमधील देण्याघेण्याची योजना पक्की होण्यापूर्वी मध्यवर्ती असेंब्लीचा सल्ला घेण्यांत यावा; तयार योजनाच केवळ ऐकण्याची तिला पाळी येऊं नये, अशी मागणी श्री. जमनादास मेहता ह्यांनीं असेंब्लींत केली. हिंदुस्थानाचा लष्करी खर्च किती झपाट्यानें वाढत आहे, हें कांहीं आकडे देऊन त्यांपैकीं हिंदुस्थानानें किती खर्च सोसावयाचा हें निश्चित ठरण्याची आवश्यकता त्यांनीं प्रतिपादन केली. निवळ हिंदुस्थानाच्या संरक्षणासाठी केलेल्या लष्करी खर्चाचा भार हिंदुस्थानावर पडावा, अशी हल्लींच्या व्यवस्थेत तरतूद आहेच. तथापि, ह्या संबंधांत स्पष्ट खुलासा होणें जरूर आहे. सर कावसजी जहांगिर ह्यांनींहि आपल्या भाषणांत सरकारी धोरणाच्या स्पष्टीकरणाची मागणी केली. फडनवीस, सर जरेमी रेसमन, ह्यांनीं आपल्या उत्तरांत इंग्लंडमधील चर्चेवर प्रकाश पाडला नाहीं. त्यांच्या इंग्लंडमधील वाटाघाटींची माहिती हिंदुस्थान सरकारास सादर झाल्यानंतर त्यास त्याबाबत विचार करण्यास अद्याप अवधि मिळालेला नाहीं, असें ते म्हणाले. गेल्या अंदाजपत्रकाचे वेळेपासून युद्धखर्चांत एकसारखी वाढ होत चालली आहे, त्याची सध्यांच्या योजनेप्रमाणें कशी वाटणी करावी हें ठरविण्यांत येत आहे. तथापि, सर्वत्र युद्धाचे क्षेत्राचा साकल्यानें विचार करूनच ही वांटणी निश्चित करावी लागणार, हें उघड आहे. सध्याच्या योजनेचे बाहेर जादा खर्चाचा बोजा स्वतःचे शिरावर घेण्याचा सरकारचा विचार झाल्यास, त्यासंबंधांत असेंब्लीस आपलें म्हणणें मांडण्यास जरूर संधि दिली जाईल, असें त्यांनीं सांगितलें.

१९३६–३७ अखेर हिंदुस्थान सरकारचें ग्रेट ब्रिटनमधील देणें (रेल्वे स्टॉक, डिबेंचर्स, इ. वगळून) २७½ कोटि पौंड होतें, त्यापैकीं २० कोटि पौंडांचें कर्ज ऑगस्ट, १९४२ अखेर वळतें करून घेण्यांत आलें आहे, अशी माहिती फडनविसांनीं ता. २१ रोजीं असेंब्लींत सांगितली. उरलेल्या कर्जापैकीं ६ कोटींची परतफेड जानेवारी १९४३ मध्यें होईल, असेंहि त्यांनीं सांगितलें. हिंदुस्थान सरकारच्या विलायतेमधील कर्जाची फेड होऊन कालांतरानें हिंदुस्थानाची देणेकऱ्याची भूमिका नाहींशी होऊन तो आतां घेणेकरी होऊं लागला आहे. आफ्रिका, कॅनडा, इत्यादि ब्रिटिश साम्राज्यांतर्गत देशांचीहि अशीच परिस्थिति झाली आहे. अमेरिकेचें देणें फेडण्यासाठी इंग्लंडनें तेथील आपले रोखे विकून टाकले आहेत. अशा रीतीनें, इंग्लंडचें देणें वाढत आहे. ग्रेट ब्रिटनमध्यें होणाऱ्या आयातीची किंमत देण्यास ग्रेट ब्रिटनमधून पुरेशी निर्गत होणें सध्यां शक्य नसल्याकारणानें तें राष्ट्र इतर देशांत गुंतविलेलें भांडवल त्या कामीं उपयोगांत आणीत आहे. चालू युद्धामुळें ग्रेटब्रिटनला आपल्या परदेशांत गुंतलेल्या भांडवलाच्या फार मोठ्या भागास मुकावें लागेल, हें उघड आहे. युद्धोत्तर काळांत ह्या परिस्थितीचा प्रत्यक्ष व्यावहारिक परिणाम काय होईल, ह्याचा अंदाज करून त्याची तरतूद आतांपासूनच करावी लागेल. युद्ध संपल्यानंतर नवी यंत्रसामुग्री मागविण्यासाठीं इंग्लंडमधील आपल्या येण्याचा हिंदुस्थानास उपयोग करतां येईल, असें लंडन टाइम्सनें सुचविलें आहे. हिंदुस्थान सरकारनें इंग्लंडमध्यें उभारलेलें कर्ज व ब्रिटिश लोकांनीं हिंदी उद्योगधंद्यांत गुंतविलेलें भांडवल ह्यांतील फरक ध्यानांत घेऊन, ब्रिटिश भागीदारांना व कर्जरोखे धारण करणारांना त्यांच्या परतफेडीचे मुदतीचे आधीं पैसे घेण्यास भाग पडणार नाहीं, अशी आशा फिनॅन्शिअल टाइम्सनें व्यक्त केली आहे. ग्रेट ब्रिटनमधील आपल्या येण्याचे पोटीं ह्या रोख्यांची वजावाट न करतां हिंदुस्थानानें ग्रेट ब्रिटनमध्यें येणें वाढूं द्यावें व त्याचा युद्धसमाप्तीनंतर भांडवली खर्चासाठी उपयोग करावा, असा फिनॅन्शिअल टाइम्सचा सल्ला आहे. कॅनडानें आपलें ग्रेट ब्रिटनमधील एक अब्ज डॉलर्सचें येणें रद्द करून ह्या रकमेची ग्रेट ब्रिटनला देणगी दिली ह्या गोष्टीची आठवण मँचेस्टर गार्डियननें करून

द्देऊन, तशी गोष्ट हिंदुस्थानाचे बाबतींत शक्य नसल्यास, युद्ध-समाप्तीपर्यंत त्यानें वाट पाहून ह्या येण्याचा किफायतशीर उपयोग करून घ्यावा असें सुचविलें आहे. ह्या सर्व विवेचनावरून, हिंदुस्थान व ग्रेट ब्रिटन ह्यांचेमधील देण्याघेण्याचा प्रश्न किती बिकट आहे ह्याची कल्पना येईल. हिंदुस्थान सरकारनें हिंदी हितसंबंधांस अनुसरून आपल्या रास्त मागणीस चिकटून राहिलें पाहिजे, अशी हिंदी लोकांची स्वाभाविक अपेक्षा आहे. युद्धप्रयत्नांस व्यत्यय न येतां सहविचारानें हे प्रश्न सोडविणें आवश्यक आहे.

---

## रेल्वे कायद्यांत दुरुस्ती

आगगाडींतील जागा रिझर्व्ह करण्याचे संबंधांतील कायदा दुरुस्त करण्यांत येणार आहे, त्याचे मुळाशीं सरदार महमद अवरंगजेबखान ह्यांनीं मुंबई हायकोर्टांत मुंबई सरकारविरुद्ध जिंकलेला दावा हा आहे. अवरंगजेबखान ह्यांनीं फ्रँटियर मेलमध्यें एक निजण्याचा बर्थ रिझर्व्ह केला. त्यांचें म्हणणें असें होतें कीं, त्यांना खालचें बाक दिलें असल्याचें सांगितलें होतें, परंतु प्रत्यक्ष वरची फळी त्यांचे वाट्यास आली. त्यांस खालचाच बर्थ हवा होता, म्हणून तो दुसऱ्याचे नांवावर असतांहि त्यावरच आपला बिछाना त्यांनीं अंथरला. खालचें बाक रिझर्व्ह करणारा उतारू आल्यावर त्यास ती जागा देण्याचें अवरंगजेबखानानें नाकारलें. अवरंगजेबखानावर १८९० च्या रेल्वे ॲक्टाचे १०९ व १२० कलमान्वयें ऑनररी मॅजिस्ट्रेटांचे बेंचापुढें फिर्याद करण्यांत आली, परंतु आरोपीस दोषमुक्त ठरविण्यांत आलें. ह्या निवाड्यावर हायकोर्टांत अपील करण्यांत आलें. "रिझर्व्ह केलेल्या डब्यांत शिरणें हा गुन्हा आहे परंतु रिझर्व्ह केलेलें बाक व्यापणें ह्यास शिक्षा सांगितलेली नाहीं. रेल्वे ॲक्टांत हा दोष राहून गेलेला आहे. अशा परिस्थितींत दुसऱ्यानें रिझर्व्ह केलेली जागा व्यापल्याबद्दल आरोपीस शिक्षा करतां येत नाहीं" असा हायकोर्टानें निवाडा केला व सरकारचें अपील फेटाळून लावलें. रेल्वे कायद्यांत इतकीं वर्षे राहून गेलेला हा दोष सरदार अवरंगजेबखान ह्यांच्या कणखरपणामुळें हायकोर्टाचे निदर्शनास येऊं शकला व सरकारास तो काढून टाकण्यासाठी कायद्यांत दुरुस्ती करणें आतां भाग पडलें आहे.

---

### दौंड-बारामती रेल्वे कं., लि.

गेल्या चार वर्षांतील वरील रेल्वेवरील वहातुकीचे आंकडे खालीं दिले आहेत, त्यावरून उतारूंची संख्या, तिकिटांचें उत्पन्न, मालाची वहातूक, भाड्याचें उत्पन्न, ह्यांत सालोसाल झालेली वाढ दिसून येईल. सर्व रेल्वे कंपन्यांच्या व्यवहारांतील वाढीस धरूनच ही वाढ झालेली आढळेल.

| वर्ष | उतारू | | माल | |
|---|---|---|---|---|
| | संख्या | उत्पन्न (रु.) | मण | उत्पन्न (रु.) |
| १९३८-३९ | ७६,०४९ | ३२,७०५ | ५,९०,३०५ | ५९,३५६ |
| १९३९-४० | ९१,७९९ | ३४,१६३ | ६,६७,६६७ | ७०,६९१ |
| १९४०-४१ | १,१८,३४८ | ४१,४२९ | ८,४३,७६६ | ९०,६४९ |
| १९४१-४२ | १,२१,६१२ | ६०,११५ | ९,०५,५८५ | १,०१,००९ |

---

### पाचोरा-जामनेर रेल्वे कं. लि.

दौंड-बारामती रेल्वेप्रमाणेंच ह्या रेल्वेच्या वहातुकीचे व उत्पन्नाचे आंकडे खालीं दिले आहेत:—

| वर्ष | उतारू | | माल | |
|---|---|---|---|---|
| | संख्या | उत्पन्न रु. | मण | उत्पन्न रु. |
| १९३८-३९ | १,१४,३२७ | ३६,५७२ | १,२९,१३८ | १२,०९४ |
| १९३९-४० | १,१९,९३९ | ३६,१९१ | ८३,६७५ | ७,७५१ |
| १९४०-४१ | २,२१,०६३ | ५४,४८८ | १,३३,८८७ | १५,००६ |
| १९४१-४२ | २,३१,५७१ | ६०,१०५ | २,४२,३६४ | २९,५४६ |

---

### इंडेक्स नंबर

बाजारभावांच्या चढउताराचा प्रश्न आतां अत्यंत महत्त्वाचा झाला असून त्याकडे सर्वांचें लक्ष लागून राहिलेलें आहे. हिंदुस्थानांतील कांहीं महत्त्वाच्या जिनसांचे घाऊक विक्रीचे भाव व त्यांचे तुलनात्मक इंडेक्स नंबर्स सरकारच्या आर्थिक सल्लागाराचे कचेरींत सरकारी उपयोगासाठी तयार करण्यांत येत असतात, परंतु आतां ते सर्वसामान्य लोकांसहि उपलब्ध करण्यांत येणार आहेत. १९ ऑगस्ट १९३९ ते ३१ डिसेंबर, १९४१ अखेरचे आंकडे ह्याप्रमाणें नुकतेच प्रसिद्ध करण्यांत आले. निवडक २३ जिनसांचे घाऊक बाजारभाव लक्षांत घेऊन हे आंकडे तयार करण्यांत आले आहेत आणि जिनसांचे ४५ प्रकार विचारांत घेतलेले आहेत. जिनसांचे खालीलप्रमाणें सहा गट केलेले आहेत :—

गट नं. १ तांदूळ, गहूं, चहा, भुइमुग, कॉफी, साखर, तंबाखू व खोबरें.

गट नं. २ कपास, ताग, जवस.

गट नं. ३ पिग आयर्न, कोळसा, लोंकर, कांतडीं, केरोसीन, पेट्रोल.

गट नं. ४ कपाशीचा व तागाचा तयार माल, सिमेंट, मळीचे पत्रे, कमावलेलें कांतडें.

गट नं. ५ एक ते तीन ह्या गटांतील सर्व जिन्नस.

गट नं. ६ एक ते चार ह्या गटांतील महत्त्वाचे कित्येक जिन्नस.

आठवड्यांतील एका विशिष्ट दिवसाचे—शुक्रवारचे—बाजारभाव मुख्यत: विचारांत घेतले जातात ह्या बाजारभावांवर आधारलेले इंडेक्स नंबर वक्तशीर प्रसिद्ध करण्याचा सरकारचा मानस आहे.

---

### पुणें जिल्हा को. लँड मॉर्गेज बँक लि.

वरील बँकेनें अहवालाचे वर्षी २६ सभासदांना ४०,१५० रुपयांचीं नवीन कर्जें दिलीं, त्यांपैकी ३८ हजाराचीं कर्जें जुन्या कर्जफेडीसाठी होतीं. तीं देतांना १२,३०२ रुपयांची सूट मिळविण्यांत आली. "अत्यंत प्रतिकूल परिस्थितींत वसुली समाधानकारक झाली." मुदलाची थकबाकी ३५% व व्याजाची थकबाकी १४·९% आहे. मुंबई बँकेची थकबाकी ५ हजारांनीं कमी झाली आहे. गतवर्षीचा ७१४ रुपये तोटा भरून काढूनहि बँकेनें १६१ रुपये निव्वळ नफा दाखविला आहे.

# स्फुट विचार

## युद्धोत्तर पुनर्घटनेची दिशा

प्रस्तुत युद्धाचे अखेर राष्ट्रांची आर्थिक पुनर्घटना व्हावी लागेल ह्याविषयीं आतां विचारी लोकांत बहुतेक एकमत झाल्यासारखें दिसत आहे. उद्योगधंदे, व्यापार व जनतेचें आर्थिक जीवन ह्यांमध्यें राजसत्तेनें हात घालणें अनिष्ट आहे अशी विचारसरणी इंग्लंडसारख्या देशांत पिढ्यानुपिढ्या दृढमूल झालेली असली तरी तेथेंहि योजनात्मक पद्धतीनें सरकारनें लोकांच्या जीवनास व व्यवहारास इष्ट वळण लावणें अगत्याचें आहे अशा विचारांचा सूर जोरानें ऐकूं येऊं लागला आहे. प्रसिद्ध "अटलांटिक सनदे"च्या मुळाशीं ह्या विचारक्रांतीचें तत्व स्पष्टच आहे. युद्धोत्तर काळांत दारिद्र्य, उपासमार व बेकारी असल्या आपत्तींस थारा मिळणार नाहीं ह्या घोषणेचा अर्थच असा आहे कीं, सध्याच्या सामाजिक व आर्थिक रचनेंत महत्वाचे बदल झाले पाहिजेत आणि जनतेच्या प्रातिनिधिक राजसत्तेनेंच ते घडवून आणले पाहिजेत. युद्धांत झालेली हानि भरून काढणें, अंतर्गत व आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवहार सुरळीत चालतील अशी व्यवस्था करणें, शेती व उद्योगधंदे ह्यांची घडी पुन्हां नीट बसवणें, इत्यादि अनेक महत्वाचे व बिकट प्रश्न मुत्सद्यांस व पुढाऱ्यांस समाधानकारक रीतीनें सोडवावे लागतील. इंग्लंडमध्यें सर वुइल्यम बीव्हरिज ह्यांच्या नेतृत्वाखालीं एका समितीनें असल्या प्रकारच्या पुनर्घटनेच्या विषयाची चर्चा करून ब्रिटिश सरकारास कांहीं सूचना सादर करण्याचें ठरविलें आहे असें प्रसिद्ध झालें आहे, त्यावरून प्रस्तुत विवेचनावर उत्कृष्ट प्रकाश पडतो. ब्रिटनमधील प्रत्येक व्यक्तीस रोजगार मिळाला पाहिजे आणि आजारीपणासारख्या अडचणींत खाण्यापिण्याची व औषधाची सोय सर्वांचे बाबतींत झाली पाहिजे असें समितीचें म्हणणें आहे. त्याप्रीत्यर्थ प्रतिवर्षी ६७० कोटि रुपयांचा खर्च राष्ट्रास करावा लागेल असा अंदाज आहे. इंटरनॅशनल इन्फर्मेशन कमिटीच्या युद्धोत्तर तजविजीचा विचार करणाऱ्या समितीनें मित्रराष्ट्रांच्या कच्चा व पक्का माल, औषधी जिनसा इत्यादि बाबतच्या गरजांचा अंदाज केला असून शेतीच्या परिस्थितीसंबंधानें योजना आखल्या आहेत, असेंहि प्रसिद्ध झालें आहे. अशा तऱ्हेचे प्रयत्न चालू आहेत ह्यावरून युद्धोत्तर काळांतील आर्थिक पुनर्घटनेचा प्रश्न किती महत्वाचा व व्यापक आहे ह्याची कल्पना येण्यासारखी आहे. न्यूझीलंडचे मुख्य प्रधान, मि. वॉल्टर नॅश, ह्यांनीं अमेरिकेंत खालील उद्गार काढले ते ह्या दृष्टीनें सूचक आहेत. ते म्हणाले:- "१९३९ मध्यें जें जग आपणांस माहीत होतें तें आतां प्राचीन काळचें जग झालें आहे. आतां ह्यापुढचें जें आपलें कार्य आहे तें नष्ट झालेल्या जगास पुनर्जन्म देण्याचें नसून त्याच्या संहारामधून सबंद मानवजातीस हितकारक होतील अशा संस्था निर्माण करणें हें आहे."

## व्यापाऱ्यांची तक्रार मिटवा

मुंबई शहरांतील धान्याच्या घाऊक व्यापाऱ्यांच्या प्रातिनिधिक संस्थेच्या बाजारभाव-नियंत्रणाच्या सरकारी धोरणासंबंधानें तक्रारी पुन्हां पुन्हां प्रसिद्ध होत आहेत. धान्याच्या लोकांच्या गरजा भागतील ह्या बेताचा पुरवठा आणि त्याच्या योग्य किंमती ह्यांचे बाबतींतली माहिती मुंबई सरकारच्या वतीनें प्रसिद्ध करण्यांत येते आणि तीमध्यें व्यापारीवर्गाच्या गाऱ्हाण्यांचें निराकरण करण्याचा प्रयत्न केला जातो. व्यापाऱ्यांच्या संस्थेनें एक लांबलचक पत्रक नुकतेंच प्रसिद्ध करून सरकारी धोरणांत झालेल्या व होत असलेल्या चुका निदर्शनास आणल्या आहेत. मुंबईच्या बाजारांत धान्याचा तुटवडा कां होत आहे आणि तें योग्य भावानें मिळण्यास जनतेस कोणत्या अडचणी येत आहेत ह्याचें विवेचन सोदाहरण ह्या पत्रकांत केलें आहे. त्यांतल्या तक्रारींस सरकारचें समर्पक उत्तर असेल आणि तें जनतेच्या माहितीसाठी पुढें मांडण्यांत येईल अशी अपेक्षा करण्यास हरकत नाहीं. आपली संस्था जुनी, प्रातिनिधिक व मोठी असतां आणि धान्याचा व्यापार प्रामुख्यानें आपल्या सभासदांच्या हातीं असतां सरकारी धोरण ठरणें व त्याची अंमलबजावणी होणें ह्या कामीं आपला सल्ला घेतला व ऐकला जात नाहीं असें घाऊक व्यापाऱ्यांनीं म्हटलें आहे. धान्य-पुरवठ्याचा प्रश्न इतक्या जिव्हाळ्याचा आहे कीं, व्यापारी व प्रांतिक सरकार ह्यांनीं परस्परांचे दोष दाखवित बसणें श्रेयस्कर होणार नाहीं. सरकार व व्यापारी ह्यांच्या पूर्ण सहकार्यानें हा प्रश्न सोडवला जाणें अगत्याचें आहे. सरकारच्या जबाबदाऱ्या व अडचणी ह्यांचाहि विचार व्यापाऱ्यांनीं करावयास पाहिजे आणि सरकारनें व्यापाऱ्यांच्या सहाय्यानें धान्यपुरवठा व भावनियंत्रण ह्यांविषयींचें धोरण अंमलांत आणणें इष्ट आहे. व्यापाऱ्यांस बाजूस सारून धान्य-पुरवठ्याची सर्व जबाबदारी स्वतःच्या शिरावर घेणें जसें सरकारास शक्य नाहीं तसेंच आमच्याच म्हणण्याप्रमाणें सरकारनें सर्व व्यवस्था ठेवली पाहिजे असेंहि व्यापाऱ्यांस म्हणतां यावयाचें नाहीं. ह्या दोन टोकांच्या मधला सहकार्याचा मार्ग आक्रमण्यांत आला पाहिजे, मामुली काळांतली व्यापाराची व्यवस्था युद्धपरिस्थितींत जशीच्या तशी चालू राहूं शकत नाहीं आणि तिला जरूरीप्रमाणें मुरड घालावी लागते हें धंदेवाल्यांनीं विसरतां कामा नये. जनतेच्या हिताच्या व सोयीच्या दृष्टीनें व्यापारीवर्गावर मोठी जबाबदारी येऊन पडते हें त्यानें लक्षांत वागवावें.

## ग्रामसुधारणा बोर्डाच्या कांहीं सूचना

शेतकरी कर्जनिवारणाचा कायदा मुंबई प्रांतांत कांहीं निवडक तालुक्यांत लागू करण्यांत आला आहे. निरनिराळ्या ठिकाणीं त्या कायद्यान्वयें किती सावकारांनीं व कर्जदारांनीं अर्ज केले, ह्या विषयांची माहिती प्रांतिक ग्रामसुधारणा बोर्डाच्या गेल्या सभेंत देण्यांत आली. कित्येक क्षेत्रांत फार थोड्या लोकांचे अर्ज आले आहेत ह्याचें कारण काय असावें ह्याचा विचार त्या सभेंत झाला. तथापि, ह्या परिस्थितीचें विश्वसनीय निदान करण्यास आधारभूत होईल अशी माहिती अजून उपलब्ध नाहीं असें चर्चेअंतीं आढळून आलें. तथापि, कायद्याच्या अंमलबजावणीबाबत जे नियम केलेले आहेत त्यांपैकीं कांहींत दुरुस्ती करण्याची आवश्यकता सभेनें मान्य केली. कर्जनिवारणाच्या कायद्यांत ज्यांचीं कर्जें मर्यादित केलीं जातील अशा शेतकऱ्यांस विवक्षित अटींवर देण्यांत यावयाच्या कर्जांचे संबंधांत कित्येक नियंत्रणें घालण्यांत आलीं आहेत. पीक करण्यासाठीं दिलेल्या कर्जांची नियमांतली सध्याची व्याख्या आकुंचित असून कांहीं टापूंमध्यें शेतकऱ्यांस हंगामांत उदरनिर्वाहास पैसा लागतो आणि इतरत्र त्यांस शेतीचे बैल भाड्यानें न मिळतां विकत घ्यावे लागतात ह्यामुळें सदरहू बाबींचा अंतर्भाव वरील व्याख्येंत केला जावा असें मत बोर्डाच्या सभेनें

व्यक्त केलें. कर्जनिवारणाच्या कायद्याची अंमलबजावणी एकदा चालू झाली म्हणजे शेतकऱ्यांस त्याच्या नियमांप्रमाणें कर्जे मिळण्याची व्यवस्था मोठ्या प्रमाणावर व्हावी लागेल. हें कार्य सहकारी संस्थांच्या मार्फत यशस्वी तऱ्हेनें होण्यासाठी योग्य योजना अंमलांत येण्याची आवश्यकता सभेनें प्रतिपादली. पतपेढ्यांनीं दिलेलीं कर्जें सुरक्षित व्हावीं ह्याकरितां कर्जनिवारणाच्या किंवा सहकाराच्या कायद्यांत आवश्यक ती दुरुस्ती केली जावी असेंहि सभेनें सुचवलें. पतपेढ्यांस कर्जाचे वसुलीचे बाबतींत अग्रतेचा हक्क न मिळाल्यास त्यांचें नुकसान होऊन शेतकऱ्यांस कर्जें मिळण्याची अडचण पडेल ह्यांत शंका नाहीं. सरकार व सावकार ह्यांचेपेक्षा सहकारी संस्था शेतकऱ्यांस कर्जें देण्याचे कामीं अधिक उचित समजल्या जाणें इष्ट असून ह्याच कारणानें सदरहु संस्थांच्या मजबुतीकडे विशेष लक्ष पुरवलें जाणें अगत्याचें आहे.

---

### बॉबे को. क्वार्टर्ली

वरील त्रैमासिकाचा सप्टेंबर,१९४२चा अंक प्रसिद्ध झाला आहे. प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूटचें तिच्या नव्या घटनेप्रमाणें काम लवकरच सुरू होईल. ह्या दृष्टीनें इन्स्टिट्यूटच्या स्थापनेचा उद्देश, तो पार पाडण्यांतील अडचणी, सहकारी खात्याचे अधिकारी व बिनसरकारी कार्यकर्ते ह्यांचें परस्पर सहकार्य, नव्या घटनेमधील कार्यक्षेत्राची आकुंचित मर्यादा, कार्यकर्त्यांचें ध्येयवादित्व व त्यासाठीं त्यांची देवघेवींची तयारी, इत्यादि प्रश्नांची चर्चा प्रो. काळे ह्यांनीं आपल्या "इन्स्टिट्यूटचा नवा अवतार" ह्या लेखांत केली आहे. युद्धकालीन चीनमधील ग्रामीण आर्थिक संसार ह्या विषयावरील श्री. वैकुंठराय मेहता ह्यांचा लेख माहितीपूर्ण आहे. कानडा जिल्ह्यांतील किरकोळ प्रमाणावर उत्पादन करणारांची सहकारी तत्त्वावर संघटना हा श्री. एस. के. कल्लापूर ह्यांचा लेखहि वाचनीय आहे. श्री. एच.बी. मोती ह्यांचा सहकारी संस्था व शेतकऱ्यांना भांडवलाचा पुरवठा हा प्रस्तुत अंकांतील शेवटचा लेख आहे. पुस्तकपरीक्षण, ताजीं पुस्तकें, संपादकीय स्फुटें, सहकाराची प्रगति, सहकारी बातम्या, रजिस्ट्रारची सर्क्युलरें, सहकारी बँकांच्या हिशेबांचे तक्ते, इत्यादि नेहमींचीं सदरें अंकांत आहेत.

---

### अमेरिकन पद्धतीचे गणवेश

अमेरिकन सैनिकांस लागणारे गणवेश हिंदुस्थानांत आतां तयार होऊं लागले आहेत. अमेरिकन सैनिकांस वेगवेगळ्या ३४ आकारांचे शर्ट लागतात; हिंदुस्थानांत फक्त ७ आकारांचे शर्टच बनवितात. आतां २१ आकारांचे शर्ट बनविण्यांत येऊं लागले आहेत.

### नवें इस्पितळ

अमेरिकन सैनिकांसाठी एक अमेरिकन इस्पितळ दिल्ली येथें बांधण्यांत येत आहे.

### रबरापासून पेट्रोल

"जपानी सरकार रबरापासून पेट्रोल करण्याचा कारखाना डच ईस्ट इंडीजमध्यें उभारीत आहे, ह्यावरून तेथील तेलाच्या खाणी अद्याप चालू होऊं शकल्या नाहींत असें सिद्ध होतें." लंडनमधील एका डच वर्तमानपत्रानें ही बातमी प्रसिद्ध केली आहे.


## दि बँक ऑफ इंडिया लि.

[स्थापना : १९०६]

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल ... ... ... | रु. २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... ... ... | रु. १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड ... ... ... | रु. १,१८,००,००० |

मुख्य कचेरी: ओरिएन्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

मुंबईमधील शाखा : बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

इतर शाखा : अहमदाबाद (भद्र. मुख्य ऑफिस), अहमदाबाद (एलिस ब्रिज शाखा), अहमदाबाद (स्टेशन शाखा), अंधेरी (मुंबई शेजारीं), बांद्रे (मुंबई शेजारीं), कलकत्ता (क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर, कराची, नागपूर (किंग्जवे), नागपूर (इतवारी बझार), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत.

लंडन एजन्ट्स : वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

डायरेक्टर्स : सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई, सर जोसेफ के. नाइट, मि. ए. गेडिस, सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई., मि. दिनशा के. दाजी, श्री. रामनिवास रामनारायण.

### करंट डिपॉझिट अकाउंट्स :

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षा कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग्ज बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमीचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

एजंट—टी. आर. लालवाणी.

---

## दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

हेड ऑफिस : पुणें शहर.

स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.

मुंबई शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | : रु. १०,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | : रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | : रु. ४,४५,९५० |
| वसूल झालेलें भांडवल | : रु. २,२२,७९५ |
| एकूण खेळतें भांडवल | : रु. ३७,००,००० |

### डायरेक्टर्स

प्रो. वा. गो. काळे, अध्यक्ष

| | |
|---|---|
| श्री. धों. कृ. साठे | श्री. मा. रा. जोशी |
| श्री. न. ग. पवार | श्री. श्री. गो. मराठे |
| श्री. त्र्यं. वि. रानडे | श्री. र. चिं. सोहोनी |
| श्री. वा. पुं. वर्दे | मि. फ. दो. पदमजी |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदीविक्री कसोशीनें करून दिली जाते.

बँकेच्या शेअरवर १९४१ अखेर पुऱ्या होणाऱ्या वर्षी द. सा. द. शेंकडा ४ टक्के करमाफ डिव्हिडंड दिलें गेलें. बँकेची शेअरविक्री चालू आहे.

म. वि. गोखले
मॅनेजर.

# सहकारी संस्थांचे अहवाल

### बेळगांव पायोनियर अर्बन को. बँक लि.

वरील बँकेच्या भागांचें भांडवल १ लक्ष ८०½ हजार रुपये असून २ लक्ष ८५ हजारांचे तिचे रिझर्व्ह व इतर फंड आहेत. बँकेच्या भागांना जोराची मागणी आहे. बँकेकडे १२ लक्ष १७ हजारांच्या ठेवी आहेत. बँकेनें घेतलेल्या सरकारी वगैरे रोख्यांची साळेबंदांतील किंमत १ लक्ष, ९०½ हजार असली तरी त्यांची बाजारभावानें होणारी किंमत ७½ हजारांनीं अधिक आहे. बँकेनें दिलेल्या कर्जाची वर्गवारी २ लक्ष, ४०½ हजार रु. सामान्य कर्जे, १ लक्ष ३½ हजार रुपये कॅश क्रेडिट कर्जे व ८४ हजार रुपये जंगम मालावरील कर्जे अशीं आहेत. एकूण कर्जाशीं दिलेली मुदत होऊन गेलेल्या रकमेचें प्रमाण २१·७% पडलें. बँकेच्या १९४१-४२ वर्षाच्या नफ्याची रकम २१,७२७ रुपये आहे. भागीदारांस ७½% डिव्हिडंड देण्यास १२½ हजार रुपये लागतील. श्री. बी. बी. पोतदार बी. ए., एलएल. बी. हे बँकेचे चेअरमन असून श्री. सी. ह. जोशी बी. ए., बी.-कॉम हे मॅनेजर आहेत. बँकेची सालोसाल भरभराट होत आहे.

---

### दि इचलकरंजी सेंट्रल को-ऑपेरेटिव्ह बँक लि., इचलकरंजी

बँकेची स्थापना १९३० मध्यें झाली. तिचें अधिकृत शेअर भांडवल ७५,००० रुपये आहे. पैकीं भरलेलें भांडवल ३२,५७५ रुपये आहे. बँकेचे रिझर्व व इतर फंड मिळून रु. ३१,८०० आहेत. भांडवल व फंडस् जवळ जवळ सारखे झाले आहेत. बँकेकडे एकूण ठेवी ३,२८,३१४ रुपयांच्या आहेत. बँकेंतील व हातांतील शिल्लक २,५५,००० रुपये आहे. बँकेनें २१,००० रुपये खर्चून स्वतःची इमारत बांधली आहे. इचलकरंजी येथील पातळाच्या कारखानदारांस बँकेचा फारच उपयोग होत आहे. श्रीमंत नारायणराव बाबासाहेब, चीफ ऑफ इचलकरंजी यांचे नेतृत्वाखाली बँकेचें काम समाधानकारकपणें चालू आहे. आर्थिक मंदीचे काळांतहि चालू सालीं बँकेनें रु. ५०४० रु. इतका नफा मिळविला आहे. बँकेनें गेलीं वर्षे ६ टक्के डिव्हिडंड आपले भागीदारांस दिलें आहे. चालू सालींहि तितकेंच देणेबद्दल डायरेक्टरांची शिफारस आहे. सुविख्यात व्यापारी श्री. मृगेंद्र विरुपाक्ष सुलतानपुरे बी. ए., एलएल. बी. हे गेलीं तीन वर्षे बँकेचे चेअरमन आहेत व तेथील रहिवासी श्री. श्रीधर हरी दातार बी. कॉम्, ए. सी. आर. ए. हे बँकेचे मॅनेजर आहेत. त्यांचे व्यवस्थेखाली बँक उत्तरोत्तर अधिकाधिक लोकादरास पात्र होत आहे.

---

### पूर्व खानदेश सहकारी संस्थांतील पगारदार नोकरांची सहकारी मंडळी लि., जळगांव

या सोसायटीची वार्षिक साधारण सभा ता. ६–९–४२ रोजीं पार पडली. सोसायटी स्थापन होण्यास केवळ ६ च वर्षे झालीं असलीं तरी इतक्या अल्पावधींत सोसायटीनें बरीच प्रगति केली आहे. सोसायटीच्या कारभारांत श्री. टी. टी. साळुंखे हे कळकळीनें लक्ष घालीत असतात. सन १९४२–४३ सालाकरितां पूर्ववत् त्यांनाच चेअरमन म्हणून एकमतानें निवडण्यांत आलें आहे. सोसायटीनें "अ" हा ऑडिटवर्ग पूर्वीप्रमाणेंच कायम ठेविला आहे. यंदा सभासदास ६¼% भागांवर डिव्हिडंड जाहीर केला आहे. सभासदांमध्यें या महागाईच्या काळांतहि काटकसर करून शिल्लक ठेवणेस उत्तेजन दिल्यामुळें सभासदांची वर्गण्याद्वारां शिल्लक वाढत आहे. यामुळें मध्यवर्ती बँकेच्या कर्जाची गरज क्वचित् भासते.

---

### अर्बन को. बँक लि., सांगली

वरील बँकेच्या सभासदांत गेल्या वर्षी ६५ ची भर पडून त्यांची संख्या ५२३ झाली. भाग भांडवल ३३½ हजारांचें ४०½ हजार झालें व ठेवींचा आकडा ७९ हजारांनीं वाढला. एकूण खेळतें भांडवल ३ लक्ष, ३७ हजारांचें ४ लक्ष, २५½ हजार रुपये झालें. सालअखेर थकबाकी १२,१३४ रुपये आहे. त्यांपैकीं ९,०२१ रु. चे लवाद दाखल केले असून त्यांची हप्तेबंदीनें फेड होत आहे. "थकबाकी बुडीत होण्याचा संभव दिसत नाहीं, कारण भरपूर तारण अगर लायक जामीनहि आहेत." वर्षअखेर बँकेस निवळ नफा ४,८९५ रुपये झाला. भागीदारांस ६% डिव्हिडंड मिळालें. श्री. ग. कों. गोडबोले, बी. ए., एलएल. बी. हे बँकेचे चेअरमन असून श्री. वा. कृ. लागू, बी. ए., एलएल. बी. हे व्यवस्थापक आहेत. श्री. वैकुंठराया मेहता ह्यांनीं बँकेस नुकतीच भेट दिली त्या वेळीं त्यांनीं "बँकेनें आपल्या केवळ सहा वर्षाच्या आयुष्यांत उल्लेखनीय प्रगति केली आहे. हिंदुस्थानांतील कोणत्याहि क्रेडिट बँकेच्या प्रगतीशीं तिची तुलना केली असतां ही बँक उठूनच दिसेल" असा अभिप्राय नमूद केला व त्याचें श्रेय त्यांनीं डायरेक्टरांच्या काळजीकाळ्यांच्या व्यवहारांस दिलें.

---

### प. खा. गव्हर्नमेंट सर्व्हंट्स को. बँक लि., धुळें

वरील बँकेचे जून, १९४२ अखेर ९२५ सभासद होते व त्यांच्या भागांचें भांडवल ४९,२३३ रुपये होतें. वर्षअखेर वर्गणी जमा ३ लक्ष, ५९½ हजार रुपये आहे. कर्जाची येणें बाकी १ लक्ष, २९ हजार रुपये आहे. कर्जाशीं थकबाकीचें प्रमाण ९.६८% पडतें. सेव्हिंग्ज बँकेस ४७५ खातेदारांचे १ लक्ष, ३६ हजार रुपये आहेत. बँकेस निवळ नफा २,६९३ रुपये झाला. भागीदारांस ३½% दरानें डिव्हिडंड मिळालें. बँकेचें खेळतें भांडवल ५ लक्ष, ८७ हजार रुपये आहे.

---

### सांगली स्टेट सें. को. बँक लि.

वरील बँकेचें वसूल भांडवल ६७,३२७ रुपये असून रिझर्व्ह व इतर फंड ८५,३६४ रुपयांचे आहेत. तिचेकडे ठेवी ८ लक्ष, ६५ हजारांच्या आहेत. बँकेनें २ लक्ष, ४२ हजार रुपये रोख व इतर बँकांत ठेवले असून इनव्हेस्टमेंट खातीं १ लक्ष, ७४ हजार रुपये आहेत. एकूण कर्जाची रकम २ लक्ष, १२ हजार रुपये भरते. सोसायट्यांकडून येणें असलेल्या थकबाकीचें प्रमाण ३७·७% पडतें. वर्षअखेर बँकेस ९,०६१ रुपये नफा झाला. द. सा. द. शे. ५ रु. १० आ. प्रमाणें डिव्हिडंड देण्यासाठी ३,७८३ रुपयांचा विनियोग करण्यांत आला.

---

## अर्थशास्त्र

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें ६००; किंमत ३ रुपये
या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

## श्रीराम सिल्क मिल्स लि., बंगलोर

[ कंपनीनें १९४१ अखेर ६ टक्के डिव्हिडंड वांटला आहे. ]

युद्धसाहित्यपुरवठा–खात्याची पॅरेशूटकरितां लागणाऱ्या
रेशमी कापडाची ऑर्डर पुरी करण्यासाठी लागणाऱ्या
भांडवलाकरितां तूर्त एकूण रु. १ लक्षाच्या रकमेपर्यंत

# ठेवी घेणें आहेत

व्याजाचा दर ४॥ ते ६ टक्के. ठेव किमान रु. ५०० ची असावी. ठेवीवरील व्याज दर सहा महिन्यांनीं दिलें जातें.

श्रीराम सिल्क मिल्स लि.,
श्रीरामबाग,
बसवनगुडी, बंगलोर.

नारायण गोविंद नाईक,
( माजी अध्यक्ष, म्हैसूर चेंबर ऑफ कॉमर्स ) मॅनेजिंग डायरेक्टर

आमच्या कारखान्यांतील माल मुंबईस बॉम्बे स्वदेशी को–ऑपरेटिव्ह स्टोअर्समध्यें व पुण्यास लक्ष्मी रोडवरील रे म्यूझिअमच्या व्यापार–संवर्धन–गृहांत पहा.

राहाणेची व भोजनाची उत्तम सोय




फोन नं. ७७९ गणपति चौक. व्यवस्थापक.

## N. V. WADNERKAR

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver,
Electro-plater & Manufacturer of Sporting Trophies, Medals, Cups etc.
- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -
POONA CITY.




# मधुमेहावरील औषध

तीन आठवड्यांचे औषधास फक्त रु. ७

—मागविण्याचा पत्ता—

मॅनेजिंग डायरेक्टर, रूरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड.
९२३ ए, सदाशिव, पुणें २.

## DECCAN BOOK STALL

Booksellers, Publishers & Subscription Agents
Fergusson College Road, Poona No. 4

(1) We stock and supply Educational books, General books & Library books.

(2) We supply Government of Bombay and Government of India publications.

(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.

(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.

## वक्तशीर आणि मनपसंत काम करून देणारे

# मोहन वॉच कंपनी

रेग्युलेशन मोफत

कॉमनवेल्थ बिल्डिंगसमोर लक्ष्मी रोड, पुणें २.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व प्रो. श्रीपाद वामन काळे, एम्. ए., यांनीं 'दुर्गाविश्राम,' भांबुर्डा, घ. नं. ९२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ८ | पुणें; बुधवार, तारीख ७ आक्टोबर १९४२ | अंक ४०

## विमेदार नि हवाई हल्ला

शत्रु राष्ट्राकडून हवाई हल्ला अगर तत्सम उपद्रव यापासून बिन-लढाऊ नागरिकांच्या जीविताला येणाऱ्या धोक्याचा समावेश विमा पॉलिसीच्या अटींत होतो काय व त्यासाठी जादा प्रिमिअम भरावा लागेल काय ? असा प्रश्न साहजिकच नागरिकांमध्यें चर्चिला जात आहे.

## ट्रस्ट ऑफ इंडिया

विमा कंपनीच्या
विमा पॉलिसीमध्यें हवाई हल्ल्यामुळें जीविताला होणाऱ्या अपायाचा अंतर्भाव होतो त्याकरितां जादा प्रिमिअम नाहीं.

तरी विलंब न लावतां—
तुमचा नि तुमच्या आप्तेष्टांचा विमा
**ट्रस्ट ऑफ इंडिया**
विमा कंपनींतच उतरा.

अध्यक्षः—श्रीमंत सरदार जगन्नाथ महाराज पंडित
माहितीपत्रकें विनामूल्य पाठवूं

ट्रस्ट ऑफ इंडिया विमा कं. लि. लक्ष्मी रोड, पुणें २ | वि. ह. देशमुख, बी. ए. जनरल मॅनेजर

## महायुद्ध दाराशीं आलें परदेशी औषधें दुर्मिळ व महाग झालीं

पण
भिण्याचें कारण नाहीं !!!
— कारण —
**आयुर्वेद रसशाळा पुणें लि०**
या देशी औषधाच्या प्रसिद्ध कारखान्यानें तयार केलेलीं

- रक्तवर्धक,
- उपनाह,
- बालजीवन,
- कॅल्सीप्राल

इत्यादि पेटंट, स्टँडर्ड व लोकप्रिय औषधें खात्री पटल्यामुळें
★ डॉक्टर्सहि वापरूं लागले आहेत. ★
दरसाल बिनचूक नफा वाटणाऱ्या ह्या कंपनीचे शेअर्स व औषधें मागवा.

**आयुर्वेद रसशाळा पुणें लि०**
मुख्य दुकान गणपति चौक, लक्ष्मीरोड, पुणें २.

**महायुद्धाची जाणीव !** कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर

## महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

# विविध माहिती

### जड लोकांवर कर

मनुष्याचें जेवढें वजन असावयास पाहिजे, त्यापेक्षा तें जितकें अधिक भरेल, त्यावर प्रत्येक पौंड वजनास ७५ रुपये ह्याप्रमाणें सालिना कर बसवावा, अशी शिकॅगो येथील एका शरीरशास्त्राच्या अध्यापकाची सूचना आहे.

### नोटांची घडी घालूं नका

"कागदाची शक्य तेवढी बचत करणें आवश्यक आहे. चलनी नोटांची घडी घालत जाऊं नका, कारण त्यामुळें घडीच्या जागीं नोटा लवकर फाटतात."–बँक ऑफ इंग्लंडच्या एका अधिकाऱ्यानें ब्रिटिश नागरिकांस वरीलप्रमाणें सूचना केली आहे.

### पोस्टाचीं लहान तिकिटें

कागदाची बचत करण्यासाठी दक्षिण आफ्रिकेच्या सरकारनें नेहमीच्या आकाराच्या निम्म्या आकाराचीं म्हणजे निम्मा कागद लागणारीं पोस्टाचीं तिकिटें काढलीं आहेत.

### ट्रेझरी बिलांवर ९ आ. ८ पै व्याजाचा दर

रिझर्व्ह बँकेनें गेल्या आठवड्यांत रिझर्व्ह बँकेचीं ६ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. ९ आ. ८ पै इतका पडला.

### युद्धजन्य मृत्यु

हिंदुस्थान सरकाच्या अधिकारकक्षेबाहेरील प्रदेशांत युद्धांतील जखमांमुळें जे बिन-लष्करी हिंदी नागरिक मरण पावले असतील, अशांचीं नांवें इंपीरिअल वॉर ग्रेव्हज कमिशनकडे पाठविण्यांत येणार आहेत.

### रशियन नागरिकांच्या रक्ताचा जर्मनीस उपयोग

रशियन नागरिकांचें रक्त काढून घेऊन तें आपल्या लष्करी 'ब्लड बँक' मध्यें जर्मनी पद्धतशीरपणें साठवून ठेवीत आहे.

### पुनः पुरानें हाहाःकार उडवूं नये अशी तरतूद

सिंध प्रांतांत सिंधू नदीच्या पुरामुळें हाहाःकार उडाला त्याची पुनरावृत्ति होऊं नये एवढ्यासाठी नदीला बांध घालण्याची योजना आखण्यासाठी सिंधी सरकार मि. इंग्लिस ह्यांची नेमणूक करणार आहे. मि. इंग्लिस ह्यांस हें काम स्वीकारतां यावें म्हणून हिंदुस्थान सरकारची परवानगी मागण्यांत आली आहे.

### स्थानिक स्वराज्य संस्थांचे सभासद 'पब्लिक सर्व्हंट' आहेत काय?

मुरादाबाद म्युनिसिपॅलिटीच्या चौघा सभासदांस लाच खाल्याच्या आरोपावरून शिक्षा झाली ती अलाहाबाद हायकोर्टानें कायम केली. म्युनिसिपॅलिटीचा सभासद हा इं. पि. को. च्या २१ व्या कलमांत सांगितलेल्या 'सार्वजनिक नोकर' (पब्लिक सर्व्हंट) ह्या व्याख्येंत बसत नाहीं, असें आरोपीतर्फे सांगण्यांत आलें तें हायकोर्टानें मान्य केलें नाहीं. म्युनिसिपॅलिटीचा सभासद सार्वजनिक कामासाठी कर व पट्ट्या बसविण्यांत भाग घेतो, म्हणून तो पब्लिक सर्व्हंट समजला जातो, असें हायकोर्टानें सांगितलें. ह्याच तत्त्वावर डिस्ट्रिक्ट बोर्डें, नोटिफाइड एरिआ कमिट्या, कॉर्पोरेशन्स, मध्यवर्ती व प्रांतिक विधिमंडळें, ह्या सर्वांच्या सभासदांचा समावेश पब्लिक सर्व्हंटमध्यें होईल.

### सर सी. व्ही. रामन ह्यांचा चिनी सोसायटीकडून गौरव

फिजिकल सोसायटी ऑफ चायना ह्या संस्थेनें सर सी. व्ही. रामन ह्यांस आपले सन्माननीय सभासद निवडून त्यांचा गौरव केला आहे.

### वैमानिक हल्ल्यांचे बळी

चालू युद्धाच्या पहिल्या तीन वर्षांचे अवधींत ग्रेट ब्रिटनमध्यें बिगर लष्करी लोकांची वैमानिक हल्ल्यांत झालेली हानि पार्लमेंटमध्यें निवेदन करण्यांत आली. एकूण ४७,३०५ लोक मरण पावले व ५५,६५८ जखमी झाले, त्यांपैकीं अनुक्रमें २१,११० व २६,०७१ लंडन शहराच्या आवारांतील होते असें मि. हर्बर्ट मॉरिसन यांनीं सांगितलें.

### चेक्सची देवघेव

मुंबई बँकर्स क्लिअरिंग हाउसमध्यें २५-९-४२ अखेर संपलेल्या आठवड्यांत २३ कोटि, २६ लक्ष रुपये किंमतीच्या १,१७,२७३ चेक्सची देवघेव झाली.

### आणखी निर्वासित येणार?

ब्रह्मदेशांतून आणखी निर्वासित येण्याचा संभव आहे व त्यासंबंधांत बंगालच्या सरकारनें आसामच्या सरकारकडे विचारणा केली आहे.

### हिंदी सैनिकांस पगारवाढ

हिंदी सैनिकांच्या पगारांत नुकतीच वाढ करण्यांत आली आहे, त्यामुळें वार्षिक लष्करी खर्चांत ५ कोटि, ३० लक्ष रुपयांची भर पडेल. सप्टेंबर, १९३९ पासून आजवर केलेल्या वाढीचा वार्षिक खर्च १० ते ११ कोटि रुपये आहे.

### टांकसाळीचें स्थलांतर

कलकत्ता येथील नव्या टांकसाळीचें उत्तर हिंदुस्थानांत कोठेंतरी स्थलांतर करण्यांत आलें आहे.

### गुळाच्या भावाचें नियंत्रण

पुणें जिल्ह्यांतील भिमथडी, इंदापूर, हवेली व पुणें शहर ह्या तालुक्यांत गुळाच्या भावाचें नियंत्रण करण्यांत आलें आहे, तेथील नियंत्रित भाव खालीलप्रमाणें आहे:—

| | |
|---|---|
| १ पल्ला ते १ खडा : | ३० रु. पल्ला |
| १ शेर : | ४½ आणे |

पुणें जिल्ह्याच्या इतर भागांतील नियंत्रित दर पुढीलप्रमाणें आहे:-

| | |
|---|---|
| १ पल्ला ते १ खडा : | ३३ रु. १२ आ. पल्ला |
| १ शेर : | ५ आणे |

### महाराष्ट्र मोटार स्टोअर्स

मोटार धंद्याकरितां लागणारा माल मोटार धंद्यांतील लोकांना पुरविण्यासाठी पुणें येथें 'महाराष्ट्र मोटार स्टोअर्स लि०' नांवाची एक लिमिटेड कंपनी स्थापन करण्यांत येऊन तिचें भांडवल एक लाख रुपयांचें ठेवून तें रु. १०० च्या १,००० शेअर्समध्यें विभागण्यांत येणार आहे. फक्त मोटार वाहतुकीचा धंदा करणाऱ्या इसमाला अगर कंपनीला नवीन लिमिटेड स्टोअर्सचे शेअर-होल्डर करून घेण्यांत येईल. प्रत्येकानें कमींतकमी १००० रुपयांचे शेअर्स घेतलेच पाहिजेत. कंपनी तावडतोब कंपनी ॲक्टान्वयें रजिस्टर करण्यांत यावयाची आहे. कंपनीच्या पहिल्या डायरेक्टर बोर्डाचे अध्यक्ष मि. सरोश न. कोठावाला (सिल्व्हर ज्युबिली मोटर्स लि.) हे राहणार असून कंपनीचें काम सुरू करून व्यवस्था पहाण्याकरितां मि. जहांगिर सातारवाला (पांचगणी मोटार सर्व्हिस) व श्री. टि. क. मेढेकर (परांजपे मोटार सर्व्हिस लि.) ह्यांची अध्यक्ष व सेक्रेटरी म्हणून नेमणूक झाली आहे. श्री. वा. गो. भागवत हे नियोजित कंपनीचे कायद्याचे सल्लागार आहेत.

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | ३१६ | होणार—स्टर्लिंगमधलि देणें भागविणार— ९५ कोटींचें कर्ज | |
| २ साखर आणि गूळ ह्यांचें उत्पादन ... | ३१७ | ६ विमा कायद्याच्या २७व्या कलमाचा अर्थ ... | ३२० |
| ३ ब्रह्मदेशाची पुनर्रचना | ३१८ | ७ व्यापारव्यवहाराचा शिक्षणवर्ग ... | ३२० |
| ४ बाजारभाव ठरवितांना शेतकऱ्यांस विसरूं नका | ३१८ | ८ सहकारी संस्थांचे अहवाल... ... | ३२१ |
| ५ स्फुट विचार ... | ३१९ | | |
| गोरगरिबांसाठी कापड—सर्व रुपये नव्या बनावटीचे | | | |



# अर्थ

बुधवार, ता. ७ आक्टोबर, १९४२


## साखर आणि गूळ ह्यांचें उत्पादन

### एक अग्राह्य सूचना

हिंदुस्थानच्या मामुली गरजेच्या मानानें स्वदेशी साखरेचें उत्पादन अधिक झाल्याकारणानें ह्या धंद्यास देण्यांत आलेलें जकातीचें संरक्षण काढून घेण्यांत यावें, निदान कमी केलें जावें, अशी सूचना करण्यापर्यंत कांहीं लोकांची मजल गेली होती. त्याचप्रमाणें, फाजील झालेली देशी साखर बाहेरच्या देशांत विकण्यास व्यापाऱ्यांस सवलती देण्यांत याव्या अशी मागणीहि झाली होती. परंतु अलीकडच्या युद्धपरिस्थितीनें ही सर्व परिस्थिति बदलून टाकली आहे. जाव्हाचे मोठे साखरेचे कारखाने जपानच्या हातीं गेल्यामुळें त्या देशांतून साखरेचा पुरवठा ऑस्ट्रेलिया, सिलोन व पश्चिम एशियाच्या भागांत होणें अशक्य झालें आहे आणि हिंदुस्थानच्या मध्यवर्तित्वामुळें येथील कारखान्यांच्या साखरेस परदेशी गिऱ्हाईक उत्पन्न होऊन ह्या मालाच्या पुरवठ्याच्या मानानें मागणी वाढली आहे. हिंदुस्थानांतील व बाहेरील गिऱ्हाइकांची मागणी योग्य रीतीनें भागवतां येईल ह्या रीतीनें स्वदेशी साखरेची वाटणी होणें अगत्याचें आहे हें उघड आहे. त्याच्याच इतकी महत्त्वाची गोष्ट उसाची पैदास व साखरेचें उत्पादन वाढविण्याच्या आवश्यकतेसंबंधाची होय. ह्याविषयीं सरकारचे प्रयत्न चालू आहेत आणि ते यशस्वी होणें अगत्याचें आहे. साखरेचा तुटवडा व महागाई होणार नाहीं ह्या बेतानें ही व्यवस्था झाली पाहिजे.

स्वदेशी साखरेच्या पुरवठ्याबाबतच्या वरील विचारांचे संबंधांत मतभेद होण्याचें कारण नाहीं. तथापि, हा पुरवठा वाढला जाण्यासाठी योजावयाचा एक उपाय सुचवण्यांत आला आहे. त्याविषयीं नापसंतीचे दोन शब्द येथें लिहिणें अगत्याचें आहे. मुंबईच्या "कॉमर्स" नांवाच्या साप्ताहिकांत अशी सूचना करण्यांत आली आहे कीं साखरेविषयींची देशांतली व बाहेरील सर्व मागणी भागवली जाण्यास गुळाच्या उत्पादनास व किंमतीस मर्यादा घालण्यांत यावी. गुळाचे भाव चढत असल्यानें शेतकऱ्यांस ऊस अधिक पिकवून त्याचा उपयोग गूळ करण्यास उत्तेजन मिळाल्यावांचून रहाणार नाहीं आणि जो ऊस साखरेचें उत्पादन वाढवण्यास आवश्यक आहे तो गुळाकडे जाऊन साखरकारखान्यांकडे येणार नाहीं. शक्य तितका ऊस साखरेच्या उत्पादनासाठी हवा आहे आणि म्हणून गुळाच्या किंमतीचें व त्याच्या उत्पत्तीचें नियंत्रण अपरिहार्य आहे असा "कॉमर्स" चा युक्तिवाद आहे. त्याचा भ्रामकपणा उघड करून दाखवणें आवश्यक आहे. गुळाच्या ऐवजी साखर वापरणें शक्य आहे असें ह्या पत्राचें म्हणणें आहे. पण तें साखरेचा पुरवठा विपुल व स्वस्त असतो त्या वेळेस लागू आहे. आज साखर दुर्मिळ झाली असतां लोकांनीं तिच्या ऐवजींहि गूळ वापरला असतां साखरेच्या पुरवठ्यावरील ताण कमी होऊन ह्या पत्राचें उद्दिष्ट साधण्यास सहाय होईल ही गोष्ट त्याचे लक्षांत आलेली दिसत नाहीं. साखर मिळत नाहीं म्हणून तिच्याऐवजीं गूळ वापरण्याची सामान्य जनतेची प्रवृत्ति वाढत असली पाहिजे आणि गुळाचें उत्पादन कमी करून तिला आळा घालण्याचा प्रयत्न करणें म्हणजे साखरेविषयींची मागणी निष्कारण वाढवणें होय हें विसरतां कामा नये. गुळाची किंमत थोडी चढली असली तर त्याचें कारण ह्या मालास असलेली मागणी व त्याच्या वहातुकीस येणाऱ्या अडचणी हें असलें पाहिजे हें उघड आहे.

"कॉमर्स" मधील लेखकानें साखरेच्या व्यापाराची बाजू उचलून धरली आहे. ऊस पिकवणारा व गूळ करणारा शेतकरी वर्ग ह्याचेविषयींचें ज्ञान व सहानुभूति ह्यांचा त्याचेमध्यें अभाव असला पाहिजे. तो म्हणतो कीं, गूळ करणें बिनयंत्री व अगदी सोपें असून त्याच्या उत्पादनाचा खर्च गुळाच्या बाजारभावाचे मानानें अल्प असतो. ह्या कारणानें लहानसहान शेतकऱ्यांसहि ऊस करणें व गुऱ्हाळें लावणें सोपें जातें. शेतकऱ्यांचा ऊस गूळ करण्यांत उपयोगांत आणला नाहीं तर तो सर्व साखर कारखान्याकडे जाईल असें मानणें चुकीचें आहे. देशांतल्या अनेक भागांतली परिस्थिति ह्या अनुमानास अनुकूल नाहीं. कांहीं कारखाने शेतकऱ्यांनीं केलेला ऊस घेतात हें खरें असलें तरी तें सर्व ठिकाणीं लागू पडण्यासारखें नाहीं. तसेंच गुळाच्या किंमती नियंत्रणानें निश्चित करतांना शेतकऱ्यांचाहि उत्पादन खर्च वाढला आहे हें विसरतां कामा नये. "कॉमर्स" मधल्या लेखकास शेतकऱ्याचीहि रहाणी महाग व अडचणीची झाली आहे, ह्या सत्यस्थितीची कल्पना नाहीं असें दिसतें. खेडेगावी जीवनाची त्यास माहिती असती आणि शेतकरी वर्गाच्या आर्थिक स्थितीविषयीं त्यास सहानुभूति असती तर गूळ परवान्यावांचून केला जाण्यास बंदी असावी आणि युद्धापूर्वीच्या तीन वर्षांच्या गुळाच्या भावाची सरासरी काढून सरकारनें तिला अनुसरून त्याची किंमत ह्यापुढे कायम करावी ह्या आशयाच्या सूचना त्यानें केल्या नसत्या. मध्यंतरीं गुळाचे भाव विलक्षण उतरल्यानें शेतकऱ्यांचें फार नुकसान झालेलें आहे आणि आतां ते चढले असल्यास त्याचा फायदा गूळ करणारांस मिळणें न्यायाचें व खेडेगावी जनतेची आर्थिक परिस्थिति लक्षांत घेतां इष्ट आहे, ह्याचा शांतपणानें विचार झाला पाहिजे. थोड्याच वर्षांमागें साखरेचे कारखाने नवे निघणें व साखरेचें उत्पादन वाढणें अयोग्य असून साखरेच्याऐवजीं गूळ बनवला गेला पाहिजे, म्हणजे साखरेचें भाव सुधारतील असें महाराष्ट्रांत कांहीं व्यापारी सांगत होते. आतां गूळ करूं नका, सगळा ऊस साखरेच्या बनावटीसाठी वापरा असें सुचवण्यांत येत आहे. ह्यांत दिसून येणारी

खासरेच्या धंद्याविषयींची आपुलकीची भावना अयोग्य नसली तरी खेडेगावी धंदा ह्या दृष्टीनें गुळाच्या धंद्याच्या महत्त्वाकडे होणारें दुर्लक्ष त्यावरून स्पष्ट होत आहे. गुळाचें उत्पादन, त्याचा खप इत्यादि बाबींचे आकडे उपलब्ध नसल्याची अडचण "कॉमर्स" मधील लेखक कबूल करून तिच्यामुळें नियंत्रणाचें धोरण अवघड होईल ह्याची त्यास शंका नाहीं. तरीहि असें उत्पादनाचें व किंमतींचें नियंत्रण झालेंच पाहिजे असें तो ठासून सांगतो. साखर दुर्मिळ झाली असतां आपली गरज गुळानें भागवा असें म्हणण्याची परिस्थिति असतां त्यानें गुळावर घसरावें हें चमत्कारिक आहे. महाराष्ट्रांतील गूळ व ऊस करणारे शेतकरी ह्यांच्या आर्थिक स्थितीची मुंबई सरकारास चांगली माहिती असल्याकारणानें ह्या धंद्यांतल्या लोकांच्या व एकंदर जनतेच्या हिताच्या दृष्टीनें नियंत्रणाविषयींच्या सूचनांचा त्याचेकडून परामर्श केला जाईल अशी आम्हांस आशा आहे. साखरेच्या हिंदुस्थान सरकारच्या नियंत्रण अधिकाऱ्यांस मुंबई सरकार ह्या प्रकरणीं योग्य तो सल्ला देईल असा आम्हांस विश्वास वाटतो.

---

**ब्रह्मदेश परत घेतल्यावर त्याची पुनर्रचना कशी केली जाईल?**

"ब्रिटिश लष्करी अधिकारी ज्याप्रमाणें ब्रह्मदेशांतून जपान्यांना बाहेर काढण्याच्या योजना आखत आहेत त्याप्रमाणें ब्रह्मदेशांतील जीवनाची पुनः स्थिर उभारणी करण्याच्या योजनाहि बिनलष्करी अधिकारी तयार करीत आहेत. ब्रह्मदेशांत पूर्वी असलेलें सर्व खरें स्वातंत्र्य जपान्यांनीं हिरावून घेतलें आहे. ब्रह्मी लोकांनीं बऱ्याच मोठ्या प्रमाणांत राजकीय व आर्थिक स्वातंत्र्य मिळविलें होतें. तुम्हीं पार्लमेंटांत निवडून दिलेल्यांपैकींच सभासदांचें मंत्रिमंडळ बनविलेलें होतें व त्यांस पुष्कळच अधिकार होते. सर्व राष्ट्रवर्धक खातीं त्यांच्याच हातांत पूर्णपणें होतीं. इष्ट तें करण्यास त्यांस कधींहि अडथळा केलेला नव्हता. जपान्यांनी हें सर्व नाहींसें केलें आहे. जपानमधील सर्वसाधारण नागरिकांस स्वातंत्र्य चाखावयास मिळालेलें नाहीं; तेव्हां जपान्यांनीं स्वातंत्र्य देण्याचें कबूल केलें तरी तें कोणासहि कसें मिळूं शकणार? सध्या ब्रह्मदेशांत स्थापन झालेल्या सरकारच्या राज्यकारभारांत ब्रह्मी लोकांना बिलकूल वाव नाहीं. थाकिन पक्षाच्या कांहीं नालायक सभासदांस हरभऱ्यावर चढवून त्यांच्या पाठिंब्यावर जपाननें नवें सरकार आधारलें आहे. ब्रह्मी लोकांचें मत त्या बाबतींत घेतलेलें नाहीं. जपान्यांना ब्रह्मदेशांतून हाकून दिल्यावर, आजवर कधींहि ब्रह्मदेश सुखी नव्हता इतका तो सुखी करण्याचें धोरण आतां आखलेलें आहे. ग्रेट ब्रिटन व संयुक्त राष्ट्रें ह्यांचाच अखेर जय होणार आहे. जे सरकारी अधिकारी ब्रह्मदेशांत मागे राहिले त्यांचें वर्तन शत्रूनें ब्रह्मदेश आक्रमण केलेल्या काळांतहि ब्रह्मदेशाचे दृष्टीनें समाधानकारक व इमानीपणाचें आढळलें, तर आम्ही तेथें परत आल्यावर त्यांचें नुकसान होणार नाहीं, असें त्यांस आमचें आश्वासन आहे."

—ब्रह्मदेशाचे गव्हर्नर सर रेजिनाल्ड डॉर्मन स्मिथ ह्यांचें ब्रह्मदेशास उद्देशून दिली रेडिओवर भाषण.

---

## बाजारभाव ठरवितांना शेतकऱ्यांस विसरूं नका

**शहरांतील मागणी व खेडेगांवांतील सांठा ह्यांचा मेळ**

(श्री. आर. जी. सरया, ओ. बी. ई., चेअरमन, मुं. प्रां. सहकारी बँक लि., ह्यांच्या बँकेचे वार्षिक सभेपुढील भाषणांतील उतारा)

"शेतीच्या मालाचे भाव युद्धास प्रारंभ होण्यापूर्वी अगदी खाली गेलेले होते. तेव्हां, त्या भावापेक्षा थोडा अधिक भाव निश्चित करून टाकणें शेतकऱ्यांचे दृष्टीनें योग्य होणार नाहीं. शेतकऱ्यांस मिळणाऱ्या किंमतींतून त्यांस आपल्या गरजा भागवतां आल्या पाहिजेत व इतर कामकरी गटांचे क्रयशक्तीचे प्रमाणांतच त्यांस क्रयशक्ति उपलब्ध झाली पाहिजे.' अमेरिकेंतील व्याख्येप्रमाणें, 'कारखान्यांत काम करणाऱ्या व्यक्तिगत कामकऱ्याच्या बरोबरीची क्रयशक्ति शेतकऱ्यास प्राप्त होईल, इतक्या बेतानें त्याच्या मालास किंमत आली पाहिजे.' ऑगस्ट, १९३९ ते ऑगस्ट, १९४२ ह्या मुदतींत अमेरिकन शेतकऱ्यांस मिळालेल्या बाजारभावांत ८५% वाढ झाली, परंतु शेतकऱ्यांच्या खरेदींत २३% चीच वाढ झाली.

"शहरांमध्यें केवळ धान्याची किंमत वाढली, म्हणजे शेतकऱ्यांस शेती परवडण्याइतका तरी बाजारभाव मिळतोच, असें नाहीं. हिंदुस्थानांतील वहातुकीच्या साधनांवर भयंकर ताण पडत आहे, त्यामुळें उत्पादनाचें केंद्र व उठावाचें केंद्र ह्यांचे ठिकाणच्या किंमतींत कमालीची तफावत आढळून येत आहे. शहरांत मोठी मागणी असलेल्या जिनसास खेडेगांवांत कोणी विचारतहि नाहीं, असें कित्येक वेळां आढळून येतें. वहातुकीच्या साधनांचे अभावीं खेडेगांवांतील मालाच्या किंमती घसरूं लागल्या, तर त्यांस माल साठविण्याची व त्यासाठी पैसा पुरविण्याची व्यवस्था झाली पाहिजे व विशिष्ट किमान किंमतीस माल विकत घेण्याची सरकारची तयारी पाहिजे.

"भावनियंत्रणाचा विचार करते वेळीं शहरांतील राहणीचें मान विचारांत घेतलें जातें, परंतु शेतकरी वर्ग हाच हिंदुस्थानांतील सर्वांत मोठा उपभोक्ता आहे, हें विसरलें जातें. ह्या प्रश्नाकडे आजवर लक्षच दिलें गेलेलें नाहीं. थोड्या दिवसांपूर्वी, व्यापारमंत्र्यांनीं शेतकरी व कामकरी ह्यांच्या रोजच्या गरजा भागविणाऱ्या जिनसांचे — केरोसीन, मीठ, इ. चे — बाजारभाव नियंत्रित करण्याच्या आवश्यकतेचा निर्देश केला, परंतु भावनियंत्रण आणि योग्य पुरवठा ह्या दोन्ही गोष्टींचा एकदमच विचार करावयास पाहिजे. शेतकऱ्यांचें आजचें व पुढील हित ह्या प्रश्नांशीं निगडित आहे. सहकारी चळवळीचें भवितव्यहि त्यावर अवलंबून आहे. हिंदी आर्थिक संसाराची घडी न बिघडतां ती नीट टिकणें भावनियंत्रणाच्या योग्य योजनांवरच अवलंबून आहे. भावनियंत्रणाचे संबंधांत हिंदुस्थान सरकारच्या व्यापारमंत्र्यांनीं व्यापारी वर्गाच्या प्रतिनिधींचा सल्ला घेतला, त्याप्रमाणें त्यांनीं शेतकरी हितसंबंधाच्या प्रतिनिधींचेंहि म्हणणें ऐकून घ्यावें. शेतकऱ्यांच्या मालास योग्य किंमत यावी व त्यांस रोजच्या राहणीस लागणाऱ्या जिनसा उपलब्ध व्हाव्या ह्या दृष्टीनें मार्केटिंग सोसायट्या, पर्चेस व सेल यूनियन्स, प्राथमिक पतपेढ्या, सेंट्रल व प्रांतिक बँका, इत्यादि सहकारी संस्थांच्या सहकार्याचा उपयोग करून घेतां येण्याजोगा आहे. तिकडे व्यापारमंत्र्यांनीं लक्ष पुरवावें."

# स्फुट विचार

## गोरगरिबांसाठी कापड

मामुली परिस्थितींत वापरल्या जाणाऱ्यां कापडाच्या किंमती दुपटीपर्यंत चढल्या आहेत आणि सरकारच्या पुरवठा खात्याच्या गरजा भागवण्यांत हिंदी गिरण्या गुंतल्या असल्यानें सामान्य जनतेस लागणारें जाडेंभरडें वस्त्रप्रावरण मिळण्यास अडचण भासत आहे. अशा तऱ्हेनें कापड स्वस्त भावानें गोरगरिबांस मिळूं शकेल अशी खास व्यवस्था करण्याचें आणि त्या दृष्टीनें गिरणी-वाल्यांशीं विशिष्ट करार होण्याचें आज कित्येक महिने घाटत आहे. त्या योजनेचें काय झालें आणि गोरगरिबांस स्वस्त कापड केव्हां मिळूं लागणार ह्याविषयींची माहिती कांहींच उपलब्ध नव्हती. सुताच्या पुरवठ्याचे खास अधिकारी, मि. व्हेलोडी, नुकतेच मुंबईस आले होते आणि त्यांनीं स्वस्त कापडाच्या पुरवठ्याचे संबंधांत गिरणीवाल्यांशीं विचारविनिमय केला असल्याचें प्रसिद्ध झालें आहे. गरीब जनतेच्या उपयोगासाठी काढण्यांत येणारें स्वस्त कापड आणि इतर मामुली कापड हीं एकाच वेळीं बाजारांत आलीं असतां नफेबाजीस वाव मिळण्याची भीति असल्यानें हा प्रश्न कसा सोडवावा ह्याची चर्चा झाली असल्याचें समजतें. नवें कापड विकण्याची समाधानकारक व्यवस्था निश्चित झाली म्हणजे तिच्या वनावटीस प्रारंभ करण्यांत याव-याचा आहे. आसाम सरकारासाठी एका गिरणीनें नवीन तऱ्हेचें कापड विणून दिलें आहे आणि हा माल स्वस्त व समाधानकारक ठरेल अशी अपेक्षा आहे. शेतकरी व कामकरी वर्गाच्या गरजेच्या दृष्टीनें स्वस्त कापडाचें उत्पादन व पुरवठा हीं जितक्या लवकर हातीं घेण्यांत येतील तितकें इष्ट आहे. ह्या कामीं अगोदरच दिरंगाई झाली आहे ह्याची जाणीव सरकारासहि असली पाहिजे.

## सर्व रुपये नव्या बनावटीचे होणार

पांचव्या आणि सहाव्या जॉर्जच्या मुखवट्याचे अकरा-बारांश चांदी व एक बारांश हलके धातु ह्यांचे बनविलेले रुपये १ मे, १९४३ पासून व्यवहारांतून काढून घेतले जातील, परंतु सरकारी खजिने, पोस्ट ऑफिसें व रेल्वे स्टेशन्स येथें ते ऑक्टोबर, १९४३ अखेर स्वीकारले जातील, असें हिंदुस्थानसरकारनें जाहीर केलें आहे. त्यानंतर कांहीं काळ ते रिझर्व्ह बँकेच्या मुंबई, कलकत्ता व मद्रास येथील कचेऱ्यांतच फक्त स्वीकारण्यांत येतील. १९४० मध्यें रुपयांस एकदम भयंकर मागणी वाढली, ती पुरी पाडण्या-साठी पुरेपूर चांदी असलेले रुपये काढणें निष्कारण खर्चाचें आहे असें सरकारनें ठरवून रुपयांतील चांदीचें व इतर धातूंचें प्रमाण सरकारनें बरोबरीचें केलें. रुपये साठवून ठेवण्याच्या लोकांच्या प्रवृत्तीस त्यामुळें आळा बसावा, असाहि त्यांत हेतु होता. बनावट रुपये करणें अशक्यप्राय व्हावें ह्या हेतूनें नव्या रुपयांची कड नवीन धर्तीची करण्यांत आली. व्हिक्टोरिया राणीच्या मुखवट्याचे रुपयें १९४१ च्या मार्चनंतर व्यवहारांतून काढून घेण्याच्या धोरणांत रुपयांतील चांदी कमी करणें हाच हेतु होता. ४ नोव्हेंबर, १९४१ च्या जाहीरनाम्यानें ७ व्या एडवर्डच्या मुखवट्याचे रुपये व्यवहारांतून काढून घेतले तेहि ह्याच धोरणास अनुसरून. आतां पांचव्या आणि सहाव्या जॉर्ज-च्या मुखवट्याचे भरपूर चांदीचे रुपये व्यवहारांतून गेले, म्हणजे ५०% चांदी असलेलेच रुपये खेळते रहातील. चांदीची बचत, रुपये साठवणारांची नाउमेदी व बनावट नाणीं करणारांचे मार्गांत अडचणी अशा तीन गोष्टी साध्य करण्याच्या धोरणाचा प्रस्तुत जाहीरनामा हा अखेरचा टप्पा आहे.

## रेल्वेजचें स्टर्लिंगमधील देणें भागविणार

कंपन्यांकडून हिंदुस्थान सरकार रेल्वेज विकत घेते त्या वेळीं सरकार खरेदीची किंमत रोखीनें देऊन टाकतें, नवीन हिंदी कर्ज-रोख्यांच्या स्वरुपांत देतें अथवा कांहीं काळपर्यंत दरसाल ठराविक रकमेच्या हप्त्यांनीं तें आपलें देणें भागवितें. १ ऑक्टोबर, १९४२ नंतर हिंदुस्थान सरकारनें द्यावयाच्या एकूण हप्त्यांची बेरीज ३,४१,१४,६,५४ पौंड इतकी होते. हें सर्व देणें इंग्लंडमध्येंच फेडावयाचें आहे. आज हिंदुस्थान ग्रेट ब्रिटनतर्फे कोट्यवधि रुपये खर्च करीत आहे, त्या संबंधांतील त्याचें येणें ग्रेट ब्रिटनमध्यें साठत आहे. त्याचा विनियोग रेल्वेजचें स्टर्लिंगमधील देणें भागवून टाकण्याकडे करण्याचा हिंदुस्थान सरकारचा विचार ब्रिटिश सर-कारास मान्य झाला आहे. वरील देणें एकदम देऊन टाकण्यास ३,००,५४,२५० पौंड पुरतील व त्यामुळें ४०,६०,४०४ पौंडांची हिंदुस्थानाची बचत होणार आहे. ह्याचा अर्थ, सुमारें ४ कोटि, ४१ लाखांवर २½% व्याज सुटेल असा होतो. वर्षासनाची रकम ताबड-तोब देऊन टाकण्यासाठी आवश्यक ती व्यवस्था रिझर्व्ह बँके-मार्फत करण्यांत येईल. त्यास लागणाऱ्या रकमेची तरतूद करण्या-साठीं, १९६३–६५ च्या परत फेडीचें ३% चें कर्ज विक्रीस काढून १५ कोटि रुपयांचें कर्ज घेण्यांत येईल.

## १५ कोटि रुपयांचें नवें कर्ज

३% १९६३-६५ च्या कर्जरोख्याची विक्री १५ ऑक्टोबर अखेरच चालू राहील. त्यापूर्वीच १५ कोटींच्या कर्जरोख्यांचे अर्ज आले तर मात्र आणखी कर्जरोख्यांचे अर्ज स्वीकारले जाणार नाहींत व विक्री बंद ठेवण्यांत येईल. शेड्यूल्ड बँक अथवा ब्रोकर ह्यांचेमार्फतच अर्ज स्वीकारले जातील. अर्जाबरोबर पैशाचा भरणा रोखीनें अथवा चेकनें करावयाचा आहे. १ जून, १९६३ रोजीं अथवा त्यानंतर केव्हांहि कर्जाची परतफेड करण्याचा अधिकार सरकारनें स्वतःकडे राखून ठेवला आहे; परंतु कांहीं झालें तरी १ जून १९६५ नंतर कर्जफेड पुरी झाली नाहीं असें होणार नाहीं. प्रत्येक शंभराच्या रोख्याची किंमत ९५ रुपये ठरविण्यांत आली आहे. व्याज प्रत्येक सहामाहीस, १ जून व १ डिसेंबर रोजीं दिलें जाईल. ३% १९६३-६५ चें कर्ज ह्यापूर्वी तीनदां उभारलेलें होतें. १ जून, १९३८ रोजीं पहिल्या प्रथम तें काढलें तेव्हां त्याची किंमत ९८ रुपये होती. १ जून १९३९ रोजीं त्याच अटींचें कर्ज काढलें, त्याची किंमतहि ९८ रुपयेच होती. जून १९४१ मध्यें विक्रीस काढलेल्या कर्जाची किंमत ९५ रुपये होती व आतां काढलेल्या कर्जाची किंमतहि तेवढीच ठेवण्यांत आलेली आहे.

## जागृति रौप्यमहोत्सव अंक

बडोदें येथें प्रसिद्ध होणाऱ्या जागृति साप्ताहिकाच्या स्थापनेस २५ वर्षें पुरीं झालीं, ह्या निमित्त जागृतीचा रौप्यमहोत्सव अंक प्रसिद्ध करण्यांत आला आहे. जागृतीनें आतांपर्यंत कोणत्या तत्त्वांचें प्रतिपादन केलें व कोणत्या धोरणाचा पुरस्कार केला, हें पटविण्यासाठी कांहीं जुने लेख ह्या खास अंकांत पुनर्मुद्रित केले आहेत, त्यावरून जागृतीकारांची प्रगति प्रियता व ध्येयवादित्व स्पष्ट दिसून येतें. "जागृती"चा नंदादीप ह्या लेखांत राजरत्न वा. वि. जोशी ह्यांनीं साप्ताहिकाचे संपादक श्री. पाळेकर ह्यांच्या कार्याचें वर्णन मार्मिकपणें केलें आहे. रौप्यमहोत्सवाचे शुभप्रसंगीं आम्हीं जागृतीकारांचें अभिनंदन करतों व जागृतीसंबंधीच्या त्यांच्या पुढील मनीषा सत्वर पार पडोत असें इच्छितों.

## विमा कायद्याच्या २७ व्या कलमाचा अर्थ

### सरकारी रोख्यांत किती रकम गुंतवावी ?

### सरकारी ॲक्चुअरींचें म्हणणेंच बरोबर

हिंदी विमा कायद्याच्या २७ व्या कलमाचे अर्थासंबंधीं सरकार आणि विमा कंपन्या ह्यांचेमध्यें मतभेद होता. तेव्हां ह्या कलमाचा अर्थ कोर्टामार्फत निश्चयात्मक रीतीनें लावून घ्यावा असें ठरून हिंदुस्थान सरकारनें सुमारें दोन हजार रुपयांचा कोर्टखर्च सोसण्याचें मान्य केलें. त्यास अनुसरून इंडियन लाइफ ॲशुअरन्स ऑफिसेस असोसिएशनचे तर्फे मुंबईच्या नवभारत विमा कंपनीनें प्रस्तुत प्रश्नांचा निकाल लावून घेण्याचें मान्य केलें. त्याप्रमाणें, सुपरिंटेंडेंट ऑफ इन्शुअरन्सनें नवभारत कंपनीवर मुंबई हायकोर्टांत दावा आणला, परंतु हायकोर्टानें कंपनीचें म्हणजेच सर्वसाधारण विमा कंपन्यांचें म्हणणें अमान्य केलें व २७ व्या कलमाचा सरकारनें केलेला अर्थ बरोबर असल्याचें जाहीर केलें.

दाव्याचा विषय असलेल्या २७ व्या कलमाचें विवेचन "अर्था" मध्यें मागें येऊन गेलेलें आहे.

( आ ) विमेदारांस देणें असलेली रकम ( आजची किंमत )
+ ( ब ) क्लेम्सची रकम.

= ( क ) एकूण देण्याची रकम ( १०० रु. )
– ( ड ) कंपनीनें रिझर्व्ह बँकेकडे ठेवावयाचें डिपॉझिट ( २० रु. )
– ( इ ) विमा पॉलिसीवरील कर्जाची येणें बाकी ( १० रु. )
= ( फ ) २७ व्या कलमाच्या अंमलबजावणीसाठी विचारांत घ्यावयाची रकम ( ७७ रु. )

१०० रुपये एकूण देणें मानल्यास, व डिपॉझिटची व विमा पॉलिसींवरील कर्जाची रकम अनुक्रमें २० रु. व १० रु. आहे असें गृहीत धरल्यास, सरकारी अर्थाप्रमाणें १००–२० – १० = ७७ रुपयांच्या ५५% इतकी म्हणजे ३८ रु. ८ आ. इतकी रकम सरकारी रोख्यांत गुंतविली पाहिजे. विमा-कंपन्यांच्या अर्थाप्रमाणें, कंपनीनें रिझर्व्ह बँकेकडे ठेवलेलें डिपॉझिट ५५% गुंतवणुकींत धरलें पाहिजे. म्हणजे अर्थातच त्या मानानें सरकारी रोख्यांतील गुंतवणूक कमी होईल. २७ व्या कलमांतील एका स्वल्पविरामाच्या स्थानावरून हा वाद उपस्थित झाला. हायकोर्टानें त्यासंबंधांत निर्णायक निकाल दिला आहे. हायकोर्टापुढील दाव्याची हकीकत खालीलप्रमाणें आहे:—

३० जून, १९४१ असेरचें नवभारत कंपनीचें एकूण देणें २,८२,५५१ रु. ४ आ. ४ पै इतकें होतें. कंपनीनें रिझर्व्ह बँकेकडे ठेवलेल्या डिपॉझिटची रकम १,३४,१५९ रु. ६ आ. होती व तिनें विमा-पॉलिसीवर दिलेल्या कर्जाची येणें रकम १७,२२१ रु. ६ आ. इतकी होती. सुपरिंटेंडेंट ऑफ इन्शुअरन्सचें म्हणणें असें, कीं कंपनीनें [ २,८२,५५१ रु. ४ आ. ४ पै, वजा १,३४,१५९ रु. ५ आ., वजा १७,२२१ रु. ६ आ.] इतक्या रकमेच्या म्हणजे वर सांगितल्याप्रमाणें (क–ड–इ=फ) ह्या रकमेच्या ५५% म्हणजे ७२,१४४ रुपये सरकारी रोख्यांत ठेवले पाहिजेत. कंपनीच्या म्हणण्याप्रमाणें, तिनें २,८२,५५१ रु. ४ आ. ४ पै ह्या रकमेच्या ५५% इतकी रकम रोख्यांत ठेवली म्हणजे पुरे व तीमधूनहि १,३४,१५९ रु. ६ आ. व १७,२२१ रु. ६ आ. वजा केले पाहिजेत. कलमाच्या ह्या अर्थाप्रमाणें, तिचेवर फक्त २,२०० रुपये सरकारी रोख्यांत ठेवण्याची जबाबदारी येते.

हायकोर्टानें कंपनीचें म्हणणें मान्य न करतां सुपरिंटेंडेंट ऑफ इन्शुअरन्सनें कलमाचा लावलेला अर्थच ग्राह्य ठरविला. विमा कायद्याच्या अंमलबजावणीस प्रारंभ झाल्यापासून दोन वर्षांचे आंत, ठरलेल्या रकमेच्या रोख्यांपैकीं निम्मे रोखे कंपनीनें घेतले पाहिजेत असें २७ ( ३ ) हें कलम सांगतें. त्याप्रमाणें, नवभारत कंपनीनें ७२,१४४ रुपयांच्या निम्मे म्हणजे ३६,०७२ रुपये रोख्यांत गुंतविले पाहिजेत असा निवाडा केला. वादी व प्रतिवादी ह्यांचेमध्यें अगोदरच ठरल्याप्रमाणें प्रतिवादीचा २ हजार रुपयांपर्यंतचा खर्च वादी सुपरिंटेंडेंट ऑफ इन्शुअरन्सनें द्यावा असा हायकोर्टानें हुकूम दिला.

## सुपरवायझरांचा शिक्षणवर्ग

महाराष्ट्रांतील यूनियन सुपरवायझरांचें शिक्षण सहकारी खात्यामार्फत चाललेल्या वर्गामार्फत दोन गटांत संपविण्याचें ठरलें होतें; त्याप्रमाणें हडपसर येथें यंदाचे सालीं १-७-४२ पासून श्री. जी. एस्. जोशी ऑडिटर यांचे हाताखालीं दुसऱ्या गटाचें शिक्षण सुरू झालें व ता. ३०-९-४२ रोजीं संपलें. शिक्षणक्रमांत साधारणपणें कठीण स्वरूपाचे जमाखर्च, सहकारी कायदा व ग्रामीण जीवनाशीं संबंध येणारे इतर प्रचलित कायदे, ग्रामीण अर्थशास्त्र, निरनिराळ्या शेतकी पेढ्यांविषयीं समग्र माहिती, सहकार–अर्थ व तत्त्वें–व तदंगभूत इतर विषय, संघ, संस्था वगैरे विषयांचा समावेश केला होता. वरील विषयाबरोबरच वर्गामध्यें सुपरवायझरांनीं टिपण्या घेण्यावर, प्रचलित विषयावर चर्चा करण्यावर व शक्य त्यावेळीं महत्त्वाचे विषयावर निबंध लिहिण्यावर विशेष कटाक्ष होता. त्या त्या विषयांत पारंगत असलेल्या कांहीं अधिकारी व्यक्तींचीं विशेषतः कायद्यांचे विषयावर व्याख्यानें करविण्यांत आलीं.

वर्गास डेप्युटी रजिस्ट्रार मि. शहा यांनीं एकदां भेट देऊन टिपण्या घेण्याचे व अभ्यासाचे पद्धतीविषयीं चर्चा केली. रजिस्ट्रार मि. इक्रम यांनीं दोनदां भेटी दिल्या व सुपरवायझरांच्या कामांतील अडचणी, त्यांचीं कर्तव्यें, अलीकडे त्यांचे नोकरीचे बाबतींत करण्यांत आलेले नियम वगैरेबाबत चर्चा केली; तसेंच कर्जनिवारण कायद्याची अंमलबजावणी खेड व पंढरपूर भागांत कशी होत आहे याविषयींहि विचार-विनिमय केला. सुपरवायझरांनीं पक्षातीत राहून निस्पृहपणें काम करणें जरूर आहे असाहि त्यांनीं उपदेश केला. असि. रजिस्ट्रार मि. कारखानीस यांनीं दोन भेटी दिल्या व दुसऱ्या भेटीचे वेळीं उपदेशात्मक भाषण करून सुपरवायझरांनीं शिक्षण ग्रहण करण्याची तयारी नेहमींच ठेवावी, आपले विचार व्यापक व वृत्ति उदार करण्याचा प्रयत्न करावा व आपले कामांत कळकळ नसल्यास आपले हातून कोणतेंच काम चांगल्या प्रकारें होऊं शकणार नाहीं हें ध्यानीं ठेवावें असें सांगितलें. शिक्षणक्रम संपल्यानंतर अनेक सुपरवायझरांनीं आपले तीन महिने फुकट न जातां वर्गांतील शिक्षणानें आपला चांगलाच फायदा झाला असें मत प्रांजलपणें व्यक्त केलें.

## सहकारी संस्थांचे अहवाल

### नगर डिस्ट्रिक्ट अर्बन को. बँक, लि., नगर

वरील बँकेच्या २,०२२ व्यक्ती व ३० सोसायट्या सभासद आहेत आणि त्यांनीं १,२७,२४० रुपयांचे भाग घेतलेले आहेत. रिझर्व्ह फंड १,५४,१०८ रुपयांचा असून एकूण फंड २ लक्ष, ७६ हजार रुपयांचे आहेत. गेल्या वर्षी बँकेकडील ठेवींत २¾ लाखांची वाढ होऊन त्यांचा आकडा सुमारें १६ लक्ष रुपये झाला. बँकेच्या एकूण २०⅓ लक्ष रुपयांच्या खेळत्या भांडवलापैकीं ९½ लक्ष रुपये रोख व इतर बँकांत आहेत. ४⅓ लक्ष रुपये सरकारी व इतर रोख्यांत आहेत. सोसायट्यांकडील येणें ५५ हजार रुपये आहे व व्यक्तिशः सभासदांकडील येणें ६ लक्ष, १४ हजार रुपये आहे. बँकेच्या सेफ डिपॉझिट व्हॉल्टसचा उपयोग पुरेपूर करून घेतला जात आहे. नवीन कर्ज वसूल करण्याच्या बाबतींत, होतां होईल तो वसूल झालेल्या रकमेपेक्षां जास्त कर्ज न देण्याकडे डायरेक्टर बोर्डाचें लक्ष आहे. गेल्या वर्षी बँकेस सुमारें २२ हजार रुपये नफा झाला. त्यांतून भागीदारांस ६¼% दरानें डिव्हिडंड देण्याअडे ७,८२२ रुपयांचा विनियोग झाला. श्री. कुं. सो. फिरोदिया, बी. ए. एलएल. बी., ॲडव्होकेट, एम. एल. ए., हे बँकेचे चेअरमन असून श्री. कु. ज. जोशी हे मॅनेजर आहेत.

---

### श्री महालक्ष्मी को. बँक लि., कोल्हापूर

वरील बँकेच्या पटावर ७८९ सभासद असून त्यांनीं १०,२५५ रुपयांचे भाग घेतलेले आहेत. बँकेचा रिझर्व्ह फंड ३,०६२ रुपयांचा असून इतर फंडांत सुमारें १,८०० रुपये आहेत. सालअखेर ६१,००० रुपये कर्ज येणें आहे व सुमारें ९ हजार रुपये रोख्यांत गुंतविलेले आहेत. थकबाकीचें प्रमाण अल्प ( ४·०१% ) आहे. चेक, हुंड्या, वगैरेंवरील कमिशनचा आकडा वाढत आहे त्यामुळें नफ्यांत भर पडत आहे. सभासदांच्या सोईसाठी ऋग्णोपयोगी उपकरणें वापरण्याकरितां मोफत देण्याची व्यवस्था बँकेनें केली असून लोक त्याचा फायदा घेत आहेत. बँकेस निवळ नफा २,६२३ रुपये झाला. भागीदारांस ७½% दरानें डिव्हिडंड मिळालें. श्री. कु. अ. पोतनीस वकील हे बँकेचे चेअरमन असून श्री. ग. व. वाडीकर हे ऑनररी सेक्रेटरी आहेत.

---

### रावेर पीपल्स को. बँक लि., रावेर

वरील बँकेचे २७२ सभासद असून त्यांचे २०,१०० रुपयांचे भाग आहेत. रिझर्व्ह व इतर फंड यांत मिळून ४,६४१ रुपये आहेत. ठेवींचा आकडा १ लक्ष, १६ हजार रुपये झाला आहे. बँकेनें दिलेल्या कर्जाची रकम ४२½ हजार रुपये आहे. " इतर कोणत्याहि प्रकारें बँकेचे कामांत व व्यवहारांत न्यून नसतांहि, केवळ थकबाक्यांचें प्रमाण कमी न झाल्यामुळें बँकेस ' ब ' वर्ग देण्यांत आला आहे. " वर्षअखेर बँकेस १,५७६ रुपये नफा झाला. भागीदारांस ६% डिव्हिडंड मिळालें.

---

### श्री. लक्ष्मी सें. को. बँ. लि., फलटण

वरील बँकेची माहिती ता. २३–९–४२ च्या अंकांत प्रसिद्ध केली त्यांत खालीलप्रमाणें दुरुस्ती आहे. वैयक्तिक भागीदारांची संख्याः १७९१, रिझर्व्ह व इतर फंडः ९४ हजार रु., बँकेची रोख व इतर बँकांतील रकमः १ लक्ष, १२ हजार रुपये. वरील दुरुस्ती आमचे नजरेस आणल्याबद्दल बँकेच्या व्यवस्थापकांचे आम्हीं आभारी आहों.


मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् को-ऑपरेटिव् बँक, लिमिटेड.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी–सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंग ९, बेक हाउस लेन, कोट मुंबई.

शाखा

| | |
|---|---|
| १ बारामती ( जि. पुणें ) | १८ अकलूज ( जि. सोलापूर ) |
| २ सातारा ( „ सातारा ) | १९ विरमगांव ( „ अहमदाबाद ) |
| ३ इस्लामपूर ( „ „ ) | २० धुळें ( „ प. खानदेश ) |
| ४ कऱ्हाड ( „ „ ) | २१ दोंडाईचें ( „ „ ) |
| ५ तासगांव ( „ „ ) | २२ शिरपूर ( „ „ ) |
| ६ किर्लोस्करवाडी ( „ „ ) | २३ शहादें ( „ „ ) |
| ७ शिराळें ( „ „ ) | २४ नंदुरबार ( „ „ ) |
| ८ कोरेगांव ( „ „ ) | २५ साक्री ( „ „ ) |
| ९ वाई ( „ „ ) | २६ शिंदखेडें ( „ „ ) |
| १० अहमदनगर ( „ अहमदनगर ) | २७ तळोदें ( „ „ ) |
| ११ शेवगांव ( „ „ ) | २८ मालेगांव ( „ नाशिक ) |
| १२ कोपरगांव ( „ „ ) | २९ सटाणा ( „ „ ) |
| १३ बेलापूर ( „ „ ) | ३० कळवण ( „ „ ) |
| १४ राहुरी ( „ „ ) | ३१ लासलगांव ( „ „ ) |
| १५ भिवंडी ( „ ठाणें ) | ३२ नांदगांव ( „ „ ) |
| १६ पालघर ( „ „ ) | ३३ दोहद ( „ पंचमहाल ) |
| १७ कल्याण ( „ „ ) | ३४ कालोल ( „ „ ) |

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.

## अर्थशास्त्र

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे

पृष्ठसंख्या सुमारें ३००, किंमत ३ रुपये

या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

## श्रीराम सिल्क मिल्स लि., बंगलोर

[ कंपनीनें १९४१ अखेर ६ टक्के डिव्हिडंड वांटला आहे. ]

युद्धसाहित्यपुरवठा-खात्याची पॅरेशूटकरितां लागणाऱ्या रेशमी कापडाची ऑर्डर पुरी करण्यासाठी लागणाऱ्या भांडवलाकरितां तूर्त एकूण रु. १ लक्षाच्या रकमेपर्यंत

**ठेवी घेणें आहेत**

व्याजाचा दर ४॥ ते ६ टक्के. ठेव किमान रु. ५०० ची असावी. ठेवीवरील व्याज दर सहा महिन्यांनीं दिलें जातें.

श्रीराम सिल्क मिल्स लि., श्रीरामबाग, बसवनगुडी, बंगलोर. | नारायण गोविंद नाईक, ( माजी अध्यक्ष, म्हैसूर चेंबर ऑफ कॉमर्स ) मॅनेजिंग डायरेक्टर

आमच्या कारखान्यांतील माल मुंबईस बॉम्बे स्वदेशी को—ऑपरेटिव्ह स्टोअर्समध्यें व पुण्यास लक्ष्मी रोडवरील रे म्यूझिअमच्या व्यापार—संवर्धन—गृहांत पहा.

राहाणेची व भोजनाची उत्तम सोय




फोन नं. ७७९ गणपति चौक, व्यवस्थापक.

## N. V. WADNERKAR

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver, Electro-plater & Manufacturer of Sporting Trophies, Medals, Cups etc.

- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -

POONA CITY.




## मधुमेहावरील औषध

तीन आठवड्यांचे औषधास फक्त रु. ७

— मागविण्याचा पत्ता —

मॅनेजिंग डायरेक्टर, रूरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड.

९२३ ए, सदाशिव, पुणें २.

## DECCAN BOOK STALL

**Booksellers, Publishers & Subscription Agents**

**Fergusson College Road, Poona No. 4**

(1) We stock and supply Educational books, General books & Library books.

(2) We supply Government of Bombay and Government of India publications.

(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.

(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.

वक्तशीर आणि मनपसंत काम करून देणारे

## मोहन वॉच कंपनी

रेग्युलेशन मोफत

कॉमनवेल्थ बिल्डिंगसमोर लक्ष्मी रोड, पुणें २.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. ९२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हशील माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ८ पुणें, बुधवार, तारीख १४ आक्टोबर १९४२ अंक ४१

## विमेदार नि हवाई हल्ला

शत्रु राष्ट्राकडून हवाई हल्ला अगर तत्सम उपद्रव यापासून विनलढाऊ नागरिकांच्या जीविताला येणाऱ्या धोक्याचा समावेश विमा पॉलिसीच्या अटींत होतो काय व त्यासाठी जादा प्रिमिअम भरावा लागेल काय ! असा प्रश्न साहजिकच नागरिकांमध्यें चर्चिला जात आहे.

## ट्रस्ट ऑफ इंडिया

विमा कंपनीच्या
विमा पॉलिसीमध्यें हवाई हल्ल्यामुळें जीविताला होणाऱ्या अपायाचा अंतर्भाव होतो त्याकरितां जादा प्रिमिअम नाहीं.

तरी विलंब न लावतां—
तुमचा नि तुमच्या आप्तेष्टांचा विमा

### ट्रस्ट ऑफ इंडिया

विमा कंपनींतच उतरा.

अध्यक्षः—श्रीमंत सरदार जगन्नाथ महाराज पंडित
माहितीपत्रकें विनामूल्य पाठवूं

ट्रस्ट ऑफ इंडिया विमा कं. लि., लक्ष्मी रोड, पुणें २ | वि. ह. देशमुख, बी. ए., जनरल मॅनेजर

## महायुद्ध दाराशीं आलें
## परदेशी औषधें
## दुर्मिळ व महाग झालीं

पण

भिण्याचें कारण नाहीं !!!

— कारण —

## आयुर्वेद रसशाळा पुणें लि०

या देशी औषधाच्या प्रसिद्ध कारखान्यानें तयार केलेलीं

● रक्तवर्धक, ● उपनाह,
● बालजीवन, ● कॅल्सीप्राल

इत्यादि पेटंट, स्टँडर्ड व लोकप्रिय औषधें खात्री पटल्यामुळें

★ डॉक्टर्सहि वापरूं लागले आहेत. ★

दरसाल बिनचूक नफा वाटणाऱ्या ह्या कंपनीचे शेअर्स व औषधें मागवा.

### आयुर्वेद रसशाळा पुणें लि०

मुख्य दुकान गणपति चौक, लक्ष्मीरोड, पुणें २.

महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर

## महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

# विविध माहिती

### रूळ

ग्रेट ब्रिटनमधील ४ कोटि फूट लांबीचे आगगाडीचे रूळ काढून जरूरीच्या ठिकाणीं ते घालण्यांत यावयाचे आहेत.

### युनायटेड फ्रूट कंपनी

आशियांतील कित्येक देश जपाननें पादाक्रांत केल्या कारणानें रबर, कोयनेल, इत्यादींचा तेथून होणारा पुरवठा बंद पडला आहे. त्यांची लागवड कोस्टारिका, गुटेमाला, होंडुरास, निकाराग्वे, पनामा, इत्यादि दक्षिण अमेरिका खंडांतील देशांत सुरू करण्यासाठी वरील कंपनी स्थापन झाली आहे.

### उल्लेख करण्याची बंदी

फ्रेंच वृत्तपत्रांत अमेरिकन व ब्रिटिश सिनेमा नटांचा उल्लेख करण्याची बंदी करण्यांत आलेली आहे.

### १२ लक्ष मुलांचें स्थलांतर

ब्रिटिश वैमानिक हल्ल्यांच्या तोंडी असलेल्या जर्मन प्रदेशांतील १२ लक्ष जर्मन मुलांचें १७ हजार खास आगगाड्यांतून स्थलांतर करण्यांत आलें आहे.

### साम्राज्यांतील कंपन्यांची हिंदुस्थानांत नोंद

ब्रिटिश साम्राज्यांतील कांहीं देशांत स्थापन झालेल्या कंपन्यांना हिंदुस्थानांत येऊन आपलें काम चालवितां यावें ह्या दृष्टीनें एक ऑर्डिनन्स काढण्यांत आला आहे. ह्या ऑर्डिनन्सच्या अन्वयें, अशा कोणत्याहि कंपनीस ऑर्डिनन्सखाली नोंदण्याचा हिंदुस्थान सरकारास अधिकार आहे. ह्याप्रमाणें नोंदलेली कंपनी ब्रिटिश हिंदुस्थानांत इंडियन कंपनीज ॲक्टान्वयें नोंदलेल्या कंपनीसमान समजली जाईल.

### मध्यप्रांत सरकारची ट्रेझरी बिलें

मध्यप्रांत व वऱ्हाड प्रांतिक सरकारचीं ५० लक्ष रुपयांचीं ट्रेझरी बिलें गेल्या आठवड्यांत रिझर्व्ह बँकेनें विकलीं. त्यांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. १० आणे इतका पडला.

### रबराचा पीक अधिक जमवा

रबराच्या झाडांचें रबर गोळा करणाऱ्या मजुरांस सिलोनच्या गव्हर्नरांनीं एक खास संदेश पाठवून, दररोज पूर्वीपेक्षा एकतरी पौंड अधिक रबर जमा करा, अशी कळकळीची सूचना केली आहे.

### अमेरिकेच्या युद्धप्रयत्नाचें अवलोकन

तुर्कस्थानांतील प्रमुख वृत्तपत्रांचे संपादक न्यूयॉर्क येथें दाखल झाले आहेत. अमेरिकेंतील युद्धविषयक उत्पादनाचें कार्य ते प्रत्यक्ष अवलोकन करतील. निरनिराळ्या देशांतील ८५ संपादकांना अशीच संधी देण्यांत येईल.

### ग्रेट ब्रिटनमधील मोटार अपघात

ग्रेट ब्रिटनमध्यें चालू युद्धाच्या तिसऱ्या वर्षी ७,६९३ लोक रस्त्यांवरील अपघातांत मरण पावले. दुसऱ्या वर्षापेक्षा ही संख्या २,४०० नें कमी आहे; परंतु युद्धपूर्व वर्षापेक्षा ती अद्याप बरीच मोठी आहे. रात्रीचे वेळीं रस्त्यावरील अपघाती मृत्यूंची संख्या युद्धाचे पहिल्या वर्षी ४,५०० होती ती तिसऱ्या वर्षी ३,००० झाली.

### पूना पोस्टल को. बँक लि., पुणें

वरील बँकेच्या स्वतःच्या नवीन इमारतीचा उद्घाटन समारंभ ता. १८ रोजीं खा. ब. कोठावाला, सी. डे. डायरेक्टर, पो. ॲन्ड टे., न्यू दिल्ली, ह्यांचे हस्तें होणार आहे.

### अमेरिकन सैनिकाशीं विवाह करणारी ब्रिटिश तरुणी

ग्रेट ब्रिटनमध्यें आलेल्या कनेडिअन व अमेरिकन सैनिकांना ब्रिटिश तरुणींशीं विवाह करावयाचा असल्यास, त्यांनीं नियोजित लष्करी अधिकाऱ्याची परवानगी घेतली पाहिजे. परवानगीविना विवाह करणारास लष्करी कोर्टापुढें उभें केलें जातें. अमेरिकन सैनिकाशीं विवाह करणाऱ्या तरुणीस त्याचेबरोबर अमेरिकेंत जातां येणार नाहीं व ती अमेरिकनाची पत्नी ह्या नात्यानें केवळ अमेरिकेची नागरिक बनणार नाहीं. अमेरिकेंत बाहेरून येणारांस लागू असलेले सर्व कायदे तिलाहि बंधनकारक होतील.

### बालमृत्यु

जर्मनींतील बालमृत्यूंचें प्रमाण १९४२ च्या पहिल्या तिमाहींत दर हजारी ७४·१ इतकें भारी होतें.

### खाकी रंगाचा उपयोग

दिल्ली व नवी दिल्ली येथील सरकारी इमारतींच्या बाहेरील बाजूंस पुनः रंग देण्याचा प्रसंग येईल, त्यावेळीं खाकी रंगाचा उपयोग करण्याचें ठरलें आहे.

### वेडा कोण ठरला ?

फ्रान्समधील वेड्याच्या इस्पितळांतील एक वेडा निसटून बाहेर पडला व त्यानें पॅरीस येथें घोड्यांच्या शर्यतींत ९५ हजार रुपये मिळविले. कर्फ्यूनंतर त्यास पकडण्यांत आलें. परंतु परत नेत असतांना त्यानें पोलिसाला अमुक घोडा जिंकणार असें सांगितलें. तो घोडा पहिला आला, परंतु त्यावर खेळण्याचें पोलीस विसरला !

### कराची मेल व सिंध एक्सप्रेस

नोव्हेंबर, १९४२ पासून कराची मेलला तिसऱ्या वर्गाचे डबे जोडण्यांत येणार नाहींत व सिंध एक्सप्रेस फक्त इंटर व तिसऱ्या वर्गाच्या उतारूंचीच वहातुक करील.

### क्षयरोगाचें निदान

एक्स रेडिओ फोटोच्या छोट्या यंत्रानें दर ताशीं १०० लोकांच्या छातीचे १½" लांबीरुंदीचे फोटो घेऊन क्षयाचें निदान अगदी लवकर करण्याची एक योजना इंग्लंडमध्यें आखण्यांत आली आहे.

### कोयनेलचा तुटवडा

मलेरियावरील रामबाण औषध कोयनेल ह्याचा पुरवठा अपुरा पडत आहे, तेव्हां सरकारनें १० रुपये पौंड ह्या दरानें आपल्याजवळील साठा उपलब्ध करावा, अशी सरकारास विनंति करणारा ठराव मुंबईच्या डॉक्टरांचे सभेनें नुकताच पास केला आहे. सध्या १५० रुपये देऊनहि पौंडभर कोयनेल मिळूं शकत नाहीं.

### सोन्यापेक्षा तांबें महत्त्वाचें

अमेरिकेंतील सुमारें २०० ते ३०० सोन्याच्या खाणी बंद ठेवून त्यांतील कामगारांना तांबें व इतर युद्धोपयोगी धातूंच्या खाणींत कामास पाठविलें आहे.

### गव्हाची आयात

हिंदुस्थानांत सुमारें १५ हजार टन गव्हाची आयात नुकतीच झाली असून आणखी गहूं अपेक्षित आहे.

## अनुक्रमणिका

| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | ३२४ |
| २ उद्योगधंद्यांची वाढ व हिंदी कपाशीचा उठाव | ३२५ |
| ३ भाग्यरेषा | ३२६ |
| ४ बूट्स प्युअर ड्रग कं.लि. | ३२६ |
| ५ स्फुट विचार ... स्टॅलिनग्राडचा प्रभावी बचाव–मि.वुइंडेल विल्की यांचा दौरा–चीन मधील खास इक्यांवर पाणी सोडणार | ३२७ |
| ६ मिरज स्टेट बँक लि. | ३२८ |
| ७ कमर्शिअल बँक लि. | ३२८ |
| ८ आयर्लंडची आजची आर्थिक परिस्थिति | ३२९ |
| ९ कोल्हापूर अर्बन को. बँक लि. | ३२९ |


# अर्थ

बुधवार, ता. १४ आक्टोबर, १९४२


## उद्योगधंद्यांची वाढ व हिंदी कपाशीचा उठाव

हिंदुस्थानाचा जपानशी चालणारा व्यापार बंद पडल्यामुळें आखूड धाग्याच्या हिंदी कपाशीचें मोठें गिऱ्हाइक तुटून ह्या शेतीच्या मालाची स्थिति कठीण झाली आहे, हें आतां सर्वांस कळून चुकलें आहे. ह्या परकी गिऱ्हाइकांची जागा स्वदेशी गिरण्यांस अल्प प्रमाणांतच घेतां येणें शक्य आहे. कपाशीचें उत्पादन पूर्वीप्रमाणेंच चालू राहिल्यास तो माल कवडीमोल होऊन जाईल ह्या दृष्टीनें त्याची लागवड कमी करण्याचा प्रयत्न करून त्याच्या जागीं धान्याचीं पिकें काढण्याचा सल्ला शेतकऱ्यांस देण्यांत आला. आखूड धाग्याच्या कपाशीच्या लागवडीमुळें होणारे दुष्परिणाम आणि धान्याच्या पिकांची आवश्यकता ह्यांचें महत्त्व शेतकऱ्यांस पटवून देण्याचा प्रांतिक सरकारांनीं कसून प्रयत्न केला. मुंबई प्रांताच्या शेतकी खात्यानें पत्रक काढून ह्या संबंधांत शेतकरी वर्गांस स्पष्ट इशारा दिला, $\frac{7}{8}$" व त्याहून कमी धाग्याच्या हिंदी कपाशीची विक्री होणेंच अशक्य आहे किंवा ती झालीच तर अगदीं विनकिफायती भावानें होईल. ह्या जातींखेरीज ('वनिला'प्रमाणें) इतर कांहीं जातींची लागवड होत राहिल्यास त्यांसहि भाव येणार नाहीं. तेव्हां $\frac{7}{8}$" खालील आखूड धाग्याच्या एन. आर. व एन. आर. मिक्श्चर ह्या जातीच्या कापसाची लागवड अजिबात करूं नका व "वनिला" कपाशीच्या लागवडीचें क्षेत्र पुढील हंगामांत कमी करा, असा मुंबई सरकारच्या शेतकी खात्यानें सल्ला दिला. अनुक्रमें निश्चित तोट्याच्या व अनिश्चित फायद्याच्या ह्या कपाशीचे जागीं खाद्योपयोगी पिकांची लागवड करण्याची सूचना सरकारनें त्यास केली.

तात्कालिक उपाय ह्या दृष्टीनें वरील उपाययोजना ठीक आहे. परंतु कायम स्वरुपाची योजना कोणत्या स्वरुपाची असावयास पाहिजे? कपाशीची लागवड कमी न करितां हिंदुस्थानाचें परदेशी पेठांवरील अवलंबन नाहींसें करतां येणें शक्य होणार नाहीं काय? आजच्या परिस्थितींत हिंदुस्थानांत १५ ते २० लक्ष गाठींचें फाजील उत्पादन होत आहे व तें देशांत खपूं शकत नाहीं आणि बाहेरहि जाऊं शकत नाहीं. आखूड धाग्याचे ऐवजीं मध्यम लांबीच्या धाग्याची लागवड करण्याची खटपट चालू आहे. उदाहरणार्थ, खानदेशांत आखूड धाग्याच्या देशीची जागा $\frac{7}{8}$" ते $\frac{15}{16}$" धाग्याच्या जरिलानें मोठ्या प्रमाणावर घेतली आहे. जरिलाची लागवड मुंबई प्रांताच्या इतर जिल्ह्यांत व वऱ्हाडांत वाढण्याचा रंग दिसतो. जेथें अशा लागवडीस हवा व जमीन सोईची आहे आणि स्थानिक परिस्थितीस योग्य असें बीं तयार करण्यांत आलेलें आहे अशा ठिकाणीं जरिलाची लागवड वाढणें इष्टच ठरेल, हिंदी गिरण्यांत हिंदी कपाशीच्या सबंध उत्पादनाचा–६० लक्ष गाठींचा–उठाव जोंपर्यंत होऊं शकत नाहीं, तोंवर आखूड कपाशीची जागा लांब कपाशीनें घेतल्यानें केवळ भागणार नाहीं हें उघड आहे. कपाशीचा उठाव हिंदुस्थानांत वाढविण्यास वाव कितपत आहे, हा प्रश्न येथें उपस्थित होतो.

हिंदुस्थानाची लोकसंख्या सुमारें ४० कोटि असून दर माणशीं कापडाचा खप सुमारें १७ वार आहे. कापडाच्या खपाचा जागतिक दर माणशीं सरासरीचा आंकडा ३० वार आहे. ह्यावरून हिंदुस्थानांत कापडाचा खप वाढण्यास किती मोठा वाव आहे ह्याची कल्पना येईल. जनतेचें दारिद्र्य व अगदीं अल्प क्रयशक्ति हेंच कापडाच्या कमी वापराचें कारण आहे व तें दूर करावयाचें म्हणजे लोकांचें रहाणीचें मान सुधारलें पाहिजे व तें सुधारण्यास औद्योगिक प्रगति झाली पाहिजे. सर्व प्रकारच्या कारखान्यांतून कपाशीस किती मोठी मागणी असूं शकते, ह्याची कल्पना त्यासंबंधांतील अमेरिकेच्या आकड्यांवरून येईल. चालू युद्धापूर्वी, अमेरिकेंतील एकूण कपाशीच्या उठावापैकीं ४०% उठाव कापडाखेरीज इतर उत्पादन करणाऱ्या कारखान्यांत होत होता! रबरी धावांच्या बनावटींत कितीतरी कपास खपते. १९३६ सालीं मोटारींच्या धावांसाठी अमेरिकन कारखान्यांनीं ६ लक्ष गाठी कपास खरेदी केली.

तीस वेगवेगळ्या प्रकारच्या कारखान्यांत अशाच मोठ्या प्रमाणावर कपाशीचा उठाव होतो. रबराचा पुरवठा आतां मर्यादित झाल्याकारणानें साध्या कापडापासून वॉटरप्रुफ कापड तयार करण्यास प्रारंभ लवकरच होईल. रबरांतील कांहीं गुणधर्म कपाशीच्या धाग्यांत आणण्याचे प्रयोगहि करण्यासारखे आहेत. हिंदुस्थानांत कारखान्यांची वाढ झपाट्यानें झाल्यास, हिंदी कपाशीच्या उठावाचा प्रश्न सुटण्यास फार मोठें साहाय होईल. ह्या कारखान्यांस कपाशीसाठी बाहेरील देशांवर अवलंबून रहावें लागणार नाहीं व हिंदी कपाशीचा उठावहि स्वदेशांतच होऊं लागेल. अंतर्गत उठावास एवढा मोठा वाव आहे, त्याचा विचार होणें अगत्याचें आहे. तातडीचा उपाय म्हणून हातीं घेतलेल्या उपायांबरोबर दीर्घकालीन दृष्टीच्या उपायांच्या शक्यतेची व इष्टतेचीहि काळजीपूर्वक छाननी झाली पाहिजे व त्या मार्गानें पाऊल टाकण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

## भाग्यरेषा

### सामुद्रिक ग्रंथ

लेखकः—श्री. शं. दि. करंदीकर, ( स्टोरीटेलर व पामिस्ट ) जव्हेरी बिल्डिंग, ३ रा मजला, २११ चर्नीरोड, मुंबई ४. पृष्ठसंख्या ४८०, किंमत ३ रुपये.

“ द्रव्य आणि नशीब ह्यांची इच्छा असणाऱ्या स्त्री-पुरुषांकरितां ” हा सामुद्रिक ग्रंथ श्री. करंदीकरांनीं लिहिला आहे. “ लक्ष्मीच्या प्राप्तीकरितां वाचावयाचा व ऐकावयाचा ग्रंथ ” असें त्यांनीं त्याचें स्वतःच वर्णन केलें असुन “ तुमच्या नशिबाचा शोध याच ग्रंथानें लागेल ” असा निर्वाळा त्यांनीं दिला आहे. मनुष्यास सुखदुःखादि अनुभव स्वतःच्या आयुष्यांत काय येणार ह्याचें चित्रीकरण त्याच्या हातांच्या रेषांतच जन्माबरोबर झालेलें असतें आणि त्या रेषा त्यास मार्गदर्शक होतात हें स्पष्ट करून सांगणें हा प्रस्तुत ग्रंथाचा हेतु आहे. हस्तरेषा आणि मानवी जीवन ह्यांचा संबंध कसा असूं शकेल आणि तो समाधानकारक रीतीनें सिद्ध कसा करतां येईल ? मनुष्याचें नशीब जर अगोदरच वज्रलेप निश्चित झालेलें असेल आणि “ यद्भावि न तद्भावी, भाविचेन्नतदन्यथा ” हें जर खरें असेल तर भविष्य कळण्याचा व मानवी प्रयत्नांचा उपयोग काय ? असे प्रश्न सामुद्रिक व फलज्योतिष ह्यांचेसंबंधानें उपस्थित केले जातात. “ शनीवांचून महदैश्वर्य नाहीं, भाग्य नाहीं, त्या देवतेची प्रत्येक मनुष्याच्या तळहातावरची जी रेषा खूण, ती भाग्यरेषा; आणि सर्व जगाचा मुख्य प्रश्न ‘ धन ’ तो प्रश्न प्रत्येक व्यक्तीला आपल्या हातावरून सोडवतां येईल किंवा नाहीं याचें विवेचन करण्याचा या ग्रंथांत मीं प्रयत्न केला आहे ” असें ग्रंथकार म्हणतात. “ द्रव्यप्रश्नापुढें सर्व जण हात टेकतात. ! पण ते कां टेकतात ? याचें उत्तर या ग्रंथांत व प्रत्येकाच्या हातांतच मिळेल. त्यावरून दैव श्रेष्ठ कां उद्योग श्रेष्ठ या वादाचें निर्णयात्मक उत्तर प्रत्येकास देतां येईल ” असेंहि ते सांगतात. प्रस्तुत ग्रंथ निर्माण करण्यास आपलें स्वतःचें दुःखमय आयुष्यच कारण झालें आहे आणि नशिबाच्या हेलकाव्यांत सुःस्थितीच्या उंचीवरून दुर्दैवाच्या निराशामय परिस्थितींत खालीं येऊन “ तळहाताच्या रेषांकडे पहात बसणें भाग्यच पडलें ” असतां हा ग्रंथ आपण लिहिला आहे अशी माहिती त्यांनीं प्रांजलपणानें दिली आहे. मनुष्याच्या हातावर ‘ भाग्यरेषा ’ असल्याशिवाय कोणास भाग्य असणें शक्य नाहीं असा ग्रंथकर्त्याचा ठाम सिद्धांत आहे. ग्रंथाप्रमाणें ज्या वाचकांस अनुभव येणार नाहीं त्यांनीं तसें आपणांस कळवावें अशी त्यांची सूचना आहे.

सामुद्रिक व फलज्योतिष ह्यांच्यावर विश्वास नसणारांच्या वर निर्दिष्ट केलेल्या शंकांस शास्त्रीय उत्तरें प्रस्तुत ग्रंथांत दिलेला नाहींत. पण हा प्रत्यक्ष अनुभवाचा प्रश्न आहे, अशी भूमिका त्यांत स्वीकारलेली दिसते. पुस्तक सामुद्रिकासंबंधानें आहे तरी त्यांत सर्वत्र प्रयत्नवादित्व, सद्वर्तन, व्यक्तीच्या व देशाच्या आर्थिक उन्नतीप्रीत्यर्थ आवश्यक असलेले पद्धतशीर उपाय इत्यादींचें विवेचन व समर्थन केलेलें आढळतें. भाग्यरेषेचा अधिष्ठाता ह्या नात्यानें शनिदेवाचें अभिनव वर्णन ग्रंथकर्त्यानें केलें आहे, पण “ प्रयत्नांतीं परमेश्वर ’ हें त्याचें सार असावें असें वाचणारांस वाटतें. श्री. स्वामी शिवानंद ह्यांनीं प्रस्तावनेंत ग्रंथाच्या अंतरंगाचें दिग्दर्शन केलें आहे. त्यांत आत्मज्ञान, मनःशांती, शुभ विचार, सदाचार, दीर्घ यत्न हाच ग्रंथकर्त्याचा दिव्य संदेश आहे असें स्पष्ट म्हटलें आहे. प्रत्येक पानांत खालीं सुभाषित दिलें आहे. त्यांतहि हाच उत्साहवर्धक संदेश व्यक्त आहे. ग्रंथाची भाषा ओघवती, मनोरंजक व उद्बोधक आहे आणि त्यांतलें विवेचन सद्वर्तनप्रवर्तक आहे. श्री. करंदीकर ह्यांची उत्तम मराठी लेखक अशी प्रसिद्धि आहे. सफाईदार व चटकदार लेखनशैली हा प्रस्तुत ग्रंथाचा एक विशेष तीमध्यें निःसंशय भर घालील.

---

### बूट्स प्युअर ड्रग कं. लि.

[ सध्याच्या युद्धकालांतहि ब्रिटिश कंपन्यांचें काम कसें पद्धतशीर व आत्मविश्वासपूर्वक चाललें आहे व त्या युद्धप्रयत्नास कसें सक्रिय सहाय करीत आहेत ह्याची कल्पना बूट्स प्युअर ड्रग कंपनीच्या खालील त्रोटक वार्षिक वृत्तांतावरून येईल. ]

कंपनीच्या नोकरवर्गापैकीं ४½ हजार लोक लष्करांत दाखल झाले आहेत. नोकरांपैकीं ४५ लोक मरण पावले. २१ लोक युद्धकैदी आहेत व ४८ लोकांना ग्रेटब्रिटनमध्येंच शत्रूच्या वैमानिक हल्ल्यांत मृत्यु आला. १५ लोकांना युद्धांतील कामगिरीबद्दल सरकारकडून प्रशंसापत्रें मिळालीं. ज्या विवाहित नोकरांचें लष्करांत गेल्यामुळें पैशाचें नुकसान झालें अशांस पूर्वीइतकाच पगार मिळावा म्हणून कंपनी सालीना १५ लक्ष रुपये खर्च करीत आहे. शास्त्रीय विषयांची प्राथमिक माहिती देणारीं व्याख्यानें नव्या नोकरांसाठीं देण्यांत येत आहेत. कंपनीच्या बऱ्याच फोरमेननी सरकारी ट्रेनिंग क्लासचा फायदा घेतला. कंपनीच्या नोकरांपैकीं १४½ हजार नोकर राष्ट्रीय बचतीच्या योजनेप्रमाणें रकमा शिल्लक टाकीत आहेत. गेल्या वर्षीच्या वैमानिक हल्ल्यांत आपल्या कारखान्याचें पुष्कळ नुकसान झालें, परंतु जखमी व मृत ह्यांची संख्या प्रमाणाबाहेर नव्हती. उत्पादनाचें काम अखंड चालू ठेवण्याची सर्व दर्जाच्या नोकरांनीं उत्कृष्ट कामगिरी केली. कामगारांच्या वेतनांत वाढ झाली, तरी उत्पादनाच्या पद्धतींत सुधारणा घडवून आणल्यामुळें कांहीं बाबींत किंमती उतरविणें शक्य झालें—रोगराईमुळें पिकांचें होत असलेलें नुकसान टाळण्याचे बाबतींत आम्हीं सरकारी प्रयत्नांस मदत केली व बहुसंख्य शाखांचे मार्फत शेतकऱ्यांस उपयुक्त माहिती व औषधें उपलब्ध केलीं. कारखान्याचे भोवतालच्या ४० एकरांत आम्हीं भाजी लावली आहे, त्यामुळें कामगारांना न्याहारीस ताजी भाजी व टोमॅटो मिळूं शकतात. कांहीं विशिष्ट मालाचा तुटवडा पडूं लागल्यामुळें त्यांचे जागीं दुसरा माल कसा वापरतां येईल, ह्यासंबंधीं संशोधन चालू आहे. आपल्या सारख्याच चार इतर कंपन्यांनीं व आपण मिळून संशोधनकार्यासाठींच केवळ एक नवी कॉर्पोरेशन स्थापन केली आहे. प्रत्येकानें स्वतंत्रपणें संशोधन करण्यापेक्षा तें कार्य वाटून घेणें अधिक सोईचें व कार्यक्षम असल्यानें, ह्या नव्या संस्थेचे हातून प्रभावी कार्य होईल, असा विश्वास वाटतो. संस्थांच्या पांचहि घटक कंपन्यांच्या आर्थिक व्यवहारांशी कॉर्पोरेशनचा संबंध नाहीं. माहिती एकत्र आणणें, संशोधन करणें व त्याच्या व्यावहारिक उपयोगाच्या शक्याशक्यतेचा विचार करणें, एवढेंच त्या कॉर्पोरेशनचें काम आहे.

---

# स्फुट विचार

## स्टॅलिनग्राडचा प्रभावी बचाव

रशियन सैन्यें पूर्वेच्या आघाडीवर इतक्या चिकाटीनें व शौर्यानें लढत आहेत कीं त्यांनीं हिटलरचे सर्व बेत हाणून पाडून विजयाविषयींच्या त्याच्या आकांक्षा फोल करून टाकल्या आहेत. स्टॅलिनग्राड केव्हांच सर करून आपण ताब्यांत घेऊं असें जर्मनांस वाटत होतें आणि हा पण खरा करण्यासाठी हिटलर आपलें शक्तिसर्वस्व वेचीत आहे. परंतु रशियन फौजा शत्रूचे आघात जोरानें व एकामागून एक झाले तरी त्यांचा यशस्वी रीतीनें प्रतिकार करीत आहेत. एवढेंच नव्हे तर त्यांनीं त्याच्यावर प्रतिहल्ले चढवून कांहीं ठिकाणीं त्यास मागें हटवण्यासहि सोडलेलें नाहीं. त्याचवेळीं पूर्व आघाडीच्या दुसऱ्या भागांत चढाईचें धोरण स्वीकारून टिमोशेंको व त्याचे सहकारी ह्यांनीं शत्रूस हैराण केलें आहे. कॉकेशस प्रांत व्यापून ग्रॉझनेच्या तेलाच्या विहिरी काबीज करण्याचाहि हिटलरचा हेतु त्यांनीं सफल होऊं दिलेला नाहीं. ह्या परिस्थितींत पश्चिम युरोपच्या बाजूनें इंग्लंड व अमेरिका ह्यांनीं दुसरी आघाडी चालू केल्यास जर्मनीची तारांबळ उडेल आणि त्याच्या पूर्ण पराभवाचा क्षण जवळ येईल असें मॉ. स्टॅलिन ह्यास वाटलें असल्यास त्यांत आश्चर्य नाहीं. इंग्लंडमध्यें व अमेरिकेंत ह्याच प्रकारचें मत व्यक्त करण्यांत येत आहे. दुसऱ्या आघाडीस अनुकूल परिस्थिति आहे असें दिसतांच ती चालू करण्यांत आल्यावांचून रहाणार नाहीं असें ब्रिटिश सरकारच्या वतीनें सांगण्यांत येत आहे. कांहीं झालें तरी स्टॅलिनग्राडच्या लढायांनीं रशियन शौर्याची उत्कृष्ट साक्ष जगास पटवून दिली आहे ह्यांत संशय नाहीं.

## मि. वुइंडेल विल्की ह्यांचा दौरा

एका वेळीं अमेरिकेच्या अध्यक्षीय पदासाठीं प्रयत्न करणारे उमेदवार आणि सध्या प्रे. रूझवेल्ट ह्यांचे स्वतःचे खास प्रतिनिधि मि. वुइंडेल विल्की ह्यांनीं इजिप्त, रशिया, इराण व चीन ह्या देशांत दौरा करून रणांगणावरील परिस्थिति प्रत्यक्ष अवलोकन केली आहे आणि तेथील पुढाऱ्यांशीं युद्धाबाबत चर्चाहि केली आहे. त्यांचे प्रसिद्ध झालेले विचार वक्तृत्वाच्या ओघांत भरमसाटपणानें व्यक्त केलेलीं वैयक्तिक मतें आहेत अशा आशयाचे उद्गार त्यांच्या कांहीं देशबंधूंनीं काढले आहेत. तथापि, प्रस्तुत युद्धाचें उद्दिष्ट व चीन देशाचें भवितव्य ह्या विषयींच्या त्यांनीं प्रकट केलेल्या कल्पना उदात्त आहेत. आपण तेरा देशांमध्यें दौरा केला, त्यामध्यें चार गोष्टी प्रामुख्यानें आपल्या मनावर ठसल्या असें त्यांनीं म्हटलें आहे. मित्र-राष्ट्रांचा विजय ह्या सर्व देशांत चिंतण्यांत येत आहे ही पहिली गोष्ट. दुसरी ही आहे कीं, मित्रराष्ट्रांनीं आतां चढाईचें धोरण अंगिकारावें असें सर्वांस वाटत आहे. युद्धोत्तर काळांत सर्व देशांच्या लोकांस स्वातंत्र्य अनुभवास मिळावें ही सार्वत्रिक दिसून येणारी इच्छा. तिसरी आणि चवथी गोष्ट म्हटली म्हणजे युद्धोत्तर काळांत आपणांस स्वातंत्र्य भोगावयास मिळेल कीं नाहीं ह्या संबंधांतली साशंक वृत्ति ही होय. युद्धानंतरच्या काळांत चीनमध्यें मोठे उद्योगधंदे चाललेले दिसतील अशी अपेक्षा मि. विल्की ह्यांनीं प्रकट केली आणि अमेरिकन राष्ट्राचें धोरण चीनच्या स्वातंत्र्यास पोषक असें राहील असें सांगितलें. जगांतील सर्व लोकांची आर्थिक स्थिति सुधारून त्यांची रहाणी सुलभाची होईल, ह्या रीतीची आंतरराष्ट्रीय व्यवस्था केली जाण्याची आवश्यकता त्यांनीं प्रतिपादली. त्याच आशयाचे विचार प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांनीं अनेक वेळां व्यक्त केले असून त्यांचाच पुनरुच्चार मि. विल्कींनीं केला आहे. तेरा देशांच्या स्थितीचें अवलोकन आणि त्यांच्या पुढाऱ्यांशीं चर्चा ह्यांचेमुळें हे त्यांचे विचार दृढ झाले आहेत हें विशेष आहे.

## चीनमधील खास हक्कांवर पाणी सोडणार

पूर्ववत् शांतता प्रस्थापित झाली म्हणजे चीनमधील व्यापारविषयक खास हक्क सोडून देण्याविषयीं ग्रेट ब्रिटन अमेरिकेप्रमाणेंच विचार करील, अशी बातमी जुलै १९४१ मध्येंच प्रसिद्ध झाली होती. त्यासंबंधांत आतां अधिकृत घोषणा ग्रेट ब्रिटन व अमेरिका ह्यांनीं केली आहे. चिनी सरकारचे अधिकारी व ब्रिटिश व्यापारी ह्यांचेमध्यें पूर्वी वारंवार वांधे येत. अखेर १८३९ मध्यें उघड युद्ध जुंपलें. १८४२ च्या नॅनकिंगच्या तहानें हॉंगकॉंग ग्रेट ब्रिटनकडे कायमचें आलें व चीनमधील पांच बंदरें व्यापारास खुलीं झालीं. १८५६ व १८६० सालीं आणखी युद्धें झालीं व पाश्चात्य राष्ट्रांना चीनमध्यें खुल्या व्यापारास आणखी वाव मिळाला. रशिया, जर्मनी, इत्यादिकांनींहि ह्यामध्यें वाटा मिळविला व चीनमध्यें आपले खास हक्क निर्माण केले. "सर्व भूपृष्ठाचा अधिकांत अधिक व उत्तमांत उत्तम उपयोग व्हावा, अशी मागणी करण्याचा जगास अधिकार आहे" ह्या तत्त्वावर चीनमध्यें पाश्चात्य राष्ट्रांनीं बळजबरीनें प्रवेश करून घेतला व "एक्स्ट्रॉ टेरिटोरिअल" हक्कांचा इतकीं वर्षे उपभोग घेतला. दुसऱ्या राष्ट्राचे हद्दींत कोणतेहि खास हक्क मागण्याचा अधिकार इतर राष्ट्रांचे नागरिकांस नसतो. कारण, असा अधिकार घेणें म्हणजे त्या राष्ट्राच्या सार्वभौमत्वाचें अतिक्रमण करणें होय. वकिलातीच्या हद्दींत ज्या देशाची वकिलात असेल, त्या देशाचे कायदे चालतात, परंतु हें केवळ त्या देशास मान दर्शविण्याचें चिन्ह आहे. त्यानें दुसऱ्या राष्ट्राचें सार्वभौमत्व नष्ट होत नाहीं. चीनमध्यें पाश्चात्य राष्ट्रांनीं मिळविलेल्या खास अधिकारांचें स्वरूप व्यापक होतें. आंत येण्याचा, राहण्याचा व व्यापार करण्याचा हक्क, आर्थिक स्वातंत्र्य, बिन्हाडांत कोणासहि शिरूं न देण्याचा हक्क, करांची माफी, स्थानिक कोर्टें व कायदा गैरलागू असणें, इत्यादि सवलती चीननें इतर देशांस दिल्या ह्याचा अर्थ विदेशी नागरिकांचे मोहल्ले हीं स्वतंत्र संस्थानेंच बनलीं. चीनच्या प्रतिष्ठेस व सार्वभौमत्वास असलेला हा कलंक नाहींसा करण्याचें श्रेय आतां ग्रेट ब्रिटन व अमेरिका ह्यांनीं घेण्याचें ठरविलें आहे. इजिप्तमध्यें १८ व्या शतकाचे अखेरीस बहुतेक सर्व युरोपियन देशांस अशाच प्रकारच्या सवलती होत्या व गेल्या महायुद्धापर्यंत सवलत मिळविणाऱ्या देशांची संख्या वाढतच गेली. महायुद्धांत इजिप्त जेत्यांचे बाजूस असतांहि त्या सवलती कांहीं काळ चालू राहिल्या. ब्रिटिश सरकारनें मॉंट्रिओ करारानें ह्या सर्व सवलती रद्द करण्याचें श्रेय घेतलें. चीनमधील खास सवलती नाहींशी होण्यास त्याला युद्धसमाप्तीची वाट पहाण्याचें प्रयोजन उरणार नाहीं हें आधुनिक राष्ट्रांत चीनच्या वाढलेल्या दर्जाचें लक्षण आहे.

## दि मिरज स्टेट बँक लि.

**( वार्षिक सभा २५–१०-४२ )**

वरील बँकेच्या भक्कमपणाची कल्पना खालील ३० जून अखेरच्या आकड्यांवरून तात्काळ येईल.

| | | | |
|---|---|---|---|
| शेअर भांडवल | २० हजार रु. | रोख रु. व इतर बँकांत शिल्लक | ८ लक्ष रु. |
| रिझर्व्ह फंड | ३४½ ” | इन्व्हेस्टमेंट्स | ९½ लक्ष. रु. |
| बिल्डिंग फंड | ६½ ” | लोन | १ ल. ६१ ह. रु. |
| इन्व्हेस्टमेंट फ्लु.फंड | २८½ ” | कॅश क्रेडिट | — ५७ ” ” |
| डिव्हि.तरतूद फंड | २½ ” | सोनें गहाण | १ ल. १४ ” ” |
| बुडीत व संशयित येणीं फंड | ७५ ” | माल गहाण | ४ ल. ९३ ” ” |
| | | बँक इमारत | — ९½ ” ” |

कांहीं कुळांकडील संशयित येणीं म्हणून ८८,८४६ रुपयांची रकम ताळेबंदांत दाखविलेली आहे, त्यासंबंधांतील दावे व हुकुमनामे चालू आहेत. ठेवींचा आंकडा १९३९–४० अखेर १४ लक्ष, ३९ हजार रुपये होता तो पुढील वर्षी १७ लक्ष, ५४ हजार रुपये झाला व आतां तो २१ लक्ष, ८२ हजार रुपयांवर आला आहे. ह्या ठेवींपैकीं मुदतीच्या ठेवी १० लक्ष, ४८ हजारांच्या आहेत, म्हणजे, चालू व सेव्हिंग्ज ठेवींचा आकडा ११ लक्ष ३३½ हजार रुपये आहे. बँकेची शिल्लक रकम व इन्व्हेस्टमेंट ह्यांचीच बेरीज १४ लक्ष, ३७ हजार रुपये भरते. ह्यावरून ठेवीदारांची सुरक्षितता दिसून येते. बँकेचें स्वतःचें भांडवल १ लक्ष ६५ हजार रुपयांपेक्षां अधिक आहे. व ८० हजारांची भागीदारांची रिझर्व्ह लायबिलिटी आहे. ३० जून, १९४२ अखेर संपलेल्या वर्षी बँकेस १६ हजार रुपये नफा झाला. भागीदारांस १२% डिव्हिडंड व ४% बोनस देण्यासाठी ३,२०० रुपये लागतील. बाकीच्या नफ्याचा विनियोग रिझर्व्ह व इतर फंड वाढविण्याकडेच होईल. वरील हकीकतीवरून बँकेच्या सुस्थितीची कल्पना येईल. मिरजेचे दिवाणसाहेब रा. ब. जोशी हे बँकेचे प्रेसिडेंट असून रा. सा. वि. पां. वेडेकर, बी.एससी., बी. इ. हे चेअरमन आहेत. श्री. ल. ग. मराठे, जी. डी. ए. हे मॅनेजर आहेत.

---

## दि कमर्शिअल बँक लि., कोल्हापूर

वरील बँकेचें खपलेलें व वसूल भांडवल अनुक्रमें ६५,६२० रु. व ३२८१० रुपये आहे. रिझर्व्ह व इतर फंड ३,६७५ रुपयांचे आहेत. ठेवींचा आकडा ४ लक्ष, ३२ हजारांवर गेला आहे. बँकेनें १ लक्ष, ७२ हजार रुपये हातांत व बँकांत शिल्लक ठेवले असून २ लक्ष, ९० हजारांचीं कर्जें दिलेलीं आहेत. “नियमित प्रमाणांतहि रकमा गुंतवून उत्पन्न वाढविण्यापेक्षीं कोठल्याहि परिस्थितींत ठेवीदारांची कोठलीहि गैरसोय न होईल याकडेच जास्त लक्ष देण्याचें धोरण स्वीकारून बोर्डानें भरपूर रकम तरती ठेवली.” ३० जून अखेर संपलेल्या वर्षी बँकेस निवळ नफा ८,२४५ रुपये झाला. भागीदारांस द. द. शे. ८/२ प्रमाणें करमाफ डिव्हिडंड देण्याकडे २,४८० रुपयांचा विनियोग करण्यांत आला. ॲडव्होकेट एस. श्री. दाभोळकर हे बोर्डाचे अध्यक्ष असून मेसर्स साळोखे आणि कंपनी हे सेक्रेटरीज्, ट्रेझरर्स ॲंड एजंट्स आहेत.

---



## दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

अधिकृत भांडवल ... ... ... रु. २,००,००,०००
वसूल झालेलें भांडवल ... ... ... रु. १,००,००,०००
रिझर्व्ह फंड ... ... ... रु. १,१८,००,०००

मुख्य कचेरी: ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

मुंबईमधील शाखा : बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

इतर शाखा : अहमदाबाद ( भद्र, मुख्य ऑफिस ), अहमदाबाद ( एलिस ब्रिज शाखा ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अंधेरी ( मुंबई शेजारीं ), बांद्रे ( मुंबई शेजारीं ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस ), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर, कराची, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत.

लंडन एजन्ट्स : वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

डायरेक्टर्स : सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष); श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाईट; मि. ए. गेडिस; सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई.; मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण.

**करंट डिपॉझिट अकाउंट्स :**

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रकम ५ रु. पेक्षा कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमीचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

एजंट—टी. आर. लालवाणी.

---

## दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

हेड ऑफिस : पुणें शहर.

स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.

मुंबअी शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबअी.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | : रु. १०,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | : रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | : रु. ४,८९,९५० |
| वसूल झालेलें भांडवल | : रु. २,४४,९२५ |
| एकूण खेळतें भांडवल | : रु. ४०,००,००० |

**डायरेक्टर्स**

| | |
|---|---|
| प्रो. वा. गो. काळे, अध्यक्ष | श्री. भा. म. गुप्ते |
| श्री. धों. कृ. साठे | श्री. मा. रा. जोशी |
| श्री. न. ग. पवार | श्री. श्री. गो. मराठे |
| श्री. त्र्यं. वि. रानडे | श्री. र. चिं. सोहोनी |
| श्री. वा. पुं. वर्दे | मि. फ. दो. पदमजी |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदीविक्री कसोशीनें करून दिली जाते.

बँकेच्या शेअरवर १९४१ अखेर पुऱ्या होणाऱ्या वर्षी द. सा. द. शेंकडा ४ टक्के करमाफ डिव्हिडंड दिलें गेलें. बँकेची शेअरविक्री चालू आहे.

म. वि. गोखले
मॅनेजर.

## आयर्लंडमधील आजची आर्थिक परिस्थिति

चालू युद्धामध्यें आयर्लंड ( आयरा ) नें पूर्ण तटस्थतेचें धोरण ठेवलें आहे, तरी तेथील आर्थिक परिस्थिति युद्धमान राष्ट्रांतील परिस्थितीप्रमाणेंच आहे. दिवाबंदीवर तेथें नियंत्रण नसलें व लोणी, अंडीं, फळें व चॉकोलेट ह्यांचा तुटवडा नसला तरी इतर बाबतींत परिस्थिति अगदीं भिन्न आहे. रोटी, चहा, सर्पण आणि छपाईचा कागद ह्यांचें तेथें दुर्भिक्ष्य आहे, परंतु श्रीमंतांस तेथें कित्येक गोष्टी मिळूं शकतात त्या गरीबांस मिळत नाहींत. इंग्लंडमधून कोळशाची आयात पूर्वीच्या मानानें अत्यल्प प्रमाणावर होते व त्यामुळें शहरांतील सर्पणाच्या गॅसचा पुरवठा ठराविक तासांपुरताच केला जातो, त्यांत लोकांनीं स्वैंपाक आटोपला पाहिजे. घासलेट व मेणबत्त्या ह्यांचा तुटवडा आहेच. आगगाड्यांची संख्या शक्य तेवढी कमी करण्यांत आली आहे. उद्योगधंद्यास मंदीची अवस्था प्राप्त झाली आहे, परंतु कित्येक आयरिश लोक इंग्लंडमध्यें कारखान्यांत कामासाठी गेले असल्यामुळें बेकारीची तीव्रता लक्षांत येत नाहीं. तेथून ते घरीं पैसे धाडतात. शहरी कामगारांना शेतावर काम करितां येत नाहीं, त्यामुळें शेतावर मजुरांचा तुटवडा भासत आहे. आयरिश शेतीच्या मालाचा इंग्लंडमध्यें तात्काळ उठाव होतो परंतु आयर्लंडला आज हव्या असलेल्या मालाचे स्वरूपांत इंग्लंड मोबदला देऊं शकत नसल्याकारणानें आयर्लंडचें इंग्लंडमध्यें येणें वाढत चाललें आहे. आपला देश स्वयंपूर्ण करण्याचा आयर्लंडचा प्रयत्न आहे. परदेशांतून परावलंबी आगबोटांतून येणाऱ्या मालावर संसार चालविण्यापेक्षा आपली स्वतःचीच भाजी-भाकरी असणें इष्ट, अशा धोरणाचा तेथें पुरस्कार चालू आहे.

## दि कोल्हापूर अर्बन को. बँक लि.

वरील बँकेचें वसूल भांडवल २४,९२५ रुपये आहे. म्हणजे फक्त ११ भागच आतां शिल्लक आहेत. बँकेचा रिझर्व्ह फंड ५८,६६९ रुपये असून इतर फंड ६२$\frac{3}{4}$ हजारांचे आहेत. बँकेनें सुमारें ६० हजार रुपये रोख व इतर बँकांत ठेवले असून, ११ हजारांची मुदतबंद ठेव आहे. इन्व्हेस्टमेंट खातीं ६४ हजार रुपये आहेत. व्यक्तिशः सभासदांकडे १ लक्ष, २४ हजार व सोसायट्यांकडे १ लक्ष १२ हजार रुपये कर्ज येणें आहे. कॅश क्रेडीट खातीं २१ हजार रुपये आहेत. बँकेची थकबाकी ८९ हजार रुपये आहे. ही मागील सालापेक्षा १६ हजार रुपयांनीं कमी झालेली आहे. अहवालाचे वर्षी बँकेस निवळ नफा ७,००२ रुपये झाला. डिव्हिडंड वाटणीसाठी ( ७$\frac{1}{2}$% ) २,५३८ रुपयांचा विनियोग करण्यांत आला. आरंभापासून 'अर्बन बँक' ही बॅलन्सिंग सेंटरचें व सेंट्रल फायनान्सिंग एजन्सीचें काम करीत आहे. कोल्हापूर इलाख्यांतील शेतकरी सहकारी संस्थांना जरूर असणाऱ्या भांडवलाचा पुरवठा करण्याच्या दृष्टीनें एक मोठी मध्यवर्ती संस्था असणें अवश्य असल्याचें वाटूं लागल्यावरून सहकारी संस्थांना भांडवलाचा पुरवठा करणाऱ्या दोन्ही संस्थांचें 'कोल्हापूर अर्बन बँक व कोल्हापूर सेंट्रल बँक'चें एकीकरण करण्याबाबत विचार करण्यांत आला. त्या बाबतींत नियमाचा मसुदा तयार करण्याचें काम नामदार भास्करराव जाधवराव यांचे नेतृत्वाखाली चालूं आहे. बँकेच्या व्यवहाराचें क्षेत्र व्यापक होण्याचे दृष्टीनें हें रूपांतर स्वागतार्हच वाटेल. श्री. शा. ह. सरनाईक हे बँकेचे चेअरमन असून श्री. श्री. शं. गुते, बी. कॉम, हे मॅनेजर आहेत.


मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् को-ऑपरेटिव् बँक, लिमिटेड.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी–सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंग
९, बँक हाउस लेन, कोट मुंबई.

शाखा

| | |
|---|---|
| १ बारामती ( जि. पुणें ) | १८ अकलूज ( जि. सोलापूर ) |
| २ सातारा ( „ सातारा ) | १९ विरमगांव ( „ अहमदाबाद ) |
| ३ इस्लामपूर ( „ „ ) | २० धुळें ( „ प. खानदेश ) |
| ४ कऱ्हाड ( „ „ ) | २१ दोंडाईचें ( „ „ ) |
| ५ तासगांव ( „ „ ) | २२ शिरपूर ( „ „ ) |
| ६ किर्लोस्करवाडी ( „ „ ) | २३ शहादें ( „ „ ) |
| ७ शिराळें ( „ „ ) | २४ नंदुरबार ( „ „ ) |
| ८ कोरेगांव ( „ „ ) | २५ साक्री ( „ „ ) |
| ९ वाई ( „ „ ) | २६ शिंदखेडें ( „ „ ) |
| १० अहमदनगर ( „ अहमदनगर ) | २७ तळोदें ( „ „ ) |
| ११ शेवगांव ( „ „ ) | २८ मालेगांव ( „ नाशिक ) |
| १२ कोपरगांव ( „ „ ) | २९ सटाणा ( „ „ ) |
| १३ बेलापूर ( „ „ ) | ३० कळवण ( „ „ ) |
| १४ राहुरी ( „ „ ) | ३१ लासलगांव ( „ „ ) |
| १५ भिवंडी ( „ ठाणें ) | ३२ नांदगांव ( „ „ ) |
| १६ पालघर ( „ „ ) | ३३ दोहद ( „ पंचमहाल ) |
| १७ कल्याण ( „ „ ) | ३४ कालोल ( „ „ ) |

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.

## अर्थशास्त्र

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे

पृष्ठसंख्या सुमारें ३००; किंमत ३ रुपये

या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

## श्रीराम सिल्क मिल्स लि., बंगलोर

[ कंपनीनें १९४१ अखेर ६ टक्के डिव्हिडंड वांटला आहे. ]

युद्धसाहित्यपुरवठा–खात्याची पॅरेशूटकरितां लागणाऱ्या

रेशमी कापडाची ऑर्डर पुरी करण्यासाठी लागणाऱ्या भांडवलाकरितां तूर्त एकूण रु. १ लक्षाच्या रकमेपर्यंत


# ठेवी घेणें आहेत

व्याजाचा दर ४॥ ते ६ टक्के. ठेव किमान रु. ५०० ची असावी. ठेवीवरील व्याज दर सहा महिन्यांनीं दिलें जातें.

श्रीराम सिल्क मिल्स लि.,<br>श्रीरामबाग,<br>बसवनगुडी, बंगलोर.

**नारायण गोविंद नाईक,**<br>( माजी अध्यक्ष, म्हैसूर चेंबर ऑफ कॉमर्स ) मॅनेजिंग डायरेक्टर

आमच्या कारखान्यांतील माल मुंबईस बॉम्बे स्वदेशी को–ऑपरेटिव्ह स्टोअर्समध्यें व पुण्यास लक्ष्मी रोडवरील रे म्यूझिअमच्या व्यापार–संवर्धन–गृहांत पहा.



# मधुमेहावरील औषध

तीन आठवड्यांचे औषधास फक्त रु. ७

— मागविण्याचा पत्ता —

मॅनेजिंग डायरेक्टर, रूरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड.

९२३ ए, सदाशिव, पुणें २.

## वक्तशीर आणि मनपसंत काम करून देणारे

# मोहन वॉच कंपनी

रेग्युलेशन मोफत

कॉमनवेल्थ बिल्डिंगसमोर लक्ष्मी रोड, पुणें २.

## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार<br>२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक<br>३ व्यापारी उलाढाली<br>४ सहकार

राहाणेची व भोजनाची उत्तम सोय




फोन नं. ७७९ गणपति चौक, व्यवस्थापक.

## N. V. WADNERKAR

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver, Electro-plater & Manufacturer of Sporting Trophies, Medals, Cups etc.

- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -

POONA CITY.

## DECCAN BOOK STALL

Booksellers, Publishers & Subscription Agents

**Fergusson College Road, Poona No. 4**

(1) We stock and supply Educational books, General books & Library books.

(2) We supply Government of Bombay and Government of India publications.

(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.

(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे. बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

**जाहिरातींचे दर.**
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

**वर्गणीचे दर.**
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ८ पुणें, बुधवार, तारीख २१ आक्टोबर १९४२ अंक ४२

## विमेदार नि हवाई हल्ला

शत्रु राष्ट्राकडून हवाई हल्ला अगर तत्सम उपद्रव यापासून बिन-लढाऊ नागरिकांच्या जीविताला येणाऱ्या धोक्याचा समावेश विमा पॉलिसीच्या अटींत होतो काय व त्यासाठी जादा प्रिमिअम भरावा लागेल काय ? असा प्रश्न साहजिकच नागरिकांमध्यें चर्चिला जात आहे.

## ट्रस्ट ऑफ इंडिया

विमा कंपनीच्या
विमा पॉलिसीमध्यें हवाई हल्ल्यामुळें जीविताला होणाऱ्या अपायाचा अंतर्भाव होतो त्याकरितां जादा प्रिमिअम नाहीं.

तरी विलंब न लावतां—
तुमचा नि तुमच्या आप्तेष्टांचा विमा

## ट्रस्ट ऑफ इंडिया

विमा कंपनींतच उतरा.

अध्यक्षः—श्रीमंत सरदार जगन्नाथ महाराज पंडित
माहितीपत्रकें विनामूल्य पाठवूं

ट्रस्ट ऑफ इंडिया विमा कं. लि.
लक्ष्मी रोड, पुणें २

वि. ह. देशमुख, बी. ए.
जनरल मॅनेजर

## महायुद्ध दाराशीं आलें परदेशी औषधें दुर्मिळ व महाग झालीं

पण

भिण्याचें कारण नाहीं !!!

— कारण —

## आयुर्वेद रसशाळा पुणें लि०

या देशी औषधांच्या प्रसिद्ध कारखान्यानें तयार केलेलीं

- रक्तवर्धक,
- उपनाह,
- बालजीवन,
- कॅल्सीप्राल

इत्यादि पेटंट, स्टँडर्ड व लोकप्रिय औषधें खात्री पटल्यामुळें

★ डॉक्टर्सहि वापरूं लागले आहेत. ★

दरसाल बिनचूक नफा वाटणाऱ्या ह्या कंपनीचे शेअर्स व औषधें मागवा.

## आयुर्वेद रसशाळा पुणें लि०

मुख्य दुकान गणपति चौक, लक्ष्मीरोड, पुणें १.

**महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.**

बंबाचे माडीवर

# महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

# विविध माहिती

**बेळगांव बँक लि., बेळगांव**

वरील बँकेची शाखा मालवण येथें उघडली आहे तिचा उद्घाटन समारंभ ता. १६ आक्टोबर रोजीं श्री. जयराम केशव प्रभु ह्यांच्या अध्यक्षतेखालीं झाला.

**ग्रेट ब्रिटनमध्यें प्रोड्यूसर गॅसचा प्रसार**

मोटार लॉऱ्यांस प्रोड्यूसर गॅस प्लँट बसविण्यास प्रोत्साहन देण्याचें ब्रिटिश सरकारचें धोरण आहे; तथापि अद्याप तेथें फक्त २ हजार गाड्या गॅस प्लँटवर चालू आहेत. जर्मनींत २½ लक्ष गाड्या गॅसवर चालतात व रशियांत त्यांची संख्या ह्याहिपेक्षा ज्यास्त आहे. ३० हजार गाड्यांस गॅस प्लँट बसविण्याचा ब्रिटिश सरकारचा विचार आहे, तो साध्य झाला म्हणजे सालिना ६ लक्ष टन कोळशाची बचत होईल व तेलवाहू आगबोटींच्या ६० फेऱ्या वांचतील. अर्थात्, त्यामुळें कोळशास मागणी वाढेल.

**रबराची जागा घेणारा पीक**

रबराचा तुटवडा नाहींसा करण्यासाठी रबराच्या चिकासारखा चीक देणारीं दुसरीं झाडें शोधून त्यांवर प्रयोग करण्याचें काम मद्रास प्रांतांत चालू आहे.

**युनायटेड किंग्डम कमर्शीअल कॉर्पोरेशन**

वरील कंपनीच्या व्यवहारांमुळें हिंदी व्यापाऱ्यांच्या कार्यक्षेत्रावर गदा येत आहे; कंपनीला खास सवलती देण्यांत येत आहेत; ही कंपनी म्हणजे ईस्ट इंडिया कंपनीचाच नवा अवतार आहे, इत्यादि तिचेसंबंधीं तक्रारी हिंदुस्थानांत करण्यांत आल्या. त्या लक्षांत घेऊन युद्ध संपताच कंपनीचा व्यवहार गुंडाळण्यांत येईल व कंपनीचा येथील व्यवहार आतां वाढविण्यांत येणार नाहीं असें आश्वासन ब्रिटिश सरकारकडून मिळवून देण्याचा प्रयत्न हिंदुस्थान सरकार करीत आहे.

**हिंदुस्थानांतील सर्व रेल्वेज सरकारी मालकीच्या होणार ?**

हिंदुस्थानाचें ग्रेट ब्रिटनमधील देणें भागवून टाकण्याकडे तेथें साठत असलेल्या पौंडांतील येण्याचा उपयोग करण्याचें हिंदुस्थान सरकारचें धोरण आहे. त्यास अनुसरून सरकारनें प्रथम आपल्या पौंडांतील कर्जाचें रुपयांतील कर्जांत रूपांतर केलें. रेल्वेजचे स्टर्लिंगमधील वर्षासनांचें देणें भागविण्याची योजना नुकतीच प्रसिद्ध झाली व त्यासाठी १५ कोटि रुपयांचें नवें कर्जहि सरकारनें जाहीर केलें. ३ कोटि, १० लक्ष पौंडांचीं रेल्वेजचीं डिबेंचर्स फेडून टाकण्याचा व हिंदुस्थानांत उरलेल्या खासगी रेल्वे कंपन्या ९० लक्ष पौन्ड देऊन विकत घेण्याचा सरकारचा आतां विचार असल्याचें समजतें. हा विचार तडीस गेला म्हणजे हिंदुस्थानांतील सर्व रेल्वेज सरकारी मालकीच्या होतील व त्यांचा कारभार सरकारकडे येईल. युद्धपरिस्थितीमुळें हिंदुस्थानाचें येणें इंग्लंडमध्यें वाढलें त्याचा हा परिणाम आहे.

**इटालियन आगबोटी**

इटलीनें युद्धांत प्रवेश केला, तेव्हां त्याचेजवळ ३५ लक्ष टनांच्या मालवाहू आगबोटी होत्या. त्यांपैकी संयुक्त राष्ट्रांनीं २३½ लक्ष टनांच्या आगबोटी निकामी केल्या असून १५ लक्ष टनांच्या आगबोटींचा तर सपशेल नाश झाला आहे.

**टायर्सची खरेदी**

मोटार मालकांच्या सर्व नव्या व जुन्या टायर्स अमेरिकन सरकार विकत घेणार आहे. हें काम रेल्वे एक्सप्रेस एजन्सी आपल्या २३ हजार कचेऱ्यांमार्फत करील.

**टाटा कंपनीचा नोकरवर्ग**

टाटा आयर्न अँड स्टील कंपनीच्या नोकरवर्गांपैकीं कोणासहि सिंगभूम जिल्ह्याच्या डे. कमिशनरच्या परवानगीवांचून त्यांनीं सांगितलेल्या क्षेत्राचे बाहेर जाण्यास बंदी करण्याचा अधिकार बिहार सरकारनें सिंगभूमच्या डे. कमिशनरास दिला आहे. जमशेटपूर सिंगभूम जिल्ह्यांत आहे.

**लष्करी अधिकारी व प्राप्तीवरील कर**

हिंदी इनकमटॅक्सचा लष्करी अधिकाऱ्यांवर किती बोजा बसतो, ह्याची चौकशी भारतमंत्रि करणार आहेत.

**चेक्सची देवघेव**

मुंबई बँकर्स क्लिअरिंग हाउसमध्यें ९ ऑक्टोबर अखेर संपलेल्या आठवड्यांत चेक्सची खालीलप्रमाणें देवघेव झाली:—

| | |
|---|---|
| चेक्सची संख्या : | १,१४,५८० |
| चेक्सची किंमत : | २१,४८,८१,५७६ रु. |

**अमेरिकेंतील इटालियन**

अमेरिकेंत ६ लक्ष वस्ती करून राहिलेल्या इटालियन लोकांस ह्यापुढें शत्रुपक्षीय समजलें जाईल अशा मजकुराचीं पत्रकें इटली देशावर टाकण्यांत येत आहेत.

**हेसच्या पत्नीची विनंति**

जर्मन पुढारी रुडॉल्फ हेस ह्याच्या पत्नीनें आपल्या पतीस भेटण्याची परवानगी ब्रिटिश सरकारकडे मागितली आहे, अशी बातमी प्रसिद्ध झाली आहे.

**हाँगकाँग**

चीनमधील खास हक्क ग्रेट ब्रिटन सोडून देणार आहे. परंतु हाँगकाँग चीनला परत देण्याचा प्रश्न त्यांत उपस्थित होत नाहीं असें सरकारतर्फे ब्रिटिश कॉमन्स सभेंत सांगण्यांत आलें. हाँगकाँग बेट चीन सरकारच्या अमलाखालीं नाहीं. १८४२ सालापासून हाँगकाँगवर ग्रेट ब्रिटनचा ताबा आहे. तें व्यापाराचें अत्यंत महत्त्वाचें केंद्र आहे. हाँगकाँग बेटाचें क्षेत्रफळ ३२ चौ. मैल असून सबंध वसाहतीचें क्षेत्रफळ ३९० चौ. मैल आहे. सध्या हाँगकाँग जपानच्या ताब्यांत आहे.

**३% १९६३-६५ चें कर्ज**

हिंदुस्थान सरकारनें १९६३-६५ चे ३ टक्क्यांचें १५ कोटि रुपयांचें कर्ज जाहीर केलें होतें. लोकांकडून ३ कोटि, ४१½ लक्ष रुपयांच्या रोख्यांची मागणी आली व उरलेल्या ११ कोटि, ५८½ लक्ष रुपयांचे रोखे रिझर्व्ह बँकेनें घेतले.

**ओ. अँड टी. रेल्वे**

बेंगॉल अँड नॉर्थ वेस्टर्न रेल्वे आणि रोहिलखंड अँड कुमान रेल्वे ह्या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या दोन रेल्वेजचें १ जानेवारी १९४३ रोजीं एकत्रीकरण होऊन त्या दोन्हीं मिळून औध अँड तिरहुट रेल्वे ह्या नांवानें ओळखल्या जातील.

**पांच महिन्यांत ५३½ कोटि रुपये**

जानेवारी ते मे १९४२ ह्या पांच महिन्यांत हिंदुस्थान सरकारचा खर्च त्याच्या उत्पन्नापेक्षा ५३½ कोटि रुपये अधिक झाला. गेल्या वर्षीचा तत्सम आकडा २३½ कोटि रुपये होता.

अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| | पृष्ठ | | पृष्ठ |
| १ विविध माहिती | ... ३३२ | उत्पादन-शत्रुराष्ट्रांच्या जनन संख्येंत घट-महागाईचा प्रतिकार-श्री. काळे ह्यांचा सहकार-विषयक कार्यक्रम | |
| २ चांदीची किंमत विलक्षण चढली | ३३३ | | |
| ३ युद्धखर्च आणि युद्धकर्ज | ३३४ | | |
| ४ स्फुट विचार | ... ३३५ | ५ विचारप्रवर्तक सहकारी बातम्या | ३३६ |
| मालाच्या सहकारी साठवणीस सरकारी सहाय-अमेरिकेचें वाढतें लढाऊ | | ६ सहकारी बँकांचे अहवाल | ३३७ |


# अर्थ

बुधवार, ता. २१ आक्टोबर, १९४२

## चांदीची किंमत विलक्षण चढली

आर्थिक प्रश्नांच्या चर्चेस वाहिलेल्या "एकॉनॉमिस्ट" ह्या प्रसिद्ध साप्ताहिकानें मुंबईच्या सोने-चांदीबाजाराच्या परिस्थिती-संबंधानें खालील उद्गार गेल्या जून अखेरच्या अंकांत काढले होते:—"मुंबईमध्यें चांदीच्या भावांत अलीकडे अगदी बेताची वाढ झाली होती, परंतु चालू आठवड्यांत तिची किंमत दर शंभर तोळ्यांस ८३ रु. ५ आणे इतकी चढली, म्हणजे एका पंधरवड्यांत तिच्यामध्यें ५ रु. ८ आण्याची वाढ झाली. पूर्व एशियांत जपानला गेल्या मार्च महिन्यांत जय मिळाले त्यावेळीं चांदीची खरेदी व साठवण ह्यांचे बाबतींत मोठी धामधूम झाली होती, तिच्याशीं वरील परिस्थितीची तुलना करणें आवश्यक आहे. त्या प्रसंगीं चांदीचा भाव ९० रु. ८ आण्यांपर्यंत वर गेला आणि सोन्यानें ५६ रु. ८ आण्यांची मर्यादा गाठली. चांदीची किंमत १०९ रुपयांपर्यंत जाऊन रुपयाच्या नाण्याची अंगची व दर्शनी किंमत एक होऊन तें वितळणें फायदेशीर होण्याची स्थिति निर्माण होणार कीं काय असेंहि त्यावेळीं वाटावयास लागलें होतें." चांदीचा भाव शंभर तोळ्यांस १०९ रुपये ह्या दरापर्यंत वर जाण्याचा संभव साडेतीन महिन्यांमागें ध्वनित केला होता, ती कल्पना गेल्या आठवड्यांत मुंबईच्या बाजारांत मूर्तस्वरूप धारण करती झाली. सोनें-चांदीचा लंडन व न्यूयॉर्कच्या बाजारांतील भाव आणि त्यांची मुंबईमधील किंमत ह्यांमध्यें नेहमी प्रमाणबद्धता असते आणि तिकडचा भाव कमी-अधिक होईल त्या मानानें ती इकडेहि खाली-वर जाते असा अनुभव आहे. परंतु ही प्रमाणबद्धता सोनें-चांदीची आयात-निर्गत सुरळीत रीतीनें चालू असण्यावर अवलंबून रहाते. परंतु सध्याच्या युद्धपरिस्थितींत लंडन व न्यूयॉर्क येथील चांदीच्या भावांत विशेष बदल न होतांच हिंदुस्थानांत मात्र तो विलक्षण भडकला आहे. "एकॉनॉमिस्ट" पत्रानें असें म्हटलें आहे कीं, गेल्या जून अखेर हिंदुस्थानांत चांदीचा भाव ८३ रुपये होता तेव्हां त्याच्या प्रमाणांत लंडनमधील भाव दर औंसास ३६३/४ पेन्स असावयास पाहिजे होता; पण तो वस्तुतः फक्त २३१/२ पेन्सच होता. तशाच तऱ्हेचा परंतु अतिशय ठळक असा ह्या दोन किंमतींमधला प्रमाण-बद्धतेचा अभाव आज दिसून येत आहे. चांदीला असलेली विशेष मागणी आणि तोकडा पुरवठा हें ह्या परिस्थितीचें मुख्य कारण आहे. सोनें-चांदी ह्या धातूंच्या अंगच्या मोलावरचा जनतेचा विलक्षण विश्वासहि तिला जबाबदार आहे. सट्टेबाजी करणाऱ्या धंदेवाल्यांची कारवाई हेंहि एक कारण येथें प्रभावी नाहीं असें नाहीं. चांदीमध्यें स्वतःची बचत घालण्याची हिंदी जनतेची सवय प्रसिद्धच आहे आणि सध्याच्या परिस्थितीनें तिला विशेष उत्तेजन मिळाल्यासारखें दिसत आहे.

गेल्या महायुद्धांत चांदीची किंमत, रुपयाच्या नाण्याचा प्रसार झपाट्यानें झाल्यामुळें, सारखी वाढत गेली आणि हिंदुस्थान सरकारास चढत्या भावानें ती खरेदी करून टांकसाळींत रुपये पाडावे लागल्यानें त्यानें क्रमाक्रमानें हुंडणावळीचा दर चढवीत नेला. तरीहि पाडलेले नवे रुपये, चांदीस चांगली किंमत येत असल्यानें, व्यवहारांतून तात्काळ नाहींसे होऊं लागले आणि ह्या नाण्याचा एवढा दुष्काळ झाला कीं अमेरिकेहून मुद्दाम नवी चांदी आणवून तिचें नाणें सरकारास पाडावें लागलें. पण टांकसाळींतून नवे रुपये बाहेर पाठवणें चाळणींत पाणी ओतल्यासारखें झालें. ह्या अनुभवापासून योग्य बोध घेऊन चालू युद्धांत सरकारनें विशेष सावधगिरी प्रथमपासूनच बाळगली आहे. हिंदी चलनाची ब्रिटिश पौंडांतली किंमत म्हणजेच हुंडणावळीचा दर स्थिर ठेवण्यांत त्यानें यश संपादलें आहे. चांदी, रुपयाचें नाणें व हुंडणावळ ह्यांचा परस्पर संबंधच त्यानें तोडून टाकला आहे. चांदी कितीहि महागली तरी ह्या चढीच्या भावाचा परिणाम हुंडणावळीप्रमाणें रुपयाच्या नाण्यावर होऊं नये अशी बेमालूम व्यवस्था त्यानें केली आहे. रुपयांत असलेल्या चांदीची किंमत सोळा आण्यांचे-वर गेली कीं त्याचा नाणें म्हणून उपयोग न केला जातां त्यांतली धातूच अधिक मोलवान ठरून नाणीं व्यवहारांतून नाहींशीं होणें स्वाभाविक आहे. हीच अडचण गेल्या महायुद्धांत सरकारास भासली. म्हणून चालू युद्धांत रुपयाचें नाणें साठवण्याचें किंवा वितळवून चांदी म्हणून वापरण्याचें प्रयोजनच कोणास राहूं नये ह्यासाठी सरकारनें ह्या नाण्यांतला शुद्ध चांदीचा अंशच कमी करून टाकला आहे. अलीकडे नव्या पाडण्यांत आलेल्या रुपयांत चांदीचें प्रमाण इतकें थोडें आहे कीं धातूचा तुकडा ह्या नात्यानें त्यास सोळा आण्यांपेक्षा पुष्कळ कमी किंमत यावी अशी ही योजना आहे. पूर्वी रुपयाच्या नाण्यांत अकरा बारांश इतकी शुद्ध चांदी असे; आतां ती निम्म्यापर्यंत खाली आणण्यांत आली आहे. पांचवे आणि सहावे जॉर्ज बादशहा ह्यांच्या मुद्रेचे जुने रुपये सरकार व्यवहारांतून काढून टाकीत असून नवीन तऱ्हेचे, कमी चांदी आंत असलेले, रुपये प्रचलित करीत आहे ह्या गोष्टीचें मर्म वरील विवेचनावरून ध्यानांत येईल. नवीन रुपये सुधारलेल्या बनावटीचे आहेत आणि त्या योगानें खोटीं नाणीं पाडलीं जाणें अशक्य, निदान विशेष कठीण होईल हा त्यांचा फायदा आहेच. तथापि, रुपयाचीं नाणीं संग्रही ठेवण्याचा किंवा वितळवण्याचा मोह कोणासहि होऊं नये अशा बेतानें त्यांतल्या चांदीचें प्रमाण मर्यादित राखून चलनाचा प्रसार व्यवहारांत अबाधित ठेवणें हा जुने रुपये काढून घेऊन त्यांच्या जागीं नवीन प्रकारचे रुपये प्रचलित करणें ह्या सरकारच्या प्रस्तुत चलनविषयक धोरणाचा एकमेव हेतु आहे. नाण्यांसाठीं लागणाऱ्या चांदीचा तुटवडा सरकारला भासत आहे किंवा चांदी जरूरीप्रमाणें त्यास मिळणार नाहीं, असें मुळींच नाहीं. पण जुन्या व पूर्ण प्रमाणांत चांदी आंत

असलेले रुपये पाडण्यांत व प्रचलित करण्यांत फायदा किंवा लोकांची सोय नाहीं. व्यवहारांतलें देवघेवीचें साधन ह्या नात्यानें नवे रुपये जुन्या नाण्यांइतकेच उपयोगी व सोयीचे आहेत आणि रुपया हें चलन आहे, भारी किंमतीच्या धातुचा तुकडा किंवा दागिना नाहीं, हें विसरतां कामा नये.

## युद्धखर्च आणि युद्धकर्ज

[ प्रो. वा. गो. काळे ह्यांचें मुंबई रेडिओवरील भाषण, रेडिओ अधिकाऱ्यांचे कृपेनें प्रसिद्ध करण्यांत येत आहे. ]

हिंदुस्थानची लष्करी तयारी झपाट्यानें पुढें पाऊल टाकीत आली असून त्या देशाची लढाऊ शक्ति शत्रूच्या हल्ल्यांचा प्रतिकार करण्यासच नव्हे तर त्याचेवर चढाई करण्यासहि आतां समर्थ बनली आहे ह्याची माहिती सर सेनापती जनरल वेव्हल ह्यांनीं स्वतः नुकतीच दिली आहे. लष्करी तयारीच्या निरनिराळ्या अंगांची कार्यक्षमता वाढत असल्याची अधिकृत माहितीहि प्रसिद्ध करण्यांत आली आहे. तीवरून सर्व प्रकारचे सैनिक आणि शस्त्रास्त्रें जय्यत तयार ठेवण्यांत आलीं असून हिंदुस्थान देश स्वतःच्या संरक्षणास पूर्णपणें सिद्ध आहे आणि मित्रराष्ट्रांच्या लढाऊ धोरणाचें आशिया खंडांतील मुख्य केंद्र बनला आहे हें स्पष्ट होतें. सध्याच्या जगड्व्याळ युद्धांत यांत्रिक शस्त्रास्त्रांचा उपयोग विलक्षण वाढला आहे हें सुप्रसिद्ध आहे आणि त्या योगानें राष्ट्रांच्या लष्करी खर्चांत अवाढव्य वाढ झाली आहे है दर्शवणारे आकडे वेळोवेळ प्रसिद्ध केले जात आहेत ते युद्धाच्या सांपत्तिक अंगाचें संबंधांत अत्यंत उद्बोधक आहेत. हिंदुस्थानच्या लष्करी तयारीच्या लढाऊ कार्यक्षमतेच्या वाढीबरोबर हिंदी सरकारच्या युद्धखर्चांत वाढ होणें अपरिहार्य आहे हें सांगावयास नको. तथापि, हिंदुस्थानच्या लष्करी खर्चाचे बाबतींत एक महत्त्वाची गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे आणि ती ही आहे कीं, ह्या देशांत येथील सरकारच्या चाललेल्या युद्धखर्चाचा बराच मोठा भाग ब्रिटिश साम्राज्य सरकारनें उचललेला आहे. ह्या कारणानें हिंदी जनतेवर पडणारा लष्करी खर्चाचा बोजा मर्यादित झालेला आहे. हिंदुस्थानच्या स्वतःच्या युद्धविषयक जबाबदारीचा विस्तार झाला असून त्यामुळें येथील सरकारचा लष्करी खर्च वाढणें स्वाभाविक व अपेक्षित आहे. तथापि, ह्या कामींहि लागणाऱ्या खर्चाची वाटणी हिंदुस्थान सरकार व साम्राज्य सरकार ह्यांचे दरम्यान विशिष्ट तत्त्वावर होण्याचें ठरलें आहे. हिंदी फौजेचें यंत्रीकरण होण्यास साम्राज्य सरकारनें द्रव्यसहाय देण्याचें पत्करलें असून त्याप्रमाणें त्याचेकडून खर्चास सहाय मिळत आहे. युद्धक्षेत्राचा विस्तार आणि युद्धाच्या तयारीचा व्याप अलीकडे वाढला असल्यामुळें हिंदुस्थान सरकार करीत असलेल्या लष्करी खर्चाची वांटणी ह्या दोन सरकारांत कशी व्हावी ह्याचा निर्णय लावला जाणें अगत्याचें आहे. साम्राज्य सरकारास युद्धसामुग्री पुरवण्याचें कार्यहि येथील सरकार करीत असून तदर्थ खर्च होणाऱ्या पैशाचा हिशेब होऊन तो त्यास परत मिळण्याची व्यवस्था लावणें ही गोष्ट तशीच महत्वाची आहे. ह्या संबंधांत हिशेबाच्या पद्धतीचे व देण्या-घेण्याचे गुंतागुंतीचे प्रश्न उद्भवणें साहजिक आहे हें सांगण्याचें प्रयोजन नाहीं.

### खर्चाची वांटणी

हे प्रश्न पत्रव्यवहारानें सोडवणें कालावधीचें व अवघड काम असल्यानें ब्रिटिश फडनविशी खात्याच्या अधिकाऱ्यांशीं प्रत्यक्ष विचारविनिमय करून ते निकालांत काढणें अधिक सोइस्कर व श्रेयस्कर होईल ह्या भावनेनें हिंदुस्थान सरकारचे फडनवीस, सर जरेमी रेस्मन इंग्लंडला स्वतः गेले होते. ते परत आल्यावर त्यांच्या लंडनमधील कामगिरीसंबंधानें प्रश्नोत्तरें व विस्तृत चर्चा दिल्ली येथें विधिमंडळांत गेल्या महिन्यांत झाली तीवरून प्रस्तुत विषयास चोहोंबाजूंनीं कसें विशेष महत्त्व देण्यांत येत आहे ह्याची कल्पना येते. हिंदुस्थानच्या संरक्षणासाठी लागणारा तेवढाच लष्करी खर्च ह्या देशाच्या सरकारावर पडावा आणि अमेरिका व इंग्लंड ह्यांचेकडून मिळणारें द्रव्यसहाय ह्या देशाच्या आर्थिक कुवतीस अनुलक्षून दिलें जावें हीं प्रमुख तत्वें युद्धखर्चाच्या सध्याच्या वांटणीच्या मुळाशी आहेत. ह्या तत्वांस धरून होणारा खर्चाचा हिशेब न्याय्य व सरळ आहे ह्या संबंधानें दुमत नाहीं आणि युद्धक्षेत्राचा व लढाऊ तयारीचा जोरानें विस्तार चालला असतांहि हीच व्यवस्था अमलांत राहील असें स्पष्ट आश्वासन सर जरेमी रेस्मन ह्यांनीं दिलें आहे. युद्धाप्रीत्यर्थ खर्ची पडणाऱ्या रकमांची कल्पना त्यांनीं सांगितलेल्या माहितीवरून येण्यासारखी आहे. हिंदुस्थान सरकारचा स्वतःचा आणि ब्रिटिश सरकारासाठी झालेला गेल्या एप्रिल ते ऑगस्ट ह्या पांच महिन्यांच्या मुदतीमधला एकूण खर्च १७४ कोटि रुपये इतका होता. ह्यापैकी फार मोठा भाग ब्रिटिश सरकारासाठी खर्ची पडला आहे. सर्व लष्करी खर्च प्रथम त्या सरकारच्या नांवें टाकण्यांत येतो आणि हिंदुस्थानच्या स्वतःच्या खर्चाचा हिशेब दर महिन्यास होत असतो. हिंदुस्थानांतील फौज, विमानदल व आरमार ह्यांच्या खर्चासाठी ब्रिटिश सरकारचें द्रव्यसहाय मिळत आहे त्याची एकूण रकम चालू वर्षाचे अखेरीस ६० कोटि रुपयांपर्यंत जाईल. अमेरिकेच्या व चीनच्या फौजा ह्या देशांत आहेत, त्यांचा खर्च अमेरिकेच्या व ब्रिटिश सरकारांकडून परस्पर चालतो आणि त्याचा बोजा त्या देशावर पडत नाहीं. हिंदुस्थान सरकारच्या हिशेबांत दाखल होणारा लष्करी खर्च केवळ अंशतःच त्या सरकारच्या पदरचा खर्च समजण्यांत येत असून बाकीचा पुष्कळसा भाग ब्रिटिश सरकारच्या नावें पडत आहे. ह्या पद्धतीच्या हिशेबानें १९३९–४० सालांत ४ कोटि रुपये त्या सरकारच्या नांवें टाकले गेले. १९४०–४१ मध्यें हा आकडा ५२ कोटि रु. झाला. १९४१–४२ च्या दुरुस्त अंदाजपत्रकाप्रमाणें त्या सालांतली रकम १८५ कोटि रुपये भरली असून चालू सालीं म्हणजे १९४२–४३ मध्यें ब्रिटिश सरकारच्या नावें पडणारी रकम ३८७ कोटि रुपयांपर्यंत जाईल असा अंदाज आहे. लष्करी खर्चाच्या सदरांत पडणाऱ्या कोणत्या रकमा ब्रिटिश सरकारच्या नावे टाकावयाच्या हा तपशीलाचा पण महत्वाचा प्रश्न मागें सांगितलेल्या तत्वांवर निकालांत काढण्यांत येत आहे. त्याचेसंबंधांतच हिंदुस्थानच्या मध्यवर्ती विधिमंडळांत गेल्या महिन्यांत चर्चा झाली आणि सर जरेमी रेस्मन ह्यांनीं सरकारच्या वतीनें आश्वासनात्मक स्पष्टीकरण केलें हें पूर्वी सांगितलेंच आहे. पूर्व एशियांत व ब्रह्मदेशांत हिंदुस्थानच्या फौजा लढल्या त्यांचा खर्च ह्या देशावर पडलेला नाहीं ही माहितीहि हिंदी फडनवीसांनीं दिली ती लक्षांत घेण्यासारखी आहे. ( अपूर्ण ).

# स्फुट विचार

### मालाच्या सहकारी साठवणीस सरकारी सहाय

हंगामांत शेतकऱ्यांस आपला तयार माल येईल त्या भावानें विकावा लागून रोख पैसा हातीं येण्याची व्यवस्था करावी लागते ह्याचें कारण त्यांस चांगल्या किंमती येण्याची वाट पहाण्याचें आर्थिक सामर्थ्य नसतें. त्यांचीं देणीं शेतीच्या मोसमांत तुंबलेलीं असतात आणि तीं वेऊन टाकण्याचा लकडा त्यांचे मागें असतो. शेतीच्या मालाच्या तारणावर त्यांस तात्पुरतीं कर्जें मिळण्याची सोय झाल्यास येईल त्या स्वस्त भावानें माल विकावा लागण्याची अडचण दूर होऊं शकते आणि ह्यासाठीच सहकारी विक्री संघ कित्येक ठिकाणीं काढलेले आहेत. माल साठवण्याच्या कामीं येणारी मुख्य अडचण कोठारांची असते. प्रत्येक जिल्ह्यांत सोयीच्या गांवांत कोठारें उपलब्ध झाल्यास सहकारी बँकांच्या सहायानें मालाच्या तात्पुरत्या साठवणीची तरतूद करतां येण्यासारखी आहे. सबब कोठारें बांधण्याच्या कामीं सरकारनें सहाय द्यावें अशी सूचना अनेकवार करण्यांत आलेली आहे. सध्याच्या युद्ध-परिस्थितींत वहातुकीचीं साधनें मर्यादित झाल्यानें मालाच्या साठवणीची आवश्यकता विशेष तीव्रतेनें भासत आहे.* हें लक्षांत घेऊन मुंबई सरकारनें सहकारी पतपेढ्यांस कोठारांसाठी चार टक्के व्याजानें पैसा पुरवण्याचें आपलें धोरण जाहीर केलें आहे ही समाधानाची गोष्ट आहे. मालविक्रीच्या संस्था आणि मल्टिपर्पज सोसायट्या ह्यांस ही मदत आतांपर्यंत देण्यांत येत आहे. ती सवलत आतां सर्व पतपेढ्यांस मिळावयाची आहे. त्यांच्या सभासदांच्या मालाची विक्री सहकारी पद्धतीनें होण्याची आवश्यकता कित्येक वर्षें प्रतिपादली जात आहे, ती युद्ध-परिस्थितीमुळें अधिक निकडीची झाली आहे. ह्या दृष्टीनें पाहतां सरकारनें देऊं केलेल्या विस्तृत सवलतीचा फायदा पद्धतशीर रीतीनें घेतला जाणें अगत्याचें आहे. सहकारी मालविक्रीची व्यवस्था मोठ्या प्रमाणावर केली जाण्यासाठी सहकारी खातें आणि मध्यवर्ती बँका ह्यांनीं संघटित प्रयत्न केले पाहिजेत. शेतकरी कर्जनिवारणाचा कायदा प्रांतांत कांहीं तालुक्यांत प्रयोग म्हणून अंमलांत आणला जात असून त्याचें क्षेत्र क्रमाक्रमानें विस्तृत व्हावयाचें आहे. त्या कामींहि सहकारी मालाची साठवण व विक्री ह्यांचा उपयोग होणार आहे. ह्या सर्व गोष्टी लक्षांत घेतल्या गेल्यास कोठारांच्या पुरवठ्याचें महत्त्व सहकारी संस्था व कार्यकर्ते ह्यांस पटल्यावांचून रहाणार नाहीं.

---

### अमेरिकेचें वाढतें लढाऊ उत्पादन

स्टालिनग्राड व कॉकेशस ह्या रणांगणांवर मूळच्या योजनेप्रमाणें जर्मन सैन्यास यश आलें नाहीं, एवढेंच नव्हे तर रशियन फौजांनीं त्यास मागें हटवण्याचा उपक्रम उलट हल्ले चढवून केला आहे हें पाहून हिटलरचें डोकें फिरलें असल्यास आश्चर्य नाहीं. टिमोशेंको ह्यांनीं अतुल पराक्रम करून हिटलरचे लष्करी बेत हाणून पाडले आहेत. ग्रॉझनेच्या तेलाच्या विहिरीकडची जर्मनांची प्रगति कुंठित झाली आहे आणि काळ्या समुद्राच्या उत्तर किनाऱ्याकडची पूर्व बाजूची चालहि थांबली आहे. हिंवाळा चालू होण्यापूर्वी विशिष्ट प्रदेश काबीज करून रशियाची कंबर मोडून टाकण्याची जर्मनीची मनीषा एकीकडे विफल झाली असतां त्याचे विरुद्ध दुसऱ्या बाजूस नवी आघाडी सुरू करण्याची मित्र-राष्ट्रांची तयारी झपाट्यानें चालली आहे. ही आघाडी कोठें व केव्हां सुरू होईल हें आज अर्थातच गुपित असणें स्वाभाविक आहे. तथापि येथें हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं जर्मनीचें रशियन मोहिमेमुळें भयंकर नुकसान होऊन त्याची लढाऊ शक्ति घटली आहे, ह्याचवेळीं मित्र राष्ट्रांचें बळ सारखें वाढत आहे. युद्धसामुग्रीचें उत्पादन अमेरिकेंत केवढ्या मोठ्या प्रमाणांत होत आहे ह्याची माहिती प्रसिद्ध झाली आहे ती प्रस्तुत बाबतींत उद्बोधक आहे. दर महिन्यास पांच हजार लढाऊ विमानें तयार व्हावीं असा संकल्प प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांनीं केला आहे आणि चार हजार विमानांची दर महिन्याची मजल आतां गाठण्यांत आलीच आहे. सुधारलेलीं व मोठ्या आकाराचीं विमानें बनवण्याचा प्रयत्न चालला असल्यानें त्यांच्या उत्पादनाची प्रगति थोडी कमी झाल्यासारखी दिसत आहे. जर्मनी व जपान यांच्या एकूण लढाऊ उत्पादनापेक्षा अमेरिकेच्या उत्पादनाचें प्रमाण अधिक होणार आहे ही येथें महत्त्वाची गोष्ट आहे. लढाऊ व व्यापारी जहाजें बांधण्याचे कामीं तर अमेरिकेनें उच्चांक गाठला आहे. येत्या सालीं अमेरिकन सैनिकांच्या संख्येंत बत्तीस लक्ष लोकांची भर पडून एकूण संख्या पंचाहत्तर लक्ष होणार आहे. ह्या रीतीनें मित्र राष्ट्रांची युद्धसिद्धता येत्या वर्षीं अत्यंत समाधानकारक होऊन त्यास जर्मनीविरुद्ध चढाईचें धोरण स्वीकारतां येईल.

---

### शत्रुराष्ट्रांच्या जननसंख्येंत घट

राष्ट्रसंघाच्या आकडेवजा माहिती देणाऱ्या मासिकांत कांहीं महिन्यांमागें जनन-मरणाविषयींचे जर्मनी, फ्रान्स व इटली ह्या देशांच्या संबंधांतले तुलनात्मक आकडे प्रसिद्ध झाले होते, त्यावरून शत्रु-राष्ट्रांत जननाचें प्रमाण अलीकडे उतरलें असल्याचें दिसून येतें. जननाच्या प्रमाणांत घट होण्याचा संबंध युद्धपरिस्थितीशीं असणें स्वाभाविक आहे. विवाहांस उत्तेजन देऊन जननसंख्या वाढवण्याच्या नात्सी व फॅसिस्ट सरकारांच्या धोरणास यश मिळण्याच्या मार्गांत अडचणीहि आल्या असल्या पाहिजेत हें उघड आहे. १९४१ सालीं अमेरिकेंत जननसंख्या वाढली पण जर्मनींत ८ टक्क्यांनीं ती कमी झाली आणि इटलींत घटीचें प्रमाण ११ टक्क्यांनीं उतरलें. ग्रेट ब्रिटनमध्यें जननांत फक्त २ टक्क्यांची घट झाली. ऑस्ट्रिया वगळून बाकीच्या जर्मन देशांत १९३३ मध्यें ९ लक्ष, ७१ हजार जन्म झाले होते आणि त्यांची संख्या क्रमाक्रमानें वाढत जाऊन ती १९४० सालीं १४ लक्ष झाली. ऑस्ट्रिया, डॅन्झिग व मेमेल धरून जर्मनींत १९४० मध्यें १६ लक्ष ४५ हजार जन्म झाले आणि ही संख्या १९४१ सालीं १५ लक्ष २८ हजारांवर घसरली. लोकांस विवाहास उत्तेजन म्हणून ऑगस्ट १९३३ ते डिसेंबर १९४१ ह्या अवधींत एकूण १८ लक्ष सरकारी कर्जें देण्यांत आलीं. ह्यांचा परिणाम १९३९ अखेर व १९४० चे प्रारंभीं विवाहांच्या वाढलेल्या संख्येंत दिसून आला. १९४१ च्या पहिल्या तिमाहीचे फ्रान्सचे जनन-मरणाचे आकडे पाहिले असतां असें दिसून येतें कीं, त्या देशांत जननास ओहोटी लागून मृत्यूंस भरती आली आहे. फ्रान्समध्यें मृत्यूंच्या मानानें जन्म अधिक होत नसल्यानें त्यास अगोदरच मृतराष्ट्र अशी संज्ञा प्राप्त झालेली आहे आणि अलीकडे ही प्रवृत्ति दृढ होत आहे असें आकड्यांवरून दिसतें. १९४० मध्यें

फ्रान्सच्या ८७ जिल्ह्यांत मिळून जननापेक्षा २ लक्ष अधिक मृत्यू झाले. लोकसंख्येस लागलेली ही ओहोटी युद्ध वर्षे सारखी चाललेली आहे. १९४१ सालच्या पहिल्या तिमाहींत फ्रान्समध्यें जन्मापेक्षा ९१ हजार अधिक मृत्यू झाले! मृत्यूविषयींच्या वरील आकड्यांत सैनिकांचा अंतर्भाव केलेला नाहीं हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

---

### महागाईचा प्रतिकार

युद्धकाळांत लष्करी खर्च प्रचंड प्रमाणावर चालतो. त्याचे योगानें मजुरी, पगार इत्यादि स्वरूपांतील प्राप्तीच्या द्वारें जनतेच्या हातांत अधिक चलन म्हणजे जिन्नस विकत घेण्याचें साधन येऊं लागतें. दुसऱ्या बाजूनें, विकत मिळावयाच्या वस्तूंचा पुरवठा युद्धपरिस्थितीमुळेंच मर्यादित होत असतो. म्हणजे वाढती मागणी व कमी होणारा पुरवठा असा प्रकार होऊन पदार्थांच्या किंमती चढतात. ही महागाई होणें म्हणजेच पैशाचें मोल उतरणें होय. युद्धकाळांत चढती महागाई ही मोठी आपत्ति समजली जाते ह्याचें कारण तिच्या योगानें मजुरी व उत्पादनखर्च ह्यांत वाढ करावी लागून सर्व आर्थिक परिस्थिति भयंकर खर्चाची होऊन आटोक्याचे बाहेर जाते हें होय. चलनाच्या बेसुमार वाढीचा व महागाईचा प्रतिकार करण्यासाठी प्रेसिडेंट रूझव्हेल्ट ह्यांच्या निर्वाणीच्या सूचनेवरून अमेरिकन विधिमंडळानें कडक निर्बंधाचे कायदे नुकतेच केले आहेत. इंग्लंडमध्यें जनतेनें स्वतःच्या खर्चांत बचत करणें आणि मजुरीच्या दरांतली वाढ मर्यादित ठेवणें इत्यादि बाबतींत राष्ट्राचें सहकार्य यशस्वी रीतीनें सरकारशी होत असल्याचें ब्रिटिश फडनवीस सर किंग्स्ले वुड ह्यांनीं कॉमन्स सभेंत आश्वासन दिलें. कर, सरकारी कर्जें व विविध नियंत्रणें पुरीं न पडल्यास अधिक कडक उपाय अंमलांत आणण्याचा विचार सरकारास करावा लागेल असें ते म्हणाले. हिंदुस्थान सरकारचे फडनवीस, सर जेरेमी रेसमन, ह्यांस प्रस्तुत विषयासंबंधीचा प्रश्न मध्यवर्ती असेंब्लींत विचारण्यांत आला असतां करांच्या व कर्जांच्या मार्गांनीं हिंदी जनतेजवळचीं क्रयसाधनें मर्यादित करण्यांत येत असून बाजारभावांवर नियंत्रणेंहि चालण्यांत आलीं आहेत ह्या कारणानें महागाईची व चलनाच्या वाढीची परिस्थिति आटोक्यांत ठेवणें पुष्कळसें शक्य झालें आहे आणि अन्न सामुग्रीचा पुरवठा वाढवण्याचे प्रयत्न प्रांतिक सरकारांच्या सहकार्यानें चालले आहेत त्यांचाहि उपयोग होण्यासारखा आहे असें त्यांनीं सांगितलें. युद्धखर्च, वाढतें चलन, महागाई, सरकारी कर्जें, बाजारभावांचें नियंत्रण, उत्पादनाचा विस्तार व जनतेची काटकसर ह्यांचे परस्पर संबंध किती निकट व गुंतागुंतीचे आहेत ह्याची प्रस्तुत विवेचनावरून कल्पना येईल. तसेंच उत्पादन, पुरवठा, बचत, भावनियंत्रण व सरकारी गुंतवण ह्यांची युद्धपरिस्थितींत एकाच वेळीं सांगड सहकार्यानें घातली जाण्याचें महत्त्व ध्यानांत येईल.

---

### जळगांवांत प्रो. काळे ह्यांचा सहकारविषयक कार्यक्रम

जळगांव येथें जिल्हा सहकारी बँकेच्या निमंत्रणावरून प्रो. काळे ह्यांनीं तेथील आपल्या मुक्कामांत त्या संस्थेस चालू महिन्याच्या ११ तारखेस भेट दिली. त्यावेळीं बँकेचे स्थानिक डायरेक्टर व इतर निमंत्रित संबंधी उपस्थित होते. पूर्व खानदेश सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँकेनें अलीकडे केलेली समाधानकारक प्रगति व तिच्या पुढचे निरनिराळे प्रश्न ह्यांची प्रो. काळे ह्यांनीं डायरेक्टरांशीं चर्चा केली. श्री. ब. ग्या. देशमुख बँकेचे चेअरमन आणि श्री. आर. वाय. सोनवणे मॅनेजिंग डायरेक्टर आहेत. शेतीच्या मालाची विक्री व पतपेढ्यांच्या सभासदांसाठी लागणाऱ्या मालाची खरेदी ह्यांच्या व्यवस्थेकडे बँक सध्या विशेष लक्ष पुरवीत आहे आणि तिची सांपत्तिक स्थिति मजबूत आहे. ह्या संबंधांत प्रो. काळे ह्यांनीं संस्थेच्या चालकांचें अभिनंदन करून कित्येक महत्त्वाच्या बाबतींत विधायक सूचना केल्या. पूर्व खानदेश मराठा विद्याप्रसारक को. समाज ही संस्था जळगांवांत उपयुक्त शैक्षणिक कार्य करीत आहे. प्राथमिक शिक्षकांसाठीं ट्रेनिंग कॉलेजचा उपक्रम तिनें अलीकडे केला आहे. संस्थेचे सेक्रेटरी श्री. केशवराव पाटील ह्यांच्या निमंत्रणावरून प्रो. काळे ह्यांनीं ट्रेनिंग कॉलेजास भेट देऊन विद्यार्थ्यांस उद्देशून भाषण केलें. श्री. ग. ह. पाटील हे कॉलेजचे प्रिन्सिपॉल आहेत आणि ते व इतर शिक्षक उत्साहानें कार्य करीत असल्याविषयीं प्रो. काळे ह्यांनीं समाधान व्यक्त केलें. मराठा विद्याप्रसारक समाजाची घटना सहकारी पद्धतीची आहे हें विशेष आहे.

---

## विचारप्रवर्तक सहकारी बातम्या

(ले. श्री. बा. चिं. भानु)

साखर आणि रॉकेल या दोन आवश्यक पदार्थांची विलक्षण चणचण भासूं लागल्यानें व व्यापारी वर्गानें नफा उकळण्याची ही एक पर्वणीच आलेली आहे असें समजून या पदार्थांचे भाव कल्पनातीत चढविल्यानें सरकारला मध्यस्थी करणें भाग पडलें व या पदार्थांच्या किंमती नियंत्रित कराव्या लागल्या. साखर आणि रॉकेल यांची विक्री करण्यास सरकारनें लायसेन्स देण्याची पद्धति अमलांत आणली. पण यामुळें सर्वसामान्य गिऱ्हाइकांची एकच गर्दी लायसन्सदार दुकानांवर होऊं लागली.

* * *

या आपत्तींतून मार्ग काढण्यास सहकारी भांडारें (स्टोअर्स) किंवा तत्सम संस्थांना या पदार्थांची विक्री करण्याची लायसन्स सरकारनें दिलीं आहेत. लायसन्स मिळतात म्हणून नवीन नवीन सहकारी खरेदी-विक्रीच्या संस्था रजिस्टर होण्यासाठी भराभर सहकारी खात्याकडे जाऊं लागल्या आहेत. वाईटांतून पुष्कळदां चांगलें निघतें तें हें असें. मुंबई प्रांतांत अशा खरेदीविक्रीच्या सोसायट्या प्रायः कमीच होत्या व ज्या स्थापन झालेल्या होत्या त्यांचा व्यवहार अगदींच सामान्य असे. पण आतां हीं रॉकेल आणि साखर यांची चणचण भासूं लागतांच या सोसायट्यांचे सभासद खडबडून जागे झाले आहेत व सहकारी तत्त्वावर घाऊक माल खरेदी करून तो सभासदांस पुरविण्याची व्यवस्था करूं पहात आहेत.

* * *

ज्या संस्थांमार्फत हा व्यवहार सुरू झाला आहे तेथें मनुष्यस्वभावानुसार कांहीं गटांचीच केवळ सोय लावून घेण्याचा प्रयत्न झाल्यास सहकारी चळवळीच्या आरंभींच्या काळांत शेतकी पतपेढ्यांचे बाबत आलेल्या अनुभवाची पुनरावृत्ति व्हावयाची!

* * *

असे खरेदीविक्रीचे संघ स्थापन करणारांवर व त्यांत सामील होणारांवर नैतिक जबाबदारी किती असते व सहकार म्हणजे चार स्वार्थ साधूंचा स्वाहाकार नव्हे याची जाणीव म्हणजेच सहकारी सात्त्विकतेची जाणीव जोंपर्यंत दिसून येत नाहीं तोंपर्यंत सहकारितेचीं गोड फळें चाखावयास मिळणार नाहींत.

# सहकारी बँकांचे अहवाल

### मराठा मार्केट पीपल्स को. बँक लि., मुंबई

वरील बँकेच्या सभासदांची संख्या ६८४ असून त्यांनीं २४,५१० रुपयांचे भाग घेतलेले आहेत. रिझर्व्ह फंड ४,७५७ रुपयांचा असून इतर फंडांत १,८८५ रुपये आहेत. ठेवींचा आकडा पावणे दोन लक्ष रुपये झाला आहे. बँकेनें १८३/४ हजार रुपये रोख व इतर बँकांत ठेवले असून सरकारी रोखे, डिबेंचर्स, इत्यादींत तिनें १ लक्ष, ४१ हजार रुपये गुंतविले आहेत. एकूण कर्ज येणें ४०१/२ हजार रुपये आहे. अहवालाचे वर्षी ३१२ सभासदांनीं ९४,४९० रुपयांचें कर्ज नेलें. गेल्या वर्षापेक्षा हा आकडा १८१/२ हजारांनीं लहान आहे. अहवालाचे वर्षी बँकेस ३१९६ रुपये नफा झाला. भागीदारांस ३% डिव्हिडंड देण्यांत आलें. श्री. भास्करराव जाधव हे सल्लागारमंडळाचे अध्यक्ष असून श्री. खंडेराव दौंडकर, एम. ए., एलएल. बी. हे डायरेक्टर बोर्डाचे अध्यक्ष आहेत. श्री. स. शि. खैरे हे मॅ. डायरेक्टर आहेत.

---

### भुसावळ पीपल्स को. बँक लि., भुसावळ

३० जून असेर वरील बँकेच्या पटावर ५९३ सभासद असून त्यांचें शेअर भांडवल ७५ हजार रुपये आहे. बँकेच्या रिझर्व्ह व इतर फंडांत ८६१/२ हजार रुपये आहेत. बँकेकडील ठेवींचा आकडा ६ लक्ष, ५७ हजार रुपये आहे. बँकेनें रोख व इतर बँकांत मिळून ४ लक्ष, ६८ हजार रुपये ठेवले असून १ लक्ष १६ हजारांची तिची इन्व्हेस्टमेंट आहे. एकूण कर्जाचा आकडा १ लक्ष, ९४ हजार रुपये असून दोन महिन्यांवरील थकबाकी १५·९९% आहे. खेळत्या भांडवलाशीं कर्जाचें प्रमाण २१·१५% पडतें. अहवालाचे वर्षी बँकेस १०,९१९ रुपये नफा झाला. भागीदारांस ६% डिव्हिडंड मिळालें. श्री. हरि सदाशिव खरे हे बँकेचे चेअरमन असून श्री. जिनाभाई जी. देसाई हे मॅनेजर आहेत.

---

### महाड को. अर्बन बँक लि.

वरील बँकेच्या २९४ सभासदांनीं २५ हजार रुपयांचे भाग घेतलेले आहेत. रिझर्व्ह फंडांत ३,३४२ रुपये असून इतर फंड २०५० रुपयांचे आहेत. ठेवींचा आकडा १ लाखानें वाढून तो २,४०,५०० रुपये इतका झाला आहे. बँकेचा व्यवहारहि गेल्या सालाचे मानानें दुप्पट झाला आहे. बँकेचे २ लक्ष, २४ हजार रुपये रोख व इतर बँकांत ठेव म्हणून आहेत. ३२ हजारांचे रोखे आहेत व कर्जखातीं फक्त २७१/२ हजार रुपये आहेत. वर्षअखेर निवळ नफा ३,४४० रुपये झाला. भागीदारांस ५% डिव्हिडंड मिळालें. श्री. द. न. वैद्य, बी. ए., एलएल. बी. हे बँकेचे चेअरमन असून श्री. पी. गो. मेहता, बी. ए., एलएल. बी. हे ऑनररी मॅ. डायरेक्टर आहेत.

---

### मुधोळ सें. को. बँक लि.

वरील बँकेची महालिंगपूर येथें शाखा उघडण्याचा समारंभ श्री. मा. रीजंट राणीसाहेब ह्यांचे हस्तें विजयादशमीच्या मुहूर्तावर ता. १८ रोजीं झाला.


## दि बँक ऑफ इंडिया लि.

(स्थापना : १९०६)

अधिकृत भांडवल ... ... ... रु. २,००,००,०००
वसूल झालेलें भांडवल ... ... रु. १,००,००,०००
रिझर्व्ह फंड ... ... रु. १,१०,५०,०००

मुख्य कचेरी : ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

मुंबईमधील शाखा : बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

इतर शाखा : अहमदाबाद (भद्र, मुख्य ऑफिस), अहमदाबाद (एलिस ब्रिज शाखा), अहमदाबाद (स्टेशन शाखा), अंधेरी (मुंबई शेजारीं), बांद्रे (मुंबई शेजारीं), कलकत्ता (क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर, कराची, नागपूर (किंग्जवे), नागपूर (इतवारी बझार), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत.

लंडन एजन्ट्स : वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

डायरेक्टर्स : सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई, सर जोसेफ के. नाईट, मि. ए. गेडिस, सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई., मि. दिनशा के. दाजी, श्री. रामनिवास रामनारायण.

**करंट डिपॉझिट अकाउंट्स :**

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर १/२% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही असेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षा कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमीचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

एजंट—टी. आर. लालवाणी.

---

## दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

हेड ऑफिस : पुणें शहर.
स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.
मुंबअी शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबअी.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | : रु. १०,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | : रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | : रु. ५,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | : रु. २,४८,९८० |
| एकूण खेळतें भांडवल | : रु. ४०,००,००० |

**डायरेक्टर्स**

| | |
|---|---|
| प्रो. वा. गो. काळे, अध्यक्ष | श्री. मा. म. गुणे |
| श्री. धों. कृ. साठे | श्री. मा. रा. जोशी |
| श्री. न. ग. पवार | श्री. श्री. गो. मराठे |
| श्री. त्र्यं. वि. रानडे | श्री. र. चिं. सोहोनी |
| श्री. बा. पुं. बर्वे | मि. फ. दो. पदमजी |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदीविक्री कसोशीनें करून दिली जाते.

म. वि. मोखले
मॅनेजर.

## अर्थशास्त्र

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे

पृष्ठसंख्या सुमारें ३००, किंमत ३ रुपये

या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

## श्रीराम सिल्क मिल्स लि., बंगलोर

[ कंपनीनें १९४१ अखेर ६ टक्के डिव्हिडंड वांटला आहे. ]

युद्धसाहित्यपुरवठा–खात्याची पॅरेशूटकरितां लागणाऱ्या

रेशमी कापडाची ऑर्डर पुरी करण्यासाठी लागणाऱ्या भांडवलाकरितां तूर्त एकूण रु. १ लक्षाच्या रकमेपर्यंत

**ठेवी घेणें आहेत**

व्याजाचा दर ४॥ ते ६ टक्के. ठेव किमान रु. ५०० ची असावी. ठेवीवरील व्याज दर सहा महिन्यांनीं दिलें जातें.

श्रीराम सिल्क मिल्स लि.,
श्रीरामबाग,
बसवनगुडी, बंगलोर.

नारायण गोविंद नाईक,
( माजी अध्यक्ष, म्हैसूर चेंबर ऑफ कॉमर्स ) मॅनेजिंग डायरेक्टर

आमच्या कारखान्यांतील माल मुंबईस बॉम्बे स्वदेशी को–ऑपरेटिव्ह स्टोअर्समध्यें व पुण्यास लक्ष्मी रोडवरील रे न्यूझिअमच्या व्यापार–संवर्धन–गृहांत पहा.



## मधुमेहावरील औषध

तीन आठवड्यांचे औषधास फक्त रु. ७

— मागविण्याचा पत्ता —

मॅनेजिंग डायरेक्टर, रूरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड.

९२३ ए, सदाशिव, पुणें २.

## वक्तशीर आणि मनपसंत काम करून देणारे

## मोहन वॉच कंपनी

रेग्युलेशन मोफत

कॉमनवेल्थ बिल्डिंगसमोर लक्ष्मी रोड, पुणें २.

## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

राहाणेची व भोजनाची उत्तम सोय




फोन नं. ७७९ गणपति चौक, व्यवस्थापक

## N. V. WADNERKAR

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver, Electro-plater & Manufacturer of Sporting Trophies, Medals, Cups etc.

- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -

POONA CITY.

## DECCAN BOOK STALL

Booksellers, Publishers & Subscription Agents

Fergusson College Road, Poona No. 4

(1) We stock and supply Educational books, General books & Library books.

(2) We supply Government of Bombay and Government of India publications.

(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.

(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनी छापिलें व
रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनी 'दुर्गाधिगम,' भांबुर्डा, घ. नं. १२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ८ पुणें, बुधवार, तारीख ४ नोव्हेंबर १९४२ अंक ४४

## विमेदार नि हवाई हल्ला

शत्रु राष्ट्राकडून हवाई हल्ला अगर तत्सम उपद्रव यापासून बिनलढाऊ नागरिकांच्या जीविताला येणाऱ्या धोक्याचा समावेश विमा पॉलिसीच्या अटींत होतो काय व त्यासाठी जादा प्रिमिअम भरावा लागेल काय ! असा प्रश्न साहजिकच नागरिकांमध्यें चर्चिला जात आहे.

## ट्रस्ट ऑफ इंडिया

विमा कंपनीच्या
विमा पॉलिसीमध्यें हवाई हल्ल्यामुळें जीविताला होणाऱ्या अपायाचा अंतर्भाव होतो त्याकरितां जादा प्रिमिअम नाहीं.

तरी विलंब न लावतां—
तुमचा नि तुमच्या आप्तेष्टांचा विमा

## ट्रस्ट ऑफ इंडिया

विमा कंपनींतच उतरा.

अध्यक्षः—श्रीमंत सरदार जगन्नाथ महाराज पंडित
माहितीपत्रकें विनामूल्य पाठवूं

ट्रस्ट ऑफ इंडिया विमा कं. लि.
लक्ष्मी रोड, पुणें २

वि. ह. देशमुख, बी. ए.
जनरल मॅनेजर

## महायुद्ध दाराशीं आलें
परदेशी औषधें
दुर्मिळ व महाग झालीं

पण

भिण्याचें कारण नाहीं !!!

— कारण —

## आयुर्वेद रसशाळा पुणें लि०

या देशी औषधाच्या प्रसिद्ध कारखान्यानें तयार केलेलीं

- रक्तवर्धक,
- उपनाह,
- बालजीवन,
- कॅल्सीप्राल

इत्यादि पेटंट, स्टँडर्ड व लोकप्रिय औषधें खात्री पटल्यामुळें

★ डॉक्टर्सहि वापरूं लागले आहेत. ★

दरसाल बिनचूक नफा वाटणाऱ्या ह्या कंपनीचे शेअर्स व औषधें मागवा.

## आयुर्वेद रसशाळा पुणें लि०

मुख्य दुकान गणपति चौक, लक्ष्मीरोड, पुणें २.

महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर

# महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

## विविध माहिती

### बँकांस सुट्टी

शनिवार ता. ७ व सोमवार ता. ९ रोजीं दिवाळीनिमित्त बँका बंद राहातील.

### प्रांतिक सहकारी बँकेची नाशिक शाखा

मुंबई प्रांतिक सहकारी बँकेच्या नाशिक येथील शाखेचें उद्घाटन ता. ९ नोव्हेंबर रोजीं होणार आहे, असें समजतें.

### ट्रेझरी बिलांवर १० आ. ३ पै व्याजाचा दर

रिझर्व्ह बँकेनें गेल्या आठवड्यांत हिंदुस्थान सरकारचीं ८कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. १० आ. ३ पै इतका पडला.

### जर्मनीची प्रचंड हानि

ऑगस्ट, १९४२ अखेर ४० लक्ष जर्मन सैनिक मृत अथवा जखमी होऊन कामास आले आहेत असें झेकोस्लोव्हाकियाचे अध्यक्ष डॉ. बेनेश हे आपल्या रेडिओवरील भाषणांत नुकतेच म्हणाले.

### चीनमध्यें हिंदुस्थान सरकारच्या प्रसिद्धिखात्याची व्यवस्था

हिंदुस्थान सरकारच्या चीनमधील प्रसिद्धीची नीट व्यवस्था करण्यासाठी मि. जे. नटराजन ह्यांची हिंदुस्थान सरकारनें योजना केली आहे.

### ऑस्ट्रेलियांतील अमेरिकन नागरिक

अठरा ते साठ वर्षांच्या मधील वयाच्या ऑस्ट्रेलियांतील अमेरिकनांनीं ऑस्ट्रेलियन नागरिकांच्या लष्करांत आपलें नांव नोंदलें पाहिजे. परंतु त्यांनीं राजनिष्ठेची शपथ घेतली नाहीं तरी चालतें.

### कुंपण मोडून दारूगोळा करणार

लंडनमधील रशियन वकिलाती भोंवतालचें लोखंडी कुंपण मोडून तें ब्रिटिश सरकारास देण्यांत यावयाचें आहे. त्याचा उपयोग दारूगोळा करण्याकडे होईल.

### पेट्रोलचा पुरवठा आणखी कमी होणार

पेट्रोलचा खासगी वापरासाठी पुरवठा आणखी कमी केला जाईल, असें मुंबई सरकारनें जाहीर केलें आहे. जिल्ह्यांतील बस सर्व्हिसवाल्यांनीं आपल्या गाड्यांस गॅस प्लँट लावून घ्यावें, असा सरकारचा सल्ला आहे.

### कुराणाचें चिनी भाषांतर

कुराणाचें चिनी भाषांतर करण्याचें काम चालू आहे.

### फोर्ड रबर कारखाना रशियाकडे पाठविणार

डेट्रॉइट येथील फोर्ड मोटार कंपनीचा रबर टायरचा कारखाना अमेरिकन सरकार विकत घेणार आहे. कारखान्यांतील यंत्रें खोलून व पॅक करून तीं रशियाकडे पाठविण्यांत येतील व तेथें तीं उभारण्यांत येतील. 'लंड-उधार' योजनेप्रमाणें हा कारखाना अमेरिकेस देण्यांत येईल.

### रस्त्यांवरील अपघातांत मृत्यु

सप्टेंबर, १९४२ मध्यें ग्रेट ब्रिटनमध्यें रस्त्यांवरील अपघातांत जितके लोक मेले तितके कमी चालू युद्धास प्रारंभ झाल्यानंतरच्या कोणत्याहि सप्टेंबरांत मेले नव्हते. गेल्या महिन्यांत रस्त्यावरील अपघातांत ५५३ लोक मरण पावले.

### रेडिओ अधिकारी व व्यापारी ह्यांचें सहकार्य

रेडिओच्या व्यापाऱ्यांना आपल्या गिऱ्हाइकांच्या आवडी-निवडी चांगल्या समजतात; तेव्हां ऑल इंडिया रेडिओच्या अधिकाऱ्यांनीं व्यापाऱ्यांशीं अधिक सहकार्य करावें म्हणजे रेडिओची लोकप्रियता आणखी वाढवितां येईल, असें ऑल इंडिया रेडिओ मर्चंटस असोसिएशनचे सेक्रेटरी, श्री. सिताराम, हे आपल्या एका भाषणांत नुकतेच म्हणाले.

### जनरल मॅकआर्थरची कर्जरोख्यांची खरेदी

जनरल डग्लस मॅकआर्थरनें ऑस्ट्रेलियाच्या मुख्य प्रधानांचे समवेत मेलबोर्न येथील बँकेंत जाऊन ३२४८ डॉलर्सचे ऑस्ट्रेलियन युद्धकर्जाचे रोखे विकत घेतले. ह्या रोख्यांवरील व्याज मुद्दलांतच जमा करण्यांत यावयाचें आहे.

### मोटारगाड्यांचा सक्तीनें विमा

मोटार व्हेइकल्स ॲक्टाच्या तिसऱ्या कलमानें मोटारगाड्यांचा थर्ड पार्टी विमा उतरण्याची सक्ति करण्यांत आली आहे. ह्या कलमाची अंमलबजावणी १ जुलै, १९४३ पासून व्हावयाची होती, परंतु सध्याच्या विशिष्ट परिस्थितींत ती तीन वर्षे तहकूब करण्यांत येईल, असें समजतें.

### कॅल्शियम कार्बाइड

हिंदुस्थानांत युद्धप्रयत्नांस मदत ह्या दृष्टीनें कॅल्शियम कार्बाइडचें उत्पादन होणें आवश्यक आहे. कॅल्शियम कार्बाइडचें उत्पादन करणारांस युद्धसमाप्तीनंतर बाहेरील घातुक स्पर्धेपासून संरक्षण मिळेल, असें हिंदुस्थान सरकारनें जाहीर केलें आहे.

### कागदाची बचत करा

दररोज सायंकाळीं रद्दी कागद टाकण्याच्या टोपल्या तपासून पहाव्या व त्यांतील उपयुक्त चिठोरीं पुन वापरण्यास घ्यावींत; जुनीं दुसरें वरचेवर चाळून त्यांतील कागद वापरण्यास घ्यावा; कोणताहि कागद जाळून टाकूं नये; डायऱ्या, कॅटलॉग, कॅलेंडरें काढूं नयेत; वापरलेलीं पाकिटें त्यांवर लेबलें लावून पुनः वापरावींत, इत्यादि सूचना बंगाल चेंबर ऑफ कॉमर्सनें आपल्या सभासद-संस्थांस एक पत्रक काढून केल्या आहेत. ह्यापुढें कागद मिळणें आणखी दुरापास्त होत जाईल, असें चेंबरचें म्हणणें आहे. बेंगॉल चेंबर ही युरोपिअन व्यापाऱ्यांची संस्था आहे.

### मुंबई प्रांतांतील कामगार संघ

मुंबई प्रांतांतील ट्रेड युनियन्सच्या सभासदांची संख्या ३१ मार्च १९४१ रोजीं १,४१,५७८ भरली. म्हणजे त्यापूर्वीच्या १२ महिन्यांत त्यांचे संख्येंत ६·८७% वाढ झाली. एकूण २६ संघांत मिळून ७,०८९ स्त्री कामगार सभासद होते.

### विम्याची माफी करण्यासंबंधीं विनंति

कलकत्ता कॉर्पोरेशननें आपल्या मालकीची २½ कोटि रुपये किंमतीची मालमत्ता व यंत्रसामुग्री ह्यांचा ऑर्डिनन्सबरहुकूम विमा उतरला नाहीं. ह्या विम्याचा हप्ता ११ लक्ष रुपये होतो. विमा न उतरल्याबद्दल सरकारनें कॉर्पोरेशनवर नोटीस बजावली आहे. आपणांस विम्याची माफी असावी, अशी विनंति कॉर्पोरेशननें सरकारास केली आहे तीसंबंधीं सरकारचा निर्णय कळेपर्यंत कॉर्पोरेशनाविरुद्ध सरकारनें कायदेशीर इलाज करूं नये अशी तिनें सरकारास विनंति केली आहे. ही मान्य न झाल्यास, प्रांतिक सरकारनें विम्याच्या हप्त्यांचा बोजा स्वीकारावा, असें कॉर्पोरेशनचें म्हणणें आहे.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | ३४८ |
| २ मित्रराष्ट्रांस अमेरिकेचें सहाय ... ... | ३४९ |
| ३ हिंदुस्थानांतील लोकसंख्येचा प्रश्न ... | ३५० |
| ४ हिंदी तांदुळाची सिलोनला निर्गत ... | ३५० |
| ५ स्फुट विचार ... | ३५१ |
| साखरेचें नियंत्रण आणि पुरवठा-नियंत्रण दूर होण्याविषयीं मागणी-नियंत्रणाचें समर्थन-ब्रिटिश विमानांचे जर्मनीवर हल्ले | |
| ६ नाशिक जिल्ह्यांतील पतपेढ्यांचें पुनरुज्जीवन | ३५२ |


# अर्थ

बुधवार, ता. ४ नोव्हेंबर, १९४२

## मित्रराष्ट्रांस अमेरिकेचें सहाय

### इंग्लंडमध्यें अमेरिकन अन्नसामुग्री

केवळ स्वतःच्याच नव्हे तर सर्व मित्रराष्ट्रांच्या लढाऊ उपयोगासाठीं अमेरिका आपलें उत्पादन प्रचंड प्रमाणावर वाढवीत असून त्यांतून त्या सर्वांस पुरवठा करीत आहे ह्या विषयींची माहिती वेळोवेळ प्रसिद्ध करण्यांत येतच आहे. अमेरिका स्वतःच्या जबाबदारीवर पॅसिफिकमध्यें युद्ध चालवीत आहे. आणि त्याप्रीत्यर्थ फौजा, आरमार, विमानदल, वहातुकीचीं जहाजें इत्यादि सामुग्रीचा पुरवठा त्यास करावा लागत असतांच इंग्लंड, रशिया, चीन ह्या देशांच्याहि लढाऊ गरजा शक्य तेवढ्या भागवण्याचें कार्य तें राष्ट्र पुरें पाडीत आहे. प्रस्तुत युद्ध इतरांच्या व आपल्या स्वतःच्या स्वातंत्र्यासाठीं असल्यानें अशा रीतीनें सहाय देणें आपलें कर्तव्य आहे ह्या भावनेनें अमेरिका हें काम करीत आहे. मनुष्यबळ, विस्तृत प्रदेश, निसर्गाची अनुकूलता, संपत्तीच्या सर्व साधनांची विपुलता इत्यादि गोष्टींचें ह्या कार्यक्रमांत त्यास सहाय मिळत आहे. युद्धसामुग्रींत सैन्यास व बिनलढाऊ जनतेस आवश्यक असलेल्या अन्नाचा पुरवठा अंतर्भूत आहे हें येथें ध्यानांत वागवलें पाहिजे. ग्रेटब्रिटन हा देश औद्योगिक सामर्थ्यांत पुरोगामी असल्यानें शस्त्रास्त्रांचें उत्पादन त्यामध्यें मोठ्या प्रमाणावर होणें शक्य आहे आणि त्याप्रमाणें तें वाढत आलें आहे. रशियास शस्त्रास्त्रें पुरवण्यांत इंग्लंडनें भाग घेतला आहे ह्यावरून त्याच्या उत्पादन-सामर्थ्याची कल्पना येते. इंग्लंडच्या लढाऊ संघटनेंत अमेरिकेचें सहाय विशेष एखाद्या बाबतींत अगत्याचें असेल तर ती बाब अन्नसामुग्रीची होय. खाण्याच्या अनेक जिनसांचे संबंधांत इंग्लंड स्वावलंबी होऊं शकत नसल्यानें आणि युरोपांतील देशांतून होणारी आयात बंद पडल्यामुळें हा पुरवठा अमेरिकेंतूनच होणें अपरिहार्य आहे.

इंग्लंडची अन्नसामुग्रीची गरज जरूर ते खाण्याचे पदार्थ त्या देशास पाठवून भागवण्याचा क्रम अमेरिकेनें चालवला असून चालू वर्षाबाबतची त्यासंबंधांतली योजना अंमलांत आणलेलीहि आहे. रहाणीच्या मानाविषयींचे अमेरिकन शास्त्रज्ञ व सरकार ह्यांचें ध्येय आहे त्याच्या पुष्कळ अलीकडे अमेरिकन जनता आजमितिस आहे ह्याची जाणीव ठेवून तें मान सुधारणें आणि इंग्लंडला अन्न पुरवून सहाय देणें हा दुहेरी हेतु अमेरिकेनें धरला आहे. इंग्लंडला पाठवावयाच्या अन्नाबाबतचा चालू सालांतला अमेरिकेचा कार्यक्रम पाहिला तर तो प्रचंड आहे असें म्हणावें लागतें. वाळवलेलें व पिठाच्या स्वरूपांतलें दूध व चीज ह्यांची निर्गत पाचशे कोटि पौंड भरेल असा अंदाज आहे. हा पुरवठा किती अवाढव्य आहे ह्याची कल्पना देण्यास असें सांगण्यांत आलें आहे कीं अर्धा फूट व्यासाच्या नळींत हें दूध ओतलें तर तो नळ पृथ्वीभोवती तीन विळखे घालूं शकेल! डुकराचें मास इतकें पाठवण्यांत येईल कीं दीड दीड फूट अंतरानें हीं डुकरें जवळ जवळ उभीं केलीं तर त्यांची रांग उत्तर अमेरिकेच्या अगदीं उत्तरेच्या टोकापासून दक्षिण अमेरिकेच्या अगदीं दक्षिण टोकापर्यंत पसरेल! पन्नास कोटी डझन अंडीं, पावणेदोन कोटि पौंड डब्यांत घातलेलें कोंबड्या वगैरेचें मास, ७५० मैल लांबीच्या रेलवेच्या वाघणी भरतील इतकीं फळें आणि १२ मैल लांबीच्या वाघिणी भरून भाजीपाला इतक्या खाद्य पदार्थांचाहि पुरवठा व्हावयाचा आहे. स्वतःच्या मामुली गरजेच्या फक्त ३७ टक्के एवढेंच अन्न ग्रेट ब्रिटनला उत्पन्न करतां येतें. बाकीच्याचा पुरवठा करण्यांत अमेरिकेसच पुढाकार घेणें आवश्यक आहे. तथापि, अमेरिकेची उत्पादनशक्ति एवढी दांडगी आहे कीं, तीमध्यें थोडी भर घातली असतां स्वतःची गरज पुरी करून इंग्लंडलाहि पुरवठा करणें त्यास शक्य आहे. उदाहरणार्थ, अमेरिकेचें दुधाचें उत्पादन १९३० सालाच्या सुमारास १०,६६० कोटि पौंड इतकें होतें. १९४० मध्यें तें ११,१०० कोटि पौंड झालें. पुढच्या वर्षी तो आंकडा ११,७०० कोटि पौंडांवर गेला आणि चालू सालीं १२,५०० कोटि पौंड दूध अमेरिकेंत तयार होईल असा हिशेब आहे. त्यापैकीं ५०० कोटि पौंड दूध इंग्लंडला पाठवण्यांत येऊन बाकीच्या पुरवठ्यांतून अमेरिकन जनतेची गरज वाढत्या प्रमाणांत भागवतां येईल. अमेरिकन जनतेचें अन्न पुरेसें आणि पौष्टिक असावें अशाविषयीं प्रयत्न चालले आहेत. शास्त्रीय संशोधनाचे सहाय्यानें व वाढत्या पुरवठ्यानें त्या सुधारणा करण्याचें ध्येय अमेरिकन सरकारनें स्वतःपुढें ठेवलें आहे. तें साध्य करीत असतांनाच त्या सरकारास इंग्लंडला भरपूर अन्नसामुग्रीचें सहाय देतां येत आहे ही गोष्ट विशेष आहे.

### २४ तासांत संपूर्ण लष्करी छावणीची उभारणी

अमेरिकन लष्करी फौजा ऑस्ट्रेलियांत आपलीं ठाणीं झटपट उभारीत आहेत. ज्या ठिकाणीं मेंढ्या चरत होत्या अशा भूमीवर चोवीस तासांत अमेरिकन लष्कराची छावणी तयार होऊं शकते. प्रत्येक इमारतींत व तंबूंत विजेच्या दिव्यांसुद्धा ही छावणी परिपूर्ण असते. सुरवात केल्यापासून एका तासांत रस्ते आखण्यांत येतात व चार तासांत इमारतींचे आराखडे उभे रहातात, चार तासांत पाण्याचा अखंड पुरवठा सुरू होतो व न्हाणीघरांतून गरम पाणी मिळूं लागतें. प्रारंभापासून आठ तासांत इमारतींत व तंबूंत विजेचा उजेड दिसूं लागतो व ड्रेनेजचें कामहि पुरें होतें. बारा तासांत बबर्जी जेवण तयार करून ते तेथें आपल्या सैनिकांस वाढण्यास तयार असतात. हें होईपर्यंत सुतार, रस्ते तयार करणारे, वीजवाले, इत्यादि पुढील छावणीच्या उभारणीसाठीं रवाना होतात.

## हिंदुस्थानांतील लोकसंख्येचा प्रश्न

हिंदुस्थानांतील वाढती लोकसंख्या आणि जनतेची असमाधानकारक आर्थिक परिस्थिति ह्यांचा परस्पर संबंध ठळक रीतीनें डोळ्यांत भरतो आणि संपत्तीच्या उत्पादनाची वाढ व संतति-नियमन हे ह्या स्थितीवरचे उपाय सुचवण्यांत येत असतात. तथापि, हिंदी खानेसुमारीच्या आकड्यांत खोल शिरून नैसर्गिक व सांस्कृतिक कारणांमुळें लोकसंख्येंत वाढ किंवा घट कशी होते ह्याची शहानिशा करणारे पंडित ह्यासंबंधांत निरनिराळीं अनुमानें काढीत असतात. हवापाणी, जमिनीचा मगदूर, धार्मिक कल्पना, सामाजिक चालीरीती, शिक्षणाचा प्रसार किंवा अभाव इत्यादींचा परिणाम जनन, मृत्यू व संख्यावाढ ह्यांवर कसा होतो ह्याविषयीं सिद्धांत निश्चित करून लोकसंख्येच्या परिस्थितींत पुढें काय फेरफार होतील ह्याचें भविष्य वर्तवण्याचा अभ्यासकांचा प्रघात असतो. राष्ट्राचें आर्थिक धोरण हेतुपूर्वक आखतां येण्याकरितां आणि जनतेच्या रहाणींत सुधारणा घडवून आणण्याकरितां उपाययोजना आखण्यास सहाय व्हावें हा त्या अनुमानांचा व सिद्धांतांचा उद्देश असतो. हिंदुस्थानांतील लोकसंख्येविषयीं खानेसुमारीचे प्रसंगीं गोळा करण्यांत येणारी माहिती अपुरी व असमाधानकारक असते ही गोष्ट सुप्रसिद्ध असल्यानें पंडितांचीं प्रस्तुत बाबतींतलीं अनुमानें विश्वसनीय होणें शक्य नाहीं हें उघड आहे. हा देश एवढा विस्तृत आहे आणि त्यांतले बहुसंख्य लोक इतके मागासलेले आहेत कीं खानेसुमारीचे वेळीं त्यांचेकडून घेतलेली माहिती सर्वसाधारणपणानें काढावयाच्या अनुमानांचा आधार म्हणून उपयोगांत आणणें सत्यत्वाच्या व उपयुक्ततेच्या दृष्टीनें धोक्याचें आहे. लोकसंख्येचा शास्त्रीय पद्धतीनें अभ्यास करणारांस तर खानेसुमारीच्या प्रसिद्ध झालेल्या आकड्यांवर अवलंबून रहाण्यावांचून गत्यंतर नाहीं, असा येथें दुहेरी पेच आहे.

तथापि, उपलब्ध असलेल्या हिंदी लोकसंख्येविषयींच्या माहितीचा, देशाचे सारखी नैसर्गिक परिस्थिति असलेले भाग पाडून त्यांतील संख्येंत झालेल्या बदलाचा अभ्यास करण्याकडे उपयोग झाल्यास अधिक विश्वसनीय अनुमानें काढतां येणें शक्य आहे ह्या कल्पनेनें श्री. एन्. व्ही. सोवनी, एम. ए. ह्यांनीं एक उपक्रम केला आहे, तो स्वागतार्ह आहे.* हिंदुस्थानाच्या निरनिराळ्या भागांत नैसर्गिक व सांस्कृतिक भिन्नत्व एवढें मोठें आहे कीं सबंध देशाच्या लोकसंख्येविषयीं अनुमानें न काढतां मर्यादित क्षेत्रांतल्या परिस्थितीचा अभ्यास करणें अधिक श्रेयस्कर आहे ह्या भूमिकेवरून त्यांनीं प्रस्तुत संशोधन केलें आहे. ह्या नैसर्गिक ( राजकीय नव्हे ) क्षेत्रांतील तपशीलवार माहितीवर आधारलेलीं आपुलीं अनुमानें त्यांनीं नमूद केलीं असून अर्थशास्त्रज्ञांच्या लोकसंख्येविषयींच्या सिद्धांतांचा परामर्शहि त्यांनीं उद्बोधक रीतीनें घेतला आहे. श्री. सोवनी ह्यांनीं आपलें संशोधन कार्य, गोखले स्कूल ऑफ पॉलिटिक्स अँड एकॉनॉमिक्सचे प्रमुख प्रा. धनंजयराव गाडगीळ ह्यांचे मार्गदर्शनाचे सहायानें केलें आहे. त्यांच्या निबंधास प्रा. धनंजयराव ह्यांनीं विद्वत्ताप्रचुर व मार्मिक प्रस्तावना लिहिली आहे, ती अर्थशास्त्राच्या अभ्यासकांनीं परिशीलन करण्यासारखी आहे. त्यांनीं येथें कित्येक मुलग्राही तत्त्वाचे व पद्धतीचे प्रश्न उपस्थित केले असून त्यांच्या दृष्टीनें लोकसंख्याविषयक सिद्धांतांची छाननी केली आहे.

लोकसंख्येचा रहाणीच्या मानावर आणि रहाणीच्या मानाचा लोकसंख्येवर कसा व काय परिणाम होतो ? नैसर्गिक परिस्थिति आणि संख्येची वाढ व हालचाल ह्यांचे परस्पर संबंध कसे असतात ? आणि ह्या बाबतींत विशिष्ट अवधींत दिसून येणाऱ्या परिस्थितीमध्यें कायमची नियमबद्धता असते कीं काय ? अशा प्रकारचे शास्त्रीय महत्त्वाचे प्रश्न उपस्थित करून त्यांचेविषयीं अनुमानें काढतांना किती खबरदारी घेतली पाहिजे ह्याचें उत्कृष्ट विवेचन प्रा. धनंजयराव ह्यांच्या प्रस्तावनेंत सापडतें. ह्या मनोरंजक विषयाची चर्चा येथें करणें शक्य नाहीं. त्याच्या स्वरूपाचें दिग्दर्शन करणें एवढेंच विवक्षित आहे. गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्सच्या ग्रंथमालेंत श्री. सोवनी ह्यांच्या निबंधाचा समावेश करण्यांत आला आहे तें सर्वस्वी यथोचित आहे.

* 'The Population Problem in India: ' A Regional Approach' By N. V. Sovani, M. A., Gokhale Institute of Politics and Economics Publication No. 8, Price Rs. 4/-

## हिंदी तांदुळाची सिलोनला निर्गत

तांदुळाच्या पुरवठ्याचे बाबतींत हिंदुस्थान देश स्वयंपूर्ण नाहीं आणि त्या धान्याची ब्रह्मदेशांतून होणारी मामुली निर्गत बंद पडल्याकारणानें त्याचा तुटवडा हिंदी जनतेस भासत आहे. हिंदुस्थान सरकारचे मंत्री सर जोगेंद्रसिंग ह्यांनीं ही माहिती कांहीं आठवड्यांमागें स्वतः पुरवली होती. भाताच्या पिकास विशिष्ट प्रकारची जमीन आणि हवापाणी आवश्यक असल्यानें त्याच्या लागवडीचें क्षेत्र वाढवलें जाण्यास फारसा वाव नाहीं. खाद्यपदार्थांचें उत्पादन वाढवण्याचे प्रयत्न झाले आहेत, त्यांस इतर पिकांचे संबंधांत यश आलें आहे, तसा प्रकार भाताचे बाबतींत म्हणण्यासारखा होणें संभवनीय नाहीं. अशा स्थितींत देशामध्यें उपलब्ध होणाऱ्या तांदुळाचा काटकसरीनें उपयोग करून त्याची वाटणी समाधानकारक होईल अशी व्यवस्था करणें हाच एक उपाय ह्या धान्याच्या तुटवड्यावर अवलंबतां येण्यासारखा आहे. तांदुळाची भूक इतर धान्यांनीं शक्य त्या मर्यादेपर्यंत भागवणें ह्या मार्गाचाहि त्यांत अंतर्भाव होतो. ह्या परिस्थितींत देशांतून बाहेर तांदूळ जाऊं दिल्यास येथील पुरवठ्याचा प्रश्न अधिकच बिकट होणार हें उघड आहे. म्हणूनच मुंबईच्या इंडिअन चेंबर ऑफ कॉमर्सनें हिंदुस्थान सरकारचें ह्या प्रश्नाकडे गेल्या सप्टेंबर महिन्यांत लक्ष वेधलें होतें त्याचें उत्तर चेंबरला आलें नाहीं आणि मध्यंतरीं कराचीहून कांहीं तांदूळ सिलोनला पाठवला जाण्याची परवानगी देण्यांत आली असल्याचें समजल्यावरून तिनें अलिकडे सरकारला एक तार पाठवून ह्यासंबंधांत पृच्छा केली आहे. हिंदुस्थान सरकार आणि सिलोनचें सरकार ह्यांचे दरम्यान हिंदी तांदुळाच्या त्या देशांत व्हावयाच्या निर्गतीविषयींची विशिष्ट योजना निश्चित झाली असल्यांच्या बातमीचा उल्लेख करून ह्या प्रकारच्या निर्गतीचा येथील तांदुळाच्या पुरवठ्यावर अनिष्ट परिणाम होईल असें तीमध्यें म्हटलें आहे. ह्या अन्नपुरवठ्यासारख्या अत्यंत महत्त्वाच्या बाबतींत वस्तुस्थितीची संपूर्ण माहिती जनतेस देऊन स्वतःच्या धोरणाचें समाधानकारक स्पष्टीकरण सरकारनें करणें अगत्याचें आहे. सिलोनमध्येंहि तांदुळाचा तुटवडा भासत असल्यानें तेथील सरकारचे प्रयत्न हिंदी तांदुळाची निर्यात आपल्या देशांत व्हावी ह्याबद्दल गेले कित्येक महिने चालू आहेत. त्याच खटपटीचा परिणाम इंडिअन चेंबरनें उल्लेखिलेल्या निर्गतीच्या योजनेंत झाला असावा असें दिसतें. चेंबरच्या तारेस हिंदुस्थान सरकारनें तपशीलवार उत्तर दिलें पाहिजे.

# स्फुट विचार

## साखरेचें नियंत्रण आणि पुरवठा

साखरेच्या पुरवठ्यासंबंधानें सर्वत्र हाकाटी चालू आहे आणि ती मिटवण्याचा प्रयत्न सरकारकडून होत आहे. सरकारी नियंत्रणाचा उपयोग साखर विशिष्ट प्रमाणांत सर्व कुटुंबांस ठराविक दरानें मिळण्यास व्हावा अशी सामान्य जनतेच्या तर्फेची मागणी आहे. साखरेच्या वांटणीचा प्रश्न समाधानकारक रीतीनें सुटण्यांत चार निरनिराळ्या पक्षांचे हितसंबंध लक्षांत घेणें आवश्यक असून त्यांचा मेळ घालण्याचें कर्तव्य नियंत्रणाच्या मार्गानें सरकारास करावयाचें असतें. विशेषतः उत्तर हिंदुस्थानांतील प्रांतांत साखर कारखान्यांस ऊस पुरवणाऱ्या शेतकऱ्यांचा वर्ग; साखरेचे कारखानदार; साखरेचे घाऊक व्यापारी आणि साखर वापरणारी जनता असे हे चतुर्विध संबंधी आहेत. युद्धपरिस्थितींत वहातुकीचीं साधनें जरूरीप्रमाणें उपलब्ध होऊन साखरेची ने-आण मागणीस अनुसरून होईल अशी व्यवस्था लावण्याचें कामहि सरकारकडे आलें आहे. ऊस पिकवणाऱ्या शेतकऱ्यांस त्यांच्या मालाची वाजवी किंमत मिळावी आणि कारखानदारांनीं ऊस पाडून घेऊं नये म्हणून त्याचा व साखरेचा भाव निश्चित करावा लागतो. सर्व देशभर साखरेची वाटणी समाधानकारक रीतीनें व्हावी ह्यासाठी मध्यवर्ती सरकारास घाउक व्यापाराचेंहि नियंत्रण करणें प्राप्त होतें. खरेदी-विक्रीचें यंत्र युद्धकालांत अनियंत्रित रीतीनें नेहमीप्रमाणें चालू ठेवणें सरकारास शक्य होत नाहीं आणि आपल्या व्यवहाराच्या पद्धतींत घोटाळा उडून आपणांस स्वतःचें कार्य नीटपणें करतां येत नाहीं अशी तक्रार करण्यास व्यापाऱ्यांस जागा उत्पन्न होते. उत्तर हिंदुस्थानांतील साखर कारखानदारांची " इंडियन शुगर असोसिएशन " या नांवाची संस्था आहे तिची दहावी वार्षिक सभा कानपूर येथें नुकतीच भरली होती, तीमध्यें साखरेच्या विक्रीवरील नियंत्रण दूर करण्यांत यावें अशी मागणी करणारा ठराव मान्य झाला त्याचें कारण उघड आहे.

---

## नियंत्रण दूर होण्याविषयीं मागणी

नियंत्रणाच्या इष्टानिष्टतेची कसोटी त्याच्या योगानें मालाच्या वांटणीची, विक्रीची व किंमतीची समाधानकारक व्यवस्था ही आहे. मालाची वांटणी नियंत्रणाच्या अभावीं अधिक यशस्वी होईल असें सिद्ध झालें तरच तें काढून टाकण्याची सूचना सयुक्तिक आहे असें म्हणतां येईल. नियंत्रणाच्या सध्याच्या पद्धतींत सुधारणा व्हावी अशी मागणी करणें वेगळें आणि त्याचें उच्चाटन केलें जावें असें म्हणणें निराळें. कारखानदारांच्या मतें मुख्य प्रश्न स्वस्त साखर बनवण्याचा असून सरकारी नियंत्रण काढून घेतलें जाऊन माल अनियंत्रितपणानें विकला जाण्याची मुभा देण्याविषयींचा आहे. त्यांचें असेंहि म्हणणें आहे कीं, नियंत्रण चालू होण्यापूर्वी जे लोक साखरविक्रीचा व्यवहार करीत होते, त्यांच्याशिवाय इतर कोणासहि विक्रेते म्हणून मान्यता मिळूं नये. कानपूर येथील कारखानदारांच्या सभेचे अध्यक्ष श्री. खैतान म्हणाले कीं, साखरेच्या सरकारी नियंत्रणाची योजना अयशस्वी ठरली आहे आणि तिच्या योगानें किंमती निश्चित झालेल्या नाहींत किंवा मालाची वांटणी नीट झालेली नाहीं. जनतेच्या हिताच्या दृष्टीनें हवें आहे तें साखरेचें विस्तृत उत्पादन हवें आहे आणि तें वाढलें असतां हिंदी जनतेच्या सर्व गरजा भागून माल बाहेरहि पाठवणें शक्य होईल. ह्या श्री. खैतान ह्यांच्या मुद्यांत सत्यांश असला तरी त्याचा संबंध साखरेच्या पुरवठ्याच्या एकाच अंगाशीं येतो आणि बाकीचीं अंगें त्यांत विचाराबाहेर टाकण्यांत आलीं आहेत. नियंत्रणाच्या मार्गानें साधावयाचें सरकारनें योजलेलें कार्य कारखानदार व व्यापारी ह्यांस आपले व्यवहार निर्वेधपणानें करूं दिल्यानें कसें यशस्वी होऊं शकेल ह्याची कल्पना कारखानदारांच्या वतीनें देण्यांत आलेली नाहीं. सरकारी नियंत्रणाची व्यवस्था समाधानकारक होण्यास कारखानदार व व्यापारी ह्यांचें सहकार्य हवें ह्यांत वाद नाहीं. पण नियंत्रण निवारणाची आपली बाजू लोकांस पटेल या रीतीनें कारखानदारांनीं पुढें मांडली आहे असें वाटण्यास जागा नाहीं.

---

## नियंत्रणाचें समर्थन

एकीकडे साखर कारखानदार सरकारी नियंत्रण अयशस्वी ठरलें आहे आणि तें दूर करण्यांत यावें असें म्हणत आहेत तर दुसरीकडे साखरेच्या धंद्यांतल्या यांत्रिक तज्ज्ञांच्या सभेंत भाषण करतांना श्री. श्रीवास्तव ह्यांनीं कानपुरांत ठासून सांगितलें कीं, नियंत्रण साखरेच्या धंद्यास उपयुक्त व हितकारक झालें आहे. हिंदी साखरेचा धंदा हिंदुस्थानभर पसरला असून त्यामध्यें एकसूत्रीपणाचा अभाव आतांपर्यंत होता तो नियंत्रणाच्या योगानें नाहींसा होऊन् अखिल भारतीय नियंत्रणाखालीं तो आला आहे असें मत त्यांनीं व्यक्त केलें. सध्याची नियंत्रणाची व्यवस्था यशस्वी झाल्यास युद्धाचे नंतर तिला कायमचें स्वरूप देतां येईल असेंहि ते म्हणाले. देशाच्या इतर भागांत नवीन निघालेल्या साखरकारखान्यांची अनिष्ट स्पर्धा आपणांस निष्कारण जाचक होत असून साखरेच्या सर्वच धंद्याचें मध्यवर्ती सरकारनें नियमन करावें अशी मागणी उत्तर हिंदुस्थानांतील कारखानदार करीत आले आहेत. त्यास श्री. श्रीवास्तव ह्यांचा वरील मुद्दा खोडून काढणें कठीण गेलें पाहिजे. नियंत्रणाचा एक फायदा श्री. श्रीवास्तव ह्यांनीं आपल्या भाषणांत पुढें मांडला तो विचारांत घेण्यासारखा आहे. साखरेच्या खरेदीविक्रीचे वायद्याचे व्यवहार करण्याचा धंदेवाल्यांचा प्रचार होता तो नियंत्रणामुळें बंद पडला आहे ही साखरेचा धंदा व जनता ह्या दोहोंच्या हिताची गोष्ट आहे. वायद्याच्या व्यवहारामुळें साखरेच्या बाजारांत जुगारीस वाव मिळून किंमतींत अस्थिरता उत्पन्न होऊन जनतेचें नुकसान् होत असे त्यास नियंत्रणानें आळा घातला आहे. नियंत्रणाच्या योजनेनें साखरेची प्रतवारी लावण्याची व्यवस्था झाली आहे. हें ह्या धंद्याच्या प्रगतीचें लक्षण असून त्यामुळें हिंदी साखरेच्या निर्यातीस उत्तेजन मिळण्यासारखें आहे. श्री. श्रीवास्तव ह्यांचें वरील आशयाचें नियंत्रणाचें समर्थन आहे. त्यावर कारखानदार व व्यापारी ह्यांस टीका करण्यास जागा असली आणि नियंत्रणाच्या चालू व्यवस्थेंत सुधारणा होणें आवश्यक असलें ( आणि हें आहेहि ) तरी नियंत्रण मुळांतच काढून टाकण्याविषयींची सूचना जनतेच्या हिताच्या दृष्टीनें ग्राह्य होण्यासारखी नाहीं हें विचाराअंतीं कोणाच्याहि लक्षांत आल्यावांचून रहाणार नाहीं.

---

## ब्रिटिश विमानांचे जर्मनीवर हल्ले

युरोपमध्यें जर्मनीविरुद्ध दुसरी आघाडी चालू करण्याचा उपक्रम केव्हांहि व कसाहि होवो, त्याचें कार्य बऱ्याच अंशांनीं ब्रिटिश विमानांचे मोठ्या प्रमाणावर जर्मन कारखान्यांवर हल्ले होत आहेत, त्यांच्या द्वारें घडत आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. रशियन आघाडीवरील जर्मन लढाऊ बल कमी कार्यक्षम करण्यास ह्या हल्ल्यांची मदत मिळत आहे ह्यांत शंका नाहीं. ब्रिटिश विमानांचे हल्ले जर्मनींतील शहरांवर चालले असतां त्यांच्यापासून बचाव करण्यांत जर्मनीची लढाऊ शक्ति अडकून रहाते. जर्मन कारखाने व खाणी ह्यांचा नाश होऊन त्यांची दुरुस्ति करण्यांत कामकरी गुंतून ठेवावे लागतात, शस्त्रास्त्रांच्या उत्पादनास व्यत्यय येतो आणि नाश पावलेल्या कारखान्यांत माल बनणें बंद झाल्यानें इतरहि उद्योगधंदे मंदींत येतात. जर्मनींतल्या रेल्वेजवर हल्ले होऊन त्यांची नासधूस होते. तिच्या योगानें वहातुकीस अडथळा येऊन त्यामुळेंहि कारखान्यांचें काम चालेनासें होतें. जर्मनींतल्या कारखान्यांत तयार होणाऱ्या लढाऊ सामुग्रीवर हिटलरच्या लढायांचें यश अर्थातच अवलंबून आहे आणि साधनांच्या पुरवठ्यावर होणारे ब्रिटिश विमानांचे घाले हे त्या यशाच्या शक्यतेवरचेच हल्ले होत. ह्या हल्ल्यांच्या विनाशक परिणामांची कल्पना खालीं दिलेल्या विश्वसनीय माहितीवरून सहज येईल. पॅरिस शेजारच्या रेनो नांवाच्या कारखान्यांत दर महिन्यास १०० टँक्स, ८०० रणगाडे व ६०० विमानांचीं इंजनें तयार होत असत. त्यांवरील हल्ल्यांमुळें एवढें मोठें लढाऊ उत्पादन कित्येक महिनेपर्यंत बंद पडलें ह्यांत संशय नाहीं. रॉस्टॉकवरील हल्ल्यांत मोठ्या प्रमाणावर विमानें बनवणारा कारखाना नष्ट झाला. जर्मन फौजेच्या उपयोगासाठीं मॅटफर्ड कारखान्यांत दर महिन्यास एक हजार रणगाडे तयार होत असत ते त्याच रीतीनें बंद झाले. अशीं दुसरींहि उदाहरणें देतां येतील आणि त्यांवरून असें दिसून येतें कीं, ब्रिटिश विमानांच्या शत्रूच्या मोठ्या शहरांवरील हल्ल्यांनीं त्याचें लढाऊ बळ बरेंच मर्यादित केलें आहे. त्यांनीं जर्मनीच्या लष्करी शक्तीच्या मुळावरच घाव घातला आहे.

---

## श्री. किर्लोस्कर ह्यांच्या फोटोचें अनावरण

सातारा जिल्ह्यांतील सहकारी चळवळींतील वयोवृद्ध पुढारी व प्रांतिक सहकारी बँकेची किर्लोस्करवाडी शाखा स्थापन झालेपासून सतत १२ वर्षे शाखा कमिटीचे चेअरमन व बँकेचे माजी डायरेक्टर श्री. लक्ष्मणरावजी किर्लोस्कर यांच्या फोटोचा अनावरण समारंभ किर्लोस्करवाडी येथें श्री. आर. जी. सरय्या, चेअरमन, मुंबई प्रॉव्हिन्शिअल को-ऑ. बँक लि. मुंबई यांचे हस्तें रविवार ता. १ नोव्हेंबर १९४२ रोजीं दुपारीं ४ वाजतां येथील शाळेच्या हॉलमध्यें साजरा झाला.

---

## मुलांचें स्थलांतर

लंडनमधील शाळांतील मुलांचें अंतर्गत ठिकाणीं स्थलांतर करण्याचें तूर्त तहकूब ठेवलें आहे. आधीं गेलेलीं मुलें परत आणण्यांत येणार नाहींत.


# दि बँक ऑफ इंडिया लि.

[स्थापना : १९०६]

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... ... ... रु. | २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | ... ... ... रु. | १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड | ... ... ... रु. | १,१८,००,००० |

मुख्य कचेरी: ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

मुंबईमधील शाखा : बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

इतर शाखा : अहमदाबाद ( भद्र, मुख्य ऑफिस ), अहमदाबाद ( एलिस ब्रिज शाखा ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अंधेरी ( मुंबई शेजारीं ), बांद्रे ( मुंबई शेजारीं ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस ), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर, कराची, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत.

लंडन एजन्ट्स : वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

डायरेक्टर्स : सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस. आय. (अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई, सर जोसेफ के. नाइट, मि. ए. गेडिस, सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई., मि. दिनशा के. दाजी, श्री. रामनिवास रामनारायण.

### करंट डिपॉझिट अकाउंट्स :

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षा कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते; सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमीचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

एजंटः—टी. आर. लालवाणी.



# दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

हेड ऑफिस : पुणें शहर.

स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.

मुंबअी शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबअी.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | : रु. १०,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | : रु. ५,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | : रु. २,४९,२५० |
| एकूण खेळतें भांडवल | : रु. ४०,००,००० |

### डायरेक्टर्स

| | |
|---|---|
| प्रो. वा. गो. काळे, अध्यक्ष | श्री. मा. म. गुप्ते |
| श्री. धों. कृ. साठे | श्री. मा. रा. जोशी |
| श्री. न. म. पवार | श्री. श्री. गो. मराठे |
| श्री. त्र्यं. वि. रामडे | श्री. र. चिं. सोहोनी |
| श्री. वा. पुं. बर्वे | मि. फ. दो. पदमजी |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदीविक्री कसोशीनें करून दिली जाते.

म. वि. गोखले

मॅनेजर.

## नाशिक जिल्ह्यांतील सहकारी पतपेढ्यांचें पुनरुज्जीवन

नाशिक जिल्ह्यांत विशेषतः निफाड तालुक्यांत सहकारी चळवळीची सुरुवात बऱ्याच वर्षांपूर्वी झाली व बऱ्याचशा सहकारी पतपेढ्या ह्या तालुक्यांत २०।२५ वर्षांपासून काम करीत आहेत. निफाड तालुका हा नाशिक जिल्ह्याचें बागाईत केंद्र असून सहकारी चळवळीचा प्रसार झपाट्यानें त्या तालुक्यांत व्हावयास पाहिजे होता व तसा प्रसार सुमारें १९२९।३० सालापर्यंत ह्या तालुक्यांत करण्यांत आला. तेव्हांपासून या चळवळीला लागलेली ओहोटी व सहकारी संस्थांतून दिसून येणारी अव्यवस्था पुढें पुढें वाढत गेली व त्याचा परिणाम पर्यायानें जिल्हा बँकेवर होऊन ती बँक १९३८ सालीं रद्द करावी लागली. नाशिक जिल्हा बँक सन १९३८ सालीं रद्द झाल्यापासून या भागांतील सर्व सहकारी पतपेढ्या पोरक्या बनल्या व त्यांना लागणारा पैशाचा व देखरेखीचा अभाव तीव्रतेनें भासूं लागला व त्यांतील सभासदांना आपला व्यवहार आपल्या संस्थेशीं इमानानें व प्रामाणिकपणें ठेवणें कठीण होत गेलें. कारण, आपलें उत्पन्न पतपेढ्यांच्या वसुलीकडे दिल्यास पुन्हां आपल्या शेतीच्या धंद्यास लागणारें भांडवल त्या संस्थेंतून परत मिळेल किंवा नाहीं याची शंका निर्माण झाली. वेळेवर कर्ज न मिळाल्यास होणाऱ्या नुकसानीची जाणीव त्यांना भासूं लागली. त्यामुळें आपल्याकडील कर्जे फेडण्याची टाळाटाळी करण्याची त्यांची प्रवृत्ति दुणावत गेली. याचा परिणाम सोसायट्यांची परिस्थिति जास्त खालावण्यांत व जनतेमध्यें सहकारी संस्थांबद्दल गैरसमज व अविश्वास वाढण्यांत झाला.

प्रॉव्हिन्शिअल बँकेच्या चालकांनीं बँकेची शाखा लवकरच नाशिक येथें उघडण्याचें ठरविलें आहे हा उपक्रम स्तुत्यच आहे. ह्या बँकेचे सिनिअर इन्स्पेक्टर मि. चावडा, बी. ए., ऑडिटर व रिकन्स्ट्रक्शन ऑफिसर मि. प्रधान ह्यांनीं निफाड, रौळसपिंप्री व कोठुरे ह्या गांवांतील पतपेढ्यांना भेटी दिल्या. त्यांचे बरोबर नगर जिल्ह्याचे सिनिअर इन्स्पेक्टर मि. गायतोंडे, बी. ए. हेहि होते. त्यांनीं सभासदांना आपल्या डोईजड कर्जाचा भार कसा हलका करावा, या बाबतींत प्रांतिक बँकेकडून कोणत्या प्रकारचें सहाय्य व सवलती मिळूं शकतील व नवीन कर्ज मिळण्याबाबतींत काय व्यवस्था केली जाईल ह्याबद्दलची योजना समजावून सांगितली, एवढेंच नव्हे तर सभासदांकडील जुन्या बाक्या तडजोडीनें कशा फेडल्या जातील व जे सभासद या योजनेप्रमाणें वसूल देतील, त्यांना फायदा कसा होईल ह्याबद्दल सभासदांची खात्री पटवून दिली.

प्रचलित युद्ध परिस्थितीमुळें धान्याचे भाव व पर्यायानें जमिनीचे भाव बरेच वर गेले आहेत. अशा वेळीं शेतकऱ्यांनीं विशेषतः सहकारी संस्थेंतील सभासदांनीं आपलीं जुनीं कर्जें फेडण्याचे अगर कमी करण्याचे प्रयत्न करणें त्यांचें कर्तव्य आहे. जर या परिस्थितीचा योग्य फायदा शेतकरी बंधूंनीं करून घेतला नाहीं तर त्यांना आपल्या जमिनीस मुकावें लागून त्यांची आर्थिक परिस्थिति सुधारण्यास त्यांना पुन्हा अशी संधी मिळणार नाहीं.

ह्या योजनेनें रद्द झालेल्या नाशिक डि. को. बँकेचे वसुलीचें काम सुलभ होईल, कारण स्थगित झालेल्या पतपेढ्यांचें पुनरुज्जीवन होऊन त्यांचेकडून येणें असलेली बाकी सहजगत्या वसूल होईल व अशा रीतीनें परिणामी ठेविदारांना आपल्या ठेवी लवकर परत मिळूं शकतील व डिव्हिडंड मिळेल असा दुहेरी फायदा ह्या योजनेनें साधतां येईल तरी अशा संधीचा फायदा शेतकरी बंधूंनीं अवश्य घ्यावा व इतर जनतेनें त्यांना प्रोत्साहन द्यावें.

मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानी असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् को-ऑपरेटिव् बँक, लिमिटेड.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी—सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंग
९, बेक हाउस लेन, कोट मुंबई.

शाखा

| | |
|---|---|
| १ बारामती ( जि. पुणें ) | १८ अकलूज ( जि. सोलापूर ) |
| २ सातारा ( „ सातारा ) | १९ विरमगांव ( „ अहमदाबाद ) |
| ३ इस्लामपूर ( „ „ ) | २० धुळें ( „ प. खानदेश ) |
| ४ कऱ्हाड ( „ „ ) | २१ दोंडाईचें ( „ „ ) |
| ५ तासगांव ( „ „ ) | २२ शिरपूर ( „ „ ) |
| ६ किर्लोस्करवाडी ( „ „ ) | २३ शहादें ( „ „ ) |
| ७ शिराळें ( „ „ ) | २४ नंदुरबार ( „ „ ) |
| ८ कोरेगांव ( „ „ ) | २५ साक्री ( „ „ ) |
| ९ वांई ( „ „ ) | २६ शिंदखेडें ( „ „ ) |
| १० अहमदनगर ( „ अहमदनगर ) | २७ तळोदें ( „ „ ) |
| ११ शेवगांव ( „ „ ) | २८ मालेगांव ( „ नाशिक ) |
| १२ कोपरगांव ( „ „ ) | २९ सटाणा ( „ „ ) |
| १३ बेलापूर ( „ „ ) | ३० कळवण ( „ „ ) |
| १४ राहुरी ( „ „ ) | ३१ लासलगांव ( „ „ ) |
| १५ भिवंडी ( „ ठाणें ) | ३२ नांदगांव ( „ „ ) |
| १६ पालघर ( „ „ ) | ३३ दोहद ( „ पंचमहाल ) |
| १७ कल्याण ( „ „ ) | ३४ कालोल ( „ „ ) |

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात
आणि
इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.

## अर्थशास्त्र

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें ३००; किंमत ३ रुपये
या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

## श्रीराम सिल्क मिल्स लि., बंगलोर

[ कंपनीनें १९४१ अखेर ६ टक्के डिव्हिडंड वांटला आहे. ]

युद्धसाहित्यपुरवठा–खात्याची पॅरेशूटकरितां लागणाऱ्या

रेशमी कापडाची ऑर्डर पुरी करण्यासाठी लागणाऱ्या भांडवलाकरितां तूर्त एकूण रु. १ लक्षाच्या रकमेपर्यंत

# ठेवी घेणें आहेत

व्याजाचा दर ४॥ ते ६ टक्के. ठेव किमान रु. ५०० ची असावी. ठेवीवरील व्याज दर सहा महिन्यांनीं दिलें जातें.

श्रीराम सिल्क मिल्स लि.,
श्रीरामबाग,
बसवनगुडी, बंगलोर.

**नारायण गोविंद नाईक,**
( माजी अध्यक्ष, म्हैसूर चेंबर ऑफ कॉमर्स ) मॅनेजिंग डायरेक्टर

आमच्या कारखान्यांतील माल मुंबईस बॉम्बे स्वदेशी को–ऑपरेटिव्ह स्टोअर्समध्यें व पुण्यास लक्ष्मी रोडवरील रे म्यूझिअमच्या व्यापार–संवर्धन–गृहांत पहा.

राहाणेची व भोजनाची उत्तम सोय




फोन नं. ७७९ गणपति चौक, व्यवस्थापक



# मधुमेहावरील औषध

## तीन आठवड्यांचे औषधास फक्त रु. ७

— मागविण्याचा पत्ता —
मॅनेजिंग डायरेक्टर, रूरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड.
१२३ ए, सदाशिव, पुणें २.

## N. V. WADNERKAR

**Gold & Silver Smith, Jeweller & Engraver, Electro-plater & Manufacturer of Sporting Trophies, Medals, Cups etc.**

**- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -**
**POONA CITY.**

## वक्तशीर आणि मनपसंत काम करून देणारे

# मोहन वॉच कंपनी

रेग्युलेशन मोफत
कॉमनवेल्थ बिल्डिंगसमोर लक्ष्मी रोड, पुणें २.

## DECCAN BOOK STALL

**Booksellers, Publishers & Subscription Agents**
**Fergusson College Road, Poona No. 4**

(1) We stock and supply Educational books, General books & Library books.

(2) We supply Government of Bombay and Government of India publications.

(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.

(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.


हे पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२७।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

दिवाळीचा मोठा अंक—किंमत ४ आणे.

REGISTERED No. B. 3434.

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ८ | पुणें, बुधवार, तारीख ११ नोव्हेंबर १९४२ | अंक ४५

पुण्यांतील

## कापडाचे व्यापारी यांना

★ अपूर्व संधी ★

## "विजय टेक्स्टाईल्स् लि."

एरंडवणें, पुणें ४

★ कारखाना चालू होऊन एक वर्ष झालें.

★ काम रात्रंदिवस चालू आहे व सर्व माल पुणें येथेंच खपतो.

★ आमचेकडे चादरी, शर्टिंग, जगन्नाथी, लुखाधोती व ४६" ते ५०" कोरें मांजरपाट कापड तयार होतें.

कंपनीची शेअरविक्री चालू आहे.

कंपनी मुदतीच्या ठेवी स्वीकारते.

आमचे हितचिंतकांस नवें वर्ष सुखदायी होवो !

# दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड.

| : मुंबई शाखा : | : हेड ऑफिस : | : स्थानिक शाखा : |
| --- | --- | --- |
| दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई. | पुणें शहर. | डेक्कन जिमखाना, पुणें ४. |

| | | | |
| --- | --- | --- | --- |
| अधिकृत भांडवल | रु. १०,००,००० | वसूल झालेलें भांडवल | रु. २,४९,२५० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० | एकूण खेळतें भांडवल | रु. ४०,००,००० |

— डायरेक्टर्स —

प्रो. वा. गो. काळे, (अध्यक्ष).

| | |
| --- | --- |
| श्री. धों. कृ. साठे | श्री. मा. रा. जोशी |
| श्री. न. ग. पवार | श्री. श्री. गो. मराठे |
| श्री. त्र्यं. वि. रानडे | श्री. र. चिं. सोहनी |
| श्री. वा. पुं. वर्दे | श्री. फ. दो. पदमजी |
| श्री. मा. म. गुत्ते | |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदीविक्री कसोशीनें करून दिली जाते.

— मॅनेजर —

श्री. म. वि. गोखले.

# दि डेक्कन पेपर मिल्स कंपनी लिमिटेड.

रे पेपर मिल, मुंढवा, पुणें.

पदमजी पेपर मिल, मुंबई.

पूर्वी आम्हांस लागणारा सर्व कागद आम्ही आपल्या देशांतच तयार करीत होतों, आणि महाराष्ट्रांतील कागदांचा धंदा सुप्रसिद्ध होता;

आणि सध्यांच्या यांत्रिक युगांत, कागदाचे प्रकार आणि त्यांस असलेली मागणी विलक्षण वाढली असतांहि गेलीं ५० वर्षें व आजहि

दि डेक्कन पेपर मिल्स कंपनी

## अनेक प्रकारांचा व प्रतींचा

उत्तम कागद आपल्या कारखान्यांत तयार करून त्याचा शक्य तो पुरवठा करीत आहे.

मॅनेजिंग एजंट्स:— दी कॅनरा पल्प अँड पेपर मिल्स लि., मुंबई.

८१५-१६ भवानी पेठ, पुणें ::: वेस्टर्न इंडिया हाऊस, सर फेरोजशा मेहता रोड, फोर्ट, मुंबई.

★ महाराष्ट्राच्या पहिल्या शेड्यूल्ड बँकेवरील जनतेच्या वाढत्या विश्वासाचें प्रतीक ★

**बँकेचें खेळतें भांडवल ४० लाखांचेवर**

**निधिधारकांची स्वतःची बँक**

# दी न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया लि.

★ हेड ऑफिस : १६ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई. ★

अध्यक्षः—श्री. जमनादास एम्. मेहता, एम. ए., एलएल. बी., बार-ॲट-लॉ, एम. एल. ए. (Central)

ठेवीदारातर्फे डायरेक्टरः—श्री. गजानन विश्वनाथ ऊर्फ बाबुराव साळवेकर, बी. ए., मालक सरदार गृह, मुंबई.

—बोर्ड ऑफ डायरेक्टर्स—

श्री. पी. बी. गोळे, बी. ए., एलएल. बी., माजी प्रधान, मध्यप्रांत, अकोला बेरार.

श्री. जी. एस. मराठे, एम. ए. (मुं.), ए. आय. ए. (लं.), ॲक्चुअरी, पुणें.

रावबहादूर एन. बी. देशमुख, रिटायर्ड गव्हर्नमेंट प्लीडर व पब्लिक प्रॉसिक्यूटर, अहमदनगर.

शेठ भगवानजी मुरारजी गोकुळदास, मॅनेजिंग एजंट्स, बॉंबे टायर्स सर्व्हिस लि., मुंबई.

श्री. बी. डी. गरवारे, गव्हर्निंग डायरेक्टर : गरवारे मोटार्स लि. मुंबई.

श्री. जी. व्ही. पुराणिक, गव्हर्निंग डायरेक्टर, श्रीधूतपापेश्वर लि. पनवेल.

शेठ गोविंददास नारायणदास बनातवाले, चंपागल्ली, मुंबई २.

सर एच. पी. दस्तुर, बी. ए., एलएल. बी., बार-ॲट-लॉ., रिटायर्ड चीफ प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट, मुंबई.

श्री. आर. एस. आठवले, बी. ए., रिटायर्ड डेप्युटी कलेक्टर, व माजी दिवाण सांगली, नाशिक सिटी.

श्री. डी. डी. देशपांडे, बी. ए., मॅनेजिंग डायरेक्टर, मुंबई.

## युद्ध असो अगर नसो

## "न्यू सिटिझन" ची प्रगति पहिल्याच दमानें व जोरानें चालू आहे

**रोख वसूल झालेलें शेअर — भांडवल व रिझर्व्ह : ५,७०,००० चे वर**

### बोलक्या आंकड्यांची कामगिरी

| तारीख | एकूण ठेवी | एकूण चालू भांडवल |
|---|---|---|
| ता. ३१-३-१९४१ चौथ्या ताळेबंदाच्या वेळीं | रु. २६,०५,००० हातीं असलेलीं बिलें धरून | रु. ११,००,००० चे वर |
| ३१-७-१९४१ चौथ्या ताळेबंदानंतर ४ महि. | रु. ३०,१९,२०० बिलें सोडून | रु. ३६,००,००० चे वर |
| ३०-९-१९४१ अगदीं अलीकडे | रु. ३४,४०,००० हातीं असलेलीं बिलें धरून | रु. ४०,००,००० चे वर |

धंदाचे नियम

॥ पाहुनिया आधीं जनता-जनार्दनाची सोय ॥

॥ करी काम काज तोचि विश्वासपात्र होय ॥

धंदाची महत्तम सुरक्षितता सांभाळून ठेवीदारांना जास्तींत जास्त व्याज देणारी बँक.

चालू खातें : १०० रुपयांनीं उघडतां येतें—व्याजाचा दर १/४% (पाऊण टक्का)

**मध्यम स्थितींतील लोकांची एकमात्र सोय**

सेव्हिंग बँक खातें : १० रुपयांनीं उघडतां येतें. १००० रकमेपर्यंत आठवड्यांतून दोनदां रक्कम चेकनें काढतां येते.
व्याजाचे दर १३/४% (पावणे दोन) ते २%

मुदत ठेवीः १०० अगर जास्त रकमेच्या १ ते ५ वर्षें मुदतीच्या स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर समक्ष अगर पत्रद्वारें

★ "न्यू सिटिझन" चा वाढता विस्तार ★

स्थानिक शाखा : (१) गिरगांव मुंबई ४. (२) दादर (B. B. & C. I. Ry). (३) जव्हेरी बाजार, मुंबई २. (४) शिव (Collecting Office).

बाहेरगांवच्या : (५) नाशिक शहर (६) नाशिक रोड (७) सिन्नर (Pay Office) (८) कोल्हापूर (९) सांगली. (१०) सोलापूर

*अधिक माहितीसाठी समक्ष भेटा अगर लिहा—*

डी. डी. देशपांडे, बी. ए.,
मॅनेजिंग डायरेक्टर.

# दि सदर्न निटिंग वर्क्स लि.

## पुणें २

यांनीं तयार केलेली

# " पूना होजिअरी "

## आपल्या व्यापाऱ्यांकडे अवश्य पहा.

सर्व प्रकारचा सुती व लोकरी आणि जाळीचा माल निरनिराळे डिझाइन्समध्यें तयार होतो. इंटरलॉक अंडर-वेअर्स व शर्टस् ही विशेष स्पेशॅलिटी आहे.

# ओगले ग्लास वर्क्स, लि.

★ कांचेच्या चिमण्या व ग्लोब्स,
★ बंगल्यावर घालण्याचीं कांचेचीं कौलें,
★ हेअर ऑइल्स अगर शाईकरितां लागणाऱ्या बाटल्या,
★ प्रभाकर हरीकेन लँटर्नस्,
★ एनामल्ड ॲडव्हर्टायजिंग साईन्स, अभंग पाट्या
★ सूप, मीट व राईस प्लेट्स्, इत्यादि एनामल वेअर,
★ रेल्वेकडे लागणारीं हरतऱ्हेचीं एनामल कमोड्स्, वॉश बेसीन्स वगैरे,
★ एनामल्ड इलेक्ट्रिक शेड्स्.
★ वेल्डींग इलेक्ट्रोडस्

## सर्व तऱ्हेचा माल अस्सल दर्जाचा होतो.

—: जास्त माहितीकरितां लिहा :—

एस. पी. ओगले आणि कंपनी,
मॅनेजिंग एजंटस्.

पोस्टः—ओगलेवाडी ( सं. औंध ), जिल्हाः–सातारा.

# अ नु क्र म णि का.


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... ... | ३५८ |
| २ अन्नसामुग्रीचा पुरवठा ... | ३५९ |
| ३ स्फुट विचार ... ... | ३६० |
| रणांगणावरील हालचाली—खंडकरी कायद्यांत दुरुस्ति—पश्चिम किनाऱ्यावरील वहातूक—गरिबांसाठी स्वस्त कापड—विमा कायद्यांत दुरुस्ति करण्याची मागणी—जर्मनीमधील रक्तदानाची व्यवस्था—हिंदुस्थानांत युद्धसामुग्रीची खरेदी | |
| ४ अल्फा केमिकल्स लि. ... | ३६२ |
| ५ मुर्के कशीं तपासावीत ? ... | ३६२ |
| ६ ॲक्चुअरीच्या खाजगी धंद्याची राष्ट्रीय कामगिरी ... ... | ३६३ |
| ७ हिंदुस्थानचें औद्योगीकरण ... | ३६५ |
| ८ वसुलीसाठी पाठविलेला चेक ... | ३६५ |
| ९ सहकारी इन्स्टिट्यूटची पुनर्घटना | ३६६ |
| १० ओगले बंधू व काच कारखाने... | ३६८ |
| ११ कामगारांच्या जेवणाची सोय ... | ३६८ |
| १२ दुय्यम नाण्यांचा तुटवडा ... | ३६९ |
| १३ म्युनिसिपॅलिट्यांचा कारभार ... | ३७१ |
| १४ सहकारी मालपुरवठा समित्या ... | ३७१ |
| १५ हिंदी कापूस-कापडाच्या गिरण्या | ३७३ |
| १६ हिंदी आयुर्विम्याची प्रगति ... | ३७५ |
| १७ विम्यांतील "थर्ड पार्टी"चा अर्थ | ३७५ |
| १८ तंबूंचें उत्पादन ... ... | ३७५ |
| १९ यंत्रांचें सहाय आर्थिक प्रगतीस पोषक ... ... | ३७७ |



'"कांचन" येई घरा, तोचि दिवाळी-दसरा'




★ पुणें—सिटी पोस्टासमोर. ★ मुंबई—गिरगांव व काळबादेवी.
★ नागपूर—महाल रोड.

**श्री. मराठे (ॲक्चुअरी) ह्यांचें चरित्र**

कापडी बांधणी; २५० पृष्ठें; दहा चित्रें, (एकांत सावरकर ह्यांचें हस्ताक्षर).

श्री. मराठे ह्यांची व्यापारी, औद्योगिक, राष्ट्रीय, सामाजिक, ललितकलाविषयक व वाङ्मयीन कामगिरी पुस्तकांत वर्णिली असून त्यांच्या विनोदी लेखांचे उतारेहि दिले आहेत.

**किंमत ४ रु., ट. पॅ. खर्च ४ आणे.**

शाळा-कॉलेजांतील व इतर खासगी नसलेल्या खात्रीलायक ग्रन्थालयांस संक्रांतीच्या पूर्वी मागणी आल्यास ट. ख. सह केवळ ८ आणे (आगाऊ रोख).

पत्ता:—

श्री. मराठे, ॲक्चुअरी, पोस्ट पुणें नं. ४




पुणें येथें मिळेल:—
१ वि. स. लेले, ४२५ नारायण पेठ, पुणें नं. २.
२ मेसर्स ल. ना. गोडबोले, बुकसेलर, पुणें २.

सर्व तऱ्हेची कापड छपाई व रंगाई (Calico Printing and Dyeing) करणारा कारखाना.

**' पायोनियर डाइंग हाऊस '**

कोचाचें कापड (Casement cloth), दाराचे पडदे, टेबल कव्हर इ. टिकाऊ रंगाचे, स्वदेशी तयार मिळतात. कारखाना:—
भिकारदास मारुती रोड, दातेवाडी, पुणें.

**अर्थशास्त्र**

लेखक:—प्रो. वा. गो. काळे व प्रो. वृ. गो. कर्वे

**पृष्ठसंख्या सुमारें ३००, किंमत ३ रुपये**

या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

## "अर्था" चा पुढील अंक

अर्थाचा ता. १८ नोव्हेंबरचा अंक दिवाळीनिमित्त बंद राहील आणि त्यापुढील अंक ता. २५ रोजीं प्रसिद्ध होईल.

# विविध माहिती

### मागसलेल्या वर्गांच्या उन्नतीसाठीं प्रयत्न

मुंबई प्रांतांतील मागसलेल्या वर्गांच्या उद्धारासाठीं योजना हातीं घेण्याकरितां मुंबई सरकारनें आपल्या स्पेशल डेव्हलपमेंट फंडांतून २५ लक्ष रुपयांची तरतूद केली आहे. मागसलेल्या वर्गांस स्वतःचे पायांवर उभें रहातां येण्यास मदत व्हावी, ह्या दृष्टीनेंच ह्या रकमेचा विनियोग केला जाईल. ह्यासंबंधांत सरकारला सल्ला देण्याकरितां मध्यविभागाच्या कमिशनरच्या अध्यक्षत्वाखालीं एक कमिटी नेमण्यांत आली आहे.

### दिवाळीमध्यें दुकानें ज्यास्त वेळ उघडीं रहाणार

४ नोव्हेंबर ते १० नोव्हेंबर अखेर मेवामिठाई, फुलें, फळें, अत्तरें-तेलें, दागिने, फटाके, कांतडी सामान, कापड, हिशेबाच्या वह्या इत्यादींच्या विक्रीचीं व केंस कापण्याचीं दुकानें रात्रीं १० वाजेपर्यंत उघडीं ठेवण्यास परवानगी देण्यांत आली आहे.

### मुंबई प्रांतांत कामगारांच्या संख्येंत वाढ

मुंबई प्रांतांतील कारखान्यांमधील कामगारांची संख्या १९४१ सालीं १९४० च्या मानानें २७% वाढली, म्हणजे त्यांचे संख्येंत १,३१,३३९ ची भर पडली. कापडाच्या गिरण्यांतील कामगारांच्या वाढत्या संख्येमुळेंच मुख्यतः हा आकडा एवढा वाढला आहे. १९४० सालीं सर्व प्रकारच्या कारखान्यांत मिळून ४,८०,६०४ कामगार होते, ते आतां ६,११,९४३ झाले आहेत. स्त्री-कामगारांची संख्या ११½ हजारांनीं वाढली आहे. कारखान्यांची संख्या ३,३१८ ची ३,६२१ झाली; एकूण अपघातांची संख्या ११,९३८ वरून १५,०५४ वर गेली परंतु अपघातांचें एकूण कामगारांशीं पडणारें प्रमाण कमीच झालेलें आढळतें. अपघातांत एकूण १५,१४३ कामगारांना दुखापत झाली; १९४० सालीं ही संख्या ११,९९३ होती.

### गव्हाच्या साठ्यासाठीं १⅓ कोटि रुपये

पंजाब सरकारनें मोठ्या प्रमाणावर ठिकठिकाणीं गव्हाचा साठा करून ठेवण्याचें ठरविलें आहे व त्यासाठीं १ कोटि, ३१ लक्ष रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे. वहातुकीमध्यें व्यत्यय आल्यास गव्हाचा तुटवडा पडूं नये ह्यासाठीं ही व्यवस्था आहे.

### ताग लावणारांसाठीं १ कोटि रुपयांचें कर्ज

तागाची किंमत पडली असल्यामुळें आलेल्या आपत्तीस ताग लावणारांना तोंड देतां यावें, ह्यासाठीं त्यांना कर्ज देण्याकरितां बंगाल सरकारनें १ कोटि रुपयांचा विनियोग करण्याचें ठरविलें आहे.

### कपाशीची लागवड

हिंदुस्थानांतील कपाशीच्या लागवडीचे क्षेत्रांत चालू वर्षी १७% घट अपेक्षित आहे. अंदाजी लागवड १ कोटि, ६०½ लक्ष एकर इतकी आहे.

### चेक्सची देवघेव

मुंबई बँकर्स क्लिअरिंग हाउसमध्यें २३ ऑक्टोबर अखेरच्या आठवड्यांत २३ कोटि, ५६ लक्ष रुपये किंमतीच्या १,२४,८२२ चेक्सची देवघेव झाली.

### ६ लक्ष सैनिक सुखरूप पोचविले

सुमारें ६ लक्ष अमेरिकन सैनिक परदेशीं रवाना झाले ते सर्व सुरक्षितपणें इष्ट स्थळीं पोचले ह्याचें श्रेय अमेरिकन नाविक दलास आहे, असे उद्गार कॅप्टन व्हाइट ह्यांनीं नुकतेच काढले.

### रूझवेल्ट कुटुंबाचें युद्धकार्य

अमेरिकेचे अध्यक्ष मि. रूझवेल्ट हे स्वतः अमेरिकेचे कमांडर-इन-चीफ आहेत. मिसेस रूझवेल्ट इंग्लंडमध्यें धोक्याचे ठिकाणीं उपयुक्त कामगिरी करीत आहेत. त्यांचे चार मुलगे प्रत्यक्ष सैन्यांत दाखल झालेले आहेत.

### पुस्तकांची निर्गत

ग्रेट ब्रिटनमधून १९४१ मध्यें निर्गत झालेल्या पुस्तकांची किंमत ४० लक्ष पौंड भरली. १९३७ चे मानानें हा आकडा २५% नें मोठा आहे.

### व्होल्गा नदीवरील वहातुकीचें महत्त्व

रशियास समुद्रमार्गानें जाणाऱ्या मालापैकीं ७५% मालाची वहातूक व्होल्गा नदींतून होते. युद्धापूर्वी हें प्रमाण ५०% इतकें होतें. दक्षिणेकडून उत्तरेकडे जाणारा माल उत्तरेकडून खालीं येणाऱ्या मालाचे दुप्पट भरतो. १९२६ ते १९३९ ह्या मुदतींत व्होल्गा नदीवरील पांच प्रमुख औद्योगिक शहरांची वाढ मोठ्या प्रमाणावर झाली, त्यावरून व्होल्गाच्या खोऱ्याचें महत्त्व दिसून येतें.

| शहर | लोकसंख्येंत वाढ | |
|---|---|---|
| | १९२६ | १९३९ |
| गॉर्की | २,२२,००० | ६,४४,००० |
| कझान | १,७९,००० | ४,६१,००० |
| कुबिशेव | १,७५,००० | ३,९०,००० |
| साराटोव्ह | २,१९,००० | ३,७५,००० |
| स्टालिनग्राड | १,५१,००० | ४,४५,००० |

### अंड्यांची पूड

ग्रेट ब्रिटनमध्यें अंड्यांऐवजीं अंड्यांची पूड मिळूं लागली आहे. १२ अंड्यांच्या पुडीच्या डब्यास सुमारें १½ रुपया पडतो. दर दोन महिन्यांतून एक तरी डबा (१२ अंडीं) गिऱ्हाइकाच्या वांटणीस यावा अशी अपेक्षा आहे. युरोपांतून ताजीं अंडीं येण्याचें बंद झालें, त्याची जागा अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया व अर्जेंटिना येथून आणलेल्या अंड्यांच्या पुडीनें कांहीं अंशीं घेतली जाईल. आयर्लंडमधून अंडीं येऊं शकतात. पुडीच्या वहातुकीस जागा थोडी पुरते, कारण अंड्यांच्या एक षष्ठांश जागेंत ती मावूं शकते.

### शतायू लोक

शंभर वर्षांपेक्षां अधिक वयाचे लोक जर्मनींत शंभरहि नाहींत. इंग्लंडमध्यें ते १४६, फ्रान्समध्यें २१३ व स्पेनमध्यें ४१० आहेत.

### मार्शल टिमोशेंको

मार्शल टिमोशेंको हे वेल्श रक्ताचे आहेत असें वेल्सचें म्हणणें आहे, तर हे सेनानी डब्लिनचे, असें आयर्लंड म्हणतो. ह्या दोन्ही म्हणण्यांत एवढाच भाग खरा आहे, कीं त्या दोघांसहि सत्याचा आधार नाहीं! टिमोशेंको ह्यांचा जन्म बेसारेबिआमध्यें १८९५ सालीं झाला.

वर्ष ८ वें | अर्थ | अंक ४५ वा
बुधवार, ता. ११ नोव्हेंबर, १९४२

# अन्नसामुग्रीचा पुरवठा

मुंबई शहराचा अन्नसामुग्रीचा पुरवठा सर्वस्वी बाहेरून आयात होणाऱ्या मालावर अवलंबून असल्यानें त्याचें नियमन व व्यवस्था नीट होण्यासाठी खास योजना अमलांत आणणें आवश्यक आहे. ह्या दृष्टीनें प्रांतिक सरकारनें एक सल्लागार मंडळ नेमलें आहे, त्याची प्रास्तविक सभा मि. नाइट ह्यांचे अध्यक्षतेखाली गेल्या महिन्याच्या ३१ तारखेस मुंबई येथें भरली होती. अन्नसामुग्रीच्या पुरवठ्याबाबतची व्यवस्था सर्वस्वी सरकारच्या जबाबदारीच्या क्षेत्रांत येत असल्यानें सल्लागार मंडळाच्या कार्याची व्याप्ति व्यावहारिक स्वरूपाच्या सूचना करण्यास मर्यादित राहील ही मूलभूत कल्पना स्पष्ट करून सांगतांना मि. नाइट म्हणाले कीं, मंडळाच्या सल्ल्याचा सरकार अवश्य विचार करील आणि कांहीं बाबतींत तो स्वीकारणें शक्य किंवा इष्ट नसेल तेव्हां त्याचीं कारणें प्रकट केलीं जातील. औपचारिक रीतीचे ठराव करण्याऐवजी मंडळानें निरनिराळ्या प्रश्नांची चर्चा करणें अधिक श्रेयस्कर होईल असेंहि त्यांनीं सुचवलें. निरनिराळ्या खाद्यपदार्थांच्या खरेदी-विक्रीचे व्यवहार करणाऱ्या व्यापाऱ्यांच्या अनुभवाचा फायदा सल्लागार मंडळास व सरकारास मिळावा म्हणून त्यांचे गट करण्यांत यावे आणि गहूं, तांदूळ, साखर, भुइमूग, सरकी ह्या मालाच्या देवघेवींचे बाबतींत त्यांचा विचार घेण्यांत यावा. मंडळाची एक उपसमिति नेमण्यांत येऊन पुरवठा–अधिकाऱ्यांनीं महत्त्वाच्या प्रश्नांचे बाबतींत तिचा सल्ला घ्यावा असें मि. नाइट ह्यांच्या सूचनेवरून मंडळानें ठरवलें. मुंबई शहराची अन्नसामुग्रीच्या पुरवठ्याचे संबंधांत काय परिस्थिति आहे आणि तो पुरवठा कसा वाढवतां येईल ह्याविषयीं त्यांनीं माहिती दिली. व्यापारीवर्गाचें सहकार्य सरकारास पूर्णपणें हवें आहे, तरी युद्धासारख्या काळांत कित्येक बाबींत व्यापारी व्यवहारांचें नियंत्रण करणें अपरिहार्य होतें ह्याची जाणीव त्यांनीं करून दिली.

शेतीच्या मालाच्या विक्रीची नीट व्यवस्था लागावी ह्या हेतूनें प्रांतिक सरकारांनीं खास अधिकारी नेमले असून बाजारांच्या नियमनाचे, मालाच्या प्रतवारीचे व भावांच्या निश्चितीचे प्रश्न त्यांच्या कक्षेंत येतात. हे अधिकारी आणि मध्यवर्ती सरकारचें ह्याच विषयास वाहिलेलें खातें ह्यांचा विचारविनिमय वारंवार होऊन सर्वसाधारण धोरण ठरवलें जाणें इष्ट आहे हें उघड आहे. बाजार-नियमन-अधिकाऱ्यांची आठवी वार्षिक सभा दिल्ली येथें नुकतीच भरली होती. खाद्यपदार्थांच्या विक्रीचें नियंत्रण करण्यासाठी निरनिराळ्या प्रांतांत व संस्थानांत योजना अंमलांत आहेत त्यांचे बाबतींत अनेक अडचणी व भानगडी उपस्थित झाल्या आहेत, त्यांचें निराकरण होण्यास गहू वगैरे पदार्थांचें नियंत्रण एका ठराविक धोरणानें सर्वत्र सारखें व्हावें असें दिल्ली येथें भरलेल्या परिषदेनें सुचवलें आहे. निरनिराळ्या खाद्यपदार्थांच्या किंमती निश्चित करण्यासंबंधानें विशिष्ट विधायक शिफारसी ह्या ठरावांत परिषदेनें केल्या. बाजार-नियमन-अधिकारी महत्त्वाची माहिती पुरवठ्याच्या व इतर खात्यांस पुरवीत असतात, परंतु धोरण अंमलांत आणलें जातें त्यांत त्या तज्ज्ञांचा हात नसतो, ह्या परिस्थितींत सुधारणा केली जाण्याचें महत्त्व तिनें प्रतिपादलें. मालाची प्रतवारी लावण्यांत येणाऱ्या अडचणींचा विचार तीमध्यें झाला आणि शेतकऱ्यांच्या सहकारी संस्थांकडून करतां येण्यासारख्या कार्याचें दिग्दर्शन केलें गेलें. मालाची प्रत दर्शवणाऱ्या "अग मार्कची' अधिक प्रसिद्धि होऊन हीं चिन्हें धारण करणाऱ्या मालाची विक्री करणारांस उत्तेजन यावें आणि तुपाची प्रतवारी कशी लावण्यांत येते ह्याची माहिती देणारा चित्रपट तयार केला जावा अशा आशयाच्या सूचना करण्यांत आल्या. मालाचा पुरवठा व त्याचे बाजारभाव ह्यांचें नियमन होण्याचा प्रश्न किती भानगडीचा आहे आणि तो समाधानकारक रीतीनें सुटण्यास किती निरनिराळ्या बाबींची व्यवस्था लागली पाहिजे हें वरील माहितीवरून समजून येण्यास सहाय होईल. युद्ध–परिस्थितींत मालाचा पुरवठा व विक्री ह्यांचें नियमन, तें कितीहि अवघड असलें तरी, अपरिहार्य झालें आहे आणि तें जनतेच्या सोयीस व हितास पोषक होईल अशा रीतीनें केलें जाणें अगत्याचें आहे.

---

आमचे सर्व हितचिंतकांस
नवें वर्ष सुखाचें जावो.

# स्फुट विचार

### रणांगणांवरील हालचाली

स्टालिनग्राडच्या बचावासाठी रशियन फौजांनीं अतुल पराक्रम केला आहे. त्यानें प्रत्यक्ष जर्मनांसहि चकित करून सोडलें आहे. त्या विस्तृत शहरांतील प्रत्येक भाग, प्रत्येक कारखाना व प्रत्येक रस्ता रशियन लढवीत आहेत आणि शत्रूची गति व मति कुंठित करीत आहेत. स्टालिनग्राड हस्तगत करून व्होल्गा नदीवर आपली सरहद्द हिवाळ्यासाठी स्थिर करण्याचा हिटलरचा बेत रशियन लढवय्यांनीं हाणून पाडला आहे. कॉकेशस प्रांतांतहि जर्मन सैन्याचा प्रतिकार त्यांनीं यशस्वी रीतीनें चालवला असल्यानें त्याहि रणांगणावर हिटलरच्या पदरांत अपयशच पडलें आहे. इकडे इजिप्तमध्यें ब्रिटिश सैन्यानें चढाईचें धोरण स्वीकारलें असून इटालियन शहरांस व आरमारास ब्रिटिश विमानांचा तडाखा सहन करावा लागत आहे. एशियामध्यें अमेरिका व ऑस्ट्रेलिया ह्यांनीं जपानी फौजांवर चढाई करून शत्रूस स्वतःच्या बचावाची धडपड करण्यास भाग पाडलें आहे. न्यूगिनीमध्यें जपानची पिछेहाट चालली असून ऑस्ट्रेलिअन सैन्य त्यास कोकोडाच्या भागांत पलीकडे मार्गे रेटीत नेत आहे. सॉलोमन बेटांत अमेरिकेची सरशी आहे आणि जपानी आरमाराचें मोठें नुकसान झालें आहे. ब्रह्मदेशांतील जपानी ठाण्यांवर हिंदुस्थानांतून विमानांचे हल्ले यशस्वी रीतीनें चालले आहेत आणि तो देश शत्रूकडून जिंकण्याची तयारी ह्या देशांत झाली आहे. ह्या मोहिमेस उत्तर म्हणून जपाननें ब्रह्मदेशच्या आसपासच्या हिंदुस्थानांतील अमेरिकन विमानतळावर अलीकडे किरकोळ हल्ले केले आहेत, पण त्यांत म्हणण्यासारखें नुकसान झालें नसून ह्या देशांतील लढाईची तयारी शत्रूस जाणवूं लागल्याचें तें चिन्ह आहे. टेहळणी करणाऱ्या हिंदी सैन्याच्या टोळ्या ब्रह्मदेशांत घुसल्या आहेत.

---

### खंडकरी कायद्यांत दुरुस्ती

खंडानें शेती करणारीं कुळें आणि जमिनीचे मालक ह्यांचे परस्परांशीं होणारे खंडाबाबतचे करार कुळांस जाचक होऊं नयेत आणि खंडकऱ्यांस काढून टाकून किंवा त्यांचा खंड वाढवून मालकांनीं कुळांचें उपजीविकेचें साधन धोक्यांत आणूं नये म्हणून मुंबई सरकारनें कुळ संरक्षणासाठी एक कायदा केला आहे. ह्या कायद्याचा इष्ट हेतु साध्य व्हावा म्हणून मालक व खंडकरी ह्यांचेवर कांहीं निर्बंध घालण्यांत आले आहेत. सध्याच्या युद्धपरिस्थितींत खेडेगांवांतील लोक लढाईवर जातील आणि लष्करी नोकरी पत्करतील तेव्हां सदरहु निर्बंध पाळणें त्यांस अशक्य होऊन कायद्यानें त्यास दिलेल्या संरक्षणास जमीन मालक व खंडकरी मुकतील. युद्धाच्या कामगिरीवर जाणाऱ्या शेतकऱ्यांचें नुकसान ह्या रीतीनें होणें केव्हांहि अनिष्ट होय. ही गोष्ट लक्षांत आणून मुंबई सरकारनें कुळ संरक्षण कायद्यांत जरूर ती दुरुस्ती करून जमिनीचे मालक व खंडकरी ह्यांस देण्यांत आलेल्या सवलती नाहींशा होणार नाहींत अशी व्यवस्था करण्याचें ठरवलें असून त्या संबंधांतल्या दुरुस्तीचा खर्डा प्रसिद्ध केला आहे. खंडकरी लढाईच्या कामावर जातील तेव्हां त्यांस शेतें स्वतः कसतां न येऊन तीं दुसऱ्या कुळांस लावून द्यावीं लागतील. तसेंच मालकांस आपलीं शेतें जातीनें कसतां येणार नाहींत आणि तीं खंडानें द्यावीं लागतील. प्रचलित खंडकरी संरक्षण कायद्याच्या महत्त्वाच्या कलमांचें ह्या योगानें उल्लंघन होईल आणि कायदा निष्फळ होईल. लष्करी कामगिरी करून हे लोक परत येतील तेव्हां त्यांस कायद्यानें दिलेलें संरक्षण निश्चित मिळावें अशी योजना दुरुस्ती बिलांत सरकारनें सुचविली आहे आणि त्यासंबंधांत कोणाच्या कांहीं हरकती असल्यास त्या सरकारला १५ नोव्हेंबरच्या आंत कळवण्यांत याव्या असें जाहीर झालें आहे.

---

### पश्चिम किनाऱ्यावरील वहातूक

युद्धोपयोगी साहित्याच्या नेआणीस सध्याच्या परिस्थितींत हिंदी रेल्वेजवर अग्रतेची जागा दिली जाणें स्वाभाविक आहे. पेट्रोलच्या मर्यादित पुरवठ्यामुळें मोटार बसेसनीं मालाची वहातूक पूर्वीप्रमाणें होऊं शकत नाहीं ह्याहि कारणानें रेल्वेजवर ताण पडत आहे. जरूरीच्या जिनसांची नेआण, त्यांची देशभर योग्य प्रमाणांत वाटणी होण्यास, अगत्याची आहे. अशा स्थितींत वहातुकीच्या निरनिराळ्या साधनांचा अत्यंत काटकसरीनें उपयोग केला जाणें अत्यावश्यक आहे हें सांगावयास नको. रेल्वेजच्या वाघिणी किंवा मोटार बसेस ह्यांचा पुरवठा अपुरा होऊं लागला असतां शक्य तेथें बैलगाड्यांचा उपयोग मालाच्या वहातुकीसाठीं करण्यांत सोय आहे असेंहि कित्येक ठिकाणीं अनुभवास येत आहे. रॉकेलच्या ऐवजीं गोडें तेल जुन्या पद्धतीच्या किंवा नवीन तऱ्हेच्या बनवलेल्या दिव्यांमध्यें वापरण्याची कल्पना व्यावहारिक तारतम्याच्या दृष्टीनें जशी ग्राह्य ठरत आहे तशीच योजना वहातुकीच्या साधनांचे बाबतींतहि होणें क्रमप्राप्तच आहे. हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्यावर अनेक लहानमोठीं बंदरें असून त्यांचे दरम्यान पडावांतून मालाची नेआण होत असे ती अलीकडे रेल्वेजच्या स्पर्धेमुळें बंद किंवा मर्यादित झाली आहे. किनाऱ्यालगतच्या प्रदेशांत रेल्वेजच्या वहातुकीची सोय झाल्याकारणानें अर्थातच लहान बंदरांचें आणि होड्या-मचव्यांचें महत्त्व कमी झालें. परंतु आतां किनाऱ्यास लागून असलेल्या भागांत वहातुकीचें काम युद्धपरिस्थितींत नेहमीप्रमाणें करण्यास रेल्वेज असमर्थ झाल्या आहेत, तेव्हां होड्यांतून होणाऱ्या मालाच्या नेआणीच्या पद्धतीचें पुनरुज्जीवन करणें सोईस्कर व फायदेशीर होणार आहे ह्यांत शंका नाहीं. ही गोष्ट हिंदुस्थान सरकारच्या नजरेस आणली जाऊन तिचे संबंधांत चौकशी झाली आहे. सरकारनें उत्तेजन दिलें असतां किनाऱ्यालगतच्या भागास मालपुरवठ्याचें कार्य होड्यांचे मार्फत करतां येऊन रेल्वेजवरचा सध्याचा ताण हलका होईल अशा आशयाची शिफारस ह्या चौकशीमधून बाहेर आली आहे असें समजतें. ह्यासंबंधांत एखादी व्यापक योजना निश्चित होऊन तिची अंमलबजावणी लवकर चालू होईल अशी अपेक्षा आहे. तिच्यामध्यें होड्यांचे मालक जरूर तो भाग घेऊन ती यशस्वी होण्यास सहाय करतील असें समजण्यास हरकत नाहीं.

---

### गरीबांसाठी स्वस्त कापड

गरीब आणि मध्यम स्थितींतल्या लोकांच्या उपयोगासाठी सामान्य प्रतीचें व स्वस्त कापड तयार करवून तें पुरवण्याची योजना हिंदुस्थान सरकार अमलांत आणीत असल्याचें वृत्त कांहीं आठवड्यांमागें प्रसिद्ध झालें होतें. परंतु प्रसिद्ध झालेल्या ताज्या बातमीवरून असें दिसतें कीं त्या कामीं अजून प्रगति झालेली नाहीं. हिंदुस्थान सरकारचे व्यापारमंत्री सदरहु प्रश्नाचा विचार करीत असून आपली विशिष्ट योजना येत्या डिसेंबर महिन्यांत मुंबई गिरणी मालकांचेपुढें चर्चेसाठी मांडणार आहेत असें समजतें. कित्येक प्रांतिक सरकारांनीं ह्यापूर्वींच ठराविक नमुन्याचें स्वस्त कापड तयार होऊन मिळण्याच्या ऑर्डरी दिलेल्या आहेत, त्या पुऱ्या होण्याची तजवीज व्यापारमंत्री सध्या करीत आहेत. हा कार्यक्रम येत्या जानेवारींत पुरा होईल अशी अपेक्षा आहे. ह्या कापडाच्या उत्पादनास लागलेल्या भांडवलाचा पुरवठा आणि तयार होणाऱ्या मालाचा खप ह्यांविषयीं प्रांतिक सरकारांची काय योजना आहे ह्यासंबंधांत पत्रव्यवहारी चर्चा लवकरच चालू होणार आहे असेंहि कळतें. प्रांतिक सरकारांच्या ऑर्डरींचा निकाल लागला म्हणजे त्यांच्या मुळाशीं असलेली कल्पना सोडून देण्यांत येईल आणि गरीब व मध्यम परिस्थितींतल्या लोकांच्या उपयोगासाठीं गिरण्यांत स्वस्त कापड काढलें जाण्याची नवीन व्यवस्था चालू करण्यांत येईल असेंहि सांगण्यांत येत आहे. गिरण्यांनीं अधिक तास काम केलें आणि त्यांस यंत्रांच्या झीजेचा जादा खर्च कराच्या आकारणींत विचारांत घेतला जाण्याची सवलत मिळाल्यास त्यांमध्यें स्वस्त कापड बनवलें जाण्यास अडचण येणार नाहीं अशी अपेक्षा आहे. बिनलष्करी उपयोगाला लागणाऱ्या कापडाच्या पुरवठ्याची व्यवस्था ह्या रीतीनें समाधानकारक होऊं शकेल असें सांगण्यांत येत आहे. उत्पादनाचे मार्गांत सुताच्या पुरवठ्याचा तुटवडा व्यत्यय आणूं शकणार नाहीं अशी समजूत आहे आणि लष्करी तंबूंच्या बनावटींत कापसाच्या सुताचे ऐवजीं दुसरा कच्चा माल वापरला जाण्याच्या शक्यतेचीहि चौकशी करण्यांत येईल असा रंग आहे. गोरगरिबांसाठी धडधाकट व स्वस्त कापड तयार होऊन विकलें जाण्याचा प्रश्न अत्यंत निकडीचा आहे. त्या दृष्टीनें विचाराच्या, पत्रव्यवहाराच्या व चर्चेच्या चाकारीमधून बाहेर पडून तो लवकर निकालांत निघणें अगत्याचें आहे. ह्या कामीं अगोदर बराच वेळ खर्ची पडला आहे; आतां निश्चित व्यवस्था अमलांत आली पाहिजे.

---

### हिंदी विमा कायद्यांत दुरुस्ती करण्याची मागणी

हिंदी विमा कायद्याच्या २७ व्या कलमाच्या अर्थासंबंधानें हिंदी विमा कंपन्या व हिंदुस्थान सरकार ह्यांचेमध्यें वाद उत्पन्न होऊन त्याचा निवाडा अखेर कोर्टांमार्फत करून घेण्याचें उभयपक्षीं ठरलें. त्यास अनुसरून मुंबई हायकोर्टांत हा प्रश्न उपस्थित करण्यांत आला, परंतु हायकोर्टाचा निवाडा विमा कंपन्यांस प्रतिकूल झाला. वादाचा विषय झालेलें कलम विमा कंपन्यांनीं सरकारी रोख्यांत किती रकम गुंतवावी ह्यासंबंधाचें आहे आणि विशेषतः नवीन कंपन्यांना तें जाचक होणारें आहे. ह्याविषयींची हकीकत "अर्था"मध्यें येऊन गेलेलीच आहे. सरकारी ॲक्चुअरीनें केलेलाच अर्थ आतां कायम झाला आहे. तेव्हां, २७ वें कलम बदलणें हाच ह्यानंतर उपाय उरलेला आहे. ५५% रकम रोख्यांत गुंतविण्याचें कंपन्यांवरील बंधन ढिलें करण्यासाठी कलमांत दुरुस्ती करण्याचें सरकारनें ठरवावें अशी मागणी विमा कंपन्यांनीं सुरू केली आहे. म्हणजे, ह्या प्रश्नास आतां वेगळेंच वळण लागणार आहे आणि गुंतवणुकीच्या प्रमाणाचा फेरविचार करण्याच्या आवश्यकतेसंबंधीं चर्चेस त्यामुळें प्रारंभ होईल. कलमाची अंमलबजावणी करण्याची चार वर्षांची मुदत तरी बरीच वाढवावी, असें कंपन्यांचें म्हणणें आहे. अर्थात्, हें करण्यासहि विमा कायदा दुरुस्त करावा लागेल, हें उघड आहे.

---

### जर्मनीमधील रक्तदानाची व्यवस्था

जर्मनीमधील रक्तदानाच्या व्यवस्थेसंबंधीं माहिती प्रसिद्ध झाली आहे. प्रत्येक १,००० नागरिकांस रक्तदान करणारा एक दाता लागतो, ह्या हिशेबानें सबंध जर्मनीसाठी ६०,००० दाते लागतील. इस्पितळांची संख्या ३,००० आहे, ह्या हिशेबानें प्रत्येक इस्पितळास २० दाते हवेत. ह्या दात्यांचें प्रमाण साधारणतः जनतेच्या रक्ताच्या प्रकाराचे प्रमाणांतच ( ओ गट–४०%; ए गट–४०%; बी गट–१५%; एबी गट ५–% ) असावेत. २१ ते ५० वयाच्या दात्यांचें रक्त तपासण्यांत येतें. रक्तदाते पास झाल्यावर त्यांस त्यांच्या रक्ताच्या प्रकाराप्रमाणें वेगवेगळ्या रंगाचें कार्ड देण्यांत येतें त्यावर त्यांचा फोटो, त्यांच्या रक्ताचा प्रकार, इत्यादींची माहिती देण्यांत येते. दात्यास पहिल्या १०० सी. सी. रक्तास १० मार्क व पुढील प्रत्येक १०० सी. सी. रक्तास ५ मार्क अशी रकम देण्यांत येते. ह्याखेरीज त्यांना येण्याजाण्याचा खर्च व त्यांचें रोजगाराचें झालेलें नुकसान हींहि देण्यांत येतात. रक्ताचा ज्यास उपयोग होतो, त्यास तो ऐपतवाला असल्यास हा खर्च भरावा लागतो. त्याचा विमा उतरलेला असल्यास विमा कंपनी तो खर्च देतें व त्यास ऐपत नसली तर सरकार त्या खर्चाची जबाबदारी घेतें. २०० सी. सी. पेक्षा जास्त रक्त देणारांना रक्तांतराच्या दिवसापासून पुढें १५ दिवस मांस व इतर अन्न अधिक प्रमाणांत मिळावें, अशी तरतूद केलेली असते.

---

### हिंदुस्थानांत युद्धसामुग्रीची खरेदी

युद्धाच्या आरंभापासून १९४१ च्या डिसेंबर अखेरपर्यंत लढाऊ सामानाची खरेदी हिंदुस्थानांत करण्यांत आली, त्याची एकूण किंमत २३० कोटि रुपये भरली. ह्या मालाची वर्गवारी खालीं दिल्याप्रमाणें होतीः—

| | कोटि रुपये |
|---|---|
| इंजिनिअरिंग, लोखंडी व पोलादी सामान | ९७·७ |
| कापसाचें कापड | ५०·४ |
| लोकरीचें कापड | १७·६ |
| इतर कापड | २८·८ |
| अन्नसामुग्री | १६·२ |
| कातड्याचें सामान | १०·२ |
| लाकूड व लाकडाचें सामान | ९·२ |
| | रुपये २३०·१ कोटि |


---

## दि अल्फा केमिकल्स लि., पुणें

मेसर्स एस. व्ही. सुपनेकर, कुलकर्णी आणि सन्स लि. हे पूर्वी केमिकल्स तयार करण्याचा धंदा करीत होते. हा धंदा किफायतशीर होऊं लागल्यानंतर त्यांचें ता. २४ ऑक्टोबर १९४२ रोजीं वरील प्रायव्हेट लिमिटेड कंपनीमध्यें रूपांतर करण्यांत आलें. कंपनीच्या बोर्डामध्यें शेठ काकूभाई ऊर्फ द्वारकादास वखारिया, जे. पी. (मुंबई), डॉ. रा. ह. भडकमकर ( पुणें ), शेठ कालीचंद भाइदास, एजंट बर्माशेल ( सातारा ), श्री. राम रगबीर, बी. एस. (अमेरिका) ( पुणें ) व श्री. रा. रा. गो. कुबेर, बी. ए., एलएल. बी. ( सातारा ) ही मंडळी असून शेठ काकूभाई बोर्डाचे अध्यक्ष आहेत. मॅनेजिंग एजन्टस एस. व्ही. सुपनेकर, कुलकर्णी ॲन्ड सन्स ह्यांचेतर्फे बोर्डावर श्री. श्री. ल. फणसळकर, ( शास्त्रीय ज्ञानाच्या अनेक पाश्चात्य पदव्या मिळविलेले ) डॉ. डी. आर. भवाळकर, एम. एससी., पीएच. डी., व श्री. रा. द. सुपनेकर, बी. ए., एलएल. बी. हे काम करीत आहेत. डायरेक्टरांपैकीं अध्यक्षांचा स्वतःचा केमिकल्सचा मोठा व्यापार आहे. श्री. रगबीर हे केमिकल्सच्या धंद्यांतील तज्ज्ञ आहेत. श्री. फणसळकर व डॉ. भवाळकर हे ह्या धंद्यांतील वाकबगार म्हणून प्रसिद्ध आहेत. कंपनीचा कारखाना पुणें येथें चालू आहे. कंपनीचें अधिकृत भांडवल ५ लक्ष रुपयांचें आहे. डायरेक्टरांनीं प्रत्येकीं १२ हजारांचे भाग घेतलेले आहेत व मॅनेजिंग एजंटांनीं एकूण ५० हजारांचे भाग घेतले आहेत. सुरवातीस बेरियम सल्फाइड, बेरियम क्लोराइड, वगैरे सॉल्टस व प्लॅस्टर ऑफ पॅरिस, पोटॅशिअम परमँगॅनेट हीं केमिकल्स तयार होत आहेत. कंपनीच्या व्यवहारकुशल चेअरमनचे नेतृत्वाखालीं व कर्तबगार मॅनेजिंग एजन्सीचे देखरेखीखालीं कंपनी यशस्वी होईल, ह्याविषयीं विश्वास वाटतो.

## प्रुफें कशीं तपासावींत ?

"प्रुफें नीट समोर धरावींत, म्हणजे मजकूर स्पष्ट वाचतां येतो. वाचतांना एकाग्रता ठेवावी; दुसरीकडे लक्ष जाऊं देऊं नये. मध्यें थांबावें लागलेंच, तर जेथवर प्रुफ वाचून झालें असेल तेथें बारीक खूण करावी व पुनः वाचावयास प्रारंभ करतांना त्याचे वरील ओळीपासून सुरवात करावी. शब्दकोश, वगैरे बघावयाचा असल्यास गॅली सबंध वाचून झाल्यावरच उठावें. प्रत्येक स्वल्पविरामसुद्धां काळजीपूर्वक पहावा. हेडिंगकडे दुर्लक्ष करूं नये. पुनर्मुद्रणाचीं प्रुफें असतील, तर मुळांतील अक्षरांप्रमाणेंच नवा कंपोज आहे किंवा नाहीं हें नीट पहावें. खिळे जुळविणारानें एखादा शब्द प्रुफांत मूळ कॉपीपेक्षां अधिक घातला असला तर त्यानें बिघडत नाहीं अथवा तो सयुक्तिक आहे म्हणून पुढें जाऊं नका. लेखकाचें त्याकडे लक्ष वेधा. पुष्कळ वेळा वाचण्याच्या भरांत नसलेले व गळलेले शब्दहि वाचून जाण्याचा संभव असतो. ह्यासाठीं दक्षता बाळगा. तारीख व वार हीं नीट तपासून पहा. " बुधवार, ता. ११ नोव्हेंबर " असें प्रुफांत असल्यास बुधवारीं ११ तारीखच येते किंवा नाहीं, हें कॅलेंडरांत बघा. संदर्भावरून कोणता वार व तारीख अभिप्रेत आहे हें न कळल्यास लेखकाकडे चौकशी करा. ब्लॉक योग्य ठिकाणीं लेखकाचे इच्छेप्रमाणें उठविले जातात किंवा नाहीं हें पहा. ब्लॉकवरील मजकूर ब्लॉकविषयींच आहेना, हें तपासून पहा. बेरजा, वजाबाक्या इत्यादि कसोशीनें ताडून पहा. ढोळे बिघडणार नाहींत, ह्याबद्दल काळजी घ्या. चुका सांपडणें हें रोजच्या सवयीनें चटकन साधतें."


**N. V. WADNERKAR**

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver, Electro-plater & Manufacturer of Sporting Trophies, Medals, Cups etc.

- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -

POONA CITY.

# ॲक्चुअरीच्या खाजगी धंद्याची राष्ट्रीय कामगिरी

( श्री. ग. स. मराठे, एम. ए., ए. आय. ए., ॲक्चुअरी, ह्यांच्या ज्युबिलीचे निमित्तानें नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या चरित्र-ग्रंथांतून त्यांचे खालील अनुभव उद्धृत केले आहेत. )

### प्रीमियमचे दर तयार करणें

१९१२ च्या कायद्याप्रमाणें पाहतां प्रीमियमचे दर ॲक्चुअरीकडून करवून घेतले पाहिजेत अशी सक्ती नव्हती. पण नव्या कंपन्यांनीं ॲक्चुअरीकडून दर बनवून घेण्याची इष्ट अशी रूढी पाडली. त्या रूढीचा फायदा घेऊन बाबासाहेबांनीं विमा कंपन्यांच्या मनावर आपली शिकस्त करून असें बिंबवण्याचा प्रयत्न केला कीं, हलके किंवा कमी दर ठेवण्यानें व्यवहार जास्ती मिळेल असें वाटतें पण ती फार धोक्याची गोष्ट आहे. प्रीमिअममध्यें खर्चाची तरतूद असते तीहून अधिक खर्च कंपनीचा होतोच त्यामुळें एक व व्हॅल्युएशनमध्यें विमेदारांचे पुढें येणारे प्रीमिअम येणें म्हणून धरले जातात, व जितके प्रीमिअम मोठे तितकें येणें अधिक म्हणून दुसरें, अशा कारणांनीं विम्याचे दर जरा मोठेच ठेवावे. प्रीमिअम तयार करितांना तीन गोष्टी लक्षांत घ्यावयाच्या असतात. ठराविक विम्याची रक्कम मृत्यु येतांच किंवा मुदत भरल्यावर देण्यासाठीं एक अंश ठेवावयाचा असतो. हाच सगळ्यांत मोठा असतो. नंतर कंपनीच्या खर्चाकरितां म्हणून एक अंश ठरवावयाचा असतो. हा कंपनीची घटना वगैरे लक्षांत घेऊन तारतम्यानें ठरवावयाचा असतो. यांत प्रत्येक कंपनीचे बाबतींत फेरबदल होतो पण तो थोड्या प्रमाणांत असतो. आणि तिसरा अंश बोनस देतां यावें म्हणून असतो, व दर लहान-मोठे होणें हें हा अंश कमी-अधिक करण्यावर बरेंच अवलंबून असतें. अर्थात् तें थोड्या मर्यादेंत कंपनीच्या इच्छेवर ठेवणें शक्य असतें. विमेदारांचे पैसेसुद्धां देतां येणार नाहींत इतके प्रीमिअम कमी करणें म्हणजे त्यांचें शास्त्रीयत्व नष्ट करण्यासारखें आहे व तें ॲक्चुअरी करणार नाहींत. बाबासाहेबांनीं मध्यम दर्जाचे तरी प्रीमिअम कंपन्यांना स्वीकारावयास लाविलें ही त्यांची राष्ट्रीय कामगिरी म्हणतां येईल, कारण जर याहून हलक्या दरांनीं कंपन्या काम करत्या तर एव्हांना त्यांतल्या कित्येक रसातळाला गेल्या असत्या.

### परकी कंपन्यांशीं चढाओढ

परकी कंपन्यांना मिळणारे विमेदार युरोपिअन व श्रीमंत हिंदी लोक असल्यामुळें दर विमेदारामागें विम्याच्या रकमेचें सरासरी प्रमाण त्यांचें हिंदी कंपन्यांच्या निदान दुप्पट असें, व कंपनीच्या खर्चाच्या कांहीं बाबी विम्याच्या रकमेवर अवलंबून न रहातां विमेदारांच्या संख्येवर अवलंबून असल्यामुळें, व्यवहारांतील खर्चाचें प्रीमिअमशीं प्रमाण परकी कंपन्यांत कमी राही. यामुळें मध्यम व लहान कंपन्यांना परकी विमा कंपन्यांशीं टक्कर देणें कठीण जाई. चढाओढीमध्यें पहिल्या धक्क्याला टिकावयाचें असेल तर पैसा ओतावा लागतो. देशी विमा कंपन्यांचें भांडवलहि तुटपुंजें. ओरिएंटल कंपनीनें कोणत्याहि परकी कंपन्यांच्या तोडीचें नांव कमावलें होतें व ध्येय या दृष्टीनें ओरिएंटलशीं बरोबरी करणें एवढें सगळ्यांना पुरें होतें.

### डिव्हायडिंग सोसायट्या

मेंबरकडून पैसे जमतील त्यांतले खर्चापुरते व कांहीं रिझर्व्ह म्हणून काढून ठेवून उरलेले ठराविक ( १२, ६, ३ किंवा १ महिने ) मुदतींत मृत्यू होतील तेवढ्यांत वाटून घावयाचे. यामुळें मरणाऱ्याच्या वारसांना कांहीं सोसायट्यांत खूप मोठाल्या रकमा मिळत. या योजनेंत दोष असा कीं, विम्यासारखी यांत पुढची तरतूद कांहीं नसे, किंवा कांहीं कंपन्यांनीं तशी करण्याचें सोंग आणून योजना केली तरी ती शास्त्रीय नसे, त्यामुळें वर्षानुवर्षे रकमा भरलेल्यांना शेवटीं पस्तावण्याची पाळी आली. असल्या कंपन्यांचें मधून मधून पीकच येई, त्यांचे उत्पादक लोक आलेल्या पैशांतून उधळपट्टीचा कारभार करीत, व पुढें अडचण आली म्हणजे खांका वर करीत. अशा कंपन्या नव्या कायद्याअन्वयें बेकायदेशीर ठरल्या आहेत.

### रोख्यांच्या किंमतींत घट

आयुर्विमा कंपन्या आपलें पुष्कळसें भांडवल सरकारी रोखे व शेअर बाजारांतील चांगल्यापैकीं रोखे यांत गुंतवीत. कैसरकृत लढाईच्या काळांत ह्या रोख्यांची बाजार किंमत ढासळली ती इतकी कीं एकदां १०० च्या रोख्याची ५२ पर्यंत उतरली. अशा वेळीं व्हॅल्युएशन करतांनाच सवलतीचें धोरण शास्त्रीय आधारानें व सरकारच्या संमतीनेंच ठेवावें लागलें. परंतु जनतेचा विश्वास कांहीं काळ उडाला होता.

### मृत्युसंख्येच्या प्रमाणांत वाढ

लढाई, इन्फ्लुएंझा, प्लेग, दुष्काळ वगैरे कारणांनीं मधून मधून मृत्युसंख्येचें प्रमाण वाढलें, तथापि एकंदर बहुजनसमाजावर वरील गोष्टींचा जितका परिणाम झाला त्या मानानें विमा उतरलेल्या लोकांत बराच कमी झाला. आणि जो झाला त्याचा विशेष ताण विमा कंपन्यांवर पडल्याचें वेगळें दिसून आलें नाहीं. तसें म्हटलें तर या दृष्टीनें ॲक्चुअरी लोकांनीं संशोधनच केलें नाहीं, कारण झाला हा भूतकाळचा प्रकार. तो भविष्यकाळीं पुन्हां विशेष त्रास देईल अशी अपेक्षा नव्हती. रोगादिकांनीं मृत्यू अधिक झाल्यानें क्लेमची रक्कम हिशेबापेक्षां जरा अधिक यावी लागून शिल्लक कमी झाली. ह्या अडचणीचा परिणाम कंपन्यांवर थोडीं वर्षेंच झाला.

### मॅनेजरांचें अज्ञान

कोणत्याहि औद्योगिक धंद्याचा चालक त्यांतील तज्ज्ञ असावा लागतो हें सर्वमान्य आहे, पण अशी समजूत पुष्कळांची कीं, बँका व विमा कंपन्यांच्या अधिकाऱ्याच्या खुर्चीवर बसलें कीं, ताबडतोब काम करण्याची पात्रता येते, निदान एजंटाला जें सर्वसाधारण ज्ञान असतें तेवढें असलें म्हणजे तें विमा कंपनीचा मॅनेजर व्हावयास पुरें असतें, व अशा समजुतीमुळें जो पैसे गोळा करूं शकेल तो मॅनेजरच्या खुर्चीवर बसण्यास सर्वथैव पात्र ठरतो, फारतर विम्याचे एजंटाच्या कामाची त्याला थोडीशी माहिती असावी. बाबासाहेबांनीं एका इंग्रजी मासिकाला लिहिलेल्या लेखांत लिहिल्याप्रमाणें विमा कंपनीच्या कार्यकर्त्याला पुढील सर्व विषयांचें थोडथोडें व पहिल्या पांचांचें तरी उत्तम ज्ञान असणें आवश्यक आहे.

१ प्रॉस्पेक्टसमधील माहिती, २ पत्रव्यवहार व ऑफिसचें काम ३ एजंटाची कामगिरी, स्वभाव, प्राप्ति इ०, ४ विम्याचा कायदा

व कंपन्यांचा कायदा, ५ पैसे व्याजीं लावणें, ६ विमाशास्त्राचीं मूलतत्त्वें, ७ विमा कंपन्यांचे हिशेब, ८ जाहिराती ( थोड्या खर्चांत पुष्कळ उपयोग ), ९ आरोग्य व रोगांचीं लक्षणें.

असें ज्ञान असून बोलण्यांत चातुर्य, मोहकपणा, विश्वास वगैरे पाहिजेतच. पण असे मॅनेजर फारच थोडे सांपडतात. राजकीय आंदोलनें थांबल्यावर त्यांत लोकप्रिय झालेल्यांकडून म्हणा, किंवा कंपन्यांतुन निघालेल्या एजंटांकडून म्हणा, पैसे जमवून नव्या कंपन्या निघावयास लागल्या. ( सुमारें पंचवीस वर्षांपूर्वी अशी एक कल्पना होती कीं, आयुष्याच्या विम्याची कंपनी कधीं बुडत नाहीं ! ही कल्पनाच मूर्खपणाची आहे; पण कितीतरी सुशिक्षितांनासुद्धां ती खरी वाटे. ) अशा कंपन्यांचीं सूत्रें भांडवलवाला म्हणेल त्याच्या हातीं. विमा कंपनींत असें होतें कीं, पांच वर्षे भरेपर्यंत विमेदार पैसे भरीत रहातात व त्यानंतर कंपनीचें लक्षण कळलें तर बरें, नाहीं तर आणखी हप्ते भरीत राहणें भाग आहे, व इकडे अडाणी कारभार चालूच असतो. शेअरहोल्डर ( भागीदार ) यांनीं मनावर घेतलें तर कांहीं होईल; पण त्यांना खटपटी करावयास सवड नसते व कोणाला असली तर त्याच्याविरुद्ध कांहीं तरी उभें करावयाला मॅनेजिंग एजंट तयार असतात. कराराप्रमाणें मॅनेजिंग एजंट्सना फार अधिकार असत. विमा कंपन्यांचे प्रगतींत ही एक मोठी अडचण होती. नव्या कायद्यानें मॅनेजिंग एजंट्स होणें मना झालें आहे पण एक एका व्यक्तीला करार करून बरेच अधिकार घेतां येतात. मॅनेजिंग एजन्सीचें कमिशन विम्यांच्या हप्त्यांची रक्कम जमेल त्यावर असे, तेव्हां कोणीकडून विम्यांची रक्कम वाढवावयाची, पुढचें पुढें पाहतां येईल !

### पहिलें व्हॅल्युएशन

अर्थात् पहिल्या पांच वर्षांत उत्तम अनुभवी मॅनेजर असला तरी तारांबळ उडते व सर्व ठीकठाक जमेपर्यंत पैशावर कमी अधिक ताण पडतोच. तेव्हां पहिलें व्हॅल्युएशन जरा सौम्य पायावर करून त्यांतल्या त्यांत योग्य उपदेश करून चालत्या पायावर ठेवावें लागे. पहिल्या व्हॅल्युएशनला अनुकूल परिस्थिति व काटकसरीची व्यवस्था यामुळें आपोआपच निकाल चांगला झालेल्या कंपन्या अगदीं थोड्या. त्या थोड्यांत, वेस्टर्न इंडिया, लक्ष्मी, कॉमनवेल्थ युनायटेड इंडिया, या उल्लेख करण्यासारख्या आहेत. पहिल्या व्हॅल्युएशनला सवलत देणें हें सगळीकडेच मान्य आहे. तरी पण ही सवलत कोठपर्यंत असावी हा प्रश्न आहे. पहिल्याच व्हॅल्युएशनला बोनस पाहिजे अशी कित्येकांची इच्छा होती. बोनस म्हटलें म्हणजे, हप्ता वाढविल्याशिवाय विमा वाढविणें व त्या बाबतींत कंपनीवर आर्थिक बोजा ओढवून घेणें होय, व या बाबतींत बाबासाहेब फार सावधगिरी घेत. पहिल्या व्हॅल्युएशननंतरच्या दुसऱ्या व पुढील व्हॅल्युएशनमध्यें पहिल्या सबबी तितक्याशा चालत नाहींत. तरी पण कित्येक कंपन्यांचें तेंच रडगाणें असे. पण लहान मुलांना व अडाणी श्रमजीवि लोकांना जसें विशेष प्रेमानें वागवावें लागतें त्याप्रमाणें उद्योगधंद्यांतील नव्या प्रयत्नांनाहि करड्या अंमलांत वागवून भागत नाहीं. रागें भरणें, समजूत घालणें, कान उपटणें, असें कांहीं तरी करून पुढें ढकलावें लागतें.

### नव्या कंपन्यांस सवलत

वरील अडचणींमुळें बाबासाहेबांचें काम अवघड झालें. १९२७ नंतर नवीन निघालेल्या कंपन्यांच्या बाबतींत बाबासाहेबांनीं क्वचित् सौम्यपणा दाखविण्यास सुरवात केली ही गोष्ट खरी, पण एकतर वर सांगितल्याप्रमाणें मधून मधून विशेष कारणांनीं परिस्थिति चमत्कारिक होत असे, व दुसरें म्हणजे या वेळेपासून विम्याचा नवा कायदा करण्याचा सरकारचा विचार चालू होता. विम्याचा कायदा पास झाल्यावर कडक नियम चालू होतील, पण व्हॅल्युएशन्समधले अंतर पांच वर्षांचें असल्यानें तितकी सवड कंपन्यांना सुधारणा करण्यास मिळेल या हेतुनें १९३४-३५ नंतर व्हॅल्युशनचे हिशेब करण्यांत थोडासा बाबासाहेबांनीं सौम्यपणा धरला. विम्याचा कायदा असा सदोष आहे कीं, विमा कंपनी सदृढ रीतीनें चालत नसली तर ती एक तर दुसऱ्या कंपनीच्या खुषीनें त्या कंपनींत मिसळली तरी पाहिजे, नाहीं तर बुडविली तरी पाहिजे. ती बुडविली म्हणजे विमेदारांचें अत्यंत नुकसान होतें. विम्याचा फायदा तर समूळ जातोच, पण भरलेल्या पैशांपैकीं फारच थोडा भाग विमेदारांच्या हातीं लागतो. १९२० पासून १९३५ पर्यंत असल्या नव्या व दुबळ्या कंपन्याच फार होत्या व त्या बुडविणें म्हणजे एक मोठी राष्ट्रीय आपत्तीच झाली असती. खरें म्हटलें तर कायद्यांतच निराळी सोय करतां येणें शक्य होतें असें बाबासाहेबांस वाटतें. अशी जर कायद्यांत सुधारणा केली तर ॲक्चुअरींनाहि सौम्यपणाचा अवलंब करण्याचें कारण पडणार नाहीं.


## दि लाइट अॅन्ड पॉवर सप्लायर्स लि., पुणें.

: अध्यक्ष :
श्री. गणेश सदाशिव मराठे,
एम्. ए., ए. आय. ए., ॲक्चुअरी.

: मॅनेजिंग एजन्ट्स :
मे. इंडस्ट्रियल सर्व्हिस, लि.

★ पालघर येथील पावर हाऊस पुरें होऊन गांवाला वीजपुरवठा होऊं लागला आहे.
★ अथणी येथील पावर हाऊसचें काम पुरें होत आलें असून, थोड्याच मुदतींत वीजपुरवठा करतां येईल असा भरंवसा वाटतो.
★ कंपनीची शेअर्सची विक्री चालू असून ठराविक मुदतीच्या ठेवी स्वीकारण्यांत येतात.

के. व्ही. साने, बी. ई., मॅनेजिंग डायरेक्टर.

## हिंदुस्थानचें औद्योगीकरण

हिंदुस्थानची लोकसंख्या दर खानेसुमारीस वाढत चालली असून संपत्तीच्या उत्पादनाची कार्यक्षमता व फलद्रूपता ह्यांमध्यें त्या प्रमाणांत सुधारणा होत नसल्यानें जनतेच्या रहाणीच्या मानांत प्रगति होण्याचे ऐवजी तें खालावण्याची भीति भेडसावीत आहे. बहुसंख्य हिंदी लोकांचें शेतीच्या धंद्यावरचें अवलंबन हा ह्या देशाच्या आर्थिक घटनेचा ठळक दोष असल्याविषयीं येथील पुढाऱ्यांनीं मत व्यक्त केलें असून लहानमोठ्या उद्योगधंद्यांस उत्तेजन देऊन त्यांची वाढ करण्याचें अगत्य त्यांनीं आज अनेक वर्षे प्रतिपादलें आहे. खुल्या व्यापाराचें तत्त्व हिंदुस्थानच्या परिस्थितीस गैरलागू आहे आणि स्वदेशी धंद्यांस प्रत्यक्ष रीतीनें सहाय देणें हें राज्यकर्त्यांनीं आपलें कर्तव्य समजलें पाहिजे ह्या मुद्यावर औद्योगिक संरक्षणाचें धोरण अखेर अंगीकारणें सरकारास लोकमताच्या टोचणीनें आवश्यक झालें आणि पोलाद, साखर, कागद, काड्याच्या पेट्या इत्यादि स्वदेशी धंद्यांचा उदय व विस्तार होण्यास ही नवी भूमिका उपकारक ठरली आहे. अलीकडच्या युद्धपरिस्थितीनें हिंदुस्थानांत मोठमोठे कारखाने स्थापन होण्याचें महत्त्व बिनतोड रीतीनें सिद्ध केलें असून सरकारचें औद्योगिक धोरण अधिक धडाडीचें होणें अगत्याचें आहे ह्याची खात्री आतां सर्व बाजूंनीं पटली आहे. तरीहि ह्या बाबतींतली प्रत्यक्ष कृति असावी तशी पुरोगामी नसल्याविषयींच्या तक्रारीस जागा उरली आहे. मोटारी, जहाजें, विमानें, इंजनें वगैरेंचे कारखाने देशांत अजूनहि जरूरीप्रमाणें निघून विस्तार पावलेले नाहींत. यांत्रिक शिक्षणाची सोय मोठ्या प्रमाणावर करण्यांत आली असून कुशल कारागिरांची वाण पडूं नये अशी तजवीज होत आहे.

युद्धोत्तर काळांत जगाची आर्थिक घडी कोणत्या तत्त्वावर केली जावी ह्याविषयीं विचार प्रदर्शित केले जात असून ह्या पुनर्घटनेंत हिंदुस्थानास औद्योगिक व व्यापारीदृष्ट्या कोणतें स्थान असावें ह्याची चर्चा होणें आवश्यक झालें आहे. जगाची पुनर्घटना व्हावयाची असतां हिंदुस्थानची अंतस्थ आर्थिक व सामाजिक पुनर्रचना होणेंहि अपरिहार्य ठरणार आहे. ह्या दृष्टीनें हिंदुस्थानच्या औद्योगीकरणाच्या प्रश्नाची चिकित्सा व चर्चा अधिकारी रीतीनें होणें अगत्याचें आहे. योजनात्मक पद्धतीनें ही पुनर्घटना घडवून आणण्यासंबंधानें वस्तुस्थितीची चौकशी करण्याचे प्रयत्नहि अलीकडे झाले आहेत. ह्या प्रकारच्या चर्चेस सहायभूत होण्यासारखा एक इंग्रजी ग्रंथ नुकताच प्रसिद्ध झाला असून त्यांत कित्येक विद्वानांचे व तज्ज्ञांचे लेख समाविष्ट केलेले आहेत.* पाटणा युनिव्हर्सिटीचे प्रो. ग्यानचंद ह्यांनीं एक विस्तृत प्रस्तावना पुस्तकासाठी लिहिली असून तीमध्यें प्रतिपाद्य विषयाची व्यापक व मूलग्राही स्वरूपांत चर्चा केली आहे. युद्धोत्तर जगांत हिंदुस्थानास इतर राष्ट्रांशीं आर्थिक सहकार्य करावें लागेल आणि त्याचबरोबर स्वतःच्या आर्थिक घटनेची पुनर्रचना बहुजन समाजाच्या सुधारणाऱ्या रहाणीच्या दृष्टीनें करावी लागेल हा मुद्दा त्यांनीं पुढें मांडला आहे. मोठमोठ्या कारखान्यांच्या स्थापनेंत अनेक सामाजिक वैगुण्यें शिरतात, तीं टाळावीं लागतील, लहान आकारांच्या धंद्यांचा त्यांच्याशीं मेळ घालावा लागेल, कित्येक धंद्यांचें नियमन सरकारास करावें लागेल आणि ह्या सर्व आर्थिक सुधारणा विचारपूर्वक व योजनात्मक पद्धतीनें घडवून आणाव्या लागतील असें प्रो. ग्यानचंद ह्यांनीं आपल्या लेखांत म्हटलें आहे. युद्धोत्तर आर्थिक पुनर्घटनेच्या प्रश्नास किती विविध अंगें आहेत ह्याची कल्पना प्रस्तुत ग्रंथांत चर्चिलेले निरनिराळे विषय येथें नमूद केले असतां येण्यासारखी आहे. प्रो. जे. के मेथा ह्यांनीं औद्योगीकरणाचें तत्त्वज्ञान, डॉ. दुबे ह्यांनीं खनिज द्रव्यें आणि प्रेरक शक्ति, डॉ. व्ही. के. आर. व्ही. राव ह्यांनीं छोटेखानी व व खेडेगांवी धंदे, प्रो. आर. आडारकर ह्यांनीं जकातींचें धोरण, डॉ. नायडू ह्यांनीं परराष्ट्रीय व्यापार, प्रो. जैन (ग्रंथाचे संपादक) ह्यांनीं चलन व भांडवल, श्री. बुलचंद ह्यांनीं कारखान्यांतले वांधे, डॉ. कुरेशी ह्यांनीं कामगारांची कार्यक्षमता व त्यांच्या सुखसोयी व प्रो. जैन ह्यांनीं आर्थिक योजना ह्याप्रमाणें निबंध लिहिले असून हिंदुस्थानच्या औद्योगीकरणांत ह्या सर्व प्रश्नांस कोणतें महत्त्व आहे ह्याचें दिग्दर्शन केलें आहे. सर्व लेखांचा रोख औद्योगीकरण व योजनात्मक पद्धतीचें तत्त्व ह्यांस अनुकूल असा आहे. ह्या दोन्ही बाबी आतां अपरिहार्य झालेल्या आहेत आणि हिंदुस्थानांत त्यांचा योग्य परामर्श घेतला जाऊन त्यांचा राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक परिस्थितीशीं मेळ घालण्याचें अवघड कार्य हातीं घेतलें जाणें आवश्यक आहे.

* "Industrial Problems of India" Edited by Prof. P. C. Jain. Kitabistan, Bombay. Price Rs. 4-8/-

## वसुलीसाठी पाठविलेला चेक

### त्रावणकोर बँकेसंबंधीं एक निवाडा

त्रावणकोर नॅशनल ॲण्ड क्विलॉन बँकेच्या एका खातेदारानें त्या बँकेच्या मुंबई शाखेंत चालू खात्यांत पैसे ठेवले होते. त्यानें आपल्या खात्यांत १६ जून १९३८ रोजीं त्याच तारखेचा, त्याचे नांवानें काढलेला, बँकेच्या मद्रास येथील शाखेवर काढलेला, १५०० रुपयांचा चेक भरला व दुसरा ४३३ रु. २ आ. चा त्याच शाखेवरील चेकहि आपल्या खात्यांत भरला. चेकची वसुली झाल्यावर व तसें खातेदारास कळविल्यावरच खातेदारास चेकचे पैसे काढतां येतील, असा बँकेचा नियम होता. खातेदाराचें म्हणणें असें कीं, त्यास बँकेकडून असें कळण्यापूर्वी बँकेनें व्यवहार बंद केला, तेव्हां बँकेनें त्याचे पैसे विश्वस्त म्हणून ठेवले असें मानलें पाहिजे व त्यास इतरांपेक्षां पैसे मिळण्यांत प्राधान्य मिळालें पाहिजे. १६ तारखेच्या १,५०० रुपयांच्या चेकची वसुली मद्रास येथील शाखेनें ता. १८ रोजीं केली व २० तारखेस दुसऱ्या चेकची वसुली झाली. २१ तारखेस बँकेनें आपला व्यवहार बंद केला. ह्या चेक्सचे संबंधांत बँक व खातेदार ह्यांचेमध्यें देणेकरी व घेणेकरी हें नातें उपस्थित झालें किंवा नाहीं, हा प्रश्न येथें उपस्थित होतो. मद्रास येथील शाखेस पैसे मिळाले ह्याचा बँकेस पैसे पोंचले असाच अर्थ होतो व ज्या दिवशीं मद्रास शाखेंत पैसे जमा झाले त्याच दिवशीं मुंबई शाखेस ते मिळाले, असें ह्या संबंधांतील कायदा सांगतो. १,५०० रुपयांच्या चेकचे बाबतींत मद्रास हायकोर्टाचें असें म्हणणें पडलें, कीं १८ तारखेस त्याची वसुली झाली तेव्हां त्याबाबत चौकशी करून खातेदार त्याचे पैसे बँकेंतून काढूं शकला असतां. तेव्हां, बँक देणेकरी व ठेवीदार घेणेकरी असें नातें उत्पन्न झालें. परंतु दुसऱ्या चेकचे बाबतींत असें म्हणतां येत नाहीं. १५०० रुपयांच्या संबंधांत खातेदारास साध्या घेणेकऱ्यांपेक्षां अधिक हक्क मिळूं नये परंतु दुसऱ्या चेकचे बाबतींत त्यास प्राधान्य मिळावें, असा मद्रास हायकोर्टानें निवाडा केला.

# मुंबई प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूटची पुनर्घटना

( लि. आ. म. )

जनतेच्या आर्थिक रोगाचें निदान आपणांस झालें व त्यावर हीच उपाययोजना ह्या आत्मविश्वासानें इंग्लंडांत रॉबर्ट ओवेन व जर्मनींत रायफायसेन ह्यांनीं सहकारी भांडारें व सहकारी पतपेढ्या काढण्यास सुमारें शंभर वर्षांपूर्वी सुरवात केली. हिंदुस्थानांतील सहकारी चळवळ अशा रीतीनें लोकधुरीणांनीं स्वयंस्फूर्तीनें सुरू केली नसून हिंदुस्थान सरकारनें १९०४ सालीं एक कायदा करून तिला चालना दिली हा इतिहास सहकारी चळवळींतील कार्यकर्त्यांस अवगत आहेच. परंतु अशा प्रकारें चळवळीचें जनकत्व सरकारकडे जात असलें व तिच्या संवर्धनाची कांहीं विवक्षित मर्यादेपर्यंत जबाबदारी सहकारी खात्यामार्फत सरकारनें आपल्याकडे घेतलेली असली तरी इतर देशांप्रमाणें हिंदुस्थानांत सुद्धां कांहीं काळानें ही चळवळ सहकारी कार्यकर्त्यांनीं आपल्या हातीं घ्यावी व सरकारावरील जबाबदारीचा बोजा कमी व्हावा हें धोरण सुरवातीपासून होतेंच.

जनतेच्या आर्थिक व्यवहारासंबंधी कोणतीही गोष्ट केवळ कायदा करून साधत नाहीं. तो व्यवहार आपल्या फायद्याचा आहे हें लोकांना पटलें पाहिजे. सहकारी चळवळ म्हणजे लोकांचा स्वखुषीचा सौदा. कोणतीही सहकारी संस्था, तिचें तत्त्व कांहीं किमान लोकांना पटून त्यांनीं तें आचरण्यांत आणण्यास तयार झाल्याशिवाय चालणें शक्यच नाहीं. हें तत्त्व पटविण्याचें लोकशिक्षणाचें कार्य सरकारी अधिकाऱ्यांचें नसून जनतेचें आहे आणि म्हणूनच हिंदुस्थानांतील चळवळीच्या पहिल्या दशकानंतर प्रमुख कार्यकर्त्यांनीं सहकाराचा प्रचार करण्यासाठी व तदनुषंगानें इतर कार्य करण्यासाठी प्रांतानिहाय संस्था स्थापन केल्या.

## इन्स्टिट्यूटचें कार्य

आपल्या इलाख्यांत अशा प्रकारची संस्था मुंबई प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूट ही असून ती १९१८ सालीं स्थापन झाली. तिचे उद्देश व कार्यक्षेत्र फारच व्यापक ठेवण्यांत आलें होतें. इलाख्यांतील सर्व सहकारी संस्था तिचे सभासद होण्यास पात्र होत्या; इतकेंच नव्हे, तर त्यांनीं सभासद व्हावें असा एक पोटनियम सोसायट्यांच्या पोट नियमांत घालण्यांत आला होता. सहकारी चळवळीसंबंधी शिक्षण व प्रचार, सहकारी सोसायट्यांवर देखरेख व सोसायट्यांच्या सभासदांची सर्वांगीण उन्नति करणें असें ह्या संस्थेचें ध्येय होतें. राजकीय आदर्शानुसार इन्स्टिट्यूटच्या जिल्हानिहाय शाखा स्थापन करण्यांत आल्या व ह्या शाखांवर कलेक्टरांवर देखरेख करणाऱ्या कमिशनरांप्रमाणें भाग शासाहि होत्या. अर्थात् इन्स्टिट्यूटचें कार्य सर्व जिल्ह्यांत सारख्या प्रमाणांत होत नसे. कामाचा उरक कार्यकर्त्यांच्या धमदुरावर व स्थानिक परिस्थितीवर अवलंबून होता. कांहीं काल खुद्द रजिस्ट्रारसाहेबच इन्स्टिट्यूटचे पक्षपाती असल्याचा भास होत होता. कारण "टीका करणें सोपें आहे; परंतु आपल्या शक्तीच्या आणि सभोंवतालच्या निराशाजनक परिस्थितीच्या मानानें इन्स्टिट्यूटनें केलें तेंच कार्य विशेष आहे" असे शब्द सहकारी खात्याच्या १९२८-२९ सालच्या रिपोर्टांत आहेत.

परंतु हा मनु पालटला. निरनिराळ्या कार्यासाठी निरनिराळ्या संस्था असाव्या हें तत्त्व पुढें आलें व त्या तत्त्वांत कांहींच वावगें नसल्यामुळें बिन सरकारी कार्यकर्त्यांनीं सुद्धां त्याला मान्यता दिली. देखरेखीसाठी (Supervision) स्वतंत्र सुपरवायझिंग युनिअन्स स्थापन करण्यांत आल्या व त्यांचे जिल्हानिहाय संघ झाले. ह्या प्रश्नांत इन्स्टिट्यूटनें लुडबूड करूं नये असा मुद्दा सहकारी खात्यामार्फत मांडण्यांत आला. उलटपक्षीं सहकारी शिक्षण हें इन्स्टिट्यूटचें प्रमुख कार्य असतांना सोसायट्यांची शिक्षणाची व्यवस्था करणें हें कलम यूनिअन्स संघांच्या (District Union Boards) पोटनियमांत समाविष्ट करण्यांत आलें. प्रस्तुत लेखकास ह्या नियमाची भीति वाटली नाहीं. कारण सहकारी चळवळीच्या प्रत्येक क्षेत्रांत हल्ली इतकें काम वाढलें आहे कीं, कार्यकर्त्यांना आपल्या खास कार्याशिवाय इतर गोष्टींत लक्ष देणें शक्यच नाहीं व युनिअन्स संघांस शिक्षणाचें कार्य करणें सुतरां अशक्य होतें.

## पुनर्घटना

प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूटसंबंधी खरा मूलग्राही प्रश्न १९३६ सालीं युनिअन्स संघ स्थापण्यांत आले तेव्हां उपस्थित झाला नाहीं, तर १९३९ सालीं ध्येयवादी प्रांतिक मंत्रिमंडळ जेव्हां ग्रामसुधारणेसंबंधीं आपली व्यापक योजना उत्साहपूर्वक आखूं लागलें तेव्हां तो उत्पन्न झाला. ग्रामसुधारणेची सर्वांगीण व एकजीवी व्यवस्था करण्यासाठी प्रांतिक रूरल डेव्हलपमेंट बोर्ड, जिल्हानिहाय जिल्हा रूरल डेव्हलपमेंट बोर्ड व त्याच्या तालुका शाखा, प्रत्येक मोठ्या खेड्यांत ग्रामसुधारणा करण्यासाठी १,००० पगारी सेवक व त्यांच्या शिक्षणाची व्यापक योजना ह्या गोष्टी कोणास पसंत पडणार नाहींत? इन्स्टिट्यूटच्या कार्यकर्त्यांनीही स्वतः ग्रामसुधारणेचे जुजबी प्रयत्न केले होते व नव्या व्यापक योजनेस त्यांनीं मनःपूर्वक पाठिंबा दिला. परंतु ह्या कल्पनेस मूर्तस्वरूप येण्यास प्रारंभ होण्याच्या आधींच, थोडें कां होईना पण पद्धतशीरपणें सहकारी शिक्षणाचें व इतर कार्य करणाऱ्या इन्स्टिट्यूटच्या शाखा एकदम रद्द करण्यांत सरकारची मोठी घाई झाली हें गेल्या तीन वर्षांच्या अनुभवानें सिद्ध झालेंच आहे. राजवाडा नाहीं नि झोपडी होती ती पण गेली अशी अवस्था झाली. बदललेल्या परिस्थितींत इन्स्टिट्यूटची पुनर्घटना कशी व्हावी ह्याविषयीं सहकारी कार्यकर्ते आणि सरकार ह्यांचेमध्यें प्रदीर्घ वाटाघाटी झाल्या आणि अखेर हें लांबलेलें प्रकरण एकदाचें संपवावें असें ठरलें. अखेरच्या सरकारी ठरावाप्रमाणें आतां इन्स्टिट्यूटची पुनर्घटना करण्यांत आली आहे. जिल्हा शाखा १९३९ सालींच रद्द करण्यांत आल्या होत्या. म्हणून जिल्हा यूनिअन्स संघांच्या शिक्षण कमेटीमार्फत प्रत्येक जिल्ह्यांत इन्स्टिट्यूट आपलें शिक्षणाचें काम चालू ठेवील. त्यांतसुद्धां सुरवातीस असा प्रसंग आला कीं एकोणीस जिल्ह्यांपैकीं अहमदाबाद, खेडा, पंचमहाल, कुलाबा व रत्नागिरी ह्या जिल्ह्यांत युनिअन्स संघच नाहींत. परंतु सदिच्छा असली कीं मार्ग सुचतो, ह्या न्यायानें खुद्द रजिस्ट्रारसाहेबांनींच युनिअन्स संघ नसले तरी ह्या

पांचहि जिल्ह्यांत तुम्ही स्वतंत्र शिक्षण कमेट्या स्थापन करा असें इन्स्टिट्यूटला सांगितलें व त्या दिशेनें सध्या उपक्रम चालू आहे. आहे. शिवाय, मुंबई शहराकरितांहि एक शिक्षण कमेटी स्थापन करण्याचें ठरलें आहे.

इन्स्टिट्यूटचें खरें कार्य पूर्वीहि शिक्षण प्रचार हें होतें. हें कार्य नवीन घटनेप्रमाणेंहि इन्स्टिट्यूटकडेच राहील. तीन वर्षांची किंकर्तव्यतामूढ स्थिति आतां नाहींशी होऊन इन्स्टिट्यूटनें हातपाय हालविण्यास सुरवात केली आहे. गेल्या १ ऑगस्ट रोजीं नव्या एक्झिक्यूटिव्ह कमेटीची निवडणूक करण्यांत आली. माजी रजिस्ट्रार व गव्हर्नरसाहेबांचे माजी ॲडव्हाइसर ह्या उच्चपदावरून सेवानिवृत्त झालेले सर जनार्दनराव मदन हे आतां इन्स्टिट्यूटचे अध्यक्ष आहेत व ऑननरी सेक्रेटरीच्या जागीं श्री. वैकुंठराय मेहता यांची नेमणूक करण्यांत आली आहे. उद्देशांत आर्थिक व सामाजिक संशोधनाच्या कार्याचा खास उल्लेख आहे आणि ह्याप्रमाणें रिसर्च ब्यूरोची योजना आखण्याचें इन्स्टिट्यूटच्या एक्झिक्यूटिव्ह कमेटीनें ठरविलें आहे. हिंदुस्थान सरकारच्या ग्रँटमधून होणारा सोसायट्यांचे सेक्रेटरी, कमेटीचे सभासद व सर्वसाधारण सभासद ह्यांच्या शिक्षणाचा उरलेला कार्यक्रम इन्स्टिट्यूटकडे सोपविण्यांत येण्याचाहि संभव आहे.

## नवें मराठी त्रैमासिक

एक जुनाच पण स्थगित झालेला कार्यक्रम इन्स्टिट्यूटनें आतां हातीं घेतला आहे. सहकारी मासिकें हें एक सहकारी शिक्षणाचें प्रमुख अंग आहे आणि मराठी, गुजराती व कानडी ह्या तिन्ही भाषांत सहकारी चळवळीसंबंधी त्रैमासिकें जानेवारी १९४३ पासून पुन्हां सुरू करण्याचें एक्झिक्यूटिव्ह कमेटीनें ठरविलें आहे. गुजराथी व कानडी त्रैमासिकें तूर्त जुन्या पद्धतीनेंच चालतील; पण मराठी त्रैमासिकासंबंधी एक अभिनव उपक्रम करण्याचें योजिलें आहे. आज सात-आठ वर्षें प्रो. काळे "अर्थ" साप्ताहिक महाराष्ट्रीय जनतेस आर्थिक प्रश्न कळावे व त्यांस त्यांची गोडी लागावी ह्या सदिच्छेनें चालवीत आहेत. "अर्था"चें कार्यक्षेत्र एकाद्या खास सहकारी मासिकापेक्षा जास्त व्यापक असलें तरी तो विषयहि साधारणपणें रुक्षच आहे. परंतु प्रो. काळे ह्यांच्यासारखे प्रथितयश व कुशल संपादक कोणताहि विषय आकर्षक करूं शकतात हें "अर्था"च्या वाचकांस सांगण्याची जरूरी नाहीं. प्रो. काळे यांच्या दर्जाचे गृहस्थ पूर्वी इन्स्टिट्यूटच्या एक्झिक्यूटिव्ह कमेटीवर होते व आजहि त्या कमेटीवर आहेत, ही गोष्ट इन्स्टिट्यूटला अर्थात् भूषणावह आहे. प्रो. काळे यांनीं आपला इतर मोठा कार्यव्यवसाय असतांनाहि इन्स्टिट्यूटच्या मराठी त्रैमासिकाचें संपादकत्व स्वीकारून इन्स्टिट्यूटला व पर्यायानें महाराष्ट्रांतील सहकारी जनतेला उपकृत केलें आहे. त्यांच्या संपादकत्वाखाली जानेवारी १९४३ पासून प्रसिद्ध होणाऱ्या ह्या त्रैमासिकांत सहकारी चळवळीसंबंधी लेख व माहिती येईलच परंतु आनुषंगिक आर्थिक प्रश्नांचीहि अधिकारी वाणीनें चर्चा होईल. शिवाय, "अर्थ" साप्ताहिकाप्रमाणें हें त्रैमासिक सुद्धा निरनिराळीं खास सदरें घालून आकर्षक करण्यांत येईल. इंग्लंडांतील सहकारी मासिकें ह्याच पद्धतीनें चालविण्यांत येतात. त्यांत लघुकथासुद्धां असतात! अशा प्रकारचा उपक्रम आमच्या माहितीप्रमाणें प्रथमच हिंदुस्थानांत होत आहे. इन्स्टिट्यूटच्या सभासदांना हें त्रैमासिक विनामूल्य देण्यांत येईल. इतर सहकारी जनता वर्गणीदार होऊन ह्या उपक्रमास सक्रिय पाठिंबा देईल अशी आशा आहे.

ठेवी व शेअर–अर्जांचे नमुने मागवा.

# जी. जी. दांडेकर मशीन वर्क्स लि.,

## भिवंडी, जि. ठाणें

**भातापासून तांदूळ करण्याच्या गिरण्या, ऊंस गाळण्याचीं यंत्रें, टूल ग्राइंडर्स वगैरे विविध यंत्रसामुग्री बनविणारा कारखाना**

स्थापना १९११मध्यें होऊन लिमिटेड १९२९मध्यें झाली.

विक्रीस काढलेलें भांडवलः जमा झालेलें भांडवलः

**रु. ५,००,००० * रु. २,४३,०००**

ऑर्डिनरी व प्रेफरन्स शेअर प्रत्येकीं रु. १०० चा असून, प्रेफरन्स शेअर्स रिडीमेबल व ५ टक्के क्युम्युलेटिव्ह व्याजाचे आहेत. आतां फक्त रु. २५००० चेच रिडीमेबल प्रेफरन्स शेअर्स विकावयाचे आहेत.

## या कंपनींत पैसा गुंतविणें सुरक्षित कां आहे!

कारण

(१) गेलीं तीस वर्षें कारखाना व्यवस्थित चालला असून त्याची उभारणी शास्त्रशुद्ध पायावर झालेली आहे.

(२) श्री. दांडेकरांनीं कारखान्याला झालेल्या उत्पन्नांतून सुमारें दोन लक्ष रुपयांचें भांडवल निर्माण केलें.

(३) कंपनी लिमिटेड झाल्या दिवसापासून शेअर–होल्डरांना डिव्हिडंड देत आहे. गतवर्षी कंपनीनें ऑर्डिनरी शेअर–होल्डरांनाही पांच टक्के डिव्हिडंड दिलें आहे. त्याहून अधिक डिव्हिडंड चालू सालीं अपेक्षित आहे.

(४) हिंदुस्थानांतील सर्वांत मोठें धान्याचें पीक भाताचें आहे, व त्याचें उत्पादन वाढण्याचा प्रयत्न चालू आहे. सबब कंपनी करीत असलेल्या भातगिरण्या व त्यांचे सुटे भाग यांना सतत मागणी राहील.

(५) हिंदुस्थानांत साखरेचा धंदा बद्धमूल होऊन कारखान्यांची संख्या वाढत आहे, सबब या कारखान्यांकडून कंपनी करीत असलेल्या सुट्या भागांना मागणी वाढणार आहे.

(६) कंपनीचे चालक उत्पादन व विक्री या दोहोंतहि वाकबगार आहेत.

(७) कंपनीच्या संचालक-मंडळांत व्यापार-उदिमांत नांव मिळविलेले व घरंदाज गृहस्थ आहेत.

(८) कंपनीचे चालक प्रगमनशील असून प्रत्येक उपक्रम यशस्वी होत आहे.

### ऑर्डिनरी शेअर्सवर दिलेलें व्याज

| | |
|---|---|
| ३० जून १९४० अखेर ४ टक्के | शेअरविक्री चालू आहे. |
| ३० जून १९४१ अखेर ५ टक्के | |
| ३० जून १९४२ अखेर ६ टक्के | |

### ठेवींवरील व्याज

| | |
|---|---|
| १ वर्ष ३॥ टक्के द. द. शें. | तूर्त फक्त एक लक्ष रुपयांच्याच ठेवी घ्यावयाच्या आहेत. |
| २ वर्षें ४। टक्के " " | |
| ३ वर्षें ४॥ टक्के " " | |

## ओगले बंधू व कांच कारखाने

१९१४-१९१८ चे महायुद्धामुळें, हिंदुस्थानांत हरघडी घरगुती उपयोगासाठी लागणाऱ्या कांचेच्या वस्तू म्हणजे दिव्यांच्या चिमण्या, बाटल्या, पाणी पिण्याचीं टंबलर्स वगैरेंबद्दल परकीय देशांतून येणाऱ्या मालावर हिंदी जनतेला अवलंबून बसावें लागतें हें उघड झाल्यानें ह्या वस्तू आपल्या देशांत कशा तयार करतां येतील इकडे तरुण होतकरू मंडळींचें लक्ष वेधलें, पण त्यांचे प्रयत्न, देशी धंद्यांना सरकारचें सक्रिय पाठबळ नसल्यानें फोल ठरत चाललें. तथापि ओगले बंधूंनीं अत्यंत परिश्रमपूर्वक व चिकाटीनें प्रयत्न चालू ठेवून श्रीमंत राजेसाहेब ऑफ औंध ह्यांचे आश्रयाखाली ओगलेवाडी येथें कांचेचा कारखाना स्थापन करून त्यांचे प्रोत्साहनानें कांचेच्या धंद्यांत प्रगति करून गेल्या वर्षी कारखान्याचा रौप्य महोत्सवहि साजरा केला हें ओगले बंधूंना व महाराष्ट्राला आदर्श झालें.

परकीय देशांतून येणाऱ्या मालाची स्पर्धा, देशी धंद्यांना संरक्षण नसणें, भांडवलाची अडचण, वगैरेंतून मार्ग काढणें वगैरे दुर्घट कामगिरी श्रीमंत राजेसाहेब ऑफ औंध ह्यांचे प्रोत्साहनानें ओगले बंधूंनीं तडीस नेली. परंतु निव्वळ कारखाना टिकवून धरणें ह्या ध्येयाबरोबर रांजण, मोल्ड्स, मशिनरी वगैरेंबद्दल जें इतर देशांवर अवलंबून बसावें लागतें ते जिन्नस त्यांनीं कारखान्यांत तयार केल्यानें कारखाना स्वावलंबी बनत जाऊन खर्चांतहि बचत होत गेली. शिवाय अव्वल दर्जाचा माल तयार करण्याकडे कटाक्ष ठेवल्यानें ओगले ह्यांचा कांचमाल म्हणजे स्टँडर्ड झालें व कांचेची वस्तू बनविणें व ओगले बंधू ह्यांचा कार्यकारणभाव जनतेला पटला.

ह्यामुळें १९३८ सालीं कांचकारखाना म्हैसूर संस्थानांत काढण्याबद्दल म्हैसूरचे माजी दिवाण सर मिर्झा इस्माईल ह्यांनीं ओगले बंधूंना बोलाविलें व हा कारखाना यशस्वी रीतीनें चालू आहे. गेल्याच वर्षी सीलोन गव्हर्मेंटनें सीलोनमध्यें कांचकारखाना काढण्याबद्दल ओगले बंधूंना बोलावल्याप्रमाणें ओगले बंधूतर्फे श्री. नरहरपंत ओगले तिकडे गेले असून कारखान्याचे बांधकामास सुरुवात झाली आहे. मालाची निपज लौकरच होईल.

तथापि दक्षिण हिंदुस्थानांत कांचेचा कारखाना एकहि नव्हता. कांचेच्या धंद्यास लागणाऱ्या कच्च्या मालाची विपुलता त्रावणकोर व त्या लगतचे भागांत आहे व कोचीन बंदरामुळें सोडाॲश, कोळसा, क्रूडऑईल वगैरेसारखा माल कमी खर्चानें आणविणें शक्य असल्यानें त्रावणकोर संस्थानांत कांचकारखाना काढण्याची आवश्यकता दिवाण सर सी. पी. रामस्वामी अय्यर ह्यांना पटून त्यांनीं कांचकारखाना काढण्याची परवानगी ओगले बंधूंना देऊन, कारखान्याकरतां अलवायेजवळ सोयीस्कर अशी जागा देऊं करून शिवाय स्टेटतर्फे दोन लाख रुपयांचे शेअर्स घेतले व त्याप्रमाणें हा कारखाना ता. ६-१०-४२ ला दि त्रावणकोर ओगले ग्लास मॅन्युफॅक्चरिंग कं. लि., नांवानें श्री. गुरुनाथराव ओगले यांचे देखरेखीखालीं स्थापन झाला. कारखान्याचें अधिकृत भांडवल दहा लाखांचें असून पांच लाखांचे शेअर्स विक्रीस काढले होते. पण ह्यांपैकी दोन लाखांचे शेअर्स त्रावणकोर स्टेटनें घेतले. रु. ७५,००० चे शेअर्स डायरेक्टर्स, मॅनेजिंग एजन्टस व इतर त्यांची मित्र मंडळी ह्यांनीं घेतले व बाकीचे रु. २२,५०० चे शेअर्स मे. लोकूर आणि कं., स्टॉक अँड शेअर्सब्रोकर्स, केंपेगौडा रोड, बंगलोर सिटी ह्यांचे नांवानें त्यांनीं विनंती केल्याप्रमाणें अंडरराईट केले. म्हणजे विक्रीस काढलेले पांच लाख रुपयांचे शेअर्स कारखाना स्थापन होतांच वरीलप्रमाणें दिले गेले ही मोठ्या संतोषाची बाब आहे. ह्याप्रमाणें सर्व शेअर्स खपून गेलेमुळें त्या दिवशीं अधिक आलेले सुमारें दोन लाखांचे शेअर्स नाकारावे लागले.

ओगले बंधूंचे, ओगलेवाडी, बंगलोर, नागपूर व सिलोन येथील कारखाने यशस्वी रीतीनें चालले असून कांचकारखाने म्हणजे ओगले बंधू ही गोष्ट सर्वश्रुत आहे. तेव्हां हा त्रावणकोरमधील कारखानाहि ही उज्ज्वल परंपरा चालू ठेवील हें निर्विवाद आहे. एकंदरींत ओगले बंधूंची ही धडाडी महाराष्ट्राचे कर्तबगारीची द्योतक होऊन महाराष्ट्रीयांत उत्साह उत्पन्न करील व नव्या पिढीला मार्गदर्शक होईल यांत शंका नाहीं.

## कामगारांच्या जेवणाची कारखान्याचे खर्चानें कारखान्यांतच सोय

### एक नवा उपक्रम

सध्यांच्या युद्धपरिस्थितीमध्यें कारखान्यांतील कामगारांना महागाई भत्ता देण्यांत येत असला, तरी त्याचा प्रत्यक्ष उपयोग त्यांना होत नाहीं, असें कित्येक ठिकाणीं आढळून येतें. साखर, रॉकेल हे पदार्थ सोडले तरी धान्यासारखेहि आवश्यक जिन्नस पैसे देऊनहि मिळणें त्यांना कित्येक प्रसंगीं कठीण जातें, असा अनुभव आहे. कामगारांची ही अडचण लक्षांत घेऊन पुण्यांतील एका मोठ्या कारखान्यानें आपल्या कामगारांच्या कुटुंबांस आवश्यक अन्न व वस्त्र सध्याच्या बाजारभावापेक्षा सुमारें ३३% कमी किंमतींत देण्याची व्यवस्था गेल्या पाडव्यापासून केली आहे. कामगारांना कारखान्यांतच दोन वेळां पोटभर जेवण देण्याची योजनाहि आखली आहे व त्यासाठी जरूर ती सर्व पूर्वतयारी केली आहे. जरूर तेवढा अगोदरच इतर जिल्ह्यांत खरेदी केलेला धान्याचा साठा येथें आणण्याचे कामीं सरकारी नियंत्रणामुळें थोडी अडचण येत आहे. हें धान्य फायदेशीर विक्रीसाठी येथें यावयाचें नसून गरीब कामगारांच्या नडी भागविण्याकडेच त्याचा विनियोग व्हावयाचा आहे, हें लक्षांत घेऊन सरकारकडून सवलती लवकर मिळतील अशी अपेक्षा आहे. जेवणाच्या खर्चाचा बोजा कामगारांवर बिलकूल पडणार नाहीं. ही योजना यशस्वी ठरल्यास ती कायम चालू ठेवण्याचाहि चालकांचा विचार असल्याचें समजतें. प्रस्तुत उपक्रमाची अधिक माहिती तो चालू झाल्यावर आम्ही मागाहून देऊं.

### खाद्यपदार्थ-पुरवठ्याचा कारभार

धान्यधुन्य वगैरे जरूरीच्या जिनसांच्या पुरवठ्याविषयींचे प्रश्न इतके गुंतागुंतीचे व कठीण झाले आहेत कीं, त्यांची व्यवस्था हिंदुस्थान सरकारच्या कार्यकारी मंडळांत स्वतंत्र मंत्र्याकडे सोपविण्यांत यावी अशी कल्पना मध्यंतरीं निघाली होती, पण हें काम व्यापार मंत्र्याच्या खात्यांतच एका स्वतंत्र चिटणीसाच्या हातीं देण्यांत येणार आहे असें समजतें.

# दुय्यम नाण्यांचा तुटवडा

दुय्यम नाण्यांचा मुंबई प्रांतांत तुटवडा पडूं लागला आहे, असें दिसतें. पैसे, अणेल्या, चवल्या, हीं नाणीं साठवून ठेवण्याची लोकांची प्रवृत्ति त्याचे बुडाशीं आहे. चालू युद्धास प्रारंभ झाल्यापासून मार्च १९४२ अखेर गडप झालेल्या आठ आणेल्या लक्षांत न घेतांहि ८ कोटि रुपये किंमतीचीं दुय्यम नाणीं देवघेवींतून गडप झालीं आहेत. गेल्या युद्धांतील तत्सम आंकडा ५ कोटि रुपयांचा आहे. ३० सप्टेंबर अखेरच्या सहामाहींत ह्या प्रवृत्तीस आणखी चालना मिळून त्यास ३½ कोटि रुपयांचीं नाणीं बळी पडलीं. चलनी नोटा देऊन त्यांचे बदली घेतलेलीं दुय्यम नाणीं देवघेवींतून नाहींशीं होत आहेत. सुमारें १३ लक्ष रुपयांचें पैसे लोकांनीं संग्रह करून ठेवले आहेत, असा अंदाज आहे. दुय्यम नाणीं जरूरीपेक्षा अधिक बाळगणें हा डिफेन्स ऑफ इंडिया कायद्याखालीं गुन्हा आहे; तथापि हीं नाणीं व्यवहारांतून नाहींशीं होत आहेत. विशेषतः बंगालमध्यें दुय्यम नाण्यांची चणचण ज्यास्त भासत आहे. तेथील व्यापाऱ्यांनीं आपल्या हिशेबांत पैसा घेऊंच नये, असा त्यांस रिझर्व्ह बँकेनें सल्ला दिला असल्याचें समजतें. दुय्यम नाण्यांचा संग्रह करून ठेवणें ही गोष्ट रोजच्या व्यवहाराची आर्थिक घडी नीट रहाण्यास पोषक नाहीं, हें उघड आहे आणि ह्या दृष्टीनें प्रस्तुत प्रवृत्तीस आळा बसणें अत्यावश्यक आहे.

दुय्यम नाण्यांच्या. रिझर्व्ह बँकेच्या खालील आकड्यांवरून किती नाणीं व्यवहारांतून बाहेर गेलीं व ही प्रवृत्ति कशी वाढत आहे, हें दिसून येईलः—

( आकडे लक्ष रुपयांचे आहेत. ) + हें चिन्ह नाण्यांची गळति दर्शवितें

| गडप झालेलीं नाणीं | १९३८–३९ | १९३९–४० | सप्टेंबर-मार्च १९३९–४० | १९४०–४१ | १९४१–४२ | सप्टेंबर १९३९ ते मार्च १९४२ |
|---|---|---|---|---|---|---|
| चांदीचें | | | | | | |
| ८ आणे | + २ | + ६० | + ७७ | + १५३ | + १५७ | + ३८७ |
| ४ आणे | – ५ | + ३७ | + ४३ | + १०२ | + १२९ | + २७४ |
| एकूण | – ३ | + ९७ | + १२० | + २५५ | + २८६ | + ६६१ |
| निकेलचें | | | | | | |
| ४ आणे | – ४ | + ८ | + १५ | ... | – २ | + १३ |
| २ आणे | + ४ | + ४९ | + ५८ | + ७२ | + ८८ | + २१८ |
| १ आणा | + ६ | + ५१ | + ५३ | + ७६ | + ९९ | + २२८ |
| ½ आणा | ... | ... | ... | ... | + ४ | + ४ |
| एकूण | + ६ | + १०८ | + १२६ | + १४८ | + १८९ | + ४६३ |
| तांब्याचें | | | | | | |
| पैसा | + १४ | + २१ | + १६ | + २३ | + २९ | + ६८ |
| अधेला | + १ | + १ | + १ | + १ | + १ | + ३ |
| पै | + १ | + १ | + १ | + १ | + १ | + ३ |
| एकूण | + १६ | + २३ | + १८ | + २५ | + ३१ | + ७४ |
| सर्व नाण्यांची बेरीज | + १९ | + २२८ | + २६४ | + ४२८ | + ५०६ | + ११९८ |


# दि प्रॉपर्टी इम्प्रूव्हमेंट ॲन्ड एक्सचेंज कंपनी, लि.

६२१ बुधवार, नगरकर बिल्डिंग, तिसरा मजला, पुणें.

: चेअरमन :

**श्री. धोंडुमामा साठे, बी. ए., बी. एस्सी.**

कंपनीचे उद्देश

(१) मध्यम वर्गीयांकरितां सोइस्कर कॉलनीज बांधून देणें.
(२) घरें, बंगले, प्लॉट्स व वखळी ह्यांच्या खरेदी–विक्रीचे व्यवहार करणें.
(३) योग्य तारणावर कर्जाऊ रक्कम घेणें व देणें.
(४) सर्व प्रकारच्या इस्टेटीची व्यवस्था पाहणें.

मॅनेजिंग एजंटः—एम्. जी. भावे

आजच्या परिस्थितींत विम्यामध्यें पैसे
गुंतविणेंच श्रेयस्कर.

आपला विमा महाराष्ट्राच्या पहिल्या प्रगतिपर
असलेल्या

दी औंध म्युच्युअल
लाइफ ॲश्युरन्स सोसायटीमध्येंच उतरा.

— पेट्रन —
श्रीमंत राजेसाहेब सं. औंध

— डायरेक्टर्स —

● १ श्री. वामन पुंडलिक वर्दे,
बी. कॉम्. आर. आर. नायर कंपनीचे मालक,
मुंबई, चेअरमन.
● २ रावबहादुर कॅप्टन, व्ही. बी. गोखले,
एफ. आर. सी. एस., एम. सी. ओ. जी., डी. ओ.,
डी. ओ., एम. एस., व्हाइस चेअरमन.
● ३ श्रीमंत राजकुमार अप्पासाहेब पंत,
बी. ए., बार-ॲट-लॉ, ( लंडन )
● ४ श्री. एम. आर. जोशी, बी. ए.
● ५ श्री. व्ही. जी. जोशी, मॅनेजिंग डायरेक्टर.

फलटण दरबारकडून पुरस्कृत असलेली
श्रीलक्ष्मी सें. को. बँक, लि. फलटण
( स्थापना १।१।१९२६ )

| | |
|---|---|
| भागांचें वसूल भांडवल.... | रु. ६,३००० वर |
| राखीव व इतर निधि ... | रु. ९६,००० वर |
| ठेवी .... | रु.५,१०,००० वर |
| खेळतें भांडवल .... | रु.६,७०,००० वर |

ठेवीः—चालू, सेव्हिंग्ज व मुदत ठेवी स्वीकारण्यांत येतात.

कर्जः—बँकेस जोडून घेतलेल्या सहकारी पेढ्यांना व बँकेच्या भागीदारांना सर्व प्रकारच्या तारणांवर बँकेकडून कर्ज मिळण्याची सोय आहे. तसेंच योग्य तारणांवर ओव्हरड्राफ्ट मिळण्याची सोय करण्यांत आली आहे.

इतर व्यवहारः—हुंड्यांची खरेदीविक्री, चेक, हुंड्या, ड्राफ्ट्स्, रेल्वे रिसिट्स्, डिव्हिडंड-वॉरंटें, पेन्शनबिलें यांची वसुली वगैरे सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार या बँकेमध्यें होतात.

विमा हप्तेः—वेस्टर्न इंडिया, नेपच्यून, एशियन व कॉमनवेल्थ या विमा कंपन्यांच्या हप्त्यांच्या रकमा या बँकेंत स्वीकारण्यांत येतात.

बँकर्सः—ही बँक फलटण दरबार, दि फलटण शुगर वर्क्स लि., व सर्व स्थानिक सार्वजनिक संस्था यांची बँकर्स आहे.

अधिक माहिती समक्ष अगर पत्रद्वारें मिळं शकेल.

फलटण,
दि. २।११।४२ }

श्री. ह. तळवलकर,
व्यवस्थापक.

आग, मोटार अपघात इ. चा
विमा उतरविण्यापूर्वी

दि व्हल्कन
इन्शुअरन्स कं. लि.

चा सल्ला घेणें आपले
फायद्याचें होईल.

चौकशीः—एच. के. जोशी, बी. एस्सी.
ब्रँच सेक्रेटरी,
बुधवार पेठ, पुणें.

वार्शी सेंट्रल
को-ऑपरेटिव्ह बँक लि.

( स्थापना १९०६ )

आपण मोठ्या परिश्रमपूर्वक सांठविलेली शिल्लक सुरक्षित तऱ्हेनें गुंतवावी असें प्रत्येकास वाटतें. ही बँक स्थापनेपासून आजतागायत "अ" वर्गामध्यें आहे. येथें लहान-मोठ्या ठेवी स्वीकारल्या जातात.

— माहितीसाठी पत्रव्यवहार करा —

गणेश रामचंद्र साने,
चेअरमन

## म्युनिसिपॅलिट्यांचा कारभार

### मुंबई प्रांताच्या मध्यविभागांतील कमिशनरचा अहवाल

### ( १९४०-४१ )

ह्या विभागांतील म्युनिसिपॅलिट्यांची संख्या ५८ आहे व त्यांची लोकसंख्या १०,३१,२१० इतकी भरते. ह्या सर्व म्युनिसिपॅलिट्यांच्या एकूण १४१५ सभा भरल्या, त्यांपैकी २३० सभा गणसंख्येच्या अभावीं निष्फळ ठरल्या व ५४२ सभांचें काम पुढें ढकलण्यांत आलें. सभांस हजेरी ६३·१३% इतकी पडली. म्युनिसिपॅलिट्यांचें निवळ उत्पन्न ७८,२६,०४२ रुपये भरलें. पुणें शहर व सबर्बन म्युनिसिपॅलिट्यांचें जकातींचें उत्पन्न २ लक्ष, १९ हजारांनीं वाढलें, त्याचें कारण लष्करी ठेकेदारांनीं त्या म्युनिसिपॅलिट्यांचे हद्दींत मोठ्या प्रमाणावर आयात केलेला माल हें होय. ह्याच कारणानें अहमदनगर म्युनिसिपॅलिटीचें जकातीचें उत्पन्न २७ हजारांनीं वाढलें. पुणें शहर म्युनिसिपॅलिटीनें पाणीपट्टी वाढविली त्यामुळें ह्या पट्टीनें २९½ हजार रुपये अधिक दिले.

म्युनिसिपॅलिट्यांच्या एकूण निवळ उत्पन्नांपैकी ५७½ लक्ष रुपये करांपासून मिळाले. प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष करांचें प्रमाण ५६·३% व ४३·७% पडलें. म्युनीसिपॅलिट्यांचा खर्च ७३,०५,१८० रुपये झाला. रस्त्यांप्रीत्यर्थ केलेल्या खर्चांत ३ लक्ष रुपयांची घट झाली, त्यांपैकी पुणें शहरानेंच २ लक्ष ११ हजार रुपये कमी खर्च केलेले आहेत.

#### हिशेबाची तपासणी

लोकल ऑडिट खात्यानें म्युनिसिपॅलिट्यांच्या हिशेबांत दोष दाखविले आहेत. त्यांतील प्रमुख खालीलप्रमाणें आहेत:—( १ ) पैशाची असमाधानकारक व्यवस्था ( २ ) जबर थकबाकी ( ३ ) मागणीपत्रकें अपुरीं असणें ( ४ ) दुय्यम नोकरांवर नीट देखरेख नसणें ( ५ ) व बेकायदा विनाकारण कराची माफी देणें ( ६ ) ऑडिटच्या सूचनांकडे दुर्लक्ष्य ( ७ ) सभासद, चीफ ऑफिसर व म्युनिसिपल नोकर वर्ग ह्यांनीं म्युनिसिपॅलिटीचें देणें न भरणें इ.

#### पुणें शहर म्युनिसिपॅलिटी

ह्या म्युनिसिपॅलिटीचें उत्पन्न २१ लक्ष, ३९ हजार रुपये झालें, म्हणजे तें २ लाखांनीं वाढलें. खर्च २६ लक्ष, ८५ हजारांवरून २४ लक्ष, ४६ हजारांवर आला. थकलेल्या करवसुलीचा आकडा १ लक्ष, ८६ हजार रुपये भरला.

#### आर्थिक परिस्थिति

" म्युनिसिपॅलिट्यांची आर्थिक परिस्थिति अद्याप असमाधानकारकच आहे. बहुतेक म्युनिसिपॅलिट्या, विशेषतः लहान म्युनिसिपॅलिट्या, आर्थिक अडचणींत आहेत. त्यामुळें त्यांस पाणी-पुरवठा, ड्रेनेज, ह्यांसारख्या सार्वजनिक आरोग्याच्या योजना हातीं घेतां येत नाहींत. जीं कामें करणें म्युनिसिपॅलिट्यांवर बंधनकारक नाहीं, अशा कामावर खर्च करण्याची प्रवृत्ति वाढत आहे. हायस्कूल चालविणें ह्याच बाबींत येतें. अशा शाळा काढण्यांतील हेतु बहुधा स्वार्थांध असतो. आवश्यक कामें मागें पडून अशीं हायस्कुलें चालविलीं जातात व त्यांतील शिक्षणहि वाईट व्यवस्थेमुळें नीट होत नाहीं. सध्या नोकरवर्गाची निवड करतांना वशिलेबाजी फार आढळते. म्युनिसिपल सभासद रोजच्या कारभारांत अतिशय ढवळाढवळ करतात, त्यामुळें चांगल्या चीफ ऑफिसरला सरळपणें काम करणें कठीण जातें. रद्द केलेल्या म्युनिसिपॅलिटींतील जुनाच नोकरवर्ग सरकारनें नेमलेल्या कार्यक्षम ॲडमिनिस्ट्रेटरखाली चांगलें काम करतो. अधिकारीवर्गाच्या कामांत ढवळाढवळ झाली नाहीं, तर म्युनिसिपॅलिट्यांच्या कारभारांतील गोंधळ पुष्कळ कमी होईल."

## सहकारी मालपुरवठा समित्या

### ( लि. आ. म. )

युद्धपरिस्थितीमुळें जीवनास आवश्यक अशा नित्योपयोगी जिनसा मिळण्यास सध्या फारच अडचण भासत आहे, त्यास अनेक कारणें आहेत. त्यांतील प्रमुख कारणें म्हणजे, दळणवळणाच्या बाबतींत मुख्य अडचण व देशांतील इतर प्रांतांतून होणारी निर्गत हीं प्रमुख होत. त्याचप्रमाणें दोस्तराष्ट्रांतील इतर घटकांना पुरवावा लागणारा माल हेंहि एक कारण आहे. अशा या परिस्थितींत मालाची विल्हेवाट योग्य प्रमाणांत होणें आवश्यक आहे.

या अडचणी लक्षांत घेऊन निरनिराळ्या ठिकाणीं सहकारी तत्त्वावर संस्था स्थापन होऊं लागल्या आहेत. सहकारी तत्त्वावर नागरिक एकत्र येऊन त्यांनीं आपल्या गरजेवर योग्य तें नियंत्रण घातल्यास अशा संस्था उपयोगी होतील. अशा या संस्था स्थापनेच्या बाबत कांहीं आक्षेप घेतले जात आहेत आणि त्यांपैकीं प्रमुख आक्षेप म्हणजे ( १ ) या संस्था टिकाऊ होणार नाहींत आणि ( २ ) स्वार्थी लोक याचा पुरेपूर फायदा घेतील हे होत. सहकारी तत्त्वावर निघालेल्या संस्था आणि मुख्यतः मालपुरवठा संस्था टिकाऊ होणार नाहींत हा एक आक्षेप विचार करण्यासारखा आहे. कांहीं अंशीं हा आक्षेप जरी खरा असला तरी कांहीं विविक्षित लोक एकत्र येऊन त्यांपैकीं थोड्या फार लोकांना कां होईना सहकारी चळवळीचीं तत्त्वें पटल्यास त्यांचा चळवळीस फार उपयोग होईल. सहकारी चळवळ स्थिर होण्यास व तिचीं तत्त्वें समजण्यास अशा अडचणीच्या मार्गांतून निघालेल्या संस्था हें एक साधन होय. स्वार्थी लोक कोण आहेत हें जगाचे पुढें ठळकपणें येईल व त्यापासून समाजांतील इतर लोक जागृत होतील. सहकारी चळवळीशिवाय जर समाजाचा उद्धार होणार नसेल तर अशा चळवळींना प्रोत्साहन देणें अगत्याचें आहे. पुष्कळ वेळां वाईटांतून चांगलें निघतें या न्यायानें या चळवळींतून पुष्कळच चांगल्या गोष्टी निर्माण होतील.

सहकारी खात्याला मात्र एक प्रेमाची सूचना करावयाची आहे. सहकारी चळवळ अयशस्वी होण्यास मुख्य कारण म्हणजे एकमेकांवरील अविश्वास हें होय आणि याकरितां खात्यानें थोडे कां होईना, लोक एकत्र येऊन जर अशा संस्था स्थापन होत असतील तर त्यांना प्रोत्साहन द्यावें. ठरावीक सभासदांच्या नोंदीची अगर पैशाची आवश्यकता ठेवूं नये. युद्ध-परिस्थितींतील सर्वच कामें तात्पुरतीं असतात, या दृष्टीनें अशा संस्थांमध्यें काम करणारे कळकळीचे कार्यकर्ते यांना विश्वासांत घेऊन जास्त कडक अटी न घालतां सहकारी चळवळीचें आळें पसरावें म्हणजे त्यायोगें सहकारी तत्त्वांचा प्रचार होऊन राष्ट्रीय शांतता व एकमेकांसंबंधीं प्रेम उत्पन्न होऊन समाज बलवान व सुखी होईल. जीवनकलहाचे खडतर परिस्थितींत जर समाजास हात दिला नाहीं तर सहकारी चळवळीवरील विश्वास उडून जाऊन सहकारी चळवळ ही एक पुस्तकी बाब होऊन राहील. सहकारी चळवळीमुळें जर समाजांतील घटकांचें थोडें फार नष्टचर्य संपत असेल तर त्यास सर्वांनींच हातभार लावणें हें कर्तव्य आहे.

# इंडियन प्रोग्रेसिव्ह

## इन्शुअरन्स कंपनी लिमिटेड, पुणें २.

: चेअरमन :

ले. कर्नल के. जी. घारपुरे, आय. एम. एस. (रि.)

१९४१ सालअखेर—

प्रगति आणि वैशिष्ट्यें

१. आयुर्विमा निधि रु. ९०,११५.
२. खर्चाचें प्रमाण शें. ४३.१.
३. इन्व्हेस्टमेन्ट्स व कॅश रु. १,७६,९३८.
४. जून १९४२ अखेर रिझर्व्ह बँकेकडे डिपॉझिट रु. १,५०,००० सरकारी कर्जरोखे.
५. नवीन विमा कायद्याप्रमाणें केलेल्या पहिल्या मूल्यमापनांत नफा.
६. जादा हप्ता न आकारतां युद्धजन्य धोक्यासुद्धां सर्व धोक्यांपासून मिळणारें संरक्षण.
७. विम्याच्या अटी सुलभ व हप्ते अल्प.

आकर्षक कमिशनचे दरावर एजन्टस नेमणें आहेत.

— माहिती आजच मागवा —

अ. ना. गाडगीळ,
वा. ना. कलंत्रे, बी. ए. } सेक्रेटरी.

# चालू दिवाळी व ★ वर्ष ★

आमचे ग्राहक, एजंट व हितचिंतक या सर्वांना

## आनंदाचें जावो.

## द. कृ. सांडू ब्रदर्स, चेंबूर लि.

आर्यौषधि कारखाना : चेंबूर, मुंबई

पुणें एजंट

ठाकूरदेसाई आणि कं. जोगेश्वरी नाका

सतत एकोणतीस वर्षें खास लोकाश्रयाखालीं चाललेली व विश्वासास पात्र झालेली आणि कोल्हापूर इलाख्यांत प्रथम स्थापन झालेली.

# दि कोल्हापूर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि. कोल्हापूर.

स्थापना १९१३ इसवी

| | | |
|---|---|---|
| शेअर भांडवल | ... ... | ३५०००. |
| रिझर्व्ह फंड | ... ... | ५८६६९. |
| इतर फंडस | ... ... | ६२७३५. |
| सरकारी रोख्यांत वगैरे | ... | ६३८२०. |

बँकिंगसंबंधीं सर्व प्रकारचीं कामें केलीं जातात. बँकेचीं तिमाही सांपत्तिक पत्रकें कायद्यानुसार सरकारी गॅझिटमध्यें प्रसिद्ध केलीं जातात. ठेवींच्या व्याजाचे दरासंबंधीं व विशेष माहितीसाठीं भेटा अगर लिहा.

एस. एस. गुते, मॅनेजर.
येशवंत रामजी भोयटे, प्रेसिडेंट.

दि कोल्हापूर अर्बन को. ऑ. बँक लि.

भगिनींनो:—

सध्यां बाजारांत वस्तू दुर्मिळ झाल्या आहेत.

# —दिवाळीकरितां—

★ खमंग भाजणी २ प्रकारची
★ अनारशाचें तयार गोळापीठ

निश्चित मिळेल : : ऑर्डर नोंदवा

## म. गो. कुलकर्णी, किराणा दुकान

फडतरे चौक, सदाशिव पेठ, पुणें


# हिंदी कापूस कापडाच्या गिरण्या

हिंदुस्थानांत स्वदेशी कापडाच्या गिरण्या स्थापन होऊन अनेक वर्षें झालीं तरी मँचेस्टरचें कापड ह्या देशांत मोठ्या प्रमाणांत आयात होत असे. खुल्या व्यापाराचें तत्त्व सरकारच्या धोरणांत प्रभावी असल्यामुळें देशी गिरण्यांची वाढ होण्यास उत्तेजन मिळणें अशक्य होतें. गेल्या महायुद्धांत वाढता खर्च भागवण्यासाठीं हिंदुस्थान सरकारास परदेशी कापडावरील जकात वाढवावी लागली आणि ह्या योगानें देशी गिरण्यांच्या विस्तारास वाव मिळाला व त्यांत उंची दर्जाचें कापड निघूं लागलें. जकातींच्या सहाय्याचे जोरावर ह्या गिरण्यांची प्रगति उत्तरोत्तर होत गेली. मँचेस्टरचें व जपानी कापड ह्या देशांत स्वदेशी मालाच्या स्पर्धेमुळें कमी कमी येऊं लागलें. दर वर्षी तीनशें कोटि चौरस वार इतकें मँचेस्टरचें कापड आयात होत असे आणि हिंदी गिरण्यांची पैदास सुमारें सवा दोनशें कोटि वार असे. हळुहळु हें प्रमाण बदललें गेलें आणि परदेशी कापडाची आयात संपुष्टांत आली. युद्धपरिस्थितींत विलायती कापडाची आयात अत्यंत मर्यादित होणें अपरिहार्य होतें. ह्या आयातींत जपानचा हिस्सा महत्त्वाचा होता तो जपान मित्रराष्ट्रांच्या विरुद्ध युद्धांत पडतांच समूळ नष्ट झाला. वहातुकीच्या साधनांच्या तुटवड्यामुळें मँचेस्टरचें कापड इकडे येणें कठीण झालें. ह्या सर्व गोष्टींचा परिणाम हिंदी गिरण्यांतील कापडास वाढती मागणी उत्पन्न होण्यांत झाला. हिंदुस्थानांत सैन्याचा विस्तार होऊं लागला तसतशी लष्करी उपयोगासाठीं लागणाऱ्या कापडाच्या सरकारी ऑर्डरींची ह्या मागणींत भर पडली. आयातीची जागा भरून काढणें आणि मामुली बिनलष्करी व वाढती लष्करी मागणी पुरवणें ही त्रिविध कामगिरी त्यांचेवर येऊन पडली. स्वदेशी कापूस कापडाच्या गिरण्यांचें उत्पादन गेल्या तीन वर्षांत कसें वाढत आलें आहे हें त्याविषयींच्या खालील तुलनात्मक आकड्यांवरून स्पष्ट होईल.

| एप्रिल ते मार्च | कोटि चौरस वार |
|---|---|
| १९३९–४० | ४०१ |
| १९४०–४१ | ४२७ |
| १९४१–४२ | ४४५ |

जपान युद्धांत पडण्यापूर्वींपासूनच हें उत्पादन महागाईच्या वगैरे अडचणी असतांहि वाढत होतें. एकट्या मुंबईमध्यें कापडाच्या उत्पादनाचा आकडा १९४० मध्यें १५० कोटि वार होता तो १९४१ सालीं १५० कोटि वारांवर गेला आणि सुताचें उत्पादनहि त्याचप्रमाणें वाढलें. हिंदी गिरण्यांच्या उत्पादक शक्तीचा विशिष्ट भाग लष्करी गरजा भागवण्याकरितां राखून ठेवण्याचें ठरल्यानें जपान युद्धांत पडल्यावरहि गिरण्यांची उत्पादनाची स्थिति सुधारत गेली. दरम्यान कपास व सूत ह्यांच्या बाजारभावांनीं हेलकावे खाण्याचा क्रम चालू ठेवला होता. जपानला होणारी हिंदी कापसाची निर्गत बंद पडली, ह्यामुळें त्याची किंमत ह्या देशांत खालीं आली. गिरण्यांचा उत्पादन खर्च युद्धपरिस्थितीच्या महागाईमुळें चढला आहे तरी कापडास मागणी भक्कम असल्यानें त्यांच्या नफ्याचें मान समाधानकारक राहिलें आहे आणि त्यांच्या भागांच्या किंमतीहि चांगल्या आहेत. त्यांच्याकडे येणाऱ्या मागण्यांची मासिक किंमत वीस कोटि रुपये भरते. चालू वर्षाच्या जून अखेर एकूण १२० कोटि रुपयांचें कापड युद्धाच्या उपयोगासाठीं सरकारनें खरेदी केलें आहे असा अंदाज आहे. एकट्या चालू वर्षांतला हा आकडा ७० कोटि रुपये भरेल असा रंग आहे.

गिरण्यांचें सर्व उत्पादन-सामर्थ्य वर सांगितल्याप्रमाणें पूर्ण गुंतलें आहे, कापडाचा पुरवठा बाहेरून होणें शक्य नाहीं आणि बिनलष्करी मागणी पुरवावी लागणार आहे. त्याचाच अर्थ असा आहे कीं हातमागावर अधिक कापड निघेल अशी व्यवस्था झाली पाहिजे, म्हणजे ह्या मार्गानें लोकांच्या मामुली गरजा भागवतां येणें शक्य होईल. लढाऊ उपयोगासाठीं कांहीं माल हातमागावर काढून घेण्यांत येत आहे. विणकरांस सुताचा व फिरत्या भांडवलाचा पुरवठा केला गेल्यास त्यांच्या उत्पादनाची महत्त्वाची भर पडेल. सामान्य स्थितींतल्या जनतेस लागणारें कापड स्वस्त किंमतीनें मिळेल अशी व्यवस्था करण्याची आवश्यकता तीव्रतेनें उपस्थित झाली आहे. ह्यास कोणती परिस्थिति कारणीभूत आहे हें वर दिलेल्या माहितीवरून ध्यानांत येईल. ह्यासंबंधांत मध्यवर्ती सरकार व प्रांतिक सरकार ह्यांनीं व्यावहारिक योजना आखून त्या अमलांत आणणें अगत्याचें आहे.


## स्वावलंबी दीपावली

जागतिक युद्धामुळें सर्वच विलायती वस्तूंची आयात थांबली, आतां आपण आपल्याला लागणारें कापड, सौंदर्य साधनें, सुगंधी तेलें, शोभेची दारू, खाद्य पदार्थ इत्यादि सर्व तयार करीत आहों व आपलें सर्व सण स्वदेशी वस्तु घेऊनच साजरे करीत आहोंत, हा स्वावलंबनाचा आनंद निरतिशय आहे. प्रत्येक क्षेत्रांत स्वावलंबी होण्याचें सामर्थ्य व आत्मविश्वास आपण संपादित आहों.

*आयुर्विमा क्षेत्रांत हिंदुस्थान परावलंबी नाहीं. हिंदी विमा–कंपन्यांनीं या क्षेत्रांत स्पृहणीय यश संपादन केलें आहे.*

ट्रस्ट ऑफ इंडिया विमा कंपनीनें विमेदारांना कसलाहि जादा हप्ता न आकारतां विम्याचें संपूर्ण संरक्षण ( ज्यामध्यें हवाई हल्ल्यामुळें जीविताला होणाऱ्या अपायांचा अंतर्भाव होतो ) दिलें आहे.

त्रैवार्षिक बोनस, हजारीं रु. ३० व २६

## दि ट्रस्ट ऑफ इंडिया विमा कंपनी लिमिटेड, पुणें २.

हिंदुस्थानच्या सर्व भागांत उपशाखा व प्रचारकेंद्रें

★ नवें वर्ष आपणांस सुखाचें जावो. ★

विम्याचे पैसे वेळींच मिळाले आणि
त्यानें आपला धंदा थाटला.



☞ आमचे हितचिंतकांस नवें वर्ष
सुखदायी होवो !

कॉमनवेल्थ ॲशुअरन्स कं. लि. पुणें

न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.
( Approved Re-traders and Approved Contractors )
२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.
अध्यक्ष:—श्री. ग. स. मराठे, ॲक्चुअरी.

महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना

★ गिरणीचे रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स
★ रीमोल्ड टायर्स ★ रबरी वाशर्स ★ सॉलिड व्हील्स

व इतर रबरी माल तयार होतो.

पु. ग. मराठे,
मॅनेजिंग डायरेक्टर.

## हिंदी आयुर्विम्याची प्रगति

( अगदी ताजे उपलब्ध आकडे )

| | |
|---|---|
| १९४० असेरचें एकूण चालू काम | १५,५३,००० पॉलिसी<br>२,८५,६३,००,००० रुपयांचे विमे |
| १९३९ असेरचें चालू काम | १४,९७,००० पॉलिसी<br>२,७१,८०,००,००० रुपयांचे विमे |
| १९४० असेरचा विमानिधि | ६२,४१,००,००० रुपये |
| १९३९ असेरचा विमानिधि | ५६,४१,००,००० रुपये |

विमानिधींत वाढः—६ कोटि रुपये

व्यवस्थेचा खर्च ( १९४० ):—२८·९%

व्यवस्थेचा खर्च ( १९३९ ):—३३·२%

| | |
|---|---|
| १९४० मधील नवें काम | २,०६,००० पॉलिसी<br>३६,११,००,००० रुपयांचे विमे |

त्याचे वार्षिक हप्तेः—१,८९,००,००० रुपये

| | |
|---|---|
| १९३९ मधील नवें काम | ३,००,००० पॉलिसी<br>४६,६२,००,०० रुपयांचे विमे |

त्याचे वार्षिक हप्तेः—२,३७,००,००० रुपये

| | |
|---|---|
| १९४० सालीं हिंदी विमा कंपन्यांस मिळालेलें काम | १,९६,००० पॉलिसी<br>३२,३२,००,००० रुपयांचे विमे<br>१,६७,००,००० रुपयांचे वार्षिक हप्ते |
| १९३९ सालीं हिंदी विमा कंपन्यांस मिळालेलें काम | २,८९,००० पॉलिसी<br>४२,५१,००,००० रुपयांचे विमे<br>२,१४,००,००० रुपयांचे वार्षिक हप्ते |
| १९४० असेरच्या एकूण चालू कामांतील हिंदी कंपन्यांचा वाटा | १३,७२,००० पॉलिसी<br>२,२५,५१,००,००० रुपयांचे विमे<br>१०,६९,००,००० रुपयांचे वार्षिक हप्ते |
| १९३९ असेरच्या एकूण चालू कामांतील हिंदी कंपन्यांचा वाटा | १३,३१,००० पॉलिसी<br>२,१५,१९,००,००० रुपयांचे विमे<br>११,१३,००,००० रुपयांचे वार्षिक हप्ते |
| १९४० सालीं पडलेलें व्याज (प्राप्तीवरील कर मुळांत वजा करून ) | ४·३७% |
| १९३९ सालाचा तत्सम आकडा | ४·६८% |
| १९४० सालीं हिंदी कंपन्यांनीं हिंदुस्थानाबाहेर मिळवलेलें काम | २,९१,००,००० रुपयांचे विमे<br>१६,००,००० रुपयांचे वार्षिक हप्ते |
| १९३९ सालाचे तत्सम आकडे | ३,४५,००,००० रुपयांचे विमे<br>१९,००,००० रुपयांचे वार्षिक हप्ते |
| १९४० असेर हिंदुस्थानाबाहेर चालू काम | १८,४०,००,००० रुपयांचे विमे<br>९६,००,००० रुपयांचे वार्षिक हप्ते |

### १० लक्ष ज्यू लोकांची कत्तल

जर्मनीच्या ताब्यांतील युरोपमधील देशांतील ज्यू लोकांची संख्या ७० लक्ष भरते. त्यांपैकीं १० लक्ष ज्यू लोकांची कत्तल झालेली आहे. वर्ल्ड ज्यूइश काँग्रेसनें वरील माहिती प्रसिद्ध केली आहे.

## विम्यांतील " थर्ड पार्टी "चा अर्थ

सुप्रसिद्ध नटी मिस मर्ले ओबेरॉन ही लंडनमधील रस्त्यांवरून आपल्या स्वतःच्या मोटार गाडींतून जात होती व डिग्बी हा तिचा ड्रायव्हर मोटार चालवीत होता. मोटारीची दुसऱ्या मोटारीशीं टक्कर झाली तीमध्यें मिस ओबेरॉनला दुखापत झाली. टक्कर देणाऱ्या मोटारीच्या ड्रायव्हरवर तिनें दावा लावला, तेव्हां दोन्ही मोटारींचे ड्रायव्हर अपघातास कारणीभूत आहेत असें कोर्टास आढळून आलें. त्यापैकीं डिग्बीचा दोष जरा कमी होता. डिग्बी हा मिस ओबेरॉनचाच ड्रायव्हर असल्यामुळें, त्याच्या थोड्या निष्काळजीमुळें दुसऱ्या कितीतरी अधिक निष्काळजी ड्रायव्हरकडून बाईला नुकसानभरपाई मिळूं शकली नाहीं. परंतु तिनें डिग्बीला प्रतिवादी केलें होतें, त्याचेकडून सर्व नुकसानभरपाई वसूल करण्याचा हुकूम कोर्टानें दिला. डिग्बी ५ हजार पौंडांची रक्कम देण्यास समर्थ नव्हता, व त्याच्या विम्याचीहि तरतूद केलेली नव्हती. मिस ओबेरॉनच्या पॉलिसींतील अटीप्रमाणें, तिच्या परवानगीनें मोटार चालविणाऱ्यामुळें दुसऱ्यास अपघात झाल्यास विमा कंपनी नुकसान भरून देण्यास बांधलेली होती.

डिग्बीचें म्हणणें असें, कीं मिस ओबेरॉनचा 'दुसऱ्या' म्हणजे 'थर्ड पार्टी' मध्यें समावेश होतो. तो मोटार चालवीत असतांना व ती मोटारींत बसली असतांना तिच्या दोन भूमिका होत्याः ( १ ) विमेदार व ( २ ) डिग्बीच्या दृष्टीनें " थर्ड पार्टी ". अपघातांत मोटार मोडली तर तिचा विमा भरपाई करील. तिला अपघात झाला, तर ती 'थर्ड पार्टी' होते. अपील कोर्टानें डिग्बीचें म्हणणें अमान्य केलें व विमा कंपनीनें केस जिंकली. हाऊस ऑफ लॉर्ड्समध्यें पांचांपैकीं दोघांचें मत विमा कंपनीच्या बाजूचें होतें व तिघांनीं डिग्बीच्या म्हणण्यास पाठिंबा दिला. डिग्बीला त्यामुळें ५ हजार पौंड परत मिळाले. ह्या सर्वांचा सारांश असा, कीं स्वतः मोटार चालवूं नका, ड्रायव्हरला अगर मित्राला ती चालवूं द्या. म्हणजे, स्वतःच्या पॉलिसीमध्यें वर्णिलेला 'थर्ड पार्टी' इसम तुम्ही स्वतःच बनाल व अपघात झाल्यास कंपनीकडून पैसे वसूल करूं शकाल.

## लष्करी उपयोगासाठीं तंबूंचें उत्पादन

### वार्षिक उत्पादनांत १६० पट वाढ

हिंदुस्थानांतील तंबूंचें उत्पादन चालू युद्धास प्रारंभ झाल्यापासून विलक्षण वाढलें आहे. युद्धापूर्वी हिंदी लष्करास दरसाल १० लक्ष रुपयांचे तंबू लागत. १९३९–४० सालीं तो आकडा १ कोटि रुपयांवर गेला व १९४०–४१ मध्यें तो ८¾ कोटि रुपये झाला. १९४१–४२ मध्यें तो १३ कोटि रुपयांवर गेला व चालू वर्षांतील तंबूंच्या खरेदीची किंमत १६ कोटि रुपये भरेल अशी अपेक्षा आहे. म्हणजे, शांततेच्या काळांतील मागणीचे मानानें आतां मागणी १६० पट झाली आहे. चालू वर्षांतील मागणी पुरी पाडण्यासाठीं २० कोटि वार कापड; दोऱ्या, नवार इत्यादींसाठीं १८ हजार टन सूत व ५०० टन रंग लागतील. युद्धापूर्वी फक्त पांचच तंबूचे कारखाने होते; आतां ५३ नवे कारखाने निघाले आहेत. सुमारें ५ लक्ष लोक ह्या धंद्यांत आतां प्रत्यक्षपणें व आणखी ३ लक्ष लोक अप्रत्यक्षपणें गुंतलेले आहेत. सुमारें १०० कारखान्यांत तंबूंचें कापड तयार होत आहे.

महायुद्ध दाराशीं आलें
परदेशी औषधें
दुर्मिळ व महाग झालीं
पण
भिण्याचें कारण नाहीं !!!
— कारण —
आयुर्वेद रसशाळा पुणें लि०
या देशी औषधाच्या प्रसिद्ध कारखान्यानें
तयार केलेलीं
● रक्तवर्धक, ● उपनाह,
● बालजीवन, ● कॅल्सीप्राल
इत्यादि पेटंट, स्टँडर्ड व लोकप्रिय औषधें खात्री पटल्यामुळें
★ डॉक्टर्सहि वापरूं लागले आहेत. ★
दरसाल बिनचूक नफा वाटणाऱ्या ह्या कंपनीचे
शेअर्स व औषधें मागवा.
आयुर्वेद रसशाळा पुणें लि०
मुख्य दुकान गणपति चौक, लक्ष्मी रोड, पुणें २.



'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार



**L. S. G. D.** Training Classes for officers of Local Self-Government Service under the auspices of the Government of Bombay and the Local Self-Government Institute, will begin from

***16th November, 1942 at Bombay, Ahmedabad and Poona.***

**Fees Rs. 75**

*Apply for Prospectus to :*

**THE HONORARY SECRETARY,**
**410, Shanwar, Poona 2**
OR
**THE DIRECTOR,**
**11 Elphinstone Circle, Fort, Bombay**



राहाणेची व भोजनाची उत्तम सोय




फोन नं. ७७९ गणपति चौक, व्यवस्थापक



सर्व कंपन्यांचे रेकॉर्ड्स व ग्रामोफोन्स् मिळण्याचें
पुण्यांतील विश्वसनीय ठिकाण
जी. जे. घैसास आणि कंपनी
★ गिरगांव ट्रामनाका, मुंबई आणि लक्ष्मी रोड, पुणें शहर ★



महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन
स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.
बंबाचे माडीवर
महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी
बुधवार चौक, पुणें

# यंत्रांचें सहाय्य आर्थिक उन्नतीस पोषकच आहे

[ श्री. लक्ष्मणरावजी किर्लोस्कर यांच्या, प्रांतिक सहकारी बँकेच्या किर्लोस्करवाडी शाखेंतील तैलचित्राचे अनावरणप्रसंगीं श्री. आर. जी. सरय्या, बी. ए., बी. एस्‌सी., ओ. बी. ई., चेअरमन, बाँबे प्रॉ. को. बँक लिमिटेड, यांनीं केलेलें भाषण. ]

### यंत्रांचें महत्त्व

जगामध्यें जगाबरोबर चाललेंच पाहिजे. उगाच फक्त जुन्याचा खोटा अभिमान धरून बसल्यास हंसें झाल्याशिवाय राहणार नाहीं. हल्लींचें जग हें यांत्रिक आहे, यंत्राकडे सहायक दृष्टीनें पाहिलें पाहिजे. यंत्राला मानव जातीवर ताबा करूं न देतां यंत्रावर मनुष्यानें ताबा ठेवला पाहिजे. तरच जीवन हें सुखमय आणि प्रगतिमय होऊं शकेल. आपला देश हा शेतीप्रधान आहे. इतर उद्योगधंदे हे दुय्यम प्रतीचे आहेत म्हणून यंत्राचा उपयोग अशा रीतीनें करण्यांत आला पाहिजे कीं, त्यामुळें शेतीच्या उत्पन्नाची वाढ होईल व शेतींत उत्पन्न झालेल्या मालाची थोड्या खर्चांत विक्रीसाठी तयारी करतां येईल आणि कच्च्या मालाचें रूपांतर तयार मालांत थोडक्या खर्चांत व सुबक रीतीनें करतां येईल. यंत्राचा उपयोग करतांना ही गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे कीं त्यामुळें माणसांची व शेतकीला लागणाऱ्या जनावरांची उपयुक्तता कोणत्याहि प्रकारानें कमी न होतां उलट यंत्राच्या सहाय्यानें त्यांना आपली उत्पादनशक्ति जास्त प्रमाणांत वाढवतां येईल. अशा तऱ्हेनें यंत्राचा उपयोग केला गेल्यास आपणाला यंत्रावर सर्वस्वीं अवलंबून राहण्याचें कारण नाहीं. ह्या सर्व गोष्टी लक्षांत घेऊनच किर्लोस्कर बंधूंनीं आपल्या धंद्याचें धोरण ठरविलें. या त्यांच्या दूरदर्शीपणाबद्दल आपण सर्वजण त्यांचे ऋणी आहोंत. धंद्याची वाढ करतांना स्वतःचा त्याचप्रमाणें बहुजन समाजाचा कसा फायदा होईल याबद्दल त्यांनीं विशेष काळजी घेतली आहे. त्यांच्या यशाचें खरें रहस्य त्यांच्या सहकार वृत्तींतच आहे.

### श्री. लक्ष्मणराव किर्लोस्करांच्या उद्योगधंद्याचा विकास

आतां आपण ज्यांचें तैलचित्र आपल्या शाखेमध्यें ठेवणार आहोंत त्यांची माहिती माझ्यापेक्षा तुम्हां सर्वांनाच जास्त आहे ह्याची मला जाणीव आहे. परंतु अशा संस्मरणीय प्रसंगीं मला त्यांच्याबद्दल येथें चार शब्द सांगितल्याशिवाय राहवत नाहीं. श्री. लक्ष्मणरावांचा जन्म इ. स. १८५८ सालीं बेळगांव जिल्ह्यांत झाला. त्यांनीं आपला शिक्षणक्रम संपविल्यानंतर मुंबई येथील व्हिक्टोरिया टेक्निकल इंस्टिट्यूटमध्यें शिक्षकाची नोकरी पत्करली. शिक्षकाच्या व्यवसायांत असतांनासुद्धा कांहींतरी स्वतंत्रपणें उद्योगधंदा सुरूं करण्याची महत्त्वाकांक्षा त्यांनीं आपल्या मनांत बाळगली होती व ते नेहमीं आपल्या फावल्या वेळांत इतर देशांतील निरनिराळीं औद्योगिक प्रश्नांबाबत निघत असलेलीं मासिकें फार काळजीपूर्वक वाचून त्यांचा अभ्यास करीत असत. पुढें कांहीं कारणांनीं त्यांचे व त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचे न पटलेमुळें


हे मधुप फुलांभोंवतीं — डोलती जसें गुंगती —
त्याप्रमाणें तुम्हांलाहि डोलावयास व गुंगविण्यास लावणारा
नवयुगचा नृत्यमय आणि संगीतमय बोलपट

तुझाच

: भूमिका :
स्नेहप्रभा प्रधान, साळवी,
वासुअण्णा मालवणकर,
जोग, बेबी आचरेकर,
राजा परांजपे व विजय.

दिग्दर्शक : जुन्नरकर

तुझाच सोबत
प्रो. देवधरांची क्रिकेट मॅच.

मिनर्व्हा — पुणें.
रोज ६॥ व १०

४ था आठवडा
शनि. रवि. सोम. मंगळ.
जादा खेळ ३॥ वा.

आतां नोकरी सोडून देऊन स्वतंत्र रीतीनें उद्योगधंदा करण्यास त्यांनीं सुरवात केली. आरंभीं त्यांच्याजवळ कांहींहि भांडवल नव्हतें तरीहि ते मुळीच डगमगले नाहींत. प्रथमतः त्यांनीं एक सायकल-दुरुस्तीचें दुकान बेळगांव येथें काढलें. हळूहळू तें वाढवून त्याला लागणारें सामान तयार करण्याचाहि धंदा त्यांनीं सुरू केला.

### औंधच्या राजेसाहेबांची सहानुभूति व सहाय

पुढें कांहीं काळानीं त्यांची व औंधचे त्यावेळचे युवराज व आजचे राजेसाहेब यांची गाठ पडली. लक्ष्मणरावांच्या हुशारीबद्दल व त्यांच्या स्वतंत्रपणाच्या बाण्याबद्दल व उद्यमप्रवृत्तीबद्दल खात्री असल्यामुळें त्यांचेकडे औंध येथील देवळाचा मोठा सभामंडप बांधणेची कामगिरी सोंपविणेंत आली व ती त्यांनीं उत्तम रीतीनें पार पाडली. त्यांचा बेळगांव येथील कारखाना कांहीं विशिष्ट कारणामुळें तेथील म्युनिसिपॅलटीनें हालविण्यास सांगितला. सदर कारखाना आतां कोठें हालवावा असा पेचप्रसंग पडल्यावेळीं औन्धचे राजेसाहेबांनीं तो आपल्या संस्थानांत आणण्यास प्रोत्साहन दिलें इतकेंच नव्हें तर संस्थानांतील कराची माफी १९४० सालापर्यंत दिली होती. ही गोष्ट या कारखान्याचा येथें पाया घालण्याचें कारण होय. असा उपयुक्त कारखाना स्थापन करण्याकरतां औन्धचे श्रीमंत राजेसाहेबांनीं जी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष मदत दिली त्याबद्दल आपण सर्व हिंदवासी लोक त्यांचे ऋणी आहोंत व त्यांचे उपकार शब्दांनीं तरी फिटण्यासारखे नाहींत. वर नमूद केल्याप्रमाणें किर्लोस्कर बंधूंना शेतकऱ्यांबद्दल आस्था असल्यामुळें त्यांनीं प्रथम शेतीस लागणारें नांगर, कोळपीं वगैरे आयुधांची पैदास करण्याचें काम हातीं घेतलें. नंतर त्यांनीं शेतीच्या मालाचें रूपांतर तयार मालांत करण्यास लागणारीं यंत्रें म्हणजे शेंगा फोडण्याचीं यंत्रें, ऊस गाळण्याचे चरक, साखर तयार करण्याचीं यंत्रें, वगैरे निर्माण केलीं. त्यानंतर पाणी काढण्याचे पंप व क्रूडाईलवर चालणारीं एंजिनें व नंतर इतर लोखंडी सामान म्हणजे टेबलें, खुर्च्या, पलंग वगैरे उपयुक्त गोष्टींची पैदास केली.

### सहकाराचें अवलंबन

त्यांच्या लहानशा कारखान्यांत ते व त्यांचा कामकरीवर्ग एकत्र बंधूप्रमाणें काम करीत असत. त्यावरून सहकारित्वाचें बाळकडू त्यांना पहिल्यापासूनच मिळालें होतें. त्यांनीं आपल्या कामगारवर्गाकरतां निरनिराळ्या प्रकारच्या सहकारी संस्था स्थापून त्यांना योग्य वळण लावण्याची कामगिरी स्वतःकडे घेतली होती. कारखान्यांतील लोकांना काटकसरीची संवय लागावी याकरतां सेव्हिंग बँकेची योजना जरूर होती. अशी योजना एकादी बँक अगर बँकेची शाखा किर्लोस्करवाडी येथें स्थापन झाल्याशिवाय होणें शक्य नव्हतें. कारखान्याची हुंडीचिठीची सोय वगैरे होण्याकरितां त्यांना एकाद्या समाईक भांडवलाच्या बँकेची शाखा येथें आणणें अशक्य नव्हतें. परंतु सहकारी तत्त्वाकडे त्यांचा विशेष ओढा असल्यामुळें त्यांनीं आपल्या बँकेची शाखा येथें आणण्यासंबंधानें विशेष प्रयत्न करून सन १९२८ सालीं येथें आणिली. रा. लक्ष्मणराव यांनीं शाखेच्या कमिटीवर सतत १३ वर्षे चेअरमन म्हणून काम केलें व कांहीं काळ सुपरवायझिंग युनिअनचे चेअरमन म्हणून काम केलें. त्यांनीं आपल्या कारकीर्दींत सहकारी चळवळ योग्य-रीतीनें चालण्यासाठीं अतिशय मेहनत घेतली व त्यामुळें मला येथें नमूद करण्यास अभिमान वाटतो कीं, या शाखेखालील कांहीं अपवाद सोडून दिल्यास सर्व सोसायट्यांची परिस्थिति व व्यवस्था समाधानकारक आहे आणि त्याबद्दलचें श्रेय रा. लक्ष्मणरावांकडेच आहे. कारण त्यांनीं वेळोवेळीं आपल्या व्यवहारज्ञानाचा व अनुभवाचा फायदा पतपेढ्यांस देऊन त्यांस कार्यक्षम बनविलें. औंध संस्थानांतील सहकारी बँक व विमा कंपनी स्थापन करण्याचे कामीं त्यांचेंच प्रामुख्यानें अंग होतें व त्यांनीं सदरहू संस्थेचे चेअरमन म्हणून कित्येक वर्षे काम केलें आहे. त्याचप्रमाणें संस्थानांतील शेतकरी लोकांच्या ऋणविमोचनयोजनेबद्दलची कामगिरी कोणालाहि दृष्टीआड न करतां येण्यासारखी आहे. आपलीं बहुमोल कामें बाजूला ठेवून १९३२ सालीं बोर्डावर येऊन त्यांनीं आपणां सर्वांची सेवा केलेली आहेच.

### यंत्रांच्या उत्पादनाचें महत्त्व

जगामध्यें यांत्रिक सुधारणा इतक्या झपाट्यानें वाढत आहेत कीं आपण त्या सुधारणेप्रमाणें पुढें पाऊल न टाकल्यास व जुनें तें सोनें याचाच जप करीत बसल्यास आपली गणना थोडक्याच काळांत रानटी लोकांत होण्याचा संभव आहे व आपणांला त्याप्रमाणेंच वागविण्यांत येणेंहि अशक्य नाहीं. यंत्राचा उपयोग उत्पादनाकडे करणें हें मानवी लक्षण होय व नाशाकडे करणें हें राक्षसी लक्षण होय.

या दृष्टीनें यंत्राचा उपयोग करणें हें जितकें महत्त्वाचें आहे त्यापेक्षाहि यंत्रें स्वतःच्या राष्ट्रांत तयार करणें अधिक महत्त्वाचें आहे. नाहींतर यंत्रांत जीं राष्ट्रें सुधारणा करून आणतात तीं उर्जितावस्थेस जातात आणि यंत्रांची पैदास न करतां त्यांचा केवळ उपयोग करणारीं राष्ट्रें हीं नेहमीं निकृष्ट स्थितींत राहतात. कोणत्याहि धंद्याचा मालक व त्या धंद्यांत काम करणारीं माणसें यांच्यांत ज्या प्रमाणांत प्रेम राहतें त्या प्रमाणांत त्या धंद्याची प्रगति होत असते. धंद्याचा मालक कामकरीवर्गाबरोबर बंधुभावनेनें राहून त्यांच्या सुखसोयींकडे, आरोग्याकडे व आर्थिक उन्नतीकडे ज्या प्रमाणांत लक्ष देईल त्या प्रमाणांत धंद्याची प्रगती होणें सुलभ होतें व या सर्व गोष्टी साधण्याकरतां सहकार ही गुरुकिल्ली आहे. या सर्व गोष्टींचें आकलन करून रा. लक्ष्मणराव यांनीं आपल्या कृतींत उतरविलें आहे. रा. लक्ष्मणराव किर्लोस्कर यांच्यासारखीं परिस्थितीला न डगमगता धडाडीनें ध्येयासाठी काम करणारीं हजारो कर्तबगार माणसें जर आपल्या देशाला लाभलीं तर आपल्या या देशाची भरभराट होण्यास कांहींहि विलंब लागणार नाहीं हें अगदीं निर्विवाद आहे.

---

### लुंग्यांच्या निर्गतीवर नियंत्रण

लुंगी व इतर हातमागाचें कापड यांच्या निर्गतीवर बसविण्यांत आलेल्या नियंत्रणामुळें मुसलमान कोष्ट्यांचें फार नुकसान झालें आहे, अशी तक्रार दक्षिण हिंदुस्थानाच्या मुस्लिम चेंबर ऑफ कॉमर्सनें मद्रास सरकारकडे नुकतीच केली. मलाया व ब्रह्मदेश येथील व्यापार बंद पडल्यावर सिलोन हेंच लुंगीचें प्रमुख गिऱ्हाइक उरतें. दक्षिण हिंदुस्थानांतील लुंग्यांचें उत्पादन एकूण हिंदी मागणीपेक्षा पुष्कळच अधिक आहे. मुस्लिम चेंबरची ही तक्रार मद्रास सरकारनें हिंदुस्थान सरकारकडे पाठविली असून लुंग्यांच्या सिलोनकडील निर्गतीवरील बंधनें ढिलीं करण्याची त्यांस विनंति केली आहे.

# सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड.

● [ स्थापना १९१८ ] ●

शेअर भांडवल व रिझर्व्ह फंड्स ... १,७५,००० रु.
ठेवी ... ... .... १६,५०,००० रु.

## सिल्व्हर ज्युबिली सेव्हिंग्ज सर्टिफिकिटें

मुदतः— ३ वर्षें, ५ वर्षें, ० वर्षें

९२ रुपये भरून तीन वर्षांनीं १०० रुपये मिळतील.
८५ „ „ पांच „ १०० रु. „
७२ „ „ दहा „ १०० रु. „

—— विशेष माहितीसाठीं लिहा अगर भेटा. ——

हेड ऑफिस :
सारस्वत बँक बिल्डिंग,
निकद्वरी लेन, गिरगांव.

सब-ऑफिस :
भिस्मिल्ला बिल्डिंग,
बी. बी. सी. आय. स्टेशनसमोर, दादर.

# दि मिरज स्टेट बँक लिमिटेड

[ स्थापना : १०-५-१९२९ ]

मुख्य कचेरी : बँक बिल्डिंग, मिरज

शाखा : १ लक्ष्मेश्वर, ( जि. धारवाड ) २ मोडनिंब, ( जि. सोलापूर )
पे. ऑफिसेस : १ करकंब, ( जि. सोलापूर ) २ कुर्डुवाडी, ( जि. सोलापूर )

★ मुख्य कचेरी व शाखांमार्फत सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात ★

खेळतें भांडवल ..............रु. २७,००,००० वर
निरनिराळे फंड व रिझर्व
फंड मिळून, एकूण फंड ................रु. १,५०,००० वर

- कायम, सेव्हिंग बँक व चालू ठेवी स्वीकारल्या जातात.
- बँकेचे नियम व व्याजाचे दर याबद्दल चौकशी करावी.
- याशिवाय सरकारी रोखे, शेअर्स, सोनें, चांदी यांचे तारणावर, माल गहाणाचे तारणावर व स्थावर मिळकतीचे तारणावर कर्ज अगर कॅशक्रेडिट दिलें जातें. शेअर्स व सरकारी रोखे यांची खरेदीविक्री योग्य कमिशन घेऊन केली जाते याबाबत समक्ष चौकशी बँकेकडे करावी अगर लिहावें.

ल. ग. मराठे,
मॅनेजर.

मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेंच

## बॉंबे प्रॉव्हिन्शिअल् को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड

[ सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली ]

स्थापना : १९११

मुख्य कचेरी :

९, बेक हाउस लेन, मुंबई.

शाखा :

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ बारामती | ( जि. पुणें ) | १० अहमदनगर | ( जि. अहमदनगर ) | २० दोंडाईचें | ( जि. प. खानदेश ) |
| २ सातारा | ( जि. सातारा ) | ११ शेवगांव | ( „ „ ) | २१ शिरपूर | ( „ „ ) |
| ३ इस्लामपूर | ( „ „ ) | १२ कोपरगांव | ( „ „ ) | २२ शहादें | ( जि. प. खानदेश ) |
| ४ कऱ्हाड | ( „ „ ) | १३ बेलापूर | ( „ „ ) | २३ नंदुरबार | ( „ „ ) |
| ५ तासगांव | ( „ „ ) | १४ पालघर | ( जि. ठाणें ) | २४ साक्री | ( „ „ ) |
| ६ किर्लोस्करवाडी | ( „ „ ) | १५ भिवंडी | ( „ „ ) | २५ शिंदखेडें | ( „ „ ) |
| ७ शिराळें | ( „ „ ) | १६ कल्याण | ( „ „ ) | २६ तळोदें | ( „ „ ) |
| ८ कोरेगांव | ( „ „ ) | १७ अकलूज | ( जि. सोलापूर ) | २७ मालेगांव | ( जि. नाशिक ) |
| ९ वाई | ( „ „ ) | १८ विरमगांव | ( जि. अहमदाबाद ) | २८ सटाणा | ( „ „ ) |
| | | १९ धुळें | ( जि. प. खानदेश ) | २९ दोहद | ( जि. पंचमहाल ) |

## खेळतें भांडवल रु. २,५०,००,००० चे वर

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिस अगर शाखा कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.


हे पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व
रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ८ | पुणें, बुधवार, तारीख २५ नोव्हेंबर १९४२ | अंक ४६

## दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... ... ... रु. | २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | ... ... ... रु. | १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड | ... ... ... रु. | १,१८,००,००० |

मुख्य कचेरी : ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

मुंबईमधील शाखा : बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

इतर शाखा : अहमदाबाद ( भद्र, मुख्य ऑफिस ), अहमदाबाद ( एलिस ब्रिज शाखा ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अंधेरी ( मुंबई शेजारीं ), बांद्रे ( मुंबई शेजारीं ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस ), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर, कराची, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत.

लंडन एजन्ट्स : वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

डायरेक्टर्स : सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाइट; मि. ए. गेडिस; सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई.; मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण.

### करंट डिपॉझिट अकाउंट्स :

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षा कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमीचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

एजंटः—टी. आर. लालवाणी.

## दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

हेड ऑफिस : पुणें शहर.

स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.

मुंबअी शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबअी.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | : रु. १०,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | : रु. ५,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | : रु. २,५०,००० |
| एकूण खेळतें भांडवल | : रु. ४०,००,००० |

### डायरेक्टर्स

| | |
|---|---|
| प्रो. वा. गो. काळे, अध्यक्ष | श्री. भा. म. गुप्ते |
| श्री. धों. कृ. साठे | श्री. मा. रा. जोशी |
| श्री. म. ग. पवार | श्री. श्री. गो. मराठे |
| श्री. त्र्यं. वि. रानडे | श्री. र. चिं. सोहोनी |
| श्री. वा. पुं. वर्दे | मि. फ. दो. पदमजी |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदीविक्री कसोशीनें करून दिली जाते.

म. वि. गोखले
मॅनेजर.

महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशांचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर

# महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

# विविध माहिती

### डालमिया सिमेंट कं. लि.

डालमिया सिमेंट कंपनीनें १९४१ सालीं ६०¾ लक्ष रुपयांची विक्री करून १८¾ लक्ष रुपयांचा नफा मिळविला. ऑर्डिनरी भागांस आजवर डिव्हिडंड मिळालें नव्हतें, तें आतां ६¼% दरानें मिळणार आहे. १९४० मधील कंपनीची विक्री ५६ लक्ष रुपयांची व १९३९ मधील विक्री ३७ लक्ष रुपयांची होती.

### आनंद इन्शुअरन्स कं. लि.

वरील विमा कंपनी सर चुनिलाल भाईचंद मेहता ह्यांनीं नोंदविली आहे, तिचें भांडवल १ कोटि रुपयांचें आहे.

### बेलापूर कं. लि.

वरील कंपनीनें ३० सप्टेंबर, १९४२ अखेरच्या वर्षाचें १२% दरानें डिव्हिडंड देण्याचें जाहीर केलें आहे.

### रशियास मदत

गेल्या बारा महिन्यांत ग्रेटब्रिटन व अमेरिका ह्यांनीं राशियाकडे ३,०५२ विमानें, ४,०८४ रणगाडे व ३०,०३१ लष्करी गाड्या ह्यांची निर्गत केली.

### भारत बँक लि., दिल्ली

नुकत्याच स्थापन झालेल्या भारत बँकेचें शेड्यूल्ड बँकांच्या यादींत नांव दाखल झालें आहे.

### हिंदी कपास कापडाच्या गिरण्यांचें उत्पादन

हिंदी कपास कापडाच्या गिरण्यांचें उत्पादन किती वाढलें आहे, ह्याची माहिती खालील ताजे आंकडे देतील:—

हजारांचे आंकडे

(एप्रिल ते मार्च, बारा महिने)

| | १९४१-४२ | १९४०-४१ | १९३९-४० |
|---|---|---|---|
| सूत कातलें (पौंड) | १५,७७,१७८ | १३,४९,१५६ | १२,३४,८७३ |
| कापडाचें उत्पादन | | | |
| ,, (पौंड) | १०,९३,३५८ | ९,८१,४०३ | ८,७७,८१२ |
| ,, (वार) | ४४,९३,६१३ | ४२,६९,४७५ | ४०,१२,५२९ |

सुतामध्यें खालच्या नंबराच्या सुताचेंच उत्पादन मुख्यतः वाढलें आहे.

### ट्रेझरी बिलांवर १२ आणे व्याजाचा दर

रिझर्व्ह बँकेनें गेल्या आठवड्यांत १० कोटि रुपयांचीं हिंदुस्थान सरकारचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. १२ आणे इतका पडला.

### हिंदी सरकारी रेल्वेजचें वाढतें उत्पन्न

| | | |
|---|---|---|
| ऑक्टोबर, | १९४० | ९ कोटि, १५ लक्ष रु. |
| ऑक्टोबर, | १९४१ | १० कोटि, ४८ लक्ष रु. |
| ऑक्टोबर, | १९४२ | ११ कोटि, १० लक्ष रु. |

उतारूंच्या दरांत वाढ, लष्करी उतारूंच्या संख्येंत वाढ, उतारूंचे दीर्घ प्रवास व पार्सलांचे लांब पल्ले हीं रेल्वेजच्या उत्पन्नांतील वाढीचीं प्रमुख कारणें आहेत.

### हिंदी कस्टम्सचें उत्पन्न

| | | |
|---|---|---|
| ऑक्टोबर, | १९४१ | ३ कोटि, ५९ लक्ष रु. |
| सप्टेंबर, | १९४२ | ३ कोटि, १५ लक्ष रु. |
| ऑक्टोबर, | १९४२ | २ कोटि, ९४ लक्ष रु. |

### हिंदी कारखान्यांतील संप

ब्रिटिश हिंदुस्थानांत १९४० चे मानानें १९४१ सालीं अधिक संप झाले तरी त्यांत भाग घेणाऱ्या कामगारांची संख्या कमी होती व बुडालेल्या कामाच्या दिवसांची संख्या ५६% कमी भरली. १९४० सालीं ७५ लक्ष, ७७ हजार कामाचे दिवस बुडाले होते; १९४१ सालीं त्यांची संख्या ३३ लक्ष, ३० हजार होती.

### चीन–आर्जेंटिना करार

चीन आणि आर्जेंटिना ह्यांचेमध्यें सलोखा, व्यापार व वहातुक ह्याबाबत बरोबरीच्या नात्यानें करार झाला आहे. १८८१ सालीं झालेल्या कराराची जागा प्रस्तुत करार घेईल.

### जुने दागिने

जुन्या दागिन्यांचा व्यापार इंग्लंडमध्यें तेजींत आहे. जुने दागिने विकत घेऊन ते अमेरिका व कॅनडा ह्या देशांकडे पाठविण्यांत येत आहेत.

### तांदळापेवजी ओटमील

सिलोन विभागाचे लष्करी प्रमुख, सर हेन्री पॉनॉल ह्यांनीं ब्रिटिश सैनिकांस देण्यांत येत असलेलें तांदळाचें रेशन बंद केलें आहे. तांदळाचे ऐवजीं त्यांस ओटमील देण्यांत येईल. तांदळाची ह्यामुळें बचत होईल व सिलोनी लोकांस त्या प्रमाणांत अधिक तांदूळ खावयास उपलब्ध होईल.

### टोळांचा उपद्रव थांबविण्यासाठी चार देशांचें सहकार्य

इजिप्त ते इराणचें आखात ह्या प्रदेशांत टोळांनीं चालविलेल्या उपद्रवास प्रतिबंध करण्यासाठी इराणी, ब्रिटिश, रशियन व हिंदी शास्त्रज्ञ तेहरान येथें उपाययोजना आखीत आहेत. टोळांवर विषारी पिठाचा वर्षाव करण्यासाठी रशियानें विमानें दिलीं आहेत.

### इंग्लंडमधला प्राप्तीवरील कर

युद्धामुळें इंग्लंडमध्यें प्राप्तीवरील करास पात्र असलेल्या लोकांची संख्या व त्यांचे उत्पन्न ह्यांत मोठी वाढ झालेली आहे. १९३९ मध्यें हा कर देणारांची संख्या ३८ लक्ष होती ती आतां १०५ लक्ष झाली आहे. सध्या ४२५ कोटि पौंड इतक्या एकूण प्राप्तीवर कर आकारला जातो. १९३९ सालीं हा आकडा ३०० कोटि पौंड होता. सध्यांचे ब्रिटिश सरकारचें प्राप्तीवरील कराचें उत्पन्न ८३ कोटि पौंड आहे; १९३९ मध्यें तें ३१ कोटि पौंड होतें.

### विजेचा पुरवठा व सिनेमागृहें

विजेच्या पुरवठ्यांत काटकसर व्हावी म्हणून मद्रासच्या पोलिस कमिशनरांनीं असा हुकूम काढला आहे कीं, शनिवार व रविवार सोडून कोणत्याहि सिनेमागृहांत रात्रीं सवा नऊ वाजण्याच्या पुढें विद्युत्‌शक्तीचा उपयोग केला जाऊं नये. प्रत्येक खेळाचे पूर्वी पंधरा मिनिटांपेक्षा अधिक काल सिनेमागृहें उघडीं राहूं नयेत. जाहिराती किंवा "ट्रेलर" दाखवल्या जाऊं नयेत आणि मधली सुटी तीन मिनिटांपेक्षा अधिक वेळ असतां कामा नये, असेंहि हुकुमांत फर्मावण्यांत आलें आहे.

### जी. जी. दांडेकर मशीन वर्क्स लि.

आमचे दिवाळी अंकांत जी. जी. दांडेकर मशीन वर्क्स लि. ची जाहिरात छापली होती, तीमध्यें जमा झालेलें भांडवल, ठेवीवरील व्याज, इत्यादींच्या आकड्यांत कांहीं चुका राहून गेल्या होत्या. त्या दुरुस्त करून नवी जाहिरात पृ. ३८४ वर छापली आहे, तीमधील मजकूरच अधिकृत समजावा.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | ३८० | ची आफ्रिकेंत यशस्वी मोहीम—उपयुक्त गाई-बैलांचें संरक्षण—हिंदी रबराचें उत्पादन—हिंदी रेल्वेजची परिस्थिति | |
| २ चांदीच्या रुपयाचें अलीकडचें स्थित्यंतर | ३८१ | ५ पुणें येथील सहकार दिन | ३८५ |
| ३ रेशनिंगच्या पद्धतीची योजना | ३८२ | ६ शेड्यूल्ड बँकांच्या कचेऱ्या | ३८५ |
| ४ स्फुट विचार ... मित्रराष्ट्रांचे दणदणीत विजय—अमेरिकन सैन्या- | ३८३ | | |


# अर्थ

बुधवार, ता. २५ नोव्हेंबर, १९४२

## चांदीच्या रुपयाचें अलीकडचें स्थित्यंतर

व्हिक्टोरिया महाराणी व सहावे एडवर्ड बादशहा ह्यांच्या मुखवट्याचे रुपये आणि अधेल्या अनुक्रमें करून एप्रिल, १९४१ व जून, १९४२ पासून व्यवहारांतून काढून घेतल्याविषयींचे हुकूम सरकारनें योग्य वेळीं प्रसिद्ध केले होते तरी हीं नाणीं रिझर्व्ह बँकेच्या विशिष्ट शाखांत स्वीकारण्यांत येतील असें अभिवचन त्याप्रसंगीं देण्यांत आलें होतें. या संबंधांत हिंदुस्थान सरकारच्या फडनविशी खात्यानें आपल्या एका पत्रकांत नुकतेंच असें जाहीर केलें आहे कीं, वरील रुपये त्यांच्या पूर्ण किंमतीनें घेतले जाण्याची मुभा १, मे १९४३ ला बंद होईल आणि त्या तारखेच्यापुढें सदरहु नाणीं नाणीं ह्या नात्यानें कोठेंच चालणार नाहींत. दुसऱ्या एका सरकारी हुकुमांत असें म्हटलें गेलें आहे कीं पंचम जॉर्ज व सहावे जॉर्ज यांच्या मुखवट्याचे जुने रुपये मे, १९४३ च्या पूर्वी परत घेण्यांत यावयाचे आहेत, त्यांचा १ नोव्हेंबर, १९४३ च्या पुढें कोठेंहि स्वीकार व्हावयाचा नाहीं. उपरिनिर्दिष्ट चार प्रकारांच्या रुपयांचा कायदेशीर नाणें हा दर्जा जाहीर केलेल्या मुदतीनंतर नष्ट होईल आणि ते अपवाद म्हणून स्वीकारणें केवळ रिझर्व्ह बँकेच्या मर्जीवर राहील.

हिंदुस्थानच्या चलनपद्धतीच्या इतिहासांतील एका महत्त्वाच्या प्रकरणाचा शेवट होत असल्याविषयींची आठवण सरकारच्या प्रस्तुत पत्रकांत करून देण्यांत आली आहे तिचा संक्षिप्त परामर्श घेणें आवश्यक आहे. हिंदी रुपयाच्या इतिहासांत पन्नास वर्षामागें म्हणजे १८९३ सालीं एक अत्यंत महत्त्वाची घटना घडून आली. त्या वेळेपर्यंत रुपयाची धातू ह्या नात्याची किंमत आणि त्याची कायद्यानें नाणें म्हणून ठरवलेली किंमत ह्या दोहोंमध्यें म्हणण्यासारखा फरक नव्हता. त्यामुळें रुपये वितळवणे किंवा चांदीचे रुपये सरकारी टाकसाळींत पाडून घेणें ह्या गोष्टी सहज होऊं शकत होत्या. कोणत्याहि देशांतल्या मुख्य नाण्याचें लक्षण म्हटलें म्हणजे त्याचें आंगचें, अर्थात् धातुमय मोल आणि त्याची कायद्यानें निश्चित केलेली किंमत हीं एकच असणें हें असल्यानें हिंदी रुपया ह्या देशाचें प्रमाणभूत व आधारभूत असें चलन होतें. परंतु १८९३ सालच्या पूर्वींच्या कांहीं वर्षांत युरोपांतील चलनी उलाढालीमुळें चांदीची किंमत सारखी उतरत गेली आणि ह्या स्वस्ताईचा अनिष्ट परिणाम हिंदुस्थान सरकारच्या तिजोरीवर होऊं लागला. सरकारचें लंडनमधलें वार्षिक देणें सोन्यामध्यें द्यावें लागत असे आणि ज्यामधून त्याची भरती करावयाची तें त्याचें उत्पन्न चांदीच्या रुपयांत वसूल होत असे. चांदी स्वस्त झाली ह्याचाच अर्थ सोनें महागलें असा होतो आणि प्रतिवर्षी सोन्यांतलें ठराविक देणें देण्यास अधिक रुपये लागू लागून देशाच्या तिजोरीवर वाढता ताण पडूं लागला. ही अडचण दूर करण्यासाठी सरकारनें नवे रुपये टाकसाळींत पाडून देण्याचें बंद केलें आणि त्या नाण्यांचा पुरवठा मर्यादित करून त्याची सोन्यांतली किंमत कृत्रिम रीतीनें हळुहळु चढवली. ह्याप्रमाणें रुपयाचें प्रमाणभूत नाण्याचें मूळचें स्वरूप बदलून तो दुय्यम नाणें बनला. १८९९ सालीं ह्या घटनेस कायदेशीर स्वरूप देण्यांत आलें आणि सोन्याचा सॉव्हरिन प्रमाणभूत धरण्यांत आला आणि त्याचें रुपयाशीं असावयाचें प्रमाण निश्चित धरण्यांत आलें. चलन व्यवस्थेंतील रुपयाच्या स्थानांत ह्याप्रमाणें क्रांति घडून आली, पण सॉव्हरिन किंवा दुसरें सोन्याचें नाणें मात्र सरकारनें प्रचलित केलें नाहीं.

पूर्वीपासून आजतागायत रुपयाचें वजन १८० ग्रेन आहे आणि त्यापैकीं १६५ ग्रेन शुद्ध चांदी व १५ ग्रेन हलक्या धातूचें मिश्रण अशी व्यवस्था परवांपर्यंत होती. पण रुपया हें जर दुय्यम नाणें आहे आणि चांदीच्या तुकड्यावर छापलेल्या नोटेचें स्वरूप त्यास देण्यांत आलें आहे तर त्यांत अकरा-बारांश इतक्या मोठ्या प्रमाणांत शुद्ध धातू कशास हवी ? असा प्रश्न विशेषतः चांदी महागत गेल्यापासून उपस्थित झाला. गेल्या युद्धांत चांदीची किंमत चढली तेव्हां रुपयाचें सोन्याशीं असलेलें किंमतीचें प्रमाण पाहिरी पाहिरीनें चढवावें लागलें आणि रुपयाचीं नाणीं वितळण्यांतल्या फायद्याच्या मोहामुळें तीं व्यवहारांतून नाहींशीं झालीं. ही आपत्ति टाळण्यासाठी प्रस्तुत युद्धांत सरकारनें रुपयांतली चांदी त्याच्या वजनाच्या अकरा-बारांशाच्या ऐवजी निम्मी केली आहे. ह्या कारणानें हीं नाणीं वितळवण्यांत फायदा उरलेला नाहीं आणि तीं व्यवहारांतून नाहींशीं होण्याची भीति उरलेली नाहीं. चांदी महागली असतां ती विकत घेण्यास पडणारा अधिक खर्च आणि ती स्वस्तावली म्हणजे ती वितळण्यांतलें नुकसान ह्या दुहेरी अडचणींतून सरकार आतां मुक्त झालें आहे आणि रुपयाचें स्थान पक्कें झालें आहे. रुपयाची अंगची किंमत व बाजारी किंमत ह्यांमध्यें मोठा फरक होता अशा वेळीं जुने रुपये काढून घेण्यांत आले असते तर त्यांत आपली बचत घालणाऱ्या असंख्य गोरगरीब लोकांचें नुकसान झालें असतें. म्हणून सरकारनें आंत कमी चांदी असलेलीं नवीं नाणीं प्रचलित केलीं तरी जुने रुपये बदलून घेण्याची सवलत जनतेस कांहीं मुदतीपर्यंत ठेवली. आतां चांदी इतकी महागली आहे कीं जुन्या रुपयांची दर्शनी व अंगची किंमत एकच झाली आहे. तेव्हां ही सवलतहि दीर्घ काळपर्यंत अंमलांत रहाण्याचें प्रयोजन उरलेलें नाहीं असें सरकारनें म्हटलें आहे. प्रस्तुत सवलतीचा फायदा त्वरित घेण्यांत लोकांचें हित आहे कारण पुढें जुन्या रुपयाचे सोळा आणे होणार नाहींत आणि ते जवळ बाळगणाऱ्यांचा तोटा होण्याचा संभव आहे अशी

भय-सूचनाहि देण्यांत आली आहे. आंत अकरा-बारांश ह्या प्रमाणांत चांदी असलेल्या जुन्या रुपयांच्या मोबदल्यांत सोळा आणे देण्याच्या जबाबदारींतून सरकार मोकळें होत आहे, ह्याचा अर्थ नाण्यांत करावयाचा ह्या धातूचा असलेला महत्त्वाचा उपयोग त्यास मान्य नाहीं असा नव्हे आणि नवीन प्रकारच्या रुपयांत निम्मी चांदी आहे ह्यावरून ही जाणीव स्पष्ट होत आहे असें सरकारनें आपल्या पत्रकांत म्हटलें आहे. दुय्यम नाण्याच्या अंगच्या म्हणजे धातु-मूलक मोलास महत्व नसतें. ह्या दृष्टीनें रुपयांत जरूरीपेक्षा अधिक शुद्ध चांदी होती असें म्हणणें क्रमप्राप्त होतें आणि हें नाणें खरेंखुरें दुय्यम करण्याच्या म्हणजे तें चांदीची नोट बनवण्याच्या मार्गांत आतां पुष्कळच प्रगति झाली आहे. चांदी विशेष महाग नव्हती तोंपर्यंत ही आवश्यकता निकडीनें भासली नाहीं. परंतु युद्धपरिस्थितीनें अखेर त्या मार्गाचा अवलंब अपरिहार्य केला आहे आणि हिंदी चलनाच्या मोलाचें अंतिम प्रमाण सोनें असावें हें ध्येय केव्हांच दुरावलें आहे. हें प्रमाण आज ब्रिटिश पौंड स्टर्लिंग हें आहे. युद्धोत्तर काळांत आर्थिक पुनर्घटनेंत हिंदी चलन पद्धतींत काय घडामोडी होतील हें आज सांगतां येत नाहीं.

---

## रेशनिंगच्या पद्धतीची योजना

### पुणें सर्वपक्षीय नागरिक संरक्षण समितीचें कार्य

[ प्राथमिक तयारी, माहितीचा तपशील, बाहेरून येणाऱ्या मालाची नोंद, गिऱ्हाइकांस द्यावयाच्या कमाल मालाचें प्रमाण, इत्यादि प्रश्नांची चर्चा. ]

पुणें सर्वपक्षीय नागरिक संरक्षण समितीच्या उपसमितीनें रेशनिंगची पद्धत पुण्यांत सुरू करण्याच्या योजनेचा नुकताच विचार केला.

रेशनिंगचे पूर्वतयारीसाठी म्हणून प्रथमतः शहरांतील कुटुंबांची माहिती गोळा करावयास पाहिजे. हें काम करणें झाल्यास त्यास नगरपालिकेचें सहाय्य लागेल. परंतु अशी माहिती गोळा झाल्यानंतर तिचें वर्गीकरण करणेसाठीं नोकरवर्ग लागेल. व अशा माहितीबरोबर प्रत्येक कुटुंबास लागणारा माल याचीहि माहिती जमवावी लागेल. कदाचित् तपशीलवार माहिती गोळा करणें अशक्य झाल्यास निरनिराळ्या समाजांतील कांहीं कुटुंबांची माहिती नमुना पद्धतीवर जमवावी व हें काम नगरपालिका, नागरिक संरक्षण समितीच्या पेठानिहाय संस्था व इतर सामाजिक संस्था यांचेमार्फत करून घेणें शक्य आहे असा निष्कर्ष निघाला. कुटुंबांसंबंधीं माहिती जमवितांना प्रायः खालीलप्रमाणें वर्गीकरण करावें व खालील वस्तूंचे बाबत तूर्त रेशनिंग करावें असें ठरलें.

कुटुंबांची माहितीः—( १ ) वयांत आलेले पुरुष व स्त्रियांची संख्या ( २ ) १० वर्षांचे आंतील मुलें यांची संख्या ( ३ ) कुटुंबावर अवलंबून असलेला नोकरवर्ग यांची संख्या.

धान्याचे प्रकारः—( १ ) तांदूळ ( २ ) ज्वारी ( ३ ) बाजरी ( ४ ) डाळ ( ५ ) साखर.

१० वर्षांचे आंतील मुलांना लागणाऱ्या जिनसा मोठ्या माणसास लागणाऱ्या जिनसाच्या निम्म्या धराव्यात असें ठरलें.

### घाऊक व्यापारी, किरकोळ व्यापारी व गिऱ्हाईक यांचे संबंध

यानंतर शहरांत आयात होणारा माल याची नोंद योग्य तऱ्हेनें व्हावी व तो घाऊक व्यापाऱ्यांकडे जावा, यासंबंधीं चर्चा झाली. यांतील अडचणी लक्षांत घेतां सध्यां घाऊक व्यापार करणारे व्यापारी या सर्वांना मान्यता द्यावी व जकात नाक्यावर माल येतांना तो कोणाकडून आला आणि कोणाकडे जावयाचा यांची नोंद होऊन त्याबद्दल नेहमीं तपासणीहि व्हावी असें ठरलें. घाऊक व्यापाऱ्यांनीं कोणत्या किरकोळ व्यापाऱ्यास माल द्यावयाचा हेंहि ठरवावें व शक्य तों सध्यांचे घाऊक व किरकोळ व्यापाऱ्यांचे संबंध आहेत तसे ठेवावे असें ठरलें. किरकोळ व्यापाऱ्यानें माल फक्त ज्या गिऱ्हाईकाजवळ कार्ड असेल त्यासच द्यावयाचा आहे. शहरांत बाहेर गांवाहून दररोज व्यवसायासाठीं येणाऱ्या गिऱ्हाईकांची सोय व्हावी म्हणून किरकोळ व्यापाऱ्यांकडे कांहीं प्रमाणांत जादा ( सुमारें ५ टक्के ) माल ठेवण्यास हरकत नसावी. ज्या नागरिकांना स्वतःचे उपयोगासाठीं आपल्या शेतीवाडीहून माल आणणें असेल अशांना रेशनिंगचा फायदा देतां येणार नाहीं.

शहरांतील सध्यां व्यापार करणारीं किरकोळ दुकानें, त्यांचें स्थैर्य व ते व्यापार करीत असलेलीं वर्षें लक्षांत घेऊन त्यांना लायसेन्स देण्यांत यावें व अशा दुकानदारांनीं त्या भागांतील कुपन दाखविणारांना माल द्यावा. विशिष्ट परिस्थितींत गिऱ्हाइकांस विशिष्ट दुकानीं माल घेण्यास सवड देण्यांत यावी. एका वेळेस माल घ्यावयाचा तो कमींत कमी एक आठवड्याचा द्यावा व जास्तींत जास्त पंधरा दिवसांचा असावा. किरकोळ दुकानांखेरीज, सहकारी संस्था व निमसहकारी संस्था यांनाहि मान्यता देण्यास हरकत नसावी असेंहि ठरलें.

सध्यां प्रत्येक कुटुंबाजवळ असलेल्या धान्यसाठ्याचीहि माहिती मागवावी असें ठरलें. " रेशनिंग " सुरू झाल्यावरहि किंमतीबद्दल नियंत्रण करावें लागेल. रेशनिंग पद्धतींत येणाऱ्या अडचणी निवारण्यासाठीं व पद्धत यशस्वी होण्यास लागणाऱ्या मदतीसाठीं एक निम-सरकारी समिति असावी व त्यांत नगरपालिकेचे प्रतिनिधी, किरकोळ व घाऊक व्यापारी यांचे प्रतिनिधी, कलेक्टर अगर त्यांचा प्रतिनिधी व गिऱ्हाईकांतर्फे प्रतिनिधी असावे, असें ठरलें.

---

## अमेरिकेंतील अपघात

अमेरिकेंत गेल्या वर्षी अपघातांमुळें १,०२,५०० लोक मरण पावले, ३,५०,००० कायमचे जायबंदी झाले व ९० लक्ष लोकांस कमी-जास्त दुखापती झाल्या. म्हणजे अमेरिकेंतील प्रत्येक चौदापैकीं एकास अपघातानें मृत्यु आला किंवा जबर दुखापत झाली. त्यामुळें ४ अब्ज डॉलर्सचें नुकसान झालें. कारखान्यांत होणाऱ्या अपघातांचीं प्रमुख कारणें खालीलप्रमाणें आहेतः—( १ ) कच्चा कामगार वर्ग, ( २ ) कामाची धोकायुक्त योजना, ( ३ ) सदोष यंत्रसामुग्री, ( ४ ) यंत्रांभोंवतीं अपुरें कंपाउंड, ( ५ ) सुटे कपडे, ( ६ ) कामगारांतील शारीरिक दोष, ( ७ ) खेळत्या हवेचा अभाव व ( ८ ) अपुरा उजेड. ह्यांपैकीं पहिल्या तीन कारणांमुळेंच विशेष अपघात होतात, असा अनुभव आहे. कारखान्यांतील अपघातांपेक्षा कारखान्यांबाहेरील अपघातांची संख्याच ज्यास्त भरते. १९४१ सालीं रस्त्यांवरील वहातुकीच्या अपघातांमुळें १९ हजार कामगार मरण पावले व ६३ लक्ष कामगारांस दुखापत झाली.

## स्फुट विचार

### मित्र राष्ट्रांचे रणक्षणीत विजय

उत्तर आफ्रिकेंत मित्र राष्ट्रें चढाईचें धोरण स्वीकारतील अशी हिट्लरला कल्पनाहि नव्हती अशा वेळीं इजिप्तमधून ब्रिटिश सैन्यानें इटली-जर्मन सैन्यावर हल्ले चढवून त्यांस माघार घेण्यास लावलें, एवढेंच नव्हे तर कोठेंहि थांबून प्रतिकार करण्याची फुरसतहि त्यास दिलेली नाहीं. मध्यंतरीं रोमेल एखाद्या मजबूत ठिकाणीं मित्र राष्ट्रांच्या सैन्यास थांबवून लढाई देईल असें वाटत होतें. परंतु त्याची एवढी तारांबळ उडून गेली कीं लढाऊ सामान मागें टाकून तो सारखा पळत सुटला. बिचाऱ्या इटालिअन पलटणींस निसटण्याची संधि जर्मनांनीं न दिल्याकारणानें त्यांतले हजारों शिपाई कैद झाले. जर्मन सैन्यास पळतां भुई थोडी झाली आणि समुद्राच्या बाजूनें आरमार, हवेंत विमानें व जमिनीवर सशस्त्र गाड्या ह्यांनीं पाठलाग केल्यामुळें टोब्रुकसारखीं महत्त्वाचीं ठिकाणें सोडूनहि त्यास पश्चिमेच्या रस्त्यानें धाव मारावी लागली आहे. एल आलमेनपासून पूर्वेकडे अलेक्झांड्रिया व सुएझचा कालवा ह्यांच्या बाजूनें चाल करावयाची आणि युद्धाचें क्षेत्र इजिप्त व पश्चिम एशिया ह्यांचे-मध्यें थाटावयाचें हें हिट्लरी मनोराज्य तर ढासळून पडलें आहे, पण त्याच्यापेक्षां अधिक महत्त्वाची गोष्ट घडून आली आहे ती ही कीं जर्मनी व इटली ह्यांची उत्तर आफ्रिकेमधून हकालपट्टी होत आहे. ह्या रणक्षेत्रांतील ब्रिटिश सेनानींचें त्या पराक्रमाबद्दल हार्दिक अभिनंदन होत आहे तें सर्वस्वी योग्य आहे. त्यांनीं आपल्या चढाईच्या मोहिमेची योजना कल्पकतेनें तयार करून ती कुशलतेनें व चिकाटीनें पार पाडली आहे हें त्यांस अत्यंत भूषणावह आहे.

---

### अमेरिकन सैन्याची आफ्रिकेंत यशस्वी मोहीम

पूर्वेच्या दिशेकडून जर्मनीच्या फौजेची अशी दांडगेतोड चालली असतांना पश्चिमेच्या बाजूनें प्रचंड अमेरिकन फौजेनें फ्रेंच मोरोक्को व आल्जीरिया ह्यांमध्यें उतरून त्यांत आपलें ठाणें बसविलें. ही अमेरिकन मोहीमहि हिटलरला अनपेक्षितच होती आणि ती एवढ्या झपाट्यानें व यशस्वी रीतीनें प्रगति करील अशी कल्पनाहि त्यास आली नसेल. व्हिशीचें अंकित सरकार अमेरिकन स्वारीचा प्रतिकार करील आणि स्वतःच्या सैन्याची जुळवाजुळव करण्यास वेळ मिळेल असें त्यास वाटलें असल्यास त्यांतहि त्याची निराशा झाली आहे. विजयी अमेरिकन सैन्या-पुढें आपलें कांहीं चालावयाचें नाहीं हें जाणून मोरोक्को व आल्जी-रिया ह्या फ्रेंच प्रदेशांतील अधिकाऱ्यांनीं शस्त्र खालीं ठेवलें असून ॲडमिरल डारलॉ हा तर मित्रराष्ट्रांस येऊन मिळाला आहे. ओरान व आल्जिअर्स हीं महत्त्वाचीं बंदरें पहिल्या झपाट्यास अमेरिकन सेनापतींनीं काबीज केलीं आणि ट्युनीशियामध्यें प्रवेश केला. एवढी मोठी सुसज्ज फौज अमेरिकेंतून जर्मन पाण-बुड्या बोटी व विमानें ह्यांस नकळत आफ्रिकन किनाऱ्यावर उतरून थोड्या काळांत आंत घुसूं शकली हा पराक्रमहि वाखा-णण्यासारखा आहे ह्यांत संशय नाहीं. ट्युनीशियाच्या किनाऱ्यापासून सिसिली व इटली अगदीं जवळ असल्यानें जर्मनीस तेथें आपल्या दोस्ताच्या मदतीस धावून जाणें भाग पडलें आहे. सॉलोमन बेटांत व न्यूगिनीमध्यें जपानला भयं-कर नुकसान सोसून मागें हटावें लागलें आहे ही अमेरिकन व ऑस्ट्रेलियन सैन्यांची स्तुत्य कामगिरी आहे.

---

### उपयुक्त गाई-बैलांचें रक्षण

सध्याच्या युद्ध-परिस्थितींत गाई-बैलांच्या मांसास मागणी वाढली आहे आणि तिचें नियमन, हिंदुस्थानांतील शेतीच्या धंद्यास अत्यावश्यक असलेल्या जनावरांची कत्तल होणार नाहीं अशा बेतानें केलें जाणें अगत्याचें आहे. अन्नसामुग्रीच्या पुरव-ठ्याची व्यवस्था ह्या देशांत नीट व्हावी म्हणून परिषदा व सल्ला-गार मंडळांच्या सभा भरत आहेत आणि निरनिराळ्या योज-नांची चर्चा चालू आहे. ह्या बाबतींत शाकाहाराबरोबर मांसा-हाराचाहि विचार झाला पाहिजे हें उघड आहे. मध्यवर्ती खाद्य-पदार्थ पुरवठा सल्लागार समितीनें गेल्या ऑगस्ट महिन्यांत ह्या प्रश्नास चालना देऊन सरकारास असें सुचवलें होतें कीं दहा वर्षांच्या आंतील वयाचे शेतीचे बैल आणि दुभाळ व गाभण गाई ह्यांची कत्तल त्यांच्या मांसासाठीं होणार नाहीं असा निर्बंध घालण्यांत यावा. निरनिराळ्या सैन्य विभागांस मांसाचा पुर-वठा केला जातो त्याचे संबंधांत हिंदुस्थान सरकारनें ही शिफारस मान्य केली आहे आणि तिची अंमलबजावणी चालूहि झाली आहे असें एका पत्रकांत म्हटलें आहे. दुभत्या व गाभण्या गाईंची कत्तल सध्यांहि केली जात नाहीं आणि त्यामुळें वहातुकीसाठीं उपयोगांत येणारीं जनावरेंहि स्वीकारण्यांत येऊं नयेत असा हुकूम आतां काढण्यांत आला आहे. पूर्वीच दिलेल्या कंत्राटांत त्या विषयींची अट नसली- तरी ती-आहे असें समजून कंत्राटदारांनीं पुरवठा करावा असेंहि सरकारनें सुचवलें आहे. शाकाहाराच्या सामुग्रीचा पुरवठा ज्यांच्या श्रमावर अवलंबून आहे आणि जीं देशांतील संपत्तीच्या उत्पादनाचीं महत्त्वाचीं साधनें आहेत अशा जनावरांची काळजी घेतली जाणें राष्ट्रहिताच्या दृष्टीनें अगत्याचें असल्यानें हिंदुस्थान सरकारनें ह्या बाबतींत अंमलांत आणलेलें धोरण अभिनंदनीय आहे असें म्हटलें पाहिजे. घनोत्पादक जना-वरांचें रक्षण न होईल तर सोन्याचीं अंडीं घालणाऱ्या हंसीची हत्या करण्यासारखा तो वेडगळपणाच होणार आहे.

---

### हिंदी रबराचें उत्पादन वाढविण्याचा प्रयत्न

हिंदी रबराच्या वार्षिक उत्पादनाचा आकडा १६,५०० टन इतका आहे, तो हळुहळू वाढत आहे. हिंदी रबराची किंमत वाढ-वून ती सिलोनी रबराच्या किंमतीचे बरोबरीस आणावी, असें रबराच्या मळेवाल्यांचें म्हणणें आहे. असें केलें म्हणजे हिंदी उत्पादनास प्रोत्साहन मिळेल. युद्धसमाप्तीनंतर हिंदी रबरास हिंदु-स्थानांतील असलेली मागणी वाढण्याचा संभव आहे. तथापि, जे मळेवाले सरकारी सूचनांस अनुसरून उत्पादन वाढवीत आहेत, त्यांच्या हितसंबंधांचें युद्धानंतरहि संरक्षण होणें आवश्यक आहे असें त्यांचें म्हणणें आहे. पूर्वेकडील देशांत रबराच्या उत्पादनास चालना देण्याकरितां एक ब्रिटिश शिष्टमंडळ इकडील देशांस भेट देत आहे, तें सिलोनला जाऊन हिंदुस्थानांत येत्या महिन्यांत दाखल होईल. ह्या शिष्टमंडळावर हिंदी व ब्रिटिश मळेवाल्यांचा प्रत्येकीं एक प्रतिनिधी हिंदुस्थानांतील प्रश्नापुरतें काम करील व मंडळाचा रिपोर्ट हिंदुस्थान सरकारास पहावयास मिळेल.

---

### हिंदी रेल्वेजची परिस्थिति

हिंदी रेल्वेजच्या मुख्य अधिकाऱ्यांची वार्षिक परिषद् दिल्ली येथें गेल्या आठवड्यांत भरली होती. त्या प्रसंगीं हिंदुस्थान सरकारचे वहातुक मंत्री सर एडवर्ड बेंथॉल, ह्यांनीं युद्धोपयोगी ज़िनसांच्या ने-आणीचा ताण रेल्वेजवर कसा पडत आहे, इंजनें बाहेरून येण्याची पंचाइत झाल्यामुळें येथेंच त्यांचे संबंधांत तरतूद कशी करावी लागत आहे आणि अन्नसामुग्रीच्या वहातुकीस सवलती कशा देण्यांत येत आहेत त्यांची माहिती दिली. जरूरीच्या मालाच्या वहातुकीस प्राधान्य देण्यांत येत असल्याकारणानें माणसांच्या प्रवासांत गैरसोयी होणें तूर्त अपरिहार्य आहे असें ते म्हणाले. ह्या परिस्थितींतल्या रेल्वेजच्या अडचणी जनतेस समजाव्या ह्याकरितां रेडिओवर अधिकाऱ्यांचीं स्पष्टीकरणात्मक भाषणें होण्याची व्यवस्था लवकरच अंमलांत यावयाची आहे. लोकांची सहानुभूति आणि सहकार्य मिळवण्याच्या ह्या उपयाचा अवलंब ह्यापूर्वीच केला जाणें आवश्यक होतें. धान्य वगैरे खाद्यपदार्थांच्या वहातुकीस प्राधान्य देण्यांत येत आहे, पण वाघिणी पुरवल्या असतां त्यांमधून न्यावयाचा मालच वेळेस जाग्यावर नसतो असा अनुभव येत असल्याची तक्रार सर एडवर्ड ह्यांनीं केली. एकदम मागणी आल्यास वाघिणी पुरवणें रेल्वेजना कठिण जाईल, तरीहि धान्याच्या वहातुकीस विशेष सवलती देण्याचें धोरण अंमलांत रहाणार असल्यानें प्रांतिक सरकारें व व्यापारी ह्यांस वहातुकीच्या साधनाची अडचण पडणार नाहीं असें आश्वासन त्यांनीं दिलें. दिल्ली रेल्वे परिषदेचे अध्यक्ष, मि. लॉटन, ह्यांनीं आपल्या भाषणांत युद्धोत्तर काळांत रेल्वे व मोटारबसेस ह्यांची तीव्र स्पर्धा होणार असल्यानें त्या प्रश्नाचा पूर्वीपासून विचार केला जावा असें सुचवलें. रेल्वेज मध्यवर्ती सरकारच्या हुकमतीखालीं आणि मोटारींची वहातुक प्रांतिक सरकारांच्या अधिकारांतली असा प्रकार असल्यानें आणि युद्धानंतर मोटारी व ते हाकणारे ह्यांचा धंदा मोठ्या प्रमाणावर चालू होण्याचा संभव असल्याकारणानें त्या बाबतींत एकसूत्री धोरण आजच निश्चित होणें अगत्याचें आहे असें ते म्हणाले.

---

## अलॉटमेंटपूर्वी प्रॉस्पेक्टस बदलल्यास भागीदारास भाग नाकारतां येतो

---

### मद्रास हायकोर्टाचा निवाडा

राजगोपाल अयर ह्यांनीं साउथ इंडिया रबर वर्क्सच्या २० जानेवारी, १९३७ च्या प्रॉस्पेक्टसप्रमाणें त्या कंपनीच्या भागांकरितां अर्ज केला. त्यांचा अर्ज मंजूर होण्यापूर्वी, अलॉटमेंटला किमान जरूर असलेली ४० हजारांची रक्कम कमी करून १० हजार रुपये कंपनीनें केली. हा बदल ९ मे, १९३७ रोजीं करण्यांत आला. त्यानंतर २ दिवसांनीं अर्जदारास अर्जमंजुरीचें पत्र मिळालें. अर्जदारानें आपला अर्ज रद्द केला असल्याचें कंपनीस कळविलें. अर्जानंतर परंतु अर्जमंजुरीपूर्वी प्रॉस्पेक्टसमध्यें अर्जदाराचे दृष्टीनें महत्त्वाचा बदल झाला असल्यानें त्यास अर्ज परत घेतां येतो, असें त्याचें म्हणणें होतें. हायकोर्टापर्यंत हें प्रकरण जाऊन राजगोपाल अयरप्रमाणें निवाडा झाला.

---


ठेवी व शेअर-अर्जांचे नमुने मागवा.

## जी. जी. दांडेकर मशीन वर्क्स लि.,

### भिवंडी, जि. ठाणें

भातापासून तांदूळ करण्याच्या गिरण्या, ऊंस गाळण्याचीं यंत्रें, टूल ग्राइंडर्स वगैरे विविध यंत्रसामुग्री बनविणारा कारखाना.

स्थापना १९११ मध्यें होऊन
लिमिटेड १९३९ मध्यें झाली.

विक्रीस काढलेलें भांडवल: जमा झालेलें भांडवल:

**रु. ५,००,००० * रु. २,७०,५००**

ऑर्डिनरी व प्रेफरन्स शेअर प्रत्येकीं रु. १०० चा असून, प्रेफरन्स शेअर्स रिडीमेबल व ५ टक्के क्युम्युलेटिव्ह व्याजाचे आहेत. आतां फक्त रु. २५००० चेच रिडीमेबल प्रेफरन्स शेअर्स विकावयाचे आहेत.

### या कंपनींत पैसा गुंतविणें सुरक्षित कां आहे?

कारण

(१) गेलीं तीस वर्षे कारखाना व्यवस्थित चालला असून त्याची उभारणी शास्त्रशुद्ध पायावर झालेली आहे.

(२) श्री. दांडेकरांनीं कारखान्याला झालेल्या उत्पन्नांतून सुमारें दोन लक्ष रुपयांचें भांडवल निर्माण केलें.

(३) हिंदुस्थानांतील सर्वांत मोठें धान्याचें पीक भाताचें आहे, व त्याचें उत्पादन वाढण्याचा प्रयत्न चालू आहे. सबब कंपनी करीत असलेल्या भातगिरण्या व त्यांचे सुटे भाग यांना सतत मागणी राहील.

(४) हिंदुस्थानांत साखरेचा धंदा बद्धमूल होऊन कारखान्यांची संख्या वाढत आहे, सबब या कारखान्यांकडून कंपनी करित असलेल्या सुट्या भागांना मागणी वाढणार आहे.

(५) कंपनीचे चालक उत्पादन व विक्री या दोहोंतहि वाकबगार आहेत.

(६) कंपनीच्या संचालक-मंडळांत व्यापार-उदिमांत नांव मिळविलेले व घरंदाज गृहस्थ आहेत.

(७) कंपनीचे चालक प्रगमनशील असून प्रत्येक उपक्रम यशस्वी होत आहे.

### ऑर्डिनरी शेअर्सवर दिलेलें व्याज

| | | |
|---|---|---|
| ३० जून १९४० अखेर ४ टक्के | | |
| ३० जून १९४१ अखेर ५ टक्के | } | शेअरविक्री चालू आहे. |
| ३० जून १९४२ अखेर ६ टक्के | | |

### ठेवींवरील व्याज

| | | |
|---|---|---|
| १ वर्ष ३॥ टक्के द. द. शें. | | |
| २ वर्षे ४ टक्के „ „ | } | तूर्त फक्त एक लक्ष रुपयांच्याच ठेवी घ्यावयाच्या आहेत. |
| ३ वर्षे ४½ टक्के „ „ | | |

## पुणें येथील सहकार दिन

( ले.:—एक सहकारी )

आजवरच्या प्रथेला अनुसरून नोव्हेंबर महिन्यांतील पहिल्या शनिवारीं सहकार दिन साजरा करण्याचें पुण्यांतील सहकार मंडळानें योजलें होतें. गतवर्षी प्रमाणेंच सहकार सप्ताहाचा कार्यक्रम शनिवार ता. ७।११।४२ ते १३।११।४२ पर्यंत आखण्यांत आला. वेगवेगळया दिवशीं जो विषय घेण्यांत यावयाचा होता त्याचें टांचण स्थानिक वर्तमानपत्रांतून आगाऊ प्रसिद्ध करण्यांत आलें होतें. गतवर्षी हा सहकार दिन साजरा करण्याबद्दल सहकारी खात्यानें विशेष पुढाकार घेतला असल्यानें त्याचा गाजावाजा बराच झाला पण यंदा मात्र तशी परिस्थिति नव्हती. जिल्हा यूनियन बोर्डानेंही सहकारी दिनाबाबत चालू सालीं कांहीं केल्याचें दिसत नाहीं. सहकारी मंडळानें लिहिलेल्या पत्रास उत्तरें देखील जिल्हा यूनियन बोर्डानें दिलीं नाहींत असें समजतें. परंतु त्यामुळें निराश न होतां सहकार मंडळानें द्रव्यसहाय किंवा मोठा जमाव जमविण्याचे नादीं न लागतां अंतःकरणाच्या कळकळीनें जेवढी मंडळी जमतील तेवढ्यावरच समाधान मानून घेण्याचें ठरविलें. सभा भरविण्याऐवजीं निमंत्रित कार्यकर्त्यांशीं मोकळया मनानें प्रत्येक दिवसासाठीं मुकर केलेल्या विषयावर चर्चा करण्याची जी योजना आंखली होती त्याप्रमाणें आठवडाभर कार्यक्रम पार पडला.

या चर्चेत प्रो. शं. रा. भागवत, रावसाहेब खोले, श्री. द. दि. चितळे इत्यादींनीं विशेष भाग घेतला. यंदाची युद्धजन्य परिस्थिति व त्यामुळें जीवनासाठी आवश्यक लागणाऱ्या वस्तूंची दुर्मिळता लक्षांत घेऊन प्रत्येक कुटुंबासाठीं रेशनिंगची पद्धत अंमलांत आणण्याच्या प्रश्नाबद्दल पुष्कळ वाटाघाट होऊन एक अनरजिस्टर्ड संस्था स्थापन करण्याचा उपक्रम करण्यांत आला. या संस्थेंत सभासद होणारानें आपल्या कुटुंबाच्या गरजा त्या संस्थेमार्फतच भागवावयाच्या आहेत. या संस्थेच्या वतीनें प्रो. भागवत यांनीं सहकारी अंमलदाराबरोबर पत्रव्यवहार करावयाचा आहे. हा प्रयत्न यशस्वी होण्यास सभासदांची एकनिष्ठा, चिकाटी व तळमळ आवश्यक आहे व सभासदांची तीच कसोटी आहे. या प्रयत्नामधूनच पुढील कन्झ्यूमर्स चळवळ रचिली जाणार आहे.

ता. १३।११।४२ रोजीं सप्ताहाचा समारोप होऊन पुढील वर्षाच्या कामाची रूपरेखा ठरविण्यांत आली. सहकार मंडळाच्या सभा दर सोमवारीं संध्याकाळीं पुणें सें. को. बँकेच्या दिवाणखान्यांत भरत जातील. यंदाचे सालासाठी रावसाहेब वाय. डी. खोले हे मंडळाचे प्रमुख म्हणून नेमण्यांत आलेले आहेत.

### शेड्यूल्ड बँकांच्या कचेऱ्या

| | ३०-६-४२ | ३१-१२-४१ | ३०-६-४१ |
|---|---|---|---|
| इंपीरिअल बँक | ३८९ | ४०१ | ३९७ |
| पांच प्रमुख शेड्यूल्ड बँका | ३४५ | ३४१ | ३२१ |
| एक्सचेंज बँका | ८६ | ९९ | १०२ |
| इतर शेड्यूल्ड बँका | ५८५ | ६१३ | ५८४ |
| एकूण ... | १,४०५ | १,४५४ | १,४०४ |

### उसाच्या लागवडीचें परीक्षण

हिंदी उसाच्या लागवडीची पहाणी करण्यासाठीं हिंदुस्थान सरकारनें सर टी. एस. वेंकटरामन ह्यांची नेमणूक केली आहे. ही पहाणी पुरी होण्यास तीन महिने लागतील.

### मेंढ्या

हिंदुस्थानांतील मेंढ्यांची संख्या ४½ कोटि असून त्यांचेपासून ८ कोटि, ६० लक्ष पौंड लोकर दरसाल मिळते.

आशेचा किरण

भविष्य काळाविषयीं कोण काय सांगूं शकणार? सांप्रतचे दिवस तर अत्यंत काळजीचे आहेत. अशा वेळीं जवळ सामर्थ्याचा सांठा असल्यास कोणत्याहि प्रसंगांतून आपण निभावून जाऊं.

वेस्टर्न इंडिया

विमा कंपनीची पॉलिसी म्हणजे असा सामर्थ्याचा सांठाच आहे. हा सांठा आपलासा करण्यासाठीं आम्हांकडून माहिती मागवा.

वेस्टर्न इंडिया

विमा कंपनी लि., सातारा.

पुणें शाखाः—१७९ बुधवार लक्ष्मी रस्ता, पुणें २.

## अर्थशास्त्र

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे

पृष्ठसंख्या सुमारें ३००; किंमत ३ रुपये

या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

## श्रीराम सिल्क मिल्स लि., बंगलोर

[ कंपनीनें १९४१ अखेर ६ टक्के डिव्हिडंड वांटला आहे. ]

युद्धसाहित्यपुरवठा-खात्याची पॅरेशूटकरितां लागणाऱ्या रेशमी कापडाची ऑर्डर पुरी करण्यासाठी लागणाऱ्या भांडवलाकरितां तूर्त एकूण रु. १ लक्षाच्या रकमेपर्यंत

## ठेवी घेणें आहेत

व्याजाचा दर ४॥ ते ६ टक्के. ठेव किमान रु. ५०० ची असावी. ठेवीवरील व्याज दर सहा महिन्यांनीं दिलें जातें.

श्रीराम सिल्क मिल्स लि.,
श्रीरामबाग,
बसवनगुडी, बंगलोर.

**नारायण गोविंद नाईक,**
( माजी अध्यक्ष, म्हैसूर चेंबर ऑफ कॉमर्स ) मॅनेजिंग डायरेक्टर

आमच्या कारखान्यांतील माल मुंबईस बॉम्बे स्वदेशी को-ऑपरेटिव्ह स्टोअर्समध्यें व पुण्यास लक्ष्मी रोडवरील रे म्युझिअमच्या व्यापार-संवर्धन-गृहांत पहा.

राहाणेची व भोजनाची उत्तम सोय





फोन नं. ७७९ गणपति चौक, व्यवस्थापक

## N. V. WADNERKAR

**Gold & Silver Smith, Jeweller & Engraver, Electro-plater & Manufacturer of Sporting Trophies, Medals, Cups etc.**

**- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -**

**POONA CITY.**



## मधुमेहावरील औषध

तीन आठवड्यांचे औषधास फक्त रु. ७

— मागविण्याचा पत्ता —

मॅनेजिंग डायरेक्टर, रूरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड.

९२३ ए, सदाशिव, पुणें २.

## DECCAN BOOK STALL

**Booksellers, Publishers & Subscription Agents**

**Fergusson College Road, Poona No. 4**

(1) We stock and supply Educational books, General books & Library books.

(2) We supply Government of Bombay and Government of India publications.

(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.

(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.

वक्तशीर आणि मनपसंत काम करून देणारे

## मोहन वॉच कंपनी

रेग्युलेशन मोफत

कॉमनवेल्थ बिल्डिंगसमोर लक्ष्मी रोड, पुणें २.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ८ पुणें, बुधवार, तारीख २ डिसेंबर १९४२ अंक ४७

## दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... ... ... रु. | २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | ... ... ... रु. | १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड | ... ... ... रु. | १,१८,००,००० |

मुख्य कचेरी: ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

मुंबईमधील शाखा : बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

इतर शाखा : अहमदाबाद ( भद्र, मुख्य ऑफिस ), अहमदाबाद ( एलिस ब्रिज शाखा ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अंधेरी ( मुंबई शेजारीं ), बांद्रे ( मुंबई शेजारीं ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस ), कलकत्ता ( बडा बझार ), कलकत्ता ( चौरंगी स्क्वेअर ), जमशेदपूर, कराची, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत.

लंडन एजन्ट्स : वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

डायरेक्टर्स : सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई, सर जोसेफ के. नाईट, मि. ए. गेडिस, सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई., मि. दिनशा के. दाजी, श्री. रामनिवास रामनारायण.

### करंट डिपॉझिट अकाउंट्स :

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षा कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमीचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

एजंट—टी. आर. लालवाणी.

## दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

हेड ऑफिस : पुणें शहर.

स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.

मुंबअी शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबअी.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | : रु. १०,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | : रु. ५,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | : रु. २,५०,००० |
| एकूण खेळतें भांडवल | : रु. ४५,००,००० |

### डायरेक्टर्स

| | |
|---|---|
| प्रो. वा. गो. काळे, अध्यक्ष | श्री. मा. म. गुते |
| श्री. धों. कृ. साठे | श्री. मा. रा. जोशी |
| श्री. न. ग. पवार | श्री. श्री. गो. मराठे |
| श्री. त्र्यं. वि. रानडे | श्री. र. चिं. सोहोनी |
| श्री. वा. पुं. वर्दे | मि. फ. दो. पदमजी |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदीविक्री कसोशीनें करून दिली जाते.

म. वि. गोखले
मॅनेजर.

महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर

# महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

# विविध माहिती

### विमानांचें उत्पादन

जपान, जर्मनी व इटली ह्यांचें मिळून विमानांचें मासिक उत्पादन ३,२०० विमानें आहे. एकट्या अमेरिकेंत ४,००० विमानें तयार होतात.

### इंडियन मिलिटरी ॲकॅडेमी, डेहराडून

डेहराडून येथील लष्करी शाळेंत उमेदवारांस घोड्यावर बसण्याचें शिक्षण देत असत; परंतु लष्करी अधिकाऱ्यांच्या अभ्यासक्रमांतून तें शिक्षण आतां वगळण्यांत आलें आहे.

### प्रवासावर नियंत्रण

कोळशाची बचत करण्याकरितां, तुर्कस्तानांतील लोकांच्या आगगाडीच्या प्रवासावर नियंत्रण बसविण्याचा तेथील सरकारचा विचार आहे.

### ५५० मैल लांबीचा तेलाचा नळ

लॉंग व्हू पासून सालेमपर्यंत तेल वहाण्याकरितां ५५० मैल लांबीचा नळ टाकण्याची योजना अमेरिकन सरकारनें मंजूर केली आहे.

### ट्रेझरी बिलांवर १३ आ. ४ पै व्याजाचा दर

गेल्या आठवड्यांत रिझर्व्ह बँकेनें हिंदुस्थान सरकारचीं १० कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. १३ आ. ४ पै इतका पडला.

### दि म्हैसूर सिल्क फिलेचर्स लि.

वरील कंपनीनें ३१ ऑगस्ट, १९४२ अखेरच्या आठ महिन्यांचें इंटेरिम डिव्हिडंड ७½% दरानें जाहीर केलें आहे. कंपनीचें रेशमाचें सर्व उत्पादन सरकार विकत घेत आहे. कंपनीची उत्पादन शक्ति तिपटीनें वाढविण्याकरितां तिनें ४ लक्ष रुपयांचे भाग विक्रीस काढले आहेत. हे नवे भाग प्रत्येक १० रुपयांच्या भागास १५ रुपये ह्या दरानें विकले जातील. सध्याचा कंपनीच्या भागाचा बाजारभाव ह्यापेक्षा किंतीतरी अधिक आहे. नवीन भाग १ जानेवारी, १९४३ नंतरच्या मुदतीच्या डिव्हिडंडला पात्र होतील. भागांवर शेअर होल्डरांच्या उड्या पडतीलच, परंतु कांहीं भाग शिल्लक राहिल्यास ते सर्व घेण्याचें अंडर रायटर्सनीं कबूल केलें आहे. मेसर्स नाईक आणि कंपनी हिचेकडे कंपनीची मॅनेजिंग एजन्सी आहे व तिचे श्री. नारायणराव नाइक हे प्रमुख आहेत.

### निग्रो शास्त्रज्ञ

डॉ. जॉर्ज वॉशिंग्टन कार्व्हर. ह्या निग्रो शास्त्रज्ञाच्या शेतीविषयक शोधांबद्दल त्यांचा सन्मान करण्यांत आला. ७८ वर्षांपूर्वी त्यांचा जन्म झाला, तो गुलामगिरींतच झाला. लहानपणीं शर्यतीच्या घोड्याचे बदली त्यांची देवघेव झाली होती.

### प्रसिद्ध योद्धे शारीरिक तपासणींत नापास झाले असते!

शारीरिक अव्यंगतेनेंच केवळ युद्ध जिंकतां येतें, असें नाहीं. जॉर्ज वॉशिंग्टनचे दात कृत्रिम होते, बिस्मार्कचें वजन फाजील होतें, नेपोलिअनला पोटाचा विकार होता, ग्रँट दारुबाज होता व नेल्सनला तर एकच डोळा व एकच हात होता. वैद्यकीय तपासणीच्या बोर्डानें ह्या सर्वांस नापास केलें असतें.

### फुलांच्या वहातुकीस बंदी

ग्रेट ब्रिटनमध्यें रेल्वेनें फुलें पाठविण्यास बंदी केल्यामुळें फुलवाल्यांचें फार नुकसान झालें आहे. बागवान फुलझाडांऐवजी भाज्या लावूं शकतील, परंतु केवळ फुलांची विक्री करण्याचा धंदा करणारांची अडचण होईल. लग्नसमारंभ, दफनविधी, इत्यादींसहि फुलें मिळणें कठीण जाईल.

### कपाशीचा जागतिक खप

चालू युद्धपरिस्थितींतहि कपाशीचा खप कमी झालेला नाहीं, हें खालील आंकडे दर्शवितातः—

(हजार गाठी)

| | १९३८-३९ | १९३९-४० | १९४०-४१ | १९४१-४२ |
|---|---|---|---|---|
| अमेरिका | ६,८५८ | ७,७८४ | ९,७२२ | ११,३०० |
| ग्रेट ब्रिटन | २,६९० | २,९९३ | २,११० | १,७४२ |
| युरोप (रशिया वगळून) | ५,६७९ | ४,१७७ | १,९८४ | ६८५ |
| पौर्वात्य देश | ३,७६५ | ४,०११ | ३,२८९ | ३,००० |
| इतर | ७,९८४ | ७,५७६ | ७,१७० | ६,३२७ |
| | | १,९४५ | २,२६७ | २,७५२ |
| | २८,५०७ | २८,४८६ | २६,५४२ | २५,८०६ |

अमेरिकन कपाशीचा खप वाढत आहे व इतर देशांत तयार होणाऱ्या कपाशीचा उठाव कमी होत आहे. अमेरिकेंतील कपाशीचा खप झपाट्यानें वाढत आहे. तेथें १९४२-४३ मध्यें १,३०,००,००० गाठींचा खप अपेक्षित आहे.

### विजेचा उपयोग

१९३७-३८ मध्यें ग्रेट ब्रिटनमध्यें एकूण २० अब्ज युनिटस विजेचा खप झाला. त्याचा विनियोग खालीलप्रमाणें करण्यांत आला.—

| | एकूण खपाचा अंश |
|---|---|
| घरगुती उजेड, उष्णता, स्वैपाक | ३८·१% |
| शक्ति | ५४·१% |
| रस्त्यांवरील दिवे | १·८% |
| ट्राम वगैरे | ६·०% |
| | १००·० |

एकूण विजेपैकी निम्म्यापेक्षां अधिक विजेचा उपयोग कारखान्यांतील यंत्रें चालविण्याकडे झाला, ही गोष्ट लक्षांत ठेवण्याजोगी आहे. सुमारें १½ कोटि टन कोळसा वीज निर्माण करण्यासाठी जाळण्यांत आला.

### बनारस विश्वविद्यालय

बनारस विश्वविद्यालयास १९४१-४२ मध्यें १७,६४ ४६५ उत्पन्न झालें व खर्च सुमारें १७ लक्ष रुपये झाला. विश्वविद्यालयाचें वार्षिक उत्पन्न आणखी २ लाखांनीं वाढणें जरूर आहे, असें त्याचे उपकुलगुरु सर एस. राधाकृष्णन, हे नुकतेच म्हणाले.

### विधिमंडळाच्या सभासदांची लष्करी नोकरी

हिंदी विधिमंडळांच्या सभासदांनीं लष्करी नोकरी पत्करली तरी त्यांचें सभासदत्व रद्द होणार नाहीं असें जाहीर करणारा ऑर्डिनन्स हिंदुस्थान सरकारनें काढला आहे.

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती | ३८८ |
| २ चांदीच्या प्रश्नाची चर्चा | ३८९ |
| ३ शेतकऱ्यांच्या सर्वांगीण प्रगतीची दिशा | ३९० |
| ४ मोटार व्हेइकल्स ॲक्टाची अंमलबजावणी | ३९० |
| ५ स्फुट विचार | ३९१ |
| स्वस्त कापडाचा प्रश्न—स्थानिक स्वराज्य संस्था व प्रांतिक सरकार—रब्बीचें पीक व धान्य-पुरवठा. | |
| ६ लढाऊ सामुग्रींत तांब्याचा उपयोग | ३९२ |
| ७ हवाई हल्ल्यांचे बळी | ३९२ |
| ८ पुणें सेंट्रल बँकेची घोडनदी शाखा | ३९३ |
| ९ बार्शी येथील सहकार दिनोत्सव | ३९३ |



# अर्थ

बुधवार, ता. २ डिसेंबर, १९४२


## चांदीच्या प्रश्नाची चर्चा

हिंदी व्यापारी मंडळयांच्या मध्यवर्ती संस्थेनें ( फेडरेशन ऑफ इंडिअन चेंबर्स ) ह्या देशाच्या मालकीची लंडनमध्यें चांदी आहे, तिची विक्री योग्य बाजारभावानें केली जात नसल्याविषयीं तक्रार करून ही चांदी हिंदुस्थानमध्यें ठेवली जाणें उचित आहे असें सुचवलें आहे. ह्यासंबंधांत हिंदुस्थान सरकारच्या फडनवीशी खात्यानें आवश्यक असलेली माहिती प्रसिद्ध करून पूर्ण खुलासा लोकांपुढें मांडणें अगत्याचें आहे. हिंदुस्थानांत चांदीचा बाजारभाव विलक्षण वर गेला असून शंभर तोळयांस एकशे दहा रुपये येथवर तो चढला आहे. अशा वेळीं लंडनमधील चांदीचा भाव जवळ जवळ पूर्वींचाच म्हणजे दर औंसास सुमारें साडे तेवीस पेन्स असाच राहिला आहे. न्यूयॉर्कमध्यें अमेरिकन सरकारनें बाहेरून येणाऱ्या चांदीचा दर चढविला आहे. ह्या परिस्थितींत हिंदुस्थान सरकारनें लंडनच्या स्वस्त भावानें आपली चांदी विकण्यांत नुकसान आहे अशी टीका हिंदी व्यापारी मंडळयांनीं केली आहे आणि हिंदुस्थानची चांदी ह्या देशांत आणून ठेवण्याची इष्टता प्रतिपादिली आहे. लंडनमधील चांदी तेथील बाजाराच्या भावानेंच विकली जाणें उचित आहे; तिची खरेदीची किंमत लक्षांत घेतां ह्या भावांत सरकारचें नुकसान नाहीं आणि सध्याच्या युद्धपरिस्थितींत हिंदुस्थानची चांदी इकडे आणणें अव्यवहार्य आहे असें समर्थन सरकारच्या वतीनें केलें जाण्याचा संभव आहे. परंतु अगोदर टीकेचा विषय झालेल्या प्रश्नाविषयीं वस्तुस्थितीची माहिती लोकांस होणें आवश्यक आहे. सरकारनें लंडनमध्यें चांदी विकली आहे काय ? विकली असल्यास ती किती आणि कोणत्या भावानें विकली आहे ? आणि ह्या बाबतींत सरकारचें धोरण काय आहे ? लंडनमध्यें कोणताहि बाजारभाव असला तरी ब्रिटिश सरकाराशीं खास करार करून त्यापेक्षां अधिक व परिस्थितीस धरून असलेल्या किंमतीनें ती विकणें शक्य आहे किंवा नाहीं ? हे व ह्या प्रकारचे दुसरे प्रश्न येथें उद्भवतात आणि सरकारनें त्यांचीं सविस्तर उत्तरें दिल्यास लोकांचे गैरसमजास जागा रहाणार नाहीं. फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्सचें मत प्रसिद्ध होतांच हिंदुस्थान सरकारचा खुलासा बाहेर येईल अशी सहाजिकच अपेक्षा होती. ती सरकारनें लवकर पुरी केली पाहिजे. चांदीविषयींच्या धोरणासंबंधानें व्यापारी संस्था व सरकार ह्यांचेमध्यें मतभेद होणें अस्वाभाविक नाहीं. परंतु मतप्रदर्शन वस्तुस्थितीच्या माहितीवर आधारलेलें असणें आवश्यक आहे.

चांदीला शस्त्रास्त्रांच्या बनावटीमध्यें तांब्याच्या व कथिलाच्या दुर्मिळतेमुळें महत्त्वाचें स्थान प्राप्त झालें आहे. अमेरिकेंत चांदीचा मोठा साठा आहे आणि तेथें ह्या धातूचा उपयोग लढाऊ सामानाच्या कारखान्यांत होऊं लागला आहे. गेल्या वर्षीं त्या देशांत आठ कोटि औंस वजनाची चांदी ह्या रीतीनें वापरली गेली. गेल्या ऑगस्ट महिन्यांत अमेरिकन सरकारनें बाहेरून येणाऱ्या चांदीची किंमत दर औंसास ३५ सेंटची ४५ सेंट निश्चित केली तेव्हां आर्थिक प्रश्नांच्या चर्चेस वाहिलेल्या ब्रिटिश पत्रांत चांदीच्या प्रश्नाची चर्चा झाली. मेक्सिकोच्या सरकारनें आपल्या देशांतील रॉकेलच्या खाणींचा ताबा मागें घेतला, तेव्हां त्या धंद्यांत अमेरिकन व ब्रिटिश लोकांनीं स्वतःचें भांडवल घातलें होतें, त्यांस नुकसानभरपाई मिळण्याचा वादग्रस्त प्रश्न उपस्थित झाला होता. ह्या संबंधांत अमेरिकन व मेक्सिकन सरकारांचे दरम्यान कांहीं व्यवस्था निश्चित झालेली आहे आणि ती पुरी पाडली जाण्यास सवलत म्हणून मेक्सिकोकडून येणाऱ्या चांदीचा भाव अमेरिकन सरकारनें वाढवून दिला आहे. मामुली परिस्थितींत सोनें-चांदीचा बाजार जागतिक असून ह्या धातूंची किंमत एका देशांत कमी-अधिक झाल्यास त्याचा परिणाम इतर पेठांवर झाल्यावांचून रहात नाहीं. सध्या वहातुकीची अडचण आणि राष्ट्रीय सरकारांनीं अंगिकारलेलें नियंत्रणाचें धोरण ह्यांमुळें चांदीचे ठिकठिकाणचे बाजार तुटक बनले असून त्यांच्या परिस्थितीचा परिणाम एकमेकांवर होत नाहीं. म्हणूनच अमेरिकेनें आयात होणाऱ्या चांदीची किंमत चढवली तरी लंडनच्या बाजारांत तिच्या भावांत कांहींच बदल झाला नाहीं. परंतु ऑस्ट्रेलिया वगैरे देशांतली चांदी वरच्या दरामुळें इंग्लंडला न जातां अमेरिकेकडे आकर्षित केली जाईल ह्या शक्यतेचा उल्लेख इंग्रजी पत्रांनीं केला आहे. हुंडणावळीच्या दरास अनुसरून, अमेरिकन "फाइन" चांदीची दर औंसास ३५ सेंट किंमत असली तर ब्रिटिश "स्टँडर्ड" चांदीच्या औंसाची किंमत १९½ पेन्स होते. म्हणजे लंडनमधली २३ पेन्सांची किंमत वाजवीपेक्षां अधिकच होती. ४५ सेंटची अमेरिकन किंमतीच्या प्रमाणबद्ध बरोबरीनें लंडनमध्यें किंमत २५ पेन्स व्हावयास हवी. पण ती २३½ पेन्सच राहिली. ऑस्ट्रेलियन वगैरे चांदी इंग्लंडला न जातां अमेरिकेंत गेली तर लंडनच्या बाजाराची गरज भागण्यास तेथील हिंदुस्थानच्या चांदीचा भाव चढवावा लागेल असें "एकॉनॉमिस्ट" पत्रानें म्हटलें आहे. हिंदी चांदीच्या लंडनमधील साठ्यामधून विकल्या जाणाऱ्या मालास मर्यादा घातली पाहिजे असें मतहि त्या पत्रानें व्यक्त केलें आहे. अमेरिकेच्या चलनाच्या आधारास लागणाऱ्या चांदीच्या मर्यादेबाहेर १३५ कोटि औंस इतकी चांदी त्या देशाच्या सरकारापाशीं आहे आणि कारखान्यांच्या उपयोगासाठी जरूर पडेल तशी ती पुरवण्याचें धोरण अमेरिकन सरकारनें जाहीर केलें आहे. चांदीला वाढती मागणी आहे आणि तिचा पुरवठा मर्यादित आहे. तसेंच चांदीची किंमत न्यूयॉर्क व विशेषतः मुंबई येथें चढली आहे. अशा स्थितीनें हिंदुस्थान सरकारनें आपल्या साठ्यांतली

किती चांदी बाहेर काढावी आणि ती कोणत्या फायदेशीर भावानें विकावी हाच महत्त्वाचा प्रश्न आहे. ह्या देशाच्या आर्थिक हितास बाध न येतां जरूर व इष्ट असल्यास हा व्यवहार व्हावा अशी हिंदी लोकमताची मागणी असणें स्वाभाविक व सरळ आहे.

## शेतकऱ्यांच्या सर्वांगीण प्रगतीची दिशा

( मुं. प्रां. स. बँकेचे अध्यक्ष, श्री. आर. जी. सराया, ह्यांनीं कराड येथें भरलेल्या, सातारा जिल्हा फील्ड वर्कर्सच्या परिषदेचें उद्घाटन प्रसंगीं केलेलें भाषण. )

### सर्वांगीण उन्नतीची आवश्यकता

सहकारी चळवळीसंबंधी निरनिराळ्या विषयांचा विचार करतांना कांहीं विशेष गोष्टी लक्षांत ठेवल्या पाहिजेत. त्या म्हणजे, शेतकऱ्यांचें जीवन सर्व बाजूंनीं लक्षांत घेतलें पाहिजे. मनुष्याच्या शरीराचे सर्व भाग नीट असल्याशिवाय शरीर धड राहूं शकत नाहीं व त्याचें जीवन कष्टमय होतें, त्याप्रमाणेंच शेतकऱ्यांचीहि गोष्ट आहे. शेतकी करतां येत असेल, पण हिशेबीपणा नसेल, शिक्षण असेल पण रूढीच्या ताब्यांत पूर्णपणें सापडला असेल, ढोकें असेल पण व्यसनी बनला असेल तर त्यामुळें जीवन कष्टमय होईल. म्हणून शेतकी जीवनाचीं सर्व अंगें प्रमाणशीर बनविण्याची काळजी घेतली पाहिजे. व हें कळण्याकरितां 'सहकार' ही मोठी गुरुकिल्ली आहे.

स्वतः खटपट करणारालाच ईश्वर सहाय्य करतो, ही म्हण लक्षांत ठेवणेसारखी आहे. तरी प्रत्येक शेतकरी माणसानें, आपली उन्नति कशी होईल याचा विचार करून त्या तयारीस लागलें पाहिजे. माझा अनुभव असा आहे कीं, कोणतेंहि काम स्वतः करण्यापेक्षां दुसऱ्याकडून करवून घेणें फार अवघड आहे. तर हें शिक्षणाचें अवघड काम अनुभवी कामकरी पुढारी मंडळींचें आहे. तेव्हां आपल्या सर्वांचें मुख्य काम माझ्यामतें हें आहे कीं, शेतकऱ्याला आपल्या पायावर कोणत्या रीतीनें उभें राहतां येईल याचें शिक्षण देऊन त्याला सर्व प्रकारनें मदत केली पाहिजे.

### खरेदी-विक्री संघ

शेतकऱ्याला माल उत्पन्न करण्याकरितां कर्ज लागतें व तें योग्य दरानें न मिळाल्यास त्याची नुकसानी होते. हें जरी खरें आहे व त्याकरितां सहकारी पतपेढ्यांची आवश्यकता आहे तरी उत्पन्न केलेल्या मालाची योग्य किंमत शेतकऱ्याचे पदरांत न पडल्यास त्यापासून होणारें नुकसान ज्यास्त दराच्या कर्जापासून होणारे नुकसानीपेक्षां कितीतरी अधिक आहे. म्हणून सहकारी दुकानांमार्फत मालविक्रीची सोय करून घेणें अधीक उचित आहे. ही मालविक्री करून घेतांना एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे कीं, किरकोळ मालविक्री झाल्यास त्याला घाऊक विक्रीपेक्षा थोडातरी भाव कमी मिळतो. त्याकरितां शेतकऱ्यांनीं खरी सहकार वृत्ति धरून व व्यक्तिस्वातंत्र्य झुगारून आपला मार्ग, जातवार व प्रतवार एकत्र करून विकण्याच्या तत्त्वाचा अवलंब केला पाहिजे. त्याचप्रमाणें माल उत्पन्न करणारा व तो उपयोगांत आणणारा या दोघांचे दलालांची संख्या कमी झाल्यास शेतकऱ्याला जास्त प्रमाणांत फायदा होईल. घाऊक गिऱ्हाइकें मिळवून देण्याकरितां मुंबई येथें खरेदी विक्री संघ निघाला आहे. तरी त्याचा शक्य तितका फायदा मोठ्या शेतकऱ्यांनीं व स्थानिक खरेदी विक्री संघांनीं घेतला पाहिजे.

## मोटार वेहिकल्स ॲक्टाची व त्याखालील नियमांची मुंबई प्रांतांतील अंमलबजावणी

( १९४०-४१ )

१ एप्रिलपासून मुंबई प्रांताचे मोटार वेहिकल्स ॲक्टाचे अंमलबजावणींसाठी पांच विभाग पाडण्यांत आले, ते खालीलप्रमाणें:- मुंबई, गुजरात, दक्षिण डेक्कन, उत्तर डेक्कन व कर्नाटक. दक्षिण डेक्कनमध्यें पुणें, सातारा, सोलापूर हे जिल्हे आणि अहमदनगर जिल्ह्याचा कांहीं भाग ह्यांचा समावेश असून उत्तर डेक्कन विभागांत पूर्व खानदेश, पश्चिम खानदेश, नाशिक हे जिल्हे व अहमदनगर जिल्ह्याचा कांहीं भाग ह्यांचा अंतर्भाव होतो.

१९४०-४१ मध्यें ११,३०६ लोकांना मोटारी चालविण्याचे टेंपररी परवाने देण्यांत आले. ४,५०० लोकांची मोटार हाकण्याची चाचणी घेण्यांत आली, त्यांपैकीं निम्मे पास झाले. नवीन ॲक्टान्वयें ४७,०३५ लायसेन्स देण्यांत आले. ३,५२८ लोकांना हे परवाने प्रथमच देण्यांत आले. भाड्याच्या गाड्या चालविण्याचा दर्जा बराच चांगला असल्याचें आढळलें. एकूण १४,९३४ मोटार मालकींची वर्गावर्गी अहवालाचे वर्षी नोंदण्यांत आली. बस मालकांच्या भागीदारी फर्म्स अथवा खाजगी लिमिटेड कंपन्या बनविण्याच्या प्रवृत्तीस उत्तेजन देण्यांत आलें. सहकाराचें महत्त्व बसवाल्यांना अद्याप पूर्णपणें पटलेलें दिसत नाहीं. कारण अजून फर्म्समध्येंहि भांडणें चालूच असलेलीं आढळतात. आतां बसचे मार्ग ठरवून टाकण्यांत आले आहेत व त्यावर किती बसेस जावयाच्या हेंहि निश्चित केलेलें आहे. निश्चित भाड्याचे दर व वेळापत्रकें हींहि शक्य तोंवर अंमलांत आणलीं जावींत अशी व्यवस्था आहे. नवीन कायद्याखालीं एकूण ७,९६१ लोकांवर खटले भरण्यांत आले. त्यांपैकीं ५,२२३ लोकांना शिक्षा झाली. ४०० लोक निर्दोषी ठरले व वर्षअखेर १,८७३ खटले चालू होते. मोटार वेहिकल्स ॲक्टाखालील सरकारी उत्पन्नाचा आकडा ५ लक्ष, ६० हजार रुपये भरला. प्रांतांत एकूण ७,४५६ अपघात झाले. त्यांत २९७ लोक मरण पावले. १९३९-४० मध्यें ७,९०३ अपघातांत २७६ लोकांस मृत्यु आला होता. कायद्याच्या अंमलबजावणीस हिंदी संस्थानांची स्वायत्त हद्द हा एक अडथळा येतो. मुंबई सरकार व संस्थानें ह्यांचिमध्यें परस्परास पोषक अशी व्यवस्था झाल्यावर अडचण उरणार नाहीं. अशी व्यवस्था बडोदें, मिरज, सांगली, सावनूर, कुरुंदवाड, इत्यादि संस्थानांनीं केली आहे. इतर संस्थानांबरोबर वाटाघाटी चालू आहेत.

### व्हिस्की

अमेरिका दरसाल १,१२,५०,००० पौंड किंमतीची व्हिस्की ग्रेट ब्रिटनमधून आयात करीत असे. ही आयात आतां बंद करण्यात येत आहे. त्यामुळें अमेरिका व ग्रेट ब्रिटन ह्या दोन्ही देशांची गैरसोय झाली आहे. एका देशांतील लोकांची व्हिस्की कमी झाली व दुसऱ्या देशांतील लोकांचें उत्पन्न बुडालें.

# स्फुट विचार

### स्वस्त कापडाचा प्रश्न

कापडाच्या किंमती अलीकडे विलक्षण चढल्या आहेत आणि गोरगरिबांची त्याचे बाबतींत मोठी गैरसोय होत आहे. युद्धोपयोगी कापड बनवण्यांत देशी गिरण्यांची पुष्कळशी शक्ति गुंतली असली तरी जाडेंभरडें वस्त्र सामान्य जनतेस पुरवलें जाण्याची व्यवस्था त्यांचेमार्फत होणें अगत्याचें आहे. ह्या गोष्टीची जाणीव हिंदुस्थान सरकारास असून त्यांनीं प्रांतिक सरकारांशीं विचारविनिमय करून देशी गिरण्यांत त्यांनीं मागितलेलें जाडेंभरडें कापड तयार होण्याची तजवीज केली. पंजाब, सिंध व आसाम ह्या प्रांतांच्या सरकारांनीं ह्या व्यवस्थेचा फायदा घेतला असून मुंबईच्या गिरण्यांत त्यांच्या मागणीप्रमाणें कापड तयार होत आहे आणि हा सुमारें एक कोटि वार माल जानेवारी महिन्यांत खरेदीदारांच्या हातीं पडेल. मुंबई सरकार पस्तीस लाख वार कापड ह्याच रीतीनें घेईल असें समजतें. गिरण्यांच्या उत्पादक शक्तीचा कांहीं ठराविक भाग स्वस्त कापड बनवण्याकडेच उपयोगांत आणला जाईल अशी योजना अंमलांत येण्याचाहि विचार चालू आहे. ह्या प्रश्नाचा निर्णय लवकर लागून गोरगरिबांची गैरसोय जितक्या लवकर दूर करतां येईल तितकी ती नाहींशी होणें अगत्याचें आहे. गरिबांच्यासाठी तयार होणारें कापड त्यांच्याच हातीं जाईल आणि त्यांस तें ठरलेल्या किंमतीनें मिळेल ह्या विषयींची व्यवस्था कशी करावी हा येथें थोडासा अवघड प्रश्न आहे. कापडाच्या किंमतीचा पैसा गिरणीवाल्यांस देऊन टाकून पुढें मालाची योग्य वाटणी व खप ह्यांची जबाबदारी प्रांतिक सरकारनें घ्यावी किंवा त्याबद्दल दुसरी कांहीं योजना करावी हेंहि निश्चित होणें अगत्याचें आहे. ह्या कामीं एका नाहीं तर दुसऱ्या स्वरूपांत सरकारी नियमन व देखरेख आवश्यक समजलीं जातील ह्यांत शंका नाहीं.

---

### स्थानिक स्वराज्य संस्था व प्रांतिक सरकार

त्यांच्या उत्पन्नाच्या मामुली बाबी अपुऱ्या असल्यानें प्रांतिक सरकारनें द्रव्यसहाय दिल्यावांचून स्थानिक स्वराज्य संस्थांस स्वतःचीं कर्तव्यें नीट पार पाडतां येणें अशक्य आहे, अशा आशयाचें गाऱ्हाणें नेहमी ऐकूं येतें. म्युनिसिपालिट्या व विशेषतः लोकल बोर्ड्स यांच्या बाजूनें पुढें येणाऱ्या तक्रारींत पुष्कळ तथ्यांश आहे यांत शंका नाहीं. तथापि, स्थानिक स्वराज्य संस्थाहि स्वतःचें उत्पन्न वाढवण्याचा शिकस्तीचा प्रयत्न करीत नाहींत ही त्यांच्या कारभारावरील टीका निराधार आहे असें म्हणतां यावयाचें नाहीं. ह्या प्रश्नाची थोडीशी चर्चा मुंबईचे गव्हर्नर, सर रोजर लम्ले, ह्यांनीं अहमदनगर येथें स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मानपत्रास उत्तर देतांना गेल्या आठवड्यांत केली. तीमधील मुद्दे असे. "प्रांतांतील सर्वच जिल्ह्यांच्या स्थानिक गरजांचा सरकारास विचार करावा लागतो आणि त्याच्याहि उत्पन्नास मर्यादा आहेत. शिवाय, युद्धपरिस्थितीमुळें पुष्कळसा पैसा संरक्षणाच्या योजनांवर खर्चणें आवश्यक झाल्यानें स्थानिक सुधारणांसाठी यावयाच्या सरकारी ग्रँट्स अपेक्षेच्या मानानें कमी पडणें अपरिहार्य होतें. तरीहि आपला कारभार कार्यक्षम रीतीनें चालवणाऱ्या स्थानिक संस्थांस शक्य तितकें सहाय देण्याचा प्रयत्न सरकार करतें. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे "जे स्वतःस सहाय करतात त्यांचा सहायकर्ता ईश्वर असतो" ह्या तत्त्वावर सरकारचें धोरण आधारलेलें आहे. ह्या दृष्टीनें पहातां नगर म्युनिसिपालिटीनें घरपट्टींत व आरोग्य पट्टींत वाढ करण्याचें व वसुलींत सुधारणा घडवून आणण्याचें ठरवलें आहे तें समाधानकारक आहे. जिल्हा लोकलबोर्ड मात्र लोकल फंड सेस दीड आण्याचा दोन आणे करण्यास कचरत आहे, असें समजतें. ही वृत्ति टाकून देण्यांत येऊन सोलापूर जिल्ह्याप्रमाणें येथेंहि बोर्डाच्या उत्पन्नांत भर टाकणारें हें धोरण स्वीकारण्यांत येईल अशी आशा आहे." पाणी पुरवठ्याच्या व्यवस्थेंत सुधारणा करण्याची एक योजना नगर म्युनिसिपालिटीनें आखली आहे तिला सहाय देण्याच्या प्रश्नाचा विचार सहानुभूतीनें केला जाईल असें आश्वासन सर रोजर ह्यांनीं दिलें.

---

### रब्बीचें पीक व धान्यपुरवठा

ह्या प्रांताच्या मध्य व दक्षिण विभागांत कित्येक टापूंमध्यें अखेरचे पाऊस न पडल्यामुळें रब्बीचीं पिकें होऊं शकत नाहींत, ही एक आपत्ति निर्माण झाली आहे. बहुतेक जिल्ह्यांत पहिले पाऊस उत्कृष्ट झाले आणि कांहीं भागांत तर अनेक वर्षांत आलें नव्हतें असें खरीपाचें पीक आलें, पण रब्बीच्या पेरण्याहि होणें कांहीं जिल्ह्यांत अशक्य झालें असल्यानें धान्य व कडबा ह्यांचा तुटवडा पडण्याची भीति लोकांस भेडसावीत आहे. युद्धपरिस्थितींत वहातुकीच्या साधनांच्या अडचणींमुळें खाद्य पदार्थांच्या पुरवठ्याबाबत मध्यवर्ती व प्रांतिक सरकार ह्यांचेपुढें अवघड प्रश्न उपस्थित झाले असतां "दुष्काळांत तेरावा महिना" ह्याप्रमाणें रब्बीच्या पिकांच्या अभावानें धान्याच्या पुरवठ्याचा प्रश्न अधिक बिकट करून सोडला आहे. नगर येथें केलेल्या भाषणांत नामदार गव्हर्नरांनीं ह्या आपत्तीचा उल्लेख केला. जवळच्या जिल्ह्यांतल्या स्थितीच्या मानानें नगर जिल्ह्यांतली परिस्थिति बरी आहे ह्या गोष्टीनें नगरवासीयांचें सांत्वन होण्यासारखें नसलें तरी रब्बीचीं पिकें न आल्यामुळें एकंदरींतच अवस्था कशी आहे ह्याची त्यांस जाणीव होईल. कांहीं जिल्ह्यांत रब्बीचेंच पीक मुख्य असतें आणि त्याची कुचंबणा होऊन त्यांचेवर अवलंबून असणाऱ्या जिल्ह्यांस त्यांचेकडून नेहमीप्रमाणें पुरवठा होणार नाहीं. धान्याच्या पुरवठ्याचा होणारा तुटवडा भरून काढण्यासाठी बाहेरच्या प्रांतांतून व संस्थानांतून माल आणण्याचा प्रयत्न सरकार कसोशीनें करीत आहे असें अश्वासन सर रोजर ह्यांनीं दिलें आहे ही उत्तेजनकारक गोष्ट आहे. प्रांतिक पुरवठा शक्य तेवढा वाढवून त्याची वाटणी जिल्हानिहाय योग्य रीतीनें करण्याचा हा प्रश्न असून सरकार त्या बाबतींत पूर्णपणें जागरूक आहे असें अधिकृत रीतीनें प्रत्यक्ष प्रांताधिपतींनीं आतां सांगितलें आहे.

---

### पेट्रोल रेशनमध्यें आणखी कपात

खासगी मोटारगाड्या व मोटारसायकली ह्यांस मिळत असलेल्या पेट्रोलच्या रेशनमध्यें डिसेंबर १९४२ पासून आणखी कपात करण्याचें मुंबई सरकारनें ठरविलें आहे. ज्यांस दरमहा आठ गॅलनपेक्षा अधिक पेट्रोल मिळत नाहीं, त्यांस ही कपात लागू नाहीं. त्यापेक्षा अधिक पेट्रोल मिळणारांच्या रेशनमध्यें सुमारें १०% ची कपात केली जाईल.

## लढाऊ सामुग्रींत तांब्याचा उपयोग

जीवनाच्या गरजा शक्य तितक्या कमी त्रासानें व खर्चानें भागवावयाचा प्रयत्न करणें ही आर्थिक दृष्टी होय. गव्हाची किंवा तांदुळाची गरजा बाजरी-जोंधळयानें, साखरेची गुळानें व राकेलची गोड्या तेलानें भागविण्याची आवश्यकता ह्याच दृष्टीनें आजच्या युद्धपरिस्थितींत भासत आहे. कच्चा माल, यंत्रें, कामगार ह्यांच्या उपयोगातलें प्रमाण कारखानदार नेहमीच अशा प्रकारच्या तारतम्य बुद्धीनें वागत असतात. युद्धकाळांत कित्येक उत्पादनाच्या साधनांचा पुरवठा मर्यादित, अनिश्चित किंवा दुर्मिळ होत असल्यानें साधनांची निवड व उपयोग मोठ्या कुशलतेनें करावीं लागतात. दगडी कोळशापासून पेट्रोल तयार करणें, कृत्रिम रीतीनें रबर बनवणें इत्यादि गोष्टी अलीकडे सामान्य परिचयाच्या झाल्या आहेत. युद्धसामुग्रीच्या बनावटींत चांदी वापरण्याचा प्रघात सध्या अमेरिकेंत चालू झाला आहे त्या विषयींची माहिती "अर्था"मध्यें मागें आलीच आहे. चालू यांत्रिक युद्धांत लढाऊ सामुग्रीच्या उत्पादनास लागणाऱ्या बहुतेक मालमसाल्याच्या पुरवठ्याच्या बाबतींत मित्रराष्ट्रें संपन्न आहेत आणि त्यांचे मानानें जर्मनी व इटली ह्यांची समृद्धता मर्यादित आहे ही समाधानाची गोष्ट आहे. ज्याचे संबंधांत तुटवडा भासण्याचा संभव आहे अशा मालाची योग्य तरतूद करण्याचें सामर्थ्य अमेरिका व इंग्लंड ह्या राष्ट्रांत आहे. "एका प्रकारच्या मालाच्या जागीं दुसरा माल वापरण्या" च्या कलेंत जर्मनी निष्णात आहे ही गोष्ट त्यांस पूर्णपणें अवगत असून आपलीं नैसर्गिक व बौद्धिक साधनें ज्यास्तींत-जास्त कार्यक्षम रीतीनें उपयोगांत आणण्याचा मित्रराष्ट्रें प्रयत्न करीत आहेत.

प्रस्तुत युद्धांत अत्यंत उपयुक्त असा कोणता धातू असेल तर तो तांबें हा होय, आणि शत्रूच्या मानानें मित्रराष्ट्रांस तो विपुलतेनें उपलब्ध होत आहे. लढाऊ सामुग्रींत वापरण्यांत येणाऱ्या तांब्यापैकीं निम्में प्रत्यक्ष दारूगोळ्याच्या बनावटीस लागतें आणि बाकीचें विजेचीं उपकरणें वगैरेमध्यें उपयोगास येतें. मि. डोनॅल्ड नेल्सन ह्यांनीं आपल्या एका भाषणांत सांगितलें आहे कीं एक बॉंबर (बॉंब टाकणारें विमान) चांगल्या काम देण्याच्या स्थितींत ठेवावयाचा तर त्यास दोन मैल लांबीची तांब्याची तार लागते. दुसऱ्या एका प्रकारच्या लढाऊ विमानांत ५०० पौंड वजनाचें तांबें असतें. तांब्याच्या अभावीं मोठ्या तोफा बंदच ठेवाव्या लागतील. शत्रु-राष्ट्रापाशीं पुरेसें तांबें नाहीं. जर्मनीच्या वर्चस्वाखालीं असलेल्या देशांत चालू युद्धापूर्वी दीड लक्ष टन किंवा जागतिक उत्पादनांतील ७ टक्के एवढें तांबें निघत असे. जर्मनी व इटली ह्या दोन्ही राष्ट्रांस दर वर्षी साडेचार लक्ष टन तांबें बाहेरून आणावें लागत असे. युद्ध चालू झाल्यापासून जर्मनीनें तांब्याचें उत्पादन वाढवलें असेल किंवा त्याचा काटकसरीनें उपयोग चालवला असेल हें शक्य आहे. रशियामध्यें तांब्याच्या मोठ्या खाणी आहेत पण त्या जर्मनीच्या सत्ताकक्षेच्या बाहेर आहेत. जपानलाहि त्यानें पादाक्रांत केलेल्या देशांत तांबें मिळण्यासारखें नाहीं. त्याचा ह्या धातूचा साठा रिता होण्यास अजून कांहीं काळ लागेल एवढेंच. गेल्या वर्षातलें तांब्याचें जागतिक उत्पादन २५ लक्ष टन भरलें. त्यांतलें ८ लक्ष टन एकट्या अमेरिकेंत निघालें. त्याच्या खालोखाल चिलीचें साडेचार लाख व कॅनडाचें सुमारें ३½ लक्ष टन एवढें उत्पादन होतें. लढाऊ सामुग्रीचें मित्रराष्ट्रांचें उत्पादन झपाट्यानें वाढत असल्याकारणानें तीं आपला पुरवठा शक्य तितका वाढवण्याचा प्रयत्न करीत आहेत. शत्रूच्या वर्चस्वाखालीं नसलेल्या सर्व देशांतलें तांबें ब्रिटिश व अमेरिकन सरकारें स्वतःसाठी खरेदी करीत आहेत. तांब्याच्या पुरवठ्याच्या बाबतींतलें मित्र राष्ट्रांचें शत्रुराष्ट्रांवरलें वर्चस्व कायम राहून त्याचा उपयोग इंग्लंड व अमेरिका ह्यांचें लढाऊ सामुग्रीचें उत्पादन झपाट्यानें विस्तार करण्यांत होईल अशी अपेक्षा आहे. तांब्याच्या अंगीं जे विशिष्ट गुण आहेत त्यांचे योगानें त्याची जागा दुसऱ्या धातूंनीं घेतली जाण्यास फारच मर्यादित वाव आहे. ह्या कारणानें तांब्याच्या पुरवठ्याचें प्रस्तुत युद्धांत फार मोठें महत्त्व आहे आणि मित्र राष्ट्रांची बाजू, ह्यासंबंधांत शत्रुराष्ट्रांशीं तुलना करतां, मजबूत आहे.

## हवाई हल्ल्यांचे बळी—ताजे उपलब्ध आकडे

ग्रेटब्रिटनवरील सप्टेंबर १९४० पासूनच्या हवाई हल्ल्यांमुळें मरण पावलेल्या व जखमी झालेल्या नागरिकांची संख्या खाली दिली आहे:—

| | मृत | जखमी होऊन इस्पितळांत पाठवले | एकूण |
|---|---|---|---|
| सप्टेंबर-डिसेंबर १९४० | २१,६६९ | ३०,५५६ | ५२,२२५ |
| १९४१ ची बेरीज | १९,९७० | २१,८८४ | ४१,८४४ |
| १९४२ जानेवारी | ११२ | ६१ | १७३ |
| " फेब्रुवारी | २२ | २१ | ४३ |
| " मार्च | २१ | १३ | ३४ |
| " एप्रिल | ९३८ | ९९८ | १९३६ |
| " मे | ३९९ | ४२५ | ८२४ |
| " जून | ३०० | ३३७ | ६३७ |
| आतांपर्यंत एकूण | ४५,४३१ | ५४,२८५ | ९७,७१६ |

### पाश्चात्य पदव्यांचा हव्यास

सर सी. व्ही. रमण ह्यांनीं मद्रास विश्वविद्यालयाच्या पदवी-दान प्रसंगीं नुकतेंच भाषण केलें, त्यांत त्यांनीं पाश्चिमात्य पदव्यांच्या हव्यासावर कडक टीका केली.

### रीयुनियन बेट

हिंदी महासागरांत मादागास्करच्या पूर्वेस ४२० मैलांवर असलेलें रीयुनियन हें फ्रेंच मालकीचें बेट दक्षिण आफ्रिकेच्या सैन्यानें ताब्यांत घेतलें आहे. १६ व्या शतकाचे प्रारंभीं पोर्तुगीजांनीं त्याचा शोध लावला. १६४९ सालीं तें फ्रेंचांनीं घेतलें. १८१० ते १८१४ चे दरम्यान त्यावर ब्रिटिशांची सत्ता होती. बेटाचें क्षेत्रफळ सुमारें ९७० चौ. मैल आहे.

### गिरणी कामगारांच्या पगाराची जप्ती

सिव्हिल प्रोसिजर कोडाच्या ६० व्या कलमानें कामगारांचा पगार जप्त करण्यास प्रतिबंध केला आहे. हेड जॉबरला दरमहा जरी १४० रुपये पगार मिळत असला तरी तो कामगार ह्या संज्ञेंतच येतो व त्याच्या पगारावर जप्ती आणतां येत नाहीं, असा निर्णय मुंबईच्या स्मॉल कॉज कोर्टानें नुकताच दिला.

## पुणें सें. को. बँकेनें घोडनदी येथें शाखा उघडली

( आमच्या बातमीदाराकडून )

पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेनें शनिवार ता. १४-११-४२ रोजीं पुणें जिल्ह्यांतील शिरूर पेठ्यांत घोडनदी येथें आपली एक शाखा उघडली. हा समारंभ बँकेचे एक माजी डायरेक्टर, श्री. शेठ भोगिलाल बालचंद गुजर यांचे हस्ते करण्यांत आला. या समारंभासाठी बँकेचे चेअरमन श्री. श्री. रा. पाळंदे आणि इतर कांहीं डायरेक्टर्स व मॅनेजिंग डायरेक्टर श्री. द. दि. चितळे आणि बँकेचे इतर अंमलदार अशी मंडळी उपस्थित होती. घोडनदी येथील बहुतेक प्रमुख व्यापारी मंडळी व पेठ्याचे महालकरी श्री. पुरंधरे वगैरे हजर होते.

श्री. पाळंदे यांनी सर्वांचें स्वागत करितांना घोडनदी येथें शाखा उघडणें बँकेस कसें आवश्यक आहे तें स्पष्ट केलें व समारंभाचे नियोजित अध्यक्ष श्रीमान शेठ भोगिलाल यांचा बँकेशीं कसा दाट परिचय आहे व शाखा काढण्याचे कामीं त्यांनीं कसे श्रम घेतले आहेत तें सांगितलें. मॅनेजिंग डायरेक्टर श्री. चितळे यांनीं सहकारी बँकांचा शेतकऱ्यांप्रमाणेंच सावकार वर्गालाहि कसा उपयोग होतो तें समजाऊन दिलें व सर्वांना या शाखेमार्फत तूर्त सुरू होणाऱ्या कोठाराचा कसा उपयोग करून घेतां येईल तें सांगितलें. स्थानिक मंडळींपैकीं श्री. अवसरीकर वकील यांनी आपल्या भाषणांत बँकेनें अंमळ उशीरा कां होईना, पण शाखा कचेरी घोडनदी येथें उघडल्याबद्दल आभार मानले.

घोडनदी शाखा उघडल्याचें जाहीर करितांना श्रीमान शेठ भोगिलाल यांनीं शाखेपासून सावकारांचा देखील फायदा होईल, खरेदी-विक्रीचे व्यवहार सुरळीत होतील व ही शाखा शिरूर पेठ्याची आर्थिक उन्नती घडवून आणण्यास मदत करील अशी आशा प्रकट करून व सर्वांचे आभार मानून आपलें भाषण संपविलें. बँकेतर्फे सर्वांचे आभार मानल्यानंतर पेढे, पानसुपारी, अत्तर-गुलाब सर्वांना देण्यांत आलेवर समारंभ संपला.

घोडनदी येथील शाखेमार्फत मालाचे तारणावर मुदतीनें कर्जे देण्याचा व्यवहार तूर्त होणार आहे.

[ १९२६ सालापासून बँकेच्या शाखा खेड, इंदापूर, केडगांव, लोणावळा, डेक्कन जिमखाना, जुन्नर, सासवड, ह्या ठिकाणीं उघडण्यांत आल्या, त्यांपैकीं लोणावळा शाखा १९३३ सालीं बंद करण्यांत आली. १९३३ पासून प्रयोगादाखल विशिष्ट कारणासाठीं ओगलेवाडी येथें शाखा सुरू करण्यांत आली ती १९३८ सालीं बंद करण्यांत आली. १९३३ पासून फर्ग्युसन कॉलेज येथें एक उपशाखा सुरू करण्यांत आलेली आहे. केडगांव शाखेची कचेरी १९३७ पासून कामकाजाचे अधिक सोईसाठीं दौंड येथें नेण्यांत आली आहे. ]

### दि नॅशनल फिनॅन्स कॉर्पोरेशन लि., दिल्ली

चित्रपट कंपन्यांना भांडवल पुरविण्यासाठीं वरील कंपनी स्थापन झाली आहे, तिचें विक्रीस काढलेलें ५ लक्ष रुपयांचें भांडवल खपून गेलेलें आहे. श्री. शांताराम हे मुंबई येथें स्वतःच्या स्टुडिओमध्यें तयार करीत असलेल्या पहिल्या नऊ चित्रपटांच्या प्रकाशनाचा हक्क कंपनीनें मिळविला आहे.

## बार्शी येथील सहकारी दिनोत्सव

बार्शी सें. को. बँन्केच्या विद्यमानें सहकारी दिनोत्सव शनिवार ता. १४।११।४२ रोजीं साने मेमोरियल हॉलमध्यें सायंकाळीं सात वाजतां मोठ्या उत्साहानें साजरा करण्यांत आला. समारंभास सुमारें ७५ सद्गृहस्थ उपस्थित होते.

आरंभीं बँन्केचे चेअरमन श्री. गणेश रामचंद्र साने यांचे सूचनेवरून बँकेचे डायरेक्टर व एक प्रमुख सार्वजनिक कार्यकर्ते गोविंद रघुनाथ काळे यांस सर्वानुमतें अध्यक्ष निवडण्यांत आले. अध्यक्षांनीं समारंभाचें प्रयोजन समजावून सांगितल्यावर श्री. साने यांनीं आंतरराष्ट्रीय सहकारी संस्थांची व हिंदी सहकारी चळवळीची थोडक्यांत माहिती सांगितली. त्यानंतर को. सो. चे सब-ऑडिटर श्री. बनगोळी यांनीं बार्शी तालुक्यांतील सहकारी सोसायट्यांची माहिती सांगितली. ह्या तालुक्यामध्यें एकंदर ५६ सहकारी संस्था असून त्यांपैकीं ४७ शेतकीच्या व ९ बिगर शेतकीच्या सोसायटी आहेत. "अ" व "ब" वर्गामध्यें बहुतेक सोसायट्या असून त्यांचें काम समाधानकारक चाललें आहे. "ड" वर्गामध्यें फक्त १० सोसायट्या आहेत, त्यांपैकीं १-२ खेरीज बाकी सर्व सुधारण्यासारख्या आहेत. त्यांची सांपत्तिक स्थिति बरी आहे. फक्त बँन्केचें कर्ज नसलेमुळें कामकाज समाधानकारक नाहीं इतकेंच. तेव्हां सोसायट्यांनीं आपलें कर्ज-व्यवहार परस्पर न भागवतां बँन्केच्या मदतीनें केल्यास अनायासें देखरेख होऊन व्यवहार नीट चालण्यास मदत होईल, अशी माहिती सांगितल्यावर मॅनेजर रा. पटवर्धन यांनीं सहकारी ठरावाचें मराठी भाषांतर वाचून दाखविलें. तो ठराव सर्वानुमतें मंजूर करण्यांत आला.

त्यानंतर अध्यक्ष श्री. काळे यांनीं ठरावांतील कांहीं विशिष्ट प्रश्नांचा जास्त खुलासा केला. ह्यापुढें जगामध्यें भांडवलशाही आर्थिक घडीच्या जागीं परस्पर बंधुभाव व सहकार्य ह्यांवर आधारलेली घडी बसविण्याकरितां सहकारी संस्था अधिक कार्यक्षम व सामर्थ्यशाली होण्यास सभासदांनीं सहकारी संस्थांचे मूळ नियम उल्लंघून चालणार नाहीं. आजपर्यंत सोसायटी म्हणजे कर्ज पुरवणारी संस्था एवढीच आपली कल्पना होती ती सोडून सहकार ही आपला जीवन व्यवसाय सुकर करणारी एक महान् शक्ति आहे याची जाणीव ठेवून आपला संस्थेशीं असलेला व्यवहार चोख ठेवून संस्था बलवान करण्यास झटावें अशी त्यांनीं सर्वांस विनंती केल्यावर, अध्यक्षांचे आभार मानल्यावर पानसुपारी देण्यांत आली व समारंभाचा समारोप झाला.

### जगांतील सर्वांत मोठी बँक

ऑगस्ट, १९४२ मध्यें ग्रेटब्रिटनमधील मिडलंड बँकेकडील ठेवींचा आंकडा ७० कोटि पौंडांवर गेला! कोणत्याहि ब्रिटिश बँकेजवळ ह्यापूर्वी एवढ्या ठेवी नव्हत्या. चेस नॅशनल बँक ऑफ न्यूयॉर्क ही जगांतील सर्वांत मोठी बँक आहे, तिच्याशीं बरोबरी करण्याजोगी मिडलंड बँकेची परिस्थिति निर्माण झाली आहे, परंतु डॉलर-पौंड हुंडणावळीच्या दरामुळें बरोबरी होऊं शकत नाहीं. चालू हुंडणावळीच्या दरानें, न्यूयॉर्क बँकेकडील ठेवींची रक्कम ९० कोटि पौंड भरते!

## अर्थशास्त्र

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे

**पृष्ठसंख्या सुमारें ३००, किंमत ३ रुपये**

या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

## श्रीराम सिल्क मिल्स लि., बंगलोर

[ कंपनीनें १९४१ अखेर ६ टक्के डिव्हिडंड वांटला आहे. ]

**युद्धसाहित्यपुरवठा—खात्याची पॅरेशूटकरितां लागणाऱ्या**

रेशमी कापडाची ऑर्डर पुरी करण्यासाठी लागणाऱ्या भांडवलाकरितां तूर्त एकूण रु. १ लक्षाच्या रकमेपर्यंत

# ठेवी घेणें आहेत

**व्याजाचा दर ४॥ ते ६ टक्के. ठेव किमान रु. ५०० ची असावी. ठेवीवरील व्याज दर सहा महिन्यांनीं दिलें जातें.**

श्रीराम सिल्क मिल्स लि.,
श्रीरामबाग,
बसवनगुडी, बंगलोर.

**नारायण गोविंद नाईक,**
( माजी अध्यक्ष, म्हैसूर चेंबर ऑफ कॉमर्स ) **मॅनेजिंग डायरेक्टर**

आमच्या कारखान्यांतील माल मुंबईस बॉम्बे स्वदेशी को—ऑपरेटिव्ह स्टोअर्समध्यें व पुण्यास लक्ष्मी रोडवरील रे म्यूझिअमच्या व्यापार—संवर्धन—गृहांत पहा.

राहाणेची व भोजनाची उत्तम सोय




फोन नं. ७७९ गणपति चौक, व्यवस्थापक

## N. V. WADNERKAR

**Gold & Silver Smith, Jeweller & Engraver, Electro-plater & Manufacturer of Sporting Trophies, Medals, Cups etc.**

**- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -**

**POONA CITY.**



# मधुमेहावरील औषध

**तीन आठवड्यांचे औषधास फक्त रु. ७**

**— मागविण्याचा पत्ता —**

**मॅनेजिंग डायरेक्टर, रूरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड.**

९२३ ए, सदाशिव, पुणें २.

## DECCAN BOOK STALL

**Booksellers, Publishers & Subscription Agents**

**Fergusson College Road, Poona No. 4**

(1) We stock and supply Educational books, General books & Library books.
(2) We supply Government of Bombay and Government of India publications.
(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.
(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.

## वक्तशीर आणि मनपसंत काम करून देणारे

# मोहन वॉच कंपनी

**रेग्युलेशन मोफत**

**कॉमनवेल्थ बिल्डिंगसमोर लक्ष्मी रोड, पुणें २.**


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
(टपाल हंशील माफ)
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ८ पुणें, बुधवार, तारीख ९ डिसेंबर १९४२ अंक ४८

★ महाराष्ट्राच्या पहिल्या शेड्यूल्ड बँकेवरील जनतेच्या वाढत्या विश्वासाचें प्रतीक ★

बँकेचें खेळतें भांडवल ४० लाखांचेवर

निधिधारकांची स्वतःची बँक

## दी न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया लि.

★ हेड ऑफिस : १६ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई. ★

अध्यक्षः—श्री. जमनादास एम्. मेहता, एम. ए., एलएल. बी., बार-ॲट-लॉ, एम. एल. ए. (Central)

ठेवीदारांतर्फे डायरेक्टरः—श्री. गजानन विश्वनाथ ऊर्फ बाबुराव साळवेकर, बी. ए., मालक सरदार गृह, मुंबई.

—बोर्ड ऑफ डायरेक्टर्स—

श्री. पी. बी. गोळे, बी. ए., एलएल. बी., माजी प्रधान, मध्यप्रांत, अकोला बेरार.

श्री. जी. एस. मराठे, एम. ए. (मुं.), ए. आय. ए. (लं.), ॲक्चुअरी, पुणें.

रावबहादुर एन. बी. देशमुख, रिटायर्ड गव्हर्नमेंट प्लीडर व पब्लिक प्रॉसिक्यूटर, अहमदनगर.

शेठ भगवानजी मुरारजी गोकुळदास, मॅनेजिंग एजंटस्, बाँबे टायर्स सर्व्हिस लि., मुंबई.

श्री. बी. डी. गरवारे, गव्हर्निंग डायरेक्टर: गरवारे मोटार्स लि., मुंबई

श्री. जी. व्ही. पुराणिक, गव्हर्निंग डायरेक्टर, श्रीधूतपापेश्वर लि. पनवेल.

शेठ गोविंददास नारायणदास बनातवाले, चंपागल्ली, मुंबई २.

सर एच. पी. दस्तुर, बी. ए., एलएल. बी., बार-ॲट-लॉ, रिटायर्ड चीफ प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट, मुंबई.

श्री. आर. एस. आठवले, बी. ए., रिटायर्ड डेप्युटी कलेक्टर, व माजी दिवाण सांगली, नाशिक सिटी.

श्री. डी. डी. देशपांडे, बी. ए., मॅनेजिंग डायरेक्टर, मुंबई.

युद्ध असो अगर नसो

"न्यू सिटिझन" ची प्रगति पहिल्याच दमानें व जोरानें चालू आहे

रोख वसूल झालेलें शेअर – भांडवल व रिझर्व्ह : ५,७०,००० चे वर

### बोलक्या आंकड्यांची कामगिरी

| तारीख | एकूण ठेवी | एकूण चालू भांडवल |
|---|---|---|
| ता. ११-१-१९४१ चौथ्या ताळेबंदाच्या वेळीं | रु. २६,०५,००० हातीं असलेलीं बिलें धरून | रु. ११,००,००० चे वर |
| ११-७-१९४१ चौथ्या ताळेबंदानंतर ६ महि. | रु. ३०,१९,२००. बिलें सोडून | रु. ३६,००,००० चे वर |
| ३०-९-१९४१ अगदीं अलीकडे | रु. ३४,४०,००० हातीं असलेलीं बिलें धरून | रु. ४०,००,००० चे वर |

धंद्याचे नियम

॥ पाहुनिया आधीं जनता-
जनार्दनाची सोय ॥
॥ करी काम काज तोचि
विश्वासपात्र होय ॥

धंद्याची महत्तम सुरक्षितता सांभाळून ठेवीदारांना जास्तींत जास्त व्याज देणारी बँक.

**दि न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया, लि.**

चालू खातें : १०० रुपयांनीं उघडतां येतें–व्याजाचा दर १/४% ( पाऊण टक्का )

मध्यम स्थितींतील लोकांची एकमात्र सोय

सेव्हिंग बँक खातें : १० रुपयांनीं उघडतां येतें. १००० रकमेपर्यंत आठवड्यांतून दोनदां रकम चेकनें काढतां येते.

व्याजाचे दर १३/४% ( पावणे दोन ) ते २%

मुदत ठेवी: १०० अगर जास्त रकमेच्या १ ते ५ वर्षें मुदतीच्या स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर समक्ष अगर पत्रद्वारें

★ " न्यू सिटिझन " चा वाढता विस्तार ★

स्थानिक शाखा : ( १ ) गिरगांव, मुंबई ४. ( २ ) दादर ( B. B. & C. I. Ry).
( ३ ) जव्हेरी बाजार, मुंबई २. ( ४ ) शिव ( Collecting Office).

बाहेरगांवच्या : ( ५ ) नाशिक शहर ( ६ ) नाशिक रोड ( ७ ) सिन्नर ( Pay Office )
( ८ ) कोल्हापूर ( ९ ) सांगली. ( १० ) सोलापूर

*अधिक माहितीसाठी समक्ष भेटा अगर लिहा—*

डी. डी. देशपांडे, बी. ए.,
मॅनेजिंग डायरेक्टर.


## विविध माहिती

### मुंबई प्रांतांतील शिक्षणप्रगति

मुंबई प्रांतांतील क्षिक्षणसंस्थांत १९४१–४२ मध्यें ६०२ संस्थांची भर पडून त्यांची संख्या २२,७५१ झाली. विद्यार्थ्यांची संख्या १८,५५,२८१ भरली; म्हणजे त्यांच्या संख्येंत २२,८८९ ची वाढ झाली. २१,६५७ गांवें व खेडीं ह्यांपैकी १३,९७६ मध्यें शाळा होत्या. शाळांवरील खर्च ४ कोटि, ८७ लक्ष रुपये झाला, त्यांपैकी सरकारनें २ कोटि, ६ लक्ष रुपयांचा बोजा उचलला व फीचे रूपानें १ कोटि, ४६ लक्ष रुपये वसूल झाले.

### कोयनेल

डॉक्टर लोक, इस्पितळें, कारखानदार व सर्वसाधारण जनता ह्यांस विक्री करण्याकरितां कोयनेलचा सांठा प्रांतिक सरकारांस देण्यांत आलेला आहे, असें हिंदुस्थान सरकारनें जाहीर केलें आहे.

### ट्रेझरी बिलांवर १४ आ. ९ पै व्याज

गेल्या आठवड्यांत रिझर्व्ह बँकेनें हिंदुस्थान सरकारचीं १० कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं त्यांवर १४ आ. ९ पै व्याजाचा दर पडला.

### मध्यवर्ती असेंब्लीचें अधिवेशन

ता. १५ फेब्रुवारी रोजीं हिंदुस्थान सरकारचें रेल्वे बजेट मध्यवर्ती असेंब्लीस सादर केलें जाईल. मुख्य बजेट सादर करण्याची तारीख २७ फेब्रुवारी ही ठरली आहे. अधिवेशनास १० फेब्रुवारी रोजीं प्रारंभ होऊन तें ३१ मार्चअखेर चालेल.

### अमेरिकन मंडळाची नेमणूक

इराणचा राष्ट्रीय आर्थिक संसार भक्कम पायावर बसवून देण्यासाठी त्या देशानें एका अमेरिकन तज्ज्ञ मंडळाची योजना केली आहे.

### मि. चर्चिल ह्यांचा वाढदिवस

ब्रिटिश मुख्य प्रधान मि. चर्चिल ह्यांनीं ता. ३० नोव्हेंबर रोजीं आपला ६८ वा वाढदिवस दिवसभर काम करून व संध्याकाळीं कौटुंबीय मंडळी व निवडक मित्र ह्यांचेबरोबर जेवण करून साजरा केला. स्टॅलिनकडून त्यांस अभिनंदनपर संदेश आला होता.

### ऑस्ट्रेलियाशीं वैमानिक दळणवळण

ॲटलांटिक व पॅसिफिक महासागर ओलांडणाऱ्या विमानांची वहातुक चालू आहे व त्यांतून इंग्लंड-अमेरिका व अमेरिका-ऑस्ट्रेलिया दळणवळण चालू शकतें. जपाननें मलाया घेण्यापूर्वी सिंगापूर मार्फत ऑस्ट्रेलियाचें लंडनशीं वैमानिक दळणवळण होतें. हिंदी महासागर ओलांडून नव्या मार्गानें तें सुरू करण्याचा आतां विचार चालू आहे.

### १०० अब्ज डॉलर्सचें बजेट

अमेरिकन सरकार तेथील विधिमंडळाकडून येत्या वर्षी १०० अब्ज डॉलर्सच्या खर्चास मंजुरी मागणार आहे. एवढ्या खर्चाचें बजेट आजवर कोणत्याहि देशाचें झालेलें नव्हतें.

### इराक-इराण रेल्वे

रशियाला युद्धसाहित्य पाठविण्यास उपयोगी पडणारी वरील रेल्वे लाईन आतां पुरी झाली आहे. हें सर्व काम हिंदी लोकांनीं पुरें केलें व रूळ आणि डबे हीं सर्व हिंदुस्थानांतूनच नेण्यांत आलेलीं आहेत. दिवसास एक मैल ह्या गतीनें हें काम करण्यांत आलें.

### प्रार्थना व उपास

युरोपांतील ज्यू लोकांवर ओढवलेल्या कठीण प्रसंगाची आठवण म्हणून ब्रिटिश ज्यू येत्या रविवारीं प्रार्थना व उपास करणार आहेत.

### आश्रयार्थ आलेले प्रोफेसर

जर्मनींतून हाकून दिल्यामुळें आश्रयार्थ ग्रेट ब्रिटनमध्यें येऊन राहिलेल्या प्रोफेसरांची संख्या ५९५ आहे. त्यांपैकी २५४ विश्वविद्यालयांत व रसशाळांत काम करीत आहेत. २३४ लोकांना व्यापारी संस्थांत काम मिळालें आहे.

### अमेरिकनांचें युद्धकार्य

एका वर्षापूर्वी युद्धकार्यांत गुंतलेल्या अमेरिकनांची संख्या ७० लक्ष होती, आतां ती १३/४ कोटींच्या वर गेली आहे.

### मादाम चँग काय शेक

मादाम चँग काय शेक ह्या डॉक्टरी उपचारासाठी अमेरिकेंत गेल्या आहेत. त्यांची प्रकृति सुधारत आहे.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती | १९६ |
| २ विमाव्यवसायाची परिस्थिति | १९७ |
| ३ बाँबे को. बँक्स असोसिएशन | १९८ |
| ४ बेलापूर कं. लि. | १९८ |
| ५ स्फुट विचार — युद्धोत्तर पुनर्घटना—सर बुइल्यम बेव्हरिज ह्यांची योजना—मोठेचा तुटवडा—मित्रराष्ट्रांची यशस्वी चढाई—मुसोलिनीचें रडगाणें | १९९ |
| ६ शिरपूर तालुक्यांतील सहकारी कार्यक्रम | २०१ |



# अर्थ

बुधवार, ता. ९ डिसेंबर, १९४१


## विमाव्यवसायाची परिस्थिति

इतर आर्थिक व्यवहारांप्रमाणें आयुर्विम्याच्या धंद्यावरहि युद्धपरिस्थितीचा आकुंचनात्मक परिणाम होणें स्वाभाविक आहे. महागाई, कराचा वाढता बोजा, लोकांच्या मनाची अस्थिरता इत्यादि गोष्टींमुळें आयुष्याचा विमा उतरवण्याची जनतेची प्रवृत्ति मर्यादित होते आणि नवीन काम कमी मिळणें आणि गुंतवावयाच्या पैशावर कमी व्याज सुटणें ह्यांचे योगानें विमा मंडळ्यांचें उत्पन्न घटतें. युद्धाचे ह्या प्रकारचे काय परिणाम झाले आहेत. ह्याची छाननी, कलकत्ता इन्शुअरन्स कंपनीचे कंट्रोलर, श्री. गुप्ता ह्यांनीं अलीकडे कलकत्ता येथील इंडिअन इन्शुअरन्स इन्स्टिटयूटच्या विद्यमानें झालेल्या एका भाषणांत नुकतीच केली. मागील व चालू युद्ध, आणि इंग्लंड व हिंदुस्थान ह्यांचेमधील परिस्थिति ह्यांचा तुलनात्मक विचार करून स्वतःचीं अनुमानें त्यांनीं पुढें मांडलीं आहेत. विम्याचा धंदा करणाऱ्या मंडळ्या आणि विमेच्छु जनता ह्यांचें लक्ष श्री. गुप्ता ह्यांच्या विचारांकडे ओढणें आवश्यक आहे.

श्री. गुप्ता ह्यांनीं मुख्यत्वेंकरून चार मुद्यांची चर्चा केली आहे. (१) मृत्यूंचें प्रमाण, (२) विम्याचे करार, (३) चालू व नवे विमे आणि (४) विमा मंडळ्यांची सांपत्तिक स्थिति ह्यांचे संबंधांत युद्धाचे काय परिणाम झाले आहेत हा चतुर्विध प्रश्न त्यांनीं विवेचिला आहे. मृत्युसंख्येचें प्रमाण गेल्या युद्धाचे मानानें चालू युद्धांत विशेष वाढलेलें नाहीं असा इंग्लंडमधील मंडळ्यांचा अनुभव आहे. हिंदुस्थानांत प्रत्यक्ष लढाईचे अनुभव अजून आलेले नाहींत, ह्या कारणानें युद्धामुळें मृत्यूंचें प्रमाण वाढण्याचा प्रश्न येथें महत्त्वाचा नाहीं. शिवाय, लढाईमध्यें प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रीतीनें भाग घेणारे लोक आणि विमा उतरवण्याची प्रवृत्ति असलेली जनता ह्यांचा परस्पर संबंधहि लक्षांत घेणें आवश्यक आहे. मध्यम स्थितींतले व पांढरपेशे लोकच मुख्यत्वेंकरून विम्याच्या सवलतींचा फायदा घेत असतात आणि प्रत्यक्ष युद्धांत पडणारांशीं त्यांचें प्रमाण अत्यंत अल्प असेंच असतें. विमा पॉलिसीच्या करारांचा विचार करतां असें दिसतें कीं, युद्धांतील मृत्यूंची जोखीम उचलण्याची विमा मंडळ्यांची तयारी प्रथम नव्हती परंतु अलीकडे ह्या धोरणांत बदल झाला आहे आणि ही जोखीम कांहीं अटींवर घेण्याचा प्रघात इंग्लंडमध्यें रूढ झाला आहे आणि तो ह्या देशांत रूढ होत आहे. मंडळ्यांच्या विम्यांच्या सांपत्तिक योजनेंत लढाईंतील मृत्यूची जोखीम बसवावी लागते आणि तसें करण्याचे निरनिराळे प्रकार अंगीकारण्यांत येत आहेत. पॉलिसीचे भरलेले पैसे परत देणें किंवा हप्ते चढवणें इत्यादि मार्गांनीं युद्धाच्या जोखमीच्या जबाबदारीची तरतूद करण्यांत येत आहे. श्री. गुप्ता ह्यांचा तिसरा मुद्दा चालू विमे व नवीन पॉलिसीज ह्यांचे संबंधांतला आहे. युद्धाचा विस्तार होऊं लागला तेव्हां हिंदी लोकांचे मनांत अस्थिरता, अनिश्चितता व भीति ह्या विकारांची लाट उसळली तेव्हां विम्याचे हप्ते भरण्याचें बंद करणें आणि नवीन विमे न उतरवणें अशा वृत्तीस जोर आला. ह्या कारणानें विमा मंडळ्यांचें चालू व नवें काम ह्यांत घट होऊं लागली. महागाई, वाढता करांचा बोजा इत्यादि कारणांचीहि ह्या परिस्थितींत भर पडली असून बहुतेक विमा मंडळ्यांच्या प्रगतीवर तिचा अनिष्ट परिणाम झालेला दिसत आहे.

विमा मंडळ्यांचें काम कमी होणें म्हणजे त्यांचें उत्पन्न घटणें होय हें उघडच आहे. तथापि, त्यांच्या सांपत्तिक स्थितीवर युद्धाचा दुसरा एक महत्त्वाचा प्रतिकूल परिणाम होत आहे तो त्यांच्या पैशाची गुंतवण कमी व्याजाच्या दरानें होत आहे त्यामुळें आहे. त्यांस आपला पैसा विशिष्ट प्रमाणांत सरकारी रोख्यांत गुंतवलाच पाहिजे आणि ह्या रोख्यांची बाजारी किंमत आणि त्यांवर सुटणारें व्याज ह्या गोष्टी त्यांच्या सांपत्तिक स्थितीच्या मुळाशीं आहेत. रोख्यांचे बाजारभाव सरकारनें चालू युद्धांत पडूं न देतां उचलून धरले आहेत हें खरें, परंतु व्याजाचा दरहि सरकारनें रोखून धरला आहे. ह्या कारणानें विमा मंडळ्यांची सांपत्तिक बाजू लंगडी झाली आहे. तसेंच, युद्धपरिस्थितीमुळें त्यांचे खर्च मात्र वाढले आहेत. गेल्या युद्धाचे मानानें चालू युद्धांत रोख्यांच्या किंमतीमधली घट पुष्कळ कमी आहे आणि १९३९ च्या डिसेंबर महिन्यांत ती झाली होती तिच्याशीं तुलना करतां अलीकडे स्थिति सुधारली आहे. परंतु विमा मंडळ्यांचें मुख्य उत्पन्न व्याजाचें आणि तो झरा तर कमी उत्पादक झाला आहे. विमा मंडळ्यांच्या उत्पन्न-खर्चाच्या ह्या अवस्थेंत बोनस वाटण्याची प्रथा त्यांनीं चालू ठेवावी, का तात्पुरती तहकूब करावी हा वादग्रस्त प्रश्न उपस्थित झाला आहे. बोनस न देतां त्यांनीं स्वतःच्या मजबुतीकडे अधिक लक्ष पुरवावें असें कोणीहि दूरदर्शी व जागरूक मनुष्य म्हणेल. आमचा सुरक्षितपणा कायम राखून आम्हांस आमच्या पॉलिसीज धारण करणारांस बोनस देतां येत आहे, तर तसें करण्यास हरकत कां घेतली जावी कसें जुन्या आणि प्रथितयश मंडळ्या म्हणणार, पण त्यांच्या ह्या धोरणानें इतर मंडळ्यांस अनिष्ट स्पर्धेची झळ लागून विम्याच्या सबंध धंद्याचा विचका होतो असा युक्तिवाद इतर मंडळ्या पुढें मांडणार. युद्धकाळांत होणारे बदल ध्यानांत बाळगून विमा मंडळ्यांनीं बोनसविषयींचें स्वतःचें धोरण निश्चित केलें पाहिजे आणि त्यांनीं विम्याच्या एकूण धंद्याचें भवितव्यहि दृष्टीआड करून चालणार नाहीं. श्री. गुप्ता यांच्या प्रस्तुत प्रश्नासंबंधांतला हा अभिप्राय विचारप्रवर्तक आहे यांत संशय नाहीं. आयुर्विम्याचा संबंध सामान्य आर्थिक स्थितींतल्या आणि बहुतेक असहाय

अशा अनेक व्यक्तींच्या जीवनाशीं जिव्हाळ्याचा असल्यानें विमा मंडळ्यांची सामाजिक जबाबदारी विशेष महत्त्वाची आहे आणि त्या कारणानेंच त्यांचेविषयींच्या कायद्यांत कित्येक तरतुदी करण्यांत आल्या आहेत ही गोष्ट नजरेंत ठेवली जाणें अगत्याचें आहे.

## बॉंबे को. बँक्स असोसिएशन

### १९४१–४२ चा अहवाल

मुंबई प्रांतांतील सेंट्रल व अर्बन बँकांच्या व्यवहारांत एकसूत्रीपणा आणण्यासाठी व त्यांच्या हितसंबंधांचा विचार करण्याकरितां एक मध्यवर्ती संस्था स्थापन करण्याचें चार वर्षांपूर्वी ठरलें व १९३९ मध्यें तिच्या कार्यास प्रारंभ झाला. सहकारी बँकांच्या प्रश्नांबाबत असोसिएशनच्या मतांस योग्य महत्त्व देण्याचें सहकारी रजिस्ट्रारचें धोरण संस्थेच्या कार्यांची उपयुक्तता वाढविण्यास कारणीभूत झालें आहे. संस्थेच्या पटावर २७ अर्बन बँका व १२ सेंट्रल व इतर बँका आहेत. म्हणजे, १९४१–४२ मध्यें सभासद–अर्बन बँकांत तीन बँकांची भर पडलेली आहे. अहवालाचे वर्षी असोसिएशनच्या कार्यकारी मंडळाच्या एकूण १२ सभांत ११३ प्रश्नांचा विचार केला. ह्यावरून संस्थेच्या व्यापक कार्याची कल्पना येईल. १९४०-४१ मध्येंहि कार्यकारी मंडळानें १० सभांत ११४ प्रश्नांचा विचार केला होता. बॉंबे ॲग्रिकल्चरल डेटर्स रिलीफ ॲक्टाखाली सहकारी सोसायट्यांना बाबयाच्या सुटीसंबंधांत उपस्थित होणाऱ्या प्रश्नांचा विचार असोसिएशननें करून त्याविषयीं तपशीलवार सूचनाहि केल्या. सहकारी बँकांची प्रांतिक परिषद् मे, १९४२ मध्यें पुणें येथें भरविण्यांत आली. मुंबई प्रांतांतील सहकारी बँकांची यादी असोसिएशननें १९३७ सालीं प्रसिद्ध केली होती, त्याची दुरुस्त आवृत्ति जानेवारी १९४२ मध्यें तयार करून छापण्यांत आली. "बँक" हें नांव धारण करणाऱ्या संस्थेचें भाग-भांडवल किमान २० हजार रुपये असावयास पाहिजे, परंतु सध्याच्या परिस्थितींत कित्येक संस्थांस ही अट पार पाडणें कठीण जाईल, असें सरकारच्या निदर्शनास आणल्यावरून, ही अट पुरी करण्याची मुदत सरकारनें ३० जून १९४३ अखेर लांबविली. असोसिएशनच्या मध्यस्तीनें महत्त्वाच्या इतर अनेक प्रश्नांचा उलगडा होऊन सहकारी बँकांच्या हितसंबंधांचें रक्षण झालें व सहकारी खात्यास तज्ज्ञ सल्ला मिळूं शकला. असोसिएशनच्या वार्षिक रिपोर्टांत त्याची माहिती मिळूं शकेल. प्रांतिक सहकारी बँकेचे अध्यक्ष श्री. आर. जी. सरया हे संस्थेचे अध्यक्ष आहेत. श्री. वैकुंठराय मेहता (मॅ. डायरेक्टर, मुं. प्रां. स. बँक) हे संस्थेचे पहिल्यापासून ऑनररी सेक्रेटरी आहेत. असोसिएशनच्या उपयुक्त कामगिरीचें पुष्कळसें श्रेय त्यांनाच आहे.

---

### भुइमुगाचें पीक

सरकारी अंदाजाप्रमाणें, चालू मोसमांत हिंदुस्थानांतील भुइमुगाची लागवड ६३,८१,००० एकरांत झालेली आहे. म्हणजे, गेल्या वर्षाचे मानानें चालू वर्षी लागवडींत ११% वाढ झाली आहे. वाढीचें प्रमाण मद्रास प्रांतांत ३५% आहे. मुंबई प्रांतांत लागवड १५% घटली आहे.

### बेलापूर कं. लिमिटेड

वरील कंपनीनें ३० सप्टेंबर, १९४२ अखेर संपलेल्या वर्षी ३० लक्ष, ६६ हजारांची साखर तयार करून विकली. कंपनीला ७ लक्ष, ४० हजार रुपये नफा झाला. घसाऱ्यासाठीं १ लक्ष, ६६ हजार रुपये बाजूस काढून हा नफा झालेला आहे. भागीदारांस प्रत्येक भागावर करमाफ ६% डिव्हिडंड मिळणार आहे, त्यासाठी ४ लक्ष, ५१ हजार रुपये लागतील.

कंपनीच्या उसाचे इस्टेटीवर १९४१ मधील कामगारांच्या संपाचा परिणाम झाला. उसास पाणी वेळेवर मिळालें नाहीं व बराच ऊंस आगीनें जळाला. नोव्हेंबर १९४१ अखेर नव्या कारखान्याचें काम पुरें झालें. जळालेला ऊंस गाळण्याच्या व त्याचा रस स्वच्छ करण्याच्या अडचणींमुळें साखरेचें उत्पादन कमी झालें. वहातुकीच्या अडचणींमुळें व सरकारी नियंत्रणामुळें वर्षअखेर कांहीं साखर शिल्लक राहिली. हिशेबाचे वर्षअखेर साखर शिल्लक दाखविण्याचा हा पहिलाच प्रसंग आहे. (२ लक्ष, ५३ हजारांची साखर शिल्लक आहे.) ३० सप्टेंबर १९४२ अखेर कंपनीनें ४,५१९ एकर व ७ गुंठे एवढ्या क्षेत्रांत ऊंस लावलेला आहे.

---


# NOTICE.

The Eighth Annual General Meeting of the Share-holders of the Brihan Maharashtra Sugar Syndicate, Ltd., Poona 2, will be held on Thursday, the 31st December, 1942, at 3 P. M. (S. T.) at the Tilak Smarak Mandir, Poona 2, to transact the following business :—

(1) To receive and adopt the Directors' Report and Audited Statement of Accounts for the year ended 30th September, 1942.

(2) To sanction the declaration of a Dividend for the above mentioned period.

(3) To elect Directors in place of those who retire but are elegible for re-election.

(4) To appoint Auditors for the current year and fix their remuneration.

By Order of the Board of Directors,

C. G. AGASHE & Co.,
Managing Agents.

Poona 2,
29th November, 1942.

*Note* :—The Transfer Books of the Company will be closed from 16th of December, 1942 to 7th of January, 1943 (both days inclusive).

The Dividend when sanctioned will be made payable after one month from the passing of the Balance Sheet by the General Meeting.

# स्फुट विचार

## युद्धोत्तर पुनर्घटना

गेल्या महायुद्धाचे वेळीं तें संपल्यावर आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय, राजकीय, आर्थिक व सामाजिक घटनेंत कोणते बदल झाले पाहिजेत ह्याविषयीं पुष्कळ चर्चा झाली. राष्ट्रसंघ व आंतरराष्ट्रीय कामगार संघ ह्या संस्था ह्या त्या वादविवादांतून प्रत्यक्षपणें बाहेर आल्या आणि युरोपांत कित्येक लहान राष्ट्रांस स्वातंत्र्य मिळालें. रणांगणांचा विस्तृतपणा, संपत्तीचा व्यय, परिणामकारकपणाचा पल्ला ह्यांचे बाबतींत चालू युद्धानें मागच्या युद्धास मागें सारलें आहे आणि जागतिक पुनर्घटनेची चर्चाहि त्या मानानें अधिक व्यापक व मूलग्राही झाली आहे. जागतिक पुनर्रचना कोणत्या तत्त्वांवर व्हावी ह्याविषयीं प्रेसिडेंट रूझव्हेल्ट व मि. चर्चिल ह्यांनीं स्वतः-च्या राष्ट्रांच्या वतीनें ह्यासंबंधांत केलेल्या घोषणा प्रसिद्धच आहेत. त्यांस अनुसरून व त्यांचे धर्तीवर कित्येक योजना तयार होत आहेत व पुढें मांडल्या जात आहेत. दारिद्र्य नष्ट व्हावें, बेकारीनें पुन्हां डोकें वर काढूं नये, प्रत्येकाची पोटापाण्याची व्यवस्था व्हावी, सर्व राष्ट्रें स्वतंत्र होऊन त्यांचेमध्यें आर्थिक सहकार नांदावा इत्यादि उच्च तत्त्वें पुनर्घटनेच्या योजनांत गोवलीं गेलीं आहेत. त्यांस मूर्त स्वरूप कसें देतां येईल हाच खरा व अवघड प्रश्न आहे. वैयक्तिक स्वातंत्र्य व राजव्यवस्थेची सत्ता ह्यांचा मेळ व्यवहारांत कसा घालावा हें ठरवणें सोपें नाहीं. त्याच-प्रमाणें इंग्लंड व अमेरिका येथील लोकशाही रशियांतील समाज-सत्तावाद व अशिया खंडांतील लोकांची स्वातंत्र्यलालसा ह्यांचा एकजीव कसा करावा ह्याचा निर्णय करणेंहि अवघड आहे. शेती, उद्योगधंदे, व्यापार ह्यांची प्रत्येक राष्ट्रांतली व्यवस्था आणि त्यांचे आंतरराष्ट्रीय संबंध हे इतके गुंतागुंतीचे असतात कीं, एखादी प्रभावी आंतरराष्ट्रीय सत्ता प्रस्थापित झाल्यावांचून आर्थिक व्यवहार सुरळीत रीतीनें चालणें अशक्य होणार आहे. युद्धोत्तर काळांत जग पूर्वीच्या पद्धतीनें चालू शकत नाहीं ही जाणीव एवढी तीव्र आहे कीं, सर्व अडचणी बाजूस सारून त्यांचे-मधून पुनर्रचनेचा कांहींतरी मार्ग काढलाच पाहिजे असें मत चोहोंकडे पसरत आहे.

## सर वुइल्यम बीव्हरीज ह्यांची योजना

इंग्लंडमधील जनतेस पोटापाण्याच्या काळजीमधून मुक्त कर-ण्याची एक महत्त्वाकांक्षी योजना सर वुइल्यम बीव्हरीज ह्यांनीं तयार केली असून ती नुकतीच प्रसिद्ध झाली आहे. ती वर वर्णि-लेल्या कल्पनांचा उत्कृष्ट नमुना आहे. जागतिक पुनर्घटनेंत ती कशी बसवतां येईल ह्याचा विचार त्यांनीं केलेला नाहीं आणि त्यांनीं आपलें सर्व लक्ष इंग्लिश परिस्थितीस मर्यादित केलें आहे. इंग्लंडमध्यें प्रत्येक व्यक्तीची रहाणी विशिष्ट किमान दर्जाची रहावी ह्या बेतानें बेकारी, आजारीपणा व वार्धक्य ह्यांची तरतूद विम्या-च्या पद्धतीनें केली जावी हें सर वुइल्यम ह्यांच्या सूचनेचें सार आहे. राष्ट्रीय योजनेस अनुसरून प्रत्येक व्यक्तीच्या चरितार्थाची तज-वीज केली असतां लोक आळशी व बेफिकीर बनतील आणि राष्ट्रीय संपत्तीचें उत्पादनच मर्यादित होईल ह्या अडचणीच्या दृष्टीनें विम्याच्या योजनेस सर्व नागरिकांनीं हातभार लावलाच पाहिजे अशी अट त्यांनीं घातली आहे. विमा निधींत प्रत्येकानें आपल्या परानें भर घालण्याचें सामर्थ्य सर्व व्यक्तींस प्राप्त व्हावें ह्याविषयींच्या प्रयत्नांचाहि अंतर्भाव त्यांच्या योजनेंत आहे. वार्धक्य, आजारीपणा, ह्या आपत्तींची कामगारवर्गाविषयींची तरतूद इंग्लंडमध्यें आजहि आहे. तिच्याच धर्तीवर सर वुइल्यम ह्यांची व्यापक योजना आधारलेली आहे. युद्धोत्तर पुनर्रचनेचा अत्यंत महत्त्वाचा भाग म्हणून त्यांनीं ती तयार केली आहे आणि युद्धप्रयत्नास उत्तेजन म्हणून तिची चर्चा आतांच झाली पाहिजे असा त्यांचा आग्रह आहे. युद्धापूर्वीच्या ब्रिटिश सरकारच्या वार्षिक उत्पन्नाइतका त्या योजनेचा खर्च आहे. पुनर्घटनेच्या प्रश्नावर ब्रिटिश पार्लमेंटमध्येंहि वादविवाद होत आहे. आर्थिक योजनात्मक धोरणाचा अंगिकार केला जाण्याची आवश्यकता आतां चोहोंकडे पटत चालली आहे आणि इंग्लंडप्रमाणें हिंदुस्थानांतहि आर्थिक नियोजन अगत्याचें आहे हें स्पष्ट आहे. कांहीं काळापूर्वी पुनर्घटनेच्या प्रश्नांचा विचार करण्यासाठी येथें समित्या नेमण्यांत आल्या होत्या, त्यांच्या कामकाजाची माहिती अलीकडे कांहींच उपलब्ध झालेली नाहीं. पुनर्घटनेची आवश्यकता युद्धप्रयत्नास इंग्लंडमध्यें जर सहाय-कारक समजली जात आहे तर तोच न्याय हिंदुस्थानास कां लावला जाऊं नये ?

## मोडेचा तुटवडा

अलीकडे नोटा किंवा रुपये ह्यांची मोड मिळण्यास लोकांस विलक्षण अडचण भासत आहे आणि सरकारनें हलकीं नाणीं पुरवून ती त्वरित दूर करावी अशा सूचना केल्या जात आहेत. ह्यासंबंधांत परिस्थिति काय आहे ह्याविषयींचा खुलासा आतां सरकारनें अधिकारी रीत्या प्रसिद्ध केला आहे. त्यांचें म्हणणें असें आहे कीं, हलक्या नाण्यांचा तुटवडा होण्याच्या मुख्य कारणांत फायद्याच्या आशेनें कांहीं लोक त्यांचा साठा करीत आहेत हें महत्त्वाचें आहे. नफा घेऊन नाण्यांची अदलाबदल करतां यावी किंवा त्यांची धातू म्हणून फायद्यानें विक्री करावी असा दुहेरी हेतु ह्या प्रकरणांत आहे. नाणीं ह्या रीतीनें साठवणें हें जनतेच्या गरजेचा अवास्तव फायदा घेणें होय आणि त्याचा लोकांनीं निषेध करणें अगत्याचें आहे, असें सरकारचें म्हणणें आहे. जरूरीपेक्षां अधिक नाणीं जवळ ठेवणें हा राष्ट्रसंरक्षणाच्या नियमान्वयें गुन्हा आहे ह्या गोष्टीकडेहि त्यांनीं लक्ष वेधलें आहे. सरकारी टांकसाळींत शक्य तितक्या मोठ्या प्रमाणांत हलकीं नाणीं पाडण्याची शिकस्त केली जात आहे. चालू युद्धाच्या प्रारंभीं दर महिन्यास १६० लक्ष ह्या वेगानें सदरहु नाणीं पाडलीं जात असत. सध्यांचें मासिक प्रमाण ७ कोटि एवढें मोठें आहे. युद्धाच्या पहिल्या तीन वर्षांच्या अवधींत पाडण्यांत आलेल्या नवीन हलक्या नाण्यांची एकूण संख्या १८ कोटि इतकी भरते; आणि ह्या प्रचंड संख्येची भर अगोदरच व्यवहारांत खेळणाऱ्या चलनांत पडली हे लक्षांत ठेवलें पाहिजे. टांकसाळींमध्यें नाणीं सध्यांपेक्षा अधिक झपाट्यानें पाडण्याची व्यवस्था करण्याचें सरकारनें ठरवलें आहे. तथापि जनतेनें नाण्यांचा कृत्रिम तुटवडा स्वतःच्या वैयक्तिक फायद्यासाठी करणाऱ्या आपमतलबी लोकांच्या कारवाया उजेडांत आणल्या पाहिजेत. असें झालें असतां सध्यां-च्या तुटवड्याचा ताण हलका होण्यासारखा आहे असें सरकारनें आपल्या पत्रकांत म्हटलें आहे.

### मित्रराष्ट्रांची यशस्वी चढाई

गेल्या आठवड्यांतील युद्धाच्या बातम्या अत्यंत उत्साहवर्धक अशा आहेत. सर्व रणांगणावर शत्रूची पिछेहाट चालली असून आफ्रिकेच्या उत्तर किनाऱ्यावर मित्रराष्ट्रांचें बळ वाढत आहे. ट्युनिशियामध्यें जर्मनी आपल्या फौजा आकाश मार्गानें व समुद्रावरून उतरीत आहे आणि तेथें अमेरिकन व ब्रिटिश सैन्याच्या चढाईस विरोध करण्याच्या खटपटींत आहे. इकडे पूर्वेच्या बाजूनें ब्रिटिश सैन्यानें जर्मन व इटालिअन फौजांस मागें रेटीत नेण्याचा क्रम चालूच ठेवला आहे आणि ह्यारीतीनें हिटलरची चमू दोन दळांच्या चिमट्यांत सांपडली आहे. भूमध्य समुद्रावरील महत्त्वाचीं बंदरें मित्रराष्ट्रांच्या हातीं आहेत आणि बिझर्टा व ट्यूनिस ह्यांचेवर त्यांची चाल रोखून जात आहे. फ्रान्सचें आरमार टूलाँ बंदरांत होतें आणि त्यावर हिटलरचा डोळा होता. भू-मध्य समुद्रांतील व ट्युनिशियामधील युद्धांत ह्या आरमाराचा उपयोग करण्याचा त्याचा बेत होता. परंतु फ्रेंच आरमाराच्या अधिकाऱ्यांनीं आपलीं जहाजें जर्मनीच्या हातीं लागण्यापेक्षां समुद्राच्या तळास गेलीं तरी हरकत नाहीं ह्या स्वातंत्र्य-प्रेमी बुद्धीनें तीं स्वतः बुडवून टाकलीं आहेत. हिटलरच्या लढाऊ योजनांस हा जबरदस्त धक्काच आहे. ह्याच वेळीं रशियामध्यें टिमोशेंकोनें स्टालिनग्राडच्या बाजूस जर्मन फौजेवर जोराचे हल्ले चढवण्याचा यशस्वी उपक्रम केला असून तिला मागें हाटवलें आहे. स्टालिनग्राड घेण्याचें बाजूस राहून स्वतःचा बचाव करणें जर्मन फौजेस कठीण झालें आहे. ह्या रीतीनें युरोपांतील व आफ्रिकेमधील रणांगणांवर मित्रराष्ट्रांची अभिनंदनीय सरशी आहे. न्यूगिनीमध्यें जपानाची फौज मागें हाटत जाऊन तिचा पिच्छा अमेरिकन व ऑस्ट्रेलिअन सेनानींनीं चालवला आहे. ह्याहि रणांगणांत मित्रराष्ट्रांची चढाई यशस्वी ठरली आहे आणि जपानला स्वतःची फौज, आरमार व विमानदल ह्यांचा बचाव करण्याची पंचाईत झाली आहे. हिटलरच्या महत्त्वाकांक्षेचा डोलारा हादरला आहे व तो कोसळून पडण्याचीं पूर्वचिन्हें स्पष्ट दिसूं लागलीं आहेत.

### मुसोलिनीचें रडगाणें

फ्रेंच राष्ट्र अडचणींत सांपडलें असतां त्याच्या विरुद्ध जर्मनीच्या बाजूनें युद्धांत पडण्यांत जेत्याच्या पक्षांस मिळून पुढें प्राप्त होणाऱ्या लुटीमध्यें आपण अंशभागी व्हावें असा मुसोलिनीचा हेतु होता. पूर्व युरोपांत प्राचीन रोमन बादशाहीचें पुनरुज्जीवन करावें ह्या महत्त्वाकांक्षेनें ॲबिसीनिया जिंकून आफ्रिकेंत आपल्या साम्राज्याचा विस्तार त्यानें चालवला होता. शांततेच्या स्थितीस तुच्छ लेखून युद्ध, विजय व राज्यविस्तार ह्यांचे तो गोडवे गात असे. ह्या मनःस्थितींत हिटलरच्या बाजूनें त्यानें युद्धांत उडी घातली. अगदीं प्रारंभीं जयाच्या योगानें त्यास उत्तेजन मिळालें. पण अखेर त्याच्या हातीं काय आलें आहे ? ॲबिसीनिया इटालिअन वर्चस्वांतून मुक्त झाला आणि उत्तर आफ्रिकेंतील रोमन साम्राज्याची आतां इतिश्री झाली आहे. हिटलरचा हस्तक बनून मुसोलिनी सध्यां त्याचा अंकित झाला आहे. सैन्य गेलें व इटलीस दारिद्र्य आलें. ब्रिटिशांनीं मुसोलिनीच्या लढाऊ शक्तीचा पार धुव्वा उडवून त्याची आफ्रिकेंतून हकालपट्टी केली आहे. आतां तर इटलीचीं बंदरें व औद्योगिक शहरें ह्यांवर ब्रिटिश विमानांचे हल्ले सारखे चालले आहेत आणि त्यांनीं शत्रूस सळोकीपळो करून सोडलें आहे. हा हल्ल्याचा जोर ह्याहिपेक्षां मोठ्या प्रमाणांत होणार असल्याचें मि. चर्चिल ह्यांनीं जाहीर करून मित्रराष्ट्रांचें वैर जाणूनबुजून पत्करण्यांत इटालिअन राष्ट्रावर आणलेल्या घोर आपत्तीचें माप त्यांनीं मुसोलिनीच्या पदरांत टाकलें आहे. त्यास उत्तर म्हणून आणि आपल्या लोकांच्या नष्ट झालेल्या उत्साहास फुंकून पुन्हां प्रज्वलित करण्याकरितां मुसोलिनीनें केलेलें भाषण वस्तुतः रडगाणेंच ठरलें आहे. आठरा महिन्यांचें आपलें मौन टाकून देऊन त्यानें उद्गार काढले आहेत त्यानें इटालिअन लोकांचा निरुत्साह कसा नाहींसा होणार ? हिटलर तरी त्याचें रक्षण कसें करणार ? विजयी ब्रिटिश विमानांच्या पल्ल्यांत इटली सहज येत असल्या कारणानें त्याचा नाश अपरिहार्य झाला आहे. इटलीच्या केविलवाण्या स्थितीस मुसोलिनी जबाबदार आहे ही गोष्ट स्पष्ट आहे. त्याच्या पूर्वीच्या बढाया कोणीकडे आणि सध्याचें रडगाणें कोणीकडे ? त्यास स्वतःचें लढाऊ सामर्थ्य उरलेलें नाहीं आणि सर्वस्वी हिटलरच्या तोंडाकडे पहाण्याचा प्रसंग आला आहे.

### गोकाक येथें फळझाडांच्या माहितीचा क्लास

हॉर्टिकल्चरल ऑफिसर रा. सा. दाणी ह्यांनीं गोकाक येथें ता. डे. असोसिएशनमार्फत भरविण्यांत आलेल्या फळझाडांचे माहितीचे वर्गास फळझाडें लावणें व त्याची उपयुक्तता ह्याविषयीं सर्व माहिती सांगितली. सदरहु वर्ग २३-११-४२ ते ३०-११-४२ अखेर चालू होता. वर्गाचें उद्घाटन गोकाक म्युनिसिपालिटीचे अध्यक्ष श्री. महालिंगपा स्वामी वंटमुरी ह्यांनीं केलें व समारोप रा. सा. पाटील, बी. ए. जी. मामलेदार, गोकाक तालुका ह्यांचे हस्तें झाला, त्यांचें भाषण अतिशय कळकळीचें असें झालें.

महायुद्ध दाराशीं आलें
परदेशी औषधें
दुर्मिळ व महाग झालीं
पण
भिण्याचें कारण नाहीं !!!
— कारण —
आयुर्वेद रसशाळा पुणें लि०
या देशी औषधाच्या प्रसिद्ध कारखान्यानें
तयार केलेलीं
● रक्तवर्धक, ● उपनाह,
● बालजीवन, ● कॅल्सीप्राल
इत्यादि पेटंट, स्टँडर्ड व लोकप्रिय औषधें खात्री पटल्यामुळें
★ डॉक्टर्सहि वापरूं लागले आहेत. ★
दरसाल बिनचूक नफा वाटणाऱ्या ह्या कंपनीचे
शेअर्स व औषधें मागवा.
आयुर्वेद रसशाळा पुणें लि०
मुख्य दुकान गणपति चौक, लक्ष्मी रोड, पुणें २.

## शिरपुर तालुक्यांतील सहकारविषयक कार्यक्रम

शिरपुर येथें रा. आर. एन. देशमुख, अमोदे यांचे अध्यक्षतेखाली तारीख २१ व २२-१०-४२ रोजीं तालुक्यांतील पुढारी व सर्व सोसायटयांचे सेकेटरी यांना सुपरवायझिंग युनियनच्या ऑफिसांत बोलावून धुळें येथील भरलेल्या ता. ५-६ रोजीं मे. आसि. रजिस्ट्रार साहेब ( मे. पाळेकर साहेब ) यांनीं बोलाविलेल्या जिल्हा कान्फरन्समधील जे ठराव झाले त्या ठरावांचें स्पष्टीकरण व कान्फरन्सनें ठरविलेल्या वसुलीचें व नवीन कर्जाचे वगैरेबाबतचें धोरण समजावून देण्यांत आलें. सदर सभेंत पुढाऱ्यांनीं तसेंच ता. २२ रोजीं सेकेटरींनीं मनमोकळेपणानें व खुल्या दिल्यानें चर्चा करून चालू वर्षाचें धोरण ठरविण्यांत आलें. शेतीच्या मालाची विक्री व पतपेढ्यांच्या सभासदांसाठी लागणाऱ्या मालाची खरेदी त्यांच्या व्यवस्थेकडे सोसायटींचे पंच विशेष लक्ष पुरवतील अशीं आश्वासनें मिळालीं. बरेच वर्षांपासून थंडावलेल्या सोसायटयांचे व्यवहारांस चालना देऊन वसूल जास्त झाला पाहिजे यासाठी कांहीं सोसायटींत नवीन सेकेटरींची नेमणूक केली आहे याचें महत्त्व पटवून देण्यांत आलें. सोसायटयांचीं कामें सुव्यवस्थित होणेस मदत या दृष्टीनें सेकेटरींच्या नोकरीस शाश्वती उत्पन्न करण्याचे दृष्टीनें तालुक्यांत ग्रुप सेकेटरीची पद्धत लागू करण्याचें सर्वानुमतें ठरलें.

या प्रसंगीं शिरपुर तालुक्यांतील सेकेटरींच्या संघाचा जीर्णोद्धार करण्यांत आला. असे संघ चालू राहिल्यास सेकेटरीच्या नोकरीची शाश्वती व इतर अडीअडचणींची दाद या संघाद्वारें मागतां येईल.

या कामीं युनियनचे दोन्ही सुपरवायझर्स रा. उपाचार्य व कुळकर्णी, बँक इन्स्पेक्टर्स रा. भडभडे व कुळकर्णी, सब-ऑडिटर रा. इनामदार यांनीं मेहनत घेऊन हातीं घेतलेले काम मतभेद न होतां निर्विघ्नपणें पार पडलें. उपस्थित असलेल्या पाहुण्यांचे युनियन सेकेटरी रा. उपाचार्य यांनीं आभार मानले.

शेवटीं अल्पहार, पानसुपारी होऊन सभा यशस्वी रीतीनें पार पडली.

### कपाशीच्या लागवडीचा अंदाज

कपाशीची लागवड चालू वर्षी गेल्या वर्षीपेक्षां १७% कमी झालेली आहे. लागवडीच्या क्षेत्राचे आकडे १६०३/४ लक्ष एकर ( १९४२-४३ ) व १९२३/४ लक्ष एकर ( १९४१-४२ ) असे आहेत. ह्या घटीचें प्रांतवार प्रमाण मुंबई-३१% मध्यप्रांत, वऱ्हाड ११%, पंजाब ६%, मद्रास ४%, सिंध २३% संयुक्त प्रांत १७%, हैद्राबाद ७%, असें आहे.


# न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.

( Approved Re-traders and Approved Contractors )

२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.

अध्यक्षः—श्री. ग. स. मराठे, ॲक्चुअरी.

**महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना**

★ गिरणीचे रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स
★ रीमोल्ड टायर्स ★ रबरी वाशर्स ★ सॉलिड व्हील्स

व इतर रबरी माल तयार होतो.

पु. ग. मराठे
मॅनेजिंग डायरेक्टर.

**महायुद्धाची जाणीव! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.**

गिरगांव मुंबई नं. ४

# महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

## अर्थशास्त्र

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे

पृष्ठसंख्या सुमारें ३००; किंमत ३ रुपये

या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

## श्रीराम सिल्क मिल्स लि., बंगलोर

[ कंपनीनें १९४१ अखेर ६ टक्के डिव्हिडंड वांटला आहे. ]

युद्धसाहित्यपुरवठा–खात्याची पॅरेशूटकरितां लागणाऱ्या

रेशमी कापडाची ऑर्डर पुरी करण्यासाठी लागणाऱ्या भांडवलाकरितां तूर्त एकूण रु. १ लक्षाच्या रकमेपर्यंत

# ठेवी घेणें आहेत

व्याजाचा दर ४॥ ते ६ टक्के. ठेव किमान रु. ५०० ची असावी. ठेवीवरील व्याज दर सहा महिन्यांनीं दिलें जातें.

श्रीराम सिल्क मिल्स लि., श्रीरामबाग, बसवनगुडी, बंगलोर.

**नारायण गोविंद नाईक,** ( माजी अध्यक्ष, म्हैसूर चेंबर ऑफ कॉमर्स ) मॅनेजिंग डायरेक्टर

आमच्या कारखान्यांतील माल मुंबईस बॉम्बे स्वदेशी को–ऑपरेटिव्ह स्टोअर्समध्यें व पुण्यास लक्ष्मी रोडवरील रे म्यूझिअमच्या व्यापार–संवर्धन–गृहांत पहा.




## मधुमेहावरील औषध

तीन आठवड्यांचे औषधास फक्त रु. ७

— मागविण्याचा पत्ता —

मॅनेजिंग डायरेक्टर, रूरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड.

९२३ ए, सदाशिव, पुणें २.

## वक्तशीर आणि मनपसंत काम करून देणारे

# मोहन वॉच कंपनी

रेग्युलेशन मोफत

कॉमनवेल्थ बिल्डिंगसमोर लक्ष्मी रोड, पुणें २.

## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

राहाणेची व भोजनाची उत्तम सोय




फोन नं. ७७९ गणपति चौक, व्यवस्थापक

## N. V. WADNERKAR

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver, Electro-plater & Manufacturer of Sporting Trophies, Medals, Cups etc.

- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -

POONA CITY.

## DECCAN BOOK STALL

**Booksellers, Publishers & Subscription Agents**

**Fergusson College Road, Poona No. 4**

(1) We stock and supply Educational books, General books & Library books.

(2) We supply Government of Bombay and Government of India publications.

(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.

(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 5434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
(टपाल हशील माफ)
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति। —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ८ पुणें, बुधवार, तारीख १६ डिसेंबर १९४२ अंक ४९

## दि बँक ऑफ इंडिया लि.

[स्थापना : १९०६]

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल ... ... ... | रु. २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... ... ... | रु. १,२०,००,००० |
| रिझर्व्ह फंड ... ... ... | रु. १,१८,००,००० |

मुख्य कचेरी: ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

मुंबईमधील शाखा : बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

इतर शाखा : अहमदाबाद ( भद्र, मुख्य ऑफिस ), अहमदाबाद ( एलिस ब्रिज शाखा ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अंधेरी ( मुंबई शेजारीं ), बांद्रे ( मुंबई शेजारीं ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस ), कलकत्ता ( बडा बझार ), कलकत्ता ( चौरंगी स्केअर ), जमशेदपूर, कराची, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत.

लंडन एजन्ट्स : वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

डायरेक्टर्स : सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई, सर जोसेफ के. नाईट, मि. ए. गेडिस, सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई., मि. दिनशा के. दाजी, श्री. रामनिवास रामनारायण.

करंट डिपॉझिट अकाउंट्स :

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० एकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षा कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमीचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

एजंटः—टी. आर. लालवाणी.

## दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

हेड ऑफिस : पुणें शहर.

स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.

मुंबअी शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबअी.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | : रु. १०,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | : रु. ५,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | : रु. २,५०,००० |
| एकूण खेळतें भांडवल | : रु. ४५,००,००० |

डायरेक्टर्स

प्रो. वा. गो. काळे, अध्यक्ष — श्री. मा. म. गुते

| | |
|---|---|
| श्री. धों. कृ. साठे | श्री. मा. रा. जोशी |
| श्री. म. म. पवार | श्री. श्री. गो. मराठे |
| श्री. त्र्यं. वि. रानडे | श्री. र. चिं. सोहोनी |
| श्री. वा. पु. वर्दे | मि. फ. दो. पदमजी |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदीविक्री कसोशीनें करून दिली जाते.

म. वि. गोखले
मॅनेजर.

महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

गिरगांव मुंबई नं. ४

## महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

कारण दाखविण्यास सांगण्याविषयी

# नोटीस

(सामान्य नमुना)

पुणें येथील स्मॉलकॉज जज्ज यांचे कोर्टांत

मुक्काम पुणें येथें नि. ११

किरकोळ अर्ज नं. १२७, सन १९४२ पैकीं.

कन्हयालाल पुरुषोत्तमदास } वादी.

विरुद्ध

मेसर्स गोपाळ आणि कंपनी, पुणें रविवार घ. नं. १७० दुसरा मजला सदर कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर डी. डी. गुप्ता यांस } प्रतिवादी.

दावा रु. २२/–

ज्यापेक्षां सदरीं लिहिलेला धी डिव्हिजनल इंजिनिअर, टेलिग्राफ पुणें यांनीं ह्या कोर्टास दरखास्त नंबर ३३१/४२ मध्यें जप्ती-खुलीचा अर्ज दिला आहे.

त्यापेक्षां यावरून तुम्हांस बजाविण्यांत येत आहे कीं, तारीख ९ माहे १ सन १९४३ रोजीं सकाळचे ११ वाजतां तुम्हीं सदरहू अर्जीविरुद्ध कारण दाखविण्यासाठीं ह्या कोर्टांत जातीनें, किंवा योग्य रीतीनें माहिती दिलेल्या प्लीडराच्यामार्फत, हजर व्हावें, व तसें तुम्हांकडून घडून न आल्यास, सदरहू अर्जीची एकतर्फी चौकशी होऊन निकाल केला जाईल.

तसेंच तुम्हांस अशीहि नोटीस देण्यांत येत आहे कीं, निर्दिष्ट केलेल्या तारखेस किंवा तिच्यापूर्वी बजावणीसाठीं पत्ता लिहून देण्यांत तुम्हीं कसूर केल्यास तुमच्या बचावाकडे लक्ष देण्यांत येणार नाहीं.

आज तारीख १० माहे १२ सन १९४२ रोजीं आमच्या सहीनिशीं व कोर्टाच्या शिक्क्यानिशीं दिली.

(शिक्का.)

व्ही. आर. मंगळवेढेकर,
स्मॉलकॉज कोर्ट, पुणें.

## विविध माहिती

### बँकांस सुटी

शनिवार, ता. १९ रोजीं बकरीदनिमित्त बँका बंद रहातील.

### निजाम सरकारचें बजेट

निजाम सरकारच्या बजेटांत येणारी तूट भरून काढण्याकरितां इनकमटॅक्स व सुपरटॅक्स बसविण्यांत येणार आहे, असें समजतें.

### लॉर्ड लिन्लिथगो

व्हाइसरॉय लॉर्ड लिन्लिथगो, ह्यांची मुदत ऑक्टोबर १९४३ अखेर वाढविण्यांत आली आहे. ब्रिटिश मंत्रिमंडळाच्या खास विनंतीवरून त्यांनीं येत्या ऑक्टोबरअखेर व्हाइसरॉय व गव्हर्नर जनरल म्हणून काम करण्यास संमति दिली आहे.

### जखमी जर्मन

स्टालिनग्राड येथें जखमी होणाऱ्या जर्मन सैनिकांस जर्मनींत न नेतां युगोस्लाव्हिया, ग्रीस, रुमेनिया ह्या देशांतील इस्पितळांत धाडविण्यांत येते.

### ट्रेझरी बिलांवर १ रु. ० आ. ५ पै व्याजाचा दर

गेल्या आठवड्यांत रिझर्व्ह बँकेनें हिंदुस्थान सरकारचीं १० कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. १ रु. ० आ. ५ पै इतका पडला.

### फ्रेंच इंडोचायनामधील फौज

फ्रेंच इंडोचायनामध्यें तेथील स्थानिक लोकांची फौज उभारण्याचें काम जपाननें चालविलें आहे. ह्या १½ लक्ष सैनिकांचा उपयोग चीनशीं लढण्याकडे केला जाईल.

### फ्रेंच सोनें जर्मनींत गेलें

बँक ऑफ फ्रान्सजवळील ४९ टन सोनें जर्मनीनें आगगाडीच्या डब्यांतून जर्मनींत नेलें. अशी बातमी प्रसिद्ध झाली आहे.

### पॅकिंगसंबंधीं संशोधन

शक्य तितक्या कमी जागेंत अधिकांत अधिक माल कसा भरतां येईल, ह्यासंबंधीं संशोधन करण्याकरितां इंग्लंडमध्यें एक योजना आंखण्यांत आली आहे. दरसाल १½ लक्ष रुपये तिचेवर खर्च होतील. पॅकिंगमध्यें अशा तऱ्हेनें सुधारणा झाल्यास वहातुकीचा प्रश्न सुटण्यास सहाय होईल.

### दररोज ७ हजारांची हानी

चालू युद्धांत दररोज ६ ते ७ हजार रशियन लोक कामास येतात, असें इंग्लंडमधील रशियन वकील मि. मैस्की हे नुकतेच म्हणाले.

### रबर

१९०१ सालापर्यंत जंगली रबराचें जागतिक उत्पादन ५४ हजार टन व मळ्यांतील रबराचें उत्पादन ४ टन होतें. २० वर्षांनीं मळ्यांतील रबराचें उत्पादन ३ लक्ष, २० हजार टनांवर गेलें व जंगली रबराचें उत्पादन १८ हजार टनांवर आलें. मळ्यांचें उत्पादन फाजील होऊं लागल्यावर त्याचें काय करावें हें कळेना. अनेक तऱ्हेच्या वस्तू बनवून त्यांचा उठाव करण्याचा प्रयत्न केला गेला. आतां मात्र रबरावांचून चालेनासें झालें आहे. एशियांत रबराचीं झाडें नव्हतीं. दक्षिण अमेरिकेंतील बीं नेऊन तें दक्षिण हिंदुस्थान, सिलोन, मलाया, स्टेट्स सेटलमेंट्स, सुमात्रा, जाव्हा, बोर्निओ इत्यादि देशांत पेरण्यांत आलें व तेथें रबराचे मळे करण्यांत आले. आफ्रिकेंतील दाट अरण्यांत रबराचीं जंगलीं झाडें आहेत त्यांच्यापासून रबर गोळा करण्याची खटपट रबर दुर्मीळ झाल्यामुळें आतां पुनः करावी लागत आहे.

### बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि.

घसारा व मॅनेजिंग एजंट ह्यांचें कमिशन या व्यतिरिक्त इतर सर्व खर्च वजा जातां अहवालाचे वर्षी ३०-९-४२ अखेर सिंडिकेटला ४,८१,९३१ रुपये नफा झाला. त्यांतून घसारा व मॅनेजिंग एजंट ह्यांस देणें असलेलें कमिशन वजा जातां निव्वळ नफा ३,७७,००३ रुपये रहातो. मागील ताळेबंदांतील सर्व तोटा (१,९३,५७९ रु.) लिहून टाकून करासाठीं ६५ हजारांची तरतूद करून व डिफर्ड रेव्हेन्यू खर्चाची बाकी (३४,२६३ रु.) पूज्य करून ऑर्डिनरी भागीदारांस ७½% डिव्हिडंड व २½% बोनस द्यावें अशी बोर्डाची शिफारस आहे. क्यु. प्रेफरन्स भागीदारांस ३० सप्टेंबर १९४१ अखेरचें ५% व ३० सप्टेंबर, १९४२ अखेरचें ५% असें दोन वर्षांचें डिव्हिडंड मिळेल.

अनुक्रमणिका

पृष्ठ
१ विविध माहिती ... ४०५
२ इंजिनिअर राज्यकर्ते झाले तर !
३ जर्मन नाझींची तत्त्वें व घोषणा ... ... ४०६
५ स्फुट विचार ... ४०७
व्यापारमंत्र्याची मुंबईस भेट–युनायटेड किंग्डम कमर्शिअल कॉर्पोरेशन–गरीबांसाठी स्वस्त कापड मिळू लागणार–मित्र राष्ट्रांचा वक्काई–भाजीपाल्याच्या लागवडीस प्रोत्साहन
५ विजेच्या परवान्यांतील नवीन अटी ... ४०८
६ सहकारी सोसायट्यांनीं धान्याचा साठा करण्याची योजना ... ... ४०९
७ ब्रिटिशांचें युद्धोत्तर व्यापारी धोरण ... ४०९

# अर्थ

बुधवार, ता. १६ डिसेंबर, १९४२

## इंजिनिअर राज्यकर्ते झाले तर !

मुंबईच्या इंजिनिअरांची वार्षिक परिषद् नुकतीच भरली होती, त्या प्रसंगीं अध्यक्षीय भाषण करतांना श्री. दप्तरी ह्यांनीं जागतिक शांतता व उन्नति साधण्यासाठीं आपल्या व्यवसायांतल्या लोकांनीं राज्यकारभारांत महत्त्वाचें स्थान मिळवून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय धोरणास प्रगतिकारक वळण लावावें असें सुचविलें. इंजिनिअरांच्या ज्ञानाचा व कलेचा उपयोग जनतेचें स्वास्थ्य व सुख ह्यांच्या संवर्धनार्थ व्हावयाचा असेल तर राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय धोरणाचीं राजकीय सूत्रें त्यांच्या हातीं असलीं पाहिजेत, निदान त्यांचें वजन ह्या धोरणाच्या निश्चितीवर पडलें पाहिजे, असा त्यांच्या भाषणाचा रोख होता. जुन्या वळणाच्या राज्यकर्त्यांच्या अमदानींत शस्त्रास्त्रांचें उत्पादन, युद्धें, बहुजन समाजाचें दारिद्र्य व दुःस्थिति ह्यांचेंच साम्राज्य चोहोंकडे असलेलें दिसतें. इंजिनिअर्स आज राजकारणापासून अलिप्त राहिले आहेत, त्यांनीं आपली बेफिकीरी सोडून स्वतःचें ज्ञान जनतेच्या उन्नतीसाठीं वेचण्याचें ठरवल्यास जगाचें हित होणार आहे असें श्री. दप्तरी ह्यांनीं प्रतिपादिलें.

उद्यां इंजिनिअरांचीं मंत्रिमंडळें सर्व देशांत स्थापन झालीं तर जग इकडचें तिकडे होईल ही त्यांची विचारसरणी सदोष आहे. यांत्रिक कला व भौतिक शास्त्रांतले आधुनिक शोध ह्यांचें ज्ञान जर्मनींत नाहीं म्हणून हिटलरनें प्रस्तुत युद्धाची आपत्ति जगावर आणली आहे असें नाहीं. त्याचप्रमाणें इंग्लंडसारख्या राष्ट्रांत बेकारी व कामकरी वर्गाची हलाखी आहे तिला कारण इंजिनिअरांच्या कलेचें अज्ञान किंवा मागसलेपणा हें नाहीं. लढाऊ विमानें, पाणबुड्या, बाँब हीं तर आधुनिक यांत्रिक कलेच्या प्रगतीचीं व उपयोगाचीं फळें आहेत. कोणत्याहि कलेचें ज्ञान आणि त्याचा सदुपयोग किंवा दुरुपयोग ह्या गोष्टी भिन्न आहेत. कोणत्याहि कलेचें तंत्र हें साधन आहे, त्याचा विनियोग कोणतें साधन हस्तगत करण्यासाठीं करावयाचा हा खरा प्रश्न आहे. राजकीय, राष्ट्रीय किंवा आर्थिक महत्त्वाकांक्षा व स्वार्थ ह्यांनीं प्रेरित झालेल्या पुढाऱ्यांच्या हातीं यांत्रिक कलेचें तंत्र असल्यानें तें अनिष्ट फलदायी होत आहे अशी आजची वस्तुस्थिति आहे. जागतिक पुनर्घटनेनें ही परिस्थिति बदलून टाकण्यांत आली पाहिजे आणि व्यक्तींचें व राष्ट्रांचें स्वातंत्र्य अबाधित राहून दारिद्र्य व भीति ह्यांचें उच्चाटन झालें पाहिजे हें उद्दिष्ट मित्रराष्ट्रांच्या बाजूनें पुढें मांडण्यांत येत आहे हें ह्याचकरितां होय.

मुंबईच्या परिषदेचें उद्घाटन करतांना श्री. कृपालानी ह्यांनीं ही गोष्ट स्पष्ट करून सांगितली. इंजिनिअर्स राजकारणांत पडले म्हणजे पृथ्वीवर स्वर्ग येऊन चोहोंकडे शांतता, सुराज्य, सुस्थिति ह्यांचें साम्राज्य होईल ही कल्पना निराधार आहे असें ते म्हणाले. जगांत अशा क्वचित् चांगल्या गोष्टी आहेत कीं, ज्यांचा दुरुपयोग करतां येणार नाहीं. विषाचा उपयोग तारक किंवा मारक होऊं शकतो असा अनुभव आहे. कोणत्याहि वस्तूचा सदुपयोग किंवा दुरुपयोग ती वापणाराच्या हेतूवर अवलंबून रहात असतो. हितावह साधनें अहितावह रीतीनें वापरणारे लोक सर्व देशांत व समाजांत आढळतात. अमूक एका वर्गांत सद्धेतुप्रेरितांचा भरणा असतो आणि इतरांत त्यांचा अभाव असतो असें म्हणतां येणार नाहीं. निसर्गाच्या शक्तींचा तलास करून मानवी सुखसोयींच्या संवर्धनास त्या कशा राबवतां येतील हें पहाणें व दर्शवणें हें इंजिनिअरिंगचा व्यवसाय करणारांचें कार्य आहे. राजकारणांत पडणाऱ्या लोकांचें काम ह्या व अशा इतर धंद्यांतल्या तज्ज्ञांच्या ज्ञानाचा व अनुभवाचा उपयोग समाजाच्या उत्कर्षाकडे करण्याचें आहे. प्रत्येक व्यवसायी वर्गानें स्वतःकडे आलेली सामाजिक कामगिरी बजवावयाची असते; आणि एकानें दुसऱ्याच्या उद्योगांत पडण्यानें परिस्थिति सुधारेल असें म्हणतां यावयाचें नाहीं. श्री. कृपालानी ह्यांनीं पुढें मांडलेली वरील आशयाची विचारसरणी चिंतनीय आहे. इंजिनिअरिंगसारख्या भौतिक शास्त्रांचा भर तंत्र आणि साधनें कार्यक्षम करण्यावर असतो. राजकारणशास्त्र व अर्थशास्त्र ह्यांस मानवी व सामाजिक ध्येयाकडे पहावयाचें असतें. भौतिक शास्त्रें व सामाजिक शास्त्रें ह्यांची गल्लत झाल्याकारणानें अनेक गैरसमज व चुकीचे सिद्धांत पसरले आहेत. निसर्गाचें दास्यत्व झुगारून देऊन मनुष्यांनीं बुद्धीचा उपयोग करून सहकार्याची कास धरावी ही तत्त्वज्ञानाची शिकवण येथें ध्यानांत आणण्यासारखी आहे.

यंत्रकला, उद्योगधंदे, व्यापार हीं मानवी सुखसोयींचीं साधनें आहेत आणि तीं व्यक्तींच्या उपयोगांत आणलीं जात असतां त्याचे परिणाम एकंदर समाज व मानवजात ह्यांचेवर काय होतील त्याकडे पहाणें आवश्यक आहे. भौतिक सुखाचे व्यतिरिक्त मनुष्यास इतर ध्येयें आहेत. त्यांच्या आड यंत्रकलेची प्रगति येते कीं काय आणि विशिष्ट वर्ग व राष्ट्रें ह्यांचा स्वार्थ इतर वर्ग व राष्ट्रें ह्यांस विघातक होतो कीं काय हें पहावें लागतें. जागतिक पुनर्घटनेच्या योजनांच्या मुळाशीं ही दृष्टि नसेल तर युद्धोत्तर काळांत शांतता व समता ह्यांची स्थापना होणें कठीण पडेल. सर बुइल्यम बीव्हरिज ह्यांनीं इंग्लंडच्या आर्थिक व सामाजिक पुनर्घटनेची योजना तयार केली आहे तिच्या बुडाशीं भौतिक साधनांच्या सहाय्यानें जनतेचें जीवित सुखमय व निर्भय करण्याविषयींचें ध्येयवादित्व आहे. असल्या योजनात्मक धोरणांत इंजिनिअरच काय पण इतर तंत्रज्ञ, वैद्य, शिक्षक इत्यादींसहि आपापली कामगिरी बजावली पाहिजे. आधुनिक काळांत भौतिक शास्त्रें सहायकारक असूनहि शांतता, सुख, समाधान ह्यांचा अभाव दृष्टीस पडतो त्याचें कारण ध्येयवादी "योजकस्तत्र दुर्लभः" हेंच आहे.

## जर्मन नाझींचीं तत्त्वें आणि धोरण

"म्हैसूर एकॉनॉमिक जर्नल" ह्या इंग्रजी मासिकाच्या संपादकांनीं हिटलरच्या "माझा झगडा" ह्या पुस्तकांतून कांहीं उतारे काढून त्यांच्या सहायानें जर्मन नाझी राज्यकर्त्यांच्या राजकीय व आर्थिक धोरणावर उत्कृष्ट प्रकाश पाडला आहे. सदरहु पुस्तक हा नाझींचा पवित्र ग्रंथ आहे असें समजलें पाहिजे. हिटलर तर त्यांचा गुरु आणि युगप्रवर्तक आहे. ह्या दृष्टीनें खालीं दिलेले उद्गार वाचकांस बोधप्रद होतील:—

(१) नाझी संघटन पार्लमेंटरी पद्धतीच्या राज्यव्यवस्थेविरुद्ध आहे. म्हणजे बहुमतानें कारभार चालण्यास तें प्रतिकूल आहे आणि लोकशाही त्यास मान्य नाहीं.

(२) नाझी पक्षास जर्मन वंशाच्या लोकांचें वरिष्ठत्व स्थापावयाचें आहे. आपल्या वंशाच्या मापानें इतर राष्ट्रांच्या महत्त्वाची किंमत ठरवतांना दलित समजल्या जाणाऱ्या देशांच्या स्थितीचा विचार करण्याचें आपणास कारण नाहीं, कारण हे देश रद्द आहेत असें हिटलर म्हणतो.

(३) नाझी पक्ष हिंदुस्थानच्या विरुद्ध आहे. इंग्लंड हिंदुस्थान कधींहि सोडणार नाहीं. प्रबळ शत्रूनें भाग पाडल्यावांचून व ह्या देशांत गोंधळ माजल्यावांचून इंग्लंडची सत्ता येथून हालणार नाहीं.

(४) नाझी पक्षास व्यक्तिस्वातंत्र्य मान्य नाहीं. जर्मन वंश टिकवणें हें त्याचें मुख्य ध्येय आहे आणि त्याचे मानानें व्यक्तीचें स्वातंत्र्य हें गौण आहे.

(५) वृत्तपत्रांच्या स्वातंत्र्याचें नाझींस वावडें आहे. वृत्तपत्रांच्या स्वतंत्र समजल्या जाणाऱ्या सल्ल्याच्या नादीं लागून राज्यकर्त्यांनीं भलत्याच मार्गानें जाऊं नये. लोकशिक्षणाच्या ह्या साधनाचें त्यांनीं कडक रीतीनें नियंत्रण केलें पाहिजे.

(६) समता व लोकमत हीं नाझींस नको आहेत. चालू राज्यपद्धति स्वतःच्या अवगुणांनीं आपला नाश करून घेत आहे. सर्वांस मतदानाचा अधिकार आणि समता हीं वैगुण्यें त्याज्य आहेत.

(७) अंकित राष्ट्रांविषयीं नाझी पक्षास सहानुभूति वाटत नाहीं. जग भेकड लोकांसाठी नाहीं आणि त्यांस दडपूनच टाकलें पाहिजे असें त्याचें मत आहे. उच्च संस्कृतीची प्रगति नीच लोकांच्या दास्यत्वावर उभारलेली आहे. जित लोक प्रथम जेत्यांचे दास बनले आणि नंतर हीच आपत्ति जनावरांवर आली. जर्मनीनें इतर राष्ट्रांस अंकित बनवण्याची आवश्यकता ह्या इतिहासावरून नाझी पक्ष सिद्ध करूं पहातो.

(८) मनगटाचा जोर हेंच अखेरचें तत्त्व नाझी पक्ष मानतो. त्याच्या मतें बचावापेक्षा हल्लाच निर्णायक असतो. अंगांत जोर नसेल तर जगांतील सर्व शहाणपण व्यर्थ आहे; युद्धावांचून शांतता नाहीं असा त्याचा सिद्धांत आहे.

(९) अनियंत्रित राजसत्ता आणि सर्वाधिकारी नेता हे नाझी धोरणाचे आधारस्तंभ आहेत. वरिष्ठ राजसत्तेवर सामान्य लोकांच्या मताचा किंचितहि निर्बंध असतां कामा नये ह्या तत्त्वावर हिटलरनें जर्मनीमध्यें सर्व राष्ट्रीय सत्ता स्वतःच्या मुठींत ठेवली आहे. तो एकटा जर्मनीचा शास्ता आहे. धर्मगुरु, राजा, सेनापति, मंत्री, न्यायाधीश सर्व कांहीं तोच आहे.

युरोपचीच नव्हे तर सर्व जगाची पुनर्घटना करण्याचा चंग हिटलर आणि त्याचे अंध भक्त ह्यांनीं बांधला आहे. त्यांची योजना अंमलांत आल्यास जगांतील लहान-मोठ्या सर्व राष्ट्रांवर हीनत्वाची, दास्याची व दारिद्र्याची केवढी आपत्ति कोसळेल ह्याची कल्पना नाझी पक्षाचें प्रत्यक्ष धोरण आणि त्याच्या मुळाशीं असलेलीं तत्त्वें वर संक्षिप्त रीतीनें दिलीं आहेत त्यांवरून सहज येईल.


विमेदार नि हवाई हल्ला

शत्रु राष्ट्राकडून हवाई हल्ला अगर तत्सम उपद्रव यापासून बिनलढाऊ नागरिकांच्या जीविताला येणाऱ्या धोक्याचा समावेश विमा पॉलिसीच्या अटींत होतो काय व त्यासाठी जादा प्रिमिअम भरावा लागेल काय ! असा प्रश्न साहजिकच नागरिकांमध्यें चर्चिला जात आहे.

ट्रस्ट ऑफ इंडिया

विमा कंपनीच्या

विमा पॉलिसीमध्यें हवाई हल्ल्यामुळें जीविताला होणाऱ्या अपायाचा अंतर्भाव होतो त्याकरितां जादा प्रिमिअम नाहीं.

तरी विलंब न लावतां—

तुमचा नि तुमच्या आप्तेष्टांचा विमा

ट्रस्ट ऑफ इंडिया

विमा कंपनींतच उतरा.

अध्यक्षः—श्रीमंत सरदार जगन्नाथ महाराज पंडित

माहितीपत्रकें विनामूल्य पाठवूं

ट्रस्ट ऑफ इंडिया विमा कं. लि. लक्ष्मी रोड, पुणें २ | वि. ह. देशमुख, बी. ए. जनरल मॅनेजर

महायुद्ध दाराशीं आलें

परदेशी औषधें

दुर्मिळ व महाग झालीं

पण

भिण्याचें कारण नाहीं !!!

— कारण —

आयुर्वेद रसशाळा पुणें लि०

या देशी औषधाच्या प्रसिद्ध कारखान्यानें तयार केलेलीं

● रक्तवर्धक, ● उपनाह,

● बालजीवन, ● कॅल्सीप्राल

इत्यादि पेटंट, स्टँडर्ड व लोकप्रिय औषधें खात्री पटल्यामुळें

★ डॉक्टर्सहि वापरूं लागले आहेत. ★

दूरसाल बिनचूक नफा वाटणाऱ्या ह्या कंपनीचे शेअर्स व औषधें मागवा.

आयुर्वेद रसशाळा पुणें लि०

मुख्य दुकान गणपति चौक, लक्ष्मी रोड, पुणें २.

## स्फुट विचार

### व्यापार मंत्र्यांची मुंबईस भेट

हिंदुस्थान सरकारचे व्यापारमंत्रि, श्री. एन. आर. सरकार, ह्यांनी गेल्या आठवड्यांत मुंबई शहरास भेट देऊन व्यापारी मंडळांशीं निकडीच्या प्रश्नांबाबतें मनमोकळेपणानें चर्चा केली. हिंदी व्यापार व उद्योगधंदे ह्यांच्या अडचणींची श्री. सरकार ह्यांस पूर्ण माहिती आहे, तेव्हां त्या अडचणी दूर करण्याचा व्यापार-मंत्रि कसून प्रयत्न करतील, अशी आशा इंडियन मर्चंट्स चेंबरचे अध्यक्ष, श्री. सेटलवाड, ह्यांनी व्यक्त केली. मुंबई प्रांतामधील धान्याचा तुटवडा किती तीव्र आहे, ह्याची कल्पना श्री. सरकार ह्यांस आली असून तो तुटवडा दूर करण्यासाठी इतर प्रांतांतून गहू व तांदूळ मिळविण्याचा प्रयत्न करण्याचें त्यांनी आश्वासन दिलें. पंजाबनें २० हजार टन गहू व सिंधनें ३० हजार टन तांदूळ देण्याचें कबूल केलें आहे व तो खरेदी करण्यासाठी मुंबई सरकारचा एक अधिकारी तिकडे रवाना होणार आहे, असें समजतें. हिंदुस्थानांत एकूण १० लक्ष टन इतक्या धान्याचा तुटवडा येणार असून ६ कोटि टनांच्या उत्पादनाचे मानानें ही तूट फार मोठी नाहीं. तथापि, ज्या प्रांतांत तुटवडा आहे, तेथें इतर प्रांतांतील धान्य उपलब्ध करून देण्याच्या पद्धतींत एकवाक्यता येणें आवश्यक आहे, हें श्री. सरकार ह्यांनीं मान्य केलें. हिंदुस्थानांतच धान्य अपुरें पडत असतांना तें बाहेर निर्गत करणें सयुक्तिक नाहीं, असें इंडियन मर्चंट्स चेंबरनें सांगितलें त्यांस श्री. सरकार ह्यांनीं उत्तर देतांना, इराक व इराण येथील आपल्या सैनिकांकरितांच व सिलोनची अगदीं तातडीची गरज भागविण्याकरितांच कांहीं धान्य बाहेर जाऊं दिलें जातें, असा खुलासा केला.

### युनायटेड किंग्डम कमर्शिअल कॉर्पोरेशन

युनायटेड किंग्डम कमर्शिअल कॉर्पोरेशनच्या व्यवहारासंबंधीं माहिती "अर्था"मध्यें मार्गेंच येऊन गेली आहे. ह्या ब्रिटिश संस्थेस मिळत असलेल्या खास सवलतींची यादी श्री. सेटलवाड ह्यांनीं श्री. सरकार ह्यांस सादर केली व अशाच तऱ्हेची हिंदी कंपनी हिंदी व्यापाऱ्यांच्या सहकार्यानें स्थापन करून यु. किं. क. कॉर्पोरेशनचा हिंदुस्थानांतील व्यवहार थांबविण्यांत यावा, असें त्यांनीं सुचविलें. रशियास मालाचा पुरवठा करणें, हेंच प्रस्तुत कॉर्पोरेशनचें सध्याचें मुख्य कार्य आहे; इराणला तिचेमार्फत फारच थोड्या वस्तूंची निर्गत होते; गेल्या सबंद वर्षांत तिनें गहू, खरेदी केलेला नाहीं; कॉर्पोरेशननें ब्रिटिश सरकारचे तर्फे इजिप्तला साखर पुरविली, त्याबाबत हिंदुस्थान सरकारला अधिकार नाहीं; इत्यादि हकीकत श्री. सरकार ह्यांनीं सांगून इतर व्यापारी संस्थांस मिळत नाहींत अशा कोणत्याच सवलती कॉर्पोरेशनला देण्यांत येत नाहींत, असें त्यांनीं आश्वासन दिलें. कॉर्पोरेशनच्या धर्तीवर परदेशांत माल निर्गत करण्यासाठी हिंदी संस्था काढण्याच्या प्रश्नाचा विचार मी केला, परंतु तो प्रयत्न सफल होण्याच्या मार्गांत बऱ्याच अडचणी आहेत, असें ते म्हणाले. युद्धानंतरच्या काळांत युनायटेड किंग्डम कमर्शिअल कॉर्पोरेशनचा कारभार हिंदी व्यापाऱ्यांच्या न्याय्य हितसंबंधांस बाधक होणार नाहीं, ह्या बेतानें तिचा व्यवहार नियंत्रित करण्यांत येईल अशा अर्थाचें आश्वासन ब्रिटिश सरकारकडून मिळविण्याचा प्रयत्न श्री. सरकार हे करणार आहेत.

### गरीबांसाठी स्वस्त कापड मिळूं लागणार

व्यापारमंत्र्यांनीं आपल्या मुंबईच्या मुक्कामांत धेगवेगळ्या हितसंबंधींच्या व्यापारी मंडळांचें म्हणणें ऐकून घेतलें व त्यांच्या अडचणी दूर करण्याचा प्रयत्न करण्याचें आश्वासन दिलें. गरीब व मध्यम वर्गाच्या उपयोगासाठी स्वस्त कापडाचा पुरवठा करण्याचा प्रश्न आज कित्येक महिने लोंबकळत पडला होता, तो व्यापारमंत्र्यांनीं निकालांत काढून, हें कापड तीन महिन्यांत मिळूं लागण्याची आशा उत्पन्न केली. टेक्स्टाइल ॲडव्हायसरी पॅनेलेची सभा मुंबईस भरली, तिला श्री. सरकार हे हजर राहिले. ह्या सभेनें तयार केलेली योजना गिरणीमालकांकडे धाडण्यांत येऊन, जानेवारींत त्यासंबंधींतील अखेरचा निर्णय जाहीर होईल. सध्याच्या योजनेप्रमाणें, धोतरें, साड्या व शर्टिंग हीं प्रत्येक तीन प्रकारचीं काढण्यांत येतील व गिरणीमालकांस व व्यापाऱ्यांस अगदीं थोडा नफा उरेल, अशा किंमतीस तीं विकण्यांत येतील. सबंध हिंदुस्थानांत एकाच ठराविक किंमतीस त्यांची विक्री केली जाईल व प्रत्येक तिमाहीस किंमत योग्य आहे किंवा नाहीं हें तपासून पाहून ती पुनः कमी-ज्यास्त करण्यांत येईल. हें कापड तयार करवून त्याची विक्री करण्याकरितां मुंबई येथें एक प्रातिनिधिक मंडळ स्थापन केलें जाईल. विक्रीचे कामीं लागणाऱ्या पैशाची व्यवस्था प्रांतिक सरकारांनीं करावी, किंवा त्यासाठीं योग्य कमिशन देऊन दलाल नेमण्यांत यावा, अशी तरतूद योजनेंत करण्यांत आली आहे. खेडोपाडींहि स्वस्त कापड उपलब्ध व्हावें, ह्यासाठी जिल्हानिहाय नागरिकांच्या प्रतिनिधींचीं मंडळें नेमण्यांत येतील. हें सर्व घडून येण्यास सहाजिकच कांहीं वेळ लागेल, तोवर वाट न पहातां हिंदुस्थान सरकारनें गिरणीवाल्यांस १½ कोटि वार कापडाची ऑर्डर दिली आहे. त्यांत मुंबई प्रांतासाठी २४ लक्ष वारांची मागणी अंतर्भूत आहे. स्वस्त कापड गिऱ्हाइकांच्या हातीं पडेपर्यंत अखेर महाग होऊं नये, ह्यासाठी सरकारास विशेष दक्षता बाळगावी लागेल व कापडाच्या उत्पादनाच्या प्रश्नापेक्षा त्याची किंमत चढूं न देणें हाच प्रश्न महत्त्वाचा होण्याचा संभव आहे.

### मित्रराष्ट्रांच्या चढाईची चढती कमान

रशिया, आफ्रिका व पॅसिफिक महासागर ह्या तिन्ही युद्धक्षेत्रांत जर्मनी व जपान ह्यांस हार खावी लागली असून त्यांच्या सैन्याची सारखी पिछेहाट चालली आहे. युद्धाच्या पहिल्या तीन वर्षांच्या अवधींत शत्रुराष्ट्रांची अप्रतिहत प्रगति होत गेली आणि तीं जणूं काय सर्वस्वीं अजिंक्य आहेत असा कांहीं काळ आभास उत्पन्न झाला. वास्तविक पहातां ह्या परिस्थितीचें कारण जर्मनीची अनेक वर्षांची पूर्वतयारी आणि जपाननें केलेला विश्वासघातकी हल्ला हेंच होतें. मित्रराष्ट्रांच्या लढाऊ बळास मूर्त स्वरूप मिळून तें एकवटलें असतां त्याच्या पुढें जर्मनी, इटली व जपान ह्यांची मात्रा चालावयाची नाहीं हें प्रथमपासूनच स्पष्ट होतें. ह्याची प्रचीति गेल्या दोन महिन्यांतल्या घडामोडींवरून आलीच आहे. युद्धसामुग्रीच्या बनावटीबाबत अमेरिकेचीं विधानें निव्वळ बढाया आहेत असें शत्रुराष्ट्रें भासवीत होतीं. आतां ह्या संबंधांतली अमेरिकन राष्ट्राची कामगिरी आश्चर्यकारक अशी प्रत्यक्ष कृतीवरूनच ठरली आहे. अमेरिकेनें स्वतःचे लक्षावधि सैनिक निरनिराळ्या रणक्षेत्रांवर पाठविले आहेत. एक वर्षांमागें मित्रराष्ट्रांस लढाऊ सामुग्री पुरवण्याचें तेवढें काम अमेरिकेकडे होतें. अलीकडे स्वतःच्या सैन्यास व मित्रराष्ट्रांच्या सैन्यासहि

शत्रूचें पुरवण्यांत यश मिळवलें आहे. आफ्रिकन व पॅसिफिक क्षेत्रांत अमेरिकन स्वतः लढत आहेत आणि त्यांनीं तेथें शत्रूस चांगला हात दाखवला आहे. उसनवारी पद्धतीनें अमेरिका मित्रराष्ट्रांस युद्धसामुग्री पुरवीत आहे तिच्या विषयींचा सातवा वृत्तांत प्रेसिडेंट रूझव्हेल्ट ह्यांनीं कॉंग्रेसला सादर केला त्यावरून अमेरिकन राष्ट्राच्या प्रचंड उत्पादनाची आणि युद्धसहायाची चांगली कल्पना येते. अमेरिकेच्या एकूण लढाऊ उत्पादनापैकीं पंधरा टक्के सामान सध्या मित्रराष्ट्रांस पुरवण्यांत येत आहे. ह्या सहायांपैकीं २१ टक्के सामुग्री ऑक्टोबर महिन्यांत रशियाकडे पाठवण्यांत आली. गेल्या वर्षांत रशियास दिलेला अमेरिकन माल पंचवीस लक्ष टन भरला. ब्रह्मदेशाहून चीनला जाणारा रस्ता जपाननें बंद केल्यामुळें हिमालयाच्या बाजूनें व आकाश मार्गानें लढाऊ सामान त्या देशास पुरवण्यांत येत आहे. वहातुकीच्या अडचणीमुळें हा पुरवठा मर्यादित झाला आहे परंतु तो वाढवण्याची खटपट चालू आहे असें प्रेसिडेंट रूझव्हेल्ट ह्यांनीं आपल्या वृत्तांतांत म्हटलें आहे. रशियन आघाडीवर जर्मन फौजांस स्वतःचा बचाव करतां करतां पुरेवाट झाली आहे; आणि तिकडील सबंद रणांगणावर रशियन सैन्यांनीं चढाईचें धोरण स्वीकारलें आहे. न्यूगिनीमध्यें जपानची पीछेहाट झपाट्यानें झाली असून त्याचा पाय कोठेंच टिकत नाहीं असें झालें आहे. अशा रीतीनें हिटलरच्या व त्याच्या मित्रांच्या दैवयोगास निश्चित ओहोटी लागली आहे. तरीहि शत्रु शेवटपर्यंत शिकस्तीनें लढल्यावांचून रहाणार नाहीं ह्याची जाणीव मित्रराष्ट्रांस आहे आणि त्यांनीं सावधगिरीनें व चिकाटीनें कार्य चालवलें आहे.

---

### भाजीपाल्याच्या लागवडीस प्रोत्साहन

पुणें, अहमदनगर व नाशिक ह्या तीन जिल्ह्यांत मिळून सुमारें ४७½ हजार एकर जमिनींत भाजीपाला लावण्यांत येतो. भाज्यांस लष्करी मागणी अतिशय मोठी असल्यामुळें व वहातुकीची अडचण भासत असल्याकारणानें भाज्यांचा तुटवडा भासत आहे. खात्रीलायक बीं मिळण्याचीहि पंचाईत पडते. भाज्यांची लागवड वाढून त्या अधिक प्रमाणांत उपलब्ध व्हाव्या, ह्यासाठी मुंबई सरकारनें एक योजना आखली आहे, तिचे अन्वयें वरील तीन जिल्ह्यांत मिळून आणखी ४ हजार एकर जमीन भाजीपाल्याखालीं येईल, असा अंदाज आहे. शेतकऱ्यांस भाजी लावण्यास प्रोत्साहन देण्याकरितां प्रचार करणें, त्यांस हरतऱ्हेचा सल्ला देणें, पाण्याची सोय करून देणें, बीं व खतें ह्यांसाठी तकावी कर्जें देणें, तयार भाजीच्या विक्रीची व्यवस्था करणें, इत्यादि बाबी सदरहू योजनेंत अंतर्भूत आहेत. भाजीची लागवड जवळजवळच्या शेतांत शक्य तों व्हावी, असा प्रयत्न केला जाईल. म्हणजे, त्या क्षेत्रास कालव्याचें पाणी वरचेवर देणें सोईचें पडेल.

---

### प्रोड्यूसर गॅस प्लँटच्या यशस्वितेची छाननी

युद्ध-वहातुक खात्याच्या अधिकाऱ्यांनीं गॅस प्लँट बसविलेली लॉरी मुंबई ते दिल्ली नुकतीच चालवून पाहिली. हा प्रवास ३½ दिवसांत पुरा करण्यांत आला व प्रत्यक्ष चाल ३६·८५ तास झाली. दर ताशी सरासरी वेग २५ मैल पडला. कोळसा भरण्यासाठी व प्लँट निवण्यासाठी प्रत्येक १०० मैलांस ४५ मिनिटें ह्या हिशेबानें ६·८५ तास लागले, ते मोजले असतां व मध्यें कांहीं वेळ गाडी मुद्दाम उभी केली, ती वेळ लक्षांत घेतां, एकूण पल्ला गाठण्यास ४३·७० तासांचा अवधि लागला. म्हणजे, दर ताशी वेग २१ मैलांवर आला. एकूण ९१५ मैलांचें अंतर तोडण्यांत आलें. प्रत्येक मैलास १½ पौंड कोळसा पुरला. प्रवास इगतपुरी, नाशिक, इंदूर, शिवपुरी, आग्रा, ह्या मार्गानें करण्यांत आला. घाटांतील रस्ते प्रोड्युसर गॅसवरच चढण्यांत आले. पेट्रोलवर चालणाऱ्या वेगवान गाडींतून प्रवास केला तरी, रात्रीं बरेच तास ती चालविल्याशिवाय, तीन दिवसांपेक्षा फार कमी वेळांत मुंबई ते दिल्ली हें अंतर तोडतां येत नाहींच.

---

### विजेच्या परवान्यांतील नवीन अटी

विजेच्या ग्राहकांच्या हिताचे दृष्टीनें आवश्यक अशा कांहीं नवीन अटींचा, वीजकंपन्यांस द्यावयाच्या परवान्यांत समावेश करण्याचें मुंबई सरकारनें सप्टेंबर, १९३८ मध्यें जाहीर केलें. ह्या अटींसंबंधींचें लोकमत लक्षांत घेऊन, तेव्हां जाहीर केलेल्या अटी आतां रद्द करण्यांत आल्या आहेत व खालील दुरुस्त अटी जाहीर करण्यांत येत आहेतः—

(१) सह्याय्य कंपनीच्या बोर्डावर एक डायरेक्टर नेमण्याचा अधिकार सरकारास राहील.

(२) कंपनीचे हिशेब तपासण्यास सरकार एकाद्या ऑडिटरची नेमणूक करील अथवा नेमणूक मान्य करील.

(३) कंपनी आपला कोणताहि लायसेन्स विजेचा धंदा करणाऱ्या कंपनीखेरीज इतर कोणासहि विकूं शकणार नाहीं. वीजपुरवठ्यासाठीच स्थापन झालेल्या कंपनीस मात्र मूळ पडलेल्या किंमतीस लायसेन्स देतां येईल.

(४) वीजपुरवठ्याच्या कामास येणाऱ्या अंदाजी खर्चाच्या २०% रकम सरकारजवळ अनामत ठेवल्याशिवाय लायसेन्स देण्यांत येणार नाहीं. काम पुरें होत येईल त्या प्रमाणांत ही रकम हप्त्याहप्त्यानें परत केली जाईल.

(५) सरकारास कंपनीची मालमत्ता विकत घेण्याचा अधिकार आहे, त्याचा, उपयोग लायसेन्स प्रथम दिल्यापासून ३० वर्षांनीं अगर त्यानंतर प्रत्येक १० वर्षांनीं सरकार करूं शकेल.

(६) कंपनीला लायसेन्स देण्यापूर्वी, कंपनी व तिचे मॅनेजिंग एजंट ह्यांचेमधील करार तपासण्याचा अधिकार सरकारास आहे. जरूर तर, त्या करारांत दुरुस्तीहि सरकार सुचवील.

(७) कंपनीला पडणाऱ्या दरापेक्षा स्वस्त दरानें तिला विजेचा पुरवठा दुसरीकडून होऊं शकला तर तिनें त्याचा फायदा घेतला पाहिजे व त्यामुळें कंपनीचा खर्च ज्या प्रमाणांत कमी होईल, त्या प्रमाणांत गिऱ्हाइकांस पडणारा दरहि कमी करण्यांत आला पाहिजे.

(८) कंपनीला जे दर आकारण्याचा परवाना दिला असेल, ते पुढें कमी करण्याचा अधिकार सरकारास राहील.

(९) जास्तींत ज्यास्त दोन उमेदवार शिक्षणासाठी ठेवून घेणें कंपनीवर बंधनकारक राहील.

---

## सहकारी सोसायट्यांनीं धान्याचा सांठा करण्याची योजना

तारीख २२-११-४२ रोजीं मे. रजिस्ट्रार, को. सो., मुंबई इलाखा, यांचे अध्यक्षतेखालीं नासिक जिल्ह्यांतील सर्व प्रमुख सहकारी कार्यकर्त्यांची एक सभा भरून तीमध्यें खेडेगांवांत उत्पन्न होणाऱ्या धान्यापैकीं गांवाला स्वतःच्या उपयोगासाठी लागणाऱ्या धान्याचा साठा गांवांतच कसा करतां येईल याबाबतच मुंबई सरकारनें जी योजना आखली आहे तिच्यावर विचार-विनिमय होऊन, ती योजना स्वीकारावी असें सर्वानुमतें ठरलें. सदर योजनेंतले मुख्य मुद्दे खालीं दिले आहेतः—

१ ही योजना तूर्त दोन वर्षें अंमलांत यावयाची आहे.

२ शेतकऱ्यांना आपल्या स्वतःस लागणारा माल देखील स्वतः-जवळ साठविणेची ऐपत नसते व गांवामध्यें एकत्र माल करणारे व्यापारी आढळत नाहींत. म्हणून गांवांतला माल बाजारपेठेंत जातो व परत गावाचे उपयोगासाठी तो तेथून आणावा लागून वाहातुकीचा खर्च विनाकारण वाढतो.

३ चांगल्या रीतीनें चाललेल्या शेतकी पतपेढ्या अथवा मल्टी-परपज् सोसायट्या यांना या परिस्थितींत मदत करतां येईल.

४ अशा सोसायट्यांमधून सभासदांनीं आपला सर्व माल साठवावा—निदान स्वतःच्या जरूरीपुरता माल तरी पुढील हंगामा-पर्यंत साठवून ठेवावा. सोसायट्यांनीं गांवांतच सोईस्कर कोठा घेऊन माल साठवून त्याची किल्ली आपणाजवळ ठेवावी.

५ सोसायट्यांनीं या मालाच्या तारणावर बाजारभावाच्या अदमासे ६० टकेपर्यंत माल सांठविणाऱ्यास उचल द्यावयाची. या उचलींतून त्यानें शेतसारा, पाणीपट्टी, सोसायटीची बाकी फेडावी किंवा मेंबराची इच्छा असल्यास सोसायटीनें मेंबराचे वतीनें या रकमा फेडाव्यात.

६ पुढच्या वर्षाची पत मंजूर झाली म्हणजे वाटल्यास मेंबरानें आपला माल विकावयास घेऊन जावा, अथवा स्वतःचे उपयोगा-साठीं न्यावा.

७ हें काम करणेसाठी जादा नोकरवर्ग ठेवावा लागेल त्याचा खर्च भागविणेसाठी अशा सोसायटीस जो खर्च येईल त्यांतील निम्मा अथवा रुपये १५०/– यांपैकीं जी रक्कम कमी असेल तेवढी सरकारनें ग्रँट म्हणून द्यावी, या खेरीज जेवढ्या किंमतीचा माल साठविला असेल त्या किंमतीवर शेकडा १ टका अगर रुपये ५०/– यांपैकीं जी रक्कम कमी असेल तेवढी सरकारनें साठविणेचा विमा उतरणेचा खर्च म्हणून द्यावी.

८ मालाचा विमा उतरण्यांत येईल.

९ मल्टीपरपज सोसायट्यांना नोकरवर्गाच्या खर्चासाठी सर-कार सध्या ग्रँट देतच आहे म्हणून या कामासाठीं जादा ग्रँट देण्याची जरूरी नाहीं परंतु वर लिहिलेप्रमाणें शेकडा १ टका अथवा रु ५०।– एवढी रक्कम विमा वगैरेकरितां मिळेल.

१० चांगल्या रीतीनें चाललेल्या सेल सोसायट्यांना मदतीची आवश्यकता असून देखील रु. १५०।– पर्यंत मे. रजि-स्ट्रार सो. यांना जरूर वाटल्यास ग्रँट देण्यास हरकत नाहीं. सेल सोसायट्यांना कदाचित् एकादा जादा कारकून ठेवावा लागेल किंवा सर्व वर्षभर कोठे अंगावर ठेवावे लागतील म्हणून ही ग्रँट कदाचित रु. २००।- पर्यंत वाढण्याचा संभव आहे. सेंट्रल बँक अथवा पैसे पुरविणारी बँका स्वतः अगर आपल्या शाखेमार्फत धान्याच्या तारणावर कर्ज देण्याचें काम करील तर त्यांना देखील रु. २००।– पर्यंत ग्रँट देण्यास हरकत नाहीं. या कामासाठी त्यांना कदाचित उपशाखा उघडाव्या लागतील. त्यांना ग्रँट देण्याची पूर्वीची योजना सुद्धां अंमलांत असेल.

११ मालाच्या संरक्षणाची काळजी वाटत असेल अथवा लुटमारीसारखा धोका वाटत असेल तर तालुक्याच्या गांवीं अगर जेथें पोलिस संरक्षण मिळूं शकेल अशा मोठ्या गांवीं माल साठवून ठेवावा.

१२ ही योजना प्रथम निवडक पतपेढ्या, मल्टीपरपज् सोसा-यट्या, सेल सोसायट्या, बँका आणि त्यांच्या शाखा एवढ्यापुरती मर्यादित राहील.

१३ जरूर त्या ठिकाणीं हें काम करणेसाठीं पोटनियमांत दुरुस्ती करावी लागेल.

१४ एकाद्या सोसायटीस या कामाकरितां गोडाउनची जरूरी असेल तर तें बांधणेसाठी रु. २,०००।– पर्यंत सरकारी कर्ज मिळेल.

१५ जे शेतकरी इतर क्रेडिट सोसायटीचे सभासद नसतील अशा शेतकऱ्यांना मल्टीपरपज् सोसायट्यांनीं या कामाकरितां तात्पुरते सभासद करून घ्यावें.

१६ मालाचा साठा केव्हां विकावयाचा हें मे. रजिस्ट्रार सो. वेळोवेळीं ठरवितील.

## ब्रिटिशांचें युद्धोत्तर व्यापारी धोरण

### निर्गत वाढविली पाहिजे

"ब्रिटिश कापडाच्या गिरणीवाल्यांस त्यांच्या भवितव्याबद्दल काळजी वाटणें स्वाभाविक आहे. युद्ध जिंकल्यावर आपणांस स्तब्ध बसून चालणार नाहीं. युद्धोत्तर काळांत निर्गत व्यापारास विशेष महत्त्व प्राप्त होईल. आपलें परराष्ट्रीय देणें भागविण्यास पुरेल इतकी निर्गत चालू ठेवणें सोपें जाणार नाहीं. अन्नसामुग्री व कच्चा माल ह्यांची आपली आयात मोठ्या प्रमाणावर चालू राहील व आयात आणि निर्गत ह्यांचेमधील खड्डा भरून काढण्यासाठी कापडाच्या गिरण्यांनीं पुढें आलें पाहिजे. आपल्या मालास बाहेर मागणी असण्यावरच आपला निर्गत व्यापार अवलंबून राहील. हा आंतरराष्ट्रीय स्वरूपाचा प्रश्न असला तरी तो सोडवण्यांत आपण पुढाकार घेतला पाहिजे. मंदीमधील काळांतील गोष्टींची पुनरावृत्ति होणार नाहीं व आपल्या सर्व गिरण्या चालू रहातील अशी व्यवस्था केली पाहिजे. उत्पादन शक्तीइतकें गिऱ्हाईक मिळवलें पाहिजे; खपाइतकें उत्पादन मर्यादित करण्याची पाळी येतां कामा नये. उद्योगधंद्यांची सर्वां-गीण वाढ झाली म्हणजेच बेकारीचा प्रश्न सुटेल. ह्या सर्व बाब-तींत कापडाच्या गिरण्यांनीं पुढाकार घेतला पाहिजे." प्रेसिडेंट ऑफ दि बोर्ड ऑफ ट्रेड, मि. ह्यू डाल्टन, ह्यांचें मँचेस्टर येथील भाषण.

## अर्थशास्त्र

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. दृ. गो. कर्वे

पृष्ठसंख्या सुमारें ३००; किंमत ३ रुपये

या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

## श्रीराम सिल्क मिल्स लि., बंगलोर

[ कंपनीनें १९४१ अखेर ६ टक्के डिव्हिडंड वांटला आहे. ]

युद्धसाहित्यपुरवठा–खात्याची पॅरेशूटकरितां लागणाऱ्या

रेशमी कापडाची ऑर्डर पुरी करण्यासाठी लागणाऱ्या भांडवलाकरितां तूर्त एकूण रु. १ लक्षाच्या रकमेपर्यंत

# ठेवी घेणें आहेत

व्याजाचा दर ४॥ ते ६ टक्के. ठेव किमान रु. ५०० ची असावी. ठेवीवरील व्याज दर सहा महिन्यांनीं दिलें जातें.

श्रीराम सिल्क मिल्स लि., श्रीरामबाग, बसवनगुडी, बंगलोर.

नारायण गोविंद नाईक, ( माजी अध्यक्ष, म्हैसूर चेंबर ऑफ कॉमर्स ) मॅनेजिंग डायरेक्टर

आमच्या कारखान्यांतील माल मुंबईस बॉम्बे स्वदेशी को–ऑपरेटिव्ह स्टोअर्समध्यें व पुण्यास लक्ष्मी रोडवरील रे म्युझिअमच्या व्यापार–संवर्धन–गृहांत पहा.

राहाणेची व भोजनाची उत्तम सोय




फोन नं. ७७९ गणपति चौक, व्यवस्थापक

## N. V. WADNERKAR

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver, Electro-plater & Manufacturer of Sporting Trophies, Medals, Cups etc.

- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -

POONA CITY.




# मधुमेहावरील औषध

तीन आठवड्यांचे औषधास फक्त रु. ७

—मागविण्याचा पत्ता—

मॅनेजिंग डायरेक्टर, रूरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड.

९२३ ए, सदाशिव, पुणें २.

## DECCAN BOOK STALL

Booksellers, Publishers & Subscription Agents

Fergusson College Road, Poona No. 4

(1) We stock and supply Educational books, General books & Library books.

(2) We supply Government of Bombay and Government of India publications.

(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.

(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.

वक्तशीर आणि मनपसंत काम करून देणारे

# मोहन वॉच कंपनी

रेग्युलेशन मोफत

कॉमनवेल्थ बिल्डिंगसमोर लक्ष्मी रोड, पुणें २.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

' अर्थ एव प्रधान ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ८ पुणें, बुधवार, तारीख २३ डिसेंबर १९४२ अंक ५०

**महायुद्ध दाराशीं आलें**
**परदेशी औषधें**
**दुर्मिळ व महाग झालीं**
पण
**भिण्याचें कारण नाहीं !!!**
— कारण —
**आयुर्वेद रसशाळा-पुणें लि०**
या देशी औषधाच्या प्रसिद्ध कारखान्यानें
तयार केलेलीं

● रक्तवर्धक, ● उपनाह,
● बालजीवन, ● कॅल्सीप्राल

इत्यादि पेटंट, स्टँडर्ड व लोकप्रिय औषधें खात्री पटल्यामुळें
★ डॉक्टर्सहि वापरूं लागले आहेत. ★
दरसाल बिनचूक नफा वाटणाऱ्या ह्या कंपनीचे
शेअर्स व औषधें मागवा.

**आयुर्वेद रसशाळा पुणें लि०**
मुख्य दुकान गणपति चौक, लक्ष्मी रोड, पुणें २.

## दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

हेड ऑफिस : पुणें शहर.
स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.
मुंबअी शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबअी.

अधिकृत भांडवल : रु. १०,००,०००
विक्रीस काढलेलें व खपलेलें
भांडवल : रु. ५,००,०००
वसूल झालेलें भांडवल : रु. २,५०,०००
एकूण खेळतें भांडवल : रु. ४५,००,०००

**डायरेक्टर्स**

प्रो. वा. गो. काळे, अध्यक्ष — श्री. मा. म. गुते
श्री. धों. कृ. साठे — श्री. मा. रा. जोशी
श्री. न. ग. पवार — श्री. श्री. गो. मराठे
श्री. त्र्यं. वि. रानडे — श्री. र. चिं. सोहोनी
श्री. वा. पुं. वर्दे — मि. फ. दो. पदमजी

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदीविक्री कसोशीनें करून दिली जाते.

म. वि. गोखले,
मॅनेजर.

महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

गिरगांव मुंबई नं. ४

# महिंद्रकर ब्रदर्स
## तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

# विविध माहिती

### नागपूरमध्यें बस सर्व्हिस

नागपूरमध्यें मोठ्या प्रमाणावर बस सर्व्हिस सुरू होणार आहे. मेकॅनिकल ट्रॅन्स्पोर्ट लि. त्याची व्यवस्था पहाणार आहे. तूर्त दोन बसेस चालू आहेत; त्यांची संख्या वीसपर्यंत वाढविण्यांत येईल.

### लंडनमधील मशीद

मशिदीसाठी सरकारनें लंडनमध्यें जागा दिली आहे, तिचेवर बांधण्यांत यावयाची मशीद एकाद्या विशिष्ट देशांतील मुसलमानांसाठी आहे कीं ती जगांतील सर्व मुसलमानांतर्फे बांधण्यांत येणार आहे, असा प्रश्न ब्रिटिश कॉमन्स सभेंत विचारण्यांत आला, त्यास वसाहत सेक्रेटरींनीं उत्तर दिलें. "हा प्रश्न मुख्यतः लंडन मशीद कमिटीचा आहे. परंतु जगांतील सर्व मुसलमानांच्या सहकार्याची याचना करण्यांत येईल असें समजतें" असा त्यांनीं खुलासा केला.

### ट्रेझरी बिलांवर १ रु. ० आ. ११ पै व्याजाचा दर

रिझर्व्ह बँकेनें गेल्या आठवड्यांत हिंदुस्थान सरकारचीं ६ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. १ रु. ० आ. ११ पै इतका पडला.

### राशियांत कृत्रिम रबर कसें करतात ?

राशियांत कृत्रिम रबर कसें करतात, हें पहाण्याकरितां चार अमेरिकन तज्ज्ञांचें एक मंडळ राशियास भेट देणार आहे.

### अमेरिकेचें राष्ट्रीय उत्पन्न

चालू वर्षी अमेरिकेंतील लोकांचें एकूण उत्पन्न १३० अब्ज डॉलर्स भरेल व त्यांपैकी एक चतुर्थांश रकम मध्यवर्ती व प्रांतिक सरकारांचे आणि म्युनिसिपॅलिट्यांचे कर ह्यांचे स्वरूपांत वसूल केली जाईल, असा फेडरल रिझर्व्ह बोर्डाचा अंदाज आहे.

### १९२ इंजनांसाठी ५३/४ कोटि रुपये

१९४३-४४ मध्यें हिंदी रेल्वेजना १०० ब्रॉड गेजचीं व ९२ मीटर गेजचीं इंजनें मिळूं शकतील व त्यांसाठी ५३/४ कोटि रुपयांची तरतूद करावी लागेल.

### हिंदी रेल्वेजचें वाढतें उत्पन्न

| १ एप्रिल, ते ३० नोव्हेंबर | रु. |
|---|---|
| १९४२ | ९२ कोटि, ७१ लक्ष |
| १९४१ | ८२ कोटि, १० लक्ष |

### दारुबंदीमुळें विणकर वाचले

"सध्याच्या परिस्थितींत सूत व रंग ह्यांचे भाव कमालीचे हेलकावे खात आहेत. विणकऱ्यांत दारूचें व्यसन अतिशय मोठ्या प्रमाणावर आढळतें. तेव्हां आज जर दारूबंदी नसती, तर विणकऱ्यांची स्थिति केविलवाणी झाली असती" असा मद्रास प्रांताच्या अबकारी खात्याचा रिपोर्ट आहे.

### रोमेलला पकडणारास १० हजार पौंड

उत्तर आफ्रिकेच्या किनाऱ्यावर रोमेलचा पाठलाग करीत असलेल्या एका अधिकाऱ्यास मि. चार्लस ली ह्यांनीं तार करून, रोमेलला जिवंत अगर मेलेला पकडला तर १० हजार पौंड देऊं केले आहेत. ही रकम पाठलाग करणाऱ्या पलटणीस मिळावयाची आहे.

### तांदळाच्या उत्पादनाचा अंदाज

चालू वर्षांतील मुंबई प्रांतांतील तांदळाचें उत्पादन २ कोटि, २९३/४ हंड्रेडवेट भरेल, असा सरकारी अंदाज आहे. म्हणजे, गेल्या वर्षांचे मानानें उत्पादन ४१·४% अधिक होईल. जून आणि ऑगस्ट ह्यांचे दरम्यान लावलेल्या भाताचे माहेतीवर हा अंदाज आधारलेला आहे.

### प्रोड्यूसर गॅसवर चालणाऱ्या मोटारगाड्या

प्रोड्यूसर गॅसवर चालणाऱ्या वहानांची संख्या ग्रेटब्रिटनमध्यें लवकरच १० हजारांवर जाईल, असें मागें प्रसिद्ध झालें होतें. अद्याप २ हजारांवर त्यांची संख्या गेलेली नाहीं, परंतु लवकरच त्यांत भर पडेल.

### असोसिएटेड सिमेंट कं. लि.

वरील कंपनीनें ३१ जुलै, १९४२ अखेरच्या वर्षाचें ८% दरानें डिव्हिडंड जाहीर केलें आहे.

### निजाम सरकारच्या रुपयावाल्या नोटा

निजाम सरकार एक रुपयावाल्या चलनी नोटा काढणार आहे व चांदीच्या रुपयाचे जागीं कमी चांदीचे रुपये प्रसृत करणार आहे.

### हिंदुस्थान सरकारचा वाढता युद्धखर्च

| एप्रिल ते ऑक्टोबर | रुपये |
|---|---|
| १९४२ | १०२,२५,००,००० |
| १९४१ | ४८,२५,००,००० |

### केसर शुगर वर्क्स लि.

वरील कंपनीच्या कारखान्यास जुलै, १९४२ अखेरच्या वर्षी २,६१,४३३ रुपये नफा झाला. भागीदारांस ८० रुपयांच्या प्रत्येक भागावर ७ रु. ८ आ. करमाफ डिव्हिडंड मिळालें.

### बॉंबे सेफ डिपॉझिट कं. लि.

३० सप्टेंबर १९४२ अखेरच्या वर्षी वरील कंपनीस ५८,०१८ रुपये नफा झाला. भागीदारांस २०० रुपयांच्या प्रत्येक भागावर कर माफ २० रुपये डिव्हिडंड मिळालें.

### आय. सी. एस. मधील जागा

जानेवारी, १९४३ नंतर आय. सी. एस. मधील सर्व जागा युद्धविषयक नोकरी करणाऱ्या उमेदवारांसाठी राखून ठेवण्यांत येणार आहेत.

### ज्यू लोकांची कत्तल

युगोस्लाव्हियावर जर्मनीनें स्वारी केल्यापासून त्यानें युगोस्लाव्हियांतील ८६ हजार ज्यूपैकीं ८५ हजारांना ठार केलें आहे, अशी माहिती प्रसिद्ध झाली आहे.

### सी. पी. रेल्वेज कं. लि.

सप्टेंबर, १९४२ अखेर संपलेल्या वर्षाचें ४% डिव्हिडंड वरील कंपनीनें जाहीर केलें आहे. गेल्या वर्षापेक्षा हें डिव्हिडंड १/२ % नें कमी आहे.

### मध्यवर्ती सरकार विरुद्ध मद्रास सरकार

मद्रास प्रांतांत तयार होणाऱ्या मालाचे पहिल्या विक्रीवर कर बसविण्याचा अधिकार मद्रास प्रांतिक सरकारास नाहीं, म्हणून तो १९३९ च्या त्या संबंधींतील कायदा लागू होऊं शकत नाहीं; ही कराची बाब मध्यवर्ती सरकाराचे कक्षेंतील आहे, ह्या मुद्यावर हिंदुस्थान सरकारानें मद्रास सरकारविरुद्ध फेडरल कोर्टांत दावा लावला आहे. जानेवारी, १९४३ मध्यें दाव्याचें काम सुरू होईल.

## अनुक्रमणिका

| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | ४१२ |
| २ " वालचंद " | ४१३ |
| ३ बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट | ४१४ |
| ४ कै. आण्णासाहेब वर्तक | ४१४ |
| ५ स्फुट विचार ... फ्रान्स आणि फ्रेंच वसाहती–दिल्लीची अन्न पुरवठा परिषद्—चलन आणि बाजारभाव—मालाचा पुरवठा व सरकारी नियंत्रण–ब्रिटिश धंदेवाल्यांचा दृष्टिकोन | ४१५ |
| ६ पत्नीच्या मृत्युपत्रास पतीची संमति | ४१६ |
| ७ कृत्रिम रबर | ४१७ |

# अर्थ

बुधवार, ता. २३ डिसेंबर, १९४२

## " वालचंद "

२३ नोव्हेंबर, १९४२ रोजीं श्री. वालचंद हिराचंद ह्यांस ६१ वें वर्ष लागलें, त्या निमित्तानें वालचंद डायमंड ज्युबिली सेलिब्रेशन कमिटीनें त्यांस, त्यांच्या कार्याची माहिती थोडक्यांत एकत्रित करून त्याचें राष्ट्रीय महत्त्व वर्णन करणारा एक ग्रंथ "वालचंद" तयार करून समर्पण केला. श्री. वालचंद ह्यांनीं केलेल्या सर्व प्रमुख उपक्रमांची माहिती त्यांत दिली आहे, त्यावरून शेटजींचें व्यक्तित्व, त्यांची धडाडी, त्यांची कुशाग्र बुद्धिमत्ता, हीं तर दिसून येतातच. परंतु, त्याबरोबरच हिंदी आर्थिक व औद्योगिक प्रगतीचा व धोरणाचा ताजा इतिहासहि त्यांत एकत्र आढळतो.

श्री. वालचंद ह्यांचें घराणें दिगंबर जैन असून ते ८० ते १०० वर्षांपूर्वी उत्तर हिंदुस्थानांतून दक्षिणेकडे आलें. त्यांतील कुटुंबें फलटण, अक्कलकोट, उस्मानाबाद, बारामती, पुणें, सोलापूर, पंढरपूर, इत्यादि ठिकाणीं स्थायिक झालीं. श्री. वालचंद ह्यांचे आजोबा शेठ नेमचंद दोशी हे सोलापूर येथें व्यापार करीत असत. ह्या घराण्यांतील सर्व पुरुष महाराष्ट्रीय पद्धतीनेंच पोषाक करतात व मराठीच भाषा बोलतात. श्री. वालचंद हे आपले हिशेब मोडींत ठेवतात व खासगी पत्रव्यवहार मोडींतच करतात, इतके ते महाराष्ट्रीय आहेत. त्यांचें शिक्षण बी. ए. पर्यंत झालें. त्यांचे दोघे वडील बंधू प्लेगनें निवर्तल्यामुळें, त्यांस पदवी घेण्यापूर्वीच शिक्षण सोडणें भाग पडलें व त्यांनीं आपल्या वडिलांच्या पेढींत काम करण्यास प्रारंभ केला. पेढीच्या कामांत लवकरच ते प्रवीण झाले. व्यापार व सावकारी व्यवसाय हीं त्यांच्या धडाडीस व महत्त्वाकांक्षेस पुरेशीं वाटेनाशीं झालीं व ते कॉन्ट्रॅक्टच्या धंद्यांत पडले. सोलापूर येथील रेल्वे इंजिनिअरच्या कचेरींतील श्री. एल. बी. फाटक, ह्यांनीं बार्शी लाइट रेल्वेचें येडशी–तडवळ ह्या सात मैलांच्या फाट्याचें काम घेतलें होतें व त्यांस भांडवलवाला भागीदार हवा होता.

श्री. वालचंद व श्री. फाटक ह्यांची १९०५ सालीं भागीदारी जमली व ह्यांतच शेटजींच्या पुढील अवाढव्य कार्याचा पाया घातला गेला. १९१५ सालीं ह्या भागीदारीचें लिमिटेड कंपनींत रूपांतर झालें. फाटक अँड वालचंद लि. मधून श्री. फाटक प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें १९१७ सालीं निवृत्त झाले. कंपनीच्या २ लक्ष ५५ हजार रुपयांच्या वसूल भांडवलावर २१ वर्षांत भागीदारांस डिव्हिडंडचे रूपानें ८,३४,९५५ रुपये मिळाले. म्हणजे वसूल भांडवलावर दरसाल सरासरीनें १५½% व्याज पडलें. १९२० सालीं टाटांच्या निमंत्रणावरून श्री. वालचंद हे टाटा कन्स्ट्रक्शन कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर झाले. पहिल्याच वर्षी श्री. वालचंद ह्यांनीं कंपनीसाठी मार्सलंड प्राइस ॲण्ड कंपनीचे बहुसंख्य भाग मिळवून दिले. ह्यूम पद्धतीनें क्रॉंकीटचे नळ करण्याचें पेटंट त्यांनीं मिळवून हा नवीन धंदा सुरू केला. १९३० सालीं टाटा कन्स्ट्रक्शन कंपनी श्री. वालचंद ह्यांचे ताब्यांत आली. १९३५ सालीं त्यांनीं तिचें नवें नांव प्रीमिअर कन्स्ट्रक्शन कंपनी लि. असें ठेवलें. तिला जोडून हिंदुस्थान कन्स्ट्रक्शन कं. लि., इंडियन ह्यूम पाइप कं. लि. व ऑल इंडिया कन्स्ट्रक्शन कं. लि. ह्या सबसिडिअरी कंपन्या काढण्यांत आल्या. प्रीमिअर कन्स्ट्रक्शन कंपनीचा हिंदुस्थान कन्स्ट्रक्शन, बिल्डिंग कन्स्ट्रक्शन, ऑल इंडिया कन्स्ट्रक्शन, इंडियन ह्यूम पाइप, मार्सलंड प्राइस अँड कं., कूपर इंजिनिअरिंग व ॲकमी मॅन्युफॅक्चरिंग कं. ह्या सात मोठ्या लिमिटेड कंपन्यांत निर्णायक हात आहे. ह्या सात कंपन्यांची प्रगति म्हणजेच श्री. वालचंद ह्यांच्या कर्तृत्वाचा इतिहास आहे. "वालचंद" ह्या ग्रंथांत ह्या सर्व कंपन्यांनीं केलेल्या कामाची यादी दिली आहे, तिची बेरीज किती तरी कोटि रुपयांच्या वर जाते! मार्सलंड प्राइस कंपनीनें आपला मेमोरँडम बदलून साखरेचा कारखाना उभारला व कळंबच्या ओसाड जागेचें " वालचंदनगर " बनविलें. त्यांचा रावळगांव शुगर फार्म लि. चा कारखानाहि सुप्रसिद्ध आहे. ह्या दोन्ही ठिकाणीं आधुनिक पद्धतीच्या डेअरी उभारण्याचा त्यांचा प्रयत्न चालू आहे.

श्री. वालचंद ह्यांचें कार्यक्षेत्र इतकें विस्तृत असलें, तरी जनतेच्या मनांत त्यांचें नांव शिंदा स्टीम नॅव्हिगेशन कंपनीशीं जितकें निगडित आहे, तितकें दुसऱ्या कोणत्याहि उपक्रमाशीं नाहीं. शिंदा स्टीमची स्थापना, तिच्या प्रगतीचे मार्गांतील अनेक अडचणी, तिनें विदेशी कंपन्यांवर केलेली चढाई, श्री. वालचंद ह्यांनीं हिंदी किनाऱ्यावर हिंदी आगबोटींस प्राधान्य मिळावें ह्यासाठी केलेले भगीरथ प्रयत्न, कंपनीनें बॉंबे स्टीम नॅव्हिगेशन कंपनीची मिळविलेली मॅनेजिंग एजन्सी, इंडियन को. नॅव्हिगेशन कंपनीला तिनें दिलेला हात, आगबोटी बांधण्यासाठी कंपनीचें स्वतःचें शिपयार्ड, इत्यादि गोष्टींचा इतिहास अगदीं ताजा आहे. श्री. वालचंद ह्यांनीं विमानांच्या उत्पादनाचा कारखाना ( हिंदुस्थान एअरक्राफ्ट लि. ) व मोटारींच्या उत्पादनाचा कारखाना काढण्यासाठी सर्व पूर्वतयारी केली असतांहि युद्धपरिस्थितीमुळें विमानांचा कारखाना त्यांस सरकारचे ताब्यांत द्यावा लागला व सरकारच्या सहाय्याचे अभावीं मोटारींचा कारखाना निघूं शकला नाहीं, ही अत्यंत नाइलाजाची गोष्ट झाली. राष्ट्रीय दृष्ट्या महत्त्वाचे धंदे हातीं घेऊन ते यशस्वी करण्यांतच श्री. वालचंद ह्यांच्या राष्ट्रीय कामगिरीचें रहस्य साठविलेलें आहे व खासगी धंद्यांत पैसे मिळविण्यापेक्षा राष्ट्रसंवर्धक धंद्यांस चालना देऊन

त्यासाठी आपलें सर्वस्व खर्च करण्याची तयारी ठेवण्यांतच त्यांचा मोठेपणा आहे. ज्या घडामोडींत श्री. वालचंद ह्यांचा प्रत्यक्ष निर्णायक हात आहे, अशाच घडामोडींची माहिती "वालचंद" मध्यें देण्यांत आली आहे. अशा प्रकारच्या ह्या ग्रंथानें हिंदी आर्थिक व औद्योगिक इतिहासाच्या वाङ्मयांत उत्कृष्ट भर घातली आहे.

श्री. वालचंद हिराचंद ह्यांनीं मुंबई येथील महाराष्ट्र चेंबरची कल्पना काढून तिची स्थापना केली. पहिलीं कित्येक वर्षें तिचे ते अध्यक्ष व आश्रयदाते होते. हिंदी उद्योगधंद्यांचे क्षेत्राच्या आघाडीवर असणारे श्री. वालचंद ह्यांचेसंबंधीं महाराष्ट्रास अभिमान वाटणें स्वाभाविक आहे. त्यांच्या कंपन्यांचे व्यवस्थेंत, मोठ्या अधिकारावरील लोकांत महाराष्ट्रीयांचींच नांवें मुख्यतः आढळतात. युद्धोत्तर काळांतील पुनर्घटनेंत श्री. वालचंद ह्यांच्यासारख्या धडाडीच्या व कर्तृत्वाच्या पुढाऱ्यांची हिंदुस्थानास विशेष आवश्यकता भासेल. त्यावेळीं श्री. वालचंद हे पुनः प्रामुख्यानें आणखी चमकतील, ह्यांत संशय नाहीं. श्री. वालचंद ह्यांस दीर्घायुष्य मिळून त्यांचे हातून अशीच भरीव कामगिरी आणखी पार पडो, अशी इच्छा आम्हीं त्यांच्या ज्युबिलीचे निमित्तानें प्रदर्शित करतों.

---

## दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट, लि.

(वार्षिक सभा: ३१-१२-१९४२)

मागील तोट्याची संपूर्ण बाकी (१,९३,५७९ रुपये) व डिफर्ड रेव्हेन्यू खर्चाची पूर्ण बाकी (३४,२६३ रुपये) लिहून टाकून व ऑर्डिनरी शेअरवर ७½% डिव्हिडंड व २½% बोनस देऊन वरील कंपनीनें आतां आपल्या प्रगतीचा महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. कोणत्याहि साखर-कारखान्याच्या कंपनीच्या यशाचें मुख्य रहस्य, तिला मिळणाऱ्या साखरेच्या उताऱ्यांत आहे. १९४१–४२ च्या हंगामांत बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेटला १०·३६% साखरेचा उतारा मिळाला व त्यामुळें साखरेचें उत्पादन त्यापूर्वींच्या हंगामापेक्षां ८,६८३ पोत्यांनीं वाढलें. सिंडिकेटच्या साखरेचा उतारा, गेल्या हंगामांत इतर कंपन्यांना पडलेल्या उताऱ्यांशीं तुलना करतां अतिशय समाधानकारक आहे, असेंच म्हटलें पाहिजे. १९३९-४० च्या मोसमांत कारखान्याचें काम सुरू होण्यास थोडा उशीर झाला व मोसम लांबला त्यामुळें साखरेचा उतारा थोडा कमी (९·८%) आला. त्या वर्षी सिंडिकेटला २,८३,१७२ रुपये नफा झाला. १९४०-४१ च्या मोसमांत साखरेचा उतारा ८·७% होता. ह्याचा परिणाम सिंडिकेटला १,९८,९६२ रुपये तोटा होण्यांत झाला. १९४१-४२ च्या मोसमांतील उतारा १०·३६% इतका आहे. साखरेचा उतारा असाच समाधानकारक राहिल्यास, सिंडिकेटच्या भागीदारांनीं मोठ्या डिव्हिडंडची अपेक्षा करण्यास हरकत नाहीं.

सिंडिकेटनें आपल्या कारखान्याच्या खर्चाची व्यवस्था आजपर्यंत कशी केली, व तिचेवर जनतेचा विश्वास कसा बसत गेला, हें खालील थोड्या माहितीवरून समजून येईल. सिंडिकेटची स्थापना २१ सप्टेंबर, १९३४ सालीं झाली. २३ जून, १९३५ अखेर कंपनीचें भरणा झालेलें भांडवल ३६,९०३ रुपये होतें. ६ एप्रिल, १९३७ रोजीं कंपनीनें ३१,१०० पौंड किंमतीच्या यंत्रसामुग्रीची स्कोडा कंपनीकडे ऑर्डर दिली, परंतु त्या वर्षअखेर कंपनीचें भरणा झालेलें भांडवल फक्त २,८१,८०३ रुपये होतें व मुदतीच्या ठेवी १,०७,८५० रुपयांच्या होत्या. २० नोव्हेंबर, १९३८ अखेर सिंडिकेटचें भरणा झालेलें भांडवल ३,२४,५११ रुपये झालें व मुदतीच्या ठेवी ७ लक्ष रुपयांच्या होत्या. १९३७-३८ अखेर सिंडिकेटनें मशिनरीची सबंद रकम देऊन टाकली. मुदतीच्या ठेवींतील वाढीमुळें उसाची लागवड वाढविण्यास फार मदत झाली. १७ मार्च, १९३९ रोजीं सिंडिकेटच्या कारखान्यांत ऊंस गाळण्यास प्रारंभ झाला. १९३८-३९ अखेर कंपनीचें भरणा झालेलें भांडवल ४,३३,१५२ रुपये झालें. ३० सप्टेंबर, १९४० अखेर तो आंकडा सुमारें ६ लक्ष रुपये झाला व ठेवींची रकम १२ लक्ष, ६५ हजारांवर आली. १९४०–४१ अखेर भांडवलाचा आंकडा ६½ लाखांवर गेला व ठेवीहि १४ लक्ष, १५ हजार रुपयांवर गेल्या. १९४१–४२ अखेर भांडवल पावणे सात लाखांवर गेलें असून ठेवींचा आंकडा १२½ लाखांचे खालीं आला आहे. भांडवल व ठेवी ह्यांचें प्रमाण कसें सुधारत चाललें आहे, हें वरील आंकडे दर्शवितात. ठेवींवरील व्याजाचा सिंडिकेटवरील बोजा अहवालाचे वर्षी कमी झालेला आढळून येईल. बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेटनें १९४१–४२ मध्यें साखर विकून १९ लक्ष, ३६ हजार रुपये मिळविले. एक्साइज ड्यूटीचे ३ लक्ष, ४६½ हजार रुपये तिला भरावे लागले. ठेवींवरील व्याजाबद्दल सिंडिकेटला ७२,८२६ रुपये खर्च आला. हा आंकडा गेल्या वर्षापेक्षां थोडा लहानच आहे. सिंडिकेटची कल्पना काढून ती उभारणारे उत्पादक, तिचे संचालक व मॅनेजिंग एजंट हे सिंडिकेटच्या यशाबद्दल अभिनंदनास पात्र आहे. "महाराष्ट्रीय जनतेनें दर्शविलेली सक्रिय सहानुभूति व दिलेला उदार आश्रय" ह्यांवरच सिंडिकेटची उभारणी झालेली आहे.

---

## कै. आण्णासाहेब वर्तक

पुण्याचे एक प्रमुख नागरिक श्री. वि. ना. वर्तक, रि. चीफ इंजिनिअर, हे सोमवार ता. २१ रोजीं आपल्या वयाच्या ७४ व्या वर्षी मरण पावले, हें नमूद करण्यास वाईट वाटतें. सिंध प्रांताचे चीफ इंजिनिअर म्हणून काम केल्यानंतर त्यांनीं ग्वालेर संस्थानाचे मुख्य इंजिनिअर म्हणून कांहीं काळ काम केलें व त्यानंतरचें आपलें आयुष्य सार्वजनिक कार्यासाठी खर्च केलें. त्यांच्या इंजिनिअरिंगच्या ज्ञानाचा व अनुभवाचा उपयोग अनेक संस्थांस झालेला आहे. बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेटच्या उत्पादकांतील ते एक प्रमुख होते व तिचे स्थापनेचे व वाढीचे कामीं त्यांनीं अतिशय परिश्रम घेतले. सिंडिकेटच्या स्थापनेचे पूर्वीहि त्यांचा स्वतःचा एक साखरेचा कारखाना होता व त्यांची साखर वर्तकी साखर ह्या नांवानें प्रसिद्ध होती. मोठ्या प्रमाणावर देशी साखरेचें उत्पादन सुरू होण्यापूर्वी, स्वदेशी व्रतधारी लोकांस वर्तकी साखरेचाच अवलंब करावा लागे. श्री. आण्णासाहेब ह्यांचे निधनानें पुण्यांतील एक जुन्या पिढींतील निष्ठावंत व घरंदाज सार्वजनिक कार्यकर्ता नाहींसा झाला आहे.

---

# स्फुट विचार

## फ्रान्स आणि फ्रेंच वसाहती

जर्मनीनें फ्रान्सचा उत्तर भाग आपल्या ताब्यांत घेतल्यानंतर बाकी राहिलेल्या त्या देशाच्या प्रदेशांत मार्शल पेतॉं हिटलरचा अंकित म्हणून राज्यकारभार पहात होता. लाव्हाल उघडपणानें जर्मनीस जाऊन मिळाला आणि त्याच्या तंत्रानें व्हिशीचें मंत्रिमंडळ चालू लागून पेतॉं हा केवळ त्याचें बाहुलें बनला. हा शत्रूस दिलेल्या शरणचिठ्ठीचा प्रकार डिगॉलसारख्या स्वाभिमानी फ्रेंच राष्ट्रभक्तांस प्रथमपासूनच नापसंत होऊन त्यांनीं जर्मनी विरुद्ध बंड पुकारलें आणि इंग्लंड, रशिया व अमेरिका ह्यांचा पक्ष त्यांनीं उघडपणें स्वीकारला. उत्तर आफ्रिकेंतील फ्रेंच वसाहतींत अमेरिका व इंग्लंड ह्यांनीं आपलें सैन्य उतरवून ट्युनिस व बिझर्टा ह्यांच्या दिशेनें चाल केली आहे आणि ह्या दोन ठिकाणीं जर्मन सैन्यास घेरून टाकलें आहे. ह्या संधीस जर्मनीच्या हातीं टूलॉन बंदरांतलें आरमार सापडूं नये ह्यासाठी त्याच्या अधिकाऱ्यांनीं आपलीं लढाऊ जहाजें समुद्रांत बुडवलीं आणि जर्मन सैन्यानें फ्रान्सच्या दक्षिणेकडील भाग नामधारी रीतीनें स्वतंत्र होता तोहि स्वतःच्या सत्तेखालीं आणला. जर्मनीच्या ह्या कृत्यासहि मार्शल पेतॉंनें नाखुषीची संमति दुःखानें दिली आहे. पश्चिम भूमध्य समुद्रांत मित्र राष्ट्रांच्या चढाईस तोंड देतां यावें म्हणून हिटलरनें सबंध फ्रान्स आतां व्यापून टाकला आहे. ह्याच सुमारास ॲडमिरल डार्लॉं फ्रेंच उत्तर आफ्रिकेंत अवतरला आणि तेथें अमेरिकन सेनानींच्या संमतीनें पण पेतॉंच्या विद्यमानें मित्र राष्ट्रांस मिळाला. शत्रूस फितूर झालेल्या फ्रेंच पक्षाच्या एका पुढाऱ्यास हें विश्वासाचें स्थान देण्यांत आलेलें पाहून डिगॉलसारख्या स्वतंत्र पुढाऱ्यास वैषम्य वाटणें सहाजिक होतें. अमेरिकन सेनानींच्या धोरणाचें इंग्लंडमध्येंहि जनतेस आश्चर्य वाटल्यावांचून राहिलें नाहीं. डार्लॉंस पुढारीपण देण्यानें ट्युनिशियामधील फ्रेंच लोक आपणांस आयतेच मिळाले आणि त्यांच्याशीं लढत बसण्याचा प्रसंग टळला हा फायदा झाला आहे असा युक्तिवाद अमेरिकन सेनानींनीं पुढें मांडला आहे. डार्लॉंच्या अधिकाराचा प्रश्न तूर्त ह्या स्थितींतच आहे. इकडे पश्चिम आफ्रिकेंतील फ्रेंच वसाहतींनीं मित्रराष्ट्रांची बाजू जाहीरपणानें उचलली आहे. फ्रेंच साम्राज्यानें ह्या रीतीनें फ्रान्समधील पेतॉंच्या मंत्रिमंडळाविरुद्ध बंडाचें निशाण उभारलें आहे आणि सर्व स्वातंत्र्यप्रेमी फ्रेंच पुढारी आपल्या मातृभूमीस जर्मनीच्या मगरमिठींतून सोडवण्यासाठीं मित्रराष्ट्रांच्या बाजूनें शत्रूशीं झगडत आहेत. लाव्हाल मात्र हिटलरच्या तावडींत अधिकाधिक जात असून फ्रेंच लोकांस आपल्या बरोबर खेचूं पहात आहे. जर्मनीवांचून फ्रान्सला दुसरा तरणोपाय नाहीं आणि कांहीं झालें तरी त्याची बाजू आपण उचलून धरलीच पाहिजे असें तो सांगत आहे. ह्या हिटलरधार्जिण्या धोरणाविरुद्ध जाणाऱ्या फ्रेंच जनतेचा नाश करण्याचीहि धमकी त्यानें दिली आहे. देशबुडवेपणाचा हा सल्ला फ्रेंच लोकांस पटणें शक्य नाहीं हें उघड असून जर्मनी व लाव्हाल ह्यांच्या विरुद्ध फ्रान्समधील जनता प्रसंग येतांच उठल्यावांचून रहाणार नाहीं. डिगॉलसारख्या पुढाऱ्यांच्या नेतृत्वाखालीं फ्रान्स मित्रराष्ट्रांच्या सहायानें स्वतंत्र होणार यांत संशय नाहीं.

## दिल्लीची अन्नपुरवठा परिषद्

हिंदुस्थानांत निरनिराळ्या भागांतील लोकांस खाद्यपदार्थांचा पुरवठा व्यवस्थित रीतीनें होण्याच्या प्रश्नाची चर्चा करण्यासाठीं दिल्ली येथें श्री. सरकार, हिंदुस्थान सरकारचे व्यापारमंत्रि, यांचे अध्यक्षतेखालीं एक परिषद् गेल्या आठवड्यांत भरली होती. प्रांतिक आणि संस्थानी सरकारांचे प्रतिनिधी त्या प्रसंगीं उपस्थित होते. शेतीच्या पुढील हंगामापर्यंत मुख्य धान्यांचा पुरवठा सबंध देशांत किती होईल व त्यापैकीं निरनिराळ्या धान्यांचें उत्पादन निरनिराळ्या क्षेत्रांत किती होईल त्याची कल्पना आतां सरकारी अधिकाऱ्यांस आली असली पाहिजे. एकूण पुरवठ्याच्या मानानें गहूं, तांदुळ, ज्वारी, बाजरी, डाळी इत्यादींची वाटणी अंतर्गत देवघेवीनें करावयाचा हाच मुख्य प्रश्न सोडवावयाचा आहे आणि प्रांतिक व संस्थानी प्रतिनिधींचा विचारविनिमय मध्यवर्ती सरकारच्या विद्यमानें होण्याचें महत्त्व त्यांतच आहे. मुंबई प्रांताच्या अन्नपुरवठ्याबाबतच्या काय गरजा आहेत ह्याची माहिती श्री. सरकार ह्यांस त्यांच्या मुंबईच्या मुक्कामांत करून देण्यांत आली आहे, आणि प्रांतिक सरकार शक्य तेवढें धान्य बाहेरच्या प्रांतांमधून आणण्याची खटपट करीत आहे. धान्याची वाटणी जिल्हानिहाय करण्याचें काम स्थानिक अधिकाऱ्यांचें असून तें जनतेच्या सहकार्यानें पार पाडलें जाणें इष्ट आहे. धान्याबरोबर स्वस्त कापडाच्या पुरवठ्याचीहि तजवीज त्वरित होणें अगत्याचें असून ह्या संबंधांतली सरकारी योजना लवकर अमलांत आली पाहिजे.

---

## चलन आणि बाजारभाव

कलकत्ता येथें ब्रिटिश व्यापारी मंडळांच्या सभेंत भाषण करतांना व्हाइसरॉय लॉर्ड लिन्लिथगो ह्यांनीं कांहीं आर्थिक महत्त्वाच्या प्रश्नांचा उल्लेख केला. युद्ध परिस्थितीमुळें जनतेच्या हातांत वाढत्या प्रमाणांत चलन म्हणजे पदार्थ विकत घेण्याचें सामर्थ्य जात आहे आणि त्याचे योगानें बाजारभाव चढत आहेत ह्या प्रवृत्तीस आळा घालण्याची आवश्यकता त्यांनीं प्रतिपादली. एका बाजूनें लोकांनीं विकत घ्यावयाच्या नित्योपयोगी वस्तूंचा पुरवठा मर्यादित होत आहे आणि दुसऱ्या बाजूनें त्यांच्या हातांत अधिक चलन खेळत आहे ह्या कारणानें मालास वाढती मागणी येऊन बाजारभाव चढत आहेत. ह्यासच चलनाचा फुगवटा ( इन्फ्लेशन ) म्हणतात आणि त्याच्या प्रतिकाराचा मुख्य उपाय जनतेच्या हातांतील चलनाचा ओघ मालाच्या खरेदीकडून काढून सरकारी कर्जरोख्यांकडे वळवणें हा आहे असें समजण्यांत येतें. पैशाच्या योगानें पदार्थ खरेदी करण्याची शक्ति निर्माण होत असल्यानें तो रोख्यांत गुंतवला गेल्यास जिनसांच्या पुरवठ्यावरचा ताण कमी होऊन बाजारभाव चढण्यास आळा बसतो हा आर्थिक सिद्धांत येथें लागू पडतो. कारखानदार आणि धंदेवाले ह्यांनीं कामकरी वगैरे नोकरांस मजुरी व पगार वाटतांना त्यांस दिल्या जाणाऱ्या प्राप्तीचा अंश सरकारी रोख्यांत गुंतवला जाण्याविषयींचा उपाय व्हाइसरॉय ह्यांनीं आपल्या श्रोत्यांस सुचविला. ह्यावरून वरील उपपत्तीचें रहस्य ध्यानांत येण्यासारखें आहे. महागाईवरचा हा तोडगा शास्त्रशुद्ध असला तरी सद्यःपरिस्थितींत तो कितीसा फलद्रूप होईल ह्याचा विचार झाला पाहिजे. आपल्या खर्चांत बचत करण्याची सवय समाजाच्या सर्व थरांत पसरली पाहिजे आणि आवश्यक वस्तूंचा पुरवठा वाढवण्यांत आला पाहिजे;

म्हणजे ह्या दुहेरी उपायानें महागाईस आळा बसण्याचा संभव आहे, एरव्ही नाहीं.

### मालाचा पुरवठा व सरकारी नियंत्रण

ह्या गोष्टीची जाणीव लॉर्ड लिन्लिथगो ह्यांस नाहीं असें नाहीं; कारण, लोकांनीं आपल्या प्राप्तींतील कांहीं भागाचा उपयोग रोख्यांतील गुंतवणेकडे करावा असें सांगून सध्यापेक्षा अधिक जिनसांच्या पुरवठ्याचें व किंमतीचें नियंत्रण करण्याचा सरकारचा विचार असल्याचें त्यांनीं ध्वनित केलें. इंग्लंड, अमेरिका वगैरे देशांत लोकांच्या सामान्य उपयोगाच्या वस्तूंचा पुरवठा मर्यादित केला आहे इतकेंच नव्हे तर प्रत्येक व्यक्तीचा त्यांतला वाटा निश्चित केला आहे. ह्या नियंत्रित वाटणीमुळें लोकांस माल विकत घेण्याची इच्छा असली तरी त्यांस तो खरेदी करतां येत नाहीं आणि ह्या रीतीनें बचत झालेल्या पैशाचा विनियोग आपोआपच रोखे-खरेदींत होतो. परंतु हिंदुस्थानांत सध्या धान्यधुन्याचा किमान जरूरीइतकाहि पुरवठा अनेक लहान-मोठ्या ठिकाणीं होण्याची पंचाईत झाली आहे. ह्या परिस्थितीस अनुलक्षून व्हाइसरॉयनीं असें निक्षून आश्वासन आपल्या भाषणांत दिलें आहे कीं अन्न-सामुग्रीच्या विषम वाटणीनें व तुटवड्यानें निर्माण होणारी जनतेची हलाखी दूर करण्यासाठी शक्य ते सर्व उपाय कडक रीतीनें योजल्यावांचून सरकार रहाणार नाहीं. देवघेवीच्या मामुली पद्धतीनें जो माल जनतेस मिळूं शकत नाहीं तो सरकार स्वतः मिळवून वाटील येथपर्यंत जाण्याची तयारी त्यांनीं दर्शविली आहे ह्यावरून सध्याच्या असमाधानकारक परिस्थितीची कल्पना सरकारास आली आहे असें समजण्यास हरकत नाहीं. अन्नसामुग्रीची व्यवस्था पहाण्यासाठीं हिंदुस्थान सरकारनें एक स्वतंत्र खातें निर्माण केलें आहे हें याचेंच निदर्शक आहे. सरकारचे हेतू आणि योजना ह्यांच्या परिणामाचा प्रत्यक्ष अनुभव जितक्या लवकर येऊं शकेल तितका तो हवा आहे.

### ब्रिटिश धंदेवाल्यांचा दृष्टिकोन

"हिंदुस्थानच्या प्रगतीस हातभार लावावा आणि हिंदी शेती व उद्योगधंदे यांस सहाय करावें आणि हिंदी धंदेवाल्यांस जें स्वातंत्र्य व मोकळीक इंग्लंडमध्यें आहे तेंच स्वातंत्र्य ब्रिटिशांस ह्या देशांत असावें" एवढीच आमची इच्छा आहे असें ब्रिटिश व्यापारी मंडळ्यांच्या परिषदेचे अध्यक्ष, हॅंडो ह्यांनीं सांगितलें. इंग्लंडमध्यें व्यवहार करणारे हिंदी धंदेवाले आणि हिंदुस्थानांत व्यवहार करणारे ब्रिटिश धंदेवाले ह्यांच्या परिस्थितीची तुलना करून तीमधलें साम्य दाखवण्याचा आपला प्रयत्न किती अर्थशून्य आहे हें त्यांच्या लक्षांत कसें आलें नाहीं ह्याचें आश्चर्य वाटतें. सिलोन, आफ्रिका व ब्रह्मदेश येथें हिंदी लोकांस न्यायानें व सरळपणानें वागवण्यांत यावें ह्या मागणीसारखीच आपली मागणी आहे असेंहि त्यांनीं सांगितलें. हिंदुस्थानांत ब्रिटिशांची सत्ता आहे तशी वरील देशांत हिंदी लोकांची नाहीं एवढें सांगितलें म्हणजे मि. हॅंडो ह्यांचा युक्तिवाद कसा सदोष आहे हें तेव्हांच ध्यानांत येईल. ब्रिटिश धंदेवाल्यांच्या हितसंबंधाचें संरक्षण राज्यघटनेंत योग्य तऱ्हेनें केलें जावें ही जुनी मागणी आहे आणि तिचा यथाचित परामर्ष हिंदी लोकमतानें वारंवार घेतला आहे. मि. हॅंडो ह्यांच्या मुद्यास उत्तर देतांना लॉर्ड लिन्लिथगो ह्यांनीं ब्रिटिश धंदेवाल्यांस हिंदी आर्थिक उन्नतीस मदत करण्याची संधि आतांप्रमाणें पुढेंहि मिळेल असें आश्वासन दिलें आहे. हिंदुस्थानचे उपयुक्त नागरिक ह्या नात्यानें ब्रिटिश धंदेवाल्यांस न्यायानें वागवलें जाईल ह्यासंबंधानें शंका घेण्याचें त्यांस कारण नाहीं. युद्धोत्तर आर्थिक पुनर्घटनेच्या योजना तयार करण्यांत सरकारनें पुढाकार घ्यावा अशा आशयाचा एक ठराव कलकत्त्याच्या सभेंत मान्य करण्यांत आला. आर्थिक बाबतींत युद्धोत्तर जगांत हिंदुस्थानास योग्य स्थान मिळालें पाहिजे आणि त्या प्रश्नाची शहानिशा एव्हांपासून झाली पाहिजे ही हिंदी लोकमताचीहि मागणी आहे. तथापि, आर्थिक योजनात्मक धोरण ठरवलें जात असतां हिंदी लोकांच्या आकांक्षांचें समाधान होईल ह्याविषयीं काळजी घेतली जाणें अगत्याचें आहे. ह्या उद्देश सिद्धीस जाण्यास ह्या देशांत राष्ट्रीय स्वरूपाचें मध्यवर्ती मंत्रिमंडळ स्थापलें जाण्याची आवश्यकता असल्याचें हिंदी पुढारी कळकळीनें सांगत आहेत, त्यासंबंधांत ब्रिटिश धंदेवाल्यांनीं अनुकूल मत व्यक्त केलेलें दिसत नाहीं आणि व्हाइसरॉयांच्या कलकत्ता येथील भाषणाचा सूरहि निराशामयच होता.

## पत्नीच्या मृत्युपत्रास पतीची संमति आवश्यक

### मुंबई हायकोर्टाचा निवाडा

नारायणदास बैरागी ह्याचा पार्वतीबाईशीं विवाह झाला होता. पार्वतीबाई १९३६ सालीं निवर्तली. त्यापूर्वी, तिनें मृत्युपत्र करून आपलें सर्व स्त्रीधन आपली पुतणी सारूबाई हिला दिलें. मरणापूर्वी २० वर्षे पार्वतीबाई पतीपासून विभक्त रहात होती. हिंदु कायद्याप्रमाणें पतीचे संमतीशिवाय पत्नीला आपली मिळकत-स्त्रीधन सुद्धां-विक्री, देणगी अथवा मृत्युपत्र ह्यापैकीं कोणत्याहि प्रकारें दुसऱ्यास देतां येत नाहीं, ह्या मुद्यावर नारायणदासनें सदरहू मृत्युपत्र बेकायदा ठरवावें असा कोर्टाकडे अर्ज केला. पतीची संमति आवश्यक करणारा हिंदु कायदा सध्याच्या काळाशीं विसंगत आहे व तो जुना-पुराणा झाला आहे, म्हणून तो कोर्टानें लागू करूं नये, असें अर्जदारातर्फे सांगण्यांत आलें. पार्वतीबाईनें नवऱ्याचा आश्रय कित्येक वर्षांपूर्वी सोडला होता, ही गोष्टहि लक्षांत घ्यावी, असें सुचविण्यांत आलें. पत्नीवरील हें नियंत्रण दूर करण्याचा प्रश्न मंडळाच्या कक्षेंतील आहे, हें नियंत्रण पत्नीच्या हितावेंच आहे व पार्वतीबाई वेगळी राहिली तरी ती विवाहितच होती, ह्या मुद्यांवर मुंबई हायकोर्टानें तिचें मृत्युपत्राप्रमाणें सारूबाईस मालमत्ता मिळूं शकत नाहीं, असा निवाडा दिला.

### आयुर्वेद रसशाळा, पुणें लि.

वरील कंपनीचें ३१ मे, १९४२ अखेरचें वसूल-भांडवल २ लक्ष, ९४३ हजार रुपये असून आगाऊ दिलेल्या कॉल्सची रकम ५१ रुपये आहे. कंपनीनें अहवालाचे वर्षी २ लक्ष, २७ हजारांची विक्री केली व तिचेजवळ वर्षअखेर २ लक्ष, ७८ हजारांचा कच्चा व पक्का माल शिल्लक आहे. वर्षअखेरचा निवळ नफा १५, ६५० रुपये आहे. प्रेफरन्स भागीदारांस ५% व ऑर्डिनरी भागीदारांस ९% (त्यांतील निमें डिव्हिडंड राष्ट्रीय-शिक्षण-मंडळास मिळावयाचें आहे) डिव्हिडंड मिळेल.

## कृत्रिम रबर

( लेः—डॉ. ग. रा. केळकर, एम्. एस्‌सी., पीएच. डी. )

रासायनिक संशोधनामुळें रंग, रेशीम, धागे इ. बाबतींमध्यें मनुष्यास आतां निसर्गाच्या लहरीवर अवलंबून राहण्याचें कारण उरलें नाहीं. रबराच्या बाबतींमध्येंही मनुष्य आतां स्वतंत्र होऊं पहात आहे. नैसर्गिक रबर हें एका झाडाच्या चिकापासून काढतात. त्यांचे मळे मलाया, सयाम, फ्रेंच इंडोचायना, सीलोन इ. पौर्वात्य देशांमध्येंच विशेष आहेत. आधुनिक यांत्रिक युद्धपद्धतीमध्यें रबर ही एक अत्यावश्यक वस्तु असून जर्मनी, रशिया इ. राष्ट्रांना पौर्वात्य देशांकडून पुरवठा होणें अशक्य झालें. अर्थातच या राष्ट्रांनीं कृत्रिम रबर बनविण्याच्या प्रयत्नामध्यें अग्रेसरत्व मिळविलें आहे. ऑस्ट्रियावरील स्वारीमध्यें जर्मनीनें आपल्या रणगाड्यांकरितां कृत्रिम रबराचाच उपयोग केला होता. १९३८ सालापासून किमान २५,००० टन कृत्रिम रबर जर्मनीमध्यें प्रतिवर्षी होत असावें असा अंदाज आहे. कांहींच्या मतें १९४१ सालीं हा आंकडा ५०,००० टन इतका वाढला असावा. अगदीं अलिकडे अमेरिकेनें फार मोठ्या प्रमाणावर कृत्रिम रबर तयार करण्याच्या योजना आखिल्या आहेत.

कृत्रिम तऱ्हेनें एखादा पदार्थ बनवावयाचा असेल तर नैसर्गिक पदार्थाच्या पृथक्करणापासून त्याकरितां आवश्यक असलेल्या कच्च्या द्रव्याबद्दल प्रथम अंदाज बांधतां येतो. नैसर्गिक रबराच्या पृथक्करणानें असें दिसून आलें कीं त्यामध्यें $C_5H_8$ हा परमाणुसमुच्चय असलेले आयसोप्रिन Isoprene नामक द्रव्याचे शेकडो अणू एकत्र गुंफिले गेले आहेत. तेव्हां आयसोप्रिन किंवा तत्सदृश अंतर्गत रचना असलेल्या ब्यूटाडायईन, मेथिल-ब्यूटायईन, क्लोरोब्यूटाडायईन, इ. परमाणूंची गुंफण करून अनेक जातींचीं कृत्रिम रबरें तयार करण्यांत आलेलीं आहेत व तीं मेथिल रबर, ब्यूना एस्, थायकॉल, क्लोरोप्रीन, नीओप्रिन, कोरोसील, केमिगम्, ॲमिरोपॉल इ. नांवांनीं ओळखिलीं जातात. या रबरांना लागणारीं ब्यूटाडायईन सारखीं द्रव्यें आतां टरपेंटाईन, पेट्रोल, चुनखडी, कोळसा, डांबर, अमेरिकेमध्यें आढळणारा नॅचरल गॅस इ. पासून कमी किंमतींत बनविण्याच्या कृतीहि उपलब्ध झाल्या आहेत.

प्रत्येक कृत्रिम रबरामध्यें नैसर्गिक रबराचे सर्व गुणधर्म असतातच असें नाहीं. पण कित्येक बाबतींत कृत्रिम रबरें नैसर्गिक रबरांपेक्षा सरस ठरतात व विशिष्ट कामाकरितां त्यांची योजना करणें फायदेशीर असते. उदाहरणार्थ, नियोप्रिन हें रबर तेलकट पदार्थांच्या सान्निध्यांत जास्त काळ टिकूं शकतें. नैसर्गिक रबर त्यापेक्षा लवकर खराब होतें. ब्यूना नामक रबराचे गुणधर्म आवश्यकतेप्रमाणें बदलतां येतात.

कृत्रिम रबरांचा प्रसार होण्याच्या मार्गांमधील मुख्य अडचण म्हणजे त्यांची किंमत. तीं नैसर्गिक रबराच्या चौपट-पांचपट महाग पडतात. अर्थात् युद्धकार्याकरितां म्हणून लागतील तेव्हां किंमतीचा प्रश्न नाहीं ही गोष्ट वेगळी. कृत्रिम रबराकरितां कच्चा माल म्हणून उपयोगीं पडणारीं द्रव्यें जरी स्वस्त असलीं तरी त्यावर करावे लागणारे रासायनिक संस्कार व त्याकरितां लागणारा उपकरणें यांना बराच खर्च येतो. त्याचप्रमाणें कृत्रिम रबरांच्या निर्मितीस मनुष्यबळ असें फारच थोडें लागत असल्यामुळें मोठ्या प्रमाणावर निर्मिति करून खर्चांत बचत करण्यासही फारसा वाव नाहीं. तरी पण त्यांच्या विशिष्ट गुणधर्मांमुळें कांहीं ठिकाणीं अत्यंत उपयोगी म्हणून कृत्रिम रबरें टिकाव धरूं शकतील. कोणी सांगावें, कदाचित् शास्त्रीय प्रगतीमुळें पुढेंमागें तीं नैसर्गिक रबराइतका किंवा त्यापेक्षाही स्वस्त होतील किंवा रबराचा उपयोग दिवसेंदिवस इतका वाढेल कीं, कृत्रिम व नैसर्गिक अशा दोन्हीहि रबरांची आपणास गरज भासेल.

हिंदुस्थानमध्यें प्रतिवर्षी ८००० टन रबराचा उपयोग केला जातो. शिवाय जवळ जवळ २ कोटि रुपयांचा रबरी माल परदेशांतून आयात होतो. युद्धामुळें ही आयात बंद झाली म्हणजे आपणांस येथील पुरवठ्यावरच अवलंबून रहावें लागेल शिवाय युद्धोपयोगी पदार्थांच्या निर्मितीकरितां जास्त रबराचा उपयोग करावा लागेल त्यामुळें येथें रबराचा तुटवडा पडण्याचा संभव आहे. येथील कच्च्या मालापासून कृत्रिम रबर कसें बनवितां येईल याबाबत कांहीं प्रयत्न होणें आवश्यक आहे.


**न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.**

( Approved Re-traders and Approved Contractors )

२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.

**अध्यक्षः—श्री. ग. स. मराठे, ॲक्चुअरी.**

**महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना**

★ गिरणीचे रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स

★ रीमोल्ड टायर्स ★ रबरी वाशर्स ★ सॉलिड व्हील्स

व इतर रबरी माल तयार होतो.

पु. ग. मराठे

मॅनेजिंग डायरेक्टर.

## अर्थशास्त्र

लेखक:—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे

पृष्ठसंख्या सुमारें ३००; किंमत ३ रुपये

या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

## श्रीराम सिल्क मिल्स लि., बंगलोर

[ कंपनीनें १९४१ अखेर ६ टक्के डिव्हिडंड वांटला आहे. ]

युद्धसाहित्यपुरवठा–खात्याची पॅरेशूटकरितां लागणाऱ्या

रेशमी कापडाची ऑर्डर पुरी करण्यासाठी लागणाऱ्या भांडवलाकरितां तूर्त एकूण रु. १ लक्षाच्या रकमेपर्यंत

## ठेवी घेणें आहेत

व्याजाचा दर ४॥ ते ६ टक्के. ठेव किमान रु. ५०० ची असावी. ठेवीवरील व्याज दर सहा महिन्यांनीं दिलें जातें.

श्रीराम सिल्क मिल्स लि., श्रीरामबाग, बसवनगुडी, बंगलोर.

**नारायण गोविंद नाईक,** ( माजी अध्यक्ष, म्हैसूर चेंबर ऑफ कॉमर्स ) मॅनेजिंग डायरेक्टर

आमच्या कारखान्यांतील माल मुंबईस बॉम्बे स्वदेशी को–ऑपरेटिव्ह स्टोअर्समध्यें व पुण्यास लक्ष्मी रोडवरील रे म्यूझिअमच्या व्यापार–संवर्धन–गृहांत पहा.

राहाणेची व भोजनाची उत्तम सोय




फोन नं. ७७९ गणपति चौक, व्यवस्थापक

## N. V. WADNERKAR

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver,
Electro-plater & Manufacturer of Sporting Trophies, Medals, Cups etc.

- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -
POONA CITY.




## मधुमेहावरील औषध

तीन आठवड्यांचे औषधास फक्त रु. ७

— मागविण्याचा पत्ता —

मॅनेजिंग डायरेक्टर, रूरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड.
१२३ ए, सदाशिव, पुणें २.

## DECCAN BOOK STALL

**Booksellers, Publishers & Subscription Agents**
**Fergusson College Road, Poona No. 4**

(1) We stock and supply Educational books, General books & Library books.
(2) We supply Government of Bombay and Government of India publications.
(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.
(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.

वक्तशीर आणि मनपसंत काम करून देणारे

## मोहन वॉच कंपनी

रेग्युलेशन मोफत

कॉमनवेल्थ बिल्डिंगसमोर लक्ष्मी रोड, पुणें २.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे. बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434


जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ, 'दुर्गाधिवास' पुणें ४.


# अर्थ


वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी रु. ३ (टपाल हंशील माफ)
किरकोळ अंकास दोन आणे.


'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे


वर्ष ८ पुणें, बुधवार, तारीख ३० डिसेंबर १९४२ अंक ५१



महायुद्ध दाराशीं आलें
परदेशी औषधें
दुर्मिळ व महाग झालीं
पण
भिण्याचें कारण नाहीं!!!
—कारण—
आयुर्वेद रसशाळा पुणें लि०
या देशी औषधाच्या प्रसिद्ध कारखान्यानें
तयार केलेलीं
● रक्तवर्धक, ● उपनाह,
● बालजीवन, ● कॅल्सीप्राल
इत्यादि पेटंट, स्टँडर्ड व लोकप्रिय औषधें खात्री पटल्यामुळें
★ डॉक्टर्सहि वापरूं लागले आहेत. ★
दरसाल बिनचूक नफा वाटणाऱ्या ह्या कंपनीचे शेअर्स व औषधें मागवा.
आयुर्वेद रसशाळा पुणें लि०
मुख्य दुकान गणपति चौक, लक्ष्मी रोड, पुणें २.

दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.
हेड ऑफिस : पुणें शहर.
स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.
मुंबई शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.
अधिकृत भांडवल : रु. १०,००,०००
विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल : रु. [illegible]
वसूल झालेलें भांडवल : रु. २,५०,०००
एकूण खेळतें भांडवल : रु. ४५,००,०००
डायरेक्टर्स
प्रो. वा. गो. काळे, अध्यक्ष — श्री. भा. म. गुते
श्री. धों. कृ. साठे — श्री. मा. रा. जोशी
श्री. न. ग. पवार — श्री. श्री. गो. मराठे
श्री. श्यं. वि. रानडे — श्री. र. वि. सोहोनी
श्री. बा. पुं. वर्दे — मि. फ. दो. पदमजी
बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदीविक्री कसोशीनें करून दिली जाते.
म. वि. गोखले
मॅनेजर.

महायुद्धाची जाणीव! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.
गिरगांव मुंबई नं. ४
महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी
बुधवार चौक, पुणें

## दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल ... ... ... | रु. | २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... ... ... | रु. | १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड ... ... ... | रु. | १,१८,००,००० |

मुख्य कचेरी: ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

मुंबईमधील शाखा : बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

इतर शाखा : अहमदाबाद ( भद्र, मुख्य ऑफिस ), अहमदाबाद ( एलिस ब्रिज शाखा ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अंधेरी ( मुंबई शेजारीं ), वांद्रे ( मुंबई शेजारीं ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस ), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर, कराची, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत.

लंडन एजन्ट्स : वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

डायरेक्टर्स : सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाइट; मि. ए. गेडिस; सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई.; मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण.

करंट डिपॉझिट अकाउंट्स :

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षा कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व प्रकारचें ट्रस्टींचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमींचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

एजंटः—टी. आर. लालवाणी.


# विविध माहिती

### नियंत्रण

चीनमध्यें १५ जानेवारीपासून सर्व जिनसांचे, वहातुकीचे व मजुरीचे दर नियंत्रित करण्यांत येणार आहेत.

### लंडनमधील नवा पूल

१८१७ सालीं सर जॉन रेनी ह्यांनीं बांधलेला वॉटर्लू पूल नादुरुस्त झाला म्हणून त्याचे जागीं नवीन पूल बांधण्यांत आला, तो वहातुकीस १४ ऑगष्ट रोजीं सुरू झाला. उद्घाटन समारंभ वगैरे कांहीं झालें नाहीं. नव्या पुलाची लांबी १,२४३ फूट आहे व रुंदी ८० फूट आहे. पुलावरून सहा मोटारी समांतर जाऊं शकतात. पुलाचे कडेनें पादचारी लोकांसाठीं फुटपाथ आहेत. युद्ध सुरू झालें नसतें तर पुलाचें काम १९४० मध्येंच पुरें झालें असतें. पुलाच्या कायम कठड्यांचीं व जिन्यांचीं कामें युद्ध-समाप्तीनंतर पार पाडण्यांत येतील.

### मुंबई प्रांतांतील जंगल खात्याचें उत्पन्न

मुंबई प्रांतांतील जंगलाचें क्षेत्र १९४१-४२ अखेर १२,९२० चौ. मैल होतें. म्हणजे, त्यांत त्यापूर्वीच्या वर्षाच्या मानानें वाढ झाली नाहीं. हें क्षेत्र प्रांताच्या एकूण क्षेत्राच्या १७ % आहे. जंगल कायद्याखालील गुन्ह्यांच्या संख्येंत १० टक्के भर पडली, ह्यांचीं मुख्य कारणें, रहाणीच्या खर्चांत वाढ, दुष्काळामुळें टंचाई व युद्धविषयक मालाचा पुरवठ्यांत गुंतलेला जंगल खात्याचा नोकरवर्ग हीं होत. १९४१-४२ मध्यें जंगल खात्याचें उत्पन्न ६९¾ लक्ष रुपये झालें. म्हणजे त्यापूर्वीच्या वर्षापेक्षा उत्पन्न २५¾ लक्ष रुपये अधिक भरलें व वाढाव्यांत ११ लाखांची भर पडून तो ३५¾ लक्ष रुपये झाला.

### गॅसच्या व विजेच्या दिव्यांचें नुकसान

मुंबई शहरांतील दंगलीमुळें नादुरुस्त झालेल्या व फुटलेल्या गॅसच्या व विजेच्या दिव्यांचे जागीं नवे दिवे बसविण्यासाठीं मुंबई कॉर्पोरेशनच्या स्टँडिंग कमिटीनें ६० हजार रूपये मंजूर केले. एकूण २,९६५ गॅसच्या दिव्यांची खराबी झाली व २९७ दिवे आजिबात नाश पावले व २०० विजेचे दिवे फुटले.

### ग्रेट ब्रिटनमधील आगगाड्या

युद्धकालीन काटकसर ह्या दृष्टीनें ग्रेट ब्रिटनमधील सर्व इंजनांस काळा रंग देण्यांत येणार आहे. गेल्या वर्षी ग्रेट ब्रिटन-मध्यें सैनिक व युद्धविषयक माल ह्यांच्या वहातुकीसाठीं १½ लक्ष खास आगगाड्या सोडण्यांत आल्या. कामगारांकरितां दर आठ-वड्यास ७ हजार जादा आगगाड्या सोडण्यांत येत आहेत.

### श्रीनिवास कॉटन मिल्स लि.

करिमभाई गटांतील सुप्रसिद्ध फाझलभाई गिरणीचें हें नवें नांव आहे. गिरणीच्या नव्या व्यवस्थेखालीं चाल्यांत १२ हजारांची भर पडली आहे. प्रत्येकीं ४०० प्रमाणें ८ हजार ऑर्डिनरी भाग कंपनीनें विक्रीस काढले आहेत.

### घंटा वाजविण्यास परवानगी

ग्रेट ब्रिटनमधील चर्चच्या घंटांचा उपयोग शत्रूच्या हल्ल्याचे वेळींच करण्यास परवानगी आहे. परंतु, चालू नाताळाच्या वेळीं त्या वाजविण्यास सरकारनें परवानगी दिली आहे.

### युद्धामध्यें धातूंचा उपयोग

गेल्या महायुद्धाचे वेळीं प्रत्येक सैनिकामागें सुमारें १०० ते २०० पौंड वजनाचे धातू युद्ध साहित्यांत उपयोगांत आणावे लागत. चालू युद्धांत एक सैनिक सज्ज करावयाचा म्हणजे त्याचे मागें २ टन ( ४१६० पौंड ) वजनाचे धातू लागतात. ह्या धातूंतील महत्त्वाचा धातु म्हणजे तांबें होय.

### महापुरामुळें नुकसान कां झालें ?

उत्तर सिंधमध्यें महापुरामुळें कोट्यवधि रुपयांचें नुकसान झालें, त्याचें कारण शोधून काढण्यासाठी सिंध सरकार एक कमिशन नेमणार आहे; त्यांत तज्ज्ञ व जज्ज ह्या दोघांचाहि समावेश केला जाईल.

### मुंबई प्रांताचें पब्लिक वर्क्स खातें

### १९४१–४२ चा अहवाल

| | |
|---|---|
| खात्याचे व्यवस्थेखालील रस्त्याची लांबी : | २०,६३८ मैल |
| त्यांपैकीं खडीचे रस्ते : | १०,४५५ मैल |
| खडीच्या रस्त्यांपैकीं लोकल बोर्डाकडील रस्ते : | ४,१४२ मैल |
| बिनखडीचे रस्ते : | १०,१८३ मैल |
| त्यांपैकीं लोकल बोर्डाकडील रस्ते : | ९,८२१ मैल |
| खात्यानें रस्त्यांवर केलेला खर्च : | ९७,९५,३३४ रु. |
| त्यांपैकीं नवीन कामांवर खर्च : | ६०,१५,६७१ रु. |
| रस्ते दुरुस्तीवर खर्च : | ३७,७९,६६३ रु. |
| इमारतींवरील खर्च : | ३२,३२,५२९ रु. |
| दापोडी वर्कशॉपमध्यें केलेल्या कामाची किंमत | २,६२,९३५ रु. |
| वर्कशॉपचा निवळ नफा : | ४०,४७४, रु. |
| वीज-पुरवठ्याच्या लायसेन्सची संख्या : | ६७ |
| विजेवरील कराचें उत्पन्न : | ३३,६८,०८० रु. |
| पी. डब्ल्यू. डी. खात्याकडील वृक्ष : | ७,२९,६१२ |

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | ४२० | कालांतील शिक्षण— मराठा चेंबरचें निवेदन | |
| २ अमेरिका, इंग्लंड व हिंदुस्थान ह्यांचीं देणीं-घेणीं ... | ४२१ | ५ मॅनेजिंग एजन्सीचा करार ... | ४२४ |
| ३ त्रैवार्षिक वृत्तांत ... | ४२२ | ६ पब्लिक वर्क्स खातें | ४२४ |
| ४ स्फुट विचार ... | ४२३ | ७ भात कोठाराची यशस्विता ... | ४२५ |
| नूतन वर्षाचा उत्साहजनक प्रारंभ—युद्धोत्तर- | | ८ मॅग्नेशियमचें उत्पादन | ४२५ |


# अर्थ

बुधवार, ता. ३० डिसेंबर, १९४२

## अमेरिका, इंग्लंड व हिंदुस्थान ह्यांचीं देणींघेणीं

युद्धकाळाच्या परिस्थितींत आंतरराष्ट्रीय देण्याघेण्याची व्यवस्था करणें अतिशय अवघड असतें. विशेषतः मित्र राष्ट्रें एकमेकांस युद्ध सहाय देत असतां त्यांचीं देणीं घेणीं पुरीं करण्याचे मामुली मार्ग उपलब्ध नसल्यानें देणीं कर्जें म्हणून हिशेबांत काढावीं लागतात. आयात-निर्यात व्यापाराची आंतरराष्ट्रीय तोंडमिळवणी होऊं शकत नाहीं, निघालेल्या बाकीची फेड सोनें-चांदी पाठवून करतां येत नाहीं आणि लढाऊ सामुग्रीची देवघेव तर अपरिहार्य असल्यानें देणें-घेणें फुगत जातें. देण्या-घेण्याची वजावाट होत नाहीं ह्या कारणानें बाक्या कर्ज म्हणून समजाव्या लागतात. इतकें होऊनहि अखेर कर्जफेड पैशाच्या किंवा हुंड्यांच्या मार्गानें होऊं शकत नाहीं. ह्या संबंधांत अमेरिका व इंग्लंड ह्या राष्ट्रांस गेल्या युद्धानंतर आपलीं येणीं वसूल करण्यांत विलक्षण अडचणी आल्या. चालू युद्धांत अमेरिका इंग्लंड वगैरे मित्र-राष्ट्रांस कोट्यवधि रुपये किंमतीचा माल पुरवीत आहे आणि या व्यवहारांत उत्पन्न होणाऱ्या येण्याची विल्हेवाट उसनवारीच्या पद्धतीनें केली जात आहे. आज उसनवारीनें पुरवण्यांत येणारा माल ऐनजिनसी परत केला जाईल ही कल्पना ह्या पद्धतीच्या मुळाशीं आहे.

हिंदुस्थान आणि अमेरिका ह्यांच्या परस्पर देण्या-घेण्याविषयीं आज ह्या प्रकारचा प्रश्न उपस्थित झाला असून तो कसा सोडवण्यांत येत आहे ह्याची त्रोटक माहिती नुकतीच बाहेर आली आहे, तिचें थोडेसें विवेचन येथें करणें आवश्यक आहे. विशिष्ट जातीचा अमेरिकन माल ह्या देशांत येत आहे. कोणता माल इकडे पाठवावयाचा आणि कोणत्या मालास उसनवारीचें तत्त्व लागू करावयाचें हें अमेरिकेंतले नियुक्त अधिकारी ठरवतात आणि ब्रिटिश सरकारच्या विद्यमानें ही व्यवस्था अंमलांत येते. जरूरीचा माल हिंदुस्थानासाठी मिळवण्याच्या कामाप्रीत्यर्थ येथील सरकारचे प्रतिनिधी अमेरिकेंत काम करीत आहेत. सध्यां अमेरिकेच्या फौजा ह्या देशांत आहेत आणि त्यांचा खर्च येथें चालू आहे. ह्यासंबंधांत अमेरिकेस लागणारा बराचसा माल व पैसा हिंदुस्थान सरकारामार्फत पुरवण्यांत येत आहे आणि त्या मानानें अमेरिकेचें ह्या देशास द्यावयाचें देणें होत आहे. ह्याच्या उलट, अमेरिकेकडून उसनवारीच्या पद्धतीनें हिंदुस्थानास माल मिळत आहे आणि त्याबद्दलचें देणें ह्या देशाच्या नांवानें पडत आहे. ह्या देण्या-घेण्याचा हिशेब कोणत्या रीतीनें करण्यांत येत आहे ह्याचें थोडेसें दिग्दर्शन व्हॉइसरॉय लॉर्ड लिन्लिथगो ह्यांनीं कलकत्ता येथें नुकत्याच केलेल्या भाषणांत आल्याचें प्रसिद्ध झालें आहे. हिंदुस्थाननें अमेरिकेस पुरवावयाच्या मालाची किंमत आणि अमेरिकन फौजेसाठी ह्या देशांत होणारा खर्च ह्यांची बेरीज उसनवार पद्धतीनें अमेरिकेनें इकडे पाठविलेल्या मालाच्या किंमतीपेक्षां अधिक असूं नये अशी एक अट वरील देण्या-घेण्याच्या हिशेबाच्या व्यवस्थेंत घालण्यांत आली आहे असें समजतें. युद्ध कालांत होणाऱ्या परस्पर व्यवहारांचा परिणाम युद्धोत्तर परिस्थितींत हिंदुस्थानच्या आर्थिक हितसंबंधास प्रतिकूल होणार नाहीं ह्याविषयींहि खबरदारी घेण्यांत आली आहे असेंहि सांगण्यांत येत आहे.

एका वर्षांत सुमारें चाळीस-पन्नास कोटि रुपये किंमतीचा अमेरिकन माल ह्या देशास मिळेल आणि अमेरिकेच्या वतीनें हिंदुस्थान सरकार ह्या देशांत त्या रकमेइतकाच खर्च करील असें दिसतें. हिंदुस्थानांत येणाऱ्या अमेरिकन मालापैकीं येथील सरकारच्या नांवें किती पडावयाचा आणि किंतीची जबाबदारी ब्रिटिश सरकारची असेल ह्याचा निर्णय व्हावा लागेल. तो प्रश्न स्वतंत्र आहेच. पण अमेरिका व हिंदुस्थान ह्यांच्या दरम्यान निघणाऱ्या देण्या-घेण्याच्या मर्यादा काय असतील ह्याची कल्पना होत असलेल्या कराराच्या वरील रूपरेखेवरून दिसून येते. प्रस्तुत गुंतागुंतीच्या प्रश्नाचा विस्तृत खुलासा हिंदुस्थान सरकारचे फडनवीस आपल्या अंदाजपत्रकावरील भाषणांत करतील असें मानण्यास हरकत नाहीं. उसनवारीची अमेरिकन व्यवस्था ह्या देशास लागू करण्यांत येत असतां हिंदी उद्योगधंद्यांच्या प्रगतीस बाधक होईल असें कांहीं तीमध्यें असूं नये असा आग्रह धरण्याचें कारण ह्या देशाची औद्योगिक प्रगति कोणत्याहि देशाशीं खुला व्यापार होऊं देण्यासारखी नाहीं हें असून युद्धोत्तर काळांत हिंदी धंद्यांस जकातीचें संरक्षण देणें आवश्यक वाटण्याचा संभव आहे हें विसरून चालावयाचें नाहीं. पुढील व्यापारी धोरणाबाबत युद्ध-परिस्थितींत हिंदुस्थान सरकारचे हात बांधले जाऊं नयेत आणि त्यास युद्धोत्तर काळांत ह्या देशाच्या आर्थिक गरजेस अनुसरून योग्य दिसेल तें जकातीचें धोरण अंमलांत आणतां यावें हें उचित आहे.

प्रस्तुत प्रश्नाइतकाच किंवा त्याहिपेक्षां अधिक महत्त्वाचा प्रश्न आज हिंदुस्थान सरकारापुढें आहे आणि तो म्हणजे ह्या देशानें इंग्लंडच्या वतीनें खर्च चालवला आहे त्याची फेड कशी करून घ्यावयाची ह्या संबंधाचा आहे. हें हिंदुस्थानचें देणें इंग्लंडमध्यें गुंतून पडलें आहे आणि त्याचा समाधानकारक निकाल लागावयाचा आहे. त्यासंबंधांत सर जेरेमी रेस्मन मध्यंतरी इंग्लंडला गेले होते. त्यावेळीं ब्रिटिश सरकारच्या प्रतिनिधींशीं त्यांच्या वाटाघाटी झाल्या. त्यामध्यें हिंदुस्थानच्या इंग्लंडकडून देण्याची फेड होण्याबाबतच्या योजनांचा विचार झाला आणि त्या चर्चेचा कांहीं तरी निर्णय आतां लागला असला पाहिजे. त्याचाहि

खुलासा सर जेरेमी रेस्मन मध्यवर्ती असेंब्लीमध्यें अंदाजपत्रकाच्या वेळीं करतील. आजपावेतों देण्या-घेण्याच्या व्यवहारांत इंग्लंड धनको आणि हिंदुस्थान ऋणको अशी स्थिति अपवादविरहीत असे. आतां मात्र हिंदुस्थानचें इंग्लंडमधील सर्व कर्ज फिटून ह्या देशाचें लंडनकडून घाढतें येणें निघत आहे. धनको होणें हें चांगलें असलें तरी त्यास आपल्या कर्जाच्या फेडीची व्यवस्था नीट लावावी लागते. हिंदुस्थान सरकार ही तजवीज कशी करणार ह्याकडे हिंदी लोकांचे डोळे लागून रहाणें स्वाभाविक आहे.

## मोटारीचा कर कोणी भरावयाचा असतो ?

आरोपी बापुरावजवळ एक मोटार होती. ती मोटार तो वापरीत नसे व वापरण्यासाठी त्यानें ती ठेवलीहि नव्हती. आरोपीनें त्या मोटारीचा टॅक्स दिला नाहीं म्हणून त्याच्यावर मध्यप्रांताच्या मोटार वाहनाच्या टॅक्सबाबतचा कायदा क. १३ ( अ ) अन्वयें खटला भरण्यांत आला व त्या खटल्यांत अव्वल कोर्टानें त्याला दंडाची शिक्षा दिली म्हणून त्यानें सेशन्स जज्जकडे अपील केलें. सेशन्स जज्जचें मत असें पडलें कीं उपयोगांत ( वापरीत ) असलेल्या व उपयोगासाठी ( वापरण्यासाठी ) ठेवलेल्या मोटारीवरच टॅक्स द्यावा लागत असल्यामुळें व आरोपी आपल्या मोटारीचा उपयोग करीत नसल्यामुळे व उपयोगासाठी त्यानें मोटार ठेवली नसल्यामुळें त्याला दंडाची शिक्षा देतां येत नाहीं अथवा त्यास दोषीहि ठरवितां येत नाहीं. सबब सेशन्स जज्जनें आपल्या शिफारशीसह नागपूर हायकोर्टाकडे हा रेफरन्स केला होता.

### हायकोर्टाचें विवेचन

आरोपी क. १३ ( अ ) खाली दोषी आहे किंवा काय हें आपल्याला पहावयाचें आहे. मोटार वहानाच्या टॅक्सबाबतचा कायदा क. ३ ( १ ) मध्यें असें म्हटलें आहे कीं ' मध्यप्रांत व वऱ्हाडांत उपयोगासाठी ठेवलेल्या अथवा उपयोगांत असलेल्या प्रत्येक मोटारीवर टॅक्स दिला पाहिजे. ' ह्याचा अर्थ असा कीं, उपयोग करण्याचें दृष्टीनें मोटार ठेवण्यांत आली नसेल अथवा मोटारीचा उपयोग करण्यांत येत नसेल तर त्या मोटारीवर मोटार टॅक्स देण्याची गरज नाहीं. आपल्याजवळ मोटार आहे ही गोष्ट आरोपीस कबूल आहे. त्याचें म्हणणें असें आहे कीं " ज्याअर्थी मी ती मोटार वापरीत नाहीं अथवा वापरण्याचे दृष्टीनें मी ती मोटार ठेवली नाहीं त्याअर्थी मला त्या मोटारीचा टॅक्स देण्याची गरज नाहीं. जवळ बाळगलेली प्रत्येक मोटार उपयोगांतच असते अथवा उपयोगासाठींच ठेवण्यांत येते असें आपल्यास गृहित धरून चालतां येत नाहीं. मोटार उपयोगांत होती किंवा काय अथवा उपयोगासाठी ती जवळ बाळगण्यांत आली आहे किंवा काय हा मुकदम्याच्या हकिकतीचा प्रश्न आहे व तो आरोपीनें सिद्ध केला पाहिजे. मोटार वाहनाच्या टॅक्सबाबतच्या कायद्यांत १९४२ मध्यें दुरुस्ती करण्यांत आली. दुरुस्ती कायद्याच्या क. ३ मधील पोट-कलम ( २ ) ला जो प्रोव्हिजो जोडण्यांत आला आहे त्यांत असें म्हटलें आहे कीं, ' मोटार मालकानें आगाऊ नोटीस देऊन असें कळविलें पाहिजे कीं, आपण अमुक मुदतींत मोटार वापरणार नाहीं तर त्या मुदतीचा टॅक्स त्यास द्यावा लागणार नाहीं.' आगाऊ नोटिस दिली नाहीं तर टॅक्स द्यावाच लागतो असें आपल्यास म्हणतां येत नाहीं कारण दुरुस्ती कायद्याच्या क. ३ मधील ठराव अगदीं स्पष्ट आहे, त्यांत असें स्पष्ट म्हटलें आहे कीं, ' उपयोगासाठी ठेवलेल्या अथवा उपयोगांत असलेल्या प्रत्येक मोटारीवर टॅक्स दिला पाहिजे, ह्याचा अर्थ असा कीं उपयोगासाठी मोटार ठेवण्यांत आली नसेल अथवा ती उपयोगांत नसेल तर त्या मोटारीचा टॅक्स देण्याचा प्रश्नच उद्भवत नाहीं व आगाऊ नोटीस देण्याचेंहि आम्हांस कांहीं प्रयोजन दिसत नाहीं.

आरोपीचें म्हणणें ऐकून न घेतां व कोणत्याहि प्रकारचा पुरावा न नोंदवितां खालच्या कोर्टानें आरोपीस दोषी ठरविलें आहे. वास्तविक आम्ही हा खटला परत चौकशीसाठी खालच्या कोर्टाकडे पाठवावयास पाहिजे होता परंतु तसें करण्याची आम्हांला गरज दिसत नाहीं. सरकारजवळ पुरावा असेल व सरकारला योग्य वाटेल तर सरकारनें आरोपीवर नवीन खटला भरावा.

निकाल:—वरील कारणास्तव आम्ही हा रेफरन्स मंजूर करून आरोपीस निर्दोषी सोडून देतों व आरोपीनें दंड भरला असल्यास तो त्यास परत करण्यांत यावा असा हुकूम देतों.

सारांश:—उपयोगासाठी जवळ मोटार बाळगण्यांत आली नसेल अथवा बाळगलेल्या मोटारीचा उपयोग करण्यांत येत नसेल तर त्या मोटारीचा टॅक्स देण्याची गरज नाहीं. मोटार उपयोगांत असेल अथवा उपयोगासाठी ठेवण्यांत आली असेल तर मात्र टॅक्स द्यावा लागतो. आपण आपली मोटार वापरीत नाही अथवा वापरण्यासाठी आपण ती आपल्याजवळ बाळगली नाहीं ह्या दोन्ही गोष्टी सिद्ध करण्याची जबाबदारी आरोपीवर असते. —"न्यायबोध"

### त्रैवार्षिक वृत्तांत

मुंबई इलाख्याचा राजकीय कारभार कॉंग्रेस मंत्रिमंडळानें सत्तात्याग केल्यानंतर प्रांतिक गव्हर्नरांनीं स्वतःच्या हातीं घेऊन मंत्र्यांच्या जागीं सिव्हिल सर्व्हिसमधील सल्लागारांची नेमणूक केली त्या गोष्टीस गेल्या नोव्हेंबरच्या ४ तारखेस तीन वर्षे पुरीं झालीं. प्रांतिक कायदेमंडळाचे सर्व अधिकार प्रांताधिपतींनीं स्वतःकडे घेतल्यानंतरच्या तीन वर्षांत युद्ध-परिस्थिती असतांहि राज्यकारभारांत काय प्रगति झाली त्याचा आढावा सरकारी रीत्या प्रसिद्ध झाला आहे. सामान्य जनतेच्या, विशेषतः खेडेगांवीं लोकांच्या सुखसोयी आणि उन्नति ह्यांचे प्रीत्यर्थ सरकारी खर्चाचें मान गेल्या तीन वर्षांत कसें हळुहळु वाढत आलें आहे हें दर्शविणारे तुलनात्मक आंकडे सरकारी वृत्तांतांत दिले आहेत. " राष्ट्रसंवर्धनात्मक " अशीं समजण्यांत येणारीं सरकारी खातीं आणि त्यांवरचा १९३९–४० व १९४२–४३ सालांतला खर्च खालीं नमूद केल्याप्रमाणें दाखवला आहे:—

लक्ष रुपये

| | १९३९–४० | १९४२–४३ |
|---|---|---|
| शिक्षण | २००·१७ | २०७·६५ |
| वैद्यक | ४६·३९ | ५५·३९ |
| सार्वजनिक आरोग्य | २८·१० | ५५·५२ |
| शेती | ११·९९ | २१·३२ |
| व्हेटेरिनरी | ४·४१ | ४·९६ |
| सहकार | १५·७६ | १३·०६ |
| उद्योगधंदे | ७·६५ | १०·४५ |
| किरकोळ | ११·७४ | ११·७५ |
| | ३२६·२१ | ३८०·१२ |

## स्फुट विचार

### नूतन वर्षाचा उत्साहजनक प्रारंभ

जर्मन फौजांस स्टालिनग्राडमध्यें व कॉकेशस प्रांतांत थोपवून धरूनच रशियन सेनापति राहिले नसून त्यांनीं शत्रूस मागें रेटीत नेण्याचा सपाटा चालविला आहे. व्होल्गा नदीवर व कॉकेशस-मधील खाणींवर आपली सत्ता स्थापून हिवाळ्यांत जर्मन सैन्यास सुरक्षितपणें विश्रांति द्यावयाची असा हिटलरचा बेत होता. त्यांत त्यास यश मिळालें असतें तर आफ्रिकन रणांगणावर आपली शक्ति एकवटण्यास त्यास संधी मिळाली असती. पण रशियन सेनापतींनीं डॉन नदीवर चढाईची मोहीम सुरू करून जर्मन फौजांस व्यापलेला मुलूख हळुहळू सोडून पीछेहाट करण्यास भाग पाडलें आहे. या रीतीनें यंदाच्या नाताळांत पूर्व रणांगणावर युद्धें मंदावण्याच्या ऐवजी तें जोरानें चालू राहिलें आहे आणि त्यांत रशियास चांगलें यश येत आहे. हिटलरचा होत असलेला पराभव आणि जर्मनीचें चाललेलें भयंकर नुकसान यांचा मित्र राष्ट्रांच्या दृष्टीनें युद्धावर अत्यंत अनुकूल असा परिणाम होत आहे. आफ्रिकेंत रोमेलची सेना पश्चिमेकडे पलायन करीत असून ट्युनीशिया-मध्यें ब्रिटिश व अमेरिकन सेनापति त्या प्रदेशांतून जर्मनीची हकालपट्टी करण्याच्या तयारींत आहेत. ब्रह्मदेशांत ब्रिटिश व अमेरिकन विमानें जपानच्या ताब्यांतील प्रमुख ठिकाणांवर हल्ले चढवीत आहेत. त्यांस उत्तरादाखल जपानी विमानांनीं कलकत्ता व चितगांव विभागांत केलेले विमानी हल्ले अयशस्वी ठरले आहेत. कलकत्त्यांतील संरक्षणाचीं साधनें यशस्वी झालीं आहेत आणि तेथील जनतेनें शत्रूच्या लढाऊ उपक्रमास धीरानें तोंड दिलें आहे ही समाधानाची गोष्ट आहे. न्यूगिनी-मध्येंहि जपानच्या पदरीं पूर्ण अपयश आलें आहे आणि अमेरिकन व ऑस्ट्रेलियन फौजांनीं तेथून बहुतेक शत्रूचें उच्चाटन केलें आहे. या प्रकारें नवें वर्ष मित्र राष्ट्रांस उत्साहजनक रीतीनें चालू होत आहे आणि शत्रूच्या भाग्यास निश्चितपणानें ओहोटी लागली आहे.

---

### युद्धोत्तर काळांतील शिक्षण

युद्ध संपून आंतरराष्ट्रीय संबंध आणि राष्ट्रीय अंतर्गत आर्थिक परिस्थिति यांची घडी कशी बसवावी त्याविषयीं निरनिराळ्या व्यक्ती आणि परंपरांचे प्रतिनिधी आपापले विचार बनवीत आहेत. ह्या विचारांत आणि योजनांत लोकांचीं ध्येयें आणि परंपरा ह्यांचें प्रतिबिंब पडलेलें आढळतें. इंग्लंडमधील कॉन्झर्व्हे-टिव्ह म्हणजे जुन्या परंपरेच्या पक्षानें युद्धोत्तर पुनर्घटनेच्या दृष्टीनें भिन्नभिन्न प्रश्नांचा विचार करण्यासाठीं नेमलेल्या समितीनें शिक्षणसंबंधांत योजना पुढें मांडली आहे. "व्यक्तीचा सर्वांत अधिक पूर्ण विकास" ह्या शिक्षणाच्या सामान्य ध्येयाचा उल्लेख करून त्यास भलतेंच महत्त्व दिलें जाण्याची भीति तिनें प्रकट केली आहे. राष्ट्र आणि राष्ट्रीय राज्यव्यवस्थेच्या गरजा तरुण पिढीच्या मनावर बिंबवून त्या संबंधांतल्या आपल्या कर्तव्याची जबाबदारी पार पाडण्यास तीस तयार करणें हा विद्येचा मुख्य उद्देश व कार्य असावयास पाहिजे असें तिचें म्हणणें आहे. केवळ व्यक्तिस्वार्थाकडे न पहातां सर्वंद्र समाजाच्या हितासाठीं झटणें आणि स्वदेशाच्या रक्षणास सहाय करणें हें आपलें कर्तव्य आहे ही भावना शिक्षणानें तरुणांच्या मनांत दृढ केली पाहिजे. तसेंच, आपले पूर्वज, आपली पुराण संस्कृति व आपली राष्ट्रीय परंपरा ह्यांविषयीं तरुणांस पूर्ण अभिमान वाटला पाहिजे असें समितीनें म्हटलें आहे. धार्मिक व नैतिक भावनांचा विकास शिक्षणानें झाला पाहिजे आणि होतकरू तरुणांस पुढें येण्यास संधि मिळाली पाहिजे असें तिचें मत आहे. ब्रिटिश राष्ट्राच्या विस्तारशील जागतिक पुढारी-पणाची परंपरा चालू ठेवण्याचें सामर्थ्य तरुणपिढींत येईल असा शिक्षणाचा रोख असणें अगत्याचें आहे असेंहि समितीनें म्हटलें आहे. ब्रिटिश कामकरी पक्षांच्या वतीनेंहि शिक्षणाची एक भावी योजना प्रसिद्ध झाली आहे तीमध्यें ह्या वर्गाच्या तरुणांस धंदे-शिक्षणाच्या सोयी कोणत्या व कशा दिल्या गेल्या पाहिजेत याचा तपशीलवार विचार केलेला आहे. एका उद्योगांतून दुसऱ्या उद्योगांत जाण्याची पात्रता तरुण कामगारांत उत्पन्न व्हावी अशा तऱ्हेची शिक्षण-व्यवस्था असावी असेंहि योजना सुचविणारांचें म्हणणें आहे. भावी शिक्षण व्यवस्थेच्या स्वरूपाचा विचार हिंदु-स्थानांत फारसा होत असलेला दिसत नाहीं. इंग्लंडसारख्या देशांत चाललेल्या चर्चेपासून येथें पुष्कळ बोध घेण्यासारखा नाहीं काय ?

---

### मराठा चेंबरच्या शिष्टमंडळाचें व्यापारमंत्र्यांस निवेदन

हिंदुस्थान सरकारचे व्यापारमंत्रि, श्री. सरकार, ह्यांचा मुक्काम मुंबईस असतांना मराठा चेंबरच्या शिष्टमंडळाचें म्हणणें त्यांनीं ऐकून घेऊन त्याचेशी तपशीलवार चर्चा केली. कारखानदारांनीं वॉर रिस्कचा विमा उतरतेवेळीं मालमत्तेची किंमत किती धरावी, ह्या विषयींच्या अडचणी शिष्टमंडळानें व्यापारमंत्र्यांस निवेदन केल्या व विशेषतः लहान कारखान्यांस विम्याची ही योजना सक्तीनें लागू करण्यांत येऊं नये, असें सुचविलें. कार-खाना जितका लहान, तितका त्यास विम्याचा फायदा कमी, अशी वस्तुस्थिति असल्याचें त्यांस कळविण्यांत आलें. तथापि विमा-योजनेचा पायाच सर्वांस सक्ति हा आहे, असें शिष्टमंड-ळास उत्तर मिळालें. छापखान्यांच्या धंद्याच्या व पाकिटें तयार करणाऱ्या कारखान्यांच्या कागदासंबंधींच्या अडचणी शिष्टमंड-ळानें पुढें मांडल्या, त्यास उत्तर देतांना पुरवठ्याचे मार्गांतील अडचणींचा उल्लेख करून युद्ध संपेपर्यंत ह्या संबंधांत फारशी सुधारणा शक्य होणार नाहीं, तथापि आपण प्रयत्नांची शिकस्त करीत आहों, असें श्री. सरकार ह्यांनीं सांगितलें. उत्पादनाचे क्रियांकरितां कारखान्यांस गहूं, साखर, रॉकेल, इत्यादींचा तुटवडा भासतो, हें खरें असलें तरी सामान्य जनतेच्या गरजा भागविल्यानंतरच त्यांचा कारखान्यांस पद्धतशीर पुरवठा करतां येणें शक्य होईल, असें श्री. सरकार ह्यांनीं स्पष्ट सांगितलें. कार-खान्यांतील कामगारांसाठी स्वस्त मालाच्या दुकानांस मूळ किंमतीनें मालाचा पुरवठा व्हावा, केवळ त्यांस परवाने दिल्यानें काम-गारांची गरज भागणार नाहीं, हें शिष्टमंडळचें म्हणणें श्री. सरकार ह्यांस पटलें व त्याविषयीं खटपट करण्याचें आश्वासन त्यांनीं दिलें. मोटार-गाड्यांच्या सुट्या भागांची किंमत नियंत्रित करावी व मोटार ओनर्स म्यूच्युअल इं. कंपनीचें वैशिष्ट्य लक्षांत घेऊन तिचेवरील विमा कायद्याचें बंधन ढिलें करावें ह्या दोन्ही सूचनांबाबत श्री. सरकार ह्यांचेकडून विशेष महत्त्वाचें आश्वासन मिळूं शकलें नाहीं. भावनियंत्रणाच्या व खाद्यपदार्थांच्या पुरव-ठ्याच्या योजनांत सुधारणा करण्याची आवश्यकता व्यापार-

मंड्याचे नजरेस आणून देण्यांत आली व त्यांनींहि ह्या संबंधांतील लोकांच्या अडचणी दूर करण्याची व्यवस्था सरकार तांतडीनें करील, असें सांगितलें. महाराष्ट्रांतील व्यापारी व कारखानदार ह्यांच्या अडचणी श्री. सरकार ह्यांनीं शिष्टमंडळाकडून समजून घेतल्या. लवकरच पुण्यास येऊन त्यांनीं अधिक तपशीलवार माहिती समक्ष मिळवावी, ह्या शिष्टमंडळाच्या विनंतीस त्यांनीं मान देऊन मराठा चेंबरचा गौरव केला आहे. ते येथें आल्यावर प्रत्येक धंद्याच्या विशिष्ट अडचणी त्यांचेपुढें मांडणें सोईचें होईल व लहान आणि मध्यम आकाराच्या उद्योगधंद्यांचे प्रश्नांस चालना मिळूं शकेल.

---

## मॅनेजिंग एजन्सीचा करार

**अलेंबिक केमिकल्स वि. भगवानजी मोरारजी गोकुळदास**

डिसेंबर, १९०७ मध्यें कोटिभास्कर अमिन आणि कं. ह्या फर्मचे भागीदार व अलेंबिक केमिकल वर्क्स लि. ह्यांचेमध्यें करार होऊन फर्मला कंपनीचे सेक्रेटरीज, ट्रेझरर्स व एजंटस नेमण्यांत आलें. फर्मच्या भागीदारांनीं व्यक्तिशः आपण आपलें काम नीट करूं, असें लिहून दिलें; उलट कंपनीनें फर्मला, कंपनी व फर्म शिलक असेपर्यंत मॅनेजिंग एजंट म्हणून ठेवूं, असें कबूल केलें. १९२२ सालीं फर्मच्या मूळ भागीदारपैकीं फक्त एकच भागीदार—भाईलाल अमीन—उरला. त्यास अर्जदार भगवानजी मोरारजी गोकुळदास हे जाऊन मिळाले. बाकीच्या भागीदारांनीं त्यापूर्वींच राजीनामा दिलेला होता. ५ ऑक्टोबर, १९३९ रोजीं भाईलाल अमिनचें आपले भागीदारांतील हितसंबंध भगवानजीस मिळाले. २० नोव्हेंबर, १९३९ रोजीं कंपनीनें एजन्सी फर्मला व भगवानजीला पत्र पाठवून मॅनेजिंग एजन्सीचा करार संपला असल्याचें कळविलें. भाईलाल अमीननें भगवानदासला फर्ममधील आपला हिस्सा विकल्यानंतर जी फर्म अस्तित्वांत राहिली, तिचेशींच अलेंबिक कंपनीचा करार झाला होता असें म्हणतां येईल काय? असा महत्त्वाचा प्रश्न उपस्थित झाला. भगवानदासनें अलेंबिक कंपनीकडे ९ लक्ष रुपयांची नुकसान भरपाईची मागणी केली, तिचा मुंबई हायकोर्टानें विचार करून वादीचा अर्ज फेटाळून लावला. मूळ फर्म व नवीन फर्म ह्यांचेमध्यें कांहींतरी दुवा शिलक पाहिजे. मूळ फर्मपैकीं निदान एक तरी भागीदार नव्या फर्ममध्यें असणें आवश्यक आहे. भाईलालनें फर्म सोडल्याबरोबर हा दुवा नाहींसा झाला व त्यानंतर उत्पन्न झालेल्या फर्मचा व कंपनीचा कांहींहि संबंध येत नाहीं. भाईलाल अमीन फर्म सोडून गेल्याचे तारखेपासून मॅनेजिंग एजन्सीचा करार रद्द होतो, म्हणून तो करार संपुष्टांत आणण्याचा कंपनीस अधिकार आहे, असा हायकोर्टानें निवाडा केला.

---

**पहिल्या वर्गाचे डब्यांत दोन बर्थ**

इंग्लंडमधील आगगाड्यांच्या पहिल्या वर्गाच्या प्रत्येक डब्यांत आतांपर्यंत रात्रीचे वेळीं एकाच उतारूची सोय असे परंतु आतां युद्धपरिस्थिति लक्षांत घेऊन एल. एम. एस. कंपनीनें कांहीं डब्यांत आणखी एक बर्थ वरती बसविला आहे व दोन उतारूंच्या निजण्याची सोय केली आहे, तथापि एकच बर्थ असलेले डबे अजूनहि मिळूं शकतात.


मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी-सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंग
९, बेक हाउस लेन, कोट मुंबई.

**शाखा**

| | |
|---|---|
| १ बारामती ( जि. पुणें ) | १८ अकलूज ( जि. सोलापूर ) |
| २ सातारा ( „ सातारा ) | १९ विरमगांव ( „ अहमदाबाद ) |
| ३ इस्लामपूर ( „ „ ) | २० धुळें ( „ प. खानदेश ) |
| ४ कऱ्हाड ( „ „ ) | २१ दोंडाईचें ( „ „ ) |
| ५ तासगांव ( „ „ ) | २२ शिरपूर ( „ „ ) |
| ६ किर्लोस्करवाडी ( „ „ ) | २३ शहादें ( „ „ ) |
| ७ शिराळें ( „ „ ) | २४ नंदुरबार ( „ „ ) |
| ८ कोरेगांव ( „ „ ) | २५ साक्री ( „ „ ) |
| ९ वाई ( „ „ ) | २६ शिंदखेडें ( „ „ ) |
| १० अहमदनगर ( „ अहमदनगर ) | २७ तळोदें ( „ „ ) |
| ११ शेवगांव ( „ „ ) | २८ मालेगांव ( „ नाशिक ) |
| १२ कोपरगांव ( „ „ ) | २९ सटाणा ( „ „ ) |
| १३ बेलापूर ( „ „ ) | ३० कळवण ( „ „ ) |
| १४ राहुरी ( „ „ ) | ३१ लासलगांव ( „ „ ) |
| १५ भिवंडी ( „ ठाणें ) | ३२ नांदगांव ( „ „ ) |
| १६ पालघर ( „ „ ) | ३३ दोहद ( „ पंचमहाल ) |
| १७ कल्याण ( „ „ ) | ३४ कालोल ( „ „ ) |

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.

## भात ( धान्य ) कोठारांची यशस्विता

### वाडा को. सु. युनियनचें कार्य

#### पालेमोडी कर्ज

सोसायट्यांतील मेंबर बाहेरील सावकारांकडून पालेमोडी कर्ज आणून त्यांपोटीं दुप्पट, तिप्पट किंमतीचें भात देतात. या पद्धतीस आळा बसणेसाठी व मेंबरांचें हित साधण्यासाठी सोसायटीचे मेंबरांस अत्यंत जरूरीचे वेळीं पालेमोडी कर्जाची योजना बँकेचे अधिकारी यांस पटवून सन १९४० पासून ही पद्धत सुरू केली आहे व त्याचा प्रसार खालील प्रमाणें झाला आहे.

| साल | मेंबर संख्या | रक्कम |
|---|---|---|
| १९३९-४० | १३ | ४०० |
| १९४०-४१ | २८ | ८४० |
| १९४१-४२ | ४८ | १,४४५ |

आज ४८ मेंबरांकडे रु. १,४४५ चें पालेमोडी कर्ज आहे. त्यामुळें मेंबरांचीं भातें सोसायटीच्या ताब्यांत घेऊन मेंबरांचाहि आर्थिक फायदा झाला शिवाय मालास भावहि चांगला येऊन एकत्रित माल-विक्रीचें तत्त्व बिंबलें आहे.

#### भात-कोठार

भात-कोठाराची योजना वाडे पेठ्यांत सन १९३७-३८ सालांपासून अमलांत आली असून तीमुळें सोसायट्यांची आर्थिक उन्नति झाली असून त्यांतील मेंबरांची आर्थिक उन्नति होत आहे. सदर भात-कोठारें फायदेशीर असल्यामुळें त्यांचा फायदा खालीलप्रमाणें झालेला आहे.

| सन | भात-कोठारांची संख्या |
|---|---|
| १९३७-३८ | ३ |
| १९३८-३९ | ३ |
| १९३९-४० | ६ |
| १९४०-४१ | ३ |
| १९४१-४२ | ५ |
| | २० |

वरीलप्रमाणें रिपोर्टांतील सालांत ५ नवीन भात-कोठारें स्थापन झाल्यामुळें सामील असलेल्या सर्व सोसायट्यांत भात-कोठारें झालेलीं आहेत व तीं उत्तम चाललेलीं आहेत. सदर भात-कोठारांत ३२० मेंबरांनीं भाग घेतला असून त्यांस ७३११ मण भात कर्जाऊ दिलेलें आहे. मागील सालीं २०० मेंबरांस ४४४३ मण भात कर्जाऊ दिलें होतें. त्यापैकी ४४०० मण भात वसूल झालें असून ३६ मण भातास, तहकुबी देण्यांत आली आहे व ७ मण भात थकलेलें आहे. रिपोर्टाचे सालीं ज्या मेंबरांकडून भात वसूल झालें नाहीं त्यांचें भयंकर नुकसान झालें आहे, म्हणून त्याकडील वसूल आलेला नाहीं.

मेंबरांनीं जमविलेलें शेअर भांडवल ( भाताचें ) :— २५९४ मण आहे व भात-कोठारांत आतापर्यंत एकूण झालेला नफा २३९७ मण आहे. सदर प्रगति अवघ्या चार वर्षांचीच आहे. यावरून भात-कोठाराची उपयुक्तता किती आहे हें दिसून येईल.

#### भात-कोठारांची माहिती

| | |
|---|---|
| भात-कोठारांची संख्या | २० |
| मेंबर संख्या | ३२० |
| मेंबरांकडील भाताचें येणें मण | ७३११ |
| थकलेलें कर्ज मण | ४३ |
| पैकी तहकुबी दिलेले मण | ३६ |
| भाताची ठेव मण | १५४ |
| मेंबर शेअर्स मण | २५९३ |
| बँक पैशांनीं विकत घेतलेलें भात मण | २१५२ |
| भाताचा रिझर्व फंड मण | ९४ |
| भात-कोठारांचा नफा मण | २३९३ |
| भात-कोठारांत शिल्लक भात मण | ८८ |
| भाताकरितां बँकेंतून आणलेलें कर्ज रु. | ६१४४ |
| भात- कोठारांतील भाताची किंमत रु. | २६६८२ |

सन १९३६-३७ पासून भात-कोठारें काढण्याचें योजनेस प्रथम परवानगी देऊन त्या गोष्टीची सत्यता आम्ही बँकेस पटवून दिल्यावर वाडे पेठ्यांत बँकेनें भात-कोठारांकरितां कर्ज देण्यास सुरवात केली परंतु त्यास या भागाचे मे. अ. रजिस्ट्रारसाहेब यांनीं ३-४ वर्षें मान्यता दिली नसल्यामुळें सहा नवीन कोठारें काढण्यासाठी बँक कर्ज देण्यास तयार होईना. परंतु याबाबतींत सारखी ३-४ वर्षें चिकाटी न सोडतां प्रयत्न करून सन १९४१ सालीं या युनियनला मे. रजिस्ट्रारसाहेब [illegible] सदर योजना सोसायट्यांचे व शेतकऱ्यांचे हिताची आहे असें आम्हीं व मे. डी. जे. झुंजारराव डि. ऑ. ऑर्गनायझर यांनीं पटवून दिल्यावर मे. रजिस्ट्रारसाहेब यांनीं भात-कोठाराचे नियम मंजूर करण्याचें आश्वासन दिलें व त्याप्रमाणें भात-कोठारांचे पोटनियम तयार होऊन त्यास मे. रजिस्ट्रारसाहेब यांजकडून मंजुरी देण्यांत आली.

सदर भाताचे पोटनियम रिपोर्टाचे सालीं सर्व सोसायट्यांस लागू करून घेतले आहेत व त्याप्रमाणें सर्व सोसायट्यांनीं कोठारें काढून आज फायदा करून घेतलेला आहे, त्याचा फायदा रिपोर्टाचे सालीं भिवंडी, कल्याण व पालघर तालुक्यांनीं घेतला आहे.

---

#### समुद्राच्या पाण्यांतून मॅग्नेशियमचें उत्पादन

समुद्राच्या पाण्यांत कित्येक महत्त्वाचीं द्रव्यें विरघळलेलीं असतात, परंतु त्यांचें प्रमाण अत्यल्प असल्यामुळें तीं काढणें आर्थिक दृष्ट्या परवडत नाहीं. फक्त मीठ तयार करणेंच परवडतें. परंतु आतां ब्रोमाइन, मॅग्नेशियम इत्यादींचें समुद्राच्या पाण्यापासून मोठ्या प्रमाणावर उत्पादन करण्यास प्रारंभ झाला आहे. ह्या पाण्याच्या ८०० भागांत मॅग्नेशियमचा एक भाग असतो तो काढण्यासाठीं अमेरिकेच्या किनाऱ्यावर यंत्रसामुग्री बसविण्यांत आली आहे. किनाऱ्यावर सापडणाऱ्या जमिनींतील चुना समुद्राच्या पाण्यांत मिसळला म्हणजे मॅग्नेशियमचा एक कॉंपौंड तयार होतो तो हैड्रोक्लोरिक ॲसिडमध्यें विरघळूं शकतो. त्याचें मॅग्नेशियम क्लोराइड तयार होतें. तें वाळवलें म्हणजे पूड मिळतें. त्यांतून विद्युत्प्रवाहाचे साह्यानें मॅग्नेशियम काढतां येतें.

## अर्थशास्त्र

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे

पृष्ठसंख्या सुमारें ३००; किंमत ३ रुपये

या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

## श्रीराम सिल्क मिल्स लि., बंगलोर

[ कंपनीनें १९४१ अखेर ६ टक्के डिव्हिडंड वांटला आहे. ]

**युद्धसाहित्यपुरवठा–खात्याची पॅरेशूटकरितां लागणाऱ्या**

रेशमी कापडाची ऑर्डर पुरी करण्यासाठी लागणाऱ्या भांडवलाकरितां तूर्त एकूण रु. १ लक्षाच्या रकमेपर्यंत

# ठेवी घेणें आहेत

**व्याजाचा दर ४॥ ते ६ टक्के. ठेव किमान रु. ५०० ची असावी. ठेवीवरील व्याज दर सहा महिन्यांनीं दिलें जातें.**

श्रीराम सिल्क मिल्स लि.,
श्रीरामबाग,
बसवनगुडी, बंगलोर.

**नारायण गोविंद नाईक,**
( माजी अध्यक्ष, म्हैसूर चेंबर ऑफ कॉमर्स ) मॅनेजिंग डायरेक्टर

आमच्या कारखान्यांतील माल मुंबईस बॉम्बे स्वदेशी को–ऑपरेटिव्ह स्टोअर्समध्यें व पुण्यास [illegible] व्यापार–संवर्धन–गृहांत पहा.

राहाणेची व भोजनाची उत्तम सोय




फोन नं. ७७९ गणपति चौक, व्यवस्थापक

## N. V. WADNERKAR

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver, Electro-plater & Manufacturer of Sporting Trophies, Medals, Cups etc.

- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -

POONA CITY.



# मधुमेहावरील औषध

**तीन आठवड्यांचे औषधास फक्त रु. ७**

— मागविण्याचा पत्ता —

मॅनेजिंग डायरेक्टर, रूरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड.

१२३ ए, सदाशिव, पुणें २.

## DECCAN BOOK STALL

Booksellers, Publishers & Subscription Agents

**Fergusson College Road, Poona No. 4**

(1) We stock and supply Educational books, General books & Library books.

(2) We supply Government of Bombay and Government of India publications.

(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.

(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.

**वक्तशीर आणि मनपसंत काम करून देणारे**

# मोहन वॉच कंपनी

रेग्युलेशन मोफत

कॉमनवेल्थ बिल्डिंगसमोर लक्ष्मी रोड, पुणें २.



हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.